
# महात्मा गांधींचे विचार

संकलन आणि संपादन

आर. के. प्रभू आणि यू. आर. राव

अनुवाद

ब्रिजमोहन हेडा



# महात्मा गांधींचे विचार


संकलन आणि संपादन

**आर. के. प्रभू आणि यू. आर. राव**

प्रास्ताविक

**आचार्य विनोबा भावे**

आणि

**डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन**

अनुवाद

**ब्रिजमोहन हेडा**



प्रकाशक

**नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद**

**शंभर रुपये**

© नवजीवन ट्रस्ट, १९६७

पहिली आवृत्ती,

मुद्रक व प्रकाशक
जितेंद्र देसाई
नवजीवन मुद्रणालय,
अहमदाबाद-३८० ०१४

हे पुस्तक

महादेव देसाई

यांना समर्पित

ज्यांनी याचे संकलन

करायला पाहिजे होते.

# अनुक्रमणिका


प्रास्ताविक - विनोबा भावे
प्रस्तावना -सर्वपल्ली राधाकृष्णन
भूमिका, सुधारित इंग्रजी आवृत्तीची
भूमिका - पहिल्या व दुस-या इंग्रजी आवृत्तीची
वाचकांना - महात्मा गांधी

**१. स्वतःबद्दल**

१. ना संत ना पापी १
२. माझे महात्मापण १०
३. मला मार्ग माहीत आहे १७
४. माझे जीवनध्येय २३
५. आतला आवाज ३२
६. माझे उपवास ३६
७. माझ्यातील विसंगती ३९
८. माझे लेखन ४२

**२. सत्य**

९. सत्याचा दिव्य संदेश ४४
१०. सत्य ईश्वर आहे ५०
११. सत्य आणि सौंदर्य ५९

**३. निर्भयता**

१२. निर्भयतेचा दिव्य संदेश ६३

**४. श्रद्धा**

१३. श्रद्धेचा दिव्य संदेश ६७
१४. ईश्वराचा अर्थ ७५
१५. रामनाम ८६
१६. प्रार्थना : माझ्या आत्म्याचा आहार ९०
१७. माझा हिंदू धर्म अन्य धर्मीयांना वगळणारा नाही ९९

१८. धर्म आणि राजकारण १०९
१९. मंदिर आणि मूर्तिपूजा ११२
२०. अस्पृश्यतेचा शाप ११५

## ५. अहिंसा

२१. अहिंसेचा दिव्य संदेश १२१
२२. अहिंसेची शक्ती १३१
२३. अहिंसेकरिता प्रशिक्षण १३५
२४. अहिंसेची अंमलबजावणी १३८
२५. अहिंसक समाज १४१
२६. अहिंसक राज्य १४५
२७. हिंसा आणि आतंकवाद १४९
२८. हिंसा आणि भ्याडपणा यांतून निवड १५४
२९. आक्रमणाचा प्रतिकार १५७
३०. भारतासमोरील पर्यायी मार्ग १६५
३१. भारत आणि अहिंसक मार्ग १७०
३२. भारत आणि हिंसक मार्ग १७४

## ६. सत्याग्रह

३३. सत्याग्रहाचा दिव्य संदेश १७८
३४. सत्याग्रहाची शक्ती १८९
३५. असहकार्य १९५
३६. उपवास आणि सत्याग्रह २०१

## ७. अपरिग्रह

३७. अपरिग्रहाचा दिव्य संदेश २०४
३८. गरिबी आणि श्रीमंती २१०
३९. दरिद्रनारायण २१४

## ८. श्रम

४०. भाकरीकरिता श्रमाचा सिद्धान्त २१६

४१. श्रम आणि भांडवल २२४
४२. संप - वैध आणि अवैध २३०
४३. शेतात राबणारे शेतकरी २३८
४४. श्रमिकवर्गासमोर उपलब्ध मार्ग २४१

## ९. सर्वोदय

४५. सर्वोदयाचा दिव्य संदेश २४४
४६. यज्ञाचे तत्त्वज्ञान २५०
४७. ही दानवी संस्कृती २५३
४८. मनुष्य विरुद्ध यंत्र २५७
४९. उद्योगीकरणाचा अभिशाप २६४
५०. समाजवाद २६८
५१. समाजाचा समाजवादी ढाचा २७५
५२. साम्यवादी संप्रदाय २७८

## १०. विश्वस्तता

५३. विश्वस्ततेचा दिव्य संदेश २८१
५४. अहिंसक अर्थव्यवस्था २८८
५५. आर्थिक समता २९१

## ११. ब्रह्मचर्य

५६. ब्रह्मचर्याचा दिव्य संदेश २९७
५७. विवाहाचा आदर्श ३०३
५८. मुले ३०७
५९. संततिनियमन ३०८
६०. स्त्रियांचे समाजातील स्थान व त्यांची भूमिका ३१७
६१. लैंगिक शिक्षण ३२७
६२. स्त्रियांविरुद्ध अपराध ३२९
६३. आश्रमातील व्रते ३३१

## १२. स्वातंत्र्य आणि लोकशाही

६४. स्वातंत्र्याचा दिव्य संदेश ३३९

६५. स्वराज्याचा माझ्याकरिता काय अर्थ आहे ३४६
६६. मी इंग्लंडविरोधी नाही ३५२
६७. रामराज्य ३५६
६८. काश्मीर ३५७
६९. भारतातील विदेशी वस्त्या ३५८
७०. भारत आणि पाकिस्तान ३६२
७१. भारताचे ध्येय ३६४
७२. लोकशाहीचे सारतत्त्व ३६८
७३. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस ३८२
७४. लोकप्रिय मंत्रिमंडळ ३८८
७५. माझ्या स्वप्नातील भारत ३९२
७६. खेड्यांकडे परत ३९३
७७. समग्र ग्रामसेवा ३९८
७८. पंचायतराज ४०५
७९. शिक्षण ४११
८०. भाषावार प्रांतरचना ४२०
८१. गोरक्षण ४२२
८२. सहकारी पशुपालन ४२६
८३. निसर्गोपचार ४२८
८४. सामूहिक स्वच्छता ४३१
८५. सांप्रदायिक सद्भाव ४३३

## १३. स्वदेशी

८६. चरख्याचा दिव्य संदेश ४३९
८७. स्वदेशीचा अर्थ ४४६

## १४. बंधुभाव

८८. प्रेमाचा दिव्य संदेश ४५३
८९. सर्व जीवन एक आहे ४६२
९०. मला सांस्कृतिक वेगळेपणा नको आहे ४६८

| | | |
|---|---|---|
| ९१. | राष्ट्रभक्ती विरुद्ध आंतरराष्ट्रीयतावाद | ४७४ |
| ९२. | वंशवाद | ४८० |
| ९३. | युद्ध आणि शांतता | ४८२ |
| ९४. | परमाणू युद्ध | ४८८ |
| ९५. | शांततेचा मार्ग | ४९२ |
| ९६. | उद्याचे जग | ५०० |

## १५. स्फुट विचार

१. अंधश्रद्धा ५०३, २. चांगुलपणा, ५०३ ३. अनासक्ती ५०४, ४. अनुशासन ५०५, ५. अमरत्व ५०६, ६. आत्मशुद्धीकरण ५०६, ७. आदर्श, ५०७ ८. प्रामाणिकपणा ५०७, ९. इच्छा ५०८, १०. क्षमा ५०८, ११. गुरू ५०८, १२. माझे राजकीय गुरू, ५१० १३. गोपनीयता ५११, १४. घोड्यांची शर्यत ५११, १५. ज्युरीद्वारे खटल्याची सुनावणी ५१२, १६. खोटी निंदा ५१३, १७. डॉक्टर ५१३, १८. औषध ५१४, १९. संपत्ती ५१५, २०. धूम्रपान ५१५, २१. ध्वज ५१६, २२. नद्या ५१६, २३. नियती ५१७, २४. नेतृत्व ५१७, २५. नैतिकता ५१८, २६. पत्रकारिता ५१८, २७. पोषाख ५२१, २८. पाप आणि पापी ५२२, २९. पुनर्जन्म ५२४, ३०. पुरोहित ५२४, ३१. प्रयोग ५२४, ३२. परलोकविद्यावाद अथवा प्रेतात्मवाद ५२४, ३३. विमा ५२५, ३४. आहार ५२५, ३५. मताधिकार ५३०, ३६. महानता ५३०, ३७. आईवडील ५३१, ३८. मृत्यू ५३१, ३९. तरुणवर्ग ५३३, ४०. वकील ५३४, ४१. विचारशक्ती ५३५, ४२. व्यक्ती ५३६, ४३. मद्य ५३६, ४४. श्रमविभाजन ५३७, ४५. वेळ पाळणे ५३८, ४६. सामाजिक सुधारणा ५३८, ४७. साधी राहणी ५३९, ४८. साधन आणि साध्य ५४०, ४९. सामाजिक कार्यकर्ता ५४०, ५०. सामाजिक जीवन ५४१, ५१. सार्वजनिक संपत्ती ५४१, ५२. सार्वजनिक संस्था ५४२, ५३. सुख ५४२, ५४. आरोग्य ५४३

# प्रस्तावना

## (सुधारित इंग्रजी आवृत्तीची)

श्री प्रभू आणि श्री राव यांनी संपादित केलेल्या 'महात्मा गांधींचे विचार' या पुस्तकाची सुधारित आणि वाढवलेली आवृत्ती नवजीवन प्रकाशनातर्फे प्रकाशित होते आहे, ही आनंदाची गोष्ट आहे.

या नवीन आवृत्तीत गांधीजींचे अखेरच्या क्षणापर्यंतचे विचार उद्धृत करण्यात आले आहेत. त्यामुळे ही आवृत्ती अद्ययावत बनली आहे, असे म्हणू शकतो.

'लोकोत्तराणां चेतांसि को हि विज्ञातुमर्हति'

लोकोत्तर पुरुषांच्या मनात काय असते हे कोणाला माहीत हे भवभूतीचे वचन सर्वश्रुत आहे. गांधीजी लोकोत्तर पुरुष असतानाही त्यांनी आपले मन लोकांसमोर उघडे करून ठेवले होते. आपल्याकडून त्यांनी काहीच दडवून ठेवले नव्हते. तरीही त्यांच्या जीवनाचे अंतिम पर्व, ज्याला मी स्वर्गारोहण पर्व असे नाव दिले आहे, माझ्याकरिता गूढच राहिले होते हे मी कबूल केले पाहिजे. एवढेच नाही तर मला तर ते भगवान कृष्णाच्या अंतिम लीलेसारखेच वाटले. ते गूढ उकलण्याकरिता तर गांधीजींनाच परत यावे लागेल. परंतु तोपर्यंत सत्याचा शोध घेणा-या सर्वोदय साधकांना गांधीजींचे विचार समजण्याकरिता या पुस्तकाची नक्कीच मदत होईल अशी मला आशा आहे.

विनोबाचे जय जगत

विनोबा

किशनगंज,

पुर्णिया जिल्हा,

बिहार,

मे १२, १९६६

## प्रस्तावना

(पहिल्या आणि दुस-या इंग्रजी आवृत्तीची)

कधी कधी असे होते की एखादा असामान्य आत्मा साधारण पातळीच्या वर उठून जन्म घेतो, ज्याने ईश्वराविषयी अधिक गंभीरपणे चिंतन केलेले असते, त्याच्या वर्तनातून दैवी हेतू अधिक स्पष्टपणे प्रतिबिंबित होतो, आणि ईश्वरी मार्गदर्शनानुसार तो अधिक धैर्याने आचरण करतो. अशा महान आत्म्याचा प्रकाश अंधकारमय आणि अव्यवस्थित जगात दीपस्तंभाचे काम करतो. गांधीजी त्या पैगंबरांपैकी आहेत ज्यांच्यात अंतःकरणाचे सौंदर्य, आत्म्याचे शील, आणि निर्भय व्यक्तीचे हास्य यांचे दर्शन होते. त्यांच्या जीवनातून आणि त्यांच्या उपदेशातून त्या मूल्यांचे दर्शन होते ज्या मूल्यांना अनेक युगांपासून या देशाने जपले, मानले. आत्म्यावर विश्वास, त्याच्या रहस्याबद्दल आदरभाव, पावित्र्यातील सौंदर्य, जीवनातील कर्तव्याचा स्वीकार, चारित्र्याची शुद्धता ही अशी मूल्ये आहेत जी राष्ट्रीय वा आंतरराष्ट्रीय नसून वैश्वीक आहेत.

अनेक लोक असे आहेत की जे गांधीजींना व्यावसायिक राजकारणी मानायला तयार नाहीत कारण त्यांच्या मते गांधीजी निर्णायक क्षणी गोंधळतात. एका अर्थाने राजकारण एक व्यवसाय आहे व राजकारणी व्यक्ती ती असते जी सार्वजनिक कामे कौशल्याने करू शकते. दुस-या अर्थाने राजकारण एक कर्तव्य आहे आणि राजकारणी व्यक्ती ती व्यक्ती असते जी आपल्या देशबांधवांचे रक्षण करणे व ईश्वरावर श्रद्धा ठेवण्याकरिता व मानवतेवर प्रेम करण्याकरिता त्यांना प्रेरित करणे हे आपले जीवनध्येय मानत असते व त्याकरिता ती पूर्ण सावधगिरीने काम करत असते. असा राजकारणी शासनव्यवहाराचे संचालन करण्यात अयशस्वी होऊ शकतो परंतु आपल्या सोबत्यांच्या मनात ध्येयाबद्दलची अढळ श्रद्धा निर्माण करण्यात तो नक्कीच यशस्वी होत असतो. गांधीजी मूलतः या दुस-या वर्गातील राजकारणी व्यक्ती होते. त्यांना खात्री होती की आपण आध्यात्मिक जगावर लक्ष केंद्रित केले तर आपण अशा जगाची निर्मिती करू शकू जिथे ना गरिबी असेल ना बेकारी, तसेच नसेल

तिथे रक्तपाताला वा युद्धाला स्थान. त्यांचे म्हणणे आहे : 'उद्याचे जग अहिंसेवर आधारित असेल - असायलाही हवे. हे एक दूरवरचे ध्येय आहे, एक अव्यावहारिक युटोपिया (काल्पनिक जग) आहे असे वाटू शकते. परंतु यावर आजच आणि आताच कृती करता येत असल्यामुळे ते अप्राप्य मुळीच नाही. कोणतीही व्यक्ती दुस-याची वाट न पाहता भावी जगाच्या जीवन पद्धतीनुसार म्हणजे अहिंसेच्या पद्धतीनुसार जगायला सुरुवात करू शकते. आणि जर व्यक्ती असे करू शकत असेल तर सगळेच्या सगळे व्यक्तिसमूह असे का करू शकणार नाहीत? आणि सगळी राष्ट्रे असे का करू शकणार नाहीत? सामान्यपणे ध्येय पूर्णपणे साध्य करता येणार नाही या भीतीनेच लोक सामान्यपणे सुरुवात करायला घाबरत असतात. आपली ही मनोवृत्तीच प्रगतीच्या आड येणारा फार मोठा अडसर आहे - हा अडसर असा आहे की इच्छा असेल तर प्रत्येक माणूस तो दूर करू शकतो.'(१)

सामान्यपणे अशी टीका करण्यात येत असते की हे जग संतांनी भरलेले आहे या सोप्या परंतु चुकीच्या धारणेने गांधीजी पुढे जात असतात आणि त्यांची दृष्टी त्यांच्या गृहीतकांपेक्षाही फार उंच उडी घेत असते. गांधीजींच्या दृष्टिकोनाचा हा चुकीचा अन्वयार्थ आहे. त्यांना माहीत आहे की चांगल्यात चांगले जीवनही द्वितीय श्रेणीचे जीवन असते व आपल्याला व्यवहार आणि आदर्श यांच्यात सतत तडजोड करावी लागत असते. देवाच्या राज्यात कोणत्याही तडजोडीची गरज नसते आणि नसतात तिथे कोणत्याही मर्यादा. परंतु इथे या पृथ्वीवर निसर्गाचे निर्दयी नियम असतात. मानवी आकांक्षांच्या आधारावर आपल्याला एका सुव्यवस्थित जगाची निर्मिती करायची असते. प्रयत्न आणि अडचणी यांच्या माध्यमातून आदर्श अस्तित्वात येण्याकरिता धडपडत असतात. सुसंस्कृत जगाचा आदर्श अहिंसा आहे असे गांधीजींना वाटत असले तरी ते हिंसेला परवानगी देतात. 'एखाद्या माणसात धैर्य नसेल तर त्याने भ्याडपणाने धोक्याच्या भीतीने पळ काढण्याऐवजी मारण्याची आणि मरण्याची कला शिकावी अशी माझी इच्छा आहे.' (२) 'जग पूर्णपणे तर्कावर चालत नाही. जगण्याच्या प्रक्रियेत काही ना काही हिंसा होतच असते व आपल्याला किमान हिंसेचा मार्ग निवडावा लागत असतो.' (३) समाजाच्या प्रगतीच्या तीन अवस्था स्पष्टपणे दिसतात - पहिल्या अवस्थेत जंगलाचा कायदा चालतो. त्यात हिंसा आणि स्वार्थाला प्राधान्य असते; दुस-या अवस्थेत कायद्याचे राज्य असते, निष्पक्ष न्याय, न्यायालये, पोलीस आणि तुरुंग यांना प्राधान्य असते तर तिस-या

अवस्थेत अहिंसा आणि निस्वार्थीपणा यांना प्राधान्य असते म्हणजेच तिथे प्रेम आणि कायदा हे एकच असतात. सुसंस्कृत मानवतेच्या या शेवटच्या ध्येयाची सिद्धी गांधीजींसारख्या लोकांच्या कार्यामुळे जवळ आली आहे.

गांधीजींचे विचार आणि त्यांची चिंतन प्रक्रिया यांच्याबद्दल आज किती तरी गैरसमज आहेत. मला आशा आहे की या पुस्तकात गांधीजींची श्रद्धा व आचरण यांच्यासंबंधीची गांधीजींच्या लेखनातील जी उद्धरणे दिली आहेत त्यामुळे गांधीजींची भूमिका स्पष्ट होऊन आधुनिक मनाला ती समजून घेण्यास मदत होईल.

-सर्वपल्ली राधाकृष्णन

बनारस

४ एप्रिल १९४५

टिपा :

(१) लिबर्टी, लंडन, १९३१

(२) हरिजन, १५-१- १९३८, पृष्ठ ४१८

(३) हरिजन, २८-९-१९३४, पृष्ठ २५९

# भूमिका

## (सुधारित इंग्रजी आवृत्तीची)

कोणत्याही सत्पुरुषाचे त्याच्याच जिवंतपणी मूल्यांकन करणे व इतिहासातील त्याचे स्थान ठरवणे सोपी गोष्ट नसते. गांधीजी एकदा म्हणाले होते, 'माणसाच्या सुखाविषयी त्याच्या जिवंतपणी निर्णय घेणे सोलनला कठीण झाले होते; मग माणसाच्या महत्तेबद्दल निर्णय घेणे ही किती कठीण गोष्ट होईल?'(१) अजून एका प्रसंगी स्वतःबद्दल बोलताना ते म्हणाले होते, 'माझे डोळे मिटल्यानंतर आणि हा देह भस्मीभूत झाल्यानंतर माझ्या कामावर निर्णय घेण्याकरिता बराच वेळ शिल्लक राहील.'(२) आता त्यांच्या हौतात्म्याला एकोणीस वर्षे झाली आहेत.

त्यांच्या मृत्यूवर जगाने असा शोक व्यक्त केला होता जसा मानव इतिहासात अन्य कोणाच्याही मृत्यूवर करण्यात आला नव्हता. ज्याप्रकारे त्यांचा मृत्यू झाला त्या प्रकारामुळे तो शोक अजूनच वाढला. कोणी तरी एक प्रेक्षक म्हणाला होता की त्यांच्या हत्येची आठवण अनेक शतके ताजी राहील. संयुक्त राज्य अमेरिकेच्या हर्स्ट प्रेसचे मत आहे की लिंकनच्या अशाच हौतात्म्यानंतर इतर कोणाच्याही हौतात्म्याचा जगावर असा परिणाम झाला नाही. गांधीजींबद्दलही असे म्हणणे उचित होईल की 'ते आता युगपुरुषांच्या प्रभावळीत आले आहेत.' त्या काळोख्या रात्री जवाहरलाल नेहरूंनी उच्चारलेले शब्द अचानक कानावर आदळतात, 'आपल्या जीवनातील एक ज्योत निमाली.' याच भावनेचा पुनरुच्चार करत न्यूयार्क टाईम्सने ३१ जानेवारी १९४८ला त्यापुढे लिहिले की आता जे काही सांगण्यासारखे राहिले आहे ते इतिहासाच्या क्रूर हातांनी लिहिले जाईल. प्रश्न आहे इतिहास गांधीजींसंबंधी कोणता निर्णय घेतो?

जर समकालीन लोकांची मते महत्त्वाची मानायची तर गांधीजींची गणना मानव इतिहासातील महानतम पुरुषांमध्ये केली जाईल. इ. एम. फॉस्टरचे मत होते की बहुधा गांधीजींना या शतकातील महानतम पुरुष मानले जाईल. अर्नोल्ड टॉयन्बीला तर असेच होईल असा दृढ विश्वास होता. 'गांधीजी गौतम बुद्धानंतरचे सर्वश्रेष्ठ

भारतीय होते व येशू ख्रिस्तानंतरचे ते सर्वात श्रेष्ठ पुरुष होते' असे डॉ. जे. एच. होम्स यांनी गांधीजींचे मूल्यांकन केले आहे. परंतु ज्यांनी एका रक्तहीन क्रांतीद्वारे भारतवासीयांना विदेशी शासनाच्या जोखडातून मुक्त केले त्या भारतवासीयांच्या अंतःकरणात तर त्यांना बहुधा महात्मा म्हणूनच कायम स्थान मिळेल वा ते त्यांची अजूनच प्रेमाने बापू' वा 'राष्ट्रपिता' म्हणून आठवण ठेवतील.

गांधीजींमध्ये असे कोणते गुण होते ज्यामुळे ते या महानतेपर्यंत पोहोचले? ते केवळ एक महान व्यक्तीच नव्हते; ते महापुरुष आणि सत्पुरुष दोन्ही होते - एका टीकाकाराच्या म्हणण्याप्रमाणे हा योग अतिशय दुर्लभ आहे आणि त्याचे महत्त्व बहुधा लोकांना कळत नाही. या संदर्भात जॉर्ज बर्नार्ड शॉ यांनी थोडक्या शब्दात केलेले भाष्य आठवते : 'फार चांगले असणेही धोक्याचे असते.'

इतिहासात या गोष्टीची नोंद होईल की या लहानशा दिसणा-या माणसाचा आपल्या देशबांधवांवर इतका जबरदस्त प्रभाव होता की तसे उदाहरण मिळणे कठीण आहे. या प्रभावामागे एखादी लौकिक शक्ती वा अस्त्रशस्त्राची कोणतीही शक्ती कार्यरत नव्हती ही आश्चर्याची गोष्ट आहे. गांधीजींच्या या गूढाचे रहस्य, जर त्याला गूढ मानायचे तर, लॉर्ड हॅलिफॉक्स यांच्या मतानुसार - त्यांचे श्रेष्ठ चरित्र आणि अनुकरणीय असे श्रेष्ठ आचरण आहे. लॉर्ड हॅलिफॉक्स मिठाच्या सत्याग्रहाच्या दरम्यान भारताचे महाराज्यपाल होते. गांधीजींना समजून घेता येईल इतकी जवळीक त्यांच्यामध्ये निर्माण झाली होती. चरित्र आणि आचरणाची शक्ती यांच्याद्वारेच गांधीजींनी आपल्या पिढीच्या विचारांवर इतका खोल प्रभाव टाकला होता, उपदेश वा सूचना यांच्याद्वारे नाही. प्रा. एल. डब्ल्यू. ग्रेंनस्टेड यांचे हे मत अगदी बरोबर आहे की गांधीजींची महती त्यांनी साध्य केलेल्या गोष्टींमध्ये नव्हती तर चारित्र्यात होती. फिलिप नोएल-बेकर यामध्ये अजून दोन गोष्टी जोडू इच्छितात - शुद्ध उद्दिष्टे आणि त्याकरिता निःस्वार्थ समर्पणभाव.

परंतु गांधीजींच्या अभूतपूर्व उत्कर्षामागे केवळ एवढीच कारणे नव्हती. समकालीनांचीच साक्ष उद्धृत करायची तर रेगिनाल्ड सोरेस यांचे म्हणणे आहे की गांधीजींचा भारतावरच नाही तर आधुनिक काळावर जो अमाप प्रभाव होता त्याचे कारण असे असे होते की ते आत्मशक्तीचे साक्षीदार होते व तिचा उपयोग त्यांनी राजकीय कार्यात केला. गांधीजींची मानव आत्म्यावरील श्रद्धा व सांसारिक विषयांमध्ये आध्यात्मिक मूल्ये आणि पद्धती लागू करण्यावर त्यांनी दिलेला भर यांत

गांधीजींचे असामान्यत्व आहे. डॉ. फ्रॅन्सिस नेल्सन याच गोष्टीकडे लक्ष वेधत गांधीजींबद्दल लिहितात : 'गांधीजी कर्मात डायोजिनिस, नम्रपणात सेंट फ्रॅन्सिस, बुद्धिमत्तेत सॉक्रेटिस होते; आपल्या उद्दिष्टांच्या पूर्ततेकरिता शक्तीची मदत घेणा-या नेत्यांच्या पद्धती किती क्षुद्र आहेत हे गांधीजींनी याच गुणांच्या आधारे जगाला दाखवून दिले. या स्पर्धेत राज्याच्या भौतिक शक्तीच्या विरोधावर आध्यात्मिक प्रामाणिकपणाचा विजय होतो'. (३)

गांधीजींनी राज्याच्या संघटित शक्तीच्या विरोधात सत्य आणि अहिंसेच्या शक्तीला आणून उभे केले होते, आणि त्यांचा विजय झाला होता. परंतु त्यांनी अहिंसा आणि सत्याच्या ज्या तत्वाचा प्रचार केला होता व ज्यानुसार आचरण केले होते ते तत्त्वज्ञान काही नवीन नव्हते. खरे म्हणजे त्यांनी हे मान्य केले होतेच त्यांचा असाही दावा होता की 'हे तत्व पर्वताएवढे प्राचीन आहे.' त्यांनी तर या तत्त्वज्ञानाला एक जिवंत सत्य म्हणून केवळ पुनर्जीवन दिले होते व एका नवीन पातळीवर त्याचा प्रयोग केला होता. सत्य हे जिवंत सिद्धान्त आहे व ते विकसनशील असल्यामुळे कळकळ असलेल्या आपल्या कोणत्याही पुजा-यासमोर नवनवीन रूपात प्रगट होत असते या आपल्या श्रद्धेनुसार त्यांनी अहिंसेच्या सिद्धान्ताच्या नवीन परिमाणांचा व नवीन क्षमतांचा शोध लावला असल्याचा त्यांचा दावा होता. हे खरे आहे की हे तत्व सत्याचीच दुसरी बाजू होते, परंतु याच कारणामुळे ते सत्यापासून अभिन्न होते. एक व्यक्ती म्हणून, समुदाय म्हणून वा राष्ट्र म्हणून तोपर्यंत तुमची मुक्ती होऊ शकत नाही जोपर्यंत तुम्ही अहिंसेच्या व सत्याच्या मार्गाचे अनुसरण करत नाही अशी श्रद्धा जगात पसरलेल्या आपल्या सगळया सहका-यांच्या मनामध्ये निर्माण करणे हे गांधीजींनी आपले जीवनध्येय मानले होते.

एका टीकाकारानुसार राजकारणात त्या मार्गाचा अर्थ होता - व आहे - एक आमूलाग्र क्रांती. म्हणजेच वैयक्तिक वा राजकीय जीवनात संपूर्ण बदल वा मग काहीही बदलायचे नाही. परंतु वैयक्तिक व सार्वजनिक जीवन म्हणजेच माणसाचे अंतरंग व बहिरंग जीवन अशा प्रकारचा कोणताही भेद करणा-या भिंतीचे अस्तित्व गांधीजींना मान्य नव्हते. या अर्थाने ते जगातील बहुतांश राज्यशास्त्रज्ञ व राजकारणी यांच्यापेक्षा अगदी वेगळे होते व यातच त्यांच्या शक्तीचे रहस्य दडलेले आहे.

गांधीजी स्वतःच म्हणाले होते की त्यांच्याजवळ जी काही शक्ती वा प्रभाव आहे ते सर्व धर्मातून निर्माण झालेले आहेत. स्टॅफर्ड क्रिप्स जेव्हा म्हणाले की आपल्या

काळात गांधीजींपेक्षा कोणताही आध्यात्मिक नेता निर्माण झालेला नाही तेव्हा त्यांच्या मनात कदाचित हीच गोष्ट असावी. गांधीजींच्या व्यक्तिमत्त्वाची हीच बाजू साररूपात मांडताना मॅन्चेस्टर गार्डियनने ३१ जानेवारी १९४८ला लिहिले, "या सर्वांपेक्षाही मोठी गोष्ट म्हणजे ते असे व्यक्ती होते ज्यांनी धर्माचा अर्थ व त्याचे मूल्य याविषयीची आमची संकल्पना पुनर्जीवित केली आणि तिला नवीन स्फूर्ती दिली. त्यांच्यामध्ये नवीन तत्त्वज्ञानाला वा धर्माला जन्म देणारी सर्वसमावेशक प्रज्ञा वा भावनात्मक संपन्नता नसली, तरी त्यांची नैतिक प्रवृत्तीची शक्ती व शुद्धता इतक्या सखोल धार्मिक भावनेतून निर्माण झाली होती की..."

आज जग निश्चितपणे विनाशाच्या काठावर उभे आहे व त्यापासून त्याला वाचवणे अतिशय कठीण असल्याचे जाणवते आहे. याला कारणं आहेत : विचारसरणीविषयी सुरू असलेला सतत संघर्ष, इतिहासातील कोणत्याही युद्धापेक्षा भयानक युद्धाकडे नेणारा वंशविषयक तीव्र द्वेष आणि कल्पनातीत विध्वंस करू शकणा-या अण्वस्त्र साठ्यात होत असलेली भयावह वाढ. अशा परिस्थितीत माणसाला आपल्या अस्तित्वाच्या रक्षणाकरिता दोनपैकी एका शक्तीची निवड करावी लागेल - नैतिक शक्ती वा भौतिक शक्ती. भौतिक शक्ती मानवजातीला आत्मनाशाकडे नेत आहे. गांधीजी नैतिक शक्तीचे प्रतिनिधित्व करत असल्यामुळे ते आपल्याला दुसरा मार्ग दाखवतात. हा मार्ग नवीन नाही असे तुम्ही म्हणू शकता. परंतु हा असा मार्ग आहे की जग एक तर त्याला विसरले आहे वा त्या मार्गावरून जाण्याचे धैर्य जगाजवळ नाही. परंतु आता या मार्गाची उपेक्षा केली तर आपले अस्तित्वच धोक्यात येऊ शकते.

या पुस्तकात गांधीजी आपल्याच शब्दांत आपली बाजू मांडत आहेत. इथे त्यांच्यात आणि वाचकांत कोणी भाष्यकार नाही कारण त्याची आवश्यकताच नाही. पश्चिमेकडील लोकांना काही वेळेस गांधीजींना समजून घेणे कठीण होते. उदाहरणार्थ होरेस अलेक्झॅन्डर यांनी विधान केले आहे की काही प्रसंगी गांधीजींचा सखोल तत्त्वज्ञानात्मक युक्तिवाद पाश्चात्त्य लोकांना अतिशय गोंधळात टाकणारा असू शकतो. नैतिक, सामाजिक, राजकीय आणि आध्यात्मिक बाबींसंबंधी गांधीजींचे मानस समजून घेण्याकरिता या खंडामध्ये मूलभूत साहित्य देण्यात आले आहे. ते काहीही असले तरी मानसशास्त्राच्या गंभीर व सखोल अभ्यास करणा-या विद्यार्थ्यांना गांधीजींच्या प्रेरणा आणि त्याचे आचरण यांच्यासंबंधीच्या मूलभूत स्रोतांचा सखोल अभ्यास

करावा लागेल. त्याकरिता या पुस्तकाचा उपयोग एक स्रोतसंदर्भ म्हणून होऊ शकेल.

ही सुधारित आणि परिवर्धित आवृत्ती वीस वर्षांनंतर प्रकाशित होते आहे. यात त्याही सामग्रीचा समावेश आहे जिचा मागील आवृत्तीत समावेश करणे शक्य झाले नव्हते. आपल्या या निर्णायक अंतिम वर्षात म्हणजे १९४६ - ४८ या काळात गांधीजींचे विचार आणि तत्त्वज्ञान - जेव्हा ते जाती, पंथ, पक्ष आणि एवढेच नाही तर देशाच्याही सीमा ओलांडून मानव आत्म्याच्या लोकोत्तर उंचीला स्पर्श करत होते - तेव्हा गांधीजी संपूर्ण मानवतेचे झाले होते. केवळ मानव धर्मच मानवतेचे रक्षण करण्याकरिता समर्थ असल्यामुळे या काळात ते मानव धर्माचाच प्रचार करू लागले होते व त्याचीच परिणती त्यांच्या हौतात्म्यात झाली होती. याच कारणामुळे या अखेरच्या वर्षांमधील त्यांनी व्यक्त केलेले विचार व मते आपल्याकरिता व आपल्या भावी पिढ्यांकरिता पवित्र आहेत व निरोपाच्या भाषणाप्रमाणे त्यांच्यामध्ये परिपक्वता असल्यामुळे त्याचे संपूर्ण मानस जाणून घेण्याकरिता ते समजून घेणे अपरिहार्य आहे. या आवृत्तीत त्या सर्व विचारांचा समावेश करता यावा म्हणून काही नवीन प्रकरणे लिहावी लागली असून जुन्या प्रकरणांमध्ये बरीच भर घालावी लागली आहे.

याशिवाय पूर्वीच्या आवृत्त्यांमध्ये एक दोष राहिला होता. त्यात शुद्ध भारतीय समस्यांवरील संपूर्ण नाही तरी गांधीजींच्या ब-याचशा विचारांचा समावेश करण्यात आलेला नव्हता. याचे एक कारण होते जागेचा अभाव आणि दुसरे कारण विदेशी वाचक डोळ्यासमोर होते हे आहे. गांधीजींचे व्यक्तित्व आणि त्यांची दृष्टी यांचे संपूर्ण आकलन करता येण्याकरिता हे आवश्यक होते. त्यांचा विश्वास होता की भारताजवळ विश्वाला देण्याकरिता एक संदेश आहे व भारताने त्या तत्त्वज्ञानाचे उदाहरण घालून द्यावे व भाष्यकार व्हावे अशी त्यांची इच्छा होती. त्यांच्या स्वप्नातील या भारताचे दर्शन वाचकांना 'स्वातंत्र्य आणि लोकशाही' या प्रकरणातून होऊ शकेल.

या पुस्तकाच्या उद्दिष्टाच्या व हेतूच्या परिपूर्तीच्या दृष्टीने विषयवस्तुची लक्षात घेण्यासारखी पुनर्व्यवस्था आणि पुनर्रचना करण्यात आली आहे.

या पुस्तकाच्या तयारीकरिता ज्या पुस्तकांमधून, वृत्तपत्रांतून व पत्रिकांमधून साहित्य संकलित करण्यात आले आहे त्या सर्व प्रकाशकांचे संकलकद्वय आभार व्यक्त करत आहेत. या नवीन आवृत्तीकरिता आचार्य विनोबा भावे यांनी फार महत्त्वाची प्रस्तावना लिहिली आहे. त्याकरिता आम्ही त्यांचे अतिशय कृतज्ञ आहोत.

अजून एक गोष्ट सांगायची आहे. या भूमिकेखाली केवळ एकाच संकलकाची सही असल्याचे वाचकांना आढळेल. कारण असे आहे माझे दुसरे सहकारी आता या जगात नाहीत. गांधीजींच्या उपदेशांचे आजीवन अभ्यासक आणि प्रामाणिक विवेचक व माझ्यासहित अनेक लोकांचे मार्गदर्शक श्री. आर. के. प्रभू यांचे ४ जानेवारीला निधन झाले. ही दुःखद घटना नवीन आवृत्तीची भूमिका लिहिण्याआधी व प्रकाशनाआधीच घडली. यामुळे इथे जे काही लिहिण्यात आले आहे त्याची जबाबदारी आता केवळ माझी आहे. याशिवाय जे सांगायला पाहिजे होते ते सांगायचे राहून गेले असेल तर तो दोष माझा आहे. परंतु श्री प्रभू अखेरच्या दिवसापर्यंत पत्र लिहून आपल्या पांडित्यपूर्ण विचारांचा मला लाभ देत असल्यामुळे त्या प्रमाणात माझी जबाबदारी आणि दोष सीमित होतात.

गेली तीस वर्षे मला प्रभूंच्या मैत्रीचे सौभाग्य लाभले होते आणि या दरम्यान १ ब-याच काळापासून त्यांचा सक्रिय सहकारी म्हणून मी काम केले. त्यामुळे मी त्यांची कितीही प्रशंसा केली तरी ती माझ्या दृष्टीने कमीच होईल आणि याच कारणामुळे मी त्यांच्याविषयी जे काही सांगेन ते वाचकांना निःपक्षपातीपणाचे वाटणार नाही.

प्रभू एका भव्य गांधी संघटनेचे संघटक होते. त्या योजनेअंतर्गत या खंडासहित अनेक खंडांची रचना केली जाणार होती. आमच्या संयुक्त प्रयत्नांनी त्यांपैकी केवळ तीनच खंड तयार होऊ शकले. सुदैवाने प्रभूंनी स्वतःच अनेक लहान लहान पुस्तके तयार केली आणि ती सर्व नवजीवनद्वारा प्रकाशित झाली आहेत. गांधी साहित्याचा गंभीरपणे अभ्यास करणारा एखादा माणूसच प्रभूंच्या साहित्याचे मूल्यांकन करू शकेल. त्यांच्याकडून मला प्रेरणा, नेतृत्व व साहचर्य यांचा जो लाभ झाला त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करूनच मी समाधान मानले पाहिजे.

परंतु इथे मी गांधी संकलनातील प्रभूच्या स्थानाबद्दलच्या दोन वैशिष्ट्यपूर्ण आणि अनाहूतपणे करण्यात आलेल्या निरीक्षणांचा उल्लेख करीन. पहिले निरीक्षण स्वतः गांधीजींचे आहे. पुण्यातील निसर्गोपचार केंद्रात गांधीजींनी २७ जून १९४४ला आम्हा दोघांना अविस्मरणीय मुलाखत दिली होती. त्या मुलाखतीच्या दरम्यान गांधीजींनी पुढील मत व्यक्त केले होते, ‘प्रभू, तुझ्यामध्ये माझ्या लेखनाची भावना पूर्णपणे भिनलेली आहे.‘ दुसरे निरीक्षण गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचे प्रसिद्ध अभ्यासू डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे आहे.

प्रभूंच्या निधनानंतर व्यक्तिगत शोकसंदेशात त्यांनी लिहिले, ‘गांधींवरील त्यांच्या साहित्याच्या प्रकाशनामुळे आपल्या सर्वांना त्यांच्या जीवनध्येयाची चांगली आठवण राहील.‘

य़ु. आर. आर.

नवी दिल्ली,

जानेवारी १३, १९६७

या भूमिकेतील टिपा

(१) हरिजन, १० - १२ - १९३८

(२) हरिजन, ४ - ४ - १९२०

(३) सर्वपल्ली राधाकृष्णन, ’महात्मा गांधी; एसेज ॲन्ड रिफ्लेक्शन्स ऑन हिज लाईफ ॲन्ड वर्क्स’, जॉर्ज ॲलन ॲन्ड अनविन, लंडन (१९४९), पृष्ठ ५३७.

# भूमिका

## (पहिल्या व दुस-या इंग्रजी आवृत्तीची.)

‘गांधी एक गूढ रहस्य आहे’ ही गोष्ट केवळ त्याच लोकांच्या तोंडून ऐकायला येत नाही जे गांधीजींच्या उद्‌गारांचे आणि आचरणाचे टीकाकार आहेत तर ते लोकही म्हणतात जे गांधीजींच्या ब-याच घनिष्ट संपर्कात होते. ही गोष्ट याकरिता अजूनच आश्चर्यजनक आहे की गत पन्नास वर्षांपासून गांधीजींचे खाजगी जीवन जवळपास नसल्यासारखेच आहे. ते क्वचितच एकटे असतात; त्यांचे कामकाज, बोलणेचालणे, ध्यान, प्रार्थना आणि भोजन या सर्व गोष्टी त्यांच्या सहका-यांसोबतच होत असत. ते झोपतात तेही उघड्या आकाशाखालील एका शयनकक्षात. एकटे तर ते क्वचितच कधी झोपत असतील.

गांधीजींनी स्वतःच मान्य केले आहे की त्यांच्या जीवनात विसंगती आहे. त्याबद्दल खेद प्रगट करणे तर दूर, परंतु त्यांचे म्हणणे आहे की, ‘मी कधीही सुसंगतीची अंधपूजा केली नाही. मी सत्याचा पुजारी आहे, त्यामुळे एखाद्या प्रश्नाबद्दल एखाद्या निश्चित वेळी मला जो अनुभव येतो तेच मी सांगितले पाहिजे, आणि त्याबद्दल मी आधी काय म्हणालो होतो त्याची चिंता मी करू नये. जसजशी माझी दृष्टी स्पष्ट होत जाते तसतसे दैनिक अभ्यासाने माझे विचारही स्पष्ट होत गेले पाहिजे.’ (१) त्यांना विश्वास होता की त्यांच्यातील विसंगती वरवरची होती. त्यांनी लिहिले आहे, ‘मला असे वाटते की माझ्या विसंगतीमध्येही एक सुसंगती आहे.’ (२) काही विसंगती त्यांच्या तडजोडीच्या भावनेमुळे निर्माण झाली आहे. तो त्यांच्या आध्यात्मिक प्रवृत्तीचा अभिन्न भाग आहे. ते म्हणतात, ‘आयुष्यभर सत्याचा आग्रह धरल्यामुळे मी तडजोडीतील सौंदर्य पाहायला शिकलो आहे.’ (३) सत्याबद्दलच्या अतिशय आदरामुळेच ते इतरांच्या दृष्टिकोनातील सत्य पाहू शकतात. त्याचबरोबर त्यांची मान्यता आहे की अशी काही चिरंतन तत्व असतात ज्यांच्याबद्दल मुळीच तडजोड करता येऊ शकत नाही. आणि माणसाने गरज पडल्यास त्याकरिता प्राणांची आहुती देण्याकरितासुद्धा तयार राहिले पाहिजे.

गांधीजींच्या मानसाबद्दलचं हे कोडं त्यांच्या आत्म्याचं गूढ आहे.

'अंतःकरणाचे स्वतःचे काही तर्क असतात व ते तर्कबुद्धीला माहीतच नसतात.' (४) त्यांचे विविध लेखन आणि त्यांचे उद्‌गार यांच्यातून त्यांच्या तत्त्वज्ञानाची उभारणी करावी लागते. आपल्या दृष्टिकोनाची सांगोपांग व्याख्या करण्याचा त्यांनी कधीही प्रयत्न केला नाही. त्यांच्या आत्मकथेच्या शीर्षकावरून कळते की ते स्वतःला सत्यशोधकच समजतात व आपले अनुभव इतरांना सांगण्याकरिता ते नेहमी तयार आणि उत्सुक असतात. परंतु ते असा दावा करत नसतात की त्यांचे निष्कर्षच अंतिम आहेत. अनेकदा असे प्रसंग आले आहेत जेव्हा राष्ट्राचे पुढारी म्हणून त्यांनी मौन राहायला पाहिजे होते वा काही वेगळे मत व्यक्त करायला पाहिजे होते, परंतु त्यांनी आपल्या मनातील जसेच्या तसे सांगितले. त्यामुळे त्यांच्यावर बेजबाबदार पद्धतीने वागण्याचा आरोपही करण्यात आला. या आरोपाच्या उत्तरात ते हेच म्हणाले होते की प्रत्येक व्यक्तीला सत्याचे जसे दर्शन होते तसेच तिने सांगणे हे तिचे कर्तव्य असते. व्यक्तीचा हेतू शुद्ध असेल तर कोणतीही हानी होऊ शकणार नाही. त्यांचे म्हणणे होते की हेतू पूर्णपणे शुद्ध असल्यानंतरही व्यक्तीकडून काही चुका झाल्या तर त्यामुळे जगाची वा त्या व्यक्तीची कोणतीही हानी होऊ शकत नाही असा मला विश्वास वाटतो. (५)

आध्यात्मिक विषयांबद्दल गांधीजींचे म्हणणे आहे की वैज्ञानिक ज्या प्रयोग-पद्धती म्हणजेच प्रयोग आणि चुकांपासून शिकण्याच्या पद्धती उपयोगात आणत असतात त्याच पद्धतीनुसार ते आचरण करत असतात. कोणत्याही निष्कर्षापर्यंत कदाचित ते पोहोचूही शकले नसतील परंतु आइन्स्टाईनच्या सिद्धान्ताने प्रभावित न होताही एखादा खगोलशास्त्रज्ञ ज्याप्रमाणे पृथ्वीचे सूर्यापासूनचे सरासरी अंतर २,३८,८५७ मैल आहे असे सांगू शकतो त्याचप्रमाणे आजीवन 'सत्याचे प्रयोग' केल्यानंतर एक अशी स्थिती निर्माण झाली होती की गांधीजीसुद्धा ठोस आणि निश्चित पद्धतीने आपले निष्कर्ष सांगण्याच्या स्थितीत पोहोचले होते. त्यांचे म्हणणे आहे : 'आत्मशुद्धीकरिता सतत प्रयत्न करत असताना मी माझ्या आतील आवाज ऐकण्याची क्षमता विकसित केली आहे.'(६) आणि गांधीजींच्या दृष्टिकोनातून हा आतला आवाज म्हणजेच सत्य आहे. प्रेमाला आणि ईश्वराला ते एकमेकांचा पर्याय मानतात. : 'माझे ध्येय संपूर्ण जगाबरोबर मैत्री करण्याचे आहे....(७) 'मी माणसाच्या स्वभावाकडे संशयाच्या दृष्टीने पाहू शकत नाही,

कोणत्याही उदात्त आणि मैत्रीपूर्ण कार्याला तो प्रतिसाद देईल, निश्चित देईल.'(८) अखेरीस त्यांचा विश्वास आहे की 'श्रमावर जितका भर द्यावा तितका कमीच आहे.'(९) 'सर्व लोक केवळ भाकरीकरिता काम करू लागले तर सर्वांकरिता पुरेसे अन्न आणि विश्रांती उपलब्ध होईल.'(१०) तेव्हा 'आपल्या गरजा किमान होतील, आपला आहार साधा होईल व आपण जगण्याकरिता खाऊ, खाण्याकरिता जगणार नाही.'(११) गांधीजींना व्यक्तीच्या आत्म्याच्या मुक्तीची काळजी वाटते व त्यांच्या दृष्टिप्रमाणे उच्च विचारांना साध्या राहणीपासून वेगळे करता येऊ शकत नाही. 'मला विकास हवा आहे, मला स्वयंनिर्णय पाहिजे. मला स्वातंत्र्य पाहिजे, परंतु या सर्व गोष्टी मला आत्म्याकरिता पाहिजे.'(१२)

या पुस्तकाच्या रचनेमागील भूमिका काय आहे हे जाणून घेण्याची कदाचित वाचकांना इच्छा होईल. जवळपास बारा वर्षांपूर्वी आमच्यापैकी कोणाच्या तरी मनात असा विचार आला की गांधीजींच्या लेखनातून आणि भाषणातून जे 'शाश्वत सत्य' अभिव्यक्त झाले आहे त्याचे व्यवस्थित पद्धतीने संकलन केले तर त्यामागे जे तत्त्वज्ञान आहे ते स्पष्ट करता येऊ शकेल व गांधीजींच्या अंतरंगाचे दर्शन होऊ शकेल. तेव्हा आम्ही सत्य, अहिंसा, सत्याग्रह, प्रेम, श्रद्धा, अपरिग्रह, स्वातंत्र्य, उपवास, प्रार्थना, ब्रह्मचर्य, श्रम, यंत्रे इत्यादी विषयांवरील गांधीजींच्या विचारांचा समावेश असलेली जवळपास एक डझन पुस्तके प्रकाशित करण्याची योजना तयार केली आणि असाही विचार केला की अजून एक खंड वेगळा तयार करून त्यात या विषयांवरील गांधीजींच्या विचारांचा सार देण्यात यावा. यानंतर साहित्य संकलनाचे काम सुरू झाले. काही वर्षांतच असे वाटू लागले की या कामाकरिता कोणा तरी एका सहकारी कार्यकर्त्याचे सहकार्य घेणे आवश्यक आहे आणि तेव्हापासून आम्ही दोघे सतत या कामाला लागलेलो आहोत. मागील दोन वर्षांत अशा काही घटना घडल्या की आम्हाला आमचे लक्ष अखेरच्या खंडावर केंद्रित करणे भाग पडले. हा अखेरचा खंड तोच होता ज्यात आम्हाला गांधीजींच्या विचारांचा सार द्यायचा होता. तोच खंड आता वाचकांसमोर सादर आहे. हे खरे आहे की आमच्या मूळ योजनेपेक्षा हा फार संक्षिप्त आहे.

याच्या हस्तलिखिताचा मसुदा गांधीजींना दाखवण्यात आला होता व त्यांनी तो वाचला होता. गांधीजींनी आमच्या प्रयत्नांना मान्यता दिली व याबद्दल

आम्ही त्यांचे ऋणी आहोत. गांधीजींच्या लेखनाचा उपयोग करण्याची परवानगी दिल्याबद्दल आम्ही नवजीवन ट्रस्टचेही आभारी आहोत. श्री कनू गांधी यांनी गांधीजींच्या चित्रांमधील एका चित्राचा उपयोग या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर करण्याची परवानगी दिल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

- आर. के. प्रभू

- यू. आर. राव

टिपा :

१. हरिजन, २८-९-१९३४, पृष्ठ २६०,

२. यंग इंडिया १३-२-१९३०, पृष्ठ ५२,

३. आत्मकथा पृष्ठ १०७,

४. पेस्कल पेन्सिज, पृष्ठ २७७,

५. यंग इंडिया ३-१-१९२९, पृष्ठ ६,

६. द एपिक फास्ट, पृष्ठ ३४,

७. यंग इंडिया १०-३-१९२०, पृष्ठ ५,

८. यंग इंडिया ४-८-१९२०, पृष्ठ ५२

९. हरिजन, २-११-१९३५

१०. हरिजन, २९-६-१९३५

११. हरिजन, २९-६-१९३५

१२. यंग इंडिया १३-१०-१९२१, पृष्ठ ३२५

# अनुवादकाचे दोन शब्द आणि ऋणनिर्देश

श्री. आर. के. प्रभू आणि श्री. यु. आर राव यांनी संकलित केलेल्या 'माईंड ऑफ महात्मा गांधी' या पुस्तकाचा अनुवाद करण्याची संधी मला श्री. टी. आर. के. सोमैय्या यांच्यामुळे मिळाली. यामुळे मी संकलन करणा-यांचा व श्री. सोमैय्या यांचा ऋणी आहे.

गांधीजींच्या विचारांचे या पुस्तकात अतिशय थोडक्यात आणि सुबकपणे दर्शन घडवण्यात आले आहे. गांधीजींच्या विचारविश्वात प्रवेश करू इच्छिणा-यांनी हे पुस्तक अवश्य वाचले पाहिजे इतके या पुस्तकाचे मोल आहे.

या पुस्तकाची मुद्रिते तपासून दिल्याबद्दल व अनुवादाबद्दल मूलभूत सूचना केल्याबद्दल मी डॉ. सुशीला पाटील यांचा ऋणी आहे. अतिशय व्यस्त असतानाही सुशीलाताई नेहमीच मदतीसाठी तत्परतेने धावून येतात.

संदर्भांचा निर्देश मूळ संहितेतच केला आहे. गांधीजींचे विचार कुठून घेतले आहेत व ते कोणत्या काळातील होते हे वाचकांना लगेच कळावे या दृष्टीने हा बदल केला आहे.

ब्रिजमोहन हेडा

## वाचकांना

माझ्या अभ्यासू वाचकांना आणि इतरांना, ज्यांना माझ्या लेखनात रस आहे, मी सांगू इच्छितो की मला सुसंगत दिसण्याची किंचितही इच्छा नाही. सत्याच्या माझ्या शोधात मी अनेक विचारांचा त्याग करत आलो आहे आणि नवनव्या गोष्टी शिकत आलो आहे. हे खरे आहे की आता मी म्हातारा होऊ लागलो आहे, परंतु माझा आंतरिक विकास थांबला आहे अथवा माझ्या पार्थिव शरीराच्या मृत्यूनंतर माझी आंतरिक वाढ थांबेल असे मला वाटत नाही. मी माझ्या ईश्वराच्या म्हणजेच सत्याच्या आदेशाचे दर क्षणी पालन करण्याकरिता तत्पर असतो. आणि यामुळे माझ्या लेखनातील कोणत्याही दोन गोष्टींमध्ये विसंगती दिसत असेल आणि तरीही त्यांचा माझ्या विवेकबुद्धिवर विश्वास असेल तर त्याने त्या विषयावरील शेवटच्या तारखेचे जे लेखन असेल ते माझे मनोगत आहे असे मानले पाहिजे.

मोहनदास करमचंद गांधी

हरिजन, २९-४-१९३३, पृष्ठ २.

# १. स्वतःबद्दल

## १ ना संत ना पापी

मला वाटते की आजच्या जीवनातून 'संत' हा शब्द काढून टाकला पाहिजे. हा शब्द इतका पवित्र आहे की कोणाशीही या शब्दाला असेच जोडणे बरोबर नाही. माझ्यासारख्या माणसाशी तर अजिबात नाही, कारण मी केवळ सत्यशोधक असल्याचा माझा नम्र दावा आहे. माझ्या मर्यादांचे मला भान आहे. मी चुका करतो आणि त्यांची मी निःसंकोच कबुली देतो. मी जाहीरपणे कबूल करतो की एखाद्या वैज्ञानिकाप्रमाणे मी जीवनातील काही 'शाश्वत सत्यांविषयी' प्रयोग करत असतो. असे असले तरीही मी वापरत असलेल्या पद्धती प्रमाण आहेत असा कोणताही पुरावा माझ्याजवळ नाही. वैज्ञानिक असल्याचा दावाही मी करू शकत नाही, कारण आधुनिक विज्ञानाची जी मागणी असते त्याप्रमाणे माझ्या प्रयोगातून कोणताही प्रत्यक्ष परिणाम सिद्ध झाल्याचेही मी दाखवू शकत नाही.
(यंग. १२-५-१९२०, पृ. २)

मला संत म्हणणे जरी शक्य असले, तरी अजून ती वेळ बरीच दूर आहे. कोणत्याही स्वरूपात मी संत असल्याचे मला जाणवत नाही. परंतु जाणीवपूर्वक वा अजाणतेपणी झालेल्या चुकांनंतरही मी स्वतःला सत्याचा पुजारी नक्कीच समजतो.

### सत्याची नीती

संताच्या वेषातील मी राजकीय पुढारी नाही. परंतु सत्यात पराकाष्ठेचा सूज्ञपणा असल्यामुळे कधी कधी माझे कार्य उच्च कोटीच्या राजकीय पुढा-यांसारखे वाटते. सत्य आणि अहिंसेच्या धोरणापेक्षा माझे कोणतेही वेगळे धोरण नाही, असे मला वाटते. मी माझ्या देशाच्या वा धर्माच्या उद्धाराकरिताही सत्य आणि अहिंसा यांचा बळी देणार नाही. तसे पाहिले तर सत्य आणि अहिंसेचा बळी देऊन देशाचा वा

धर्माचा उद्धार करता येणार नाही. (यंग. २०-१-१९२७ पृ. २१)

माझ्या जीवनात मला कोणताही अंतर्विरोध दिसत नाही आणि कोणताही वेडेपणा दिसत नाही. हे खरे आहे की ज्याप्रमाणे माणसाला आपली पाठ दिसू शकत नाही त्याचप्रमाणे त्याला आपले दोष वा वेडेपणाही दिसत नाही. परंतु विद्वानांनी धार्मिक व्यक्तींना बहुधा वेडेच ठरवलेले असते. त्यामुळेच मी असे समजतो की मी वेडा नसून ख-या अर्थाने धार्मिक आहे. या दोन्ही गोष्टींमधून मी नक्की काय आहे याचा निर्णय मी मेल्यानंतरच होऊ शकेल.
(यंग १४-८-१९२४ पृ. २६७)

मला असे वाटते की, अहिंसेपेक्षा सत्याचा आदर्श मला अधिक चांगला समजलेला आहे आणि माझा अनुभव मला सांगतो की सत्यावरील माझी पकड सुटली तर अहिंसेचे रहस्य मला कधीही उलगडता येणार नाही.... वेगळ्या शब्दांत सांगायचे तर एकदम अहिंसेचा मार्ग अनुसरण्याचे साहस कदाचित माझ्यामध्ये नसेल. तत्त्वतः सत्य आणि अहिंसा एकच आहेत आणि श्रद्धेची उणीव वा दुर्बलता यांमुळेच संशय निर्माण होत असतो. त्यामुळेच मी रात्रंदिवस प्रार्थना करत असतो की, 'हे देवा मला श्रद्धा दे.' (ए. पृ. ३३६)

मला असे वाटते की, लहानपणापासूनच मी सत्याचा कैवारी राहिलो आहे. हे माझ्याकरिता अतिशय स्वाभाविक होते. माझ्या प्रार्थनापूर्ण शोधाने 'ईश्वर सत्य आहे' या सामान्य तत्त्वाऐवजी 'सत्यच ईश्वर आहे' हे तत्त्व मला दिले. हे तत्त्व एक प्रकारे मला ईश्वरासमोर उभे करते. माझ्या अस्तित्वाचा कण-न-कण ईश्वरव्याप्त असल्याचा अनुभव मला येत असतो. (हरि. ९-८-१९४२, पृ. २६४)

## न्यायावर विश्वास

अंतिमतः न्यायाचाच विजय होईल असे मानण्याकरिता माझ्याजवळ काही पुरावा आहे म्हणून नाही, तर या गोष्टीवर माझा अदम्य विश्वास आहे म्हणून मी आशावादी आहे,... अंतिमतः केवळ न्यायाचाच विजय होईल या विश्वासामुळेच आपल्याला प्रेरणा मिळत असते. (हरि. १०-१२-१९३८, पृ. ३७२)

कोणत्या ना कोणत्या प्रकारे माणसातील सर्वोत्कृष्ट गुण बाहेर काढून त्यांचा उपयोग करण्यात मी यशस्वी होतो आणि त्यामुळे ईश्वर व मानवी स्वभावावरील माझा विश्वास कायम राहतो. (हरि. १५-४-१९३९, पृ. ८५)

## संन्यासी नाही

मी स्वतःला कधीही संन्यासी म्हणालो नाही. संन्यास फार कठीण गोष्ट आहे. सहका-यांसोबत व मित्रांच्या दानशीलतेवर सेवेचे विनम्र जीवन जगणारा मी एक गृहस्थ आहे असे मी समजतो.... मी जे जीवन जगतो आहे ते अतिशय सुखावह आणि आरामशीर आहे. या गोष्टींना जर मानसिक अवस्था मानले तर मला जे काही हवे आहे ते सर्व मला उपलब्ध आहे व व्यक्तिगत संपत्ती म्हणून मला काहीही बाळगण्याची गरज नाही. (यंग. १-१०-१९२५, पृ. ३३८)

माझा पंचा माझ्या जीवनाचा स्वाभाविक विकास आहे. हा आपोआप आला. याकरिता आधीपासून मी कोणताही प्रयत्न वा विचार केला नाही.
(यंग. ९-७-१९३१, पृ. १७५)

विशेषाधिकार आणि एकाधिकार यांची मला घृणा वाटते. जिथे सामान्य माणूस सहभागी होऊ शकत नाही ते माझ्याकरिता त्याज्य आहे.
(हरि, २-११-१९३४, पृ. ३०३)

मला संन्यासी म्हणणे चूक आहे. ज्या आदर्शांनी माझे जीवन नियंत्रित आहे ते सामान्य माणूस अवलंबू शकतो. मी त्यांना हळूहळू विकसित केले आहे. प्रत्येक पाऊल विचारपूर्वक आणि सावधगिरीने उचलण्यात आले आहे.

माझा इंद्रियनिग्रह आणि अहिंसा या दोन्ही गोष्टी माझ्या वैयक्तिक अनुभवातून निर्माण झाल्या आहेत. जनसेवेकरिता या गोष्टी आवश्यक होत्या. दक्षिण आफ्रिकेत गृहस्थ, वकील, समाजसुधारक अथवा राजकीय नेता म्हणून मला जे आगळेवेगळे जीवन जगावे लागले होते त्यात कर्तव्य नीट पार पाडता यावे म्हणून मला स्वतःच्या लैंगिक जीवनावर नियंत्रण ठेवणे आवश्यक झाले होते आणि मानवी संबंधात - मग ते देशवासीयांबरोबरचे असोत की युरोपिअनांबरोबरचे - अहिंसा आणि सत्याचे पालन करणे माझ्याकरिता गरजेचे होते.
(हरि, ३-१०-१९३६, पृ. २६८)

अविरत काम करतानाही माझे जीवन आनंदाने परिपूर्ण असते. उद्या माझे काय होईल याची मला कोणतीही काळजी नसल्यामुळे मी एखाद्या पक्ष्याप्रमाणे मुक्त असल्यासारखे अनुभवतो.... आपण भौतिक शरीराच्या गरजांशी सतत आणि प्रामाणिकपणे संघर्ष करत आहोत, हा विचारच मला जिवंत ठेवतो.
(यंग. १-१०-१९२५, पृ. ३३८)

श्रद्धेशिवाय काम करणे हे तळ नसलेल्या डोहाच्या तळापर्यंत पोहोचण्याच्या प्रयत्नासारखे आहे. (हरि. ३-१०- १९३६, पृ. २६८-६९)

## अहंकाराचा त्याग

मला माहीत आहे की मला अजून फार कठीण मार्ग आक्रमायचा आहे. मी स्वतःला शून्यवत केले पाहिजे. जोपर्यंत मनुष्य स्वतःला स्वेच्छेने सर्व प्राणिमात्रांमध्ये सर्वात शेवटी ठेवत नाही, तोपर्यंत त्याला मुक्ती मिळणे शक्य नाही. अहिंसा विनम्रतेची परिसीमा आहे. (ए. पृ. ३७१)

आपण जर धर्म, राजकारण, अर्थशास्त्र इत्यादींमधून 'मी' आणि 'माझे' वगळू शकलो तर आपण लगेच स्वतंत्र होऊ व पृथ्वीवर स्वर्ग आणू शकू. (यंग. ३-९-१९२६, पृ. ३३६)

समुद्राच्या थेंबाला भान नसले तरी, तो समुद्राच्या विशालतेचा भाग असतो आणि जेव्हा तो समुद्रापासून वेगळा होतो तेव्हा तो सुकून जातो. आयुष्य केवळ एक बुडबुडा आहे असे आपण म्हणतो, तेव्हा आपण कोणतीही अतिशयोक्ती करत नसतो.

सत्यशोधक हा अहंकारी होऊ शकत नाही. जो दुस-यासाठी आपल्या जीवनाचे बलिदान करायला तयार असतो. त्याच्याजवळ या जगात आपले स्थान सुरक्षित करायला वेळच कुठे असतो? (यंग. ३-९-१९२६, पृ. २)

व्यक्तीच्या क्षमतेला सीमा आहेत. आपण सर्व काही करण्यास समर्थ आहोत असे वाटू लागताच ईश्वर तिच्या गर्वाचा चुराडा करतो. माझ्या संदर्भात म्हणायचे तर मला स्वाभाविकपणेच इतकी नम्रता मिळाली आहे की, अननुभवी आणि मुले यांच्यापासूनही मदत घेण्याकरिता मी नेहमीच तयार असतो. (यंग, १२-३-१९३१, पृ. ३२)

मी करावयाच्या कार्यांचा निर्णय नियतीच करते. मी कधीही त्यांचा शोध घेण्याकरिता जात नाही. ते आपोआप माझ्याकडे येतात. माझ्या संपूर्ण जीवनात - दक्षिण आफ्रिकेत आणि भारतात परतल्यानंतरही - हाच क्रम राहिला आहे. (यंग. ७-५-१९२५, पृ. १६३)

## पुस्तकी ज्ञान अतिशय अल्प

मला माझ्या मर्यादा मान्य आहेत. मी कोणत्याही उल्लेखनीय विद्यापीठातून शिक्षण घेतलेले नाही. हायस्कूलधील माझी प्रगतीदेखील सर्वसाधारण होती. परीक्षेत मी

पास झालो की तेवढ्यानेच मला धन्य धन्य होत असे. शालेय परीक्षांमध्ये विशेष प्रावीण्य दाखवण्याची तर मी कल्पनाही करू शकत नव्हतो.
(हरि. ९-७-१९३८, पृ. १७६)

शिक्षणाच्या काळात पाठ्यपुस्तकांशिवाय मी क्वचितच अधिक काही वाचले असेल आणि सक्रिय जीवनात अभ्यासाकरिता मला बहुधा फारच कमी वेळ मिळाला. त्यामुळे मी विशेष पुस्तकी ज्ञानाचा दावा करू शकत नाही. तरीही माझ्या विवशतेमुळे मला जो संयम पाळावा लागला त्यामुळे माझे फार नुकसान झाल्याचे दिसत नाही. कमी वाचन केल्यामुळे मी जे वाचतो त्याचे चांगल्या प्रकारे चिंतन-मनन करण्याची पात्रता माझ्यात आली.

मी वाचलेल्या पुस्तकांपैकी ज्या पुस्तकाने माझ्या जीवनावर तात्काळ प्रभाव पाडला आणि परिवर्तन घडवून आणले, ते पुस्तक आहे 'अनटू धिस लास्ट'. काही काळानंतर मी या पुस्तकाचे गुजराती भाषांतर केले आणि त्याला नाव दिले 'सर्वोदय'. माझा विश्वास आहे की रस्किनच्या या महान पुस्तकात माझ्यामध्ये खोलवर रुजलेल्या श्रद्धांचे प्रतिबिंब उमटले होते आणि याच कारणामुळे त्याने मला मोहीत करून माझ्या जीवनात परिवर्तन घडवून आणले. (ए. पृ. २२०)

त्यावेळी मी दक्षिण आफ्रिकेत राहत होतो. १९०४ साली म्हणजे वयाच्या चौतिसाव्या वर्षी डरबनला जाताना रेल्वेत मी 'अनटू धिस लास्ट' वाचले. ते वाचून माझे बाह्य जीवन संपूर्णपणे बदलण्याचा निर्णय मी घेऊन टाकला. रस्किनच्या शब्दांनी माझ्यावर मोहिनी घातली होती एवढेच मी सांगू शकतो. मी एका दमात संपूर्ण पुस्तक वाचून काढले व त्यानंतर मी रात्रभर झोपू शकलो नाही. माझे जीवन बदलण्याचा निर्णय मी तत्काळ घेतला. टॉलस्टॉय मी बराच आधी वाचला होता. त्याने माझ्या अंतर्मनाला प्रभावित केले होते. (इंके, पृ.२४५)

## गरिबांची सेवा

शुद्ध आणि मनापासून केलेली कामना नेहमी पूर्ण होते. माझ्या अनुभवाप्रमाणे ही उक्ती नेहमीच खरी असल्याचे मला आढळले आहे. गरिबांची सेवा माझी हार्दिक कामना राहिली आहे व तिने मला नेहमीच गरिबांमध्ये आणून उभे केले आहे व त्यामुळे त्यांच्याशी एकरूप होण्याची संधी मला मिळाली. (ए. पृ. २२०)

जीवनभर मी निर्धनांवर प्रेम केले आणि तेही भरपूर प्रमाणात केले. माझ्या गत जीवनाचे उदाहरण देऊन मी सांगू शकतो की, माझे हे प्रेम माझ्या स्वभावाचा भाग होता. गरिबांमध्ये आणि माझ्यात मला कोणतेच अंतर जाणवले नाही. मला

ते नेहमीच माझे आप्तेष्ट वाटत आले आहेत. (हरि, ११-५-१९३५, पृ. ९९)

मला या नाशवंत जगाच्या राज्याची कोणतीही कामना नाही. स्वर्गाच्या ज्या साम्राज्याकरिता मी प्रयत्नशील आहे, त्याचेच नाव ‘मोक्ष’ आहे. या ध्येयाच्या प्राप्तीकरिता मला गुहेत बसण्याची गरज नाही. तशी आवश्यकता असती तर, मी तेही केले असते.

गुहेत राहणारा माणूसही हवाई किल्ले बांधू शकतो तर राजमहालात राहणा-या जनकासारख्या माणसाला कोणताही किल्ला बांधायचा नसतो. विचाराच्या पंखावर बसून विश्वात विचरण करणा-या गुहावासीयांना शांतता मिळत नसते. याउलट राजवैभवात राहत असतानाही जनकाला विवेकपूर्ण शांततेचा अनुभव आला.

माझ्या देशाची व त्याच्या माध्यमातून संपूर्ण मानवतेची निरंतर सेवा करणे हाच माझ्याकरिता मोक्षाचा मार्ग आहे. संपूर्ण भूतमात्रांशी माझे तादात्म्य व्हावे, अशी माझी इच्छा आहे. (यंग. ३-४-१९२४, पृ. ११४)

माझे जीवन अविभाज्य आहे आणि माझी सगळी कामे एकमेकांत गुंफलेली आहेत; ही सर्व कामे मानवतेबद्दल मला वाटणा-या असीम प्रेमातून निर्माण झालेली आहेत. (हरि. २-३-१९३४, पृ. २४)

जीवनभर मला विपर्यासाची सवय झालेली आहे. प्रत्येक जनसेवकाच्या नशिबी हा भोग असतोच. त्याचे मन घट्ट असले पाहिजे. आपल्याबद्दल बोलल्या जाणा-या प्रत्येक गोष्टीचे मी स्पष्टीकरण देऊ लागलो आणि विपर्यास दूर करण्याचा प्रयत्न करू लागलो तर माझे जीवन ओझे होऊन जाईल. मी नियमच केला आहे की माझ्या बाबतीत कोणी विपर्यास करत असेल वा अपप्रचार करत असेल तर स्पष्टीकरण देत बसायचे नाही. परंतु जेव्हा दुरुस्तीची गरज असते तेव्हा मी याचा अपवाद करतो. या नियमामुळे माझ्या वेळेची आणि काळजीची पुष्कळ बचत झाली आहे. (यंग. २७-५-१९२६, पृ १९३)

मला लोक त-हेवाईक, छंदिष्ट आणि वेडा समजतात. माझी ही ख्याती योग्य असल्याचे सिद्धही झाले आहे. याचे कारण असे आहे की, मी जिथे जातो तिथे माझ्याजवळ त-हेवाईक, छंदिष्ट आणि वेडे लोक येतात.
(यंग. १३-६-१९२९, पृ. १९३)

**व्यावहारिक स्वप्नद्रष्टा**

ईश्वरावर, आणि त्यामुळेच मानवतेच्या संपूर्ण ऐक्यावर माझा विश्वास आहे.

आमचे शरीर वेगवेगळे असले म्हणून काय झाले, आत्मा तर एक आहे. सूर्याचे किरण परावर्तनामुळे अनेक होतात परंतु त्यांचा स्रोत तर एकच आहे. यामुळेच वाईट प्रवृत्तींपासून मी स्वतःला वेगळा करू शकत नाही (मोठ्यात मोठ्या सदाचारी माणसाशी तादात्म्य पावण्यापासूनही मला वंचित करण्यात येऊ नये.) आणि त्यामुळे माझ्या प्रयोगांमध्ये मी संपूर्ण मानवतेला भागीदार बनवले पाहिजे. मी प्रयोग करणे थांबवू शकत नाही. अनंत प्रयोगांची एक शृंखला म्हणजेच जीवन. (यंग. २५-९-१९२४, पृ. ३१३)

मला माझ्या दोषांसह स्वीकारण्यात आले पाहिजे. मी एक सत्यशोधक आहे. माझ्याकरिता माझे प्रयोग हिमालयाच्या मोहिमेपेक्षाही अधिक महत्त्वाचे आहेत. (यंग, ३-१२-१९२५, पृ. ४२२)

माझे दुर्दैव म्हणा की सुदैव म्हणा, माझ्यामुळे जगाला आश्चर्याचा धक्का बसतो. नवीन प्रयोग अथवा नव्या पद्धतीने केलेले जुने प्रयोग यांच्यामुळे काही वेळेस भ्रम निर्माण होतो. (एफा, पृ. १३२)

वास्तवात मी एक व्यावहारिक स्वप्नद्रष्टा आहे. माझी स्वप्ने म्हणजे हवाई किल्ले नाहीत. शक्यतोवर माझ्या स्वप्नांना मी वास्तवात आणू इच्छितो. (हरि. १७-११-१९३३, पृ.६)

मी पवित्र मानलेले एखादे कार्य अव्यावहारिक आहे असे सिद्ध झाले तर, ते अयशस्वी झाले असे घोषित केले पाहिजे. माझा पक्का विश्वास आहे की, सर्वाधिक आध्यात्मिक कर्म ख-या अर्थाने सर्वाधिक व्यावहारिक असतात. (हरि. १-७-१९३९, पृ. १८१)

## माझी स्खलनशीलता

मी स्वतःला असा एक सामान्य माणूस समजतो की, ज्याच्या हातून इतरांप्रमाणे चुका होऊ शकतात. मात्र माझ्यात एवढी विनम्रता नक्कीच आहे की, मी माझ्या चुका मान्य करू शकतो आणि त्यांच्यांत सुधारणा करू शकतो. मला हेही मान्य आहे की ईश्वरावर आणि त्याच्या दयाळूपणावर माझी अविचल श्रद्धा आहे. त्याचबरोबर सत्य आणि प्रेम यांची मला तीव्र ओढ आहे. परंतु ही भावना प्रत्येक माणसामध्ये सुप्तावस्थेत असतेच, नाही का? (यंग, ६-५-१९२६, पृ. १६४)

ज्यांनी माझ्या जीवनावर ओझरता दृष्टिक्षेप टाकला आहे त्यांच्या लक्षात ही गोष्ट नक्कीच आली असेल की, मी जीवनात एकही काम एखाद्या व्यक्तीला वा

राष्ट्राला हानी पोहोचविण्याकरिता केलेले नाही.... माझा असा दावा नाही की, माझ्यात कोणत्याच उणिवा नाहीत. मला माहीत आहे की मी हिमालयाएवढ्या मोठ्या चुका केल्या आहेत, परंतु त्या मी जाणूनबुजून केलेल्या नाहीत. तसेच कोणतीही व्यक्ती वा राष्ट्र अथवा कोणी माणूस वा प्राणिमात्र यांच्याविरुद्ध मी शत्रुत्वाची भावना ठेवलेली नाही. (एफा, पृ. १३३)

माझ्या अनेक पापांची मी स्पष्ट कबुली दिलेली आहे. परंतु या पापांचे गाठोडे खांद्यावर सांभाळत मी नेहमी वावरत नाही. मला वाटते त्याप्रमाणे जर माझा ईश्वराकडे प्रवास सुरू असेल, तर मी सुरक्षित आहे. त्याच्या प्रकाशाची ऊब अनुभवत असल्यामुळे मी असे म्हणतो आहे.

मला माहीत आहे की, मी माझ्यात सुधारणा करण्याकरिता माझा साधेपणा, माझे उपवास आणि माझ्या प्रार्थना यांवरच अवलंबून राहीलो तर, त्यांस काहीही किंमत राहणार नाही. परंतु निर्मात्याच्या मांडीवर शिणलेले डोके टेकवण्याची अभिलाषा जर या गोष्टींमधून अभिव्यक्त होत असेल, जसे की ती होते असा माझा विश्वास आहे, तर या गोष्टी अमूल्य आहेत. (हरि, १८-४-१९३६, पृ. ७७)

## सर्वांशीच नाते

जेव्हा मी एखाद्या दोषी व्यक्तीला पाहतो तेव्हा मी स्वतःलाच सांगतो की मीही चुका केल्या आहेत; जेव्हा मी एखाद्या कामुक व्यक्तीला पाहतो तेव्हा मी स्वतःला सांगतो की कधी काळी मीही असाच होतो; आणि अशा प्रकारे जगातील प्रत्येक व्यक्तीबरोबर मी नाते प्रस्थापित करतो आणि जोपर्यंत आपल्यातील सर्वात दीन व्यक्ती सुखी होत नाही तोपर्यंत मी सुखी होऊ शकणार नाही असे मी अनुभवतो. (यंग, १०-२-१९२७, पृ. ४४)

जर मी कुणाला त्याच्या हिश्शापेक्षा कमी दिले तर, मला ईश्वराला आणि माझ्या निर्मात्याला उत्तर द्यावे लागेल. परंतु मला पक्का विश्वास आहे की मी त्याला त्याच्या हिश्शापेक्षा अधिक दिले आहे हे जर त्याने पाहीले, तर तो मला नक्कीच आशीर्वाद देईल. (यंग, १०-३-१९२७, पृ. ८०)

मनुष्य जमातीतील कोणतीही व्यक्ती परिपूर्ण नसते, याची मला जाणीव आहे आणि त्यामुळेच मी कधीच कोणावर रागावत नाही. चूक करणा-या व्यक्तीला दुखविण्यापेक्षा चुकीची गोष्ट सुधारण्याकडे माझा कल असतो. माझ्या चुकांमुळे कोणी दुखावले गेले, तर मलाही ते आवडणार नाही. (यंग, १२-३-१९३०, पृ.८९-९०)

अगदी खरे सांगायचे तर माझ्या सहका-यांचे दोष काढण्याच्या बाबतीत मी फार शिथिल आहे आणि माझ्या स्वतःतही कितीतरी दोष असल्यामुळे मला या सहका-यांच्या उदारतेची गरज आहे. लोकांच्या बाबतीत फार कठीण आदर्शांच्या आधारे निर्णय न घेणे आणि त्यांच्या चुकांबद्दल उदारवृत्ती धारण करणे मी शिकलो आहे. (हरि, ११-३-१९३९, पृ. ४७)

## विरोधकांबद्दल आदर

दृष्टिकोन भिन्न असणे म्हणजे युद्धजन्य परिस्थितीत राहणे नव्हे. असे असेल तर मी आणि माझी पत्नी केव्हाच शत्रू झालो असतो. मी अशा कोणत्याही दोन व्यक्तींना ओळखत नाही ज्यांच्यात मतभेद नाहीत, आणि मी गीतेचा उपासक असल्यामुळे ज्यांच्याशी माझे मतभेद आहेत त्यांच्याशीही स्वजनांशी वा प्रियजनांशी करतात तसा प्रेमपूर्ण व्यवहार करावा, असा प्रयत्न मी नेहमीच करत आलो आहे. (यंग, १७-३-१९२७, पृ. ८२)

मी ज्यांच्या सिद्धान्तांचा आणि धोरणांचा विरोध करतो त्यांचे माझ्यावरील प्रेम आणि विश्वास बहुधा कायम राहतात हे पाहून मला फार आनंद होतो. दक्षिण आफ्रिकेतील इंग्रज लोकांनीसुद्धा व्यक्तिगत पातळीवर माझ्यावर विश्वास टाकला आणि माझ्याशी मित्रभाव कायम ठेवला.

ब्रिटिश नीती आणि प्रणाली यांची निंदा करूनही मला हजारो इंग्रज स्त्री-पुरुषांचे प्रेम मिळालेले आहे आणि आधुनिक भौतिकवादी संस्कृतीची पूर्णपणे निंदा केल्यानंतरही माझ्या युरोपीय आणि अमेरिकी मित्रांची संख्या वाढतच चालली आहे. हा सुद्धा अहिंसेचाच विजय आहे. (यंग, १७-३-१९२७, पृ. ८२)

जाणीवपूर्वक मी कोणत्याही प्राण्याला इजा करू शकत नाही आणि मानवी भावंडांना तर नाहीच नाही. मग त्यांनी वाईटपणाचे वर्तन केलेले असले तरी त्यामुळे काहीही फरक पडत नाही. (यंग, १२-३-१९३०, पृ. ९३)

गेल्या ५० वर्षांत मी केलेले कोणतेही काम एखाद्या व्यक्तीविरुद्ध वा समुदायाविरुद्ध आहे असे कोणीही सिद्ध करू शकणार नाही. मी कधीही कोणालाही शत्रू मानले नाही. माझा धर्म कुणालाही शत्रू मानण्याची मला परवानगी देत नाही. कोणत्याही प्राण्याबद्दल मी दुर्भावना ठेवू शकत नाही. (हरि, १७-११-१९३३, पृ. ४)

# २. माझे महात्मापण

### महात्मा नाही

मला वाटत नाही की मी महात्मा आहे. परंतु मला हे निश्चित माहीत आहे की ईश्वराच्या सर्वाधिक हीनदीन प्राण्यांपैकी मी एक आहे. (यंग, २७-१०-१९२१, पृ. ३४२)

महात्मा या पदवीने मला फार वेदना झाल्या आहेत आणि असा एकही क्षण नाही की ज्यावेळी या पदवीमुळे मी सुखावलो असेन. (ए, पृ. xiv)

माझी महात्मा ही पदवी व्यर्थ आहे. माझ्या बाह्य कार्यामुळे व माझ्या राजकीय कामामुळे असे घडले आहे. परंतु माझ्या एकूण कार्यात राजकीय कार्याची व्याप्ती फारच अल्प आहे आणि म्हणूनच ते अल्पजीवीही आहे. माझी वास्तविक बाजू आहे सत्य, अहिंसा आणि ब्रह्मचर्य यांच्याबद्दलचा माझा आग्रह आणि याचेच चिरंतन महत्त्व आहे. ही बाजू कितीही अपुरी असली तरी तिची उपेक्षा करता येऊ शकत नाही. हेच माझे सर्वस्व आहे. माझे अपयश आणि भ्रमनिरासही माझ्या यशाच्या पाय-या आहेत व त्यामुळे तेही मला प्रिय आहेत.
(यंग, २५-२-१९२६, पृ. ७८-७९)

माझ्या मूक, निष्ठावान, योग्य आणि शुद्ध कार्यकर्त्यांच्या - स्त्री आणि पुरुष यांच्या-अविरत परिश्रमावर, आणि नीरस कामातही त्यांनी दाखवलेल्या चिकाटीवर माझी तथाकथित महानता किती मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे याबद्दल जगाला फारच थोडे ज्ञान आहे. (यंग, २६-४-१९२८, पृ. १३०)

मला महात्मापणापेक्षा सत्य किती तरी अधिक प्रिय आहे. महात्मापण तर माझ्यासाठी केवळ एक ओझे आहे. माझ्या सीमा आणि अस्तित्वहीनता यांचे मला भान असल्यामुळेच महात्मापणाच्या अत्याचारी स्वरूपापासून मी बचावलो आहे. (यंग, १-११-१९२८, पृ. ३६१)

### भक्तिभावामुळे त्रस्त

अविवेकी लोकांनी केलेल्या भक्तीमुळे मी खरोखरच त्रस्त झालो आहे. त्याऐवजी ते माझ्यावर थुंकले असते तर हिमालयाएवढ्या मोठ्या चुकांची कबुली देण्याची, माघार घेण्याची आणि पुनर्रचना करण्याची माझ्यावर वेळ आली नसती.
(यंग, २-३-१९२२, पृ. १३५)

मला भेट म्हणून देण्यात येणा-या अभिनंदन पत्रांमध्ये अशा विशेषणांचा प्रयोग करण्यात येत असतो की, ज्यांच्याकरिता मी अगदीच पात्र नाही. यामुळे न या लेखकांचे भले होते न माझे. उलट या विशेषणांना मी पात्र नाही अशी कबुली मला द्यावी लागते व त्यामुळे विनाकारण माझी मानहानी होते. जी विशेषणे योग्य आहेत त्यांचीही अतिशयोक्ती करण्यात येते. अशा अभिनंदनांमुळे माझे गुण वाढण्यास कोणतीही मदत होत नाही. उलट मी सावध नसलो तर यांमुळे माझी बुद्धी भ्रष्ट होऊ शकते. माणसाच्या सत्कर्मांचीही फार चर्चा करण्यात येऊ नये, हेच बरे. उलट त्यांचे अनुकरण झाले, तर तीच मोठी प्रशंसा ठरेल. (यंग, २१-५-१९२५, पृ. १७६)

या 'महात्मा' पदवीला मी तिच्याच नशिबावर सोडले पाहिजे. मी जरी असहकारी असलो तरी मला महात्मा म्हणणे आणि माझ्या पाया पडणे हा गुन्हा आहे असे घोषित करणारे विधेयक जर कोणी आणील तर त्या विधेयकाचे मी आनंदाने समर्थन करीन. आश्रमासारख्या ठिकाणी, जिथे माझा कायदा चालतो, तिथे या सर्व गोष्टींना बंदी आहे. (यंग, १७-३-१९२७, पृ. ८६)

**खरा सन्मान**

माझ्या तत्त्वांचे/मूल्यांचे आपल्या जीवनात अनुसरण करून वा माझे विचार पटत नसल्यास त्यांना सर्व परीने विरोध करून माझे मित्र माझा सर्वाधिक सन्मान करू शकतात. (यंग, २१-५-१९२५, पृ. १९७)

ज्या काचेच्या बांगडीवर प्रक्रिया करून आपण तिला हजारो वर्षे अभंग ठेवू शकतो त्या काचेच्या बांगडीपेक्षाही जो माणूस भंगूर आहे व स्वतः मातीचा बनलेला आहे त्या माणसाचा मातीचा वा धातूचा पुतळा उभारणे.... हा तर संपत्तीचा अपव्यय आहे.... मानव शरीर सतत विघटित होत असते आणि आयुष्य संपल्यानंतर त्याचे अंतिम विघटन होऊन जाते. माझ्या मुसलमान मित्रांकडून, ज्यांच्या सोबत मी जीवनाची महत्त्वपूर्ण वर्षे व्यतीत केली आहेत, माझ्या पुतळ्यांना आणि चित्रांना नापसंत करणे मी शिकलो आहे....

माझे पुतळे बनवून वा माझी चित्रे काढून जे माझा सन्मान करू इच्छितात, त्यांनी पुढील दोन ओळी वाचून सावध व्हावे - अशा प्रदर्शनांचा मला मनापासून तिटकारा वाटतो ही गोष्ट त्यांनी लक्षात घ्यावी. ज्यांना माझ्याबद्दल आस्था वाटते त्यांनी माझे कार्य पुढे चालवले तर माझा पुरेसा सन्मान करण्यात आला, असे

मी समजेन. (हरि, ११-२-१९३९, पृ. १)

## मी 'अवतार' नाही

मला श्रीकृष्ण म्हणून मानणे ही गोष्ट ईश्वराची निंदा असल्याचे माझे स्पष्ट मत आहे. मी तर एक लहानसा कार्यकर्ता आहे आणि एका महान कार्यात लागलेल्या अनेक लोकांमधील मी एक आहे. हे कार्य करणा-या लोकांचे पोवाडे गाईल्याने या कार्याचा लाभ होण्याऐवजी त्याला हानीच पोहोचेल. एखाद्या साध्याच्या यशस्वीततेची सर्वाधिक शक्यता तेव्हाच असते, जेव्हा त्याच्या गुण-दोषांची चिकित्सा करून त्या आधारावर त्याचे अनुसरण केले जाईल. प्रगतिशील समाजात माणसापेक्षा अधिक महत्त्व साध्याला दिले गेले पाहिजे कारण त्या साध्याकरिता धडपडणारा माणूस हा केवळ अपूर्ण साधन आहे.
(यंग, १३-७-१९२१, पृ. २२४)

मी ज्या गुणांचा दावा करू शकतो ते गुण आहेत सत्य आणि अहिंसा. कोणत्याही अतिमानवीय शक्तीचा माझा दावा नाही आणि मला त्यांची कामनाही नाही. मी त्याच रक्तमांसाने बनलो आहे ज्याने माझे इतर दुर्बल सहकारी बंधुभगिनी बनले आहेत. त्यामुळे इतर सर्वसामान्य माणसांप्रमाणेच मीही चुका करू शकतो. माझ्या सेवेला अनेक सीमा आहेत, परंतु ईश्वराने माझ्या अपूर्णतेनंतरही आतापर्यंत माझ्या सेवेवर वरदहस्त ठेवला आहे. (यंग, १६-२-१९२२, पृ. १०२)

माझ्यात एखादी अनन्य दैवी शक्ती आहे, असा कोणताही दावा मी करत नाही. मी प्रेषितत्वाचाही दावा करत नाही. मी केवळ एक विनम्र सत्यशोधक आहे आणि सत्याच्या प्राप्तीकरिता मी संकल्पबद्ध आहे. ईश्वराच्या साक्षात्काराकरिता कितीही मोठा त्याग करावा लागला तरी मी त्याला मोठा मानत नाही. माझी सगळी कामे - तुम्ही त्यांना सामाजिक म्हणा की राजकीय म्हणा, मानवीय म्हणा की नैतिक म्हणा - त्याच उद्दिष्टाच्या प्राप्तीकरिता आहेत.

ईश्वराचा वास उच्च आणि शक्तिसंपन्नांमध्ये असण्यापेक्षा बहुधा अतिसामान्य खालच्या प्राण्यांमध्ये अधिक असतो, हे मला माहीत असल्यामुळे मी त्यांच्याच पातळीवर जाण्याकरिता संघर्षरत असतो. असे मी त्यांची सेवा केल्याशिवाय करू शकत नाही. यामुळेच मला दलित वर्गाची सेवा करण्याची लालसा असते. आणि राजकारणात प्रवेश केल्याशिवाय मी ही सेवा करू शकत नसल्यामुळे मी राजकारणात आहे. अशा रीतीने मी कुणाचाही स्वामी नाही. मी चुका करत

असलो तरी भारत आणि त्याच्या माध्यमातून संपूर्ण मानवतेचा मी एक विनम्र सेवक आहे. (यंग, ११-९-१९२४, पृ. २९८)

स्वतःचीच फसवणूक आपण कशी करतो हे पाहिले की नवल वाटते. आपण अशा भ्रमात असतो की या नाशिवंत शरीराला आपण अजिंक्य बनवू शकतो आणि असे गृहीत धरून चालतो की आत्म्याच्या सुप्त शक्तींना जागृत करणे असंभव आहे. माझ्याजवळ त्यातील काही शक्ती असतीलही तरी मी असेच समजण्याचा प्रयत्न करत असतो की, मी सर्वसाधारण माणसांप्रमाणेच दुर्बल आहे आणि पूर्वीही माझ्यात विशेष असे काही नव्हते आणि आजही नाही.
(यंग, ६-५-१९२६, पृ. २६४)

माझी गणना प्रेषितांमध्ये व्हावी अशी माझी पात्रता नाही. मी एक विनम्र सत्यशोधक आहे. याच जन्मात आत्मसाक्षात्कार व्हावा, मोक्ष मिळावा याकरिता मी तळमळतो आहे. माझ्याकरिता आत्म्याच्या या बंधनापासून मुक्त होण्याचे देशसेवा हे एक साधन आहे. त्या अर्थाने या सेवेला शुद्ध स्वार्थही मानता येईल. विश्वातील कोणत्याही साम्राज्याची मला कामना नाही. स्वर्गाच्या साम्राज्याकरिता म्हणजे मोक्षाकरिता मी धडपडतो आहे. (यंग, ३-४-१९२४, पृ. ११४)

सामान्यांपेक्षाही कमी योग्यता असणा-या साधारण माणसापेक्षा अधिक काही असल्याचा माझा दावा नाही. परिश्रमपूर्वक केलेल्या शोधाद्वारे अहिंसा आणि आत्मसंयम या ज्या काही गोष्टी थोड्या फार प्रमाणात मी मिळवू शकलो, त्याकरिता माझ्यात आधीच काही विशेष गुण होते असा माझा दावा नाही. मी जे काही केले आहे ते कोणतीही व्यक्ती-स्त्री वा पुरुष-करू शकेल याबद्दल मला किंचितही संशय वाटत नाही. अट एवढीच की त्या व्यक्तीनेही माझ्यासारख्याच विश्वासाने व आशेने त्याकरिता प्रयत्न केला पाहिजे. (हरि, ३-१०-१९३६,पृ.२६०)

मला पत्र लिहिणा-या काही लोकांचा असा समज आहे की, मी चमत्कार करू शकतो. सत्याचा पुजारी असण्याच्या नात्याने मी सांगू शकतो की, माझ्याजवळ असे कोणतेही सामर्थ्य नाही. माझ्यात जी काही शक्ती असेल ती देवाने दिलेली आहे. परंतु देव स्वतः कार्य करत असल्याचे दिसत नाही. तो आपल्या असंख्य किरणांद्वारे काम करत असतो. (हरि, ३-१०-१९३६, पृ. २८५)

## मर्यादांची जाणीव

मी स्वतःला एक दूरदर्शी कार्यकर्ता समजतो. दूरदर्शितेचा माझा अर्थ केवळ एवढाच आहे की मला माझ्या मर्यादांचे अचूक भान आहे. मला आशा आहे

की, मी कधीही माझ्या मर्यादांचे उल्लंघन करणार नाही. जाणीवपूर्वक तर मी असे नक्कीच केले नाही. (यंग, २३-६-१९२०, पृ. ३)

माझ्या मर्यादांची मला जाणीव आहे. ही जाणीवच माझी एकमेव शक्ती आहे. माझ्या जीवनात मी जे काही करू शकलो ते इतर कोणत्याही गोष्टीमुळे नाही तर माझ्या या मर्यादांचे भान ठेवण्याच्या क्षमतेमुळेच करू शकलो.
(यंग, १३-११-१९२४, पृ. ३७८)

जसा मी असायला पाहिजे होतो तसा मी असतो तर मला उपवासाची गरज पडली नसती, कुणाशी वाद करण्याची गरज पडली नसती. मग माझ्या शब्दांनीच काम झाले असते. खरे सांगायचे तर मला बोलायचीही गरज पडली नसती. माझ्या इच्छेनेच हवा तो परिणाम झाला असता. परंतु मला माझ्या मर्यादांचे भान आहे. (हरि, १५-४-१९३९, पृ. ८६)

लोक जेव्हा जेव्हा गंभीर चुका करतात तेव्हा तेव्हा मी त्या चुका कबूल करीत जाईन. जगातील एकाच निरंकुश शक्तीला मी मानतो आणि ती आहे माझ्या आत्म्याचा मंद आवाज. आणि हेही शक्य आहे की, माझ्या मार्गाने चालत असताना मी एकटा राहीन. परंतु मला खात्री वाटते की इतक्या अल्पमतात राहण्याचेही धैर्य माझ्यात असेल. (मगां. २-३-१९२२, पृ. १३५)

मला वाटते की मला मानवी स्वभावाची चांगली पारख आहे आणि माझ्या अपयशांचा मी चांगला शल्यचिकित्सक आहे. माणसाने प्रतिपादिलेल्या पद्धतींपेक्षा माणूस श्रेष्ठ असतो असे मला आढळले आहे. (मगां, पृ. २४१)

मला आशा आहे की माझ्यात गर्वाची भावना नसेल. मला वाटते की माझ्या उणिवांची मला चांगली ओळख आहे. परंतु ईश्वर आणि त्याची शक्ती यांच्याबद्दल मला अढळ श्रद्धा वाटते. मी तर कुंभाराच्या हातातील मातीच्या गोळ्यासारखा आहे. (यंग, २६-१-१९२२, पृ. ४९)

कुठे तरी प्रतिष्ठा मिळावी अशी मला इच्छा नाही. प्रतिष्ठा तर राजदरबाराची सजावट आहे. मी जसा हिंदूंचा सेवक आहे तसाच मुसलमानांचाही आहे, ख्रिश्चनांचा, पारश्यांचा आणि यहुदी लोकांचाही आहे. सेवकाला प्रेम हवे असते, प्रतिष्ठा नाही. जोपर्यंत मी एक निष्ठावान सेवक बनून राहीन तोपर्यंत मला नक्कीच प्रेम मिळत राहील. (यंग, २६-३-१९२५, पृ. ११२)

## हौतात्म्याकरिता तयारी

काही गोष्टी अशा असतात की तुम्ही कितीही प्रयत्न केला तरी त्यांच्यापासून तुम्ही लगेच मुक्त होऊ शकत नाही. माझा हा पार्थिव देह, ज्यात मी बंदी आहे, माझ्या जीवनाचे ओझे आहे. परंतु मला ते वाहावेच लागेल. एवढेच नाही तर त्याला प्रसन्नही ठेवावे लागेल. (यंग, २७-१०-१९२१, पृ. ३४२)

'ईश्वराच्या मर्जीशिवाय पानही हालत नाही' या विधानावर माझा पूर्ण विश्वास आहे. त्याला जर माझ्या देहाकडून अधिक सेवा करून घ्यायची असेल तर तो याचे रक्षणही करील. त्याच्या इच्छेशिवाय देह टिकून राहू शकत नाही.
(एफा, पृ. ११४)

माझ्या रक्षणाकरिता कोणतेही प्रयत्न करू नका. सर्वशक्तिमान सदैव आपले रक्षण करत असतो. तुम्ही खात्रीपूर्वक लक्षात ठेवा की माझी जेव्हा वेळ येईल तेव्हा जगातील मोठ्यात मोठा माणूसही मी आणि ईश्वर यांच्यामध्ये येऊ शकणार नाही. (यंग, २-४-१९३१, पृ. ५४-५५)

माझ्या निर्मात्यासमोर मी सदैव प्रामाणिक असलो पाहिजे आणि ज्या क्षणी मला वाटेल की हे शरीर मी आता चालवू शकत नाही तेव्हा मी याचा मोह सोडला पाहिजे, असे मला वाटते. जेव्हा हे शरीर काम करणे बंद करील आणि सन्मार्गाच्या शोधात त्यामुळे अडथळा निर्माण होईल, तेव्हा याला मी स्वेच्छेने त्यागण्यापेक्षा अधिक चांगली गोष्ट कोणती असू शकेल? (यंग, २-४-१९३१, पृ. ६०)

हौतात्म्याकरिता मी उत्सुक नाही. परंतु माझ्या श्रद्धेच्या रक्षणाला मी माझे सर्वोच्च कर्तव्य मानतो आणि त्याचा निर्वाह करताना मला जर हौतात्म्य पत्करावे लागले.... तर मी समजेन की मी त्याकरिता पात्र होतो.
(हरि, २९-६-१९३४, पृ. १५६)

लोकांकडून मिळालेल्या असीम प्रेमाबद्दल मी कृतज्ञ आहे. परंतु त्यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की माझ्या रक्षणाच्या काळजीमुळे जर हे राष्ट्र आपल्या प्रमुख ध्येयापासून विचलित होत असेल, तर हा देह रक्षणाच्या लायकीचा नाही.
(हरि, ११-३-१९३९, पृ. ४४)

भूतकाळात माझा जीव घेण्याचे किती तरी प्रयत्न केले गेले आहेत, परंतु अजूनपर्यंत तरी ईश्वराने माझे रक्षण केले आहे आणि हल्ला करणारांनी पश्चात्ताप व्यक्त केला आहे. परंतु आपण एका दुष्टापासून सुटका करून घेत आहोत असे समजून जर कोणी माझ्यावर गोळी चालवत असेल तर तो ख-या गांधीला नाही

तर त्यालाच मारेल ज्याला तो दुष्ट समजत होता. (बांक्रा, ९-८-१९४२)

केवळ ईश्वरच माझा रक्षक आहे. ज्या क्षुद्र माणसाला आपले उद्या काय होईल हेही माहीत नसते, तो दुस-याच्या संरक्षणाची जबाबदारी कसा काय घेऊ शकणार आहे? मी ईश्वराने दिलेल्या संरक्षणावर संतुष्ट आहे. तोच रक्षण करील वा नष्ट करील. कधी-कधी तो रक्षण करण्याकरिता नष्टही करत असतो हे मला माहीत आहे. (हरि, ९-६-१९४६, पृ. १७०)

माझ्या कार्यक्षमतेच्या क्रमिक -हासामुळे.... एखाद्या पराजित माणसाप्रमाणे मरण्याची माझी इच्छा नाही. त्यापेक्षा एखाद्या मारेक-याच्या गोळीने माझा जीव घेतलेला मला आवडेल. परंतु शेवटच्या श्वासापर्यंत आपले कर्तव्य करता करता मला मरण आले तर ते मला सर्वात अधिक आवडेल. (मगांअ पृ. १)

आपल्या ध्येयाची पूर्तता करत असताना मरण्याची भीती मला वाटत नाही. माझ्या नशिबात असे असेल तर असेच होईल. (हरि, २७-४-१९४७, पृ. १२७)

**क्रोध टाळणे**

कटू अनुभवाद्वारे आपल्या क्रोधाला जतन करून ठेवण्याचा उत्तम पाठ मी शिकलो आहे; ज्या प्रकारे उष्णतेचे जतन करून तिचे ऊर्जेत परिवर्तन करता येते, त्याच प्रकारे क्रोधाला नियंत्रित करून त्याला एका अशा शक्तीत रूपांतरित करता येते, जी सर्व जगाला हलवू शकेल. (यंग, १५-९-१९२०, पृ. ६)

सन्मान्य वर्तनापासून दूर जाणा-या व्यक्तीला - मग ती मित्र असो वा शत्रू - मी सोडत नाही. (यंग, २-३-१९२२, पृ. १४०)

मला राग येत नाही अशी गोष्ट नाही. परंतु मी राग व्यक्त करत नाही. अक्रोध म्हणून मी धैर्य वाढवण्याचा प्रयत्न करतो व बहुधा त्यात यशस्वी होतो. जेव्हा राग येतो तेव्हा मी केवळ त्याला नियंत्रित करतो. मी त्याला कसा नियंत्रित करतो हे विचारणे व्यर्थ आहे; ही एक सवय आहे आणि ती प्रत्येकाने लावून घेतली पाहिजे. सतत अभ्यासाने त्यात यश मिळवले पाहिजे.
(हरि, ११-५-१९३५, पृ. ९८)

माझ्यात विनोदवृत्ती नसती तर मी फार पूर्वीच आत्महत्या केली असती. (यंग, १८-८-१९२१, पृ. २३८)

मी दुर्दम्य आशावादी आहे कारण माझा स्वतःवर विश्वास आहे. ही गर्वोक्ती वाटते, खरे की नाही? परंतु ही गोष्ट मी अतिशय नम्रतेने सांगतो आहे. माझा

ईश्वराच्या सर्वशक्तिमानतेवर विश्वास आहे, माझा सत्यावर विश्वास आहे आणि त्यामुळे या देशातील मानवतेच्या भविष्याबद्दल मला कोणताही संशय वाटत नाही.

मी आशावादी आहे, कारण मी स्वतःकडून अनेक गोष्टींची अपेक्षा करतो. मला माहीत आहे की त्या सर्व गोष्टी माझ्यात नाहीत, कारण अजून मी पूर्णावस्था प्राप्त केलेली नाही. तसे असते तर मला वाद करावा लागला नसता. जेव्हा तशी अवस्था मी पूर्णपणे प्राप्त करीन तेव्हा मी तोंड उघडताच संपूर्ण राष्ट्र माझे म्हणणे ऐकेल. सेवेच्या माध्यमातून मला ही पूर्णता मिळवायची आहे.
(यंग, १३-८-१९२५, पृ. २७९-८०)

माझे जर कोणते तत्त्वज्ञान असेल तर ते सांगते की, कोणत्याही ध्येयाला बाह्य तत्त्वांकडून हानी पोहोचत नाही. जेव्हा ध्येय अशुद्ध असेल अथवा ध्येय जरी शुद्ध असले तरी त्याचे समर्थक खोटे, दुबळे वा मलीन असतील तरच ध्येयाला हानी पोहोचू शकते व तेव्हा तशी हानी पोहोचणे उचितही असते.
(हरि, २५-७-१९३६, पृ. १८५)

## ३. मला मार्ग माहीत आहे.

मला मार्ग माहीत आहे. तो सरळ आणि अरुंद आहे. तो असिधारेसारखा आहे. त्यावरून चालताना मला आनंद होतो. जेव्हा त्यावरून मी घसरतो तेव्हा मी रडतो. ईश्वरवचन आहे : 'जो प्रयत्न करतो तो कधीही नष्ट होत नाही'. या वचनावर माझा पूर्ण विश्वास आहे. त्यामुळे माझ्या दुबळेपणामुळे मी हजारो वेळा अयशस्वी झालो तरी माझी श्रद्धा कधीही ढळणार नाही. उलट माझी अशी आशा कायम राहील की ज्या दिवशी हे शरीर पूर्ण नियंत्रणात येईल त्या दिवशी मला ईश्वराच्या अलौकिक प्रकाशाचे दर्शन होईल आणि असे नक्कीच होईल.
(यंग, १७-६-१९२६, पृ. २१५)

जेव्हा माझा आत्मा एकाही अन्यायाचा वा विपत्तीचा विवश साक्षीदार असतो तेव्हा त्याला समाधानाचा अनुभव येऊ शकत नाही. परंतु माझ्यासारख्या दुर्बल, नश्वर आणि दीन व्यक्तीला प्रत्येक दोष दूर करणे अथवा जे दोष मला दिसतात त्या सर्वांपासून स्वतःला मुक्त करणे शक्य नाही.

माझे अंतर्मन मला एका बाजूला नेते आणि शरीर उलट दिशेला जाऊ इच्छिते. या दोन्ही विरोधी सैन्यापासून मुक्ती मिळवता येऊ शकते, परंतु ती धीराने व खडतर मार्गानेच मिळू शकते.

कर्मांचा यांत्रिकपणे त्याग करून मला ही मुक्ती मिळू शकत नाही - ती तर अनासक्त भावाने जाणीवपूर्वक कर्म केल्यानेच प्राप्त होऊ शकते. या संघर्षशील देहाला सतत कष्टवावे लागत असते. तसे केल्यानंतरच अंतर्मन पूर्णपणे स्वतंत्र होऊ शकेल. (यंग, १७-११-१९२१, ३६८)

## सत्याचा शोध

मी केवळ एक सत्यशोधक आहे. मला वाटते की सत्यापर्यंत पोहोचण्याचा मार्ग मी शोधला आहे. मी ते मिळवण्याचा निरंतर प्रयत्न करतो आहे, परंतु अजूनपर्यंत मी त्या ध्येयात यशस्वी होऊ शकलेलो नाही. सत्याला पूर्ण स्वरूपात प्राप्त करणे, आपल्या आणि आपल्या नियतीचा पूर्णपणे साक्षात्कार होणे म्हणजेच पूर्णत्वाला पोहोचणे आहे. मला माझ्या अपूर्णतेची दुःखद जाणीव आहे आणि माणसाला आपल्या सीमांची जाणीव होणे ही फार दुर्लभ गोष्ट असल्यामुळे या जाणिवेतच माझी सर्व शक्ती आहे.

मी जर पूर्णपुरुष असतो, तर माझ्या शेजा-यांचे दुःख पाहून मला तशी जाणीव झाली नसती जशी आज होते आहे. पूर्ण मनुष्य म्हणून त्यांचे दुःख पाहताच ते दूर करण्याचा उपाय मी त्यांना सांगितला असता आणि माझ्यातील अजय सत्याच्या बळावर ती उपाययोजना करण्याकरिता मी त्यांना भाग पाडले असते. परंतु सध्या तर मी एखाद्या धूसर काचेतून पाहण्याचाच प्रयत्न करतो आहे. त्यामुळे हळूहळू आणि कष्टदायी प्रक्रियेद्वारे मी विश्वास जागृत करू शकतो आणि त्यातही मला नेहमी यश येतेच असे नाही.

अशा स्थितीत चोहोकडे पसरलेल्या दूर करता येण्यासारख्या दुःखाची मला कल्पना असतानाही आणि विश्वनियंत्याच्या छायेखाली हाडाच्या सापळ्यासारखी माणसे पाहूनही भारतातील कोट्यवधी दीनदुःखी लोकांबद्दल मला सहानुभूती वाटली नाही तर मी अधमाहून अधम प्राणी ठरेन. (यंग, १७-११-१९२१, ३७७)

## देवावर विश्वास

या जगाला व्यापणा-या काळोखातून बाहेर निघून प्रकाशापर्यंत पोहोचण्याचा मी प्रयत्न करतो आहे. माझ्याकडून अनेकदा चुका होतात वा माझे अंदाज चुकीचे असतात.... माझा विश्वास केवळ ईश्वरावर आहे आणि मी माणसांवरही विश्वास ठेवतो, कारण माझा देवावर विश्वास आहे. (यंग, ४-१२-१९२४, पृ. ३९८)

माझा देवावर विश्वास नसता, तर टाईमनप्रमाणे मानव-वंशाची मी घृणा केली

असती. (हरि, १८-२-१९३३, पृ. ४)

माझ्या जीवनात मी जे काही उल्लेखनीय कार्य केले ते तर्कशक्तीच्या आधारे केलेले नाही तर माझ्या सहजप्रवृत्तीनुसार वा असे म्हणा की ईश्वराकडून मिळालेल्या प्रेरणेद्वारे मी ते केले आहे. (हरि, १४-५-१९३८, पृ. ११०)

मी श्रद्धावान व्यक्ती आहे. मला केवळ देवाचा आधार आहे. माझ्याकरिता केवळ एक पाऊलच पुरे आहे. वेळ आली की देव मला पुढील पाऊल दाखवील. (हरि, २०-१०-१९४०, पृ. ३३०)

**कोणतीही गोपनीयता नाही**

माझी कोणतीही कामे गोपनीय नाहीत. सत्याशिवाय इतर कोणतीही कूटनीती मला माहीत नाही. अहिंसेशिवाय दुसरे कोणतेही शस्त्र माझ्याजवळ नाही. अजाणतेपणी काही वेळासाठी मी भरकटू शकेनही, परंतु कायमस्वरूपी भरकटू शकत नाही. (यंग, ११-१२-१९२४, पृ. ४०६)

माझे जीवन एक उघडे पुस्तक आहे. माझे ना कोणते गुपित आहे ना मी कोणत्याही गुपिताला आश्रय देतो. (यंग, १९-३-१९३१, पृ. ४३)

पूर्णपणे चांगला होण्याकरिता संघर्ष करत असलेला मी एक सामान्य माणूस आहे. मन, वाणी आणि कर्म यांनी पूर्णपणे प्रामाणिक आणि अहिंसक होण्याकरिता मी प्रयत्नशील आहे - हे ध्येय खरे आहे हे मला माहीत आहे, परंतु ते साध्य करताना मी वारंवार अपयशी होतो. मला माहीत आहे की या ध्येयाप्रत पोहोचणे कष्टाचे काम आहे. परंतु या कष्टांनी मला आनंद होतो. या ध्येयाप्रत पोहोचवणारी प्रत्येक पायरी मला पुढच्या पायरीपर्यंत पोहोचण्याकरिता शक्ती आणि सामर्थ्य देते. (यंग, ९-४-१९२४, पृ. १२६)

मी जेव्हा माझ्या लघुतेबद्दल आणि मर्यादांबद्दल विचार करतो आणि दुसरीकडे लोकांच्या माझ्याकडून ज्या अपेक्षा आहेत त्यांच्याबद्दल विचार करतो, तेव्हा क्षणभर तर मी स्तंभित होतो. परंतु नंतर माझ्या लक्षात येते की या अपेक्षा ब-या-वाईटाचे विचित्र मिश्रण असलेल्या माझ्यासारख्या माणसाकडून नाहीत तर माझ्यात असलेल्या सत्य आणि अहिंसा या दोन गुणांकडून आहेत - मग ते गुण माझ्यात कितीही अपु-या प्रमाणात असले तरी तुलनात्मक दृष्टीने ते माझ्यात अधिक असल्याचे दिसते. त्यामुळे पश्चिमेकडील माझ्या सहशोधकांना जी काही मदत मला करता येत असेल ती करण्यापासून त्यांनी विन्मुख होऊ

नये. (यंग, ३-१०-१९२५, पृ. ३४४)

## मार्गदर्शन

मला अचूक मार्गदर्शन होते आहे वा प्रेरणा मिळते आहे, असा माझा दावा नाही. माझा अनुभव मला सांगतो की, कोणत्याही मनुष्य प्राण्याने अचूकतेचा दावा करणे अनुचित आहे. प्रेरणासुद्धा त्यालाच मिळते जो विरोधी तत्त्वांच्या प्रतिक्रियांपासून मुक्त होतो आणि एखाद्या विशिष्ट प्रसंगी विरोधी तत्त्वांपासून मुक्त असल्याचा दावा बरोबर आहे की नाही हे सांगणे कठीण असते. त्यामुळे अचूकतेचा दावा करणे फार धोक्याचे असते. परंतु याचा अर्थ असाही नाही की आम्हाला कोणतेच मार्गदर्शन उपलब्ध नाही. आजवर विद्वानांनी मिळवलेला अनुभव आम्हाला उपलब्ध आहे आणि तो सदैव उपलब्ध राहील.

याशिवाय मूलभूत सत्य अनेक नसून एकच आहे आणि ते आहे सत्य व त्यालाच अहिंसा असेही म्हटले जाते. अपूर्ण माणसाला पूर्ण सत्याचे आणि प्रेमाचे अनंत स्वरूप कळू शकत नाही. परंतु आम्हाला मार्गदर्शन मिळण्यापुरते त्याचे स्वरूप कळते. त्यानुसार आचरण करत असताना काही चुका होऊ शकतात व काही वेळेस तर त्या घोडचुका असतात. परंतु माणूस हा असा एक प्राणी आहे जो स्वतःला नियंत्रित करू शकतो आणि नियंत्रणाच्या या शक्तीत ज्याप्रमाणे चुका करण्याची शक्ती समाविष्ट आहे, त्याचप्रमाणे चूक कळल्यानंतर ती दुरुस्त करण्याचीही शक्ती समाविष्ट आहे. (यंग, २१-४-१९२७, पृ. १२८)

मी द्रष्टा असल्याचे मला मान्य नाही. संत असल्याचा दावा मी नाकारतो. मी या मातीचा आहे, पार्थिव शरीरधारी आहे. तुमच्याप्रमाणेच मीही स्खलनशील माणूस आहे. परंतु मी जग पाहिले आहे. डोळे उघडे ठेवून मी जगलो आहे. माणसाला ज्या ज्या सत्त्वपरीक्षांमधून जावे लागू शकते, त्यांतील बहुतांश सत्त्वपरीक्षांमधून मी गेलो आहे. या साधनेचा प्रवास मी केला आहे.
(स्पीरा, पृ. ५३१)

## स्वार्थत्याग

मी माझ्या देशबांधवांना सांगतो की, स्वार्थत्यागाशिवाय इतर कोणत्याही सिद्धान्ताचे अनुसरण करण्याची गरज नाही. प्रत्येक युद्धाच्या आधी स्वार्थत्याग आवश्यक असतो. तुम्ही हिंसेच्या तत्त्वाचे पुरस्कर्ते असा वा अहिंसेचे; तुम्हाला त्याग आणि शिस्त यांच्या कसोटीतून पार पडावेच लागेल. (स्पीरा, ५३२)

पश्चिमेकडील अनेक मित्रांच्या आदराला मला मुकावे लागत असले तरी त्यांच्या मैत्रीकरिता आणि प्रेमाकरिता मी माझ्या अंतरात्म्याचा आवाज दाबून ठेवू शकत नाही आणि त्यामुळे नतमस्तक होऊन जगासमोर माझ्या अंतरंगाच्या मूळ स्वरूपाची मी घोषणा करतो. माझ्या आत असे काही तरी आहे की, जे मला माझा आक्रोश व्यक्त करण्याकरिता बाध्य करत आहे. मला मानवतेची माहिती आहे. मानसशास्त्राचाही मी थोडासा अभ्यास केलेला आहे. अशा माणसाला ते नेमके काय आहे ते माहीत असते. तुम्ही त्याचे कसे वर्णन करता त्याची मला फिकीर नाही. माझ्या आतील आवाज मला सांगतो की 'तुला संपूर्ण जगाच्या विरोधात उभे राहावे लागेल, मग तू एकटा पडलास तरी हरकत नाही. जरी जगाने तुझ्याकडे रागावून पाहिले तरी तू जगाच्या डोळ्याला डोळा भिडवलाच पाहिजे. घाबरू नकोस, आपल्या अंतरात्म्याच्या आवाजावर विश्वास ठेव.' तो आवाज सांगतो, 'तशीच वेळ आली तर, मित्र, पत्नी आणि सर्व गोष्टींचा त्याग कर, परंतु ज्याकरिता तू जगलास आणि ज्याकरिता तुला मरायचे आहे त्याप्रती तू प्रामाणिक राहिले पाहिजे.' (मार्नॉ, पृ. २०१-२)

## पराभूत मनोवृत्ती नाही

पराजयाने मी नाराज होत नाही. त्यामुळे माझ्यात केवळ सुधारणा होऊ शकते.... मला माहीत आहे की ईश्वर मला मार्गदर्शन करील. मानवी बुद्धिमत्तेपेक्षा सत्य श्रेष्ठ आहे. (यंग, ३-७-१९२४, पृ. २१८)

माझा आशावाद मी कधीच गमावला नाही. अतिशय खडतर प्रसंगातसुद्धा माझ्या आतील आशेची प्रखर ज्योत तेवतच असते. मी स्वतः माझ्या आशेला मारू शकत नाही. आशेच्या औचित्याचे मी प्रदर्शन करू शकत नाही, परंतु माझ्यात पराजयाची भावना नाही. (हरि, २५-१-१९३५, पृ. ३९९)

मी भविष्य सांगू शकत नाही. वर्तमानाची चिंता करणे एवढेच माझे काम आहे. आगामी क्षणांवर नियंत्रण ठेवण्याची कोणतीही शक्ती ईश्वराने मला दिलेली नाही....

## विश्वास

हे खरे आहे की, लोकांनी अनेकदा मला निराश केले आहे. अनेकांनी मला फसविले आहे आणि अनेकांनी आपले कर्तव्य बजावलेले नाही. ज्याप्रमाणे सहकार्य कसे करावे हे मला माहीत आहे, त्याचप्रमाणे असहकार कसा करावा हेही मला माहीत असल्यामुळे त्यांच्याबरोबर काम करण्याचा मला कोणताच

पश्चात्ताप नाही. जोपर्यंत एखाद्या व्यक्तीच्या विरोधात निश्चित पुरावा नाही तोपर्यंत त्याच्या म्हणण्यावर आपण विश्वास टाकला पाहिजे हाच जगात काम करण्याचा सर्वात व्यावहारिक आणि सन्माननीय मार्ग आहे. (यंग, २६-१२-१९२४, पृ. ४३०)

विश्वास करण्यावर माझा विश्वास आहे. विश्वासाने विश्वास मिळतो. संशय दुर्गंधीयुक्त आहे आणि त्यामुळे केवळ कीड निर्माण होते. ज्याने विश्वास ठेवला तो आजपर्यंत जगात पराभूत झाला नाही. (यंग, ४-६-१९२५, पृ. १९३)

वचनभंग माझ्या अंतःकरणाला मुळापासून हादरवतो. आणि वचनभंग करणा-यांशी जेव्हा माझा काही संबंध असतो, तेव्हा तर असे विशेषत्वाने होते. वयाच्या सत्तराव्या वर्षी माझ्या जीवनाचे कोणतेही विमा मूल्य नाही. म्हणूनच एखाद्या पवित्र आणि गंभीर वचनाचे पालन करण्यासाठी मला माझ्या प्राणांची आहुती द्यावी लागली तरी त्यासाठी मी सहर्ष तयार असले पाहिजे.
(हरि, ११-३-१९३९, पृ. ४६)

माझ्या मते माझ्या संपूर्ण सार्वजनिक आणि व्यक्तिगत जीवनात मी कोणताही वचनभंग केलेला नाही. (हरि, २२-४-१९३९, पृ. १००)

### माझे नेतृत्व

त्यांचे म्हणणे आहे की मानवी स्वभावाचे मला अधिक चांगले ज्ञान आहे असा माझा दावा आहे. माझा विश्वास आहे की हा माझा दावा बरोबर आहे. जर माझ्या प्रामाणिकपणावर आणि पद्धतींवर माझा विश्वास नसेल तर मी पुढारीपण करण्याच्या योग्यतेचा राहणार नाही. (यंग, १-१-१९२५, पृ. ८)

माझ्या नेतृत्वाचा जर प्रश्न असेल व जर मी नेता असेन, तर ते पद मी मागितल्यामुळे नाही तर मी केलेल्या निष्ठापूर्वक सेवेमुळे मला मिळालेले असेल. ज्याप्रमाणे व्यक्ती आपल्या त्वचेचा रंग सोडू शकत नाही त्याचप्रमाणे अशा नेतृत्वाचा ती त्यागही करू शकत नाही आणि ज्याअर्थी माझ्या राष्ट्राचा मी अभिन्न अंग बनलेलो आहे त्याअर्थी त्याने माझ्या सर्व उणिवा आणि मर्यादांसह माझा स्वीकार केला पाहिजे. त्यातील अनेक उणिवा आणि मर्यादा यांची मला दुःखद जाणीव आहे आणि उरलेल्यांची जाणीव माझे स्पष्टवक्ते टीकाकार मला नेहमीच करून देत असतात. (यंग, १३-२-१९३०, पृ. ५२)

जो सुतार आपल्या अवजारांची निंदा करतो, तो वाईट कारागीर असतो. जो सेनापती वाईट कामगिरीकरिता आपल्या सैनिकांना दोष देतो तो सेनापती अयोग्य

असतो. माझ्या मर्यादा ओळखण्याइतके ज्ञान मला आहे. माझ्या अकलेचे दिवाळे निघाले असेल तर ते सांगण्याइतके धैर्य ईश्वर मला देईल. गत अर्ध्या शतकापासून ईश्वराच्या अनुमतीने मी जे काम करत आलो आहे, त्या कामाकरिता जेव्हा माझी गरज राहणार नसेल तेव्हा बहुधा तोच मला उचलून घेईल. परंतु मला वाटते की अजून माझे काम बाकी आहे. माझ्या चोहोबाजूला जो काळोख पसरला आहे तो दूर होईल आणि दांडी मार्चपेक्षाही एखाद्या मोठ्या लढ्याद्वारे वा त्याशिवायही अहिंसक मार्गाने भारताला आपले खरे स्थान प्राप्त होऊ शकेल. या काळोखाला दूर करू शकेल अशा प्रकाशाकरिता मी प्रार्थना करतो आहे. ज्यांचा अहिंसेवर जागृत विश्वास आहे त्यांनी माझ्या प्रार्थनेत सहभागी व्हावे. (हरि, २३-७-१९३८, पृ. १९३)

### माझे काम

जे काम माझ्यासमोर आहे ते करून मी संतुष्ट आहे. का आणि कशाची मला फिकीर नाही.... ज्या गोष्टींचा आम्हाला अंदाज लागत नाही त्या गोष्टींमध्ये आम्ही लुडबुडू नये असे आम्हाला विवेक सांगतो. (हरि, ७-९-१९३५, पृ. २३४)

प्रत्येक व्यक्तीच्या मनात, मग ती कितीही दुर्बल असली तरी, ती स्वतःच्या स्वाभिमानाचे आणि स्वातंत्र्याचे रक्षण करण्याकरिता समर्थ आहे असा विश्वास जर मानवजातीमध्ये मी निर्माण करू शकलो तर माझे काम झाले असे मी समजेन. प्रतिकार करणा-या व्यक्तीविरुद्ध सर्व जग जरी उभे राहिले तरी त्याला संरक्षण उपलब्ध असतेच. (हिंस्ट, ६-८-१९४४)

माझे डोळे मिटल्यानंतर व माझ्या शरीराचे दहन झाल्यानंतरही माझ्या कार्याच्या मूल्यमापनाकरिता भरपूर वेळ राहील. (यंग, ४-४-१९२९, पृ. १०७)

## ४. माझ्या जीवनाचे ध्येय

मी द्रष्टा नाही. मी व्यावहारिक आदर्शवादी आहे असा माझा दावा आहे. अहिंसाधर्म हा केवळ ऋषीमुनींकरिता नाही. तो सामान्य माणसांकरितासुद्धा आहे. ज्याप्रमाणे हिंसा पशूंचा धर्म आहे; त्याचप्रमाणे अहिंसा हा मानवजातीचा धर्म आहे. पशूंचा आत्मा सुप्तावस्थेत असतो व त्यामुळे शारीरिक शक्तीपेक्षा वेगळा धर्म त्यांना माहीत नसतो. माणसाचा मोठेपणा आत्मशक्तीने प्रेरित केलेल्या उच्च कायद्याच्या पालनाची अपेक्षा करतो. (यंग, ११-८-१९२०, पृ. ३)

माझ्या सार्वजनिक जीवनात अनेक असे प्रसंग आले, जेव्हा प्रतिकाराची ताकद असतानाही प्रतिकार करण्यापासून मी स्वतःला अडवले आणि मित्रांनाही तसा सल्ला दिला. याच तत्त्वाला माझे जीवन समर्पित आहे. जगाच्या सर्व महान गुरूंच्या - झरतुष्ट्र, महावीर, डॅनियल, येशू, महंमद, नानक आणखी किती तरी - उपदेशातून मी हेच शिकलो आहे. (यंग, ९-२-१९२२, पृ. ८५)

माझ्या धर्माचा पहिला नियम अहिंसा आहे आणि हाच माझ्या पंथाचा अंतिम नियमही आहे. (यंग, २३-३-१९२२, पृ. १६६)

अहिंसाविज्ञानाचा मी लहानसा संशोधक आहे. याची खोली पाहिली की, काही वेळा माझ्या सहकारी कार्यकर्त्याएवढाच मीही घाबरून जातो.
(यंग, २०-११-१९२४, पृ. ३८२)

## सत्याग्रहाचा हेतू

अत्यंत संयमाने उदाहरण आणि उपदेश देत सत्याग्रहाच्या अतुलनीय अस्त्राच्या प्रयोगाची दीक्षा देणे हे माझे ध्येय आहे. अहिंसा आणि सत्य या सिद्धान्ताचा सत्याग्रह हा उपसिद्धान्त आहे. जीवनातील अनेक दोषांचा उपाय अहिंसेशिवाय दुसरा कोणताही नाही हे सांगण्याकरिता मी केवळ उत्सुकच नाही तर अस्वस्थही आहे....

जेव्हा वाईटपणा करण्याची क्षमताच माझ्यात उरणार नाही आणि माझ्या वैचारिक जगतात कोणतीही कटू वा दांभिक गोष्ट टिकू शकणार नाही तेव्हा आणि केवळ तेव्हाच माझी अहिंसा जगातील सर्व लोकांच्या हृदयाला पाझर फोडेल. मी स्वतःसमोर तसेच माझ्या वाचकांसमोर एखादा असंभाव्य आदर्श वा कठीण कसोटी असे काहीही ठेवलेले नाही. हा माणसाचा विशेषाधिकारही आहे आणि जन्मसिद्ध अधिकारही आहे.

आम्ही स्वर्ग गमावला आहे परंतु आपण तो परत मिळवू शकतो. या गोष्टीला जरी वेळ लागणार असेल तरी एकूण कालचक्रात तो अणुमात्र आहे. गीतेच्या दिव्य गुरूने म्हणजे श्रीकृष्णाने सांगितलेलेच आहे की माणसाचे लक्षावधी दिवस ब्रह्माच्या एका दिवसासारखे असतात. (यंग, २-७-१९२५, पृ. २३२)

अहिंसा माझा देव आहे आणि सत्य माझा देव आहे. जेव्हा मी अहिंसेचा शोध घेतो तेव्हा सत्य म्हणते 'हिला माझ्या माध्यमातून शोध.' आणि जेव्हा मी सत्याचा शोध घेत असतो तेव्हा अहिंसा म्हणते, 'याला माझ्या माध्यमातून

शोध. (यंग, २-७-१९२५, पृ. १९१)

मला वाटते की माझ्या अंगप्रत्यंगात अहिंसा वसलेली आहे. अहिंसा आणि सत्य ही माझी दोन फुफ्फुसे आहेत. यांच्याशिवाय मी जगू शकत नाही. परंतु दर क्षणाला अहिंसेच्या प्रचंड शक्तीचे व माणसाच्या मला लघुतेचे दर्शन होते. एक वनवासी अतीव करुणा असूनही हिंसेपासून पूर्णपणे मुक्त राहू शकत नाही. आपल्या प्रत्येक श्वासाबरोबर तो थोडीफार हिंसा करतोच.

हे शरीर स्वतःच एक कत्तलखाना आहे. त्यामुळे शरीराच्या मुक्तीतच मोक्ष आणि परमानंद आहे. यामुळेच मोक्षाच्या आनंदाशिवाय सगळे सुख क्षणिक आणि अपूर्ण आहेत. वस्तुस्थिती हीच आहे की, आम्हाला आमच्या जीवनात हिंसेचे अनेक घोट घ्यावे लागत असतात. (यंग, २१-१०-१९२६, पृ. ३६४)

**अहिंसेचा उपयोग**

आपल्याला सत्य आणि अहिंसेला केवळ व्यक्तिगत आचरणापर्यंतच सीमित ठेवायचे नाही तर समूह, समुदाय आणि राष्ट्र यांच्या आचरणापर्यंत यांची व्याप्ती आपल्याला वाढवायची आहे. कमीतकमी माझे स्वप्न तरी हेच आहे आणि यांची प्राप्ती करण्याकरिताच मी जगेन आणि मरेनही.

दररोज नवा शोध लावण्याकरिता माझ्या विश्वासाची मला मदत होते. अहिंसा हा आत्म्याचा स्वभाव आहे. त्यामुळे जीवनाच्या सर्व प्रकारच्या कार्यात अहिंसेचे आचरण केले पाहिजे. जर अहिंसेचे आचरण सर्वत्र करता येत नसेल, तर हिचे कोणतेच व्यावहारिक मूल्य नाही. (हरि, २-३-१९४०, पृ. २३)

सत्य आणि अहिंसा यांच्याबद्दलची माझी श्रद्धा सतत वाढत चालली आहे. जसजसा माझ्या जीवनात या गोष्टींच्या अनुसरणाचा मी प्रयत्न करतो, तसतसा माझा विकास होतो आहे. मला त्यांचा नवा गूढार्थ कळतो. दररोज मी त्यांना नव्या प्रकाशात पाहतो व त्यांच्यातील नवनवीन अर्थ मला कळतात.
(हरि, १-५-१९३७, पृ. ९४)

लोकांना कठीण परिस्थितीतून बाहेर काढण्याकरिता धावपळ करणारा शूरवीर होणे हे माझे ध्येय नाही. आपण स्वतः आपल्या अडचणीतून मार्ग काढू शकतो हे लोकांना दाखवण्याचे काम नम्रतापूर्वक करणे एवढाच माझा हेतू आहे.
(हरि, २८-६-१९४२, पृ. २०१)

ज्याप्रमाणे माझे यश आणि कौशल्य ईश्वरी वरदान आहेत त्याचप्रमाणे माझी

अपूर्णता आणि अपयश या गोष्टीही ईश्वरी वरदान आहेत आणि मी या दोन्ही गोष्टी त्याच्या पायावर अर्पण करतो. माझ्यासारख्या अपूर्ण व्यक्तीला त्याने एवढ्या महान कार्यासाठी का निवडले? मला वाटते की, त्याने असे जाणूनबुजून केले आहे. लाखो निर्धन, मूक आणि अडाणी लोकांची सेवा करण्याचा त्याचा हेतू असावा. एखाद्या पूर्ण पुरुषाने तर त्यांची निराशाच केली असती. जेव्हा ते पाहतील की, त्यांच्यासारखाच एक दुबळा माणूस अहिंसेच्या मार्गावर चालून पुढे जातो आहे तेव्हा त्यांच्यातही आपल्या सामर्थ्याबद्दल आत्मविश्वास जागा होईल. जर एखादी पूर्ण व्यक्ती नेतृत्वाकरिता आली असती, तर आम्ही त्याला मान्यता दिली नसती आणि त्याला गुहेत हाकलून लावले असते. शक्य आहे की माझे अनुसरण करणारी एखादी व्यक्ती माझ्यापेक्षा अधिक पूर्ण असल्याचे सिद्ध होईल आणि तुम्ही तिचा संदेश अधिक चांगला ग्रहण करू शकाल. (हरि, २१-७-१९४०, पृ. २११)

## गांधीवादी संप्रदाय नाही

मी स्वतःला भारताचा आणि मानवतेचा एक नम्र सेवक समजतो व अशाच प्रकारे सेवा करत असताना मरून जाणे मी पसंत करेन. कोणताही संप्रदाय चालवण्याची मला कामना नाही. खरोखर मी एवढा महत्त्वाकांक्षी आहे की केवळ एका संप्रदायाने माझे अनुसरण करावे ही गोष्ट मला पसंत नाही. एवढ्याने माझे समाधान होणार नाही. मी कोणत्याही नवीन सत्याचे प्रतिनिधित्व करत नसल्यामुळे मी ज्या सत्याला ओळखतो, त्या सत्याचे प्रतिनिधित्व करण्याचा मी प्रयत्न करतो आहे. एवढे मात्र खरे की अनेक जुन्या सत्यांना मी उजाळा देतो आहे.
(यंग, २५-८-१९२१, पृ. २६७)

मी कोणताच नवीन सिद्धान्त मांडलेला नाही. जुन्याच सिद्धान्तांना नव्या पद्धतीने मांडण्याचा प्रयत्न मी केलेला आहे. (यंग, २-१२-१९२६, पृ. ४१९)

'गांधीवाद' यासारखी कोणतीही गोष्ट नाही आणि माझ्यामागे कोणताही संप्रदाय सोडून जाण्याची माझी इच्छा नाही. मी एखाद्या नवीन सिद्धान्ताला जन्म दिला आहे असा दावा मी करत नाही. आपल्या दैनंदिन जीवनात आणि समस्यांच्या सोडवणुकीकरिता सनातन सत्यांना माझ्या पद्धतीने लागू करण्याचा प्रयत्न मी केला आहे.... (हरि, २८-३-१९३६, पृ. ४९)

गांधीवाद काय आहे ते मला स्वतःलाही माहीत नाही. अज्ञात समुद्रात मी माझी नाव वल्हवतो आहे. वारंवार मला समुद्राच्या खोलीचा अंदाज घ्यावा

लागतो. (हरि, १७-१२-१९३९, पृ. ३८५)

'गांधीवादी' हे काय नाव आहे? त्याऐवजी अहिंसावादी का नाही? गांधीत तर चांगुलपणा आणि वाईटपणा, दुबळेपणा आणि कणखरपणा, हिंसा आणि अहिंसा यांचे विचित्र मिश्रण आहे. उलट अहिंसेत मात्र कोणत्याही प्रकाराची भेसळ नाही. (हरि, १३-५-१९३९, पृ. १२१)

तथाकथित गांधीवादी सिद्धान्त आणि त्याच्या प्रचाराचे उपाय यासंबंधीची चर्चा आता मी करीन. सत्य आणि अहिंसेचा प्रचार पुस्तकांच्या माध्यमातून तेवढा चांगला करता येत नाही जेवढा तो आचरणातून करता येतो. प्रामाणिकपणाने जगण्यात आलेले जीवन पुस्तकांपेक्षा अधिक प्रभावी होते.
(हरि, १३-५-१९३९, पृ. १२२)

माझ्या सर्व सल्ल्यांना नेहमीच एक बचावात्मक कलम जोडलेले असते. ते कलम असे आहे : 'माझा सल्ला मनाला आणि बुद्धीला पटत नसेल तर तो मान्य करण्याची गरज नाही.' ज्याला खरोखर आपल्या आतील आवाज ऐकू येतो त्याने माझा सल्ला मानण्याकरिता आपल्या आतील आवाजाची अवज्ञा करू नये, वेगळ्या शब्दात सांगायचे तर माझा सल्ला केवळ त्यांच्याचकरिता आहे ज्यांना आपल्या आतील आवाज ऐकू येत नाही आणि ज्यांचा तुलनात्मक रीतीने माझ्या अधिक अनुभवावर आणि योग्य निर्णय घेण्याच्या क्षमतेवर विश्वास आहे.
(हरि, १५-७-१९३९, पृ. १९७)

गांधीवाद जर भ्रमावर आधारित असेल तर तो नष्ट होणेच उचित होईल. सत्य आणि अहिंसा कधीही नष्ट होणार नाहीत परंतु गांधीवाद जर एखाद्या पंथाचा वा संप्रदायाचा पर्याय असेल तर तो नष्ट होणेच उचित होईल. माझ्या मरणानंतर जर मला कळले की मी ज्या आदर्शांवर चाललो त्यांचा पंथ वा संप्रदाय बनला आहे तर मला फार वेदना होतील....

आपण गांधीचे अनुयायी आहोत असे कोणीही म्हणू नये. मी स्वतःच माझे अनुयायित्व करणे एवढेच पुरेसे आहे. मला माहीत आहे की मी माझा किती अपूर्ण अनुयायी आहे कारण मी स्वतःच माझ्या श्रद्धेप्रमाणे जगू शकत नाही. तुम्ही माझे अनुयायी नाही तर सहपाठी आहात, सह-संशोधक आहात आणि सहकारी आहात. (हरि, २-३-१९४०, पृ. २३)

जर कोणी गांधीवादी असेल तर तो मीच असलो पाहिजे. परंतु मला आशा आहे की असा कोणताही दावा करण्याचा दांभिकपणा मी करणार नाही.

गांधीवादीचा अर्थ आहे गांधीची पूजा करणारा. पूजा तर ईश्वराची केली जाते. मी ईश्वरत्वाचा दावा कधीही केला नाही, त्यामुळे कोणीही स्वतःला माझा भक्त म्हणवू शकत नाही. (हरि, २-११-१९४७, पृ. ३८९)

## व्यथांचा नियम

भारतासमोर आत्मत्यागाचा प्राचीन आदर्श ठेवण्याचा धोका मी पत्करला आहे. वास्तवात सत्याग्रह आणि त्याच्या शाखाप्रशाखा - असहकार आणि सविनय कायदेभंग - इतर काही नसून आत्मतप आणि त्रास सहन करण्याचा नियम यांची ही नवीन नावे आहेत.

ज्या ऋषींनी हिंसेच्या वातावरणात राहूनही अहिंसेच्या तत्त्वाचा शोध लावला आणि अस्त्र चालवण्याचे ज्ञान असूनही अस्त्रांचे वैय्यर्थ ज्यांना कळले आणि ज्यांनी मुक्तीचा मार्ग हिंसा नाही तर अहिंसाच आहे हे त्रस्त जगाला शिकवले ते न्यूटनपेक्षाही मोठे शास्त्रज्ञ होते. ते वेलिंग्डनपेक्षाही मोठे योद्धे होते.

आपल्या गतिमान अवस्थेत अहिंसेचा अर्थ आहे विवेकपूर्ण कष्ट सहन करणे. याचा अर्थ अत्याचारीच्या इच्छेसमोर भित्रेपणाने केलेले आत्मसमर्पण नाही, उलट याचा अर्थ आहे अत्याचा-याच्या इच्छेविरुद्ध आपल्या संपूर्ण आत्मशक्तीच्या आधारावर उठून उभे राहणे. या नियमानुसार चालताना कोणताही माणूस एकटाच आपला सन्मान, धर्म आणि आत्मा यांच्या रक्षणाकरिता अन्यायी साम्राज्यालासुद्धा आव्हान देऊ शकतो आणि त्या साम्राज्याच्या पतनाची वा नवनिर्माणाची सुरुवात करू शकतो.

## भारताची भूमिका

भारत दुर्बल आहे म्हणून मी त्याला अहिंसेच्या मार्गावर चालण्याची विनंती करत नाही. माझी इच्छा आहे की त्याने आपल्या सामर्थ्याची आणि शक्तीची जाणीव ठेवून अहिंसेचे अनुसरण केले पाहिजे. आपल्या शक्तीची ओळख व्हावी म्हणून भारताला शस्त्रांच्या प्रशिक्षणाची गरज नाही. आपण स्वतःला केवळ हाडामांसाचा गोळा समजत असल्यामुळे आपल्याला शस्त्रांची गरज वाटते.

मला वाटते की, प्रत्येक भौतिक दुर्बलतेवर मात करू शकणा-या व संपूर्ण जगाच्या भौतिक सामर्थ्याला आव्हान देऊ शकणा-या आपल्या अविनाशी आत्म्याची ओळख भारताला पटावी. (यंग, ११-८-१९२०, पृ. ३-४)

उद्धटपणाची भावना न ठेवता नम्रतापूर्वक मी म्हणू शकतो की, माझा संदेश

आणि माझ्या पद्धती तत्त्वतः सर्व जगाकरिता आहेत आणि विशाल व सतत वाढत्या संख्येत पश्चिमेकडील स्त्री-पुरुषांचे अंतःकरण त्यांनी आश्चर्यकारकरित्या प्रभावित केले असल्याचे पाहून मला अतिशय समाधान होते आहे.
(यंग, १७-९-१९२५, पृ. ३२०)

**विश्वबंधुत्व**

केवळ भारतवासीयांमध्ये बंधुभावाची भावना निर्माण करणे एवढेच माझ्या जीवनाचे ध्येय नाही. आज माझा जवळपास सगळा वेळ भारताच्या स्वातंत्र्याकरिता खर्च होत आहे हे खरे असले तरी माझे ध्येय केवळ भारताचे स्वातंत्र्य नाही. भारताच्या स्वातंत्र्याच्या माध्यमातून मला विश्वबंधुत्वाचे ध्येय साध्य करायचे आहे.

माझी देशभक्ती इतरांना वगळणारी गोष्ट नाही. ही सर्वसमावेशक आहे आणि इतर राष्ट्रांना त्रास देऊन व त्यांचे शोषण करून आपले मोठेपण सिद्ध करणा-या देशभक्तीचा मी त्याग करीन. संपूर्ण मानवतेच्या अधिकाधिक कल्याणाशी माझी देशभक्ती निरपवाद रूपाने जुळलेली नसेल तर ती व्यर्थ आहे.

एवढेच नाही तर माझा धर्म आणि त्या धर्मातून निर्माण झालेली माझी देशभक्ती या गोष्टी संपूर्ण जीवन व्यापतात. मी केवळ मनुष्यप्राण्यांबरोबरच तादात्म्य वा बंधुत्व स्थापू इच्छीत नाही, तर पृथ्वीवर राहणा-या किडे-कीटकांबरोबरही तादात्म्य अथवा बंधुत्व स्थापन करण्याची माझी इच्छा आहे.... याचे कारण आमची मान्यता आहे की, आम्ही सर्व एकाच ईश्वराची लेकरे आहोत आणि म्हणून जीवन कोणत्याही रूपात दिसत असले, तरी तत्त्वतः ते एकच असले पाहिजे. (यंग, ४-४-१९२९, पृ. १०७)

मला माझ्या जीवनाच्या ध्येयाबद्दल एवढी श्रद्धा आहे की, ते प्राप्त करण्यात जर मी यशस्वी झालो - आणि तसे होणे अपरिहार्य आहे - तर इतिहासात ही गोष्ट नमूद करण्यात येईल की हे आंदोलन जगातील सर्व लोकांना एका सूत्रात ओवण्याकरिता होते. हे लोक परस्पर विरोधी नाहीत तर एकाच समष्टीचे भाग आहेत. (हरि, २६-१-१९३४, पृ. ८)

**अहिंसक मार्ग**

माझी महत्त्वाकांक्षा सीमित आहे. देवाने सर्व जगाला अहिंसेच्या मार्गाने नेण्याची शक्ती मला दिलेली नाही. परंतु मला वाटते की, भारताच्या अनेक दोषांचे

अहिंसेच्या मार्गाने निराकरण करण्याकरिता, मार्गदर्शन करण्याकरिता त्याने मला निवडले आहे. या दिशेने आतापर्यंत करण्यात आलेली प्रगती प्रचंड आहे; परंतु अजूनही बरेचसे करायचे शिल्लक आहे. (हरि, २३-७-१९३८, पृ. १९३)

आज फसवणूक आणि असत्य जगाची शिकार करण्याकरिता टपलेले आहेत. अशा परिस्थितीचा मी विवश साक्षीदार बनून राहू शकत नाही.... आज जर मी शांत आणि निष्क्रिय होऊन बसलो, तर संपूर्ण जगाला गिळंकृत करणारी ही आग विझवण्याकरिता ईश्वराने मला दिलेल्या शक्तीचा मी उपयोग केला नाही, म्हणून तो मला शिक्षा देईल. (बांक्रा, ९-८-१९४२)

माझी श्रद्धा मी इतरांवर लादू शकत नाही आणि एखाद्या राष्ट्रीय संघटनेवर तर मुळीच नाही. मी राष्ट्राला श्रद्धेचे सौंदर्य व उपयुक्तता दाखवू इच्छितो आणि त्याबद्दल विश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न करू शकतो....

जी साधने निश्चितपणे खोडसाळ आणि हानिकारक नसतील, त्या साधनांद्वारे माझ्या हट्टाखातर देशाला प्रगती न करू देणे अनर्थकारक होईल. उदाहरणार्थ वास्तव हिंसेला विरोध करणारा मी एकटा जरी असलो, तरी मी उभा राहिलो पाहिजे. परंतु मी हे मान्य केले आहे की राष्ट्राला हवे असेल तर त्याला वास्तव हिंसेद्वारेसुद्धा स्वातंत्र्य मिळवण्याचा अधिकार आहे. माझी आई पथभ्रष्ट झाली तर ज्याप्रमाणे ती आदराला पात्र राहणार नाही; त्याचप्रमाणे भारत माझी मातृभूमी असूनही ती माझी प्रिय भूमी मात्र राहणार नाही. (यंग, २०-११-१९२४, पृ. ३८२)

सार्वभौम अहिंसेचा प्रचार करण्याची क्षमता माझ्यात नाही. त्यामुळे आपले स्वातंत्र्य मिळवण्याच्या मर्यादित ध्येयाने अहिंसेचा उपयोग करण्याकरिता मी प्रचार करतो आहे आणि त्यामुळेच कदाचित मी आंतरराष्ट्रीय संबंधांचे नियंत्रण अहिंसक उपायांनी करण्याकरिता प्रचार करत असतो. सार्वभौम अहिंसेचा प्रचार करण्याआधी मला वासनांपासून पूर्णपणे मुक्त व्हावे लागेल आणि माझ्यात कोणतीही पाप भावना नसेल अशी स्थिती निर्माण करावी लागेल.
(हरि, २५-१-१९४२, पृ. १५)

माझा उपदेश आणि माझी शिकवण भावनात्मक वा अव्यावहारिक नाही. मी तीच शिकवण देतो, जी प्राचीन काळापासून चालत आली आहे आणि तोच उपदेश करतो; ज्यानुसार मी स्वतः आचरण करण्याचा प्रयत्न करतो आणि माझा दावा आहे की माझ्याप्रमाणे प्रत्येकजण आचरण करू शकतो कारण मी एक सामान्य देहधारी प्राणी आहे आणि आमच्यातील सर्वात कमी प्रतीचा माणूस ज्या प्रकारच्या

चुका करू शकतो त्याच प्रकारच्या चुका मीही करू शकतो.
(यंग, १५-१२-१९२७, पृ. ४२४)

मी सार्वभौम अहिंसेच्या गोष्टी करत असलो, तरी माझा प्रयोग केवळ भारतापर्यंत सीमित आहे. जर मी यशस्वी झालो तर सगळे जग हिचा सहज स्वीकार करील. परंतु हा 'जर' फार मोठा आहे. वेळेची काळजी मी करत नाही. निबिड काळोखातही माझा विश्वास कायम असतो. (हरि, ११-२-१९३९, पृ. ८)

का कुणास ठाऊक मला युरोप आणि अमेरिकेत जाण्याची भीती वाटते. देशबांधवांच्या तुलनेत त्यांच्यावर माझा कमी विश्वास आहे म्हणून नव्हे, उलट माझा स्वतःवरच विश्वास कमी आहे हे त्याचे कारण आहे. प्रकृतीकरिता हवापालटाची वा देशाटनाची मला कोणतीही लालसा नाही. सार्वजनिक भाषणे देण्याचाही मला लोभ नाही. माझे देव्हारे माजवले जावे अशीही माझी मुळीच इच्छा नाही. सार्वजनिक भाषणे देण्याची व सार्वजनिक निदर्शनाचा ताण सहन करण्याची शक्ती माझ्यात आता क्वचितच परत येईल, असे मला वाटते.

ईश्वराने जर मला कधीकाळी पश्चिमेच्या यात्रेवर पाठविले, तर मी तेथील जनतेच्या अंतःकरणात प्रवेश करण्याकरिता, युवकांशी शांततापूर्वक चर्चा करण्याकरिता आणि माझ्यासारख्या लोकांना - ज्यांना सत्याशिवाय इतर कोणत्याही अटीवर शांतता नको आहे - भेटण्याकरिता जाईन.

परंतु मला वाटते की, सध्या पश्चिमेला देण्यासारखा माझ्याजवळ कोणताच संदेश नाही. मला खात्री आहे की माझा संदेश सार्वभौम आहे. परंतु मला वाटते की, मी सध्या माझ्या देशात काम करूनच हा संदेश अधिक चांगल्या पद्धतीने सर्वत्र पोहोचवू शकतो. जर मी मला भारतात मिळालेले यश दाखवू शकलो, तर माझा संदेश सर्व लोकांपर्यंत पोहोचेल.

जर मी या निष्कर्षावर पोहोचलो की, भारताकरिता माझ्या संदेशाचा काहीही उपयोग नाही, तर माझी त्यावर श्रद्धा असूनही इतर लोकांपर्यंत तो पोहोचवण्याकरिता कुठे बाहेर जाण्याची इच्छा मी करता कामा नये. जर मी बाहेर गेलो तर आधी मला या गोष्टीचा विश्वास वाटला पाहिजे की - लोकांचा त्यावर विश्वास असो वा नसो - भारताने माझा संदेश ग्रहण केला आहे, मग तसे करण्याची गती कितीही कमी का असेना. (म, II, पृ. ४१७)

माझ्याकडून वाईट कृत्य होऊच शकणार नाही आणि माझ्या वैचारिक जगात कोणतीही कटू वा दांभिकपणाची गोष्ट टिकूच शकणार नाही असे जेव्हा होईल,

तेव्हा आणि केवळ तेव्हाच माझी अहिंसा जगातील सर्व लोकांना पाझर फोडेल. (यंग, २-७-१९२५, पृ. २३२)

माझ्यासारखे लाखो लोक आपल्या आयुष्यात सत्याचा पुरावा देण्यात अपयशी ठरू शकतात, परंतु ते अपयश त्यांचे असेल, चिरंतन सनातन नियमाचे कदापिही नाही. (म, VIII, पृ. २३)

## ५. आतला आवाज

जीवनात काही क्षण असे असतात, जेव्हा काही गोष्टींकरिता आपल्याला बाह्य पुराव्यांची आवश्यकता नसते. आपल्या आतील एक आवाज आपल्याला सांगत असतो की 'तू योग्य मार्गावर आहेस, डावीकडे-उजवीकडे वळण्याची गरज नाही, सरळ आणि अरुंद वाटेने पुढे चालत राहा.' (ली, २५-१२-१९१६)

तुमच्या जीवनात असे क्षण येतील जेव्हा तुमच्या जवळचा मित्रही तुम्हाला सहकार्य करायला तयार होणार नाही. परंतु तेव्हाही तुम्हाला पाऊल उचलावेच लागेल. जेव्हा कर्तव्याबद्दल द्विधा मनःस्थिती असेल तेव्हा नेहमीच तुम्ही तुमच्या 'आतील आवाजाला' निर्णायक समजा. (यंग, ४-८-१९२०, पृ. ३)

आत्मशुद्धीचा सतत अभ्यास करता करता मी 'आतील आवाज' नीट आणि स्पष्टपणे ऐकण्याची थोडीशी क्षमता मिळवली आहे. (एफा, पृ. ३४)

ज्या क्षणी मी माझ्या 'आतील आवाजाला अवरुद्ध' करून टाकेन, त्या क्षणी माझी उपयोगिताच संपून जाईल. (यंग, ३-१२-१९२५, पृ. ४२२)

माझे प्रायश्चित्त काही यांत्रिक क्रिया नाही. ते आतील आदेशानुसारच केले जाते. (यंग, २-४-१९३१, पृ. ६०)

### खोटा दावा नाही

जर एखादी व्यक्ती आतील आवाज नसतानाही त्याचे अनुसरण करत असल्याचे सांगत असेल, तर त्याची अवस्था एखाद्या लौकिक सम्राटाच्या तोतयापेक्षाही वाईट होईल. लौकिक सम्राटाच्या तोतयाचे रहस्य उलगडल्यानंतर त्याला केवळ शारीरिक शिक्षा होते, परंतु आतला आवाज ऐकल्याचा खोटा दावा करणा-याच्या शरीर आणि आत्मा या दोघांचाही नाश होतो.

उदार टीकाकार मला कपटी समजत नाहीत, परंतु त्यांना वाटते की मी बहुधा कोणत्या तरी भ्रमाला बळी पडून काम करत असतो. हे जर खरे असेल तर

या गोष्टीचे परिणामही तोतयाच्या परिस्थितीपेक्षा चांगले होणार नाहीत. माझ्यासारख्या सामान्य ईश्वरशोधकाने अतिशय सावध राहिले पाहिजे आणि आपले मानसिक संतुलन टिकवले पाहिजे. ईश्वराचे मार्गदर्शन मिळण्याआधी माणसाने स्वतःला शून्यवत केले पाहिजे. या विषयाची अधिक चर्चा मी करणार नाही.

माझ्या भ्रमिष्टपणाचा प्रश्नच उद्‌भवत नाही. मी एक साधेसरळ वैज्ञानिक सत्य मांडले आहे आणि याची परीक्षा ते सर्व लोक घेऊ शकतात, ज्यांच्यात ती घेण्याकरिता आवश्यक इच्छा आणि धैर्य आहे. निर्धार असेल तर या योग्यतांना ओळखणे आणि त्या मिळवणे अतिशय सोपे आहे. (बांक्रा, १८-११-१९३२)

दुस-या कोणावर नाही तर स्वतःवर विश्वास ठेवण्याची तुम्हाला गरज आहे. अंतर्मनातील आवाज ऐकण्याची तुम्हाला सवय करावी लागेल. याला आतला आवाज म्हणण्याची तुमची इच्छा नसेल तर विवेकबुद्धीचा आदेश असे तुम्ही म्हणू शकाल. परंतु त्या हाकेचे पालन तुम्हाला करावे लागेल आणि जर तुम्ही ईश्वराचे नाव घेणार नसाल तर निःसंशय तुम्ही दुस-या कोणाचे तरी नाव घ्याल, जो शेवटी ईश्वरच असल्याचे सिद्ध होईल. या ब्रह्मांडात ईश्वराशिवाय दुसरे काहीही नसल्यामुळे असे होणे अपरिहार्य आहे.

मी असेही म्हणेन की आतील आवाजाच्या प्रेरणेनुसार काम करण्याचा दावा करणा-या प्रत्येक व्यक्तीला ती प्रेरणा मिळत नसते. इतर सर्व क्षमतांप्रमाणेच आतील आवाज ऐकण्याची क्षमतासुद्धा पूर्वप्रयत्न आणि प्रशिक्षणाद्वारे विकसित होत असते. अन्य कोणत्याही क्षमतेच्या विकासाकरिता जितक्या मेहनतीची आणि प्रशिक्षणाची आवश्यकता असते, त्यापेक्षा किती तरी अधिक आत्मप्रशिक्षण आतील आवाज ऐकण्याची क्षमता विकसित करण्याकरिता आवश्यक असते. जर हजारो दावेदारांमधून काही लोक आपला हा दावा सिद्ध करण्यात यशस्वी झाले तर मग संभ्रमावस्थेतील दावेदारांचा धोका पत्करायला काहीही हरकत नाही. (म, III, २२९)

काही लोकांना ‘आतील आवाज’ ऐकू येतो, ही शक्यता माझ्या माहितीनुसार कोणीही नाकारलेली नाही आणि आतल्या आवाजाच्या आदेशानुसारच मी ही गोष्ट सांगतो आहे की, एका माणसाचा जरी असा दावा खरा ठरला तरी त्यामुळे जगाचा फायदाच होईल. दावा अनेक लोक करू शकतात, परंतु ते त्याच्या खरेपणाचा पुरावा देऊ शकणार नाहीत. खोट्या दावेदारांना अडवण्याकरिता ख-या दावेदारांना

दाबून ठेवता येऊ शकत नाही आणि ठेवण्यात येऊही नये.

आतील आवाजाचे प्रामाणिकपणे प्रतिनिधित्व करू शकणारे अनेक लोक असले, तरी त्यामुळे काहीही हानी नाही. परंतु दुर्दैवाने ढोंगावर काहीच उपाय नाही. अनेक लोक ढोंग करत असले तरी सद्‌गुणांचे दमन करण्यात येऊ नये. जगात नेहमीच असे लोक होत आले आहेत ज्यांनी अंतर्मनातील आवाजाच्या प्रतिनिधित्वाचा दावा केला आहे. परंतु त्यांच्या अल्पकालीन कामामुळे जगाचा अजूनपर्यंत काही तोटा झालेला नाही.

'आतील आवाज' ऐकण्याची क्षमता विकसित करण्याकरिता माणसाला फार दीर्घ आणि खडतर साधना करावी लागते आणि आतील आवाज जेव्हा बोलू लागतो तेव्हा तो बिनचूक असतो. जगाला मूर्ख बनवण्यात तुम्ही नेहमीच यशस्वी होऊ शकत नाही. जगात अराजक पसरण्याची भीति नाही, कारण माझ्यासारखा क्षुद्र माणूस दबला जाणार नाही आणि आपल्याला आतील आवाज ऐकल्याची खात्री पटेल, तेव्हा तो ही गोष्ट जगाला सांगण्याचे धाडस नक्कीच करेल. (हरि, १८-३-१९३३, पृ. ८)

मी ईश्वराचा आवाज ऐकू शकतो हा माझा दावा काही नवीन नाही. दुर्दैवाने हा दावा सिद्ध करण्याकरिता माझ्या कामाशिवाय इतर कोणताही पर्याय माझ्याजवळ नाही. ईश्वराने निर्मिलेल्या प्राण्यांनाच जर ईश्वर स्वतःच्या अस्तित्वाचा पुरावा देऊ लागेल तर तो ईश्वर कसा? परंतु स्वेच्छेने गुलाम झालेल्या आपल्या लोकांना अतिशय कठीण अशा सत्त्वपरीक्षेला तोंड देण्याची शक्ती तो देतो.

गत अर्ध शतकापासूनही अधिक काळ या अतिशय कठोर स्वामीचा मी सेवक राहिलेलो आहे. जसजसा काळ जातो तसतसा मला त्याचा आवाज अधिक स्पष्ट ऐकू येतो. अतिशय अडचणीच्या काळातही त्याने माझी साथ सोडली नाही. त्याने अनेकदा माझे माझ्यापासून रक्षण केले आहे आणि स्वातंत्र्याचा लवलेशही त्याने माझ्याजवळ राहू दिला नाही. मी स्वतःला त्याला जेवढा समर्पित करतो, तेवढाच जास्त आनंद मला मिळतो. (हरि, ६-५-१९३३, पृ. ४)

## ईश्वरीय वाणी

माझ्याकरिता ईश्वराचा आवाज, आतील आवाज अथवा सत्याचा आवाज वा आतील मंद हाक हे सर्व एकच आहेत. मला ईश्वराचे प्रत्यक्ष दर्शन कधीही झालेले

नाही. त्याकरिता मी कधी प्रयत्नही केला नाही. ईश्वराला मी नेहमी निराकार मानत आलो आहे. परंतु मी जो आवाज ऐकला तो दुरून कुठून तरी येत होता आणि तरीही तो फार जवळ असल्यासारखा वाटत होता. तो ऐकण्यात माझी कोणतीही चूक झालेली नाही. तो इतका स्पष्ट होता की, जणू एखादा माणूस माझ्याशी बोलत होता. त्या आवाजात एक विचित्र आकर्षण शक्ती होती. ज्यावेळी मी तो आवाज ऐकला त्यावेळी मी स्वप्न पाहत नव्हतो. तो आवाज ऐकण्यापूर्वी माझ्या मनात भयानक संघर्ष सुरू होता. अचानक मला तो आवाज ऐकू आला. मी तो ऐकला, तो आवाज त्याचाच आहे याबद्दल जेव्हा मी निश्चिंत झालो, तेव्हा आतील संघर्ष थांबला. मी शांत झालो. त्यानुसार संकल्प केला, उपवासाची तारीख आणि वेळ या गोष्टी निश्चित झाल्या....

मी ऐकलेला आवाज ईश्वरीय वाणीच होती आणि माझ्या उत्तेजित कल्पनाशक्तीचा तो प्रतिध्वनी नव्हता याचा मी एखादा पुरावा देऊ शकेन? शंकेखोरांना आश्वस्त करता येईल असा कोणताही पुरावा माझ्याजवळ नाही. तो माझा भ्रम वा विभ्रम होता, असे म्हणण्याकरिता ते स्वतंत्र आहेत आणि तसे असूही शकते. हा विचार चुकीचा आहे हे ठरवण्याकरिता माझ्याजवळ कोणताही तर्क नाही. परंतु मी एक गोष्ट सांगू इच्छितो की, सगळे जग एकमुखाने ही गोष्ट खोटी आहे असे म्हणत असेल तरीही माझा अढळ विश्वास आहे की, मी जो आवाज ऐकला तो आवाज ईश्वरीय वाणीच होती.

परंतु काही लोकांचा विश्वास आहे की, ईश्वर स्वतःच आमच्या कल्पनेची सृष्टी आहे. जर हा दृष्टिकोन बरोबर असेल तर मग वास्तव काहीही नाही, सर्व काही आमच्या कल्पनेचीच सृष्टी आहे. तसे असले तरीही जोपर्यंत माझ्या कल्पनेने मी जखडलेलो आहे, तोपर्यंत मी तिच्याच संमोहनाच्या बंधनात राहून काम करू शकतो. वास्तवाहून वास्तव गोष्टीही सापेक्ष रूपाने वास्तव असतात. माझ्याकरिता ही ईश्वरीय वाणी माझ्या स्वतःच्या अस्तित्वापेक्षाही वास्तव होती. तिने मला कधीच धोका दिला नाही व ती कुणाला देतही नाही आणि ज्याला हवे आहे तो तिचा आवाज ऐकू शकतो. सर्वांमध्ये तिचे अस्तित्व आहे. परंतु इतर सर्व गोष्टींप्रमाणेच तिच्याकरिताही तयारी आवश्यक असते.

(हरि, ८-७-१९३३, पृ. ४)

बरोबर असो वा चूक, मला माहीत आहे की, एक सत्याग्रही म्हणून प्रत्येक अडचणीच्या प्रसंगी ईश्वरी मदतीशिवाय माझ्याजवळ अन्य कोणतेही साधन नसते

आणि गूढ वाटणारी माझी कृत्येही वास्तवात माझ्या आतल्या आवाजाच्या आदेशानुसारच मी केली आहेत यावर लोकांनी विश्वास ठेवावा, अशी माझी इच्छा आहे.

ही माझ्या उत्तेजित कल्पनेची निर्मिती असू शकते. असे असेल तर जिने पंचावन्न वर्षांहून अधिक काळ माझ्या जीवनातील चढउतारात साथ दिली, त्या कल्पनाशक्तीचे मला कौतुक वाटते. पंचावन्न वर्षे याकरिता म्हणतो की, वयाच्या पंधराव्या वर्षापासूनच मी ईश्वरावर विश्वास ठेवणे शिकलो होतो.
(हरि, ११-३-१९३९, पृ. ४६)

## ६. माझे उपवास

माझा धर्म मला शिकवतो की, ज्याचे निवारण होऊ शकत नाही अशा संकटात जेव्हा तुम्ही असता, तेव्हा उपवास आणि प्रार्थना करावी.
(यंग, २५-९-१९२४, पृ. ३१९)

हे (उपवास) माझ्या अस्तित्वाचा भाग आहेत. उदाहरणार्थ, माझ्याकरिता माझे डोळे जेवढे गरजेचे आहेत तेवढेच जरुरीचे उपवास आहेत. बाह्य जगाकरिता जे महत्त्व डोळ्यांचे आहे तेच महत्त्व आतल्या गोष्टींकरिता उपवासाचे आहे.
(यंग, ३-१२-१९२५, पृ. ४२२)

### उच्चतम आदेश

या उपवासांची जबाबदारी माझ्यावर नाही. माझ्या करमणुकीकरिता मी ते करत नाही. प्रसिद्धी मिळवण्याकरिता मी शरीराला कष्ट देणार नाही. मी जरी भुकेने तडफडण्यामुळे आणि उपवासामुळे होणारा त्रास आनंदाने सहन करत असलो, तरी मला त्रास होत नाही असे कोणी समजू नये. हे उपवास मी सहन करू शकतो, कारण कोणती तरी उच्चतर शक्ती माझ्यावर ते लादत असते आणि तीच मला त्यापासून होणारे त्रास सहन करण्याची शक्ती देत असते.
(हरि, २४-८-१९३४, पृ. २२३)

हे उपवास मी कुणाच्याही हुकुमावरून सुरू करत नाही. आमरण उपोषण ही काही हलकीफुलकी गोष्ट नाही. ते पूर्णपणे अवांछनीयही मानले जाऊ शकतात. रागाच्या भरातही ते सुरू केले जाऊ शकत नाहीत. राग तर अल्पकालीन वेडच आहे. यामुळे मी तेव्हाच उपवास केला पाहिजे, जेव्हा माझ्या आतील आवाजाचा मला तसा आदेश असेल. (हरि, १५-६-१९४७, पृ. १९४)

## उपवास आणि प्रार्थना

खरा उपवास शरीर, मन आणि आत्मा या तिघांचीही शुद्धी करतो. तो देहाला त्रास देतो आणि त्याच प्रमाणात आत्म्याला स्वतंत्र करतो. यात अंतःकरणापासून केलेल्या प्रार्थनेमुळे आश्चर्यजनक परिणाम उत्पन्न होऊ शकतात. अधिकाधिक शुद्धतेकडे नेणारी ही आत्म्याची हाक असू शकते. अशा प्रकारे मिळवण्यात आलेली शुद्धी जेव्हा एखाद्या शुभ हेतूकरिता उपयोगात आणली जाते, तेव्हा ती प्रार्थना होते. (यंग, २४-३-१९२०, पृ. १)

माझ्या मते उपवासाशिवाय प्रार्थना होऊ शकत नाही आणि प्रार्थनेशिवाय खरा उपवास होऊ शकत नाही. (हरि, २६-२-१९३३, पृ. २)

पूर्ण उपवास संपूर्ण आणि खरा आत्मत्याग असतो. तो सर्वोत्तम प्रार्थना असतो. 'माझा जीव घे, हा नेहमीच तुझ्याकरिता आणि केवळ तुझ्याकरिताच असू दे.' तोंडातून निघणारी अशी ही हाक केवळ निरर्थक वा प्रतीकात्मक वा वरवरची असू नये. किंचितही मागेपुढे न पाहता आपल्या स्वतःला बेफिकीरपणाने सहर्ष समर्पित करण्याच्या भावनेने ती परिपूर्ण असली पाहिजे. जेवण आणि जलत्यागसुद्धा केवळ हिची सुरुवात असते. समर्पणात या गोष्टींचे फार कमी महत्त्व आहे. (हरि, १५-४-१९३३, पृ. ४)

## शरीराला वश करणे

जोपर्यंत ईश्वरकृपेचा परिणाम होणार नाही तोपर्यंत उपवास अधिक काही नसून व्यर्थ उपाशी मरणे आहे. (हरि, ११-४-१९३९, पृ. ४६)

मला माहीत आहे की, मनाची प्रवृत्तीच सर्व काही आहे. ज्याप्रमाणे प्रार्थना पोपटपंचीप्रमाणे असू शकते, त्याचप्रमाणे उपवासही केवळ देहदंडाचे रूप घेऊ शकतो.... यापैकी कशामुळेही अंतरात्म्याला स्पर्श होऊ शकत नाही.
(यंग, १६-२ १९२२, पृ. १०३)

माझा विश्वास आहे की जसजसा देहावर तुमचा ताबा प्रस्थापित होऊ लागतो, तसतशी आत्म्याची शक्ती वाढू लागते. (यंग, २३-१०-१९२४, पृ. ३५४)

जेव्हा माणसाची इंद्रिये त्याच्याविरुद्ध बंड करू लागतात तेव्हा त्यांचे दमन करणे जरुरीचे होते; इंद्रियांवर ताबा मिळवला गेलेला असेल व सेवेचे साधन म्हणून त्यांचा उपयोग होत असेल, तर मग त्यांचे दमन करणे पाप ठरते. वेगळ्या शब्दांत सांगायचे तर केवळ इंद्रियदमनाला काहीही अर्थ

नाही. (हरि, २-११-१९३५, पृ. २९९)

इंद्रियांचे समाधान न करण्याला काही अर्थ असू शकतो. जोपर्यंत इंद्रियांच्या आवेगांचा बळी दिला जात नाही, तोपर्यंत ईश्वराचा साक्षात्कार होऊ शकत नाही. देवाच्या देवळाप्रमाणे देहाची काळजी घेणे एक गोष्ट आहे आणि दैहिक आवेगांकडे दुर्लक्ष करणे दुसरी गोष्ट आहे. (हरि, १०-१२-१९३८, पृ. ३७३)

माझ्या आणि माझ्या सहका-यांच्या अनुभवांच्या आधारावर मी ठामपणे सांगू शकतो की, उपवास करणे तेव्हा उचित असते जेव्हा तुम्हाला (१) बद्धकोष्ठता असेल, (२) रक्ताल्पता असेल, (३) ताप असेल, (४) अपचन असेल, (५) डोकेदुखी असेल, (६) आमवात असेल (Gouty), (७) संधिवात (Rheumatic) असेल, (८) चीड आणि राग येत असेल, (९) तुम्ही उदास असाल अथवा (१०) तुम्हाला हर्षातिरेक होत असेल. जर तुम्ही असे कराल तर तुम्ही डॉक्टरचा उपचार व रामबाण औषधे टाळू शकाल. (यंग, १७-१२-१९२५, पृ. ४४२)

## जुलमी उपवास

ज्याच्यावर तुमचे प्रेम असेल त्याच्याविरुद्धच तुम्हाला उपवास करता येऊ शकतो. ज्याच्यावर आपण प्रेम करतो त्याच्याकडून काही अधिकार हिरावून घेणे हा उपवासाचा उद्देश नसून तर त्याच्यात सुधारणा करणे हा असतो. उदाहरणार्थ पुत्र आपल्या पित्याची दारू सोडवण्याकरिता उपवास करू शकतो. मुंबई आणि त्यानंतर बारडोली येथील माझे उपवास याच प्रकारचे होते. माझ्यावर जे लोक प्रेम करत होते त्यांच्या सुधारणेकरिता मी ते उपवास केले होते. परंतु जनरल डायरविरुद्ध मी उपवास करणार नाही कारण ते माझ्यावर प्रेम करत नाहीत, उलट मला ते स्वतःचा शत्रूच समजतात. (यंग, १-५-१९२४, पृ. १४५)

उपवास खरोखरच जुलमी वा दडपण आणणारा असू शकतो, ही गोष्ट नाकारली जाऊ शकत नाही. असे उपवास एखाद्या स्वार्थाच्या परिपूर्तीकरिता केले जातात. एखाद्या माणसाकडून पैसा काढण्याकरिता वा व्यक्तिगत स्वार्थाच्या सिद्धिकरिता करण्यात आलेला उपवास जुलमी वा अनुचित दडपण आणणारा आहे असेच मानले जाईल. अशा प्रकारच्या अनाठायी दडपणाला आपण बळी पडता कामा नये असे मी निःसंकोचपणे म्हणेन.

माझ्याविरुद्ध वा माझ्यावर दडपण आणण्याकरिता करण्यात आलेल्या

उपवासांचा मी यशस्वीपणे प्रतिकार केलेला आहे. स्वार्थी आणि निःस्वार्थी उपवासातील सीमारेषा बहुधा फार क्षीण असते असा कोणी दावा केला, तर मी असे म्हणेन की, ज्या माणसाला एखादा उपवास स्वार्थी उद्दिष्ट वा इतर काही कारणाने हिणकस प्रवृत्तीचा आहे असे वाटत असेल तर त्याने त्या उपवासाचा कठोरपणे विरोध केला पाहिजे. मग त्यामुळे त्या व्यक्तीचा मृत्यू झाला तरी फिकीर करू नये. दडपण आणणा-या वा जुलमी उपवासाकडे दुर्लक्ष करण्याची सवय लोकांनी अंगी बाणवली, तर अशा प्रकारच्या उपवासांचा प्रभाव नाहीसा होईल.

इतर सर्व सामाजिक प्रथांप्रमाणेच उपवासाचाही सदुपयोग वा दुरुपयोग होऊ शकतो. परंतु सत्याग्रहाच्या शस्त्रागारातील उपवास महत्त्वाचे शस्त्र असल्यामुळे त्याचा दुरुपयोग होण्याची शक्यता असते. एवढ्याच कारणाकरिता त्याचा त्याग करता येऊ शकत नाही. (हरि, ९-९-१९३३, पृ. ५)

उपवासाच्या शस्त्राचा हलकेफुलकेपणाने वापर करता येऊ शकत नाही, हे मला माहीत आहे. उपवास करणारी व्यक्ती या कलेत तज्ज्ञ नसेल तर सहजपणे उपवासाला हिंसेचा स्पर्श होऊ शकतो. मी या विषयातील तज्ज्ञ आहे, असा माझा दावा आहे. (हरि, ११-३-१९३९, पृ. ४६)

## ७. माझ्यातील विसंगती

ज्या प्रथा वा परंपरा समजून घेता येऊ शकत नाहीत वा ज्यांचे समर्थन नैतिक पातळीवरून करता येऊ शकत नाही, त्यांचे मी डोळे मिटून पालन करू शकत नाही. (यंग, २१-७-२१, पृ. २२८)

माझ्यातील अनेक विसंगती मी मान्य केल्या पाहिजेत. परंतु ज्याअर्थी मला महात्मा म्हणतात, त्याअर्थी इमर्सनच्या उक्तीचा पुनरुच्चार करत मी म्हणू शकतो की, 'मूर्खपणाची सुसंगती ही मंदबुद्धीच्या लोकांच्या डोक्यातील पिशाच्च असते'. ज्याप्रमाणे निसर्गाच्या विविधतेत एकता असते त्याचप्रमाणे माझ्या मते माझ्या दर्शनीय विसंगतीतही एक सुसंगती आहे. (यंग, १३-२-१९३०, पृ. ५२)

जे मित्र मला ओळखतात ते सांगतात की, मी जितका मवाळ आहे तितकाच जहालही आहे आणि जेवढा सनातनी आहे, तेवढाच पुरोगामीही आहे. बहुधा त्यामुळे माझ्या सुदैवाने परस्परविरोधी विचारधारेच्या लोकांशी मैत्रीचे सौभाग्य मला लाभले आहे. माझ्या स्वभावातील या मिश्रणाकरिता माझी अहिंसा कारणीभूत आहे असा माझा विश्वास आहे.

ही विसंगती केवळ वरवरची आहे. अनेक मित्रांना ती तशी जाणवते कारण वेगवेगळ्या परिस्थितीची ती प्रतिक्रिया असते. खरे पाहता सुसंगती ही कदाचित केवळ हट्टीपणाच असू शकते. (यंग, १६-४-१९३१, पृ. ७७)

## सुसंगतीचे स्तोम

सुसंगत दिसण्याची मी कधीही फिकीर करत नाही. सत्याचरणाच्या माझ्या या प्रयत्नात मी माझ्या अनेक कल्पनांचा त्याग केला आहे आणि अनेक नवीन गोष्टी शिकलो आहे. मी जरी म्हातारा झालो असलो, तरी माझा आंतरिक विकास थांबला आहे वा माझा देह नष्ट झाल्यानंतर तो थांबेल, असे मला अगदीच वाटत नाही. माझ्या ईश्वराद्वारे म्हणजेच सत्याद्वारे वेळोवेळी मिळणा-या आदेशांचे पालन करण्याकरिता मी तत्पर असावे, एवढ्याच गोष्टीची मला काळजी आहे.
(हरि, १९-४-१९३३, पृ. २)

सुसंगतीचे स्तोम मी कधीही माजवले नाही. मी सत्याचा पुजारी आहे आणि एखाद्या प्रश्नाविषयी मी आधी काय बोललो होतो याचा विचार न करता एखाद्या विशिष्ट क्षणी त्या प्रश्नाविषयी मला काय वाटते आणि मी कोणता विचार करतो ते मी सांगितले पाहिजे.... सत्याच्या माझ्या दैनंदिन आचरणामुळे जसजसे मला स्पष्ट दिसू लागेल, तसतसा माझ्या दृष्टिकोनात स्पष्टपणा येत जाईल. जिथे मी जाणीवपूर्वक माझे मत बदलवतो तिथे बदल अपरिहार्य असतो. केवळ काळजीपूर्वक पाहणा-यालाच माझ्या दृष्टिकोनातील क्रमशः विकासाची कल्पना येऊ शकेल. (हरि, २८-९-१९३४, पृ. २६०)

विशिष्ट प्रश्नांसंबंधी मागील वक्तव्यांशी सुसंगत राहणे हे माझे ध्येय नसून विशिष्ट क्षणी सत्याचे जे दर्शन मला होते, त्यानुसार सुसंगत राहणे हे माझे ध्येय असते. परिणामी सत्यापासून सत्याकडे माझा विकास होतो आहे.
(हरि. ३०-९-१९३९, पृ. २८८)

## सोय पाहून वर्तन नाही

राजकीय लाभ घेण्याकरिता मी कोणत्याही तत्त्वांचा त्याग केलेला नाही.
(यंग, १२-३-१९२५, पृ. ९१)

सोय म्हणून मी जीवनात कोणतीही गोष्ट केलेली नाही. उच्चतम नैतिकता हीच उच्चतम सोय आहे, असे मी मानतो. (हरि, ८-१२-१९३३, पृ.८)

## तडजोड

माझ्या स्वभावात ताठरपणा असल्याचा आरोप माझ्यावर अनेकदा करण्यात येतो. बहुमताच्या निर्णयासमोर मी वाकत नाही, असेही मला सांगण्यात येते. माझ्यावर हुकुमशाहीचा आरोप करण्यात येतो. ताठरपणा वा हुकुमशाहीचा आरोप मला कधीच मान्य झाला नाही. उलटपक्षी मला नापसंत असलेल्या कमी महत्त्वाच्या मुद्यावरही मी लवचिक धोरण स्वीकारू शकलो, याचा मला अभिमान वाटतो. मला हुकुमशाही पसंत नाही. ज्याप्रमाणे माझ्या स्वातंत्र्याचे मला मोल वाटते, त्याचप्रमाणे इतरांनाही स्वातंत्र्य असावे असे मला वाटते. ज्याला मी माझे मत पटवून देऊ शकत नाही अशा कोणत्याही व्यक्तीच्या सहकार्याची अपेक्षा मी करू शकत नाही.

मी इतका रूढीमुक्त आहे की, अगदी पुरातन शास्त्रेसुद्धा माझ्या विवेकाच्या कसोटीवर उतरत नसतील तर मी त्यांचे दिव्यत्व नाकारतो. परंतु माझ्या अनुभवांनी मी हे शिकलो आहे की, मला या समाजात राहायचे असेल तर मी माझ्या संपूर्ण स्वातंत्र्याचा उपयोग महत्त्वाच्या बाबींपर्यंतच मर्यादित ठेवला पाहिजे. इतर बाबतीत, जर त्या व्यक्तीच्या वैयक्तिक धर्माचे वा नैतिक संहितेचे उल्लंघन करणा-या नसतील, तर आपण लोकांसोबत राहिले पाहिजे. (यंग, १४-७-१९२०, पृ. ४)

माझ्या संपूर्ण जीवनात सत्याच्या आग्रहांनीच मला तडजोडीतील सौंदर्य पाहणे शिकवले आहे. नंतरच्या आयुष्यात मला असे दिसून आले की, ही चेतनाच सत्याग्रहाचा अविभाज्य भाग असते. त्यामुळे अनेकदा माझे जीवन धोक्यात आले आहे आणि अनेक मित्रांच्या रोषाला मी बळी पडलो आहे. परंतु सत्य हे वज्रासारखे कठोर आणि फुलांसारखे कोमल असते. (ए, पृ. १०७)

मानवी जीवन हे तडजोडींची मालिका असते आणि जी गोष्ट आपल्याला तात्त्विक दृष्टीने सत्य वाटते, तिच्याप्रमाणे आचरण करणे सोपे नसते.
(हरि, ५-९-१९३६, पृ. २३७)

अशी काही चिरंतन तत्त्वे असतात ज्यांच्याबद्दल तडजोड करता येत नाही आणि त्यानुसार आचरण करत असताना माणसाने प्रसंगी आपला प्राण गमावण्याचीसुद्धा तयारी ठेवली पाहिजे. (हरि, ५-९-१९३६, पृ. २३८)

# ८. माझे लेखन

बोलण्याबद्दल मला वाटत असलेल्या संकोचाची कधीकाळी मला चीड यायची, परंतु त्यामुळे मला आता आनंद होतो. याचा सर्वात मोठा लाभ असा झाला की, यामुळे शब्दांचा काटकसरीने उपयोग करणे मी शिकलो. स्वाभाविकपणेच मी माझ्या विचारांवर संयम ठेवणे शिकलो आहे आणि मी एक शब्दसुद्धा अविचाराने बोललो नाही, असा दाखला आता मी स्वतःला देऊ शकतो. माझ्या एखाद्या भाषणाबद्दल वा लेखनाबद्दल मला कधी खेद करावा लागल्याचे मला आठवत नाही. त्यामुळे मी अनेक विपत्तींपासून आणि वेळेच्या अपव्ययापासून वाचू शकलो आहे. (ए, पृ. ४५)

'इंडियन ओपिनियन'च्या पहिल्या महिन्यातच माझ्या लक्षात आले होते की, पत्रकारितेचे एकमेव उद्दिष्ट सेवा असले पाहिजे. वृत्तपत्रांजवळ फार मोठी शक्ती आहे. परंतु ज्याप्रमाणे अनियंत्रित पुरामुळे किती तरी शेतीभाती आणि गावे पाण्याखाली बुडून जातात, त्याचप्रमाणे अनियंत्रित लेखणीने केलेली सेवाही विनाशकारी होते. जर पत्रकारितेचे नियंत्रण बाहेरून करण्यात आले तर ते विषापेक्षाही भयंकर होते. वृत्तपत्रांवरील नियंत्रण तेव्हाच लाभदायक होते, जेव्हा ती वृत्तपत्रे स्वतःच आपल्यावरील नियंत्रण मान्य करतात. हा युक्तिवाद जर खरा असेल तर जगातील किती वृत्तपत्रे या कसोटीवर उतरतील? परंतु वाह्यात वृत्तपत्रांना कोण अडवू शकेल? चांगुलपणा आणि वाईटपणा यांच्याप्रमाणेच चांगली आणि वाईट वृत्तपत्रेही चालणार आहेत आणि माणसाला आपली निवड स्वतःच करावी लागेल. (ए, पृ. २१४)

माझ्या लेखनात कोणत्याही व्यक्तीबद्दल घृणेची भावना असूच शकत नाही कारण हे जग प्रेमाच्या आधारावरच चालते, असा माझा दृढविश्वास आहे.
(सली, सं.५, १७-९-१९१९)

## माझी पत्रकारिता

पत्रकारितेच्या क्षेत्रात मी केवळ पत्रकारितेकरिता प्रवेश केलेला नाही. उलट माझ्या जीवनाच्या ध्येयात हिची मदत होते असे समजून मी या क्षेत्रात प्रवेश केला आहे. अत्यंत संयमाने उदाहरण देत आणि उपदेश करत अहिंसा आणि सत्य यांतून निर्मिलेल्या सत्याग्रहाच्या अजोड अस्त्राचा प्रयोग करण्याची शिकवण देणे, हे माझे

ध्येय आहे.... यामुळे मला जर माझ्या धर्माचे अनुसरण करायचे असेल, तर रागाच्या भरात द्वेष भावनेने मी काहीही लिहिता कामा नये. विनाकारण मी काहीही लिहिता कामा नये. केवळ भावना उद्दीपित करण्याकरिता मी काहीही लिहिता कामा नये.

आठवड्यामागून आठवडे मथळ्यांकरिता आणि शब्दांकरिता मला किती संयम पाळावा लागत असतो, ते वाचकांच्या लक्षातच येऊ शकणार नाही. माझ्याकरिता हे एक प्रशिक्षणच आहे. यामुळे मला अंतर्मुख होण्याची आणि माझ्या उणिवांचा शोध घेण्याची संधी मिळते. अनेकदा माझा अहंकार बोचक भाषेत लिहिण्याकरिता आणि कठोर विशेषणांचा वापर करण्याकरिता मला आदेश देत असतो. ही फार कठीण परीक्षा आहे, परंतु दुर्भावना दूर करण्याचा हा उत्तम उपाय आहे. (यंग, २-७-१९२५, पृ. २३२)

लिहीत असताना माझे अंतःकरण मला जसे लिहायला लावते, तसा मी लिहीत जात असतो. जाणीवपूर्वक मी लिहिलेले सर्व विचार आणि कार्य अंतःकरणाच्या प्रेरणेतून निर्माण झालेले असतात, असा दावा मी करू शकत नाही आणि माझ्या जीवनात मी जी मोठ्यात मोठी आणि लहानसहान पावले उचलली आहेत; त्यांच्याकडे पाहिल्यानंतर ती पावले अंतःकरणाच्या प्रेरणेतून उचलली गेली नव्हती, असे म्हणणे अनुचित होणार नाही. (ए, पृ. २०६)

जोपर्यंत कल्पनाशक्तीचा प्रश्न आहे माझ्यात काही निर्मितिक्षमता आहे. परंतु लेखन तर एक सह-उत्पादन आहे. माझ्या विचारांचा प्रचार करण्याकरिताच मी लिहीत असतो. पत्रकारिता माझा व्यवसाय नाही. (हरि, १८-८१९४६, पृ. २७०)

शेवटी माझे कामच शिल्लक राहील, माझे लेखन वा शब्द नाही. (हरि, १-५-१९४७, पृ. ९३)

# २. सत्य

## ९. सत्याचा दिव्य संदेश

सत्य.... काय आहे? हा एक कठीण प्रश्न आहे. परंतु तुझ्या आतील आवाज जे सांगेल ते सत्य आहे, असे म्हणून माझ्यापुरता हा प्रश्न मी सोडवला आहे. तुम्ही विचाराल की मग वेगवेगळ्या लोकांचे सत्य वेगवेगळे का? कारण असे की, मानवी मन असंख्य माध्यमांतून काम करत असल्यामुळे आणि सर्व लोकांचा मानसिक विकास एकाच गतीने होत नसल्यामुळे एका व्यक्तीकरिता जे सत्य असते, ते दुस-या व्यक्तीकरिता असत्य असू शकते. त्यामुळे ज्यांनी हे प्रयोग केले आहेत ते या निष्कर्षावर पोहोचले आहेत की, हे प्रयोग करताना काही अटींचे पालन करणे आवश्यक आहे....

असे होते, कारण आजकाल प्रत्येक माणूस कोणत्याही प्रकारची साधना न करता सदसद्विवेकबुद्धीच्या अधिकाराचा दावा करू लागला आहे आणि विमूढ जगाच्या पदरी असत्य टाकू लागला आहे. अगदी नम्रतापूर्वक मी तुम्हाला सांगू इच्छितो की ज्या व्यक्तीमध्ये भरपूर नम्रता नसेल, त्याला सत्याचा शोध लागू शकत नाही. तुम्हाला सत्यसागरात पोहायचे असेल तर तुम्ही स्वतःला शून्यवत केले पाहिजे. (यंग, १३-१२-१९३१, पृ. ४२८)

सत्य आणि प्रेम - अहिंसा - केवळ याच गोष्टींना महत्त्व आहे. जिथे या गोष्टी आहेत, तिथे अखेरीस सर्व काही ठीक होईल. हा असा कायदा आहे की ज्याला कोणताही अपवाद नाही. (यंग, १८-८-१९३७, पृ. पृ. २६५)

### सर्वोच्च सिद्धान्त

माझ्याकरिता सत्य सर्वोच्च सिद्धान्त आहे. यात अनेक सिद्धान्त समाविष्ट आहेत. हे सत्य केवळ शाब्दिक सत्य नाही तर विचारातील सत्यही आहे. तसेच हे सत्य आमच्या संकल्पनेतील केवळ सापेक्ष सत्य नाही तर संपूर्ण सत्य, चिरंतन सत्य आहे, हे सत्यच ईश्वर आहे. ईश्वराच्या अगणित व्याख्या आहेत, कारण त्याची अभिव्यक्तीही अगणित रूपात होत असते. सत्याची ती असंख्य रूपे पाहून मी

भयभीत होतो आणि क्षणभर स्तंभितही होतो.

परंतु मी ईश्वराची पूजा केवळ सत्याच्या रुपातच करत असतो. अजून मला त्याचा शोध लागू शकला नाही. परंतु मी निरंतर त्याच्या शोधात आहे. या शोधात मी माझ्या सर्वाधिक प्रिय गोष्टींचा त्याग करायला तयार आहे. त्याच्याकरिता मला प्राणत्याग करण्याची वेळ आली, तरी मला आशा आहे की मी त्याकरिता तयार असेन. परंतु जोपर्यंत या निरपेक्ष सत्याची प्राप्ती होत नाही तोपर्यंत मला जाणवलेल्या सत्यावरच मला अवलंबून राहावे लागेल. तोपर्यंत ते सापेक्ष सत्यच माझा दीपस्तंभ असेल, माझी ढाल असेल. सत्याच्या शोधाचा मार्ग जरी सरळ, अरुंद आणि असीधारेप्रमाणे धारदार असला, तरी माझ्याकरिता तो सर्वात वेगवान आणि सोपा आहे. इतकेच नाही तर या मार्गावर चालल्यामुळे माझ्या हिमालयासारख्या चुकाही मला नगण्य वाटू लागल्या आहेत. या मार्गाने मला शोकापासून वाचवले आहे आणि मला दिसणा-या प्रकाशाप्रमाणे मी पुढे गेलो आहे. अनेकदा मला माझ्या संपूर्ण सत्याचे - ईश्वराचे ओझरते दर्शन झाले आहे आणि केवळ ते सत्यच वास्तव आहे आणि इतर सर्व मिथ्या आहे, असा माझा विश्वास बळावू लागला आहे.

**सत्याचा शोध**

....माझ्याकरिता जे शक्य आहे ते एखाद्या लहान मुलाकरितासुद्धा शक्य आहे, ही गोष्ट मला अजून तीव्रपणे जाणवू लागली आहे. हे मी सबळ पुराव्याच्या आधारावर सांगतो आहे. सत्याच्या शोधाची साधने जेवढी कठीण आहेत, तेवढीच सोपीही आहेत. अहंकारी व्यक्तीला ते कठीण वाटू शकते आणि निरागस मुलाला सोपे.

सत्यशोधक हा धूलीकणापेक्षाही विनम्र असला पाहिजे. जग धुळीला पायाखाली तुडवते, परंतु सत्यशोधक इतका नम्र असला पाहिजे की, धूलीकणांनाही त्याला चिरडणे शक्य व्हावे. तेव्हा आणि केवळ तेव्हाच सत्याचे दर्शन शक्य आहे. (ए, पृ. XV)

सत्य एखाद्या विशाल वृक्षासारखे आहे. तुम्ही त्याचे जितके संगोपन कराल, तितकीच तो अधिक फळे देईल. सत्याच्या खाणीला तुम्ही जसजसे खोदत जाल तसतसे ती सेवेच्या नवनव्या स्वरूपातील हिरे-जवाहीर देते. (ए. पृ. १५९)

या जगात ईश्वर म्हणजे सत्य सोडून इतर कशासंबंधीही निश्चितपणाची अपेक्षा

करणे चूक आहे, असे मला वाटते. जे काही आमच्या अवतीभवती दिसत असते अथवा घडत असते ते सर्व अनिश्चित आहे, क्षणिक आहे. या जगात केवळ एकच सर्वोच्च सत्ता आहे, ती सुप्त आहे परंतु निश्चित आहे आणि जी व्यक्ती तिच्या ओझरत्या दर्शनानंतर तिच्याशी आपली जीवननौका बांधून घेते, ती व्यक्ती भाग्यवान असते. सत्याचा हा शोधच जीवनाचे परमोच्च ध्येय आहे. (ए, पृ. १८४)

सत्याचा शोध घेत असताना क्रोध, स्वार्थ, घृणा इत्यादी गोष्टी स्वाभाविकपणेच नाहीशा होतात. तसे झाले नाही तर सत्यापर्यंत पोहचताच येऊ शकत नाही. जी व्यक्ती वासनांना वश झालेली असेल तिचे हेतू कितीही चांगले असले, तरी त्या व्यक्तीला कधीही सत्याची प्राप्ती होऊ शकत नाही. सत्याच्या शोधात यशस्वी झाल्यानंतर माणूस प्रेम आणि घृणा, सुख आणि दुःख इत्यादी द्वंद्वांपासून पूर्णपणे मुक्त होतो. (ए, पृ. २५४-५५)

## सत्याची दिव्यदृष्टी

सत्याच्या सार्वभौम आणि सर्वव्यापी भावनेचे प्रत्यक्ष दर्शन त्यालाच होऊ शकेल जो ईश्वराच्या क्षुद्रतम निर्मितीवरही स्वतःएवढेच प्रेम करू शकेल आणि ज्या व्यक्तीला तसे करण्याची आकांक्षा आहे ती व्यक्ती जीवनाच्या कोणत्याही क्षेत्राला त्यापासून मुक्त ठेवू शकत नाही. या सत्याच्या प्रेमामुळेच मी राजकारणात ओढला गेलो आणि जे लोक असे म्हणतात की धर्माचा राजकारणाशी काहीही संबंध नाही त्यांना धर्म म्हणजे काय हेच कळत नाही असे नम्रतापूर्वक आणि निःसंदिग्धपणे मी सांगू शकतो. (ए, पृ. ३७०-१)

माझ्या अनुभवाने माझी खात्री पटली आहे की, सत्याशिवाय दुसरा कोणताच ईश्वर नाही.... सत्याचे जे ओझरते दर्शन मला घडले आहे त्यामुळे त्याच्या अवर्णनीय तेजाचे वर्णन करणे शक्य नाही. आपण दररोज पाहत असलेल्या सूर्याच्या तेजापेक्षाही सत्याचे तेज लक्षावधी पट अधिक प्रखर आहे.
(यंग, ७-२-१९३१, पृ. ४२)

खरे पाहता त्या अतुल प्रकाशाचा मला केवळ कवडसाच पाहायला मिळाला आहे. परंतु माझ्या सर्व प्रयोगांच्या आधारावर मी खात्रीपूर्वक सांगू शकतो की सत्याचे परिपूर्ण दर्शन संपूर्णपणे अहिंसेचे अनुसरण केल्यानंतरच होऊ शकते.
(यंग, ७-२-१९३१, पृ. ४२)

प्रत्येक माणसाच्या हृदयात सत्याचे वास्तव्य असते आणि माणसाने तिथेच त्याचा शोध घ्यायला हवा. ज्याला सत्याचे दर्शन होईल, त्याने त्या सत्याच्या

मार्गदर्शनाप्रमाणेच चालले पाहिजे. परंतु आपल्याला जसे सत्याचे दर्शन होईल, तसेच इतरांनी चालले पाहिजे, अशी बळजबरी करण्याचा कोणालाही अधिकार नाही. (हरि, २४-११-१९३३, पृ. ६)

## निरपेक्ष सत्य

संपूर्ण सत्यदर्शन माणसाच्या आवाक्यातील गोष्ट नाही. आपल्याला दिसणा-या सत्यानुसार आचरण करणे हे माणसाचे कर्तव्य आहे आणि असे करताना शुद्धतम साधनेचा म्हणजे अहिंसेचाच त्याने आधार घेतला पाहिजे.
(हरि, २४-११-१९३३, पृ. ६)

केवळ ईश्वरालाच निरपेक्ष सत्य माहीत आहे. त्यामुळेच मी अनेकदा सांगत असतो की सत्यच ईश्वर आहे. याचा अर्थ माणसाला, ज्याच्या क्षमता सीमित आहेत, निरपेक्ष सत्याचे दर्शन होऊ शकत नाही. (हरि, ७-४-१९४६, पृ. ७०)

या जगात निरपेक्ष सत्याचे ज्ञान कुणालाही नाही. ते सामर्थ्य केवळ ईश्वरातच आहे. आपणा सर्वांना केवळ सापेक्ष सत्याचेच ज्ञान आहे. यामुळेच आम्हाला दिसणा-या सत्याचे आपण अनुसरण करू शकतो. अशा प्रकारे सत्याचे अनुसरण केले, तर कोणीही आपल्या मार्गावरून भरकटू शकत नाही.
(हरि, २-६-१९४६, पृ. १६७)

## सत्य आणि मी

मला अभिप्रेत नसलेली गोष्ट सांगण्याची चूक मी कधीही केलेली नाही. माझा स्वभाव मुळापर्यंत पोहोचण्याचा आहे आणि तरीही एखाद्या वेळेस एखाद्या गोष्टीच्या मुळापर्यंत मी पोहोचू शकलो नाही तरी मला माहीत असते की, अखेरीस सत्य स्वतःच आपले काय म्हणणे आहे ते लोकांना सांगण्यात आणि त्याची जाणीव करून देण्यात यशस्वी होईल. मला अनेकदा असाच अनुभव आला आहे.
(यंग, २०-८-१९२५, पृ. २८५-८६)

माझ्यासारखे हजारो नष्ट झाले तरी चालतील, परंतु सत्याचा विजय झाला पाहिजे. माझ्यासारख्या स्खलनशील माणसांना न्याय देण्याकरिता सत्याचा मानदंड तसूभरही कमी करायला नको. (१५. ए. पृ. XV)

माझे स्वतःचे मूल्यांकन करताना मी सत्याप्रमाणेच कठोर होण्याचा प्रयत्न करीन आणि इतरांनीही असेच करावे, अशी माझी अपेक्षा आहे. त्या मानदंडानुसार स्वतःला मोजताना सूरदासाच्या सुरात सूर मिळवून मी म्हणेन की,

'मजसम कोण खल, कामी,
दिला देह ज्याने
विसरलो त्यालाच मी,
असा कसा कृतघ्न मी!'

(ए. पृ. XV)

**माझ्या उणिवा**

मी कितीही तुच्छ असलो तरी जेव्हा सत्य माझ्या मुखातून बोलू लागते, तेव्हा मी अजिंक्य होतो. (एफा, पृ. ७१)

मी केवळ सत्याला वाहून घेतले आहे आणि सत्याशिवाय मी कोणाचेच अनुशासन मानत नाही. (हरि, २५-५-१९३५, पृ. ११५)

सत्याशिवाय मी कोणाचाच गुलाम नाही. (हरि, १५-४-१९३९, पृ. ८७)

सत्याच्या आग्रहामुळे येणा-या शक्तीशिवाय दुसरी कोणतीही ताकद माझ्याजवळ नाही. अहिंसासुद्धा माझ्या याच आग्रहामधून उद्‌भवली आहे. (हरि. ७-४-१९४६, पृ. ७०)

मी सत्याचा नम्र परंतु कळकळीचा शोधक आहे. माझ्यातील दोष कळावे आणि ते दूर करता यावे, म्हणून माझ्या या शोधकार्यात माझ्या सर्व सह-शोधकांना मी सर्वाधिक विश्वासात घेतो. मला मान्य आहे की अनुमान करताना आणि निष्कर्ष काढताना मी अनेकदा चुका केल्या आहेत.... आणि प्रत्येक प्रकरणी मी माझ्या चुका दुरुस्त केलेल्या असल्यामुळे देशाची न भरून निघण्यासारखी अशी कोणतीही मोठी हानी झालेली नाही. (यंग, २१-४-१९२७, पृ. १२८)

मी अजून नवशिका आहे, मला कोणताही स्वार्थ साधायचा नाही आणि जिथे कुठे मला सत्य दिसते तिथे मी सत्याची बाजू घेतो आणि त्याप्रमाणे काम करण्याचा प्रयत्न करतो. (यंग, ११-८-१९२७, पृ. २५०)

माझा विश्वास आहे की, पूर्ण सद्‌हेतूने काम करत असताना एखाद्या व्यक्तीकडून जरी चूक झाली तरी त्या चुकीमुळे जगाचेच नाही, तर कोणत्याही व्यक्तीचे कोणतेच नुकसान होऊ शकत नाही. देवाला घाबरून राहणा-या माणसाकडून अहेतुकपणे झालेल्या चुकांच्या दुष्परिणामांपासून देवाने जगाला नेहमीच वाचवले आहे.

माझे अनुसरण केल्यामुळे लोक चुकीच्या मार्गाला लागतील, अशी भीती

काही लोकांना वाटते. परंतु माझे अनुसरण करणा-यांना जरी माझ्या मार्गाची माहिती नसती तरी ते त्याच मार्गाने गेले असते. याचे कारण असे आहे की, माणूस इतरांच्या उदाहरणाचे अनुसरण करतो असे जरी वाटत असले तरी तो अखेरीस आपल्या स्वतःच्या अंतःप्रेरणेप्रमाणेच वागत असतो. असो, ते काहीही असले तरी माझ्या चुका अजाणता झालेल्या असल्यामुळे त्यांच्यामुळे जगाची हानी झालेली नाही हे मला माहीत आहे. ज्या चुका माझ्या आहेत असे म्हटले जाते, त्यापैकी एकही चूक मी जाणीवपूर्वक केलेली नाही अशी माझी खात्री आहे. (यंग, ३-१-१९२९, पृ. ६)

एखाद्याला एखादी गोष्ट चुकीची वाटते, तीच गोष्ट दुस-याला हुशारीची वाटू शकते. अशा वेळी माणूस भ्रमात असला, तरी तो चुका करण्यापासून स्वतःला अडवू शकत नाही.

रजत सीप महुं भास जिमी जथा भानू कर बारि।
जदपि मृषा तिहुं काल सोई भ्रम न सकइ कोई टारि।।

ही तुलसीदासांची उक्ती खरीच आहे म्हणायचे. असे असले तरी माझ्यासारख्या माणसाच्या बाबतीत, जो महान भ्रमात असण्याची शक्यता आहे, असेच होत राहील. ईश्वर त्यांना नक्कीच क्षमा करील, परंतु जगानेही अशा लोकांना सहन केले पाहिजे. अखेरीस सत्याचाच विजय होणार आहे. (यंग, ३-१-१९२९, पृ. ६)

सत्यामुळे न्याय्य उद्दिष्टांची कधीही हानी होत नाही. (हरि,१०-११-१९४६,पृ. ८९)

जीवन एक आकांक्षा आहे. पूर्णतेकरिता प्रयत्न करणे हे त्याचे ध्येय आहे. त्यालाच आत्मसाक्षात्कार म्हणतात. आपल्या उणिवा आणि दुबळेपणा यांच्यामुळे ध्येयाची पातळी घसरू देऊ नये. माझ्यात उणिवाही आहेत आणि दुबळेपणाही आहे, याची मला दुःखद जाणीव आहे. या उणिवा आणि हा दुबळेपणा दूर व्हावा म्हणून मी सत्यदेवतेच्या चरणी रोज करुणा भाकत असतो. (हरि, २२-६-१९३५, पृ. १४५)

### सत्याचा त्याग केला नाही

माझ्यावर विश्वास ठेवा, साठ वर्षांच्या व्यक्तिगत अनुभवानंतर मी सांगतो आहे की, सत्याच्या मार्गाचा त्याग करणे हीच दुर्दैवाची गोष्ट असते. जर ही गोष्ट तुम्हाला कळू शकत असेल तर सत्याचे अनुसरण करताना कितीही कठीण समस्यांना तोंड देण्याची वेळ तुमच्यावर आली, तरी त्यातून पार पडण्याची शक्ती

द्यावी एवढीच प्रार्थना तुम्ही ईश्वराजवळ करा. (हरि, २८-७-१९४६, पृ. २४३)

केवळ सत्यच टिकेल बाकी सर्व कालप्रवाहात वाहून जाईल. त्यामुळे सर्वांनी जरी माझा त्याग केला तरी मी सत्याचा साक्षीदार बनून राहिलो पाहिजे. आज माझे बोलणे अरण्यरुदनासारखे असू शकेल, परंतु जर तो सत्याचा आवाज असेल तर सर्व आवाज मूक झाल्यानंतर माझाच आवाज ऐकू येईल. (हरि, २५-८-१९४६, पृ. २८४)

सर्व जग असत्याच्या जाळ्यात सापडले तरी श्रद्धावान मनुष्य सत्याचा त्याग करणार नाही. (हरि, २२-९-१९४६, पृ. ३२२)

जेव्हा प्रसंग येईल तेव्हा कितीही अप्रिय असले तरी सत्य सांगितले पाहिजे. अप्रासंगिकता नेहमीच असत्य असते आणि त्यामुळे प्रसंग नसताना सत्य कधीही सांगू नये. (हरि, २१-१२-१९४७, पृ. ४७३)

## १०. सत्य ईश्वर आहे

### ईश्वर आहे

अशी एक शक्ती आहे जिची व्याख्या करता येणार नाही व जी सर्वव्यापी आहे. मला जरी ती दिसत नसली तरी मला ती जाणवते. ही अदृश्य शक्ती मला जाणवते परंतु तिचा पुरावा देता येणे शक्य नाही, कारण ती इंद्रियसंवेद्य वस्तूंपेक्षा अगदी भिन्न आहे. ती इंद्रियातीत आहे. तरीही ईश्वराच्या अस्तित्वाविषयी काही प्रमाणात तर्क करता येतो.

मला अस्पष्टशी अनुभूती होते की, जिथे माझ्या आजूबाजूला असलेल्या सर्व गोष्टी कायम परिवर्तनशील आहेत, कायम नाशवान आहेत तिथेच या सर्व परिवर्तनांमागे अशी एक जिवंत शक्ती आहे जी अपरिवर्तनीय आहे, जी सर्वांना धारण करते, सर्वांचे सृजन करते, विनाश करते आणि परत सृजन करते. ही चैतन्यशक्तीच ईश्वर आहे आणि ज्याअर्थी कोणतीही इंद्रियग्राह्य वस्तू चिरंतन असू शकत नाही आणि असणारही नाही, त्याअर्थी तो ईश्वरच केवळ चिरंतन आहे.

ही शक्ती उपकारक आहे की हानिकारक? मला ती शुद्ध उपकारक वाटते. मृत्यूच्या तांडवातही जीवन कायम असल्याचे मला दिसते, असत्यात सत्य कायम असलेले दिसते आणि मिट्ट काळोखातही मला प्रकाश दिसतो. यामुळे ती शक्ती उपकारकच असली पाहिजे. यामुळेच माझा तर्क आहे की ईश्वर जीवन आहे, सत्य आहे, प्रकाश आहे व तो सर्वोच्च शुभ आहे.

मला मान्य आहे की.... युक्तिवादाद्वारे वा तर्काद्वारे.... तो असल्याचे मी पटवून देऊ शकत नाही. श्रद्धा तर्कातीत असते. जगात वाईटपणा का आहे याचेही तर्कसंगत उत्तर मी देऊ शकत नाही. असे करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे ईश्वराची बरोबरी करणे होईल.

त्यामुळे मी अगदी नम्रतापूर्वक वाईटपणाचे अस्तित्व मान्य करतो आणि म्हणतो की दीर्घकाळापासून ईश्वर यातना सहन करतो आहे आणि धैर्याचे दर्शनही घडवतो आहे कारण त्याने जगात वाईटपणा सुरू राहू दिला आहे. मला माहीत आहे की ईश्वरात वाईटपणाचा लवलेशही नाही आणि ईश्वराला वाईटपणाचा स्पर्श होऊ शकत नाही तरीही जगात जर वाईटपणा आहे तर त्याचाही निर्माता तोच आहे.

मला माहीत आहे की, जर मी वाईटपणाशी संघर्ष केला नाही व या संघर्षात प्राण पणाला लावले नाही तर ईश्वर काय आहे, हे मला कधीच कळणार नाही. माझ्या सामान्य आणि मर्यादित अनुभवाने माझा हा विश्वास अजूनच दृढ झाला आहे. जितका शुद्ध होण्याचा मी प्रयत्न करतो, तेवढाच मी ईश्वराजवळ गेलो असल्याचा मला अनुभव येतो. आजच्यासारखी माझी श्रद्धा केवळ निमित्तमात्र राहणार नाही, उलटपक्षी जेव्हा ती हिमालयाच्या बर्फाच्छादित शिखरांप्रमाणे दैदीप्यमान आणि अढळ होईल; तेव्हा मी ईश्वराच्या किती जवळ पोहोचलेलो असेन! (यंग, ११-१०-१९२८, ३४०-१)

## माझी श्रद्धा

जगाच्या संकल्पनेचा त्याग करूनसुद्धा मी राहू शकतो, परंतु ईश्वराच्या संकल्पनेच्या त्यागाचा मी विचारही करू शकत नाही. (यंग, २३-२-१९२२, पृ. ११२)

मला माहीत आहे की मी काहीही करू शकत नाही, ईश्वरच सर्व काही करू शकतो. हे देवा, तू मला तुझे उचित साधन बनव आणि तुझ्या इच्छेप्रमाणे माझा उपयोग करून घे. (यंग, ९-१०-१९२४, पृ. ३२९)

मी ईश्वराला पाहिलेले नाही आणि मला त्याची ओळखही नाही. जगाला ईश्वराबद्दल वाटणा-या श्रद्धेला मी माझी श्रद्धा बनवले आहे आणि माझी श्रद्धा वज्रलेप असल्यामुळे ती श्रद्धाच माझ्याकरिता ईश्वराचा अनुभव होत असते. परंतु असे म्हणता येईल की, श्रद्धेचे वर्णन अनुभव म्हणून करणे ही गोष्ट सत्याची मोडतोड करणे होईल. वास्तव कदाचित असे असू शकेल की, ईश्वराचे वर्णन

करण्याकरिता माझ्याजवळ कोणतेच शब्द नाहीत. (ए, पृ. २०६)

तुम्ही आणि मी या खोलीत बसलेलो आहोत या वास्तवापेक्षाही ईश्वराच्या अस्तित्वावर माझा अधिक विश्वास आहे. त्यामुळे मी असेही म्हणू शकतो की मी हवा आणि पाण्याशिवाय जिवंत राहू शकतो, परंतु ईश्वराशिवाय जिवंत राहू शकत नाही. तुम्ही माझे डोळे काढून घेतले तरी त्यामुळे मी मरणार नाही, तुम्ही माझे नाक कापले तरीही मी मरणार नाही, परंतु ईश्वरावरील माझी श्रद्धा जर तुम्ही नष्ट केलीत, तर मात्र मी मरून जाईन.

तुम्ही याला अंधश्रद्धा म्हणाल, परंतु मी मान्य करतो की, लहानपणी भीती किंवा धोक्याची जाणीव झाली की मी रामनामाला कवटाळत असे. तेच मी आजही करतो. माझ्या म्हाता-या दाईने मला हेच शिकवले होते. (हरि, ११-५-१९३८, पृ. १०९)

आपण जर माणसाला घाबरणे बंद केले आणि केवळ ईश्वरी सत्याचा शोध घेतला तर मला विश्वास वाटतो की, आपण सर्व देवदूत बनू शकू. मला विश्वास आहे की माणसाच्या भीतीपासून मी पूर्णपणे मुक्त झालो आहे आणि मी केवळ ईश्वरी सत्याचाच शोध घेतो आहे.

.... मला ईश्वरी इच्छेचा साक्षात्कार झालेला नाही. माझी खात्री आहे की प्रत्येक माणसाला त्याचा साक्षात्कार होत असतो, परंतु तो 'आतील हळुवार आवाज' ऐकू येऊ नये म्हणून आपण आपले कान बंद करतो. आपल्यासमोरील अग्निस्तंभ दिसू नये म्हणून आपण आपले डोळे मिटतो. मला त्या सर्वव्यापी ईश्वराची अनुभूती होते. (यंग, २५-५-१९२१, पृ. १६१-२)

मला पत्र लिहिणा-या काही लोकांना वाटते की मी चमत्कार करू शकतो. सत्याचा पुजारी म्हणून मी सांगेन की, मला अशी कोणतीच देणगी मिळालेली नाही. माझ्याजवळ जी काही शक्ती असेल ती ईश्वरापासून आलेली आहे. परंतु तो प्रत्यक्षपणे काम करत नसतो. तो आपल्या असंख्य माध्यमांद्वारे काम करत असतो. (हरि, ८-१०-१९३८, पृ.२८५)

## ईश्वराचा स्वभाव

माझ्याकरिता ईश्वर सत्य आणि प्रेम आहे; ईश्वर नैतिकता आणि सदाचार आहे; ईश्वर निर्भयपणा आहे. ईश्वर प्रकाश आणि जीवन यांचे मूळ आहे आणि तरीही तो या सर्वांच्या पलीकडे आहे. ईश्वर जाणीव आहे. एवढेच नाही तर आपल्या असीम प्रेमाच्या छायेत तो नास्तिकालाही राहू देत असल्यामुळे तो नास्तिकांचा

नास्तिकपणाही आहे. तो आपली अंतःकरणे चाचपडत असतो. तो वाणी आणि तर्क यांच्या पलीकडे आहे. तो आपल्याला आणि आपल्या अंतःकरणाला आपल्यापेक्षाही अधिक चांगला ओळखतो. तो आपले म्हणणे शब्दशः घेत नाही कारण अनेकदा कळत वा नकळत आपण जे बोलतो, तसा त्याचा अर्थ नसतो.

ज्यांना ईश्वराच्या व्यक्तिगत उपस्थितीची गरज असते, त्यांच्याकरिता तो ईश्वर व्यक्तिगत असतो. ज्यांना त्याचा व्यक्तिगत स्पर्श हवा असतो त्यांच्याकरिता तो साकार आहे. तो विशुद्धतम तत्त्व आहे. ज्यांच्यात श्रद्धा आहे त्यांच्याकरिता तो केवळ अस्तित्व आहे. सर्व माणसांकरिता तो सर्व काही आहे. तो आमच्या आत आहे आणि तरीही तो आमच्या वरही आहे आणि पलीकडेही आहे....

त्याच्या नावावर घृणित दुराचार वा अमानवीय कृत्ये केली जातात एवढ्या कारणामुळे त्याचे अस्तित्व लोप पावत नाही. तो दीर्घकालीन यातना सहन करतो आहे. तो सहनशील आहे तसाच भयंकरही आहे. या जगातील आणि आगामी जगातील तो सर्वात कठोर मालक आहे. आपल्या शेजा-यांशी - माणसांशी आणि प्राणिमात्रांशी-आपण जसा व्यवहार करतो तसाच व्यवहार तो आपल्याशी करतो.

अज्ञानाला तो क्षमा करत नाही आणि पश्चात्तापाची संधी तो आम्हाला नेहमीच देत असल्यामुळे तो नित्य क्षमाशीलही आहे.

चांगले आणि वाईट यातील निवड करण्याचे 'स्वातंत्र्य' तो आम्हाला देत असल्यामुळे त्याच्यासारखा लोकशाहीचा पुरस्कर्ता दुसरा कोणीही नाही. त्याच्यासारखा जुलमी सत्ताधीशही कोणी नाही कारण तो आपल्या ओठांजवळील पेला हिसकावून घेतो आणि इच्छास्वातंत्र्याच्या नावावर अत्यंत कमी वाव देतो आणि नंतर आमची त्रेधा-तिरपीट पाहून वरून तो आम्हाला हसत असतो.

ही सर्व त्याची 'लीला' वा माया वा भ्रम आहे असे हिंदू धर्मात सांगितलेले आहे. केवळ तोच आहे आणि जर आपण असू तर आपण निरंतर त्याचे स्तोत्र गायले पाहिजे आणि त्याच्या इच्छेप्रमाणे वागले पाहिजे. त्याच्या बासरीच्या सुरावर आपण नाचलो तर सर्व काही ठीक होईल. (यंग, ५-३-१९२५, पृ. ८१)

माझ्या माहितीप्रमाणे या जगात ईश्वर सगळ्यात कठोर मालक आहे आणि तो तुमची तावून-सुलाखून परीक्षा घेत असतो आणि जेव्हा तुम्हाला वाटते की तुमची श्रद्धा डळमळू लागली आहे अथवा तुमचे शरीर तुम्हाला साथ देत नाही अथवा तुम्ही बुडताहात, तेव्हा कोणत्या ना कोणत्या मार्गाने तो धावून येतो आणि तुमच्या हाकेसरशी तुमच्या सेवेकरता तत्पर असल्याचे सांगून तुमची श्रद्धा अढळ

असली पाहिजे हे तुम्हाला पटवून देतो. परंतु तो हे आपल्या स्वतःच्या अटीवर करत असतो, तुमच्या अटीवर नाही. मला तरी तो असाच दिसला आहे. आणीबाणीच्या प्रसंगी माझ्या मदतीकरिता ऐनवेळी तो धावून आला नाही व त्याने मला टाकून दिले, असा एकही प्रसंग मला आठवत नाही. (स्पीरा, पृ १०६९)

लहानपणी माझ्याकडून विष्णुसहस्रनाम पाठ करून घेण्यात आले होते. परंतु ईश्वराची केवळ ही हजार नावेच नाहीत. आपला विश्वास आहे की - आणि मला वाटते की तो उचितच आहे - जगात जितके प्राणी आहेत तितकी त्याची नावे आहेत म्हणूनच आपण त्याला 'अनाम' असे म्हणत असतो आणि ईश्वराचे अनेक आकार असल्यामुळे आपण त्याला 'निराकार' म्हणतो आणि तो अनेक प्रकारच्या वाणींमधून बोलत असल्यामुळे आपण त्याला 'अवाक'ही म्हणतो आणि मी जेव्हा इस्लामचा अभ्यास करू लागलो तेव्हा त्या धर्मातही ईश्वराची अनेक नावे असल्याचे मला आढळून आले.

जे म्हणतात की ईश्वर प्रेम आहे त्यांच्या सुरात सूर मिळवून मीही म्हणेन की ईश्वर प्रेम आहे. परंतु माझ्या अंतःकरणातून मला वाटते की, ईश्वर प्रेम असेल तरी या सर्व गोष्टींपलीकडेही ईश्वर सत्य आहे. माणसाला जर आपल्या वाणीद्वारे ईश्वराचे परिपूर्ण वर्णन करता येत असेल, तर ईश्वर सत्य आहे याच भाषेत त्याचे वर्णन करता येईल या निष्कर्षावर मी पोहोचलो आहे.

परंतु दोन वर्षांपूर्वी एक पाऊल पुढे टाकून मी म्हणालो की सत्यच ईश्वर आहे. ईश्वर सत्य आहे आणि सत्य ईश्वर आहे या दोन विधानांमधील सूक्ष्म भेद तुम्ही लक्षात घ्या. जवळपास पन्नास वर्षे सत्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केल्यानंतर मी या निष्कर्षावर पोहोचलो आहे.

सत्याजवळ पोहोचण्याचा सर्वात जवळचा मार्ग प्रेमाचा आहे असे माझ्या लक्षात आले. परंतु त्याच वेळी माझ्या असेही लक्षात आले की, कमीत कमी इंग्रजी भाषेत प्रेमाचे अनेक अर्थ आहेत आणि वासना म्हणून जो प्रेमाचा अर्थ आहे, तो माणसाला अधःपतनाकडे नेणाराही असू शकतो. मला असेही आढळून आले आहे की प्रेम म्हणजे अहिंसा असा अर्थ घेणारे या जगात फार कमी लोक आहेत. परंतु सत्य या शब्दाचे दोन अर्थ असल्याचे मला कुठेही आढळले नाही आणि नास्तिकही सत्याच्या आवश्यकतेसंबंधी आणि त्याच्या शक्तीविषयी वाद घालत नाहीत.

परंतु सत्याच्या शोधाच्या उत्साहात नास्तिकांनी ईश्वराच्या अस्तित्वावरच

प्रश्नचिन्ह लावले आहे आणि त्यांच्या दृष्टीने ते योग्य आहे. या तर्कामुळेच ईश्वर सत्य आहे असे म्हणण्याऐवजी सत्य ईश्वर आहे असे म्हटले पाहिजे असे मला वाटले. (यंग, ३१-१२-१९३१, ४२७-८)

ईश्वर सत्य आहे परंतु ईश्वर इतरही अनेक गोष्टी आहे. त्यामुळेच ईश्वर सत्य आहे असे मी म्हणतो.... परंतु हे लक्षात ठेवले पाहिजे की ईश्वराच्या अनेक गुणांपैकी सत्य हा एक गुण नसून, सत्य ईश्वराचे जिवंत रूप आहे, तेच जीवन आहे. सत्यालाच मी परिपूर्ण जीवन समजतो. अशा रीतीने संपूर्ण सृष्टी, संपूर्ण अस्तित्व ईश्वर आहे आणि जे काही अस्तित्वात आहे - म्हणजे सत्य - त्याची सेवा म्हणजे ईश्वराची सेवा होय. (हरि, २५-५-१९३५, पृ. ११५)

परिपूर्णता हा त्या सर्वशक्तिमानाचा गुण आहे आणि तरीही तो किती लोकशाही प्रवृत्तीचा आहे! आमच्यातील वाईटपणा आणि कितीतरी हेवेदावे त्याला सहन करावे लागतात! आमच्यातील अणुरेणूत तो आहे, आमच्या अवतीभवती तो आहे, त्यानेच आम्हाला निर्मिले आहे आणि असे असले तरी आम्ही त्याच्या अस्तित्वावरच शंका घेतो आणि ती गोष्टही तो सहन करतो. परंतु हवे त्याला दर्शन देण्याचा अधिकार त्याने आपल्याजवळ सुरक्षित ठेवला आहे. त्याला ना हातपाय आहेत ना नाक, कान, डोळे आणि इतर इंद्रिये आणि तरीही साक्षात दर्शन देण्याकरिता तो ज्याची निवड करतो तो त्याला पाहू शकतो.
(हरि, १४-११-१९३६, पृ. ३१४)

## सेवेद्वारे ईश्वर

माझ्यातील ईश्वराच्या उपस्थितीची मला अनुभूती झाली नसती तर इतक्या हालअपेष्टा आणि निराशा पाहिल्यानंतर मी ठार वेडा तरी झालो असतो वा गंगेत उडी मारून जीव तरी दिला असता. (यंग, ६-८-१९२५, पृ. २७५)

भारतातीलच नव्हे तर संपूर्ण जगातील सर्वात खालच्या माणसांच्या दुःखाशी जर मला एकरूप व्हायचे असेल, तर माझ्या देखरेखीखाली असलेल्या लहानसहान माणसांच्या पापांशीही मी एकरूप झालो पाहिजे. आणि संपूर्ण नम्रपणाने असे करत असताना एक दिवस मला ईश्वराचे - सत्याचे - साक्षात दर्शन होईल अशी मला आशा आहे. (यंग, ३-१२-१९२५, पृ. ४२२)

ईश्वर स्वर्गातही नाही आणि पाताळातही नाही, उलट तो आम्हा सर्वांत आहे हे मला माहीत असल्यामुळे मानवसेवेच्या माध्यमातून ईश्वरप्राप्तीचा प्रयत्न मी

करतो आहे. (यंग, ४-८-१९२७, पृ. २४७-८)

मी समष्टीचा भाग आहे आणि संपूर्ण मानवतेपासून वेगळ्या ठिकाणी मी त्याचा शोध घेऊ शकत नाही. माझे देशबांधव माझे सर्वात जवळचे शेजारी आहेत. ते इतके असहाय, साधनहीन आणि सुस्त झाले आहेत की, माझे सर्व लक्ष मी त्यांच्या सुधारणेवर केंद्रित केले पाहिजे. ईश्वर हिमालयाच्या गुहेत आहे असा विश्वास जर मला वाटला असता तर, मी ताबडतोब त्या दिशेने प्रस्थान केले असते. परंतु मानवतेपासून वेगळ्या ठिकाणी त्याचा शोध लागू शकत नाही, हे मला माहीत आहे. (हरि, २९-८-१९३६, पृ. २२६)

मी माझ्या लाखो-करोडो देशबांधवांना ओळखतो. दिवसाचे चोवीसही तास मी त्यांच्याबरोबर राहत असतो. कोट्यवधी मूक लोकांच्या अंतःकरणात ईश्वराचा वास असल्याची जाणीव त्यांना नसली तरी मला आहे. त्यांच्या अंतःकरणाशिवाय अन्यत्र कुठेही तो असू शकतो हे मला मान्य नाही. त्यामुळे त्यांची सेवा करणे हे माझे पहिले आणि अखेरचे कर्तव्य आहे आणि या लाखो-करोडो लोकांच्या सेवेच्या माध्यमातून मी ईश्वराची - सत्याची - पूजा करत असतो.
(हरि, ११-३-१९३९, पृ. ४४)

## मार्गदर्शक आणि संरक्षक

ईश्वर हाच एकमेव मार्गदर्शक आहे हे समजून.... मी पुढे जायलाच पाहिजे. तो फार मत्सरी स्वामी आहे. आपल्या अधिकारक्षेत्रात तो कुणाचीही भागीदारी सहन करत नाही. त्यामुळे आपल्या सर्व उणिवांसह, रिकाम्या हातांनी आणि समर्पक भावनेने त्याच्यासमोर उपस्थित व्हायला पाहिजे आणि तसे केले की, सर्व जगाशी सामना करण्याचे सामर्थ्य तो तुम्हाला देईल व सर्व प्रकारच्या संकटात तो तुमचे रक्षण करील. (यंग, ३-९-१९३१, पृ. २४७)

मी एक धडा शिकलो आहे - माणसाकरिता जी गोष्ट अशक्यप्राय आहे ती गोष्ट ईश्वराच्या हातचा मळ आहे आणि जर त्या ईश्वरावर माझा विश्वास असेल जो आपल्या निकृष्टतम सृष्टीचाही भाग्यविधाता आहे, तर मग सर्व काही शक्य आहे याबद्दलही मला संशय वाटायला नको. अशा या अखेरच्या आशेवर मी जगतो आहे आणि काळ घालवतो आहे आणि त्याच्या इच्छेचे पालन करण्याचा मी प्रयत्न करतो आहे. (यंग, १९-११-१९३१, पृ. ३६१)

अगदी घोर निराशेतही जेव्हा कोणी मदत करणारा दिसत नाही, सांत्वन

करणारा असत नाही, तेव्हा त्याचे नावच आम्हाला शक्ती देते आणि आम्हाला प्रेरित करून आमच्या सर्व शंकांचे निरसन करते व निराशेला दूर पळवते. आज आकाश ढगांनी भरलेले असू शकते परंतु भक्तिपूर्ण अंतःकरणाने केलेली ईश्वराची प्रार्थना ते ढग नक्कीच दूर करतात. मला कधीही निराशेचे तोंड पाहावे लागले नाही हा प्रार्थनेचाच प्रभाव आहे.

....मी कधीही निराश झालेलो नाही. मग तुम्ही का निराश होता? आपण प्रार्थना करू या की त्याने आमच्या अंतःकरणातील क्षुद्रपणा, नीचपणा, आणि कपटीपणा दूर करावा आणि आम्हाला शुद्ध करावे. तो आमची प्रार्थना नक्कीच ऐकेल. या अमोघ शक्तीचा लाभ घेतलेल्या अनेक लोकांना मी ओळखतो. (हरि, १-६-१९३५, पृ. १२३)

मी पाहिले आहे आणि माझा विश्वासही आहे की, ईश्वर सदेह नाही तर कार्यातून प्रगट होत असतो व त्यामुळेच आपली संकटातून सुटका होत असते. (हरि, १०-१२-१९३८, पृ. ३७३)

व्यक्तिगत भक्तीचे शब्दांत वर्णन करता येऊ शकत नाही. ती निरंतर आणि अनेकदा नकळतही सुरूच असते. असा एकही क्षण नसतो जेव्हा त्या सर्वसाक्षीची उपस्थिती मला जाणवत नाही. त्याच्या नजरेतून एकही गोष्ट सुटत नाही. याच सर्वसाक्षीच्या चालीत चाल मिळवून चालण्याचा मी प्रयत्न करत असतो.

त्याने प्रतिसाद दिला नाही असे कधीच झाले नाही. तुरुंगातील माझ्या सत्त्वपरीक्षेच्या काळात जेव्हा क्षितिजापर्यंत सर्वत्र काळोख भरलेला दिसायचा आणि मला कोणताच मार्ग सुचत नव्हता; तेव्हा तो माझ्याजवळच उभा असल्याचे मला आढळले. माझ्या जीवनातील असा एकही क्षण मला आठवत नाही जेव्हा त्याने माझी साथ सोडली. (हरि, २४-१२-१९३८, पृ. ३९५)

**आत्मसाक्षात्कार**

माझा विश्वास आहे की प्रत्येक माणसाला ती भाग्यशाली, अवर्णनीय, पापमुक्त स्थिती प्राप्त करून घेता येऊ शकते ज्या स्थितीत त्याला आपल्या अंतःकरणातील ईश्वराच्या - केवळ ईश्वराच्या उपस्थितीचा अनुभव जाणवू शकतो. (हरि, १७-११-२१, पृ. ३६८)

मी जी गोष्ट मिळवू इच्छितो - आणि जे मिळवण्याकरिता मी प्रयत्नशील आणि उत्सुकही आहे - ती गोष्ट आहे आत्मसाक्षात्कार. ईश्वराचे याची देही याची

डोळा दर्शन घेणे म्हणजेच मोक्ष आहे. याच ध्येयाच्या परिपूर्तीकरिता मी जगतो आहे, हालचाल करतो आहे आणि माझे अस्तित्वही त्याकरिताच आहे. मी जे काही करतो म्हणजे माझे वाचन-लेखन आणि राजकारणातील माझे सर्व कार्य याच ध्येयाच्या दिशेने केलेली वाटचाल आहे. (ए, पृ. XIV)

ज्याचा माझ्या जीवनाच्या प्रत्येक श्वासावर संपूर्ण अधिकार आहे आणि ज्याचा मी पुत्र आहे त्याच्यापासून मी इतका दूर आहे, हा विचारच माझ्या मनाला सतत वेदना देत असतो. मला माहीत आहे की, माझ्यातील दुष्ट वासनांमुळेच मी त्याच्यापासून इतका दूर आहे आणि असे असूनही त्या वासनांपासून मी मुक्त होऊ शकत नाही. (ए. पृ. XVI)

तर्कातीत असलेल्या ईश्वरावरील हा विश्वास श्रद्धेवर आधारित असला पाहिजे. खरे पाहता तथाकथित साक्षात्काराच्या मुळाशीही श्रद्धेचे तत्त्व असते. तिच्या आधाराशिवाय तो साक्षात्कार टिकू शकत नाही. असे होणे अपरिहार्य आहे. आपल्या स्वत्वाच्या सीमेचे उल्लंघन कोण करू शकतो?

मला वाटते की, या जीवनात संपूर्ण साक्षात्कार अशक्य आहे. त्याची गरजही नाही. संपूर्ण आध्यात्मिक उंचीवर पोहोचण्याकरिता केवळ जिवंत अढळ निष्ठेची गरज असते. आमच्या या नश्वर देहाबाहेर ईश्वर नाही. त्यामुळे आवश्यकता असली तरी बाह्य पुराव्याचा काही उपयोग नाही.

इंद्रियांच्या माध्यमांद्वारे आम्ही ईश्वराचा अनुभव घेऊ शकत नाही कारण तो इंद्रियातीत आहे. आपली इच्छा असेल तर इंद्रियांपासून आपण स्वतःला मुक्त करून घेऊ शकतो. आपणा सर्वांच्या आत अनाहत नाद होत असतो, परंतु आमच्या इंद्रियांच्या कोलाहलात त्याचे मधुर संगीत आम्हाला ऐकू येत नाही. आमच्या इंद्रियांना जाणवणा-या वा ऐकू येणा-या कोणत्याही संगीतापेक्षा ते वेगळे आणि अतिशय श्रेष्ठ आहे. (हरि, १३-६-१९३६, पृ. १४०-१)

# ११. सत्य आणि सौंदर्य

## कलेची अंतर्मुखता/आध्यात्मिकता

कोणत्याही वस्तूच्या दोन बाजू असतात.... बाह्य आणि अंतर्गत.... बाह्य बाजूचा उपयोग अंतर्गत बाजूला मदत करणे एवढाच असतो. अशा प्रकारची खरी कला आत्म्याची अभिव्यक्ती असते. बाह्य रूपाची उपयोगिता माणसाच्या आंतरिक भावनांची अभिव्यक्ती करणे हीच आहे. (यंग, १३-११-१९२४, पृ. ३७७)

मला माहीत आहे की, काही लोक स्वतःला कलाकार म्हणवून घेतात आणि त्यांना तशी मान्यताही असते, परंतु तरीही त्यांच्या कलाकृतीत आत्म्याच्या उर्ध्वगामी आकांक्षांचे आणि त्याच्या अस्वस्थतेचे नाममात्रही चित्रण नसते. (यंग, १३-११-१९२४, पृ. ३७७)

प्रत्येक ख-या कलाकृतीमुळे आत्मदर्शन व्हायला मदत झाली पाहिजे. माझ्या स्वतःच्या बाबतीत सांगायचे तर आत्मदर्शनाकरिता बाह्य साधनांचा मला मुळीच उपयोग नाही. त्यामुळे मी दावा करू शकतो की मी कोणतीही कलाकृती निर्माण करत असल्याचे तुम्हाला दिसत नसले, तरी माझ्या जीवनात खरे फळ देणारी कला आहे.

शक्य आहे की माझ्या खोलीच्या भिंतींना खिडक्यादरवाजे नसतील, मला कदाचित माझ्या डोक्यावरील छपराचीही गरज नसेल कारण तसे केल्यानंतर तारकांनी भरलेल्या असीम आकाशाला मी पाहू शकेन. जेव्हा मी चमचमणा-या चांदण्यांनी भरलेल्या आकाशाकडे पाहतो तेव्हा माझ्यासमोर एक अद्‌भुत दृश्य उभे राहते. त्याची बरोबरी कोणतीही मानवी कलाकृती करू शकत नाही.

याचा अर्थ असा नाही की, कलाकृतींचे सामान्यपणे जे मूल्य मानले जाते ते मी कमी करू इच्छितो, परंतु निसर्गसौंदर्यातील चिरंतन प्रतीकांकडे पाहिले असता या कलाकृती किती अपूर्ण आहेत याची जाणीव मला होते. आत्मदर्शन घडवून मानवनिर्मित कलाकृती आपल्याला जितक्या प्रमाणात वर उचलू शकतील तितक्या प्रमाणातच त्यांचे मोल असू शकते. (यंग, १३-११-१९२४, पृ. ३७७)

## सत्य आधी

सत्याचा शोध हीच पहिली गोष्ट आहे. त्यानंतर त्यात सौंदर्य आणि चांगुलपणा

यांची भर पडू शकेल. माझ्या मते येशू हा सर्वश्रेष्ठ कलाकार होता कारण त्याला सत्यदर्शन झाले होते आणि त्याने ते अभिव्यक्तही केले होते; त्याचप्रमाणे अरबी भाषेतील कुराण ही सर्वश्रेष्ठ रचना आहे, असे विद्वान लोक सांगत असल्यामुळे तीच गोष्ट महंमदाचीही आहे. या दोघांनीही आधी सत्य शोधण्याकरिता धडपड केली होती आणि मागाहून त्यांच्या लेखनात आपोआप सौंदर्य आले आणि येशू अथवा महंमद यांपैकी कोणीही कलाकृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला नव्हता आणि तरीही असे घडले होते. मला याच सत्याची आणि सौंदर्याची ओढ आहे आणि यांच्याकरिताच मी जगेन आणि मरेनही. (यंग, २०-११-१९२४, पृ. ३८६)

## कोट्यवधींसाठी कला

इतर सर्व गोष्टींप्रमाणेच याही बाबतीत मी करोडो लोकांच्या दृष्टीने विचार करत असतो. सौंदर्यातून सत्याचे दर्शन घेता येईल असे प्रशिक्षण कोट्यवधी लोकांना देता येऊ शकत नाही. त्यामुळे आधी त्यांना सत्याचे दर्शन घडवावे आणि नंतर ते स्वतःच सौंदर्याचे दर्शन घेतील.... या कोट्यवधी लोकांच्या उपयोगाचे जे काही असेल, माझ्या दृष्टीने तेच सुंदर आहे. आधी त्यांना जीवनाकरिता अत्यावश्यक गोष्टी द्या, सुंदर आणि अलंकारिक वस्तू नंतर येतील. (यंग, २०-११-१९२४, पृ. ३८६)

कोट्यवधींशी बोलू शकणारी कला मला हवी आहे. (हरि, १४-११-१९३६, पृ. ३१५)

जी दिलासा देते तीच कला असते. (यंग, २७-५-१९२६, पृ. १९६)

अखेर मोठ्या प्रमाणात उत्पादन करणा-या निर्जीव वीजेवर चालणा-या यंत्रांद्वारे तर कला निर्माण करता येऊ शकत नाही. तिच्याकरिता स्त्री-पुरुषांच्या कोमल हातांचा स्पर्शच पाहिजे. (यंग, १४-३-१९२९, पृ. ८६)

## आंतरिक शुचिता

खरी कला केवळ आकारावरच नाही तर तिच्या पार्श्वभूमीतील गोष्टींकडेही लक्ष देत असते. एक कला ती असते जी मारत असते आणि एक कला ती असते, जी जीवन देत असते.... खरी कला आपल्या निर्मात्याची सुख-शांती, समाधान आणि शुचिता यांचा पुरावा असली पाहिजे. (यंग, ११-८-१९२१, पृ. २५३)

अखेरीस खरे सौंदर्य अंतःकरणाच्या शुचितेत असते. (ए, पृ. २२८)

मला संगीत आणि अन्य कला आवडतात, परंतु सामान्यपणे त्यांना जेवढे महत्त्व देण्यात येते, तेवढे मी देत नाही. उदाहरणार्थ ज्या गोष्टी कळण्याकरिता

तांत्रिक ज्ञानाची गरज असते त्या गोष्टींचे महत्त्व मला मान्य नाही.

सर्व कलांपेक्षा जीवन मोठे आहे. उदात्त जीवनाचा पाया आणि घडण नसलेली कला आहे तरी काय? त्यामुळे यापुढे जाऊन मी तर असे म्हणेन की, ज्याने जीवनात परिपूर्णता मिळवली आहे तोच सर्वात मोठा कलाकार आहे. (एग्रे, पृ. ६५-६)

कशामुळे का होईना परंतु आमच्या मनात असे ठसले आहे की व्यक्तिगत जीवनातील शुचितेशी कलेचा काहीही संबंध नाही. मी माझ्या संपूर्ण अनुभवाच्या आधारावर सांगतो की यापेक्षा खोटी गोष्ट कोणतीही असू शकत नाही. आता मी माझ्या भौतिक जीवनाच्या अंतिम अवस्थेत असल्यामुळे सांगतो आहे की, जीवनातील शुचिता सर्वात श्रेष्ठ आहे आणि तीच खरी कला आहे. घोटलेल्या आवाजाच्या आधारे उत्तम संगीत वाजवण्याची कला काही लोकांनी अर्जित केली आहे. परंतु शुचितापूर्ण जीवनाच्या सामंजस्यातून तशी कला निर्माण करण्याचे कौशल्य मोजक्याच लोकांमध्ये असते. (हरि, १९-२-१९३८, पृ. १०)

### सत्यामध्ये सौंदर्य

मी सत्यामध्ये वा सत्याच्या माध्यमातून सौंदर्याचा शोध घेत असतो. सत्याची सर्व रूपे - केवळ सत्य विचारच नाही तर खरे चित्र आणि गाणीही - सुंदर असतात. सामान्यपणे लोक सत्यात सौंदर्य पाहू शकत नाहीत. सामान्य माणूस त्यापासून दूर पळतो आणि त्यामुळे सौंदर्य पाहण्याची क्षमतासुद्धा तो हरवून बसतो. लोक जेव्हा सत्यात सौंदर्याचा आस्वाद घेऊ शकतील तेव्हा ख-या कलेचा उदय होईल. (यंग, १३-११-१९२४, पृ.३७७)

ख-या कलावंताच्या दृष्टीने तोच चेहरा सुंदर असतो जो आपल्या बाह्य रूपापेक्षा वेगळ्या आत्म्यातील सत्याच्या प्रकाशाने दैदीप्यमान झालेला आहे. याहून वेगळे कोणतेच सौंदर्य नाही. या उलट सत्य अशा अनेक स्वरूपात अभिव्यक्त होऊ शकते जे बाह्यतः सुंदर नाही. असे म्हणतात की सॉक्रेटीस आपल्या काळातील सर्वात सत्यनिष्ठ माणूस होता, परंतु त्याचा चेहरा ग्रीसमध्ये सर्वात कुरूप होता. माझ्या दृष्टीने सॉक्रेटीस सुंदर होता, कारण त्याने आयुष्यभर सत्याकरिता संघर्ष केला. आणि तुम्हाला आठवत असेलच की कलाकार म्हणून फिडियसला बाह्याकारातील सौंदर्य पाहण्याचा अभ्यास असला तरी त्याला सॉक्रेटीसच्या सौंदर्याचे कौतुक करण्यात कोणतीही अडचण

जाणवली नव्हती. (यंग, १३-११-१९२४, पृ. ३७७)

सामान्यतः सत्य आणि असत्य एकत्र चालत असतात. त्याचप्रमाणे चांगुलपणा आणि वाईटपणा हेही परस्परांसोबतच असतात. कलावंतामध्येसुद्धा अनेकदा ख-या आणि खोट्या संकल्पनांचे सहअस्तित्व असते. जेव्हा कलावंत ख-या संकल्पनांनी प्रेरित झालेला असतो, तेव्हाच खरी आणि सुंदर कलाकृती जन्म घेते. जर त्याच्या जीवनात संस्मरणीय गोष्टी कमी असतील, तर त्याच्या कलेतही संस्मरणीय असे कमीच असेल. (यंग, १३-११-१९२४, पृ. ३७७)

ही सुंदर दृश्ये (सूर्यास्त अथवा चांदण्यांनी भरलेल्या आकाशात प्रकाशणारा चंद्र) तोपर्यंतच सुंदर आहेत, जोपर्यंत त्यांच्याकडे पाहून मला त्यांच्या निर्मात्याची आठवण होते. यांच्या सर्जनात सत्य आहे म्हणूनच तर ही दृश्ये सुंदर आहेत. जेव्हा मी सूर्यास्ताच्या अद्‌भुत दृश्याचे वा चंद्राच्या सौंदर्याचे कौतुक करतो, तेव्हा माझा आत्मा विकसित होऊन त्यांच्या निर्मात्याच्या आराधनेत तल्लीन होतो. या सर्व दृश्यांमध्ये ईश्वराचे व त्याच्या अनुकंपेचे दर्शन होते. परंतु ह्या सूर्यास्तांचा आणि सूर्योदयांचा मला ईश्वराची आठवण करून देण्याकरिता उपयोग होणार नसेल, तर त्यांची मला केवळ अडचणच होईल. आत्म्याला मुक्त विहार करण्यापासून रोखणारी प्रत्येक गोष्ट भ्रम आणि बंधन आहे; देहही अशीच गोष्ट आहे. त्यामुळेसुद्धा मुक्तीच्या मार्गात अनेकदा अडसर निर्माण होत असतो. (हरि, १३-११-१९२४, पृ. ३७८)

तुम्हाला भाज्यांच्या रंगात सौंदर्य का दिसू शकत नाही? आणि निरभ्र आकाशही सुंदर आहे. परंतु नाही, तुम्ही तर इंद्रधनुष्याच्या रंगांनी आकर्षित होता परंतु तो केवळ दृष्टिभ्रम आहे. जे सुंदर आहे ते उपयोगी असण्याची गरज नाही आणि जे उपयोगी असेल ते सुंदर नाही असे समजण्याचे शिक्षण आम्हाला देण्यात आले आहे. जे उपयोगी आहे ते सुंदरही असू शकते, हे दाखवण्याचा माझा प्रयत्न आहे. (हरि, ७-४-१९४६, पृ. ६७)

# ३. निर्भयता

## १२. निर्भयतेचा दिव्य संदेश

निर्भयता आध्यात्मिकतेची पहिली कसोटी आहे. भित्रा कधीही नैतिक असू शकत नाही. (यंग, १३-१०-१९२१ पृ. ३२३)

जिथे भय असेल, तिथे धर्म असू शकत नाही. (यंग, २-९-१९२६, पृ. ३०८)

गीतेच्या प्रत्येक पाठकाला माहीत असते की, गीतेच्या सोळाव्या अध्यायात ज्या दैवी गुणांचे वर्णन करण्यात आले आहे त्यात निर्भयता पहिल्या क्रमांकावर आहे. असे जाणूनबुजून करण्यात आले आहे की, केवळ छंदरचनेकरिता, ते मी निश्चित सांगू शकत नाही. परंतु माझ्या मते निर्भयतेला जे पहिले स्थान देण्यात आले आहे, ते योगायोगाने असले तरी सर्वतोपरी उचितच आहे.

इतर उदात्त गुणांच्या विकासाकरिता निर्भयतेची अट अनिवार्य असते. निर्भयतेशिवाय सत्याचा शोध वा प्रेमाची काळजी कशी घेता येऊ शकेल? प्रीतमने म्हटल्याप्रमाणे 'ईश्वरापर्यंत पोहोचण्याचा मार्ग वीरांचा आहे, भित्र्यांचा नाही.' इथे वीर या शब्दाचा अभिप्राय सत्य असा आहे. ज्यांच्याजवळ तलवारी, रायफली वा इतर शस्त्रास्त्रे आहेत - व भित्र्या लोकांनाच या शस्त्रांची महती वाटत असते- त्यांचा इथे उल्लेख नाही. उलट जे निर्भयतेच्या शस्त्राने सुसज्ज आहेत त्यांचा इथे उल्लेख आहे. (यंग, ११-९-३०, पृ.१-२)

निर्भयतेचा अर्थ आहे सर्व भयांपासून मुक्ती - उदाहरणार्थ आजार, शारीरिक इजा वा मृत्यूची भीती, आपल्या जवळच्या नातलगाचा मृत्यू इत्यादी इत्यादी. (यंग, ११-९-३०, पृ.२)

### निर्भय होणे

पूर्णपणे निर्भय तोच होऊ शकतो, जो सर्वोच्च शक्तीला समजू शकला आहे. सर्व प्रकारच्या भ्रमापासून मुक्त होण्याची तीच अवस्था आहे. परंतु माणूस दृढनिश्चयाने सतत प्रयत्न करून त्या मार्गाने नक्कीच प्रगती करू शकतो....

जोवर आंतरिक शत्रूचा प्रश्न आहे, आपण त्यांचे भय बाळगले पाहिजे.

कामवासना, क्रोध आदींबद्दल भीती बाळगणे योग्य आहे. आंतरिक शत्रूंवर विजय मिळवताच बाह्य भय आपोआप नाहीसे होते. सर्व प्रकारच्या भीतींचे केंद्र आमचे मन आहे आणि एकदा देहाची आसक्ती संपली की, कोणतीच भीती आम्हाला घाबरवू शकत नाही.

अशा रीतीने दिसून येते की, सर्व प्रकारच्या भीतीला कोणताच आधार नाही, आपल्या मनाचा तो निरर्थक भ्रम आहे. आपण संपत्ती, कुटुंब देह यांच्या आसक्तीचा त्याग करताच भीतीचे कोणतेही कारण शिल्लक राहत नाही. 'तेन त्यक्तेन भुंजिथा' (सांसारिक वस्तूंचा त्याग करत त्यांचा उपभोग घ्या) हा अतिशय उदात्त संदेश धर्माने दिलेला आहे. धन, कुटुंब, शरीर तसेच राहतील, आपल्याला केवळ त्यांच्याबद्दलची मानसिकता बदलण्याची गरज आहे. या गोष्टी आपल्या नसून ईश्वराच्या आहेत. असे असताना भीतीचे कारण काय?

यामुळे उपनिषदाचा आदेश आहे की 'वस्तूंचा उपभोग घेत असतानाही त्यांच्या आसक्तीचा त्याग करा.' याचा अर्थ आम्ही स्वतःला त्यांचा स्वामी नाही तर विश्वस्त मानले पाहिजे. ज्या ईश्वराद्वारे आम्हाला या गोष्टी मिळाल्या आहेत तोच या गोष्टींचे रक्षण करण्याकरिता आम्हाला शक्ती आणि आवश्यक शस्त्रही देईल.

अशा प्रकारे आम्ही स्वामी न राहता आपल्या पायाखालील धुळीपेक्षाही अधिक सामान्य अशा सेवकाच्या भूमिकेत जेव्हा उतरू, तेव्हा सर्व भीती धुक्याप्रमाणे वितळून जाईल. तेव्हाच आपल्याला अनिर्वचनीय शांतता लाभेल आणि सत्यनारायणाचा (सत्याचा ईश्वर) साक्षात्कार होऊ शकेल.
(यंग, ११-९-३०, पृ. २)

## ईश्वराची भीती

आम्ही ईश्वराला घाबरलो तर आमच्या मनातील माणसाची भीती निघून जाईल.
(स्पीरा, पृ. १३०)

आपल्या आजूबाजूला अंधविश्वास आणि दांभिकता या गोष्टी इतक्या भरलेल्या आहेत की आम्ही योग्य काम करायलाही घाबरतो. परंतु माणूस एकदा का भीतीच्या ताब्यात गेला की, मग तो सत्याचेही दमन करू लागतो. सुवर्ण नियम हा आहे की जे काम तुम्हाला उचित वाटेल ते तुम्ही निर्भय होऊन करा.
(हरि, २-६-४६, पृ. १६०)

निर्भयतेचा अर्थ दंभ वा आक्रमक व्यवहार नाही. या गोष्टी तर स्वतःच

भीतीच्या प्रतीक आहेत. निर्भयतेची पहिली अट आहे मनाची शांती. याकरिता ईश्वरावर जिवंत विश्वास असणे आवश्यक आहे. (हरि, ३-११-१९४६, पृ. ३८८)

मला भीती मुळीच आवडत नाही. एका माणसाने दुस-या माणसाला का घाबरावे? माणसाने केवळ ईश्वराला घाबरायला पाहिजे. त्यानंतर तो सर्व भीतींपासून मुक्त होईल. (हरि, ५-१-१९४७, पृ. ४७७)

**आत्म्याचे शौर्य**

प्रत्येक माणसाला आत्मरक्षणाचे कौशल्य शिकवले पाहिजे. याकरिता शरीराला प्रतिकाराकरिता प्रशिक्षित करण्यापेक्षा मन अधिक सुदृढ करण्याची गरज असते. आतापर्यंतचे आमचे मानसिक प्रशिक्षण आमच्यात असहाय्यतेची भावना निर्माण करत आले आहे. शौर्य शरीराचा नाही तर आत्म्याचा गुण आहे. धष्टपुष्ट शरीराच्या लोकांमध्ये मी भित्रेपणा पाहिला आहे आणि अगदी काटकुळ्या लोकांमध्ये मला अद्‌भुत साहसाचे दर्शन झाले आहे.... आमच्यातील दुर्बलतम व्यक्तीलाही संकटाचा सामना करण्याचे आणि शौर्याचे शिक्षण दिले गेले पाहिजे. (यंग, २०-१०-१९२१, पृ. ३३५)

आपण संधिप्रकाशाच्या उंबरठ्यावर उभे आहोत. हा संधिप्रकाश सायंकाळचा आहे की सकाळचा हे मला माहीत नाही. एका नंतर रात्र होते आणि दुस-यानंतर दिवस उगवतो. आपल्याला या संधिप्रकाशानंतर जर दुःखद रात्र नको असेल आणि उज्ज्वल दिवस हवा असेल तर आमच्यापैकी प्रत्येकाने.... सत्य काय आहे ते ओळखले पाहिजे, सर्व प्रकारच्या प्रतिकूलतेचा सामना करून सत्याची तरफदारी केली पाहिजे आणि निर्भिड होऊन त्याची बाजू घेऊन त्याचा प्रचार केला पाहिजे. (स्पीरा, पृ. ३०३)

स्वातंत्र्याकडे कूच करण्याकरिता आम्ही सत्य आणि अहिंसेचा प्राचीन मार्ग निवडला आहे आणि जे सरळ आणि अरुंद वाटेने चालतात, त्यांना कधीही अपयशाचे तोंड पाहावे लागत नाही या ईश्वरी वचनाधारे आम्ही आपल्या मनात आशा आणि विश्वास निर्माण केला पाहिजे. (यंग, २-४-१९३१, पृ. ५४)

आत्मदमन आणि भिडस्तपणा, जो जवळपास भित्रेपणाच आहे, यांनी भरलेल्या.... या देशात आम्हाला फार मोठ्या शौर्याचे आणि आत्मबलिदानाचे दर्शन होऊ शकत नाही. मी.... विनम्र, सौम्य आणि अहिंसक माणसाच्या श्रेष्ठतम शौर्याची.... अपेक्षा करतो आहे. हे ते शौर्य आहे की जे एकाही व्यक्तीला इजा

न करता वा इजा पोहोचवण्याचा विचारही न करता सुळावर चढून जाईल.
(यंग, २-४-१९३१, पृ. ५८)

मोठ्यात मोठ्या शक्तीसमोर गुडघे टेकण्याचे साफ नाकारून, मनात कटुता न आणता, केवळ आत्मा अमर आहे आणि इतर काहीही नाही असा विश्वास मनात बाळगण्याइतके मोठे शौर्य कोणतेही नाही. (हरि, १५-१०-१९३८, पृ. २९१)

आमच्यासमोर दोन पर्याय आहेत; एक आपण शक्तीशाली फौज उभी करू शकतो, अथवा माझ्या मार्गावर चालून आपण एक महान आणि अपराजित शक्ती बनू शकतो. दोन्ही विकल्पांकरिता भयमुक्त होणे ही पहिली अट आहे.
(हरि, २६-१०-१९४७, पृ. ३८२)

# ४. श्रद्धा

## १३. श्रद्धेचा दिव्य संदेश

श्रद्धाच अशी गोष्ट आहे जी आम्हाला वादळी सागरातून पलीकडे पोहोचवते. श्रद्धा पर्वतांना हलवू शकते, समुद्र ओलांडू शकते. ही श्रद्धा म्हणजे आणखी काही नसून आपल्यामध्ये वास करत असलेल्या परमेश्वराची जिवंत आणि स्पष्ट जाणीव आहे. ज्याला ही श्रद्धा प्राप्त झाली आहे त्याला दूसरे काहीही नको असते. अशा व्यक्तीला शारीरिक व्याधी असली तरी तो आध्यात्मिक दृष्टीने निरोगी असतो. तो भौतिक दृष्टीने गरीब असेल, परंतु आध्यात्मिक दृष्टीने तो संपन्न असतो. (यंग, २४-९-१९२५, पृ. ३३१)

श्रद्धा नसेल तर हे जग एक क्षणही टिकू शकणार नाही. प्रार्थना आणि तप करून जे शुद्ध जीवन जगले होते अशा विभूतींचे तर्कसंगत अनुभव स्वीकारणे म्हणजे खरी श्रद्धा. प्राचीन काळातील पैगंबरांवर वा अवतारांवर श्रद्धा ठेवणे हा व्यर्थ अंधविश्वास नसून, आमच्या अगदी आतील आत्म्याचे ते समाधान आहे. (यंग, १४-४-१९२७, पृ. १२०)

एखाद्या लहानशा वा-याच्या झोताबरोबर उडून जाणा-या कोमल पुष्पासारखी श्रद्धा नाही, श्रद्धा हिमालयासारखी आहे, जो अचल असतो. कोणतेही वादळ हिमालयाला मुळापासून उलथवू शकणार नाही.... तुमच्यापैकी प्रत्येकामध्ये ईश्वर आणि धर्माबद्दल अशी श्रद्धा निर्माण व्हावी, अशी माझी इच्छा आहे.
(हरि, २६-१-१९३४, पृ. ८)

**तर्काच्या मर्यादा**

अनुभवामुळे मी इतका विनम्र झालो आहे की आता मी तर्काच्या नेमक्या सीमा ओळखू शकतो. ज्याप्रमाणे चुकीच्या ठिकाणी ठेवल्यामुळे पदार्थ कचरा होतो, त्याचप्रमाणे तर्काचा दुरुपयोग केला तर त्याचे वेडात रूपांतर होते.

विवेकवादी प्रशंसनीय व्यक्ती असतात, परंतु सर्वशक्तिमान असल्याचा दावा

जेव्हा विवेकवाद करतो, तेव्हा तो राक्षसी रूप धारण करतो. तर्काला सर्वशक्तिमान मानणे ही तशीच चूक आहे, जशी केवळ मूर्तीला ईश्वर मानून तिची पूजा करणे ही चूक आहे. (यंग, १४-१०-१९२६, पृ. ३५९)

मी विवेकाला दडपण्याविषयी बोलत नाही, तर विवेकाला पवित्र करणा-या गोष्टीला मान्यता देण्याविषयी बोलत आहे. (यंग, १४-१०-१९२६, पृ. ३५९)

शुद्ध आणि भेसळ नसलेल्या तर्काला जिथे आवाहन असेल, तिथे कोणत्याही व्यक्तीला उद्धृत करून तिचा आधार घेण्याची गरज नाही, मग ती व्यक्ती कितीही मोठी असो, असे माझे स्पष्ट मत आहे. (यंग, २६-९-१९२९, पृ. ३१६)

असे काही विषय असतात जिथे तर्क आपल्याला फार लांब नेऊ शकत नाही आणि आपल्याला त्या गोष्टी श्रद्धापूर्वक स्वीकाराव्या लागतात. अशा वेळी श्रद्धा तर्कविरोधी नसते, तर तर्कातीत असते. श्रद्धा ही सहाव्या इंद्रियाप्रमाणे असते आणि तर्काच्या क्षेत्रापलीकडील विषयांच्या बाबतीत ती काम करते.
(हरि, ६-३-१९३७, पृ. २६)

## धर्माचा अर्थ

धर्माचा माझा अर्थ काय आहे ते मला स्पष्ट करू द्या. हिंदू धर्माबद्दल मला सगळ्या धर्मांपेक्षा अधिक आदर वाटत असला, तरी हिंदू धर्म म्हणजेच धर्म असा त्याचा अर्थ नाही. याउलट धर्माचा माझा अर्थ तो आहे जो हिंदू धर्माच्याही पलीकडे आहे, जो माणसाचा स्वभावच बदलून टाकतो, जो आपल्याला आतील सत्याशी एकरूप करतो आणि सतत आपल्याला पवित्र करत जातो तो खरा धर्म. मानवी स्वभावाचा तो स्थायी गुणधर्म आहे. संपूर्ण अभिव्यक्तीकरिता कोणताही त्याग करण्याची त्याची तयारी असते. आत्म्याचे आणि निर्मात्याचे ज्ञान होईपर्यंत आणि निर्मिक व निर्मित यांच्यातील ख-या तादात्म्याची ओळख होईपर्यंत तो आपल्याला स्वस्थ बसू देत नाही. (यंग, १२-५-१९२०, पृ. २)

धर्माचा माझा अर्थ औपचारिक धर्म नाही तर सर्व धर्मांच्या मुळाशी जो धर्म आहे आणि जो आपल्याला आपल्या निर्मात्याचे दर्शन घडवतो तो धर्म. मी धर्म म्हणतो तेव्हा मला हाच अर्थ अभिप्रेत असतो. (एमके, पृ. ७)

## माझा धर्म

माझ्या धर्माला कोणत्याही भौगोलिक सीमा नाहीत. माझी जर त्याच्यावर खरी श्रद्धा असेल, तर तो माझ्या भारतावरील प्रेमाच्याही पलीकडे निघून

जाईल. (यंग, ११-८-१९२०, पृ. ४)

माझा धर्म तुरुंगासारखा नाही. यात ईश्वराने निर्मिलेल्या अगदी तळातील माणसाचाही समावेश आहे. परंतु तो उद्धटपणा आणि जात, धर्म अथवा वर्णभेद वा रंगभेद सहन करत नाही. (यंग, १-६-२१, पृ. १७१)

माझ्या देशापेक्षा माझ्या धर्मावर मी अधिक प्रेम करतो आणि त्यामुळे मी आधी हिंदू आहे आणि नंतर राष्ट्रभक्त हे माझे विधान एका अर्थाने अगदी बरोबर आहे. असे म्हटल्यामुळे चांगल्यात चांगल्या राष्ट्रभक्तापेक्षा माझी पातळी कमी होत नाही. माझ्या म्हणण्याचा अर्थ एवढाच आहे की माझ्या देशाचे आणि धर्माचे हित एकच आहे.

अशा रीतीने जेव्हा मी म्हणतो की, माझ्या मुक्तीला मी सर्वाधिक महत्त्व देतो. एवढेच नाही तर भारताच्या मुक्तीपेक्षाही अधिक महत्त्व देतो तेव्हा याचा अर्थ असा नसतो की माझ्या स्वतःच्या मुक्तीकरिता भारताच्या राजकीय वा इतर कोणत्याही प्रकारच्या मुक्तीचा बळी द्यावा लागेल. अपरिहार्यपणे याचा अर्थ असा होतो की या दोन्ही गोष्टी सोबत चालत असतात. (यंग, २३-२-१९२२, पृ. १२३)

जीवनसिद्धांत म्हणून मी मान्य केले आहे की एखाद्या माणसाने केलेल्या कामाला, मग तो कितीही मोठा माणूस असला तरी, तोपर्यंत यश येऊ शकत नाही जोपर्यंत तो माणूस धार्मिक प्रवृत्तीचा होत नाही. (स्पीरा, पृ. ३७७-८)

माझ्या कामाबद्दल व मानवतेबद्दल माझ्या मनात भरपूर श्रद्धा आहे. कोणत्याही मानवतेपेक्षा भारतीय मानवता कमी प्रतीची नाही; कदाचित ती अधिक चांगलीच असेल. वास्तवात माझ्या उद्दिष्टांकरिता मानवी स्वभावाबद्दल श्रद्धा असणे अपरिहार्य आहे. जरी मार्ग काळोखाने भरलेला दिसत असला तरी माझ्यात जर श्रद्धा असेल आणि त्याच्या अचूक मार्गदर्शनाशिवाय आपले भागू शकणार नाही हे मान्य करण्याचा नम्रपणा आपल्यात असेल तर तो आपला मार्ग प्रकाशित करून आपल्याला मार्गदर्शन करील. (यंग, २७-११-१९२४, पृ. ३९१)

कोणी या गोष्टीला काल्पनिक म्हणू शकेल, परंतु माझी खात्री आहे की माणूस जर एखादे काम ईश्वराच्या नावावर आणि त्याच्यावर श्रद्धा ठेवून करील तर मग ते काम जीवनाच्या अखेरच्या दिवसात केलेले असले तरी वाया जात नाही. मी खात्रीपूर्वक सांगू शकतो की, मी जे काम हाती घेतले आहे ते माझे नसून ईश्वराचे आहे. (हरि, १-३-१९३५, पृ. २४)

पवित्र ग्रंथांमधून ज्याची आज्ञा मिळते, ज्याचे पालन सर्व ऋषीमुनी करतात,

विद्वान लोकांनी ज्याचा अर्थ लावलेला असतो व जो अंतःकरणाचा ठाव घेतो, तोच धर्म असतो. चौथ्या अटीची परिपूर्ती होण्याआधी पहिल्या तीन अटींचे अनुपालन होणे आवश्यक आहे. अज्ञानी वा दुष्ट लोकांचा आदेश कितीही चांगला वाटत असला तरी त्यांच्या उपदेशाचे पालन करण्याची गरज कोणत्याही व्यक्तीला नाही. निरुपद्रवीपणा, शत्रुत्वभाव आणि त्याग या तीन अटींचे जो कठोरपणे पालन करील, त्यालाच नियम म्हणजेच धर्म तयार करण्याचा अधिकार आहे.
(हरि, १७-११-१९४६, पृ. ३९७)

### भौतिक शक्तीचे वैय्यर्थ

माझी खात्री आहे की, पाशवी शक्तीच्या आधारावर कोणताही धर्म जिवंत राहू शकत नाही. एवढेच नाही तर जे लोक तलवारीचा आधार घेतात त्यांनाच तलवार मारून टाकते. (हरि, ९-३-१९३४, पृ. २९)

राष्ट्रांप्रमाणेच धर्मदेखील तराजूच्या पारड्यात तोलले जातात. जे धर्म आणि राष्ट्र अन्याय, असत्य आणि हिंसा यांच्यावर श्रद्धा ठेवतात, ते या अवनीतलावरून नाहीसे होतात. (हरि, १२-९-१९३६, पृ. २४७)

### नैतिकता

माझ्याकरिता नैतिकतेत आध्यात्मिकता समाविष्ट आहे.... सुधारकाच्या रूपात प्रत्येक गोष्टीकडे मी नैतिक दृष्टीने पाहिले आहे. मी राजकीय समस्येकरिता, सामाजिक समस्येकरिता वा आर्थिक समस्येकरिता झगडत असलो तरी त्या समस्यांची नैतिक बाजू प्रामुख्याने माझ्यासमोर येते आणि माझ्या संपूर्ण विचारसरणीला ती प्रभावित करते. (हरि, २९-३-१९३५, पृ. ५१)

सर्व युगांकरिता वैध, निरपेक्ष नैतिकता अशी कोणतीही गोष्ट नाही. परंतु एक सापेक्ष नैतिकता अवश्य आहे आणि आपल्यासारख्या अपूर्ण मानवांकरिता ती निरपेक्ष असल्यासारखीच आहे. उदाहरणार्थ औषध म्हणून, औषधीच्या प्रमाणात डॉक्टरच्या सल्ल्याप्रमाणे घेतलेले मद्य सोडून मद्यपान निरपेक्ष रूपात सर्वथा अनैतिक आहे. अशाच रीतीने आपल्या पत्नीशिवाय अन्य स्त्रीकडे कामुक दृष्टीने पाहणेही अगदीच चूक आहे. या दोन्ही गोष्टी शुद्ध तर्काद्वारे सिद्ध झालेल्या आहेत. याच्या विरोधातील युक्तिवादही अनेकदा करण्यात आलेले आहेत. पण असे युक्तिवाद तर ईश्वराच्या अस्तित्वाच्या विरोधातही करण्यात आलेले आहेत. युगांपासून तर्कातीत श्रद्धा आमचा आधार राहिलेली आहे.... माझ्या श्रद्धेनेच मला

कठीण प्रसंगांपासून वाचवले आहे आणि आताही वाचवत आहे. तिने मला कधीही धोका दिलेला नाही. तिने कधीही कुणालाही धोका दिलेला नाही. (हरि, २३-१२-१९३९, पृ. ३८७)

**धर्मांतील वैविध्य**

वास्तवात जितक्या व्यक्ती आहेत तितकेच धर्म आहेत. (हिंस्व, पृ ४९)

धर्म म्हणजे एकाच बिंदूकडे जाणारे विविध मार्ग. आपण एकाच ठिकाणी पोहोचणार असू तर वेगवेगळे मार्ग निवडल्यामुळे काय फरक पडतो? (हिंस्व, पृ.४९)

जगात एकच धर्म आहे वा असेल, या धारणेशी मी सहमत नाही. त्यामुळे त्यांच्यातील समान सूत्र पकडण्याचा व परस्परांतील सहिष्णुता वाढवण्याचा मी प्रयत्न करीन. (यंग, ३१-७-१९२४, पृ. २५४)

**मूलभूत ऐक्य**

सर्व धर्मांचा आत्मा एक आहे, परंतु त्यांची रूपे अनेक आहेत. ही रूपे अनंत काळापर्यंत राहतील. शहाणी माणसे बाह्य कवचाकडे दुर्लक्ष करून विविध कवचांमध्ये राहणारा एकच आत्मा पाहतील. (यंग, २५-९-१९२४, पृ. ३१८)

जगातील सर्व धर्म कमी-अधिक प्रमाणात खरे आहेत असा माझा विश्वास आहे. मी 'कमी-अधिक प्रमाणात' असे म्हणतो कारण माणूस हा प्राणीच मुळात अपूर्ण आहे आणि म्हणून मानवी हात ज्या कशाला स्पर्श करील ते अपूर्ण होईल, अशी माझी खात्री आहे. पूर्णता हा केवळ ईश्वराचा गुण आहे आणि तो अवर्णनीय व अननुवाद्य (अनुवाद न करता येण्यासारखा) आहे. प्रत्येक माणूस ईश्वरासारखा बनू शकतो असे माझे मत आहे, हे खरे आहे. आपण सर्वांनी ईश्वराप्रमाणे परिपूर्णतेची कामना ठेवणे आवश्यक आहे. परंतु जेव्हा ती स्थिती प्राप्त होते, तेव्हा ती अवर्णनीय आणि अपरिभाषेय होते. त्यामुळे विनम्रतापूर्वक मी मान्य करतो की, वेद, कुराण, आणि बायबल हेसुद्धा ईश्वराचे अपूर्ण शब्द आहेत आणि अनेक मनोविकारांनी ग्रस्त आपल्यासारख्या अपूर्ण मानवप्राण्याला ही ईश्वरीय वाणी समजणेसुद्धा अशक्य आहे. (यंग, २२-९-१९२७, पृ. ३१९)

माझी अपेक्षा आहे की, विविध धर्मांतील सर्व लोकांनी - केवळ भारतातीलच नव्हे तर सर्व जगातील - एकमेकांच्या संपर्कात येऊन अधिक चांगले बनले पाहिजे. असे घडले तर हे जग राहण्याकरिता अधिक चांगले ठिकाण होईल. मी

अधिकात अधिक सहिष्णुतेचा पुरस्कर्ता आहे व त्याकरिताच प्रयत्नशील आहे. लोकांनी प्रत्येक धर्माची परीक्षा धार्मिक माणसाच्या दृष्टिकोनातून करावी, असे मी त्यांना सांगत असतो. माझ्या स्वप्नातील भारतात हिंदू, इस्लाम, ख्रिश्चन वा अन्य कोणता तरी एकच धर्म असेल अशी अपेक्षा मला नाही. परंतु भारताने पूर्णपणे सहिष्णू व्हावे व या देशात सर्व धर्मांनी परस्पर सहकार्याने धार्मिक कार्य करावे असे मला वाटते. (यंग, २२-१२-१९२७, पृ. ४२५)

भक्तीपूर्ण अध्ययन आणि संशोधन केल्यानंतर व अनेक लोकांशी चर्चा केल्यानंतर मी पुष्कळ आधीच या निष्कर्षावर पोहोचलो होतो की सर्व धर्म खरे आहेत आणि त्याचबरोबर त्यांच्यात काही उणिवाही आहेत आणि मी माझ्या धर्मातच असलो, तरी इतर धर्मांवरही मी हिंदू धर्माएवढेच प्रेम केले पाहिजे. यातून स्वाभाविकपणेच असा निष्कर्ष निघतो की, सर्व लोकांवर आपण आपल्या जवळच्या नातलगांप्रमाणे प्रेम केले पाहिजे. कोणामध्येही भेदभाव करू नये. (यंग, १९-१-१९२८, पृ. २२)

एका ईश्वरावर श्रद्धा ही सर्व धर्मांची आधारशिला आहे. परंतु अशा काळाची मी कल्पना करू शकत नाही, जेव्हा जगात एकच धर्म शिल्लक राहील. मला भेटलेल्या कोणत्याही दोन माणसांच्या व्यवहारातील ईश्वरासंबंधीची कल्पना एकसारखी असल्याचे मला आढळले नाही. त्यामुळे वेगवेगळ्या स्वभावाच्या आणि वेगवेगळ्या वातावरणातील लोकांच्या परिस्थितीप्रमाणे धर्मही बहुधा वेगवेगळेच राहतील. (हरि, २-२-१९३४, पृ. ८)

जगातील सर्व धर्मातील मूलभूत सत्यांवर माझा विश्वास आहे. ते सर्व ईश्वराने दिलेले आहेत हे मला मान्य आहे आणि मला हेही मान्य आहे की, ज्या लोकांकरिता त्या धर्माचा अवतार झाला, त्या लोकांकरिताही तो आवश्यक होता. माझा असाही विश्वास आहे की, जर आपण सर्व लोक विभिन्न धर्माचे पवित्र ग्रंथ त्या-त्या धर्मातील अनुयायांच्या दृष्टिकोनातून वाचले, तर सर्व धर्म मूलतः एकच असल्याचे आणि परस्पर पूरक असल्याचे आपल्याला आढळून येईल. (हरि, १६-२-१९३४, पृ. ५-६)

धर्म लोकांना एक दुस-यापासून वेगळे करण्याकरिता नाही, तर तो त्यांना जोडण्याकरिता आहे. (हरि, ८-६-१९४०, पृ. १५७)

## धर्मग्रंथ

माझ्या दृष्टीने वेद दिव्य आणि अपौरुषेय आहेत. 'शब्द मारतो.' परंतु त्यातील चैतन्य म्हणजे अर्थ-भावना प्रकाश देत असतात. पावित्र्य, सत्य, निष्कपटता, शुचिता, विनम्रता, साधेपणा, क्षमा, दिव्यत्व आणि ज्यामुळे स्त्री-पुरुष उदात्त आणि शूर होतात ते सर्व गुण वेदातून अभिव्यक्त झालेले आहेत.
(यंग, १९-१-१९२१, पृ. २२)

केवळ वेदच दिव्य आहेत असे मी समजत नाही. बायबल, कुराण आणि जेंदअवेस्ता हे ग्रंथही वेदांप्रमाणेच ईश्वरी प्रेरणेने प्रकट झालेले आहेत, असा मला विश्वास आहे. हिंदू धर्मग्रंथावरील माझ्या विश्वासाचा अर्थ असा नाही की, मी त्यातील एक एक शब्द दैवी प्रेरणेने निर्माण झालेला आहे, असे समजतो.... या ग्रंथांचा लावण्यात आलेला असा कोणताही अर्थ, मग तो कितीही मोठ्या विद्वानाने लावलेला असो, विवेक आणि नैतिकता यांच्या विरोधात असेल तर मी तो मानण्यास नकार देतो. (यंग, १९-१-१९२१, पृ. ३१७)

मी शब्दशः अर्थ घेणारा नाही. त्यामुळेच जगातील सर्व धर्मग्रंथातील भावना समजून घेण्याचा मी प्रयत्न करत आहे. धर्मग्रंथांचा अन्वयार्थ लावताना धर्मांनीच सांगितलेल्या सत्य आणि अहिंसा यांच्या कसोटीचा मी आधार घेत असतो. या कसोटीवर ज्या गोष्टी टिकत नाहीत त्या मी नाकारतो आणि ज्या गोष्टी या कसोटीवर उतरतात त्यांचा मी स्वीकार करतो. (यंग, २७-८-१९२५, पृ. २९३)

'सर्मन ऑफ द माऊंट' आणि 'भगवद्‌गीता' यांच्यात मला कोणतेच अंतर दिसत नाही. डोळ्यासमोर चित्र उभे राहील अशा पद्धतीने 'सर्मन'मध्ये वर्णन करण्यात आले आहे तर 'भगवद्‌गीतेत' त्याच विचारांना सूत्रबद्ध करण्यात आले आहे. रूढ पद्धतीने तिला वैज्ञानिक ग्रंथ म्हणून जरी संबोधता येत नसले तरी तिच्यात प्रेमाच्या नियमांबद्दल - ज्यांना मी समर्पणाचे नियम म्हणेन - फार सुंदर युक्तिवाद करण्यात आला आहे. 'सर्मन ऑफ द माऊंट'मध्ये याच नियमांचे फार सुंदर भाषेत वर्णन करण्यात आले आहे. 'न्यू टेस्टामेंट' वाचल्यानंतर मला समाधान आणि असीम आनंद यांचा अनुभव आला. 'ओल्ड टेस्टामेंट' वाचल्यानंतर मला जो तिटकारा आला होता त्यानंतर मी हे पुस्तक वाचले होते त्यामुळे असे विशेषत्वाने झाले. आज एखाद्याने माझ्याजवळून गीता हिसकावून घेतली आणि समजा गीतेतील सर्व श्लोकही मी विसरलो, तरी माझ्याजवळ जर 'सर्मन ऑफ द माऊंट' असेल तर ते वाचल्यामुळेही मला तेवढाच आनंद मिळेल

जेवढा गीतेच्या वाचनामुळे मिळतो. (यंग, २२-१२-१९२७, पृ. ४२६)

माझ्याजवळ एक गोष्ट आहे आणि ती म्हणजे कोणत्याही गोष्टीतील वाईट बाजूपेक्षा उज्ज्वल बाजूच पाहणे मला आवडते. यामुळेच कोणत्याही धर्मग्रंथातून मला प्रेरणा मिळू शकते. गीता वा 'न्यू टेस्टॅमेंट'मधील एकही कडवे मी कदाचित पाठ म्हणून दाखवू शकणार नाही आणि कदाचित हिंदू वा ख्रिश्चन मुले ते अधिक चांगल्या पद्धतीने म्हणूही शकतील. असे असले तरी या पुस्तकांमधील भावना ज्याप्रमाणे मी आत्मसात केल्या आहेत त्यांना या मुलांचे पाठांतर धक्का लावू शकणार नाही. (यंग, २२-१२-१९२७, पृ. ४२६)

यामुळे एखाद्याचा अनुभवच त्याचा अखेरचा मार्गदर्शक असतो. लिखित शब्दांची निःसंदेह मदत होते, परंतु त्यांचाही अर्थ लावावा लागतो आणि जेव्हा शब्दांचे विरोधी अर्थ लावले जातात तेव्हा अखेरचा निर्णय शोधकालाच घ्यावा लागत असतो. (हरि, २२-१२-१९३३, पृ. ३)

माझा विश्वास आहे की माझ्यात कोणतीच अंधश्रद्धा नाही. केवळ पुरातन म्हणून सत्य हे सत्य नसते. तसेच केवळ प्राचीन आहे म्हणूनही सत्याकडे संशयाने पाहता येऊ शकत नाही. जीवनाच्या अशा काही मूलभूत गोष्टी असतात ज्यांची जीवनात अंमलबजावणी करणे कठीण असते. परंतु तेवढ्याकरिता त्या सहजपणे सोडता येत नाहीत. (हरि, १४-३-१९३६, पृ. ३६)

## धार्मिक शिक्षण

भारताला जर आपल्या आध्यात्मिकतेचे दिवाळे काढायचे नसेल, तर त्याच्या तरुण पिढीला ऐहिक शिक्षणाएवढेच धार्मिक शिक्षण देणे महत्त्वाचे मानले पाहिजे. हे खरे आहे की धर्मग्रंथांचे ज्ञान आणि धर्माचे ज्ञान या गोष्टी परस्परांना पर्याय नाहीत. परंतु आमच्या मुलामुलींना धर्म देणे आम्हाला शक्य नसेल, तर त्या खालोखालची गोष्ट त्यांना देऊन आपण समाधान मानले पाहिजे. शाळेत हे शिक्षण मिळो वा न मिळो, मोठ्या मुलांनी इतर कामांप्रमाणेच या कामातही स्वावलंबी होणे शिकले पाहिजे. ज्याप्रमाणे त्यांची वादविवादाची वा आता कताईची मंडळे असतात, त्याचप्रमाणे त्यांनी धार्मिक शिक्षणाचे वर्गही स्वतःच चालवले पाहिजे. (यंग, २५-८-१९२७, पृ. २७२)

धार्मिक शिक्षणाची व्यवस्था करणे शासनाचे काम आहे असे मी समजत नाही. ही जबाबदारी ते पार पाडूही शकणार नाही. माझे मत आहे की, धार्मिक शिक्षण

देणे धार्मिक संस्थांचे काम आहे. धर्म आणि नीतिशास्त्र यांची भेसळ करू नका. माझा विश्वास आहे की नीतिशास्त्राची मूलभूत तत्त्वे ही सर्वांकरिता समान आहेत. त्यामुळे मूलभूत नैतिक तत्त्वे शिकवणे, ही निःसंशयपणे शासनाची जबाबदारी आहे. इथे धर्माचा माझा अर्थ मूलभूत नैतिक तत्त्वे असा नाही तर संप्रदायांतर्गत धर्म असा आहे. शासनाने मदत केलेल्या धर्मामुळे आणि शासकीय चर्चमुळे आपल्याला बराच त्रास सहन करावा लागला आहे. जो समाज वा गट आपल्या धर्मासाठी पूर्णपणे वा काही प्रमाणात शासकीय मदतीवर अवलंबून असतो, त्याचा धर्म शिल्लक राहावा अशी त्या समाजाच्या धर्माची पात्रताच नसते वा त्या समाजाचा कोणताही धर्मच नसतो असे म्हणणे उचित होईल.
(हरि, २३-३-१९४७, पृ. ७६)

धार्मिक संस्थांच्या अभ्यासक्रमात आपल्या धर्माशिवाय इतर धर्मांच्या सिद्धान्तांनाही स्थान देण्यात यावे. याकरिता आदरपूर्वक आणि उदार सहिष्णुतेच्या भावनेने जगातील वेगवेगळ्या महान धर्मांचे सिद्धान्त समजून घेण्याचा आणि त्यांची योग्यता ओळखण्याचा विद्यार्थ्यांनी अभ्यास करावा, म्हणून त्यांना शिकवले पाहिजे. (यंग, ६-१२-१९२८, पृ. ४०६)

## १४. ईश्वराचा अर्थ

### नियम निर्माता आणि नियम

जीवनाच्या जिवंत नियमाचा म्हणजेच नियम आणि नियम निर्माण करणा-याचा अर्थ असलेल्या कोणत्याही नावाने तुम्ही ईश्वराला हाक मारू शकता.
(हरि, १४-४-१९४६, पृ. ८०)

ईश्वर स्वतः नियमही आहे आणि नियम-निर्माताही आहे. त्यामुळे कुणीतरी ईश्वराला निर्माण करण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही आणि मग माणसासारख्या क्षुद्र प्राण्याची गोष्ट तरी काय? माणूस धरण बांधू शकतो, परंतु नदी निर्माण करू शकत नाही. तो खुर्ची तयार करू शकतो, परंतु लाकूड तयार करू शकत नाही. एवढे खरे की तो ईश्वराची कल्पना विविध रूपात करू शकतो. परंतु माणूस नदी वा लाकूड तयार करू शकत नसेल, तर मग ईश्वराची निर्मिती कसा करू शकेल? यामुळे विशुद्ध सत्य हे आहे की, ईश्वराने मनुष्याला निर्माण केले आहे. याविरोधी गोष्ट केवळ भ्रम आहे. तरीही ईश्वर कर्ताही नाही आणि कारणही नाही असे आपण म्हणू शकतो. यापैकी कोणत्याही विशेषणाने त्याचे वर्णन करता

येईल. (हरि, १४-४-१९४६, पृ. ८०)

### ईश्वर साकार नाही

मी ईश्वराला साकार समजत नाही. माझ्या दृष्टीने सत्यच ईश्वर आहे आणि एखादा लौकिक राजा व त्याचे नियम हे ज्याप्रमाणे वेगळे असतात, त्याप्रमाणे ईश्वरीय नियम आणि ईश्वर या वेगवेगळ्या गोष्टी नाहीत. ईश्वर एक विचार आहे, तो स्वतःच नियम आहे. यामुळे ईश्वर स्वतः नियमभंग करील अशी कल्पनाही करता येऊ शकत नाही. आमच्या कर्माचे नियमन करून तो स्वतः वेगळा होतो म्हणून असे होते असे नाही. आम्ही जेव्हा असे म्हणतो की, तो आमच्या कर्माचे नियमन करतो तेव्हा आपण केवळ मानवी भाषेचा प्रयोग करत असतो आणि ईश्वराला सीमित करून टाकतो. एरवीही ईश्वर आणि त्याचे नियम सर्वव्यापी आहेत आणि सर्वांचे नियंत्रकही आहेत.

त्यामुळे तो आमच्या सर्व प्रार्थना मान्य करतो वा त्या जशाच्या तशा स्वीकारतो असे नाही. परंतु तो आमच्या कर्मांचा नियंता आहे याबद्दल काहीही संशय नाही. आमचे इच्छास्वातंत्र्य हे लोकांनी भरलेल्या जहाजावरील डेकवर असलेल्या प्रवाश्यांपेक्षाही कमी आहे.

माझे स्वातंत्र्य हे जहाजावरील यात्रेकरूंपेक्षाही कमी आहे, हे मला माहीत असूनही मला त्याचे महत्त्व वाटते. माणसाला पर्यायातून निवड करण्याचे स्वातंत्र्य आहे आणि या स्वातंत्र्याचा तो हवा तसा उपयोग करू शकतो. यामुळे माणूस स्वतःच आपला भाग्यविधाता आहे, हा गीतेतील मुख्य पाठ मी चांगल्या रीतीने आत्मसात केला आहे. परंतु कर्माचे परिणाम माणसाच्या हाती नाहीत. ज्या क्षणी त्याला तसे वाटते त्याच क्षणी त्याला निराशेचे तोंड पाहावे लागते.
(हरि, २३-३-१९४०, पृ. ५५)

ही गोष्ट अगदी स्पष्ट झाली पाहिजे. आमच्याप्रमाणे ईश्वर देहधारी नाही. विश्वातील तो सर्वात मोठी शक्ती वा नियम आहे. त्यामुळे तो लहरीनुसार काम करत नाही आणि त्याच्या नियमात दुरुस्ती वा सुधारणा करण्यास कोणत्याही प्रकारचा वाव नाही. त्याची इच्छा निश्चित आणि अपरिवर्तनीय आहे. बाकी सर्व क्षणोक्षणी परिवर्तनीय असते. (हरि, २८-७-१९४६, पृ. २३३)

### त्याचे व्यक्तिमत्त्व

ईश्वराचे मला साक्षात दर्शन झालेले नाही. जर तसे दर्शन झाले असते तर,

तुमच्याशी बोलण्याची मला गरजच भासली नसती. माझ्या विचारांनीच काम झाले असते, वाणी वा कर्म अनावश्यक ठरले असते. परंतु ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल माझ्या मनात अढळ श्रद्धा आहे. विश्वातील कोट्यावधी लोक माझ्या या श्रद्धेत सहभागी आहेत. विद्वानाहून विद्वान व्यक्तीही या कोट्यावधी अशिक्षित लोकांना आपल्या श्रद्धेपासून ढळण्यास प्रवृत्त करू शकत नाहीत.
(हरि, ३-८-१९४७, पृ. २६२)

ईश्वर पूर्णपणे चांगला आहे. त्याच्यात वाईटपणाचा अंशही नाही. ईश्वराने माणसाला आपल्यासारखे बनवले होते. आमचे दुर्दैव हे आहे की, माणसाने ईश्वराला आपल्यासारखा बनवायचा प्रयत्न केला. यामुळेच माणूस अडचणींच्या सागरात सापडला आहे. ईश्वर सर्वात मोठा किमयागार आहे. त्याच्या उपस्थितीत लोखंड आणि त्याचा गंज यांचे शुद्ध सोन्यात परिवर्तन होते. अशा प्रकारे सर्व वाईटपणाचे परिवर्तन चांगुलपणात होऊन जाते.

ईश्वर जगत असतो, परंतु त्याचे जगणे आमच्यासारखे नसते. त्याने निर्माण केलेले जगत असतात, परंतु ते मरण्याकरिता. परंतु ईश्वरच जीवन आहे. त्यामुळे चांगुलपणा वा त्याचा उल्लेख करण्याकरिता लावण्यात आलेली विशेषणे हे त्याचे गुण नाहीत.

चांगुलपणा ईश्वर आहे. ईश्वराला सोडून चांगुलपणा वेगळा असेल, तर ती एक निर्जीव गोष्ट असेल आणि जोपर्यंत तिच्यामुळे काही स्वार्थ सिद्ध होतो, तोपर्यंतच ती राहते. इतर नैतिक गोष्टींनाही हीच गोष्ट लागू होते. जर या गोष्टी आमच्यामध्ये राहणार असतील, तर त्यांचा विचार आणि विकास ईश्वराच्या संदर्भातच व्हायला पाहिजे. आम्ही चांगले होण्याचा प्रयत्न करतो, कारण आपण ईश्वराजवळ पोहोचू इच्छितो व त्याला अनुभवू इच्छितो. विश्वातील सर्व शुष्क नीतिशास्त्राला धुलीकणाएवढीही किंमत नाही, कारण ईश्वराशिवाय ते निर्जीव असते. ते ईश्वराकडून येते तेव्हा ते सजीव असते. ते आमचा भाग बनते आणि आम्हाला समृद्ध करते.

उलटपक्षी चांगुलपणा विरहित ईश्वराची संकल्पना निर्जीव होते. आमच्या व्यर्थ कल्पनाशक्तीतून अशा संकल्पनेला आम्ही जन्म देत असतो.
(हरि, २४-८-१९४७, पृ. २८५)

'ईश्वराच्या प्रत्यक्ष दर्शनात' आणि 'सत्याच्या स्वरूपात दूरवरून होणा-या त्याच्या दर्शनात' फार मोठे अंतर आहे. माझ्या मते, वरील दोन विधानात विसंगती

नसून ते एकमेकांना अधिक स्पष्ट करतात. हिमालयाला आम्ही दूरवरून पाहतो आणि जेव्हा आपण त्याच्या शिखरावर असतो, तेव्हाही त्याला आपण प्रत्यक्ष पाहतो. दृष्टीच्या कक्षेत असेल तर लाखो लोक त्याला शेकडो मैल अंतरावरून पाहू शकतात. परंतु वर्षांचा प्रवास करून त्याच्या शिखरावर पोहोचू शकणारे मूठभर लोकच त्याचे प्रत्यक्ष दर्शन घेऊ शकतात. (हरि, २३-११-१९४७, पृ. ४३२)

ईश्वराचे अस्तित्व आहे आणि त्याचे सर्वात सुस्पष्ट नाव सत्य आहे याबाबतीत मला कधीच संशय वाटलेला नाही. (हरि, २५-१-१९४८, पृ. ५३५)

## ईश्वराची शक्ती

आरंभ झालेल्या प्रत्येक गोष्टीचा अंतही अपरिहार्य आहे. सूर्य, चंद्र, पृथ्वी हे सगळे एक ना एक दिवस नष्ट होणार आहेत. मग असे होण्याकरिता कदाचित असंख्य वर्षे लागू शकतील. केवळ ईश्वरच अमर आणि शाश्वत आहे. त्याचे वर्णन करण्याकरिता शब्द कुठून येतील? (हरि, १६-६-१९४६, पृ. १८३)

ईश्वराला बुद्धीच्या माध्यमातून मिळवता येऊ शकत नाही. बुद्धी आम्हाला केवळ एका निश्चित बिंदूपर्यंत नेऊ शकते, त्यापुढे नाही. ईश्वर तर श्रद्धा आणि श्रद्धेतून निर्माण झालेल्या ज्ञानाचा विषय आहे. माणूस आपल्यापेक्षा चांगल्या माणसांचा आधार घेऊ शकतो अथवा आपल्या स्वतःच्या अनुभवांवर समाधान मानू शकतो. संपूर्ण श्रद्धा असेल तर अनुभवाची गरज राहत नाही.
(हरि, ४-८-१९४६, पृ. २४९)

केवळ ईश्वरालाच निरपेक्ष सत्य माहीत आहे. त्यामुळेच मी अनेकदा सत्य हाच ईश्वर आहे असे म्हणत असतो. माणूस सीमित क्षमता असलेला प्राणी असल्यामुळे त्याला निरपेक्ष सत्याचे ज्ञान असू शकत नाही.
(हरि, २०-४-१९४७, पृ. ७०)

त्या महान शक्तीला मी अल्ला वा खुदा वा ईश्वर या नावांनी नाही तर सत्याच्या नावाने हाक मारतो. माझ्या मते, सत्य ईश्वर आहे आणि सत्य आमच्या सर्व योजनांच्या वर आहे. संपूर्ण सत्य हे केवळ त्या महान शक्तीच्या म्हणजे सत्याच्या हृदयामध्ये अवतीर्ण झाले आहे. लहानपणापासून मला शिकवण्यात आले होते की सत्य ही अगम्य गोष्ट आहे, तिच्याजवळ पोहोचता येणे कठीण आहे. ईश्वर अज्ञेय आहे हा विचार मला एका महान इंग्रज गृहस्थाने शिकवला होता. तो ज्ञेय आहे परंतु जिथवर आमची बुद्धी पोहोचू शकते तिथवरच, आमच्या

बुद्धीच्या सीमेपर्यंतच. (हरि, २०-४-१९४७, पृ. १०९)

ईश्वर सर्वशक्तिमान आहे. तो लोकांचे हृदयपरिवर्तन करू शकतो आणि त्यांच्यात शांतता प्रस्थापित करू शकतो. (हरि, ३-८-१९४७, पृ. २६२)

**त्याची शासनव्यवस्था**

आज, पश्चिमेकडे, लोक येशूचे नाव घेतात, परंतु खरे पाहता त्यांच्या जीवनाचे शासन येशूविरोधी आहे. त्याचप्रमाणे लोक इस्लामच्या नावाने बोलतात, परंतु वास्तवात ते सैतानाच्या मार्गाचे अनुसरण करत असतात. ही अतिशय शोचनीय परिस्थिती आहे.... लोक जर ईश्वराचे अनुसरण करतील तर जगात आज भ्रष्टाचार आणि नफेबाजी यांचे जे दर्शन होत आहे ते संपून जाईल. आज श्रीमंत आणखी श्रीमंत होत आहेत आणि गरीब आणखी गरीब. चोहोकडे उपासमारी, नंगेपणा आणि मृत्यू आपल्याला भेडसावत आहेत. या ईश्वराच्या राज्याच्या खुणा नाहीत. उलट सैतान, रावण वा येशूविरोधक यांच्या राज्याच्या या खुणा आहेत. केवळ ओठांनी ईश्वराचा जप करून ईश्वराच्या राज्याची स्थापना करण्याची अपेक्षा आपण करू शकत नाही. सैतानाऐवजी आम्ही ईश्वराचे अनुसरण केले पाहिजे. (हरि, २३-६-१९४६, पृ. १८६-७)

लोकांच्या हृदयात जेव्हा ईश्वराचे राज्य असेल तेव्हाच आपला क्रोध नाहीसा करण्याचे सामर्थ्य लोकांमध्ये येईल. (हरि, २०-४-१९४७, पृ. ११८)

आचरणासंबंधीचे सर्व वैश्विक नियम - ज्यांना आपण ईश्वरी आज्ञा म्हणतो - अतिशय साधे आणि समजायला सोपे आहेत आणि व्यक्तीची इच्छा असेल तर त्यानुसार आचरण करणेही सोपे आहे. मानवजातीला आलेल्या शैथिल्यामुळे ते आपल्याला कठीण वाटतात. मनुष्य एक प्रगतिशील प्राणी आहे. प्रकृतीत काहीही स्थिर नाही. केवळ ईश्वरच स्थिर आहे, कारण तो जसा काल होता तसाच आज आहे आणि तसाच पुढेही राहील. आणि तरीही तो गतिशील आहे. परंतु ईश्वराच्या गुणांची चिंता करण्याचे आपल्याला कारणच नाही. आपण केवळ एवढेच समजून घ्यायचे आहे की आपण गतिमान आहोत. त्यामुळे माझा दृढविश्वास आहे की, मानवजातीला जिवंत राहायचे असेल तर तिने अधिकाधिक सत्य आणि अहिंसा यांच्या प्रभावाखाली यायला पाहिजे. आचरणाच्या या दोन मूलभूत नियमांच्या अधीन राहूनच तुम्हाला आणि मला जिवंत राहिले पाहिजे. (हरि, ९-११-१९४७, पृ. ४०६)

जे मन ईश्वरावर केंद्रित नसेल ते भरकटत असते आणि त्याच्यात पूजेच्या मंदिराचे गुण राहत नाहीत. (हरि, ९-११-१९४७, पृ. ४०६)

### वाईटपणाची उत्पत्ती

जगात वाईटपणा का आहे याचे उत्तर देणे कठीण आहे. मी जे उत्तर देऊ शकतो ते एखाद्या खेडूत माणसाचे उत्तर म्हणता येईल. जिथे चांगुलपणा आहे तिथे वाईटपणाही असलाच पाहिजे. त्याचप्रमाणे जिथे प्रकाश असतो तिथे अंधारही असलाच पाहिजे. परंतु ही गोष्ट केवळ मानवी संबंधांच्या बाबतीतच बरोबर आहे. ईश्वरासमोर ना काही वाईट आहे आणि ना चांगले. आपण निर्धन ग्रामीण लोक ईश्वरीय विधानांची चर्चा केवळ मानवीय दृष्टीनेच करू शकतो, परंतु आमची भाषा ईश्वरी नाही.

वेदांताचे सांगणे आहे की हे जग माया आहे. हे समाधानही अपूर्ण मानवतेचे बोबडे बोल आहेत. यामुळेच मी सांगत असतो की, या विषयावर मला डोक्याला शीण द्यायचा नाही. मला जरी ईश्वराच्या अगदी अंतरंगात डोकावण्याची अनुमती मिळाली तरी मी तसे करण्याचा प्रयत्न करणार नाही. तिथे डोकावून मी करणार तरी काय? आमच्या आध्यात्मिक उन्नतीकरिता एवढे जाणून घेणे पुरेसे आहे की, ईश्वर चांगुलपणाला मदत करत असतो. तशीही ही एका अडाणी माणसाची समजूत आहे. (हरि, ७-९-१९३५, पृ. २३३)

जगात वाईटपणा का आहे याचे मी तार्किक दृष्टीने उत्तर देऊ शकत नाही. असे करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे आपल्याला ईश्वराच्या समकक्ष समजणे होईल. त्यामुळे नम्रतापूर्वक मी हे कबूल करतो की, वाईटपणा आहे आणि दीर्घकाळापासून ईश्वर दुःखी आणि धैर्यशील आहे असे मी मानतो कारण त्याने वाईटपणाला राहण्याची अनुमती दिलेली आहे. मला माहीत आहे की, ईश्वर वाईटपणापासून मुक्त आहे. तो वाईटपणाचा निर्माता आहे, परंतु वाईटपणा त्याला स्पर्श करू शकत नाही.

मला हेही माहीत आहे की, वाईटपणाशी संघर्ष करण्याकरिता मी माझे जीवन जरी पणाला लावले तरी मला कधीही ईश्वर काय आहे ते कळणार नाही. माझ्या साध्या आणि मर्यादित अनुभवामुळे माझी अशी खात्री पटली आहे. मी जेवढा निर्मळ होण्याचा प्रयत्न करतो, तेवढाच मी ईश्वराजवळ असल्याचे मला आढळते. आजच्याप्रमाणे माझी श्रद्धा केवळ ओबड-धोबड स्वरूपात न राहता, हिमालयाच्या

हिमशिखरांप्रमाणे अढळ आणि धवल व्हावी म्हणून मला आणखी किती प्रयास करावा लागेल? (यंग, ११-१०-१९२८, पृ. ३४१)

शास्त्रीयदृष्ट्या सांगायचे तर चांगले आणि वाईट या दोन्हीच्या मुळाशी ईश्वर आहे. तो जसा हत्या-याला खंजीर उपसण्याकरिता प्रेरित करतो, तसाच शल्यचिकित्सकाला आपली सुरी चालवण्याकरिताही प्रेरित करतो. परंतु मानवाच्या दृष्टीने चांगुलपणा आणि वाईटपणा वेगवेगळे आणि विसंगत आहेत, कारण ते काळोख आणि प्रकाशाचे, सैतान आणि ईश्वराचे प्रतीक आहेत.... (हरि, २०-२-१९३७, पृ. ९)

ईश्वर वाईटपणा चालू देतो असे म्हणणे कानाला बरे वाटत नाही. परंतु जर तो चांगुलपणासाठी जबाबदार असेल, तर वाईटपणाकरिताही जबाबदार आहे हे मान्य करावे लागेल. देवाने रावणाला अतुलनीय शक्तिप्रदर्शनाची संधी दिली नव्हती का? आपल्या गोंधळाचे मूळ कारण बहुधा हे आहे की, आपण देवाला नीट ओळखलेच नाही. ईश्वर काही एखादी व्यक्ती नाही. तो वर्णनातीत आहे. तो नियम-निर्माताही आहे, नियमही आहे आणि नियमांचा पालनकर्ताही आहे. इतक्या सर्व गुणांचा स्वामी असल्याचा दावा कोणताही माणूस करू शकत नाही आणि जर कोणी असेल तर त्याला शुद्ध हुकूमशहा म्हटले जाईल. हे सामर्थ्य त्याच्याच जवळ असू शकते ज्याला आपण ईश्वर म्हणून संबोधतो आणि ही गोष्ट कळली, तर वरील प्रश्नाचे (ईश्वर वाईटपणाला का चालू देतो?) उत्तर मिळेल. (हरि, २४-२-१९४६, पृ. २४)

एक वाक्प्रचार आहे की मनी वसे ते स्वप्नी दिसे. जर तुमचे मन चांगले असेल, तर सगळे जग तुम्हाला चांगले दिसेल. याउलट जर तुम्ही कोणाला वाईट समजत असाल तर तुमचे मन वाईट असण्याची शक्यता आहे....

आपण इतरांबद्दल वाईट विचार करायलाही नको आणि इतर लोक आपल्याबद्दल वाईट विचार करतात अशी शंकाही मनात बाळगायला नको. वाईट गोष्टींकडे लक्ष देणे हे श्रद्धेच्या अभावाचे सूचक असते.
(हरि, २८-४-१९४६, पृ. १११)

**चमत्कार**

माझा (चमत्कारांवर) विश्वास आहेही आणि नाहीही. ईश्वर चमत्कारांच्या माध्यमातून काम करत नाही. परंतु ईश्वरी इच्छा कधी कधी एकदम चमकत

असते. तेव्हा चमत्कार झाला असे माणसाला वाटते. आम्ही ईश्वराला ओळखत नाही, केवळ त्याच्या नियमांच्या कार्यपद्धतीवरून आम्ही त्याला ओळखतो. ईश्वर आणि त्याचे नियम एकच आहेत. त्याच्या नियमांबाहेर काहीही नाही. त्याच्या इच्छेशिवाय भूकंप आणि वादळही होत नाहीत - त्याच्या इच्छेशिवाय गवताचे एक पातेही उगवू शकत नाही. सैतानसुद्धा त्याच्या मौन संमतीमुळेच इथे आहे, स्वतःच्या इच्छेमुळे नाही. (हरि, ७-४-१९४६, पृ. ७५-६)

माणूस एका रात्रीत वाईटाचा चांगला होऊ शकत नाही. ईश्वर जादू करत नाही. तोसुद्धा आपल्या नियमांनी बांधलेला आहे. हे खरे आहे की, त्याचे कायदे लौकिक राज्याच्या कायद्यांपेक्षा वेगळे आहेत. राज्यांच्या कायद्यात उणिवा असू शकतात, परंतु ईश्वर चूक करू शकत नाही. ईश्वर जर आपल्या कायद्याचे उल्लंघन करील तर जगच नष्ट होऊन जाईल. (हरि, १९-५-१९४६, पृ. १३६)

इतिहासात अशा अनेक चमत्कारांची उदाहरणे मिळतात, जेव्हा क्षणार्धात संपूर्ण जनसमुदायाचा दृष्टिकोन बदलून गेला. बोअर युद्धच घ्या. याने इंग्रजी भाषेला 'माफेकिंग' हा शब्द दिला आहे. माफेकिंगच्या दिवशी लोक वेडे झाले होते. परंतु दोन वर्षांच्या आतच ब्रिटिश राष्ट्राचा कायापालट झाला. हेन्री कॅम्पबेल बॅनरमन प्रधानमंत्री झाले आणि युद्धामुळे झालेले सगळे लाभ सोडून देण्यात आले. नुकत्याच झालेल्या निवडणुकांमध्ये लेबर पार्टीचा झालेला विजय हे अजून एक उदाहरण आहे. आपली वक्तृत्वशैली आणि प्रतिभा यांच्यानंतरही चर्चिल, ज्यांचा एक एक शब्द जनता मंत्रमुग्ध होऊन ऐकायची, आता जनतेच्या गळ्यातील ताईत राहिलेले नाहीत. माझ्यासारख्या आस्तिकाची श्रद्धा जिवंत ठेवण्याकरिता ही सर्व उदाहरणे पुरेशी आहेत. जेव्हा सर्व ताकद संपून जाते तेव्हा केवळ ईश्वराची शक्ती शिल्लक राहते. मग तुम्ही त्याला ईश्वर म्हणा की निसर्ग म्हणा, की अजून काही. (हरि, १०-११-१९४६, पृ. ३८९)

**अवतार**

प्रत्येक देहधारी प्राणी ईश्वराचा अवतार आहे. परंतु साधारणपणे आपण प्रत्येक प्राण्याला अवतार समजत नाही. भावी पिढ्या हा सन्मान त्या व्यक्तीला देतील, जी व्यक्ती आपल्या जीवन काळात अतुलनीय धार्मिक राहिली असेल. मला यात काहीही गैर वाटत नाही. यामुळे ईश्वराचा मोठेपणा कमी होत नाही व सत्याला हानी पोहोचत नाही....

अवतारांवरील विश्वास हा माणसाच्या उच्च आकांक्षांचे प्रतीक आहे. जोपर्यंत माणूस ईश्वराच्या बरोबरीचा होत नाही, तोपर्यंत त्याला शांतता मिळू शकत नाही. या अवस्थेपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करणे, हीच सर्वोच्च आणि सार्थ आकांक्षा आहे. आणि हाच आत्मसाक्षात्कार आहे. हा आत्मसाक्षात्कारच गीतेचा आणि अन्य धर्मग्रंथांचा विषय आहे. (यंग, ६-८-१९३१, पृ. २०६)

यामुळेच प्राचीन काळातील पैगंबरांवर वा अवतारांवर श्रद्धा ठेवणे म्हणजे अंधश्रद्धा होऊ शकत नाही. उलट तसे करणे म्हणजे अंतरात्म्याचे आध्यात्मिक समाधान करणे होईल. (यंग, १४-४-१९२७, पृ. १२०)

## ईश्वरीय नियम

मानवी भाषा ईश्वरी मार्गाचे पूर्णपणे वर्णन करू शकत नाही. ईश्वरीय मार्ग अवर्णनीय आणि गूढ आहेत याची मला चांगली कल्पना आहे. परंतु त्याचे वर्णन करण्याकरीता माणसाजवळ पुरेसा अर्थ व्यक्त न करू शकणा-या भाषेशिवाय दुसरे कोणतेही माध्यम नाही. (ए, पृ. ३१७)

आपल्याला सर्व ईश्वरीय नियमांची माहिती नाही आणि ते कसे काम करतात, हे आपल्याला कळत नाही. या बाबतीत मोठ्यात मोठ्या वैज्ञानिकांचे आणि श्रेष्ठतम अध्यात्मवाद्यांचे ज्ञानही धुळीच्या एखाद्या कणाप्रमाणे आहे. जर ईश्वर माझ्या भौतिक वडिलांप्रमाणे नसेल तर तो त्यांच्यापेक्षा अनंतपटीने मोठा असेल. माझ्या जीवनातील लहानात लहान गोष्टीवरही त्याचा अधिकार आहे. ईश्वराच्या इच्छेशिवाय पानही हालू शकत नाही यावर माझा शब्दशः विश्वास आहे. माझा प्रत्येक श्वास त्याच्या मर्जीने चालतो.

ईश्वर आणि त्याचा नियम एक आहे. त्याचा नियम हाच ईश्वर आहे. त्याला लावलेले प्रत्येक विशेषण हे केवळ विशेषण नसते. तो स्वतःच विशेषण आहे. तो सत्य, प्रेम, नियम आणि अन्य अनंत गोष्टी आहे. माणूस आपल्या कल्पकतेने अशाच प्रकारची किती तरी विशेषणे लावू शकतो. (हरि,१६-२-१९३४, पृ.४)

निसर्गनियमात परिवर्तन होत नाही. ते अपरिवर्तनशील आहेत. त्यांचे उल्लंघन करता येत नाही, त्यांच्या मार्गात अडथळा आणता येऊ शकत नाही, त्यांच्या बाबतीत चमत्कार होऊ शकत नाही. परंतु आपण अपूर्ण माणसे आपले गुण त्याच्यावर लादतो व असीम ईश्वराला सीमित करतो. आपण ईश्वराचे अनुकरण करू शकतो, ईश्वर आमचे अनुकरण करत नाही. ईश्वराकरिता आपण काळाची

विभागणी करू नये. त्याच्याकरिता काळ अनंत आहे. आपल्याकरिता भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ आहे. आणि अनंत काळाच्या तुलनेत शंभर वर्षांचे मानवी आयुष्य कणमात्र आहे. (हरि, १७-४-१९४७, पृ. ८७)

## नैसर्गिक आपत्ती

बिहारच्या भूकंपासारखी संकटे मानवजातीने केलेल्या पापाची शिक्षा म्हणून येतात. या संपूर्ण जगाच्या - सुसंस्कृत आणि असंस्कृत - विश्वासात मीही सहभागी आहे, असा विश्वास जेव्हा अंतःकरणात निर्माण होतो तेव्हा लोक प्रार्थना करतात; पश्चात्ताप करतात आणि स्वतःला शुद्ध करतात....

ईश्वरीय हेतूची मला फार कमी माहिती आहे. अशा आपत्तींकरिता देवतांची वा निसर्गाची केवळ लहर कारणीभूत नसते. ज्याप्रमाणे ग्रह आपल्या गतीच्या नियमांचे शतप्रतिशत पालन करत गतिमान राहतात, त्याचप्रमाणे आपत्तीसुद्धा निश्चित नियमांचे पालन करत असतात. केवळ एवढेच की, आपल्याला त्या नियमांचे ज्ञान नाही आणि त्यामुळे आपण त्यांना संकटे वा आपत्ती म्हणतो. (हरि, २-२-१९३४, पृ. १)

आपला पार्थिव देह स्त्रियांच्या काचेच्या बांगड्यांपेक्षाही अधिक ठिसूळ आहे. बांगड्या जर तिजोरीत बंद केल्या आणि त्यांना कोणीही स्पर्श केला नाही तर त्या हजारो वर्षे टिकू शकतात. परंतु हा पार्थिव देह इतका क्षणभंगुर आहे की पापणी लवते न लवते तोच तो नाहीसा होऊ शकतो. त्यामुळे श्वास सुरू असेपर्यंत आपण लहान-मोठा हा भेद विसरला पाहिजे, आपली अंतःकरणे निर्मळ केली पाहिजेत आणि एखाद्या नैसर्गिक आपत्तीमुळे म्हणा अथवा सामान्य परिस्थितीत मृत्यू झाल्यानंतर आपल्या निर्मात्यासमोर उपस्थित होण्याकरिता म्हणा, आपण तयार राहिले पाहिजे. (हरि, २-२-१९३४, पृ. १)

प्रत्येक नैसर्गिक आपत्तीमागे कोणता ना कोणता दैवी हेतू नक्कीच असतो. आज ज्याप्रमाणे ग्रहणांसंबंधी पूर्वानुमान करता येते, त्याप्रमाणे कालांतराने कदाचित भूकंपांचेही पूर्वानुमान करता येऊ शकेल. माणसाच्या बुद्धीचा हा अजून एक विजय असेल. परंतु असे हजारो विजय आमच्या आत्म्याचे शुद्धीकरण करू शकत नाहीत आणि त्याशिवाय कशालाच काहीही अर्थ नाही.

ज्या लोकांना आत्मशुद्धीची गरज कळते त्यांना माझे सांगणे आहे की, त्यांनी अशा आपत्तींमागील ईश्वरी हेतू आपल्याला कळावा म्हणून माझ्यासोबत प्रार्थना

करावी, त्यामुळे आम्ही विनम्र व्हावे आणि अखेरची वेळ येईल तेव्हा ईश्वरासमोर उभे राहण्याची शक्ती आम्हाला मिळावी. त्याचबरोबर आपण आपल्या बरोबरीच्या लोकांचे दुःख वाटून घेण्याकरिता सदैव तयार राहिले पाहिजे. (हरि, ८-६-१९३५, पृ. १३२)

## ईश्वराची नावे

ईश्वराची हजार नावे आहेत वा असे म्हणू या की, तो अनाम आहे. आपल्याला जे नाव आवडेल त्या नावाने आपण त्याची प्रार्थना करू शकतो. कोणी त्याला राम म्हणतो, कोणी कृष्ण, इतर लोक त्याला रहीम वा गॉड म्हणतात. सर्व एकाच ईश्वराची पूजा आहे, परंतु सर्व प्रकारचा आहार प्रत्येकाला सारखाच आवडत नसतो; त्याप्रमाणेच सर्व नावे प्रत्येकाला गोड वाटत नसतात. प्रत्येक व्यक्ती आपल्या वातावरणाप्रमाणे नावाची निवड करते आणि ईश्वर अंतर्यामी, सर्वशक्तिमान आणि सर्वज्ञ असल्यामुळे तो आमच्या आतील भावना समजतो आणि आपल्या पात्रतेनुसार आम्हाला प्रत्युत्तर देतो.

यामुळे भक्ती अथवा प्रार्थना ओठांनी नाही, तर हृदयाने करावी लागते. यामुळे मूक अथवा तोतरा, अज्ञानी वा मूर्ख हे सर्व समान अधिकाराने भक्ती वा प्रार्थना करू शकतात. ज्यांच्या जिभेवर अमृत आणि मनात विष असते, त्यांची प्रार्थना कधीही स्वीकारली जात नाही. यामुळे ईश्वराची प्रार्थना करणा-याने आपले हृदय शुद्ध केले पाहिजे.

हनुमानाच्या केवळ ओठांवरच राम नव्हते, त्याच्या अंतःकरणातही रामाचा वास होता. देवाने हनुमानाला अपार शक्ती दिली. या शक्तीच्या बळावर हनुमानाने पर्वत उचलला आणि समुद्र ओलांडून तो लंकेत गेला. (यंग, २४-९-१९२५, पृ. ३३१)

ईश्वर जसा आहे असा माझा विश्वास आहे तसेच मी बोलतो.... माझा विश्वास आहे की, ईश्वर निर्माता आहे आणि तो निर्माण करतही नाही. वास्तवतेबद्दल अनेकत्ववादाचा सिद्धान्त मला मान्य असल्याचाच हा परिणाम आहे. जैन लोकांच्या व्यासपीठावरून ईश्वर सृष्टिकर्ता नाही हा सिद्धान्तही मी मान्य करतो आणि रामानुजांच्या व्यासपीठावरून ईश्वर सृष्टिकर्ता असल्याच्या सिद्धान्ताचाही मी पुरस्कार करतो. वस्तुतः आपण अचिंत्याचे चिंतन करत आहोत, अवर्णनीयाचे वर्णन करत आहोत, अज्ञाताला जाणण्याचा प्रयत्न करत आहोत. यामुळेच आमची भाषा अडखळते. कधी-कधी आपल्याला भाषेच्या अपूर्णतेचीही जाणीव होते आणि मग आपण बहुधा परस्परविरोधी गोष्टी बोलतो. याच कारणामुळे

वेदांमध्ये ब्रह्माचे वर्णन 'नेति नेति' असे केले आहे.
(यंग, २१-१-१९२६, पृ. २६७)

राम, रहमान, अहुरमज्द, गॉड वा कृष्ण ही नावे माझ्या समजुतीप्रमाणे या अदृश्य शक्तीला - जी शक्तींमध्ये सर्वांत मोठी आहे - देण्याचा एक प्रयत्न मात्र आहे. अपूर्ण असतानाही पूर्णतेच्या प्राप्तीकरिता निरंतर प्रयत्न करणे हा मानवी स्वभाव आहे. असे करताना ज्याप्रमाणे एखादे मूल उभे राहण्याचा प्रयत्न करू लागत असताना वारंवार पडते आणि शेवटी चालणे शिकते त्याचप्रमाणे तो कधी-कधी दिवास्वप्न पाहू लागतो. अफाट बुद्धिमान असूनही माणूस त्या असीम आणि अनंत ईश्वरासमोर निरागस मूल आहे. ही अतिशयोक्ती वाटू शकते, परंतु तसे नाही. माणूस ईश्वराचे वर्णन आपल्या तुच्छ भाषेतच करू शकेल ना!
(हरि, १८-८-१९४६, पृ. २६७)

## १५. रामनाम

**माझा रक्षक**

ईश्वराचा सर्वोच्च गुण आणि नाव 'सत्य' आहे हे जरी माझ्या विवेकाने आणि हृदयाने पुष्कळ दिवसांपूर्वीच मान्य केले असले, तरी मी सत्याला रामाच्या नावाने ओळखतो. माझ्या परीक्षेच्या अत्यंत कठीण प्रसंगीही याच नावाने माझे रक्षण केले आहे आणि आजही करत आहे. याचा संबंध बालपणाशी असू शकतो किंवा तुलसीदासांबद्दल असलेल्या माझ्या आकर्षणाशी.

परंतु एक गोष्ट पूर्णपणे खरी आहे आणि या ओळी लिहीत असताना माझ्यासमोर माझ्या बालपणीच्या आठवणी उभ्या राहतात. जेव्हा मी आमच्या घराजवळील रामाच्या मंदिरात नित्य दर्शनाला जात असे तेव्हा माझा राम तिथेच राहत होता. त्याने मला अनेक भीतींपासून आणि पापांपासून वाचवले. माझ्याकरिता ती अंधविश्वासाची गोष्ट नव्हती. शक्य आहे की त्या मंदिराचा पुजारी वाईट माणूस असेल. मला त्याच्याबद्दल काहीही माहीत नाही. शक्य आहे की त्या मंदिरात कुकृत्ये होत असतील. मला त्यांच्याबद्दल काहीही माहीत नाही. त्यामुळे माझ्यावर त्यांचा काहीही प्रभाव नाही. जी गोष्ट माझ्या बाबतीत खरी आहे, तीच करोडो लोकांकरिताही खरी आहे. (हरि, १८-३-१९३३, पृ. ६)

जेव्हा भीती वाटेल वा त्रास होत असेल तेव्हा रामनामाचा जप करावा, असे मी लहान असताना माझ्या दाईने मला शिकवले होते. वाढते ज्ञान आणि ढळत्या

वयातसुद्धा आजही ही गोष्ट माझ्या आयुष्याचा भाग बनलेली आहे. मी असेसुद्धा म्हणू शकतो की ओठांवर जरी नाही, तरी माझ्या हृदयात चोवीसही तास रामाचे नाव राहत असते. हे नाव माझे रक्षक आहे आणि मी नेहमी त्याचाच आधार घेतला आहे. जगातील धार्मिक साहित्यात 'तुलसीरामायण'चे प्रमुख स्थान आहे. मला महाभारतानेच काय पण वाल्मिकी रामायणानेही एवढे आकर्षित केले नाही. (हरि, १७-८-१९३४, पृ. २१३)

### सर्वोत्तम भक्ती

लहानपणापासून मी स्वतः तुलसीदासांचा भक्त राहिलो आहे. त्यामुळे मी नेहमीच ईश्वराची पूजा रामाच्या नावाने केली आहे. परंतु मला माहीत आहे की, ओंकारापासून सुरुवात करून सर्व प्रदेशांतील, देशांतील, आणि भाषांमधील ईश्वराच्या नामावलीचे पारायण केल्यानंतरही हाच परिणाम दिसेल. ईश्वर आणि त्याचा नियम एकच आहे. यामुळे त्याच्या नियमांचे पालन करणे, हीच त्याची सर्वोत्तम भक्ती आहे. (हरि, २४-३-१९४६, पृ. ५६)

### ईश्वर एक आहे

राम वा रामनाम केवळ हिंदुसाठी आहे, मुसलमान त्यात कसे सामील होऊ शकतात असे जेव्हा कोणी म्हणतो, तेव्हा मला हसू येते. मुसलमानांचा ईश्वर वेगळा आहे आणि हिंदू, पारसी वा ख्रिश्चन यांचा ईश्वर काय वेगळा आहे? नाही, सर्वशक्तिमान आणि सर्वव्यापी ईश्वर केवळ एकच आहे. बस, केवळ त्याची नावे अनेक आहेत आणि आम्ही त्याचे स्मरण त्याच नावाने करतो, जे नाव आपल्या सर्वाधिक परिचयाचे असते.

माझा राम, माझ्या प्रार्थनेचा राम हा अयोध्येचा ऐतिहासिक राम नाही. अयोध्यानरेश दशरथाचा पुत्र होता. माझा राम शाश्वत, अजात आणि अद्वितीय राम आहे. मला केवळ त्याचीच मदत दिसत असते व तशीच ती तुम्हालाही दिसेल. तो सर्वांचा एकच ईश्वर आहे. त्यामुळे मुसलमानांनी वा इतर कोणी त्याचे नाव घेण्याला का आक्षेप घ्यावा हे मला कळत नाही. परंतु रामनाम घेऊनच त्याला ओळखले पाहिजे असे काही या लोकांवर बंधन नाही. ते ध्वनिसाधर्म्यासाठी अल्ला वा खुदा असाही उच्चार करू शकतात. (हरि, २८-४-१९४६, पृ. १११)

माझ्याकरिता.... दशरथपुत्र, सीतापती, राम सर्वशक्तिमान तत्त्व आहे व त्याचे नाव हृदयात धारण केल्यामुळे सर्व मानसिक, नैतिक आणि भौतिक व्याधी दूर

होऊ शकतात. (हरि, २-६-१९४६, पृ. १५८)

## गुणकारी शक्ती

एक समयोचित प्रश्न असा आहे की जी व्यक्ती नियमितपणे रामाचे नाव घेते व पवित्र जीवन व्यतीत करते, ती व्यक्ती आजारी का पडते? निसर्गतः मनुष्य अपूर्ण आहे. विवेकशील मनुष्य परिपूर्णता प्राप्त करण्याकरिता प्रयत्न करतो, परंतु त्यात तो अपयशी होतो. जाणता अजाणता तो मार्गात अडखळतो. ईश्वराचा संपूर्ण नियम पवित्र जीवनात समाविष्ट आहे.

पहिली गोष्ट आहे आपल्या सीमा ओळखण्याची. हे स्पष्टपणे समजून घेतले पाहिजे की, जी व्यक्ती या सीमेचे उल्लंघन करते ती आजारी पडते. यामुळे आपल्या गरजांप्रमाणे समतोल आहार घेतला तर माणूस आजारापासून मुक्त होऊ शकतो. आपल्याकरिता योग्य आहार कोणता आहे हे माणसाला कसे कळेल? अशा अनेक कूट प्रश्नांची कल्पना करता येऊ शकते.

या सर्व गोष्टींचा अर्थ असा आहे की, प्रत्येकाने आपला आपला वैद्य स्वतःच बनले पाहिजे आणि आपल्या मर्यादा जाणून घेतल्या पाहिजेत. जो माणूस असे करील, तो नक्कीच १२५ वर्षे जगेल. (हरि, १९-५-१९४६, पृ. १४८)

रामनामामुळे गमावलेले इंद्रिय परत मिळण्यासारखे चमत्कार होत नाहीत. परंतु त्यामुळे याहीपेक्षा मोठे चमत्कार होऊ शकतात. रामनामामुळे एखादे इंद्रिय गमावल्यानंतरही आपण अवर्णनीय शांततेने जगू शकतो आणि जीवनाचा आनंद घेऊ शकतो व मृत्यू होत असताना काळाला दंश करण्यापासून व थडग्याला विजय साजरा करण्यापासून अडवू शकतो आणि एक ना एक दिवस प्रत्येकाचाच मृत्यू होणार असल्यामुळे त्याची चिंता करण्याचे कारणच काय?
(हरि, ७-४-१९४६, पृ. ६९)

निसर्गोपचाराकरिता कोणत्याही विद्यालयीन पात्रतेची वा विद्वत्तेची गरज नाही. साधेपणा विश्वात्मकतेचे सार आहे. लक्षावधी लोकांकरिता जे असते, त्याकरिता फार मोठ्या पांडित्याची गरज नसते. पांडित्य फार कमी लोक मिळवू शकतात आणि त्यामुळे त्याचा लाभ केवळ श्रीमंतांनाच होऊ शकतो.

परंतु भारत आपल्या सात लाख खेड्यांमध्ये राहतो. या हीनदीन, लहान लहान आणि हमरस्त्यापासून दूरवर असलेल्या खेड्यांमध्ये मोठ्या मुश्किलीने शेकड्यांनी लोक राहतात व काही ठिकाणी तर त्यांची संख्या पन्नास-साठच असते.

अशाच कोणत्या तरी गावात जाऊन राहण्याची माझी इच्छा आहे. खरा भारत, माझा भारत तिथेच आहे. तिथल्या सामान्य माणसांपर्यंत तुम्ही उच्च शिक्षित डॉक्टरांना आणि रुग्णालयांना पोहोचवू शकत नाही. त्यांच्या आशेचा आधार साधी प्राकृतिक चिकित्सा आणि रामनाम हाच असू शकतो.
(हरि, ७-४-१९४६, पृ. ६९)

## विचारांची शुचिता

केवळ तोंडाने रामनाम म्हणण्याचा उपचाराशी काहीही संबंध नाही. मित्र सांगतात त्याप्रमाणे व मला जर नीट कळले असेल तर श्रद्धाचिकित्सा ही अंधचिकित्सा आहे व त्यामुळे जिवंत ईश्वराच्या जिवंत नावाचा उपहास होतो. जिवंत ईश्वर केवळ कल्पना नाही. परंतु हे खरे आहे की त्याचे नाव हृदयापासून यायला पाहिजे.

जाणीवपूर्वक ईश्वरावर विश्वास आणि त्याच्या कायद्याचे ज्ञान यांमुळे कोणत्याही इतर मदतीशिवाय पूर्ण उपचार होऊ शकतो. तो नियम असा आहे की पूर्ण शरीर स्वास्थ्याकरिता परिपूर्ण मनाची गरज असते. मनाची परिपूर्णता हृदयाच्या परिपूर्णतेपासून येते - इथे हृदय या शब्दाचा अर्थ डॉक्टरच्या स्टेथॅस्कोपमधून ऐकू येत असलेले हृदय नाही तर ते हृदय आहे, जिथे ईश्वराचा वास आहे. असे म्हणतात की, हृदयात ईश्वराचा वास असला तर मनात कोणतेही वाईट विचार प्रवेश करूच शकत नाहीत.

विचारांची शुचिता असेल तर आजार येऊच शकत नाही. या स्थितीपर्यंत पोहोचणे कठीण आहे हे खरे असले तरी, हा नियम समजून घेणे हे स्वास्थ्याकडे टाकलेले पहिले पाऊल आहे. दुसरे पाऊल त्याप्रमाणे प्रयत्न करणे हे आहे. माणसाच्या जीवनातील या क्रांतिकारक बदलानंतर स्वाभाविकपणे माणसाने आतापर्यंत शोधलेल्या सर्व प्राकृतिक नियमांचे पालन सुरू होते. त्यांच्याशी खेळ करून माणूस शुद्ध हृदयाचा दावा करू शकत नाही.

हृदय निर्मळ झाले तर रामनामाची गरजच पडत नाही, हे निश्चितपणे सांगता येते. केवळ एवढीच गोष्ट आहे की, रामनामाशिवाय हृदय शुद्ध करण्याचे अन्य उपाय मला माहीत नाहीत. विश्वातील सर्व प्राचीन ऋषीमुनींनी याच उपायाचा अवलंब केला आहे. ते सर्व ईश्वराचे भक्त होते, अंधश्रद्ध वा धूर्त नव्हते.
(हरि, ९-६-१९४६, पृ. १७१)

आध्यात्मिक शक्ती माणसाच्या सेवेकरिता उपलब्ध असलेल्या अन्य

शक्तींसारखीच आहे. शारीरिक व्याधी दूर करण्याकरिता प्राचीन काळापासून कमीअधिक प्रमाणात या शक्तीचा उपयोग करण्यात आला आहे ही गोष्ट जरी बाजूला ठेवली, तरी आताही तिचा उपयोग शारीरिक व्याधी दूर करण्याकरिता होत असेल तर तसे न करणे चूक होईल. कारण, माणूस हा शरीर आणि आत्मा दोन्हीही आहे आणि दोघेही एकमेकांना प्रभावित करत असतात.

लक्षावधी लोकांना क्विनाईन मिळू शकते की नाही याचा विचार न करता जर तुम्ही क्विनाईन घेऊन तुमची मलेरियापासून सुटका करून घेऊ शकता तर मग लक्षावधी लोक आपल्या अज्ञानामुळे हा उपचार उपयोगात आणत नाहीत म्हणून तुमच्या आतच असलेला हा उपचार तुम्ही का नाकारावा?

अज्ञानामुळे म्हणा की हट्टीपणामुळे, लक्षावधी लोक जर स्वच्छ आणि नीटनेटके राहत नसतील तर तुम्हीही तसे राहणार नाही काय? मानवताप्रेमाच्या चुकीच्या कल्पनांमुळे तुम्ही जर घाणेरडे आणि आजारी राहाल, तर तुम्ही लक्षावधींची सेवा करण्याच्या संधीला मुकाल. (हरि, १-९-१९४६, पृ. २८६,८७)

रामनामाचा जप करणे आणि रावणाचे अनुसरण करणे ही गोष्ट निरुपयोगीच नाही तर अतिशय वाईटही आहे. तो केवळ दांभिकपणा होईल. माणूस स्वतःला वा जगाला फसवू शकेल, परंतु तो सर्वशक्तिमानाला फसवू शकत नाही. (हरि, २३-६-१९४६, पृ. १८६)

## १६. प्रार्थना : माझ्या आत्म्याचा आहार

मी श्रद्धा आणि प्रार्थना यांना वाहिलेला माणूस आहे असा माझा दावा आहे आणि माझे तुकडे तुकडे जरी करण्यात आले, तरी त्याला न नाकारण्याचे व तो आहेच असे ठासून सांगण्याचे सामर्थ्य ईश्वर मला देईल असा माझा विश्वास आहे. (यंग, ८-१२-१९२७, पृ. ४१३)

माझी कोणतीही कृती प्रार्थनेशिवाय होत नाही. माणूस स्खलनशील प्राणी आहे. आपण योग्य मार्गावर आहो असे तो कधीही म्हणू शकत नाही. आपल्या प्रार्थनेचे जे उत्तर आहे असे माणसाला वाटत असेल, तो कदाचित त्याच्या अहंकाराचा प्रतिध्वनीही असू शकेल. अस्खलनशील मार्गदर्शनाकरिता पाप करण्याची क्षमता नसलेले हृदय माणसाजवळ असले पाहिजे. मी असा दावा करू शकत नाही. धडपडणारा, प्रयत्न करणारा, चुकणारा, अपूर्ण असा माझा आत्मा आहे. (यंग, २५-९-१९२४, पृ. ३१३)

मला मारून टाकले तरी, मी राम आणि रहीम यांचा जप सोडणार नाही. माझ्याकरिता ही दोन्ही नावे एकाच ईश्वराची आहेत. ही नावे ओठांवर असताना मी आरामात मरू शकतो. (हरि, २०-४-१९४७, पृ. ११८)

## आपत्तीतून रक्षण

आपत्तीच्या प्रसंगांतून ईश्वराने मला नेहमीच वाचवले आहे. 'ईश्वराने मला वाचवले' या शब्दांचा माझ्यासाठी बराच खोल अर्थ आहे, हे मला माहीत आहे; तरीही मला वाटते की, या शब्दांचा संपूर्ण अर्थ आजही मला कळलेला नाही. सखोल अनुभवानेच या वाक्याचा अर्थ समजून घेण्याला मला मदत होईल.

परंतु माझ्या सगळ्या संकटांमध्ये - आध्यात्मिक संकटातून, वकील म्हणून काम करताना आलेल्या संकटातून, संस्थांचे संचालन करताना आलेल्या संकटातून आणि राजकारणातील संकटातून - मला नेहमी ईश्वरानेच वाचवले हे मी सांगू शकतो. जेव्हा सर्व आशा संपतात, 'जेव्हा मदत करणारे उपयोगी पडत नाहीत आणि आनंद नाहीसा होतो'; तेव्हा कोणत्या ना कोणत्या प्रकारे, कुठून तरी मदत येऊन पोहोचते असा अनुभव मला आला आहे.

प्रार्थनेनेच माझा उद्धार केला आहे. हिच्याशिवाय फार आधीच मी वेडा झालो असतो. माझ्या आत्मकथेतून तुम्हाला आढळेल की, खाजगी व सार्वजनिक जीवनात भरपूर प्रमाणात मला कटू अनुभव आले आहेत. त्यामुळे काही काळ मी हताशही झालो होतो. त्यांच्यापासून मला मुक्ती मिळू शकली, ती प्रार्थनेच्या बळावर.

मी सांगू शकतो की, ज्याप्रमाणे सत्य हा माझ्या जीवनाचा अविभाज्य भाग राहिला आहे त्याप्रमाणे प्रार्थना नव्हती. एक आवश्यकता म्हणून ती आली. त्या वेळी मी अशा काही अवस्थेत होतो की प्रार्थनेशिवाय मला प्रसन्न वाटू शकत नव्हते आणि जसजशी ईश्वरावरील माझी श्रद्धा वाढत गेली, तसतशी प्रार्थनेबद्दलची माझी उत्कंठा तीव्र होऊ लागली. तिच्याशिवाय जीवन नीरस आणि रिकामे वाटू लागले.

दक्षिण आफ्रिकेत ख्रिश्चनांच्या प्रार्थनेत मी सहभागी झालो होतो. परंतु ती प्रार्थना मला आकर्षू शकली नाही. त्यांच्याबरोबर मी प्रार्थनेत सहभागी होऊ शकलो नाही. त्यांनी ईश्वराकडे याचना केली परंतु मी त्यांना साथ देऊ शकलो नाही. मी एकदम वेगळा दिसत होतो. मी ईश्वर आणि प्रार्थना यांच्याबद्दलच्या

अविश्वासाने सुरुवात केली होती आणि अनेक वर्षांपर्यंत मला रितेपणा जाणवत नव्हता. परंतु तरीही मला वाटू लागले होते की, ज्याप्रमाणे शरीराकरिता जेवण आवश्यक आहे त्याचप्रमाणे आत्म्याकरिता प्रार्थनाही अपरिहार्य आहे. खरे सांगायचे तर शरीराकरिता काही वेळेस उपास करण्याची गरज पडत असल्यामुळे शरीराकरिता जेवणाची तेवढी गरज नाही जेवढी आत्म्याकरिता प्रार्थनेची. प्रार्थनेकरिता लंघनासारखी कोणतीच गोष्ट नसते....

राजकारणात अनेकदा माझ्यावर हताश होण्याची वेळ आली असतानाही माझी मनःशांती कधी ढळली नव्हती. वास्तवात लोकांना माझ्या शांततेबद्दल हेवा वाटतो. मी सांगेन की ही शांतता प्रार्थनेमुळे येते. मी काही विद्वान व्यक्ती नाही, परंतु मी प्रार्थना करणारा माणूस आहे. प्रार्थनेच्या स्वरूपाशी मला काही देणे घेणे नाही. या बाबतीत प्रत्येक माणूस स्वतःचा निर्णय घेत असतो. परंतु काही असे मार्ग आहेत ज्यांचे अनुसरण प्राचीन आचार्यांनी केले. त्यामुळे त्यांचे अनुसरण करणे निरपवाद आहे.

मी माझी वैयक्तिक गोष्ट सांगितली आहे. प्रत्येक माणसाने स्वतः प्रयत्न करावा आणि ज्याची तुलना इतर कशाशीच करता येऊ शकणार नाही असे काही दैनिक प्रार्थनेमुळे आपल्या जीवनात नवीन निर्माण होते की काय ते पाहावे. (यंग, २४-९-१९३१, पृ. २७४)

## ईश्वराचा प्रतिसाद

पवित्र कामामध्ये कधीही पराभव स्वीकारू नका आणि आपण स्वतःला पवित्र ठेवू याकरिता मनाचा पक्का निर्धार करा. जर असे कराल तर ईश्वराचा प्रतिसाद नक्कीच मिळेल. हं, जो अहंकारी आहे त्याची प्रार्थना तो कधीच ऐकत नाही; अशाच रीतीने जो त्याच्याबरोबर सौदा करतो त्याचीही प्रार्थना तो कधीच ऐकत नाही....

जर तुम्हाला त्याची मदत हवी असेल तर हातचे काहीही राखून न ठेवता त्याला शरण जा. तुमच्यासारख्या पतिताची मदत तो कसा करेल, अशी आशंका वा भीती वा किंतु मनात ठेवू नका. त्याला शरण गेलेल्या कोट्यवधींना त्याने मदत केली आहे. मग तो तुम्हाला टाकून देईल का? तो कधीच कोणालाही निराश करत नाही आणि तो तुमचीही प्रार्थना ऐकत आहे असे तुम्हाला आढळून येईल. पतिताहून पतित व्यक्तीची प्रार्थनाही तो ऐकतो. ही गोष्ट मी माझ्या स्वतःच्या अनुभवाने सांगतो आहे. मी शुद्धी प्रक्रियेतून गेलो आहे. आधी स्वर्गाच्या

साम्राज्याची याचना करा, मग सर्व काही मिळेल. (यंग, ४-४-१९२९, पृ. १११)

तो माझे ऐकत नाही असे मला कधीच आढळले नाही. जेव्हा क्षितिज पूर्णपणे काळोखाने भरलेले असते-तुरुंगातील सत्त्वपरीक्षेच्या दरम्यान, जेव्हा माझ्याकरिता सर्व काही सुरळीत नव्हते-तेव्हा तो अगदी माझ्याजवळ असलेला मला जाणवला. माझ्या जीवनातील असा एकही क्षण मला आठवत नाही की जेव्हा ईश्वराने माझी साथ सोडली. (हरि, २४-१२-१९३८, पृ. ३९५)

## प्रार्थनेचे स्वरूप

स्तुती, उपासना, प्रार्थना हे अंधविश्वास नाहीत. उलट आमचे खाणे-पिणे, उठणे-बसणे, चालणे-फिरणे या गोष्टी जितक्या वास्तविक आहेत, त्याहूनही या गोष्टी अधिक वास्तव आहेत, इतर सर्व अवास्तव आहे.

अशी उपासना केवळ वाणीविलास नसतो. तिचे मूळ तोंड नाही तर हृदय आहे. यामुळेच जर आम्ही हृदयाला इतके निर्मळ केले की त्यात प्रेमाशिवाय काहीही शिल्लक राहणार नाही, जर आमच्या तारा आम्ही त्याच्या सुराशी जुळवल्या; तर असा काही सूर निघेल जो पारलौकिक असेल.

प्रार्थनेकरिता वाणीची गरज नाही. कोणत्याही ऐंद्रिय प्रयत्नावर प्रार्थना अवलंबून नाही. हृदयातील विकार अचूक काढून फेकण्याचे साधन प्रार्थना आहे याबद्दल मला किंचितही संशय नाही. परंतु हा प्रसाद मिळण्याकरिता प्रार्थनेसोबत विनम्रतेचीही गरज असते. (ए, पृ. ५१-५२)

प्रार्थनेत केवळ शब्द असावे आणि हृदय नसावे यापेक्षा तर शब्द नसणे आणि हृदय असणे किती तरी उत्तम. (यंग, २३-१-१९३०, पृ. २५)

आपण मंदिरात धातू वा दगडाच्या मूर्तीची पूजा करण्याकरिता जात नाही तर त्या मूर्तीत ज्या ईश्वराचा वास आहे त्या ईश्वराची पूजा करण्याकरिता आपण जात असतो. मूर्ती तर आराधना करणा-याच्या भावनेप्रमाणे बनत असते. आराधना करणा-याने आरोपित केलेल्या शक्तीपेक्षा त्या मूर्तीची कोणतीही वेगळी शक्ती नसते. यामुळेच प्रार्थनेच्या वेळी मुलांसहित सर्वांनी पूर्णपणे मौन धारण केले पाहिजे. (हरि, २८-४-१९४६, पृ. ११२)

आपल्या आतील जिवंत ईश्वरावर आपला विश्वास नसेल तर खरी प्रार्थना होऊच शकत नाही. (यंग, २०-१२-१९२८, पृ. ४२०)

जीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रांत, ज्यात आपल्या राष्ट्राचे स्वातंत्र्य आणि त्याच्या आत्मसन्मानाचे रक्षण यांचा समावेश आहे, आत्मबलिदानाची उदात्त आणि

साहसपूर्ण कला शिकण्याचा पहिला आणि अंतिम पाठ प्रार्थना आहे. प्रार्थनेकरिता ईश्वरावर जिवंत श्रद्धा असणे अपरिहार्य आहे, हे मात्र निश्चित.
(हरि, १४-४-१९४६, पृ. ८०)

माणूस बहुधा पोपटाप्रमाणे देवाच्या नावाचा जप करत असतो आणि त्या प्रार्थनेचे फळ मिळावे अशी त्याची अपेक्षा असते. ख-या भक्ताच्या प्रार्थनेमुळे केवळ त्याचीच नव्हे तर इतरांचीही पोपटपंची बंद होईल, इतकी ती जिवंत असली पाहिजे. (हरि, ५-५-१९४६, पृ. ११३)

**प्रार्थनेची आवश्यकता**

ज्याप्रमाणे शरीराकरिता अन्न आवश्यक असते, त्याचप्रमाणे आत्म्याकरिता प्रार्थना आवश्यक असते. अन्नाशिवाय माणूस कदाचित किती तरी दिवस जगू शकेल - ज्याप्रमाणे मॅक्स्विनीने ७० दिवसांपर्यंत केले होते - परंतु ईश्वरावर श्रद्धा असणारा माणूस प्रार्थनेशिवाय एक क्षणभरही जगू शकणार नाही, जगूही नये.
(यंग, १५-१२-१९२७, पृ. ४२४)

मानसिक शैथिल्यामुळे म्हणा की वाईट सवयींमुळे म्हणा अनेक लोक असे आहेत ज्यांचा ईश्वरावर विश्वास आहे आणि तो न मागताही आपल्याला मदत करील असे त्यांना वाटते. मग त्याच्या नावाचा जप करण्याची गरज काय? हे खरे आहे की जर ईश्वर असेल तर तो आपल्या श्रद्धेशिवायही असेल. परंतु ईश्वरप्राप्ती केवळ विश्वासापेक्षा फार मोठी गोष्ट आहे. ती निरंतर अभ्यासानेच साध्य होऊ शकते. सर्व विज्ञानांनाही हीच गोष्ट लागू होते. मग विज्ञानांचेही विज्ञान असणा-यांकरिता ही गोष्ट का लागू होणार नाही? (हरि, २८-४-१९४६, पृ. १०९)

प्रार्थना सकाळची किल्ली आणि सायंकाळची कडी आहे.
(यंग, २३-१-१९३०, पृ.२५)

माणूस आहाराशिवाय सतत काही दिवस राहू शकेल परंतु प्रार्थनेशिवाय क्षणभरही राहू शकणार नाही असे जेव्हा मी म्हणतो तेव्हा मी प्रार्थनेच्या जादूचा ज्यांनी अनुभव घेतला आहे त्यांच्या आणि माझ्या अनुभवाच्या आधारावर बोलत असतो. प्रार्थनेशिवाय आंतरिक शांतता मिळू शकत नाही हे त्याचे कारण आहे.
(यंग, २३-१-१९३०, पृ. २५)

चोवीसही तास ईश्वराच्या उपस्थितीचा अनुभव येत राहील असा जर माणसाने अभ्यास केला तर त्याला प्रार्थनेकरिता वेगळा वेळ ठरवण्याची आवश्यकता नाही

हे मला मान्य आहे. परंतु असे करणे बहुतेक लोकांना शक्य नाही हे ही मला माहीत आहे. त्यांच्याकरिता दैनंदिन जीवनातील स्वार्थी भानगडीच पुष्कळ होतात. बाह्य जगापासून आपले मन काही मिनिटांकरिता का होईना, पूर्णपणे काढून घेण्याचा अभ्यास त्याकरिता अतिशय महत्त्वाचा आहे. ईश्वरासोबत झालेल्या मौन भावैक्यामुळे त्यांना या गडबडगोंधळातही अविचल शांततेचा अनुभव येईल. त्यामुळे क्रोधाला आवर घालून धैर्याने वागण्याची सवय लागेल.
(हरि, २८-४-१९४६, पृ.१०९)

जगातील कोणत्याही व्यक्तीकरिता प्रार्थनेला उशीर करू नये, असा सामान्यपणे नियम आहे. ईश्वराचा वेळ कधीच थांबत नसतो. अगदी सुरुवातीपासून त्याचे कालचक्र अविरत फिरत आहे. खरे सांगायचे तर त्याला वा त्याच्या वेळेला आदीच नाही.... ज्याचे घड्याळ कधीच थांबत नाही त्याची प्रार्थना करण्याची वेळ कोणताही माणूस कसा काय टाळू शकतो? (हरि, ५-५-१९४६, पृ. ११३)

इशोपनिषदाच्या पहिल्या श्लोकात, प्रार्थनेच्या सुरुवातीला ज्याची दररोज आपण उजळणी करतो त्या ईश्वराला सर्व काही अर्पण करा व आपल्या गरजेप्रमाणे त्याचा उपयोग करा, असे सांगण्यात आले आहे. यातील महत्त्वाची अट ही आहे की, जी गोष्ट दुस-याची आहे तिचा मोह करू नका. हे दोन सिद्धान्त हिंदू धर्माचे सार आहेत.

## प्रार्थनेचे सार

प्रातःप्रार्थनेच्या वेळी म्हणण्यात येणा-या दुस-या एका श्लोकात सांगण्यात आले आहे की 'मी भौतिक शक्तीची इच्छा करत नाही, मला स्वर्गात जाण्याचीही कामना नाही, एवढेच नाही तर निर्वाणप्राप्ती व्हावी अशी विनंतीही मी करत नाही. जे लोक दुःखात आहेत, त्यांचे दुःख दूर करण्याचे सामर्थ्य मला मिळावे एवढेच माझे मागणे आहे.' हे दुःख शारीरिक, मानसिक वा आध्यात्मिक असे कोणत्याही प्रकारचे असू शकेल. वासनांचे गुलाम झाल्यामुळे होणारे आध्यात्मिक दुःख अनेकदा शारीरिक दुःखापेक्षाही मोठे असते.

परंतु दुःख दूर करण्याकरिता ईश्वर स्वतः येत नाही. तो मानवाला माध्यम बनवून हे काम करत असतो. त्यामुळे इतर व्यक्तींचे दुःख दूर करण्याचे सामर्थ्य मिळावे म्हणून करण्यात आलेली प्रार्थना म्हणजे या कामाकरिता श्रम करण्याची इच्छा व तयारी.

प्रार्थना.... इतरांना वगळून विशिष्ट व्यक्ती वा गटांकरिताच नसते. ती आपल्या जातीपुरती वा समुदायापुरती मर्यादित नसते. ती सर्वसमावेशक असते. तिच्यात सर्व मानवतेचा समावेश असतो. यामुळे प्रार्थनेचे ध्येय स्वर्गाचे राज्य पृथ्वीवर आणणे हे असते. (हरि, २८-४-१९४६, पृ. १११)

ख-या ध्यानात भक्तीचा विषय सोडून इतर सर्व गोष्टींपासून मनाचे कान आणि डोळे बंद करण्यात येतात. त्यामुळे प्रार्थनेच्या वेळी डोळे मिटल्यामुळे लक्ष केंद्रित करण्याकरिता मदत होते. माणसाची ईश्वराबद्दलची संकल्पना स्वाभाविकपणे सीमित असते. त्यामुळे आपल्याला अधिकात अधिक भावेल अशा प्रकारे ईश्वराचा विचार केला पाहिजे. या बाबतीत अट एवढीच आहे की, अशा प्रकारचा विचार शुद्ध आणि उन्नतिशील असला पाहिजे. (हरि, १८-८-१९४६, पृ. २६५)

आपल्या अंतःकरणात ईश्वर आहे अशी ज्याची खात्री आहे तो त्याची प्रार्थना करू शकतो. ज्याच्यात अशी श्रद्धा नसेल त्याने प्रार्थना करण्याची गरज नाही. त्यामुळे ईश्वर नक्कीच दुखावणार नाही. परंतु मी माझ्या अनुभवाने सांगतो की, प्रार्थना न करणारी व्यक्ती नक्कीच काही तरी गमावत असते.

मग एखादा माणूस ईश्वराची पूजा व्यक्ती म्हणून करतो की शक्ती म्हणून करतो, यामुळे काय फरक पडतो? प्रत्येकजण आपल्याला मिळालेल्या प्रकाशाप्रमाणे योग्य तेच करत असतो. प्रार्थना करण्याची पूर्णपणे योग्य पद्धती कोणती हे कदाचित कुणालाही माहीत नाही वा नसेल. परंतु आदर्श हा नेहमी आदर्शच राहिला पाहिजे. सर्व शक्तींमध्ये सर्वात मोठी शक्ती ईश्वर आहे, याची मात्र प्रत्येकाने आठवण ठेवली पाहिजे. इतर सर्व शक्ती भौतिक आहेत. परंतु ईश्वर परम शक्ती वा चैतन्य आहे व त्यामुळे तो सर्वव्यापी व सर्वसमावेशक आहे आणि म्हणून तो मानवी ज्ञानाच्या पलीकडे आहे. (हरि, १८-८-१९४६, पृ. २६७)

### मौनाचे सामर्थ्य

मला अनेकदा असे जाणवले आहे की, सत्यशोधकाने मौनव्रत धारण केले पाहिजे. मौनाच्या सामर्थ्याच्या चमत्काराची मला कल्पना आहे. दक्षिण आफ्रिकेत ट्रॅपिस्ट लोकांच्या आश्रमात मी गेलो होतो. ते अतिशय सुंदर ठिकाण होते. तिथे राहणा-या बहुतेक लोकांनी मौनव्रत घेतलेले होते. त्यांच्या फादरला मी त्याचे कारण विचारले. त्यावेळी ते म्हणाले की याचे कारण स्पष्ट आहे : ‘आम्ही दुर्बल मानव प्राणी आहोत, अनेकदा आम्ही काय करतो याचीही आम्हाला कल्पना नसते.

आपल्या अंतःकरणाचा अस्पष्ट आवाज ऐकण्याची जर आपली इच्छा असेल, जो आमच्या आत सदैव बोलत असतो, तर आपण आपल्या वाणीवर अंकुश ठेवला पाहिजे. आम्ही सतत बोलत राहू तर अंतःकरणाचा आवाज ऐकू येणार नाही.' अतिशय मोलाच्या या पाठाचे मर्म मला कळले आहे. मौनाचे रहस्य मला माहीत आहे. (यंग, ६-८-१९२५, पृ. २७४-५)

अनुभवाने मला शिकवले आहे की, मौन हा सत्यव्रतीच्या आध्यात्मिक अनुशासनाचा एक भाग आहे. कळत नकळत अतिशयोक्ती करणे व सत्याला दाबणे वा त्याच्यात दुरुस्ती करणेही माणसाची दुर्बलता आहे. या दुबळेपणावर विजय मिळवण्याकरिता मौन आवश्यक असते. मितभाषी माणसाची भाषा क्वचितच विवेकहीन असते. तो तर आपला प्रत्येक शब्द मोजून मापून बोलत असतो. (ए. पृ. ४५)

शिवलेल्या ओठांचे मौन काही मौन नाही. माणसाने आपली जीभ जरी कापली तरी त्याला मौन म्हणता येणार नाही. खरा मौन धारण करणारा तो असतो, जो बोलण्याचे सामर्थ्य असूनही एक शब्दही निरर्थक बोलत नाही. (ए, पृ. ४५)

केवळ ओठ मिटून ठेवणे म्हणजे मौन नाही. आपली जीभ छाटूनही एखादा माणूस ही गोष्ट साध्य करू शकेल. परंतु ते मौन असणार नाही. बोलण्याची शक्ती असूनही जो बोलत नाही, एकही शब्द वायफळ बोलत नाही त्याने ख-या अर्थाने मौन पाळले असे म्हणता येईल. (हरि, २४-६-१९३३, पृ. ५)

आता माझ्याकरिता ही गोष्ट (मौन) शारीरिक आणि आध्यात्मिक दृष्टीने गरजेची झाली आहे. माझ्यावरील दडपण दूर करण्याकरिता मुळात ही गोष्ट सुरू करण्यात आली होती. त्यावेळी लेखनाकरिता मला वेळ पाहिजे होता. अशा प्रकारे काही काळ मी मौनाचा सराव करत होतो. मला त्याचे आध्यात्मिक मूल्य कळले. नंतर एकाएकी माझ्या मनात विचार आला की, ईश्वराशी संपर्क करण्याकरिता ह्या वेळेचा मला उपयोग करता येऊ शकतो आणि मौन हा माझा स्वभावच आहे, असे आता मला वाटते. (हरि, १०-१२-१९३८, पृ. २२३-४)

प्रार्थना ही ईश्वराच्या स्मरणाकरिता आणि अंतःकरणाच्या शुद्धीकरिता असते आणि मौनातही ती करता येते. (हरि, २०-४-१९४७, पृ. ११८)

माझ्या विश्वासाप्रमाणे मौन प्रार्थना अनेकदा बाह्य कृतीपेक्षाही प्रभावी असते. शुद्ध अंतःकरणाने केलेली प्रार्थना कधीही अनुत्तरित राहत नाही, या श्रद्धेने माझ्या असहाय अवस्थेत मी सतत प्रार्थना करत असतो. (यंग, २२-९-१९२७,पृ.३३१)

## प्रार्थनेची शक्ती

भीती आणि इतर वाईट सवयी यांच्यापासून मुक्त होण्याकरिता अंतःकरणापासून केलेली प्रार्थना हे माणसाजवळील अतिशय प्रभावशाली साधन आहे, हे माझी स्वतःची साक्ष देऊन मी निःसंशयपणे सांगू शकतो. (यंग, २०-१२-१९२८, पृ.४२०)

जोपर्यंत आपण स्वतःला शून्यवत करत नाही, तोपर्यंत आपण आपल्या वाईटपणावर मात करू शकत नाही. माणसाला खरी मुक्ती मिळण्याकरिता हे त्याचे सर्वोत्तम अभीष्ट असू शकते, मूल्य म्हणून ईश्वर माणसाकडून संपूर्ण शरणागती मागतो. अशा रीतीने माणूस जेव्हा स्वतःचे अस्तित्व मिटवतो, तेव्हा सर्व भूतमात्रांच्या सेवेसाठी तो सिद्ध असल्याचे त्याला आढळते. तो त्याच्या आनंदाचा आणि करमणुकीचा विषय होऊन जातो. तो नवा माणूस होतो, ईश्वरनिर्मित सृष्टीच्या सेवेत स्वतःला तना-मनाने वाहून घेण्यासाठी तो सदैव तयार असतो. (यंग, २०-१२-१९२८, पृ. ४२०)

माणसाच्या अंतःकरणात काळोखाची शक्ती आणि प्रकाशाची शक्ती यांचा सतत संघर्ष सुरू असतो आणि ज्याच्याजवळ प्रार्थनेचा नांगर नसेल त्याची नाव काळोखाच्या सागरात बुडाल्याशिवाय राहत नाही. प्रार्थनापरायण पुरुषाला मानसिक शांतताही लाभेल आणि जगाच्या व्यवहारातही तो शांतचित्त राहील. प्रार्थनारत हृदयाशिवाय जगाच्या व्यवहारात माणूस स्वतःही दुःखी होतो आणि सगळ्या जगालाही दुःखी करतो....

आमच्या दैनंदिन कामकाजात व्यवस्था, शांतता आणि आत्मसंयम टिकवण्याकरिता प्रार्थनाच एकमेव साधन आहे.... ज्या गोष्टीचे मूलभूत महत्त्व आहे, ती ध्यानात ठेवा. इतर गोष्टी मग आपोआप ठीक होतील. काटकोनाचा एक कोन चांगला करा, बाकीचे कोन आपोआप चांगले होतील.
(यंग, २३-१-१९३०, पृ. २६)

प्रार्थना हे काही एखाद्या म्हातारीचे मन रमवण्याचे साधन नाही. हिला नीट समजून घेतले आणि उपयोग केला, तर ती फार शक्तिशाली साधन असल्याचे आढळून येईल. (हरि, १४-४-१९४६, पृ. ८०)

मन जेव्हा ईश्वराच्या भावनेने परिपूर्ण होते, तेव्हा माणूस कुणाबद्दलही दुर्भावना वा घृणाभाव बाळगू शकत नाही व त्या प्रभावाने शत्रूसुद्धा आपले शत्रुत्व सोडून मित्र होतो. शत्रूंना मित्र करण्यात मी यशस्वी झालो आहे असा दावा मी करत नाही, परंतु मनात ईश्वरीय शांतीचा वास असेल तर सर्व घृणा नाहीशी होते,

असा अनेक बाबतीत माझा अनुभव आहे. अतिशय प्राचीन काळापासून अनेक उपदेशकांनी या गोष्टीचे समर्थन केले आहे. यात माझा काही मोठेपणा आहे असे मी म्हणत नाही. मला माहीत आहे की, हा केवळ ईश्वरी कृपेचाच परिणाम आहे. (हरि, २८-४-१९४६, पृ. १०९)

दुष्ट अंतःकरणाला सर्वशुचिकारी ईश्वराचा अनुभव येऊ शकत नाही. (हरि, १९-६-१९४६, पृ. २०९)

ईश्वर आमची प्रार्थना आमच्या पद्धतीने नाही तर स्वतःच्या पद्धतीने ऐकतो. आम्हा मानवांच्या पद्धतीपेक्षा त्याची पद्धती वेगळी आहे. यामुळेच तो अज्ञेय आहे. प्रार्थनेकरिता श्रद्धा आवश्यक आहे. कोणतीही प्रार्थना वाया जात नाही. इतर सर्व कृत्यांप्रमाणेच ती आहे. आम्हाला दिसो वा न दिसो तिचे फळ मिळाल्याशिवाय राहत नाही आणि अंतःकरणापासून केलेली प्रार्थना तथाकथित कृत्यांपेक्षा अधिक शक्तिशाली असते. (हरि, १९-६-१९४६, पृ. २१५)

## १७. माझा हिंदू धर्म अन्य धर्मीयांना वगळणारा नाही

### सर्वसमावेशक

माझ्या दृष्टीने हिंदू धर्म सर्व गरजा पूर्ण करतो. त्याच्या विशाल छायेत एक प्रकारचे संरक्षण मिळते. (स्पीरा, पृ. ३२९)

ज्या शब्दात माझ्या पत्नीबद्दलची भावना मी व्यक्त करू शकतो, त्याच शब्दात हिंदू धर्माबद्दलची भावनाही मी व्यक्त करू शकतो. ज्याप्रमाणे माझी पत्नी मला प्रेरित करू शकते, त्याप्रमाणे जगातील कोणतीही स्त्री मला प्रेरित करू शकत नाही. तिच्यात काही दोष नाहीत असे नाही, मला तिचे जितके दोष दिसतात त्यापेक्षाही अधिक दोष तिच्यात असू शकतील. परंतु तिच्यासोबत माझ्याशी अवर्णनीय असे भावबंध जुळलेले आहेत. हिंदू धर्मातील सर्व दोष आणि त्याच्या सीमांच्या पलीकडे त्याच्याशी माझा तसाच संबंध असल्याचे मला जाणवते. (यंग, ६-१०-१९२१, पृ. ३१८)

....हिंदू धर्म अन्य कुणालाही वगळणारा नाही. जगातील सर्व पैगंबरांच्या पूजेला यात स्थान आहे. मिशनरी धर्माच्या सामान्य अर्थाप्रमाणे हा मिशनरी धर्म नाही. याने अनेक जातींना आपल्यामध्ये सामावून घेतले आहे यात काही संशय नाही. परंतु हे सामावून घेणे एका विकासात्मक आणि सूक्ष्म प्रक्रियेप्रमाणे झाले आहे. हिंदू धर्म प्रत्येक व्यक्तीला आपल्या श्रद्धेप्रमाणे देवाची आराधना करण्यास

सांगतो. यामुळेच सर्व धर्मांबरोबर याचे सह-अस्तित्व आहे.
(यंग, ६-१०-१९२१, पृ. ३१८)

ख्रिश्चन वा अजून कोणता धर्म खरा आहे, असे मला कळताच त्याचा प्रचार करण्यापासून मला जगातील कोणतीही शक्ती अडवू शकणार नाही. जिथे भीती असते तिथे धर्म नसतो. कुराण वा बायबलचा मी जो अन्वयार्थ लावला आहे, त्यानुसार मला स्वतःला ख्रिश्चन वा मुसलमान म्हणवून घेता येत असेल तर, तसे म्हणवून घेण्यावर माझी कोणतीही आपत्ती असू नये. कारण तशा अवस्थेत हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन हे सर्व पर्यायी शब्द होऊन जातील. परलोकात ना हिंदू आहेत ना मुसलमान ना ख्रिश्चन अशी माझी भावना आहे. तिथे व्यक्तीचे मूल्यमापन नावाच्या वा धर्माच्या पट्ट्या पाहून करण्यात येत नाही, तर त्यांच्या कर्माच्या आधारावर करण्यात येते, मग त्यांचा धर्म कोणताही असो. आमच्या लौकिक जीवनात या नामपट्ट्या राहतीलच. त्यामुळेच जोपर्यंत या पट्ट्या माझा विकास अवरुद्ध करत नाहीत आणि कुठेही चांगली गोष्ट दिसली तर ती आत्मसात करण्यापासून या पट्ट्या मला अडवत नाहीत; तोपर्यंत पूर्वजांच्या नामपट्ट्या कायम राहू देणे मला उचित वाटते. (यंग, २-७-१९२६, पृ. ३०८)

मी सनातनी हिंदू आहे असे जरी मी म्हणवत असलो, तरी माझ्यात सनातन्यांचे म्हणून ओळखले जाणारे गुण दिसत नाहीत हे पाहून मित्रांचा गोंधळ उडतो, हे मला माहीत आहे. असे यामुळे होते की, मी कट्टर हिंदू असतानाही माझ्या धर्मात ख्रिश्चन, मुस्लीम, ज्यू या सर्व धर्मातील उपदेशांकरिता स्थान आहे आणि यामुळेच काही लोकांना माझे विचार ढिगा-याप्रमाणे वाटतात, तर काहींना मी सारसंकलन करणारा आहे असे वाटते. एखाद्याला सारसंकलक म्हणतात तेव्हा त्याचा अर्थ त्या माणसाचा कोणताच धर्म नाही, असा होत असतो. उलट माझा धर्म एक व्यापक धर्म आहे व तो ख्रिश्चनांचाच काय परंतु प्लायमाऊथ ब्रदर्स सारख्यांचाही विरोधी नाही. तसेच तो कट्टराहून कट्टर मुसलमानांचाही विरोध करत नाही. माझा धर्म शक्य तेवढ्या व्यापक सहिष्णुतेवर आधारित आहे. व्यक्तीच्या कट्टरपणामुळे तिला बरीवाईट म्हणण्याची माझी तयारी नाही, कारण मी कोणत्याही व्यक्तीला तिच्या स्वतःच्या दृष्टिकोनातून पाहण्याचा प्रयत्न करतो. माझा हा व्यापक धर्मच मला जिवंत ठेवतो. ही काहीशी गोंधळात टाकणारी परिस्थिती आहे, हे मला माहीत आहे, परंतु माझ्याकरिता नाही तर इतरांकरिता! (यंग, २२-१२-१९२७, पृ. ४२६)

हिंदू धर्माचे वैशिष्ट्य हे आहे की, तो सर्व भूतमात्रांना (केवळ मानवांनाच नाही तर सर्व सचेतन प्राण्यांना) एक समजतो. म्हणजे सर्व प्राणी एकाच वैश्विक स्रष्ट्याची सृष्टी आहेत. मग त्या स्रष्ट्याला अल्ला म्हणा की गॉड म्हणा की परमेश्वर म्हणा. (हरि, २६-१२-१९३६, पृ. ३६५)

माझे हिंदुत्व सांप्रदायिक नाही. त्यात इस्लाम, ख्रिश्चन, बौद्ध आणि झरतुष्ट्र धर्मातील उत्कृष्ट गोष्टींचाही समावेश होतो - सत्य माझा धर्म आहे आणि अहिंसा त्याच्या प्राप्तीचा एकमेव मार्ग आहे. तलवारीचा सिद्धान्त मी कायमचा ठोकरून लावला आहे. (हरि, ३०-४-१९३८, पृ. ९९)

## हिंदू धर्म आणि त्याची अहिंसा

ज्याप्रमाणे माझी पत्नी माझ्याकरिता जगातील सगळ्यात सुंदर स्त्री आहे, त्याचप्रमाणे अहिंसेचा संदेश देणारा हिंदू धर्म माझ्या मते जगातील सर्वात उत्कृष्ट धर्म आहे आणि इतर लोकही आपल्या धर्माबद्दल असाच विचार करू शकतात. (यंग, १९-१-१९२८, पृ. २२)

भारतीय संस्कृतीकरिता हिंदू धर्माने दिलेली सर्वात मोठी व वैशिष्ट्यपूर्ण देणगी अहिंसेचा सिद्धान्त आहे. तीन हजार वर्षांपेक्षा अधिक काळापासून या तत्त्वाने या देशाच्या इतिहासाला एक निश्चित वळण लावले आहे आणि अजूनही कोट्यवधी भारतीयांच्या जीवनाचा तो प्रेरणास्त्रोत राहिला आहे. अहिंसेचा सिद्धान्त हा विकसनशील सिद्धान्त आहे व त्याचा संदेश आजही क्रियान्वित होतो आहे. अहिंसेचा संदेश आमच्या लोकांमध्ये असा काही ठसला आहे की, भारतात सशस्त्र क्रांती होणे जवळपास अशक्य झाले आहे. इथे खोलवर रुजलेली अहिंसेची मुळे हे याचे कारण आहे. परंतु काही लोकांना वाटते की एक वंश म्हणून शारीरिक दृष्टीने आम्ही दुर्बल झालो आहोत म्हणून असे होते. परंतु असे समजणे चूक आहे. एखाद्याला गोळी मारण्याकरिता शारीरिक शक्तीची तेवढी गरज नसते, जेवढी राक्षसी प्रवृत्तीची. (हरि, २४-३-१९२९, पृ. ९५)

## गीता माझी माता

चांगल्या उद्दिष्टांच्या पूर्तीकरिता गीता हिंसेचा आदेश देते असे मला वाटत नाही. आमच्या हृदयात चालणा-या द्वंद्वाचे वर्णन गीतेत आहे. आपले कर्तव्य पार पाडत असताना माणसाने प्रसंगी आपल्या प्राणाचाही बळी देताना मागेपुढे पाहू नये, हे सांगण्याकरिता भगवान कृष्णाने एका ऐतिहासिक घटनेचा आधार घेतला आहे.

आपण मानव देहबंधनाने बांधलेलो असल्यामुळे आपण आपल्याशिवाय इतरांची कृत्ये नियंत्रित करू शकत नाही, त्यामुळे परिणामाची काळजी न करता कर्म करण्यावर गीतेत भर देण्यात आला आहे. प्रकाश आणि तिमिर यांच्यामागील शक्तीतील अंतर आणि त्यांच्यातील विसंगती गीता स्पष्ट करते.
(यंग,२५-८-१९२०,पृ.२)

ख्रिश्चन धर्मातील अनेक गोष्टींचा मी प्रशंसक असलो, तरीही सनातनी ख्रिश्चन धर्माशी मी एकरूप होऊ शकत नाही. हिंदू धर्म मला जो काही कळला आहे तेवढ्यामुळे माझ्या आत्म्याचे पूर्ण समाधान होते, माझ्या संपूर्ण अस्तित्वाला तो भारून टाकतो आणि भगवद्‌गीता व उपनिषदांमधून मला जे समाधान मिळते तेवढे समाधान मला 'सर्मन ऑफ द माऊंट'मधूनही मिळत नाही. असे काही नाही की त्यातील आदर्शांचे मला मोल वाटत नाही वा अशीही गोष्ट नाही की 'सर्मन ऑफ द माऊंट'मधील उपदेशांनी मला प्रभावित केलेले नाही. परंतु जेव्हा संशयपिशाच्च माझा पिच्छा सोडत नाही, जेव्हा नैराश्य अगदी माझ्या तोंडाशी येऊन भिडलेले असते, जेव्हा क्षितिजावर एकही प्रकाशकिरण दिसत नाही; तेव्हा मी भगवद्‌गीतेला शरण जातो आणि तिचा कोणता ना कोणता श्लोक मला दिलासा देऊन जातो आणि दुःखाच्या त्या घोर काळोखातही मला समाधान मिळू लागते. माझे जीवन किती तरी बाह्य शोकांतिकांनी भरलेले असूनही त्यांचा माझ्या मनावर कोणताच ठसा उमटू शकला नाही, याचे श्रेय मी भगवद्‌गीतेतील उपदेशाला देतो. (यंग, ६-८-१९२५, पृ. २७४)

माझ्या संदर्भात बोलयचे झाले तर, जेव्हा जेव्हा मी अडचणीत सापडतो, तेव्हा मी धावत गीतामातेला शरण जातो. आजपर्यंत असा एकही प्रसंग आला नाही, जेव्हा गीतेकडून माझे सांत्वन झाले नसेल. माझ्या दैनंदिन जीवनात मला गीतेचे जे आकलन झाले त्याचे स्वरूप जर लोकांना कळले तर आज लोकांना गीतेपासून जे समाधान मिळते, त्यापेक्षा किती तरी अधिक मदत गीतेकडून त्यांना होईल. (यंग, १३-११-१९३०, पृ. १)

आज गीता माझे बायबल वा कुराणच नाही, तर त्यापेक्षा किती तरी अधिक आहे - ती माझी आई आहे. मला जन्म देणा-या लौकिक आईला मी कधीच गमावून बसलो आहे. परंतु या शाश्वत मातेने तेव्हापासूनच माझ्याजवळ राहून माझ्या आईचा अभाव पूर्णपणे दूर केला आहे. ती कधीच बदलली नाही आणि तिने मला कधी निराशही केले नाही. जेव्हा मी अडचणीत वा संकटात असतो,

तेव्हा मी याच मातेच्या कुशीत जातो. (हरि, २४-८-१९३४, पृ. २२२)

**बुद्धाचा मार्ग**

पूर्ण विचारांती माझे मत झाले आहे की, बुद्धाच्या शिकवणुकीतील महत्त्वपूर्ण भाग हिंदू धर्माचा अनिवार्य भाग बनला आहे. हिंदू भारताकरिता आपले पाऊल परत फिरवणे आणि गौतम बुद्धाची शिकवण नाकारणे अशक्य आहे. प्रचंड बलिदान, महान त्याग आणि शुद्ध जीवन या गोष्टींमुळे गौतम बुद्धाने हिंदू धर्मावर कधीही न पुसला जाणारा असा ठसा उमटवला आहे. याकरिता हिंदू धर्म या महान उपदेशकाचा सदैव ऋणी राहील.... बौद्ध धर्माच्या आजच्या स्वरूपातील जो भाग हिंदू धर्माने आत्मसात केलेला नाही, तो बुद्धाच्या जीवनातील व त्याच्या शिकवणुकीतील आवश्यक भाग नाही.

माझे ठाम मत आहे की, बौद्धधर्म वा बुद्धाची शिकवण हे भारतातच सुफलित झाले व इतरत्र असे घडूच शकत नव्हते. कारण गौतम बुद्ध हा स्वतःच एक श्रेष्ठ हिंदू होता. हिंदू धर्मातील श्रेष्ठ तत्त्व त्याच्यात ठासून भरलेले होते आणि त्याने अशा काही नवीन शिकवणुकीला जन्म दिला, जी वेदांच्या तणकटामध्ये दबून गेलेली होती. त्याच्या महान हिंदू चेतनेने हिंदू धर्माच्या स्वर्णिम सत्याला वेदांच्या निरर्थक शब्दजंजाळातून मुक्त केले. त्याने वेदातील शब्दांना असा काही अर्थ दिला जो त्याच्या काळातील लोकांकरिता एकदम नवीन होता. बुद्धाला आपल्या शिकवणुकीकरिता भारताची भूमी अतिशय सुपीक वाटली. जिथे कुठे बुद्ध गेला, तिथे त्याच्या भोवती गोळा होणारे लोक अहिंदू नव्हते तर वैदिक ज्ञानाने परिपूर्ण हिंदू होते. परंतु बुद्धाचा उपदेश त्याच्या हृदयाप्रमाणेच सर्वव्यापक आणि सर्वसमावेशक होता. त्यामुळे त्याच्या मृत्यूनंतरही तो उपदेश जगभर पसरला. बुद्धाचा अनुयायी म्हणवण्याचा धोका पत्करूनही मी म्हणेन की बुद्धाचे यश हा हिंदू धर्माचा विजय आहे. बुद्धाने हिंदू धर्म कधीही नाकारला नाही. त्याने त्याचा आधार व्यापक बनवला. त्याने त्याला नवजीवन दिले आणि त्याची नवीन व्याख्या केली. परंतु.... मी नम्रपणाने सांगेन की बुद्धाच्या शिकवणुकीला कुठेही पूर्णपणे आत्मसात करता येऊ शकत नाही, मग श्रीलंका, म्यांमार, चीन वा तिबेट यांपैकी कोणताही देश असो.... (यंग, २४-११-१९२७, पृ. ३९२-३)

**विश्वाचे नैतिक शासन**

मी अनेकदा लोकांना असे म्हणताना पाहिले आहे आणि बौद्ध धर्माचे सार

सांगणा-या पुस्तकांमधून वाचलेही आहे की, बुद्धाचा ईश्वरावर विश्वास नव्हता. माझे नम्र मत आहे की, ही धारणा बुद्धाच्या उपदेशाचेच खंडन करणारी आहे.... हा भ्रम याकरिता निर्माण झाला आहे की बुद्धाने त्याच्या काळात देवाच्या नावावर चालणा-या निकृष्ट गोष्टींना नाकारले होते. ही गोष्ट पूर्णपणे उचितही होती. ईश्वर म्हणवली जाणारी शक्ती दुर्भावनेने प्रेरित होऊ शकते, आपल्या कृत्यांबद्दल पश्चात्ताप करू शकते, लौकिक राजांप्रमाणे प्रलोभन आणि लाचलुचपतींनी प्रभावित होऊ शकते, ईश्वराचे काही जवळचे लोकही असू शकतात, अशा ईश्वरविषयक कल्पनांना बुद्धाने निःसंशयपणे विरोध केला होता. ईश्वराला प्रसन्न करण्याकरिता पशूंना - जी त्याचीच सृष्टी होती - बळी देण्याच्या प्रथेला बुद्धाने प्राणपणाने विरोध केला होता. अशा रीतीने बुद्धाने ईश्वराला परत त्याच्या मूळ ठिकाणावर प्रतिष्ठित केले आणि काही काळ ईश्वराच्या सिंहासनावर जाऊन बसलेल्या अनधिका-याला हुसकावून लावले. विश्वाच्या नैतिक शासनाच्या शाश्वत आणि अपरिवर्तनीय अस्तित्वावर भर देत त्याने परत त्या ईश्वराची पुनःस्थापना केली. ईश्वर स्वतः नियम आहे असे तो निःसंकोचपणे म्हणाला.

ईश्वराचे नियम शाश्वत आणि अपरिवर्तनीय आहेत आणि त्यांना स्वतः ईश्वरापासून वेगळे करता येऊ शकत नाही. ईश्वराच्या परिपूर्णतेची ही अनिवार्य अट आहे. यामुळेच असा भ्रम निर्माण झाला की, बुद्धाचा ईश्वरावर विश्वास नव्हता आणि त्याचा केवळ नैतिक नियमांवर विश्वास होता. ईश्वराबद्दलच्या या भ्रांतीमुळेच 'निर्वाण'सारख्या महान शब्दाच्या अर्थाविषयी भ्रम निर्माण झाला. 'निर्वाण' म्हणजे पूर्णपणे लोप नक्कीच नाही. जे काही बुद्धाचे जीवनतत्त्व मला कळले, त्यानुसार आमच्या आत जे काही हीन आहे, पापमय आहे, भ्रष्ट आहे, विकृत आणि विकारशील आहे, त्यांचा संपूर्ण लोप म्हणजे 'निर्वाण'. 'निर्वाण' निस्तब्ध काळोखी स्मशानशांतता नाही. उलटपक्षी 'निर्वाण' म्हणजे आपल्या अस्तित्वाची जाणीव असलेल्या आणि ईश्वराच्या हृदयात स्थान मिळवलेल्या आत्म्याचे जिवंत समाधान आणि शांतता आहे....

ईश्वराची त्याच्या स्थानावर पुनःप्रतिष्ठा ही तर बुद्धाची मानवतेला महान देणगी आहेच, परंतु माझ्या नम्र मताप्रमाणे बुद्धाने मानवतेला दिलेली याहूनही महत्त्वाची देणगी म्हणजे निम्नतम प्राण्यांबद्दलही त्याने केलेली दृढ प्रेमाची स्थापना. (यंग, २४-११-१९२७, पृ. ३९३)

## पश्चिमेतील ख्रिश्चन धर्म

माझे निश्चित मत आहे कि, आजचा युरोप गॉड वा ख्रिश्चन धर्माच्या भावनेचे प्रतिनिधित्व करत नाही तर सैतानाच्या भावनेचे प्रतिनिधित्व करतो आणि सैतान आपल्या ओठांवर जेव्हा देवाचे नाव घेऊन येतो, तेव्हा तो सर्वाधिक यशस्वी होतो. युरोप आज केवळ नावाकरिता ख्रिश्चन आहे. वास्तवात तो संपत्तीच्या देवतेची म्हणजे मॅमनची पूजा करत आहे. 'स्वर्गाच्या साम्राज्यात श्रीमंताला प्रवेश करणे तेवढेच कठीण आहे, जेवढे सुईच्या छिद्रातून उंटाने बाहेर निघणे'. येशूने वस्तुतः असेच सांगितले होते. त्याचे तथाकथित अनुयायी आपल्या नैतिक उन्नतीचे मोजमाप आपल्या भौतिक उन्नतीने करत आहेत. (यंग, ८-९-१९२०, पृ.२-३)

पश्चिमेबद्दल ही एक फार विचित्र गोष्ट आहे की ती जरी ख्रिश्चन धर्माच्या अनुयायित्वाचा दावा करत असली तरी तिथे ना ख्रिश्चन धर्म आहे ना येशू. असे नसते तर तिथे युद्ध झाले नसते. मी तरी येशूच्या संदेशाचा हाच अर्थ घेतो. (हरि, १७-११-१९४६, पृ. ४०५)

ख्रिश्चन धर्म जेव्हा पश्चिमेत गेला तेव्हा त्याचे स्वरूप विकृत झाले, हे सांगताना मला दुःख होते. (हरि, २०-४-१९४७, पृ. ११६)

माझ्या ख्रिश्चन बांधवांना मी सांगत असतो की.... त्यांनी पाश्चिमात्त्यांनी लावलेल्या अर्थानुसार ख्रिश्चन धर्माचा अर्थ लावू नये. आम्हाला माहीत आहे की, तिथे पूर्वी कधीही जशी परस्परांशी भांडणे होत नसत, तशी भांडणे आज होत आहेत. अखेरीस येशू हा आशियायी होता व अरबी पद्धतीच्या लांब पोषाखात त्याला दाखविले जाते. तो विनयाची मूर्ती होता. मला आशा आहे की, भारतातील ख्रिश्चन आपल्या जीवनात बायबलमधील त्या येशूचे अनुसरण करतील जो सुळावर चढला होता, त्या येशूचे नाही ज्याची व्याख्या आपल्या रक्तरंजित बोटांनी पाश्चिमात्त्य करत आहेत. पश्चिमेची टीका करण्याची माझी इच्छा नाही. परंतु आशियातील येशूचे काही सन्माननीय अपवाद वगळता पश्चिमेकडे चुकीच्या पद्धतीने चित्रण करण्यात येत आहे, हे सांगणे मला भाग आहे.
(हरि, ७-९-१९४७, पृ. ३१५)

ख्रिश्चन धर्माच्या अप्रत्यक्ष प्रभावामुळे हिंदुधर्म अजून प्रखर आणि जिवंत झाला आहे.... परंतु ख्रिश्चन धर्माच्या भारतावरील प्रभावाचे आकलन आम्हाला आमच्यामध्ये राहणा-या सर्वसामान्य ख्रिश्चनांचा आमच्यावर जो प्रभाव पडतो, त्याद्वारे करावे लागेल. दुःखद अंतःकरणाने मला सांगावे लागते की, हा प्रभाव

अतिशय वाईट आहे. (यंग, ३१-७-१९२४,पृ.२५४)

### येशूचे व्यक्तिमत्व

मी सांगू इच्छितो की, ऐतिहासिक येशूत मला कधीच रस नव्हता. येशू नावाची व्यक्ती कधी जन्मालाच आलेली नव्हती व गॉस्पेलमधील आख्यान केवळ लेखकाची कविकल्पना आहे, असे जरी कोणी सिद्ध केले, तरीही मला कोणताच फरक पडणार नाही. कारण तेव्हाही 'सर्मन ऑफ द माऊंट' माझ्याकरिता तेवढेच प्रेरणादायी असेल. (यंग, ३१-१२-१९३१, पृ. ४२९)

केवळ येशूतच देवत्व होते, असे मी मान्य करू शकत नाही. येशूत तेवढेच देवत्व होते जेवढे कृष्ण, राम, महंमद, वा झरतुष्ट्र यांच्यात होते. अशाच रीतीने बायबलमधील वा कुराणमधील प्रत्येक शब्द देवत्वाने प्रेरित आहे असेही मी समजत नाही. या ग्रंथांचा समग्र विचार केला तर निश्चितच ते प्रेरणादायी असल्याचे आढळते. परंतु त्यांच्यातील वेगवेगळ्या गोष्टींचा वेगवेगळा विचार केला, तर अनेक गोष्टींमध्ये काहीही प्रेरणादायी असल्याचे मला आढळत नाही. बायबल माझ्याकरिता तसाच ग्रंथ आहे जसे गीता वा कुराण हे ग्रंथ.
(हरि, ६-३-१९३७, पृ. २५)

सांप्रदायिक अर्थाने ख्रिश्चन असल्याचा दावा मी करू शकत नाही. परंतु येशूच्या वेदनेच्या उदाहरणामुळे माझ्यात अहिंसेबद्दल अढळ श्रद्धा निर्माण होण्याकरिता मदत झाली. माझ्या सर्व लौकिक कार्यांचे नियमन अहिंसाच करत असते. (हरि, ७-१-१९३९, पृ. ४१७)

### माझ्याकरिता येशूचा अर्थ

माझ्याकरिता येशूचा.... काय अर्थ आहे? येशू मानव जातीच्या महान शिक्षकांमधील एक होता, असे मला वाटते. त्याचे अनुयायी त्याला ईश्वरापासून उत्पन्न (बिगॉटन) एकमात्र पुत्र मानतात. ही गोष्ट मान्य केल्यामुळे वा न केल्यामुळे माझ्या जीवनावर येशूचा जो प्रभाव आहे त्यात अंतर निर्माण होणार आहे का? त्यामुळे येशूच्या उपदेशापासून आणि सिद्धान्तांपासून मला वंचित करण्यात येईल का? मला तसे वाटत नाही. (मॉरि, ऑक्टोबर १९४१, पृ. ४०६-७)

माझे मत आहे की, बिगॉटन शब्दाचा संबंध आध्यात्मिक जन्माशी आहे. वेगळ्या शब्दांत सांगायचे तर मी लावलेला अर्थ असा आहे की, येशूचे स्वतःचे जीवनच त्याच्या ईश्वराच्या जवळिकीची किल्ली आहे; त्याने इतर कोणाहीपेक्षा

अधिक चांगल्या पद्धतीने ईश्वराची भावना आणि त्याची इच्छा व्यक्त केली आहे. या अर्थाने मी येशूला ईश्वराचा पुत्र म्हणून ओळखतो.
(मॉरि, ऑक्टोबर १९४१, पृ. ४०६-७)

माझा विश्वास आहे की जगातील विविध धर्मांच्या गुणांचे मूल्यमापन करणे अशक्य आहे आणि तसा प्रयत्न करणे अनावश्यक व हानिकारक आहे. परंतु माझ्या मते प्रत्येक धर्माची प्रेरक शक्ती एकच आहे : माणसाचे जीवन उन्नत करणे व त्याला ध्येय देण्याची कामना. येशूच्या जीवनात ती श्रेष्ठता व पारदर्शिता आहे व मी आधीच सुचवल्याप्रमाणे येशू केवळ ख्रिश्चन धर्माकरिताच नाही, तर सगळ्या जगासाठी, सर्व वंशांकरिता, सर्व लोकांकरिता आहे. मग ते कोणत्या ध्वजाखाली, नावाखाली वा सिद्धान्तानुसार काम करतात वा कोणत्या धर्माचे अनुसरण करतात वा पूर्वजांकडून मिळालेल्या ईश्वराची कशी आराधना करतात, याला फार कमी महत्त्व आहे. (मॉरि, ऑक्टोबर १९४१, पृ.४०६-७)

भारतात बरीच अंधश्रद्धा आणि अज्ञान आहे. परंतु आमच्या अंतःकरणात खोलवर ईश्वराची श्रद्धा आणि धर्माबद्दलची आस्था रुजलेली आहे.
(हरि, १७-११-१९४६, पृ. ४०५)

आज जर भारतात महंमद आला तर तो त्याच्या अनेक तथाकथित अनुयायांचा त्याग करील व ज्याप्रमाणे खरा ख्रिश्चन म्हणून येशू माझा स्वीकार करील, त्याचप्रमाणे खरा मुसलमान म्हणून महंमद माझा स्वीकार करील.
(हरि, १७-११-१९४६, पृ. ४०५)

'माणसाला आपण कशा प्रकारे परत ईश्वराजवळ वा येशू अथवा महंमद यांच्या शिकवणुकीजवळ नेऊ शकतो?' येशूने आपल्या एका अनुयायाला दिलेले उत्तरच मी यावेळी देईन : 'स्वर्गात असलेल्या माझ्या वडिलांच्या इच्छेप्रमाणे वागा, केवळ देवा, देवा असे म्हणू नका.' ही गोष्ट तुमच्याकरिता, माझ्याकरिता आणि सर्वांकरिता खरी आहे. आपली जर जिवंत ईश्वरावर श्रद्धा असेल तर आपल्याकरिता सर्व काही चांगले होईल. मला आशा आहे की, माझी ही आशा माझ्या अखेरच्या दिवसापर्यंत कायम राहील. अनेक अपयश आणि उणिवा यांच्यानंतरही, ज्यांची मला चांगलीच जाणीव आहे, माझी ईश्वरावरील श्रद्धा दिवसेंदिवस वाढतेच आहे. (हरि, १७-११-१९४६, पृ. ४०५)

असे जर झाले नसते तर मी माझ्यावर तोच उपचार केला असता, ज्याचा सल्ला मी असहाय्य आणि अब्रूरक्षणाची शक्यता नसलेल्या स्त्रियांना देतो. तो

म्हणजे आत्महत्येचा. (हरि, १७-११-१९४६, पृ. ४०५)

**इस्लाम शांततेचा धर्म आहे**

इस्लाम धर्माला मी ख्रिश्चन धर्म, बौद्ध धर्म आणि हिंदू धर्माप्रमाणेच शांततेचा धर्म मानतो. या धर्मांमध्ये शांततेला देण्यात आलेल्या प्राधान्याच्या प्रमाणात अंतर आहे हे खरे असले, तरी या सर्व धर्मांचा हेतू शांतताच आहे.
(यंग, २०-१-१९२७, पृ. २१)

भारताच्या संस्कृतीत इस्लामने घातलेली भर म्हणजे ईश्वर एकच आहे या तत्त्वावर निर्भेळ विश्वास आणि सामान्यपणे आपल्या धर्मातील लोकांच्या व्यवहारामध्ये रुजवलेली बंधुभावाची भावना. या दोन महत्त्वाच्या देणग्या आहेत असे माझे मत आहे. हिंदू धर्मामध्ये बंधुत्वाची भावना अतिशय जास्त तात्त्विक पातळीवर आलेली आहे. अशाच प्रकारे हिंदू धर्मात तात्त्विक दृष्टीने ईश्वर एक असला तरी इस्लामप्रमाणे व्यवहारात त्याकडे फारसे लक्ष देण्यात येत नाही.
(यंग, २१-३-१९२८, पृ. ९५)

**बलप्रयोग**

बलप्रयोग करून धर्मपरिवर्तन करावे असे कुराणात कुठेच म्हटलेले नाही. पवित्र ग्रंथात तर स्पष्ट भाषेत सांगण्यात आले आहे की 'धर्मात बळाला कोणतेच स्थान नाही'. पैगंबराचे संपूर्ण जीवन धर्मावर दबाव टाकण्याला मनाई करणारे आहे. माझ्या माहितीप्रमाणे कोणत्याही मुसलमानाने बळजबरीच्या धर्मपरिवर्तनाला उचित ठरवलेले नाही. धर्मप्रचारात भौतिक शक्तीचा आधार घेण्यात आला तर इस्लाम विश्वधर्म राहणार नाही. (यंग, २९-९-१९२१, पृ. ३०७)

मी माझे मत सांगितलेच आहे की, इस्लामचे अनुयायी तलवारीचा वापर मुक्त हस्ताने करत आहेत. परंतु कुराणाच्या शिकवणुकीमुळे असे घडत नाही. माझ्या मते, इस्लामचा जन्म ज्या वातावरणात झाला त्या वातावरणाचा हा परिणाम आहे. ख्रिश्चन धर्माचा इतिहास रक्तरंजित असण्याचे कारण येशूमध्ये काही दोष होता असे नसून, ज्या वातावरणात तो धर्म वाढला ते वातावरण त्या धर्मातील उदात्त शिकवण स्वीकारण्याकरिता तयार नव्हते हे आहे. (यंग, २०-१-१९२७, पृ. २१)

**कुराण**

एकापेक्षा अधिक वेळा मी कुराणाचे पारायण केले आहे. जगातील सर्व धर्मातील

चांगल्या गोष्टी आत्मसात करण्याकरिता माझा धर्म मला केवळ शिकवतच नाही, तर तसे करण्याची विनंती तो मला करतो. (हरि, २८-१०-१९३९, पृ. ३१७)

इस्लाम हा ईश्वर प्रेरित धर्म आहे, असा मला विश्वास वाटतो. त्यामुळे स्वाभाविकपणेच कुराण हा ईश्वर प्रेरित ग्रंथ ठरतो व महंमद हा संत ठरतो. (हरि, १३-७-१९४०, पृ. २०७)

मी या निष्कर्षावर पोहोचलो आहे की कुराणमधील शिकवण मुळात शांततेच्या बाजूची आहे. अहिंसा ही हिंसेपेक्षा चांगली असे कुराणामध्ये सांगितले आहे. हिंसेला केवळ गरजेपुरतीच परवानगी देण्यात आली आहे.
(हरि, ११-७-१९४०, पृ. १९३)

## १८. धर्म आणि राजकारण

### जीवन समग्र आहे

माझा दावा आहे की, मानवी मन वा मानव समाज सामाजिक, राजकीय आणि धार्मिक अशा वेगवेगळ्या कप्प्यांमध्ये विभागलेला नाही. प्रत्येकाची एकमेकांवर क्रिया-प्रतिक्रिया होत असते. (यंग, २-३-१९२२, पृ. १३१)

मानवी जीवन समग्र असल्यामुळे त्याच्या विविध भागांना, छेद देणारी रेषा काढता येत नाही - नीतिशास्त्र आणि राजकारणातही. जो व्यापारी फसवणूक करून संपत्ती जोडतो, तो असे समजत असेल की, काळ्या कमाईतून दानधर्म करून तो आपल्या पापातून मुक्त होऊ शकेल, तर तो स्वतःलाच धोका देत असतो. माणसाचे दैनंदिन जीवन आध्यात्मिक जीवनापासून कधीही वेगळे करता येऊ शकत नाही. दोघांच्याही परस्परांवर क्रिया-प्रतिक्रिया होत असतात.
(हरि, ३०-३-१९४७, पृ. ८५)

माझ्या आत बसलेल्या राजकारणी व्यक्तीने माझ्या एकाही निर्णयाला प्रभावित केलेले नाही. राजकारणाने आम्हाला सर्पाप्रमाणे विळखा घातलेला आहे आणि व्यक्तीने कितीही प्रयत्न केला तरी ती यापासून मुक्त होऊ शकत नाही, केवळ एवढ्याकरिता मी राजकारणात भाग घेतो. त्यामुळेच मी या सापाशी लढा देऊ इच्छितो. असा प्रयत्न मी जाणीवपूर्वक १८९४पासून आणि कळू लागल्यापासून अजाणतेपणी करतो आहे. चोहोकडे पसरलेल्या वा फोफावणा-या वादळात शांततापूर्ण जीवन जगण्याची इच्छा असल्यामुळे केवळ स्वार्थापोटी मी राजकारणात धर्माचा शिरकाव केला आणि मी माझ्या आणि माझ्या मित्रांच्या जीवनावर प्रयोग

करतो आहे. (यंग, १२-५-१९२०, पृ.२)

सत्याच्या वैश्विक आणि सर्वव्यापी भावनेचे साक्षात दर्शन घेण्याकरिता माणसाला क्षुद्रतम प्राण्यावरही आपल्यासारखेच प्रेम करता आले पाहिजे. ज्या व्यक्तीला यात यशस्वी होण्याची इच्छा असेल त्याला स्वतःला जीवनाच्या कोणत्याही क्षेत्राबाहेर ठेवता येऊ शकत नाही. याच कारणामुळे सत्याच्या माझ्या भक्तीने मला राजकारणाच्या क्षेत्रात आणून उभे केले. जे लोक म्हणतात की, धर्माचा राजकारणाशी काहीही संबंध नाही, त्यांना मी निःसंकोचपणे परंतु नम्रतापूर्वक सांगू इच्छितो की, त्यांना धर्माचा अर्थ कळत नाही. (ए, ३७०-१)

जोपर्यंत संपूर्ण मानवतेबरोबर माझे तादात्म्य होऊ शकत नाही, तोपर्यंत मी धार्मिक जीवन जगू शकत नाही आणि असे तोपर्यंत होऊ शकत नाही, जोपर्यंत मी राजकारणात भाग घेत नाही. आज माणसाचे संपूर्ण कार्यक्षेत्र समग्र आहे. तुम्ही त्याचे सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि शुद्ध धार्मिक असे परस्परांशी संबंध नसलेले भाग पाडू शकत नाही. मानवी कार्यक्षेत्राबाहेर असलेला कोणताही धर्म मला माहीत नाही. धर्मामुळे माणसाच्या सर्व कामांना नैतिक आधार मिळतो आणि धर्म नसेल तर माणूस नैतिक आधारापासून वंचित होईल. तशा परिस्थितीत जीवन 'निरर्थक आवाज आणि उन्माद' यांनी भरलेली एक व्यूहरचना होईल.
(हरि, २४-१२-१९३८, पृ. ३९३)

राजकारणाच्या क्षेत्रात मला नाइलाजाने उतरावे लागले. मला दिसून आले होते की, राजकारणाला स्पर्श केल्याशिवाय मला सामाजिक कार्य करता येऊ शकत नाही. मला वाटते की, सामाजिक आणि नैतिक प्रगती या अर्थाने राजकारणातील कामाकडे पाहिले पाहिजे. लोकशाहीत जीवनाचा कोणताही भाग राजकारणापासून वेगळा राहू शकत नाही. (हरि, ६-१०-१९४६, पृ. ३४१)

माझ्या दृष्टिकोनातून धर्माशिवाय राजकारण केवळ घाण आहे व ते संपूर्णपणे त्याज्य आहे. राजकारणाचा संबंध राष्ट्राशी असतो व ज्या गोष्टीचा संबंध राष्ट्रकल्याणाशी असतो तिचा संबंध धार्मिक प्रवृत्तीच्या म्हणजेच ईश्वर आणि सत्याचा शोध घेणा-याशी असलाच पाहिजे. माझ्या मते, ईश्वर आणि सत्य परस्परांचे पर्याय आहेत आणि कोणी जर मला पटवून दिले की, ईश्वर असत्याचा वा यातनांचा ईश्वर आहे, तर मी त्याची आराधना करणे बंद करून टाकेन. यामुळेच राजकारणातही आपल्याला स्वर्गाच्या साम्राज्याची स्थापना करायची आहे.
(यंग, १८-६-१९२५, पृ.२१४)

माझ्या जीवनात खोलवर रुजलेल्या गोष्टींपासून मी राजकारणाला दूर करू शकत नाही. माझे राजकारण भ्रष्ट नाही आणि ते सत्य आणि अहिंसेच्या अतूट बंधनाने बांधलेले आहे, हे याचे कारण आहे. (यंग, १-१०-१९३१, पृ. २८१)

धर्माशिवाय मी एक क्षणही राहू शकत नाही. माझे राजकारण धर्मातून व्युत्पन्न झालेले आहे, असे माझ्या मित्रांना वाटत असल्यामुळे अनेक राजकारणी मित्र माझ्यावर नाराज आहेत आणि त्यांचे म्हणणे बरोबरच आहे. माझे राजकारण आणि माझी इतर कामे धर्मातूनच निर्माण झाली आहेत.

धर्माचा अर्थ ईश्वराशी बांधिलकी आहे. म्हणजे तुमच्या प्रत्येक श्वासावर ईश्वराचा अधिकार असा धर्माचा अर्थ असल्यामुळे एक पाऊल पुढे टाकून मी असेही म्हणेन की, धार्मिक व्यक्तीचे प्रत्येक काम धर्मातून व्युत्पन्न झालेले असले पाहिजे. (हरि, २-३-१९३४, पृ. २३)

खरे पाहता, आपले प्रत्येक कार्य धर्माने ओतप्रोत भरलेले असले पाहिजे. या धर्माचा अर्थ संप्रदायवाद नाही. त्याचा अर्थ आहे विश्वाचे नैतिक शासन. तो दिसत नाही म्हणून तो अस्तित्वात नाही असे नाही. हा धर्म हिंदू धर्म, इस्लाम धर्म, ख्रिश्चन धर्म या सर्वांना व्यापणारा आहे. तो त्यांची जागा घेत नाही. तो त्यांच्यात सुसंवाद निर्माण करतो व त्यांना वास्तव रूप देतो.
(हरि, १०-२-१९४०, पृ. ४४५)

करोडो लोकांचे जीवन म्हणजे माझे राजकारण. माझे जीवनध्येय आणि ईश्वर यांना सोडल्याशिवाय मी त्यापासून मुक्त होऊ शकत नाही. या गोष्टीची बरीच शक्यता आहे की (१५ ऑगस्ट नंतर, जेव्हा भारत स्वतंत्र होईल) माझे राजकारण एक नवीन वळण घेईल. परंतु हे परिस्थितीवर अवलंबून आहे.
(हरि, १७-८-१९४७, पृ. २८१)

एका अर्थाने माझे हे म्हणणे अगदी बरोबर आहे की, माझ्या धर्मावर मी माझ्या देशापेक्षाही अधिक प्रेम करतो. यामुळेच मी आधी हिंदू आहे आणि नंतर राष्ट्रभक्त. यामुळे चांगल्यात चांगल्या राष्ट्रभक्तापेक्षा मी कमी प्रतीचा ठरत नाही. याचा अर्थ असा आहे की, माझ्या राष्ट्राचे हित आणि माझ्या धर्माचे हित या दोन्ही गोष्टी एकच आहेत. अशाच रीतीने जेव्हा मी म्हणतो की माझ्या मुक्तीला मी सर्वाधिक महत्त्व देतो म्हणजे भारताच्या मुक्तीपेक्षाही अधिक महत्त्व देतो, तेव्हा त्याचा अर्थ असा नसतो की माझ्या स्वतःच्या मुक्तीकरिता भारताच्या राजकीय वा अन्य प्रकारच्या मुक्तीचा मला बळी द्यावा लागेल. याचा अनिवार्य अर्थ हा आहे की,

या दोन्ही गोष्टी सहगामी आहेत. (यंग, २३-२-१९२२, पृ. १२३)

धर्म राष्ट्रीयत्वाची कसोटी नाही. उलट व्यक्ती आणि ईश्वर यांच्यामधील ती खाजगी बाब आहे. आमचा धर्म कोणताही असला, तरी राष्ट्रीयतेच्या अर्थाने आपण सर्व सर्वप्रथम भारतीय आहोत आणि सर्वात शेवटीही भारतीय आहोत. (हरि, २९-६-१९४७, पृ. २१५)

# १९. मंदिर आणि मूर्तिपूजा

## मूर्तिपूजेचे स्वरूप

मूर्तिपूजेवर माझा विश्वास नाही. माझ्यामध्ये मूर्ती श्रद्धा जागवत नाही. परंतु मला वाटते की, मूर्तिपूजा मानव स्वभावाचा एक भाग आहे. आपण प्रतिकांच्या मागे धावत असतो. इतर कोणत्याही ठिकाणापेक्षा चर्चमध्ये माणसाला अधिक शांततेचा अनुभव का येतो? मूर्तीमुळे आराधनेला मदत होते. कोणताही हिंदू मूर्तीला देव समजत नाही. मी मूर्तिपूजेला पाप समजत नाही. (यंग, ६-१०-१९२१, पृ. ३१८)

मूर्तिपूजक आणि मूर्तिभंजक या शब्दांचा खरा अर्थ घेतला तर मी दोन्हीही आहे. मूर्तिपूजेमागील भावनेचे मला महत्त्व वाटते. मानवजातीच्या उत्थानात तिने फार महत्त्वाची भूमिका बजावली आहे.... दगड वा सोन्याच्या लहानशा तुकड्याला देव मानून, त्याची आराधना करणारी मूर्तिपूजा स्थूल स्वरूपाची असते. परंतु आपल्या पद्धतीने केलेल्या देवतेच्या आराधनेशिवाय अन्य सर्व पद्धतींना निरर्थक समजणारी कट्टरपंथीय पद्धती ही सूक्ष्म स्वरूपातील मूर्तिपूजाच आहे. अशा सूक्ष्म स्वरूपाच्या मूर्तिपूजेचा मी विरोधक आहे. या अर्थाने मी मूर्तिभंजक आहे. (यंग, २८-८-१९२४, पृ. २८४)

मी मूर्तिपूजेचा समर्थकही आहे आणि तिचा विरोधकही आहे. जेव्हा प्रतिमापूजेचा -हास होऊन ती मूर्तिपूजेत परिवर्तित होते व तिच्यावर मिथ्या विश्वासाची व सिद्धान्ताची पुटे चढतात, तेव्हा फार मोठ्या सामाजिक कुप्रथेत तिचे रूपांतर होते. अशा वेळी तिचा विरोध करणे आवश्यक होते. दुसरीकडे आपल्या आदर्शांना एखाद्या स्थूल आकृतीत समाविष्ट झालेले पाहणे हा मानव स्वभाव आहे आणि भक्तीचे ते एक मूल्यवान साधनही आहे. अशा रीतीने जेव्हा एखाद्या पुस्तकाला पवित्र मानून कोणी त्याचा आदर करतो, तेव्हा ती प्रतिमापूजाच असते. जेव्हा आम्ही पावित्र्याच्या वा आदराच्या भावनेने मंदिरात वा मशिदीत जातो, तेव्हाही आपण एक प्रकारची मूर्तिपूजाच करत असतो. या सर्व गोष्टींमध्ये मला

कोणतीही हानी दिसत नाही. उलट माणसाच्या सीमांकडे पाहता यापेक्षा चांगली पद्धती त्याला क्वचितच सापडू शकेल. यामुळे वृक्षपूजेत काही मूलभूत वाईटपणा आहे, असे समजण्यापेक्षा मी त्या गोष्टीला करुणा आणि काव्यगत सौंदर्य यांनी युक्त अशी पद्धती मानतो. वनस्पतीपूजा ही संपूर्ण वनस्पती-जगताबद्दलच्या - जे वनस्पती-जगत आपल्या सुंदर रूपाने आणि आकाराने ईश्वराच्या वैभवाचे आणि मोठेपणाचे गुणगान करत असते - आदराची प्रतीक आहे. हे सर्व पूजा करणा-यांच्या अंतःकरणातील प्रवृत्तीवर अवलंबून असते.

(यंग, २६-९-१९२९, पृ. ३२०)

परंतु पूजा करणा-याने वृक्षांसमोर घेतलेल्या शपथा आणि केलेल्या प्रार्थनांपेक्षा ही गोष्ट अगदी वेगळी आहे. चर्चमध्ये, मशिदीत वा मंदिरात वा वृक्षांसमोर वा अशाच कोणत्याही ठिकाणी स्वार्थपूर्तीकरिता घेतलेल्या शपथा आणि करण्यात आलेल्या प्रार्थना यांना प्रोत्साहन देण्यात येऊ नये. प्रतिमापूजा आणि स्वार्थपूर्तीकरिता करण्यात आलेले निवेदन वा शपथा यांच्यात कोणताही कार्यकारण संबंध नाही. वैयक्तिक स्वार्थाकरिता करण्यात आलेली प्रार्थना वाईट गोष्ट आहे, मग ती मूर्तीसमोर करण्यात आलेली असो वा निराकार परमेश्वरासमोर.

परंतु यावरून असे कोणीही समजू नये की, मी व्यापक प्रमाणावरील वृक्षपूजेचे समर्थन करतो आहे. वृक्षपूजेला मी आराधनेचे महत्त्वपूर्ण साधन मानतो म्हणून मी वृक्षपूजेचे समर्थन करत नाही, तर ईश्वर या जगात विविध रूपात प्रकट होत असतो व त्याचे प्रत्येक रूप माझ्याकरिता स्वाभाविकपणेच वंदनीय आहे याकरिता मी वृक्षपूजेचे समर्थन करतो. (यंग, २६-९-१९२९, पृ. ३२०)

जोपर्यंत मूर्तिपूजेचा प्रश्न आहे तिला कोणत्या ना कोणत्या स्वरूपात स्वीकारल्याशिवाय तुमचे काम भागू शकत नाही. मशिदीला खुदाचे घर समजून तिच्या रक्षणाकरिता मुसलमान जिवावर का उदार होतात? ख्रिश्चन चर्चमध्ये का जातो आणि बायबल हातात घेऊन का शपथ घेतो? असे काही नाही की माझा या गोष्टींवर आक्षेप आहे. परंतु मशिदी आणि मकबरे यांच्या निर्मितीकरिता वारेमाप पैसा देणे ही मूर्तिपूजा नाही तर काय आहे? आणि रोमन कॅथॉलिक कुमारी मेरीसमोर गुडघे टेकवतात तेव्हा ते काय करतात?

अथवा दगडांनी बनवलेल्या वा कॅनव्हासवर काचांनी चिकटवलेल्या ख्रिश्चन संतांच्या वा अन्य काल्पनिक आकृत्यांना ते नमन करतात तेव्हा ते काय असते?

आम्ही सर्व असे करतो, तेव्हा आम्ही दगडांनी वा धातूंनी बनवलेल्या प्रतिमेची - मग त्या कितीही ओबडधोबड असो - पूजा करत नसतो तर त्यांच्या माध्यमातून ईश्वराची पूजा करत असतो. (हरि, १३-३-१९३७, पृ.३९)

## पूजेचे ठिकाण

मंदिरांच्या अस्तित्वाला मी पाप वा अंधश्रद्धा समजत नाही. सार्वजनिक पूजेचा कोणताही प्रकार आणि सार्वजनिक पूजेचे ठिकाण मानवी आवश्यकता आहे. मंदिरात मूर्ती असावी वा असू नये, हे आराधकाचा स्वभाव वा रुची यांवर अवलंबून असते. मूर्ती असलेल्या मंदिरांना वा रोमन कॅथॉलिकांच्या चर्चला मी अपरिहार्यपणे वाईट वा अंधविश्वासपूर्ण समजत नाही आणि मशिदींमध्ये वा प्रॉटेस्टंट लोकांच्या चर्चमध्ये मूर्ती नाही म्हणून तेवढ्या कारणाकरिता मी त्यांना चांगले वा अंधविश्वासापासून मुक्त असेही समजत नाही. क्रूस वा ग्रंथ यांच्यासारखी प्रतीकेही मूर्तिपूजेसारखी व त्यामुळे अंधविश्वासपूर्ण असल्याचे सहजपणे दाखवता येऊ शकते तर दुसरीकडे बालगोपाळ कृष्ण अथवा कुमारी मेरी यांच्या प्रतिमेची पूजा उदात्त आणि अंधविश्वासापासून मुक्त समजली जाऊ शकते. हे सर्व आराधकाच्या अंतःकरणाच्या प्रवृत्तीवर अवलंबून आहे. (यंग, ५-११-१९२५, पृ. ३७८)

माझ्या दृष्टिकोनातून पूजेचे ठिकाण केवळ विटा आणि दगड यांचा ढिगारा नसतो. ते वास्तवाची छाया असतात. नष्ट करण्यात आलेल्या प्रत्येक चर्च, मशीद आणि मंदिर यांच्या ठिकाणी शेकडो चर्च, मशिदी आणि मंदिर यांची उभारणी केली गेली आहे. (यंग, ४-११-१९२६, पृ. ३८६)

मला असा कोणताही धर्म किंवा पंथ माहित नाही, ज्याने आपल्या ईश्वराचे घर बनविले नाही - मग त्याला मंदिर म्हणा, मशीद म्हणा, चर्च म्हणा, सिनेगॉग म्हणा की अग्यारी म्हणा. असेही म्हणता येऊ शकत नाही की येशूसारख्या मोठ्या सुधारकाने मंदिर नष्ट केले असावे वा त्यांचा पूर्णपणे त्याग केला असावा. या सगळ्यांनी मंदिरांतील आणि त्याचबरोबर समाजातील भ्रष्टाचार दूर करण्याचा प्रयत्न केला.... अनेक वर्षांपासून मी मंदिरात जाणे बंद केले आहे. परंतु यामुळे मी पूर्वीपेक्षा अधिक चांगला माणूस बनलो आहे, असे मी समजत नाही. माझी आई जोपर्यंत मंदिरात जाऊ शकत होती, तोपर्यंत ती मंदिरात गेल्याशिवाय कधीही राहीली नाही. मी मंदिरात जात नसलो तरी शक्य आहे की तिची श्रद्धा माझ्यापेक्षा दृढ असावी. (हरि, ११-३-१९३३, पृ. ५)

मंदिर, मशीद वा चर्च.... या ईश्वराच्या विविध निवासस्थानात मी कोणताही भेद मानत नाही. ते श्रद्धेनुसार बनवण्यात आलेले आहेत. कोणत्या ना कोणत्या प्रकारे त्या अदृष्टापर्यंत पोहोचण्याच्या इच्छेची ही अभिव्यक्ती आहे.
(हरि, १८-३-१९३३, पृ. ६)

आपल्या आतील सजीव ईश्वराच्या उपस्थितीची जाणीव होण्याकरिता मंदिरात जाण्याची गरज नाही. (हरि, २९-६-१९४७, पृ. २०९)

दगडांच्या इमारतींपेक्षा आमचे शरीर वास्तवात मंदिर आहे. सामूहिक आराधनेचे सर्वोत्तम ठिकाण म्हणजे डोईवर छत म्हणून उघडे आकाश आणि खाली भूमातेचे अंगण. (हरि, ४-१-१९४८, पृ. ४९८)

## २०. अस्पृश्यतेचा शाप

मला पुनर्जन्माची इच्छा नाही. परंतु मला पुनर्जन्म मिळणारच असेल तर माझा जन्म अस्पृश्य म्हणून व्हावा. यामुळे त्यांच्या दुःखात आणि व्यथांमध्ये मी सहभागी होऊ शकेन आणि स्वतःची आणि त्यांची या दयनीय अवस्थेतून सुटका करण्याचा प्रयत्न करू शकेन. यामुळेच माझी प्रार्थना आहे की, जर माझा पुनर्जन्म झाला तर तो ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य वा शूद्र म्हणून न होता तो अतिशूद्र म्हणून व्हावा.
(यंग, ४-५-१९२१, पृ. १४४)

माझ्या पत्नीबरोबर बंधनात बांधला जाण्याच्या पुष्कळ आधीपासून मी अस्पृश्यता निर्मूलनाच्या कामाशी बांधलो गेलो होतो. आमच्या संयुक्त जीवनात दोनदा असे प्रसंग आले होते की जेव्हा मला अस्पृश्योद्धार व पत्नी यांतून एकाचीच निवड करणे भाग पडले होते व मी अस्पृश्योद्धाराचीच निवड केली असती. परंतु ते संकट टाळल्याबद्दल मी माझ्या पत्नीचा आभारी आहे. माझ्या आश्रमात, जो माझ्या कुटुंबासारखाच आहे, किती तरी अस्पृश्य राहतात आणि एक गोड, परंतु खोडकर मुलगी माझ्या स्वतःच्या मुलीप्रमाणेच तिथे राहते.
(यंग, ५-११-१९३१, पृ. ३४१)

लोकांच्या प्रेमामुळे माझ्या बालपणातच अस्पृश्यतेचा प्रश्न माझ्यासमोर उभा राहिला होता. माझी आई म्हणाली, 'या मुलाला स्पर्श करू नकोस, तो अस्पृश्य आहे.' 'का नाही?' मी परत प्रश्न केला आणि त्या दिवसापासून अस्पृश्यतेविरुद्धच्या माझ्या बंडाला सुरुवात झाली. (हरि,२४-१२-१९३८, पृ.३९३)

भारतातील एकपंचमांश लोकसंख्येला पराधीन ठेवण्याची आपण इच्छा ठेवली

आणि राष्ट्रीय संस्कृतीच्या फळांपासून जाणूनबुजून तिला वंचित ठेवले तर, स्वराज्याला काहीही अर्थ राहणार नाही.

या महान शुद्धी कार्यात आपल्याला ईश्वराची मदत हवी आहे, परंतु त्याने निर्माण केलेल्या सर्वाधिक पात्र प्राण्यांना मानवतेचे अधिकार मात्र आपण देऊ इच्छीत नाही. आपण स्वतः जर अमानवीय असू, तर इतरांच्या अमानवीय वर्तनापासून आम्हाला मुक्ती मिळावी अशी विनवणी आपण ईश्वराजवळ कशी काय करू शकतो? (यंग, २५-५-१९२१, पृ. १६५)

धर्माच्या नावावर माणसाचा छळ करत राहणे, ही गोष्ट धार्मिक कट्टरपणाशिवाय दुसरे काहीही नाही. (यंग, ११-३-१९२६, पृ. ९५)

हिंदू धर्माची सुधारणा आणि त्याच्या खऱ्या संरक्षणाकरिता स्पर्शा-स्पर्शाची भावना मिटवणे, सर्वात जास्त आवश्यक आहे. ....अस्पृश्यता मिटवणे.... ही आध्यात्मिक प्रक्रिया आहे. (यंग, ६-१-१९२७, पृ. २)

जर अस्पृश्यता जगली, तर हिंदू धर्म नष्ट झाला पाहिजे.
(हरि, २८-९-१९४७, पृ. ३४९)

मी तर इथपर्यंत म्हणेन की, अस्पृश्यता कायम राहण्यापेक्षा हिंदू धर्म नाहीसा होणे अधिक चांगले. (यंग, २६-११-१९३१, पृ. ३७२)

अस्पृश्यतेशी लढणे आणि त्या संघर्षाकरिता स्वतःला समर्पित करण्यामागील माझी आकांक्षा मानवजातीच्या संपूर्ण पुनरुद्धाराची आहे. शिंपल्यात चांदीचा भास व्हावा, तशाच प्रकारचे हे एखादे स्वप्नही असू शकेल. परंतु माझ्याकरिता माझी ही आकांक्षा अगदी योग्य आहे व त्यामुळे हे स्वप्न नाही. रोमा रोलॉच्या शब्दात 'विजय ध्येयाच्या प्राप्तीत नसतो, तर त्याकरिता केलेल्या सातत्याच्या प्रयत्नात असतो.' (हरि, २५-३-१९३३, पृ. ३)

## अस्पृश्यता आणि जाती

अस्पृश्यांमुळे जातिव्यवस्था नष्ट करणे तेवढेच चूक आहे जेवढे शरीरात झालेल्या एखाद्या घाणेरड्या वाढीमुळे शरीराला वा तणकटामुळे पिकाला नष्ट करणे. यामुळे जिला आपण अस्पृश्यता म्हणतो तिला पूर्णपणे नष्ट केले पाहिजे. संपूर्ण व्यवस्थेला वाचवावयाचे असेल, तर या अतिरेकाचा उच्छेद आवश्यक आहे. अस्पृश्यता जातिव्यवस्थेमुळे निर्माण झालेली नसून हिंदू धर्मातील श्रेष्ठकनिष्ठतेच्या भावनेतून निर्माण झाली आहे व ती हिंदू धर्माला नष्ट करत आहे. यामुळे

अस्पृश्यतेवरील आक्रमण म्हणजे त्या श्रेष्ठकनिष्ठतेच्या भावनेवरील आक्रमण आहे. ज्या क्षणी अस्पृश्यता नष्ट होईल, त्या क्षणी जातिव्यवस्था स्वतःच शुद्ध होईल. म्हणजेच माझ्या स्वप्नातील वर्णधर्माची स्थापना होईल - समाजाचे हे चार भाग परस्पर पूरक असतील, त्यात कोणीही लहान-मोठा नसेल आणि शरीराच्या प्रत्येक भागाला ज्याप्रमाणे समान महत्त्व असते, त्याप्रमाणे हिंदू धर्माची वर्णव्यवस्था होईल. (हरि, ११-२-१९३३, पृ. ३)

## वर्णाश्रम धर्म

वर्णाश्रम धर्म या जगातील माणसाच्या जीवनध्येयाची परिभाषा करतो. माणूस धनसंपत्ती गोळा करण्याकरिता आणि उपजीविका करण्याकरिता वारंवार देह धारण करत नाही. आपल्या निर्मात्याला ओळखण्याकरिता, आपल्या ऊर्जेचा एक-एक कण खर्च करण्याकरिता, तो देह धारण करत असतो. त्यामुळे आपल्या जीवनधारणेकरिता त्याने आपल्या पूर्वजांच्या व्यवसायांपर्यंत थांबले पाहिजे. हाच वर्णाश्रम धर्म आहे - ना यापेक्षा अधिक ना कमी. (यंग, २७-१०-१९२७, पृ. ३५७)

वाडवडिलांच्या व्यवसायावर आधारित वर्णव्यवस्थेवर माझा विश्वास आहे. वर्ण चार आहेत आणि चार वैश्विक व्यवसायांशी ते जुळलेले आहेत. ज्ञानदान, संरक्षण, शेती आणि व्यापार आणि शारीरिक श्रमाद्वारे सेवा करणे, हे ते चार व्यवसाय आहेत. हे चार व्यवसाय संपूर्ण मानवजातीत समान रूपात अस्तित्वात आहेत. परंतु हिंदू धर्माने यांना आपल्या अस्तित्वाचा नियम मानून यांच्याद्वारे सामाजिक संबंध आणि सामाजिक व्यवहार या गोष्टी नियंत्रित करण्याचा प्रयत्न केला. गुरुत्वाकर्षणाच्या नियमाच्या अस्तित्वाचे आम्हाला भान असो वा नसो, तो आम्हा सर्वांना प्रभावित करत असतो. परंतु ज्या वैज्ञानिकाला या नियमाची माहिती असते त्यांनी या नियमाचा उपयोग करून असे शोध लावले आहेत, जे पाहून आपल्याला नवल वाटेल. अशाच रीतीने हिंदू धर्माने लावलेला वर्ण नियमांचा शोध आणि त्याचा केलेला उपयोग पाहून सर्व जग आश्चर्यचकीत झाले. जेव्हा हिंदू धर्म सुस्त झालेला होता तेव्हा वर्णव्यवस्थेच्या दुरुपयोगाने अनेक जाती निर्माण झाल्या आणि आंतरजातीय विवाह व आंतरजातीय भोजन यांच्या संबंधात अनावश्यक प्रतिबंध लावण्यात आले. या प्रतिबंधांशी वर्णव्यवस्थेचे काहीही देणे-घेणे नाही. विभिन्न वर्णाचे लोक परस्परात विवाह करू शकतात आणि एकमेकांबरोबर बसून जेवण करू शकतात. हे प्रतिबंध शुद्धता आणि

स्वच्छतेकरिता आवश्यक असू शकतात, परंतु एखाद्या ब्राह्मण मुलाने शूद्र मुलीशी जरी लग्न केले, तरी त्यामुळे वर्णव्यवस्थेच्या नियमाचे कोणतेही उल्लंघन होत नाही. (यंग, ४-६-१९३१, पृ. १२९)

आज ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र हे केवळ नावापुरते आहेत. माझ्या मते, वर्णव्यवस्थेत पूर्णपणे गोंधळ माजलेला आहे आणि मला वाटते की, सर्व हिंदूंनी आता स्वतःला शूद्र म्हणावे. ब्राह्मणवादातील सत्य सिद्ध करण्याचा आणि वर्णधर्म पुनःस्थापित करण्याचा हाच एकमेव उपाय आहे.
(हरि, २५-३-१९३३, पृ. ३)

प्रत्येक व्यक्ती काही सहज प्रवृत्ती घेऊन जन्माला येत असते, असे मला वाटते. प्रत्येक व्यक्ती काही उणिवा घेऊनही जन्माला येत असते. या उणिवांचे सावधगिरीने निरीक्षण केल्यामुळेच वर्णनियमांचे प्रतिपादन करण्यात आले होते. यामुळे विशिष्ट प्रवृत्ती असलेल्या विशिष्ट लोकांकरिता विशिष्ट कार्यक्षेत्रांची योजना करण्यात आली. लोकांच्या स्वाभाविक उणिवा मान्य करूनही वर्णव्यवस्थेत लहानमोठा असा कोणताच भेद मानण्यात आला नव्हता. या नियमांमुळे प्रत्येक व्यक्तीला तिच्या परिश्रमाचे फळ मिळेल, याची ग्वाही देण्यात आली आणि दुसरीकडे आपल्या शेजा-यावर दडपण आणण्यापासून या नियमाने अडवले. या महान नियमाला विकृत करण्यात आले आहे आणि तो बदनाम झाला आहे. परंतु माझी खात्री आहे की, या नियमामागे दडलेला अर्थ पूर्णपणे समजून घेऊन त्याला लागू करण्यात येईल; तेव्हाच आदर्श सामाजिक व्यवस्था निर्माण होईल. (मॉरि, ऑक्टोबर १९३५, पृ. ४१३)

## आंतरजातीय विवाह आणि आंतरजातीय भोजन

जरी वर्णाश्रम धर्मात आंतरजातीय विवाह आणि आंतरजातीय भोजन यांच्यावर कोणतेच बंधन नाही, तरी त्या बाबतीत कोणतीही बळजबरी करता येऊ शकत नाही. माणसाने कुठे लग्न करावे आणि कुठे जेवावे याचा निर्णय घेण्याचे त्याला स्वातंत्र्य असावे. (हरि, १६-११-१९३५, पृ. ३१६)

## जाती

मी चार विभाजनांनाच मूलभूत, स्वाभाविक आणि आवश्यक समजतो. असंख्य उपजाती काही वेळेस सोयीच्या होतात, परंतु सामान्यपणे त्यांच्यामुळे अवरोध निर्माण होत असल्याचेच दिसून येते. त्यांचा विलय जितक्या लवकर होईल,

तितके चांगले. (यंग, ८-१२-१९२१०, पृ. ३)

आर्थिक दृष्टीने एके काळी जातींचे फार महत्त्व होते. त्यामुळे पैतृक कौशल्याचे रक्षण होत होते आणि स्पर्धा मर्यादित राहत होती. दारिद्र्य दूर करण्याचा हा सर्वोत्तम उपाय होता. हिच्यात व्यापारी संघाचे सर्व फायदे होते. हिच्यामुळे साहस अथवा आविष्काराला जरी संधी वा प्रोत्साहन मिळत नव्हते तरी असेही म्हणता येऊ शकते की, या गोष्टींच्या मार्गात जातींमुळे अडथळा निर्माण होत होता....

ऐतिहासिक दृष्टीने सांगायचे तर, जातिव्यवस्थेला भारताच्या प्रयोगशाळेत सामाजिक समायोजनाकरिता माणसाने केलेला प्रयोग असे म्हणता येईल. जर ही यशस्वी होऊ शकते असे आपण सिद्ध करू शकलो तर जगाचा कायापालट करण्याकरिता, निर्दयी स्पर्धा संपवण्याकरिता आणि धनलोलुपता व हावेमुळे उत्पन्न होणारे सामाजिक विघटन थांबण्याचे सर्वोत्तम साधन म्हणून हिच्याकडे पाहता येईल. (यंग, ५-१-१९३१, पृ. २)

## जाती आणि वर्ण

....अनेकदा मी सांगितले आहे की, जातींचा जो आधुनिक अर्थ आहे त्यावर माझा विश्वास नाही. जाती अनावश्यक आहेत व प्रगतीकरिता त्या बाधक आहेत. माणसातील विषमतेवरही माझा विश्वास नाही. आपण सगळे समान आहोत. परंतु समता आत्म्याची आहे, शरीराची नाही. त्यामुळे ही एक मानसिक स्थिती आहे. या भौतिक जगात फार मोठी विषमता असल्यामुळे आपण समतेचा विचार करून तिच्याकरिता प्रयत्न केला पाहिजे. स्पष्टपणे दिसणा-या बाह्य विषमतेतून आपल्याला समता निर्माण करायची आहे. एका व्यक्तीने दुस-या व्यक्तीपेक्षा स्वतःला मोठे समजणे हा ईश्वर आणि माणूस यांच्याविरुद्ध केलेला अपराध आहे. त्यामुळे लहानमोठा असा भेद करणा-या जाती वाईट आहेत.
(यंग, ४-६-१९३१, पृ. १२९)

जातिभेदाची मुळे आमच्यात इतक्या खोलवर पसरली आहेत की, त्यामुळे भारतातील मुसलमान, ख्रिश्चन आणि इतर धर्मावलंबीही प्रभावित झाले आहेत. तसे पाहिले तर जातींमुळे निर्माण होणारे अडथळे कमी अधिक प्रमाणात जगाच्या इतर भागातही आढळून येतात. याचा अर्थ हा आहे की, या विकृतीने संपूर्ण मानवजात पीडित आहे. ख-या अर्थाने धर्माची स्थापना करूनच ही व्यवस्था दूर

करता येईल. कोणत्याही धर्मग्रंथात अशा प्रकारच्या अडथळ्यांना वा भेदभावांना स्थान असल्याचे मला आढळले नाही.

धर्माच्या दृष्टिकोनातून सर्व माणसे समान आहेत. विद्या, बुद्धी वा धन या गोष्टी नसलेल्या व्यक्तींपेक्षा आपण श्रेष्ठ आहो, असा दावा कोणतीही व्यक्ती करू शकत नाही. ख-या धर्माच्या शक्तीमुळे आणि शिकवणूकीमुळे, एखादी व्यक्ती पवित्र झालेली असेल, तर आपला लाभ इतरांपर्यंत पोहोचवणे हे त्या व्यक्तीचे कर्तव्य असते. अशी परिस्थिती असल्यामुळे सध्याच्या अवनतावस्थेत आपण स्वेच्छेने अतिशूद्र बनावे, ही ख-या धर्माची मागणी आहे.

आपण स्वतःला संपत्तीचे मालक नाही तर विश्वस्त मानले पाहिजे व आपण केलेल्या सेवेच्या योग्य मोबदल्यापेक्षा अधिक न घेता, आपल्या उर्वरित संपत्तीचा उपयोग समाजसेवेकरिता केला पाहिजे. या व्यवस्थेत कोणी गरीबही नसेल आणि श्रीमंतही. सर्व धर्म समान मानले जातील. धर्म, जात वा आर्थिक तक्रारी यांच्यामुळे निर्माण होणारी सर्व भांडणे बंद होतील व त्यामुळे विश्वशांततेला ते धक्का लावणार नाहीत. (हिं, १९-९-१९४५)

# ५. अहिंसा

## २१. अहिंसेचा दिव्य संदेश

### मानव जातीचा नियम

मी द्रष्टा नाही. मी स्वतःला एक व्यावहारिक आदर्शवादी मानतो. अहिंसाधर्म केवळ ऋषीमुनींकरिताच नाही. ज्याप्रमाणे हिंसा पशूचा नियम आहे, त्याचप्रमाणे अहिंसा मानवाचा नियम आहे. पशूचा आत्मा सुप्तावस्थेत असतो व त्याला केवळ शारीरिक शक्तीचेच नियम कळतात. माणसाची प्रतिष्ठा एका उच्चतर नियमाचे - आत्मशक्तीच्या नियमाचे - पालन करण्याची अपेक्षा करते....

ज्या ऋषींनी हिंसेच्या वातावरणात अहिंसेचा शोध लावला, ते न्यूटनपेक्षाही अधिक प्रतिभाशाली होते. ते वेलिंग्टनपेक्षाही मोठे योद्धा होते. शस्त्राच्या प्रयोगाचे ज्ञान असल्यानंतरही त्यांनी त्यांची निरुपयोगिता ओळखली व तुमची मुक्ती हिंसेत नाही तर अहिंसेत आहे, असे त्यांनी जगाला सांगितले. (यंग, ११-८-१९२०, पृ.३)

### माझी अहिंसा

मला केवळ एकच मार्ग माहीत आहे - अहिंसेचा. हिंसेचा मार्ग माझ्या स्वभावा-विरुद्ध आहे. हिंसेचा पाठ शिकवणा-या शक्तींना मी वाढवू इच्छीत नाही.... माझी श्रद्धा मला आश्वस्त करते की, ईश्वर निराधारांचा आधार आहे आणि तो संकटात तेव्हाच मदत करतो, जेव्हा व्यक्ती स्वतःला त्याच्या दयेवर सोडून देते. या श्रद्धेमुळे मी अशी आशा करतो की, एक ना एक दिवस तो मला असा मार्ग दाखवील ज्यावर चालण्याचा आग्रह मी माझ्या देशवासीयांना करू शकेन.
(यंग, ११-१०-१९२८, पृ. ३४२)

आयुष्यभर मी एक 'जुगारी' राहिलो आहे. सत्याचा शोध घेण्याच्या माझ्या उत्साहात आणि अहिंसेवरील माझ्या श्रद्धेचे सतत अनुसरण करताना, मी निःसंकोचपणे मोठ्यात मोठी जोखीम पत्करली आहे. असे करताना माझ्याकडून कदाचित चुका झाल्या असतील, परंतु त्या चुका कोणत्याही देशातील मोठ्यात

मोठ्या वैज्ञानिकांकडून होणा-या चुकांसारख्याच आहेत.
(यंग, २०-२-१९३०, पृ. ६१)

माझ्या पत्नीला मी जेव्हा तिच्या इच्छेविरुद्ध वाकवण्याचा प्रयत्न केला, तेव्हा तिच्याकडून मी अहिंसेचा पाठ शिकलो. एकीकडे माझ्या इच्छेला कणखर विरोध आणि दुसरीकडे माझा मूर्खपणा मुकाट्याने सहन करत असताना, तिला होणा-या वेदना पाहून अखेरीस माझी मलाच लाज वाटली आणि माझ्या पत्नीवर शासन करण्याकरिताच मी जन्माला आलो आहे या मूर्खपणाच्या समजातून मी मुक्त झालो. अखेरीस अहिंसेच्या बाबतीत ती माझी शिक्षिका बनली.
(हरि, २४-१२-१९३८, पृ. ३९४)

माझ्या जीवनाचा मार्गदर्शक सिद्धान्त निष्क्रियता नसून अधिकात अधिक सक्रियता आहे. (हरि, २८-६-१९४२, पृ. २०१)

माझ्या व्यवहारात मी कोणत्या तरी वीरोचित आणि उल्लेखनीय अहिंसेचे प्रदर्शन केले आहे, असे समजून मी माझी पाठ थोपटायला नको आणि मित्रांचाही मी असा समज होऊ द्यायला नको. मी केवळ एवढाच दावा करू शकतो की, न थांबता मी त्या दिशेने माझी नाव अविरत वल्हवण्याचा प्रयत्न करतो आहे.
(हरि, ११-१-१९४८, पृ. ५०४)

### अहिंसेचे स्वरूप

(१) अहिंसा मानवजातीचा नियम आहे आणि तो पाशवी शक्तीपेक्षा किती तरी महान आणि श्रेष्ठ आहे.
(२) प्रेमाच्या ईश्वरावर ज्याची जिवंत श्रद्धा नाही, त्यांच्याकरिता हा नियम नाही.
(३) अहिंसा माणसाच्या स्वाभिमानाचे आणि आत्मसन्मानाचे पूर्णपणे रक्षण करते. परंतु ती जमीन-जुमला वा चलसंपत्ती यांच्या मालकीचे नेहमीच रक्षण करत नाही. एवढे मात्र खरे आहे की, सशस्त्र माणूस ठेवण्यापेक्षा अहिंसापालनाची सवय केल्यास संपत्तीचे रक्षणसुद्धा अधिक चांगले होते. अहिंसेचा स्वभावच असा आहे की, ती चुकीच्या मार्गाने कमावलेल्या फायद्याचे आणि अनैतिक कृत्यांचे रक्षण करण्याकरिता मदत करत नाही.
(४) अहिंसेच्या मार्गावर चालणा-या व्यक्तींनी आणि राष्ट्रांनी आपली प्रतिष्ठा सोडून बाकी सर्व गोष्टींचे बलिदान करण्याची (राष्ट्रांनी आपल्या अखेरच्या नागरिकांच्या बलिदानापर्यंत) तयारी ठेवली पाहिजे. अशा रीतीने इतर देशांवर

अधिकार स्थापित करण्याच्या प्रकाराचा म्हणजेच साम्राज्यवादाचा - जो आपल्या रक्षणाकरिता स्पष्टपणे शक्तीचा आधार घेत असतो-अहिंसेशी काहीही संबंध नाही.
(५) अहिंसा अशी शक्ती आहे, जी लहान मुले, तरुण, स्त्री-पुरुष वा प्रौढ व्यक्ती हे सर्व मिळवू शकतात. अट एवढीच आहे की, त्यांची प्रेमाच्या ईश्वरावर जिवंत श्रद्धा असली पाहिजे व संपूर्ण मानवजातीवर त्यांचे सारखेच प्रेम असले पाहिजे. अहिंसा जीवनाचा नियम आहे असे मान्य केल्यानंतर तिचा प्रभाव व्यक्तीच्या एखाद-दुस-या कृत्यावर पडायला नको, तर व्यक्तीचे संपूर्ण जीवन तिच्यामुळे प्रभावित झाले पाहिजे.
(६) अहिंसेचा नियम व्यक्तींकरिता योग्य आहे, परंतु मानव समूहांकरिता तो योग्य नाही असे समजणे अगदी चुकीचे आहे. (हरि, ५-९-१९३६, पृ. २३६)

अहिंसा आणि सत्य यांचा मार्ग तलवारीच्या धारेप्रमाणे तीक्ष्ण आहे. तिचे अनुसरण आमच्या दैनिक भोजनापेक्षाही महत्त्वाचे आहे. योग्य पद्धतीने घेतल्यास भोजनामुळे देहाचे रक्षण होते. योग्य पद्धतीने अंमलात आणल्यास अहिंसेमुळे आत्म्याचे रक्षण होते. शरीराकरिता भोजन मोजक्या प्रमाणात व निश्चित वेळेनंतरच घेता येऊ शकते; अहिंसा मात्र आत्म्याचे भोजन आहे. ते सतत घ्यावे लागते. यात तृप्तीसारखी कोणतीही गोष्ट नाही. माझ्या ध्येयाकडे माझी सतत वाटचाल होते आहे की नाही, हे मला दरक्षणी सावधगिरीने पाहावे लागते आणि आणि त्या दृष्टीने स्वतःची परीक्षा घ्यावी लागते.

## अपरिवर्तनीय पंथ

आपण आपल्या दैनंदिन जीवनात परस्परांशी सत्य, नम्रता, सहिष्णुता, आणि प्रेमपूर्ण दयाळूपणा या गुणांनी परिपूर्ण असा व्यवहार करणे, हे अहिंसेच्या मार्गावरील पहिले पाऊल आहे. इंग्रजीत म्हण आहे की, ‘प्रामाणिकपणा ही सर्वात चांगली नीती आहे’. नीती बदलू शकते आणि बदलतही असते. परंतु अहिंसेचा पंथ अपरिवर्तनीय आहे. तुमच्या चोहोकडे हिंसेचे तांडवनृत्य सुरू असतानाही तुम्हाला अहिंसेचे अनुसरण करावे लागते. अहिंसक व्यक्तीबरोबर अहिंसक वर्तन करणे काही कठीण गोष्ट नाही. एवढेच नाही, तर या वर्तनाला अहिंसा म्हणावे की नाही असाही प्रश्न पडतो. परंतु अहिंसा जेव्हा हिंसेच्या विरोधात उभी राहते तेव्हा दोघांमधील अंतर कळते. असे करणे तोपर्यंत शक्य नाही, जोपर्यंत आपण सतत जागृत राहत नाही, सतत सावध राहत नाही आणि

सतत प्रयत्नशील राहत नाही. (हरि, २-४-१९३८, पृ. ६४)

केवळ अहिंसाच वैध आहे. हिंसा कधीही वैध होऊ शकत नाही. इथे वैधतेचा माझा अर्थ मानवनिर्मित विधी नसून, निसर्गाद्वारे मानवाकरिता निर्माण करण्यात आलेला विधी असा आहे. (हरि, २७-१०-१९४६, पृ. ३६९)

## ईश्वरावर श्रद्धा

ईश्वरावर जिवंत श्रद्धा नसेल, तर अहिंसेवर जिवंत श्रद्धा असूच शकत नाही. ईश्वराची शक्ती आणि कृपा नसेल, तर अहिंसक व्यक्ती काहीही करू शकत नाही. याशिवाय क्रोध, भीती, आणि सूड या भावनांपासून दूर राहून माणूस मरण्याचे साहस करूच शकत नाही. सर्वांच्या अंतःकरणात ईश्वर आहे आणि ईश्वराच्या उपस्थितीत भीतीचे कोणतेही कारण नाही, या विश्वासातून हे साहस निर्माण होते. ज्यांना आपण आपले विरोधक समजतो, त्या व्यक्तींच्या जीवनाबद्दल आदराची भावना असा ईश्वराच्या सर्वव्यापकतेच्या ज्ञानाचा अर्थ आहे....
(हरि, १८-६-१९३८, पृ. १५२)

अहिंसा ही सर्वोच्च प्रतीची सक्रिय शक्ती आहे. ही आत्मबलाची म्हणजे आपल्या आत बसलेल्या ईश्वराची शक्ती आहे. अपूर्ण मनुष्याला या तत्त्वाचा संपूर्ण अर्थ कळू शकत नाही. तो तिचे संपूर्ण तेज सहन करू शकत नाही. परंतु अहिंसेचा अगदी थोडासा अंश जरी आमच्यामध्ये सक्रिय झाला, तरी त्याचे अद्भुत परिणाम होऊ शकतात.

सूर्य सर्व विश्वाला आपल्या जीवनदायी उष्णतेने भरून टाकतो. परंतु त्याच्या फार जवळ जाणा-याची तर तो राख करून टाकील. ईश्वरत्वासंबंधीही हीच गोष्ट आहे. जितक्या प्रमाणात आपण अहिंसेनुसार वर्तन करतो, तितक्याच प्रमाणात आपण ईश्वरासारखे होतो. परंतु आपण पूर्णपणे ईश्वरासारखे कधीच बनू शकत नाही. (हरि, १२-११-१९३८, पृ. ३२६)

सत्य हे आहे की अहिंसा त्याप्रमाणे काम करत नाही ज्याप्रमाणे हिंसा काम करते. ती विरुद्ध दिशेने काम करते. शस्त्रसज्ज माणूस सामान्यपणे आपल्या शस्त्रांवर विश्वास ठेवतो. जी व्यक्ती जाणीवपूर्वक निःशस्त्र असते, ती अदृष्टावर अवलंबून असते. कवी त्याला ईश्वर म्हणतात तर वैज्ञानिक त्याला अज्ञात म्हणून संबोधतात. परंतु जे अज्ञात असते ते अस्तित्वात नसतेच असे नाही. ज्ञात आणि अज्ञात अशा सर्व शक्तींमध्ये ईश्वर सर्वात मोठी शक्ती आहे. त्या शक्तीचा आधार

नसलेली अहिंसा कच-याच्या डब्यात फेकण्यासारखी असते.
(हरि, २८-६-१९४२, पृ. २०१)

आपल्या आतील जिवंत ईश्वराची जाणीव ही निःस्संदेह पहिली अट आहे. (हरि, २९-६-१९४७, पृ. २०९)

**धार्मिक आधार**

माझा अहिंसेवर आत्यंतिक विश्वास असल्यामुळे आणि मी तिची बाजू घेत असल्यामुळे काही लोक मला हिंदू मानायला तयार नाहीत. त्यांचे म्हणणे आहे की, मी छद्म वेषातील ख्रिश्चन आहे. गीतेत शुद्ध अहिंसेचा उपदेश आहे असे मी सांगत असल्यामुळे मी गीतेच्या अर्थाची मोडतोड करतो, असेही त्यांचे म्हणणे आहे. माझ्या काही हिंदू मित्रांचे सांगणे आहे की, काही विशिष्ट परिस्थितीत लोकांचा वध करणे माणसाचे कर्तव्य आहे, असे गीतेत सांगितले आहे. अगदी काल-परवा एका अतिशय विद्वान पंडितांनी मी लावलेला गीतेचा अर्थ तिरस्काराने फेटाळून लावला. गीतेत चांगुलपणा आणि वाईटपणा यांच्यातील द्वंद्वाची चर्चा आहे आणि आपल्यातील वाईटपणा दूर करण्याचा सल्ला निःसंकोचपणे ती आपल्याला देते असे म्हणणा-या शास्त्रकारांच्या म्हणण्याला काहीही आधार नाही, असे त्या विद्वानांचे म्हणणे आहे..

अहिंसेविरुद्धचे हे आक्षेप मी सविस्तरपणे याकरिता सांगतो आहे की, मी सांगितलेला युक्तिवाद समजून घेण्याआधी हा युक्तिवाद समजून घेणे, जरुरीचे आहे....

कोणत्याही भीडमूर्वतीशिवाय माझे म्हणणे फेटाळून लावले पाहिजे. माझा धर्मही पूर्णपणे माझा निर्माता आणि मी यांच्यामधील गोष्ट आहे. जर मी हिंदू असेन तर सगळ्या लोकांनी माझा त्याग केल्यानंतरही मी हिंदूच असेन. परंतु ते काहीही असले तरी मी म्हणेन की, अहिंसाच सर्व धर्मांची अखेरची परिणती आहे.
(यंग, २९-५-१९२४, पृ. १७५)

अहिंसेचा पाठ सर्व धर्मांतून सांगण्यात आलेला आहे. परंतु माझा पक्का विश्वास आहे की, भारतच असा देश आहे जिथे अहिंसेच्या आचरणाला वैज्ञानिक रूप देण्यात आले आहे. अगणित संतांनी तपश्चर्येत आपले प्राण समर्पित केले. एवढेच नाही, तर त्यांच्या बलिदानाने हिमालय पवित्र होऊन तो श्वेत झाला, अशीही कवींनी कल्पना केली. परंतु अहिंसेचे ते आचरण आज लोपले आहे.

क्रोधाचे उत्तर प्रेमाने आणि हिंसेचे उत्तर अहिंसेने देण्याच्या शाश्वत नियमाला आपण पुनर्जीवित करणे आवश्यक आहे आणि ही गोष्ट राजा जनक आणि राम यांच्या भूमीपेक्षा अधिक सहजपणे कुठे साध्य करता येऊ शकेल?
(हरि, ३०-३-१९४७, पृ. ३६)

## हिंदू धर्माची अद्वितीय देणगी

सर्व धर्मांतच अहिंसा सांगितलेली आहे. परंतु हिंदू धर्मातच अहिंसेला सर्वोच्च अभिव्यक्ती मिळाली आहे आणि या धर्मातच अहिंसेकडे विशेष लक्ष पुरवण्यात आले आहे. (मी बौद्धधर्म व जैनधर्म यांना हिंदू धर्मापेक्षा वेगळे समजत नाही.)

हिंदू धर्म संपूर्ण मानव जातीच्या एकीवरच विश्वास करत नाही, तर संपूर्ण प्राणी जगताच्या ऐक्यावरही त्याचा विश्वास आहे. माझ्या मते, मानवतेच्या विकासात गोपूजा हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. संपूर्ण प्राणीजगताचे ऐक्य आणि त्यांचे पावित्र्य यांच्यावरील विश्वासाचा तो प्रत्यक्ष परिणाम आहे. वर्णाश्रमाच्या नियमाचा शोधही सत्याच्या शोधाच्या सतत प्रयत्नाचा परिणाम आहे.
(यंग, २०-१०-१९२७, पृ. ३५२)

हिंदू धर्मात अहिंसेचा शोध मी कुठून लावला, असे मला विचारण्यात येते. अहिंसा हिंदू धर्मात आहे, ख्रिश्चन धर्मात आहे आणि इस्लाममध्येही आहे. तुम्ही माझ्याशी सहमत व्हा अथवा नका होऊ, परंतु मला जे सत्य वाटते त्याचा प्रचार करणे हे माझे कर्तव्य आहे. माझा असाही दृढविश्वास आहे की, अहिंसेने कधीही कुणाला भित्रा बनवले नाही. (हरि, २७-४-१९४७, पृ. १२६)

## कुराण आणि अहिंसा

(बारी साहेबांनी) मला खात्रीपूर्वक सांगितले आहे की, पवित्र कुराणात सत्याग्रहा-करिता पुरेसा पुरावा उपलब्ध आहे. त्यांना कुराणाचा हा अर्थ मान्य आहे की, कुराणात विशिष्ट परिस्थितीत हिंसेचा आधार घेण्याची परवानगी असली तरी, खुदाला संयम अधिक प्रिय आहे आणि हाच प्रेमाचा नियम आहे. हाच सत्याग्रह आहे. मानवी दुर्बलतेकरिता हिंसेची सूट आहे, सत्याग्रह एक कर्तव्य आहे. व्यावहारिक दृष्टीने पाहिले, तरी हिंसेमुळे काहीच चांगले होऊ शकत नाही उलट तिच्यामुळे अपरिमित हानी होते.
(यंग, १४-५-१९१९, कम्यूनल युनिटीत उद्धृत, पृ. ९८५)

काही मुसलमान मित्र मला सांगतात की, निर्भेळ, शुद्ध अहिंसेचे समर्थन मुसलमान कधीही करणार नाहीत. त्यांचे म्हणणे आहे की, मुसलमानांच्या दृष्टीने अहिंसा जितकी वैध आणि जरुरी आहे तितकीच हिंसाही वैध आणि जरुरी आहे. यातून कोणाचा उपयोग करावा हे परिस्थितीवर अवलंबून आहे. या दोन्ही गोष्टींची वैधता सिद्ध करण्याकरिता कुराणाची गरज नाही. जगाने युगांपासून या मार्गाचे अनुसरण केले आहे. विशुद्ध हिंसा अशी कोणतीही गोष्ट जगात नाही. परंतु अनेक मुसलमान मित्रांकडून मी ऐकले आहे की, कुराणामध्ये अहिंसेची शिकवण सांगितलेली आहे. त्यात प्रतिशोधापेक्षा सहिष्णुतेला अधिक महत्त्व देण्यात आले आहे. इस्लाम या शब्दाचा अर्थच आहे शांतता व अहिंसा. पक्के मुसलमान असलेल्या आणि नमाज व रमजानचे कट्टरपणाने पालन करणा-या बादशाह खान यांनी अहिंसेला आपला धर्म मानले आहे. ते आपल्या धर्माचे कट्टर अनुयायी नाहीत, असे म्हणणे चूक आहे आणि मीसुद्धा माझ्या धर्माचा तेवढा कट्टर अनुयायी नाही, हे कबूल करताना मला लाज वाटते. आमच्या कामकाजात अंतर असेल तर ते प्रमाणाचे आहे, तत्त्वाचे नाही. परंतु कुराणातील अहिंसेबद्दलचा माझा युक्तिवाद अतिरिक्त मुद्यांसारखा आहे, माझ्या सिद्धान्ताचा तो अपरिहार्य भाग नाही. (हरि, ७-१०-१९३९, पृ. २९६)

**प्रश्न आहाराचा नाही**

अहिंसा केवळ आहार-विज्ञानाचा प्रश्न नाही, ही त्यापुढील गोष्ट आहे. माणूस काय खातो, काय पितो या गोष्टीला तितकेसे महत्त्व नाही; महत्त्व आहे त्यामागील त्याग आणि संयम या भावनांना. आपल्या आहारातील वस्तूंची निवड करताना अधिक संयम पाळायचा असेल तर अवश्य पाळा. संयम प्रशंसनीय आहे, त्याची गरजही आहे. परंतु ही गोष्ट अहिंसेला केवळ वरवरून स्पर्श करते. हे शक्य आहे की, आहाराच्या बाबतीत भरपूर मोकळीक घेणारी व्यक्तीसुद्धा अहिंसेची मूर्ती असेल, तिचे अंतःकरण प्रेमभावनेने परिपूर्ण असेल, इतरांची पीडा पाहून ते द्रवत असेल आणि त्या व्यक्तीने आपल्या वासनांपासून मुक्ती मिळवलेली असेल; तर ती व्यक्ती आमच्याकरिता आदरणीय असेल. दुसरीकडे आहाराच्या बाबतीत अतिशय सावध असलेली व्यक्ती जर स्वार्थ आणि वासनांची दास असेल आणि कठोर हृदयाची असेल, तर ती व्यक्ती अहिंसेच्या जवळपासही पोहोचलेली नाही व ती व्यक्ती घृणास्पद

व नीच प्रकृतीची आहे, असे म्हणावे लागेल. (यंग, ६-९-१९२८, पृ.३००-१)

## सत्याचा मार्ग

अहिंसेबद्दलचे माझे प्रेम सर्व लौकिक वा अलौकिक वस्तूंपेक्षा जास्त आहे. या प्रेमाची तुलना सत्याबद्दलच्या माझ्या प्रेमाशीच करता येईल, जे माझ्या दृष्टिकोनातून समानार्थी आहेत. केवळ अहिंसेच्या माध्यमातूनच मी सत्याचे दर्शन घेऊ शकलो आणि त्याच्याजवळ पोहोचू शकलो. (यंग, २०-२-१९३०, पृ. ६१)

....अहिंसेशिवाय सत्याचा शोध आणि त्याची प्राप्ती अशक्य आहे. अहिंसा आणि सत्य हे एकमेकांमध्ये असे काही गुंफले गेले आहेत की, त्यांना वेगळे करणे जवळपास अशक्य आहे. ते नाण्याच्या वा असे म्हणा की धातूच्या चोपड्या व कोणताही शिक्का नसलेल्या चकत्यांच्या दोन बाजू आहेत. कोण सांगू शकेल की त्या चकतीची कोणती बाजू सुलट आहे आणि कोणती उलट? तरीही अहिंसा साधन आहे आणि सत्य साध्य. साधन तेच असते, जे आमच्या आवाक्यात असते आणि अशा रीतीने अहिंसा आमचे सर्वात मोठे कर्तव्य आहे. आपण जर आपले साधन नीट ठेवले तर लगेच किंवा काही कालावधीने आपण साध्यापर्यंत नक्कीच पोहोचू. एकदा हा मुद्दा कळला की, अंतिम विजयाबद्दल संशय राहत नाही. (फायम, पृ. १२-३)

अहिंसा साध्य नाही. परंतु मानवीय संबंधात सत्यप्राप्तीकरिता अहिंसेच्या अनुसरणाशिवाय दुसरे कोणतेही साधन नाही. अहिंसेचे पालन कठोरपणे केले, तर सत्यापर्यंत पोहोचणे अपरिहार्य आहे. हिंसेद्वारा ही गोष्ट शक्य नाही. यामुळेच अहिंसेवर माझा दृढविश्वास आहे. माझ्याजवळ सत्य स्वाभाविकपणेच आले. अहिंसेला मी संघर्ष करून मिळवले.

परंतु अहिंसा साधन असल्यामुळे, आपल्या दैनंदिन जीवनात तिचा अधिक संबंध आहे. यामुळे आपल्या जनतेला अहिंसेचे शिक्षण देणे, आवश्यक आहे. त्यानंतर त्या शिक्षणाची स्वाभाविक परिणती म्हणून सत्याचे शिक्षण आपल्या जनतेला आपोआपच मिळेल. (हरि, २३-६-१९४६, पृ. १९९)

## भित्रेपणाचा आडपडदा नाही

धोका समोर दिसला की, आपल्या प्रियजनांना असुरक्षित सोडून आपण स्वतः पळून जाण्याला माझी अहिंसा परवानगी देत नाही. हिंसा आणि भित्रेपणाने पळून जाणे, यातून मी हिंसेलाच पसंत करीन. ज्याप्रमाणे एखाद्या आंधळ्या माणसाला

सुंदर दृश्य पाहण्याकरिता आपण प्रेरित करू शकत नाही; त्याचप्रमाणे भित्र्याला अहिंसेचा पाठ शिकवता येऊ शकत नाही. अहिंसा तर शौर्याची परमावस्था आहे. माझ्या स्वतःच्या अनुभवानुसार, हिंसेवर विश्वास ठेवणा-यांना अहिंसेची श्रेष्ठता समजावून सांगण्यात मला अडचण आली नाही. मी अनेक वर्षे भेकड होतो आणि तेव्हा हिंसेचा आधार घेण्याची मला इच्छा व्हायची. जेव्हा माझा भेकडपणा नाहीसा करण्याचा मी प्रयत्न करू लागलो, तेव्हा मला अहिंसेचे महत्त्व वाटू लागले. जबाबदारीचे पालन न करता धोका पाहून जे हिंदू पळाले होते, ते अहिंसेमुळे पळाले नव्हते, तर मरण्याची वा मार खाण्याची तयारी नसल्यामुळे पळाले होते. शिकारी कुत्र्याला पाहून पळणारा ससा अहिंसक असल्यामुळे पळत नसतो. तो बिचारा तर कुत्र्याला पाहताच थरथर कापू लागलेला असतो आणि आपला जीव वाचवण्याकरिता पळत असतो. (यंग, २८-५-१९२४, पृ. १७८)

भित्रेपणावरील पांघरूण म्हणजे अहिंसा नाही. ती तर वीरांचा सर्वोच्च गुण आहे. अहिंसेच्या आचरणाकरिता तलवारबाजीपेक्षाही अधिक शौर्य पाहिजे. भेकडपणा आणि अहिंसा यांचा काहीही संबंध नाही. तलवारबाजी सोडून अहिंसा स्वीकारणे शक्य आणि कधी कधी सोपेही असते. यामुळे अहिंसेची पहिली अट ही आहे की, अहिंसक व्यक्तीमध्ये वार करण्याची क्षमता असली पाहिजे. माणसाच्या बदला घेण्याच्या भावनेचा जाणीवपूर्वक आणि विचारपूर्वक केलेला संयम म्हणजे अहिंसा आहे. परंतु निष्क्रियता, स्त्रैणत्व आणि विवशता यांच्यापेक्षा बदल्याची भावना किती तरी चांगली. क्षमा आणखी उच्च गोष्ट आहे. बदला दुर्बलता आहे. बदल्याची भावना काल्पनिक वा वास्तविक हानीच्या भीतीमुळे उत्पन्न होत असते. कुत्रा घाबरल्यामुळे भुंकत व चावत असतो. जो माणूस जगात कोणालाच घाबरत नाही, तो माणूस त्या व्यक्तीचा बदला घेण्याचा प्रयत्न कशाला करील, जी त्याचे निरर्थक नुकसान करण्याचे प्रयत्न करत असेल? सूर्यावर धूळ उडवणा-या मुलांचा बदला घेण्याचा प्रयत्न सूर्य करत नसतो. धूळ उडवण्याच्या प्रयत्नात मुले स्वतःच धुळीने घाणेरडी होतात. (यंग, १२-८-१९२६, पृ. २८५)

अहिंसेचा मार्ग हिंसेच्या मार्गापेक्षा किती तरी अधिक साहसाची अपेक्षा ठेवतो. (हरि, ४-८-१९४६, पृ. २४८-९)

शूराची अहिंसा अंगी बाणवू इच्छिणा-या व्यक्तीने कमीतकमी भेकडपणापासून आपली सुटका करून घेतलीच पाहिजे. त्यानंतर त्याने निर्भय होऊन आपल्या लहान-मोठ्या कामांचे नियमन केले पाहिजे. याप्रमाणे वागत असताना अहिंसेच्या

पुजा-याने आपल्या वरिष्ठ अधिका-याला घाबरण्याचे नाकारले पाहिजे. परंतु असे करण्याकरिता त्या व्यक्तीला आपल्या पदाचा - मग ते कितीही मोठे असो - बळी देण्याची तयारी ठेवली पाहिजे. आपल्या सर्वस्वाचा बळी देण्याची तयारी असतानाही जर त्या व्यक्तीत आपल्या मालकाबद्दल दुर्भावना नसेल, तर त्या व्यक्तीत शूराची भावना आहे असे म्हणता येईल.

समजा, कोणी सह-यात्रेकरू माझ्या मुलावर हल्ला करण्याची धमकी देतो आहे आणि मी त्याच्याशी वाद घातल्यानंतर तो माझ्यावर तुटून पडतो. त्यावेळी सभ्यतापूर्वक आणि प्रतिष्ठितपणाने त्याने मारलेला ठोसा मी सहन केला व त्याच्याबद्दल माझ्या मनात कोणतीही दुर्भावना मी ठेवली नाही, तर मी वीराच्या अहिंसेचे दर्शन घडवले असे म्हणता येईल. अशा घटना रोज घडत असतात आणि त्यांच्यात सहजपणे दररोज किती तरी वाढ करता येऊ शकते. जर मी दररोज माझ्या आवेशाला ताब्यात ठेवू शकलो आणि ठोशाला ठोसा देण्याची ताकद असूनही मी तसे केले नाही, तर मग मी माझ्यामध्ये वीराची ती अहिंसा विकसित करू शकतो; जी कधीही माझी साथ सोडणार नाही आणि मोठ्यात मोठ्या विरोधकालाही ती मान्य करणे भाग पडेल. (हरि, १७-११-१९४६, पृ. ४०४)

भ्याडपणाने वागणे माझ्या स्वभावाविरुद्ध आहे. दक्षिण आफ्रिकेत हजारो लोक जबरदस्त अडचणींच्या परिस्थितीतही विरोधात उभे राहिले होते आणि ते अपयशी झाले नव्हते. तो अहिंसेचा प्रकार आहे. ख-या शौर्याचा म्हणजे अहिंसेचा प्रचार करणे, हे मी माझे जीवनध्येय मानले. (हरि, १-६-१९४७, पृ. १७५)

## विनम्रता आवश्यक

माणसात जर.... गर्व वा अहंकार असेल, तर त्याच्यात अहिंसा टिकू शकत नाही. विनम्रतेशिवाय अहिंसा अशक्य आहे. माझा स्वतःचा अनुभव आहे की, जेव्हा जेव्हा मी अहिंसेचा आश्रय घेतला; तेव्हा तेव्हा कोणत्या तरी अदृश्य शक्तीने मला मार्ग दाखवला व त्या मार्गावरून मला पुढे नेले. मी जर माझ्याच इच्छेच्या बळावर राहिलो असतो तर मला फार मोठे अपयश आले असते. मी जेव्हा पहिल्या वेळी तुरुंगात गेलो होतो, तेव्हा खूप घाबरलेलो होतो. तुरुंगातील जीवनाबद्दल मी फार भयानक गोष्टी ऐकल्या होत्या. परंतु ईश्वराच्या संरक्षणावर माझी श्रद्धा होती. माझा स्वतःचा अनुभव असा आहे की, जे लोक प्रार्थनेच्या भावनेने तुरुंगात गेले होते ते विजयी होऊन परतले आणि जे आपल्या शक्तीच्या भरवशावर गेले होते, त्यांना मात्र अपयश आले. जेव्हा तुम्ही म्हणता की, ईश्वर आम्हाला शक्ती

देतो; तेव्हा त्यात स्वानुकंपेचा कोणताही भाग नसतो. स्वानुकंपेची गोष्ट तेव्हा निर्माण होते, जेव्हा तुम्हाला दुस-यांकडून मान्यता मिळवण्याची आकांक्षा असते. परंतु इथे तर मान्यतेचा कोणताच प्रश्न नसतो. (हरि, २८-१-१९३९, पृ. ४४२)

जेव्हा मी मला शून्यवत करणे शिकलो, तेव्हाच मला दक्षिण आफ्रिकेत सत्याग्रहाच्या शक्तीचा विकास करता आला. (हरि, ६-५-१९३९, पृ. ११)

## २२. अहिंसेची शक्ती

आपल्या गतिमान अवस्थेत अहिंसेचा अर्थ आहे जाणीवपूर्वक व्यथा सहन करणे. अहिंसेचा अर्थ वाईट वागणारांच्या इच्छेसमोर विनम्र आत्मसमर्पण करणे नसून त्याविरुद्ध आपल्या संपूर्ण आत्मशक्तीचा उपयोग करणे हा आहे. मानवजातीच्या या नियमाप्रमाणे आचरण करत असताना एकटा माणूससुद्धा आपला सन्मान, धर्म आणि आत्मा यांच्या रक्षणाकरिता एखाद्या अन्यायी साम्राज्यालाही तोंड देऊ शकतो आणि त्या साम्राज्याच्या पतनाचा वा पुनरुद्धाराचा पाया घालू शकतो. (यंग, १-८-१९२०, पृ. ३)

### सक्रिय शक्ती

अहिंसेच्या माझ्या संकल्पनेनुसार, अहिंसा ही दुष्टपणा आणि बदल्याची भावना यांच्याविरुद्ध संघर्ष करणारी अधिक सक्रिय शक्ती आहे. बदला घेण्याच्या भावनेचा स्वभावच मुळी दुष्टपणा वाढवणारा आहे. यामुळे अनैतिकतेला मी मानसिक आणि नैतिक विरोधाने संपवू इच्छितो. अत्याचारी माणसाच्या तलवारीची धार त्यापेक्षाही अधिक धारदार शस्त्राने मी बोथट करू इच्छीत नाही, तर शारीरिक शक्तीने प्रतिकार करण्याची त्याची इच्छाच मी धुळीला मिळवू इच्छितो. मी त्याचा जो आत्मिक प्रतिकार करीन, त्यामुळे तो गोंधळेल. माझ्या आत्मिक प्रतिकारामुळे आधी तो चकित होईल, परंतु अखेरीस त्याला तिचे महत्त्व पटल्याशिवाय राहणार नाही आणि असे केल्यामुळे तो अपमानित होणार नाही. उलट त्याचे उत्थान होईल. तुम्ही म्हणू शकाल की, ही एक आदर्श स्थिती आहे आणि ती तशी आहेही. ज्या विधानांवर माझा तर्क आधारित आहे, तो युक्लिडच्या व्याख्येइतकाच सत्य आहे. व्यवहाराच्या पाटीवर युक्लिडच्या व्याख्येप्रमाणे आपण रेषासुद्धा काढू शकत नाही. परंतु कोणताही भूमितीतज्ज्ञ युक्लिडची व्याख्या लक्षात घेतल्याशिवाय पुढे जाऊ शकत नाही. ज्या मूलभूत संकल्पनांवर सत्याग्रहाचा सिद्धान्त आधारलेला आहे, त्यांच्याशिवाय आमचेही काम चालू

शकत नाही. (यंग, ८-१०-१९२५, पृ. ३४६)

मला मान्य आहे की, जो ताकदवान आहे तो दुर्बलांना लुटेल आणि दुर्बल होणे पाप आहे. परंतु ही गोष्ट माणसाच्या आत्म्यासंबंधी सांगण्यात आलेली आहे, शरीरासंबंधी नाही. ही गोष्ट जर शरीराबद्दल सांगण्यात आली असती, तर आपण दुबळेपणाच्या पापापासून कधीही मुक्त झालो नसतो. परंतु आत्मशक्ती संपूर्ण जगाच्या सशस्त्र विरोधाला तोंड देऊ शकते आणि ही आत्मशक्ती अगदी दुर्बलाहून दुर्बल शरीर असणाराही मिळवू शकतो. (यंग, ६-५-१९२६, पृ. १६४)

माणसाला उपलब्ध असलेली सर्वात मोठी शक्ती अहिंसा आहे. माणसाने आपल्या कौशल्याने विनाशाची जी मोठ्यात मोठी शस्त्रास्त्रे बनवली आहेत; त्यांच्याहूनही अहिंसा अधिक शक्तिशाली आहे. विनाश मानवाचा नियम नाही. माणूस आपल्या भावाला मारून नाही, तर त्याच्या हाताने मरण्याची तयारी ठेवून मोकळेपणाने जगत असतो. प्रत्येक खून वा इतरांना केलेली इजा या गोष्टी कोणत्याही कारणाकरिता का केलेल्या असेना, मानवतेच्या विरोधातील अपराध असतात. (हरि, २०-७-१९३५, पृ. १८०-१)

अहिंसा रेडियमप्रमाणे काम करते. त्याचा अत्यल्प अंशही कर्करोगाच्या वाढीवर तोपर्यंत सतत आणि गुपचूप काम करत असतो, जोपर्यंत रोगग्रस्त भाग पूर्णपणे दुरुस्त होत नाही. अशाच प्रकारे थोडीशी खरी अहिंसासुद्धा सूक्ष्मपणे आणि अदृश्य स्वरूपात काम करते व संपूर्ण समाजाचा कायापालट करते. (हरि, १२-११-१९३८, पृ. ३२७)

### अद्वितीय शौर्य

सशस्त्र माणसाची शक्ती त्याच्या शस्त्रावर अवलंबून असते. त्याच्याकडून त्याचे शस्त्र, त्याची बंदूक, त्याची तलवार काढून घेतली की, बहुधा तो असहाय होतो. परंतु ज्या व्यक्तीने अहिंसेचा सिद्धान्त ख-या अर्थाने आत्मसात केला आहे, त्याचे शस्त्र ईश्वरदत्त शक्ती असते व तिच्या तोडीचे दुसरे कोणतेही शस्त्र जगात आजपर्यंत निर्माण झालेले नाही. (हरि, १९-११-१९३८, पृ. ३४१-२)

आपल्या जीवनध्येयावर अदम्य श्रद्धा असणारी मूठभर माणसे इतिहासाचा प्रवाह बदलवू शकतात. (हरि, १९-११-१९३८, पृ. ३४३)

ताकदवान माणसाची अहिंसा सगळ्या शस्त्रांनी सज्ज असलेल्या शिपायाच्या वा शिपायांच्या शक्तीपेक्षा अधिक बलशाली असते. (हरि, १२-५-१९४६, पृ. १२८)

## श्रद्धेचा प्रयोग

कठीणात कठीण धातूही आवश्यक उष्णता मिळाली की वितळतो. अशाच रीतीने कठोरतम हृदयही अहिंसेच्या आवश्यक उष्णतामानाने विरघळते आणि उष्णता निर्माण करण्याची अहिंसेची शक्ती अमाप आहे.

प्रत्येक क्रिया विविध शक्तींचा परिणाम असते. मग त्या शक्ती विरोधी शक्तीसुद्धा असू शकतात. ऊर्जा कधीही नष्ट होत नसते. यंत्रशास्त्राची पुस्तके हेच सांगतात. हाच नियम मानवी क्रियांनाही लागू होतो. अंतर एवढेच आहे की, वरील उदाहरणात आम्हाला सामान्यपणे क्रियाशील शक्तींची माहिती असते आणि गणित करून होणा-या घटनांचे आपण पूर्वानुमान करू शकतो. परंतु मानवी क्रिया मात्र अशा शक्तींचा संयुक्त परिणाम असते की, ज्यांच्यातील बहुतेक शक्तींची आम्हाला काहीही माहिती नसते. परंतु केवळ एवढ्या कारणाकरिता आपण या शक्तींच्या अस्तित्वाबद्दल अविश्वास करू नये. उलट आमच्या अज्ञानामुळे आमच्या श्रद्धेत अजून वाढ होते. अहिंसा जगातील सर्वाधिक शक्तिशाली ताकद असल्यामुळे, तिच्या कामाची पद्धतीही अनाकलनीय आहे. त्यामुळे हिच्याबाबतीत श्रद्धेचे महत्त्व सर्वाधिक आहे. ज्याप्रमाणे श्रद्धेच्या आधाराने आपण ईश्वरावर विश्वास ठेवतो, त्याप्रमाणे श्रद्धेच्या आधारावर आम्ही अहिंसेवर विश्वास ठेवला पाहिजे.
(हरि, ७-१-१९३९, पृ. ४१७)

हिंसा पाण्याप्रमाणे असते - जेव्हा तिला वाट सापडते, तेव्हा ती पूर्ण शक्तीनिशी बाहेर पडते. अहिंसा मूर्खपणाचे वर्तन करू शकत नाही. ती शिस्तीचा अर्क आहे. परंतु एकदा तिने चालायला सुरुवात केली की, मोठ्या प्रमाणातील हिंसा तिला चिरडू शकत नाही. ती पूर्णपणे कार्यरत होण्याकरिता निष्कलंक शुद्धता आणि अविचल श्रद्धा पाहिजे.... (हरि, २१-३-१९३९, पृ.४३३)

## एक विज्ञान

अहिंसा एक विज्ञान आहे. विज्ञानाच्या शब्दकोशात पराभव हा शब्दच नसतो. अपेक्षित परिणाम प्राप्त होऊ शकले नाहीत तर ती गोष्ट नवीन शोधाची पूर्वपीठिका असते. (हरि, ८-५-१९३९, पृ. ११३)

हिंसेचे कार्य जर आपल्यासमोर आलेली प्रत्येक गोष्ट स्वाहा करणे असेल, तर अहिंसेचे काम हिंसेला तोंड भरून खाऊ घालणे आहे. अहिंसेच्या वातावरणात व्यक्तीच्या अहिंसेची पारख होऊ शकत नाही. अहिंसेची परीक्षा तर

हिंसेच्या वातावरणातच होऊ शकते. (हरि, १३-५-१९३९, पृ. १२१)

हिंसेचे बिनतोड उत्तर केवळ अहिंसाच आहे. निर्विवादपणे मान्य झालेले प्राचीन सत्य हे आहे की.... हिंसेचे शस्त्र, मग ते अण्वस्त्र का असेना, ख-या अहिंसेसमोर निरुपयोगी ठरते. हे खरे आहे की, अहिंसेचे शक्तिशाली अस्त्र चालवणे फार कमी लोकांना जमते. याकरिता प्रभावी समयसूचकता आणि फार मोठे मनोबल यांची गरज असते. सैनिकी शाळा आणि महाविद्यालये यातून मिळणा-या ज्ञानापेक्षा हे ज्ञान वेगळे आहे. हिंसेचे उत्तर अहिंसेने देताना येणा-या अडचणी आपल्या मनाच्या दुबळेपणामुळे उद्‌भवतात.
(हरि, १-६-१९४७, पृ. १७२)

## कर्म, कर्ता नाही

'पापाची घृणा करा, पापी माणसाची नाही' असे एक नीतीवचन आहे. हे समजायला फार सोपे आहे, परंतु याप्रमाणे वर्तन क्वचितच केले जाते. यामुळेच जगात घृणेचे विष पसरते आहे.

अहिंसा सत्याच्या शोधाचा आधार आहे. सत्याचा शोध जर अहिंसेवर आधारित नसेल तर तो व्यर्थ आहे, अशी जाणीव मला दिवसेंदिवस होते आहे. एखाद्या व्यवस्थेचा विरोध करणे व तिच्या विरोधात बोलणे अगदी उचित आहे, परंतु त्या व्यवस्थेच्या कर्त्याचा विरोध करणे आणि त्याच्यावर हल्ला करणे, ही गोष्ट तर स्वतःचाच विरोध करून स्वतःवर हल्ला करण्यासारखी होईल. कारण आपण एकाच कुंचल्याने रंगलेलो आहोत, एकाच निर्मात्याची मुले आहोत आणि त्यामुळे आपल्याकडे असीम दैवी शक्ती आहे. एकाही माणसाला अपमानित करणे म्हणजे त्या दैवी शक्तीला अपमानित करणे होईल व त्याचबरोबर त्याच्यासह सर्व जगाला आपण दुखवू. (ए, २०३)

व्यक्ती आणि तिचे कर्म या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. जिथे सत्कर्माचा पुरस्कार केला पाहिजे आणि दुष्कर्माची निंदा केली पाहिजे, तिथे या गोष्टींचा कर्ता - मग तो सज्जन असो वा दुर्जन - परिस्थितीप्रमाणे सदैव आदर वा दया यांच्याकरिताच पात्र असतो. (ए, २०३)

आचरणकर्त्यासोबत त्याचे आचरणही मरेल अशा विश्वासाने जे लोक आचरणाऐवजी आचरणकर्त्याला नष्ट करू इच्छितात, ते लोक ते निंदनीय आचरण स्वतः करू लागतात व ज्या व्यक्तीला ते नष्ट करतात त्या व्यक्तीपेक्षाही वाईट होतात. वाईटपणाचे मूळ कशात आहे, याची जाणीव

त्यांना नसते. (यंग, १७-३-१९२७, पृ. ८५)

अहिंसक संघर्षानंतर कोणताही विद्वेष शिल्लक न राहणे, ही अहिंसेची कसोटी आहे. या संघर्षाच्या अखेरीस शत्रूही मित्र बनतात. दक्षिण आफ्रिकेत जनरल स्मट्सबाबत मला हाच अनुभव आला. ते आधी माझे कट्टर शत्रू आणि टीकाकार होते आणि आज ते माझे परम स्नेही व मित्र आहेत.
(हरि, १२-११-१९३८, पृ. ३२७)

अहिंसेचा मुख्य परिणाम असा आहे की, आमच्या अहिंसेमुळे आमच्या विरोधकाच्या विरोधाची धार बोथट झाली पाहिजे, तो आणखी कठोर व्हायला नको, आमच्या अहिंसेमुळे त्याच्या अंतःकरणाला पाझर फुटला पाहिजे, त्याच्या अंतःकरणातील संवादी सुरांना आमच्या अहिंसेने स्पर्श केला पाहिजे.

अहिंसावादी असल्यामुळे तुम्ही सांगू शकता का की, तुम्ही ख-या अहिंसेचे आचरण करत आहात? तुम्ही सांगू शकाल का की, तुम्ही विरोधकाचे बाण उघड्या छातीवर झेलू शकाल व परत बाण चालवणार नाही? तुम्ही सांगू शकाल का की, विरोधकाच्या टीकेमुळे तुम्ही संतापत वा चिडत नाही?
(हरि, १३-५-१९३९, पृ. १२१)

जीवनभर अहिंसेचे आचरण करता करता मी त्यातला (तज्ज्ञ) बनलो आहे. हे खरे आहे की मी अगदीच अपूर्ण विशेषज्ञ आहे. निरपेक्ष रूपाने सांगायचे तर माझ्या जीवनात अहिंसेचे मी जितके अनुसरण करतो, तितका अहिंसेच्या संपूर्ण अभिव्यक्तीपासून मी किती दूर आहे, याची मला जाणीव होते. आजच्या या युगात अहिंसेला हिंसेसमोर फार कमी वाव आहे असे जो माणूस म्हणतो त्याला अहिंसेबद्दल फार कमी ज्ञान असते व त्यामुळेच तो असे म्हणतो. उलटपक्षी मी ठणकावून सांगतो की, या अण्वस्त्राच्या युगामध्ये विशुद्ध अहिंसा हीच अशी एकमेव शक्ती आहे की, जी हिंसेच्या सर्व युक्त्या-प्रयुक्त्यांना तोंड देऊ शकते.
(हरि, १६-११-१९४७, ४१२)

## २३. अहिंसेकरिता प्रशिक्षण

'या कठीण कलेचे व्यक्तीला वा समाजाला प्रशिक्षण कसे देता येईल?'

आपल्या जीवनात अहिंसेचे अनुसरण करत राहणे आणि आपले जीवन अहिंसेच्या जिवंत उपदेशासारखे होईल हे पाहणे, याशिवाय अहिंसेचा कोणताही राजमार्ग नाही. अर्थातच भरपूर अभ्यास केल्यानंतर व प्रचंड चिकाटीने

अंतःकरणातील सर्व अशुद्धी दूर केल्यानंतरच आपल्या जीवनात अहिंसेची अभिव्यक्ती होऊ शकते. भौतिक विज्ञानात प्रावीण्य मिळवण्याकरिता जर सर्व जीवन अर्पावे लागत असेल, तर मग मानवजातीला ज्ञात असलेली सर्वात महान आध्यात्मिक शक्ती प्राप्त करण्याकरिता किती जन्म अर्पण करावे लागतील? परंतु अनेक जन्म अर्पावे लागले तरी आपण त्याची फिकीर करण्याचे कारण काय? हीच गोष्ट जर जीवनात चिरंतन असेल, हीच एक अशी गोष्ट असेल की जिला काही महत्त्व असेल तर मग त्याकरिता जे काही प्रयत्न आपल्याला करावे लागतील ते आपण केलेच पाहिजे. आधी स्वर्गाचे राज्य मिळवा आणि नंतर इतर गोष्टी तुम्हाला आपोआपच मिळतील. स्वर्गाचे राज्य म्हणजेच अहिंसा.
(हरि, १४-३-१९३६, पृ. ३९)

अहिंसेच्या प्रशिक्षणाकरिता शस्त्रास्त्रांची नक्कीच गरज नाही. किंबहुना आपल्याजवळ काही शस्त्रे असतील, तर खानसाहेबांनी वायव्य सरहद्द प्रांतात केले त्याप्रमाणे आपणही ती शस्त्रे फेकून दिली पाहिजेत. अहिंसेच्या प्रशिक्षणाआधी हिंसेचे प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे असे ज्यांना वाटते त्यांना असेही वाटू शकते की, केवळ पापीच संत होऊ शकतात.

## निर्भयता - एक पूर्व अट

ज्याप्रमाणे हिंसेच्या प्रशिक्षणात मारण्याची कला शिकणे जरुरीचे असते, त्याचप्रमाणे अहिंसेच्या प्रशिक्षणात मरण्याची कला शिकणे जरुरीचे असते. हिंसेचा अर्थ भीतीपासून मुक्ती नसून भीतीच्या कारणांशी लढण्याकरिता शस्त्रांचा शोध आहे. उलट अहिंसकाला भीती बाळगण्याचे कारणच नाही. अहिंसेच्या पुजा-याने भीतीपासून मुक्त होण्याकरिता मोठ्यात मोठे बलिदान करण्याची तयारी ठेवण्याची क्षमता विकसित केली पाहिजे. त्याचा जमीन-जुमला, संपत्ती, जीव सर्व काही गेले तरी तो त्याची पर्वा करत नाही. ज्याने सर्व प्रकारच्या भीतींपासून मुक्ती मिळवली नाही, त्याला अहिंसेचे परिपूर्ण आचरण करता येऊ शकत नाही. अहिंसेच्या पुजा-याला एकच भीती असते व ती म्हणजे ईश्वराची. जो ईश्वराला शरण जातो, त्याला या देहापलीकडील आत्म्याचे ओझरते दर्शन झाल्याशिवाय राहत नाही आणि माणसाला एकदा आत्म्याचे ओझरते दर्शन झाले की, मग त्याला विनाशी देहाचा मोह राहत नाही. अशा प्रकारे अहिंसेचे प्रशिक्षण हिंसेच्या प्रशिक्षणापेक्षा अगदी उलट आहे.

बाह्य वस्तूंच्या रक्षणाकरिता हिंसेची गरज असते, तर आत्म्याच्या रक्षणाकरिता, आत्मसन्मानाच्या रक्षणाकरिता अहिंसेची गरज असते.

ही अहिंसा घरी बसून शिकता येऊ शकत नाही. हिच्याकरिता साहस करण्याची गरज आहे. आपली परीक्षा घेण्याकरिता धोका आणि मृत्यू यांना आव्हान देणे, देहदमन करणे आणि सर्व प्रकारच्या अडचणीना तोंड देणे या गोष्टी आपल्याला शिकाव्या लागतात. जी व्यक्ती दोन माणसांना भांडताना पाहून थरथर कापू लागते वा घाबरून पळून जाते ती अहिंसक नसते, तर भित्री असते. अहिंसक व्यक्ती तर हे भांडण थांबवण्याकरिता आपला जीव देईल. हिंसक माणसाच्या शौर्यापेक्षा अहिंसक माणसाचे शौर्य किती तरी मोठे असते. हिंसक माणसाची निशाणी त्याची तलवार, भाला अथवा रायफल वगैरे सारखी शस्त्रे असतात, तर अहिंसकाची ढाल ईश्वर असतो.

अहिंसा शिकू इच्छिणा-या व्यक्तीकरिता कोणतीही पाठशाळा नाही. परंतु मी जी तत्त्वे सांगितली, त्यानुसार असा अभ्यासक्रम सहज तयार करता येईल. (हरि, १-९-१९४०, पृ. २६८)

## शूराची अहिंसा

अहिंसेकरता कोणत्याही बाह्य प्रशिक्षणाची आवश्यकता नाही. हिच्याकरिता केवळ दोन गोष्टी पाहिजेत. बदला घेण्याकरिताही मारायचे नाही असा निर्धार, आणि सुडाची भावना मनात न ठेवता मरण पत्करण्याचे साहस. हे अहिंसेवरील कीर्तन नाही, तर हा शुद्ध तर्क आहे व एक सार्वभौम नियम या ठिकाणी सांगण्यात आला आहे. या नियमावर दृढविश्वास असेल तर कितीही उत्तेजक परिस्थिती असली, तरी माणसाने धीर सोडू नये. हिला मी वीराची अहिंसा म्हणतो. (हरि, ८-९-१९४६, पृ. २९६)

ज्या अहिंसेचे पालन केवळ व्यक्ती करू शकते, ती समाजाकरिता फारशी उपयोगी समजली जात नाही. मनुष्य सामाजिक प्राणी आहे. एखादया व्यक्तीने प्राप्त केलेल्या गोष्टींचा उपयोग इतरांनाही झाला पाहिजे. ज्या गोष्टीचे आचरण केवळ मित्रमंडळीतच करता येईल, त्या गोष्टीला केवळ अहिंसेचे स्फुल्लींगच म्हणता येईल. अहिंसा म्हणून संबोधिले जाण्याची तिची पात्रता नसते. ‘अहिंसेसमोर शत्रुत्व नाहीसे होते’ हे एक महान वचन आहे. याचा अर्थ हा आहे की मोठ्यात मोठ्या शत्रुत्वाचे शमन करण्याकरिता तेवढीच शक्तिशाली अहिंसा अपेक्षित असते.

हा गुण अंगी बाणवण्याकरिता दीर्घ अभ्यासाची आवश्यकता असते. कधी कधी या गोष्टीकरिता अनेक जन्मही लागू शकतात. परंतु एवढ्याच कारणाकरिता ही गोष्ट निरुपयोगी ठरत नाही. अहिंसेच्या मार्गावर चालत असताना वाटसरूला दररोज एकापेक्षा एक सुंदर अनुभव येतात. शिखरावर पोहोचल्यानंतर आपल्याला कोणते अद्‌भुत सौंदर्य दिसेल याची त्यामुळे त्याला जाणीव होते. यामुळे त्याचा उत्साह वाढतो. परंतु यावरून कोणी असा निष्कर्ष काढू नये की, अशा वाटसरूच्या मार्गात काटेकुटे नसतात व केवळ फुलेच फुले असतात. एक कवी म्हणतो की, ईश्वरापर्यंत पोहोचण्याचा मार्ग केवळ वीरांकरिता आहे, भेकडाचे ते काम नाही. आज वातावरण इतके विषारी झाले आहे की, पूर्वजांच्या सूज्ञपणाचे स्मरण करण्याची माणसाची तयारी नाही व अहिंसेच्या लहान लहान विविध अनुभवांकडे लक्ष द्यायची त्याला इच्छा नाही. दैनंदिन व्यवहारात एक वाक्प्रचार आहे : 'एक चांगली गोष्ट एका वाईट गोष्टीचा प्रभाव नष्ट करते.' जगाच्या कामाचा समग्र परिणाम विनाशकारी असता तर हे जग पुष्कळ पूर्वीच नष्ट झाले असते, ही गोष्ट आपल्याला का कळत नाही?. प्रेमाने, ज्याला आपण अहिंसा असेही म्हणू शकतो, या भूमंडळाला वाचवलेले आहे एवढी गोष्ट तर मान्य केलीच पाहिजे. जीवनाची ही अमूल्य देणगी मानवी जीवनाला उन्नत करत असल्यामुळे तिला परिश्रमपूर्वक विकसित केले पाहिजे. पतन सोपे आहे, परत वर उठणे सोपे नाही आणि आपल्यामधील बहुतांश लोक अनुशासनहीन असल्यामुळे दररोज लहान लहान गोष्टींकरिता भांडण्याचा व शिव्याशाप देण्याचा आम्हाला अनुभव येतो.

अहिंसेची ही देणगी कठोर शिस्तीत राहणा-या माणसाकरिता सहजसाध्य आहे. (हरि, १४-१२-१९४७, पृ. ४६८)

## २४. अहिंसेची अंमलबजावणी

जर एखादा माणूस इतरांबरोबरच्या आपल्या व्यक्तिगत संबंधात अहिंसेचा वापर करत नसेल आणि केवळ मोठमोठ्या गोष्टींकरिताच तिचा वापर करायचा असे ठरवत असेल, तर ही त्याची फार मोठी चूक होईल. दानधर्माप्रमाणे अहिंसेचीही सुरुवात स्वतःच्याच घरापासून केली पाहिजे.

जर व्यक्तींना अहिंसेचे प्रशिक्षण देणे आवश्यक असेल, तर राष्ट्राकरिता तर ही गोष्ट अधिकच आवश्यक आहे. आपल्या वर्तुळात आपण अहिंसक राहायचे

आणि बाहेर हिंसेचा अवलंब करायचा असे होऊ शकत नाही. जर कोणी असे करत असेल तर समजा की, तो आपल्या वर्तुळातही ख-या अहिंसेचे पालन करत नाही, त्याची अहिंसा केवळ देखावा मात्र आहे. उदाहरणार्थ जेव्हा तुमच्यासमोर कोणी चोर वा खुनी येतो तेव्हा तुम्ही त्याचा प्रतिकार कसा करता यावरून तुमच्या अहिंसेची परीक्षा होते. तुम्ही चोराचा प्रतिकार त्याच्या शस्त्राने कराल की तुमच्या प्रेमाने जिंकून त्याला निःशस्त्र करण्याचा प्रयत्न कराल? तुम्ही सभ्य लोकांमध्ये राहता म्हणून तुमची वर्तणूक अहिंसक म्हणता येणार नाही.

परस्परांतील सहिष्णुतेला अहिंसा म्हणतात. त्यामुळे अहिंसा हा जीवनाचा नियम आहे अशी तुमची खात्री होताच तुमच्याशी जे हिंसक व्यवहार करतात, त्यांच्याशी व्यवहार करताना तुम्ही तुमच्या अहिंसेचा प्रयोग केला पाहिजे आणि व्यक्तींप्रमाणेच हा नियम राष्ट्रांनाही लागू होतो. याकरिता प्रशिक्षणाची गरज असते यात काही संशय नाही आणि सुरुवात ही नेहमीच लहान असते, परंतु जर विश्वास असेल तर इतर सर्व गोष्टी त्यापाठोपाठ येतीलच. (हरि, २८-१-१९३९, पृ. ४४१-२)

## अहिंसेची सार्वभौमिकता

अहिंसा धर्माचे रूप तेव्हाच घेऊ शकते, जेव्हा ती सर्वव्यापी असते. माझ्या एका कृतीत मी अहिंसक आहे आणि दुसरीत हिंसक असे होऊ शकत नाही. (हरि, १२-१०-१९३५, पृ. ३७६)

अहिंसेचे वर्तन केवळ व्यक्तीच करू शकतात आणि अनेक व्यक्तींनी बनलेल्या राष्ट्राकरिता मात्र अहिंसा नाही असे म्हणणे धर्मांधता होईल.
(हरि, १२-११-१९३८, पृ. ३२८)

माझ्या मते अहिंसा कोणत्याही स्वरूपात असली तरी ती निष्क्रिय असू शकत नाही. जितके मला कळले आहे, त्यावरून अहिंसा जगातील सर्वात मोठी शक्ती आहे हे मी सांगू शकतो.... अहिंसा हा सर्वोच्च नियम आहे. माझ्या अर्ध शतकाच्या अनुभवाने मी सांगू शकतो की, मी असहाय असल्याचे वा अहिंसेची मात्रा लागू होत नसल्याचे मला कधीही जाणवले नाही.
(हरि, २४-१२-१९३८, पृ. ३९३)

## अहिंसेची मशागत

मी दुर्दम्य आशावादी आहे. व्यक्तीद्वारे अहिंसेच्या विकासाच्या असीम शक्यता आहेत, या विश्वासावर माझा आशावाद टिकलेला आहे. तुम्ही तुमच्या

जीवनात अहिंसेचा जितका विकास कराल, तितक्याच वेगात तिचा प्रसार होऊन ती तुमच्या आजूबाजूचा परिसर व्यापते आणि हळूहळू सर्व जगही आच्छादून टाकते. (हरि, २८-१-१९३९, पृ. ४४३)

माझ्या तरुणपणीच माझ्या लक्षात आले होते की, अहिंसा हा गुण व्यक्तीकरिता केवळ शांतता आणि मोक्षप्राप्ती यांच्याकरिताच आवश्यक असलेला गुण नाही. तो सामाजिक आचरणाचा नियम आहे. समाजाला जर मानवी प्रतिष्ठेने जगण्याची व शांतता प्रस्थापित करण्याची आपली युगांची तहान भागवायची असेल, तर त्याने या गुणाचे आचरण केले पाहिजे. (गांकॉग, पृ. ४२-४४, पृ. १७०-१)

दैनंदिन व्यावहारिक जीवनात अहिंसेचे आचरण केल्यानेच तिची खरी किंमत कळू शकते. तिच्यामुळे पृथ्वी स्वर्ग बनते. वास्तवात परलोकासारखी कोणतीही गोष्ट अस्तित्वात नाही. सर्व जग एकच आहे. कोणी 'इथे' आणि कोणी 'तिथे' असा काही प्रकार नाही. जीन्स यांनी सिद्ध केल्याप्रमाणे संपूर्ण विश्व, यात दुर्बिणीनेही दिसू न शकणा-या दूरवरच्या ता-यांचाही समावेश आहे, एका अणूत समाविष्ट होते.

यामुळेच गुहेत राहणारे आणि परलोकात उच्च स्थान मिळावे अशी इच्छा बाळगणारांनाच अहिंसेचा उपयोग आहे असे म्हणणे चूक आहे, असे माझे मत आहे. जे सद्‌गुण जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात उपयोगी नसतात, त्यांना काहीही किंमत नाही. (हरि, २६-७-१९४२, पृ. २४८)

## मोठ्या प्रमाणावर उपयोग

आमचे दुर्दैव आहे की शूरांच्या अहिंसेचा आपल्याला मोठ्या प्रमाणावर परिचय नाही. मोठ्या प्रमाणातील मानवसमूहाची गोष्ट सोडा, लहान लहान वर्गांकडूनही अहिंसेचे पालन होऊ शकते याबद्दलही लोकांना संशय आहे. अहिंसक व्यवहार असाधारण व्यक्तींपुरताच सीमित आहे अशी त्यांची धारणा आहे. अहिंसा जर केवळ व्यक्तींपुरतीच मर्यादित असेल तर मानवजातीकरिता हिचा काय उपयोग? (हरि, ८-९-१९४६, पृ.२९६)

## सामर्थ्य

गेल्या पन्नास वर्षांपेक्षाही अधिक काळापासून मी अविरतपणे अहिंसेचे आचरण करतो आहे व तिच्या संभावनांचे शास्त्रशुद्ध काटेकोरपणाने पालन करतो आहे. मी हिचे अनुसरण कौटुंबिक, संस्थागत, आर्थिक, आणि राजकीय अशा सर्व

क्षेत्रांत केले आहे आणि असे एकही उदाहरण मला आठवत नाही की जिथे ती अयशस्वी झाली आहे आणि जर कुठे ती अयशस्वी झाल्यासारखी दिसतही असेल, तर त्याचे कारण माझी अपूर्णता आहे असे मला वाटते. मी माझ्या पूर्णत्वाचा दावा करत नाही. परंतु ईश्वराचेच दुसरे नाव असलेल्या सत्याचा मी उत्साही शोधक आहे एवढा मात्र माझा दावा नक्कीच आहे. याच शोधाच्या दरम्यान माझा अहिंसेशी परिचय झाला. हिचा प्रचार आता माझे जीवनध्येय आहे. या ध्येयाकरिता काम करण्यापलीकडे मला जीवनात कोणताही रस नाही. (हरि, ६-७-१९४०, पृ. १८५-६)

पीडित विश्वाकरिता अहिंसेच्या अरुंद आणि सरळ वाटेशिवाय दुसरा कोणताही आशेचा किरण नाही. आपल्यामधील लाखो लोकांना हे सत्य सिद्ध करण्याला जरी आपल्या जीवनकाळात यश आले नाही तरी ते आपले अपयश असेल, या शाश्वत नियमाचे नाही. (हरि, २९-६-१९४७, पृ. २०९)

## २५. अहिंसक समाज

मी अहिंसेला केवळ व्यक्तिगत सद्‌गुण समजत नाही. हा एक सामाजिक सद्‌गुणही आहे आणि इतर सद्‌गुणांप्रमाणेच याचा विकास केला पाहिजे. हे खरे आहे की समाजाचे पारस्परिक व्यवहार बहुधा अहिंसेच्या अभिव्यक्तीनेच प्रेरित होऊन चालत असतात. मला केवळ एवढेच सांगायचे आहे की, अहिंसेचा उपयोग आणखी मोठ्या प्रमाणावर म्हणजे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर व्हायला पाहिजे. (हरि, ७-१-१९३९, पृ. ४७०)

ज्याप्रमाणे पृथ्वी गुरुत्वाकर्षणाच्या प्रभावाने आपल्या कक्षेत स्थिर आहे, त्याचप्रमाणे संपूर्ण समाज अहिंसेच्या सूत्रात बांधलेला आहे. परंतु जेव्हा गुरुत्वाकर्षणाच्या नियमाचा शोध लागला, तेव्हा त्या नियमाच्या शोधाचे असे काही परिणाम दिसून आले की ज्यांचे ज्ञान आमच्या पूर्वजांना नव्हते. अशाच प्रकारे अहिंसेच्या नियमानुसार जेव्हा विचारपूर्वक समाजरचना केली जाईल, तेव्हा त्या संरचनेची भौतिक वैशिष्ट्ये आजच्यापेक्षा वेगळी असतील. परंतु अहिंसेवर आधारित सरकार कसे असेल याचे पूर्वानुमान मी करू शकत नाही.

आज आपल्या चोहोबाजूला जे काही घडत आहे, ते अहिंसेच्या नियमाची उपेक्षा करून हिंसाच जणू काही शाश्वत नियम आहे असे समजून तिलाच सिंहासनाधिष्ठित करण्यासारखे आहे. (हरि, ११-२-१९३९, पृ. ८)

अहिंसेवर आधारित समाज अशाच गटांचा असू शकेल की, जे स्वेच्छापूर्वक सहकार्य व सन्माननीय आणि शांततापूर्वक सहअस्तित्व या अटींवर गावात राहतात. (हरि, १३-१-१९४०, पृ. ४१०-१)

**सरकार**

सरकार सर्व लोकांचे प्रतिनिधित्व करत असल्यामुळे संपूर्णपणे अहिंसेवर आधारित सरकार यशस्वी होऊ शकत नाही. तशा प्रकारच्या सुवर्णयुगाची मी आज कल्पना करू शकत नाही. परंतु प्रामुख्याने अहिंसेवर आधारित समाजाची कल्पना मात्र मी आज नक्कीच करू शकतो आणि त्याकरिता मी प्रयत्नशील आहे. (हरि, ९-३-१९४०, पृ. ३१)

आदर्श समाजात सरकार नावाची काही गोष्ट असली पाहिजे की नाही हा प्रश्न उरतोच. या वेळी त्या गोष्टीची काळजी करण्याची गरज नाही, असे मला वाटते. परंतु अशा समाजाकरिता आपल्याला काम करायचे असेल तर तो तेवढ्याच प्रमाणात अस्तित्वात येईल, जेवढ्या प्रमाणात लोकांना त्याचा लाभ होईल. युक्लिडच्या रेषेला रुंदी नसते आणि तशी रेषा काढण्यात आजपर्यंत तरी कोणालाही यश आलेले नाही व पुढेही कोणाला यश येऊ शकणार नाही. परंतु तरीही त्या आदर्शाचा विचार मनात ठेवून भूमितीत आपण इतकी प्रगती करू शकलो. जे याबाबतीत खरे आहे, तेच प्रत्येक आदर्शाच्या बाबतीत खरे आहे.

**अराजक**

जगात कुठेही सरकारशिवाय राष्ट्र अस्तित्वात नाही, ही गोष्ट आपण लक्षात ठेवली पाहिजे. परंतु असे राष्ट्र कधी काळी अस्तित्वात येणारच असेल तर ते भारतातच घडू शकेल. कारण भारतच असा देश आहे जिथे कमीत कमी असा प्रयत्न करण्यात आलेला आहे. आवश्यक तेवढ्या प्रमाणात ते शौर्य दाखवण्यात आपल्याला अजून तरी यश मिळालेले नाही आणि ते ध्येय साध्य करण्याचा एकच उपाय आहे. ज्यांचा त्या ध्येयावर विश्वास असेल त्यांनी तसे वागणे हा तो उपाय आहे. असे करण्याकरिता ज्याप्रमाणे आपण तुरुंगाच्या भीतीवर विजय मिळवला होता त्याप्रमाणे आपल्याला मृत्यूच्या भीतीवर विजय मिळवावा लागेल.
(हरि, १५-९-१९४६, पृ. ३०९)

## लोकशाही आणि अहिंसा

युद्धविज्ञान आम्हाला विशुद्ध हुकुमशाहीकडे घेऊन जाते. अहिंसेचे शास्त्रच आम्हाला शुद्ध लोकशाहीकडे नेऊ शकते. (हरि, १५-१०-१९३८, पृ. २९०)

लोकशाही आणि हिंसा एकत्र चालू शकत नाहीत. ज्या राष्ट्रांत आज नाममात्र लोकशाही आहे, त्यांनी एक तर उघडपणे हुकुमशाहीचा पुरस्कार केला पाहिजे वा पूर्णपणे अहिंसक होण्याचे धैर्य दाखवले पाहिजे. (हरि, १२-११-१९३८, पृ. ३२८)

राष्ट्रीय पातळीवर अहिंसेला मान्यता दिल्याशिवाय संवैधानिक वा लोकशाहीवादी सरकार नावाची कोणतीही गोष्ट कार्यरत असू शकत नाही, या दृष्टिकोनावर विश्वास असल्यामुळे मी माझी सर्व शक्ती जीवनाचा नियम म्हणून - वैयक्तिक, सामाजिक, राजकीय, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय - अहिंसेच्या प्रसाराकरिता लावत आहे.

मला असे वाटते की, अंधुकसा का होईना मला प्रकाश दिसला आहे. संपूर्ण नियमाची मला माहिती नसल्यामुळे मी सावधगिरीने लिहीत आहे. माझ्या प्रयोगाच्या यशाची मला ज्याप्रमाणे जाणीव आहे; त्याचप्रमाणे त्यांच्या अपयशांचीही मला कल्पना आहे. परंतु मला मिळालेले यश माझी आशा जिवंत ठेवण्याकरिता पुरेसे आहे.

मी अनेकदा सांगितले आहे की, माणसाने जर स्वतःच्या साधनांची काळजी घेतली, तर साध्य स्वतःच स्वतःची काळजी घेईल. अहिंसा हे साधन आहे आणि संपूर्ण स्वातंत्र्य हे साध्य. आंतरराष्ट्रीय संघाची तेव्हाच स्थापना होऊ शकेल, जेव्हा त्याची लहान मोठी सर्व सदस्य राष्ट्र पूर्णपणे स्वतंत्र असतील. त्या स्वातंत्र्याचे स्वरूप संबंधित राष्ट्रांनी अंगीकारलेल्या अहिंसेप्रमाणे राहील. एक गोष्ट नक्की की अहिंसेवर आधारित समाजात, लहानात लहान राष्ट्रालाही मोठ्यात मोठ्या राष्ट्राप्रमाणे असल्यासारखा अनुभव येईल. श्रेष्ठत्व किंवा कमीपणाची भावना नाहीशी होऊन जाईल.

....माझ्यासारख्या अहिंसेला समर्पित व्यक्तीकरिता स्पष्ट आणि अपरिहार्य निष्कर्ष असा आहे की, जोवर अहिंसेला केवळ एक नीती म्हणून नाही तर एक जिवंत शक्ती म्हणून, एक अनुल्लंघनीय धर्म म्हणून मान्यता मिळत नाही; तोपर्यंत संवैधानिक वा लोकशाहीवादी सरकार एक दूरवरचे स्वप्नच राहील. मी सार्वभौम अहिंसेबद्दल बडबड करत असलो तरी माझा प्रयोग भारतापर्यंतच सीमित आहे. जर तो यशस्वी झाला, तर जग त्याचा सहज स्वीकार करेल. परंतु यात एक

फार मोठा 'परंतु' आहे. याला किती वेळ लागेल याची मला चिंता नाही. निबिड काळोखातही माझी आशा सदैव प्रकाश दाखवत असते. (हरि, ११-२-१९३९, पृ.८)

## शक्तीचा प्रयोग

अहिंसेचा स्वभावच असा आहे कि, ती शक्ती हिरावून घेऊ शकत नाही आणि ते तिचे ध्येयही नाही. परंतु अहिंसा यापेक्षा अधिक करू शकते, शासनयंत्रणा ताब्यात न घेता ती शक्तीचे परिणामकारक रीतीने नियंत्रण करू शकते आणि तिला मार्गदर्शन करू शकते. हे तिचे सौंदर्य आहे.

याला अर्थातच अपवाद आहेत. लोकांचा अहिंसक असहकार जर परिपूर्ण असला तर प्रशासन कोलमडून जाईल वा परकीय सत्तेच्या आक्रमणाच्या प्रभावामुळे प्रशासन कोलमडले आणि पोकळी निर्माण झाली तर जनप्रतिनिधी त्याची जागा घेतील व ती पोकळी भरून काढतील. सैद्धांतिक दृष्टीने हे शक्य आहे.

परंतु सत्तेचा उपयोग हिंसकच असला पाहिजे हे आवश्यक नाही. वडील मुलांवर सत्ता गाजवत असतात, ते त्यांना शिक्षाही करतात परंतु त्यात हिंसेचा अवलंब नसतो. शक्तीचा सर्वात प्रभावी उपयोग तो असतो जो सर्वात कमी त्रासदायक असतो. योग्य पद्धतीने करण्यात आलेला शक्तिप्रयोग तो असतो जो फुलाप्रमाणे जनजीवनाला स्पर्श करतो, कोणाला त्याचे ओझे जाणवतही नाही.

लोकांनी काँग्रेसची सत्ता स्वेच्छेने स्वीकारली. एकापेक्षा अधिक वेळा मला हुकूमशहाचे अधिकार देण्यात आले होते. परंतु प्रत्येकाला माहीत होते की माझी शक्ती त्यांच्या इच्छापूर्वक स्वीकृतीवर अवलंबून होती. ते कोणत्याही क्षणी मला दूर करू शकत होते व किंचितही कुरकूर न करता मी दूर झालो असतो.

पैगंबर आणि महामानव हे युगायुगात एखाद्याच वेळी जन्म घेत असतात. परंतु एक व्यक्ती जरी अहिंसेच्या परिपूर्ण आदर्शापर्यंत पोहोचू शकली तरी ती संपूर्ण समाजाला प्रभावित करते. एकदा येशूने वाट प्रकाशित केल्यानंतर त्याचे बारा शिष्य त्याच्या अनुपस्थितीतही त्याच्या मिशनला पुढे नेत राहिले.

विजेचा नियम शोधून काढण्याकरिता वैज्ञानिकांच्या अनेक पिढ्यांचे श्रम आणि प्रतिभा खर्ची पडली होती. परंतु आज प्रत्येक माणूसच नाही तर मुलेसुद्धा विजेचा वापर करू शकतात. त्याचप्रमाणे एकदा आदर्श राज्य अस्तित्वात आले की, ते चालवण्याकरिता परिपूर्ण प्रशासकाची गरज नसते. सुरुवात करण्याकरिता सामाजिक जाणीव निर्माण करण्याची तेवढी गरज असते. इतर गोष्टी आपोआप होतील.

आपल्या देशाचेच उदाहरण घेऊ या. खरे भांडवल हे सोने अथवा चांदी नसून, हात, पाय आणि बुद्धी यांच्याद्वारे तुम्ही करत असलेले श्रम हे आहे, हे सत्य मी कामगार वर्गासमोर मांडले होते. एकदा कामगारांमध्ये ही जाणीव निर्माण झाली की, त्यामुळे निर्माण झालेल्या शक्तीचा उपयोग करण्याकरिता माझ्या उपस्थितीची गरज भासणार नाही. (युन्यू, पृ. ९१-९३)

## २६. अहिंसक राज्य

'तुम्ही समूहाला अहिंसा शिकवू शकत नाही, ती केवळ व्यक्तींकरिता व तीही अगदी अपवादात्मक प्रकरणी शक्य आहे' असे म्हणून अनेक लोकांनी हात झटकले आहेत. माझ्या मते ही फार मोठी आत्मवंचना आहे. मानवजात जर स्वभावतः अहिंसक नसती तर युगांपूर्वीच तिने स्वतःचा नाश करून घेतला असता. परंतु हिंसा आणि अहिंसेच्या द्वंद्वात अंतिमतः अहिंसेचा नेहमीच विजय झालेला आहे.

वास्तवात राजकीय उद्दिष्टांच्या पूर्तीचे साधन म्हणून अहिंसेच्या उपयोगाचा प्रचार करण्याकरिता आपल्याजवळ पुरेसे धैर्य नाही व त्याकरिता आपण पुरेसा जोर लावला नाही हेच सत्य आहे. (यंग, २-१-१९३०, पृ. ४)

### राजकीय शक्ती

माझ्याकरिता राजकीय सत्ता साध्य नाही तर जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आपल्या प्रतिनिधींद्वारे आपल्या परिस्थितीत सुधारणा करण्याचे ती साधन आहे. राजकीय शक्तीचा अर्थ आहे राष्ट्रीय प्रतिनिधींच्या माध्यमातून राष्ट्रीय जीवनाचे नियमन करण्याचे सामर्थ्य. राष्ट्रीय जीवन स्वनियंत्रित होण्याइतके परिपूर्ण झाले तर प्रतिनिधित्वाची आवश्यकताच राहणार नाही. ती प्रबुद्ध अराजकाची परिस्थिती असेल. अशा परिस्थितीत प्रत्येक व्यक्ती स्वतःचीच शासक असते. शेजा-याला कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही अशा प्रकारे ती स्वतःला शासित करत असते.

त्यामुळे आदर्श राज्यात कोणतीही सत्ता नसते कारण तिथे कोणतेही राज्य नसते. परंतु जीवनात कधीही पूर्णपणे आदर्श साध्य होत नसते. त्यामुळे थोरोच्या अभिजात वचनाप्रमाणे जे शासन किमान शासन करते, ते शासन सर्वोत्कृष्ट असते. (यंग, २-७-१९३१, पृ. १६२)

## भांडवलशाही अथवा विश्वस्तता

राज्याने हिंसेद्वारे भांडवलशाहीला दडपले तर ते स्वतः हिंसाचक्रात सापडल्याशिवाय राहणार नाही व त्याला कधीही अहिंसा विकसित करता येणार नाही, असा माझा ठाम विश्वास आहे. केंद्रीभूत आणि सुसंघटित पद्धतीने राज्य हिंसेचे प्रतिनिधित्व करत असते. व्यक्तीला आत्मा असतो, परंतु राज्य आत्माविहीन तंत्र असल्यामुळे व हिंसेवरच त्याचे अस्तित्व अवलंबून असल्यामुळे त्याला हिंसेद्वारे कधीच जिंकता येत नाही. त्यामुळे मला विश्वस्तता अधिक पटते.

ज्यांचे राज्याशी मतभेद असतात, त्यांच्या विरोधात सरकार हिंसेचा अतिरिक्त अवलंब करू शकते. ही भीती नेहमीच कायम असते. संबंधित लोक जर विश्वस्ताप्रमाणे वागले तर ती माझ्याकरिता निश्चितच अतिशय आनंदाची गोष्ट होईल. परंतु ते जर असे करू शकले नाहीत, तर किमान हिंसेद्वारे त्यांना त्यांच्या सत्तेपासून दूर करावे लागेल.

त्यामुळेच गोलमेज परिषदेच्या वेळी मी म्हणालो होतो की, प्रत्येक हितसंबंधाची चौकशी करण्यात आली पाहिजे व गरज वाटल्यास प्रत्येक प्रकरणाच्या गांभीर्यानुसार त्यांना नुकसान भरपाईसह/शिवाय ताब्यात घेता आले पाहिजे.

व्यक्तिशः मला राज्याच्या हातात सत्ता केंद्रित होणे पसंत नाही. खाजगी हितापासून होणारी हिंसा राज्याच्या हिंसेपेक्षा कमी हानिकारक असल्यामुळे विश्वस्ततेच्या भावनेचा विस्तार केला जावा असे मला वाटते. परंतु अपरिहार्य झाल्यास मी राज्याच्या किमान स्वामित्वाचे समर्थन करीन.

माणूस आपल्या स्वभावानुसार आपले जीवन व्यतीत करत असतो हे मला माहीत असल्यामुळे त्याने आपल्या इच्छाशक्तीनुसार जीवन व्यतीत करणे अधिक चांगले असे मला वाटते. माझा असाही विश्वास आहे की, ज्यामुळे किमान शोषण होईल अशा प्रकारे माणूस आपली इच्छाशक्ती विकसित करू शकतो.

लोकांचे शोषण किमान करण्याकरिता वरवर पाहता जरी राज्य प्रयत्नशील असले तरी त्यामुळे वैयक्तिकता नष्ट होत असल्यामुळे मानवजातीची सर्वात मोठी हानी होते व ही वैयक्तिकताच मानवजातीच्या विकासाची किल्ली असल्यामुळे राज्याच्या शक्तीत वाढ होण्याची मला फार भीती वाटते.

आमच्यात असे अनेक लोक आहेत, ज्यांनी विश्वस्ततेचा स्वीकार केला आहे परंतु वास्तवात राज्य निर्धनांकरिता संचालित झालेले दिसेल असे एकही

उदाहरण नाही. (मारी, ऑक्टोबर १९३५, पृ. ४१२)

**अहिंसक स्वराज्य**

अहिंसेवर आधारित स्वराज्यात लोकांना आपल्या अधिकारांची जाणीव असण्याची गरज नसते. त्यांना आपल्या कर्तव्याचे भान असले की तेवढे पुरे होते. त्यामुळे ख-या नागरिकाचे हक्क त्याच नागरिकांकरिता असतात जे त्या राज्याबद्दलच्या कर्तव्यांची परिपूर्ती करतात आणि अशा प्रकारे मिळालेल्या हक्कांना तेच न्याय देऊ शकतात.

प्रत्येकाला खोटे बोलण्याचा वा गुंडगिरी करण्याचा अधिकार आहे. परंतु या हक्काचा वापर करणा-यांकरिता आणि समाजाकरिताही हा अधिकार हानिकारक आहे. परंतु जो सत्य आणि अहिंसेचे पालन करतो त्याला प्रतिष्ठा मिळते आणि प्रतिष्ठेमुळे अधिकारही मिळतात आणि ज्या लोकांना कर्तव्य केल्यामुळे अधिकार मिळतात ते लोक आपल्या अधिकारांचा उपयोग केवळ समाजसेवेसाठीच करत असतात, स्वतःकरिता कधीही नाही.

लोकराज्य म्हणजे समाजातील प्रत्येक व्यक्तीचे स्वराज्य आणि समाजातील घटक म्हणून जेव्हा प्रत्येक नागरिक आपले कर्तव्य पार पाडतो, तेव्हाच असे स्वराज्य येते. अशा स्वराज्यात कोणीही आपल्या अधिकारांचा विचार करत नाही. जेव्हा त्या अधिकारांची गरज असते तेव्हा आपले कर्तव्य अधिक चांगल्या रीतीने पार पाडता यावे म्हणून ते मिळतात. (हरि, २५-३-१९३९, पृ. ६४)

अहिंसेवर आधारित स्वराज्यात कोणीही कोणाचा शत्रू नसतो, सार्वजनिक ध्येयाकरिता प्रत्येक व्यक्ती आपल्या वाट्याचे कर्तव्य बजावत असते, प्रत्येकाला लिहिता वाचता येते व प्रत्येकाचे ज्ञान दररोज वाढत असते. आजार आणि रोगराईचे प्रमाण किमान झालेले असते. कोणीही भिकारी नसतो व श्रमिकाला केव्हाही रोजगार उपलब्ध असतो. अशा शासनात जुगार, मद्यपान वा अनैतिकता आणि वर्ग-द्वेष यांना कोणतेही स्थान नसते.

श्रीमंत माणसे आपल्या संपत्तीचा उपयोग सूज्ञपणे आणि काळजीपूर्वक करतील आणि डामडौल वा भोगविलासाकरिता आपल्या संपत्तीचा उपयोग करणार नाहीत. मोजक्याच श्रीमंत लोकांनी रत्नजडित महालात राहावे आणि प्रकाश आणि वा-याचाही नीटपणे शिरकाव होणार नाही अशा पडझड झालेल्या झोपड्यांमध्ये कोट्यवधी लोकांनी राहावे असे घडू नये....

अहिंसक स्वराज्यात न्याय्य हक्कांवर कधीही अतिक्रमण होत नाही; उलटपक्षी कोणालाही अन्याय्य हक्क मिळू शकत नाहीत. सुसंघटित राज्यात अधिकार बळकावून घेणे अशक्य असेल व त्यामुळे अशा प्रकारे अधिकार बळकावून घेणा-यांपासून ते अधिकार परत हस्तगत करण्याकरिता हिंसेचा वापर करण्याची वेळच अशा राज्यात येणार नाही. (हरि, २५-३-१९३९, पृ. ६५)

## विकेंद्रीकरण

भारताला जर अहिंसेच्या मार्गावर आपला विकास करून घ्यायचा असेल तर त्याला अनेक गोष्टींचे विकेंद्रीकरण करावे लागेल अशी माझी सूचना आहे. पुरेशा शक्तीशिवाय केंद्रीकरण टिकू शकत नाही व त्याचा बचावही करता येत नाही. साध्या घरांमध्ये चोरण्यासारखे काहीही नसते आणि म्हणून तिथे पोलिसांची गरज नसते. परंतु श्रीमंताच्या महालांचे डाकूंपासून संरक्षण करण्याकरिता ताकदवान पहारेक-यांची गरज असते. हीच गोष्ट मोठ्या कारखान्यांनाही लागू होते. सैनिक, नौदल आणि वायुसेना यांनी सुसज्ज असलेल्या शहरी भारतापेक्षा ग्रामीण आधारावर संघटित भारताला बाह्य आक्रमणाचा धोका कमी असेल. (हरि, ३०-१२-१९३९, पृ. ३९१)

एक व्यवस्था म्हणून केंद्रीकरण आणि अहिंसक समाजरचना यांच्यात सुसंगती राहू शकत नाही. (हरि, १८-१-१९४२, पृ. ६)

## आधुनिक राज्य

शक्तीवर आधारित आधुनिक राज्य बाह्य वा आंतरिक अव्यवस्थेच्या शक्तींशी अहिंसक मार्गाने संघर्ष करू शकत नाही. माणूस एकाच वेळी देवाची आणि संपत्तीची पूजा करू शकत नाही, त्याचप्रमाणे एकाच वेळी तो शांत आणि संतापलेला असू शकत नाही. असा दावा करण्यात येतो की, अहिंसेवर आधारित राज्य विश्वातील गटबाजीचा अहिंसक प्रतिकार करू शकते. असे म्हणतात की अशोकाचे राज्य तसेच होते. अशी अजूनही उदाहरणे देता येऊ शकतील. परंतु अशोकाचे राज्य अहिंसेवर आधारित नव्हते असे जरी सिद्ध झाले, तरी अहिंसेच्या बाजूचा युक्तिवाद दुबळा ठरत नाही. त्याची परीक्षा गुणावगुणाच्या आधारावर करावी लागेल....

लष्करीदृष्ट्या मजबूत असलेले राष्ट्र अहिंसेचा दावा करू शकत नाही. याप्रमाणे रशियाला जर अहिंसेचा दावा करायचा असेल तर त्याला आपल्या संपूर्ण

लष्कराचा त्याग करावा लागेल. खरी गोष्ट ही आहे की, लष्करीदृष्ट्या बलाढ्य असलेल्या राष्ट्रांनी आपल्या मतात बदल केला तर ते जगासमोर आणि आपल्या विरोधकांसमोर अहिंसेचे अधिक चांगले प्रदर्शन करू शकतील.
(हरि, १२-५-१९४६, पृ. १२८)

## २७. हिंसा आणि आतंकवाद

माझा अनुभव मला शिकवतो की, हिंसेचा अवलंब करून सत्य कधीही प्रस्थापित करता येऊ शकत नाही. ज्यांचा आपल्या सध्याच्या न्यायोचिततेवर विश्वास आहे, जे गुन्हेगारी स्वरूपाचा कायदेभंग कधीही करू शकत नाहीत; त्यांनी असीम धैर्य ठेवणे जरुरीचे असते आणि तेच लोक सविनय कायदेभंग करू शकतात. (यंग, २८-४-१९२०, पृ. ८)

### लोकहिंसा

मला जर सरकारच्या सुसंघटित हिंसेशी काहीही देणेघेणे नसेल तर जनतेच्या असंघटित हिंसेशीही माझे काहीही देणेघेणे असू शकत नाही. या दोघांमध्ये चिरडले जाण्याची माझी तयारी आहे. (यंग, २४-११-१९२१, पृ. ३८२)

माझ्या दृष्टीने आमच्या मार्गात शासकीय हिंसेचा जेवढा अडसर आहे तेवढाच अडसर लोकप्रिय हिंसेचाही आहे आणि खरे सांगायचे तर सरकारी हिंसेचा सामना करताना मला जनतेचा जेवढा पाठिंबा मिळेल; तेवढा लोकहिंसेचा प्रतिकार करताना मिळणार नसल्यामुळे सरकारी हिंसेचा प्रतिकार मी लोकहिंसेच्या प्रतिकारापेक्षा अधिक चांगला करू शकतो. (यंग, २४-४-१९३०, पृ. १४०)

मी खात्रीपूर्वक सांगू शकतो की, हिंसेचा मार्ग कोणत्याही धर्मात सांगितलेला नाही आणि काही प्रकरणी हिंसेला परवानगी देण्यात आलेली असली, तरी बहुतेक प्रकरणी सर्व धर्मांमध्ये अहिंसा बंधनकारक आहे. परंतु भारतासमोर अजून मी अहिंसेचा अंतिम नमुना ठेवलेला नाही. (यंग, २-३-१९२२, पृ. १३०)

हिंसेवर माझा आक्षेप आहे, कारण जेव्हा ती चांगले करण्याचा प्रयत्न करताना दिसते तेव्हाही ते क्षणिक असते; परंतु तिच्याद्वारे घडणा-या वाईट गोष्टी मात्र कायम टिकणा-या असतात. (यंग, २१-५-१९२५, पृ. १७८)

### हिंसेवर श्रद्धा नाही

जेवढ्या प्रमाणात आपल्या ध्येयाला हिंसेचा आधार असेल तेवढ्याच प्रमाणात

त्या ध्येयाची हानी होते असा माझा अढळ विश्वास आहे. धडधडीतपणे या उलट घटना घडताना दिसत असतानाही मी हे सांगतो आहे. माझ्या कामात अडथळा आणणा-या माणसाला जर मी मारले तर मला एका खोट्या सुरक्षिततेचा आभास होऊ शकतो. परंतु मी या अडथळ्याचे मूळ कारण दूर केलेले नसल्यामुळे ती सुरक्षितता अल्पकालीन असेल. कालांतराने इतर माणसे नक्कीच माझ्याविरुद्ध उठाव करण्याचा प्रयत्न करतील. त्यामुळे माझ्या कामात अडथळा आणणा-या माणसाला वा माणसांना मारणे हे माझे काम नसून; ते माझ्या कामात का अडथळा आणतात याच्या कारणाचा शोध घेणे व त्यावरील उपाय योजणे हे माझे काम आहे. (यंग, २६-२-१९३१, पृ. १)

माझा सशस्त्र उठावावर विश्वास नाही. ज्या व्याधींवरील उपाय म्हणून त्यांचा उपयोग करण्यात येतो त्यापेक्षाही हा उपाय भयानक आहे. बदला, उतावीळपणा आणि संताप यांचे हे चिन्ह आहे. हिंसेचा मार्ग दीर्घकालीन दृष्टीने कधीही हितावह होऊ शकत नाही. (यंग, ९-६-१९२०, पृ. ३)

## क्रांतिकारक

क्रांतिकारकाच्या शौर्य आणि त्याग या गोष्टी मी नाकारत नाही. परंतु शौर्य आणि त्याग यांचा चुकीच्या कारणाकरिता उपयोग केल्यामुळे श्रेष्ठ प्रकारच्या शक्तीचा दुरुपयोग होतो व चांगल्या ध्येयाची हानी होते. शिवाय वाईट उद्दिष्टाकरिता दाखवण्यात आलेले शौर्य व त्याग यांच्यामुळे जनतेचे लक्ष चांगल्या कामावरून विचलित होते व वाईट गोष्टीला प्रतिष्ठा प्राप्त होते ही गोष्ट वेगळीच.

शूर आणि स्वार्थत्यागी क्रांतिकारकासमोर ताठ उभा राहण्यात मला लाज वाटत नाही, कारण तितक्याच मोठ्या प्रमाणात मी त्यांच्यासमोर अहिंसक शौर्य आणि बलिदानाच्या भावनेचे प्रदर्शन करू शकतो व त्यावर कोणत्याही निर्दोष माणसाच्या रक्ताचा डागही लागलेला नसतो. एका निरागस माणसाचे बलिदान हे इतरांना मारत मारत मरण पत्करून स्वतःची आहुती देणा-या लाखो लोकांच्या बलिदानापेक्षा किती तरी अधिक प्रभावी असते. निरागस माणसाने स्वेच्छापूर्वक केलेला त्याग हे उन्मत्त जुलमाला देण्यात आलेले सर्वात प्रभावी उत्तर आहे व माणसाने वा देवानेही याहून अधिक प्रभावी उत्तराची कल्पना केलेली नसेल.

स्वराज्याच्या कामात निर्माण होत असलेल्या तीन अडथळ्यांकडे मी क्रांतिकारकांचे लक्ष वेधू इच्छितो - चरख्याच्या प्रसारकार्यात अडथळा, हिंदू आणि

मुसलमानांमध्ये बेबनाव आणि दलित वर्गांवरील अमानवीय प्रतिबंध. हे काम कदाचित पुरेसे नेत्रदीपक नसले तरी चिकाटीने कराव्या लागणा-या या रचनात्मक कार्यात क्रांतिकारकांनी सहभागी व्हावे, अशी त्यांना माझी आग्रहपूर्वक विनंती आहे. परंतु याच कारणामुळे या कामाकरिता शौर्यपूर्ण धैर्याची, शांत आणि चिकाटीपूर्ण प्रयत्नांची व स्वतःला पुसून टाकण्याची गरज असते व सर्वश्रेष्ठ क्रांतिकारकातच हे सामर्थ्य असू शकते. उतावीळपणामुळे क्रांतिकारकाची दृष्टी धूसर होते व तो मार्गावरून भरकटतो.

हसत हसत फासावर चढून जाऊन स्वतःचे बलिदान देण्याच्या आकांक्षेपेक्षा उपाशी जनतेत राहून निरस आणि कीर्तीपासून दूर असलेला व स्वतःवर लादलेल्या उपासमारीमुळे मृत्यू पत्करावा लागणारा हा मार्ग केव्हाही अधिक वीरोचित आहे. (यंग, १२-२-१९२५, पृ. ६०)

## पाशवीपणाला प्रतिबंध

माझ्या देशबांधवांची पीडा दूर करण्यापेक्षा माणसाच्या स्वभावातील पाशवीपणाला नाहीसा करण्याची मला अधिक काळजी आहे.... मला माहीत आहे की जे लोक स्वतः होऊन दुःख भोगायला तयार होतात ते स्वतःला आणि मानवजातीला वर नेतात. परंतु मला हेही माहीत आहे की, जे लोक आपल्या विरोधकावर विजय मिळवण्याच्या साहसी प्रयत्नात अथवा दुर्बल राष्ट्रांचे वा माणसांचे शोषण करण्याकरिता रानटीपणाकडे वळतात, ते केवळ स्वतःचेच अधःपतन करत नसतात तर मानवजातीचेही अधःपतन करतात. (यंग, २९-१०-१९३१, पृ.३२५)

वधस्तंभावरील मृत्यूची भुरळ पडावी असे त्यात काहीही नाही; अनेकदा तर असा मृत्यू हा मलेरियाग्रस्त प्रदेशातील कंटाळवाण्या आणि मेहनतीच्या जीवनापेक्षा किती तरी सोपा असतो.... माझ्या क्रांतिकारक मित्रांना मी समजावत असतो की, वधस्तंभावरील मृत्यूमुळे तेव्हाच देशसेवा होऊ शकते जेव्हा बळी जाणारी व्यक्ती पूर्णपणे निष्कलंक असते. (यंग, ९-४-४१९२५, पृ. १२४)

....प्रत्येक युरोपीय गोष्टीची मी निंदा करत नाही. परंतु चांगल्या उद्दिष्टांकरिता गुप्तपणे करण्यात आलेले खून आणि अनुचित पद्धती यांची मी सदैव निंदा करत आलो आहे.... एखाद्या पाशवी प्रवृत्तीविरुद्ध सशस्त्र कट म्हणजे दानवीपणाचा दानवीपणाशी संघर्ष. माझ्याकरिता एकच दानव पुरेसा असल्यामुळे त्यांची संख्या वाढवण्याची माझी इच्छा नाही.... (यंग, ९-४-४१९२५, पृ. १२५)

भित्रेपणाची, मग तो तात्त्विक असो वा अन्य प्रकारचा, मला फार घृणा आहे आणि क्रांतिकारी कारवायांमुळे भित्रेपणा नाहीसा झाला असे मला कोणी पटवून दिले, तर त्यामुळे त्यांच्या कृत्याबद्दलचा माझा घृणाभाव कमी होण्याला मदत होईल. हे खरे की तात्त्विक दृष्टीने त्यानंतरही मी त्यांचा विरोध करत राहीन....

जीव घेणे, खून करणे वा आतंकवादी कृत्य करणे या गोष्टी चांगल्या आहेत असे मी कोणत्याही परिस्थितीत मान्य करू शकत नाही. हुतात्म्यांचे रक्त सांडल्यानंतर विचार फार लवकर परिपक्व होतात ही गोष्ट मात्र मला मान्य आहे. परंतु जी व्यक्ती सेवा करता करता जंगली तापामुळे हळूहळू मरते, तीही तशीच हुतात्मा असते जशी फासावर चढणारी व्यक्ती आणि फासावर चढणा-यावर एखाद्या निर्दोष माणसाच्या खुनाचा आरोप असेल, तर त्याचे विचार परिपक्व होण्याच्या लायकीचेच नव्हते असे मी समजेन.

## इतिहासातील नायक

....(क्रांतिकारकांच्या) कार्याची तुलना गुरू गोविंदसिंह वा वाशिंग्टन वा गॅरिबाल्डी वा लेनीन यांच्याशी करणे अतिशय भ्रामक आणि धोक्याचे आहे. परंतु अहिंसेच्या कसोटीवर कसले असता त्यांच्या देशात व त्यांच्या काळात मी असतो तर ते यशस्वी आणि शूर पुरुष असले तरी ते पथभ्रष्ट देशभक्त आहेत, असेच त्यावेळी मी निःसंकोचपणे म्हणालो असतो....

जोपर्यंत या नायकांच्या कार्याच्या सविस्तर वर्णनाचा प्रश्न आहे, माझा इतिहासावर विश्वास नाही. मी इतिहासातील ढोबळ गोष्टींवर विश्वास ठेवतो आणि माझ्या आचरणाकरिता त्यापासून योग्य तो धडा घेतो. जेव्हा या ढोबळ गोष्टी जीवनाच्या नियमांशी विसंगत असतात, तेव्हा त्यांची पुनरावृत्ती करण्याची माझी इच्छा नसते. इतिहासाने दिलेल्या तुटपुंज्या माहितीच्या आधारावर या लोकांबद्दल कोणताही निर्णय घेण्याची माझी इच्छा नाही.

मी कमाल पाशा व डी व्हॅलेरा यांच्याबद्दलही निर्णय घेऊ शकत नाही. परंतु अहिंसेवर माझा संपूर्ण विश्वास असल्यामुळे व युद्धावर त्यांची श्रद्धा असल्यामुळे ते माझे मार्गदर्शक बनू शकत नाहीत. माझा कृष्णावरही विश्वास आहे, परंतु माझा कृष्ण ब्रह्मांडाचा स्वामी आहे आणि आपणा सर्वांचा स्रष्टा, पालनकर्ता आणि संहारकही आहे. तो स्रष्टा आहे, म्हणूनच तो संहारही करू शकतो....

**क्रांती आत्मघातक**

माझ्या जीवनाचे तत्त्वज्ञान शिकवण्याची पात्रता माझ्यात नाही. मी ज्या तत्त्वज्ञानावर विश्वास ठेवतो, त्यानुसार आचरण करता येण्याएवढी पात्रता मी मोठ्या मुश्किलीने मिळवली आहे.... माझे संपूर्ण तत्त्वज्ञान नाकारण्यास क्रांतिकारी स्वतंत्र आहेत.... परंतु भारताची तुलना तुर्कस्तान, आयर्लंड वा रशिया सारख्या देशांशी होऊ शकत नाही आणि राष्ट्राच्या आजच्या परिस्थितीत क्रांतिकारी कार्य संपूर्णपणे आत्मघातकीपणाचे होईल. दीर्घकालीन दृष्टीने जरी पाहिले तरी इतक्या विशाल, अतिशय वाईट पद्धतीने विभाजित, भयानक दारिद्र्य व दडपशाही यांनी पिचलेल्या या देशात क्रांतिकारी कार्याला यश कसे येऊ शकेल? (यंग, ९-४-४१९२५, पृ. १२६)

विरोधकाची हत्या करत असताना क्रांतिकारक असे गृहीत धरत असतो की, त्यामुळे त्याच्या आत्म्याचे कल्याण होईल.... विरोधकाच्या आत्म्याचा विचार करणारा एकही क्रांतिकारी मला आढळला नाही. त्याचा एकमेव हेतू देशाचे कल्याण करण्याचा असतो. मग तसे करताना विरोधकाचे शरीर व आत्मा दोन्हीही नष्ट झाले तरी त्याला त्याची फिकीर नसते. (यंग, ३०-४-१९२५, पृ. १५३)

अराजकवाद्याच्या देशप्रेमामुळे मला त्याच्याबद्दल आदर वाटतो. देशाकरिता मरण्याची त्याची तयारी व त्यातील त्याचे शौर्य यासाठी मी त्याचा सन्मान करतो. परंतु मला त्याला एक गोष्ट विचारायची आहे : हत्या करणे ही सन्माननीय गोष्ट असू शकते काय? सन्माननीय मृत्यूकरिता हत्या करणा-याच्या कट्यारीची गरज खरोखरीच असते काय? माझा यावर विश्वास नाही. (स्पीरा, पृ. ३२३)

पूर्णपणे विचार केल्यानंतर तयार झालेल्या माझ्या मताचा पुनरुच्चार करून मी म्हणेन की इतर देशांची कशीही परिस्थिती असली तरी कमीत कमी भारतातील राजकीय हत्या देशाची हानीच करतील. (यंग, १६-४-१९३१, पृ.७५)

देशाच्या स्वातंत्र्याकरिता प्रयत्न करणा-यांच्या रक्ताने इतिहासाची पाने रंगलेली आहेत. कठोर परिश्रम केल्याशिवाय एकाही राष्ट्राने आपला उद्धार केला असल्याचे उदाहरण मला माहीत नाही. स्वराज्याचे वेड लागलेल्या लोकांनी हत्या करणा-याची कट्यार, विषाचा प्याला, बंदुकधा-याची गोळी, भाला इत्यादी सर्व साधनांचा आधार घेतलेला आहे.... मी आतंकवाद्याच्या बाजूचे समर्थन करू शकत नाही. (यंग, २४-१२-१९३१, पृ. ४०८)

मनोविकारांपासून माझी मुक्ती व्हावी आणि पाप करण्याचे सामर्थ्यच माझ्यात उरू नये, अशी प्रार्थना क्रांतिकारकांनी माझ्याबरोबर आणि माझ्याकरिता करावी. परंतु मध्यंतरीच्या काळात त्यांनी माझ्याबरोबर एक पाऊल टाकावे - ते पाऊल दिवसाच्या प्रकाशाप्रमाणे मला स्पष्ट दिसत आहे आणि ते पाऊल आहे शुद्ध उपायांद्वारे भारताचे स्वातंत्र्य मिळवण्याचे. (हरि, २५-१-१९४२, पृ. १५)

## २८. हिंसा आणि भ्याडपणा यांतून निवड

संपूर्ण प्रजाती नपुंसक होण्याचा धोका पत्करण्याऐवजी मी हिंसेला हजारपट चांगली समजतो. (यंग, ४-८-१९२०, पृ. ५)

**हिंसेची निवड**

माझी खात्री आहे की केवळ भ्याडपणा आणि हिंसा यांतूनच निवड करावी लागणार असेल, तर मी हिंसेची निवड करण्याचाच सल्ला देईन.... भित्र्याप्रमाणे आपल्या अपमानाचा मूक आणि असहाय साक्षीदार बनून राहण्यापेक्षा भारताने आपल्या सन्मानाच्या रक्षणार्थ हिंसेचा आधार घ्यावा असा सल्ला मी देईन.

परंतु माझा विश्वास आहे की, अहिंसा ही हिंसेपेक्षा अधिक श्रेष्ठ आहे, दंडापेक्षा क्षमा अधिक मानवोचित आहे. क्षमा योद्ध्याचे आभूषण आहे.... परंतु संयमाला क्षमा म्हणून तेव्हाच संबोधता येते जेव्हा संयमी व्यक्तीत शिक्षा करण्याचे सामर्थ्य असते; असहाय व्यक्तीने केलेल्या क्षमेला काहीही अर्थ नसतो....

परंतु मी भारताला असहाय समजत नाही.... मी स्वतःलाही असहाय प्राणी मानत नाही.... शक्ती शारीरिक क्षमतेतून नाही, तर अदम्य इच्छेतून निर्माण होते. (यंग, ११-८-१९२०, पृ. ३)

माणसाच्या आत बसलेल्या पशूला बाहेर काढून फेकून देण्याची आमची इच्छा नक्कीच आहे. परंतु तेवढ्याकरिता त्याला आपण नपुंसक बनवू इच्छीत नाही आणि मी अजून मेलो नाही हे दाखवण्याकरिता माणसातील पशू वेळोवेळी आपले कुत्सित रूप अवश्य दाखवील. (यंग, १५-१२-१९२१, पृ.४१९)

जग केवळ तर्काधारे चालत नाही. जीवनात थोडीबहुत हिंसा तर आहेच. त्यामुळे आपण किमान हिंसेचा मार्ग अवलंबिला पाहिजे. (हरि, २८-९-१९३४, पृ. २५९)

**भ्याडपणा नाही**

माझी इच्छा आहे की, हिंदू आणि मुसलमान या दोघांनीही मारल्याशिवाय

मरण्याची हिंमत विकसित केली पाहिजे. परंतु जर एखाद्याजवळ तशी हिंमत नसेल, तर त्याने धोका पाहून भित्र्याप्रमाणे पळून जाण्याऐवजी मारून मरण्याची कला विकसित केली पाहिजे. कारण पळून जाणारा माणूस तर मानसिक हिंसा करतच असतो. मारत असताना मरण्याचे धैर्य त्याच्यात नसल्यामुळे तो पळून जातो एवढेच. (यंग, २०-१०-१९२१, पृ. ३२५)

माझ्या अहिंसक कार्यपद्धतीमुळे राष्ट्राची कधीच हानी होत नाही कारण राष्ट्राला हवे असल्यास ते संकटप्रसंगी कधीही अनुशासित आणि जोरदार हिंसेचे प्रदर्शन करू शकते. (यंग, २९-५-१९२४, पृ. १७६)

माझी अहिंसा म्हणजे अतिशय सक्रिय अशी शक्ती आहे. हिच्यात भ्याडपणा वा दुबळेपणा यांच्याकरिता कोणतेही स्थान नाही. हिंसक व्यक्ती कदाचित अहिंसक होऊ शकते, परंतु भ्याड व्यक्तीकडून अहिंसक होण्याची आशा कधीही करता येऊ शकत नाही. यामुळेच मी वारंवार सांगितले आहे की.... आम्हाला स्वतःचे, आपल्या स्त्रियांचे आणि आपल्या प्रार्थनास्थळांचे संरक्षण कसे सहन करावे हे कळत नसेल व आमच्यात पौरुष असेल, तर आम्ही त्यांचे संरक्षण शस्त्रांच्या मदतीनेही केले पाहिजे. (यंग, १६-६-१९२७, पृ. १९६)

माणूस शरीराने कितीही दुर्बल असला तरी पळून जाणे ही जर लाजिरवाणी गोष्ट असेल तर त्याने संघर्षाकरिता तयार राहिले पाहिजे आणि कर्तव्यपालन करताना मृत्यूचा स्वीकार केला पाहिजे. हेच अहिंसेतील शौर्य आहे. तो कितीही दुर्बल असला तरी त्याने आपल्या शत्रूवर आपल्या संपूर्ण शक्तीनुसार वार करण्याचा प्रयत्न केला पाहिजे आणि तसे करण्याच्या प्रयत्नात मरण पत्करण्याची तयारी त्याने ठेवली पाहिजे - ही अहिंसा नसली तरी हे शौर्य आहे. संकटाचा सामना करण्याऐवजी माणूस पळ काढत असेल तर तो भ्याडपणा होईल. पहिल्या प्रकरणी माणसाच्या मनात प्रेम आणि दया या भावना असतील तर दुस-या आणि तिस-या प्रकरणी त्याच्या मनात घृणा, अविश्वास आणि भीती या भावना असतील. (हरि, १७-८-१९३५, पृ. २११)

माझ्या अहिंसेत अशा लोकांना प्रवेश आहे की जे अहिंसेप्रमाणे आचरण करू शकत नाहीत वा करणार नाहीत. त्यामुळे शस्त्र धारण करून ते त्याचा योग्य उपयोग करतील. मी हजार वेळा सांगेन की अहिंसा दुर्बलांचे शस्त्र नाही तर ते सर्वाधिक बलवानाचे शस्त्र आहे. (यंग, ८-५-१९४१)

संकटाचा सामना करण्याऐवजी पळून जाणे म्हणजे केवळ माणसाला आणि

ईश्वरालाच गमावणे नाही तर स्वतःचा आत्मविश्वास गमावणेही आहे. विश्वासाचे असे दिवाळे काढण्याऐवजी बुडून मेलेले बरे. (हरि, २४-११-१९४६, पृ. ४१०)

**हिंसेच्या मदतीने आत्मरक्षण**

मी वारंवार सांगत आलो आहे की जी व्यक्ती मृत्यूचा सामना करत अहिंसक पद्धतीने आपल्या प्रिय लोकांचे आणि आपल्या आत्मसन्मानाचे रक्षण करू शकत नाही तिने शत्रूशी हिंसक संघर्ष करावा. अशा लोकांनी असेच केले पाहिजे. जो या दोन्हींमधून कोणताही मार्ग अनुसरू शकत नाही, तो व्यर्थ ओझे आहे. तो कुटुंबप्रमुख होण्याच्या लायकीचा नसतो. त्याने तर कुठे तरी कोप-यात जाऊन लपून बसून राहिले पाहिजे अथवा कायमस्वरूपी लाचारीचे जीवन जगण्याकरिता आणि गुंडांसमोर किड्याप्रमाणे सरपटण्याकरिता तयार राहिले पाहिजे.
(यंग, ११-१०-१९२८, पृ. ३४२)

आत्मरक्षणाकरिता मारण्याची ताकद असण्याची गरज नाही. माणसात मरण्याची शक्ती असली पाहिजे. माणूस जेव्हा मरण्याकरिता पूर्णपणे तयार होतो तेव्हा कदाचित त्याच्यामध्ये हिंसा करण्याची इच्छाच राहणार नाही. वास्तवात ही गोष्ट मी स्वयंसिद्ध विधानाप्रमाणेही मांडू शकतो. मारण्याची इच्छा आणि मरण्याची इच्छा यांच्यात व्यस्त प्रमाण आहे. इतिहासात अशी अनेक उदाहरणे आहेत, ज्यांत साहस आणि ओठांवर करुणापूर्ण शब्द घेऊन मरणा-याने आपल्या विरोधकाचे हृदयपरिवर्तन केले आहे. (यंग, २१-१-१९३०, पृ. २७)

मरणाला घाबरणा-या आणि प्रतिकाराची शक्ती नसलेल्या व्यक्तीला अहिंसा शिकवता येऊ शकत नाही. मांजरीची शिकार होणा-या लाचार उंदराला अहिंसक म्हणता येऊ शकत नाही. त्याचे चालले तर तो मांजरीला नक्कीच खाऊन टाकील. परंतु तिला पाहताच तो पळ काढतो. आपण त्याला भित्रा म्हणत नाही कारण निसर्गानेच त्याला तसे बनवले आहे आणि तो त्याप्रमाणेच वागतो.

परंतु समोर संकट दिसताच एखादा माणूस जर उंदराप्रमाणे पळ काढत असेल, तर तो ख-या अर्थाने भित्रा आहे. त्याच्या मनात हिंसा आणि घृणा आहे व स्वतःला कोणत्याही प्रकारची शारीरिक इजा होऊ न देता त्याला शत्रूला मारता येत असेल तर तो त्याला मारल्याशिवाय नक्कीच राहणार नाही. अशा व्यक्तीचा अहिंसेशी काहीही संबंध नसतो. त्याला कितीही उपदेश केला तरी तो पालथ्या घागरीवर घातलेल्या पाण्यासारखा होईल. त्याच्या स्वभावात शौर्यच नाही.

अहिंसेचे धडे देण्याआधी त्याला संकटाचा सामना करणे आणि समोर उभ्या असलेल्या शत्रूचा सामना करता करता मरावे लागले तरी मरण्याकरिता तयार असणे ही गोष्ट शिकवावी लागेल. इतर कोणताही उपाय करणे म्हणजे त्याच्या भ्याडपणाला प्रोत्साहन देणेच होईल व त्यामुळे तो अहिंसेपासून अधिक दूर निघून जाईल.

मी जर कोणाचा बदला घेण्याकरिता मदत करणार नसेन तर एखाद्या भित्र्या माणसाला अहिंसेचे निमित्त करू देण्यालासुद्धा मी मदत करायला नको. अहिंसा कोणत्या शक्तीचे नाव आहे याचे ज्ञान नसल्यामुळे विशेषतः आपल्या जिवाला जेव्हा धोका असतो तेव्हा प्रतिकार करण्याऐवजी तिथून पळ काढण्यातच बुद्धिमत्ता आहे असा चुकीचा विश्वास अनेक लोकांच्या मनात आहे. अहिंसेचा शिक्षक असल्यामुळे अशा प्रकारच्या नामर्दपणाच्या विश्वासापासून लोकांना सावध करणे माझे कर्तव्य आहे. (हरि, २०-७-१९३५, पृ. १८०-८१)

व्यक्ती जर बलिदान करायला तयार नसेल तर स्वतःचे संरक्षण करणे.... हाच एकमेव सन्माननीय मार्ग असतो. (हरि, २०-७-१९३५, पृ. १८१)

हिंसा जरी वैध नाही तरी आत्मरक्षणाकरिता वा निराधारांचे रक्षण करण्याकरिता करण्यात आलेली हिंसा हे, भित्रेपणाने केलेल्या आत्मसमर्पणापेक्षा किती तरी अधिक मर्दुमकीचे कृत्य आहे. भ्याडपणाने केलेले आत्मसमर्पण ना पुरुषाला शोभा देते ना स्त्रीला. हिंसेच्या अंतर्गत शौर्याच्या अनेक पातळ्या आणि प्रकार आहेत. त्याबाबतील व्यक्तीला स्वतःला निर्णय घ्यायला हवा. त्याचा अधिकार कोणत्याही दुस-या व्यक्तीला नसतो आणि नसावाही.
(हरि, २७-१०-१९४६, पृ. ३६९-७०)

## २९. आक्रमणाचा प्रतिकार

मला जगायचे आहे. कोणत्याही राष्ट्राचा वा व्यक्तीचा मला गुलाम बनून राहायचे नाही. एक तर मी पूर्ण स्वातंत्र्य मिळवीन वा मरण पत्करेन. सशस्त्र संघर्षाद्वारे जिंकण्याची आशा ही फुशारकी होईल. परंतु माझ्या स्वातंत्र्यापासून जो मला वंचित करील, त्याच्या शक्तीला आव्हान देण्याच्या वा त्याच्या इच्छेप्रमाणे वागण्याला नकार देण्याच्या प्रयत्नात जीव देण्याची तयारी ठेवणे म्हणजे फुशारकी नाही. यात माझा जीव जाईल हे खरे असले तरी त्यामुळे माझ्या स्वाभिमानाचे रक्षण होईल. (हरि, १५-१०-१९३८,पृ.२९०)

## प्रतिकाराचे कर्तव्य

खरा लोकशाहीवादी तोच आहे जो आपले, आपल्या देशाचे व अखेरीस संपूर्ण मानवजातीच्या स्वातंत्र्याचे रक्षण शुद्ध अहिंसक पद्धतीने करतो.... परंतु प्रतिकाराच्या कर्तव्याचा अधिकार त्यांनाच मिळतो जे अहिंसा धर्म मान्य करतात, विशिष्ट प्रसंगी युद्धाचे समर्थन करायचे की विरोध करायचा असे गणित करून प्रत्येक बाबतीत गुणावगुणाचा विचार करून जे निर्णय घेतात, त्यांना तो अधिकार मिळत नाही. याचा अर्थ असा होतो की अशा प्रकारे प्रतिकाराचा निर्णय व्यक्तीला स्वतःला घ्यावा लागतो आणि जर तिला आतील आवाजाचे अस्तित्व मान्य असेल तर आपला आतील आवाज ऐकून तिने तो निर्णय घेतला पाहिजे. (हरि, १५-४-१९३९, पृ. ९०)

अप्रतिकाराचा अर्थ बहुधा नीट समजून घेतला जात नाही व तो विकृतही करण्यात येतो. याचा असा अर्थ कधीही होऊ शकत नाही की, अहिंसक व्यक्तीने आक्रमकासमोर शरणागती पत्करावी. आक्रमकाच्या हिंसेचे उत्तर हिंसेने न देता त्याची अवैध मागणी अमान्य करून त्याला उत्तर दिले पाहिजे. त्यात त्याचा जीवही जाऊ शकतो. अप्रतिकाराचा खरा अर्थ हा आहे....

हिंसेचे उत्तर हिंसेने न देता आपला हात उचलण्यापासून स्वतःला अडवून आक्रमकाची अवैध मागणी फेटाळून लावून, आपल्यावरील आक्रमण निष्प्रभावी करायचे असते. जगात मानवी आचरणाची हीच एकमेव सभ्य पद्धती आहे. इतर कोणत्याही पद्धतीमुळे शस्त्रांची वाढ होईल - अधूनमधून शांततेचा काळ येईल, परंतु खरं तर ती वादळापूर्वीची शांतता असेल, पुढील हिंसेची तयारी असेल. उच्चतर हिंसेच्या आधारावर स्थापित शांतता अण्वस्त्र आणि त्याच्याशी संबंधित सर्व गोष्टींना जन्म देत असते. अहिंसा आणि लोकशाहीला पूर्णपणे नाकारणारी ही गोष्ट आहे. खरे तर अहिंसेशिवाय लोकशाही चालू शकत नाही.
(हरि, ३०-३-१९४७, पृ. ८५-६)

क्रौर्याचे उत्तर क्रौर्याने देणे म्हणजे आपल्या नैतिक दिवाळखोरीचा स्वीकार करणे आहे व त्यामुळे केवळ एक दुष्टचक्रच निर्माण होऊ शकते.... (हरि, १-६-१९४७, पृ. १७४)

प्रतिकाराचे दोन प्रकार आहेत - निष्क्रिय प्रतिकार आणि अहिंसक प्रतिकार. परंतु प्रतिकाराला फार मोठी किंमत मोजावी लागते. नाझरथच्या येशूने सुज्ञपणाने केलेल्या दृढ व साहसपूर्ण प्रतिकाराला दुर्बलाचा प्रतिकार समजून युरोपने त्याचा

चुकीचा अर्थ लावला. 'न्यू टेस्टॅमेंट'च्या पहिल्या चार प्रकरणात करण्यात आलेल्या येशूच्या चित्रणातून येशूच्या निष्क्रियतेचे वा दुर्बलतेचे कोणतेच चिन्ह मला तो ग्रंथ वाचताना दिसले नाही. टॉलस्टॉयचे 'हार्मनी ऑफ द गॉस्पेल' आणि याच विषयावरील त्यांची इतर पुस्तके जेव्हा मी वाचली, तेव्हा तो अर्थ अजूनच स्पष्ट झाला. येशूला निष्क्रिय प्रतिकारक समजल्यामुळे पश्चिमेला फार मोठे मूल्य चुकवावे लागले नाही काय? ख्रिश्चन जग ज्या युद्धांकरिता जबाबदार आहे त्यासमोर 'ओल्ड टेस्टॅमेंट' वा तत्सम अन्य अर्ध ऐतिहासिक दस्तावेजांमध्ये वर्णिलेली युद्धेही फिकी पडतात. मला आधुनिक वा प्राचीन इतिहासाचे केवळ वरवरचे ज्ञान असल्यामुळे माझ्या विधानांमध्ये संशोधन करावे लागू शकते हे मला माहीत आहे. (हरि, ७-१२-१९४७, पृ. ४५३)

मारत मारत मरण्यापेक्षा न मारता मृत्यूचा स्वीकार करण्यात अधिक शौर्य आहे. मारणे वा मारत असताना मरून जाणे ही काही फार मोठी प्रशंसनीय गोष्ट नाही. परंतु जी व्यक्ती शत्रूच्या इच्छेसमोर गुडघे टेकण्याऐवजी त्याच्यासमोर आपली मान करते, ती किती तरी वरच्या श्रेणीच्या साहसाचा परिचय करून देत असते. (हरि, २१-४-१९४६, पृ. ९५)

**अहिंसेचा मार्ग**

अहिंसा जगातील त्या महान सिद्धान्तापैकी एक आहे ज्याला जगातील कोणतीही शक्ती नष्ट करू शकत नाही. त्याचा खरेपणा सिद्ध करण्याच्या प्रयत्नात माझ्यासारखे हजारो लोक मरू शकतील, परंतु अहिंसा कधीही मरणार नाही आणि अहिंसेच्या सिद्धान्तावर श्रद्धा ठेवून त्याकरिता बळी जाणा-यांमुळेच या सिद्धान्ताचा प्रचार होऊ शकतो. (हरि, १७-५-१९४६, पृ. १४०)

अहिंसा उच्चतम आदर्श आहे. ती वीरांकरिता आहे, भित्र्या लोकांकरिता मुळीच नाही. इतरांच्या बलिदानाचा लाभ घेऊन आणि आम्ही फार मोठे धार्मिक आणि अहिंसक आहोत या भ्रमात राहणे, ही स्वतःची फसवणूक करणे आहे. (हरि, ९-६-१९४६, पृ. १७२)

तुमच्याजवळ अहिंसेची तलवार असेल तर जगातील कोणतीही शक्ती तुम्हाला गुलाम करू शकत नाही. हिच्यामुळे जेता आणि पराजित या दोघांचेही उदात्तीकरण होते. (हरि, ९-६-१९४६, पृ. १७४)

यावेळी सर्व जगात हिंसेची जी लाट पसरली आहे, तिचे खरे कारण हे

आहे की, अजून वीर पुरुषाच्या अपराजेय अहिंसेच्या तंत्राचा पुरेसा शोध घेण्यात आलेला नाही. अहिंसक शक्तीचा एक कणही वाया गेलेला नाही.
(हरि, ११-१-१९४८, पृ. ५०४)

'भारतावर आक्रमण करणारे लुटारू, चोर वा राष्ट्र यांच्यावर कार्यवाही करण्याकरिता हिंसेचा आधार घेऊ नका' असे माझे म्हणणे नाही. परंतु यांच्यावर चांगल्या प्रकारचे नियंत्रण ठेवण्याकरिता आम्ही स्वतःवर संयम ठेवणे शिकले पाहिजे. लहानसहान गोष्टींवर पिस्तूल उचलणे शक्तीचे चिन्ह नाही, ती दुबळेपणाची खूण आहे. आपसातील गुद्दागुद्दीतून हिंसेचे नाही तर नामर्दपणाचे प्रशिक्षण मिळते.
(यंग, २९-५-१९२४, पृ. १७६)

सर्व प्रकारची हिंसा वाईट आहे आणि तत्त्वतः तिची निंदा केली पाहिजे; असे असले तरी अहिंसेवर विश्वास ठेवणा-या व्यक्तीला आक्रमक आणि रक्षक यांच्यात भेद करण्याची केवळ परवानगीच नाही तर तसे करणे त्याचे कर्तव्यही आहे. असे केल्यानंतर त्याने रक्षकाची बाजू घेतली पाहिजे म्हणजे त्याचे रक्षण करण्याकरिता आपला जीवही दिला पाहिजे. तो मध्ये पडल्यामुळे कदाचित द्वंद्वाची स्थिती लवकर संपेल आणि असेही शक्य आहे की भांडणा-या दोन्ही पक्षांमध्ये सलोखाही होऊ शकेल. (हरि, २१-१०-१९३९, पृ. ३०९)

माझी अहिंसा वेगवेगळ्या हिंसेमध्ये - रक्षकाच्या हिंसेत आणि आक्रमकाच्या हिंसेत - अंतर आहे असे मानते. हे खरे आहे की दीर्घ काळात हा भेद नाहीसा होईल. परंतु तरीही सुरुवातीचा चांगुलपणा शिल्लक राहतोच. अहिंसक व्यक्ती वेळ आल्यानंतर कोणाचा पक्ष न्यायाचा आहे आणि कोणाचा नाही हे नक्कीच सांगेल. यामुळेच मी अबिसीमिनीयन, स्पॅनिश, झेक, पोलंडवासी आणि चिनी लोकांच्या विजयाकरिता प्रार्थना केली होती. मात्र मला असे खचितच वाटत होते की, यांच्यातील प्रत्येकाने अहिंसक प्रतिकाराचा आधार घ्यायला पाहिजे होता.
(हरि, ९-१२-१९३९, पृ. ३७१)

युद्ध जर स्वतःच एक अनैतिक कृत्य असेल तर मग त्याचे नैतिक समर्थन वा त्याकरिता आशीर्वाद कसे देता येतील? सर्व प्रकारच्या युद्धांना मी चुकीचे समजतो. परंतु युद्धात गुंतलेल्या दोन पक्षांच्या हेतूंचा तपास केला तर त्यातील एक चूक व दुसरा बरोबर असे बहुधा आढळून येईल. उदाहरणार्थ अ देशाला ब देश ताब्यात घेऊ इच्छीत असेल तर स्पष्ट आहे की तो अ देशावर अन्याय आहे. दोन्ही देश सशस्त्र संघर्ष करतील. माझा हिंसक संघर्षावर विश्वास नाही,

तरीही अ देश, ज्याची बाजू न्याय्य आहे, माझ्या नैतिक पाठिंब्याकरिता आणि आशीर्वादाकरिता पात्र असेल. (हरि, १८-८-१९४०, पृ. २५०)

जर तुमच्यात अहिंसेच्या मार्गावर चालण्याएवढे शौर्य नसेल तर तुम्ही ठोशाला ठोशाने उत्तर देऊ शकता. परंतु हिंसेच्या प्रयोगाचीही एक नैतिक संहिता आहे. असे नसेल तर हिंसेच्या ज्वाला पेटवणारांनाच भस्मसात करून टाकतील. ते सर्व नष्ट झाले तरी मला पर्वा नाही. परंतु भारताचे स्वातंत्र्य नष्ट झालेले मी पाहू शकत नाही. (हरि, १७-११-१९४६, पृ. ४०२)

### भारताचा मार्ग

मी हे मान्य केले आहे की राष्ट्राला हवे असल्यास वास्तविक हिंसेच्या माध्यमातूनही त्याला आपले स्वातंत्र्य मिळवण्याचा अधिकार आहे. तशाही अवस्थेत तो जरी माझी मातृभूमी राहणार आहे हे खरे असले तरी तो माझा प्रिय देश राहणार नाही. ज्याप्रमाणे एखादी आई पथभ्रष्ट झाली तर तिच्याबद्दल आदराची भावना राहत नाही तसेच हे. (यंग, २०-११-१९२४, पृ. ३८२)

भारत जेव्हा स्वावलंबी होईल, प्रलोभन व शोषण यांच्यापासून पूर्णपणे मुक्त होईल तेव्हा पूर्वेकडील म्हणा वा पश्चिमेकडील म्हणा कोणतीही शक्ती त्याच्याकडे लोभी दृष्टीने पाहू शकणार नाही व महागड्या शस्त्रास्त्रांशिवाय आपण सुरक्षित असल्याचे त्याला जाणवेल. त्याची आंतरिक अर्थव्यवस्था कोणत्याही आक्रमणाच्या विरोधात सर्वात मजबूत अशा गडकोटाचे काम करील. (यंग, २-७-१९३१, पृ. १६१)

### अहिंसक प्रतिकार

एखाद्या राष्ट्राने अहिंसक प्रतिकाराचा मार्ग अवलंबिला असल्याचे इतिहासात एकही उदाहरण आढळत नाही. मी पीडा सहन केल्यामुळे हिटलरवर कोणताही प्रभाव पडणार नसेल तरी त्यामुळे काहीही बिघडत नाही. कारण त्यामुळे माझी कोणतीही हानी होत नाही. माझ्या दृष्टिकोनातून रक्षणीय वस्तू केवळ माणसाचा आत्मसन्मान आहे आणि त्याकरिता हिटलरच काय इतर कोणाचीही गरज नाही. परंतु अहिंसेचा पुजारी असल्याच्या नात्याने अहिंसेच्या संभावनांना सीमित करणे उचित होणार नाही. हिटलरला आणि त्याच्यासारखी मनोवृत्ती असलेल्या लोकांना आतापर्यंत आलेल्या अनुभवांमुळे त्यांचा विश्वास दृढ झाला होता की माणूस शक्तीसमोर नमतो. निःशस्त्र स्त्री-पुरुष-मुले यांनी आपल्या मनात कोणत्याही प्रकारची कटुता न येऊ देता या लोकांचा अहिंसक प्रतिकार केला असता तर

त्यांच्याकरिता तो एक आगळाच अनुभव ठरला असता. उच्च आणि सूक्ष्म शक्तींना प्रतिसाद देणे हिटलरसारख्यांच्या स्वभावात नसते असे खात्रीपूर्वक सांगण्याचे साहस कोण करू शकेल? त्यांच्यातही तोच आत्मा आहे जो माझ्यात आहे....

मला या आव्हानाचे उत्तर द्यावेच लागेल. माझ्या देशवासीयांना माझा संदेश मी सांगितलाच पाहिजे. आपले म्हणणे लोकांपर्यंत न पोहोचवू शकण्याबद्दलची लाज माझ्या मनात खोलवर रुजलेली आहे. जो प्रकाश मला दिसला आहे कमीत कमी त्यानुसार तरी मी कार्यवाही केलीच पाहिजे.

....जेव्हा मी सत्याग्रहाला सुरुवात केली तेव्हा कोणीही माझा सहचर नव्हता. आम्ही तेरा हजार स्त्री, पुरुष आणि मुले एका संपूर्ण राष्ट्राच्या विरोधात, ज्याच्यात आम्हा सर्वांना नष्ट करण्याची ताकद होती, उभे होतो. माझे म्हणणे कोण ऐकेल तेही मला माहीत नव्हते. माझ्यासमोर जणू एकाएकी विजेचा लखलखाट झाला होता. सर्व तेरा हजार व्यक्तींनी संघर्ष केला नव्हता. अनेक मागे राहिले होते. परंतु राष्ट्राचा सन्मान जपला गेला. दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाने नवीन इतिहास लिहिला....

शस्त्र हाती घेऊन त्यांचा उपयोग करण्याच्या क्षमतेच्या तुलनेत त्यांची अहिंसा त्यांना अधिक शूर बनवत नसेल तर त्यांनी अहिंसेचा, जिचे दुसरे नाव भ्याडपणा असेल, त्याग करावा आणि जी शस्त्रे घेण्याकरिता केवळ त्यांच्या मनाचीच आडकाठी होती ती त्यांनी परत हाती घ्यावी. ही गोष्ट या लोकांच्या हृदयापर्यंत मी पोहोचून दाखवू शकलो तर माझा हेतू साध्य होईल.

मी दुर्बलांचे नाही तर शूरांचे शस्त्र सादर करीत आहे. जगातील मोठ्यात मोठ्या शक्तीसमोर गुडघे टेकायला माणसाने नकार देणे आणि असे करत असताना त्याच्या मनात कटुता नसेल व केवळ आत्माच अमर आहे इतर काहीही नाही या गोष्टीवर त्याचा विश्वास असेल, तर याहून अधिक शौर्याची गोष्ट कोणतीही असू शकत नाही. (हरि, १५-१०-१९३८, पृ. २९०-१)

## मूलभूत गृहीतके

आपण आपल्या कुटुंबाकरिता वा कुळाकरिता जो व्यवहार करतो त्याचीच उपमा देऊन मी माझा तर्क पुढे चालवला आहे. मानवसमाज एक मोठे कुटुंबच तर आहे. प्रेमाची भावना पुरेशी सखोल असेल तर ते प्रेम संपूर्ण मानवजातीकरिता असले पाहिजे. व्यक्तींनी जर रानटी लोकांबरोबरच्या व्यवहारात यश मिळवले

असेल, तर व्यक्तींचे समूह रानटी लोकांच्या समूहावर विजय का मिळवू शकणार नाहीत? आपण जर इंग्रजांच्या बाबतीत यशस्वी होऊ शकलो तर त्यांच्यापेक्षा कमी सभ्य आणि कमी उदार मनाच्या लोकांच्या बाबतीतही आपण यशस्वी होऊ, असे म्हणणे हे केवळ आपल्या श्रद्धेचा विस्तार करणे आहे. मी खात्रीपूर्वक सांगू शकतो की विशुद्ध अहिंसक प्रयत्नांच्या मदतीने आपण जर इंग्रजांवर विजय मिळवू शकतो तर इतर लोकांच्या बाबतीतही आपण नक्कीच यशस्वी होऊ शकू. आपण अहिंसेने स्वातंत्र्य मिळवू शकतो तर अहिंसेने ते टिकवूही शकतो असे म्हणण्या-सारखेच हे आहे. आपल्या मनात अशी श्रद्धा निर्माण होत नसेल तर आमची अहिंसा केवळ तात्कालिक असेल, ती भेसळ असेल, ते खरे सोने नसेल.

पहिली गोष्ट ही आहे की, संशयास्पद अहिंसेद्वारे आम्हाला कधीही स्वातंत्र्य मिळणार नाही; आणि दुसरी गोष्ट म्हणजे जर स्वातंत्र्य मिळाले, तरी आक्रमकांपासून त्याचे रक्षण करण्याकरिता आमची कधीही तयारी होणार नाही. अखेरीस अहिंसा यशस्वी होईल की नाही याबाबतीत जर आपल्याला संशय असेल तर काँग्रेसने आपली नीती बदलून राष्ट्राला शस्त्रांचे प्रशिक्षण देणे सुरू करणेच उत्तम होईल. आपल्या मनाची खात्री झाल्याशिवाय लोकांना एका भ्रामक विश्वासाकडे वळवणे काँग्रेससारख्या जनाधार असलेल्या पक्षाच्या प्रतिष्ठेकरिता हानिकारक होईल. ही भ्याडपणाची गोष्ट होईल - अहिंसेवरील आपली श्रद्धा नष्ट झाली म्हणजे आपण हिंसक होतोच असे नाही. आपण केवळ आपला मुखवटा फेकून देतो आणि स्वाभाविक अवस्थेत येतो. हा मार्ग पूर्णपणे सन्मानाचा आहे.
(हरि, २२-१०-१९३८, पृ. २९८)

एखादे राष्ट्र वा एखादा गट कितीही लहान असले तरी, त्यांच्यात जर एकी असेल आणि आपला सन्मान आणि स्वाभिमान टिकवून ठेवण्याची इच्छा व जिद्द असेल, तर त्या राष्ट्रात वा गटांत संपूर्ण जगाच्या शस्त्रास्त्रांपासून आपल्या सन्मानाचे व स्वाभिमानाचे रक्षण करण्याचे सामर्थ्य असू शकते. निःशस्त्र व्यक्तीच्या अतुलनीय शक्तीचे रहस्य यातच आहे. कोणत्याही अवस्थेत पराजय माहीत नसणारे आणि त्याचा स्वीकार न करणारे अहिंसक संरक्षण हेच आहे. यामुळेच जे राष्ट्र वा जो गट अहिंसेला आपली अंतिम नीती म्हणून मान्यता देईल, त्याला अण्वस्त्रही गुलामगिरीकरिता बाध्य करू शकत नाही.
(हरि, १८-८-१९४६, पृ. २६५)

काँग्रेसने घोषणा केली आहे की ती भारताचा स्वातंत्र्यसंघर्ष अहिंसक पद्धतीने

चालवील. परंतु एखाद्या विदेशी आक्रमकाविरुद्धही आपण याच नीतीचे पालन करू असा निर्णय तिने अजून घेतलेला नाही.

माझ्या दृष्टीने हे स्वयंस्पष्ट सत्य आहे की जर सर्वांना - शारीरिक दृष्टीने दुर्बल, अपंग आणि पंगू यांनाही - स्वातंत्र्यात बरोबरीचा वाटा दिला जाणार असेल तर या स्वातंत्र्याच्या रक्षणातही या सर्वांचा वाटा असला पाहिजे. या गोष्टीकरिता शस्त्रांची मदत घेतली गेली तर हे कसे शक्य होईल हे माझ्यासारख्या सामान्य माणसाला समजणे कठीण आहे. यामुळेच मी अहिंसेचा म्हणजेच आत्मशक्तीचा वा सत्याग्रहाचा कट्टर पुरस्कर्ता आहे आणि राहीन. याकरिता शारीरिक असमर्थतेची अडचण येत नाही आणि कमकुवत स्त्रिया अथवा मुलेही यात बरोबरीने सहभागी होऊ शकतात आणि शक्तिशालीहून शक्तिशाली शत्रूचा सामना करू शकतात. (हरि, २१-४-१९४६, पृ. ९४)

जिला श्रेय दिले पाहिजे ती व्यक्ती जरी हिंसेवर विश्वास ठेवणारी असली, तरी तिला त्या श्रेयापासून वंचित करण्यास माझी अहिंसा मला अडवते. यामुळेच सुभाषचंद्र बोस यांचा हिंसेवरील विश्वास आणि त्या विश्वासातून निर्माण झालेले कार्य मला मान्य नव्हते, तरी त्यांची देशभक्ती, समयसूचकता आणि शौर्य या गुणांकरिता त्यांची मोकळेपणाने प्रशंसा करताना मला संकोच वाटला नाही. अशाच प्रकारे काश्मिरी लोकांच्या मदतीकरिता संघ सरकारने शस्त्रास्त्रांचा जो उपयोग केला त्याचे मी जरी समर्थन केले नाही आणि शेख अब्दुल्ला यांनी शस्त्र उचलले त्यालाही जरी माझी सहमती नव्हती; तरी त्यांची समयसूचकता आणि प्रशंसनीय आचरण या गुणांकरिता त्यांची तारीफ केल्याशिवाय मला राहवले नाही. विशेषतः मदतीकरिता गेलेले भारताचे सैनिक, काश्मीरचे सैनिक व काश्मिरी लोक जर एकेक करून शौर्याने मृत्यू पत्करतील तर ती बाब गौरवाची होईल. मला माहीत आहे की ते जर असे करू शकले तर कदाचित भारताचा चेहरामोहराच बदलून जाईल आणि संरक्षणाची ही कार्यवाही उद्दिष्ट आणि कृती यांच्या दृष्टीने पूर्णपणे अहिंसक असती तर मला 'कदाचित' हा शब्दही वापरावा लागला नसता. तशा अवस्थेत भारताचा चेहरामोहरा तर बदलला असताच, पण संघ सरकारचे मंत्रिमंडळच नाही तर पाकिस्तानचे मंत्रिमंडळही काश्मिरी लोकांचे संरक्षण करणा-यांच्या बाजूचे झाले असते.

जे अहिंसक तंत्र मी सुचवत आहे त्यानुसार बचाव पक्षाला शस्त्रांची कोणतीही मदत केली जाणार नाही. संघ सरकार निःसंकोचपणे त्यांना अहिंसक मदत करू

शकते. परंतु भारताकडून अहिंसक मदत मिळाली वा मिळाली नाही तरी काश्मिरी रक्षकांनी विशाल संख्येने गोळा होऊन हल्ला करणा-यांच्या वा अनुशासित सैनिकांचा प्रतिकार करावा. काश्मिरी रक्षकांच्या मनात हल्ला करणा-यांबद्दल कोणत्याही प्रकारची दुर्भावना वा क्रोधाची भावना आली नाही व कोणत्याही प्रकारच्या शस्त्राचा, आपल्या हाताच्या मुठीचाही त्यांनी उपयोग केला नाही व आपल्या मोर्चावर ठाम राहून त्यांनी प्राणोत्सर्ग केला तर ते असे शौर्य असेल की ज्याचे उदाहरण इतिहासात सापडणार नाही. मग काश्मीर अशी पवित्र भूमी होईल जिचा सुगंध भारतातच नाही तर सर्व जगात पसरेल.

(हरि, १६-११-१९४७, पृ. ४१३)

## ३०. भारतासमोरील पर्यायी मार्ग

भारत दुर्बल आहे म्हणून त्याने अहिंसेचा स्वीकार करावा असा आग्रह मी करत नाही. भारताच्या शक्तीची व ताकदीची मला कल्पना असल्यामुळेच मी त्याला अहिंसेनुसार आचरण करायला सांगत आहे. आपली ताकद ओळखण्याकरिता भारताला शस्त्रास्त्रांच्या प्रशिक्षणाची गरज नाही. आपण स्वतःला केवळ मांसाचा गोळा समजत असल्यामुळे आम्हाला त्यांची गरज वाटते.

(यंग, ११-८-१९२०, पृ. ३)

भारताला आपला मार्ग निवडायचा आहे. हवे असल्यास तो युद्धाचा मार्ग निवडू शकतो आणि तो आज जिथे आहे त्याहून खोल अधःपतनाच्या गर्तेत सापडू शकतो.... जर भारत युद्धाद्वारे आपले स्वातंत्र्य मिळवेल, तर त्याची अवस्था फ्रान्स वा ब्रिटनसारखी न होता त्याहूनही वाईट होईल....

### शांततेचा मार्ग

भारताकरिता शांततेचा मार्गही खुला आहे. त्याच्यात जर धैर्य असेल, तर त्याचे स्वातंत्र्य निश्चित आहे. आपल्या उतावळ्या स्वभावामुळे आपल्याला शांततेचा मार्ग लांब वाटू शकत असला तरी तोच सर्वात जवळचा मार्ग आहे. शांततेच्या मार्गाने आंतरिक समृद्धी आणि स्थैर्य सुनिश्चित होतात. आपण तो नाकारतो कारण आपली अशी कल्पना असते की, त्या मार्गाचे अनुसरण केल्यामुळे आपल्याला सत्ताधा-याच्या इच्छेपुढे मान झुकवावी लागेल. परंतु जेव्हा आपल्या लक्षात येईल की, हे दडपण तथाकथित आहे व आपल्या जीविताच्या वा संपत्तीच्या नुकसानीकरिता आपली तयारी नसल्यामुळे आपण स्वतःच त्या संभ्रमाकरिता

जबाबदार आहोत; तेव्हा निष्क्रिय समर्थनाच्या आपल्या नकारार्थक प्रवृत्तीत बदल करण्याचे काम तेवढे शिल्लक राहत असते. या परिवर्तनामुळे होणारा त्रास हा युद्धाचा मार्ग अनुसरल्यामुळे जी शारीरिक पीडा आणि नैतिक हानी होते व त्यामुळे जे परिणाम होतात; त्यापेक्षा तुलनेत निश्चितपणे नगण्य असेल. अजून एक गोष्ट अशी आहे की, युद्धामुळे दोन्ही पक्षांची हानी होत असते. शांततेच्या मार्गाचे अनुसरण केल्यामुळे होणारा त्रास दोन्ही पक्षांकरिता हितावह असतो. प्रसववेदनेसारखा तो सुखद असतो....

शांततेचा मार्ग सत्याचा मार्ग आहे. सत्य शांततेपेक्षाही अधिक महत्त्वपूर्ण आहे. वास्तवात खोटेपणातून हिंसेचा जन्म होतो. सत्यनिष्ठ माणूस फार काळ हिंसक राहू शकत नाही. सत्याचा शोध घेत असताना हिंसेची गरज नसल्याचे त्याला जाणवेल. त्याचबरोबर त्याला हेही कळेल की, आपल्यात जोपर्यंत हिंसेचा लवलेश शिल्लक आहे तोपर्यंत सत्याच्या शोधात आपल्याला यश मिळू शकणार नाही. (यंग, २०-५-१९२६, पृ. १५४)

अहिंसा समजणे ही सोपी गोष्ट नाही आणि आपण दुर्बल असल्यामुळे तिचे अनुसरण करणे तर आणखी कठीण होते. आपण भक्तिभावाने आणि नम्रतापूर्वक कार्य करत राहिलो पाहिजे व आपले ज्ञानचक्षू उघडावे अशी प्रार्थना आपण ईश्वराला करत राहिलो पाहिजे. त्याचबरोबर दररोज ईश्वराकडून मिळणा-या प्रकाशाप्रमाणे आपण काम केले पाहिजे. यामुळेच स्वातंत्र्याकरिता सुरू असलेल्या आपल्या आंदोलनात अहिंसेबद्दल अढळ श्रद्धा मनात कायम टिकवून ठेवणे हे एक शांतताप्रेमी आणि शांततेचा उपासक म्हणून माझे कर्तव्य आहे. भारत जर या मार्गावर चालून स्वातंत्र्य मिळवू शकला तर विश्वशांतीकरिता ती त्याची सर्वात मोठी देणगी होईल. (यंग, ७-२-१९२९, पृ. ४६)

## पश्चिमेची नक्कल नाही

आजकाल असे समजण्याची फॅशन आहे की, जे काही अमेरिका आणि इंग्लंड करत आहेत ते सर्व चांगलेच असले पाहिजे.... आज युद्ध, पैसा आणि विनाशाकरिता विविध शस्त्रास्त्रांच्या शोधाकरिता साधनसंपन्नता यांचाच विषय झाला आहे. आता त्याचा संबंध शौर्य आणि सहनशीलतेशी राहिलेला नाही. पुरुष, स्त्रिया आणि मुलाबाळांना विनाशाच्या चक्रात फसवण्याकरिता मला केवळ एक बटन दाबण्याची गरज आहे. तेवढे केले की त्यांच्यावर विषाचा वर्षाव होईल.

आपले रक्षण करण्याकरिता या पद्धतीची नक्कल करण्याची आम्हाला इच्छा आहे का? आणि आमची तशी इच्छा असली तरी आमची आर्थिक क्षमता तशी आहे का? सैन्यावरील वाढत्या खर्चाविषयी आपण नेहमी तक्रार करत असतो. परंतु आपण इंग्लंड अमेरिकेची नक्कल केली तर आम्हाला आमच्या संरक्षण खर्चात दहापट वाढ करावी लागेल....

हिंसेच्या मदतीने राष्ट्राला अहिंसेच्या मार्गावर ठेवता येत नाही. त्याकरिता आतुर असलेल्या राष्ट्राच्या आतून ती निर्माण झाली पाहिजे. त्यामुळे 'आमच्या तात्कालिक आकांक्षा कोणत्या आहेत?' या प्रश्नाचा आपण विचार केला पाहिजे. आधी पश्चिमी राष्ट्रांचे अनुकरण करायचे आणि नंतर व्यथांचा अनुभव घेतल्यानंतर दूरवरच्या अस्पष्ट भविष्य काळात आपली पावले परत घेण्याचा मार्ग आपल्याला अनुसरायचा आहे काय? अथवा नवीन वाट चोखाळून अथवा माझ्या दृष्टीने मुख्यत्वेकरून शांततापूर्ण मार्गावर चालत राहून त्याच्या माध्यमातून आपल्याला स्वातंत्र्य मिळवायचे व ते कायम टिकवायचे आहे का?

यात भ्याडपणाशी तडजोड करण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही. एक तर विनाशाचे प्रशिक्षण घेऊन, मग तो विनाश आत्मरक्षणार्थ का असेना, शस्त्रसज्ज झाले पाहिजे आणि या प्रक्रियेत आपण स्वतःही त्रास सहन करण्याचे प्रशिक्षण घ्यायला पाहिजे. अथवा राष्ट्राचे संरक्षण करण्याकरिता वा पारतंत्र्यातून त्याला मुक्त करण्याकरिता, स्वतः व्यथा सहन करण्यास आपण तयार राहिले पाहिजे. दोन्ही बाबतीत शौर्याशिवाय भागणार नाही. हिंसक उपायात व्यक्तिगत शौर्याचे तेवढे महत्त्व नाही जेवढे अहिंसक उपायात आहे. अहिंसक उपायांचा स्वीकार केल्यानंतरही आपण कदाचित हिंसेचा पूर्णपणे त्याग करू शकणार नाही. परंतु तशा अवस्थेत हिंसा ही अहिंसेच्या ताब्यात असेल आणि हिंसेचे महत्त्व राष्ट्रीय जीवनात सतत कमी होत जाईल.

आज कमीत कमी विचारात आणि वाणीत राष्ट्रधर्म अहिंसा आहे असे जरी वाटते तरी आपण हळूहळू हिंसेकडे वाहतो आहोत. संपूर्ण वातावरणात अधीरपणा भरलेला आहे. आमचा दुबळेपणा आम्हाला हिंसक होण्यापासून अडवतो आहे. आम्ही शक्तिशाली बनावे आणि नंतर जाणूनबुजून आपण हिंसेचा त्याग करावा, याची गरज आहे. याकरिता कल्पनाशक्तीची आणि जगातील प्रवाहांच्या सखोल अभ्यासाची गरज आहे. आज पश्चिमेकडील वरवरचा डामडौल आमचे डोळे दिपवत आहे आणि रात्रंदिवस आपल्या मोहपाशात बांधून ठेवणा-या, घेरी

आणणा-या त्या नृत्यालाच आम्ही प्रगती समजतो आहोत. त्यामुळे आपण निश्चितपणे सर्वनाशाकडे जाऊ, हे पाहण्याची आपली तयारीच नाही. सर्वात आधी आपल्याला हे कळले पाहिजे की पाश्चात्त्य राष्ट्रांशी त्यांच्या अटींवर स्पर्धा करणे म्हणजे आत्महत्या करण्यापेक्षा वेगळे काही नाही. आपल्याला जर हे कळले की, हिंसेच्या वरवर दिसणा-या ताकदीनंतरही विश्वाचे नियमन नैतिक शक्तींद्वारे होते, तर अहिंसेच्या असीम संभावनांवर पूर्ण विश्वास ठेवून आपण स्वतःला तिचे प्रशिक्षण दिले पाहिजे. प्रत्येक व्यक्ती मान्य करते की १९२२मध्ये वातावरण अहिंसक ठेवण्यात यश आले असते तर आपण आपल्या उद्दिष्टापर्यंत पूर्णपणे पोहोचलो असतो. तरीही आपण ज्या आश्चर्यजनक पद्धतीने अहिंसेचे प्रदर्शन - मग ते कितीही ढोबळ स्वरूपाचे का असेना - करू शकलो त्यामुळे स्वराज्याच्या मागणीला जी शक्ती मिळाली, ती अजूनही कायम आहे. सत्याग्रह सुरू होण्याआधी राष्ट्र ज्या पक्षाघाती भीतीने ग्रस्त होते ती भीती कायमची निघून गेली. यामुळे माझ्या मते, अहिंसेचे प्रशिक्षण ही धैर्याने घेण्याची गोष्ट आहे. आपल्याला जर जिवंत राहायचे असेल व विश्वशांतीत महत्त्वपूर्ण भर घालायची असेल तर आपण दृढतापूर्वक आणि वेगाने शांततेचा मार्ग निवडला पाहिजे. (यंग, २२-८-१९२९, २७६-७)

## युद्धाला पर्याय

पस्तीस वर्षांच्या अखंड राजकीय अनुभवानंतर अंतःकरणापासून मला वाटते की, जग रक्तपाताला कंटाळले आहे. त्याला मुक्तीचा कोणता तरी मार्ग हवा आहे आणि मी हा विचार करता करता खूष होतो की, या क्षुधित जगाला मुक्तीचा मार्ग दाखवण्याचे श्रेय कदाचित भारताच्या प्राचीन भूमीलाच मिळेल.

यामुळेच भारताच्या महान संघर्षात हार्दिक सहकार्य करण्याकरिता विश्वातील महान राष्ट्रांना आमंत्रित करताना मला किंचितही संकोच वाटत नाही. (इंके, २०९)

मी संपूर्ण नम्रतापूर्वक सांगण्याचे साहस करीन की, भारत जर आपल्या ध्येयापर्यंत सत्य आणि अहिंसेच्या मार्गाने पोहोचला तर आज संपूर्ण विश्व ज्या शांततेकरिता तहानले आहे, त्या शांततेकरिता भारताकडून कमी महत्त्वाचा हातभार लागणार नाही आणि आज जे देश त्याला मोकळेपणाने मदत करत आहेत त्याच्या मोबदल्यात तोही काही प्रमाणात जगाची परतफेड करू शकेल.
(यंग, १२-३-१९३१, पृ. ३१)

स्वातंत्र्याच्या प्रकाशात भारत जर आपल्या धर्मानुसार (अहिंसा, भौतिक शक्तीवर अवलंबून न राहता) वागू शकला तर जगातील कोणतीही शक्ती त्याच्याकडे वाकडा डोळा करून पाहू शकणार नाही. भारताचा तो उज्ज्वलतम क्षण असेल आणि जगाच्या प्रगतीकरिता त्याने दिलेली ती अमूल्य देणगी असेल. (हरि, १४-४-१९४६, पृ. ९०)

**शूराची अहिंसा**

आपल्या अहिंसेने आपल्याला स्वातंत्र्याच्या दारापर्यंत आणून उभे केले आहे. मग या दारातून प्रवेश केल्यानंतर आपण अहिंसेचा त्याग करणार आहोत का? मला तर या गोष्टीचा दृढ विश्वास वाटतो की, ज्याप्रमाणे आम्हाला स्वातंत्र्य मिळवून देण्यात अहिंसेने महत्त्वाची भूमिका बजावली त्याचप्रमाणे विदेशी आक्रमण आणि आंतरिक अव्यवस्था यांचाही प्रतिकार करण्याकरिता तिचाच उपयोग होईल.

भारत जर वास्तवात अहिंसक राहिला तर त्याला विदेशी शक्तींपासून घाबरण्याची गरज राहणार नाही. आणि आपल्या रक्षणाकरिता त्याला ब्रिटिशांच्या आरमाराकडे वा वायूसेनेकडे पाहत बसावे लागणार नाही. मला हे माहीत आहे की अजूनपर्यंत आम्ही शूरांची अहिंसा मिळवू शकलो नाही.
(हरि, २१-४-१९४६, पृ. ९५)

मला स्पष्टपणे दिसते आहे की भारत अहिंसक राहिला नाही तर ती गोष्ट त्याच्याकरिता आणि विश्वाकरिताही हानिकारक होईल. त्यामुळे आमच्या हातून स्वातंत्र्य निघून जाईल. शक्य आहे की तशा अवस्थेत सैनिक शासनाचा विळखाही आमच्या भोवती पडू शकेल. शूराची अहिंसा कशी विकसित करावी याचा मी रात्रंदिवस विचार करत असतो.

भारताच्या अहिंसेचा सुगंध सर्व विश्वात दरवळेल व ते विश्वाला सुगंधित करून टाकील असे मी आशियायी संमेलनात म्हणालो होतो. ती आशा फलद्रूप होते की नाही हे जाणण्याकरिता मी उत्सुक आहे. (हरि, २७-७-१९४७, पृ. २५३)

**भारताचे कर्तव्य**

भारत आता स्वतंत्र आहे आणि हे वास्तव माझ्यासमोर उभे ठाकले आहे. आता पारतंत्र्याचे ओझे आमच्या डोक्यावरून उतरलेले असल्यामुळे चांगुलपणाच्या सर्व शक्ती अशा भारताच्या निर्माणाकरिता लावल्या पाहिजे की ज्याने मानवी संघर्षाच्या सर्व समस्या - मग त्या दोन राज्यांमधील असो की राज्यातील दोन गटांमधील

असो - सोडवण्याच्या परिचित मार्गाचा त्याग केलेला असेल. अजूनही मला विश्वास वाटतो की भारत कालानुरूप वर्तन करील आणि या दोन राष्ट्रांचा जन्म (भारत व पाकिस्तान) शेष मानवतेसाठी अभिशाप नसून वरदान असल्याचे सिद्ध करील. स्वतंत्र भारत जर आपल्या स्वातंत्र्याला अमूल्य समजत असेल, तर त्याने सामूहिक संघर्ष मिटवण्याकरिता अहिंसेच्या शस्त्राला पूर्णत्व प्रदान केले पाहिजे. (हरि, ३१-८-१९४७, पृ. ३०२)

चाळीस कोटी लोकांच्या शक्तिशाली राष्ट्राला अहिंसेने स्वातंत्र्य मिळवून दिले. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यामुळेच म्यांमार आणि श्रीलंका यांनाही स्वातंत्र्य मिळू शकले. ज्या राष्ट्राने शस्त्राशिवाय स्वातंत्र्य मिळवले त्याने आपल्या स्वातंत्र्याचे रक्षण शस्त्राशिवाय करण्याकरिता आपण समर्थ असल्याचे सिद्ध केले पाहिजे. भारताजवळ एक स्थलसेना, एक आरमार आणि एक वायूसेनाही निर्माणाधीन आहे व अजूनही यांचा विकास व्हावयाचा आहे या तथ्याची कल्पना असतानाही मी हे म्हणतो आहे. भारत आपल्या अहिंसक शक्तीचा विकास करणार नसेल तर त्याने जे काही मिळवले, त्याचे त्याच्याकरिता व जगाकरिता काहीही महत्त्व राहणार नाही. भारताचे सैनिकीकरण स्वतः त्याचा आणि जगाचा विनाश करून टाकील. (हरि, १४-१२-१९४७, पृ. ४७१)

## ३१. भारत आणि अहिंसक मार्ग

मला मान्य आहे की, दुर्बलाच्या अहिंसेपेक्षा वेगळ्या, शूराच्या आणि ताकदवान माणसाच्या अहिंसेचा प्रचार करण्यात मी अक्षम असल्याचे सिद्ध झाले आहे. परंतु याचा अर्थ असा नाही की या अमूल्य गुणाचा प्रचार कसा करावा हे मला माहीत नाही.... शूराच्या अहिंसेची शिकवण देण्याचा कोणताही कार्यक्रम लागू करण्यात आला नाही असे म्हणण्याऐवजी (जर हे सत्य असेल) हा पाठ शिकण्याची भारताची अजून तयारी झाली नाही असे म्हणणे अगदी योग्य होईल.... बलशाली व्यक्तीच्या अहिंसेचा कार्यक्रम तितका आकर्षक नसतो जितका दुर्बल माणसाच्या अहिंसेचा कार्यक्रम आकर्षक असल्याचे सिद्ध झाले आहे.

(हरि, २९-६-१९४७, पृ. २०९-१०)

### केवळ निष्क्रिय प्रतिकार

अहिंसेहून वेगळ्या निष्क्रिय प्रतिकारात लोकांच्या हृदयपरिवर्तनाची शक्ती नाही....

विषाचे अमृतात परिवर्तन करण्याकरिता काय करावे लागेल? असे करणे शक्य आहे का? मला माहीत आहे की हे अशक्य आहे आणि याची पद्धती मला माहीत आहे हेही मला कळते. परंतु भारतीय मानस निष्क्रिय प्रतिकाराचा प्रयत्न करण्याकरिता तयार असले तरी ते अहिंसेचा पाठ मात्र हृदयंगम करायला तयार नाही आणि कदाचित हीच ती गोष्ट असेल ज्यामुळे विषाचे अमृतात परिवर्तन होईल.

बहुतेक लोक मान्य करतात की मार्ग हाच आहे. परंतु त्यांच्यात या मार्गाने चालण्याची हिंमत नाही. पूर्ण शक्तीनिशी मला ही घोषणा करायची आहे की अहिंसा अयशस्वी झालेली नाही, ती कधी अयशस्वी होऊही शकत नाही. लोकच तिच्या उंचीपर्यंत पोहोचण्यात अयशस्वी ठरले आहेत.

मला कोणी असे सांगितले की, अहिंसक पद्धतीचा प्रचार करण्याची पद्धत मला माहीत नाही तर मला त्याचे वाईट वाटणार नाही. माझ्या टीकाकारांनी तर माझ्यावर इथपर्यंत आरोप केला आहे की माझ्यात मुळी अहिंसाच नाही. माणसाच्या हृदयातील गोष्ट केवळ देवालाच माहीत असते. (हरि, २०-७-१९४७, पृ. २४३)

एक गोष्ट मी स्पष्ट करीन. मी स्पष्टपणे आणि पूर्णपणे मान्य केले होते की, गत चाळीस वर्षांपासून आम्ही जे आचरण करत आहोत ते अहिंसक प्रतिकाराचे नव्हते तर निष्क्रिय प्रतिकाराचे होते. हे साधन सशस्त्र प्रतिकाराची क्षमता वा इच्छा नसलेल्या दुर्बल लोकांचे साधन आहे.

आम्हाला जर अहिंसक प्रतिकार कसा करायचा ते माहीत असते, तर आम्ही दोन तुकड्यात वाटलेल्या भारताऐवजी जगासमोर स्वतंत्र भारताचे वेगळेच चित्र उभे केले असते. आज हे दोन तुकडे परस्परातील संघर्षात इतके व्यस्त आहेत की त्यांना त्या लक्षावधी उपाशी-तापाशी आणि निर्वस्त्र लोकांच्या, खाण्या-पिण्याचा व कपड्या-लत्त्याचा शांतपणाने विचार करून त्यांची व्यवस्था करण्याकरिताही वेळ नाही. या उपाशी-तापाशी लोकांना एका देवापेक्षा दुसरा कोणताही देव माहीत नाही आणि तो देव आहे जीवनावश्यक वस्तूंच्या रूपाने अवतरणारा ईश्वर. (हरि, २७-७-१९४७, पृ. २५१)

....ती दुबळ्या लोकांची निष्क्रियता होती, ती सशक्त हृदय असलेल्या लोकांची अहिंसा नव्हती. सशक्त हृदयाचा अहिंसक तर परस्परातील संबंधांमध्ये बिघाड निर्माण झाला तरी मानवी ऐक्य आणि बंधुभाव या भावनांचा कधीही त्याग करत नाही आणि आपल्या विरोधकावर बळजबरी करण्याऐवजी तो त्याच्या

हृदयपरिवर्तनाचा प्रयत्न करतो.

भारत जर हिंसेच्या शक्तीचे उदात्तीकरण करण्याची पद्धती शोधू शकला.... आणि परस्पर विरोधी हितातील भेद नाहीसे करून रचनात्मक व शांततापूर्ण पद्धतीत त्यात परिवर्तन करू शकला तर ती फार मोठी सौभाग्याची गोष्ट होईल. (हरि, ३१-८-१९४७, पृ. ३०२)

जी गोष्ट स्वातंत्र्यसंग्रामात मिळवता येऊ शकली नाही ती कधीही मिळवता येणे शक्य नाही, असे सांगण्याचा अधिकार कोणालाही नाही. खरे सांगायचे तर, अहिंसेच्या श्रेष्ठत्वाच्या प्रदर्शनाची वास्तविक संधी तर आता मिळते आहे. मान्य आहे की आपले लोक सार्वभौम सैनिकीकरणाच्या भोव-यात फसले आहेत. परंतु काही लोक जर स्वतःला त्या भोव-यापासून दूर ठेवू शकले तर त्यांना शूराच्या अहिंसेचे उदाहरण प्रस्तुत करण्याचे सौभाग्य प्राप्त होईल व भारताच्या पहिल्या सेवकांमध्ये त्यांची गणना होईल. ही गोष्ट बुद्धीद्वारे सिद्ध करता येऊ शकत नाही. यामुळे जोपर्यंत अनुभवाद्वारे ही प्राप्त करता येत नाही तोपर्यंत श्रद्धापूर्वक ती मान्य केली पाहिजे. (हरि, १-२-१९४८, पृ. ६)

## पोलीस दल

पोलिसांना न टाळण्याची आणि माझ्या सर्व कामकाजावर देखरेख करण्याकरिता त्यांना मदत करणारी माझी भूमिका आयुष्यभर राहिलेली आहे. गोष्ट अशी आहे की मला गोपनीयतेची नेहमीच घृणा वाटत आली आहे. तसेच पोलिसांच्या देखरेखीबद्दल तटस्थ राहिल्यामुळे माझे जीवन आणखी सोपे झाले आहे. या तटस्थतेमुळे आणि पोलिसांशी सौजन्यपूर्ण व्यवहार केल्यामुळे त्यांच्यातील अनेकांचे मौन हृदयपरिवर्तन झाले आहे.

परंतु माझी तटस्थता एक गोष्ट आहे आणि ती माझी वैयक्तिक गोष्ट आहे. एक पद्धती म्हणून पोलिसांची पाळत अतिशय तिरस्करणीय गोष्ट आहे आणि चांगल्या शासनाकरिता ती शोभणारी गोष्ट नाही. आधीच कराच्या ओझ्याने दबलेल्या करदात्यावर हे विनाकारण ओझे आहे. आम्ही लक्षात ठेवले पाहिजे की हा सगळा खर्च काबाडकष्ट करणा-या करोडो कष्टकरी लोकांच्या खिशातून होत असतो. (यंग, १६-५-१९२९, पृ. १५९)

अहिंसक राज्यात पोलीस दल ठेवण्याची गरज असू शकते. ते माझ्या अपूर्ण अहिंसेचे चिन्ह आहे हे मला मान्य आहे. मी सैन्याबद्दल म्हणालो होतो की आम्ही

सैन्याशिवाय काम भागवू शकतो तसे मी पोलीस दलाबद्दल म्हणण्याचे साहस करू शकत नाही. हो, मी अशा राज्याची कल्पना अवश्य करू शकतो आणि करतो आहे ज्यात पोलिसांची गरज नसेल. परंतु असे करण्यात आपल्याला यश येईल की नाही हे भविष्यच सांगेल.

माझ्या कल्पनेतील पोलीस आजच्या पोलिसांपेक्षा फार वेगळे असतील. त्यात अहिंसेवर विश्वास असणारे लोक भरती केले जातील. ते जनतेचे स्वामी नाही तर सेवक असतील. लोक सहजपणे त्यांना मदत करतील व परस्परातील सहकार्याने ते सतत कमी होत जाणा-या उपद्रवांवर नियंत्रण आणू शकतील. पोलिसांजवळ कोणत्या ना कोणत्या प्रकारची शस्त्रे असतील हे खरे असले तरी त्यांच्या उपयोगाची वेळ जरी आली तरी ती क्वचितच केव्हा तरी येईल. खरे सांगायचे तर पोलीस सुधारकाच्या रूपात काम करतील. पोलिसांचे काम मुख्यतः लुटारू आणि डाकू यांच्यापर्यंतच सीमित असेल.

अहिंसक राज्यात श्रमिक आणि भांडवलदार यांच्यात संघर्ष आणि संप क्वचितच होतील. अहिंसक बहुमताचा प्रभाव इतका जास्त असेल की समाजातील बहुतेक लोक त्याचे म्हणणे आदराने ऐकतील. अशाच प्रकारे सांप्रदायिक दंगलींचीही शक्यता नसेल. (हरि, १-९-१९४०, पृ. २६५)

स्वराज्यात मला आणि तुम्हाला असे पोलीस दल मिळेल जे अनुशासित असेल आणि बुद्धिमानही असेल. मी अथवा अजून कोणी या शक्तींशी सामना करण्याची याहून चांगली पद्धत शोधून काढली नाही तर ते आंतरिक व्यवस्थेची काळजी घेईल आणि बाहेरून हल्ला करणा-यांचाही सामना करील. (हरि, २५-१-१९४२, पृ. १५)

## अपराध आणि शिक्षा

अहिंसक पद्धतीने स्वतंत्र झालेल्या भारतात अपराध तर होतील परंतु अपराधी असणार नाहीत. इतर विकारांप्रमाणेच अपराधही एक रोग आहे आणि तो आजच्या सामाजिक व्यवस्थेतून निर्माण झाला आहे. यामुळे खुनासह प्रत्येक अपराधाकडे रोग म्हणून पाहिले जाईल. असा भारत कधी अस्तित्वात येईल की नाही ही वेगळी गोष्ट आहे. (हरि, ५-५-१९४६, पृ. १२४)

स्वतंत्र भारतातील तुरुंग कसे असले पाहिजे? सर्व गुन्हेगारांना रोगी मानण्यात यावे आणि तुरुंगांना रुग्णालय. अशा प्रकारच्या रुग्णावर इलाज करून त्यांना

दुरुस्त करण्याकरिता या रुग्णांना भरती करण्यात येईल. कोणतीही व्यक्ती केवळ मजा करण्यासाठी गुन्हा करत नसते. अपराध रोगी मनाचे चिन्ह आहे. रोगाच्या कारणांचा शोध घेऊन ते कारण दूर केले पाहिजे.

तुरुंगांची जेव्हा रुग्णालये होतील, तेव्हा त्यांच्याकरिता प्रासादासारख्या इमारतींची गरज राहणार नाही. इतका खर्च कोणताही देश उचलू शकत नाही आणि भारतासारखा देश तर नाहीच नाही. परंतु तुरुंगातील कर्मचा-यांचा दृष्टिकोन डॉक्टर आणि परिचारिकांसारखा असला पाहिजे. कर्मचारी आपले मित्र आहेत असे कैद्यांना वाटले पाहिजे. कैद्यांना त्याचे मानसिक स्वास्थ्य परत मिळावे याकरिता आपण तिथे आहोत, कैद्यांचा छळ करण्याकरिता नाही असे कर्मचा-यांना वाटले पाहिजे. लोकप्रिय सरकारांना याकरिता आवश्यक आदेश काढावे लागतील. परंतु मध्यंतरीच्या काळात तुरुंगातील कर्मचारीवर्ग आपले मानवीकरण करण्याच्या दृष्टीने काही ना काही तर करू शकतोच.

कैद्यांचे कर्तव्य काय आहे? ....त्यांनी आदर्श कैद्याप्रमाणे व्यवहार केला पाहिजे. तुरुंगाची शिस्त तोडण्यापासून त्यांनी स्वतःला अडवले पाहिजे. त्यांना जे कोणते काम तिथे करण्याकरिता देण्यात येईल ते त्यांनी मन लावून केले पाहिजे. उदाहरणार्थ तुरुंगातील स्वयंपाक कैदी स्वतः तयार करतात. त्याकरिता तांदूळ, डाळ, धान्य जे काही असेल त्यात काडीकचरा, खडेमाती काही राहू नये म्हणून ते त्यांनी नीट स्वच्छ केले पाहिजे.

कैद्यांच्या ज्या काही तक्रारी असतील त्या त्यांनी सभ्यपणाने तुरुंगाधिका-याला सांगितल्या पाहिजे. त्यांनी आपल्या लहानशा समुदायात असे वर्तन केले पाहिजे की तुरुंगातून बाहेर पडताना आपण पूर्वीपेक्षा अधिक चांगला माणूस झालो असे कैद्यांना वाटले पाहिजे. (हरि, २-११-१९४७, पृ. ३९५)

## ३२. भारत आणि हिंसक मार्ग

भारत जर तलवारीचा सिद्धान्त अनुसरणार असेल तर शक्य आहे की त्याला क्षणिक विजय मिळेल. परंतु तशा अवस्थेत भारताबद्दल मला अभिमान वाटणार नाही. मी भारताशी याकरिता बांधलेलो आहे की माझ्याजवळ जे काही आहे ते मला भारताकडून मिळालेले आहे. विश्वाला देण्याकरिता भारताजवळ एक संदेश आहे यावर माझा विश्वास आहे. त्याने युरोपचे अंधानुकरण करू नये.

भारताने तलवारीचा सिद्धान्त स्वीकारला तर तो क्षण माझ्या परीक्षेचा क्षण

असेल. मला आशा आहे की मी त्यात उत्तीर्ण होईन. माझ्या धर्माला कोणत्याही भौगोलिक सीमा नाहीत. जर माझ्यात त्या धर्माबद्दल जिवंत श्रद्धा असेल तर ती भारतावरील माझ्या प्रेमावरही अतिक्रमण करू शकेल. अहिंसेच्या माध्यमातून भारताची सेवा करण्याकरिता माझे जीवन समर्पित आहे....
(यंग, ११-८-१९२०, पृ. ४)

भारत जर हिंसेला आपला धर्म मानणार असेल आणि त्या वेळी मी जिवंत असेन, तर भारतातच राहिले पाहिजे असे मला वाटणार नाही. तेव्हा माझ्या मनात त्याच्याबद्दलची गौरवाची भावना राहणार नाही. माझी देशभक्ती माझ्या धर्माच्या अंतर्गत आहे. मला जशा प्रकारच्या आध्यात्मिक पोषणाची गरज आहे तसे पोषण मला भारताकडून मिळते असे मला वाटत असल्यामुळे एखादे मूल आपल्या आईच्या छातीला चिकटून असावे तसा मी भारताशी बांधलेलो आहे. याचे वातावरण माझ्या उच्चतम आकांक्षांकरिता अनुरूप आहे. ज्या दिवशी ही श्रद्धा निघून जाईल त्या दिवशी आपल्या पालकांची कधीही भेट होण्याची आशा नसलेल्या अनाथ मुलासारखा मी होऊन जाईन. (यंग, ६-४-१९२१, पृ. १०८)

## निःशस्त्र विजय

भारताने अहिंसक साधनांनी आपले स्थान मिळवले तर त्याला कधीही फार मोठे सैन्य, तेवढेच मोठे आरमार व त्याहूनही मोठी वायुसेना यांची कधीही गरज भासणार नाही, असे मला वाटते. भारताच्या स्वातंत्र्यसंघर्षात अहिंसक विजय मिळू शकेल इतक्या उंचीवर त्याची आत्मचेतना पोहोचली तर त्यामुळे जागतिक मूल्यांमध्ये बदल होईल आणि बहुतांश युद्धसामग्री अनावश्यक असल्याचे दिसून येईल. असा भारत केवळ एक स्वप्न, एक बालिश मूर्खपणा असू शकेल. परंतु भारत जर अहिंसेच्या आधाराने स्वातंत्र्य मिळवील तर माझ्या मते त्याची परिणती अशीच व्हायला पाहिजे.... त्याचा आवाज अशा एका शक्तिशाली राष्ट्राचा आवाज असेल की जो संपूर्ण विश्वातील हिंसक शक्तींवर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न करील.
(यंग, ९-५-१९२९, पृ. १४८)

राष्ट्रीय सरकार कोणते धोरण अवलंबील ते मी सांगू शकत नाही. माझी खूप इच्छा असली तरी तोपर्यंत मी कदाचित जिवंतही राहणार नाही. मी जर जिवंत राहिलो तर शक्य तितक्या जास्त प्रमाणात अहिंसेचे अनुसरण करण्याचा सल्ला देईन आणि विश्वशांती व विश्वाची नवीन व्यवस्था यांच्याकरिता भारताने दिलेली

ती महान देणगी असेल. मला वाटते की भारतात अनेक लढाऊ जमाती असल्यामुळे त्यांचे म्हणणे तत्कालीन सरकार नक्कीच ऐकेल आणि राष्ट्रीय नीती सैन्यवादाच्या कोणत्या तरी संशोधित स्वरूपाकडे झुकेल. मी निश्चितपणे आशा करीन की एक राजकीय शक्ती म्हणून अहिंसेचे सामर्थ्य सिद्ध करणे.... वाया जाणार नाही आणि अहिंसेचे प्रतिनिधित्व करणारा कोणता तरी मजबूत पक्ष भारतात कायम राहील. (हरि, २१-६-१९४२, पृ. १९७)

**सैनिकीकरणाचा मार्ग**

राष्ट्रमंडळामध्ये भारताचे कोणते स्थान असेल? पाचव्या दर्जाची शक्ती असण्यावर भारताचे समाधान होईल काय....? पहिल्या प्रतीची सैनिकशक्ती बनण्याकरिता भारताला वेळ लागेल. आणि त्याकरिता त्याला कोणत्या तरी पाश्च्यात्त्य शक्तीचे संरक्षण घ्यावे लागेल. (हरि, २१-४-१९४६, पृ. ९५)

सैनिक शक्ती बनण्याच्या प्रयत्नात कोणताही संदेश देण्याची शक्ती नसलेला जगातील पाचव्या श्रेणीचा देश बनून राहण्यावर समाधान मानण्याची भारताची कमीतकमी काही वर्षे तरी तयारी आहे की.... आपल्या अहिंसक नीतीला अजून धारदार बनवून ती कायम ठेवून विश्वातील प्रथम श्रेणीचे राष्ट्र बनायचे आणि कठोर परिश्रमानंतर मिळवलेल्या आपल्या स्वातंत्र्याचा उपयोग जगाला, जे मित्रराष्ट्रांच्या विजयानंतरही वाईट त-हेने चिरडले जात आहे, (हिंसेच्या) ओझ्यापासून मुक्त करण्याकरिता करायचा या बाबतीत भारताला निर्णय घ्यावा लागेल. (हरि, ५-५-१९४६, पृ. ११६)

सत्य आणि अहिंसा यांच्याशी बांधिलकी असलेला भारत दक्षिण आफ्रिकेत राहणा-यांना शांती पाठ शिकवील. परंतु भारताने अहिंसेच्या मार्गाने चालायचे की तलवारीच्या हे आपल्याला आणि काँग्रेसला ठरवावे लागेल. जगातील लहान राष्ट्रांना व मानवतेला आपला हा बहुमोल वारसा गमवावा लागला तर ती फार खेदाची गोष्ट होईल; चाळीस कोटी लोकसंख्या असलेल्या या उपमहाद्वीपाने बंदुकीच्या दारूचा मार्ग निवडला व धोक्याचे जीवन जगायचे ठरवले तर ती फार वाईट गोष्ट होईल. (हरि, ३०-६-१९४६, पृ. २०६-७)

युद्धाने थकलेभागलेले आशियायी देश जपानच्या पावलावर पाऊल टाकून आपले सैनिकीकरण करतील काय? भारत कोणता मार्ग निवडतो यावर याचे उत्तर अवलंबून आहे..... ज्यामुळे जग आधीच त्रस्त झालेले आहे असा घृणेचा

आणि हिंसेचा संदेश स्वतंत्र भारत जगाला देतो की शांततेचा? (हरि, ८-६-१९४७, पृ. १७७)

संपूर्ण भारताने शांततेच्या शाश्वत नियमाचा स्वीकार केला तर तो खरोखरीच संपूर्ण विश्वाचा निर्विवाद नेता बनेल. (हरि, ८-६-१९४७, पृ. १८१)

एका मजबूत भारताचा उदय होईल अशी मी तर केवळ प्रार्थना आणि आशा करतो आहे. हा भारत पश्चिमेच्या सगळ्या बीभत्स गोष्टींचे अनुकरण करणारा युद्धप्रिय देश असणार नाही तर असा नवीन भारत असेल की जो पश्चिमेकडील सर्व चांगल्या गोष्टी शिकण्याकरिता तत्पर राहील आणि केवळ आशिया आणि आफ्रिकाच नाही तर संपूर्ण पीडित जग त्याच्याकडे आशेने पाहील....

परंतु पश्चिमेच्या भपक्याची खोटी नक्कल करण्याच्या वेडानंतरही माझ्या आणि माझ्यासारख्या अनेक लोकांच्या मनात अजूनही आशा आहे की भारत या समूह नृत्यातून बाहेर पडेल आणि १९१५पासून बत्तीस वर्षांपर्यंत त्याने अहिंसेचे जे प्रशिक्षण घेतले आहे - मग ते कितीही अपरिपक्व का असेना - ते घेतल्यानंतर ज्या उच्च स्थानावर त्याचा हक्क प्रस्थापित होतो तो ते मिळवील. (हरि, ७-१२-१९४७, पृ. ४५३)

आकाराने लहान झालेला परंतु आत्म्याने शुद्ध असलेला भारत अजूनही वीरांच्या अहिंसेची पाठशाळा बनू शकतो आणि विश्वाच्या नैतिक नेतृत्वाचे स्थान ग्रहण करू शकतो, तसेच दलित आणि शोषित जातीजमातींकरिता भारत आशा आणि मुक्तीचा संदेशवाहक बनू शकतो. परंतु एक बोजड आणि निष्प्राण भारत पश्चिमेकडील तिस-या दर्जाची नक्कल बनून राहील व त्यांच्या आक्रमणाचा सामना करण्याचे सामर्थ्य त्याच्यात नसेल. माझ्या स्वप्नातील भारत नष्ट झाल्यानंतर मला जगण्याची कोणतीही इच्छा नाही. (हरि, १८-१-१९४८, पृ. ५१)

# ६. सत्याग्रह

## ३३. सत्याग्रहाचा दिव्य संदेश

### निष्क्रिय प्रतिकार

निष्क्रिय प्रतिकार एखाद्या दुधारी तलवारीसारखा आहे; त्याचा कोणत्याही प्रकारे उपयोग केला जाऊ शकतो. यामुळे ज्याच्या विरोधात या शस्त्राचा उपयोग करण्यात येतो त्याचेही कल्याण होते आणि जो या शस्त्राचा उपयोग करतो त्याचेही कल्याण होते. एक थेंब रक्त वाहवल्याशिवाय याचे दूरगामी परिणाम होतात. ना हे शस्त्र गंजते ना याला कोणी चोरू शकतो. (हिंस्व, ८२)

माझे निश्चित मत आहे की निष्क्रिय प्रतिकार कठोराहून कठोर हृदयालाही पाझर फोडू शकते.... हा अतिशय प्रभावी आणि परिणामकारक उपाय आहे.... हे एक अतिशय शुद्ध अस्त्र आहे. शारीरिक प्रतिकार करणा-यांपेक्षा निष्क्रिय प्रतिकार करणा-यांमध्ये अधिक साहस असले पाहिजे.

असे साहस येशू, डॅनियल, क्रेमर, लेटिमर आणि रिडली यांच्यामध्ये होते. यांनी व्यथा आणि मृत्यू यांचा गुपचूप स्वीकार केला. रशियाच्या झारची अवज्ञा करणारे टॉलस्टॉय यांच्यातही असेच साहस होते. या साहसाचे टॉलस्टॉय हे सर्वश्रेष्ठ उदाहरण आहेत.

वास्तवात वाईटावर चांगुलपणाच्या विजयाकरिता संपूर्ण प्रतिकार करणारा एकटासुद्धा पुरेसा असतो. (यंग, १०-११-१९२१, पृ. ३६५)

माझा दावा आहे की.... निष्क्रिय प्रतिकाराची पद्धती.... सर्वात स्पष्ट आणि सर्वात सुरक्षित आहे. यात प्रतिकार करणा-याचा हेतू खरा नसेल तर हानी केवळ निष्क्रिय प्रतिकार करणा-याचीच होते.

येशू, डॅनियल आणि सॉक्रेटिस यांनी निष्क्रिय प्रतिकार अथवा आत्मशक्ती यांचे सर्वोत्तम प्रतिनिधित्व केले आहे. या सर्व महापुरुषांनी आपल्या आत्म्याच्या तुलनेत शरीराला कोणतेही महत्त्व दिले नाही.

या सिद्धान्ताचे टॉलस्टॉय हे सर्वोत्तम आणि सर्वश्रेष्ठ (आधुनिक) प्रतिपादक

होते. त्यांनी या सिद्धान्ताचे केवळ प्रतिपादनच केले नाही तर त्याला आपल्या जीवनात उतरवलेसुद्धा. पश्चिमेत हा सिद्धान्त प्रचलित होण्याच्या ब-याच आधी भारतीयांना हा सिद्धान्त कळला होता व सामान्यपणे त्यांनी तो प्रत्यक्ष अमलातही आणला होता.

आत्मशक्ती ही शारीरिक शक्तीपेक्षा अधिक श्रेष्ठ आहे हे कळणे सोपे आहे. वाईटपणाच्या प्रतिकारार्थ लोकांनी जर आत्मशक्तीचा अवलंब करायला सुरुवात केली तर सध्याच्या अनेक व्यथा दूर केल्या जाऊ शकतात.

आत्मबलाचा आधार घेतल्यामुळे इतर व्यक्तींचे कोणत्याही परिस्थितीत कधीही नुकसान होऊ शकत नाही. त्यामुळे जेव्हा याचा दुरुपयोग केला जातो तेव्हा केवळ त्याच्या प्रयोगकर्त्यालाच तो हानी पोहोचवतो, ज्याच्या विरोधात प्रयोग करण्यात येतो त्याला नाही. सद्‌गुणाप्रमाणे आत्मबलाचे पारितोषिक ते स्वतःच आहे. आत्मबलाच्या प्रयोगात अपयशाची कोणतीच शक्यता नाही.
(स्पीरा, पृ. १६५)

बुद्धाने विरोधकांमध्ये जाऊन निर्भयपणे त्यांच्याशी संघर्ष केला आणि उद्धट पुरोहितवादाला शरण यायला भाग पाडले. येशूने जेरुसलेममधील मंदिरांमधून सावकारी करणा-यांना बाहेर काढले आणि पाखंडी आणि दांभिक लोकांना स्वर्गाकडून शाप द्यायला लावला. हे दोन्ही महापुरुष थेट कार्यवाहीचे जोरदार पुरस्कर्ते होते.

परंतु शिक्षा करतानासुद्धा बुद्ध आणि येशू यांनी आपल्या प्रत्येक कामात सौजन्य आणि प्रेम यांचे दर्शन घडवले. त्यांनी आपल्या शत्रूला किंचितही दुखापत केली नाही आणि ज्या सत्याकरिता ते जगले त्याची कोणतीही हानी न होऊ देता त्यांनी स्वतःला समर्पित करून टाकण्याची नेहमीच सहर्ष तयारी ठेवली.

जर बुद्धाच्या प्रेमाची उंची पुरोहितवादाला नमवण्याकरिता असमर्थ आहे असे सिद्ध झाले असते तर बुद्धाने पुरोहितवादाचा विरोध करत असताना मरणसुद्धा पत्करले असते. एका संपूर्ण साम्राज्याला आव्हान देत काट्याचा मुकुट धारण करून येशू सुळावर चढला. मी जेव्हा अहिंसक प्रतिकार आंदोलन सुरू करतो तेव्हा मी याच पुरुषांच्या पावलावर पाऊल टाकून नम्रतापूर्वक चालत असतो एवढेच.... (यंग, १२-५-१९२०, पृ. ३)

**सविनय अवज्ञा**

अवज्ञा सविनय तेव्हाच असू शकते जेव्हा ती अंतःकरणपूर्वक असते, तिच्यात

आदरभाव असावा, संयम असावा, तिच्यात केव्हाही उद्धटपणा येऊ नये, ती सर्वमान्य सिद्धान्तावर आधारित असावी, स्वैराचाराच्या दोषाचा तिला स्पर्श नसावा आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे तिच्यामागे घृणा वा द्वेषाची भावना नसावी. (यंग, २४-३-१९२०, पृ. ४)

माझे मत आहे की सविनय आज्ञाभंग हे घटनात्मक आंदोलनाचे शुद्धतम रूप आहे. हो, त्याचे 'सविनय' म्हणजेच अहिंसक रूप जर वरवरचे असेल तर ते मानहानिकारक व तिरस्करणीय असेल. अहिंसेवर जर पूर्णपणे दृढ राहिले गेले तर अतिशय उग्र आज्ञाभंगामुळेही हिंसा भडकणार नाही. त्यामुळे तिची निंदा करायची वेळच येणार नाही.

एखादे मोठे आणि तीव्र आंदोलन जोखीम पत्करल्याशिवाय चालवता येऊ शकत नाही, जीवनात जर मोठी जोखीम नसेल तर ते जीवन जगण्यासारखे नाही असे समजले जाते. जोखीम नसेल तर जगण्यात काही स्वारस्य राहत नाही असे जगाचा इतिहासही सांगत नाही काय?
(यंग, १५-१२-१९३१, पृ. ४१९)

सविनय अवज्ञा नागरिकाचा जन्मसिद्ध अधिकार आहे. आपले माणूसपण गमावल्याशिवाय हा अधिकार सोडण्याचे साहस कोणीही करू शकत नाही. सविनय अवज्ञेमुळे कधीही अराजक निर्माण होऊ शकत नाही. ते अपराधी स्वरूपाच्या आज्ञाभंगामुळे निर्माण होऊ शकते. प्रत्येक राज्य अपराधपूर्वक अवज्ञेला बळजबरीने चिरडून टाकते आणि जर त्याने असे केले नाही तर ते स्वतः नष्ट होऊन जाते. (यंग, ५-१-१९२२, पृ. ५)

सत्याग्रही विवेकाने आणि स्वेच्छेने समाजनियमांचे पालन करत असतो. त्याला ते त्याचे पवित्र कर्तव्य वाटत असते. अशा प्रकारे समाजनियमांचे पालन केल्यामुळेच कोणते नियम न्यायोचित आणि कोणते अनुचित याचा निर्णय करण्याच्या अवस्थेत तो येतो. यानंतरच काही विशिष्ट परिस्थितीत काही नियमांची अवज्ञा करण्याचा अधिकार त्याला मिळतो. (ए, ३४७)

### पूर्वअट

सविनय प्रतिकार आंदोलनाची पहिली पूर्वअट ही आहे की त्यात भाग घेणा-यांकडून वा सामान्य जनतेकडून हिंसा सुरू न होण्याची निश्चिती असली पाहिजे. हिंसा भडकल्यानंतर ती राज्याकडून वा सविनय आज्ञाभंग करणा-यांच्या

विरोधकांतील अन्य तत्त्वांच्या प्रेरणेने भडकवली गेली होती असे म्हणणे अप्रामाणिकपणाचे होईल.

हे स्पष्टपणे कळले पाहिजे की सविनय कायदेभंग हिंसेच्या वातावरणात प्रगती करू शकत नाही. याचा अर्थ असा नाही की यानंतर सत्याग्रहीजवळ कोणताही उपाय शिल्लक राहत नसतो. सविनय आज्ञाभंगाऐवजी त्याला इतर उपायांचा शोध घ्यावा लागेल. (हरि, १८-३-१९३९, पृ. ५३)

**सत्याग्रहाचे स्वरूप**

सत्याग्रहाचे वैशिष्ट्य हे आहे की याचा शोध घेण्याकरिता माणसाला बाहेर जावे लागत नाही. तो स्वतःच त्याच्यासमोर येऊन उभा राहतो. सत्याग्रहात मुळातच हा गुण आहे. ज्यात कोणत्याही गोष्टी गुप्त ठेवण्यासारख्या नसतात आणि चलाखी वा असत्य यासारख्या गोष्टींनाही ज्यात स्थान नसते अशा धर्मयुद्धाचा शोध घ्यावा लागत नाही, तो आपोआपच प्रकट होतो आणि धर्मनिष्ठ व्यक्तीची त्याकरिता नेहमीच तयारी असते.

ज्या संघर्षाची आधीपासून योजना तयार करावी लागते तो संघर्ष धर्मसंगत आहे असे मानले जाऊ शकत नाही. धर्मसंगत संघर्षाची योजना ईश्वर स्वतः बनवतो आणि लढ्याचे संचालनही तो स्वतःच करतो.

धर्मयुद्ध केवळ ईश्वराच्या नावानेच लढले जाऊ शकते; सत्याग्रही स्वतःला जेव्हा अगदी लाचार समजतो, मोडण्याच्या अवस्थेत येतो आणि चोहोकडे त्याला अंधार दिसू लागतो तेव्हा ईश्वर त्याच्या मदतीकरिता धावून येतो.
(ससा, पृ. XIV)

सत्याग्रहाची अंमलबजावणी करताना सुरुवातीच्या अवस्थेतच माझ्या लक्षात आले होते की सत्याचे अनुसरण करताना विरोधकावर हिंसक वार करण्याची परवानगी नसते. उलट धैर्य आणि सहानुभूतीने आपली चूक दुरुस्त करण्याकरिता विरोधकाला सत्याग्रहीने प्रेरित केले पाहिजे. गोष्ट अशी आहे की एखादी गोष्ट एखाद्या माणसाला योग्य वाटते तर तीच गोष्ट दुस-या माणसाला अयोग्य वाटते. धैर्याचा अर्थ आहे आत्मपीडा. अशा रीतीने सत्याग्रहाचा अर्थ झाला विरोधकाऐवजी स्वतः त्रास सहन करून सत्य सिद्ध करणे. (रिकप)

सत्याग्रह आणि त्याच्या शाखा असहकार व सविनय प्रतिकार या गोष्टी आणखी काही नसून पीडेच्या नियमाचीच दुसरी नावे आहेत. (यंग, ११-८-१९२०, पृ. ३)

सत्याग्रह आणि अहिंसा यांच्या मदतीने तुम्ही सर्व जगाला तुमच्या चरणाशी आणू शकता. थोडक्यात सत्याग्रह आणखी काही नसून राजकीय आणि राष्ट्रीय जीवनात सत्य आणि सौजन्य यांची स्थापना करणेच आहे.
(यंग, १०-३-१९२०, पृ. ३)

स्वतःला पूर्णपणे पुसून टाकणे, अधिकात अधिक विनम्रता, असीम धैर्य आणि जळजळीत आस्था म्हणजे सत्याग्रह. सत्याग्रह स्वतःच पुरस्कार आहे.
(यंग, २६-२-१९२५, पृ. ७३)

सत्याग्रह सत्याचा अविरत शोध आहे आणि सत्यापर्यंत पोहोचण्याचा दृढ संकल्प आहे. (यंग, १९-३-१९२५, पृ. ९५)

ही अशी शक्ती आहे, जी गुपचूप आणि वरवर शांतपणे काम करताना दिसते. परंतु वास्तव हे आहे की या शक्तीपेक्षा अधिक गतीने काम करणारी दुसरी कोणतीही शक्ती या जगात नाही. (यंग, ४-६-१९२६, पृ. १८९)

सत्याग्रह हा शब्दप्रयोग फार शिथिलपणे करण्यात येतो आणि त्यात हिंसेचा भावही दडलेला आहे असे समजले जाते. परंतु या शब्दाचा जनक म्हणून मी हे स्पष्ट करण्याची परवानगी मागतो की यात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष, प्रगट वा अप्रगट अशी कोणत्याही प्रकारची हिंसा वर्ज्य आहे; यात मानसिक, वाचिक वा कर्माद्वारे केलेल्या हिंसेला कोणतेही स्थान नाही. विरोधकाची हानी व्हावी म्हणून त्याच्याबद्दल द्वेषभावना ठेवणे अथवा त्याला वा त्याच्याबद्दल कठोर शब्द बोलणे म्हणजे सत्याग्रहाचा भंग करणे होईल.

सत्याग्रह नेहमी सौजन्यशील असतो, तो कधीही इजा करत नाही. क्रोध अथवा आकसापोटी तो कधीही करण्यात येऊ नये. यात वितंडवाद, उतावीळपणा आणि गडबडगोंधळ यांना कोणतेही स्थान नसते. याचा बळजबरीला सरळ सरळ विरोध आहे. हिंसेचा संपूर्ण पर्याय म्हणून याची स्थापना करण्यात आली आहे.
(हरि, १५-४-१९३३, पृ. ८)

ज्या व्यक्तीची चैतन्यशक्ती जबरदस्त आहे, ज्याच्या मनात कोणताही संशय आणि भीती नाही त्या व्यक्तीकरिता सत्याग्रहाचा संघर्ष आहे. सत्याग्रह आपल्याला जगण्याची आणि मरण्याची अशा दोन्ही कला शिकवतो. देहधारींकरिता जन्म आणि मृत्यू दोन्ही गोष्टी न चुकणा-या आहेत. आपल्या आतील चैतन्याचे दर्शन होण्याकरिता माणूस जाणीवपूर्वक सतत प्रयत्न करत असल्यामुळे तो पशूपासून वेगळा असल्याचे सिद्ध होते. (हरि, ७-४-१९४६, पृ. ७४)

## विकसनशील विज्ञान

सत्याग्रहाविषयीचे माझे ज्ञान दिवसेंदिवस वाढते आहे. गरजेच्या वेळी मार्गदर्शन करण्याकरिता माझ्याजवळ कोणतेही पुस्तक नसते. जिला मी माझा कोश समजतो ती गीतासुद्धा माझ्याजवळ नसते. माझ्या कल्पनेतील सत्याग्रह विकासप्रक्रियेतील एक विज्ञान आहे. शक्य आहे की ज्याला मी विज्ञान समजतो ते विज्ञान असल्याचे सिद्धच होणार नाही आणि ते अगदी वेड्याचा जरी नाही तर एखाद्या मूर्खाचा विचार वा लहर असल्याचे सिद्ध होईल.

शक्य आहे की सत्याग्रहाचा खरेपणा पर्वताप्रमाणे प्राचीन असल्याचे आढळून येईल. परंतु अजूनपर्यंत विश्वसमस्यांकरिता, विशेषतः युद्धासारख्या भीषण समस्यांच्या सोडवणुकीकरता सत्याग्रहाची उपयोगिता मान्य करण्यात आलेली नाही. शक्य आहे की यात जी गोष्ट नवीन आहे म्हणून समजले जाते, तिचा युद्धाच्या समस्येच्या सोडवणुकीकरिता कोणताही विशेष उपयोग सिद्ध होणार नाही. हेही शक्य आहे की ज्या गोष्टींना सत्याग्रहाचे म्हणजेच अहिंसेचे यश समजले जात होते त्या गोष्टी वास्तवात सत्य आणि अहिंसेच्या यशाच्या द्योतकच नव्हत्या, तर हिंसेच्या भीतीमुळे मिळालेले ते यश होते. या शक्यता माझ्यासमोर सदैव राहिल्या आहेत. मी लाचार आहे. माझ्या प्रार्थनेचे जे उत्तर मला ईश्वराकडून मिळते तेच मी राष्ट्रासमोर अनुसरणाकरिता मांडतो. याबद्दल असेही म्हणता येईल की मी नेहमी देवाची सेवा करण्याकरिता त्याच्या हुकुमाचे पालन करण्याचा प्रयत्न करत असतो. (हरि, २४-९-१९३८, पृ. २६६)

## सत्याग्रहाचे तंत्र

विजेत्याच्या हाती आपला आत्मा विकण्याला नकार देण्याचा अर्थ तुम्ही ते काम करणार नाही जे करायला तुमचे अंतःकरण मनाई करते. समजा, शत्रू तुम्हाला नाक घासण्याकरिता वा कान पकडण्याकरिता वा अशाच प्रकारचे कोणते तरी लज्जास्पद काम करायला सांगतो तर तुम्ही ते करायला नकार द्याल. अहिंसेचे पुजारी असल्यामुळे तुम्ही आधीपासूनच निर्णय घेतलेला असेल की सांसारिक गोष्टींचा आत्म्याशी कोणताही संबंध नाही. त्यामुळे कोणी तुमच्यापासून तुमची संपत्ती लुबाडून घेत असेल तर तुम्ही त्याला अडवणार नाही. ज्याला तुम्ही स्वतःचे समजता ते तुमच्याजवळ तोपर्यंतच राहतील जोपर्यंत जग तुम्हाला तसे करू देईल.

आपल्या मनाच्या लहरींना बळी न पडण्याचा अर्थ असा आहे की, तुम्ही कोणत्याही मोहाला बळी पडणार नाही. माणूस बहुधा एवढा दुबळ्या मनाचा असतो की तो लोभ आणि गोड शब्द यांच्या जाळ्यात फसतो. आपल्या सामाजिक जीवनात असे घडत असल्याचे आपण दररोज पाहतो. दुबळ्या मनाची माणसे सत्याग्रही होऊ शकत नाहीत. सत्याग्रहीचे 'नाही' अढळ असते आणि 'हो' हे शाश्वत 'हो' असते. केवळ अशाच व्यक्तींमध्ये अहिंसेचा पुजारी होण्याची ताकद असते. परंतु याचबरोबर माणसाला दृढनिश्चय आणि दुराग्रह यांच्यातील भेद कळला पाहिजे. हो अथवा नाही म्हणाल्यानंतर जर माणसाला वाटले की आपला निर्णय चुकीचा होता आणि हे कळल्यानंतरही तो आपल्या निर्णयावर अडून राहिला तर तो दुराग्रह वा मूर्खपणा होईल. निर्णय घेण्यापूर्वी माणसाने सर्व गोष्टींचा सावधगिरीने साधकबाधक विचार केला पाहिजे.

कोणाला मालक मानून त्याच्याबद्दल निष्ठा ठेवण्याला नकार देण्याचा अर्थ स्पष्ट आहे. याचा अर्थ आहे तुम्ही विजेत्यासमोर झुकणार नाही, त्याच्या उद्दिष्टपूर्तीकरिता तुम्ही मदत करणार नाही. हिटलरने ब्रिटनला ताब्यात घेण्याचे स्वप्न कधीही पाहिले नव्हते. ब्रिटनने पराजयाचा स्वीकार करावा एवढीच त्याची इच्छा होती. तसे झाले की विजेता पराभूताकडून हवे ते मागू शकतो व पराभूताला विवश होऊन विजेत्याला ती गोष्ट द्यावी लागते. परंतु त्याने जर पराजय स्वीकारला नाही तर शत्रू तोपर्यंत लढेल जोपर्यंत तो विरोधकाला मारून टाकत नाही. परंतु सत्याग्रही हा तर विरोधकाने मारण्यापूर्वीच शरीराने मृत असतो, म्हणजे त्याने आपल्या शरीराच्या मोहाचा त्याग केलेला असतो व तो केवळ आत्म्याच्या विजयातच जगत असतो. त्यामुळे जो आधीच मेलेला असतो तो कुणाला मारण्याचा प्रयत्न का करील? मारत असताना मरण्याचा खरा अर्थ आहे पराभूत होऊन मरणे. कारण शत्रूला जे हवे ते तुम्ही जिवंत असताना त्याला मिळणार नसेल तर तर तुम्हाला मारून तो ते प्राप्त करण्याचा प्रयत्न करील. दुसरीकडे जेव्हा त्याला दिसेल की तुमचा स्वतःचा जीव वाचवण्याकरिताही हात उचलायचा तुमचा अगदीच हेतू नाही तेव्हा तुम्हाला मारण्याचा त्याचा उत्साह थंड होईल. प्रत्येक शिका-याचा हाच अनुभव आहे. आजपर्यंत कोणी गायीची शिकार केली असल्याचे ऐकिवात नाही.

(हरि, १८-८-१०४०, पृ. २५३-४)

## पीडा सहन करण्यातील शक्ती

क्रोध अथवा दुर्भावना मनात आणल्याशिवाय पीडा सहन करणे हा असा उगवता सूर्य आहे ज्याच्यासमोर कठोरतम हृदयालाही पाझर फुटू शकतो व अगदी घोर अज्ञानही नाहीसे होऊ शकते. (यंग, १९-२-१९२५, पृ. ६१)

पीडा सहन करण्याचीही सुनिश्चित सीमा आहे. ही गोष्ट बुद्धिमत्तापूर्ण व अबुद्धिमत्तापूर्ण दोन्ही प्रकारची असू शकते आणि जेव्हा हिची सीमा संपते तेव्हाही पीडा सहन करत राहणे हे अबुद्धिमत्तापूर्णच नसते तर मूर्खपणाची पराकोटीही असते. (यंग, १२-३-१९३१, पृ. ३०)

खरोखरी पीडा सहन करत असताना तिची जाणीवही होत नाही व तिचे कधी गणितही लावले जात नाही. तिचा स्वतःचाच असा एक आनंद असतो व तो सर्व आनंदांपेक्षा श्रेष्ठ असतो. (यंग, १९-३-१९३१, पृ. ४१)

दिवसेंदिवस माझा विश्वास बळावू लागला आहे की लोकांकरिता मूलभूत असलेल्या महत्त्वाच्या गोष्टी केवळ तर्काधारे मिळवता येऊ शकत नाहीत तर पीडा सहन करण्याचे मूल्य चुकवून त्या मिळवाव्या लागतात. पीडा सहन करणे मानवजातीचा नियम आहे तर युद्ध जंगलाचा. विरोधकाचे हृदयपरिवर्तन करण्याकरिता आणि विवेकसंमत गोष्ट ऐकण्याकरिता विरोधकाने जे कान बंद केलेले असतात ते उघडण्याकरिता जंगलाच्या नियमापेक्षा पीडा सहन करण्याचा नियम किती तरी बलवान आहे. (यंग, ५-११-१९३१, पृ. ३४१)

## सत्याग्रहाची संहिता

सत्याग्रहीने भीतीचा कायमस्वरूपी त्याग केलेला असतो. यामुळेच विरोधकावर विश्वास टाकण्याची त्याला कधीच भीती वाटत नाही. विरोधकाने जरी त्याला वीस वेळा धोका दिला तरी एकविसाव्या वेळी तो त्याच्यावर विश्वास टाकायला तयार राहील. खरी गोष्ट अशी आहे की मानव स्वभावावर अढळ विश्वास हेच सत्याग्रह धर्माचे सार आहे. (ससा, पृ. १५९)

ज्याच्यात कायदा पाळण्याची सहज प्रवृत्ती नसेल तो सत्याग्रही नसतो. कायदा पाळण्याच्या आपल्या स्वभावामुळेच तो सर्वोच्च कायदा अर्थात आपल्या अंतःकरणाच्या आवाजाचे इतर कोणत्याही कायद्यापेक्षा अधिक निष्ठेने पालन करत असतो. (स्पीरा, पृ. ४६५)

सत्याग्रह सरळ कार्यवाहीचे सर्वात शक्तिशाली रूप असल्यामुळे सत्याग्रही

सत्याग्रह सुरू करण्याआधी इतर सर्व पर्यायांचा उपयोग करून पाहत असतो. त्यानुसार तो संबंधित प्राधिकरणाला विनंती करील, त्याच्याशी संपर्क सुरू ठेवील, मग त्या समस्येकडे जनतेचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करील, लोकांना संबंधित समस्या समजावून सांगण्याचा प्रयत्न करील, ज्यांना त्याचे म्हणणे ऐकून घेण्याची इच्छा असेल त्यांच्यासमोर तो आपली बाजू शांतपणे मांडेल, आणि जेव्हा सर्व उपाय संपून जातील तेव्हाच तो सत्याग्रहाला शरण जाईल आणि एकदा आतला आवाज ऐकून त्याने सत्याग्रह सुरू केला की मग तो सत्याग्रह कोणत्याही अवस्थेत परत घेणार नाही. (यंग, २०-१०-१९२७, पृ. ३५३)

सत्याग्रही कोणत्याही क्षणी संघर्षाकरिता तयार असला तरी शांततेकरिताही त्याने तेवढेच उत्सुक असायला पाहिजे. शांततेच्या कोणत्याही सन्माननीय तोडग्याचे त्याने स्वागत केले पाहिजे. (यंग, १९-३-१९३१, पृ. ४०)

आपण एकमेव सत्याग्रहावरच अवलंबून राहिले पाहिजे असा माझा सल्ला आहे. स्वातंत्र्य मिळवण्याचा दुसरा कोणताही चांगला उपाय नाही.
(हरि, १५-९-१९४६, पृ. ३१२)

सत्याग्रहीच्या संहितेत पशुबलासमोर आत्मसमर्पणाला कोणतेच स्थान नाही. समर्पण करायचेच असेल तर ते पीडेसमोर करावे, बंदुकधा-यासमोर नाही.
(यंग, ३०-४-१९३१, पृ. ९३)

सत्याग्रहीने आपल्या बाजूच्या इतर लोकांकडून समीक्षा व पुनर्समीक्षा करून घेण्याकरिता नेहमी तयार राहिले पाहिजे आणि जर काही दोष आढळला, तर त्यात लगेच सुधारणा केली पाहिजे. (हरि, ११-३-१९३९, पृ. ४४)

## सत्याग्रहीची पात्रता

माझे मत आहे कि भारतातील प्रत्येक सत्याग्रहीत.... खालील पात्रता असली पाहिजेः

(१) त्याची ईश्वरावर जिवंत श्रद्धा असली पाहिजे, कारण तोच त्याचा एकमेव आधार आहे.

(२) सत्य आणि अहिंसा यांना आपला धर्म मानत सत्याग्रहीने त्यांच्यावर विश्वास ठेवला पाहिजे आणि याच कारणामुळे त्याने माणसाच्या स्वभावातील चांगुलपणावर विश्वास ठेवला पाहिजे. आपण स्वतः व्यथा सहन करून विरोधकावर प्रेम केले तर विरोधकातील चांगुलपणाला जागे करण्यात यश येईल यावर त्याने विश्वास ठेवला पाहिजे.

(३) त्याने पवित्र जीवन व्यतीत केले पाहिजे आणि आपल्या ध्येयाच्या पूर्तीकरता आपले जीवन आणि संपत्ती समर्पित करण्याची त्याची नेहमीच तयारी असली पाहिजे.

(४) तो सवयीने खादीधारी आणि चरख्यावर सूत कताई करणारा असला पाहिजे. भारताच्या संदर्भात हे आवश्यक आहे.

(५) मद्यपान आणि अन्य व्यसन यांच्यापासून तो मुक्त असला पाहिजे. यामुळे त्याचा विवेक सदा जागृत राहील आणि चित्त स्थिर राहील.

(६) वेळोवेळी ठरलेल्या शिस्तीचे त्याने स्वतः होऊन पालन केले पाहिजे.

(७) स्वाभिमानाला धक्का लावण्याकरिता बनवण्यात आलेले नियम सोडून जेलच्या अन्य सर्व नियमांचे सत्याग्रहीने पालन केले पाहिजे.

वरील नियमावली सर्वसमावेशक नाही. हे नियम केवळ उदाहरणादाखल आहेत. (हरि, २५-३-१९३९, पृ. ६४)

सैतानाच्या पाठीवर बसून सत्याग्रही स्वर्गात जाऊ शकत नाही.
(हरि, १५-४-१९३९, पृ. ८६)

सत्याग्रहात भ्रष्टाचार, खोटेपणा वा कपट यांना कोणतेही स्थान नाही.
(बांक्रा, ९-८-१९४२)

सन्माननीय तडजोडीची कोणतीही संधी सत्याग्रही सोडत नाही, सोडू शकत नाही. परंतु तडजोडीची चर्चा असफल झाल्यानंतर त्याने संघर्षाकरिता सदैव तयार राहिले पाहिजे. त्याला आधीपासून कोणतीही तयारी करण्याची गरज नसते. त्याच्या कामात कोणत्याही प्रकारची गुप्तता नसावी. (यंग, १६-४-१९३१, पृ.७७)

अन्यायी माणसाला लज्जित करण्याचा सत्याग्रहीचा उद्देश कधीही नसतो ही गोष्ट लोक बहुधा विसरतात. त्याचे आवाहन अन्यायीला घाबरवण्याकरिता नसावे तर त्याच्या हृदयाला स्पर्श करण्याकरिता असले पाहिजे. सत्याग्रहीचा हेतू अन्यायीवर बळजबरी करण्याचा नसतो तर त्याचे हृदयपरिवर्तन करण्याचा असतो. आपल्या सर्व व्यवहारात त्याने कृत्रिमतेपासून दूर राहिले पाहिजे. स्वाभाविकपणेच तो आपल्या अंतःकरणातील दृढविश्वासाप्रमाणे काम करत असतो. (हरि, २५-३-१९३९, पृ. ६४)

सत्याग्रह मूलतः सत्यनिष्ठ व्यक्तीचे शस्त्र आहे. सत्याग्रहीची अहिंसेशी बांधिलकी असते आणि जोपर्यंत लोक मनाने, वाणीने आणि कर्माने त्याप्रमाणे आचरण करत नाहीत तोपर्यंत मी सत्याग्रह सुरू करू शकत नाही. (ए, पृ. ३४५)

नेहमीच माझी अशी धारणा राहिली आहे की आपण आपल्या चुकांकडे बहिर्वक्र दुर्बिणीने आणि इतरांच्या चुकांकडे त्याविरुद्ध बाजूने पाहिले तरच दोघांची न्यायोचित तुलना होऊ शकेल. माझा विश्वास आहे की ज्याला सत्याग्रही बनण्याची इच्छा आहे त्याने काळजीपूर्वक आणि प्रामाणिकपणे या नियमांचे पालन केले पाहिजे. (ए, पृ. ३४६)

पाशवी शक्तीपासून होणा-या छळाकरिता सत्याग्रही ईश्वरावर भरवसा ठेवत असतो.... (हरि, ७-४-१९४६, पृ. ७३)

कट्टर विरोधकाकडून येणा-या अपेक्षित आणि अनपेक्षित कोणत्याही धोक्यांना सत्याग्रही घाबरत नाही. परंतु एवढे मात्र खरे की, सैन्याप्रमाणे त्याने आपल्या आतील धोक्यांची भीती मात्र बाळगली पाहिजे.
(हरि, १४-७-१९४६, पृ. २२०)

**सत्याग्रह आणि दडपशाही**

ज्याप्रमाणे लादल्या गेलेल्या युद्धातून शिपायाला प्रशिक्षण मिळते त्याचप्रमाणे दडपशाहीमुळे सत्याग्रही प्रशिक्षित होतो. सत्याग्रहींनी दडपशाहीच्या कारणांचा शोध घ्यायला पाहिजे. दडपल्या गेलेल्या व्यक्ती किंचित शक्तिप्रदर्शनानेही सहजपणे घाबरतात आणि त्रास सहन करण्याकरिता व आत्मबलिदानाकरिता त्या तयार होत नाहीत असे त्यांना आढळून येईल. सत्याग्रहाचा पहिला पाठ शिकण्याची हीच वेळ असते.

ज्यांना सत्याग्रहाच्या अतुल शक्तीचे थोडेसेही ज्ञान आहे त्यांनी आपल्या शेजा-यांना दुबळेपणाने आणि लाचारीने नाही तर शौर्याने आणि जाणीवपूर्वक दडपण सहन करणे शिकवले पाहिजे....

तरीही सत्याग्रहाच्या तयारीकरिता जे अनाकर्षक नियम आहेत ते सत्याग्रहाच्या प्रशिक्षणाचे महत्त्वाचे भाग आहेत.

जोपर्यंत सत्याग्रह करण्याची इच्छा असलेली व्यक्ती प्रशिक्षणाच्या आवश्यक पाय-या ओलांडत नाही तोपर्यंत, जे फार जीवघेणे काम आहे, ती प्रबळ आणि सक्रिय अहिंसेचा विकास करू शकत नाही. (हरि, ८-४-१९३९, पृ. ८०)

# ३४. सत्याग्रहाची शक्ती

**सत्याग्रहाचा विजय**

दुर्भावना असेपर्यंत सत्याग्रहाचा स्पष्ट विजय अशक्य आहे. परंतु जे स्वतःला दुर्बल समजतात ते प्रेम करण्याला समर्थ नसतात. यामुळे दररोज सकाळी आपण पुढील संकल्प करणे हे आपले पहिले काम असले पाहिजे : 'मी जगात कोणालाच घाबरणार नाही, मी कोणाहीबद्दल दुर्भावना ठेवणार नाही, मी कोणाचाही अन्याय सहन करणार नाही, मी असत्यावर सत्याद्वारे विजय मिळवीन आणि असत्याचा प्रतिकार करताना कोणत्याही प्रकारचा त्रास सहन करण्याची माझी तयारी राहील.' (सली, सं. १४, पृ. ४-५-१९१९)

सत्याग्रहीकरिता वेळेचे कोणतेही बंधन नसते आणि त्याच्या त्रास सहन करण्याच्या शक्तीला कोणतीही मर्यादा नसते. यामुळेच सत्याग्रहात पराभव नावाची कोणतीही गोष्ट नसते. (यंग, १९-२-१९२५, पृ. ६१)

असे काही नाही की मी देहाला कमी महत्त्व देत असल्यामुळे सत्याग्रहात हजारो माणसांना मरताना पाहून मला आनंद होतो. परंतु मला माहीत आहे की दीर्घ काळात सत्याग्रहात जीवितहानी किमान होते आणि त्यामुळे बलिदान करणा-यांचे उदात्तीकरण तर होतेच पण त्यांच्या बलिदानामुळे पृथ्वीचेही उदात्तीकरण होते. (यंग, ८-१०-१९२५, पृ. ३४५)

एकदा ही गोष्ट गतिमान झाली व ती भरपूर सखोल असेल तर ती सर्व विश्वाला पादाक्रांत करू शकेल. ती सर्वात मोठी शक्ती आहे कारण तिच्याद्वारे आत्म्याची सर्वात मोठी अभिव्यक्ती होते. (यंग, २३-९-१९३४, पृ. ३३२)

माझ्या अनुभवाने मला शिकवले आहे की गुणोत्तर वृद्धीचा नियम प्रत्येक न्यायोचित संघर्षाला लागू होतो. आणि सत्याग्रहाच्या बाबतीत तर हा नियम स्वयंसिद्ध आहे. जसजशी सत्याग्रह संघर्षाची प्रगती होऊ लागते तसतसे इतर लोक आणि इतर घटक त्याला शक्ती प्रदान करू लागतात. त्यामुळे सत्याग्रहाच्या शक्तीत सतत वृद्धी होत असते. वास्तवात हे अपरिहार्य आहे आणि सत्याग्रहाच्या पहिल्या सिद्धान्ताशी ही गोष्ट जुळलेली आहे. याचे कारण असे की, सत्याग्रहात किमान हेच कमालही असते आणि या किमानमध्ये अजून कमी करणे शक्य नसल्यामुळे सत्याग्रहात माघार घेण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही; त्याच्या

गतीची एकच दिशा असते व ती म्हणजे प्रगतीची. इतर प्रकारच्या संघर्षांमध्ये तडजोडीच्या वेळी मागण्या कमी करता याव्या म्हणून आधीच मागण्या थोड्या वाढवून सांगितल्या जातात. त्यामुळे तशा संघर्षांमध्ये गुणोत्तर वृद्धीचा नियम सारखाच लागू होत नाही. (सा, पृ. ३१९)

माझ्या दृष्टिकोनातून सत्याग्रह सर्वाधिक सक्रिय शक्तींपैकी एक आहे. तो सूर्यासारखा आहे जो कधीही न चुकता पृथ्वीवर तळपत असतो. आपल्याला जर कळू शकले तर सत्याग्रह करोडो सूर्यांपेक्षाही अधिक तेजस्वी आहे. तो जीवन आणि प्रकाश तसेच शांतता आणि सुख यांचा प्रसार करत असतो.
(यंग, १८-४-१९२९, पृ. १२६)

## एक खरा सत्याग्रही

एक जरी सत्याग्रही शेवटपर्यंत टिकून राहिला तरी विजय निश्चित आहे. (ससा, पृ. XIV)

मारत असताना मरणा-या लाखो माणसांच्या बलिदानाच्या तुलनेत एका निर्दोष व्यक्तीचे आत्मबलिदान लाखो पटीने परिणामकारक होते. उद्धट क्रौर्याचा प्रतिकार करण्याकरिता ईश्वराने अथवा माणसाने आतापर्यंत निर्मिलेला सर्वात शक्तिशाली प्रतिकार म्हणजे निर्दोष व्यक्तीचे स्वेच्छा बलिदान आहे. (यंग,१२-२-१९२५,पृ.६०)

माझे म्हणणे आहे की केवळ एक माणूस पूर्णपणे अहिंसक असला तरी तो मोठ्यात मोठी आग शांत करू शकतो.... परंतु लोकशाहीच्या या युगात अपेक्षित परिणाम लोकांच्या सामूहिक प्रयत्नातून निर्माण झाले पाहिजे. कोणा एका अतिशय शक्तिशाली व्यक्तीच्या प्रयत्नातून ध्येयप्राप्ती चांगली गोष्ट असली तरी त्यामुळे समुदायाला आपल्या सामूहिक शक्तीचा कधीही बोध होऊ शकत नाही. (५०. हरि, ८-९-१९४०, पृ. २७७)

एकट्याने चालण्यावर माझा विश्वास आहे. मी एकटाच या जगात आलो, मृत्यूची छाया पडलेल्या दरीतून एकटाच चालतो आहे आणि जेव्हा वेळ येईल तेव्हा मी एकटाच जाणार आहे. मला माहीत आहे की मी एकटा जरी असलो तरी माझ्यात सत्याग्रह सुरू करण्याची पुरेशी क्षमता आहे. मी यापूर्वी असे केले आहे. (हरि, २१-७-१९४६ पृ. २२७)

## सत्याग्रहाची अंमलबजावणी

सत्याग्रह अशी शक्ती आहे जिचा प्रयोग व्यक्तीही करू शकते आणि समुदायही

करू शकतो. त्याचा उपयोग जितका चांगला राजकीय प्रकरणात केला जाऊ शकतो तितक्याच चांगल्या प्रकारे घरगुती बाबतीतही केला जाऊ शकतो. याची सार्वभौम व्यवहार्यता त्याच्या चिरंतनतेचे व अपराजिततेचे चिन्ह आहे. याचा प्रयोग पुरुष. स्त्रिया, मुले हे सर्व समान रूपात करू शकतात.

दुर्बल लोक जोपर्यंत हिंसेचे उत्तर हिंसेने देऊ शकत नाहीत तोपर्यंत ते जिचा प्रयोग करू शकतात अशी अहिंसा ही एक शक्ती आहे असे म्हणणे चूक आहे....

ज्याप्रमाणे प्रकाश अंधाराला नष्ट करतो त्याप्रमाणे सत्याग्रहाची शक्ती सर्व प्रकारच्या क्रौर्यांना, सर्व प्रकारच्या अन्यायांना नष्ट करून टाकते. कोणत्याही समाजावर शासन करणे तोपर्यंतच शक्य असते जोपर्यंत ते जाणीवपूर्वक वा अजाणता आपल्यावर शासन करू देण्याकरिता तयार असतात या सिद्धान्तावर राजकारणातील सत्याग्रहाचा प्रयोग आधारित आहे. (यंग, ३-११-१९२७, पृ.३६९)

मौलिक सत्याग्रही असल्याचा दावा मी कधीही केला नाही. माझा एवढाच दावा आहे की सत्याग्रहाच्या सिद्धान्ताचा जवळपास सार्वभौम प्रयोग करता येऊ शकतो. परंतु हा सिद्धान्त सर्व काळात आणि सर्व प्रदेशातील लाखो लोक आत्मसात करू शकतात की नाही हे अजून पाहायचे आणि प्रदर्शित करायचे आहे. (यंग, २२-९-१९२७, पृ. ३१७)

## अहिंसक मान्यता

सत्याग्रह सार्वभौम अंमलबजावणीचा कायदा आहे. त्याचा वापर कुटुंबापासून सुरू होऊन सर्व क्षेत्रांपर्यंत वाढवता येतो. समजा जमीनदार आपल्या (कृषकांचे) शेतक-यांचे शोषण करत आहे आणि त्यांच्या मेहनतीच्या फळापासून त्यांना वंचित करून त्या फळांचा स्वतःच उपभोग घेतो आहे. शेतक-यांनी सविनय विरोध केल्यानंतरही तो त्यांचे म्हणणे ऐकायला तयार नाही आणि आक्षेप घेत तो म्हणतो की त्याला विशिष्ट रक्कम आपल्या बायकोकरिता हवी आहे, इतकी आपल्या मुलांकरिता इत्यादी इत्यादी. शेतकरी वा त्याच्या बाजूने बोलणा-यांमध्ये असे काही लोक आहेत की ज्यांचा काही प्रभाव आहे, ते त्याच्या पत्नीला पतीशी बोलण्याविषयी विनंती करतात. कदाचित पत्नी म्हणेल की मला अशा प्रकारे शोषण करण्यात आलेल्या संपत्तीची गरज नाही. कदाचित मुलेही असेच म्हणतील की आम्हाला गरज भासली तर आम्ही स्वतः कमाई करू.

असेही समजा की, तो कोणाचेही म्हणणे ऐकायला तयार नाही आणि त्याची

बायको मुलेही त्याच्या विरोधात एक होतात. तरीही तो त्याच्यासमोर झुकणार नाही. जमीनदार शेतक-यांना जमिनीवरून काढून टाकू पाहील तर ते निघून जातील, परंतु जाताना ते स्पष्टपणे सांगतील की कसेल त्याचीच जमीन. परंतु जमीनदार सर्व जमीन स्वतः कसू शकत नसल्यामुळे त्याला त्यांच्या न्याय्य मागण्या मान्य कराव्याच लागतील.

परंतु शक्यता आहे कि जमीनदार त्या शेतक-यांना काढून दुस-या शेतक-यांना ठेवील. अशा अवस्थेत असहकार आंदोलन सुरू करण्यात येईल व ते तोपर्यंत सुरू राहील जोपर्यंत हे नवीन कास्तकार आपली चूक कबूल करून पहिल्या कास्तकारांच्या आंदोलनात सामील होत नाहीत.

अशा रीतीने सत्याग्रह लोकमताला शिक्षित करण्याची एक प्रक्रिया आहे. समाजातील सर्व घटकांना सत्याग्रह आपल्यामध्ये सामावून घेतो आणि अखेरीस त्याचा प्रतिकार करता येऊ शकत नाही. या प्रक्रियेत हिंसा विघ्न उपस्थित करते आणि संपूर्ण सामाजिक रचनेच्या क्रांतीला दीर्घ काळापर्यंत लांबवते.

सत्याग्रहाच्या यशाकरिता पुढील अटी आवश्यक आहेत : (१) सत्याग्रहीच्या मनात विरोधकाबद्दल घृणेची भावना असू नये (२) सत्याग्रहाचा मुद्दा खरा आणि महत्त्वाचा असला पाहिजे (३) आपल्या ध्येयाची पूर्ती होईपर्यंत सत्याग्रहीने कष्ट सहन करण्याकरिता तयार राहिले पाहिजे. (हरि, ३१-३-१९४६, पृ. ६४)

## आत्मरक्षणाचे प्रशिक्षण

मला वाटते की या युगात प्रत्येक स्त्री-पुरुषाने आत्मरक्षणाची कला शिकली पाहिजे. पश्चिमेत याकरिता शस्त्राचे शिक्षण देण्यात येते. प्रत्येक वयस्क माणसाला विशिष्ट कालावधीकरिता अनिवार्यपणे सैन्यात दाखल व्हावे लागते. सत्याग्रहाचे शिक्षण सर्वांकरिता आहे, यात वयाचे वा स्त्री-पुरुष असे कोणतेही बंधन नाही. हे खरे आहे की आजूबाजूच्या वातावरणाचा मनावर परिणाम होत असतो, परंतु यामुळे बंधनाचे औचित्य सिद्ध होऊ शकत नाही.

सशस्त्र प्रतिकारापेक्षा सत्याग्रह केव्हाही श्रेष्ठ आहे. हे तर्काने नाही तर प्रात्यक्षिकाने अधिक चांगल्या पद्धतीने सिद्ध करता येते. सत्याग्रहाचे शस्त्र सबळाचे आभूषण आहे. ते दुर्बलाचे आभूषण कधीही होऊ शकत नाही. दुर्बलाचा अर्थ इथे मनःप्राणाने दुर्बल; शरीराने दुर्बल असा नाही. याच्या सीमा गुण आहेत, निंदा करावी असे अवगुण नाहीत.

अजूनही एक सीमा आहे, जी समजून घेणे आवश्यक आहे आणि ती आहे सत्याग्रहाचा उपयोग चुकीच्या उद्दिष्टाकरिता कधीही केला जाऊ शकत नाही.

प्रत्येक गावात, शहरात, इमारतीच्या प्रत्येक भागात सत्याग्रहींच्या तुकड्या तयार करता येऊ शकतात. या तुकड्यांचे सदस्य असे असतील की जे त्या तुकड्या संघटित करणा-यांना ओळखत असतील. या दृष्टीने सत्याग्रह आणि सशस्त्र सेना यांच्यात अंतर आहे. सैन्यात भरती होण्याकरिता राज्य आग्रह करत असते, परंतु सत्याग्रहाच्या तुकडीत त्याच लोकांना भरती करण्यात येते ज्यांचा सत्य आणि अहिंसेवर विश्वास असेल. परंतु तुकडीत सामील होणा-या व्यक्तींची संघटनकर्त्यांना माहिती असणे आवश्यक आहे. (हरि, १७-३-१९४६, पृ.४५-६)

## दुराग्रह

माझ्या मते हिंसक पद्धतींमुळे भारतावर संकट कोसळल्याशिवाय राहू शकत नाही. श्रमिक आत्महत्या करू लागतील आणि आपला राग काढण्याकरिता श्रमिकांनी सविनय कायदेभंग सुरू केला तर भारताला अवर्णनीय त्रास सहन करावा लागेल....

मी जेव्हा सत्याग्रह आणि सविनय आज्ञाभंगाची सुरुवात केली होती तेव्हा त्यात अपराधी प्रकृतीच्या आज्ञाभंगाला कोणतेही स्थान नव्हते. माझ्या अनुभवाने मला शिकवले आहे की सत्याचा प्रचार हिंसेद्वारा कधीही केला जाऊ शकत नाही.

आपली उद्दिष्टे न्याय्य असल्याबद्दल ज्यांची खात्री आहे व ज्यांच्यात असीम धैर्य आहे आणि ज्यांच्याकडून कधीही अपराधजन्य अवज्ञा वा हिंसा होऊच शकत नाही त्यांनाच सविनय आज्ञाभंग करण्याचा अधिकार असेल.

ज्याप्रमाणे कोणतीही व्यक्ती एकाच वेळी संतप्त आणि शांत असू शकत नाही त्याचप्रमाणे कोणतीही व्यक्ती एकाच वेळी सविनय आज्ञाभंग करणारी आणि अपराधपूर्ण आज्ञाभंग करणारी असू शकत नाही. ज्याप्रमाणे आपल्या मानसिक आवेगांवर विजय मिळवल्यानंतरच व्यक्ती आत्मसंयमाचा गुण आत्मसात करून त्याचा विकास करू शकते त्याचप्रमाणे देशाच्या नियमांचे पूर्णपणे आणि स्वेच्छापूर्वक पालन करण्याची सवय झाल्यानंतरच व्यक्तीमध्ये सविनय आज्ञाभंगाची क्षमता उत्पन्न होते.

अशाच प्रकारे प्रलोभनाची संधी आल्यानंतरही त्याच्या मोहाला बळी न पडण्यात माणसाला यश मिळाल्यानंतरच तो माणूस प्रलोभनापासून मुक्त आहे

असे समजले जाते. त्याचप्रमाणे आपण क्रोधावर विजय मिळवला आहे हे तेव्हाच म्हणता येईल जेव्हा क्रोधाकरिता पुरेशी कारणे असूनही आपण आपला संयम टिकवण्यात यशस्वी होतो. (यंग, २८-४-१९२०, पृ. ७-८)

काही विद्यार्थ्यांनी ‘धरण्यावर‘ बसण्याच्या रूपाने पूर्वीच्याच रानटीपणाला पुनर्जीवित केले आहे.... मी याला रानटीपणा यासाठी म्हणतो की ही बळजबरी करणारी उद्धटपणाची पद्धती आहे. धरण्यावर बसणा-या व्यक्तीला माहीत असते की तिला चिरडले जाऊ शकत नाही. यामुळे ही कृती भ्याडपणाचीही आहे. धरण्याला हिंसक म्हणणे कठीण आहे परंतु ती वाईट गोष्ट आहे असे निश्चितपणे म्हणता येते.

आपण जेव्हा आपल्या विरोधकाशी झगडतो तेव्हा आपण त्याला किमान ठोशाचे उत्तर ठोशाने देण्याची संधी नक्कीच देतो. परंतु तो असे करणार नाही हे आपल्याला माहीत असतानाही आपण जेव्हा त्याला आपल्या छातीवर पाय ठेवून निघून जाण्याचे आव्हान देतो तेव्हा त्याला आपण अतिशय चमत्कारिक व लाजिरवाण्या स्थितीत टाकतो. मला माहीत आहे की जे विद्यार्थी धरण्यावर बसले होते त्यांनी या कृत्याच्या रानटीपणाबद्दलचा विचार कधीही केला नव्हता. परंतु ज्या व्यक्तीकडून स्वतःच्या विवेकाच्या आवाजाप्रमाणे वर्तन करण्याची आणि अडचणींना एकट्याने तोंड देण्याची अपेक्षा केली जाते तिला कधीही विवेकहीन होता येऊ शकत नाही.

उतावीळपणा, रानटीपणा, उन्मत्तपणा वा अनुचित दडपण यांचा उपयोग आपण कधीही करायला नको. आपल्याला जर लोकशाहीच्या ख-या भावनेचा विकास करायचा असेल तर आपल्याला उतावीळपणाचा त्याग करावा लागेल. आपल्या ध्येयावर श्रद्धा नसल्याचे उतावीळपणा हे चिन्ह आहे. (यंग, २-२-१९२१, पृ.३३)

मला अटक केल्यानंतर जे उत्तेजित आणि गोंधळाचे वातावरण निर्माण झाले त्याचे कारण मला समजू शकत नाही. हा सत्याग्रह नाही, हा तर दुराग्रहाहूनही वाईट आहे.

कितीही संकटे आली तरी हिंसेचे अनुसरण करणार नाही, दगडफेक करणार नाही आणि कोणालाही कोणत्याही प्रकारची हानी पोहोचवणार नाही अशा शिस्तीला सत्याग्रहात भाग घेणारे लोक बांधले गेले होते. परंतु मुंबईत आम्ही दगडफेक केली. अडथळे उभारून ट्राम चालवण्यात अडचणी आणल्या. हा सत्याग्रह नाही. हिंसेच्या अपराधाकरिता अटक करण्यात आलेल्या ५० माणसांना

सोडण्यात यावे अशी मागणी आम्ही केली. आपले कर्तव्य मुख्यत्वेकरून अटक करवून घेणे आहे. ज्यांनी हिंसक कार्यात भाग घेतला त्यांना सोडवण्याचा प्रयत्न करणे म्हणजे आपल्या धर्मापासून च्युत होणे आहे. (स्पीरा, पृ. ४७४)

मी किती तरी वेळा सांगितले आहे की सत्याग्रहात हिंसा, लूटमार आग लावणे यांना कोणतेही स्थान नाही आणि तरीही सत्याग्रहाच्या नावावर आपण इमारती जाळल्या, बळजबरीने शस्त्रे हिसकली, रुपये लुटले, रेल्वे अडवल्या, टेलिफोनच्या तारा कापल्या, निर्दोष लोकांचा जीव घेतला आणि दुकानांची व घरांची लूट केली. अशा कृत्यांनी जर मला तुरुंगापासून वा फाशी होण्यापासून वाचवता येत असेल तर अशा प्रकारे वाचणे मला आवडणार नाही.
(स्पीरा, पृ. ४७६)

....वाईट हेतूंकरिता शौर्याचे प्रदर्शन करणे वा बलिदान देणे हा उत्तम ऊर्जेचा अपव्यय आहे आणि वाईट हेतूने करण्यात आलेल्या शौर्याच्या प्रदर्शनाला वा बलिदानाला गौरवान्वित करण्यात आले तर लोकांचे लक्ष चांगल्या उद्दिष्टांवरून विचलित होते. (यंग, १२-१२-१९२५, पृ. ६०)

....अंदाधुंद पद्धतीने सत्तेचा प्रतिकार केल्यामुळे अव्यवस्था, बेलगाम उच्छृंखलता आणि यांच्या परिणामी विनाशाची परिस्थिती निर्माण होते. (यंग, २-४-१९३१, पृ. ५८)

## ३५. असहकार

सर्वसाधारण लोकांमध्ये आपल्या प्रतिष्ठेची आणि शक्तीची भावना जागृत करण्याचा असहकार हा एक प्रयत्न आहे. जर तुम्ही अंतरात्म्याला ओळखले तर तुम्हाला पाशवी शक्तींना घाबरण्याचे कोणतेच कारण नाही याचे ज्ञान जेव्हा लोकांना होईल, तेव्हाच हे शक्य होईल. (यंग, १-१२-१९२०, पृ. ३)

नकळत आणि इच्छा नसताना वाईटपणात सहभागी व्हावे लागण्याच्या विरोधात करण्यात आलेला प्रतिकार म्हणजे असहकार.... चांगुलपणाशी सहकार करणे हे जसे माणसाचे कर्तव्य आहे, तसेच वाईटपणाशी असहकार करणेही माणसाचे कर्तव्य आहे. (यंग, १-६-१९२१, पृ. १७२)

असहकार निष्क्रिय स्थिती नाही, ती अतिशय सक्रिय स्थिती आहे - हिंसक प्रतिकार वा हिंसा यांच्यापेक्षा अधिक सक्रिय. निष्क्रिय प्रतिकार एक चुकीची संज्ञा आहे. असहकार शब्दाचा प्रयोग मी ज्या अर्थाने केला त्यात असहकार अहिंसक

असणे आवश्यक आहे आणि त्यामुळे ना असहकार दंडात्मक आहे ना तो द्वेष, आकस अथवा घृणा या भावनांवर आधारित आहे. (यंग, २५-८-१९२०, पृ. ३२२)

**धार्मिक आधार**

अंधःकार आणि प्रकाश यांच्या शक्तींमधील असहकाराचा दिव्य संदेश 'भगवद्‌गीतेत' सांगितलेला आहे हे मी छातीठोकपणे सांगेन. जर शब्दशः 'भगवद्‌गीतेचा' अर्थ लावण्यात आला तर न्याय्य उद्दिष्टांचे प्रतिनिधित्व करणा-या अर्जुनाला अन्याय्य उद्दिष्टांचे प्रतिनिधित्व करणा-या कौरवांशी रक्तरंजित युद्ध करण्याचा आदेश देण्यात आला होता.

असंगाशी संग न करण्याचा संदेश तुलसीदासांनी संतांना दिला आहे. अहुरमज्द आणि अरिमन यांच्यात कोणतीही तडजोड होऊ शकत नाही व त्यामुळे त्यांच्यामधील चिरंतन द्वंद्वाचे चित्रण 'जेंदअवेस्ता'मध्ये करण्यात आले आहे. 'बायबल' असहकाराचा निषेध करते असे म्हणणे म्हणजे येशूला न समजणे होईल. येशू तर निष्क्रिय प्रतिकार करणारांचे ताईत होते. त्याने सादूसी आणि फारसी यांना सत्याकरिता आव्हान दिले होते आणि सत्याकरिता मुलांना त्यांच्या आईवडलांपासून दूर करण्यासही त्याने मागेपुढे पाहिले नव्हते.

आणि इस्लामच्या पैगंबराने काय केले? जोपर्यंत त्याचे जीवन संकटात सापडले नाही तोपर्यंत मक्केत राहून त्याने जबरदस्त असहकार केला आणि जेव्हा त्यांना आढळले की त्याला आणि त्याच्या अनुयायांना विनाकारण प्राण गमवावे लागतील तेव्हा मक्केहून त्याने पळ काढला आणि तो मदिनेला जाऊन पोहोचला. त्यानंतर मक्केला तो तेव्हाच परतला, जेव्हा आपल्या विरोधकांशी सामना करण्याची शक्ती त्याने मिळवली.

सर्व धर्मांमध्ये ज्याप्रमाणे न्यायप्रिय व्यक्ती आणि राजे यांच्याशी सहकार करणे हे माणसाचे कर्तव्य आहे असे सांगितले आहे त्याचप्रमाणे अन्यायी व्यक्ती आणि राजे यांच्याशी असहकार करण्याचा कठोर आदेशही देण्यात आला आहे. वास्तवात विश्वातील अधिकांश धर्मग्रंथ असहकाराच्याही पुढे जाऊन असे सांगतात की, वाईटपणासमोर नपुंसकाप्रमाणे गुडघे टेकण्यापेक्षा शस्त्र उचलणे चांगले. हिंदू धार्मिक परंपरेत.... असहकाराचे कर्तव्य स्पष्टपणे सिद्ध करण्यात आले आहे. प्रल्हादाने आपल्या वडिलांशी, मीराबाईने आपल्या पतीशी आणि बिभीषणाने आपल्या अत्याचारी भावाशी असहकाराचे धोरण स्वीकारले

होते. (यंग, ४-८-१९२०, पृ. ४)

## मूलभूत सिद्धान्त

जे आपल्या बाबतीत बरोबर आहे ते संपूर्ण विश्वासाठीही बरोबर आहे या मूलभूत सिद्धान्तावर अहिंसेचे पालन अवलंबून आहे. सर्व माणसे मुळात सारखी आहेत. यामुळेच जे मी करू शकतो ते प्रत्येक जण करू शकतो....

थोडक्यात हाच अहिंसक असहकाराचा सिद्धान्त आहे. यामुळेच याचा अर्थ असा आहे की याच्या मुळात प्रेम असणे आवश्यक आहे.

विरोधकाला दंड करण्याचा वा त्याला हानी पोहोचवण्याचा याचा उद्देश नसावा. विरोधकाबरोबर असहकार करत असतानाही आपण त्याचे मित्र असल्याची त्याला जाणीव व्हायला हवी आणि जिथे शक्य असेल तिथे त्याची मानवतापूर्ण सेवा करून त्याचे हृदय जिंकण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे.

खरे म्हणजे अहिंसेची कसोटी ही आहे की अहिंसक संघर्षानंतर कोणताही द्वेषभाव शिल्लक राहायला नको आणि शत्रू मित्र झाला पाहिजे. दक्षिण आफ्रिकेत जनरल स्मट्स बरोबरचा माझा हाच अनुभव राहिला. सुरुवातीला ते माझे कट्टर विरोधक आणि टीकाकार होते, परंतु आज ते माझे जवळचे मित्र आहेत....

## स्थायी गुण

काळ बदलत असतो आणि प्रणालींचा -हास होत असतो. परंतु माझा विश्वास आहे की अखेरीस अहिंसा आणि अहिंसेशी संबंधित गोष्टीच कायम राहतील. ख्रिश्चन धर्माचा जन्म एक हजार नऊशे वर्षांपूर्वी झाला होता. येशूचे पौरोहित्य केवळ तीन वर्षे चालले. त्याच्या उपदेशाचा त्याच्या जिवंतपणीच चुकीचा अर्थ लावला गेला आणि ‘आपल्या शत्रूवर प्रेम करा’ हा त्याचा मुख्य उपदेशच आज ख्रिश्चन जग नाकारत आहे. परंतु एखाद्या उपदेशाच्या मध्यवर्ती सिद्धान्ताच्या प्रचाराकरिता १९०० वर्षांचा कालखंड असा काय फार मोठा कालखंड होतो?

त्याच्या ६०० वर्षांनंतर इस्लाम धर्म आला. इस्लामचा अर्थ विशुद्ध शांतता आहे हे सांगण्याची परवानगीही मला बरेचसे मुसलमान देणार नाहीत. कुराणाच्या अभ्यासाने माझी पक्की धारणा झाली आहे की हिंसा कुराणाचा आधार नाही.

परंतु इथेही तीच गोष्ट आहे - कालचक्रात तेराशे वर्षे म्हणजे एक लहानसा ठिपका. माझा विश्वास आहे की हे दोन्ही महान धर्म त्या प्रमाणातच जिवंत राहतील ज्या प्रमाणात त्यांचे अनुयायी अहिंसेचा मुख्य उपदेश आत्मसात

करतील. परंतु ही गोष्ट बुद्धीच्या मदतीने ग्रहण करता येऊ शकत नाही, ती आमच्या अंतःकरणातून स्फुरली पाहिजे. (हरि, १२-११-१९३८, पृ. ३२७)

असहकार जरी सत्याग्रहाच्या शस्त्रागारातील महत्त्वाचे शस्त्र असले, तरी सत्य आणि न्याय या गोष्टींवर अढळ राहून विरोधकाचे सहकार्य मिळवण्याचे ते एक साधन आहे हे आपण विसरता कामा नये. अहिंसक तंत्राचे सार हे आहे की ते विरोधकाचा विरोध संपवण्याचा प्रयत्न करते, विरोधकाला नाही. अहिंसक संघर्षात तुम्ही ज्या व्यवस्थेला विरोध करता त्या व्यवस्थेतील काही परंपरा आणि रूढी यांना तुम्हाला काही प्रमाणात मानावे लागते. यामुळे विरोधी शक्तीशी कोणताही संबंध न ठेवणे हे सत्याग्रहीचे ध्येय असू शकत नाही; त्याचे ध्येय तर त्या संबंधांचे रूपांतरण वा शुद्धीकरण करण्याचे असते.
(हरि, २९-४-१९३९, पृ. १०१)

### असहकाराचे नीतिशास्त्र

असहकाराला मी इतके शक्तिशाली आणि इतके शुद्ध साधन मानतो की जर याचा वापर खरोखरी आस्थेवाईकपणाने केला तर ती गोष्ट ईश्वराचे पहिले साम्राज्य मिळवण्याची इच्छा करण्यासारखे होईल व त्यानंतर सर्व काही आपोआपच प्राप्त होईल. तेव्हा लोकांना आपली खरी शक्ती कळेल. ज्यामुळे कोणतेही राष्ट्र केवळ महानच नाही तर महान आणि चांगले असे दोन्ही होते असे शिस्त, आत्मनियंत्रण, संयुक्त कार्यवाही, अहिंसा, संघटना इत्यादी सर्व गोष्टींचे मूल्य ते ओळखतील.
(यंग, २-६-१९२०, पृ. ३)

असहकारासारखे शुद्ध, कोणतेही नुकसान न करणारे आणि तरीही परिणामकारक असे दुसरे कोणतेही साधन नाही. विवेकपूर्ण उपयोगानंतर याचे कोणतेही दुष्परिणाम घडू शकणार नाहीत आणि याची तीव्रता पूर्णपणे लोकांच्या बलिदान करण्याच्या शक्तीवर अवलंबून राहील. (यंग, ३०-६-१९२०, पृ. ३)

आम्ही 'नाही' म्हणायची शक्ती गमावली होती. सरकारला 'नाही' म्हणणारे निष्ठाहीन आणि जवळपास द्रोही मानले जाऊ लागले होते. जाणीवपूर्वक सहकार न करण्याचे हे तंत्र तसेच आहे ज्याप्रमाणे शेतकरी पेरणी करण्याआधी जमिनीची वखरणी नांगरणी करणे आवश्यक समजतो. शेतीकरिता जितकी गरज पेरणीची आहे तितकीच गरज वखरणी नांगरणीचीही आहे. पीक जेव्हा वाढत असते तेव्हाही शेतकरी नियमितपणे निंदणी-खुरपणी करत असतोच.

आपल्या स्वतःच्या अटींवर आपण सहकार्य करू हे सरकारला सांगण्याकरिता राष्ट्राचा असहकार आहे. हा प्रत्येक राष्ट्राचा अधिकार आहे आणि प्रत्येक चांगल्या सरकारचे ते कर्तव्य आहे. सरकार पालक म्हणून जे काम करत आहे ते आपल्याला पसंत नाही हे सांगण्याकरिता राष्ट्राने दिलेली सूचना म्हणजे असहकार. (यंग, १-६-१९२१, पृ. १७३)

अहिंसक असहकार आंदोलन आणि पश्चिमेकडील ऐतिहासिक स्वातंत्र्य संघर्ष यांच्यात कोणतेही साम्य नाही. हे आंदोलन पाशवी शक्ती वा घृणा यांच्यावर आधारित नाही. याचे उद्दिष्ट अत्याचारीचा नाश करणे नाही. हे आत्मशुद्धीचे आंदोलन आहे. त्यामुळे याचा हेतू अत्याचारीचे हृदयपरिवर्तन आहे. भारत अजून जनआंदोलनाकरिता तयार नसल्यामुळे हे असफल होऊ शकते. परंतु आंदोलनाला कोत्या परिमाणाने मापणे चुकीचे होईल. माझे वैयक्तिक मत आहे की हे आंदोलन कोणत्याही दृष्टीने अयशस्वी झालेले नाही. भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात याचे कायम महत्त्व आहे. (यंग, ११-२-१९३४, पृ. ५९)

## एक कर्तव्य

काही वेळेस असहकारही त्याचप्रमाणे कर्तव्य बनते ज्याप्रमाणे सहकार कर्तव्य असते. कोणतीही व्यक्ती आपल्याच सर्वनाशाकरिता अथवा गुलामगिरीकरिता सहकार करण्याकरिता बांधील नसते. दुस-याच्या प्रयत्नांनी मिळालेले स्वातंत्र्य, मग ते प्रयत्न कितीही हितकारक असले तरी त्यांनी ते प्रयत्न परत घेताच, संकटात सापडते. दुस-या शब्दात असे स्वातंत्र्य खरे स्वातंत्र्य नसते. परंतु अहिंसक असहकाराच्या मदतीने स्वातंत्र्य मिळवण्याची कला शिकताच अगदी सामान्याहून सामान्य माणूसही त्या प्रकाशाचा अनुभव घेऊ लागतो....

माझे निश्चित मत आहे की, जी गोष्ट अहिंसक असहकाराने मिळू शकते ती हिंसेने कधीही मिळू शकत नाही आणि गैरवर्तन करणा-यांचे अंतिमतः हृदयपरिवर्तन करून ही गोष्ट प्राप्त होत असते. भारतात आपण अहिंसेच्या शस्त्राला, त्याच्या पात्रतेप्रमाणे कधीही चालवून पाहिलेच नाही. चमत्कार तर हा आहे की आपल्या अर्धवट अहिंसेनेही आपण इतके काही मिळवले आहे.
(यंग, २०-४-१९२०, पृ. ९७)

मी राजकारणात तेवढ्याच प्रमाणात भाग घेतो जेवढ्या प्रमाणात माझ्या धार्मिक शक्तीचा विकास होतो. त्यामुळे मी असहकाराची मांडणी धार्मिक पद्धतीने

केली आहे. (यंग, १९-१-१९२१, पृ. १९)

माझ्या असहकारामागे माझ्या कट्टर विरोधकाशीसुद्धा कोणत्या ना कोणत्या निमित्ताने संपर्क करावा अशी माझी नेहमीच उत्कट इच्छा असते. मी स्वतः एक अतिशय अपूर्ण माणूस आहे व मला सतत ईश्वरी अनुग्रहाची आवश्यकता असते आणि माझ्या मते, एकही व्यक्ती अशी नाही की जिचा उद्धार शक्य नाही. (यंग, ४-६-१९२५, पृ. १९३)

कपटीपणाचे मी कधीही समर्थन करणार नाही. माझ्या दृष्टीने सत्याग्रहाचा नियम, प्रेमाचा नियम एक शाश्वत सिद्धान्त आहे. प्रत्येक चांगल्या गोष्टीबरोबर मी सहकार्य करत असतो, प्रत्येक वाईट गोष्टीशी मी असहकार करत असतो.... (यंग, १८-६-१९२५, पृ. २१३)

## घृणा नाही

गत चाळीस वर्षांपासून मी प्रार्थनापूर्ण अनुशासनात राहिल्यामुळे कोणत्याही व्यक्तीकडे घृणेने पाहणे मी बंद केले आहे. मला माहीत आहे की हा फार मोठा दावा आहे. तरीही संपूर्ण नम्रतेने मी हा दावा करतो आहे. परंतु वाईटपणा कुठेही असला तरी मी त्याची घृणा करतो आणि करत राहीनही.

माझ्या असहकारात घृणा नसते तर प्रेम असते. माझा व्यक्तिगत धर्म कोणाचीही घृणा करण्याची मला परवानगी देत नाही. हा साधा परंतु महान सिद्धान्त माझे वय १२ वर्ष असताना मी शाळेच्या पुस्तकातून शिकलो होतो आणि आजही माझ्या मनःपटलावर तो दृढतापूर्वक कोरलेला आहे आणि दिवसेंदिवस तो अधिकाधिक दृढ होत चालला आहे. माझ्या जीवनातील ही तीव्र आकांक्षा आहे. (यंग, ६-८-१९२५, पृ. २७२)

प्रत्येक गोष्टीबद्दल माझ्या मनात निष्ठेची भावना असते असे काही नाही. परंतु जे असत्य आहे, जे अन्यायपूर्ण आणि वाईट आहे त्याच्याबद्दल मला कधीही निष्ठा वाटत नाही.... एखाद्या संस्थेबद्दल मला तोपर्यंतच निष्ठा वाटते जोपर्यंत ती माझ्या आणि माझ्या राष्ट्राच्या विकासात मदत करणारी असते. ती गोष्ट विकासात मदत करण्याऐवजी बाधक बनते आहे असे लक्षात येताच तिच्याबद्दल निष्ठाहीन होणे माझे कर्तव्य आहे असे मी समजू लागतो. (यंग, १३-८-१९२५, पृ. २७७)

माझा असहकार माझ्या धर्माचा भाग आहे, ही सहकाराची सुरुवात असते.

माझा असहकार हा पद्धती आणि प्रणाली यांच्या विरोधात असतो, व्यक्तींच्या विरोधात नाही. मी तर डायरबद्दलही दुर्भावना ठेवणार नाही. दुर्भावनेला मी मानवी प्रतिष्ठेशी सुसंगत समजत नाही. (यंग, १२-९-१९२९, पृ. ३००)

काही लोकांनी मला माझ्या काळातील सर्वात मोठा क्रांतिकारी मानले आहे. हे चूकही असू शकेल, परंतु मी स्वतःला एक क्रांतिकारी - एक अहिंसक क्रांतिकारी - समजतो. असहकार माझे शस्त्र आहे. कोणतीही व्यक्ती संबंधित लोकांच्या संमतीशिवाय वा त्यांच्यावर बळजबरी केल्याशिवाय विपुल संपत्तीचा संचय करू शकत नाही. (यंग, २६-११-१९३१, पृ. ३६९)

स्वभावाने मी सहकार्य करणारा आहे; वस्तुतः माझ्या असहकाराचा उद्देश सर्व नीचपणा आणि असत्य काढून फेकणे हा असतो, कारण अशा गोष्टींशी सहकार करण्याचा काहीही उपयोग नसतो. (एफा, पृ. ८४)

## ३६. उपवास आणि सत्याग्रह

### सत्याग्रहाचे शस्त्र

सत्याग्रहाच्या शस्त्रागारात उपवास एक शक्तिशाली शस्त्र आहे. याचा प्रयोग कोणीही करू शकत नाही. उपवास करण्याच्या शारीरिक क्षमतेनेच त्याची पात्रता ठरत नाही. ईश्वरावरील जागृत श्रद्धेशिवाय त्याचा काहीही उपयोग नाही. यांत्रिक क्रिया वा अनुकरण म्हणून तो केव्हाही करण्यात येऊ नये. उपवासाची प्रेरणा व्यक्तीच्या अंतःकरणाच्या आतून आली पाहिजे. यामुळेच उपवास ही नेहमीच क्वचित घडणारी गोष्ट असते. (हरि, १८-३-१९३९, पृ. ५६)

विशुद्ध उपवासात स्वार्थ, क्रोध, श्रद्धाहीनता अथवा उतावीळपणा यांना कोणतेही स्थान असू शकत नाही.... त्यात असीम धैर्य, दृढ संकल्प, उद्दिष्टाबद्दल अढळ निष्ठा, पूर्ण शांतता आणि क्रोधाचा अभाव असणे अतिशय आवश्यक असते. परंतु या सर्व गुणांचा विकास ताबडतोब करणे माणसाला शक्य नसल्यामुळे ज्याने अहिंसेच्या नियमांचे पालन करण्याचे व्रत घेतले नसेल त्याने सत्याग्रही उपवास करू नये. (हरि, १३-१०-१९४०, पृ. ३२२)

उपवास.... एक उग्र गोष्ट आहे आणि धोक्यापासून तो पूर्णपणे मुक्त नाही. मला जेव्हा उपवास चुकीचा आणि नैतिक दृष्टीने अनुचित वाटला तेव्हा मी स्वतः त्याची निंदा केली आहे. परंतु स्पष्ट नैतिक संकेत मिळाल्यानंतरही

उपवासापासून अंग चोरणे म्हणजे आपल्या नैतिक कर्तव्यापासून च्युत होणे आहे. सत्याग्रही उपवास विशुद्ध सत्य आणि अहिंसा यांच्यावर आधारित असला पाहिजे. (हरि, २८-७-१९४६, पृ. २३५)

**उपवास आणि मृत्यू**

आमरण उपवास सत्याग्रहाच्या शस्त्रागारातील अंतिम आणि सर्वात शक्तिशाली शस्त्र आहे. हे एक पवित्र शस्त्र आहे. याला त्याच्या संपूर्ण ध्वन्यर्थासहित स्वीकारले पाहिजे. उपवास महत्त्वपूर्ण नाही तर त्याचा ध्वन्यर्थ महत्त्वपूर्ण आहे. (हरि, १८-८-१९४६, पृ. २६२)

**उपवास आणि येशूचा मार्ग**

उपवास यांत्रिक पद्धतीने केला जाऊ शकत नाही. ही एक शक्तिशाली गोष्ट आहे परंतु अडाणीपणाने केल्यानंतर तो धोकादायकही सिद्ध होऊ शकतो. याच्याकरिता संपूर्ण आत्मशुद्धीची - मनात बदला घेण्याची भावना घेऊन मृत्यूची तयारी ठेवण्यासाठी लागणा-या आत्मशुद्धीपेक्षा कितीतरी अधिक आत्मशुद्धीची गरज असते. संपूर्ण बलिदानाचे असे एकच कृत्य संपूर्ण जगाकरिता पुरेसे असते. येशूचे उदाहरण याच कोटीतील आहे. (हरि, २७-१०-१९४६, पृ. २७२)

उपवासाला बळजबरीचे साधन बनवले जाऊ शकते ही गोष्ट अमान्य करता येऊ शकत नाही. एखाद्या स्वार्थसिद्धीकरिता, पैसे उकळण्याकरिता अथवा अयोग्य मागणीकरिता केलेला उपवास असाच असतो. अशा उपवासांकडे दुर्लक्ष करण्याची सवय लोकांनी लावली पाहिजे. (हरि, ९-९-१९३३, पृ. ५)

माणूस, मग तो कितीही लोकप्रिय आणि महान असला तरी, चुकीचे कारण घेऊन त्याच्या समर्थनार्थ उपवास करत असेल तर त्याच्या मित्रांचे, सहका-यांचे आणि संबंधित लोकांचे (यात माझाही समावेश असू शकतो) कर्तव्य असते की त्याचे अनुचित मुद्दे मान्य करून घेण्याकरिता त्याला मदत करण्याऐवजी त्याला मरू दिले पाहिजे. उद्देश अनुचित असेल तर शुद्धाहून शुद्ध साधनही अशुद्ध बनते. (हरि, १७-३-१९४६, पृ. ४३)

**शेवटचा उपाय**

इथे मी एक सामान्य सिद्धान्त सांगेन. अन्यायनिवारणाचे सर्व उपाय योजिले गेले असतील व ते असफल ठरले असतील तरच सत्याग्रहीने अंतिम उपाय म्हणून

उपवासाचा आधार घेतला पाहिजे. उपवासात अनुकरणाला कोणतेही स्थान नाही. ज्याच्यात आंतरिक शक्ती नसेल त्याने उपवास करण्याच्या गोष्टीचा स्वप्नातही विचार करू नये. अजून एक गोष्ट अशी आहे की उपवास यशस्वीच होईल या आसक्तीने करण्यात येऊ नये.

परंतु सत्याग्रहीने दृढनिश्चयाने एकदा उपवासाला सुरुवात केली की, मग त्याच्या यशस्वितेच्या शक्यतेचा विचार न करता त्याने आपल्या उपवासावर कायम राहिले पाहिजे. याचा अर्थ असा नाही की उपवास सफल होऊ शकत नाही वा होऊच शकतो. जी व्यक्ती उपवासाच्या यशस्वितेच्या आशेने उपवास करते तिला बहुधा अपयश येते आणि जरी ती अपयशी होताना दिसली नाही तरी तिला तो आंतरिक आनंद मिळू शकत नाही जो ख-या उपवासापासून मिळतो....

हास्यास्पद उपवास प्लेगप्रमाणे पसरतात आणि ते हानिकारक असतात. परंतु कर्तव्य म्हणून जेव्हा उपवास करावा लागतो तेव्हा तो टाळता येत नाही. यामुळेच मी तेव्हाच उपवास करतो जेव्हा तो आवश्यक असतो आणि काहीही करून तो टाळला जाऊ शकत नसतो. जे मी विशिष्ट परिस्थितीत करतो तशाच परिस्थितीत ते करण्यापासून मी दुस-याला अडवू शकत नाही. चांगल्या गोष्टींचाही अनेकदा दुरुपयोग होत असतो हे सर्वांनाच माहीत आहे. आपल्या आजूबाजूला असे घडत असताना आपण नेहमीच पाहतो. (हरि, २१-४-१९४६, पृ. ९३)

....जेव्हा माणसाचे चातुर्य काम करत नाही तेव्हा अहिंसेचा पुजारी उपवास करत असतो. प्रार्थनेच्या भावनेत उपवासामुळे तीव्रता येते. हे एक आध्यात्मिक कृत्य आहे आणि त्यामुळे ते ईश्वराला उद्देशून केले पाहिजे. उपवास करणा-याशी लोक थोडेसे जरी परिचित असले, तर त्यांची सुप्त चेतना जागी होते. अशा प्रकारे लोकांच्या जीवनावर याचा प्रभाव पडतो.

हं, या गोष्टीची मात्र भीती नक्कीच असते की, चुकीच्या सहानुभूतीला वश होऊन आपल्या प्रिय व्यक्तीचा जीव वाचवण्याकरिता लोक आपल्या इच्छेविरुद्ध काम करू शकतात. या धोक्याचा सामना करणे भाग आहे. माणूस आपल्या दृष्टिकोनाच्या खरेपणाबद्दल आश्वस्त असेल तर योग्य कार्यवाही करण्यापासून त्याने माघार घेता कामा नये. यामुळे अधिकाधिक काळजी निश्चितपणे घेतली जाऊ शकते. अशा प्रकारचा उपवास आतला आवाज ऐकून केला जातो आणि त्यामुळे त्यात गडबडीचा प्रश्न उपस्थित होत नसतो. (हरि, २१-१२-१९४७, पृ. ४७६)

# ७. अपरिग्रह

## ३७. अपरिग्रहाचा दिव्य संदेश

**सेवेची किल्ली**

मी राजकारणाच्या वेढ्यात अडकलो आहे असे जेव्हा मला आढळले तेव्हा अनैतिकता, असत्य, आणि तथाकथित इतर राजकीय लाभ यांच्यापासून पूर्णपणे कसे मुक्त राहता येईल असा प्रश्न मी स्वतःलाच विचारला.... सुरुवातीला हा एक कठीण संघर्ष होता आणि मला माझ्या पत्नीशी आणि मला चांगले आठवते की माझ्या मुलांशीही मला संघर्ष करावा लागला होता. परंतु जे काही घडले त्यानंतर मी या निश्चित निष्कर्षावर पोहोचलो की माझे जीवन ज्यांच्याकरिता समर्पित आहे व ज्यांच्या हालअपेष्टा मी दररोज पाहत असतो, जर मला त्यांची सेवा करायची असेल तर मी माझ्या सर्व धनाचा, सर्व संपत्तीचा त्याग केला पाहिजे....

हा विचार मनात ठसताच मी तात्काळ सर्व गोष्टींचा त्याग केला असे मी प्रमाणिकपणाने म्हणू शकत नाही. मी मान्य केले पाहिजे की सुरुवातीला प्रगती हळू होती आणि आज जेव्हा मी संघर्षाच्या त्या दिवसांची आठवण करतो तेव्हा आठवते की सुरुवातीला असे करताना मला त्रासही झाला होता. परंतु जसजसे दिवस जात गेले तसतसे मला वाटू लागले ज्यांना मी माझ्या समजतो अशा अजूनही अनेक गोष्टी आहेत व त्यांचा मी त्याग केला पाहिजे. अखेरीस एक वेळ अशी आली की जेव्हा त्याग केल्यामुळे मला प्रसन्नता वाटू लागली आणि एकानंतर एक गुणोत्तर पद्धतीने माझ्या हातून वस्तू निसटत गेल्या.

आज जेव्हा मी माझ्या अनुभवांचे वर्णन करत आहे, तेव्हा सांगू शकतो की माझ्या खांद्यावरील एक मोठे ओझे उतरले आणि त्यानंतर मी मोकळेपणाने हिंडू फिरू शकत होतो आणि आपल्या साथीदारांची सेवा मी अधिक आरामात करू लागलो व अधिक आनंदाचा अनुभव मला मिळू लागला. यानंतर तर कोणतीही वस्तू जवळ ठेवणे मला त्रासदायक ओझे वाटू लागले.

त्या आनंदाच्या कारणाचा शोध घेताना मला वाटले की जर एखादी गोष्ट माझी

समजून मी ती स्वतःजवळ ठेवू लागलो तर सगळ्या जगापासून मला तिचे रक्षण करावे लागते. मला असेही आढळले की जगात अनेक असे लोक आहेत ज्यांना त्या गोष्टी हव्या असूनही त्यांच्याजवळ नाहीत आणि जर मी दुष्काळग्रस्त लोकांना एकटा सापडलो तर ते माझ्या वस्तूंची माझ्याबरोबर वाटणीच करणार नाहीत, तर त्या ते माझ्याजवळून हिसकूनही घेतील. मग त्या वस्तूंच्या रक्षणाकरिता मला पोलिसांचे संरक्षण मागावे लागेल. मग मी स्वतःलाच म्हणालो की या लोकांना जर त्या वस्तू हव्या आहेत आणि माझ्याजवळून हिसकून घेण्याची यांची जी तयारी आहे ती माझ्याबद्दलच्या द्वेषभावनेमुळे नाही तर त्यांना माझ्यापेक्षा या वस्तूंची अधिक गरज असल्यामुळे आहे. (स्पीरा, पृ. १६६-७)

सर्व संपत्तीचा त्याग केल्यामुळे जग.... मला हसू शकते. परंतु माझ्याकरिता हा त्याग जास्त लाभदायक सिद्ध झाला आहे. माझ्या या समाधानाशी लोकांनी स्पर्धा करावी अशी माझी इच्छा आहे. माझा हा सर्वात मूल्यवान खजिना आहे. यामुळे असे म्हणता येईल की मी जरी गरिबीचा प्रचार करत असलो तरी मी सर्वात संपन्न व्यक्ती आहे. (यंग, ३०-४-१९२५, पृ. १४९)

### स्वेच्छापूर्वक आत्मत्याग

आपली संस्कृती, आपले संस्कार आणि आपले स्वराज्य या गोष्टी आवश्यकता वाढवण्यावर - विषयासक्तीवर - नाही तर आत्मत्यागावर अवलंबून आहेत. (यंग, २३-२-१९२१, पृ. ५९)

अपरिग्रह अस्तेयाशी जुळलेले आहे. आपल्याजवळ जर अशी एखादी वस्तू असेल की जिची आपल्याला गरज नसेल तर जरी ती वस्तू चोरलेली नसेल तरी ती चोरी केलेल्या संपत्तीच्या श्रेणीतीलच समजली जाईल. परिग्रहाचा अर्थ आहे भविष्याकरिता व्यवस्था करणे. सत्यशोधक अर्थात प्रेमाच्या नियमाचा अनुयायी उद्याकरिता काहीही वाचवून ठेवू शकत नाही. ईश्वर उद्याकरिता कोणत्याही गोष्टीचा संग्रह करून ठेवत नाही. जितकी गरज आहे त्यापेक्षा तो किंचितही अधिक निर्माण करत नाही. यामुळे ईश्वरी कृपेवर आपली श्रद्धा असेल तर आम्ही विश्वास ठेवला पाहिजे की तो आमच्या दररोजच्या जेवणाची म्हणजे आमच्या आवश्यकतांची तरतूद करेल....

माणसाला त्याच्या दैनिक गरजेएवढीच भाकरी देणा-या आणि त्यापेक्षा अधिक न देणा-या दैवी नियमाच्या अज्ञानामुळे व या नियमाकडे दुर्लक्ष केल्यामुळेच जगात

एवढी विषमता आणि तिच्यामुळे निर्माण होणा-या विपदा निर्माण झाल्या आहेत. श्रीमंताजवळ अनावश्यक गोष्टींचा साठा पडला आहे. त्यामुळे या गोष्टी तशाच पडून राहतात व त्या वाया जातात. उलट करोडो लोक जीवनावश्यक गोष्टींच्या अभावामुळे उपासमार होऊन मरत आहेत.

प्रत्येक व्यक्तीला जेवढ्याची गरज असते तेवढे ती ठेवील तर कोणालाही ददात भासणार नाही व प्रत्येक जण संतुष्ट राहील. आजच्या परिस्थितीत निर्धन जेवढे असंतुष्ट आहेत तेवढेच असंतुष्ट श्रीमंतही आहेत. निर्धन व्यक्तीला लखपती होण्याची घाई झाली आहे तर लखपतीला करोडपती होण्याची.

समाधानाची भावना सर्वत्र पसरावी म्हणून श्रीमंतांनी आपल्या संपत्तीचा त्याग करण्यात पुढाकार घेतला पाहिजे. त्यांनी जर आपली संपत्ती सीमेत ठेवली तर उपाशी माणसांचे पोट सहजपणे भरले जाऊ शकते आणि श्रीमंतांबरोबर त्यांनाही समाधानाचा पाठ शिकता येईल.

अपरिग्रहाच्या संपूर्ण आदर्शापर्यंत पोहोचण्याकरिता पक्ष्यांप्रमाणे माणसाच्या डोक्यावरही छत नसले पाहिजे, ना त्याच्याजवळ कपडे असावे आणि ना उद्याकरिता अन्नाचा साठा. त्याला जेवण इत्यादी दैनंदिन साहित्याची गरज असेल परंतु त्याची व्यवस्था करण्याची जबाबदारी त्याचे काम नसून देवाचे आहे. या आदर्शापर्यंत क्वचितच कोणी पोहोचू शकेल. परंतु त्याची दर्शनी असंभाव्यता पाहून आपल्यासारख्या सामान्य सत्यशोधकाने त्यापासून दूर पळायला नको. आपण सतत हा आदर्श डोळ्यासमोर ठेवला पाहिजे आणि त्याच्या प्रकाशात आपल्या संपत्तीचा आढावा घेऊन ती कमी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

खरे पाहता आवश्यकता द्विगुणित करण्यावर संस्कृती अवलंबून नाही तर ती विचारपूर्वक स्वेच्छेने कमी करण्यात संस्कृती आहे. केवळ यामुळेच ख-या सुखात आणि समाधानात वृद्धी होते आणि माणसाची सेवा करण्याच्या आपल्या क्षमतेत वाढ होते.

शुद्ध सत्याच्या दृष्टिकोनातून हा देहही एक संपत्ती आहे. भोगाची इच्छा आत्म्याकरिता देहाची सृष्टी करते हे वचन योग्यच आहे. ही इच्छा लुप्त झाली की देहाची आवश्यकता राहत नाही आणि माणसाची जन्म-मरणाच्या चक्रातून सुटका होते. आत्मा सर्वव्यापी आहे, पिंज-यासारख्या शरीरात बंद होऊन त्या पिंज-याकरिता वाईट काम करायचे आणि प्राण्याचा जीवसुद्धा घ्यायचा असे काम आत्मा कशासाठी करेल?

## त्यागाचा आदर्श

अशा रीतीने आपण संपूर्ण त्यागाच्या आदर्शाजवळ पोहोचू शकतो आणि देहाला, जोपर्यंत तो आहे, सेवेच्या कामात लावणे शिकतो. असे करत असताना आमच्या जीवनाचा आधार भाकरी नाही तर सेवा बनते. आपण सेवेकरिताच खातो पितो, जागतो झोपतो. मनाची अशी वृत्ती जीवनात सुख आणते आणि वेळ आल्यानंतर ईश्वरदर्शनही घडवते. आपण सर्वांनी या दृष्टीने आपला स्वतःचा आढावा घेतला पाहिजे.

या गोष्टीची आठवण ठेवली पाहिजे की अपरिग्रहाचा सिद्धान्त वस्तू आणि विचार यांच्यावर सारखाच लागू होतो. जी व्यक्ती आपल्या डोक्यात निरर्थक ज्ञान भरते तीसुद्धा या अमूल्य सिद्धान्ताचे उल्लंघन करते. जे विचार आपल्याला ईश्वरापासून विन्मुख करतात वा त्याच्याकडे जाण्याकरिता मदत करत नाहीत ते आपल्या मार्गात बाधक आहेत.

या संदर्भात गीतेच्या तेराव्या अध्यायात ज्ञानाची जी व्याख्या देण्यात आली आहे, तिचा आपण विचार केला पाहिजे. त्यात आम्हाला सांगण्यात आले आहे की नम्रता वगैरे ज्ञान आहे आणि बाकी सर्व अज्ञान आहे. हे जर बरोबर असेल आणि हे बरोबर आहे यात काही संशय नाही, तर ज्याला ज्ञान समजून आम्ही आज कवटाळत आहोत ते बहुतांश अज्ञानच आहे आणि त्यामुळे आमचा कोणत्याही प्रकारचा लाभ होत नाही, उलट हानीच होते. यामुळे भ्रम निर्माण होतो आणि शिवाय मनात एक पोकळीही निर्माण होते व त्यामुळे वाईटपणाच्या विविध स्वरूपांतील असंतोष मनात निर्माण होतो व त्यात वाढही होते.

माझ्या म्हणण्याचा अर्थ असा नाही की आम्ही जड झालो पाहिजे. आमच्या जीवनातील प्रत्येक क्षण मानसिक आणि शारीरिक सक्रियतेने परिपूर्ण असला पाहिजे. परंतु ही सक्रियता सत्याकडे प्रवृत्त करणारी आणि सात्त्विक असली पाहिजे. ज्याने सेवेकरिता आपले जीवन समर्पित केले आहे तो निष्क्रिय होऊन क्षणभरही बसू शकत नाही. परंतु चांगले काम आणि वाईट काम यांच्यामध्ये अंतर करणे आम्ही शिकलो पाहिजे. सेवेकरिता निष्ठापूर्वक वाहून घेतल्यानंतर असे अंतर करणे सहज शक्य होऊन जाते. (फ्रॉयेम, पृ. २३-२६)

## नैतिक प्रयोजन

आपणा सर्वांजवळ संपत्ती का असू नये? एका निश्चित वेळेनंतर आपण आपल्या

संपूर्ण संपत्तीचा त्याग का करू नये? बेईमान व्यापारी छद्मी हेतूंकरिता असे करतात. मग एका महान नैतिक प्रयोजनाकरिता आपण असे का करू शकत नाही?

एक काळ असा होता जेव्हा हिंदू सामान्यपणे असे करत असत. एका निश्चित अवधीपर्यंत जगल्यानंतर प्रत्येक हिंदुने अपरिग्रहाच्या जीवनात प्रवेश केला पाहिजे अशी अपेक्षा प्रत्येक हिंदूकडून करण्यात येत असे. ही उत्तम परंपरा आपण परत का सुरू करू नये? ज्यांना आपण आपली संपत्ती सोपवतो त्यांच्या दयेवर आपण आपल्या उदरनिर्वाहाकरिता अवलंबून राहावे हा याचा व्यवहारातील अर्थ आहे. मला तरी हा विचार आकर्षक वाटतो. सद्भावपूर्ण विश्वासाच्या अशा अनेक प्रकरणी विश्वासभंग करणारा एखादाच निघतो.

....बेईमान माणसाने याचा अनुचित लाभ घेऊ नये म्हणून कोणती पद्धती अवलंबिली पाहिजे हे दीर्घ काळ प्रयोग केल्यानंतरच ठरू शकेल. परंतु दुरुपयोगाच्या भीतीने हा प्रयोग करणे थांबवण्याची गरज नाही. लोक गीतेच्या उपदेशाचा विपर्यास करून खुनासह अनेक वाईट गोष्टींच्या समर्थनार्थ त्या संदेशाचा उपयोग करतील हे माहीत असूनही गीताकारांनी गीतेचा संदेश देण्यापासून स्वतःला अडवले नव्हते. (यंग, ३-७-१९२४, पृ. २२१)

धर्माच्या अत्युच्च परिपूर्तीकरिता.... सर्वोच्च त्यागाची अपेक्षा असते. मानव जीवनाचा नियम शोधून काढल्यानंतर अधिक काही नाही तर आपल्या शक्तीप्रमाणे आपण त्यानुसार आचरणाचा प्रयत्न केला पाहिजे. हाच मध्यमार्ग आहे. (यंग, ५-२-१९२५, पृ. ४८)

## सुवर्ण नियम

सुवर्ण नियम हा आहे की.... जी गोष्ट लाखो लोकांना उपलब्ध नाही तिच्या उपभोगाला आम्ही दृढपणे नकार दिला पाहिजे. नाकारण्याची ही क्षमता आमच्यामध्ये अचानक येऊ शकत नाही. जी गोष्ट लाखो लोकांना उपलब्ध नाही तिचा उपयोग आम्ही करणार नाही अशा मनोवृत्तीचा आधी विकास करावा लागेल. यानंतर या मनोवृत्तीनुसार शक्य तो लवकर जीवनात परिवर्तन घडवून आणावे लागेल. (यंग, २४-६-१९२६, पृ. २२६)

प्रेम आणि केवळ स्वतःची मालकी या गोष्टी परस्परांबरोबर चालू शकत नाहीत. तत्त्वतः जिथे पूर्ण प्रेम आहे तिथे पूर्ण अपरिग्रहही असणे आवश्यक आहे.

शरीर आमची अंतिम संपत्ती आहे. यामुळे माणूस पूर्ण प्रेमाचा आणि पूर्ण अपरिग्रहाचा दावा तेव्हाच करू शकतो जेव्हा तो मानव सेवेकरिता मृत्यूलाही आलिंगन देण्यास तयार होईल.

परंतु तत्त्वतः हे ठीक आहे. संपत्तीच्या स्वरूपात शरीर नेहमीच अपूर्ण राहील आणि माणूस नेहमी पूर्णतेकरिता प्रयत्न करत राहणार असल्यामुळे वास्तविक जीवनात पूर्ण प्रेमाच्या अवस्थेला आपण क्वचितच पोहोचू शकतो. तात्पर्य हे आहे की जोपर्यंत आपण जिवंत आहोत तोपर्यंत पूर्ण प्रेमाची आणि पूर्ण अपरिग्रहाची अवस्था आपण प्राप्त करू शकत नाही. असे असले तरीही याकरिता आपण निरंतर प्रयत्नशील असले पाहिजे. (मारी, ऑक्टोबर १९३५ पृ. ४१२)

येशू, महंमद, बुद्ध, नानक, कबीर, चैतन्य, शंकर, दयानंद, रामकृष्ण हे असे महापुरुष होते की ज्यांनी हजारो लोकांना अतिशय प्रभावित केले होते आणि त्यांचे चरित्र घडवले होते. यांच्या जीवनाने ही धरा संपन्न झाली आहे. या सर्व महापुरुषांनी जाणीवपूर्वक निर्धनता स्वीकारली होती....आधुनिक भौतिकतावादाच्या आकर्षणाला आपण आपले ध्येय मानत चाललो आहोत आणि तसतसे आपण प्रगतिपथावरून खाली घसरत चाललो आहोत. (स्पीरा, पृ. ३५३)

धन, सत्ता आणि प्रतिष्ठा या गोष्टी माणसाला किती पाप आणि अत्याचार करायला लावतात! (ए, १६८)

कोणाच्या परवानगीशिवाय त्याची वस्तू घेणे ही तर चोरी आहेच पण एखाद्याने आपल्याला एखादी गोष्ट विशिष्ट कामाकरिता वा विशिष्ट कालावधीकरिता दिली असेल व आपण ती वस्तू त्या कामाकरिता वापरली नसेल वा त्या काळात परत केली नसेल तर तीही चोरीच होते. ही गोष्ट या गूढ सत्यावर आधारलेली आहे की ईश्वर वर्तमानाकरिता जितके आवश्यक आहे तितक्याची, आणि तितक्याचीच निर्मिती करतो. त्यामुळे एखादी व्यक्ती आपल्या न्यूनतम गरजेपेक्षा अधिक प्रमाणात एखाद्या वस्तूचा उपयोग करत असेल तर ती चोर ठरते. (आआए, पृ. ५८)

**जीवनाचे रहस्य**

सर्वस्वाचा त्याग करून ते ईश्वराला समर्पित करा आणि मग जगा. जगण्याचा अधिकार याप्रमाणे त्यागातून व्युत्पन्न झाला आहे. 'इतर सर्व लोक आपले काम करतील तेव्हा मीही माझे काम करेन' हे वचन नसून 'दुस-याची चिंता करू नका, तुम्ही तुमचे काम करा व बाकी ईश्वरावर सोडा' असे वचन

आहे. (हरि, ६-३-१९३७, पृ. २७)

भौतिक वस्तूंच्या मालकीची वा उपभोगाची संधी तुम्हाला मिळू शकते, परंतु तुम्हाला त्यांचा अभाव जाणवू नये यात जीवनाचे रहस्य आहे. (हरि, १०-१२-१९३८, पृ. ३७१)

सुखी जीवनाचे रहस्य त्यागात आहे. त्यागच जीवन आहे. भोगाचा परिणाम मृत्यू आहे. यामुळे निश्‍चिंत होऊन सेवा करत प्रत्येक व्यक्तीला १२५ वर्षे जगण्याचा अधिकार आहे. असे जीवन पूर्णपणे सेवेलाच समर्पित व्हायला पाहिजे. अशा प्रकारच्या सेवेकरिता धन-संपत्तीचा त्याग केल्याने असा अनिर्वचनीय आनंद मिळतो की त्या आनंदापासून कोणीही तुम्हाला वंचित करू शकत नाही. असा आनंद तुमच्या आतून निर्माण होतो व तुम्हाला दीर्घायुष्य देतो, हे याचे कारण आहे. यात काळजी वा उतावीळपणा यांना कोणतेही स्थान असू शकत नाही. या आनंदाशिवाय दीर्घायुष्य शक्य नाही आणि जरी ते मिळाले तरी त्याला काही अर्थ नाही. (हरि, २४-२-१९४६, पृ. १९)

माझ्या म्हणण्याचा अर्थ असा नाही की तुमच्याजवळ धन असेल तर ते बाहेर फेका आणि तुमच्या बायकोला व मुलांना घराबाहेर काढून टाका. याचा अर्थ एवढाच आहे धन-संपत्तीच्या आसक्तीचा त्याग करा व सर्वस्व ईश्वराला अर्पण करून त्याने दिलेल्या वस्तू त्याच्याच सेवेत लावून टाका. (हरि, २८-४-१९४६, पृ. १११)

## ३८. गरिबी आणि श्रीमंती

मी अशा युगाची कल्पना करण्यास असमर्थ आहे ज्यात कोणतीही व्यक्ती इतर व्यक्तीपेक्षा श्रीमंत नसेल. परंतु मी अशा युगाची कल्पना नक्कीच करू शकतो ज्यात श्रीमंत लोक गरिबांच्या जिवावर श्रीमंत बनण्याचा विचार सोडून देतील आणि गरीब लोक श्रीमंतांचा मत्सर करणे सोडून देतील. परिपूर्ण जगातही विषमता टाळता येऊ शकत नाही. परंतु आपण संघर्ष आणि कटुता यांच्यापासून नक्कीच दूर राहू शकतो. (यंग, ७-१०-१९२६, पृ. ३४८)

आम्ही अमेरिकेप्रमाणे संपत्ती मिळवू मात्र अमेरिकेची पद्धती मात्र आम्ही स्वीकारणार नाही असे आपल्या देशातील अनेक लोक म्हणत असलेले मी ऐकले आहे. मी खात्रीपूर्वक सांगतो की असा प्रयत्न जर कधी करण्यात आला तर तो असफल होणे निश्‍चित आहे. आपण एकाच वेळी ‘बुद्धिमान, संयमी आणि

क्रोधोन्मत्त' होऊ शकत नाही. (स्पीरा, पृ. ३५३-४)

भारतात जितके महाल दिसतात ते भारताच्या श्रीमंतीचे नाहीत तर काही लोकांना मिळालेल्या श्रीमंतीच्या शक्तीच्या उन्मत्ततेचे प्रतीक आहेत. भारतातील लाखो गरिबांना नाममात्र मजुरी देऊन श्रीमंतांनी हे महाल उभे केले आहेत. (यंग, २८-४-१९२७, पृ. १३७)

### श्रीमंतांचे कर्तव्य

आज आपले काय कर्तव्य आहे याचा श्रीमंतांनी नीट विचार केला पाहिजे. आपल्या संपत्तीचे रक्षण करण्याकरिता आज ते ज्यांना पगार देऊन नेमतात उद्या कदाचित तेच त्यांचे शत्रू बनतील. श्रीमंतांना स्वतः शस्त्र घेऊन वा अहिंसेची मदत घेऊन संघर्ष करणे शिकावे लागेल.

ज्यांना अहिंसेची मदत घ्यायची असेल त्यांच्याकरिता सर्वात परिणामकारक मंत्र आहे : तेन त्यक्तेन भुंजिथाः. याचा अर्थ असा आहे : करोडोंची संपत्ती जरूर मिळवा, परंतु असे समजा की ती तुमची नाही, जनतेची आहे. आपल्या कमाईमधून आपल्या न्याय्य खर्चाकरिता आवश्यक तेवढे ठेवा आणि शिल्लक रक्कम समाजहिताकरिता खर्च करा.

या सत्यानुसार अजून कृती झालेली नाही. परंतु तणावाच्या या युगातही श्रीमंतांनी यानुसार वर्तन केले नाही तर ते त्यांच्या संपत्तीचे आणि वासनांचे गुलाम बनून राहतील आणि अखेरीस त्यांच्यापेक्षा वरचढ असणारांचे दास बनतील.

....मला तो दिवस येताना दिसतो आहे जेव्हा गरिबांचे राज्य असेल, मग तसे सशस्त्र संघर्षामुळे होईल वा अहिंसेच्या मार्गाने. परंतु ही गोष्ट लक्षणीय आहे की ज्याप्रमाणे शरीर कायम टिकणारे नाही त्याचप्रमाणे शारीरिक शक्तीही कायम टिकणारी नाही. परंतु आत्म्याची शक्ती तशीच चिरंतन आहे जसा आत्मा चिरंतन आहे. (हरि, १-२-१९४२, पृ. २०)

सामान्यपणे श्रीमंत लोक.... वा असेही म्हणू शकतो की आपण कशा प्रकारे पैसा कमावतो याचा अधिकांश माणसे विचार करत नाहीत. अहिंसेच्या तंत्राचा प्रयोग केल्यानंतर या गोष्टीची पूर्ण शक्यता आहे की प्रत्येक व्यक्तीत, मग ती कितीही दुर्गुणी असली तरी सुधारणा केली जाऊ शकते. आपण माणसातील चांगुलपणा वर आणला पाहिजे आणि त्याच्याकडून अनुकूल प्रतिक्रियेची आशा केली पाहिजे.

## सर्वांचे कल्याण

समाजातील प्रत्येक सदस्याने आपल्या संपूर्ण प्रतिभेचा उपयोग केवळ आपल्या प्रगतीकरता न करता सर्वांच्या कल्याणाकरिता केला पाहिजे ही गोष्ट समाजहिताची नाही का? प्रत्येक व्यक्तीला आपल्या क्षमतेचा अधिकात अधिक उपयोग करता येणे शक्य होणार नाही वा तिला तिच्या क्षमतेचा उपयोग करू दिला जाणार नाही अशी निष्प्राण समता आपल्याला प्रस्थापित करायची नाही. असा समाज अखेरीस नष्ट होतो.

श्रीमंत माणसाने वाटल्यास करोडो रुपये कमवावे (परंतु प्रामाणिकपणे) असे जे मी सांगत असतो ते यामुळेच योग्य आहे. परंतु त्याने आपली कमाई सर्वांच्या सेवेकरिता सादर केली पाहिजे. 'तेन त्यक्तेन भुंजिथाः' हा मंत्र दुर्लभ ज्ञानावर आधारित आहे. आपल्या शेजा-याचे काय होते आहे याची चिंता न करता आजच्या जगात सर्व लोक केवळ स्वार्थाचे जीवन जगत आहेत. हा मंत्र सार्वभौम हिताचा आहे व तो एका नवीन जीवनव्यवस्थेच्या विकासाचा सगळ्यात खात्रीशीर उपाय सुचवत आहे. (हरि, २२-२-१९४२, पृ. ४९)

## भिक्षावृत्ती

आपला देश भयानक दारिद्र्य आणि उपासमार यांना बळी पडलेला आहे त्यामुळे भिका-यांच्या संख्येत वाढ होत आहे. जीव वाचवण्याचा संघर्ष करता करता हे लोक शालीनता आणि स्वाभिमानाच्या सर्व भावनांबद्दलची संवेदनशीलता हरवून बसले आहेत आणि आमचे दानवीर यांनी काम करावे असा आग्रह धरण्याऐवजी त्यांना भिक्षा देत आहेत. (ए, पृ. ३२०)

ज्याने कोणत्या तरी प्रामाणिक मार्गाने आपले पोट भरण्याकरिता काम केले नसेल अशा कोणत्याही धडधाकट माणसाला फुकट जेवू घालणे ही गोष्ट माझी अहिंसा सहन करणार नाही. जर माझे चालले असते, तर फुकट जेवू घालणारे सर्व सदावर्त मी बंद केले असते. या पद्धतीने देशाला अधःपतनाकडे नेले आहे आणि तिच्यामुळे आळस, अकार्यक्षमता, ढोंग आणि एवढेच नाही तर अपराधी मनोवृत्तीला खतपाणी घातले आहे. अपात्रांना दया दाखवल्यामुळे राष्ट्राची भौतिक वा आध्यात्मिक, कोणतीही उन्नती होत नाही. उलट दान देणारांमध्ये खोटी पुण्याची भावना निर्माण होते.

**दान नाही, काम**

दानधर्म करणा-या लोकांनी अशी संस्था उघडावी जिथे निरोगी वातावरणात स्त्री-पुरुषांना जेवण मिळू शकेल आणि त्याच्या मोबदल्यात त्यांना तिथे कोणते तरी कामधाम करता येईल. ही गोष्ट किती समंजसपणाची होईल? माझे वैयक्तिक मत आहे की सूत कताई वा कापसावरील प्रक्रियेचे काम अशा संस्थांकरिता आदर्श काम राहील. परंतु त्या संस्थांना हे काम नको असेल तर त्या दुसरे कोणते तरी काम निवडू शकतात. बस, नियम एकच असावा, 'काम नाही तर खाणे नाही.'....

मला माहीत आहे की सदावर्तात जेवू घालणे सोपी गोष्ट आहे आणि जिथे खायला मिळण्यापूर्वी प्रामाणिकपणाने काम करणे जरुरीचे असेल अशी संस्था तयार करणे कठीण गोष्ट आहे. आर्थिक दृष्टीने लोकांना फुकट भोजनशाळा चालवण्यापेक्षा कामाच्या मोबदल्यात खाणे देणे महाग पडू शकते. परंतु माझा विश्वास आहे की जर आपल्याला देशात लोफर लोकांची संख्या गुणोत्तर पद्धतीने वाढवायची नसेल तर अशा संस्था उघडणे दीर्घ काळात स्वस्तच पडेल. (यंग, १३-८-१९२५, पृ. २८२)

उपाशी मरणा-या आणि निष्क्रिय लोकांसमोर ईश्वर केवळ एकाच रूपात प्रगट होण्याचे साहस करू शकतो आणि ते आहे काम आणि त्याच्या मजुरीच्या मोबदल्यात भाकरीचे आश्वासन. (यंग, १३-१०-१९२१, पृ. ३२५)

उघड्यानागड्या लोकांना कपडे देऊन मी त्यांचा अपमान करणार नाही - त्यांना कपड्यांची नाही तर कामाची गरज आहे आणि ते मी त्यांना दिले पाहिजे. मी त्यांचा पालक होण्याचे पाप करणार नाही, परंतु त्यांना गरीब बनवण्यात माझाही सहभाग आहे, हे लक्षात आल्यानंतर मी त्यांना भाकरीचे थोडेसे तुकडे वा उतरलेले कपडे देणार नाही तर त्यांना चांगल्यात चांगले कपडे व उत्तम जेवण देईन व त्यांच्याबरोबर कामात सहभागी होईन. (यंग, १३-१०-१९२१, पृ. ३२५)

भिक्षावृत्तीला प्रोत्साहन देणे ही वाईट गोष्ट आहे असे मला जाणवत असले तरी कोणत्याही भिका-याला काम आणि जेवण दिल्याशिवाय मी जाऊ देणार नाही. जर तो कामाला नाही म्हणाला, तर मी त्याला जेवण देणार नाही. लुळ्यापांगळ्या लोकांना खाऊ घालण्याची जबाबदारी राज्याची आहे.

खोट्या वा ख-या आंधळेपणाच्या नावाने फार मोठा भ्रष्टाचार सुरू आहे. बेईमानीने पैसा कमावून बरेचसे आंधळे श्रीमंत झाले आहेत. या प्रलोभनांना बळी पडण्यापेक्षा त्यांना आश्रमात भरती करणे चांगले. (हरि, ११-५-१९३५, पृ. ९९)

### नोकरांवर अवलंबून राहणे

माझे मत आहे की जी व्यक्ती इतरांची मदत घेऊ इच्छिते वा इतरांना मदत करू इच्छिते त्या व्यक्तीने नोकरांवर अवलंबून राहू नये. नोकरांची अडचण असतानाही कोणाला नोकर हवा असेल तर तो नोकर जितका पगार मागेल तितका त्याला द्यावा लागेल व त्याच्या इतर अटीही मान्य कराव्या लागतील. परिणामी मालक असण्याऐवजी ती व्यक्तीच नोकराची नोकर होऊन जाईल. ही गोष्ट ना तर मालकाकरिता चांगली आहे ना नोकराकरिता.

परंतु जर एखाद्या व्यक्तीला कुणाची गुलामगिरी नको असेल व सहकार्य हवे असेल तर ती केवळ स्वतःचीच सेवा करणार नाही तर त्याचीही सेवा करेल ज्याच्या सहकार्याची त्या व्यक्तीला गरज आहे. या सिद्धान्ताचा विस्तार केल्यानंतर माणसाला सर्व विश्व, आपल्या कुटुंबाचे बृहत् रूप वाटेल व आपल्या साथीदारां-बद्दलच्या त्याच्या दृष्टिकोनातही त्याप्रमाणे परिवर्तन होईल. इच्छित पूर्णत्वाकडे पोहोचण्याचा दुसरा कोणताही मार्ग नाही. (हरि, १३-१०-१९४६, पृ. ४०)

## ३९. दरिद्रनारायण

### गरिबांचा देव

माणसाकरिता अनाम आणि अगाध असलेल्या ईश्वराची जी लाखो नावे आहेत त्यातील एक नाव आहे दरिद्रनारायण. याचा अर्थ आहे गरिबांचा देव म्हणजे गरिबांच्या हृदयात वसणारा देव. (यंग, ४-४-१९२९, पृ. ११०)

गरिबांकरिता आर्थिक विषयच आध्यात्मिक असतात. या लाखो करोडो उपाशी लोकांवर कोणत्याही गोष्टीचा परिणाम होऊ शकत नाही. तुम्ही त्यांना भाकरी द्याल तर ते तुम्हाला देव समजतील. वेगळा काही विचार करण्याची त्यांच्यात ताकदच नाही. (यंग, ५-५-१९२७, पृ. १४२)

चिंध्यांमध्ये बांधलेल्या मळक्या-गंजल्या पै माझ्या याच हातांनी मी गोळा केल्या आहेत. त्यांच्याशी आधुनिक प्रगतीसंबंधी बोलू नका. त्यांच्यासमोर विनाकारण देवाचे नाव घेऊन देवाचा अपमान करू नका. आपण जर त्यांच्याशी ईश्वराबद्दल बोलू तर ते तुम्हाला व मला सैतान समजतील. त्यांना जर कोणता देव माहीत असेल तर तो आहे आतंक आणि बदला घेणारा देव, एक निर्दय अत्याचारी. (यंग, १५-९-१९२७, पृ. ३१३)

जीवापाड मेहनत करणा-या आणि बेरोजगार असणा-या त्या लाखो करोडो लोकांकरिता, ज्यांना दिवसभरात एकदाही पोटभर जेवण मिळत नाही आणि शिळ्या भाकरीचा एक तुकडा आणि चिमूटभर मीठ याच्या आधारावर जे संपूर्ण जीवन कंठतात, स्वराज्य मिळवण्याकरिता मी प्रयत्नरत आहे.
(यंग, २६-३-१९३१, पृ. ५३)

## ईश्वराचा संदेश

मी त्यांच्यापर्यंत ईश्वराचा संदेश नेण्याचे साहस करू शकत नाही. त्या लाखो करोडो उपाशी तापाशी लोकांसमोर, ज्यांच्या डोळ्यात कोणतेही तेज शिल्लक राहिलेले नाही आणि ज्यांचा देव केवळ त्यांची भाकरी आहे. त्यांच्यासमोर ईश्वराचा संदेश पोहोचवणे हे कुत्र्यासमोर ईश्वराचा संदेश पोहोचवण्यासारखेच होईल. त्यांच्यासमोर मी पवित्र कामाच्या रूपानेच ईश्वराचा संदेश घेऊन जाऊ शकतो.

चांगला नाश्ता करून आणि सुंदर जेवणाची वाट पाहत इथे ईश्वराबद्दल चर्चा करता येऊ शकते, परंतु त्या लाखो लोकांशी ईश्वराबद्दल कशी चर्चा करू ज्यांना दिवसभरात दोनदा भाकरीही मिळत नाही? त्यांच्याकरिता तर ईश्वर भाकरी आणि तुपाच्या रूपातच प्रकट होऊ शकतो. भारतातील शेतक-यांना आपल्या जमिनीतून भाकरी मिळत होती. त्यांना तूपही मिळावे म्हणून मी त्यांना चरखा दिला आणि आज जर मी लंगोट बांधतो तर ती मी या लाखो अर्धपोटी आणि निर्वस्त्र मूक लोकांचा एकमात्र प्रतिनिधी आहे एवढ्याकरिता. (यंग, १५-१०-१९३१, पृ. ३१०)

या लाखो करोडो दरिद्री भारतवासीयांना ओळखण्याचा माझा दावा आहे. दिवसाचे चोवीसही तास मी त्यांच्यासोबत आहे. या लोकांच्या हृदयात वसणा-या ईश्वराशिवाय इतर कोणत्याच ईश्वराला मी ओळखत नसल्यामुळे यांची काळजी हे माझे पहिले आणि अंतिम कर्तव्यही आहे. यांना त्या ईश्वराच्या उपस्थितीची अनुभूती होत नाही परंतु मला होते आणि याच लाखो करोडो दरिद्री लोकांच्या सेवेच्या माध्यमातून ईश्वररूपी सत्याची अथवा सत्यरूपी ईश्वराची मी पूजा करत असतो. (हरि, ११-३-१९३९, पृ. ४४)

# ८. श्रम

## ४०. भाकरीकरिता शारीरिक श्रमाचा सिद्धान्त

### दैवी नियम

माणसाने श्रम करून आपली भाकरी मिळवावी याकरिता ईश्वराने माणसाची सृष्टी केली आणि सांगितले की श्रमाशिवाय खाणारे चोर आहेत.
(यंग, १३-१०-१९२१, पृ. ३२५)

महान निसर्गाची इच्छा आहे की माणसाने आपल्या भाकरीकरिता घाम गाळला पाहिजे. यामुळे जी व्यक्ती एक मिनिटही वाया घालवते ती आपल्या शेजा-यांवर ओझे असते आणि असे करणे अहिंसेच्या पहिल्या पाठाचे उल्लंघन आहे. आपल्या शेजा-यांची तारतम्याने आणि पूर्णपणे काळजी घेणे म्हणजे अहिंसा नाही तर आणखी काय आहे? निष्क्रिय व्यक्तीत हीच मूलभूत उणीव असते. (यंग, ११-४-१९२९, पृ. ११४-५)

माणसाने जगण्याकरिता श्रम केले पाहिजेत, हा नियम टॉलस्टॉयच्या भाकरीकरिता शारीरिक श्रमासंबंधीच्या लेखात सुरुवातीला मी वाचला होता. तसे पाहता 'अनटू धिस लास्ट' वाचल्यापासूनच या नियमाबद्दल मला आदर वाटू लागला होता. आपली भाकरी मिळवण्याकरिता माणसाने आपल्या हाताने श्रम केले पाहिजेत, या नियमाचे प्रतिपादन सर्वात आधी रशियन लेखक बोन्डारिफ यांनी केले होते. टॉलस्टॉय यांनी त्याचा व्यापक स्वरूपात प्रचार केला. जी व्यक्ती यज्ञाशिवाय भोजन करते ती चोर असते असे जे गीतेच्या तिस-या अध्यायात सांगितले आहे त्यात माझ्या मते याच नियमाचे प्रतिपादन आहे. इथे यज्ञ या शब्दाचा अर्थ भाकरीकरिता शारीरिक श्रम असाच होऊ शकतो. (फ्रायम, पृ. ३५)

### तर्कशुद्धही

तर्काद्वारेही आपण याच निष्कर्षावर पोहोचतो. जो माणूस शारीरिक श्रम करत नाही त्याला खाण्याचा काय अधिकार आहे? 'बायबल'मध्ये सांगितले आहे, 'घाम गाळल्यानंतरच तुला भाकरी मिळेल'. जर एखादा लखपती दिवसभर अंथरुणावर

पडून या कुशीवरून त्या कुशीवर वळत असेल आणि जेवणही इतरांच्या हाताने घेत असेल तर तो अशा प्रकारे जास्त दिवस जगू शकत नाही. यामुळे व्यायाम करून तो भूक प्रदीप्त करतो व स्वतःच्या हाताने जेवण करतो.

यामुळेच गरीब-श्रीमंत, सर्वांना कोणत्या ना कोणत्या प्रकारे व्यायाम करणे जरुरीचे होते. मग असे असताना उत्पादक श्रमाच्या स्वरूपात म्हणजे भाकरीकरिता श्रमाच्या स्वरूपातच व्यायाम का करू नये? शेतक-याला कोणी प्राणायाम वा मांसपेशींचे व्यायाम करायला सांगत नाही आणि मानवजातीतील नव्वद टक्के लोक शेतकरीच आहेत. यामुळे राहिलेले दहा टक्के लोकही बहुसंख्यांकांचे उदाहरण गिरवून भाकरीकरिता श्रम करू लागतील तर हे जग आजच्या तुलनेत किती सुखी, निरोगी आणि शांततापूर्ण होऊ शकेल!

### सामाजिक क्रांती

....भांडवल आणि श्रम यांच्यात विश्वव्यापी संघर्ष आहे आणि गरीब लोक श्रीमंतांचा हेवा करतात. सर्व लोक जर भाकरीकरिता श्रम करू लागले तर लहानमोठा हा भेद मिटून जाईल; त्यानंतरही श्रीमंत लोक श्रीमंत राहतील परंतु ते स्वतःला आपल्या संपत्तीचे विश्वस्त समजतील आणि तिचा लोकहिताकरिता उपयोग करतील. (फ्रायम, पृ. ३५-६)

ईश्वर तात्कालिक आवश्यकतांपेक्षा अधिकाचे सृजन कधीही करत नाही. यामुळे जर एखादी व्यक्ती आपल्या आवश्यकतेपेक्षा अधिक वस्तूंचा उपयोग करत असेल तर ती आपल्या शेजा-यांना गरीब बनवते. याच कारणामुळे जगात अनेक लोक उपाशी आहेत आणि आपल्यापैकी अनेक आवश्यकतेपेक्षा अधिक वस्तू बळकावून बसले आहेत. निसर्गाच्या देणग्यांचा आम्ही हवा तसा उपयोग करू शकतो, परंतु निसर्गाच्या खात्यात जमा आणि नावे यांची खातेमिळवणी बरोबर होत असते. कोणत्याही बाजूला काहीही शिल्लक नसते. (आआए, पृ. ६२-३)

पक्षी आणि पशू यांच्याप्रमाणेच प्रत्येक व्यक्तीला अत्यावश्यक वस्तू मिळवण्याचा अधिकार आहे आणि प्रत्येक अधिकाराबरोबर त्याच्याशी सुसंगत असे कर्तव्यही जोडलेले असते आणि अधिकारावर हल्ला झाला असता त्याच्या बचावाकरिता सुसंगत असा उपचारही उपलब्ध असतो. यामुळे सुरुवातीची मौलिक समता सुनिश्चित करण्याकरिता आपल्या अधिकारांशी सुसंगत कर्तव्य आणि सुसंगत उपचार काय आहेत हे केवळ आम्हाला समजून घ्यायचे आहे.

भाकरीकरिता श्रम करणे हे त्याच्याशी सुसंगत कर्तव्य आहे आणि जी व्यक्ती माझ्या श्रमाच्या फळापासून मला वंचित करील तिच्याशी असहकार करणे, हा त्याच्याशी सुसंगत उपचार आहे. (यंग, २६-३-१९३१, पृ. ४९)

## खरी सेवा

भाकरीकरिता बुद्धिमत्तापूर्वक श्रम करण्याचा निश्चयच समाजसेवेचे सर्वोत्तम रूप आहे. माणसाने आपल्या व्यक्तिगत श्रमाने आपल्या देशाकरिता उपयोगी संपत्तीत वृद्धी करावी, यापेक्षा अजून चांगले काय असू शकेल? 'असू शकणे' हेच 'असणे' आहे.

इथे श्रमाला 'बुद्धिमत्तापूर्वक' हे विशेषण अशासाठी लावण्यात आले आहे की श्रमाला समाजसेवा तेव्हाच म्हणता येते जेव्हा त्यामागे एक निश्चित प्रयोजन असेल. असे नसेल तर प्रत्येक मजुराला समाजसेवक मानावे लागेल. तोही एक प्रकारे समाजसेवाच करत असतो, परंतु इथे आपला आशय याहून किती तरी व्यापक आहे. जी व्यक्ती सर्वांच्या कल्याणाकरिता श्रम करत असते ती समाजसेवक असते व तिचे श्रम मूल्यवान असतात. यामुळेच भाकरीकरिता अशा प्रकारे करण्यात आलेले श्रम समाजसेवेपेक्षा वेगळे नसतात.
(हरि, १-६-१९३५, पृ. १२५)

भाकरीकरिता श्रम करण्याच्या नियमाच्या पालनामुळे समाजाच्या संरचनेत एक मूक क्रांती होईल. तेव्हा जगण्याकरिता संघर्ष करण्याऐवजी परस्पर सेवा करण्याकरिता संघर्ष करणे हा माणसाचा विजय आहे असे मानले जाईल आणि पशूच्या नियमाच्या ठिकाणी मानवाच्या नियमाची स्थापना होईल.
(हरि, २९-६-१९३५, पृ. १५६)

प्रत्येक माणूस जर जगण्याकरिता शारीरिक श्रम करील तर हे जग स्वर्ग बनेल. या ठिकाणी विशेष योग्यतेबद्दल काही वेगळ्या प्रकारचा विचार करण्याची गरज नाही. प्रत्येक व्यक्ती आपल्या भाकरीकरिता जर शारीरिक श्रम करील तर याचा अर्थ होईल कवी, डॉक्टर, वकील इत्यादी सर्व लोक आपल्या विशेष कौशल्याचा उपयोग मानवसेवेकरिता निःशुल्क करणे आपले कर्तव्य समजतील. निःस्वार्थ भावाने सेवा केल्यामुळे त्यांच्या गुणवत्तेतही किती तरी अधिक वाढ होईल. (हरि, २-३-१९४७, पृ. ४७)

## अंमलबजावणीचे क्षेत्र

अहिंसेचे पालन करणा-यांकरिता, सत्याची आराधना करणा-यांकरिता आणि स्वाभाविक कृत्य समजून ब्रह्मचर्याचे व्रत घेणा-यांकरिता भाकरीकरिता श्रम एक वरदानच ठरेल. 'भाकरीकरिता श्रमा'चा संबंध केवळ कृषीशीच असू शकतो. परंतु आजच्या काळात शेती करणे सर्वांकरिता शक्य नाही. यामुळे शेतीऐवजी माणूस कताई, पिंजाई वगैरे करू शकतो. अथवा सुतारकाम, लोहारकामही करू शकतो. अर्थात आदर्श मात्र शेतीच आहे.

प्रत्येक व्यक्तीने आपल्या सफाईचे काम स्वतःच केले पाहिजे. जेवण जेवढे आवश्यक आहे तेवढेच मलमूत्रविसर्जन आहे आणि प्रत्येक व्यक्तीने स्वतः आपली सफाई करणे हीच सर्वोत्तम गोष्ट होईल. हे जर अशक्य असेल तर प्रत्येक कुटुंबाने तरी आपल्या साफसफाईची जबाबदारी उचललीच पाहिजे.

अनेक वर्षांपासून मला जाणवत आले आहे की समाजाच्या साफसफाईची जबाबदारी एका विशिष्ट वर्गावर टाकण्यात फार मोठी चूक झाली आहे. सर्वात आधी या सफाईसेवेला निम्नतम दर्जा देणा-या व्यक्तीचा इतिहासात कुठेही उल्लेख आढळत नाही. जो कोणी तो असेल त्याने आमचे कोणतेही कल्याण केले नाही.

आपण सर्व लोक साफसफाई करणारे आहोत आणि आपण सर्वांनी भाकरी कमावण्याकरिता सफाईचे काम हातात घेणे हा यावरील सर्वात सोपा उपाय आहे ही गोष्ट लहानपणापासूनच आमच्या मनावर ठसवण्यात आली पाहिजे. अशा प्रकारे सफाईचे काम बुद्धिमत्तापूर्वक हाती घेण्यात आले तर माणसामाणसातील समता समजून घेण्याकरिता फार मोठी मदत होईल. (फायम, पृ. ३६-७)

## स्वेच्छापूर्वक मान्यता

गावांकडे परतण्याचा अर्थ आहे भाकरीकरिता श्रम करण्याचे कर्तव्य आणि त्याच्याशी जुळलेल्या अन्य सगळ्या गोष्टी यांना मान्यता प्रदान करणे. तिकडे टीकाकारांचे म्हणणे आहे की, 'खेड्यांमध्ये भारतातील लाखो लोक राहतात, परंतु मोठ्या मुश्किलीने त्यांना अर्धपोटी जेवण मिळते.' दुर्दैव हे आहे की ही गोष्ट सत्य आहे. हे लोक खेड्यातील जीवन स्वेच्छेने जगत नाहीत हे आम्हाला माहीत आहे हे आपले भाग्य. त्यांचे चालले तर ते कदाचित शारीरिक श्रम करणे सोडून देतील आणि हेही शक्य आहे की, राहण्याच्या जागेचे त्यांना आश्वासन मिळाले तर खेड्यातून पळ काढून जवळच्या शहरात जाऊन ते राहू लागतील.

मालकाच्या आज्ञेचे बळजबरीने पालन करणे म्हणजे गुलामगिरी. उलट आपल्या वडिलांनी केलेल्या आज्ञेचे पालन करणे संततीकरिता गौरवाची गोष्ट असते. अशाच रीतीने भाकरीकरिता श्रम या नियमाचे बळजबरीने केलेले पालन गरिबी, आजार आणि असंतोषाला जन्म देते. ही गुलामगिरीची स्थिती आहे. या नियमाचे स्वेच्छेने पालन केल्यानंतर संतोष आणि स्वास्थ्य यांच्यात वृद्धी व्हायला हवी आणि स्वास्थ्यच खरे धन आहे, सोन्या-चांदीचे तुकडे नाहीत.
(हरि, २९-६-१९३५, पृ. १५६)

### श्रमविभाजन

माझा श्रमाच्या वा कामाच्या विभाजनावर विश्वास आहे. परंतु त्याचबरोबर मजुरीवर माझा भर आहे. वकील, डॉक्टर वा अध्यापकाला भंग्यापेक्षा जास्त पगार घेण्याचा अधिकार नाही. असे जेव्हा होईल तेव्हा श्रमविभाजनामुळे राष्ट्राचे वा जगाचे उत्थान होईल. खरी संस्कृती वा सुख मिळवण्याचा जवळचा मार्ग आणखी कोणताही नाही. (हरि, २३-३-१९४७, पृ. ७८)

भाकरीकरिता श्रमाचे अर्थशास्त्र म्हणजे जिवंत जीवनप्रणाली. याचा अर्थ आहे प्रत्येक माणसाला त्याचे खाणे-पिणे आणि कपडा-लत्ता यांच्याकरिता शारीरिक श्रम करावे लागतील. मी जर लोकांना भाकरीकरिता श्रम करण्याच्या गरजेचे महत्त्व समजावून सांगू शकलो तर खाण्यापिण्याची व कपड्यालत्त्याची ददात कधीही पडणार नाही. तेव्हा मी लोकांना खात्रीपूर्वक सांगू शकेन की शेती, कताई, पिंजाई वगैरे कामे करण्याची तुमची इच्छा नसेल तर तुम्हाला उपाशी आणि कपड्यांशिवाय राहावे लागेल. (हरि, ७-९-१९४७, पृ. ३१६)

एका ठराविक वयानंतर प्रत्येक नागरिकाला मतदानाचा अधिकार तेव्हाच मिळेल, जेव्हा तो शारीरिक श्रमाच्या रूपाने राज्याची सेवा करेल असे जे मी १९२५मध्ये म्हणालो होतो, त्यावर मी आजही कायम आहे.
(हरि, २-३-१९४७, पृ. ४६)

### पूजेसारखे काम

आम्ही सर्वांनी दररोज, समजा एक तास, तेच काम करावे जे गरीब लोक करतात आणि अशा प्रकारे त्यांच्याशी व त्यांच्या माध्यमातून सगळ्या मानवतेशी तादात्म्य स्थापित करावे यापेक्षा अधिक उदात्त आणि राष्ट्रप्रेमाच्या गोष्टीची कल्पना मी करू शकत नाही. ईश्वराच्या नावावर गरिबांकरिता मी तसेच श्रम करावे, जसे ते

करतात यापेक्षा अधिक चांगल्या ईश्वरपूजेची मी कल्पना करू शकत नाही. (यंग, २०-१०-१९२१, पृ. ३२९)

देवाच्या नावाने करण्यात आलेले आणि त्याला समर्पित केलेले कोणतेही काम लहान नसते. या भावनेने केलेले कोणतेही काम सारखेच प्रशंसनीय असते. ईश्वराची सेवा समजून सफाईकाम करणारा व स्वतःला विश्वस्त समजून ईश्वराच्या नावाने आपल्या गुणांचा उपयोग करून शासनकार्य करणारा एक राजा या दोघांच्या कामाचे मूल्य सारखेच आहे. (यंग, २५-११-१९२६, पृ. ४१४)

....तोपर्यंत सेवा करणे शक्य नाही जोपर्यंत तिच्या मुळाशी अहिंसा वा प्रेम नसेल.... खरे प्रेम समुद्राप्रमाणे असीम असते व त्याच्या उफाळणा-या लाटा सर्व सीमा ओलांडून संपूर्ण जगाला व्यापून टाकतात. ही सेवा भाकरीकरिता श्रम केल्याशिवाय शक्य नाही ही अजून एक गोष्ट आहे. हिलाच 'गीतेत' यज्ञ म्हणून संबोधलेले आहे. सेवेच्या हेतूने शारीरिक श्रम केल्यानंतर स्त्री वा पुरुषाला जगण्याचा हक्क मिळतो. (यंग, २०-९-१९२८, पृ. ३२०)

## त्यागाचे कर्तव्य

'ब्रह्मदेवाने ही सृष्टी निर्माण करून आपल्या प्रजेवर जबाबदारी टाकली की तुम्ही यज्ञ करा आणि तो म्हणाला : 'यज्ञाद्वारे तुम्हाला समृद्धी मिळो. यामुळे तुमच्या सर्व कामना पूर्ण होवो.' जी व्यक्ती यज्ञाशिवाय भोजन करते ती चोरीचे अन्न खाते' असे 'गीतेचे' वचन आहे. 'बायबल'चेही म्हणणे आहे, 'तू घाम गाळून आपली भाकरी मिळव.' त्याग अनेक प्रकारचा असू शकतो. त्यातील एक भाकरीकरिता श्रम आहे. सर्व लोक जरी स्वतःच्या भाकरीकरिताच श्रम करू लागले तरी सर्वांना पुरेसे जेवण आणि विश्रांती मिळेल. तेव्हा ना लोकसंख्येचा प्रश्न निर्माण होईल ना रोग असतील आणि ना आजूबाजूला आज दिसते तसे दुःख दिसेल. भाकरी कमावण्याकरिता करण्यात येणारे श्रम म्हणजे सर्वोच्च त्याग. माणूस आपल्या शरीराच्या आणि बुद्धीच्या बळावर अजूनही भरपूर काम करेल हे निश्चित. परंतु ते सर्व काम प्रेमाखातर म्हणजे लोकहितास्तव तो करील, तेव्हा ना कोणी श्रीमंत असेल, ना गरीब, ना कोणी मोठा ना कोणी लहान, ना कोणी स्पृश्य ना कोणी अस्पृश्य.

हा अप्राप्य आदर्श असू शकेल. परंतु एवढ्याकरिता संघर्ष करणे बंद करायला नको. आपण त्यागाचा संपूर्ण नियम, म्हणजेच आपल्या जीवनाचा नियम जरी पूर्ण केला नाही आणि केवळ भाकरीकरिता श्रमच केले तरी या आदर्शाकडे बरीच

वाटचाल केल्यासारखे होईल.

आपण असे करू शकलो तर आपल्या गरजा किमान होतील व आपले अन्न साधे. मग आपण जगण्याकरिता खाऊ, खाण्याकरिता जगणार नाही. जर कोणाला या विधानाच्या खरेपणाबद्दल संशय असेल तर त्याने आपली भाकरी कमावण्याकरिता मेहनत करून पाहावी. त्याला आपल्या श्रमापासून अधिकतम आनंदाची प्राप्ती होईल, त्याच्या आरोग्यात सुधारणा होईल आणि ज्या वस्तूंचा तो उपभोग घेत होता त्यातील अनेक गोष्टी बेकार असल्याचे त्याच्या लक्षात येईल. (हरि, २९-६-१९३५, पृ. १५६)

## कर्मसिद्धान्त

कर्मावर जेवढा भर द्यावा तेवढा कमी आहे. मी केवळ गीतेत सांगितलेला सिद्धान्त पुन्हा सांगतो आहे. श्रीकृष्ण भगवान सांगतात : 'मी जर अहर्निश कर्मरत राहिलो नाही तर मानवजातीसमोर मी चुकीचा आदर्श ठेवीन.'

....मला जर भगवान बुद्धासारख्या महापुरुषाला भेटण्याचे भाग्य लाभले असते तर तुम्ही ध्यानाच्या सिद्धान्ताऐवजी कर्माचा सिद्धान्त का सांगितला नाही असे मी त्यांना निःसंकोचपणे विचारले असते. तुकाराम आणि ज्ञानदेव यांसारख्या संतांचा मला साक्षात्कार होऊ शकला असता तर त्यांनाही मी हाच प्रश्न विचारला असता. (हरि, २-११-१९३५, पृ. २९८)

देवाने माणसाला आपल्या भाकरीकरिता श्रम करण्याकरिता निर्माण केले आहे. एखाद्या जादूच्या छडीच्या मदतीने कधी काळी माणसाला आपल्या गरजेच्या सर्व वस्तू निर्माण करता आल्या तर काय होईल या विचारानेच मी घाबरतो. (हरि, १६-५-१९३६, पृ. १११)

जोपर्यंत जगात एकही धडधाकट माणूस कामाशिवाय वा जेवणाशिवाय आहे तोपर्यंत आम्हाला आराम करताना वा पोटभर जेवताना लाज वाटली पाहिजे. (यंग, ६-१०-१९२१, पृ. ३१४)

आपल्या देशातील घोर दारिद्र्य आणि बेरोजगारी पाहून मी अक्षरशः रडलो आहे. परंतु याकरिता आमची उपेक्षा आणि अज्ञानच बहुतांश जबाबदार आहे हे मला मान्य करावे लागेल. आपण श्रमप्रतिष्ठेशी अपरिचित आहोत. इथे जोडे बनवणारा त्याशिवाय दुसरे कोणतेही काम करू इच्छीत नाही. इतर सर्व काम त्याला त्याच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणणारे आहेत असे वाटते. आपल्याला हा

श्रम नाहीसा करावा लागेल.

ज्यांना प्रामाणिकपणे आपल्या हातापायांनी काम करायचे आहे त्या सर्वांकरिता भारतात काम आहे. ईश्वराने प्रत्येकाला काम करण्याची व आपल्या भाकरीपेक्षा अधिक कमावण्याची शक्ती दिली आहे आणि जी व्यक्ती या क्षमतेचा उपयोग करण्याकरिता तयार आहे त्याला कामाची उणीव कधीही भासू शकत नाही. प्रामाणिकपणे काम करू इच्छिणा-या व्यक्तीकरिता कोणतेही काम कमी प्रतीचे नसते. गरज असते ती केवळ ईश्वराने दिलेल्या हातापायाचा उपयोग करण्याची. (हरि, १९-१२-१९३६, पृ. ३५६)

....सर्व बेरोजगार स्त्री-पुरुषांना - मग त्यांची संख्या कितीही असो - भाकरी कमावण्याकरिता शारीरिक श्रमाची संधी देण्याची जबाबदारी निश्चितपणे सरकारची आहे. (हरि, ११-१-१९४८, पृ. ५०७)

**बौद्धिक श्रम**

माझ्याबद्दल गैरसमज करून घेऊ नका. बौद्धिक श्रमाचे महत्त्व मी नाकारत नाही. परंतु आपण कितीही बौद्धिक श्रम केले तरी ते त्या शारीरिक श्रमाचे स्थान घेऊ शकत नाही. बौद्धिक श्रम शारीरिक श्रमापेक्षा श्रेष्ठ समजले जाऊ शकते, अनेकदा ते तसे असतेही परंतु ते शारीरिक श्रमाची जागा कधीही घेऊ शकत नाही व घेऊ शकणारही नाही. ज्याप्रमाणे बौद्धिक आहार अन्नाच्या दाण्यापेक्षा कितीही श्रेष्ठ असला तरी त्यामुळे आपले पोट भरू शकत नाही तसेच हे. सत्य तर हे आहे की भूमीतील उत्पन्नाशिवाय कोणतेही बौद्धिक कार्य शक्यच नाही. (यंग, १५-१०-१९२५, पृ. ३५५-६)

लोकांनी आपल्या बौद्धिक श्रमाद्वारे भाकरी कमावणे उचित नाही काय? नाही. शरीराची गरज शरीराद्वारेच पूर्ण केली पाहिजे. 'जे सिझरचे आहे ते सिझरला करू द्या' हे वचन कदाचित इथेही लागू होईल. परंतु मानसिक म्हणजेच बौद्धिक श्रम हे आत्म्याकरिता असतात व ते स्वतःच एका समाधानाचे विषय असतात. त्याकरिता पारिश्रमिकाची मागणी कधीही करण्यात येऊ नये. आदर्श राज्यात डॉक्टर, वकील वगैरे स्वतःकरिता नाही तर समाजहिताकरिता काम करतील. (हरि, २९-६-१९३५, पृ. १५६)

बौद्धिक कार्य महत्त्वपूर्ण आहे व जीवनात त्याचे स्थानही आहे. परंतु मी इथे शारीरिक श्रमावर भर देतो आहे. माझे म्हणणे आहे की, या जबाबदारीतून

कोणालाही मुक्त करता येऊ शकत नाही. शारीरिक श्रमामुळे माणसाच्या बौद्धिक कार्याचाही विकास होईल. (हरि, २३-२-१९४७, पृ. ३६)

मजूर खुर्चीवर बसून लिहू शकत नाही, परंतु ज्या व्यक्तीने जीवनभर खुर्चीवर बसून काम केले आहे ती निश्चितपणे शारीरिक श्रमाला सुरुवात करू शकते. (हरि, १८-१-१९४८, पृ. ५२०)

## ४१. श्रम आणि भांडवल

### संबंधातील सुसंगती

मी नेहमीच सांगत आलो आहे की भांडवल आणि श्रम यांनी परस्पर पूरक असावे आणि त्यांनी परस्परांचे साहाय्य करावे हा माझा आदर्श आहे, त्यांनी ऐक्य आणि सामंजस्याच्या भावनेने एकाच कुटुंबातील सदस्याप्रमाणे राहावे. भांडवलदार त्याच्याबरोबर काम करणा-या श्रमिकांच्या कल्याणाचा विश्वस्त असल्यामुळे त्याने श्रमिकांच्या भौतिक कल्याणावरच लक्ष न देता नैतिक कल्याणाकडेही लक्ष दिले पाहिजे. (यंग, २०-८-१९२५, पृ. २८५)

भांडवलाची मला भीती वाटत नाही. माझा संघर्ष भांडवलशाहीशी आहे. वंशीय युद्धाने अजून वेगळे आणि भयानक स्वरूप धारण करू नये म्हणून भांडवल एकाच ठिकाणी केंद्रित होऊ नये यावर पाश्चिमात्य देश भर देत आहेत. भांडवल आणि श्रमात संघर्ष असलाच पाहिजे असे नाही.
(यंग, ७-१०-१९२६, पृ. ३४८)

### भांडवलदाराचे हृदयपरिवर्तन

भांडवलदार व श्रमिक यांच्या मूलभूत समतेवर ज्याअर्थी माझा विश्वास आहे, आणि तो असायलाच पाहिजे, त्याअर्थी भांडवलदाराचा नाश करण्याचा माझा हेतू नसला पाहिजे. त्याच्या हृदयपरिवर्तनाचा मी प्रयत्न केला पाहिजे. त्याच्याशी सहकार्य करून तो करत असलेल्या अन्यायाची मी त्याला जाणीव करून देऊ शकतो..... भांडवलदाराचा विनाश केल्यामुळे अखेरीस श्रमिकाचाही विनाश होईल हे सिद्ध करणे कठीण नाही आणि जगातील कोणतीही व्यक्ती इतकी वाईट नसते की जिच्यात कधीही सुधारणा करताच येणार नाही. त्यामुळे कोणत्याही व्यक्तीला परिपूर्ण म्हणून इतकी मान्यता देता येऊ शकत नाही की त्या व्यक्तीला अशा व्यक्तीचा नाश करण्याचा अधिकार देता येईल जिला ती वाईट समजण्याची

चूक करत असते. (यंग, २६-३-१९३१, पृ. ४९)

मूठभर करोडपतींचा नाश करून गरिबांचे शोषण थांबवले जाऊ शकत नाही. उलट याकरिता गरिबांचे अज्ञान दूर करून त्यांना शोषकांशी असहकाराचे शिक्षण द्यावे लागेल. यामुळे शोषकांमध्येही परिवर्तन होईल. मी तर इथपर्यंत म्हणालो आहे की यामुळे हे दोघेही बरोबरीचे साथीदार होतील. भांडवल मूलतः वाईट गोष्ट नाही, केवळ त्याचा उपयोग चुकीचा होत आहे. कोणत्या ना कोणत्या स्वरूपात भांडवलाची गरज नेहमीच राहील. (हरि, २८-७-१९४०, पृ. २१९)

**श्रमिकांचे कर्तव्य आणि अधिकार**

माझा हा सार्वत्रिक अनुभव आहे की सामान्यपणे श्रमिक आपल्या जबाबदा-या मालकांच्या तुलनेत अधिक चांगल्या पद्धतीने आणि प्रामाणिकपणे पार पाडत असतात आणि खरे पाहता मालकांनीही श्रमिकांबद्दलची जबाबदारी अशाच रीतीने पार पाडली पाहिजे. यामुळे आपल्या मालकांकडून श्रमिकांची इच्छा कशी पूर्ण करून घ्यावी याचा मार्ग शोधावा लागेल.

आपल्याला योग्य पगार मिळत नाही वा आपल्या राहण्याकरिता चांगल्या घरांची व्यवस्था करण्यात आलेली नाही असे जर श्रमिकांना आढळले तर व्यवस्थित पगार आणि राहण्याकरिता चांगली घरे मिळावी म्हणून श्रमिकांनी काय करावे? श्रमिकांकरिता योग्य जीवनमान कोणते हे कोणी ठरवावे? श्रमिकांचे अधिकार काय आहेत हे त्यांनाच कळले पाहिजे व ते मिळवण्याचा उपायही त्यांनीच शोधायला हवा हाच यावरील सर्वात चांगला उपाय आहे यात काही संशय नाही. परंतु याकरिता काही प्रशिक्षणाची गरज असेल.... काही पूर्वशिक्षणाची गरज असेल. (स्पीरा, पृ. १०४६)

परंतु जगात असा कोणताच अधिकार नाही जो मिळवण्याकरिता आधी कोणतेही कर्तव्य पार पाडावे लागत नाही. कोणताही मालक आपली संपत्ती कधीही वाया घालवणार नाही. जेव्हा तुम्हाला वाटेल की गिरणी जेवढी मालकाची आहे तेवढीच तुमची आहे तर तुम्ही तिला कधीही हानी पोहोचवणार नाही. मीलमालकांशी सुरू असलेल्या भांडणात रागाच्या भरात तुम्ही कधीही कापडाचे वा मशीनचे नुकसान करणार नाही.

संघर्ष करायचाच असेल तर सत्याच्या मार्गावर चालून तो केला पाहिजे. तेव्हा ईश्वर तुमची मदत करेल. मी परत सांगतो की आपले अधिकार मिळवण्याकरिता

आत्मशुद्धीकरण आणि पीडा सहन करणे याशिवाय दुसरा कोणताही मार्ग आपल्याजवळ नाही. (यंग, ४-८-१९२७, पृ. ३४८)

## श्रमिकशक्ती

माझे नम्र मत आहे की, श्रमिकांमध्ये पुरेसे ऐक्य आणि स्वार्थत्यागाची भावना असेल तर ते आपल्या मागण्या न्याय्य असल्याचे केव्हाही सिद्ध करू शकतात. भांडवलदार कितीही जुलमी असला तरी माझा विश्वास आहे की, जे लोक श्रमिकांशी संबंधित आहेत आणि त्यांच्या आंदोलनाचे मार्गदर्शन करत आहेत त्यांना स्वतःलाच ही गोष्ट माहीत नाही की श्रमिक जितक्या साधनांची जुळवाजुळव करू शकतो तितकी भांडवलदार कधीही करू शकत नाही. श्रमाशिवाय भांडवल काहीही करू शकत नाही केवळ एवढी गोष्ट श्रमिकांना कळली व ती त्यांनी लक्षात ठेवली तर श्रमिकांना आपल्या शक्तीची लगेच जाणीव होईल.

दुर्दैवाने भांडवलाच्या संमोहक प्रभावाने भारून जाऊन आमचा असा समज झाला आहे की या जगात भांडवल हेच सर्व काही आहे. परंतु क्षणभर जरी आपण विचार केला तर आपल्याला आढळून येईल की श्रमिकाजवळ जे भांडवल आहे ते भांडवलदाराजवळ कधीही असू शकत नाही. रस्किनने आपल्या काळात सांगितले होते की श्रमिकाजवळ फार चांगली संधी आहे. परंतु त्याचे म्हणणे आम्हाला कळले नाही.

इंग्रजीत एक फार शक्तिमान शब्द आहे. तो फ्रेंच मध्येही आहे आणि जगातील सर्व भाषांमध्येही आहे. तो शब्द आहे 'नाही.' श्रमिकांनी 'हो' म्हणावे अशी भांडवलदारांची इच्छा असेल परंतु श्रमिकांची तसे म्हणण्याची इच्छा नसेल तर त्यांनी पूर्ण शक्तीनिशी 'नाही' म्हटले पाहिजे. याचबरोबर श्रमिकांच्या लक्षात येईल की त्यांच्यासमोर दोन विकल्प आहेत - जेव्हा 'हो' म्हणायचे असेल तेव्हा 'हो' म्हणायचे आणि 'नाही' म्हणायचे असेल तेव्हा 'नाही' म्हणायचे. अशी परिस्थिती होईल तेव्हा भांडवल आणि श्रम वेगळे होतील व भांडवलाला श्रमाची विनवणी करावी लागेल.

त्यानंतर भांडवलाजवळ बंदुका असल्या काय वा अश्रुधूर असला काय, काहीही फरक पडणार नाही. यानंतर श्रमाने सन्मानपूर्वक आणि ठामपणे नाही म्हटले तर भांडवल पूर्णपणे लाचार होऊन जाईल. तेव्हा श्रमाला प्रतिकाराची

गरज राहणार नाही, मग श्रमिक बंदुका आणि अश्रुधूर यांच्याशी झटून सामना करील आणि तरीही तो आपल्या 'नाही'वर अढळ राहील.

सामान्यपणे श्रमाचा पराभव होण्याचे एकमेव कारण हे आहे की जो मार्ग मी वर सुचवला आहे त्यानुसार भांडवलाला निष्प्रभ करण्याऐवजी श्रमिक (मी स्वतःला श्रमिक समजूनच हे बोलतो आहे) भांडवल हस्तगत करून स्वतः कमी प्रतीचा भांडवलदार बनू इच्छितो. अशा अवस्थेत श्रमिकाला स्वतःच भांडवलदार बनायची इच्छा असल्याचे त्या भांडवलदाराला दिसते. परंतु भांडवलदाराजवळ चांगली तटबंदी असते व तो अधिक सुसंघटितही असतो. त्यामुळे तो श्रमिकांना दडपून टाकतो. आपण जर भांडवलाच्या संमोहनाला वश झालो नाही तर आपल्यातील प्रत्येक स्त्री-पुरुषाला ही गोष्ट सहजपणे कळू शकेल.

तुम्हाला असे आढळून येईल की या योजनेत श्रमिकाकडून जी अपेक्षा करण्यात आली आहे.... ती शस्त्रसज्ज शिपायाकडून केली जात असते. शिपाई जेव्हा आपल्या शत्रूवर प्रहार करतो तेव्हा तो आपला जीवही पणाला लावत असतो. माझी इच्छाही अशीच आहे की शिपायाच्या पाशवीपणाचे म्हणजे जीव घेण्याच्या शक्तीचे अनुकरण न करता त्याच्या साहसाचे अनुकरण करण्यात यावे आणि मी तुम्हाला सांगेन की हातात शस्त्र न घेता जो श्रमिक मरायला तयार होतो तो डोक्यापासून पायापर्यंत शस्त्रसज्ज असलेल्या सैनिकापेक्षा किती तरी अधिक साहसी असल्याचे दाखवून देतो. (यंग, १४-१-१९३२, पृ. १७-८)

## बुद्धीची देणगी

श्रमाला ज्या क्षणी आपली महत्ता कळेल त्या क्षणी भांडवल आपल्या योग्य ठिकाणी जाईल, म्हणजे विश्वस्त म्हणून श्रमाकरिता ते राखून ठेवण्यात येईल. थोडक्यात श्रमाला भांडवलापेक्षा अधिक महत्त्व आहे. (हरि, १९-१०-१९३५, पृ. २८५)

माझे असे मत आहे की श्रमिकाकरिता विविध व्यवसायांची माहिती करून घेणे तेवढेच गरजेचे असते जेवढे भांडवलदाराकरिता धातूंची. श्रमिकाचे कौशल्यच त्याचे भांडवल आहे. ज्याप्रमाणे भांडवलदार श्रमिकाच्या सहकार्याशिवाय आपल्या भांडवलाचे फळ मिळवू शकत नाही त्याचप्रमाणे श्रमिकही भांडवलदारांच्या सहकार्याशिवाय आपल्या श्रमाचे फळ मिळवू शकत नाही.

श्रम आणि भांडवल या दोघांनीही आपल्या बुद्धीचा समान विकास केला तर परस्परांशी योग्य व्यवहार करण्याचे सामर्थ्य असल्याचा विश्वास त्यांच्यामध्ये

निर्माण होईल. असे झाले की, एकाच उद्योगातील समान भागीदार म्हणून ते परस्परांचा सन्मान करू लागतील. त्यानंतर कधीही न मिटू शकणारे कट्टर शत्रुत्व त्यांच्यामध्ये आहे असे मानण्याची गरज राहणार नाही.

## संघटना

परंतु अडचण ही आहे की आज भांडवल सुसंघटित असल्याचे व त्याने आपल्या भोवती संरक्षक तटबंदी उभारल्याचे दिसत असतानाच श्रमाची मात्र तशी परिस्थिती दिसत नाही. निर्जीव यांत्रिक काम करता करता श्रमिकाची बुद्धी अवरुद्ध झाली आहे. या कामामुळे त्याला आपल्या मनाचा विकास करण्याची फार कमी संधी असते. परिणामी त्याला आपल्या शक्तीची व आपल्या व्यावसायिक स्थानाच्या महत्तेची जाणीव नसते.

श्रमिकांची मजुरी भांडवलदार ठरवतील आणि या बाबतीत आपल्या अटी मान्य करून घेण्याची त्यांच्यात क्षमता नाही अशी श्रमिकाची समजूत करून देण्यात आलेली असते. ख-या अर्थाने तो संघटित झाला, त्याची बुद्धी प्रखर झाली, अनेक प्रकारचे कामधंदे तो शिकला तर तो ताठ मानेने चालू शकेल आणि त्याच्या उदरनिर्वाहाचे साधन कधीही संकटात सापडणार नाही.

(हरि, ३-७-१९३७, पृ. १६१)

मी श्रमाच्या संघटनेच्या विरोधात नाही, परंतु या बाबतीतही माझे म्हणणे आहे की, त्यांची संघटना भारतीय पद्धतीची वा असे म्हणा की माझ्या पद्धतीनुसार असावी. मी तेच करतो आहे. भारतीय श्रमिकांना स्वाभाविकपणे हीच पद्धत माहीत आहे. मी भांडवलाला श्रमाचा शत्रू समजत नाही. या दोघांमध्ये पूर्ण समन्वय शक्य आहे असे माझे मत आहे.

दक्षिण आफ्रिका, चंपारण वा अहमदाबाद या ठिकाणी मी श्रमाला संघटित केले होते. तिथे श्रमिकांमध्ये भांडवलदारांबद्दल वैराची भावना अगदीच नव्हती. ज्या कोणत्या बाबतीत व प्रमाणात प्रतिकार करणे आवश्यक आहे असे तिथे श्रमिकांना वाटले त्या प्रत्येक बाबतीत तिथे यश मिळाले.

(यंग, १७-३-१९२७, पृ. ८६)

श्रमिकाने हे लक्षात घ्यायला हवे की श्रम हेसुद्धा भांडवल आहे. श्रमाला चांगल्या रीतीने शिक्षित आणि संघटित करताच त्याला आपल्या शक्तीची जाणीव होईल व मग भांडवल कितीही मोठ्या प्रमाणात असले तरी ते श्रमाचे दमन करू

शकणार नाही. संघटित आणि प्रबुद्ध श्रम आपल्या अटी भांडवलदारांकडून मान्य करून घेईल. आपण दुर्बल असू तर दुस-याचा बदला घेण्याचा निश्चय व्यर्थ आहे. आपण आधी आपली ताकद वाढवली पाहिजे. सशक्त हृदय, प्रबुद्ध मन आणि काम करण्याकरिता तयार असलेले हात सर्व अडचणी आणि अडथळ्यांचा सामना करू शकतात. (हरि, १-३-१९३५, पृ. २३)

## संघर्ष अपरिहार्य नाही

भांडवल आणि श्रम यांच्यात संघर्ष आवश्यक आहे, असे मी समजत नाही. दोन्ही परस्परांवर अवलंबून आहेत. भांडवलदारांनी श्रमिकांवर शासन करणे बंद करण्याची आज गरज आहे. माझ्या मते गिरणीमजूरही गिरणीचे तसेच मालक आहेत जसे भागधारक आहेत; आपल्यासारखेच गिरणीचे मजूरही या गिरणीचे मालक आहेत ही गोष्ट ज्या दिवशी गिरणीमालकांना कळेल, त्याच दिवशी दोघांमधील संघर्ष संपेल. (यंग, ४-८-१९२७, पृ. २४८)

जनता जमीनदारांना आणि नफेखोरांना आपला शत्रू समजत नाही. परंतु या वर्गांनी जनतेवर अन्याय केला आहे ही जाणीव त्यांच्यात निर्माण करावी लागेल. भांडवलदार हे जनतेचे शत्रू आहेत हे मी जनतेला शिकवत नाही तर तुम्हीच तुमचे शत्रू आहात हे मी त्यांना सांगत आहे. (यंग, २६-११-१९३१, पृ. ३६९)

भांडवल आणि श्रम यांच्या हितसंबंधात संघर्ष आहे, परंतु आपल्याला आपले कर्तव्य पार पाडून तो संघर्ष दूर करायचा आहे. ज्याप्रमाणे शुद्ध रक्तात कोणतेच जंतू जगू शकत नाहीत त्याचप्रमाणे श्रमिक वर्ग शुद्ध झाला तर कोणीही त्याचे शोषण करू शकणार नाही.

शोषण आणि शोषण करण्याची इच्छा कायम असतानाही शोषक आणि शोषित यांच्यात सहकार्य असले पाहिजे असे मी कधीच म्हणालो नाही. माझे म्हणणे केवळ एवढेच आहे की भांडवलदार आणि जमीनदार हे स्वाभाविकपणे शोषकच असले पाहिजेत असे नाही. तसेच यांच्यात आणि जनतेत मूलभूत आणि दुराराध्य शत्रुत्व आहे यावरही माझा विश्वास नाही.

वर्गसंघर्षाचा विचार मला पटत नाही. भारतात तर हा मुळीच अपरिहार्य नाही, शिवाय अहिंसेचा संदेश समजून घेतल्यानंतर आपण यापासून अलिप्तही राहू शकतो. जे लोक वर्गसंघर्षाला अपरिहार्य समजतात त्यांना एक तर अहिंसा कळली नाही वा त्यांना तिच्याबद्दल असलेले ज्ञान अगदी वरवरचे आहे. (अबाप, पृ. ३-८-१९३४)

### विधायक (रचनात्मक) उपयोग

श्रमिकांना आपली शक्ती कळली व तिचा त्यांनी बुद्धिमत्तापूर्वक आणि रचनात्मक पद्धतीने उपयोग केला तर ते खरे मालक बनू शकतात व नोकरीस ठेवलेला विश्वस्त गरजेच्या वेळी उपयोगी पडू शकेल, असा मित्र बनू शकेल, असे मी म्हणालो नव्हतो काय? श्रमिक आपल्या श्रमाने भूमीच्या गर्भातून सोन्या-चांदीच्या रूपाने जे भांडवल काढतो त्या भांडवलापेक्षा श्रम अधिक महत्त्वाचे भांडवल आहे हे त्यांना कळेल तेव्हाच ही सुखावह स्थिती येऊ शकेल.
(हरि, २८-९-१९४७, पृ. ३५०)

प्रत्येक अधिकार जर चांगल्या प्रकारे केलेल्या कर्तव्यातून निर्माण झाला असेल, तर त्याला कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. याप्रमाणे मला मजुरी घेण्याचा तेव्हाच अधिकार मिळतो जेव्हा त्याकरिता मी माझे कर्तव्य नीट पार पाडतो. मी जर कामाशिवाय मजुरी घेत असेन तर ते चोरीचे धन होईल. आपले कर्तव्य पूर्ण न करता अधिकार मिळवण्याच्या आंदोलनांमध्ये मी सहभागी होऊ इच्छीत नाही कारण अधिकार कर्तव्यपालनावर अवलंबून असतात व त्यातूनच निर्माण होतात. (हरि, ३०-११-१९४७, पृ. ४४८)

## ४२. संप - वैध आणि अवैध

### मध्यस्थी आधी

मला माहीत आहे की न्याय मिळवण्याकरिता संप करणे हा कामगारांचा जन्मसिद्ध अधिकार आहे, परंतु भांडवलदाराने मध्यस्थी करताच कामगारांनी संप समाप्त केला पाहिजे. (यंग, ५-५-१९२०, पृ. ६)

### संप आणि राजकारण

आजकाल संप ही नित्याची गोष्ट झाली आहे. आजच्या अशांततेचे ते चिन्ह आहे. आज वातावरण सर्व प्रकारच्या अस्पष्ट विचारांनी भरलेले आहे. सर्व लोक एका धूसर आशेने प्रेरित झालेले आहेत आणि त्या आशेने स्पष्ट स्वरूप धारण केले नाही तर समाजात फार मोठे नैराश्य पसरेल. इतर देशांप्रमाणेच भारताचे श्रमिक विश्वही त्या लोकांच्या दयेवर अवलंबून आहे जे लोक त्यांचे सल्लागार आणि मार्गदर्शक बनून बसले आहेत. हे लोक नेहमीच प्रामाणिक नसतात व जे प्रामाणिक असतात ते नेहमीच बुद्धिमत्तापूर्वक काम करतात असेही नाही. श्रमिक आपल्या

परिस्थितीत समाधानी नाहीत आणि त्यांच्या असमाधानाकरिता पुरेशी कारणेही आहेत. त्यांना नेमणा-यांच्या समृद्धीत त्यांचाच हात आहे हे त्यांना शिकवले जात आहे व हे बरोबरही आहे. यामुळे थोडीशी जरी फूस दिली तरी ते आपले अवजार खाली ठेवायला तयार होतात. राजकीय वातावरणही भारताच्या श्रमिकांना प्रभावित करू लागले आहे आणि श्रमिकांच्या अशा नेत्यांची उणीव नाही ज्यांना राजकीय कारणाकरिता संप घडवून आणणे चुकीचे वाटत नाही.

माझ्या मते अशा कारणांकरिता श्रमिकांच्या संपाचा उपयोग करणे ही फार मोठी चूक होईल. अशा संपांनी राजकीय उद्दिष्टांची पूर्ती होऊ शकते हे मी अमान्य करत नाही. परंतु अहिंसेच्या परिघात हे बसत नाही. जोपर्यंत श्रमिक देशाची राजकीय परिस्थिती समजण्याच्या स्थितीत नाहीत आणि सार्वजनिक हिताकरिता काम करण्याकरिता ते तयार होत नाहीत तोपर्यंत त्यांचा राजकीय उपयोग करणे धोक्याचे होऊ शकते ही गोष्ट समजण्याकरिता बुद्धीची विशेष गरज नाही. श्रमिकांमध्ये ही गोष्ट एकाएकी निर्माण होऊ शकेल अशी अपेक्षा करता येणार नाही. त्यांच्या परिस्थितीत सुधारणा होऊन शरीर आणि आत्मा निरोगी राहील असे जीवन तो जोपर्यंत जगू शकत नाहीत तोपर्यंत ही गोष्ट निर्माण होऊ शकत नाही.

यामुळे श्रमिकांनी आपल्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणणे ही श्रमिकांची सर्वात मोठी राजकीय मदत असू शकते, सर्व गोष्टींची त्यांनी चांगली माहिती करून घ्यावी, आपल्या अधिकारांचा आग्रह धरावा आणि ज्या वस्तूंचे ते उत्पादन करतात त्या वस्तूंचा योग्य उपयोग व्हावा म्हणून त्यांनी मालकांवर दडपण आणावे. यामुळे आपली उन्नती स्वतः करून सह-स्वामित्वाचा अधिकार मिळवणे हे श्रमिकांच्या अपेक्षित विकासाचे स्वरूप राहील. सध्या मजुरांची दशा सुधारण्याकरिता संप करण्यात यावे आणि त्यांच्यात राष्ट्रप्रेमाची भावना निर्माण झाली की उत्पादनाच्या किमतीच्या नियमनाकरिताही ते संप करू शकतात.

**संप यशस्वी होण्याकरिता अटी**

यशस्वी संपाकरिता अटी फार साध्या आहेत आणि त्या पूर्ण करण्यात आल्या तर संप कधीही अयशस्वी होऊ शकत नाही. अटी अशा आहेतः

(१) संपाचे कारण न्याय्य असावे.

(२) संपकरी श्रमिकांमध्ये ऐक्य असले पाहिजे.

(३) जे श्रमिक संपामध्ये भाग घेत नसतील त्यांच्या विरोधात कोणत्याही प्रकारची हिंसा होऊ नये.
(४) संप सुरू झाल्यानंतर कामगार संघटनेच्या आर्थिक मदतीशिवायही जगता येण्याच्या परिस्थितीत श्रमिक असले पाहिजे आणि त्यांनी एखाद्या उपयोगी आणि उत्पादक व्यवसायात तात्पुरते कामाला लागले पाहिजे.
(५) संपकरी कर्मचा-यांच्या जागेवर दुसरे कर्मचारी नियुक्त करण्याची सोय असेल तर संप करणे व्यर्थ आहे. अशा परिस्थितीत न्याय्य व्यवहाराच्या निश्चितीचा अथवा अपुरी मजुरी वाढवून घेण्याचा वा अन्य कोणत्याही मागण्या पूर्ण करून घेण्याचा एकच मार्ग आहे व तो म्हणजे कर्मचा-यांनी राजीनामा देण्याचा.
(६) असे अनेक संप यशस्वी झाले आहेत ज्यांच्यात वरील सर्व अटींची पूर्तता झालेली नव्हती. परंतु त्यामुळे केवळ एवढेच सिद्ध होते की त्या प्रकरणी मालक दुबळे असावे व अपराधी भावना त्यांना बोचत असावी. चुकीच्या उदाहरणांची नक्कल केल्यामुळे आपण अनेकदा मोठमोठ्या चुका करत असतो. ज्याबद्दल आपल्याला पूर्ण माहिती नसेल त्यांचे उदाहरण आपण गिरवू नये, हा सर्वात सुरक्षित उपाय आहे. उलट जेथील अटींची आपल्याला माहिती असेल आणि यशस्वितेकरिता आपण ज्यांना आवश्यक समजतो त्यांचेच अनुकरण आपण करावे. (यंग, १६-२-१९२१, पृ. ५२-३)

## राजकीय संप

असा कोणताही संप करण्यात येऊ नये जो गुणदोषांच्या आधारावर न्याय्य ठरवला जाऊ शकत नाही. अन्यायपूर्ण संप कधीही यशस्वी व्हायला नको. अशा संपांबद्दल जनतेने कोणतीही सहानुभूती दाखवू नये.

जनतेचा विश्वास असलेले निष्पक्ष लोक संपाबद्दल आपले मत व्यक्त करत नाहीत, तोपर्यंत कोणत्याही संपाच्या गुणदोषांबद्दल जनता आपला निर्णय घेऊ शकत नाही. ज्या लोकांचे हितसंबंध संपात गुंतलेले असतात ते स्वतः त्यासंबंधी निर्णय देऊ शकत नाहीत. यामुळे संबंधित पक्षांनी एक तर मध्यस्थीकरिता तयार झाले पाहिजे वा न्यायालयीन निर्णयप्रक्रिया अमलात आणली पाहिजे.

नियम म्हणून मध्यस्थी वा न्यायालयीन निर्णय यांवर सहमती झाली तर प्रकरण बहुधा जनतेसमोर येत नाही. परंतु गर्विष्ठ मालकांनी पंचांचा निर्णय फेटाळून लावल्याची अथवा आपल्या शक्तीने उन्मत्त श्रमिकांनी पंचांचे म्हणणे

फेटाळून लावून बळजबरीने आपल्या मागण्या मान्य करवून घेण्याचा प्रयत्न केल्याचीही अनेक प्रकरणे आहेत.

आर्थिक परिस्थिती सुधारण्याकरिता करण्यात आलेल्या संपामागे कोणतेही राजकीय उद्दिष्ट नसावे. उद्दिष्टांच्या या गोंधळाची राजकीय ध्येयाच्या पूर्तीकरिता कधीही मदत होऊ शकत नाही आणि डाक विभागासारख्या लोकोपयोगी सेवेच्या संपाप्रमाणे त्यांच्यामुळे सार्वजनिक जीवन विस्कळीत होत नसले तरीही असे संप श्रमिकांना बहुधा अडचणीत आणतात.

संपामुळे शासनासमोर काही अडचणी उभ्या होऊ शकतात, परंतु शासनाचे काम एकदम थांबत नसते. अशा वेळी श्रीमंत लोक पैसे खर्च करून डाकसेवेची कोणती ना कोणती व्यवस्था करू शकतात. परंतु अशा प्रकारच्या संपामुळे जनतेला एका अशा प्रकारच्या सुविधेपासून वंचित व्हावे लागते जिची त्यांना पिढ्यांपासून सवय झालेली असते. जेव्हा सर्व उपाय योजून झाले असतील व त्यात यश आले नसेल तेव्हाच अशा प्रकारचा संप करता येऊ शकतो.

सहानुभूतीकरिता संप तोपर्यंत करता येऊ शकत नाही जोपर्यंत संपक-यांनी आपल्या आवाक्यातील सर्व उपाय योजून पाहिले आहेत हे निश्चितपणे सिद्ध होत नाही...

वर जे काही सांगण्यात आले आहे त्याचा मथितार्थ हा आहे की राजकीय संपांचा विचार त्यांच्या गुणदोषांवरून केला पाहिजे आणि आर्थिक संपात त्यांची सरमिसळ कधीही करण्यात येऊ नये वा त्यांचा एकमेकांशी संबंध जोडण्यात येऊ नये. अहिंसक कार्यवाहीत राजकीय संपांचेही एक स्थान आहे. ते असेच करता येऊ शकत नाहीत. त्यात गुप्तपणा नसावा आणि गुंडांच्या हातात त्यांचे संचालन कधीही नसावे. राजकीय संपांमधून हिंसा निर्माण होणार नाही याची काळजी घेण्यात आली पाहिजे. (हरि, ११-८-१९४६, पृ. २५६)

**अहिंसक संप**

शांततापूर्ण संप ज्या कारणांकरिता करण्यात येईल त्या कारणांनी पीडित असलेल्या लोकांपर्यंत तो सीमित राहिला पाहिजे. आता कल्पना करा की टिम्बक्टूचे आगपेटीनिर्माते आपल्या परिस्थितीबाबत पूर्णपणे समाधानी आहेत. परंतु कमी वेतन मिळणा-या गिरणी मजुरांकरिता आगपेटी निर्मात्यांनी संप केला तर तो संप हिंसेच्या प्रकारातील संप होईल. याउलट त्यांनी तेथील गिरणी

मालकांशी व्यवहार करणे बंद केले तर त्यांच्यावर हिंसेचा आरोपही येणार नाही व ते प्रभावीपणे गिरणी मजुरांना मदतही करू शकतील.

प्रत्यक्ष त्रास नसलेल्या लोकांवरही आपले काम बंद करण्याची जबाबदारी येऊ शकते. वर दिलेल्या उदाहरणात कल्पना करा की आगपेटीच्या कारखान्याचे मालक आणि गिरणीमालक हे एकत्र आले, तर आगपेटी कारखान्यातील मजुरांनी गिरणी मजुरांना साथ देऊन संप करणे हे त्यांचे कर्तव्य होईल. परंतु हे केवळ एक उदाहरण म्हणून दिले आहे. याचा अर्थ इतकाच की प्रत्येक प्रकरणी गुणदोष पाहून स्वतंत्र निर्णय घ्यावा लागेल. हिंसा एक सूक्ष्म शक्ती आहे. अनेकदा असे होते की तुम्हाला हिंसा जाणवते परंतु तिच्यावर तुम्ही नेमके बोट ठेवू शकत नाही. (यंग, १८-११-१९२६, पृ. ४००)

संप उत्स्फूर्तपणे व्हायला पाहिजे, त्याकरिता कोणत्याही प्रकारे हातचलाखी करण्यात येऊ नये. कोणत्याही प्रकारच्या बळजबरीशिवाय तो सुरू करण्यात आला तर त्यात गुंडागर्दी वा लूटमार यांची भीती राहत नाही. अशा संपात संपक-यांमध्ये पूर्ण सहकार्याचे वातावरण टिकून राहते. संप शांततापूर्ण असला पाहिजे आणि त्यात शक्तिप्रदर्शनाला स्थान नसावे.

संपाच्या काळात आपले पोट भरण्याकरिता संप करणा-यांनी व्यक्तिशः वा परस्परांच्या सहकार्याने कोणत्या तरी कामकाजाला सुरुवात केली पाहिजे. हे काम कसे असावे याचा आधीच विचार करण्यात आलेला असावा. अशा प्रकारच्या शांततापूर्ण, प्रभावी आणि मजबूत संपात उपद्रव वा लूटमार यांची मुळीच शक्यता नसते हे सांगण्याची गरज नाही. असे संप करणा-यांची मला माहिती आहे. मी कोणतेही आदर्शवादी चित्रण करत नाही. (हरि, २-६-१९४६, पृ. १५८)

सार्वत्रिक संप आणि सत्ता बळकावण्याचा प्रयत्न हे जरी अहिंसक पद्धतीने करण्यात आले तरी मी त्यांना कोणत्याही परिस्थितीत मदत करू शकत नाही. (हरि, २८-७-१९४६, पृ. २३७)

### भांडवलशाही आणि संप

श्रमिकांच्या संपाच्या दरम्यान भांडवलदारांनी कसे वर्तन करावे? हा प्रश्न अजून अनिर्णित आहे आणि आज त्याचे फार महत्त्व आहे. एक पद्धत दडपशाहीची आहे. तिला अमेरिकेचे नाव अथवा टोपण नाव देण्यात आले आहे. यात संघटित गुंडांची मदत घेऊन संप करणा-यांना दाबून टाकण्यात येत असते. या पद्धतीला

कोणताही माणूस चुकीची आणि विनाशकारक म्हणेल.

योग्य आणि सन्मानजनक असा दुसरा मार्ग आहे. या मार्गानुसार प्रत्येक संपाचा, त्याच्या गुणदोषांचा विचार करून श्रमिकांच्या न्याय्य मागण्या मान्य करण्यात येतात. 'न्याय्य'चा अर्थ भांडवलदारांना जे न्याय्य वाटते ते न्याय्य नसून स्वतः श्रमिकांना आणि सुजाण जनतेला जे न्याय्य वाटते ते न्याय्य असा आहे....

काळानुसार श्रमिक जगही नित्य नूतन मागण्या करत आहे व त्या मान्य करून घेण्याकरिता हिंसेची मदत घेण्यातही त्यांना कोणताच संकोच वाटत नाही. बळजबरीचे नवनवीन मार्ग शोधून काढण्यात येत आहेत. मालकांची संपत्ती नष्ट करणे, यंत्रसामुग्री खराब करणे, संपात भाग घेण्याची इच्छा नसलेल्या वृद्धांना त्रास देणे, खब-यांना आपल्या संघटनेमधून बाहेर काढणे इत्यादी कामे करताना श्रमिकांना कोणताही संकोच वाटत नाही. अशा परिस्थितीत मालकांनी कसे वागावे?

....जी संपत्ती आपण उभारली आहे अशा भ्रमात मालक आहेत ती श्रमिकांची आहे हे त्यांनी स्वेच्छेने मान्य करावे माझा सल्ला आहे. आपल्या कर्तव्यात त्यांनी श्रमिकांना चांगले शिक्षण देण्याचाही समावेश करावा. यामुळे श्रमिकांची सुप्त बुद्धी जागृत होईल. त्याचबरोबर यामुळे श्रमिकांमध्ये जी शक्ती निर्माण होईल तिचे स्वागत आणि संवर्धन मालक वर्गाने केले पाहिजे.

हे शुभ कार्य मालक एका दिवसात करू शकत नाहीत. मध्यंतरीच्या काळात संपक-यांनी कारखान्याचे जे नुकसान केले असेल त्याचे काय करावे? अशा मालकांना माझा निःसंकोच सल्ला आहे की त्यांनी आपल्या कारखान्याचे पूर्ण नियंत्रण संपक-याकडे द्यावे. अखेरीस कारखाना जेवढा मालकांचा आहे तेवढाच संप करणा-यांचाही आहे. मालक वर्गाने आपली जागा चिडून नाही तर तसे करणे उचित आहे म्हणून रिकामी करावी. आपल्या सद्भावनेचा श्रमिकांना विश्वास वाटावा, म्हणून आपल्या तंत्रज्ञांची व कुशल कर्मचा-यांची सेवाही त्यांनी श्रमिकांना उपलब्ध करून द्यावी.

अंतिमतः आपले कोणतेच नुकसान झाले नाही असे मालकांना आढळून येईल. वास्तवात त्यांच्या या योग्य निर्णयामुळे विरोधक निष्प्रभ होतील व त्याच्या स्वतःच्या माणसांच्या शुभेच्छा त्यांना मिळतील. यामुळे त्यांच्या भांडवलाचाही योग्य उपयोग होईल. हे वर्तन परोपकारी कृत्य आहे असे मी समजत नाही. भांडवलदारांनी आपल्या साधनसामुग्रीचा केलेला तो योग्य उपयोग असेल व

यामुळे श्रमिक आणि भांडवलदार हे कारखान्याचे सन्माननीय भागीदार होतील. (हरि, ३१-३-१९४६, पृ. ६०)

## सहानुभूतीप्रीत्यर्थ करण्यात येणारे संप

आवश्यकता निर्माण होण्यापूर्वीच सहानुभूतीप्रीत्यर्थ करण्यात आलेल्या संपामुळे.... आपल्या ध्येयाची कल्पनातीत हानी होईल. सरकारला अडचणीत आणून त्यापासून काही लाभ घेण्याचा प्रयत्न अहिंसात्मक कार्यवाहीत बसत नसल्यामुळे आपण तो सोडून दिला पाहिजे. जर आपली कार्यवाही शुद्ध असेल आणि सरकार अशुद्ध असेल व सरकार शुद्ध होण्याचा प्रयत्न करणार नसेल तर आपल्या कार्यवाहीची शुद्धता सरकारला अडचणीत टाकेल. अशा रीतीने शुद्ध आणि पवित्र आंदोलनामुळे दोन्ही पक्षांचा लाभ होतो. उलटपक्षी केवळ विध्वंसक आंदोलनामुळे विध्वंस करणारा अशुद्ध व अपवित्र होतो व तो त्याच खालच्या पातळीवर जातो ज्या पातळीवरील विरोधकाचा त्याला विध्वंस करायचा असतो.

एवढेच नाही तर सहानुभूतीप्रीत्यर्थ आपण केलेले संपही आत्मशुद्धी करणारे म्हणजे असहकार करणारे असले पाहिजे. त्यामुळे वाईटपणा दूर करण्याकरिता जेव्हा आपण संप घोषित करतो तेव्हा खरे म्हणजे आपण वाईटपणात भाग घेणे बंद करत असतो व वाईटपणा करणा-याला त्याच्याच संसाधनांवर विसंबून राहावे लागते. वेगळ्या शब्दात सांगायचे तर यामुळे वाईटपणे वागणा-याला आपल्या वाईटपणातील त्रुटी दिसून येण्याला मदत होईल. असे संप तेव्हाच यशस्वी होतील जेव्हा परत कधीही कामावर न परतण्याचा संप करणा-याचा दृढ निर्धार असेल....

जर श्रमिकांची असीमित काळापर्यंत तग धरण्याची तयारी नसेल आणि पर्यायी श्रमिक नेमता येण्याची शक्यता असेल तर न्याय्य मागण्या असूनही संप अयशस्वी होऊ शकतो. त्यामुळे आपली जागा दुसरा कामगार सहजपणे घेऊ शकेल अशी भीती असेल तर सुज्ञ कामगार पगार वाढीकरिता वा इतर सुविधांकरिता संपावर जाणार नाही. परंतु एखाद्या दानवीर वा देशभक्त माणसाला जरी माहीत असेल की मागणीपेक्षा पुरवठा अधिक आहे तरी आपल्या शेजा-याच्या व्यथा जाणवल्यामुळे त्याला त्याच्या खांद्याला खांदा लावून उभे राहण्याची इच्छा होईल व कर्मचा-यांच्या मागणीपेक्षा पुरवठा अधिक आहे हे माहीत असूनही तो संपावर जाईल. ज्या प्रकारच्या नागरिक संपाचे मी उदाहरण दिले आहे त्यात धाकदपटशा, आग लावणे वा अन्य हिंसात्मक कार्यक्रम यांना

कोणतेही स्थान नाही हे सांगायला नकोच. (यंग, २२-९-१९२१, पृ. २९८)

....तुम्ही विचारू शकाल की संपफोड्यांचे काय करावे? दुर्दैवाने संपफोडे राहणारच आहेत. परंतु मी तुम्हाला विनंती करीन की तुम्ही त्यांच्याशी भांडू नका, त्यांना समजावून सांगा, त्यांना सांगा की त्यांची भूमिका संकुचितपणाची आहे आणि तुमच्या अंतःकरणात सर्व मजूर वर्गाच्या कल्याणाची भावना आहे. शक्यता आहे की ते तुमचे ऐकणार नाहीत. अशा अवस्थेत तुम्हाला त्यांना सहन करावे लागेल, तुम्ही त्यांच्याशी भांडू शकणार नाही. (हरि, ७-११-१९३६, पृ. ३११)

संपांच्या वाढत्या आजाराचे मूळ कारण हे आहे की इतर देशांप्रमाणेच आपल्या येथेही जीवनाला जो धर्माचा आधार होता तो तुटला आहे आणि एका इंग्रज लेखकाच्या शब्दात त्याची जागा एका अर्धवट संबंधाने घेतली आहे. हा संबंध अतिशय धोक्याचा आहे. परंतु सर्व व्यक्तींचे जीवन धर्माधारित आहे अशी कल्पना करणे कठीण असल्यामुळे धर्माचा आधार असल्यानंतरही संप होणारच आहेत. त्यामुळे एकीकडे जिथे शोषणाचे प्रयत्न सुरू राहणार आहेत तिथे संपही होत राहणार आहेत. परंतु तेव्हा हे संप पूर्णपणे अहिंसक असतील.

अहिंसक संपांमुळे कधीही कोणाचेही नुकसान होऊ शकत नाही. बहुधा अशाच संपासमोर जनरल स्मट्सला माघार घ्यावी लागली होती. जनरल स्मट्स म्हणाले होते, ‘जर तुम्ही एखाद्या इंग्रजाला इजा केली असती तर मी तुम्हाला गोळी मारली असती व तुमच्या सर्व देशबांधवांना या देशातून बाहेर काढून टाकले असते. जी परिस्थिती होती त्यात मी तुम्हाला जेलमध्ये टाकले व तुम्हाला आणि तुमच्या सहका-यांना नमवण्याचा शक्य तेवढा प्रयत्न केला. परंतु तुम्ही त्याचा प्रतिकारच करणार नाही तर मी तुम्हाला किती काळ तशा परिस्थितीत ठेवू शकणार होतो?’ यामुळेच त्यांना ‘कुलींचे’ प्रतिनिधित्व करणा-या एका ‘कुलीशी’ तडजोड करावी लागली - लक्षात ठेवा की त्या वेळी सर्व भारतीयांना ‘कुली’ म्हणून संबोधण्यात येत असे. (हरि, २२-९-१९४६, पृ. ३२१)

# ४३. शेतात राबणारे शेतकरी

## शेतक-याची मान्यता

भारताला जर शांततापूर्ण पद्धतीने खरी प्रगती करायची असेल तर आपल्या आत्म्यासारखाच शेतक-यांचाही आत्मा आहे आणि आपल्या धनदौलतीमुळे शेतक-यांपेक्षा आपण कोणत्याही प्रकारे श्रेष्ठ नाही हे श्रीमंत वर्गाला मान्य करावे लागेल. जपानी श्रीमंतांप्रमाणे त्यांनीही मान्य केले पाहिजे की ते विश्वस्त आहेत व जनकल्याणाकरिता त्यांची संपत्ती आहे. एकदा असा विचार मनात रुजला की, आपल्या संपत्तीतील ते तेवढाच अंश उपयोगात आणतील जेवढा अंश त्यांच्या श्रमाचे योग्य मूल्य असेल.

श्रीमंत लोकांचा अनावश्यक डामडौल आणि उधळपट्टी व शेतक-यांची घाणेरडी वस्ती आणि घोर दारिद्र्य यांच्यात सध्या कोणतेही प्रमाण राहिलेले नाही....

भांडवलदार जर काळाची पावले ओळखतील आणि आपली संपत्ती ईश्वरदत्त अधिकार आहे असे मानणे बंद करतील तर बघता-बघता देशातील सात लाख शेणाच्या उकिरड्यांसारख्या गावांना शांतता, स्वास्थ्य आणि सुखसोयींनी युक्त अशा वस्त्यांमध्ये परिवर्तित करता येईल.

माझा विश्वास आहे की आमचे भांडवलदार जर जपानमधील समुराईंचे अनुकरण करतील तर त्यांची काहीही हानी होणार नाही, उलट फायदाच होईल. आपल्यासमोर दोनच पर्याय आहेत - भांडवलदारांनी आपला डामडौल आणि अनावश्यक उधळपट्टी बंद करून त्या संपत्तीचा उपयोग सर्व जनतेच्या वास्तविक हिताकरिता करणे अथवा जागृत परंतु अडाणी लाखो-करोडो उपाशीतापाशी लोकांनी संपूर्ण देशात निर्माण केलेल्या अव्यवस्थेचा, जिचा सामना सरकारचे सशस्त्र दलही करू शकणार नाही, सामना करणे. भांडवलदार वेळीच जागे झाले नाहीत तर या दुस-या पर्यायाला भांडवलदारांना तोंड द्यावे लागेल. मला आशा आहे की भारतावर असा प्रसंग येणार नाही. (यंग, ५-१२-१९२९, पृ. ३९६)

खाजगी मालकांची संपत्ती हिरावून घ्यावी हे माझे स्वप्न नसून तिच्या उपभोगावर नियंत्रण आणणे आणि दारिद्र्य व त्यामुळे निर्माण होणा-या असंतोषामुळे श्रीमंत व गरिबांच्या जीवनात आणि वातावरणात आज जी कुरूप

विषमता आहे ती दूर व्हावी एवढेच माझे स्वप्न आहे. आपण जमीनदाराचे भागीदार आहोत, त्यांच्या इच्छेप्रमाणे कष्ट करणारे व प्रसंगी लहानसहान भेटवस्तू देणारे गुलाम नाही ही जाणीव गरिबांना झाली पाहिजे. (यंग, २१-११-१९२९, पृ. ३८४)

जमीनदार आणि भांडवलदार यांचा उपयोग जनतेची सेवा करण्याकरिता मी करू इच्छितो. भांडवलदारांच्या हिताकरिता आम्हाला जनतेचा बळी द्यायचा नाही. आपण विश्वास ठेवला पाहिजे की जनतेच्या सेवेकरिता आपल्या लाभाचा त्याग करण्याएवढे सामर्थ्य त्यांच्यात येईल. उच्च विचारांच्या बाबतीत ते संवेदनशून्य आहेत असे काही नाही. माझा नेहमीचा अनुभव आहे की प्रेमाने सांगितलेल्या गोष्टीचा त्यांच्यावर सरळ प्रभाव पडत असतो. आपण जर त्यांचा विश्वास जिंकू शकलो व त्यांना स्वाभाविक मनःस्थितीत आणू शकलो तर जनतेबरोबर आपल्या संपत्तीच्या भागीदारीच्या विरोधात त्यांचा कल नसल्याचे आपल्याला आढळून येईल. (अबाप, ३-८-१९३४)

## जमीनदारांचे हृदयपरिवर्तन

जमीनदारांचा नाश करण्याची माझी इच्छा नाही, परंतु जमीनदार अपरिहार्य आहेत असेही माझे मत नाही.... मला आशा आहे की अहिंसक मार्गाने जमीनदार आणि भांडवलदार यांचे हृदयपरिवर्तन करता येऊ शकते. यामुळेच वर्गसंघर्ष अपरिहार्य आहे असे माझे मत नाही. किमान प्रतिकाराच्या मार्गाने उद्दिष्टप्राप्ती हे अहिंसेचे आवश्यक तत्त्व आहे.

ज्या दिवशी शेतक-यांना आपल्या शक्तीचा परिचय होईल त्या दिवशी जमीनदारीचा वाईटपणाही नाहीसा होईल. जमीन कसणारा जर असे म्हणेल की मला स्वतःला आणि माझ्या कुटुंबाला चांगल्या पद्धतीचे कपडेलत्ते, खाणे पिणे आणि शिक्षण यांच्याकरिता जोपर्यंत चांगले पैसे मिळत नाहीत तोपर्यंत मी शेतीवर काम करणार नाही. असे झाले तर बिचारा जमीनदार काय करील? वास्तवात जमिनीची लागवड करणाराच पिकाचा मालक असतो. हे लोक जर समंजसपणाने एक झाले तर ते अदम्य शक्तीचे मालक बनू शकतात. अशा प्रकारे वर्गसंघर्ष आवश्यक आहे असे मी समजत नाही. मला जर तो आवश्यक वाटला असता तर त्याची शिकवण द्यायला व त्याचा प्रचार करायला मी संकोच केला नसता. (हरि, ५-१२-१९३६, पृ. ३३८-९)

मला हिटलरच्या शक्तीची नाही तर स्वतंत्र शेतक-याच्या शक्तीची अभिलाषा

आहे. इतक्या वर्षांपासून मी कृषकांशी तादात्म्य निर्माण करण्याचा प्रयत्न करतो आहे, परंतु अजूनपर्यंत तरी मला त्यात यश आलेले नाही. आज माझ्यात आणि त्यांच्यात एवढेच अंतर आहे की ते स्वेच्छेने नाही तर परिस्थितीच्या दडपणामुळे शेतकरी आणि मजूर आहेत, उलट मी स्वेच्छेने शेतकरी आणि मजूर बनू इच्छितो. मी त्यांना जेव्हा स्वेच्छापूर्वक शेतकरी आणि मजूर बनवू शकेन तेव्हा त्या बेड्या तोडून फेकण्याकरिता मी त्यांना मदत करू शकेन ज्यांच्यात ते आज बंदिस्त आहेत व ज्यांच्यामुळे आज त्यांना आपल्या मालकाचा हुकूम बजावणे भाग पडते. (हरि, ७-६-१९४२, पृ. १८४)

## शेतकरी

शेतकरी वा किसान, मग तो भूमिहीन श्रमिक असो वा कृषक असो पहिल्या क्रमांकावर येतो. तो ख-या अर्थाने धरतीपुत्र आहे - खरोखरी भूमी त्याची आहे व त्याची व्हायला पाहिजे, इतरत्र राहणा-या भूस्वामीची वा जमीनदाराची नाही. परंतु अहिंसेच्या नियमानुसार श्रमिक बळजबरीने जमीनदारांना त्यांच्या जमिनीवरून हाकलून देऊ शकत नाही. जमीनदाराला त्याचे शोषण करणे अशक्य होईल अशा प्रकारे त्याला काम करावे लागेल.

शेतक-यांमध्ये घनिष्ट सहकार्य असणे अतिशय आवश्यक आहे. यामुळे जिथे सध्या विशेष संघटना वा समित्या अस्तित्वात नसतील तिथे त्या तयार करण्यात याव्या आणि जिथे त्या अस्तित्वात आहेत तिथे त्यांच्यात आवश्यक त्या सुधारणा केल्या पाहिजे.

शेतकरी सामान्यपणे अशिक्षित आहेत. प्रौढ आणि शाळेत जाण्याचे वय असलेल्या सर्व लोकांना शिकवले पाहिजे. ही गोष्ट स्त्री-पुरुष या दोघांनाही लागू होते. भूमिहीन श्रमिकांना चांगले जीवन जगता येईल इतकी मजुरी दिली जावी, म्हणजे त्यांच्या स्वास्थ्यविषयक गरजा पूर्ण होतील असा संतुलित आहार त्यांना मिळावा, राहण्याकरिता घर मिळावे व त्यांच्या अंगावर नीट कपडे असावे. (बांक्रा, २८-१०-१९४४)

## कायदा नाही, अहिंसा

स्वराज्य जर सर्व लोकांच्या प्रयत्नाने मिळवायचे असेल - आणि अहिंसेनुसार तसेच झाले पाहिजे - तर शेतक-यांचा स्वाभिमान जागृत झाला पाहिजे आणि त्यांचा आवाज सर्वोपरी असला पाहिजे. परंतु स्वराज्य अशा प्रकारे मिळणार

नसेल व त्याकरिता सीमित मताधिकाराच्या आधारावर जनता आणि सरकार यांच्यात काही कामचलाऊ तडजोड होत असेल तर शेतक-यांच्या हिताची दक्षतापूर्वक काळजी घ्यावी लागेल. विधानसभा जर शेतक-यांच्या हिताचे रक्षण करण्यात अपयशी ठरल्या तर शेतक-याजवळ सविनय कायदेभंग आणि असहकार हे रामबाण उपाय कायम असतील.

परंतु.... अखेरीस कागदी कायदे, साहसपूर्ण शब्द आणि वादळी भाषणे यांनी काहीही होणार नाही. उलट अहिंसक संघटना, अनुशासन आणि त्याग यांची शक्तीच लोकांना अन्याय वा दडपशाही यांच्यापासून वाचवू शकते.

मला या बाबतीत काहीही संशय नाही की जर आपण लोकशाहीवादी स्वराज्य स्थापन करू शकलो - अहिंसेद्वारे स्वातंत्र्य मिळाले तर असेच व्हायला पाहिजे - तर शेतक-यांना राजकीय शक्तीसह सर्व प्रकारची शक्ती प्राप्त होईल. (बांक्रा, १२-१-१९४५)

काही वर्षांपूर्वी मी एक कविता वाचली होती. तिच्यात शेतक-याला जगाचा जनक म्हणून दाखवण्यात आले होते. ईश्वर जर विश्वाचे पालन करत असेल तर शेतकरी ईश्वराचा हात आहे. शेतक-याच्या ऋणातून मुक्त होण्याकरिता काय करायचा आपला विचार आहे? आजपर्यंत तरी आपण त्याच्या घामाच्या कमाईवरच जगत आलो आहोत. (हरि, २५-८-१९४६, पृ. २८१)

## ४४. श्रमिक वर्गासमोर उपलब्ध मार्ग

आज भारतासमोर दोन मार्ग मोकळे आहेत. पहिला मार्ग पश्चिमेचा म्हणजे ‘बळी तो कान पिळी’ या तत्त्वाचा आहे आणि दुसरा मार्ग आहे ‘सत्यमेव जयते’चा. या तत्त्वानुसार सत्य कधीही अनिष्ट असू शकत नाही आणि यामुळे सबळाला आणि दुर्बलाला न्याय मिळवण्याचा सारखाच अधिकार मिळेल.

पर्याय निवडण्याची सुरुवात श्रमिक वर्गापासून सुरू होते. श्रमिकांना आपल्या मजुरीच्या वाढीकरिता हिंसेचा आधार घेता येणे शक्य असेल तर तो घेतला पाहिजे काय? त्यांच्या मागण्या कितीही न्याय्य असल्या तरीही त्या मान्य करवून घेण्याकरिता ते हिंसेची मदत कधीही घेऊ शकत नाहीत.

अधिकारप्राप्तीकरिता हिंसेचा मार्ग सोपा वाटू शकतो परंतु कालांतराने तो अतिशय काटेरी असल्याचे सिद्ध होईल. जे तलवारीच्या आधाराने जगतात ते तलवारीच्या वाराने मरतही असतात. पोहणा-यांचा मृत्यू बहुधा बुडाल्यामुळेच

होत असतो. युरोपला पाहा. तिथे एकही व्यक्ती सुखी दिसत नाही, कारण तिथे एकही व्यक्ती समाधानी नाही. श्रमिकांचा भांडवलदारांवर विश्वास नाही आणि भांडवलदारांचा श्रमिकांवर. दोघांमध्येही एक प्रकारचा जोम आणि शक्ती आहे. परंतु ती तर सांडांमध्येही असते. ते भांडूनभांडून मरतात.

प्रत्येक गती प्रगती नसते. युरोपचे लोक प्रगती करताहेत असा विश्वास बाळगण्यासारखे कोणतेही कारण नाही. त्यांची संपत्ती त्यांच्या नैतिक वा आध्यात्मिक गुणांची निदर्शक नाही. दुर्योधन अमाप धनाचा स्वामी होता. परंतु तसे असतानाही तो सुदामा आणि विदुर यांच्यापेक्षा दरिद्री होता. आज जग विदुर आणि सुदामा यांची पूजा करते आणि त्याच वेळी दुर्योधनाचे नाव सर्वात त्याज्य आणि दुर्गुणांचे प्रतीक झाले आहे....

**श्रमशक्ती**

भांडवल आणि श्रमाच्या संघर्षात असे म्हणतात की सामान्यपणे चूक भांडवलदारांचीच असते. परंतु श्रमिक वर्गाला जेव्हा आपल्या शक्तीची पुरेशी जाणीव होते तेव्हा तो भांडवलदारांपेक्षाही क्रूरपणावर उतरतो. श्रमिकांचा गिरणीमालकांसारखा बुद्धीचा विकास झाला तर गिरणीमालकांना श्रमिकांच्या अटींवरच काम करावे लागेल. परंतु हे स्पष्ट आहे की श्रमिकांच्या बुद्धीचा विकास त्यांच्याएवढा कधीही होणार नाही. जर झाला तर ते श्रमिक न राहता स्वतः स्वामी बनतील. भांडवलदार केवळ पैशाच्या बळावरच झगडत नसतात, त्यांच्याजवळ बुद्धी आणि चातुर्य यांचीही ताकद असते....

या दोन पक्षांमध्ये अजून एक पक्ष निर्माण झाला आहे. तो श्रमिकांचा मित्र झाला आहे. अशा पक्षाची श्रमिकाला आवश्यकताही होती. परंतु श्रमिक त्या पक्षाशी त्याच प्रमाणात मैत्री करू शकतील ज्या प्रमाणात ते निस्वार्थ भावाने श्रमिकांशी मैत्री निभवतील.

आता अशी वेळ आली आहे कि श्रमिकांना प्यादे बनवून त्यांचा विविध प्रकारे उपयोग करून घेतला जाऊ शकेल. राजकारणात भाग घेणा-यांनी यावर विचार करावा ही काळाची मागणी आहे. ते काय निवडतील? आपले हित वा श्रमिकांची आणि राष्ट्राची सेवा? श्रमिक वर्गाला मित्रांची फार गरज आहे. मित्रांशिवाय श्रमिक पुढे जाऊ शकत नाहीत. श्रमिकांना कसे नेतृत्व मिळते यावरच त्यांची दशा अवलंबून राहील.

संप, कामबंदी ही निःसंशय फार मोठी प्रभावी शस्त्रे आहेत, परंतु त्यांचा दुरुपयोग करणे कठीण नाही. श्रमिकांनी आपल्या मजबूत संघटना बनवल्या पाहिजेत आणि त्यांच्या संमतीशिवाय संप करण्यात येऊ नये.

गिरणी मालकांशी चर्चा केल्याशिवाय संपाचा धोका कधीही पत्करू नये. गिरणी मालक मध्यस्थीकरिता म्हणत असेल तर पंचायतीचा निर्णय मान्य केला पाहिजे आणि एकदा पंचांची नियुक्ती झाली की त्यांनी दिलेला निर्णय पसंत असो वा नसो तो दोन्ही पक्षांनी अनिवार्यपणे मान्य केला पाहिजे.

(यंग, ११-२-१९२०, पृ. ७-८)

# ९. सर्वोदय

## ४५. सर्वोदयाचा दिव्य संदेश

**माणसांमधील ऐक्य**

एका माणसाचा आध्यात्मिक लाभ व्हावा आणि त्याच्या आजूबाजूच्या लोकांनी दुःख भोगावे, हे मला मान्य नाही. माझा अद्वैतावर विश्वास आहे. मानवमात्राच्याच नाही तर संपूर्ण प्राणिमात्राच्या अनिवार्य ऐक्यावर माझा विश्वास आहे. यामुळेच माझा विश्वास आहे की जर एका माणसाचा आध्यात्मिक लाभ झाला तर त्याच्यासोबत सगळ्या जगाचा लाभ होतो आणि एका माणसाचे पतन झाले तर तेवढ्या मर्यादेपर्यंत सर्व जगाचे आध्यात्मिक पतन होते.
(यंग, ४-१२-१९२४, पृ. ३९८)

आध्यात्मिक नियमाच्या कार्याचे स्वतःचे असे काही वेगळे क्षेत्र आहे असे मला वाटत नाही. उलटपक्षी त्याची स्वतःची अभिव्यक्ती दैनंदिन जीवनाच्या व्यवहारातून होत असते. अशा प्रकारे आर्थिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्राला ते नियम प्रभावित करत असतात. (यंग, ३-९-१९२५, पृ. ३०४)

आपण जर ईश्वराच्या सेवेत रमलो वा त्याच्याशी एकाकार झालो तर आमची कार्यक्षमताही तशीच कायम राहील. समुद्रापासून वेगळ्या झालेल्या थेंबाला क्षणिक विश्रांती मिळते परंतु जो थेंब समुद्राबरोबर असतो त्याला विश्रांती कुठे? अशीच गोष्ट आमच्याबद्दलही आहे.

ज्या क्षणी ईश्वररूपी समुद्राशी आपण एकाकार होतो त्या क्षणी आपण विश्रांतीच्या स्थितीच्या पलीकडे जातो. वस्तुतः आम्हाला विश्रांतीची गरजच राहत नाही. आपण झोपेतही कार्यरत राहतो. आपण जेव्हा झोपतो तेव्हाही आमच्या मनात ईश्वराचे ध्यान कायम असते. ही अस्वस्थताच खरी विश्रांती आहे. हा अनंत क्षोभच अनिर्वचनीय शांततेची किल्ली आहे. पूर्ण समर्पणाच्या या अनिर्वचनीय स्थितीचे वर्णन करणे कठीण आहे, परंतु ती मानवी अनुभूतीच्या पलीकडील गोष्ट नाही. अनेक निष्ठावान लोकांनी ही गोष्ट मिळवली आहे आणि आम्हीही ती

मिळवू शकतो. (फायम, पृ. ४७)

**गरिबांबरोबर तादात्म्य**

गरिबांना जसे श्रम करावे लागतात, तसे श्रम आपण दररोज एक तास केले, तरी त्यांच्याशी आणि त्या माध्यमातून संपूर्ण मानवजातीशी आपण एकरूप होऊ शकू. यापेक्षा अधिक उदात्त राष्ट्रप्रेमाची कल्पना इतर कोणत्याही बाबतीत मी करू शकत नाही. जे काम गरीब करत आहेत तेच काम आपण स्वतः करावे यापेक्षा ईश्वराच्या अधिक चांगल्या आराधनेची कल्पना मी करू शकत नाही. (यंग, २०-१०-१९२१, पृ. ३२९)

आम्हाला खरे स्वातंत्र्य, जीवनात मिळवण्यासारखी जी एकमेव गोष्ट आहे, ती देण्याकरिता आत्मसमर्पणापेक्षा अजून कोणतीही कमी किंमत स्वीकारायला ईश्वर तयार नाही. एकदा आपण त्याला आपले सर्वस्व अर्पण केले की आपण स्वतः ईश्वराच्या सृष्टीच्या सेवेत उभे असल्याचे माणसाला आढळते.
(यंग, २०-१२-१९२८, पृ. ४२०)

आपल्या सर्व कामकाजाचे केंद्र सत्य असले पाहिजे. सत्यच आमच्या जीवनाचा श्वास असला पाहिजे. जीवनयात्रेच्या या मुक्कामावर एकदा आपण पोहोचलो की योग्य प्रकारे जगण्याचे सर्व नियम विनासायास येतील व अंतःप्रेरणेने आपण त्यांचे पालन करू. परंतु सत्याशिवाय जीवनात कोणत्याही तत्त्वांचे वा नियमांचे पालन शक्य नाही. (फ्रायम, पृ. २)

**ईश्वरी कृपेवरील श्रद्धा**

सत्यशोधक अर्थात प्रेमाच्या नियमाचे पालन करणारी व्यक्ती उद्यासाठी काहीही वाचवून ठेवू शकत नाही. ईश्वर उद्याकरिता कोणतीही व्यवस्था करत नसतो. तो दररोजच्या गरजेएवढ्याच गोष्टींची निर्मिती करत असतो, त्यापेक्षा अधिक नाही. यामुळे जर आपला त्याच्या कृपेवर विश्वास असेल तर तो आम्हाला आमच्या गरजेप्रमाणे रोजची भाकरी नक्कीच देईल याबद्दल आम्हाला खात्री वाटली पाहिजे. (यंग, ४-९-१९३०, पृ. १)

**मानवसेवा**

माणसाचे अंतिम ध्येय ईश्वरप्राप्ती आहे आणि त्याची सगळी कामे - सामाजिक, राजकीय, आणि धार्मिक - याच ध्येयाच्या दिशेने प्रेरित होऊन झाली पाहिजे.

ईश्वरप्राप्तीचा हाच मार्ग असल्यामुळे व त्याचा शोध त्याच्याच सृष्टीत घेऊन त्याच्याशी आपल्याला एकाकार व्हायचे असल्यामुळे सर्व माणसांची प्रत्यक्ष सेवा या प्रयत्नाचा अनिवार्य भाग आहे. मानव समाजाची सेवा करूनच ही गोष्ट करता येऊ शकते. मी सृष्टीचाच एक भाग आहे आणि उर्वरित मानवतेच्या पलीकडे मी ईश्वराला शोधू शकत नाही.

माझ्या देशातील लोक माझे जवळचे शेजारी आहेत. ते इतके लाचार, साधनहीन आणि शिथिल झाले आहेत की मी माझे लक्ष त्यांच्या सेवेवरच केंद्रित केले पाहिजे. जर मला स्वतःला विश्वास असता की ईश्वरप्राप्ती हिमालयाच्या गुंफेत जाऊन होऊ शकते तर मी ताबडतोब तिथे जाण्याकरिता निघालो असतो. परंतु मला माहीत आहे की मानवतेपासून दूर ईश्वराचे दर्शन होऊ शकत नाही. (हरि, २९-८-१९३६, पृ. २२६)

माझ्या ईश्वराची अनेक रूपे आहेत. कधी तो मला चरख्याच्या रूपात दिसतो तर कधी सांप्रदायिक ऐक्यात आणि कधी अस्पृश्यता निवारणात. अशा प्रकारे जिथे जिथे माझा अंतरात्मा मला नेतो तिथे तिथे मी ईश्वराशी संपर्क करतो. (हरि, ८-५-१९३७, पृ. ९९)

## चरखा : एक साधन

जी व्यक्ती गरिबांकरता चरख्यावर कताई करते व त्यांनाही असेच करण्याकरिता प्रेरित करते ती ईश्वराची अनन्य सेवा करते. 'भगवद्गीतेत' भगवान सांगतात, 'जी व्यक्ती मला भक्तिभावाने एक फळ, एक फूल वा एक पान समर्पित करते ती माझी सेवक असते.'

ईश्वराचा वास हीनदीन व नावगाव नसलेल्या लोकांमध्ये आहे. त्यामुळे स्वाभाविकपणेच अशा लोकांकरिता चरख्यावर कताई करणे ही सर्वात मोठी प्रार्थना, सर्वात मोठी आराधना आणि सर्वात मोठा त्याग आहे.
(यंग, २४-९-१९२५, पृ. ३३१-२)

जगावर युद्धाचे जे परिणाम झाले आहेत त्यामुळे ते त्रस्त आहे. ज्या प्रकारे चरखा आज भारताला सुखशांती देतो आहे त्याप्रमाणे कदाचित उद्या तो सर्व जगालाही देईल कारण तो केवळ अधिकतम लोकांचे अधिकतम हित करत नसून सर्व लोकांचे अधिकतम हित करतो. (यंग, १०-२-१९२७, पृ. ४३-४)

'अनटू धिस लास्ट' या वाक्याच्या संपूर्ण अर्थाशी मी सहमत आहे. या

पुस्तकाने माझ्या जीवनाची दिशा बदलली आहे. जगाकडून आम्हाला जे काही हवे असेल ते आम्ही आधी जगातील सर्वात तळातील लोकांना उपलब्ध करून दिले पाहिजे. सर्व व्यक्तींना समान संधी मिळाली पाहिजे. संधी मिळाली तर प्रत्येक व्यक्तीच्या समान आध्यात्मिक विकासाची शक्यता आहे. चरखा याच भावनेचे प्रतीक आहे. (हरि, १७-११-१९४६, पृ. ४०४)

**आत्मशुद्धी**

आत्मशुद्धीशिवाय प्राणिमात्रांशी तादात्म्य निर्माण होणे अशक्य आहे. आत्मशुद्धीशिवाय अहिंसेचे पालन केवळ स्वप्न आहे. ज्याचे हृदय शुद्ध नाही त्याला ईश्वरप्राप्ती होऊ शकत नाही. यामुळे आत्मशुद्धीकरणाचा अर्थ जीवनाच्या सर्व क्षेत्रातील शुद्धीकरणाशी जोडला पाहिजे आणि ज्याअर्थी शुद्धीकरण ही अतिशय संक्रामक गोष्ट आहे त्याअर्थी एका व्यक्तीच्या शुद्धीकरणाने त्याच्या आजूबाजूचे वातावरणही शुद्ध झाले पाहिजे.

परंतु शुद्धीकरणाचा मार्ग फार कठीण आणि चढाचा आहे. पूर्ण शुद्धीकरणाकरिता माणसाला मनाने, वाचेने आणि कर्माने विकारमुक्त व्हावे लागते, प्रेम आणि घृणा, आसक्ती आणि विरक्ती या परस्पर विरोधी प्रवाहांच्या वर उठावे लागते. मला माहीत आहे की सतत प्रयत्न करूनही ही त्रिविध शुद्धी मी अजून प्राप्त करू शकलेलो नाही. यामुळेच जगाच्या प्रशंसेने मला गुदगुल्या होत नाहीत, उलट त्यामुळे वेदनाच होतात.

मला वाटते की शस्त्रांच्या बळावर विश्वविजयी होण्यापेक्षा मनाच्या सूक्ष्म आवेगांवर विजय मिळवणे अधिक कठीण आहे.

....माझ्या आत दडलेल्या विकारांचा मला अनुभव आहे. माझ्यात जरी पराभवाची भावना निर्माण झालेली नसली तरी त्याविषयीची जाणीव झाली की मला लाज वाटू लागते. या अनुभवांनी आणि पराजयांनीच मला जिवंत ठेवले आहे आणि मला आनंद दिला आहे. परंतु मला अजून फार कठीण मार्ग आक्रमायचा आहे हे मला माहीत आहे. मला माझे अस्तित्व पूर्णपणे मिटवून टाकावे लागेल. जोपर्यंत माणूस स्वेच्छेने स्वतःला आपल्या प्राणिजगतामध्ये सर्वात शेवटी ठेवत नाही तोपर्यंत त्याची मुक्ती शक्य नाही. अहिंसा विनम्रपणाची परमसीमा आहे. (ए, पृ. ३७१)

## साध्य आणि साधन

माझ्या जीवनाच्या तत्त्वज्ञानात साध्य आणि साधन हे परिवर्तनीय शब्द आहेत. (यंग, २६-१२-१९२४, पृ. ४२४)

साधनाला बीजाची उपमा देता येऊ शकते आणि साध्याला झाडाची. बीज आणि वृक्ष यांच्यामध्ये जो संबंध आहे तो साधन आणि साध्यात आहे. (हिंस्व, पृ. ७१)

## वेगळेपण नाही

त्यांचे म्हणणे आहे की 'अखेरीस साधन हे तर साधनच आहे.' माझे म्हणणे आहे की साधनच सर्व काही आहे. जसे साधन तसे साध्य.... साधन व साध्य यांना वेगळे करणारी कोणतीही भिंत नाही. प्रत्यक्षात निर्मात्याने आम्हाला साधनांवर नियंत्रण दिले आहे, साध्यांवर मुळीच नाही. साधनांच्या योग्य प्रमाणातच साध्यांची सिद्धी होत असते. या नियमाला कोणताही अपवाद नाही.
(यंग, १७-७-१९२४, पृ. २३६-७)

प्रत्येक गोष्टीकरिता निर्मात्याने एक निश्चित वेळ ठरवली आहे. परिणामांवर आपले नियंत्रण नाही, आपण केवळ प्रयत्न करू शकतो. स्वत:पुरते बोलायचे झाले तर माझ्या कर्तव्याचे पालन करण्याकरिता मी पुरेसे प्रयत्न केले आहेत, हे माझ्याकरिता पुरेसे आहे. (हरि, ६-५-१९३९, पृ. ११२)

## अधिकार आणि कर्तव्य

अधिकाराचा खरा स्रोत कर्तव्य आहे. आपण सर्वांनी आपल्या कर्तव्याचे पालन केले तर अधिकार मिळणे कठीण जाणार नाही. परंतु कर्तव्य विसरून आपण अधिकारांमागे धावू लागलो तर ते आमच्याशी मृगजळाप्रमाणे व्यवहार करतील. मृगजळामागे तुम्ही कितीही धावलात तरी ते तुमच्यापासून तेवढेच दूर जात राहते. भगवान श्रीकृष्णांनी आपल्या अमर वाणीतून हाच संदेश दिला आहे : 'केवळ कर्मच तुझ्या ताब्यात आहेत. फळांची चिंता तू सोडून दे.' इथे कर्म कर्तव्य आहे आणि फळ अधिकार. (यंग, ८-१-१९२५, पृ. १५-६)

जी व्यक्ती आपले कर्तव्य चांगल्या प्रकारे पार पाडते तिला सहजच अधिकारांची प्राप्ती होते. खरे सांगायचे तर कर्तव्य पालनाचाच अधिकार असा आहे ज्याकरिता आपण जगलो आणि मेलो पाहिजे. याच्यात सर्व वैध अधिकार

आपण होऊनच सामावून जातात. बाकी सर्व गोष्टींमध्ये हिसकाहिसकी आहे आणि त्यात बीजरूपाने हिंसा आहे.

भांडवलदार आणि जमीनदार आपल्या अधिकारांबद्दल बोलतात आणि श्रमिक आपल्या अधिकारांबद्दल, राज्य शासन करण्याच्या आपल्या अधिकाराबद्दल व जनता त्याचा प्रतिकार करण्याच्या आपल्या अधिकाराबद्दल बोलते. सर्व लोक जर कर्तव्य विसरतील आणि केवळ अधिकारांवर भर देतील तर जगात अराजक निर्माण होईल. (हरि, २७-५-१९३९, पृ. १४३)

जर अधिकारांवर भर देण्याऐवजी प्रत्येक व्यक्ती आपले कर्तव्य करू लागली, तर मानवसमाजात तात्काळ सुव्यवस्था निर्माण होईल.... मी तर म्हणेन की जे अधिकार प्रत्यक्ष कर्तव्यातून निर्माण होत नाहीत ते मिळवण्याच्या लायकीचेच नसतात. ते बळजबरीने हिसकून घेतलेले अधिकार आहेत व आपण त्यांचा त्याग जितका लवकर करू तितके चांगले होईल. जो अधम बाप आपल्या मुलांबद्दलचे कर्तव्य पार न पाडताच त्यांच्याकडून आज्ञाधारकपणाची अपेक्षा करतो त्याच्या पदरी अवहेलनाच येते.

आपल्या पत्नीने आपल्या सर्व आज्ञांचे पालन करावे अशी एखाद्या दुराचारी पतीने केलेली अपेक्षा धार्मिक आज्ञेला विकृत करणे आहे. परंतु जे वडील आपल्या मुलांचे पालनपोषण करायला तयार आहेत आणि तरीही त्यांची मुले त्यांच्या आज्ञेचे पालन करत नसतील तर ते कृतघ्न म्हणवतील व ते आपल्या वडिलांपेक्षा स्वतःचीच अधिक हानी करतील. हीच गोष्ट पती-पत्नीलाही लागू होते.

जर तुम्ही हा सरळ आणि सार्वभौम नियम मालक आणि मजूर, जमीनदार आणि कृषक, राजा आणि प्रजा अथवा हिंदू आणि मुसलमान यांना लागू कराल तर जनजीवनात आणि व्यवसायांमध्ये उपद्रव आणि अव्यवस्था निर्माण केल्याशिवाय सर्व क्षेत्रांमध्ये मधुर संबंधांची निर्मिती करता येते असे तुम्हाला आढळून येईल. मी ज्याला सत्याग्रहाचा नियम म्हणतो तो कर्तव्यांची जाणीव आणि त्यातून निर्माण होणारे अधिकार यांच्यामधून सिद्ध होतो.
(हरि, ६-७-१९४७, पृ. २१७)

# ४६. यज्ञाचे तत्त्वज्ञान

## यज्ञाचा अर्थ

फलाशेशिवाय इतरांच्या कल्याणाकरिता करण्यात आलेले कर्म म्हणजे यज्ञ. हे कर्म लौकिक वा आध्यात्मिक असे कोणत्याही प्रकारचे असू शकते. 'कर्म' या शब्दाचा इथे व्यापक अर्थ घेण्यात यावा. त्यात मन, वाणी आणि कर्म या तिघांचाही समावेश होतो. 'इतरांमध्ये' केवळ इतरच नाही तर संपूर्ण प्राणिजगाचा समावेश आहे.

याशिवाय मूलभूत त्याग म्हणजे असे कर्म की जे शक्य तेवढ्या व्यापक क्षेत्रात, अधिकतम प्राणिमात्रांचे अधिकतम कल्याण करणारे आणि अधिकतम स्त्री-पुरुषांना किमान त्रास घेऊन करता येऊ शकते. याप्रमाणे एखाद्या तथाकथित उच्च उद्दिष्टाकरिता करण्यात आलेल्या कृत्यामुळे एका जरी जिवाला हानी पोहोचत असेल तर त्या कृत्याला यज्ञ म्हणता येणार नाही, महायज्ञ तर नाहीच नाही. हाच 'गीतेचा' उपदेश आहे आणि अनुभवानेही ही गोष्ट सिद्ध होते की जे कर्म यज्ञाच्या कोटीत बसत नाही ते केवळ बंधन वाढवणारे असते.

या अर्थाने यज्ञाशिवाय हे जग क्षणभरही टिकू शकत नाही आणि त्याकरिता गीतेच्या दुस-या अध्यायात सद्बुद्धीची चर्चा करण्यात आल्यानंतर तिस-या अध्यायात ती मिळवण्याच्या उपायांची चर्चा करण्यात आली आहे आणि त्याचबरोबर यज्ञाचा जन्म सृष्टीबरोबरच झाला, असेही सांगण्यात आले आहे. यामुळे हे शरीर आपल्याला केवळ संपूर्ण सृष्टीची सेवा करता यावी म्हणून मिळालेले आहे आणि म्हणूनच जो यज्ञाशिवाय खातो तो चोरीचे खातो असे 'गीतेत' सांगितले आहे. शुद्ध जीवन जगणा-या व्यक्तीचे प्रत्येक काम यज्ञस्वरूपी असले पाहिजे.

यज्ञ आपल्या जन्माबरोबरच येतो; आपण आजीवन ऋणी असतो आणि म्हणून विश्वाची सेवा करण्याकरिता आपण कर्तव्यबद्ध आहोत. ज्याप्रमाणे मालकाची सेवा केल्याबद्दल एखाद्या गुलामाला अन्न, वस्त्र आदी गोष्टी मिळतात त्याचप्रमाणे या विश्वाचा निर्माता आम्हाला जे काही देईल त्याचा आम्ही स्वीकार केला पाहिजे. त्याच्याकडून आपल्याला जे काही मिळते ती देणगी आहे असे आपण मानले पाहिजे कारण ऋणी असल्यामुळे आपल्या कर्तव्याचा मोबदला

मागण्याचा आम्हाला काहीही अधिकार नाही. त्यामुळे तो मोबदला मिळाला नाही तर आपण ईश्वराला दोष द्यायला नको. आपले हे शरीर त्याचेच आहे, त्याला इच्छा असेल तोपर्यंत त्याने याचे पोषण करावे आणि नको असेल तेव्हा फेकून द्यावे.

ही तक्रार करण्याची वा खेदाची गोष्ट नाही. उलट ईश्वरी व्यवस्थेत आपले योग्य स्थान काय आहे हे आपल्याला कळू शकले तर ही एक स्वाभाविक आणि वांछनीय स्थिती असल्याचे आपल्याला आढळून येईल. ईश्वराच्या या परम कृपेचा अनुभव येण्याकरिता दृढ श्रद्धेची गरज आहे. 'आपली चिंता करू नका, ती ईश्वरावर सोडून द्या' असा आदेश बहुतेक सर्व धर्मांतून देण्यात आला आहे.

यामुळे कोणालाही घाबरण्याची गरज नाही. जी व्यक्ती शुद्ध अंतःकरणाने स्वतःला सेवेकरिता समर्पित करते तिला दिवसेंदिवस त्याची अधिक गरज जाणवू लागते व तिची श्रद्धा सतत दृढ होत जाते. जी व्यक्ती स्वार्थत्याग आणि आपल्या जन्माच्या अटी या गोष्टी मान्य करायला तयार नाही तिच्याकरिता सेवेचा मार्ग नाही. आपल्यातील प्रत्येक व्यक्ती कळतनकळत काही तरी सेवा करतच असते. आपण जर जाणीवपूर्वक सेवा करण्याची सवय लावून घेतली तर सेवा करण्याची आपली इच्छा निरंतर वाढत जाईल व त्यामुळे केवळ आपल्यालाच सुख होणार नाही तर संपूर्ण जगाच्या सुखातही वृद्धी होईल. (फ्रायम, पृ. ५३-५६)

### व्यवहारात यज्ञ

यज्ञ दिवसाचे चोवीस तास केले जाणारे कर्तव्य आहे वा केली जाणारी सेवा आहे.... ज्याप्रमाणे ऋणातून मुक्त होऊन स्वतःलाच आपण उपकृत करतो त्याप्रमाणे निष्काम सेवा करून दुस-यावर नाही तर आपण स्वतःवरच उपकार करत असतो, आपल्याच डोक्यावरील ओझे उतरवतो आणि आपलेच कर्तव्य पार पाडतो. अजून एक गोष्ट अशी आहे की मानवतेची सेवा करण्याकरिता आपली साधनसामग्री पणाला लावून देण्याची जबाबदारी केवळ सत्पुरुषांचीच नाही तर आम्हा सर्वांची आहे आणि हा नियम जर बरोबर असेल आणि तो नक्कीच बरोबर आहे, तर जीवनात आसक्तीला कोणतेही स्थान असू शकत नाही व आसक्तीची जागा त्याग घेतो. त्यागाची भावनाच माणसाला.... पशूंपासून वेगळे करते....

परंतु संसार सोडून तुम्ही जंगलात जाऊन राहावे असा त्यागाचा अर्थ नाही.

आपल्या जीवनातील सर्व कामकाज आपण त्यागभावनेने केले पाहिजे. जर एखाद्या व्यक्तीने गृहस्थ जीवनाला आसक्ती न मानता कर्तव्य मानले, तर ती व्यक्ती गृहस्थ राहत नाही असे नाही. त्यागभावनेने व्यापार करणा-या व्यापा-याच्या हातातून करोडो रुपये जात असले तरी तो जर या नियमाचे पालन करत असेल तर तो आपल्या कौशल्याचा उपयोग समाजसेवेकरिता करतो. तो धोकाही देणार नाही, सट्टा करणार नाही, साधे जीवन जगेल आणि एकाही व्यक्तीचे नुकसान करणार नाही. कुणाचेही नुकसान करण्याऐवजी तो लाखो रुपयांचा तोटा सहन करणे पसंत करील.

कोणीही अशी कल्पना करू नये की असा व्यापारी केवळ कल्पनेतच असू शकतो. जगाचे भाग्य की असे व्यापारी पश्चिमेतही आहेत आणि पूर्वेतही. हे खरे आहे की असे व्यापारी हाताच्या बोटावर मोजण्याएवढे असतात, परंतु एकही व्यक्ती या कसोटीवर टिकत असेल तर तुम्ही या कसोटीला काल्पनिक म्हणू शकत नाही.... आणि तुम्ही जर काळजीपूर्वक पाहिले तर तुम्हाला जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात असे समर्पित जीवन जगणारे काही लोक भेटतील. असे त्यागी पुरुष आपल्या उदरनिर्वाहाकरिता काही कामकाज करत असतात मात्र ते त्यांचे ध्येय नसते तर अतिरिक्त उत्पादन असते.

त्यागाचे जीवन कलेचा परमोत्कर्ष आहे आणि खरा आनंद देणारे आहे. जो यज्ञ माणसाला भाररूप वाटतो, ज्यामुळे त्याच्यात चिडचिडेपणा निर्माण होतो तो यज्ञ नसतो. आसक्ती आत्म्याला विनाशाकडे नेते, तर त्याग अमरत्वाकडे. आनंदाला कोणतेही स्वतंत्र अस्तित्व नाही. आपल्या जीवन-तत्त्वज्ञानावर तो अवलंबून असतो. एका व्यक्तीला रंगभूमीवरील दृश्य आनंदित करतात तर दुस-या व्यक्तीला आकाशात परिवर्तित होणारी नवनवीन निसर्गसौंदर्याची दृश्ये. अशा रीतीने आनंदाचा संबंध व्यक्ती आणि राष्ट्रीय शिक्षणाशी आहे. लहानपणापासून ज्या गोष्टींमधून आनंद घेण्याची शिकवण दिली जाते त्या गोष्टींमुळेच आम्ही आनंदित होतो. भिन्न भिन्न राष्ट्रीय अभिरुचीची उदाहरणे देऊन ही गोष्ट अजून चांगली समजावून सांगता येईल....

## ऐच्छिक सेवा

जी व्यक्ती सेवेकरिता समर्पित असेल ती एका क्षणाकरिताही सुखसुविधांचा विचार करत नाही; ती काळजी ती ईश्वरावर सोडून देते. मग तो देवो अथवा न देवो.

यामुळे समोर आलेल्या प्रत्येक गोष्टीचे ती ओझे वाहत बसत नाही. ती केवळ तेवढेच घेते जेवढे तिच्याकरिता अनिवार्य आहे. उरलेले ती सोडून देते. ती शांत, क्रोधमुक्त आणि असुविधा असतानाही मनाने अविचल असते. सद्‌गुणाप्रमाणेच त्याची सेवा हेच तिचे पारितोषिक असते व तिला त्यातच समाधान वाटत असते.

अजून एक गोष्ट आहे. सेवेच्याबाबतीत माणसाने हयगय करता कामा नये तसेच त्याने हातचे राखूनही सेवा करू नये. माणसाने आपल्या खाजगी व्यवसायातच दक्ष असले पाहिजे आणि फुकटच्या भाकरी भाजण्याचे काम कसेही केले तरी चालेल असे समजणारा माणूस त्यागाच्या मूलभूत गोष्टी अजून शिकलेला नाही असे म्हणावे लागेल. माणसाने इतरांची सेवा करत असताना आपल्यामध्ये जे काही सर्वोत्कृष्ट असेल ते दिले पाहिजे आणि त्या गोष्टीला स्वतःच्या वैयक्तिक गोष्टींपेक्षा अधिक प्राधान्य दिले पाहिजे. वस्तुतः खरा भक्त कोणत्याही अटीशिवाय स्वतःला मानवतेच्या सेवेकरिता समर्पित करत असतो. (फ्रायम, पृ. ५७-६०)

## ४७. ही दानवी संस्कृती

माझी खात्री आहे की युरोप आज ईश्वराचे वा ख्रिश्चनत्वाचे प्रतिनिधित्व करत नाही, तर पाशवी भावनेचे प्रतिनिधित्व करतो आणि सैतान आपल्या ओठांवर जेव्हा ईश्वराचे नाव घेऊन प्रकट होतो तेव्हा तो सर्वात जास्त यशस्वी होतो. युरोप आज केवळ नावाकरिता ख्रिश्चन आहे, खरे तर तो कुबेराची पूजा करतो आहे. (यंग, ८-९-१९२०, पृ. २-३)

रेल्वे वा रुग्णालयांना नष्ट करण्याचे माझे ध्येय नाही, परंतु ते जर आपल्या मरणाने मेले तर मला खुषीच होईल. रेल्वे वा रुग्णालये एखाद्या उच्च आणि विशुद्ध संस्कृतीचे प्रतीक नाही. त्यांच्याबद्दल चांगलेच सांगायचे तर या गोष्टी अपरिहार्य वाईटपणा आहे. यापैकी कोणीही राष्ट्राच्या नैतिक दर्जामध्ये तसूभरही भर घालत नाही.

तसेच मला जरी न्यायालयांचा कायम विध्वंस व्हावा असे वाटत असले तरी तसे करणे हे माझे उद्दिष्ट नाही. सर्व यंत्रसामुग्री आणि गिरण्या या गोष्टी बंद करण्याचा तर माझा याहूनही कमी प्रयत्न आहे. याकरिता ज्या प्रमाणात साधेपणाची आणि त्यागाची अपेक्षा आहे त्या प्रमाणात लोकांची अजून तयारी नाही. (यंग, २६-१-१९२१, पृ. २७)

## आत्मप्रतिष्ठा

मला समृद्धी हवी आहे, मला आत्मनिर्णय हवा आहे, मला स्वातंत्र्य हवे आहे, परंतु या सर्व गोष्टी मला आत्म्याकरिता हव्या आहेत. गारगोटीच्या चकमकीच्या युगापासून पोलादाच्या युगापर्यंत पोहोचणे म्हणजे प्रगती आहे की नाही याबद्दल मला शंका आहे. मी याबद्दल उदासीन आहे. आत्मविकासच अशी गोष्ट आहे ज्याकरिता आमच्या बुद्धीचा वा सर्व क्षमतांचा उपयोग झाला पाहिजे. (यंग, १३-१०-१९२१, पृ. ३२५)

## भारताचा मार्ग

माझी इच्छा आहे की, आमच्या पुढा-यांनी आम्हाला जगातील सर्वोच्च नैतिक स्थान मिळवण्याची शिकवण द्यावी. आमच्या या भूमीत कधी काळी देवतांचा वास होता असे मी ऐकतो. गिरण्यांच्या चिमण्यांचा धूर आणि कारखान्यांचा गोंगाट यांनी इथले वातावरण दूषित झाले आहे. गाड्या ओढणारी इंजिने रस्त्यांवर धुडगूस घालत आहेत आणि त्या गाड्यांमध्ये बसलेल्या लोकांना आपण कशाच्या मागे धावतो आहोत, हे ही माहित नसते, ते बेहोश झालेले असतात. बसेसमध्ये शेळ्या-मेंढ्यांप्रमाणे कोंबण्यात आल्यामुळे ते चिडचिडे झालेले असतात आणि अनोळखी लोकांमध्ये बसल्याची जाणीव त्यांच्या चेह-यावर दिसते. शक्य असते तर समोरच्या अनोळखी लोकांनी यांना आणि यांनी त्या अनोळखी लोकांना बाहेर फेकून दिले असते, असाही भाव त्यांच्या चेह-यावर दिसतो. अशा वातावरणात ईश्वराचा वास कसा असू शकेल? या गोष्टींची चर्चा मी करत आहे कारण यांना भौतिक प्रगतीचे प्रतीक समजले जाते. सत्य हे आहे की या गोष्टींमुळे आमच्या सुखात कवडीचीही भर पडत नाही. (स्पीरा, पृ. ३५४-५५)

## आधुनिक संस्कृती

पूर्वी लोक जेव्हा एकमेकांशी युद्ध करायचे तेव्हा ते आपल्या शत्रूच्या शारीरिक शक्तीचा अंदाज घ्यायचे. परंतु आज एखाद्या पहाडाच्या शिखरावर बसलेला बंदूकधारी एकटाच हजारो लोकांचा जीव घेऊ शकतो. ही संस्कृती आहे! पूर्वी माणसाला मोकळ्या हवेत हवा तितका वेळ काम करता येत असे. आता हजारो लोक एकाच वेळी फॅक्टरीत वा कारखान्यात काम करत असतात. त्यांची अवस्था पशूंपेक्षाही वाईट आहे. त्यांना करोडपतींच्या इच्छेकरिता अतिशय भयानक

परिस्थितीत आपला जीव धोक्यात घालून काम करणे भाग पडत असते.... ही संस्कृती अशी आहे की तुम्ही श्वास रोखून तिच्याकडे पाहत राहा, ती आपोआप नष्ट होऊन जाईल. (हिंस्व, पृ. ३६-७)

वेगात धावणा-या वाहनांमुळे राहण्याच्या दृष्टीने जग अजून चांगले ठिकाण झाले आहे का? यामुळे माणसाची भौतिक प्रगती झाली आहे काय? अखेरीस यांच्यामुळे माणसाच्या प्रगतीमध्ये अडथळा येणार नाही का? आणि माणसाच्या महत्त्वाकांक्षेला काही सीमा आहे का? एक काळ असा होता जेव्हा आपण एका तासात काही मैल प्रवास करण्यात समाधान मानत होतो. आज एका तासात शेकडो मैल कापण्याची आमची इच्छा आहे. एक दिवस असा येईल की जेव्हा आम्हाला अंतरिक्षातही उडण्याची इच्छा होईल. परिणाम काय होईल? केवळ अव्यवस्था. (यंग, २१-१-१९२६, पृ. ३१)

मी अंतर आणि वेळ नष्ट करणा-या, पाशवी भूक वाढवणा-या आणि तिच्या समाधानाकरिता आकाशपाताळ एक करणा-या या वेडेपणाच्या धावपळीची अंतःकरणापासून निंदा करतो. जर हीच आधुनिक संस्कृती असेल - मला तरी हीच आहे असे वाटते - तर मी हिला सैतानी म्हणेन. (यंग, १७-३-१९२७, पृ. ८५)

## उद्योगीकरणाची नियती

कोणत्याही दृष्टीने पाहिले तरी ही औद्योगिक संस्कृती वाईट आहे व त्यामुळे ती एक आजार आहे. आकर्षक शब्द आणि घोषणा यांनी आपण फसू नये. उद्योगवाद, जहाजे वा तारायंत्र यांच्याशी माझे भांडण नाही. यांच्याशी जुळलेल्या सर्व गोष्टी उद्योगीकरणाच्या समर्थनाशिवाय टिकून राहणार असतील तर त्या गोष्टी टिकून राहतील. त्या साध्य नाहीत. जहाजे आणि तारायंत्रांकरिता आपण शोषणाला बळी पडू नये. मानव समाजाच्या चिरंतन विकासाकरिता या गोष्टी अपरिहार्य नाहीत. आता आपल्याला वाफ आणि विजेचा उपयोग माहीत आहे व उद्योगीकरण टाळणे शिकल्यानंतर आपण योग्य वेळी त्यांचा उपयोग करू शकू. त्यामुळे काहीही करून उद्योगीकरण नष्ट करायचे आहे. (यंग, ७-१०-१९२६, पृ. ३४८)

जे लोक आपल्या गरजा वाटेल तेवढ्या वाढवत आहेत आणि जीवनाचे खरे सार व विश्वाचे खरे ज्ञान यातच सामावलेले आहे असे समजतात त्या लोकांनी आपली पावले परत फिरवून 'आम्ही काय मिळवले?' असे स्वतःलाच विचारण्याची वेळ आता आलेली आहे.

संस्कृती आल्या आणि गेल्या आणि आपल्या संपूर्ण प्रगतीनंतरही मला वारंवार विचारण्याची इच्छा होते की 'या सर्वांचा हेतू काय आहे?'

डार्विनचा एक समकालीन विचारवंत वेलेसही असेच काही तरी म्हणाला होता. त्याचे म्हणणे आहे की पन्नास वर्षांमध्ये माणसाने लावलेल्या अद्‌भुत शोधांमुळे मानवजातीची नैतिक उंची एका इंचानेही वाढलेली नाही. टॉलस्टॉयचेसुद्धा, हवे असल्यास तुम्ही त्याला स्वप्नाळू विचारवंत म्हणू शकता, असेच मत होते. येशू ख्रिस्त, गौतम बुद्ध व हजरत महंमद - आज यांच्या धर्मांना माझ्या स्वतःच्याच देशात वंचित आणि विकृत केले जात आहे-या सर्वांचेही असेच मत आहे.

## ईश्वर आणि संपत्तीची लालसा

'सर्मन ऑफ द माऊंट'मध्ये तुम्हाला जो अमृताचा झरा मिळतो तो तुम्ही यथेच्छ पिऊ शकता परंतु त्याकरिता तुम्हाला जाडेभरडे तरट आणि भस्म धारण करावे लागेल. 'सर्मन'मधील उपदेश आपल्यापैकी सर्वांकरिता होता. परंतु ईश्वर आणि संपत्तीचा मोह यांची सेवा तुम्ही एकाच वेळी करू शकत नाही. सहिष्णुतेचा प्रतीक आणि करुणा आणि दया यांची मूर्ती असलेला ईश्वर मॅमनला (युरोपमधील संपत्तीची देवता) नऊ दिवसांपर्यंत आपले जाळे पसरवण्याची सूट देतो. परंतु मी तुम्हाला सांगेन की.... या संपत्तिमोहाच्या आत्मघातक प्रभावापासून दूर पळा. (यंग, ८-१२-१९२७, पृ. ४१४)

माझ्याजवळ शक्ती असती तर आजच मी ही व्यवस्था नष्ट केली असती. मला जर खात्री असेल की घातक अस्त्रांनी ही व्यवस्था नष्ट होऊ शकते तर मी तसेही केले असते. या तंत्रामुळे कदाचित या व्यवस्थेच्या आजच्या संचालकांना मी नष्ट करू शकेन परंतु त्यामुळे ही व्यवस्था चिरस्थायी होऊन जाईल. (यंग, १७-३-१९२७, पृ. ८५)

## पश्चिम

मी नम्रतापूर्वक मान्य करतो की पश्चिमेत अनेक अशा गोष्टी आहेत ज्या आत्मसात केल्यामुळे आमचा लाभ होऊ शकतो. बुद्धिमत्तेवर कोणत्याही एखाद्या देशाचा वा जातीचा एकाधिकार नसतो. पश्चिमेकडून येणा-या गोष्टींची नक्कल करण्याची तेवढी आशियातील लोकांना अक्कल आहे या धारणेमुळे पश्चिमेकडून येणा-या गोष्टींचे लोक विवेकहीन आणि तारतम्यविहीन अनुकरण करत आहेत आणि केवळ तेवढ्या कारणाकरिता मी पाश्चात्त्य संस्कृतीच्या विरोधात आहे.

माझा विश्वास आहे की भारताजवळ वेदना सहन करण्याच्या अग्निपरीक्षेतून जाण्याचे सामर्थ्य असेल व आपल्या संस्कृतीवरील अवैध आक्रमणाचा प्रतिकार करण्याचे त्याच्यात धैर्य असेल तर तो आपल्या संस्कृतीद्वारे, जी अपूर्ण जरी असली तरी निःसंशयपणे काळाच्या विध्वंसक तडाख्यांनंतरही टिकून आहे, विश्वशांतीकरिता व विश्वाच्या प्रगतीकरिता भरपूर सहकार्य करू शकतो.
(यंग, ११-८-१९२७, पृ. २५३)

## ४८. मनुष्य विरुद्ध यंत्र

जर यंत्रांचा लोप झाला तर मी दुःखी होणार नाही व ही फार मोठी आपत्ती आहे, असेही समजणार नाही. परंतु यंत्राचा नाश हे माझे ध्येय नाही.
(यंग, १९-१-१९२१, पृ. २१)

### माणसाची पूर्वीच्या पदावर पुनःस्थापना

माणूस सर्वोच्च आहे. मशिनींमुळे माणसाचे हातपाय निर्जीव झाले आहेत असे होऊ नये. (यंग, १३-११-१९२४, पृ. ३७८)

माझे अंतःकरण सांगते की जेव्हा यंत्रयुगाचे सर्व लाभ नाहीसे होतील तेव्हाही आमचे हस्तकौशल्य जिवंत राहील; जेव्हा शोषणाचा अंत होईल तेव्हाही सेवा आणि प्रामाणिकपणाने केलेले श्रम जिवंत राहतील. हीच श्रद्धा मला जिवंत ठेवते आहे आणि हिच्याच जोरावर मी माझे काम करत राहतो.... कामाबद्दलच्या अढळ श्रद्धेनेच स्टिफेन्सन आणि कोलंबस यांना जिवंत ठेवले होते. माझ्या कामाबद्दलची श्रद्धाच मला जिवंत ठेवते आहे. (हरि, ३०-११-१९३५, पृ. ३२९)

माझ्या कामाबद्दलची श्रद्धाच मला जिवंत ठेवते आहे, परंतु यापलीकडील एक विश्वास असाही आहे की माझ्या श्रद्धेला ज्या गोष्टी आव्हान देत आहेत असे वाटते त्या सगळ्यांचे भविष्य अंधकारमय आहे.... मला याबद्दल मुळीच संशय वाटत नाही की यंत्रयुगाचे ध्येय माणसाचे यंत्रात परिवर्तन करण्याचे आहे तर माझे ध्येय यंत्रवत झालेल्या माणसाला त्याच्या मूळ स्थितीत पुनःस्थापित करणे हे आहे. (हरि, २९-८-१९३६, पृ. २२८)

आदर्शाबद्दल बोलायचे तर.... सर्व प्रकारच्या यंत्राचा मी तशाच प्रकारे त्याग करेन ज्याप्रकारे मोक्षप्राप्तीला सहायक नसलेल्या या शरीराचा त्याग करून मी आत्म्याच्या संपूर्ण मुक्तीचा प्रयत्न करण्याची इच्छा करीन. या दृष्टीने सर्वच यंत्रांचा त्याग करण्याची माझी इच्छा असेल, परंतु यंत्रे राहणारच आहेत कारण

शरीराप्रमाणे ती अपरिहार्य आहेत. शरीर स्वतःच.... एक परिपूर्ण यंत्र आहे, परंतु आत्म्याच्या उन्नतीकरिता बाधक असल्यामुळे ते त्याज्य आहे.
(यंग, २०-११-१९२४, पृ. ३८६)

**यंत्र एक वाईटपण**

यंत्र सर्पाच्या बिळाप्रमाणे आहे, त्यात एकही यंत्र असू शकते आणि शंभरही. जिथे यंत्र आहेत तिथे मोठी शहरे आहेत, जिथे मोठी शहरे आहेत तिथे ट्राम आणि रेल्वेगाड्या आहेत आणि तिथेच वीजही आहे. प्रामाणिक चिकित्सक तुम्हाला सांगतील की जिथे यंत्रे आहेत तेथील लोकांचे आरोग्य चांगले नाही. मला आठवते की युरोपमध्ये जेव्हा एका शहरात पैशाची चणचण निर्माण झाली तेव्हा तेथील ट्राम कंपनी, वकील व डॉक्टर यांचे उत्पन्न कमी झाले आणि लोकांचे आरोग्य चांगले झाले. यंत्रांमध्ये मला एकही गुण आढळून येत नाही.
(हिस्व, पृ. ९६)

**श्रम वाचवणे**

माझा आक्षेप यंत्रांवर नाही तर त्यांच्याबद्दल वाटणा-या वेडाबद्दल आहे. हे वेड तथाकथित श्रम वाचवणा-या यंत्रांबद्दल आहे. लोक तोपर्यंत श्रम वाचवत जातात जोपर्यंतहजारो माणसे उपासमारीच्या स्थितीत रस्त्यावर येत नाहीत. मानवजातीच्या एका लहानशा भागाचे नाही तर सगळ्यांचे श्रम वाचावे अशी माझी इच्छा आहे.

माणसाचे श्रम वाचवणे हे उद्दिष्ट असले पाहिजे, मानवी लोभ आणि हाव पुरवणे हे नाही. उदाहरणार्थ तिरप्या झालेल्या चात्या सरळ करणा-या यंत्राचे मी केव्हाही स्वागत करीन. त्यामुळे लोहार चात्या तयार करणे बंद करणार नाहीत, परंतु जेव्हा चाती तिरपी होईल तेव्हा प्रत्येक कताई करणाराजवळ चाती सरळ करणारे एक यंत्र असेल. हावेची जागा प्रेमाला घेऊ द्या आणि सर्व काही बरोबर होईल. (यंग, १३-११-१९२४, पृ. ३७८)

अनेकांना गरीब बनवून थोड्याशा लोकांना श्रीमंत बनवणा-या वा अनेकांचे श्रम अकारण विस्थापित करणा-या यंत्रांबद्दल मला मुळीच कदर नाही.
(हरि, २२-६-१९३५, पृ. १४६)

यांत्रिकीकरण तिथे चांगले असते जिथे कामाच्या तुलनेत काम करणारे हात कमी असतात. उलट जिथे काम करणारांची संख्या कामाच्या तुलनेत अधिक असेल, तशी ती भारतात आहे, यंत्र वाईटपणाच निर्माण करते. गावांमध्ये

राहणा-या लाखो-करोडो लोकांना आराम कसा द्यावा ही आपल्यासमोरील समस्या नसून या लोकांना त्यांच्या रिकाम्या वेळेचा, जो वर्षात सहा महिन्यांच्या कामाच्या तासाइतका होईल, उपयोग कसा करावा हा आहे. (हरि, १६-११-१९३४, पृ. ३१६)

लोक विचारतात की लाखो लोकांचे श्रम वाचवून त्यांना बौद्धिक कामाकरिता अधिक वेळ मिळवून दिला तर त्यात वाईट काय आहे? आराम एका सीमेपर्यंतच चांगला व आवश्यक असतो. ईश्वराने आम्हा सर्वांना आपला घाम गाळून भाकरी कमावण्याकरिता निर्माण केले आहे आणि खाद्यान्नासहित आपल्या गरजेच्या सर्व गोष्टी एखादी जादूची छडी फिरवून निर्माण करण्याची शक्ती माणसात निर्माण झाली तर काय होईल या कल्पनेनेच मी भयभीत होतो.

कारखाना शेकडो लोकांना काम देतो व हजारो लोकांना बेकार करतो. एका तेलाच्या मीलमधून मी हजारो टन तेलाचे उत्पादन करू शकतो परंतु त्यामुळे हजारो तेली बेकार होतील. लाखो लोकांच्या हातांनी केलेले श्रम रचनात्मक असतात आणि त्यामुळे सर्वांचे कल्याण होत असल्यामुळे यांत्रिक ऊर्जेला मी विनाशक ऊर्जा म्हणतो. विजेवर चालणा-या यंत्रांनी, मग त्यांचे नियंत्रण राज्याच्या हातात असले तरी, प्रचंड प्रमाणावर केलेले उत्पादन काहीही उपयोगाचे नाही. (हरि, १६-५-१९३६, पृ. १११)

यंत्रांना माझा जो विरोध आहे त्याबद्दल लोकांमध्ये फार मोठे गैरसमज आहेत. प्रत्येक यंत्राचा मी विरोधक नाही. मी केवळ त्याच यंत्रांचा विरोधक आहे जे श्रमिकांना विस्थापित करून त्यांना बेकार करतात. (हरि, १५-९-१९४६, पृ.३१०)

यंत्राच्या दर्शनी विजयामुळे माझे डोळे दिपत नाहीत. सर्व विनाशक यंत्रांचा मी पूर्णपणे विरोधी आहे. मी अशा साध्यासुध्या अवजारांचे, उपकरणांचे आणि यंत्रांचे स्वागत करतो जे व्यक्तीचे श्रम वाचवून लाखो झोपड्यांच्या कामाचे ओझे हलके करतात. (यंग, १७-६-१९२६, पृ. २१८)

माझे मत आहे की, जेव्हा एखादे काम लाखो लोक सहजपणे करू शकतात व त्याच्याजवळ करण्यासारखे दुसरे कोणतेही काम नसते तेव्हा ते काम करण्याकरिता यंत्राचा उपयोग करणे हानिकारक असते. एकोणीसशे मैल लांब आणि चौदाशे मैल रूंद भारताच्या सात लाख खेड्यांमध्ये वसलेले लाखो-करोडो लोक ज्याप्रमाणे आपले जेवण स्वतः बनवतात त्याचप्रमाणे ते आपले कपडेही स्वतःच तयार करू लागले तर ते सर्व दृष्टीने चांगले आणि सुरक्षितपणाचे होईल. जीवनाच्या मुख्य उत्पादनावर गावांचे नियंत्रण राहिले नाही तर ते ते स्वातंत्र्य

कायम टिकवू शकणार नाहीत, ज्याचा उपभोग ते अनादी काळापासून घेत आले आहेत. (यंग, २-७-१९३१, पृ. १६१)

## मोठ्या प्रमाणावर केलेले उत्पादन

मोठ्या प्रमाणावर करण्यात आलेले उत्पादन उपभोक्त्यांच्या वास्तविक गरजांचे भान ठेवत नाही. विशाल प्रमाणावरील उत्पादन मुळात चांगली गोष्ट असती तर त्यात अनंतपटीने वृद्धी करण्याची क्षमता असायला पाहिजे होती. परंतु हे निश्चितपणे सिद्ध करता येऊ शकते की विशाल प्रमाणावरील उत्पादनालाही स्वतःच्या सीमा आहेत. सर्व देशांनी विशाल प्रमाणावरील उत्पादन सुरू केले तर त्यांच्या उत्पादनाला खपवण्यासारखा विशाल बाजार उपलब्ध होणार नाही. यामुळे त्यावर अंकुश लावावा लागेल. (हरि, २-११-१९३४,पृ. ३०१)

स्पष्टपणे मी माझे मत सांगेन की विशाल प्रमाणावरील उत्पादनच विश्वसंकटाकरिता जबाबदार आहे. क्षणभर जरी मान्य केले की यंत्रे माणसाच्या सर्व गरजा पूर्ण करू शकतील तरी त्यांचे कार्य उत्पादनाच्या विशिष्ट क्षेत्रापर्यंतच मर्यादित राहील आणि तुम्हाला वितरणाची एक वेगळी जटिल व्यवस्था निर्माण करावी लागेल. उलट ज्या भागात वस्तूची गरज आहे तिथेच तिचे उत्पादन आणि वितरण या दोन्ही गोष्टी केल्या तर त्यांचे नियंत्रण आपोआपच होते व त्यात फसवणुकीला कमी संधी असते आणि सट्टेबाजीला तर तिथे मुळीच वाव नसतो.

विशाल प्रमाणावरील उत्पादनाची मी कल्पना नक्कीच करतो परंतु ते बळावर आधारित नसावे. चरख्याचा संदेश त्याचे एक उदाहरण आहे. हे विशाल प्रमाणावरील उत्पादन आहे परंतु त्याचे ठिकाण लोकांची आपापली घरे आहेत. तुम्ही जर वैयक्तिक उत्पादन लक्षावधींच्या पटीने वाढवले तर ते विशाल प्रमाणावरील उत्पादन आहे असे म्हणता येणार नाही काय? (हरि, २-११-१९३४, पृ. ३०१-२)

## संपत्तीचे केंद्रीकरण

मला संपत्तीचे केंद्रीकरण हवे आहे, परंतु ते काहीच लोकांच्या हाती नसावे, तर सर्व लोकांच्या हाती असावे. आज मूठभर लोकांना लाखो लोकांच्या पाठीवर बसण्याकरिता यंत्र मदत करत आहे. यामागे जी प्रेरणा काम करत आहे ती लोकोपकारार्थ श्रम वाचवण्याची नसून लोभाची आहे. माझ्या पूर्ण शक्तीनिशी मी हिच्याशी संघर्ष करतो आहे.... (यंग, १३-११-१९२४, पृ. ३७८)

मूठभर लोकांच्या हातात संपत्ती आणि सत्ता यांचे केंद्रीकरण आणि लाखो

लोकांच्या शोषणाकरिता यांत्रिक पद्धतीचे संचालन यांना मी वाईट गोष्ट समजतो. आजची यांत्रिक संघटनपद्धती बहुधा अशा प्रकारची आहे. इतरांना वगळणारी यंत्रांची शक्ती व शोषण करण्याचे त्यांचे सामर्थ्य यांना बाजूला सारून त्यांना परत त्यांची जागा दाखवून देण्याकरिता चरख्याच्या आंदोलनाचा एक संघटित प्रयत्न आहे. यामुळेच माझ्या योजनेत यंत्रांचे मालक केवळ आपल्या वा आपल्या राष्ट्राच्याच हिताचा विचार करणार नाहीत तर संपूर्ण मानवजातीच्या हिताचा विचार करतील. (यंग, १७-९-१९२५, पृ. ३२१)

भारताच्या सात लाख गावांमध्ये पसरलेल्या जिवंत यंत्रांच्या विरोधात निर्जीव यंत्रांना उभे करता येऊ शकत नाही. यंत्रांनी मानवी श्रम सोपे बनवले आणि त्यात त्याला मदत केली तर तो यंत्रांचा सदुपयोग होईल. आज यंत्रांचा उपयोग लाखोकरोडो लोकांच्या तोंडातील घास हिसकून घेणे, त्यांची उपेक्षा करणे व मूठभर लोकांच्या हातात संपत्तीचे केंद्रीकरण करणे याकरिता होत आहे. (हरि, १४-९-१९३५, पृ. २४४)

**विकेंद्रीकरण**

जेव्हा उत्पादन आणि उपभोग एकाच ठिकाणी होतात तेव्हा कोणत्याही किमतीवर उत्पादनात अंदाधुंद वृद्धी करण्याची लालूच नाहीशी होते, तेव्हा आपल्या वर्तमान अर्थव्यवस्थेच्या सर्व अडचणी आणि समस्या संपून जातील...., तेव्हा मूठभर लोकांजवळ वस्तूंचा बेसुमार साठा राहणार नाही आणि उरलेल्यांना गरज असताना वस्तूंशिवाय राहावे लागणार नाही....

माझ्या योजनेत मुख्य महत्त्व श्रमाला आहे, धातूच्या चलनी नाण्याला नाही. जी व्यक्ती आपल्या श्रमाचा उपयोग करू शकते तिच्याजवळ हे नाणे असेल. ती आपल्या श्रमाला कपड्यांमध्ये बदलू शकते, अन्नधान्यात बदलू शकते. जर तिला पॅरफिन तेल हवे असेल, जे ती स्वतः बनवत नाही, तर ते ती अतिरिक्त धान्याच्या मोबदल्यात घेऊ शकेल. स्वेच्छापूर्वक, न्याय्य आणि बरोबरीच्या नात्याने केलेला हा व्यवहार असेल. त्यामुळे लूट होणार नाही. ही तर पूर्वीच्या प्राथमिक स्वरूपाच्या वस्तुविनिमयाच्या पद्धतीची पुनरावृत्ती आहे असा आक्षेप तुम्ही घेऊ शकाल. परंतु सर्व आंतरराष्ट्रीय व्यापार वस्तुविनिमयावर आधारित नाहीत काय? (हरि, २-११-१९३४, पृ. ३०२)

मोठमोठ्या यंत्रांच्या मदतीने उद्योगाचे केंद्रीकरण करण्याला व मोठेमोठे ट्रस्ट

बनवण्याला माझा व्यक्तिगत विरोध आहे.... भारत जर खादी आणि तिच्याशी जुळलेल्या सर्व गोष्टींचा अंगीकार करील तर आधुनिक यंत्रांमधून केवळ तेवढ्याचाच स्वीकार केला जाईल जे जीवनाला सुविधाजनक बनवण्याकरिता आणि श्रम वाचवण्याकरिता आवश्यक असतील. (यंग, २४-७-१९२४, पृ.२४६)

## शोषण नाही

अशा रीतीने लॅंकेशायरचे लोक आपल्या यंत्रांचा उपयोग भारताच्या आणि इतर देशांच्या शोषणाकरिता करणार नाहीत. उलट ते असा उपाय शोधून काढतील की ज्यामुळे भारत आपल्याच गावांमध्ये कापसापासून कापड तयार करू शकेल. अशाच प्रकारे अमेरिकेतील लोकही शोध लावण्याच्या आपल्या क्षमतेचा उपयोग जगातील अन्य जमातींचे शोषण करून श्रीमंत बनण्याकरिता करणार नाहीत. (यंग, २७-९-१९२५, पृ. ३२१)

वर्तमान अव्यवस्थेचे कारण काय आहे? माझ्या मते शक्तिशाली राष्ट्रांद्वारे दुर्बल राष्ट्रांचे होणारे शोषण हे त्याचे कारण नाही तर समतुल्य राष्ट्र परस्परांचे जे शोषण करतात ते या अव्यवस्थेचे कारण आहे. यंत्रांबद्दलच्या माझ्या मूलभूत विरोधाचे कारण हेच आहे की यंत्रांनी या राष्ट्रांना इतर राष्ट्रांचे शोषण करण्याकरिता मदत केली. यंत्र स्वतः एक जड वस्तू आहे आणि त्याचा चांगला वा वाईट असा दोन्ही प्रकारे उपयोग करता येऊ शकतो. परंतु आपल्याला माहीत असल्याप्रमाणे कोणत्याही गोष्टीचा वाईट उपयोग करणे अधिक सोपे असते. (यंग, २२-१०-१९३१, पृ. ३१८)

## यंत्रांचे स्थान

यंत्रांचे स्वतःचे एक स्थान आहे, त्यांचा लोप होण्याची शक्यता नाही. परंतु यंत्रांना अनिवार्यपणे मानवीश्रमाची जागा घेऊ देण्याला परवानगी देता येऊ शकत नाही....

एखादा चांगल्या प्रकाराचा नांगर विकसित होऊ शकला तर ती चांगली गोष्ट होईल. परंतु एखाद्या यंत्राच्या शोधाच्या मदतीने एखादा माणूस जर भारतातील सर्व जमिनींची लागवड करून सर्व पिकांवर आपले नियंत्रण प्रस्थापित करू शकला आणि लाखो-करोडो गरिबांना करण्यासारखे कोणतेच काम शिल्लक राहणार नसेल तर ते उपाशी मरतील आणि ते बेकार झाल्यामुळे त्यांची बुद्धी मंद होईल, जशी आधीच ब-याच लोकांची झालेली आहे. यंत्रांमुळे अनेक लोक या दयनीय अवस्थेत पोहोचण्याचा धोका आहे.

कुटिरोद्योगांच्या यंत्रसामग्रीच्या सुधारणेचे सर्व प्रकारे मी स्वागत करतो. परंतु जोपर्यंत आपल्या लाखोकरोडो शेतक-यांना त्यांच्याच घरात करण्यासारखे कोणतेही कामकाज पुरवू शकत नाही तोपर्यंत विजेवर चालणारे माग लावणे म्हणजे हाताच्या मेहनतीला विस्थापित करणारा अपराध होईल. (यंग, ५-१-१९२५, पृ. ३७७)

सर्वांच्या भल्याकरिता करण्यात आलेल्या प्रत्येक शोधाचे मी स्वागत करीन. परंतु एक शोध आणि दुसरा शोध यांच्यात अंतर आहे. एका झटक्यात हजारो लोकांना मारून टाकणा-या विषारी वायूच्या शोधाला मी महत्त्व द्यायला नको. लोकोपयोगी सेवेकरिता उपयोगात येणारी अवजड यंत्रे, ज्यांचा मानवी श्रमाच्या दृष्टीने कोणताही पर्याय नाही, निश्चितपणे अनिवार्य आहेत. परंतु त्यांच्यावर राज्याचे स्वामित्व असले पाहिजे आणि त्यांचा प्रयोग लोकहिताकरिताच करण्यात आला पाहिजे. (हरि, २२-६-१९३५, पृ. १४६)

## यंत्रयुगाला आव्हान

आमच्या अर्थव्यवस्थेवर यंत्रांचा प्रभाव असल्यामुळे आपल्या युगाला यंत्रयुग म्हणून संबोधण्यात आले आहे. 'यंत्र काय आहे?' असा प्रश्न केला जाऊ शकतो. एका अर्थाने आजपर्यंत तयार झालेल्या सर्व यंत्रांमध्ये माणूस सर्वात अद्‌भुत यंत्र आहे. याच्यासारखे ना कोणते यंत्र बनवले जाऊ शकते ना या यंत्राची कोणी नक्कल करू शकतो. परंतु मी या शब्दाचा व्यापक अर्थाने प्रयोग करत नाही आहे तर एका अशा उपकरणाच्या स्वरूपात मी हा प्रयोग करतो आहे की जे माणसाच्या अथवा पशूच्या श्रमाला पूरक होण्याऐवजी वा त्यांची कार्यकुशलता वाढवण्याऐवजी त्यांना विस्थापित करण्याचे कार्य करते.

भेद दाखवणारे यंत्राचे हे पहिले लक्षण आहे. याचे दुसरे लक्षण आहे याच्या वाढीला अथवा विकासाला कोणतीही मर्यादा नाही. मानवी श्रमासंबंधी असे म्हणता येऊ शकत नाही. मानवी श्रमाची क्षमता अथवा त्याचे यांत्रिक कौशल्य तुम्ही फार वाढवू शकत नाही. याच लक्षणांमधून आधुनिक यंत्रांची लक्षणे उत्पन्न होतात.

यंत्रांवर आपली इच्छा अथवा प्रतिभा स्वार झालेली दिसते. ते मानव श्रमाच्या विरोधात आहे. एक यंत्र एक हजार जरी नाही तरी शंभर लोकांना नक्कीच बेकार करू शकते. त्यामुळे बेरोजगारांचे आणि अर्धबेरोजगारांचे सैन्य वाढत जाते. यंत्राला असे करण्याची इच्छा असल्यामुळे ते तसे करत नसून यंत्रांचा हा नियम असल्यामुळे ते तसे करते. अमेरिकेत ही परिस्थिती बहुधा पराकोटीला

पोहोचली असावी.

यंत्रांचा विरोध मी आता सुरू केलेला नसून १९०८च्या आधीपासून मी तो करत आलो आहे. तेव्हा मी दक्षिण आफ्रिकेत होतो आणि माझ्या आजूबाजूला यंत्रेच यंत्रे होती. तेथील यंत्रांनी मी प्रभावित झालो नव्हतो तर त्यांच्याबद्दल माझ्या मनामध्ये तिरस्काराचीच भावना निर्माण झाली होती. त्याच वेळी माझ्या मनात विचार आला की, लाखो-करोडो लोकांचे शोषण करणारे यंत्र एक असा दैत्य आहे की ज्याची कोणाशीच तुलना होऊ शकणार नाही. सामाजिक घटक म्हणून सर्व माणसे समान असतील तर माणसाच्या अर्थव्यवस्थेत त्याला कोणतेही स्थान असू शकत नाही. माझी खात्री आहे की यंत्रांमुळे माणसाच्या प्रतिष्ठेत कोणतीही भर पडलेली नाही आणि यंत्राला जर त्याची योग्य जागा दाखवली नाही तर त्याच्यामुळे जगाची सेवा तर होणारच नाही उलट त्यात अव्यवस्थाच निर्माण होईल.

दक्षिण आफ्रिकेतच रेल्वेतून डरबन येथे जाण्याकरिता प्रवास करत असताना रस्किनचे 'अनटू धिस लास्ट' हे पुस्तक मी वाचले व त्याने मला लगेच भारून टाकले. मानव जातीला जर प्रगती करायची असेल आणि समता आणि बंधुभावाचा आदर्श प्राप्त करायचा असेल तर तिला 'अनटू धिस लास्ट'च्या मार्गाचे अनुसरण करावे लागेल. लुळे, पांगळे आणि अपंग यांनाही तिला आपल्या सोबत घेऊन चालावे लागेल. धर्मराज युधिष्ठिराने आपल्या स्वामिभक्त कुत्र्याशिवाय स्वर्गात प्रवेश करण्याला नकार दिला नव्हता काय?
(हरि, २५-८-१९४६, पृ. २८१)

आज भारतावर पश्चिमेकडील यंत्रांचा एवढा भीषण हल्ला सुरू आहे. भारताला त्याचा प्रतिकार करता आला तर ती गोष्ट एखाद्या चमत्कारापेक्षा कमी ठरणार नाही. (यंग, १७-११-१९४६, पृ. ४०५)

## ४९. उद्योगीकरणाचा अभिशाप

मानव स्वभावावर श्रद्धा असणे चांगली गोष्ट आहे. माझ्या याच श्रद्धेमुळे मी जिवंत आहे. परंतु अखेरीस सर्व काही जरी चांगले होणार असले तरी आजच्या पूर्वीही व्यक्ती आणि राष्ट्र म्हणवले जाणारे व्यक्तिसमूह नष्ट झाले आहेत या ऐतिहासिक तथ्याकडे ही श्रद्धा मला डोळेझाक करू देत नाही. रोम, ग्रीस, बॅबिलोनिया, इजिप्त आणि इतरही अनेक देशांची उदाहरणे अशी आहेत की, ज्यातून आपल्या

कुकृत्यांमुळे राष्ट्रे नष्ट झाल्याचे आपल्याला आढळते.

आपल्या तीक्ष्ण आणि वैज्ञानिक दृष्टीमुळे युरोप वस्तुस्थिती समजून घेईल आणि आपली पावले परत घेऊन नैतिक पतनाकडे नेणा-या उद्योगीकरणापासून बचाव करण्याचा मार्ग शोधून काढेल अशी आशा आपण केली पाहिजे. याकरिता आधीच्या अमर्याद साधेपणाकडे परतण्याची गरज नाही. याकरिता ज्यात ग्रामीण जीवनाची प्रमुख भूमिका असेल आणि पाशवी आणि भौतिक शक्तींवर आध्यात्मिक शक्तीचा अंकुश असेल अशा प्रकारे समाजाची पुनर्रचना करावी लागेल.
(यंग, ६-८-१९२५, पृ. २७३)

उद्योगवादाचे भविष्य अंधःकारमय आहे. अमेरिका, जपान, फ्रान्स आणि जर्मनी आज इंग्लंडचे यशस्वी स्पर्धक म्हणून पुढे आले आहेत. भारतातील मूठभर गिरण्यासुद्धा इंग्लंडमधील गिरण्यांशी स्पर्धा करत आहेत आणि आज भारतात ज्या प्रकारची जागृती झाली आहे तशीच जागृती नैसर्गिक संपदेने अतिशय संपन्न असलेल्या आणि भरपूर मानव संसाधन असलेल्या दक्षिण आफ्रिकेतही आता होणार आहे.

शक्तिशाली आफ्रिकी वंशाच्या लोकांसमोर शक्तिशाली इंग्रज पिग्मी वाटतात. तुम्ही म्हणाल की अखेरीस ते रानटी कुलीन आहेत. ते कुलीन आहेत हे खरे आहे परंतु रानटी नाहीत आणि काही वर्षांमध्ये पाश्चात्त्य राष्ट्रांना आपले उत्पादन आफ्रिकी बाजारामध्ये खपवणे अशक्य असल्याचे आढळून येईल. उद्योगवादाचे भविष्य पश्चिमेतच अंधारात आहे तर भारताची अवस्था अजूनच अंधारात असल्यासारखी होणार नाही काय? (यंग, १२-११-१९३१, पृ. ३५५)

उद्योगवाद मानवजातीकरिता अभिशाप सिद्ध होईल अशी मला भीती वाटते. एक राष्ट्र दुस-या राष्ट्राचे कायम शोषण करू शकत नाही. शोषण करण्याचे सामर्थ्य, उपलब्ध विदेशी बाजार आणि स्पर्धेचा अभाव या गोष्टींवर उद्योगवाद अवलंबून असतो.... (यंग, १२-११-१९३१, पृ. ३५५)

मी जेव्हा रशियाकडे पाहतो, जिथे उद्योगवाद अत्युच्च शिखरावर पोहोचला आहे, तेव्हा मला तेथील जीवन स्पृहणीय असल्याचे जाणवत नाही. 'बायबल'च्या भाषेचा प्रयोग करायचा तर 'माणसाला सर्व जग मिळाले आणि त्याच्या मोबदल्यात त्याचा आत्मा नष्ट झाला तर त्याने काय मिळवले?' आधुनिक शब्दांत आपले व्यक्तिमत्त्व हरवून यंत्राच्या चाकातील केवळ एक दाता बनणे मानवी प्रतिष्ठेला अनुकूल नाही. प्रत्येक व्यक्ती समाजाची ओजस्वी आणि पूर्णपणे

विकसित घटक बनावी अशी माझी इच्छा आहे. (हरि, २८-१-१९३९, पृ. ४३८)

भारताने परत पाश्चात्त्य पद्धतीच्या उद्योगवादाचा स्वीकार केला असे ईश्वरकृपेने होऊ नये. तीस कोटी लोकसंख्या असलेला संपूर्ण देश जर पाश्चात्त्य पद्धतीच्या आर्थिक शोषणाकडे वळला तर टोळधाडीप्रमाणे तो सर्व जगाला फस्त करून टाकेल. भारताचे भांडवलदार आपल्या प्रतिभेचा उपयोग संपत्ती मिळवण्याकरिता करण्याऐवजी जनतेचे विश्वस्त बनून परोपकाराच्या भावनेने जनसेवेकरिता करून या संकटापासून आपल्याला वाचवणार नसतील तर अखेरीस एक तर जनता त्यांच्या हातून नष्ट होईल वा जनतेच्या हातून त्यांचा विनाश होईल. (यंग, २०-१२-१९२८, पृ. ४२२)

भारत अन्य राष्ट्रांचे शोषण सुरू करील - जर त्याचे उद्योगीकरण झाले तर असेच होईल - तर तो इतर राष्ट्रांसाठी अभिशाप बनेल, तेव्हा भारत सर्व जगाला संकटात ढकलणारा होईल. भारताने इतर राष्ट्रांचे शोषण करावे असा विचार मी कशासाठी करू? परंतु इंग्लंडला आपल्या तीस लाख लोकांना काम देता येणे शक्य होत नाही आणि या समस्येचे उत्तर इंग्लडमधील मोठमोठ्या विचारवंतांना देता येणे शक्य होत नसताना आम्ही आमच्या तीस कोटी बेकारांकरिता काम कसे शोधू शकू? तुम्हाला या परिस्थितीतील शोकांतिका दिसत नाही काय? (यंग, १२-११-१९३१, पृ. ३५५)

## उद्योगीकरणाचे पर्याय

उद्योगीकरण कोणत्याही देशाकरिता कोणत्याही परिस्थितीत उपयुक्त आहे असे मी समजत नाही. भारताकरिता तर याची अजिबात गरज नाही. खरे सांगायचे तर आपल्या हजारो झोपड्यांचा विकास करून एक साधे परंतु उदात्त जीवन स्वीकारून आणि जगाबरोबर शांततापूर्वक राहूनच कण्हत असलेल्या जगाबद्दलची आपली जबाबदारी भारत पार पाडू शकतो. उच्च विचार आणि लक्ष्मीच्या पूजेमुळे आमच्यावर लादले गेलेले गुंतागुंतीचे वेगवान भौतिक जीवन यात कोणतीही सुसंगती नाही. उदात्त जीवन जगण्याची कला आत्मसात केल्यानंतर जगातील सर्व सुख मिळवता येऊ शकते....

संशयवादी विचारू शकतात की डोक्यापासून तर पायांपर्यंत शस्त्रसज्ज असलेल्या आणि डामडौल व अवडंबरपूर्ण जीवन जगणा-या जगात एखादे राष्ट्र, मग ते क्षेत्रफळाने वा लोकसंख्येने वा या दोन्हींमुळे कितीही मोठे असले तरी,

वेगळे राहून साधेपणाच्या जीवनाच्या आदर्शाला आपला आदर्श मानू शकेल काय? उत्तर अगदी साधे आहे. जर साधेपणाचे जीवन हे जगण्यासारखे जीवन असेल तर एका व्यक्तीने वा एका समूहाने जरी त्याकरिता प्रयत्न केला तरी आपण त्याचे स्वागत केले पाहिजे.

## राजकीय नियंत्रण

माझा विश्वास आहे की काही महत्त्वाचे उद्योग आवश्यक आहेत. माझा आरामखुर्चीतील म्हणजे अव्यावहारिक समाजवादावर वा सशस्त्र समाजवादावर विश्वास नाही. संपूर्ण परिवर्तनाची वाट न पाहता माझ्या विश्वासाप्रमाणे कृती करण्यावर माझा विश्वास आहे. त्यामुळे महत्त्वाच्या उद्योगाची यादी तयार करत न बसता मी म्हणेन की जिथे अनेक लोकांना काम करावे लागते तिथे मी राज्याची मालकी पसंत करेन. यात कुशल आणि अकुशल दोन्ही प्रकाराचे श्रमिक राज्याच्या माध्यमातून आपल्या उत्पादनाचे मालक असतील. परंतु माझ्या कल्पनेतील असे राज्य केवळ अहिंसेच्या आधारावर राहणार असल्यामुळे तेथील श्रीमंतांची संपत्ती त्यांच्या इच्छेशिवाय ताब्यात घेण्यात येणार नाही. उलट राज्याची मालकी निर्माण करण्याच्या कामात मदत करण्याकरिता श्रीमंतांना आमंत्रिले जाईल. समाजात अस्पृश्य कोणीही नाही, मग तो लखपती असो वा कंगाल. हे दोघेही एकाच आजाराचे गळू आहेत. (हरि, १-९-१९४६, पृ. २८५)

## ग्रामोद्योगांचे पुनरुज्जीवन

ज्या ग्रामोद्योगांचे पुनरुज्जीवन शक्य असेल त्यांच्या पुनरुज्जीवनाचा प्रयत्न करत असताना.... मी तेच करतो आहे जे ग्रामीण जीवनाबद्दल प्रेम असलेली प्रत्येक व्यक्ती वा गावांच्या विघटनाचा अर्थ समजणारी प्रत्येक व्यक्ती करण्याचा प्रयत्न करीत आहे. आपले पीठ वा कणिक स्वतः दळून त्यातील पौष्टिक कोंडा न काढता ते खायला मी गावक-यांना का सांगतो आहे? अथवा ऊसापासून कमीतकमी आपल्या गरजेपुरता गूळ तयार करायला सांगून आधुनिक संस्कृतीपासून माघारी फिरायला मी त्यांना का सांगतो आहे? गावक-यांनी केवळ पीक काढण्यापर्यंत सीमित राहू नये तर आपल्या पिकाचे त्यांनी विक्रीयोग्य वस्तूंमध्ये रूपांतरही करावे या माझ्या आग्रहामुळे त्यांच्या दैनिक उत्पन्नात दोन पैशांची भर पडली तर मी आधुनिक संस्कृतीला मागे वळवण्याचा प्रयत्न करतो आहे का? (हरि, ४-१-१९३५, पृ. ३७२)

गावांचे पुनरुज्जीवन तेव्हाच शक्य होईल जेव्हा त्यांचे शोषण बंद होईल. विशाल प्रमाणावरील उद्योगीकरणाशी स्पर्धा आणि विक्रीच्या समस्या या गोष्टी जुळलेल्या असल्यामुळे अपरिहार्यपणे गावांचे निष्क्रिय आणि सक्रिय शोषण होईल. यामुळे गावांच्या स्वावलंबनावर आम्हाला भर द्यावा लागेल. त्यांनी स्वतःला लागणा-या वस्तू स्वतः तयार केल्या पाहिजे. ग्रामोद्योगाचे हे स्वरूप कायम ठेवल्यानंतर त्यांनी अशी आधुनिक यंत्रे आणि अवजारे वापरण्यास काहीही हरकत नाही जी ते विकत घेऊन वापरू शकतात. अट एवढीच की, त्यांचा उपयोग इतरांच्या शोषणाकरिता होऊ नये. (हरि, २८-९-१९४६, पृ. २२६)

### खरी योजना

मी या विधानाचे मनःपूर्वक समर्थन करतो की जर एखादी योजना देशाच्या कच्च्या मालाच्या शोषणावर भर देत असेल आणि अपेक्षेपेक्षा अधिक शक्तिशाली होण्याच्या शक्यतेमुळे मानवशक्तीची उपेक्षा करत असेल तर ती योजना असंतुलित आहे व तिच्याद्वारे माणसा-माणसांमध्ये समता प्रस्थापित होऊ शकत नाही....

भारताच्या कच्च्या मालाची निर्यात करून परदेशात निर्माण झालेला तयार माल भरमसाट किंमतीत विकत घेऊन तो भारताच्या गावांमध्ये विकण्याऐवजी भारताच्या संपूर्ण मानव शक्तीचा इष्टतम उपयोग करून तो कच्चा माल भारतातील गावांमध्ये वितरित करणे हा ख-या योजनेचा माझा अर्थ आहे. (हरि, २३-३-१९४७, पृ. ७९)

## ५०. समाजवाद

'सबै भूमी गोपालकी' असे शिकवणा-या आपल्या पूर्वजांकडून आपल्याला खरा समाजवाद मिळाला आहे. मग सीमारेषा कोणती आहे? माणूसच ती रेषा बनवणारा आहे व ती रेषा मिटवू शकणाराही माणूसच आहे. गोपालचा शब्दशः अर्थ आहे गुराखी; त्याचा अर्थ ईश्वर असाही आहे. आधुनिक भाषेत याचा अर्थ आहे राज्य अथवा जनता. हे खरे आहे की आज भूमी जनतेच्या मालकीची नाही. परंतु हा दोष आमच्या पूर्वजांच्या शिकवणुकीचा नाही. आपण ती शिकवण आपल्या जीवनात उतरवू शकलो नाही हा आपला दोष आहे.

मला याबद्दल कोणताही संशय नाही की रशियासहित कोणत्याही राष्ट्राकरिता

ही गोष्ट मिळवणे जितके कठीण आहे तितकेच आमच्याकरिताही आहे व याकरिता हिंसेचा उपयोग करण्याची गरज नाही. (हरि, २-१-१९३७, पृ. ३७५)

स्वाभिमानी जीवनाकरिता जितक्या भूमीची आवश्यकता असते त्यापेक्षा अधिक जमीन कुणाजवळही असू नये. सर्वसामान्य लोकांच्या दारिद्र्याचे कारण हे आहे की त्यांची म्हणायला त्यांच्याजवळ कोणतीही जमीन नाही ही गोष्ट कोण नाकारू शकेल? (हरि, २०-४-१९४०, पृ. ९७)

**पाश्चात्त्य समाजवाद**

मी पाश्चात्त्य समाजव्यवस्थेचा एक सहानुभूतिपूर्ण विद्यार्थी राहिलो आहे आणि पश्चिमेच्या आत्म्याच्या उत्कंठित अवस्थेतही सत्याचा सतत शोध सुरू असल्याचे मला आढळून आले आहे. मला ती भावना मूल्यवान वाटते. वैज्ञानिक संशोधनाच्या याच भावनेने आपण आपल्या पौर्वात्य संस्थांचा अभ्यास केला पाहिजे. यामुळे आम्हाला अशा एका ख-या समाजवादाचा आणि ख-या साम्यवादाचा विकास करता येईल ज्याची आजपर्यंत जगाने कल्पनाही केली नसेल. सामान्य जनतेच्या समस्यांच्या सोडवणुकीचा अंतिम उपाय पाश्चात्त्य समाजवाद वा साम्यवादच आहे असे समजणे चूक होईल. (अबाप, ३-८-१९३४)

भांडवलदारांनी भांडवलाचा दुरुपयोग केल्याचा जेव्हा शोध लागला तेव्हा समाजवादाचा जन्म झालेला नाही. मी सांगत असल्याप्रमाणे ईशोपनिषदाच्या पहिल्या श्लोकात समाजवादाचीच नाही तर साम्यवादाचीही स्पष्ट झलक आहे. सत्य हे आहे की जेव्हा काही सुधारकांचा हृदयपरिवर्तनाच्या पद्धतीवरील विश्वास उडाला तेव्हा वैज्ञानिक समाजवादाच्या तंत्राचा जन्म झाला. ज्या समस्येचा सामना वैज्ञानिक समाजवादी करत आहेत तीच समस्या सोडवण्याचा मीही प्रयत्न करतो आहे.

हे खरे आहे की माझी पद्धती नेहमी विशुद्ध अहिंसेवर आधारित असते. शक्य आहे की मी अपयशी होईन. जर असे झाले तर तसे अहिंसेच्या पद्धतीबाबदच्या माझ्या अज्ञानामुळे होईल. ज्या सिद्धान्तांबद्दल माझी श्रद्धा दिवसेंदिवस वाढते आहे तिचा मी वाईट पुरस्कर्ता असल्याचेही त्यामुळे सिद्ध होऊ शकते.
(हरि, २०-२-१९३७, पृ. १२)

**माझा समाजवाद**

माझा दावा आहे की भारतातील माझ्या परिचित मित्रांनी समाजवादाचा स्वीकार केला त्याच्या ब-याच पूर्वीपासून मी समाजवादी होतो. परंतु माझ्या समाजवादाचा

शोध स्वाभाविकपणे लागला होता व त्याकरिता मला कोणत्याही पुस्तकाचा आधार घ्यावा लागला नव्हता. अहिंसेवरील माझ्या अढळ विश्वासातून तो निर्माण झाला होता. एखादा माणूस अहिंसेबाबत क्रियाशील असावा आणि त्याच वेळी सामाजिक अन्यायांच्या विरोधात मात्र त्याने उभे राहू नये असे होऊ शकत नाही. माझ्या समजाप्रमाणे दुर्दैवाने पश्चिमेतील समाजवाद्यांनी समाजवादी सिद्धान्त लागू करण्याकरिता हिंसेचा आधार घेणे जरुरीचे मानले आहे.

माझे नेहमीच असे मत राहिले आहे की, समाजातील सर्वात लहान आणि अगदी तळाच्या वर्गालाही बळजबरीने सामाजिक न्याय मिळवून देता येऊ शकत नाही. माझा या गोष्टीवर विश्वास आहे की समाजातील अगदी तळातील लोकांना अहिंसक उपायांचे नीट प्रशिक्षण दिले तर ते त्यांच्यावर होणारे अन्याय दूर करू शकतात. अहिंसक असहकार हे त्या उपायाचे नाव आहे.

(हरि, २०-४-१९४०, पृ. ९७)

माझ्या समाजवादी मित्रांच्या स्वार्थत्यागाच्या आणि बलिदानाच्या भावनेचा जरी मी मोठा प्रशंसक असलो तरी त्यांच्या आणि माझ्या पद्धतीतील अंतर मी कधीही लपवले नाही. हिंसा आणि तिच्याशी संबंधित गोष्टींवर त्यांचा पूर्ण विश्वास आहे. माझा अहिंसेवर पूर्णपणे विश्वास आहे....

माझा समाजवादाचा अर्थ आहे अखेरच्या व्यक्तीच्या हिताचाही विचार. आंधळ्या, बहि-या आणि पांगळ्या लोकांच्या हिताचा बळी देऊन मला माझा उत्कर्ष नको आहे. त्यांच्या समाजवादात यांच्याकरिता बहुधा स्थान नाही. त्यांचे एकमेव उद्दिष्ट भौतिक उन्नती आहे.

उदाहरणार्थ प्रत्येक व्यक्तीजवळ गाडी असली पाहिजे हे अमेरिकेचे ध्येय आहे. हे माझे ध्येय नाही. मला माझ्या व्यक्तिमत्वाच्या पूर्ण अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य हवे आहे. मला इथपर्यंत स्वातंत्र्य असले पाहिजे की, माझी इच्छा असली तर शुक्र ता-यापर्यंत जाण्याकरिता शिडी बनवण्याचा मला अधिकार असला पाहिजे. याचा अर्थ असा नाही की मला असे काही करायचे आहे. दुस-या प्रकारच्या समाजवादात व्यक्तिगत स्वातंत्र्य नावाची कोणतीही गोष्ट नाही. त्यात तुमची कशावरही मालकी नसते, स्वतःच्या शरीरावरही.

(हरि, ४-८-१९४६, पृ. २४६)

**समाजवादातील समता**

समाजवाद एक सुंदर शब्द आहे आणि माझ्या समजाप्रमाणे समाजवादात समाजातील सर्व सदस्य बरोबरीचे असतात - कोणीही खालचा नाही कोणीही वरचा नाही. माणसाच्या शरीरात डोके सर्वात उंचावर आहे याकरिता ते उच्च नाही आणि पायाचे तळवे धुळीला स्पर्श करतात म्हणून ते कमी प्रतीचे नाहीत. ज्याप्रमाणे शरीरातील सर्व अवयव बरोबरीचे आहेत त्याचप्रमाणे समाजातील सर्व सदस्य बरोबरीचे आहेत. हा समाजवाद आहे.

यात राजा आणि कृषक, श्रीमंत आणि गरीब, मालक आणि कर्मचारी सर्व समान स्तराचे आहेत. धार्मिक अर्थाने समाजवादात कोणतेही द्वैत नाही. केवळ एकत्व आहे.

आज सगळ्या जगाच्या सामाजिक व्यवस्थेत द्वैत अथवा अनेकत्व याशिवाय काहीही नाही. एकीचे तर कुठे दर्शनही होत नाही. हा माणूस उच्च आहे, हा खालचा आहे, हा हिंदू आहे, हा मुसलमान आहे, हा तिसरा ख्रिश्चन आहे, चौथा पारसी आहे, पाचवा शीख, सहावा यहुदी आहे. यातही परत उपविभाग आहेत. एकीची माझी जी धारणा आहे तिच्या अंतर्गत बाह्य अनेकत्वात पूर्ण एकीचा समावेश आहे.

ही स्थिती निर्माण व्हावी म्हणून तत्त्वज्ञान्याप्रमाणे आम्ही असे म्हणू शकत नाही की जोपर्यंत सर्व लोक समाजवादी होत नाहीत तोपर्यंत आम्ही काहीही करू शकत नाही. आपल्या जीवनात परिवर्तन आणल्याशिवाय आपण भाषणे देत राहायचे, पक्ष निर्माण करत राहायचे आणि शिकार समोर येताच गिधाडाप्रमाणे झडप घालायची. परंतु हा समाजवाद नाही. झडप घालण्यासारखी ही शिकार आहे असे आपण जितके समजू तितकाच तो आमच्यापासून दूर पळेल.

## साधन

समाजवादाची सुरुवात त्याकडे वळलेल्या पहिल्या अनुयायापासून सुरू होते. एक जरी अशी व्यक्ती असेल तर तुम्ही त्यावर शून्य चढवत जा. पहिले शून्य त्याला दहापट वाढवेल आणि नंतरचे प्रत्येक शून्य त्यापूर्वीच्या संख्येला दहापट. परंतु शून्यावरच शून्य असतील, म्हणजे सुरुवात करणारा कोणीच नसेल तर नंतरचे शून्यही शून्यच राहतील. शून्य लावण्यात जो कागद आणि वेळ खर्च होईल तो मात्र वाया जाईल.

माझा हा समाजवाद स्फटिकाप्रमाणे स्वच्छ आहे. यामुळे तो मिळवण्याचे

साधनही स्फटिकाप्रमाणे स्वच्छ असले पाहिजे. मलीन साधनांपासून मलीन ध्येय सिद्ध होत असते. ज्याप्रमाणे राजाचे डोके कापल्यामुळे राजा आणि कृषक बरोबरीचे होणार नाहीत त्याप्रमाणे मालकाचे डोके कापल्याने मालक आणि त्याचे कर्मचारी बरोबरीचे होणार नाहीत.

असत्याद्वारे सत्याची प्राप्ती होऊ शकत नाही. सत्याचरणाद्वारेच सत्यापर्यंत पोहोचता येऊ शकते. सत्य आणि अहिंसा जुळे नाहीत काय? याचे स्पष्ट उत्तर आहे 'नाही'. अहिंसा सत्यात समाविष्ट आहे आणि सत्य अहिंसेत. यामुळेच असे म्हणण्यात येते की या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, यांना एकमेकांपासून वेगळे करता येऊ शकत नाही. नाण्याची कोणतीही एक बाजू वाचा. शब्द वेगळे असतील परंतु नाण्याचे मूल्य तेच असेल.

ही सौभाग्याची स्थिती संपूर्ण शुद्धतेशिवाय प्राप्त करता येऊ शकत नाही. मनात वा शरीरात अशुद्धतेला वाढण्याची संधी देताच तात्काळ तुमच्यात असत्य आणि हिंसा शिरतील.

यामुळे केवळ सत्यनिष्ठ, अहिंसक आणि शुद्ध हृदयाचे समाजवादीच भारतात आणि जगात समाजवादाची स्थापना करू शकतील. माझ्या माहितीप्रमाणे जगात असा एकही देश नाही जिथे शुद्ध स्वरूपात समाजवादी आहेत. मी वर ज्या साधनांचे वर्णन केले त्यांच्याशिवाय अशा प्रकारचा समाजवाद अशक्य आहे. (हरि, १३-७-१९४७, पृ. २३२)

समाजवादी आणि साम्यवादी सांगतात की आर्थिक समता आणण्याकरिता ते आज काहीही करू शकतात. ते समाजवादाच्या बाजूने केवळ प्रचार करत राहतील आणि त्याकरिता घृणा निर्माण करण्यावर आणि ती वाढवण्यावर त्यांचा विश्वास आहे. त्यांचे म्हणणे आहे की 'जेव्हा आमच्या हाती सत्ता येईल तेव्हा आम्ही बळजबरीने समता निर्माण करू'.

....मी जरी श्रीमंतांनी निर्माण केलेल्या गाड्या आणि इतर सुविधांचा उपयोग करतो तरी मी पट्टीचा साम्यवादी असल्याचा माझा दावा आहे. या श्रीमंतांचा माझ्यावर किंचितही प्रभाव नाही आणि ज्या क्षणी मला वाटेल की सर्वसामान्य जनतेच्या हिताकरिता यांचा त्याग करण्याची गरज आहे त्या क्षणी यांना मी माझ्यापासून दूर करेन. (हरि, ३१-३-१९४६, पृ. ६४)

**शिक्षणाद्वारे**

परंतु हे समजून घेतले पाहिजे की सुधारणा घाईगडबडीत करता येत नाहीत. जर त्या अहिंसक पद्धतीने करायच्या असतील तर 'आहेरे' आणि 'नाहीरे' या दोन्ही वर्गांना प्रशिक्षित करणे हाच त्यांचा मार्ग असू शकतो. पहिल्या वर्गाला आश्वासित करण्यात आले पाहिजे की तुमच्यावर कोणतीही बळजबरी केली जाणार नाही. तसेच 'नाहीरे'ना शिकवले पाहिजे की तुमच्या इच्छेशिवाय काहीही करण्याकरिता तुम्हाला कोणीही जबरदस्ती करू शकत नाही आणि अहिंसेच्या म्हणजे सहन करण्याच्या मार्गाने तुम्ही तुमचे स्वातंत्र्य स्वतः मिळवू शकता.

आपल्याला जर आपले ध्येय गाठायचे असेल तर मी वर ज्या शिक्षणाची रूपरेषा दिली आहे त्यानुसार आतापासून प्रशिक्षणाला सुरुवात केली पाहिजे. पहिले पाऊल हे आहे की आपण परस्परांबद्दल आदर आणि विश्वासाचे वातावरण निर्माण केले पाहिजे. विशिष्ट वर्ग आणि सर्वसामान्य लोकांमध्ये हिंसक संघर्ष होऊ शकत नाही. (हरि, २०-४-१९४०, पृ. ९७)

## ईश्वरावर श्रद्धा

समाजवादात सत्य आणि अहिंसेचा समावेश असणे आवश्यक आहे. याकरिता समाजवाद्यांच्या पुरस्कर्त्यांची ईश्वरावर जिवंत श्रद्धा असणे आवश्यक आहे. जर त्यांचा सत्य आणि अहिंसेबद्दलचा केवळ औपचारिक आग्रह असेल तर ऐन वेळी त्याची हार होईल. म्हणूनच मी सांगत असतो की सत्यच ईश्वर आहे.

हा ईश्वर एक जिवंत शक्ती आहे. आपले जीवन या शक्तीच्याच अधिकारात आहे. हीच शक्ती आमच्यात वास करत असते, परंतु ती आमचे शरीर नाही. जी व्यक्ती या महान शक्तीला नाकारते ती या अपार शक्तीचा उपयोग करून घेण्यापासून स्वतःला वंचित करते व स्वतःच पौरुषहीन होऊन राहते. ती एखाद्या शीड नसलेल्या नावेप्रमाणे असते. अशी नाव कधी इकडे तर कधी तिकडे अशी हिंदकळत असते आणि आपल्या मार्गावर पुढे न जाताच ती नष्ट होत असते. अशा लोकांचा समाजवाद त्यांचे स्वतःचेही भले करत नाही, मग ज्या समाजात ते राहतात त्या समाजाचे भले करण्याची तर गोष्टच सोडा.

असे जर असेल तर याचा अर्थ असा आहे का की, एकाही समाजवाद्याचा ईश्वरावर विश्वास नाही? मग असे काही समाजवादी असतील तर स्पष्टपणे दिसू शकेल अशी प्रगती त्यांना का करता आली नाही? याशिवाय अनेक धर्मपरायण लोक आमच्या पूर्वी या जगात झाले आहेत. त्यांना समाजवादी राज्याचा पाया

का रचता आला नाही?

या दोन प्रश्नांचे पूर्णपणे समधानकारक उत्तर देणे कठीण आहे. तरीही समाजवादावर विश्वास असलेल्या एखाद्या व्यक्तीला त्याच्या समाजवादात आणि ईश्वरात काही संबंध आहे हे सुचलेच नसेल असे कदाचित याचे कारण सांगता येईल. असेही निःसंकोचपणे सांगता येईल की धर्मपरायण लोकांनी सर्वसामान्य जनतेसमोर समाजवादाचा आदर्श कधीही ठेवलाच नाही.

धर्मपरायण स्त्री-पुरुष असतानाही जगात अंधविश्वास फळफळले आहेत. स्वतः हिंदू समाजातही अस्पृश्यतेचा फार प्रभाव राहिला आहे.

सारांश असा की महान शक्ती आणि तिच्या गूढ शक्यता यांचे ज्ञान हा नेहमीच संशोधनाचा विषय राहिलेला आहे.

### सत्याग्रह - एक अचूक पद्धती

माझा दावा आहे की सत्याग्रहाचा शोध हा त्याच संशोधनाचा परिणाम आहे. परंतु मी असा दावा करत नाही की सत्याग्रहाचे सर्व नियम निश्चित झाले आहेत वा त्यांचा शोध लागला आहे. हो, एक गोष्ट मी न कचरता आणि खात्रीपूर्वक सांगू शकतो की सत्याग्रहाच्या प्रयोगाने कोणत्याही चांगल्या उद्दिष्टाची पूर्ती करता येऊ शकते. हे सर्वोच्च आणि अचूक साधन आहे, ही महानतम शक्ती आहे. अन्य कोणत्याही उपायाने समाजवाद कधीही स्थापन केला जाऊ शकत नाही. सत्याग्रह समाजाला त्याच्या राजकीय, आर्थिक, नैतिक वगैरे सर्व दोषांपासून मुक्त करू शकतो. (हरि, २०-७-१९४७, पृ. २४०)

### राष्ट्रीयीकरण

कराची काँग्रेसच्या ठरावात ठरवण्यात आल्याप्रमाणे माझा प्रमुख उद्योगांच्या राष्ट्रीयीकरणावर विश्वास आहे. यापेक्षा अधिक कोणत्याही गोष्टीची मी कल्पना करू शकत नाही आणि उत्पादनाच्या सर्व साधनांच्या राष्ट्रीयीकरणाच्याही मी विरोधात आहे. रवीन्द्रनाथ टागोरांचेही राष्ट्रीयीकरण केले पाहिजे काय? हे सर्व दिवास्वप्न आहे. (मासो, पृ. १०)

खाजगी उद्योग आणि योजनाबद्ध उत्पादन यांच्यावरही माझा विश्वास आहे. संपूर्ण उत्पादन शासकीय क्षेत्रात झाले तर लोक नैतिक आणि बौद्धिक दृष्टीने भिकारी होतील. ते आपल्या जबाबदा-या विसरतील यामुळेच मी भांडवलदारांजवळ त्यांचे कारखाने आणि जमीनदारांजवळ त्यांची जमीन राहू देणार

आहे. परंतु त्यांनी स्वतःला आपल्या संपत्तीचे विश्वस्त समजावे असे मी त्यांना सांगेन. (मासो, पृ. १२)

शासकीय नियंत्रणाशिवाय राष्ट्रीयीकरण शक्य आहे. श्रमिकांच्या हिताकरिता मी गिरण्या उघडू शकतो. (मासो, पृ. १३)

## ५१. समाजाचा समाजवादी ढाचा

### समाजवादी व्यवस्था

माझ्या दृष्टिकोनाबाबत जर मी देशाची संमती मिळवू शकलो तर भावी समाजव्यवस्था चरखा आणि त्याच्याशी संबंधित गोष्टींवर आधारित राहील. ग्रामवासीयांच्या कल्याणात ज्यामुळे वृद्धी होईल त्या सर्व गोष्टींचा यात समावेश असेल. यात उद्योग त्याज्य नसतील.... मर्यादा एवढीच की ते गाव आणि गावातील लोकांचा जीव गुदमरवणारे नसावे.

माझ्या कल्पनेनुसार हस्तोद्योगाबरोबरच वीज, जहाजनिर्माण, लोखंडाचे कारखाने, मशीन तयार करण्याचे कारखाने इत्यादी गोष्टीही गावांमध्ये असतील. परंतु अवलंबून राहण्याचा क्रम उलट असेल. आतापर्यंत उद्योगाच्या योजना अशा प्रकारे तयार करण्यात आल्या होत्या की त्यामुळे गाव आणि गावांमधील हस्तोद्योग नष्ट होत होते. भारताच्या भावी शासनात देशातील उद्योग गावांना आणि गावांतील हस्तोद्योगांना मदत करणा-याची भूमिका बजावतील.

### अहिंसक आधार

जीवनावश्यक गोष्टींचे केंद्रीकरण केले व त्या राज्याच्या ताब्यात असल्या तर त्याद्वारे सर्व लोकांचे हित निर्माण करण्याकरिता मदत होईल या समाजवादी विचारावर माझा विश्वास नाही. पश्चिमेकडील समाजवादी विचारधारेचा जन्म हिंसेने भरलेल्या वातावरणात झाला होता. पाश्चात्त्य आणि पौर्वात्य विचारसरणी-मागील उद्दिष्ट एकच आहे - संपूर्ण समाजाचे कमाल हित आणि त्या भयंकर विषमतेचे उन्मूलन ज्यामुळे लाखो-करोडो लोक 'नाहीरे'च्या वर्गात आहेत आणि मूठभर लोक 'आहेरे'च्या वर्गात. माझ्या मते या ध्येयाची परिपूर्ती तेव्हाच होऊ शकेल जेव्हा जगातील प्रखर बुद्धिमत्ता असलेले लोक न्यायोचित सामाजिक व्यवस्था निर्माण करण्याचा आधार म्हणून अहिंसेला मान्यता देतील. माझे ठाम मत आहे की पददलित वर्गाने हिंसेद्वारा सत्ता मिळवली तरी ते अखेरीस

अयशस्वी होतील. जी गोष्ट हिंसेद्वारा मिळवली जाते तिचा अंत अपेक्षाकृत तीव्र हिंसेने नक्कीच होतो. (हरि, २७-१-१९४०, पृ. ४२८)

स्वातंत्र्याची सुरुवात तळापासून व्हायला पाहिजे. त्यानुसार प्रत्येक गाव एका गणतंत्राचे वा पंचायतीचे रूप घेईल व त्याला पूर्ण अधिकार असतील. याचा अर्थ असा आहे की प्रत्येक गावाला स्वावलंबी बनावे लागेल आणि आपल्या गावातील सार्वजनिक कल्याणाच्या गोष्टींची काळजी घेण्याची क्षमताही त्याच्यात असावी लागेल, एवढेच नाही तर संपूर्ण जगापासून आपले रक्षण करण्याची शक्तीही त्याच्यात असायला हवी. बाह्य आक्रमणापासून स्वतःचे रक्षण करत असताना नष्ट होण्याचे प्रशिक्षण गावांना दिले जाईल व त्याकरिता तयार राहण्याकरिता त्यांची तयारी केली जाईल.

अशा रीतीने अखेरीस व्यक्तीलाच एक घटक मानण्यात येईल. याचा अर्थ असा नाही की ती व्यक्ती शेजा-यांवर वा बाहेरील जगावर अगदीच अवलंबून राहणार नाही अथवा त्यांनी स्वतःहोऊन मदत केली तरी तिचा स्वीकार ती व्यक्ती करणार नाही. परंतु हा पारस्परिक व्यवहार उभय पक्षांच्या स्वेच्छापूर्वक संमतीने होत असतो. अशा प्रकारचा समाज अतिशय सुसंस्कृत असणे अपरिहार्य आहे. या समाजातील प्रत्येक व्यक्तीला आपल्याला काय हवे ते माहीत असेल आणि याहूनही मोठी गोष्ट ही आहे की जी वस्तू तेवढ्याच परिश्रमात इतरांना मिळू शकत नाही त्या वस्तूची इच्छा करू नये हेही त्या व्यक्तीला कळत असेल.

असंख्य गावांच्या या रचनेत एकानंतर एक प्रसरणशील वलयं असतील परंतु ते उर्ध्वगामी होणारे नसतील. ज्याप्रमाणे पिरॅमिडमध्ये तळाला शिखराचे ओझे सहन करावे लागते तसे ते जीवन नसेल तर ते महासागरातील वलयांसारखे असेल, त्याच्या केंद्रात व्यक्ती असेल व ती आपल्या गावाकरिता मरण्यास तयार असेल, गाव समूहाकरिता नष्ट होण्याला तयार असतील आणि ही प्रक्रिया तोपर्यंत सुरू राहील जोपर्यंत विश्व एका जीवनाचे रूप धारण करत नाही; प्रत्येक व्यक्ती या जीवनाचा भाग असेल, अहंकारामुळे ती कधीही आक्रामक होणार नाही. उलट ती नेहमी विनम्र राहील व ती त्या समुद्राच्या वलयाच्या ऐश्वर्याची भागीदार होईल ज्याची ती एक मूलभूत घटक आहे.

या सागराच्या बाह्य परिघाजवळील वलयामध्ये आतील वलयाला चिरडून टाकण्याची शक्ती नसेल. उलट आपल्या आतील सर्व वलयांना ते शक्ती प्रदान करील आणि ते वलयही आतील वलयांपासून शक्ती घेईल. लोक टोमणा मारत

मला प्रतिप्रश्न करू शकतील की ही सर्व आदर्श समाजाची दिवास्वप्ने आहेत व त्यामुळे या गोष्टीचा क्षणभरही विचार करण्याची गरज नाही. ज्याप्रमाणे युक्लिडचा बिंदू कोणताही माणूस काढू शकत नाही परंतु तरीही त्याला चिरंतन मूल्य आहे त्याप्रमाणेच मी काढलेल्या चित्रालाही मानवजातीकरिता मूल्य आहे. मी काढलेल्या चित्रातील आदर्शापर्यंत जरी भारत कधीही पोहोचू शकला नाही तरी त्याने या ख-या चित्रातील आदर्शाकरिता जगले पाहिजे, आम्हाला जे हवे असते त्यांचे संपूर्ण चित्र आधी आपल्यासमोर असले पाहिजे, तेव्हाच त्या आदर्शाजवळ आपण पोहोचण्याचा प्रयत्न करू शकतो. भारतातील प्रत्येक गावाचे गणतंत्र झाले तर माझा दावा आहे की माझे हे चित्र खरे असल्याचे सिद्ध होईल. त्यानुसार निम्नतम व्यक्ती उच्चतम व्यक्तीच्या बरोबरीची असेल म्हणजेच ना कोणी वरचा असेल ना खालचा. (हरि, २८-७-१९४६, पृ. २३६)

## देवत्वावर विश्वास

हा समाज स्वाभाविकपणे सत्य आणि अहिंसेवर आधारित असला पाहिजे. परंतु माझ्या मते ही गोष्ट ईश्वरावरील जिवंत श्रद्धेशिवाय शक्य नाही. ईश्वर एक जिवंत आणि स्वयंभू शक्ती आहे, विश्वातील प्रत्येक ज्ञात शक्तीत ती समाविष्ट आहे व ती कोणावरही विसंबून नाही. तसेच सर्व शक्तींचा नाश झाल्यानंतर वा त्या निष्क्रिय झाल्यानंतरही ही शक्ती कायम राहील. त्या सर्वसमावेशक जिवंत ज्योतीवर विश्वास ठेवल्याशिवाय मी माझ्या जीवनाची कल्पनाही करू शकणार नाही.

या चित्रात प्रत्येक धर्माला संपूर्ण आणि बरोबरीचे स्थान आहे. आपण सर्व एका महान ऐश्वर्यशाली वृक्षाची पाने आहोत, त्या वृक्षाची मुळे पृथ्वीच्या गर्भात अशी काही रुजलेली आहेत की त्याच्या मुळांना खोडापासून वेगळे करता येऊ शकत नाही. भयंकर झंझावातही या वृक्षाला हलवू शकत नाही.

या चित्रात अशा यंत्रांना स्थान नाही की जे मानव श्रमाला विस्थापित करतात आणि मूठभर लोकांच्या हातात शक्तीचे केन्द्रीकरण करण्याला मदत करतात. सुसंस्कृत मानव परिवारात श्रमाचे महत्त्व अद्वितीय आहे. अशा प्रत्येक यंत्राचे स्वागत आहे जे लोकांना मदत करते. परंतु अशी कोणती यंत्रे असू शकतात याचा विचार मी अजून केलेला नाही हे मला मान्य आहे. सिंगरचे शिवणयंत्र माझ्या लक्षात आले आहे. परंतु तेही वरवरून. माझे चित्र पूर्ण करण्याकरिता

मला त्याची गरज नाही. (हरि, २८-७-१९४६, पृ. २३६)

## ५२. साम्यवादी संप्रदाय

### मूलभूत प्रश्न

यशस्वी होण्याकरिता सोप्या हिंसक मार्गांवर माझा विश्वास नाही. चांगल्या हेतूंबद्दल मला कितीही सहानुभूती वाटली आणि त्यांच्याबद्दल मला कितीही कौतुक वाटले तरीही चांगल्यात चांगल्या उद्दिष्टाच्या पूर्तीकरिताही हिंसक मार्गांचा अवलंब करण्याचा मी सक्त विरोधी आहे. यामुळेच माझ्यात आणि हिंसेच्या समर्थकांमध्ये वास्तव तडजोडीची कोणतीही शक्यता नाही.

परंतु अहिंसेवरील माझी श्रद्धा मला अराजकवादी आणि हिंसेवर विश्वास ठेवणारे यांच्याबरोबर विचारविनिमय करण्याकरिता प्रेरितच करत नाही तर त्याकरिता ती माझ्यावर बळजबरीही करते. हे खरे आहे की विचारविनिमयाचा एकमेव हेतू त्यांना त्यांच्या मार्गापासून, जो मला चुकीचा वाटतो, दूर करण्याचा असतो. माझा अनुभव असा आहे की हिंसा आणि असत्य यांच्याद्वारे स्थायी कल्याण कधीही होऊ शकत नाही. माझी श्रद्धा केवळ एक भ्रम असेल तरी हे तर मान्य करावेच लागेल की तो एक गोड भ्रम आहे. (यंग, ११-१२-१९२४, पृ. ४०६)

मला मान्य आहे की अजून मला बोल्शेव्हिकवादाचा अर्थ नीट कळलेला नाही. मला केवळ एवढेच कळू शकले आहे की खाजगी संपत्तीच्या संस्था नष्ट करणे याचे उद्दिष्ट आहे. अपरिग्रहाचा नैतिक आदर्श आर्थिक जगात सुस्थापित करणे हाच याचा हेतू आहे आणि लोकांनी तो स्वेच्छेने मान्य केला वा शांततामय पद्धतीने तो स्वीकारण्याकरिता त्यांना प्रेरित करता आले तर याहून चांगली गोष्ट कोणतीही होणार नाही.

परंतु मला जो काही बोल्शेव्हिककवाद कळला आहे त्याप्रमाणे तो केवळ बळजबरी करण्याकरिता प्रवृत्तच करत नाही तर खाजगी संपत्ती बळकावण्याकरिता व तिच्यावर राज्याचे स्वामित्व ठेवण्याकरिता उघडपणे बलप्रयोगाची परवानगी देतो. हिंसेवर आधारित कोणतीही गोष्ट फार दिवस टिकू शकत नसल्यामुळे मी सांगू शकतो की बोल्शेव्हिकवादाचे हे रूप फार दिवस टिकणार नाही.

काहीही असो, परंतु यात काही संशय नाही की बोल्शेव्हिकवादाच्या आदर्शाकरिता असंख्य स्त्री-पुरुषांनी आपल्या सर्वस्वाचे बलिदान करून विशुद्धतम

त्याग केला आहे. लेनीनसारख्या महापुरुषांनी आपल्या बलिदानाने पवित्र केलेला असा आदर्श कधीही वाया जाऊ शकत नाही. त्यांच्या त्यागाचे गुणगान सदैव केले जाईल व कालांतराने हा आदर्श शुद्ध स्वरूप धारण करील.
(यंग, १५-११-१९२८, पृ. ३८१)

पश्चिमेकडील समाजवाद वा साम्यवाद ज्या धारणेवर आधारित आहे ती आमच्या धारणेपेक्षा मूलतः वेगळी आहे. यांतील एका धारणेनुसार मानवी स्वभावाच्या अनिवार्य स्वार्थीपणावर विश्वास ठेवण्यात आलेला आहे. मी याच्याशी सहमत नाही, कारण मला माहीत आहे की माणूस आणि पशू यांच्यात एक मूलभूत अंतर आहे. माणूस आपल्या अंतरात्म्याचा आवाज ऐकू शकतो, माणूस आणि पशू यांच्यामध्ये ज्या समान तीव्र भावना आहेत त्यांच्यावर माणूस नियंत्रण ठेवू शकतो आणि त्यामुळे पाशवी स्वभावाचा भाग असलेल्या स्वार्थ आणि हिंसा यांच्यावर तो स्वतःला उचलू शकतो. परंतु माणसाच्या आत्म्याचे हे गुण नाहीत.

हिंदुत्ववादाची ही मूलभूत धारणा असून सत्याच्या या शोधामागे हजारो वर्षांचे तप आहे. यामुळेच आमच्याकडे असे संत निर्माण झाले आहेत की ज्यांनी आत्म्याचे रहस्य जाणून घेण्याकरिता आपले शरीर झिजवून टाकले आणि प्राणोत्सर्गही केला. परंतु पश्चिमेप्रमाणे पृथ्वीच्या दूरवरील आणि उच्चतम प्रदेशांचा शोध घेणारे संशोधक मात्र आपल्याकडे झाले नाहीत. यामुळे आपला समाजवाद वा साम्यवाद अहिंसेवर तसेच श्रम आणि भांडवल व जमीनदार आणि कास्तकार यांच्यामधील सामंजस्यपूर्ण सहकार्यावर आधारित असला पाहिजे. (अबाप, पृ. २-८-१९३४)

## साम्यवादाचा अर्थ

रशियाच्या पद्धतीचा साम्यवाद, म्हणजे लोकांवर लादण्यात आलेला साम्यवाद भारताकरिता अनुकूल नाही. हिंसेशिवाय साम्यवाद येत असेल तर त्याचे स्वागत आहे. कारण तेव्हा संपत्तीचा जो कोणी स्वामी असेल तो तिला जनतेतर्फे धारण करील. लखपतीजवळ लाखो रुपये असतील, परंतु ते जनतेकरिता असतील. राज्याला सार्वजनिक कार्याकरिता जेव्हाही गरज असेल तेव्हा तो ते घेऊ शकेल.
(हरि, १३-२-१९३७, पृ. ६)

विश्लेषण केल्यानंतर साम्यवादाचा अखेरीस काय अर्थ होतो? त्याचा अर्थ आहे विषमताविरहित समाज. हा असा आदर्श आहे की ज्याची अभिलाषा सदैव वाटली पाहिजे. परंतु तो प्राप्त करण्याकरिता जेव्हा बलप्रयोग करण्याचा प्रश्न

येतो तेव्हा मी त्यापासून दूर होतो. जन्मतः आपण सर्व समान आहोत, परंतु शतकांपासून आपण ईश्वरी इच्छेचा प्रतिरोध केला आहे. विषमतेचा विचार म्हणजेच 'उच्च नीच' ही भावना एक वाईट गोष्ट आहे. परंतु बंदुकीच्या बळावर या गोष्टीचे उन्मूलन करण्यावर माझा विश्वास नाही. माणसाचे वक्षस्थळ बंदुकीकरिता बनलेले नाही. (हरि, १३-३-१९३७, पृ. ४०)

परोपकारी वा अन्य कोणत्याही हुकुमशहाला मी स्वीकारू शकत नाही. त्यामुळे श्रीमंतही मिटणार नाहीत आणि गरिबांनाही संरक्षण मिळणार नाही. होय, काही श्रीमंतांना नक्कीच मारून टाकले जाईल आणि काही गरिबांना घरबसल्या भाकरी मिळेल. तथाकथित हुकुमशाही असतानाही एका वर्गाच्या स्वरूपात श्रीमंतही राहतील आणि गरीबही. याचा खरा उपाय अहिंसक लोकशाही आहे. यालाच सर्वांकरिता खरे शिक्षणही म्हटले जाऊ शकते. श्रीमंतांना कारभा-याची कर्तव्ये शिकवली पाहिजेत आणि गरिबांना स्वावलंबनाचे शिक्षण दिले पाहिजे. (हरि, ८-६-१९४०, पृ. १५९)

वर्गविहीन समाज एक असा आदर्श आहे जो केवळ आपला आदर्श राहू नये. तो प्राप्त करण्याकरिता आपण सतत प्रयत्नशील असले पाहिजे आणि अशा समाजात वर्ग वा समुदाय यांना कोणतेही स्थान नसते.
(हरि, १७-२-१९४६, पृ. १०)

मी स्वतःला साम्यवादीही म्हणू शकतो.... माझा साम्यवाद समाजवादापेक्षा फारसा वेगळा नाही. या दोघांचे त्यात सामंजस्यपूर्ण मीलन आहे. मला कळले आहे की, साम्यवाद समाजवादाची स्वाभाविक परिणती आहे.
(हरि, ४-८-१९४६, पृ. २४६)

# १०. विश्वस्तता

## ५३. विश्वस्ततेचा दिव्य संदेश

### वरच्यांना व खालच्यांना समपातळीत आणणे

आर्थिक समता ही अहिंसक स्वातंत्र्याची गुरुकिल्ली आहे. आर्थिक समतेकरिता कार्य करण्याचा अर्थ आहे भांडवल आणि श्रम यांच्यातील चिरंतन संघर्ष मिटवण्याचा प्रयत्न करणे. याचा अर्थ आहे एकीकडे त्या मूठभर श्रीमंतांचा (ज्यांच्या हातात राष्ट्रातील अधिकांश संपत्ती केंद्रित झालेली आहे) स्तर कमी करणे आणि दुसरीकडे अर्धपोटी राहून जीवननिर्वाह करणा-या लाखो-करोडो लोकांचा स्तर उंचावणे.

जोपर्यंत श्रीमंत आणि गरीब यांच्यामधील दरी बुजवली जात नाही तोपर्यंत अहिंसक स्वरूपाचे सरकार स्थापन करणे अगदी अशक्य आहे. स्वतंत्र भारतात गरीब लोकांच्या हातात तेवढीच सत्ता असेल जेवढी सर्वाधिक श्रीमंताच्या हातात असेल. स्वतंत्र भारतात नवी दिल्लीतील महाल आणि त्याच्याच जवळ वसलेल्या मजुरांच्या मोडक्यातोडक्या झोपड्या यांच्यातील अंतर एक दिवसही चालू शकणार नाही.

श्रीमंतांनी आपली धनदौलत आणि त्यापासून प्राप्त होणारी शक्ती यांचा स्वेच्छापूर्वक त्याग केला नाही आणि सर्वसामान्य जनतेच्या कल्याणार्थ त्या जनतेला आपल्या संपत्तीत भागीदार बनवले नाही, तर एक दिवस नक्कीच हिंसक आणि रक्तरंजित क्रांती होईल. (कंप्रो, पृ. २०-२१)

लोकांनी जरी भरपूर टर उडवली असली तरी मी माझ्या विश्वस्ततेच्या सिद्धान्तावर कायम आहे. हे खरे आहे की तोपर्यंत पोहोचणे कठीण आहे. परंतु १९२० मध्ये या दुर्गम ठिकाणी चढण्याचा आम्ही निर्णय घेतला. आज आम्हाला आमची मेहनत यशस्वी होताना दिसते आहे. (कंप्रो, पृ. २१)

### अहिंसक पद्धती

अहिंसक पद्धतीत आपण भांडवलदारांना नष्ट करण्याचा प्रयत्न करत नाही, तर

भांडवलशाहीला नष्ट करण्याचा प्रयत्न करतो. आम्ही भांडवलदाराला आग्रह करत असतो की त्याने स्वतःला त्या लोकांचे विश्वस्त समजावे ज्यांच्यावर तो आपल्या भांडवलनिर्मितीकरिता, भांडवलाच्या संरक्षणाकरिता आणि वृद्धीकरिता अवलंबून आहे. श्रमिकालासुद्धा त्याच्या हृदयपरिवर्तनाची वाट पाहण्याची गरज नाही. भांडवलात जर शक्ती आहे तर श्रमामध्येही शक्ती आहे. शक्तीचा प्रयोग विनाशाकरिताही करता येतो आणि सृजनाकरिताही. दोघेही परस्परांवर अवलंबून आहेत. आपल्या शक्तीची जाणीव होताच श्रमिक भांडवलदाराचा गुलाम असण्याऐवजी सहभागीदार असण्याच्या परिस्थितीत येतो.

जर तो एकमेव मालक बनण्याचा प्रयत्न करील तर तो सोन्याची अंडी देणा-या कोंबडीलाच मारून टाकील.

मी असहकार केल्यामुळे दुसरा कोणी माझी जागा घेईल अशी भीती मला वाटत नाही कारण माझ्या सहकर्मचा-यांनी आपल्या मालकांच्या दुराचारात सहभागी होऊ नये असे मी त्यांना पटवून देऊ शकेन अशी मला आशा आहे. विशाल संख्येतील श्रमिकांना असे प्रशिक्षण देणे ही निश्चितपणे एक संथ व वेळ खाणारी प्रक्रिया आहे. परंतु ती अचूक असल्यामुळे अनिवार्यपणे सगळ्यात कमी वेळ घेणारीही आहे. ज्याअर्थी कोणतीही व्यक्ती सुधारणा होऊच शकू नये इतकी वाईट नसते आणि कोणतीही व्यक्ती इतकी पूर्ण नसते की तिला कोणत्याही व्यक्तीला, जिला तो चुकून वाईट समजतो, नष्ट करण्याचा अधिकार असावा. त्यामुळे भांडवलदाराला नष्ट केल्यामुळे अखेरीस श्रमिकाचाच नाश होईल हे सहजपणे सिद्ध करता येईल. (यंग, २६-३-१९३१, पृ. ४९)

## सामुदायिक कल्याण

आज स्वतःला मालक समजणा-या व्यक्तींना मी विश्वस्त म्हणून काम करण्याकरिता आमंत्रित करत आहे. म्हणजेच मी त्यांना आग्रह करतो आहे की त्यांनी आपल्या अधिकाराच्या बळावर स्वतःला मालक समजू नये तर ज्यांचे त्यांनी शोषण केले आहे त्यांनी दिलेल्या अधिकाराच्या बळावर त्यांनी स्वतःला मालक समजावे. (यंग, २६-११-१९३१, पृ. ३६९)

समाजाला अहिंसक पद्धतीने संघटित अथवा संचालित करता येऊ शकत नाही असे म्हणण्याची आजकाल फॅशन झाली आहे. या मुद्यावर वाद करायला मी तयार आहे. कुटुंबात जेव्हा दोषी मुलाला वडील थापड मारतात तेव्हा मुलगा

त्यांचा बदला घेण्याचा विचार करत नाही. वडिलांनी थापड मारल्यामुळे तो त्यांच्या आज्ञेचे पालन करत नाही तर त्या थापडीमागे दडलेल्या प्रेमाची त्याला जाणीव असल्यामुळे तो तसे करत असतो. माझ्या मते हाच या पद्धतीचा मथितार्थ आहे आणि समाज याच पद्धतीच्या आधारे चालला पाहिजे. जी गोष्ट एका कुटुंबाकरिता बरोबर आहे ती समाजाकरिताही बरोबर असली पाहिजे कारण समाजसुद्धा एक विशाल कुटुंबच आहे. (हरि, ३-१२-१९३८, पृ. ३५८)

समजा माझ्याजवळ वारसाहक्कामुळे वा व्यापारउद्योग केल्यामुळे बरीच संपत्ती जमा झाली आहे आणि मी असे समजावे की ही संपूर्ण संपत्ती माझी नाही, माझा अधिकार केवळ सन्माननीय पद्धतीने राहण्याचा आहे आणि ती पद्धतीसुद्धा लाखो लोकांची जी पद्धती आहे तिच्यापेक्षा वरची असू नये. बाकीची संपत्ती समुदायाची आहे व ती समुदायाकरिताच खर्च झाली पाहिजे.

या सिद्धान्ताचे प्रतिपादन मी त्या वेळी केले होते जेव्हा देशासमोर जमीनदार आणि राजेमहाराजे यांच्या धनसंपत्तीच्या संदर्भात समाजवादी सिद्धांत मांडण्यात आला होता. समाजवाद्यांचे म्हणणे आहे की ते या लोकांचा विशेषाधिकार संपवून टाकतील. याउलट माझी इच्छा आहे की या संपन्न लोकांनी हाव आणि मालकीहक्क या भावनांच्या वर स्वतःला उचलले पाहिजे व घाम गाळून पोट भरणारा श्रमिक आपला जीवननिर्वाह ज्या पातळीवरून करतो त्या पातळीवर या वर्गाने यायला पाहिजे. श्रमिकाने हे समजून घेतले पाहिजे की श्रमिक आपल्या संपत्तीचा म्हणजे श्रमाचा जेवढा मालक आहे त्यापेक्षाही धनवान माणसाचा आपल्या संपत्तीवर कमी हक्क आहे.

**व्यवहारात**

व्याख्येप्रमाणे किती लोक ख-या विश्वस्तानुसार काम करतील या प्रश्नाला काहीही अर्थ नाही. हा सिद्धान्त जर खरा असेल तर यानुसार आचरण करणारी केवळ एक व्यक्ती आहे की अनेक आहेत यामुळे काहीही फरक पडत नाही. प्रश्न केवळ दृढ श्रद्धेचा आहे. जर तुम्ही अहिंसेचा सिद्धान्त मान्य करत असाल तर तुम्हाला यश मिळते की अपयश याचा विचार न करता तुम्हाला याच मार्गाचे अनुसरण करावे लागेल. या सिद्धान्तात न समजण्यासारखे काहीही नाही. तुम्ही एवढे मात्र म्हणू शकता की हा सिद्धान्त व्यवहार्य नाही. (हरि, ३-६-१९३९, पृ. १४५)

भांडवलदारांच्या मनात माझ्याबद्दल मैत्रीभाव आहे व ते मला घाबरत नाहीत

हे मान्य करण्यात मला काहीही लाज वाटत नाही. त्यांना माहीत आहे की भांडवलशाहीचा उच्छेद करण्याकरिता मीही तेवढाच उत्सुक आहे जेवढे अतिशय प्रगत समाजवादी वा साम्यवादी. परंतु आमच्या पद्धती वेगवेगळ्या आहेत, आमची भाषा वेगवेगळी आहे.

## तात्पुरते नाही

'विश्वस्ताचा माझा सिद्धान्त वेळ मारून नेण्याकरिता नाही - आणि फसवणुकीकरिता केलेली ती क्लुप्तीही नाही. माझी पूर्ण खात्री आहे की इतर सर्व सिद्धान्तांचा लोप झाल्यानंतरही हा सिद्धान्त जिवंत राहील. याला तत्त्वज्ञान आणि धर्म या दोघांचीही मान्यता आहे. श्रीमंतांनी या सिद्धान्तानुसार आचरण केले नाही केवळ एवढ्यामुळे हा सिद्धान्त काही खोटा ठरत नाही. यामुळे श्रीमंतांचा दुबळेपणा तेवढा सिद्ध होतो. इतर कोणताही सिद्धान्त अहिंसेशी सुसंगत नाही. अहिंसक असहकाराच्या परिणामामुळे दुराचारी माणसाला एक तर आपला दोष दिसतो व तो तो दूर करतो आणि त्याने तसे केले नाही तर तो अगदी वेगळा पडतो. यामुळे अहिंसक पद्धतीत दुराचारी जर आपले दोष दूर करत नसेल तर तो स्वतःच आपल्या विनाशाचे कारण बनतो. (हरि, १६-१२-१९३९, पृ. ३७६)

## संपत्तीचे अर्जन

आज ज्यांच्याजवळ संपत्ती आहे त्यांना मला असे सांगायचे आहे की त्यांच्याजवळची ही संपत्ती गरिबांनी जणू एक विश्वस्त म्हणून त्यांच्याजवळ ठेवलेली ठेव असल्याप्रमाणे त्यांनी आचरण करावे. तुम्ही असे म्हणू शकाल की विश्वस्तता कायद्याच्या दृष्टीने केवळ एक कल्पना आहे. परंतु लोकांनी यावर नीट विचार केला आणि त्यानुसार आचरण करण्याचा प्रयत्न केला तर जग आज जितक्या प्रेमाने चालवले जात आहे त्यापेक्षा किती तरी अधिक प्रेमाने त्याचे संचालन होईल. संपूर्ण विश्वस्तता ही युक्लिडच्या बिंदूप्रमाणे केवळ एक अमूर्त संकल्पना आहे आणि ती व्यवहारात उतरवणे युक्लिडच्या संकल्पनेएवढीच अशक्य आहे. परंतु त्या दिशेने आपण जर प्रयत्न करत राहिलो तर या धरेवर समता स्थापन करण्याकरिता इतर कोणत्याही विचारापेक्षा आपण अधिक प्रगती करू शकू. (मॉरि, ऑक्टोबर १९३५, पृ. ४१२)

माझी खात्री आहे की जाणूनबुजून चुकीचे काम न करताही पैसा कमावता येऊ शकतो. उदाहरणार्थ माझ्या एक एकर भूमीत अचानक सोन्याची खाण

आढळते. परंतु मला हा विचार मान्य आहे की संपत्ती मिळवणे आणि तिचा विश्वस्त बनणे यापेक्षा संपत्तीची इच्छाच न करणे उत्तम. मी माझ्या संपत्तीचा फार पूर्वीच त्याग केला आहे. यावरून इतरांनी काय करावे अशी माझी अपेक्षा आहे हे कळले पाहिजे. परंतु जे लोक आधीच श्रीमंत आहेत वा पैसे कमावण्याचा मोह सोडू शकत नाहीत त्या लोकांना मी कोणता सल्ला देऊ? अशा लोकांनी आपल्या पैशाचा उपयोग लोकांच्या सेवेकरिता करावा हाच सल्ला मी देऊ शकतो.

हे खरे आहे की सामान्यपणे श्रीमंत लोक आपल्या गरजेपेक्षा अधिक खर्च करतात. परंतु हे टाळता येऊ शकते. जमनालालजी आपल्या बरोबरीच्या लोकांपेक्षा अथवा अनेक मध्यमवर्गीयांपेक्षाही स्वतःवर कमी खर्च करतात. मी अशा अनेक श्रीमंतांना भेटलो आहे की जे स्वतःवर खर्च करण्यात अतिशय कंजूष आहेत. अनेक लोकांचा तर हा स्वभावच असतो की ते स्वतःवर जवळपास खर्चच करत नाहीत आणि असे करण्यात काही चांगले आहे हेही त्यांना माहीत नसते.

हीच गोष्ट श्रीमंतांच्या मुलांनाही लागू होते. वारसा म्हणून मिळालेल्या संपत्तीवर माझा व्यक्तिशः विश्वास नाही. श्रीमंत लोकांनी आपल्या मुलांना असे शिक्षण दिले पाहिजे आणि त्यांचे पालनपोषण अशा प्रकारे केले पाहिजे की त्यांना आपल्या पायावर उभे राहता आले पाहिजे. ते असे करत नाहीत ही दुःखाची गोष्ट आहे. त्यांची मुले थोडेबहुत शिकतात, गरिबाचे गुणगान करणा-या काही कविताही ते ऐकवतात परंतु आपल्या पैतृक संपत्तीचा उपभोग घेताना त्यांना कोणताही पश्चात्ताप वाटत नाही. अशा परिस्थितीत माझ्या सामान्य बुद्धीचा उपयोग करत व्यवहार्य असेल तोच सल्ला मी देतो.

गरिबी स्वीकारणे हे ज्याला आपले कर्तव्य वाटते आणि ज्यांचा आर्थिक समतेवर विश्वास आहे व समता निर्माण व्हावी अशी ज्यांची इच्छा असते त्यांनी श्रीमंतांचा मत्सर करू नये, उलट आपल्या गरिबीचे आनंदाने असे प्रदर्शन केले पाहिजे की लोक तुमचे अनुकरण करतील. अशा प्रकारे खूष राहणा-यांची संख्या फार कमी आहे ही दुःखाची गोष्ट आहे. (हरि, ८-३-१९४२, पृ. ६७)

विश्वस्ताचा कोणी वारस नसतो. जनताच त्याची वारस असते. अहिंसेच्या आधारावर संघटित राज्यात विश्वस्ततेचे नियमन केले जाईल. राजा आणि जमीनदार यांना इतर श्रीमंताच्या बरोबरीनेच गणले जाईल.
(हरि, १२-४-१९४२, पृ. ११६)

**पर्याय**

जोवर आजच्या मालकांच्या संपत्तीचा प्रश्न आहे त्यांना वर्गयुद्ध आणि आपल्या संपत्तीचा विश्वस्त या रूपात स्वेच्छेने स्वतःत बदल घडवून आणणे यामधून कोणता तरी एक पर्याय निवडावा लागेल. त्यांना आपल्या संपत्तीची मालकी टिकवून ठेवण्याची, आपल्या प्रतिभेचा उपयोग करण्याची आणि आपल्या संपत्तीत वाढ करण्याची परवानगी राहील, परंतु हे सर्व स्वतःकरिता नाही तर राष्ट्राकरिता. यामुळे यात शोषणाला कोणतेही स्थान नसेल.

त्यांनी केलेली सेवा आणि तिचे सामाजिक मूल्य पाहून यांना कमिशन मिळेल. त्याचा दर राज्याकडून ठरवला जाईल. त्यांच्या मुलांना त्यांच्या जागेवर विश्वस्त बनण्याचा अधिकार तेव्हाच मिळेल जेव्हा ते या कामाकरिता स्वतःला योग्य असल्याचे सिद्ध करतील.

समजा उद्या भारत स्वतंत्र झाला, तर भारतातील सर्व भांडवलदारांना विश्वस्त होण्याची संधी मिळेल परंतु हा कायदा वरून लादला जाणार नाही, तो खालून येईल.

लोक जेव्हा विश्वस्ततेचा अर्थ समजू लागतील व त्याला अनुकूल अशी त्यांची मनोभूमिका होईल तेव्हा लोक स्वतः असा कायदा तयार करणे सुरू करतील व ग्रामपंचायतीपासून ही सुरुवात होईल. अशा गोष्टी खालून सुरू झाल्या तर लोक ती सहजपणे मान्य करतात. वरून सुरुवात झाली तर ते एक ओझे वाटते. (हरि, ३१-३-१९४६, पृ. ६३-४)

**जमीनदार आणि कृषक**

वादाकरिता मी हे मान्य करायला तयार आहे की जमीनदार अनेक अपराधांकरिता आणि चुकांकरिता दोषी आहेत. परंतु एवढ्याकरिता या धरतीमातेला जीवन देणा-या कृषकांनी आणि मजुरांनी त्यांच्या अपराधांची नक्कल करणे योग्य आहे असे म्हणता येऊ शकत नाही. मिठाचीच चव गेली तर अळणीपणा कसा घालवणार?....

जमीनदारांना मला सांगायचे आहे की तुमच्याविरुद्ध ज्या गोष्टी बोलल्या जात आहेत त्या जर बरोबर असतील तर तुमचे दिवस भरले आहेत असे समजा. तुम्ही जास्त दिवस स्वामी अथवा मालक बनून राहू शकत नाही. परंतु तुम्ही गरीब शेतक-यांचे विश्वस्त व्हायला तयार असाल तर तुमचे भविष्य उज्ज्वल

आहे. परंतु विश्वस्त नावापुरते नाही तर खरोखरीचे बनावे लागेल. असा विश्वस्त की जो आपण घेतलेली मेहनत आणि काळजी यांचा जो काही मोबदला होईल त्यापेक्षा अधिक काहीही घेणार नाही. मग त्यांना असे आढळून येईल की कोणताही कायदा त्यांना त्यांच्या पदावरून काढू शकणार नाही आणि शेतकरी त्याचे मित्र बनतील. (हरि, ४-५-१९४७, पृ.१३४)

जमीनदार जर आपल्या रयतेकरिता खरोखरच आपल्या जमीनदारीचा विश्वस्त बनला तर (या दोघांमध्ये) कधीही बेबनाव होणार नाही. जमीनदारीची एक कठीण समस्या अजून सोडवायची आहे.... लहानमोठे जमीनदार, रयत, कास्तकार आणि सरकार यांच्यामध्ये एखादा उचित, निष्पक्ष आणि समाधानकारक असा करार झाला तर जेव्हा कायदा पास होईल तेव्हा जमीनदार आणि रयत यांच्यावर बलप्रयोगाची गरज भासणार नाही. असे घडले तर याहून अधिक चांगले काय होईल? अशा प्रकारचे सर्व परिवर्तन संपूर्ण भारतात रक्तपात आणि बलप्रयोग केल्याशिवाय करता येईल काय? (हरि, २१-९-१९४७, पृ. ३३२)

## विश्वस्ततेचे व्यावहारिक सूत्र

(१) समाजाच्या वर्तमान भांडवलशाही व्यवस्थेला समतावादी व्यवस्थेत परिवर्तित करण्याचे विश्वस्तता एक साधन आहे. विश्वस्तता भांडवलशाहीला सूट देत नाही. परंतु वर्तमान भांडवलदार वर्गाला ती एक संधी देते. मानव स्वभाव कधीही सुधारणेच्या पलीकडचा नसतो या विश्वासावर ती आधारित आहे.

(२) समाजाने आपल्या कल्याणाकरिता स्वेच्छेने दिलेल्या अनुमतीशिवाय खाजगी मालकीचा कोणताही अधिकार तिला मान्य नाही.

(३) संपत्तीचे स्वामित्व आणि तिचा उपयोग यांच्याबद्दलचा कायदा करण्याला तिची मनाई नाही.

(४) त्यानुसार राज्याच्या कायद्याप्रमाणे तयार झालेल्या विश्वस्ततेअंतर्गत व्यक्तीला आपली स्वतःची संपत्ती धारण करण्याचा वा स्वार्थी कारणाकरिता अथवा समाजहिताचा विचार न करता ती खर्च करण्याचा अधिकार नसेल.

(५) ज्याप्रमाणे एक योग्य असे किमान निर्वाह वेतन निर्धारित करण्याचा प्रस्ताव आहे त्याचप्रमाणे व्यक्तीचे अधिकतम उत्पन्नही निर्धारित केले पाहिजे. किमान आणि कमाल उत्पन्नामधील अंतर योग्य आणि न्याय्य असले पाहिजे आणि वेळोवेळी त्यात असे परिवर्तन केले पाहिजे की कालांतराने हे अंतर नाहीसे व्हावे.

गांधीवादी अर्थव्यवस्थेत उत्पादनाचे स्वरूप सामाजिक गरजांवर अवलंबून राहील, व्यक्तिगत लहर वा लोभावर नाही. (हरि, २५-१०-१९५२, पृ. ३०१; असे समजले जाते की हा दस्तावेज प्रो. एम. एल. दांतवाला यांनी तयार केला होता.)

## ५४. अहिंसक अर्थव्यवस्था

### अर्थशास्त्र, नीतिशास्त्र

मला माहीत आहे की मी अर्थशास्त्र आणि नीतिशास्त्र यांच्यात कोणताही स्पष्ट वा इतर कोणत्याही प्रकाराचा भेद करत नाही. एखाद्या व्यक्तीला वा राष्ट्राला हानी पोहोचवणारे अर्थशास्त्र अनैतिक आणि त्याचमुळे पापी असते. त्याचप्रमाणे एका राष्ट्राला दुस-या राष्ट्राची लूट करण्याची परवानगी देणारे अर्थशास्त्रही पापपूर्ण असते. शोषित श्रमाद्वारे तयार करण्यात आलेल्या वस्तू विकत घेणे आणि त्यांचा उपयोग करणे पाप आहे. (यंग, १३-१०-१९२१, पृ.३२५)

जे अर्थशास्त्र नैतिक आणि भावनात्मक दृष्टिकोनाकडे दुर्लक्ष करते ते मेणाने बनलेल्या मूर्तीसारखे असते. त्यांच्यात आकृतिसाम्य असते परंतु जिवंतपणा नसतो. अटीतटीच्या प्रत्येक प्रसंगी निर्माण झालेल्या आर्थिक नियमांचा व्यवहारात भंग होतो आणि त्यांना मार्गदर्शक तत्त्वे म्हणून स्वीकार करणा-या व्यक्तींचा वा राष्ट्रांचा अपरिहार्यपणे नाश होतो. (यंग, २७-१०-१९२१, पृ. ३४४)

जे अर्थशास्त्र नैतिक मूल्यांकडे दुर्लक्ष करते वा त्यांची उपेक्षा करते ते खोटे असते. अर्थशास्त्राच्या क्षेत्रात अहिंसेच्या नियमाचा विस्तार करणे याचा अर्थ कमीतकमी आंतरराष्ट्रीय व्यापारात नैतिक नियमांचा विचार करण्यात यावा एवढा नक्कीच आहे. (यंग, २६-१०-१९२४, पृ. ४२१)

### आदर्श अर्थशास्त्र

माझ्या मते भारताची, आणि भारताचीच का सर्व जगाची आर्थिक संघटना अशी असली पाहिजे की कोणालाही अन्नवस्त्राची अडचण जाणवू नये. वेगळ्या शब्दात, प्रत्येक व्यक्तीला आपल्या जीवननिर्वाहाकरिता पुरेसे काम मिळाले पाहिजे.

या आदर्शाची प्राप्ती तेव्हाच होऊ शकेल जेव्हा जीवनाच्या मूलभूत गरजांची उत्पादन साधने सर्वसामान्य जनतेच्या ताब्यात असतील. ज्याप्रमाणे ईश्वराने दिलेल्या हवा आणि पाणी या गोष्टी लोकांना उपलब्ध असतात त्याचप्रमाणे ही साधने लोकांना उपलब्ध असली पाहिजेत. यांना इतरांचे शोषण करण्याचे अवैध

साधन बनवण्यात येऊ नये. कोणत्याही देशाचा वा राष्ट्रसमूहांचा वा व्यक्तींचा यांच्यावर एकाधिकार असणे अनुचित आहे. या साध्या-सरळ सिद्धान्ताची अवहेलना हे आपल्याच देशातील नाही तर सर्व जगातील दारिद्र्याचे कारण आहे. (यंग, १५-११-१९२८, पृ. ३८१)

खरे अर्थशास्त्र उच्चतम नैतिक मानदंडाच्या विरोधात कधीही नसते. खरे नीतिशास्त्र तेच समजले जाईल जे नीतिशास्त्राबरोबरच चांगले अर्थशास्त्रही असेल. कुबेराची पूजा करायला शिकवते, ते अर्थशास्त्र खोटे आणि निराशाजनक आहे आणि शक्तिशाली लोकांना दुर्बलांच्या जिवावर संपत्ती गोळा करण्याचा अधिकार देते. ते मृत्यूला निमंत्रण देत असते. याउलट खरे अर्थशास्त्र सामाजिक न्यायाची ग्वाही देते, दुर्बलतम व्यक्तींपासून सर्वांच्या कल्याणाचा विचार करते आणि चांगले जीवन जगण्याकरिता ते अपरिहार्य असते. (हरि, ९-१०-१९३७, पृ. २९२)

आपण जर आपल्या घरातून, महालातून आणि मंदिरामधून संपत्तीची प्रतीके काढून टाकली व त्यांच्या जागी नैतिकतेच्या प्रतीकांची स्थापना केली तर फार मोठ्या सैन्याच्या खर्चाचे ओझे उचलल्याशिवाय आपण जगातील कोणत्याही आक्रमक शक्तीचा सामना करू शकतो. आधी आपण ईश्वराच्या साम्राज्याची व त्याच्या चांगुलपणाची कामना केली तर सर्व काही प्राप्त होईल असे मी खात्रीपूर्वक सांगतो. हेच वास्तव अर्थशास्त्र आहे. तुम्ही आणि मी - आपण सर्व ही संपत्ती जपून ठेवू या व आपल्या जीवनात तिचे अनुसरण करू या. (स्पीरा, पृ. ३५५)

## किमान हिंसा

काटेकोरपणे बोलायचे तर कोणतेही कार्य वा उद्योग काही प्रमाणात हिंसा केल्याशिवाय शक्यच होत नाही. एवढेच नाही तर विशिष्ट प्रमाणात हिंसा केल्याशिवाय जगताही येऊ शकत नाही. शक्य तितक्या प्रमाणात ती हिंसा कमी करणे एवढेच आपण करू शकतो. खरे सांगायचे तर अहिंसा, जो एक नकारार्थी शब्द आहे, या शब्दाचा अर्थ जीवनातील अपरिहार्य हिंसेच्या त्यागाचा प्रयत्न असा आहे. यामुळे जी व्यक्ती अहिंसेवर विश्वास ठेवते ती अशा प्रकारचा व्यवसाय वा उद्योग करेल ज्यात किमान हिंसा असेल.

याप्रमाणे अहिंसेवर विश्वास असणारी व्यक्ती कसायाचे काम करील या गोष्टीची कल्पना करता येऊ शकत नाही. असे नाही की मांसाहारी अहिंसक असू

शकत नाही.... परंतु अहिंसेवर विश्वास ठेवणारी मांसाहारी व्यक्ती शिकारीकरिता जाणार नाही, तसेच ती व्यक्ती युद्धात वा युद्धाच्या तयारीत भाग घेणार नाही. अशाच रीतीने असे अनेक व्यवसाय आहेत, ज्यांच्यामध्ये हिंसा अपरिहार्य आहे आणि अहिंसक व्यक्तीने त्यांच्यापासून दूर राहिले पाहिजे.

परंतु कृषीशिवाय जीवन चालू शकत नाही आणि कृषीमध्ये थोडीबहुत हिंसा तर होतेच. मग तो व्यवसाय हिंसक आहे का? याचा निर्णय आपल्याला घ्यावा लागेल. परंतु सर्वच कामकाजांमध्ये काही ना काही हिंसा होत असल्यामुळे हिंसेचे प्रमाण किमान ठेवण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. याकरिता अंतःकरणापासून आपला अहिंसेवर विश्वास असला पाहिजे.

असे समजा की एखादी व्यक्ती कोणतीही हिंसा करत नाही. आपल्या भाकरीकरिता ती श्रमही करते. परंतु तिच्या मनात इतरांच्या धनसंपत्तीबद्दल ईर्ष्येची भावना असते. अशा व्यक्तीला अहिंसक म्हणता येऊ शकत नाही. याप्रमाणे अहिंसक व्यवसाय तो आहे ज्याच्या मुळात हिंसा नसेल आणि ज्यात इतरांच्या शोषणाला वा हिंसेला कोणतेही स्थान नसेल.

## ग्रामीण अर्थशास्त्र

माझ्याजवळ याचा कोणताही पुरावा नाही, परंतु माझा विश्वास आहे की एक काळ असा होता जेव्हा भारताची अर्थव्यवस्था अशाच प्रकारच्या अहिंसक कामकाजावर आधारीत होती. ती माणसांच्या अधिकारांवर नाही तर त्याच्या कर्तव्यांवर आधारित होती. अशा कामकाजात लोक आपल्या उदरनिर्वाहापुरते जरूर कमवायचे परंतु त्यांच्या श्रमामुळे समुदायाच्या कल्याणात भर पडत असे....

या कामकाजांच्या आणि उद्योगांच्या मुळाशी शारीरिक श्रमाला महत्त्व होते आणि त्या काळात मोठ्या प्रमाणात यंत्रे नव्हती. गोष्ट अशी आहे की आपल्या मेहनतीने उदीम करू शकण्याएवढीच जमीन जर माणसाजवळ असेल तर तो इतरांचे शोषण करू शकत नाही. हस्तोद्योगात शोषण आणि गुलामगिरी यांना स्थानच नसते.

मोठ्या प्रमाणावरील यंत्रांमुळे एका माणसाच्या हाती संपत्ती गोळा होते. तो इतरांवर हुकूम चालवतो व ते याची गुलामी करतात. शक्य आहे की आपल्या कारागिरांकरिता तो उत्तम परिस्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न करत असेल, परंतु तरीही तो शोषण करतच असतो व ते हिंसेचे एक रूप आहे.

जेव्हा मी असे सांगतो की एक काळ असा होता जेव्हा समाज शोषणावर नाही तर न्यायावर आधारित होता तेव्हा माझ्या सांगण्याचा अर्थ असा असतो की तेव्हा सत्य आणि अहिंसा हे केवळ व्यक्तीगत गुण नव्हते तर संपूर्ण समाज त्या गुणांनुसार आचरण करत होता. माझ्या दृष्टीने त्या गुणाचे कोणतेही मूल्य नसते जे फक्त व्यक्तींपर्यंत सीमित असते वा त्यानुसार आचरण करणे केवळ व्यक्तींकरिताच शक्य असते. (हरि, १-९-१९४०, पृ. २७१-२)

## ५५. आर्थिक समता

बुद्धी आणि संधी यांच्याबद्दलची विषमता कायम राहणार आहे. नदीच्या काठावर राहणा-या व्यक्तीपेक्षा वाळवंटी प्रदेशात राहणा-या व्यक्तीला अन्नधान्याचे चांगले पीक काढण्याची संधी आहे. परंतु अशा प्रकारची विषमता जरी स्पष्टपणे अस्तित्वात आहे तरी मूलभूत समतेचेही तितक्याच स्पष्टपणे दर्शन होते. (यंग, २६-३-१९३१, पृ. ४९)

### समाजासंबंधीची माझी संकल्पना

समाजाबद्दलची माझी संकल्पना अशी आहे की आपण जरी सारखे निर्माण झालेलो असलो म्हणजे आपल्याला समान संधीचा अधिकार असला तरी आपणा सर्वांची क्षमता सारखी नाही. ही गोष्ट निसर्गतःच अशक्य आहे. उदाहरणार्थ रंग, उंची वा बुद्धी या गोष्टी सर्वांच्या सारख्या असू शकत नाहीत. त्यामुळे काही लोकांमध्ये पैसे कमावण्याची पात्रता अधिक असेल तर काहींमध्ये कमी हे स्वाभाविक आहे.

प्रतिभाशाली व्यक्तींजवळ अधिक क्षमता असेल व ते आपल्या प्रतिभेचा उपयोग अधिक पैसा कमावण्याकरिता करतील. जर ते आपल्या प्रतिभेचा उपयोग सौजन्यपूर्वक करतील तर ते राज्याच्या हिताकरिता काम करतील. असे लोक विश्वस्त बनूनच राहू शकतात, इतर कोणत्याही अटींवर नाही.

बुद्धिमान व्यक्तींना मी अधिक कमाई करण्याची संधी देईन, त्यांची प्रतिभा गुदमरेल असे काहीही मी करणार नाही. परंतु त्यांच्या अतिरिक्त कमाईचा बहुतांश हिस्सा राज्याच्या कल्याणार्थ खर्चिला गेला पाहिजे. एकाच वडिलांच्या मुलांचे सर्व उत्पन्न सामायिक मिळकतीत जमा होते तसेच हे. असे लोक केवळ विश्वस्त म्हणून कमाई करतील. (यंग, २६-११-१९३१, पृ. ३६८)

मला सर्वांचे सामाजिक स्थान समान करायचे आहे. गत शतकांमध्ये श्रमिकांना

वेगळे काढून त्यांना कमी प्रतीचा दर्जा देण्यात आला आहे. त्यांना शूद्र गणले गेले व शूद्र शब्दाला कमीपणाचा अर्थ आला. मी विणकर, कृषक आणि शाळेतील शिक्षक यांच्या मुलांमध्ये कोणताही भेद राहू देऊ इच्छीत नाही.
(हरि, १५-१-१९३८, पृ. ४१६)

## विषमतेचे निवारण

आर्थिक समतेचा माझा अर्थ सर्व माणसांजवळ अगदी सारखा पैसा असावा असा नाही. याचा अर्थ आहे प्रत्येक व्यक्तीजवळ आपल्या गरजेएवढा पैसा असला पाहिजे. आर्थिक समतेचा अर्थ आहे 'प्रत्येकाला त्याच्या गरजेनुसार.' मार्क्सची हीच व्याख्या आहे. चार मुले असणा-या व्यक्तीला आवश्यक असलेल्या पैशाएवढीच मागणी एकटा माणूसही करेल तर ती गोष्ट आर्थिक समतेचे उल्लंघन करणारी होईल.

उच्च वर्गाच्या आणि राजाच्या गरजा अधिक आहेत असे म्हणून उच्च वर्ग आणि सर्वसामान्य माणूस, अथवा राजा आणि दरिद्री यांच्यातील विशाल अंतराचे कोणी समर्थन करू शकत नाही. हा व्यर्थ वितंडवाद आहे आणि माझ्या युक्तिवादाचा यामुळे विपर्यास होईल.

श्रीमंत आणि गरीब यांच्यामधील आज असलेले अंतर पाहून फार दुःख होते. गरीब ग्रामीणांचे त्यांच्याच शहरी देशवासीयांतर्फे शोषण केले जात आहे. गावकरी अन्नधान्य पिकवतात परंतु स्वतः उपाशी राहतात. ते दूध निर्माण करतात परंतु त्यांच्याच मुलांच्या नशिबी दूध नसते. ही लाजिरवाणी गोष्ट आहे.

प्रत्येक व्यक्तीला संतुलित भोजन, राहण्याकरिता नीटनेटके घर, मुलांच्या शिक्षणाकरिता योग्य सोयी आणि पुरेशी आरोग्यचिकित्सा उपलब्ध असली पाहिजे....

जनतेची इच्छा कार्यान्वित करणे हे माझ्या योजनेअंतर्गत राज्याचे कर्तव्य असेल, जनतेवर हुकूम चालवणे आणि/वा बळजबरीने तिच्याकडून आपल्या इच्छेचे पालन करवून घेणे हे नाही. घृणेच्या ऐवजी प्रेमाच्या शक्तीचा उपयोग करून माझ्या दृष्टिकोनाकरिता मी लोकांची सहमती मिळवीन आणि अशा प्रकारे अहिंसेच्या मार्गाने मी समता प्रस्थापित करीन. जोपर्यंत संपूर्ण समाज माझ्या दृष्टिकोनाशी सहमत होत नाही तोपर्यंत मी वाट पाहत बसणार नाही. उलट ताबडतोब माझ्या कामाची मी सुरुवात करीन. माझ्याजवळच ५० मोटारगाड्या

आणि १० बिघे जमीन असेल तर मी देशात आर्थिक समता आणण्याची अपेक्षा करू शकत नाही हे सांगण्याची गरज नाही. याकरिता मला स्वतःला देशातील निर्धन व्यक्तीच्या पातळीवर उतरावे लागेल. (हरि, ३१-३-१९४६, पृ. ६३)

सर्वांना समान संधी दिली पाहिजे. संधी मिळाली तर प्रत्येक व्यक्तीची समान आध्यात्मिक प्रगती होऊ शकते. (हरि, १७-११-१९४६, पृ. ४०४)

हिंसक पद्धतीचा अवलंब केल्याशिवाय खाजगी व्यक्तीद्वारे भांडवलाचा संचय होऊ शकत नाही, परंतु एखाद्या अहिंसक समाजात राज्याद्वारे भांडवलाचा संचय करता येणे केवळ शक्यच नाही तर वांछनीय आणि अपरिहार्यही आहे. समाजातील अन्य व्यक्तींच्या सहाय्याने वा सहकार्याने भौतिक वा आध्यात्मिक भांडवलाचा संग्रह करून त्याचा आपल्या वैयक्तिक फायद्याकरिता उपयोग करण्याचा नैतिक अधिकार कोणत्याही व्यक्तीला नाही.
(हरि, १६-२-१९४७, पृ. २५)

आज भयानक आर्थिक विषमता अस्तित्वात आहे. समाजवादाचा आधार आर्थिक समता आहे. अन्याय्य विषमतेच्या या वर्तमान परिस्थितीत काही मूठभर लोक ऐश्वर्य उपभोगत आहेत तर सर्वसामान्य माणसाजवळ पोट भरण्याइतकाही पैसा नाही. अशी परिस्थिती असताना रामराज्याची स्थापना करता येऊ शकत नाही. (हरि, १-६-१९४७, पृ. १७२)

## समान वितरणाचा सिद्धान्त

आपल्याला आपली राष्ट्रीय संपदा संघटित करायची आहे. उत्पादनाच्या सर्वोच्च पद्धतीनेच नाही तर उत्पादन आणि वितरण या दोघांचीही सर्वोच्च पद्धती स्वीकारूनच असे करता येईल. (यंग, २८-७-१९२०, पृ. ५)

मूठभर लोकांच्या हाती भांडवल गोळा होण्याची भारताला गरज नाही. उलट ते भांडवल अशा प्रकारे वितरित करण्याची गरज आहे की १९०० मैल लांब व १४०० मैल रुंद असलेल्या या देशातील साडेसात लाख गावांमधून ते उपलब्ध व्हायला हवे. (यंग, २३-३-१९२१, पृ. ९३)

समान वितरण हा माझा आदर्श आहे परंतु हा आदर्श साध्य करणे माझ्या दृष्टीच्या टप्प्यात तरी मला शक्य वाटत नाही. यामुळे मी न्याय्य वितरणाकरिता प्रयत्न करत आहे. (यंग, १७-३-१९२७, पृ. ८६)

समान वितरणाचा वास्तविक अर्थ असा आहे कि प्रत्येकाजवळ आपल्या सर्व

स्वाभाविक गरजांच्या पूर्तीचे साधन असावे आणि याहून अधिक काहीही नसावे. उदाहरणार्थ एखाद्या माणसाची पचनशक्ती चांगली नाही आणि त्याला पोट भरण्याकरिता केवळ अर्धा पाव पीठ पाहिजे आणि दुस-या माणसाला अर्धा शेर पीठ पाहिजे. अशा परिस्थितीत दोघांनाही आपापल्या गरजेप्रमाणे पीठ मिळाले पाहिजे.

## नवीन सामाजिक व्यवस्था

हा आदर्श अस्तित्वात आणण्याकरिता संपूर्ण सामाजिक व्यवस्थेची पुनर्निर्मिती करावी लागेल. अहिंसेवर आधारित समाज अन्य कोणत्याही आदर्शाचे पोषण करू शकत नाही. आपण कदाचित या आदर्शापर्यंत पोहोचूही शकणार नाही, परंतु आपण लक्षात ठेवले पाहिजे की त्या आदर्शाजवळ पोहोचण्याकरिता आपण सतत प्रयत्नशील राहिले पाहिजे.

आपण जितके आपल्या ध्येयाजवळ पोहोचू तितकेच आपल्याला समाधान आणि सुख मिळेल आणि त्याच प्रमाणात अहिंसक समाजाची स्थापना करण्याकरिता आपण मदत करू शकू.

दुस-याची वाट न पाहता कोणीही या जीवनपद्धतीचे अनुसरण करू शकतो आणि एक व्यक्ती जर आचरणाच्या एखाद्या नियमाचे पालन करू शकत असेल तर संपूर्ण समाजालाही तसे करणे शक्य आहे. योग्य मार्गावरून चालण्याकरिता माणसाला इतरांची वाट पाहण्याची गरज नसते हे मी निक्षून सांगू इच्छितो. एखाद्या ध्येयाजवळ पोहोचणे शक्य नाही असे जर लोकांना वाटले तर ते सुरुवात करायला मागेपुढे पाहतात. ही मनोवृत्ती नेहमीच प्रगतीकरिता बाधक असते.

## अहिंसेद्वारे

आता असा विचार करा की अहिंसेद्वारे समान वितरण करता येणे कसे शक्य होईल? हा आदर्श ज्या व्यक्तीच्या जीवनाचा भाग झाला असेल त्याने सर्वप्रथम आपल्या जीवनात परिवर्तन आणले पाहिजे. भारताची गरिबी लक्षात घेऊन त्याने आपल्या गरजा कमीत कमी केल्या पाहिजे. त्याच्या मिळकतीत अप्रामाणिकपणाचा अंशही नसेल. सट्ट्याच्या इच्छेचा तो त्याग करील. त्याचे घर त्याची नवीन जीवनपद्धती प्रतिबिंबित करणारे असेल. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात तो संयमाने वागेल. आपल्या जीवनात जेव्हा तो हे सर्व परिवर्तन घडवून आणेल तेव्हाच तो आपले साथीदार आणि शेजारी यांच्यामध्ये या आदर्शाचा प्रचार करू शकेल.

खरे सांगायचे तर समान वितरणाच्या सिद्धान्ताच्या मुळाशी श्रीमंतांच्या

अनावश्यक संपत्तीच्या विश्वस्तस्तेचा सिद्धान्त असला पाहिजे. समान वितरणाच्या सिद्धान्तानुसार आपल्या शेजा-याच्या तुलनेत आपल्याजवळ एक रुपयाही अधिक असायला नको.

हे कसे करावे? अहिंसक उपायाने वा श्रीमंतांजवळून त्यांची संपत्ती हिरावून घेऊन? असे करण्याकरिता स्वाभाविकपणेच हिंसेचा आधार घ्यावा लागेल? आणि श्रीमंतांना धनसंचय कसा करावा हे माहीत असल्यामुळे त्यांच्याविरुद्ध हिंसक कारवाई केली तर समाज त्यांच्या कौशल्याला मुकेल व परिणामी समाजाचे हित होऊ शकणार नाही. यामुळे अहिंसक उपाय निश्चितच श्रेष्ठ ठरतो. श्रीमंताला आपली संपत्ती आपल्याजवळ ठेवण्याचा अधिकार असेल, परंतु त्यातून तो तेवढ्याच संपत्तीचा उपयोग करेल जेवढी त्याच्या स्वतःच्या गरजांकरिता आवश्यक असेल व उर्वरित संपत्तीकरिता विश्वस्त म्हणून तो काम करील. विश्वस्त प्रामाणिकपणे काम करील असे यामध्ये आपण गृहीत धरले आहे.

## मानव स्वभावात परिवर्तन

ज्या क्षणी माणूस स्वतःला समाजसेवक समजू लागतो त्या क्षणापासून तो समाजाकरिता कमावतो व समाजाच्याच हिताकरिता खर्च करत असतो. त्याच्या कमाईत शुद्धतेचा प्रवेश होऊ लागतो व त्याचा व्यवसाय अहिंसेने परिपूर्ण होतो. याशिवाय लोकांचे लक्ष या जीवनपद्धतीकडे वेधले गेले तर कटुता निर्माण न होता समाजात शांततापूर्ण क्रांती होईल.

मानवस्वभावात अशा प्रकारचे परिवर्तन कधी झाले असल्याचा इतिहासात उल्लेख आहे काय असा प्रश्न विचारला जाऊ शकतो. व्यक्तींच्या जीवनात असे परिवर्तन निश्चितपणे झाले आहे. परंतु संपूर्ण समाजात असे परिवर्तन झाल्याचे उदाहरण क्वचितच मिळू शकेल. याचे कारण हे आहे की, अहिंसेला घेऊन आजपर्यंत मोठ्या प्रमाणात कधीही प्रयोग करण्यात आला नाही.

## अहिंसेची अंमलबजावणी

अहिंसा मुख्यत्वेकरून केवळ व्यक्तीचे शस्त्र आहे व त्यामुळे तिचा प्रयोग व्यक्तींपर्यंतच मर्यादित ठेवला पाहिजे या गैरसमजाने आमच्या मनात कसे घर केले ते कळत नाही. परंतु वास्तव असे नाही. अहिंसा निश्चितपणे समाजाचा गुण आहे. लोकांना याच सत्याची प्रचिती व्हावी म्हणून मी प्रयत्न व प्रयोग करतो आहे.

एखादी वस्तू वा विचार नवीन आहे म्हणून बेकार आहे असे आश्चर्याच्या

या युगात कोणीही म्हणू शकत नाही. तो विचार आजच्या युगभावनेला अनुकूल नाही आणि म्हणून तो असंभव आहे असे म्हणणे कठीण आहे. ज्या गोष्टींची स्वप्नातही कल्पना करता येऊ शकत नव्हती त्या दररोज समोर येत आहेत. हिंसेच्या क्षेत्रात आजकाल असे नवनवीन शोध लागत आहेत की ते कळल्यानंतर आपण आश्चर्यचकित होतो. माझे म्हणणे आहे की अहिंसेच्या क्षेत्रातही अनपेक्षित व असंभव वाटणारे शोध लागतील. अशा उदाहरणांनी धर्माचा इतिहास भरलेला आहे....

परंतु शक्य तेवढा प्रयत्न करूनही श्रीमंत लोक गरिबांचे ख-या अर्थाने पालक बनण्याकरिता तयार झाले नाहीत आणि गरिबांना अधिकाधिक चिरडले जात असेल व ते उपासमारीला बळी पडत असतील तर काय करावे? या समस्येवर विचार करता करता मला दोन अचूक उपाय सुचले व ते आहेत अहिंसक असहकार आणि सविनय आज्ञाभंग. श्रीमंत लोक समाजातील गरिबांच्या सहकार्याशिवाय धनसंपत्ती गोळा करू शकत नाहीत.

माणूस सुरुवातीपासूनच हिंसेशी परिचित आहे, कारण त्याच्या आत दडलेल्या पशूपासून ही शक्ती त्याला वारसा म्हणून मिळाली आहे. अहिंसेच्या ज्ञानाची जाणीव त्याला तेव्हाच झाली जेव्हा तो चतुष्पादाचा द्विपाद झाला. त्याच्यामध्ये या ज्ञानाचा विकास हळूहळू पण निश्चितपणे झाला आहे. जर या ज्ञानाचा गरिबांमध्ये प्रवेश झाला व त्यांच्यामध्ये त्याचा प्रसार झाला तर ते मजबूत होतील आणि अहिंसेच्या माध्यमातून स्वतःला त्या भयानक विषमतेतून मुक्त करू शकतील जिने त्यांना उपासमारीच्या काठावर आणून उभे केले आहे.
(हरि, २५-८-१९४०, पृ. २६०-१)

# ११. ब्रह्मचर्य

## ५६. ब्रह्मचर्याचा दिव्य संदेश

**आत्मसंयम**

मानवसमाजाची वाढ अविरत आहे. आध्यात्मिक दृष्टीने सांगायचे तर क्रमशः विकसित होत जाणारी ती प्रक्रिया आहे. जर असे असेल तर शारीरीक गरजांना अधिकाधिक संयमित करण्यावर ही प्रक्रिया आधारित असली पाहिजे. याप्रमाणे विवाह हा असा संस्कार आहे की ज्यामुळे पतिपत्नी अनुशासित होतात, त्यांना केवळ आपसातच शरीरसंबंध ठेवण्याची परवानगी असते आणि तीसुद्धा जेव्हा दोघांचीही संततिनिर्मितीची इच्छा असेल तेव्हा. (यंग, १६-९-१९२६, पृ. ३२४)

पशू आणि माणूस यांच्यात मुख्य अंतर हेच आहे की माणसाला कळू लागल्यानंतर तो सतत आत्मसंयम करून जगण्याला सुरुवात करतो. आपली आई, मुलगी आणि पत्नी यांच्यात भेद करता येईल अशी बुद्धी माणसाला ईश्वराने दिली आहे. (विगांसी,पृ.८४)

**ब्रह्मचर्याची आवश्यकता**

आपण जर स्त्री-पुरुष संबंधाकडे स्वस्थ आणि शुद्ध दृष्टीने पाहू लागलो आणि स्वतःला भावी पिढ्यांच्या कल्याणाचे विश्वस्त समजू लागलो तर आजची अनेक दुःखे आपण दूर करू शकतो. (यंग, २७-९-१९२८, पृ. ३२४)

ब्रह्मचर्याशिवाय मला जीवन नीरस आणि पशूसारखे वाटू लागते. पशूला स्वभावानेच आत्मसंयम माहीत नसतो. माणूस याकरिताच माणूस आहे की तो हवा तेवढा आत्मसंयम करण्यास समर्थ आहे. धार्मिक पुस्तकांमधील ब्रह्मचर्याची जी प्रशंसा मला आधी अतिरेकी वाटत होती ती आज पूर्णपणे उचित आणि अनुभवाधारित आहे असे स्पष्टपणे वाटते. (ए, २२४)

माझे ठाम मत आहे की आध्यात्मिक पूर्णतेच्या प्राप्तीकरिता जीवनात मन, वाचा आणि कर्म या सर्वांमधून आत्मनिग्रह असणे आवश्यक आहे. ज्या राष्ट्रांमध्ये असे लोक नसतील ते राष्ट्र अशा लोकांच्या अभावी अतिशय गरीब राष्ट्र आहे

असे म्हणावे लागेल. (यंग, १३-१०-१९२०, पृ. ३)

### ईश्वरावर श्रद्धा

मला मान्य आहे की निग्रहाच्या नियमाचे पालन तोपर्यंत अशक्य आहे जोपर्यंत माणसाची ईश्वरावर, जो जिवंत सत्य आहे, नितांत श्रद्धा नसेल. ईश्वराचे अस्तित्व पूर्णपणे नाकारून जीवनातील उच्च स्तराच्या उपलब्धीकरिता जिवंत ईश्वरावरील नितांत श्रद्धेची आवश्यकता नाही या गोष्टीवर भर देण्याची आजकाल फॅशन झाली आहे. ज्या लोकांची आपल्यापेक्षा अतिशय उच्च अशा कोणत्या तरी शक्तीवर श्रद्धा नाही आणि ज्यांना ती असण्याची गरज वाटत नाही त्यांना या नियमाची सत्यता पटवून देण्याचे सामर्थ्य माझ्यामध्ये नाही ही गोष्ट मी मान्य करतो. माझ्या स्वतःच्या अनुभवाने मला हे शिकवले आहे की, संपूर्ण ब्रह्मांडाला संचालित करणा-या जिवंत नियमावर श्रद्धा ठेवल्याशिवाय जीवनाचे पूर्णत्व प्राप्त करता येऊ शकत नाही. (हरि, २५-४-१९३६,पृ.८४)

जेणेकरून आपल्या आतील ईश्वराच्या उपस्थितीची आपल्याला जाणीव होईल त्या नियमाला आपण ओळखावे आणि त्याचे अनुसरण करावे हा ज्याला आपण ईश्वर म्हणतो,... त्या जिवंत शक्तीला ओळखण्याचा उपाय आहे. परंतु हे स्पष्ट आहे की ईश्वरीय नियमाचे ज्ञान होण्याकरिता कठीण परिश्रम करावे लागतात. या नियमाला एका शब्दात 'ब्रह्मचर्य' म्हणता येऊ शकते. ब्रह्मचर्य पालनाचा साधासरळ उपाय आहे रामनाम. (हरि, २२-६-१९४७, पृ. २००)

### योग्य अर्थ

ब्रह्मचर्याचा पूर्ण आणि योग्य अर्थ ब्रह्माचा शोध हा आहे. ब्रह्म प्रत्येक जीवात व्यापलेला आहे, त्यामुळे आपल्या अंतरात्म्यात सूर मारून अंतरात्म्याच्या सिद्धिद्वारे त्याचा शोध घ्यावा लागतो. अंतरात्म्याची सिद्धी इंद्रियांवर पूर्ण नियंत्रण मिळवल्याशिवाय शक्य नाही. अशा रीतीने ब्रह्मचर्याचा अर्थ झाला आपल्या सर्व इंद्रियांवर काया, वाचा, मनाने सदैव नियंत्रण.

ब्रह्मचर्याचे पूर्णपणे पालन करणारे स्त्री-पुरुष मनोवेगापासून पूर्णपणे मुक्त असतात. अशा व्यक्तींचा ईश्वराच्या सानिध्यात वास असतो. त्या ईशतुल्य असतात. अशा ब्रह्मचर्याचे मन, वाचा आणि कर्म यांच्याद्वारे पूर्णपणे आचरण करणे शक्य आहे. (यंग, ५-६-१९२४, पृ. १८६)

ब्रह्मचर्य काय आहे? ही अशी जीवनपद्धती आहे जी आमची ब्रह्माशी

(ईश्वराशी) भेट घडवून देते. यात प्रजनन क्रियेवर पूर्ण नियंत्रण संमीलित आहे. हे नियंत्रण मन, वाचा आणि कर्म याद्वारे असले पाहिजे. मनावर जर नियंत्रण नसेल तर वाणी आणि कर्म यांच्यावर नियंत्रण मिळवून काही फायदा नाही. हिंदीत एक म्हण आहे : 'ज्याचे मन शुद्ध असते त्याच्या घरी सर्वांना पवित्र करणारे गंगाजल वास करत असते.' गोष्ट अशी आहे की, ज्याचे आपल्या मनावर नियंत्रण आहे त्याच्याकरिता इतर सर्व काही मुलांच्या खेळासारखे आहे. माझ्या कल्पनेतील ब्रह्मचारी निरोगी असेल आणि तो सहजपणे दीर्घ काळ जगेल. त्याचे डोकेसुद्धा कधीही दुखणार नाही. मानसिक आणि शारीरिक श्रमामुळे त्याला कधीही थकवा येणार नाही. तो नेहमी तेजस्वी दिसेल, आळस त्याच्याकडे फिरकणारसुद्धा नाही. त्याच्या बाह्य स्वच्छतेतून त्याची आंतरिक स्वच्छता पूर्णपणे प्रतिबिंबित होईल. गीतेत स्थितप्रज्ञाची जी लक्षणे सांगितलेली आहेत, ती सर्व त्याच्यात दिसून येतील. अशा प्रकारचे गुण असलेली एकही व्यक्ती नसली तरी काळजीचे काहीही कारण नाही.

मानवाच्या सृजनाचे सामर्थ्य असलेल्या वीर्याचे पूर्णपणे रक्षण करून जी व्यक्ती उर्ध्वरेता बनलेली असते तिच्यात वर सांगितलेले सर्व गुण दिसून येतील तर त्यात काय आश्चर्य? ज्या उर्ध्वगामी शक्तीचा केवळ एक थेंब मानवी जीवनाची सृष्टी करण्याकरिता समर्थ आहे त्या उर्ध्वगामी वीर्याची सृजनात्मक शक्ती कोण मोजू शकेल? (हरि, ८-६-१९४७, पृ. १८०)

## परिभाषा

जोपर्यंत विचार पूर्णपणे नियंत्रणात नसतो तोपर्यंत संपूर्ण ब्रह्मचर्य असू शकत नाही. अनैच्छिक विचार मनाची एक विकृती आहे, यामुळे विचारावर नियंत्रण मिळवण्याचा अर्थ आहे मनाला नियंत्रित करणे. ही गोष्ट वायूला नियंत्रित करण्यापेक्षाही कठीण आहे. तरीही अंतःकरणातील ईश्वराच्या अस्तित्वामुळे मनावर नियंत्रण आणणे शक्य होते. ही गोष्ट कठीण आहे म्हणून ती असंभव आहे असे कोणीही समजू नये. हे उच्चतम ध्येय आहे आणि त्यामुळे त्याच्या प्राप्तीकरिता प्रयत्नही अधिकतम करावे लागतात यात काही आश्चर्य नाही. (ए, पृ. ५५३)

## मन

अन्य नियमांप्रमाणेच ब्रह्मचर्याचे पालन मन, वाचा आणि कर्म यांच्याद्वारे केले

पाहिजे. गीतेत सांगितले आहे आणि अनुभवही या कथनाची पुष्टी करतो की जो मूर्ख माणूस आपल्या शरीरावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करतो परंतु मनातून मात्र वाईट विचार करत असतो त्याचे प्रयत्न व्यर्थ असतात. मनाला मुक्त संचार करू देऊन शरीराला जर दाबून ठेवले तर त्याचे विपरीत परिणाम होऊ शकतात. जेव्हा मन भरकटत असते तेव्हा लवकर म्हणा वा उशिरा शरीर त्याच्यामागे जाणे अपरिहार्य असते....

....मनाला कलुषित विचार पाळणे एक गोष्ट आहे आणि आमच्या प्रयत्नानंतरही मनाने तिकडे भरटकणे ही दुसरी गोष्ट आहे. आपण जर मनाच्या या भरकटण्याशी असहकार करू लागलो तर अखेरीस आपला विजय होईल. (फ्रायंम, पृ. १२-३)

## आंतरिक स्थिती

ब्रह्मचर्य एक मानसिक अवस्था आहे. माणसाचे बाह्य आचरण त्याच्या अंतर्मनाची अवस्था कशी आहे ते सप्रमाण दाखवते. ज्याने आपल्या कामवासनेला मारून टाकले आहे त्याच्यात कोणत्याही स्वरूपाचा दोष आढळू शकत नाही. कितीही सुंदर स्त्री असली तरी ती त्या पुरुषाला आकर्षित करू शकणार नाही ज्याच्यात कामवासनाच नाहीत. हीच गोष्ट स्त्रियांनाही लागू होते....

ब्रह्मचर्य असा गुण नाही की ज्याचा निग्रह केवळ बाह्य आचरणातून करता येईल. जी व्यक्ती स्त्रीच्या अपरिहार्य संपर्कापासून दूर पळते तिला ब्रह्मचर्याचा संपूर्ण अर्थ कळत नाही.....

खरा ब्रह्मचारी खोट्या निग्रहांपासून दूर राहील. आपल्या सीमा लक्षात ठेवून त्याला आपले कुंपण घालून घ्यावे लागेल आणि जेव्हा ते निरुपयोगी वाटेल तेव्हा त्याने ते तोडूनही टाकले पाहिजे. पहिली गोष्ट म्हणजे खरे ब्रह्मचर्य काय आहे ते कळले पाहिजे, नंतर त्याचे मूल्य समजले पाहिजे आणि शेवटी हा अमूल्य सद्‌गुण आपल्या आचरणात आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. माझे मत आहे की ख-या देशसेवेकरिता या सद्‌गुणानुसार आचरणाची नितांत गरज आहे. (हरि, १५-६-१९४७, पृ. १९२)

## इंद्रियनिग्रह

....केवळ पाशवी वासनांवर नियंत्रण मिळवले की ब्रह्मचर्याचे पालन झाले असे समजले जाते. माझ्या मते ही धारणा अपूर्ण आणि चुकीची आहे. ब्रह्मचर्य म्हणजे

सर्व इंद्रियांचा निग्रह. जी व्यक्ती केवळ एका इंद्रियाचा निग्रह करते आणि इतर इंद्रियांना मोकळे रान सोडते त्या व्यक्तीला आपले प्रयत्न वाया गेल्याचा अनुभव येणे अपरिहार्य आहे.

कानांनी सूचक गोष्टी ऐकणे, डोळ्यांनी सूचक गोष्टी पाहणे, जिभेने उत्तेजक पदार्थांचा आस्वाद घेणे, हाताने उत्तेजक गोष्टींना स्पर्श करणे आणि त्याच वेळी उरलेल्या केवळ एकाच इंद्रियावर नियंत्रण ठेवण्याची अपेक्षा करणे म्हणजे आगीत हात ठेवून तो जळू नये अशी अपेक्षा करण्यासारखे होईल. त्यामुळे ज्याला एका इंद्रियावर नियंत्रण आणायची इच्छा असेल त्याने उरलेल्या सर्व इंद्रियांना नियंत्रित केले पाहिजे.

ब्रह्मचर्याच्या संकुचित व्याख्येमुळे बरेच नुकसान झाले आहे असे मला नेहमीच वाटत आले आहे. आपण जर एकाच वेळी सर्व बाजूंनी संयमाचा प्रयत्न केला तर तो प्रयत्न शास्त्रशुद्ध होईल आणि तो यशस्वी होण्याची शक्यता राहील. रसनेचे नियंत्रण बहुधा सर्वाधिक कठीण आहे. (फ्रायम, पृ. १३-४)

## स्थितप्रज्ञ

स्थितप्रज्ञाची लक्षणे.... कोणती आहेत? ज्याप्रमाणे कासव आपल्या कवचामागे आपली इंद्रिये ओढून घेतो त्याप्रमाणे स्थितप्रज्ञ आपल्या इंद्रियांना इंद्रियांच्या विषयांपासून आत्म्याच्या ढालीमागे ओढून घेतो. ज्याची बुद्धी स्थिर नसते त्याला क्रोध, कुविचार अथवा अपशब्द हे धोका देण्याची शक्यता असते. उलट स्थिर बुद्धी असलेल्या व्यक्तीवर प्रशंसा वा अपशब्द यांचा काहीही प्रभाव पडत नाही. त्याला माहीत असते की अपशब्दांमुळे ते उच्चारणा-याची जीभच तेवढी विटाळत असते, ज्या व्यक्तीच्या विरोधात ते अपशब्द उच्चारण्यात आलेले असतात त्याच्यावर त्यांचा काहीही परिणाम होत नाही. यामुळे स्थिर बुद्धी असणारी व्यक्ती कधीही कुणाचेही वाईट चिंतणार नाही आणि आपल्या अखेरच्या श्वासापर्यंत शत्रूकरिता ती प्रार्थनाही करील. (हरि, २८-४-१९४६, पृ. ११०-११)

## माझे ब्रह्मचर्य

माझ्याकरिता तर कायिक ब्रह्मचर्यही फार कठीण असल्याचे सिद्ध झाले आहे. आज मी सांगू शकतो की मला आता बरेच सुरक्षित वाटते. परंतु मला माझ्या विचारांवर पूर्ण प्रभुत्व मिळवायचे आहे. हे फार आवश्यक आहे. असे नाही की माझ्यामध्ये इच्छा वा प्रयत्नांची उणीव आहे. परंतु अवांछनीय विचार कुठून येऊन

आपल्यावर हल्ला करतात ते मला कळू शकलेले नाही.

मला याबद्दल कोणताही संशय नाही की नको असलेल्या विचारांना अडवण्याचा कोणता तरी उपाय असलाच पाहिजे. परंतु प्रत्येक व्यक्तीला त्याचा शोध स्वतःलाच घ्यावा लागतो. संतांनी आणि ऋषींनी आमच्याकरिता अनुभव तर ठेवले आहेत परंतु त्यांनी कोणताही अचूक आणि सार्वभौम उपाय सांगितलेला नाही. परिपूर्णता वा चुकांपासून पूर्णपणे मुक्ती केवळ ईश्वरी कृपेनेच प्राप्त होऊ शकते आणि याकरिता ईश्वरप्राप्तीचा प्रयत्न करणारे ऋषीमुनी आपल्या तपश्चर्येने पवित्र केलेला रामनामासारखा मंत्र आमच्याकरिता सोडून गेले आहेत.

आपल्याला पूर्णपणे ईश्वराला समर्पित केल्याशिवाय विचारांवर पूर्ण नियंत्रण मिळवणे अशक्य आहे. प्रत्येक महान धर्मग्रंथाचा हाच उपदेश आहे आणि पूर्ण ब्रह्मचर्याकरिता प्रयत्न करत असताना दर क्षणी मला या गोष्टीचा अनुभव येत असतो. (ए, पृ. २३४)

विविध प्रकारच्या कार्यात व्यस्त असतानाही गत तीसपेक्षा अधिक वर्षांपासून मी ब्रह्मचर्याचे पुरेसे पालन केले आहे. ब्रह्मचा-याचे जीवन जगण्याचा निर्णय घेतल्यानंतर माझ्या पत्नीशी असलेले माझे वर्तन सोडून माझ्या इतर वर्तनात क्वचितच काही फरक निर्माण झाला असावा....

माझे ब्रह्मचर्य पुस्तकी नाही. मी माझ्याकरिता आणि माझ्या आग्रहामुळे या प्रयोगात सहभागी होणा-या माझ्या सहका-यांकरिता मार्गदर्शक नियम स्वतः बनवले आहेत. पूर्वनिर्धारित नियमच केवळ मी अमान्य केलेले नाहीत तर सर्व प्रकारचा वाईटपणा आणि प्रलोभने यांचे मूळ स्त्री असते या विधानाचा उल्लेख धर्मग्रंथांमध्ये असूनही हे विधान मी नाकारले आहे. माझ्यात जर काही चांगले असेल तर ते माझ्या आईमुळे आहे. मी स्त्रीला वासनापूर्तीचे साधन कधीच मानले नाही, तर माझ्या आईप्रमाणे मी तिला पूज्य मानले आहे. पुरुषच प्रलोभन देत असतो, पुरुषच आक्रमक असतो. स्त्रीचा स्पर्श पुरुषाला भ्रष्ट करत नसून स्त्रीला स्पर्श करण्याची पात्रताच राहू नये इतका पुरुषच कदाचित भ्रष्ट असावा....

मी प्रयोग करत आहे. माझ्या व्याख्येप्रमाणे मी पूर्ण ब्रह्मचर्य साध्य केले आहे असा दावा मी कधीही केला नाही. अहिंसेसंबंधी माझ्या शोधाकरिता जितके आवश्यक आहे तितके माझ्या विचारांवर मी नियंत्रण मिळवू शकलेलो नाही. माझ्या अहिंसेला जर संसर्गजन्य आणि संक्रामक बनवायचे असेल तर विचारांवर मला अधिक नियंत्रण मिळवावे लागेल. (हरि, २३-७-१९३८, पृ. १९३)

ज्या दिवशी मी ब्रह्मचर्याला सुरुवात केली त्या दिवसापासून आम्ही स्वतंत्र होऊ लागलो. माझी पत्नी एक स्वतंत्र स्त्री झाली, तिचा नवरा म्हणून तिच्यावर मी जो अधिकार गाजवत होतो, त्यापासून ती मुक्त झाली आणि मी त्या वासनेच्या गुलामगिरीतून मुक्त झालो जिच्या तृप्तीचे ती साधन होती. माझ्या पत्नीबद्दल माझ्या मनात जसे आकर्षण होते तसे इतर कोणत्याही स्त्रीबद्दल नव्हते. माझ्या पत्नीशी मी इतका प्रामाणिक होतो आणि माझ्या आईला दिलेल्या वचनाशी मी इतका बांधलेलो होतो की इतर कोणत्याही स्त्रीचा मी गुलाम बनू शकत नव्हतो. परंतु माझे ब्रह्मचर्य ज्या पद्धतीने मला मिळाले त्या पद्धतीमुळे स्त्रीला पुरुषाची आई समजून मी तिच्याकडे अनिवार्यपणे ओढला जाऊ लागलो. ती माझ्याकरिता इतकी पवित्र झाली होती की ती भोगाची वस्तू राहूच शकत नव्हती आणि अशा रीतीने प्रत्येक स्त्री माझ्याकरिता बहीण वा मुलगी झाली. (हरि, ४-११-१९३९, पृ. ३२६)

मला जर स्त्रियांबद्दल लैंगिक आकर्षण वाटले असते तर माझ्यात इतकी हिंमत आहे की या वयातही मी अनेक विवाह केल्याशिवाय राहिलो नसतो. माझा स्वच्छंद प्रेमावर - मग तो गुप्त असो वा उघड - विश्वास नाही. मुक्त आणि स्वच्छंद प्रेमाला मी कुत्र्याच्या वासनेचा दर्जा देतो आणि गुप्त भोग तर भित्रेपणाचेही आहेत. (हरि, ४-११-१९३९, पृ. ३२६)

## ५७. विवाहाचा आदर्श

विवाहाचा आदर्श आहे शारीरिक मीलनाच्या माध्यमातून आध्यात्मिक मीलनाची प्राप्ती. विवाहामुळे अभिव्यक्त होणारे प्रेम हे दिव्य वा सार्वभौम प्रेमाकडे जाणा-या शिडीची एक पायरी आहे. (यंग, २१-५-१९३१, पृ. ११५)

पूर्ण त्याग, पूर्ण ब्रह्मचर्य हा एक आदर्श आहे. तसे करण्याचे साहस जर तुमच्यात नसेल तर अवश्य लग्न करा, परंतु निदान संयमाने तरी राहा. (हरि,७-९-१९३५,पृ.२३४)

ज्यांना उच्च आध्यात्मिक जीवनाची अभिलाषा आहे त्यांच्याकरिता पूर्ण ब्रह्मचर्य वा विवाहित ब्रह्मचर्य आहे; अशा प्रकारच्या जीवनाकरिता ब्रह्मचर्याचे पालन ही अपरिहार्य अट आहे. (हरि, ५-६-१९३७, पृ. १३४)

जीवनात विवाह ही स्वाभाविक घटना आहे आणि ती अधःपतनकारी आहे असे समजणे चूक आहे.... आदर्श स्थिती ही आहे की विवाह हा एक पवित्र संबंध आहे असे समजले पाहिजे आणि वैवाहिक अवस्थेत संयमाने जीवन व्यतीत

केले पाहिजे. (हरि, २२-३-१९४२, पृ. ३८)

कामवासनेच्या तृप्तीकरिता करण्यात आलेला विवाह हा विवाह नाही, तो व्यभिचार आहे. (हरि, २४-४-१९३७, पृ. ८२)

पहिल्या अपत्याला मनूने धर्मज म्हटले आहे - धर्मज म्हणजे कर्तव्याच्या जाणिवेतून जन्मलेले अपत्य. पहिल्या अपत्यानंतर झालेली मुले कामज म्हणवली जातात म्हणजे वासनांमुळे झालेला जन्म. थोडक्यात हाच लैंगिक संबंधाचा नियम आहे आणि ईश्वर जर नियम नसेल तर अजून काय आहे? ईश्वराच्या आज्ञेचे पालन म्हणजे नियमाचे पालन. (हरि, २४-४-१९३७, पृ. ८३)

कामवासनेच्या तृप्तीकरिता करण्यात आलेला संभोग म्हणजे पशुत्वाकडे परत जाणे आहे, त्यामुळे माणसाने त्याच्या वर उठायला पाहिजे. परंतु पतिपत्नीला असे करण्यात यश आले नाही तर ती पाप वा कलंक लावणारी गोष्ट आहे असे म्हणता येऊ शकत नाही. जगातील करोडो लोक आपल्या रसनेच्या तृप्तीकरिता खातात तसेच करोडो पतिपत्नी आपल्या वासनांच्या तृप्तीकरिता संभोग करतात व करत राहणार आहेत. त्यामुळे आपल्या नियमांचा भंग करणा-यांना निसर्ग जी शिक्षा देत असतो ती असंख्य संकटांच्या रूपातील कठोर शिक्षाही त्यांना मिळेल. (हरि, ५-६-१९३७, पृ. १३४)

पतिपत्नीमधील निष्कलंक प्रेम इतर कोणत्याही प्रेमापेक्षा माणसाला ईश्वराच्या अधिक जवळ नेते. या निष्कलंक प्रेमात जेव्हा कामभावना मिसळते तेव्हा ती व्यक्तीला आपल्या निर्मात्याजवळून दूर नेते. यामुळे जर कामभावना वा कामसंबंध नसतील तर विवाहाची आवश्यकता आहे काय हा प्रश्न विचारणीय आहे. (हरि, १९-१०-१९४७, पृ. ३७४)

## विवाहाचे ध्येय

जो विवाह संयुक्तपणे सेवा करण्याकरिता केला जातो त्यांचे स्वतःचे काही लाभ आहेत. जे विवाह उपभोगाकरिता केले जातात ते तुच्छ असतात.
(हरि, १९-५-१९४६, पृ. १३३)

विवाहाचा खरा हेतू स्त्री-पुरुषामध्ये खरा मैत्रीभाव आणि सख्य निर्माण करणे आहे. यात कामभावनेच्या तृप्तीला कोणतेही स्थान नाही. कामेच्छेच्या तृप्तीकरिता करण्यात आलेला विवाह हा खरा विवाहच नाही. कामेच्छेची तृप्ती ख-या मैत्रीच्या आड येत असते.

इंग्रजांमधील अशा विवाहांची मला माहिती आहे जे सख्य आणि परस्पर सेवेकरिता करण्यात आले होते. माझ्या वैवाहिक जीवनाची चर्चा अप्रासंगिक होणार नसेल तर मी सांगेन की मला आणि माझ्या पत्नीला वैवाहिक जीवनाच्या ख-या आनंदाचा आस्वाद तेव्हाच घेता आला जेव्हापासून आम्ही लैंगिक संबंधांचा त्याग केला आणि तोही ऐन तारुण्यात. तेव्हाच आमचे सख्य फुलले आणि भारताची आणि व्यापक मानवतेची सेवा करण्याची पात्रता आम्हा दोघांमध्ये आली.... खरे सांगायचे तर स्वार्थत्यागाची ही भावना सेवा करण्याच्या आमच्या उत्कट इच्छेतूनच निर्माण झाली. (हरि, ७-७-१९४६, पृ. २१४)

हे खरे आहे की असंख्य विवाह प्रसंगोपात स्वाभाविकपणे होत असतात व होत राहतील. या विवाहांमध्ये वैवाहिक जीवनाच्या भौतिक बाजूला महत्त्व देण्यात येत असते.

असंख्य व्यक्ती आपल्या रसनेच्या तृप्तीकरिता खात असतात. परंतु एवढ्यामुळे ते माणसाचे कर्तव्य तर होत नाही? फार थोडे लोक जिवंत राहण्याकरिता खात असतात, परंतु याच लोकांना आहाराचे खरे नियम माहीत असतात. अशाच प्रकारे जे लोक विवाह बंधनातील शुद्धता आणि पावित्र्य यांचा अनुभव घेण्याकरिता आणि त्यात समाविष्ट देवत्वाच्या प्राप्तीकरिता विवाह करतात त्याच लोकांचा विवाह खरा असतो. (हरि, ७-७-१९४६, पृ. २१४)

## वैवाहिक संबंध

पत्नी पतीची वेठबिगारी करणारी गुलाम नाही तर त्याची सहकारी आणि मदतनीस आहे आणि त्याच्या सुखदुःखातील बरोबरीची भागीदार आहे. आपला मार्ग निवडण्याचे तिला तेवढेच स्वातंत्र्य आहे जेवढे पतीला आहे. (ए, पृ. १८)

माझ्या मते वैवाहिक अवस्थाही तितकीच अनुशासनबद्ध असावी, जितक्या इतर अवस्था. जीवन एक कर्तव्य आहे, एक उमेदवारीचा काळ आहे. वैवाहिक जीवनाचा उद्देश या जीवनात आणि नंतरही परस्परांच्या हिताला साहाय्य करणे आहे. याचा उद्देश मानवतेची सेवा करणे हासुद्धा आहे.

एक साथी अनुशासन भंग करत असेल तर दुस-या साथीदाराला विवाहबंधन तोडण्याचा अधिकार आहे. हे तोडणे नैतिक अर्थाने आहे, भौतिक अर्थाने नाही. यात घटस्फोटाला स्थान नाही. पती आणि पत्नीने ज्या ध्येयाच्या पूर्तीकरिता विवाह बंधनाचा स्वीकार केला होता त्याच ध्येयाच्या पूर्तीकरिता ते वेगळे होतील.

हिंदू धर्म सर्वांना समान लेखतो. परंतु व्यवहारात मात्र केव्हापासून वेगळेच काही होऊ लागले आहे यात काही संशय नाही. अजूनही काही अपप्रवृत्ती गुपचूप आत शिरल्या आहेत. परंतु मला एक गोष्ट माहीत आहे - हिंदू धर्म प्रत्येकाला आत्मसाक्षात्काराकरिता, जे प्रत्येकाच्या जीवनाचे उद्दिष्ट असते, हवे ते करण्याची परवानगी देतो. (यंग, २१-१०-१९२६, पृ. ३६५)

मी सीतेला आदर्श पत्नी मानतो आणि रामाला आदर्श पती. परंतु सीता रामाची दासी नव्हती. अथवा असेही म्हणता येईल की दोघेही परस्परांचे दास होते. राम सीतेचा सदैव आदर करायचे. (यंग, २१-१०-१९२६, पृ. ३६४)

तुम्ही तुमच्या पत्नीच्या सन्मानाचे रक्षण केले पाहिजे व स्वतःला तिचा स्वामी न समजता मित्र मानले पाहिजे. तुम्ही तिच्या शरीराला व आत्म्याला त्याप्रमाणेच पवित्र मानले पाहिजे ज्याप्रमाणे माझा विश्वास आहे की ती तुमच्या शरीराला व आत्म्याला पवित्र मानते. याकरिता तुम्हाला प्रार्थनापूर्ण श्रम, साधेपणा आणि संयम या गुणांनी युक्त असे जीवन जगावे लागेल. तुमच्यापैकी कोणीही परस्परांना वासनांचे साधन समजू नये. (यंग, २-२-१९२८, पृ. ३५)

माझे मत आहे की पतिपत्नीमध्ये काहीही गुप्त नसावे. मला असे वाटते की पतिपत्नींनी एकमेकात विलीन होऊन जावे. त्यांनी एक आत्मा आणि दोन देह होऊन राहावे. (हरि, ९-३-१९४०, पृ. ३०)

### बळजबरीचा विवाह

आईवडलांनी आपल्या मुलींचा बळजबरीने विवाह करणे चूक आहे. आपल्या मुलींना जीवननिर्वाहायोग्य न बनवणे हीही त्यांची चूक आहे. मुलीने विवाहाला नकार दिल्यानंतर तिला घराबाहेर काढून टाकण्याचा अधिकार कोणत्याही वडिलांना नाही. (हरि, १५-९-१९४६, पृ. ३११-२)

### नागरी विवाह

माझा नागरी विवाहावर विश्वास नाही, परंतु सुधारणेकरिता नागरी विवाहाची संस्था आवश्यक समजून मी तिचे स्वागत करतो. (हरि, १६-३-१९४७, पृ. ६८)

# ५८. मुले

जर मला भारतातील, भारतातीलच का माझ्यात ताकद असेल तर सर्व जगातील अगदी तळाच्या व्यक्तीशी एकरूप व्हावे असे वाटत असेल, तर मला त्या मुलांच्या दोषांशी एकरूप होता आले पाहिजे जे माझ्या देखरेखीखाली आश्रमात आहेत. अतिशय नम्रपणे असे करत असताना एक दिवस मला ईश्वराचा म्हणजे सत्याचा साक्षात्कार होऊ शकेल अशी आशा मला आहे.
(यंग, ३-१२-१९२५, पृ. ४२२)

### स्वभाव

मुलांना वारसाने आपल्या आईवडलांकडून रंगरूपच मिळत नाही, त्यांचे गुणही मिळतात. वातावरणाची भूमिकाही महत्त्वपूर्ण आहे परंतु जे मूळ भांडवल घेऊन मूल आपले जीवन सुरू करते ते त्याला आपल्या पूर्वजांकडून वारसा म्हणून मिळालेले असते. मुलांना अनेकदा जो दोषपूर्ण वारसा मिळालेला असतो त्यावर यशस्वीपणे मात करताना मी अनेक मुलांना पाहिले आहे. परंतु याचे श्रेय त्या शुद्धत्वाला आहे जो आत्म्याचा स्वाभाविक गुण आहे. (ए, पृ. २३०)

पाळण्यातील मुले नेहमीच प्रलोभन वा संसर्गापासून मुक्त असतात, असे काही नाही. (ए, पृ. २५२)

वास्तविक आईवडील आपल्या सर्व मुलांना कोणती संपत्ती समसमान हस्तांतरित करू शकत असतील तर ती आहे त्यांचे चारित्र्य आणि शैक्षणिक सोयी-सवलती. शरीरश्रमाद्वारे प्रामाणिकपणे आपल्या मुलांना उदरनिर्वाह करता येऊ शकेल अशा प्रकारे आईवडलांनी आपल्या मुलांना स्वावलंबी बनवले पाहिजे. (यंग, १७-१०-१९२९, पृ. ३४०)

### मुलांपासून बोध

संपूर्ण नम्रतापूर्वक आणि प्रामाणिकपणाने मी मान्य केले पाहिजे की मी कितीही तटस्थपणे वागण्याचा प्रयत्न करत असलो तरी माझ्या अस्तित्वाच्या अणुरेणूतून मी प्रेमाचे प्रतिनिधित्व करण्याचा प्रयत्न करत असतो. माझ्या निर्मात्याचा, जो माझ्याकरिता सत्यस्वरूपी आहे, साक्षात्कार होण्याकरिता मी आतुर आहे आणि माझ्या जीवनाच्या सुरुवातीलाच मला कळले होते की जर मला सत्याचा

साक्षात्कार हवा असेल तर मी प्रेमाच्या नियमाचे, प्रसंगी प्राणांची बाजी लावूनही, पालन केले पाहिजे. ईश्वरकृपेने जेव्हा मला मूल झाले तेव्हा मला कळले की लहान मुलांकडून प्रेमाचा नियम सर्वात चांगल्या पद्धतीने शिकता येतो.

माझा पूर्ण विश्वास आहे की कोणताही मुलगा खोडकरपणा घेऊन जन्माला येत नाही. मुलाच्या जन्माच्या आधी आणि त्यानंतर जेव्हा तो मोठा होतो तेव्हा त्याच्या आईवडलांनी त्याच्याशी नीट व्यवहार केला तर मूल स्वाभाविकपणेच सत्याच्या आणि प्रेमाच्या नियमांचे पालन करू लागते हे सुविदित तथ्य आहे. जीवनाच्या आरंभी हा धडा शिकल्यानंतर माझ्या जीवनात हळूहळू परिवर्तन होऊ लागले....

विश्वास ठेवा की शेकडो मुलांचा, मी तर हजारोच म्हणणार होतो, मला जो अनुभव आला त्यावरून मी सांगतो की आपल्यापेक्षा मुलांमध्ये आत्मसन्मानाची भावना फार तीव्र असते. आपल्यात जर नम्रता असेल तर तथाकथित अजाण मुलांकडून आपण जीवनाचे महान पाठ शिकू शकतो. त्याकरिता प्रकांड पंडीताकडे जाण्याची गरज नाही.

मुलांच्या तोडून ज्ञान बाहेर पडत असते असे जे येशूचे वचन आहे त्याहून अधिक मोठे सत्य येशूने कुठेही सांगितले नाही. मी या मताशी पूर्णपणे सहमत आहे. आपण जर नम्रपणा आणि निष्कपटपणाने मुलांशी गोष्टी केल्या तर त्यांच्याकडून बरेच ज्ञान शिकू शकतो हे मी माझ्या अनुभवावरून सांगतो....

जगात जर आम्हाला खरी शांतता हवी असेल आणि युद्धाच्या विरोधात खरा संघर्ष करायचा असेल तर आपल्याला मुलांपासून सुरुवात करावी लागेल आणि जर मुलांची वाढ त्यांच्या स्वाभाविक निरागस रूपात होऊ शकली तर ना आपल्याला संघर्ष करावा लागेल ना मोठमोठे ठराव पास करावे लागतील. तेव्हा आपण एका प्रेमापासून दुस-या प्रेमाकडे आणि एका शांततेपासून दुस-या शांततेकडे जात राहू. इथपर्यंत की विश्वात प्रेमाचे आणि शांततेचे साम्राज्य पसरून जाईल. याच साम्राज्याकरिता आज जग तृषित आहे. (यंग, १९-११-१९३१, पृ. ३६१)

## ५९. संततिनियमन

### प्रजननाचे कार्य

झोपणे वा खाणेपिणे यांच्याप्रमाणेच मैथुनही आवश्यक आहे आणि ती एक स्वतंत्र क्रिया आहे असे समजणे माझ्या मते मूर्खपणाची पराकोटी आहे. जगाचे अस्तित्व

प्रजनन कार्यावर अवलंबून आहे आणि जग ईश्वराचे क्रीडांगण असल्यामुळे व त्यातून ईश्वराचा महिमा अभिव्यक्त होत असल्यामुळे प्रजननकार्याला जगाच्या वृद्धीकरिता नियंत्रित केले पाहिजे. ज्याला ही गोष्ट कळेल तो काहीही करून आपल्या कामुकतेवर नियंत्रण ठेवेल व अपत्याच्या शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक विकासाकरिता तो स्वतःला तयार करेल व अशा प्रकारे मिळवलेल्या ज्ञानाद्वारे संततीचा लाभ व्हावा याकरिता प्रयत्न करेल. (ए, पृ. १४८)

सहवासाचे उद्दिष्ट भोगविलास नसून संततीला जन्म देणे आहे. अपत्य व्हावे अशी इच्छा नसेल तर सहवास अपराध आहे. (यंग, १२-३-१९२५, पृ. ८८)

स्त्री आणि पुरुषाच्या मनात जर ही गोष्ट ठसली की जननेंद्रियाचा एकमेव आणि अतिशय महत्त्वाचा उपयोग प्रजनन आहे तर मग ते अन्य कोणत्याही हेतूने सहवास करण्याला वीर्याचा अपराधपूर्ण अपव्यय समजतील व त्या सहवासामुळे स्त्री-पुरुषाला मिळणारी उत्तेजना ही ऊर्जेचा अपराध स्वरूपी व्यय आहे असे समजू लागतील. (हरि, २१-३-१९३६ पृ. ४८)

कामोत्तेजनेची पूर्ती करणे हे आपले तसेच कर्तव्य आहे जसे एखाद्याचे कर्ज घेतल्यानंतर ते परत करणे आपले कर्तव्य असते आणि असे केले नाही तर माणसाला बौद्धिक क्षयरूपी दंड भरावा लागतो असे आमच्या मनात ठासून भरण्यात आले आहे. या कामोत्तेजनेला संतती निर्मितीच्या इच्छेपासून वेगळे करण्यात आले आहे. संततिनियमनाच्या साधनांचा उपयोग करण्याच्या बाजूचे लोक असे सांगतात की गर्भधारणा हा एक योगायोग आहे व स्त्री-पुरुषांची इच्छा नसल्यास त्यांनी ती थांबवली पाहिजे. माझे म्हणणे आहे की हा फार भयानक सिद्धान्त आहे आणि त्याचा प्रचार करण्यात येऊ नये.

कामोत्तेजना एक सुंदर आणि उदात्त गोष्ट आहे. यात लाजण्यासारखे काहीही नाही. परंतु हिचा हेतू केवळ संततीनिर्मिती हाच आहे. हिचा इतर कोणताही उपयोग म्हणजे ईश्वर आणि मानवता यांच्या विरुद्ध केलेला अपराध असे होईल. (हरि, २८-३-१९३६, पृ. ५३)

### कलात्मक दृष्टिकोन

माणूस एक कलाकार आणि निर्माता आहे यात काही संशय नाही. त्याला सौंदर्य आणि रंग उपलब्ध व्हायलाच पाहिजे. त्याच्या उच्चतम आणि सृजनात्मक प्रकृतीने त्याला भेद करण्याची दृष्टी दिली आणि त्याला कळले की रंगांचे कोणतेही मिश्रण सौंदर्य निर्माण करू शकत नाही आणि त्याला हेही कळले की आनंदोपभोगाचा

प्रत्येक मार्ग मूलतः चांगला नाही. माणसाच्या कलात्मक दृष्टीने त्याला उपयोगितेतून आनंदाचा शोध घ्यायला शिकवले.

याप्रमाणे विकासाच्या पहिल्या टप्प्यातच त्याला कळले होते की आपण केवळ खाण्याकरिता खाऊ नये तर जगण्याकरिता खाल्ले पाहिजे.. परंतु आजही अनेक लोक खाण्याकरिता खात असतात.. पुढे जाऊन त्याला हेही कळले की केवळ स्वतःकरिता जगण्यात मजा नाही, आपण आपल्या साथीदारांकरिता आणि त्यांच्या माध्यमातून ईश्वराच्या सेवेकरिता जगलो पाहिजे.

अशाच रीतीने मैथुनापासून मिळणा-या आनंदानुभूतीचा त्याने जेव्हा विचार केला, तेव्हा त्याला कळले की इतर इंद्रियांप्रमाणेच जननेंद्रियाचाही उपयोग आणि दुरुपयोग आहे आणि त्याच्या लक्षात आले की, त्याचे खरे कार्य म्हणजे योग्य उपयोग अर्थात् प्रजनन कार्य हाच आहे. त्याला वाटले की जननेंद्रियाचा अन्य कोणताही उपयोग बीभत्स आहे आणि त्याचा व्यक्ती आणि समाज या दोघांवरही फार विपरीत परिणाम होऊ शकतो. (हरि, पृ. ४-४-१९३६, पृ. ६१)

## संततिनियमनाची आवश्यकता

संततिनियमनाच्या गरजेविषयी दुमत असू शकत नाही. परंतु अनेक युगांपासून याची एक पद्धत सांगण्यात आली आहे व ती आहे संयमाची वा ब्रह्मचर्याची. ही एक अचूक आणि सर्वश्रेष्ठ पद्धत आहे. त्यानुसार आचरण करणा-यांकरिता ती हितकारी आहे. आणि वैद्यकीय विश्वातील लोक जर संततिनियमनाच्या कृत्रिम साधनांचा शोध लावण्याऐवजी आत्मनियंत्रणाच्या उपायांचा शोध लावू शकले तर त्यामुळे मानवतेवर फार उपकार होतील....

संततिनियमनाची कृत्रिम साधने म्हणजे दुराचरणाला वाट करून देणे आहे. यामुळे स्त्री-पुरुष अविवेकी होतात आणि या पद्धतीला देण्यात येणा-या प्रतिष्ठेमुळे पाहता-पाहता संयमाच्या त्या मूल्यांचे विघटन होऊन जाईल ज्यांच्यामुळे माणूस लोकलाजेने संयमाने वागत होता. कृत्रिम साधनांच्या वापरामुळे लोकांमध्ये निश्चितच आत्यंतिक मनोदौर्बल्य आणि स्नायुदौर्बल्य वाढेल. आजारापेक्षाही इलाज अधिक हानिकारक सिद्ध होईल.

आपण केलेल्या कृत्याच्या परिणामांपासून वाचण्याचा प्रयत्न चूक आणि अनैतिक आहे. ज्या व्यक्तीने जास्त जेवण केले त्याचे डोके दुखणे व परिणामी लंघन करणे हितकर आहे. आधी अधिक खायचे आणि नंतर औषधे घेऊन

त्याच्या परिणामापासून वाचण्याचा प्रयत्न करणे हिताचे नाही. याहूनही अधिक हानिकारक गोष्ट ही आहे की आधी तर माणसाने पाशवी वासनेत लिप्त व्हायचे आणि नंतर होणा-या परिणामापासून वाचण्याचा प्रयत्न करायचा. निसर्ग कठोर आहे आणि तो आपल्या नियमभंगाचा पुरेपूर बदला घेईल. नैतिक परिणाम केवळ नैतिक निग्रहानेच प्राप्त होऊ शकतात. इतर सर्व प्रकारचे निग्रह ज्या हेतूने अवलंबिले जातात त्या हेतूंचाच नाश करून टाकतील.
(यंग, १२-३-१९२५, पृ. ८८-९)

**अतिरिक्त लोकसंख्या**

जर कोणी असे म्हणेल की देशातील अतिरिक्त लोकसंख्येमुळे संततिनियमनाची साधने वापरणे आवश्यक आहे तर मी या गोष्टीशी सहमत होऊ शकत नाही. लोकसंख्या अतिरिक्त असल्याचे अजून कोणी सिद्ध करू शकलेला नाही. माझ्या मते भूमीचे योग्य व्यवस्थापन, उत्तम कृषी आणि पूरक उद्योग यांच्या बळावर देश आजच्या दुप्पट लोकसंख्येचे भरणपोषण करू शकतो.
(यंग, २-४-१९२५, पृ. ११८)

वाढत्या लोकसंख्येचा बागुलबुवा काही नवीन नाही. हा नेहमीच उभा करण्यात येत असतो. लोकसंख्यावृद्धी काही महान संकट नाही आणि ते तसे असल्याचे समजण्यातही येऊ नये. आपल्याला कळो वा न कळो, खरे महासंकट तर कृत्रिम उपायांनी तिचे नियंत्रण वा नियमन करण्यात आहे. जर याचा सार्वत्रिक उपयोग झाला तर निश्चितपणे प्रजातीची गुणवत्ता कमी होईल. परंतु ईश्वराच्या कृपेमुळे कधीही याचा सार्वत्रिक उपयोग होणार नाही. नको असलेल्या संततीकरिता जबाबदार असलेल्या घृणित कामवासनेची शिक्षा आम्हाला संसर्गजन्य रोग, युद्ध आणि दुष्काळ यांच्या रूपाने फेडावी लागत आहे. आपल्याला जर या तिन्ही अभिशापांपासून वाचायचे असेल तर आपण आत्मसंयमाची सर्वोत्कृष्ट पद्धती स्वीकारून नको असलेल्या संततीपासून स्वतःला वाचवले पाहिजे. विवेकी माणसांना आतापासूनच कृत्रिम उपायांचे दुष्परिणाम कळू लागले आहेत. नैतिक-अनैतिकतेचा प्रश्न उपस्थित न करता मी हेच म्हणेन की उंदरांप्रमाणे आपल्या प्रजातीची बेसुमार वाढ आपण थांबवली पाहिजे. परंतु आपला त्रास अजूनच वाढेल अशा पद्धतीने ते करण्यात येऊ नये. आपल्या प्रजातीचे उदात्तीकरण होईल अशा पद्धतीने आपण ही वाढ थांबवली पाहिजे. वेगळ्या शब्दात, ज्याच्या परिघात

जीवनातील सर्व कार्यप्रणाली येतील अशा योग्य शिक्षणाचा हा मुद्दा आहे. असे झाले तर एका रोगावर इलाज करताना अन्य सर्व रोगांचाही उपचार होऊन जाईल. एखादा मार्ग कठीण, चढणीचा व म्हणून दुर्गम आहे एवढ्याकरिता आपण तो मार्ग टाकून देऊ शकत नाही. माणसाच्या प्रगतीचा मार्ग नेहमीच अधिकाधिक कठीण राहणार आहे व या गोष्टीचे आपण स्वागत केले पाहिजे. (हरि, ३१-३-१९४६, पृ. ६६)

माणसाला दोनपैकी एक मार्ग निवडावा लागतो. एक वरच्या बाजूला जाणारा व दुसरा खालच्या. परंतु माणसामध्ये एक पशू बसलेला असल्यामुळे त्याला वरच्या बाजूला जाणा-या मार्गापेक्षा खालच्या बाजूला जाणारा मार्गच निवडावासा वाटतो आणि खाली जाणारा मार्ग आकर्षक दिसणारा असेल तर असे विशेषत्वाने होईल. पापाला पुण्याचा पोषाख घातला तर माणूस अतिशय सहजपणाने तिकडे वळतो. मेरी स्टोप्स आणि इतर मंडळी आज हेच करत आहेत.
(हरि, १-२-१९३५, पृ. ४१०)

संततिनियमनाचे समर्थक असे गृहीत धरून चालले आहेत की कामवासनेत लिप्त होणे जीवनाकरिता आवश्यक आहे आणि मुळात गरजेची गोष्ट आहे. स्त्रीजातीबद्दल जो कळवळा दाखवण्यात येत आहे, तो अतिशय दयनीय आहे. माझ्या मते कृत्रिम उपायांनी संततिनियमनाच्या समर्थनार्थ स्त्रीजातीची बाजू मांडणे, हा तिचा अपमान करणे आहे. वस्तुस्थिती ही आहे की पुरुषाने आपल्या कामलिप्सेमुळे स्त्रीचे आधीच बरेच अधःपतन केले आहे. कृत्रिम उपायांच्या समर्थकांचा हेतू कितीही चांगला असला तरी त्या उपायांमुळे स्त्रीचा दर्जा अजूनच खाली घसरेल.

कृत्रिम उपायांच्या समर्थकांना माझी विनंती आहे की त्यांनी पुढील परिणामांचा विचार करावा : या उपायांचा प्रयोग व्यापक प्रमाणावर झाला तर वैवाहिक बंधनाचे विघटन होईल व त्याची जागा स्वच्छंद प्रेम घेईल. कामवासना हेच ध्येय समजून पुरुष जर त्यातच लिप्त होऊन राहू लागला व पुढील परिस्थिती निर्माण झाली तर काय होईल याचा विचार करा - उदाहरणार्थ त्याला बरेच दिवस घराबाहेर राहावे लागले अथवा दीर्घकालीन युद्धात भाग घेण्याकरिता जावे लागले वा तो विधुर झाला वा त्याची पत्नी इतकी आजारी आहे की कृत्रिम साधनांच्या मदतीनेसुद्धा प्रकृतीची हानी झाल्याशिवाय ती पतीसहवास करू शकत नसेल तर काय होईल? (यंग, २-४-१९२५, पृ. ११८)

मला तर संततिनियमन काळोखाने भरलेल्या एखाद्या खोल विवराप्रमाणे दिसत आहे. असे करणे म्हणजे अज्ञात शक्तीबरोबर खेळण्यासारखे वाटते. काही विशिष्ट परिस्थितीत संततिनियमन करणे आवश्यक आहे असे जरी मान्य केले तरी लाखो-करोडो लोकांमध्ये याचा प्रचार करणे नितांत अशक्य आहे. मला वाटते की संततिनियमनाकरिता गर्भनिरोधकांऐवजी सर्वसामान्य लोकांची आत्मसंयमाकरिता मान्यता मिळवणे अधिक सोपे राहील.

आपले हे लहानसे जग कालच जन्माला आलेले नाही. असंख्य वर्षांच्या आपल्या जीवनात या जगाला अतिरिक्त लोकसंख्येचा प्रश्न कधीही भेडसावला नाही. गर्भनिरोधकांद्वारे जन्मदर नियंत्रित केला नाही तर खाद्य पदार्थांच्या अभावी हे जग नष्ट होईल, हे सत्य काही लोकांना एकाएकी कसे उमगले?
(हरि, १४-९-१९३५, पृ. २४४)

### अधिक मोठे पाप

नको असलेले मूल जन्माला घालणे पाप आहे, परंतु आपण केलेल्या गोष्टीच्या परिणामापासून दूर पळणे हे माझ्या मते त्याहूनही मोठे पाप आहे.
(हरि, ७-९-१९३५, पृ. २३४)

ईश्वराने कृपा करून पुरुषाला सर्वाधिक शक्तिशाली बीज दिले आहे आणि स्त्रीला विश्वातील सर्वात सुपीक भूमीपेक्षाही अधिक सुपीक बनवले आहे. तिची तुलना कोणाशीही करता येऊ शकत नाही. पुरुषाने आपली ही अमूल्य संपत्ती अशीच वाया घालवली तर तो घोर मूर्खपणा होईल. महागात महाग मोत्यांपेक्षाही आपल्या या वीर्याचे माणसाने जास्त रक्षण केले पाहिजे. आपल्या सुपीक भूमीत आपण पुरुषाचे अमूल्य बीज धारण करतो आहोत हे माहीत असतानाही जी स्त्री ते तसेच वाहून जाऊ देते ती स्त्रीही नितांत मूर्ख असली पाहिजे. पुरुष आणि स्त्री या दोघांवरही निसर्गाकडून मिळालेल्या आपल्या क्षमतेचा दुरुपयोग केल्याचा दोष येईल आणि निसर्ग त्यांना त्यांच्या अमूल्य संपत्तीपासून वंचित करू टाकेल.
(हरि, २८-३-१९३६, पृ. ५३)

माझे असे मत आहे की आपल्या कृत्याचे परिणाम भोगण्याला नकार देणे म्हणजे भित्रेपणा आहे. जे गर्भनिरोधकांचा प्रयोग करतात त्यांना मनोनिग्रह म्हणजे काय हे कदाचित कधीही कळू शकणार नाही. त्यांना त्याची गरजही नाही. गर्भनिरोधकांच्या वापरामुळे मूल होणे थांबू शकेल, परंतु त्यामुळे स्त्री-पुरुष या

दोघांचाही जोम संपून जाईल - स्त्रियांच्या तुलनेत पुरुषांची हानी जास्त होईल. राक्षसाशी युद्ध करायला नकार देणे नामर्दपणा आहे. (हरि,१७-४-१९३७, पृ.८४)

## सामाजिक दुर्गुण

मला माहीत आहे की गुप्त दुर्गुणांनी शालेय विद्यार्थी-विद्यार्थिनी यांच्यामध्ये किती अनर्थ घडवून आणला आहे. विज्ञानाच्या नावावर गर्भनिरोधकांचा प्रवेश आणि समाजाच्या नामवंत नेत्यांना मिळालेले लेखनस्वातंत्र्य यांच्यामुळे समस्या अजूनच जटिल झाली आहे आणि सुधारकांना सामाजिक जीवनाच्या स्वच्छतेकरिता काम करणे जवळपास अशक्य झाले आहे. (हरि, २८-३-१९३६, पृ. ५३)

## स्त्रीत्वाचा अपमान

मला माहीत आहे की, काही आधुनिक महिला कृत्रिम उपायांचे समर्थन करत आहेत. परंतु ही गोष्ट आपल्या प्रतिष्ठेच्या विरुद्ध आहे असे जाणवल्यानंतर यांतील अधिकांश स्त्रिया ही उपाययोजना नाकारतील याबद्दल मला काहीही संशय नाही. पुरुषांना स्त्रियांचे कल्याण हवे असेल तर त्यांनी स्वतःवर संयम ठेवला पाहिजे. स्त्री पुरुषाला मोह घालत नसते. वास्तवात आक्रमक असल्यामुळे पुरुषच ख-या अर्थाने दोषी असतो आणि मोहिनी घालणाराही असतो.
(यंग, २-४-१९२५, पृ. ११८)

माझे मत आहे की, गर्भनिरोधकांचे सर्वाधिक बुद्धिमान समर्थक त्यांचा उपयोग विवाहित स्त्रियांपर्यंत मर्यादित ठेवतील ज्यांना आपल्या पतीची कामतृष्णा तृप्त करायची असते, परंतु मूल नको असते. ही प्रवृत्ती मानवजातीच्या सदस्यांकरिता नैसर्गिक नाही, असे माझे मत आहे. अशा प्रकारची कामभावनेची तुष्टी समाजाकरिता हानिकारक सिद्ध होईल. (हरि, २-५-१९३६, पृ. ९२)

भारतातील स्त्रियांना गर्भनिरोधकांचा वापर करायला सांगणे म्हणजे घोड्याच्या शेपटाला लगाम बांधण्यासारखे आहे. सर्वात आधी तर त्यांना मानसिक दास्यातून मुक्त करायचे आहे, त्यांना आपल्या शरीराच्या पावित्र्याची जाणीव करून द्यायची आहे आणि मानवतेच्या सेवेच्या महत्तेचा पाठ शिकवायचा आहे.
(हरि, २-५-१९३६, पृ. ९३)

गर्भ निरोधक नारीत्वाचा अपमान आहे. एक वेश्या आणि गर्भनिरोधकांचा वापर करणारी स्त्री यांच्यात एवढेच अंतर आहे की, वेश्या आपले शरीर अनेक पुरुषांना विकते तर दुसरी एकालाच. पुरुषाला आपल्या पत्नीला स्पर्श करण्याचा

तोपर्यंत अधिकार नाही, जोपर्यंत तिला अपत्य नको असेल आणि आपल्या पतीलाही विरोध करता येईल इतकी संकल्पशक्ती स्त्रियांमध्ये असली पाहिजे. (हरि, ५-५-१९४६, पृ. ११८)

गर्भनिरोधकांचा धूमधडाक्याने प्रचार करणारे व संततिनियमनाची सुधारणा करू इच्छिणारे सुधारक परोपकाराच्या भावनेनेच हे काम करत आहेत यात काही संशय नाही. त्यांनी आपल्या परोपकारी भावनेमुळे होणा-या अनर्थकारी परिणामांचा विचार करावा अशी माझी त्यांना विनंती आहे. ज्यांनी या साधनांचा उपयोग करावा असे त्यांना वाटते त्या वर्गापर्यंत ते कधीही पोहोचू शकणार नाहीत. ज्यांनी यांचा प्रयोग करायला नको ते यांचा प्रयोग नक्कीच करतील व त्यामुळे त्यांचा व त्यांच्याशी विवाह करणारे यांची घोर हानी होईल. गर्भनिरोधकांचा प्रयोग शारीरिक आणि नैतिक दृष्टीने पूर्णपणे योग्य असल्याचे सिद्ध झाले तरी हा अनर्थ होईलच. (हरि, १२-९-१९३६, पृ. २४४)

**संयम**

पशू आणि मानव या दोघांमध्येही समान भावनेने प्रेरित असणारा लैंगिक संपर्काचा हेतू असल्याशिवाय रात्री एकाच खोलीत एकाच अंथरुणावर झोपायचे नाही असा निर्धार प्रत्येक पतिपत्नी करू शकतात. पशू या नियमाचे निरपवादपणे पालन करतात. माणसाला पर्याय उपलब्ध असल्यामुळे त्याने चुकीचा पर्याय निवडून एक भयानक चूक केली आहे.... स्त्री आणि पुरुष दोघांनीही लक्षात ठेवले पाहिजे की, कामभावनेच्या बाबतीत संयम पाळल्यामुळे कोणताही विकार होत नाही, उलट मन आणि शरीर सोबत असतील तर स्वास्थ्य आणि ओज या दोघांचीही वृद्धी होते. (यंग, २७-९-१९२५, पृ. ३२४)

**नाही म्हणण्याचे साहस**

स्त्रियांना आपल्या पतीचा प्रतिकार करावा लागेल. गर्भनिरोधकांचा उपयोग सुरू झाला तर त्याचे भयानक परिणाम होतील. स्त्री-पुरुष केवळ कामोपभोगाकरिताच जगतील. ते दुर्बलमनस्क आणि विक्षिप्त होतील. खरे सांगायचे तर मानसिक आणि नैतिक दृष्टीने त्यांची वाताहत होऊन जाईल. (अबाप, १२-१-१९३५)

तुम्ही स्वतंत्र आहात असे माझ्या जीवनाच्या उरलेल्या काळात मला स्त्रियांच्या मनात ठसवता आले तर भारतात संततिनियमन नावाची कोणतीच समस्या उरणार नाही असे मी अनुभवले आहे. पती कामासक्त होऊन जवळ आल्यानंतर त्या

जर नाही म्हणणे शिकल्या.... तर सर्व काही ठीक होईल.... खरी समस्या ही आहे की स्त्रियांना प्रतिकार करण्याची इच्छा नसते. याकरिता त्यांनी शिक्षित होणे जरुरीचे आहे. प्रतिकाराचा मूलभूत अधिकार स्त्रियांना कळावा अशी माझी इच्छा आहे. आपल्याला प्रतिकाराचा कोणताच अधिकार नाही अशी सध्या तरी त्यांची धारणा आहे. (आअ, नोव्हेंबर १९३५)

पुरुषाएवढीच स्त्री कामवासनेची शिकार होते ही गोष्ट मी मान्य करू शकत नाही. पुरुषाच्या तुलनेत स्त्रियांकरिता आत्मसंयम करणे अधिक सोपे आहे. (हरि, २-५- १९३६, पृ. ९३)

**आत्मसंयम**

आपण जर असे समजू लागलो की कामवासनेत लिप्त होणे आवश्यक, हितकर आणि निरागस आहे तर आपण कामवासनेच्या हाती सर्व सूत्रे सोपवू व तिचा प्रतिकार करण्याची शक्ती आपल्यामध्ये राहणार नाही. याउलट आपण जर स्वतःची खात्री पटवू शकलो की, ही गोष्ट हानिकारक, पापमय आणि अनावश्यक आहे तर आत्मसंयम पूर्णपणे शक्य असल्याचे आपल्याला आढळून येईल. (यंग, १९-८-१९२६, पृ. २८९)

सर्वसामान्य माणूस आत्मसंयम करू शकत नाही अशी धारणा गर्भनिरोधकांचे समर्थन करणारांची असल्यामुळे माझे त्यांच्याशी भांडण आहे. काहींचे तर इथपर्यंत म्हणणे आहे की तो जरी आत्मसंयम करू शकत असेल तरी त्याने तसे करू नये. असे सांगणारे लोक आपल्या क्षेत्रात कितीही नावाजलेले असले तरी आत्मसंयमाच्या संभावनेचा अनुभव घेतल्याशिवाय ते असे बोलत आहेत असे मला त्यांना नम्रतापूर्वक परंतु खात्रीपूर्वक सांगायचे आहे. मानवी आत्म्याची क्षमता सीमित करण्याचा त्यांना कोणताही अधिकार नाही.

सकारात्मक अनुभवावर आधारित माझी एक विनवणी आहे. ज्याप्रमाणे सत्य आणि अहिंसा केवळ निवडक लोकांकरिता नाही, तर संपूर्ण मानवतेच्या दैनंदिन आचरणाकरिता आहे, अगदी त्याचप्रमाणे आत्मनिग्रह केवळ काही 'महात्म्यांकरिता' नाही तर संपूर्ण मानवतेकरिता आहे. बहुतेक लोक असत्यवादी आणि हिंसक आहेत याकरिता ज्याप्रमाणे मानवतेला आपल्या आदर्शाचा स्तर कमी करण्याची गरज नाही त्याचप्रमाणे अधिकांश लोक आत्मसंयमाचा संदेश ऐकायला तयार नाहीत म्हणून आपण आपल्या आदर्शाचा स्तर कमी करण्याची आवश्यकता नाही. (हरि, ३०-५-१९३६, पृ. १२६)

**निर्बीजीकरण**

निर्बीजीकरणाचा कायदा लोकांवर लादणे अमानवीय आहे असे माझे मत आहे. परंतु रोगांनी जीर्ण झालेल्या व्यक्तींचे निर्बीजीकरण आवश्यक आहे. परंतु त्याकरिता त्यांची संमती अवश्य पाहिजे. निर्बीजीकरण एक गर्भनिरोधक आहे आणि मी जरी स्त्रियांनी गर्भनिरोधक वापरण्याच्या विरोधात असलो तरी मी पुरुषांच्या निर्बीजीकरणाचा विरोध करणार नाही कारण तोच बहुधा आक्रमक असतो. (अबाप, १२-१-१९३५)

## ६०. स्त्रियांचे समाजातील स्थान आणि त्यांची भूमिका

आपल्या अर्धांगिनीच्या म्हणजे नारीजातीच्या दुरुपयोगाकरिता पुरुष जबाबदार आहे. पुरुषाचे कोणते कृत्य सर्वात जास्त हीनपणाचे, धक्कादायक वा पाशवीपणाचे असेल तर ते हे आहे. परंतु ही नारी अबला नाही. नारी जात निश्चितपणे पुरुषाच्या तुलनेत अधिक उदात्त आहे; आजही नारी त्याग, मूकपणे दुःख सहन करणे, विनम्रता, श्रद्धा आणि ज्ञान यांची प्रतिमूर्ती आहे.
(यंग, १५-९-१९२१, पृ. २९२)

स्त्रीने स्वतःला पुरुषाची भोगवस्तू मानणे बंद करावे. याचा उपाय पुरुषापेक्षा स्त्रियांच्या हाती अधिक आहे. तिने पुरुषाकरिता, यात पतीचाही समावेश आहे, शृंगार करण्याला नकार दिला पाहिजे. तसे केले तरच ती पुरुषाची बरोबरीची साथीदार बनू शकेल. सीतेने रामाला रिझवण्याकरिता एक क्षणसुद्धा वाया घालवला असेल अशी कल्पनाही मी करू शकत नाही.
(यंग, २१-७-१९३१, पृ. २२९)

स्त्रीच्या रूपाने मी जन्म घेतला असता तर स्त्री ही पुरुषाच्या मनोरंजनार्थ निर्माण झाली आहे या पुरुषांच्या दाव्याच्या विरोधात मी विद्रोह केला असता. स्त्रीच्या हृदयात स्थान मिळवण्याकरिता मला मानसिक रूपाने स्त्री बनावे लागले आहे. माझ्या पत्नीशी माझे पूर्वी जे वर्तन होते ते मी पूर्णपणे बदलून टाकण्याचा निश्चय केला नाही तोपर्यंत माझ्या पत्नीच्या अंतःकरणात मला स्थान मिळू शकले नाही. याकरिता पती म्हणून मला मिळालेले तथाकथित सर्व अधिकार मी सोडून दिले आणि ते अधिकार तिलाच परत केले. आज तुम्हाला आढळून येईल की मी जसे साधेपणाचे जीवन जगतो तसेच तीही जगते आहे.

तुम्हाला तिच्या गळ्यात नेकलेस दिसणार नाही तसेच इतर आभूषणेही. माझी

इच्छा आहे की तुम्ही स्त्रियांनीही तसेच व्हावे. मौजमजेच्या भावनेची आणि पुरुषांची गुलामी सोडा. तुमचा शृंगार सोडा, सौंदर्य प्रसाधने सोडा, सुगंधी अत्तर वगैरे सोडा. खरा सुगंध तो आहे जो तुमच्या अंतःकरणातून येतो. तो पुरुषालाच नाही तर संपूर्ण मानवतेला मोहित करणारा आहे. तो तुमचा जन्मसिद्ध अधिकार आहे. पुरुष स्त्रीपासून उत्पन्न होतो, तिच्या रक्तमांसापासून बनतो. तुमची प्रतिष्ठा परत मिळवा आणि तुमचा संदेश जगाला सांगा.
(यंग, ८-१२-१९२७, पृ. ४०६)

**अबला नाही**

नारीला अबला म्हणणे तिची निंदा करणे आहे. हा पुरुषाने स्त्रीचा केलेला अपमान आहे. शक्तीचा अर्थ पाशवी शक्ती असा असेल तर खरोखरच पुरुषाच्या तुलनेत स्त्रीमध्ये पाशवीपणा कमी आहे आणि शक्तीचा अर्थ नैतिक शक्ती असा असेल तर निश्चितपणे पुरुषाच्या तुलनेत स्त्री किती तरी श्रेष्ठ आहे. स्त्रीमध्ये पुरुषापेक्षा अधिक स्वार्थत्याग, अधिक सहिष्णुता, अधिक साहस नाही काय? तिच्याशिवाय पुरुषाला कोणतेही अस्तित्व नाही. अहिंसा जर मानवजातीचा नियम असेल तर भविष्य स्त्रीच्या हाती आहे.... हृदयाला आकर्षित करून घेण्याचा गुण स्त्रियांपेक्षा जास्त कोणात असू शकतो? (यंग, १०-४-१९३०, पृ. १२१)

पुरुषाने आपल्या अविवेकी स्वार्थाला वश होऊन स्त्रीच्या आत्म्याला अशा प्रकारे चिरडले नसते आणि पुरुषाच्या आनंदोपभोगाची स्त्री शिकार बनली नसती तर तिने जगाला तिच्या अंतर्गत असलेल्या अनंत शक्तीचा परिचय घडवून दिला असता. जेव्हा स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीची संधी मिळेल आणि ती परस्पर सहकार्य आणि त्याच्याशी संबंधित शक्तींचा पूर्ण विकास करून घेईल तेव्हा जगाला स्त्रीशक्तीच्या आश्चर्यकारक अशा संपूर्ण आविष्काराचा परिचय होईल. (यंग, ७-५-१९३१, पृ. ९६)

मला वाटते की, स्त्री ही स्वार्थत्यागाची मूर्ती आहे, परंतु आपण पुरुषापेक्षा किती श्रेष्ठ आहोत ते तिला दुर्दैवाने कळत नाही. टॉलस्टॉय सांगत असत त्याप्रमाणे स्त्रिया पुरुषाच्या संमोहक प्रभावाखाली अजूनही वावरत आहेत. त्यांना जर अहिंसेच्या शक्तीचा परिचय झाला तर त्या स्वतःला अबला म्हणवून घ्यायला कधीही तयार होणार नाहीत. (यंग, १४-१-१९३२, पृ. १९)

**स्थानाचा दुरुपयोग**

स्त्री पुरुषाची सहचर आहे, तिच्या मानसिक क्षमता पुरुषाच्या बरोबरीच्या आहेत. पुरुषाच्या लहानाहून लहान कामापासून सर्व कामांमध्ये भाग घेण्याचा तिला अधिकार आहे आणि तितक्या प्रमाणात तिलाही स्वातंत्र्याचा आणि मोकळेपणाने वागण्याचा अधिकार आहे.

स्त्रीला आपल्या कार्यक्षेत्रात सर्वोच्च स्थान मिळवण्याचा तसाच अधिकार आहे जसा पुरुषाला आपल्या कार्यक्षेत्रात. ही परिस्थिती स्वाभाविकपणेच असली पाहिजे, शिकल्यासवरल्यानंतरच स्त्रीला असे अधिकार मिळतील असे काही नाही.

चुकीच्या परंपरांमुळे मूर्ख आणि कवडीकिंमत नसलेले लोक स्त्रीपेक्षा श्रेष्ठ बनून मजा करत आहेत, वास्तवात त्यांची तशी योग्यता नाही व असूही नये. स्त्रियांच्या या अवस्थेमुळेच आमची अनेक आंदोलने अधांतरी लटकत राहतात. (स्पीरा, ४२५)

पुरुष हाच कायदा करणारा असल्यामुळे त्याने तथाकथित अबलावर्गावर ही हीन अवस्था लादली आहे. त्याबद्दल त्याला भयानक दंड भोगावा लागेल. पुरुषाच्या जाळ्यातून मुक्त होऊन स्त्रीचा जेव्हा पूर्ण उत्कर्ष होईल तेव्हा ती पुरुषाने केलेला कायदा आणि त्याने संघटित केलेल्या संस्था यांच्या विरुद्ध विद्रोह करील व हा विद्रोह जर अहिंसक असेल तर तो अतिशय प्रभावशाली असल्याचे सिद्ध होईल. (यंग, १६-४-१९२५, पृ. १३३)

स्त्रीने अनेक सूक्ष्म मार्गांनी नकळत पुरुषावर वर्चस्व स्थापिले व अशाच प्रकारे पुरुषानेही स्त्रीचे आपल्यावर वर्चस्व होऊ नये म्हणून नकळत तेवढाच परंतु व्यर्थ संघर्ष केला. परिणामी गतिरोधाची एक स्थिती निर्माण झाली. या दृष्टीने पाहिले तर ही एक गंभीर समस्या आहे आणि भारत मातेच्या सुजाण मुलींना ती सोडवायची आहे. त्यांनी पश्चिमेचे अनुकरण करू नये, कदाचित त्या गोष्टी तेथील वातावरणाला अनुकूल असतीलही. त्यांना भारताची प्रकृती आणि वातावरण पाहून आपले उपाय शोधून काढावे लागतील. त्या आपल्या संस्कृतीतील जे काही उत्तम असेल ते वाचवू शकतील आणि जे त्याज्य व अवनतिकारक असेल ते निःसंकोचपणे फेकून देऊ शकतील असे त्यांचे हात मजबूत, नियंत्रण करणारे, शुभंकर, आणि संतुलित असले पाहिजे, हे हात सीतांचे, सावित्रींचे, दमयंतींचे, द्रौपदींचे असू शकतात, पुरुषी आणि नखरेल स्त्रियांचे नाही. (यंग, १७-१०-१९२९, पृ. ३४०)

माणसाने स्त्रीचा उपयोग साधन म्हणून केला आहे. तीही त्याचे साधन म्हणून राहणे शिकली आहे आणि अखेरीस हीच अवस्था तिला सोपी आणि सुखावह वाटू लागली. जेव्हा एक व्यक्ती दुसरीला अधःपाताकडे नेते तेव्हा अधःपतनाची क्रिया सोपी वाटू लागते. (हरि, २५-१-१९३६, पृ. ३९६)

माझे दृढ मत आहे की स्त्रीला आपल्या पतीलाही नाही म्हणण्याची कला शिकवावी लागेल आणि तिने आपल्या पतीचे केवळ साधन बनून राहणे वा कचकड्याची बाहुली होऊन राहणे हा काही तिच्या कर्तव्याचा भाग नाही. तिचे स्वतःचे अधिकार आणि कर्तव्य आहेत. (हरि, २-५-१९३६, पृ. ९३)

## योग्य शिक्षण

स्त्रियांना योग्य शिक्षण देण्यावर माझा विश्वास आहे. परंतु माझा पक्का विश्वास आहे की पुरुषाची नक्कल करून वा त्याच्याशी स्पर्धा करून ती जगातील आपला कार्यभार पार पाडू शकणार नाही. ती स्पर्धा करू शकते, परंतु पुरुषाची नक्कल करून ती त्या उंचीवर पोहोचू शकत नाही ज्याचे सामर्थ्य तिच्यात आहे. तिला पुरुषाचे पूरक बनायचे आहे. (हरि, २७-२-१९३७, पृ. १९)

## आत्मरक्षण

जे लोक सीतेकडे रामाची स्वेच्छेने झालेली दासी म्हणून पाहतात त्यांना सीतेच्या स्वातंत्र्याची उंची वा प्रत्येक बाबतीत रामाने तिला दिलेले महत्त्व या गोष्टी कळूच शकत नाहीत. सीता स्वतःचे व स्वतःच्या सन्मानाचे रक्षण करायला असमर्थ असलेली अबला स्त्री नव्हती. (हरि, २-५-१९३६, पृ. ९३)

आधुनिक मुलींना अर्धा डझन रोमिओंची ज्युलिअट होणे आवडत असावे अशी मला भीती वाटते. त्यांना साहस प्रिय आहे.... आधुनिक मुली ऊन, वारा वा पाऊस यांच्यापासून बचाव करण्याकरिता कपडे घालत नसतात तर इतरांचे लक्ष वेधून घेण्याकरिता कपडे घालत असतात. स्वतःची रंगरंगोटी करून आणि असाधारण दिसण्याचा प्रयत्न करून त्या आपले सौंदर्य वाढवण्याचा प्रयत्न करतात. अशा मुलींकरिता अहिंसेचा मार्ग नाही. (हरि, ३१-१२-१९३८, पृ. ४०९)

आपल्या रक्षणाकरिता स्त्रियांनी पुरुषांवर अवलंबून राहू नये. द्रौपदीप्रमाणे तिने आपल्या चारित्र्याच्या शक्तीवर आणि पावित्र्यावर अवलंबून राहिले पाहिजे. (हरि, १५-९-१९४६, पृ. ३१२)

## योग्य स्थान

जीवनात जे काही पवित्र आणि धार्मिक आहे त्याच्या रक्षणाची विशेष जबाबदारी स्त्रियांवर आहे. स्वभावतःच परंपरावादी असल्यामुळे त्यांना जर अंधश्रद्धा टाकून देणे कठीण होत असेल तर जीवनात जे काही उदात्त आणि पवित्र आहे ते टाकून देणेही त्यांना कठीण होईल. (हरि, २५-३-१९३३, पृ. २)

मुलांचे पालनपोषण आणि घराची देखरेख या गोष्टींमध्येच पत्नीची सर्व शक्ती खर्च होत असल्यामुळे ती सामान्यपणे पतीपासून स्वतंत्रपणे जीविकोपार्जन करते आहे या गोष्टीची मी कल्पना करू शकत नाही.

सुव्यवस्थित समाजात कुटुंबाच्या जीविकोपार्जनाचे अतिरिक्त ओझे स्त्रीवर पडू नये. पुरुषाने कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी घ्यावी आणि स्त्रियांनी घराच्या व्यवस्थेकडे लक्ष द्यावे. अशा प्रकारे दोघेही परस्परांना पूरक आणि अनुपूरक होऊ शकतात.

यामध्ये स्त्रीच्या स्वातंत्र्याचे वा अधिकाराचे दमन होण्यासारखे काहीही वाटत नाही.... आपल्या साहित्यात पत्नीला अर्धांगिनी आणि सहधर्मिणी म्हणून सन्मानित करण्यात आले आहे. पतीने पत्नीला देवी म्हणून संबोधिल्यामुळे तिला तुच्छ समजले जात आहे असा अर्थ होत नाही.

....ज्या स्त्रीला आपली कर्तव्ये कळतात व जी ती पूर्ण करते तिला आपले सन्माननीय स्थान मिळते. ती ज्या घराची अधिष्ठात्री असते त्या घराची ती दासी नाही तर राणी असते. (हरि, १२-१०-१९३४, पृ. २७६-७)

परंतु पुरुषाने कोणत्या ना कोणत्या प्रकारे स्त्रीवर आपली सत्ता चालवली आहे व त्यामुळे स्त्रियांमध्ये न्यूनगंड निर्माण झाला आहे. ती पुरुषापेक्षा उणी आहे या पुरुषाच्या स्वार्थी शिकवणीवर तिने विश्वास ठेवला आहे. परंतु पुरुषांमधील ऋषींनी तिला समान दर्जा दिला आहे.

परंतु तरीही एक बिंदू असा आहे की जिथून दोन शाखा फुटतात. मुळात स्त्री आणि पुरुष समान असले तरी दोघांच्या स्वरूपात महत्त्वपूर्ण अंतर आहे हेही सत्य आहे. यामुळेच दोघांचे कार्यक्षेत्र वेगवेगळे असले पाहिजे.
(हरि, २४-२-१९४०, पृ. १३)

## स्त्री आणि अहिंसा

माझा विश्वास आहे की अहिंसेच्या उच्चतम आणि सर्वोत्कृष्ट स्वरूपाचे प्रदर्शन

करणे हे स्त्रीचे जीवनध्येय आहे.... कारण असे आहे की अहिंसेच्या क्षेत्रात शोध करण्याचे साहसपूर्ण पाऊल उचलण्याकरिता स्त्री अधिक उपयुक्त आहे.... ज्याप्रमाणे पाशवी साहस स्त्रीच्या तुलनेत पुरुषामध्ये जास्त आहे अगदी त्याचप्रमाणे स्वार्थत्यागाचे धैर्य पुरुषाच्या तुलनेत स्त्रियांमध्ये निश्चितपणे अधिक आहे. (हरि, ५-११-१९३८, पृ. ३१७)

माझे स्वतःचे मत असे आहे की, स्त्री आणि पुरुष मूलतः एक असल्यामुळे तत्त्वतः त्यांच्या समस्याही एकच असल्या पाहिजे. दोघांमध्ये एकाच आत्म्याचा वास आहे. दोघेही सारखेच जीवन जगत असतात, दोघांच्या भावनाही एकसारख्या आहेत. दोघेही परस्पर पूरक आहेत. परस्परांच्या सक्रिय मदतीशिवाय यापैकी कोणीही जगू शकत नाही. (हरि, २४-२-१९४०, पृ. १३)

मी सांगितले आहे की.... स्त्री ही अहिंसेचा अवतार आहे. अहिंसेचा अर्थ आहे असीम प्रेम म्हणजे पीडा सहन करण्याचे असीम सामर्थ्य. पुरुषाची आई असलेल्या स्त्रीमध्ये हे सामर्थ्य अधिक असणार नाही तर कोणामध्ये असू शकेल? आपल्या गर्भात शिशूचे नऊ महिने पोषण करून व त्यापासून होणारा त्रास प्रसन्नपणे सहन करून ती आपल्या या सामर्थ्याचा पुरेसा पुरावा देते. प्रसववेदनेपेक्षा अजून मोठी वेदना कोणती आहे? परंतु सृजनाच्या सुखात ती त्या वेदनाही विसरते.

मुलाच्या दैनंदिन विकासाकरिता तिच्याशिवाय अजून कोण झटत असते? याच मातृत्वाच्या भावनेचा विस्तार करून स्त्रीने संपूर्ण मानवतेचा त्यात समावेश केला पाहिजे आणि आपण पुरुषाच्या वासनेचा विषय आहो हे विसरले पाहिजे. असे जर झाले तर ती पुरुषाबरोबर त्याची आई, त्याची निर्माती आणि मूक शिक्षक म्हणून सन्माननीय पद मिळवू शकेल. शांततेकरिता व्याकुळ असलेल्या युद्धरत जगाला तिला शांततेचा पाठ शिकवायचा आहे. (हरि, २४-२-१९४०, पृ. १३-४)

## विशेष जीवितकार्य

मातृत्वाचे कर्तव्य, जे बहुतांश स्त्रिया पार पाडतील, पार पाडण्याकरिता ज्या गुणांची अपेक्षा असते ते पुरुषांमध्ये असणे आवश्यक नाही. स्त्री निष्क्रिय आहे, पुरुष सक्रिय. मुख्यतः ती गृहस्वामिनी आहे. पुरुष भाकरी कमावतो, ती भोजनाची व्यवस्था आणि वितरण करते. सर्व दृष्टींनी ती रक्षकाची भूमिका पार पाडते. प्रजातीच्या अपत्यांचे पालनपोषण करून मोठे करणे हा तिचा एकाधिकार आहे. तिने काळजी घेतली नाही तर संपूर्ण प्रजाती नष्ट होऊन जाईल.

माझ्या मते स्त्रीला घर सांभाळण्याची जबाबदारी झटकून टाकायला सांगून संरक्षणासाठी तिला बंदूक उचलायला सांगणे ही गोष्ट स्त्री आणि पुरुष या दोघांनाही कमीपणा आणणारी आहे. हे रानटीपणाकडे परत वळणे आहे व शेवटाची सुरुवात आहे. पुरुष ज्या घोड्यावर स्वार आहे त्याच घोड्यावर स्वार होण्याचा प्रयत्न करून स्त्री स्वतःही पडेल आणि पुरुषालाही खाली पाडेल.

स्त्रीला तिच्या विशेष भूमिकेचा त्याग करण्याकरिता पुरुष प्रलोभित करत असेल वा बळजबरी करत असेल तर त्याचे पाप पुरुषावर असेल. आपले घर सुव्यवस्थित ठेवण्याकरिता तेवढेच शौर्य लागते जेवढे बाह्य आक्रमणापासून रक्षण करण्याकरिता लागते.

व्यक्तीने म्हणा वा राष्ट्राने म्हणा जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात अहिंसेचा स्वीकार करावा हा या प्रचंड समस्येवर मी सुचवलेला तोडगा आहे. याबाबतीत स्त्रीकडे निर्विवाद नेतृत्व राहील अशी आशा मी माझ्या हृदयाशी बाळगली आहे आणि अशा रीतीने मानवी विकासात तिला तिचे स्थान सापडल्यानंतर तिचा न्यूनगंड निघून जाईल अशी अपेक्षा आहे.

तिला जर हे कार्य यशस्वीपणे पार पाडायचे असेल तर प्रत्येक गोष्ट लैंगिक आवेगांनी निर्धारित होते या विचाराकडे तिने निर्धाराने पाठ फिरवली पाहिजे.... (हरि, २४-२-१९४०, पृ. १३)

स्त्री स्वाभाविकपणे स्वतः अधिक त्रास सहन करत असते. त्यामुळे अहिंसा तिच्याकडे अधिक सहजपणे येते. (हरि, ५-५-१९४६, पृ. ११८)

त्यामुळे मी पुरुषापेक्षा स्त्रियांकडून अधिक उच्च दर्जाच्या प्रेमाची अपेक्षा करतो. स्त्रियांच्या अंतःकरणात जर द्वेषभावनेचा प्रवेश झाला तर त्या कुठे भरकटत जातील व आपल्या मुलांना त्या कोणती शिकवण देतील हे मला कळत नाही. (हरि, १८-५-१९४७, पृ. १५५)

## स्त्री-पुरुष समता

स्त्रियांच्या हक्कांच्या बाबतीत मी कोणतीही तडजोड करू शकत नाही. माझ्या मते पुरुषांवर नसलेले कोणतेही कायदेशीर बंधन स्त्रियांवरही नसावे. मी माझ्या मुलांशी आणि मुलींशी अगदी एकसारखा व्यवहार केला पाहिजे. (हरि, १७-१०-१९२९, पृ. ३४०)

स्त्रीपुरुषांतील समता म्हणजे त्यांच्या कामकाजातील समता होत नाही. शिकार करण्यासंबंधी वा भाला घेऊन चलण्याविषयी कोणतेही कायदेशीर बंधन

नसावे. परंतु जे काम पुरुषाचे असते ते करण्याकरिता स्त्री स्वाभाविकपणेच मागेपुढे पाहते. परस्परांना पूरक होण्याकरिता निसर्गाने लिंगभेद केला आहे. ज्याप्रमाणे त्यांची शरीररचना ठरलेली आहे त्याचप्रमाणे त्यांची कामेही ठरलेली आहेत. (हरि, २-१२-१९३९, पृ. ३५९)

कायदे करण्याचे काम बहुधा पुरुषांकडे राहिले आहे आणि स्वतःकडे जबाबदारी घेऊन हे काम करत असताना पुरुष नेहमीच न्यायाने वागलेला नाही. त्याने या कामात भेदभाव केलेला आहे. आमच्या शास्त्रांनी स्त्रियांची अनिवार्य आणि स्वाभाविक अशी काही लक्षणे सांगून त्यांचा कलंक म्हणून उल्लेख केला आहे. स्त्रियांच्या पुनरुद्धाराचे सर्वात मोठे काम हे आहे की आम्ही ते सर्व तथाकथित कलंक ताबडतोब मिटवले पाहिजे. हे काम कोण करेल आणि कसे?

माझे नम्र मत आहे की, याकरिता आपल्याला सीता, दमयंती आणि द्रौपदी यांच्यासारख्या निर्मळ, दृढ आणि आत्मनियंत्रित स्त्रिया जन्माला घालाव्या लागतील. आपण जर असे करू शकलो तर हिंदू समाज या आधुनिक भगिनींचाही तसाच आदर करील जसा तो गत काळातील देवींचा करत आला आहे. त्यांच्या शब्दांनाही शास्त्रप्रामाण्य येईल. स्मृतींमध्ये काही ठिकाणी स्त्रियांवर घेण्यात आलेल्या आक्षेपांबद्दल आम्हाला लाज वाटेल आणि लवकरच ते विस्मरणात जातील. हिंदू समाजात अशा क्रांती पूर्वीही झाल्या आहेत आणि भविष्यातही होतील. वास्तवात यामुळे धर्माला स्थैर्यच येईल. (स्पीरा, पृ. ४२४)

मी स्त्री-पुरुषांमध्ये कोणताही भेद करत नाही. पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनीही स्वतःला स्वतंत्र समजले पाहिजे. शौर्यावर पुरुषांचा एकाधिकार नाही.
(हरि, ५-१-१९४७, पृ. ४७८)

आज फार कमी महिला राजकारणात भाग घेतात व त्यातील बहुतांश स्वतंत्र चिंतन करत नाहीत. आपल्या आईवडलांच्या वा आपल्या पतीच्या आदेशाचे पालन करण्यातच त्यांना समाधान वाटते. आपल्या परावलंबित्वाची जाणीव झाल्यानंतर त्या स्त्रियांच्या अधिकारांबद्दल आवाज उठवतात. असे करण्याऐवजी महिला कार्यकर्त्यांनी स्त्रियांची नावे मतदार सूचीत नोंदवावी, स्त्रियांना व्यावहारिक शिक्षण देण्याची व्यवस्था करावी, त्यांना स्वतंत्रपणे विचार करणे शिकवावे आणि जातीपातीच्या बंधनातून त्यांना मुक्त करावे. असे झाल्यास आवश्यक बदल होतील. यामुळे पुरुषांना त्यांच्या त्यागाच्या आणि शक्तीच्या क्षमतेची जाणीव होईल व त्यांना प्रतिष्ठित स्थानावर बसवण्याकरिता

ते बाध्य होतील. (हरि, २१-४-१९४६, पृ. ९६)

आपण पुरुषांच्या अधिन आहोत वा त्यांच्यापेक्षा कमी आहोत असे स्त्रियांनी समजण्याचे काहीही कारण नाही. विभिन्न भाषांमध्ये स्त्रियांना पुरुषाची अर्धांगिनी म्हटले आहे आणि या तर्काप्रमाणे पुरुष स्त्रीचा अर्धांग झाला. स्त्री-पुरुषांना वेगवेगळे अस्तित्व नाही, उलट एकाचेच हे दोन भाग आहेत. इंग्रजी भाषा याही पुढे जाते आणि स्त्रीला उत्तम अर्धांग (बेटर हाफ) म्हणून संबोधते.

यामुळेच स्त्रियांनी सर्व अवांछनीय आणि बेकार बंधनांविरुद्ध सविनय आज्ञाभंग करून विद्रोह करावा असा माझा त्यांना सल्ला आहे. बंधने तीच हितावह असतात जी स्वेच्छापूर्वक असतात. सविनय विद्रोहामुळे कोणतेही नुकसान होणार नाही कारण त्याच्या मुळाशी शुद्धता आणि विवेकी प्रतिकार आहे. (हरि, २३-३-१९४७, पृ. ८०)

पुरुषांनी स्त्रियांना योग्य स्थान देणे शिकले पाहिजे. ज्या देशात वा समुदायात स्त्रियांचा योग्य आदर होत नाही त्या देशाला सुसंस्कृत म्हणता येऊ शकत नाही. (हरि, ११-१-१९४८, पृ. ५०८)

### पडदा

स्त्रियांच्या चारित्र्याच्या शुद्धतेबद्दल इतकी विकृत चिंता करण्याची काय गरज आहे? पुरुषचरित्राच्या शुद्धतेविषयी स्त्रियांना बोलू दिले जाते काय? पुरुषाच्या पावित्र्याबद्दल स्त्रियांच्या काळजीची चर्चा कधी ऐकू येत नाही. स्त्रियांच्या शुद्धतेविषयी चर्चा करण्याचा अधिकार पुरुषांना कोणी दिला? शुद्धता बाहेरून लादता येऊ शकत नाही, ती अंतर्गत विकासाची गोष्ट आहे आणि त्यामुळे ती संबंधित व्यक्तीच्या प्रयत्नांवर सोडली पाहिजे. (यंग, २५-११-१९२६, पृ. ४१५)

पावित्र्य एखाद्या तापगृहात विकसित करता येत नाही. पडद्याच्या कुंपणाने त्याचे संरक्षण करता येऊ शकत नाही. त्याची आतून वाढ झाली पाहिजे आणि त्याचे मूल्य तेव्हाच आहे जेव्हा प्रत्येक अवांछनीय प्रलोभनाला ते तोंड देऊ शकेल. (यंग, ३-२-१९२७, पृ. ३७)

### हुंडापद्धती

ही प्रथा संपलीच पाहिजे. विवाह आईवडिलांद्वारे पैसे मिळवण्याचे साधन असू नये. या प्रथेचा जातिप्रथेशी घनिष्ठ संबंध आहे. जोपर्यंत निवडीचे क्षेत्र एखाद्या विशिष्ट जातीतील काही शेकडा मुलामुलींपर्यंत मर्यादित असेल तोपर्यंत हुंडापद्धती

विरुद्ध कितीही आवाज उठवला तरीही ही पद्धती कायम राहील. जर ही कुप्रथा नाहीशी करायची असेल तर मुलामुलींनी वा आईवडलांनी जातिप्रथेचे बंधन तोडलेच पाहिजे. या सगळ्या गोष्टीचा अर्थ आहे आपल्या राष्ट्रातील युवकांच्या मानसिकतेत क्रांतिकारक बदल घडवून आणून देशातील युवकांना अशा प्रकारचे शिक्षण दिले पाहिजे. (हरि, २३-५-१९३६, पृ. ११७)

जो तरुण विवाहाकरिता हुंड्याची अट ठेवतो तो आपल्या शिक्षणाला आणि देशाला बदनाम करतो व त्याला स्त्रियांबद्दल आदर नसल्याचे सिद्ध करतो.

....हुंडाप्रथेच्या विरोधात जोरदार जनमत तयार केले पाहिजे आणि ज्या युवकाने या पापाच्या पैशांनी आपले हात काळे केले असतील त्याला बहिष्कृत केले पाहिजे. मुलींच्या आईवडलांनी पदव्यांच्या झगमगाटाने दिपून जाऊ नये आणि आपल्या मुलीकरिता ख-या वीर युवकाचा शोध घेण्याकरिता आपल्या जातीबाहेर वा प्रांताबाहेर जाण्यात संकोच करू नये. (यंग,२१-६-१९२९, पृ.२०७)

## विधवा पुनर्विवाह

आपल्या जीवनसाथीवरील प्रेमामुळे जर एखादी विधवा स्वेच्छेने वैधव्याचा स्वीकार करत असेल तर ती आपल्या घराला पवित्र करते व आपल्या धर्माला उन्नत करते. परंतु धर्म वा प्रथा यांच्याद्वारे लादलेले वैधव्य एक असह्य ओझे आहे व गुप्त पापाने ते घराला अपवित्र करते आणि धर्माचे पतन करते.

आपल्याला जर शुद्ध राहायचे असेल आणि हिंदुत्वाचे रक्षण करायचे असेल तर या बळजबरीच्या वैधव्याच्या विषापासून आपल्याला स्वतःला मुक्त करावे लागेल. ज्या घरात बालविधवा आहेत त्या घरांपासून या सुधारणेची सुरुवात केली पाहिजे. लोकांनी साहस करून आपल्या पालकत्वाखाली असलेल्या बालविधवांचे कायदेशीरपणे चांगल्या घरी लग्न लावून दिले पाहिजे. त्यांचा विवाह पूर्वी झालेला असल्याचे मला मान्य नसल्यामुळे मी 'पुनर्विवाह' या शब्दाचा प्रयोग केला नाही. (यंग, ५-८-१९२६, पृ. २७६)

## घटस्फोट

विवाह दोन व्यक्तींमधील शरीरसंबंधाच्या अधिकाराला मान्यता देतो आणि इतर कोणत्याही व्यक्तीबरोबर असा संबंध वर्ज्य करण्याचेही त्यामुळे बंधन येते. पती-पत्नीमधील शरीरसंबंध, त्यांच्या संयुक्त संमतीने व त्यांना जेव्हा आवश्यक वाटेल तेव्हा होऊ शकतो. परंतु आपली इच्छा असेल तेव्हा आपल्या जोडीदाराला शरीर-

संबंधाकरिता बळजबरी करण्याचा अधिकार विवाहामुळे पतीला वा पत्नीला मिळत नाही. जर एक साथी नैतिक वा अन्य कारणांनी दुस-या साथीच्या इच्छेचे पालन करू शकत नसेल, तर त्या स्थितीत काय करावे हा वेगळा प्रश्न आहे. व्यक्तिगत पातळीवर घटस्फोट हाच पर्याय असेल, तर नैतिक प्रगतीत अडसर येऊ देण्याऐवजी मी निःसंकोचपणे घटस्फोटच पसंत करीन. परंतु अशा परिस्थितीत माझा हेतू मात्र विशुद्ध नैतिक आधारावर स्वतःला संयमित करण्याचा असला पाहिजे. (यंग, ८-१०-१९२५, पृ. ३४६)

## ६१. लैंगिक शिक्षण

आपल्या शिक्षण पद्धतीत लैंगिक शिक्षणाचे.... काय स्थान आहे? अथवा त्याला काही स्थान असावे की नसावे? लिंगविज्ञान दोन प्रकारचे असू शकते - एक कामवासनेच्या आवेगाला नियंत्रित करण्याचे अथवा त्यावर विजय मिळवण्यासंबंधी शिक्षण देणारे आणि दुसरे तिला उद्दीप्त करून तिची तृप्ती करण्यासंबंधीचे. पहिल्या प्रकाराचे लैंगिक शिक्षण मुलांकरिता तेवढेच आवश्यक आहे, जेवढे दुस-या प्रकारचे धोकादायक आणि अपायकारक. त्यामुळे ते पूर्णपणे त्याज्य आहे. सर्व महान धर्मांमध्ये काम हा माणसाचा कट्टर शत्रू असल्याचे म्हटले आहे आणि ते बरोबरच आहे. क्रोध आणि घृणा यांचा क्रम त्यानंतर येतो. गीतेनुसार क्रोध कामातून निर्माण होतो. तसे गीतेत काम हा शब्द व्यापक अर्थाने वापरण्यात आला आहे. परंतु इथे ज्या संकुचित अर्थाने या शब्दाचा प्रयोग केला आहे त्या अर्थावरही हे विधान लागू होते.

आपला प्रश्न अजूनही अनुत्तरित आहे - किशोर वयातील मुलांना प्रजननाची इंद्रिये आणि त्यांचे कार्य यांच्यासंबंधी ज्ञान देणे योग्य होईल का? मला वाटते की, एका सीमेपर्यंत असे ज्ञान देणे आवश्यक आहे. सध्या ते हे ज्ञान इकडून-तिकडून चोरतात व परिणामी अनेक वाईट प्रवृत्ती जन्म घेतात. कामवासनेकडे दुर्लक्ष करून आपण तिच्यावर विजय मिळवू शकत नाही. यामुळे मी ठामपणे या गोष्टीचे समर्थन करतो की किशोर वयातील मुलामुलींना आपल्या प्रजनन विषयक अंगांचे महत्त्व आणि त्यांचा प्रयोग यांबद्दल समजावून सांगितले पाहिजे. ज्या किशोर वयातील मुलामुलींची जबाबदारी माझ्यावर होती त्यांना हे ज्ञान देण्याचा मी प्रयत्न केला आहे.

परंतु ज्या लैंगिक शिक्षणाचे मी समर्थन करतो आहे त्याचे ध्येय कामभावनेला जिंकणे आणि तिचे उदात्तीकरण करणे हे असले पाहिजे. या शिक्षणामुळे मुलांच्या

मनात स्वतः होऊन ही गोष्ट आली पाहिजे की माणूस आणि पशू यांच्यामध्ये एक भेद आहे आणि तो हा आहे की निसर्गाने माणसाला विचार करण्याची आणि संवेदनशीलतेची शक्ती देऊन विशेष उपकृत केले आहे. 'मनुष्य' या शब्दाचा अर्थ केवळ संवेदना असणारा एवढाच नाही तर विचार करणारा असाही आहे. यामुळे अविवेकी प्रवृत्तींवरील विवेकाचे नियंत्रण घालवणे म्हणजे मनुष्यत्व घालवणे आहे. माणूस वेगाने विचार करू शकतो आणि हा विचार त्याच्या प्रवृत्तींना प्रभावित करू शकतो. याउलट पशूचा आत्मा सुप्तावस्थेत असतो. अंतःकरणाला जागवणे म्हणजे आत्म्याला जागवणे आहे आणि यामुळे विवेक जागा होतो व चांगले वाईट यांच्यामधील भेद करण्याची क्षमता विकसित होते.

असे खरे लैंगिक शिक्षण कोण देऊ शकेल? स्पष्ट आहे की ज्याने आपल्या वासनांवर पूर्णपणे विजय मिळवला असेल तोच हे शिक्षण देऊ शकतो. खगोलशास्त्र आणि विज्ञानाच्या इतर शाखांमध्ये शिकवण्याकरिता असे शिक्षक नियुक्त करण्यात येतात की ज्यांनी त्यांचे प्रशिक्षण घेतलेले असते आणि जे आपल्या विषयात तज्ज्ञ असतात. अशाच प्रकारे लिंगविज्ञान वा लैंगिक शिक्षण देणा-या शिक्षकाने या विषयाने अध्ययन केलेले असले पाहिजे आणि त्याचे स्वतःवर नियंत्रण असले पाहिजे. तुम्ही कितीही मोठमोठ्या गोष्टी केल्या तरी त्यांच्या मागे तुमचा अनुभव आणि प्रामाणिकपणा नसेल तर त्या गोष्टी निर्जीव आणि निष्प्राण होतील व लोकांच्या अंतःकरणात शिरण्यात आणि त्यांना प्रेरित करण्यात तुम्हाला पूर्णपणे अपयश येईल. याउलट जी वाणी आत्मसिद्धी आणि ख-या अनुभवातून उद्‌भवते ती नेहमी आपल्या उद्दिष्टांत यशस्वी होते.

आज आपले सर्व वातावरण - आपले शिक्षण, आपले चिंतन आणि आपला सामाजिक व्यवहार या सर्व गोष्टींची प्रवृत्ती बहुधा कामभावनेला मदत करण्याची आणि तिच्या पूर्तीची साधने शोधण्याकडे असते. या दुष्ट चक्रातून बाहेर पडणे ही सोपी गोष्ट नाही. याकरिता आपण आपली सर्व शक्ती पणाला लावली पाहिजे. व्यावहारिक अनुभव असणारे आणि आत्मनियंत्रणाला मनुष्याचे सर्वोच्च कर्तव्य मानणारे व आपल्या उद्दिष्टाबद्दल खरीखुरी आणि अढळ श्रद्धा असलेले, सतत जागृत आणि कार्यप्रवण असलेले थोडेसे शिक्षक जरी असले तरी त्यांच्या श्रमांमुळे मुलांचा जीवनमार्ग उजळला जाऊ शकतो.... आणि बेसावध लोकांना कामुकतेच्या चिखलात रुतण्यापासून ते वाचवू शकतात, तसेच आधीच कामुकतेला बळी पडलेल्या लोकांचा ते उद्धारही करू शकतात. (हरि, २१-११-१९३६, पृ. ३२२)

# ६२. स्त्रियांविरुद्ध अपराध

## स्त्रीची अब्रू

स्त्रीच्या इच्छेशिवाय तिच्याशी कुकृत्य करणे शक्य नाही, यावर माझा विश्वास आहे. जेव्हा स्त्री भयभीत होते वा आपल्या नैतिक शक्तीला ती ओळखत नाही तेव्हाच असे होते. जर ती आक्रमकाचा सामना करू शकत नसेल तर त्या पुरुषाच्या पाशवीपणाला बळी पडण्याआधीच तिच्या चारित्र्याची शुद्धता तिला प्राणत्यागाची शक्ती देईल.

सीतेचे उदाहरण घ्या. शारीरिक दृष्टीने ती रावणासमोर दुबळी होती, परंतु तिच्या चारित्र्याच्या शुद्धतेची ताकद रावणाच्या अपरिमित शक्तीपेक्षाही अधिक होती. त्याने सीतेला अनेक प्रलोभने दाखवली परंतु सीतेच्या सहमतीशिवाय तो तिच्या शरीराला स्पर्श करू शकला नाही. याउलट स्त्री आपल्या शारीरिक शक्तीवर वा शस्त्रावर अवलंबून असेल तर ती शक्ती संपताच ती पराभूत होईल. (हरि, १-९-१९४०, पृ. २६६)

माझे ठाम मत आहे की आपले पावित्र्य हीच आपली सर्वोत्तम ढाल आहे अशी जाणीव असलेली निर्भय स्त्री कधीही अपमानित होऊ शकत नाही. पुरुष कितीही पाशवी असला तरी तो तिच्या पावित्र्याच्या दिव्य ज्योतीसमोर नत झाल्याशिवाय राहणार नाही....

म्हणूनच मी महिलांना सांगत असतो की.... की हे साहस निर्माण करण्याचा तुम्ही प्रयत्न करा. जर त्या असे करू शकल्या तर त्या पूर्णपणे निर्भय होतील आणि आजप्रमाणे आक्रमणाचा विचार येताच त्या थरथर कापू लागणार नाहीत.... पालकांनी आणि पतींनी त्यांना निर्भय होण्याचे शिक्षण दिले पाहिजे. याचा सर्वात चांगला मार्ग ईश्वरावरील जागृत श्रद्धा निर्माण करणे आहे. ईश्वर जरी दिसत नसला तरी तो माणसाच्या मदतीला अचूकपणे धावून येत असतो. ईश्वरावर श्रद्धा असणारी व्यक्ती सर्वात अधिक निर्भय असते....

जेव्हा स्त्रीवर आक्रमण होते तेव्हा तिने हिंसाअहिंसेचा विचार करू नये. आपले रक्षण करणे हे तिचे सर्वप्रथम कर्तव्य आहे. आपल्या आत्मरक्षणाकरिता जो कोणता उपाय तिला सुचेल त्याचा तिने आधार घेतला पाहिजे. ईश्वराने तिला नख आणि दात दिले आहेत. आपल्या पूर्ण शक्तीनिशी तिने त्यांचा उपयोग केला

पाहिजे आणि तसे करताना वेळ आली तर जीवही दिला पाहिजे. ज्या पुरुषाने वा स्त्रीने मृत्यूच्या भीतीवर विजय मिळवला असेल ते स्त्रीपुरुष आपला जीव देऊन केवळ स्वतःचेच रक्षण करण्याला समर्थ होत नाहीत तर इतरांचेही रक्षण करू शकतात. (हरि, १-३-१९४२३, पृ. ६०)

ज्या समाजात आपण राहतो त्या समाजात स्त्रियांच्या अब्रूवर असे हल्ले होत आले आहेत.... आपल्या स्वतःच्या रक्षणार्थ अथवा आपल्या घरातील स्त्रियांच्या अब्रूच्या रक्षणार्थ अहिंसक स्त्रीने अथवा पुरुषाने बदला, क्रोध वा दुर्भावना मनात न आणता आपला बळी दिला पाहिजे. हे सर्वात मोठे शौर्य आहे. (हरि, १५-९-१९४६, पृ. ३१२)

शौर्य आणि सन्मानाने मरण्याची कला शिकण्याकरिता कोणत्याही प्रशिक्षणाची गरज नसते; याकरिता केवळ ईश्वरावरील जिवंत श्रद्धा पाहिजे. (हरि, ५-१०-१९४७, पृ.३५४)

## वेश्यावृत्ती

वेश्यावृत्ती तेवढीच प्राचीन आहे जितके हे जग, परंतु ज्याप्रमाणे आज नागरी जीवनाचा हा नियमित भाग झाला आहे तसा तो कदाचित पूर्वी कधीही झाला नसावा. काहीही असो, परंतु एक वेळ अशी येईल की जेव्हा या अभिशापाच्या विरोधात मानवता बंड करून उठेल आणि वेश्यावृत्ती भूतकालीन गोष्ट होऊन जाईल. मानवतेने अनेक वाईट प्रथांपासून, त्या कितीही पुरातन काळापासून चालत आलेल्या असल्या तरी, अशाच प्रकारे मुक्ती मिळवली आहे.
(यंग, २८-५-१९२५, पृ. १८७)

कुंटणखान्याच्या समस्येसंबंधी स्त्रियांनी दुहेरी प्रचार करणे, हा त्यावरील योग्य मार्ग आहे : (अ) जीविकोपार्जनाकरिता आपला सन्मान विकणा-या, (आ) आणि अज्ञानामुळे वा अहंकारामुळे स्त्रियांना अबला समजणा-या पुरुषांना स्त्रियांशी चांगला व्यवहार करण्याकरिता भाग पाडावे म्हणून.

मला आठवते काही वर्षांपूर्वी, एकोणिसाव्या शतकाच्या अंतिम दशकात साल्व्हेशन आर्मीचे शूर सदस्य आपल्या प्राणांची बाजी लावून मुंबईच्या बदनाम गल्ल्यांमध्येजाऊन कुंटणखान्यासमोर धरणे धरत असत. अशाच प्रकारचे आंदोलन आताही का चालविले जात नाही? (हरि, ४-९-१९३७, पृ. २३३)

‘वेश्या’ हा शब्द व्यभिचार करणा-या स्त्रीकरिता वापरला जातो. परंतु वेश्यागमन करणारे पुरुषसुद्धा या पापांमध्ये त्या स्त्रियांपेक्षा कमी भागीदार नसतात.

अनेकदा तर आपले पोट भरण्याकरिता त्या आपले शरीर विकत असतात. या कुप्रथेला अवैध घोषित केले पाहिजे. परंतु कायदासुद्धा एका सीमेपर्यंतच मदत करू शकतो. कायदा असतानाही प्रत्येक देशात लपूनछपून शरीरव्यापार चालत असतो. या बाबतीत जागृत लोकमत तशाच प्रकारे मदत करू शकते ज्याप्रमाणे ते अनेक कायद्यांना निरर्थक करून टाकते.
(हरि, १५-९-१९४६, पृ. ३१०)

## ६३. आश्रमातील व्रते

जीवनातील एक सूत्र मी मान्य केले आहे. त्यानुसार माणसाने केलेल्या कोणत्याही कामाला, मग ते कितीही मोठे का असेना, धार्मिक आधार नसेल तर ते ख-या अर्थाने फळफळणार नाही. परंतु धर्म काय आहे?.... माझे उत्तर हे आहे की जगभरातील धर्मग्रंथातून वाचायला मिळतो तो धर्म नाही, वास्तवात धर्म बुद्धिग्राह्य नसून हृदयग्राह्य आहे. आमच्याकरिता ती एखादी बाह्य गोष्ट नाही, तिचा विकास आमच्या आतून होत असतो. तो नेहमी आमच्या आत असतो : काहींना त्याची जाणीव होते, काहींना तो जाणवत नाही. परंतु तो नेहमीच असतो. या धार्मिक प्रेरणेला आपण बाह्य मदतीने जागृत करू शकतो वा आंतरिक विकास करून; आपण कोणतीही पद्धती अवलंबू शकतो. परंतु कोणतेही काम आपल्याला चांगल्या पद्धतीने करायचे असेल वा टिकाऊ असे काही करायचे असेल, तर आम्हाला आपल्या धार्मिक वृत्तीला जागवावे लागेलच हे मात्र खरे.

आपल्या धर्मग्रंथांनी काही नियम सांगितलेले आहेत. त्यांचा त्यांनी जीवनाची सूत्रे आणि स्वयंसिद्ध सत्य म्हणून उल्लेख केला आहे. या दीर्घ काळात या सूत्रांवर पूर्ण विश्वास ठेवून त्यानुसार आचरण करत असताना.... मला त्या लोकांना विश्वासात घेणे आवश्यक वाटले जे हा आश्रम उघडताना माझे वैचारिक सहकारी होते. जी नियमावली तयार करण्यात आली आणि जिचे आश्रमाचा सदस्य होऊ इच्छिणा-या प्रत्येक व्यक्तीने पालन करणे आवश्यक आहे ती अशी आहे :

### सत्याचे व्रत

इथे सत्याचा अर्थ तो नाही जो आपण नेहमी समजतो. 'सत्यवादिता सर्वात चांगले धोरण आहे' या वाक्यातून सत्याचा अर्थ असा होतो की जर हे धोरण यशस्वी झाले नाही, तर आपण त्याचा त्याग करू शकतो. परंतु हासुद्धा इथे सत्याचा अर्थ नाही. आश्रमातील सत्याचा अर्थ असा आहे की आपल्याला कोणत्याही

किमतीवर सत्याचरण करायचे आहे आणि सत्याची व्याख्या स्पष्ट करण्याकरिता मी प्रल्हादाचे उदाहरण घेतले आहे. सत्याच्या रक्षणाकरिता प्रल्हादाने आपल्या स्वतःच्या वडलांना विरोध करण्याचे साहस केले. त्याने प्रत्युत्तरार्थ प्रतिकार करून वा वडलांच्या विरोधी कार्यवाही करून स्वतःला वाचवण्याचा प्रयत्न केला नाही. परंतु प्रल्हादाला जे सत्याचे दर्शन झाले होते त्याच्या बचावाकरिता त्याने आपल्या वडिलांनी आणि त्यांच्या अनुचरांनी केलेल्या छळाचा प्रतिकार केला नाही. उलट त्याकरिता तो आपला जीव देण्याकरिता तयार झाला. एवढेच नाही तर या छळापासून बचाव करण्याचाही त्याने प्रयत्न केला नाही. आपल्या ओठांवरील स्मित कायम ठेवून त्याने तो सर्व छळ सहन केला आणि अखेरीस त्याचा विजय झाला. आपल्या जीवनकाळात एक ना एक दिवस आपल्याला माहीत असलेल्या सत्याची अचूकता आपल्याला निश्चितपणे सिद्ध करता येईल हे माहीत असल्यामुळे प्रल्हादाने छळ सहन केला नव्हता. परंतु यातना सहन करत असताना त्याचा जीव जरी गेला असता तरी तो आपल्या सत्यावर अढळ राहिला असता. हेच ते सत्य आहे ज्याचे पालन करण्याची माझी इच्छा आहे. आश्रमाचा नियम आहे की जेव्हा आपल्याला 'नाही' म्हणायचे असते तेव्हा नाहीच म्हटले पाहिजे, मग त्याचा परिणाम काहीही होवो.

## अहिंसेचा सिद्धान्त

अहिंसेचा अर्थ आहे 'न मारणे'. परंतु माझ्या दृष्टीने हिचे हजारो अर्थ आहेत जे मला अतिशय उंचीवर घेऊन जातात, किंबहुना मी असे म्हणेन की ते मला अनंत उंचीचे दर्शन घडवतात.... अहिंसेचा खरा आशय आहे तुम्ही कोणालाही दुखवणार नाही; जी व्यक्ती तुम्हाला शत्रू समजते तिच्याकरितासुद्धा तुम्ही तुमच्या मनात द्वेषभावना आणणार नाही. जी व्यक्ती या सिद्धान्तावर विश्वास ठेवते ती कोणालाच आपला शत्रू समजत नाही.... परंतु तरीही काही लोक असे असतात, जे त्या व्यक्तीला आपला शत्रू समजत असतात.... यामुळे आम्ही असे ठरवले आहे की अशा लोकांबाबतही आपल्या मनात दुर्भावना ठेवायची नाही. आपण जर ठोशाला ठोशाने उत्तर दिले तर अहिंसेच्या तत्त्वापासून आपण खाली घसरू. मी यापेक्षाही एक पाऊल पुढे जातो. आपल्याला जर एखाद्या मित्राच्या व तथाकथित शत्रूच्या वर्तनाबद्दल वाईट वाटले तर तेही अहिंसेच्या सिद्धान्तापासून विचलित होणे होईल. मी जेव्हा म्हणतो की 'वाईट वाटून घेऊ नये' तेव्हा मला

असे म्हणायचे नसते की आपण गप्प बसावे. 'वाईट वाटून घेऊ नये'चा माझा आशय हा आहे की शत्रूचे कोणत्याही प्रकारे अकल्याण व्हावे वा तो नष्ट व्हावा अशी इच्छा आपण करू नये. असे आपल्यामुळे वा इतर कोणत्याही व्यक्तीमुळे तर घडू नयेच परंतु दैवी घटनेमुळेसुद्धा असे व्हावे अशी इच्छा आपण करू नये. अशा प्रकारची जरी इच्छा आपल्या मनात निर्माण झाली तरी ती अहिंसेच्या तत्त्वाची च्युती होईल. ज्या व्यक्तीला आश्रमाचा सदस्य व्हायचे असेल त्या व्यक्तीने या नियमाचे पुरेपूर पालन करणे अपरिहार्य आहे.

याचा अर्थ असा नाही की आम्ही या नियमाचे शंभर टक्के पालन करतो. असे कुठे करू शकतो? हा एक आदर्श आहे व तो प्राप्त करून घेण्याची आमच्यात क्षमता असेल व तो प्राप्त करून घेणे जर शक्य असेल तर तो याच क्षणी प्राप्त करून घेता येईल. परंतु हे काही भूमितीतील साध्य नाही आणि उच्च गणितातील सोडवण्यास कठीण असे गणित नाही. अशा गणितांपेक्षा हे अनंत पटीने कठीण आहे. तुमच्यापैकी अनेकांनी कठीण उदाहरणे सोडवण्याकरिता मध्यरात्रीपर्यंत दिवा जाळला आहे. हे उद्दिष्ट दृष्टिपथात येण्याकरितासुद्धा तुम्हाला अनेक रात्री झोपेशिवाय घालवाव्या लागतील, अनेक मानसिक यातना आणि पीडा सहन कराव्या लागतील. धार्मिक जीवन काय आहे हे जर आपल्याला समजून घ्यायचे असेल तर तुम्हाला आणि मला या उद्दिष्टापर्यंत पोहोचावेच लागेल, त्यात तसूभरही कमी करून चालणार नाही.

....हा सिद्धान्त प्रभावशाली आहे असा विश्वास असलेली व्यक्ती जेव्हा या उद्दिष्टापर्यंत पोहोचेल तेव्हा संपूर्ण जग आपल्या पायाशी असल्याचे तिला आढळून येईल. जर तुम्ही तुमच्या प्रेमाला - म्हणजे अहिंसेला अशा रीतीने अभिव्यक्त करू शकालात, तर त्याचा तुमच्या तथाकथित शत्रूवर अमीट प्रभाव पडेल. तसे झाले तर निश्चितच तो त्या प्रेमाला प्रतिसाद देईल.... या नियमांतर्गत पूर्वनियोजित खून वा उघडपणे केलेली कत्तल.... आपल्या देशाच्या रक्षणाकरिता वा तुमच्या देखरेखीखाली जे तुमचे प्रिय लोक वा आप्तजन आहेत त्यांच्या सन्मानाच्या रक्षणाकरितासुद्धा कोणत्याही प्रकारच्या हिंसेला स्थान नाही. कारण तसे केल्यास ते त्यांचे निकृष्ट रक्षण होईल. अहिंसेचा सिद्धान्त सांगतो की जे तुमच्या रक्षणाखाली आहेत त्यांच्या रक्षणार्थ तुम्ही स्वतःला अत्याचारी माणसाच्या हाती सोपवले पाहिजे आणि याकरिता हिंसा करण्याकरिता लागते त्यापेक्षा किती तरी अधिक शारीरिक आणि मानसिक साहसाची गरज आहे.... तुम्ही जर तुमचे प्रिय

लोक आणि विरोधक यांच्यामध्ये ठामपणे उभे राहाल आणि प्रतिकार न करता विरोधकाचा मारही खात राहाल तर त्याचा परिणाम काय होईल? मी तुम्हाला वचन देतो की विरोधक आपल्या संपूर्ण हिंसेचा प्रयोग तुमच्यावर करील आणि तुमच्या प्रिय लोकांना काहीही होणार नाही. जीवनाच्या या योजनेत राष्ट्रप्रेमाची अशी कोणतीही संकल्पना नाही जिच्यामुळे आज युरोपात सुरू असलेल्या युद्धांचे औचित्य सिद्ध करता येईल.

### ब्रह्मचर्याचे व्रत

ज्यांना राष्ट्रसेवा करण्याची इच्छा असेल वा ख-या धार्मिक जीवनाच्या किरणाचे दर्शन घेण्याची इच्छा असेल त्यांनी, मग ते विवाहित असो वा नसो, ब्रह्मचर्याचे व्रत पाळलेच पाहिजे. विवाहामुळे स्त्री पुरुषाच्या जवळ येते व एका खास अर्थाने ते मित्र बनतात. मैत्रीचे हे बंधन न या जन्मात तुटते ना भावी जन्मात. परंतु विवाहाच्या आपल्या संकल्पनेत वासनेचा प्रवेश होण्याची गरज आहे असे मला वाटत नाही. ते काहीही असले तरी आश्रमात दाखल होऊ इच्छिणारांकरिता ही अट ठेवण्यात आली आहे. या ठिकाणी याबद्दल फार चर्चा करणार नाही.

### रसनेंद्रियाच्या नियंत्रणाचे व्रत

ज्या माणसाला सहजपणे आपल्या वासनांवर नियंत्रण स्थापित करायचे असेल त्याने आपल्या रसनेवर ताबा मिळवला पाहिजे. हे सर्वांत कठीण व्रत असेल अशी मला भीती वाटते.... जोपर्यंत आपण उद्दीपक, गरम आणि उत्तेजक मसाल्यांपासून सुटका करून घेण्याचा निर्धार करणार नाही.... तोपर्यंत आपण वासनांच्या अतिरेकी, अनावश्यक आणि उत्तेजक उद्दीपनाला नियंत्रित करू शकणार नाही.... आपण असे केले नाही तर.... ईश्वराने विश्वासाने आपल्याला दिलेल्या या पवित्र शरीराचा आपण दुरुपयोग करू आणि पशूंपेक्षाही वाईट जीवन जगत मनुष्य आणि पशू यांच्यात समान असलेल्या लक्षणांमध्ये म्हणजे खाणे, पिणे, मैथुन इत्यादी वासनांमध्ये लिप्त होऊन राहू. परंतु गायीला वा घोड्याला तुम्ही कधी जिभेची गुलामी करताना पाहिले आहे काय? तुम्हाला असे वाटते का की, आपण कुठे आहोत हेच आपल्याला कळू नये इतकी आपल्या खाद्यपदार्थांची संख्या गुणोत्तर पद्धतीने वाढवत राहणे हेच संस्कृतीचे, ख-या जीवनाचे चिन्ह आहे? इतक्या विविध पदार्थांचे आपल्याला वेड लागते की अखेरीस नवनवीन पदार्थांच्या शोधाकरिता आपण वर्तमानपत्रांकडे धाव घेतो. अशा

पक्वान्नांच्या जाहिरातींनी वर्तमानपत्रे भरलेली असतातच.

**अस्तेय (अचौर्य) व्रत**

मला असे वाटते की एका अर्थाने आपण सर्व चोर आहोत. जिची मला लगेच गरज नाही अशी एखादी वस्तू घेऊन जर मी ती माझ्याजवळ ठेवून देतो तर कुणा तरी अन्य व्यक्तीपासून मी ती वस्तू चोरत आहे. निसर्गाचा हा मूलभूत नियम आहे आणि त्याला एकही अपवाद नाही. तो नियम असा आहे की आपल्या दैनंदिन गरजेपुरतेच निसर्ग निर्माण करतो आणि प्रत्येक व्यक्ती आपल्या गरजेपुरतेच त्यातून घेईल आणि जास्तीचे मुळीच घेणार नसेल तर जगातून दारिद्र्य नाहीसे होईल आणि माणसे भुकेने मरणार नाहीत. मी समाजवादी नाही आणि ज्यांच्याजवळ संपत्ती आहे त्यांच्याकडून ती हिरावून घेण्याचीही माझी इच्छा नाही, परंतु मी असे नक्कीच म्हणेन की ज्या व्यक्तीला काळोखातून येताना प्रकाशाच्या दर्शनाची इच्छा असेल त्यांनी हा नियम पाळला पाहिजे. मी कोणाजवळूनही त्याची संपत्ती हिसकून घेऊ इच्छीत नाही कारण ते अहिंसेच्या नियमाविरुद्ध आहे. कोणाजवळ माझ्यापेक्षा जास्त संपत्ती असेल तर असू दे. परंतु जोपर्यंत माझ्या जीवनाच्या शिस्तीच्या प्रश्न आहे मला ज्या वस्तूची गरज नसेल ती मी माझ्याजवळ ठेवण्याचे साहस करणार नाही. भारतात लाखो लोक असे आहेत की जे एक वेळच्या जेवणावर राहतात आणि तेही कोरड्या भाकरीशी चिमूटभर मीठ घेऊन. जोपर्यंत या गरिबांच्या खाण्यापिण्याची आणि कपड्यालत्त्यांची व्यवस्था होत नाही तोपर्यंत आमच्याजवळ जी संपत्ती आहे ती ठेवण्याचा आम्हाला अगदीच अधिकार नाही. तुम्हाला आणि मला, ज्यांना अधिक चांगले कळते, त्यांनी आपल्या गरजा माफक केल्या पाहिजे आणि एवढेच नाही तर या लोकांची शुश्रूषा, आहार आणि वस्त्र यांची व्यवस्था व्हावी म्हणून स्वेच्छापूर्वक उपासमारही सहन करण्याची तयारी ठेवली पाहिजे.

**अपरिग्रहाचे व्रत**

हे तर आपोआपच येते.

**स्वदेशीचे व्रत**

स्वदेशीचे व्रत हे आवश्यक व्रत आहे. आपल्या आवश्यकतांच्या पूर्तीकरिता आपण शेजा-याला सोडून दुसरीकडे जातो तेव्हा आपण मानवजातीचा एक पवित्र

नियम तोडतो. एखादा माणूस मुंबईहून येऊन तुम्हाला काही सामान विकू इच्छीत असेल आणि तुमच्या मद्रासमध्येच पालनपोषण झालेल्या एखाद्या माणसाजवळ विक्रीकरिता तेच सामान असेल तर तुम्ही मुंबईच्या व्यापा-याजवळून सामान विकत घेणे उचित नाही.

स्वदेशीबद्दलचा माझा दृष्टिकोन हाच आहे. मद्रासहून आलेल्या कुशल न्हाव्याऐवजी तुम्ही तुमच्या खेड्यात राहणा-या न्हाव्यालाच आधार दिला पाहिजे. तुमच्या गावातील न्हाव्याला मद्रासच्या न्हाव्यासारखे चांगले केस कापता आले पाहिजे असे जर तुम्हाला वाटत असेल तर गरज भासल्यास त्याला मद्रासला पाठवून तुम्ही त्याला तसे प्रशिक्षण द्या. तुम्ही असे करेपर्यंत तुम्हाला दुस-या न्हाव्याकडे जाण्याचा अधिकार नाही. हीच स्वदेशी आहे. अशा प्रकारे आपल्याला जरी ब-याचशा गोष्टी भारतात मिळत नसतील तरी आपण त्यांच्याशिवाय काम चालवले पाहिजे. आम्हाला अनेक गोष्टींशिवाय काम चालवावे लागू शकते. परंतु विश्वास ठेवा की अशी मनःस्थिती तयार झाल्यानंतर तुम्हाला तुमच्या खांद्यावरचे ओझे उतरल्यासारखे वाटेल. 'पिलग्रीम्स प्रोग्रेस' या सुंदर पुस्तकामध्ये एका यात्रेकरूला जसा अद्‌भुत अनुभव आला तसाच हा अनुभव असेल. एक वेळ अशी आली की, यात्रेकरू नकळत जे ओझे वाहत होता ते त्याच्या खांद्यावरून उतरले. तेव्हा त्याच्या लक्षात आले की आपण यात्रेच्या सुरुवातीला जे मोठे ओझे घेऊन निघालो होतो त्यापेक्षा आता किती तरी अधिक स्वतंत्र आहोत. स्वदेशीच्या भावनेचा स्वीकार करताच तुम्हालाही तसेच स्वतंत्र वाटेल.

## निर्भयतेचे व्रत

माझे देशबांधव भीतीमुळे कसे बधिर झालेले आहेत हे मला भारतभ्रमणाच्या दरम्यान दिसून आले. जाहीरपणे आमचे म्हणणे मांडण्याचे आमच्यात धैर्य नाही. आपण लपून आपले म्हणणे मांडतो. आपण आपल्या घराच्या चार भिंतीआड काहीही केले तरी लोकांना त्याचा पत्ता लागत नाही.

आपण जर मौनव्रत ठेवले असते तर माझा काही आक्षेप नसता. माझे म्हणणे आहे की आपण केवळ एकाच शक्तीला घाबरले पाहिजे आणि ती शक्ती आहे ईश्वर. जेव्हा आपण ईश्वराला घाबरू लागू तेव्हा आपण माणसाला घाबरणार नाही; मग तो कितीही उच्चपदस्थ असो. भारताच्या भविष्याला मार्गदर्शन करण्याची अपेक्षा करण्याआधी आपण निर्भय होण्याचा अभ्यास केला पाहिजे.

## 'अस्पृश्यांसंबंधी' व्रत

आज हिंदुत्वावर एक अमीट कलंक लागलेला आहे. ही प्रथा अनंत काळापासून चालत आली व वारसा म्हणून ती आम्हाला मिळाली आहे, या गोष्टीवर विश्वास ठेवण्याची माझी तयारी नाही. मला असे वाटते की आपला समाज जेव्हा घोर अवनतावस्थेत होता तेव्हा स्पर्शास्पर्शाची अतिशय दुःखद, घृणित आणि गुलामगिरीचे प्रतीक असलेली ही भावना निर्माण झाली असावी. या कुप्रथेने आमच्या समाजात मुळे पसरवली आहेत व आजही आपण त्या प्रथेचे शिकार आहोत. माझ्या मते हा एक अभिशाप आहे व जोपर्यंत हा अभिशाप आमच्यावर राहील तोपर्यंत या देशावर जी संकटे येतील, ती या घोर पापामुळे मिळालेली शिक्षा असेल. एखाद्या व्यक्तीला त्याच्या कामामुळे अस्पृश्य का समजले जावे ते मला कळत नाही; आणि तुम्ही विद्यार्थी तर आधुनिक शिक्षण घेत आहात, या पापाचे भागीदार बनण्यापेक्षा तुम्ही अशिक्षित राहिला असता तर बरे झाले असते.

## मातृभाषेच्या माध्यमातून शिक्षण

युरोपमध्ये प्रत्येक सुसंस्कृत व्यक्ती केवळ आपलीच भाषा शिकत नाही तर इतर भाषाही शिकते.

भारताची भाषासमस्या सोडवण्याकरिता आपण आश्रमवासीयांनी अधिकात अधिक भारतीय भाषा शिकण्यावर भर दिला पाहिजे. या भाषा शिकण्याकरिता करावी लागणारी मेहनत इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळवण्याकरिता लागणा-या मेहनती काहीच नाही. आपण आपल्या बालपणीचा काळ कसा विसरू शकतो? आणि विदेशी भाषांच्या माध्यमातून आपण जेव्हा उच्च शिक्षण घेऊ लागतो तेव्हा असेच घडत असते. यामुळे एक दरी निर्माण होते जी भरून काढणे फार कठीण असते. तुम्ही शिक्षण आणि अस्पृश्यताच पाहा - ज्ञान आणि शिक्षणाचा प्रसार झाल्यानंतरही अस्पृश्यता कायम आहे. शिक्षणाच्या प्रभावामुळे अस्पृश्यतेच्या भयंकर परिणामांची आपल्याला जेव्हा जाणीव होते तेव्हा आपण इतके भयभीत होतो की अस्पृश्यतेच्या निवारणार्थ काही करण्याचे साहसच आपल्याला होत नाही.

## खादीचे व्रत

तुम्ही विचारू शकाल की 'आम्ही आमच्या हातांचा उपयोग कशासाठी करायचा?'

तुम्ही म्हणू शकाल की 'अडाणी असलेल्यांनी हातांचा उपयोग करावा. मी तर साहित्य आणि राजकीय निबंध वाचण्यात माझा वेळ घालवीन.' आपण श्रमप्रतिष्ठा ओळखली पाहिजे. एखादा न्हावी वा चांभार कॉलेजमध्ये जरी शिकू लागला तरी त्याने आपला व्यवसाय सोडू नये. हा पेशाही मी डॉक्टरीपेशाच्या बरोबरीचाच आहे असे मानतो. तुम्ही या सर्व व्रतांचे जेव्हा पालन करू लागाल तेव्हा तुम्हांला अशी जाणीव होईल की:

**राजकारणाचा धार्मिक उपयोग**

धर्मापासून वेगळ्या राजकारणाला काहीही अर्थ नाही. जगातील सगळे विद्यार्थी या देशातील राजकारणाच्या व्यासपीठावर गोळा झाले तर ही गोष्ट राष्ट्रविकासाच्या दृष्टीने निरोगीपणाचे चिन्ह आहे असे म्हणता येणार नाही. परंतु याचा अर्थ असा नाही की तुम्ही आपल्या विद्यार्थी जीवनात राजकारणाचा अभ्यासच करू नये. राजकारण आमच्या जीवनाचा एक भाग आहे, आपल्या राष्ट्रीय संस्थांची आपल्याला माहिती असली पाहिजे. लहानपणापासूनच ही गोष्ट आपल्याला कळली पाहिजे. यामुळेच आमच्या आश्रमात प्रत्येक मुलाला देशातील राजकीय संस्थांची ओळख होईल असे शिक्षण दिले जाते व देश कोणकोणत्या नवीन भावनांनी, नवीन आकांक्षांनी, नवजीवनाने आंदोलित होतो आहे ते सांगितले जाते. परंतु त्याचबरोबर आम्हाला धार्मिक श्रद्धांपासून - अशी श्रद्धा नाही जी केवळ बुद्धीला आवाहन करते तर अशी श्रद्धा जी आमच्या अंतःकरणावर कोरलेली असते - मिळणारा स्थिर आणि अचूक प्रकाशही हवा असतो. सर्वात आधी आम्हाला आमची धार्मिक चेतना कळली पाहिजे आणि तसे घडताच जीवनाचे संपूर्ण क्षितिज आमच्यासमोर उघडते. हा पवित्र विशेषाधिकार सर्वांचा आहे. यामुळे आजचे किशोर उद्या जेव्हा पुरुष होतील तेव्हा ते जीवनसंघर्षाकरिता पूर्णपणे तयार झालेले असतील. आज परिस्थिती अशी आहे की बहुतांश राजकीय जीवन विद्यार्थ्यांपर्यंत मर्यादित आहे आणि जेव्हा त्यांचे विद्यार्थीजीवन संपते तेव्हा लहानमोठ्या कामाला लागून ते विस्मृतीत जातात. मग त्यांना ना ईश्वराबद्दल काही ज्ञान असते ना ताजी हवा, चमचमणारा प्रकाश वा स्फूर्तिदायी स्वातंत्र्य यांच्याबद्दल काही माहिती असते. हे सर्व ज्ञान त्या नियमांच्या पालनामुळेच येऊ शकते जे मी तुमच्यासमोर मांडले आहेत.... (वायएमसीए सभागृह, मद्रासमध्ये भाषण, फेब्रुवारी १६, १९१६; स्पीरा, ३७७-९०)

# १२. स्वातंत्र्य आणि लोकशाही

## ६४. स्वातंत्र्याचा दिव्य संदेश

'हळूहळू स्वातंत्र्य' अशी कोणतीही गोष्ट नाही. स्वातंत्र्य तर जन्मासारखे असते. सर्व प्रकारचे जन्म एका क्षणातच होत असतात. (यंग, ९-३-१९२२, पृ. १४८)

### मुलामा दिलेली गुलामगिरी

स्वाभिमानी माणसाकरिता सोन्याच्या बेड्याही तितक्याच क्लेषकारक असतात जितक्या लोखंडाच्या. वेदना बंधनात असतात, धातूमध्ये नसतात.
(यंग, ६-६-१९२९, पृ. १८८)

माझ्या मते सोन्याच्या बेड्या लोखंडी बेड्यांपेक्षा किती तरी जास्त वाईट असतात, कारण लोखंडाच्या बेड्यांचे क्लेषकारी स्वरूप माणसाच्या सहज लक्षात येते उलट सोन्याच्या बेड्यांचे दुःख बहुधा विसरले जाते. यामुळे भारत जर बेड्यांमध्ये बंदिस्त राहणारच असेल तर तो सोन्यासारख्या एखाद्या बहुमूल्य धातूच्या बंधनात असण्यापेक्षा लोखंडाच्या बेड्यात बंदिस्त असावा. (यंग, १६-१-१९३०, पृ. १७)

### स्वातंत्र्याचा अधिकार

ते स्वातंत्र्य खोटे आहे ज्यात चूक करण्याचेच नाही तर पाप करण्याचेही स्वातंत्र्य नसते. सर्वशक्तिमान ईश्वराने सर्वात कमी प्रतीच्या प्राण्यालाही चुका करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. असे असताना काही लोक, मग ते कितीही अनुभवी वा पात्र असले तरी, इतरांचा तो बहुमूल्य अधिकार काढून घेऊन कसे आनंदी होऊ शकतात ते मला कळत नाही. (यंग, १२-३-१९३१, पृ. ३१)

ज्याप्रमाणे प्रत्येक देशात खाण्यापिण्याचे व श्वासोच्छ्वास करण्याचे सामर्थ्य असते त्याचप्रमाणे प्रत्येक राष्ट्रात आपल्या समस्या, त्या कितीही क्लिष्ट असल्या तरी, सोडवण्याचे सामर्थ्य असते. (यंग, १५-१०-१९३१, पृ. ३०५)

वरून लादलेली बंधने केव्हाही वाईट असतात.... जेव्हा हे बंधन निघून जाईल तेव्हा राष्ट्र मुक्तपणाने श्वास घेऊ शकेल, त्याला चुका करण्याचा अधिकार

असेल. चुका करून त्या दुरुस्त करत जाण्याची प्राचीन पद्धती हाच प्रगतीचा योग्य मार्ग आहे. (हरि, २१-१२-१९४७, पृ. ४७७)

## व्यक्तिगत स्वातंत्र्य

माझे निश्चित मत आहे की कोणताही माणूस आपल्या स्वतःच्या दुबळेपणाशिवाय अन्य कोणत्याही कारणाने आपले स्वातंत्र्य गमावत नाही. (इंके, पृ. २०९)

व्यक्तिगत स्वातंत्र्य मूल्यवान आहे हे मला मान्य आहे. परंतु आपण हे विसरू नये की माणूस हा मूलतः सामाजिक प्राणी आहे. समाजाच्या प्रगतीच्या गरजेप्रमाणे आपल्या व्यक्तिस्वातंत्र्याला मुरड घातल्यामुळे तो आजच्या स्थानावर पोहोचला आहे. निरंकुश व्यक्तिस्वातंत्र्य हा जंगली पशूचा नियम आहे. व्यक्तिस्वातंत्र्य आणि सामाजिक संयम यातील मध्यमार्ग आपल्याला शोधावा लागेल. संपूर्ण समाजाच्या कल्याणाकरिता स्वेच्छापूर्वक सामाजिक संयम स्वीकारल्यामुळे व्यक्ती आणि समाज, ज्या समाजाची ती व्यक्ती सदस्य आहे, या दोघांचेही कल्याण होते. (हरि, २७-५-१९३९, पृ. १४४)

जर व्यक्तिस्वातंत्र्य गेले तर असे समजा की सर्व काही गेले. व्यक्तीचेच महत्त्व राहिले नाही तर समाजात शिल्लक तरी काय राहील? व्यक्तिस्वातंत्र्यच माणसाला स्वेच्छापूर्वक सामाजिक सेवेकरिता पूर्णपणे समर्पित करायला लावते. माणसाला बळजबरीने समर्पण करायला लावले तर तो यंत्रमानवाप्रमाणे काम करील व परिणामी समाजाची हानी होईल. माणसाला व्यक्तिस्वातंत्र्यापासून वंचित करून कोणत्याही समजाची घडण होऊ शकत नाही. ही गोष्ट पूर्णपणे मानवी स्वभावाच्या विरोधी आहे. ज्याप्रमाणे माणसाला शेपूट आणि शिंगे फुटू शकत नाहीत त्याचप्रमाणे त्याला स्वतःचे मन नसले तर त्याचे अस्तित्व राहणार नाही. खरे म्हणजे ज्या लोकांचा व्यक्तिस्वातंत्र्यावर विश्वास नसतो त्यांचा स्वतःच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर मात्र विश्वास असतो. परंतु चंगेजखानच्या आधुनिक आवृत्त्या स्वतःचे स्वातंत्र्य निरंकुश ठेवत असतात. (हरि, १-२-१९४२,पृ.२७)

## स्वातंत्र्याची संकल्पना

स्वातंत्र्याची माझी संकल्पना काही संकुचित संकल्पना नाही. तिच्यात माणसाच्या संपूर्ण प्रतिष्ठेसह त्याच्या व्यक्तिस्वातंत्र्याचा समावेश आहे.
(हरि, ७-६-१९४२, पृ. १८३)

प्रत्येक व्यक्तीला आपल्या प्रतिभेचा उपयोग करण्याचे पुरेपूर स्वातंत्र्य असले

पाहिजे, त्याचबरोबर त्याच्या शेजा-यांनाही आपल्या प्रतिभेचा उपयोग करण्याचे तसेच स्वातंत्र्य मिळाले पाहिजे, परंतु कोणत्याही व्यक्तीला आपल्या प्रतिभेमुळे होणा-या लाभाचा हवा तसा उपयोग करण्याचे स्वातंत्र्य असू शकत नाही. व्यक्ती, राष्ट्राचा वा असे म्हणा की आजूबाजूच्या सामाजिक संरचनेचा भाग आहे.

यामुळेच व्यक्ती आपल्या प्रतिभेचा उपयोग केवळ स्वतःकरिता करू शकत नाही. उलटपक्षी तिने आपल्या प्रतिभेचा उपयोग त्या सामाजिक संरचनेच्या कल्याणार्थ केला पाहिजे जिचा ती भाग आहे व जिच्या मौन संमतीने ती हे जीवन जगत असते. (हरि, २-८-१९४२, पृ. २४९)

## स्वतंत्र होण्याची इच्छा

कोणताही अत्याचारी आपल्या शिकारीच्या सहकार्याशिवाय आपल्या उद्दिष्टात यशस्वी होऊ शकलेला नाही. हे मात्र खरे की त्याने हे सहकार्य बळजबरी करून मिळवलेले असते. बहुतेक माणसे प्रतिकाराच्या परिणामाची फळे भोगण्यापेक्षा अत्याचारी माणसाच्या इच्छेला शरण जाणे पसंत करतात. याचमुळे दहशत हे अत्याचा-याचे महत्त्वाचे शस्त्र असते. परंतु दडपशाहीचा आधार घेऊनही शिकारीवर आपली इच्छा लादण्यात अत्याचारी माणसाला यश आले नाही अशी उदाहरणे इतिहासात आहेत. (यंग, ९-६-१९२०, पृ. ३)

अतिशय जुलमी सरकारसुद्धा आपल्या शासितांच्या सहकार्याशिवाय चालू शकत नाही. हे खरे आहे की, जुलमी सरकार ही संमती बहुधा बळजबरीने मिळवते. परंतु प्रजेच्या मनातून निरंकुश सत्तेची भीती निघून जाऊ लागली की निरंकुश सत्ता निष्प्रभ होते. (यंग, ३०-६-१९२०, पृ. ३)

यापुढे गुलामगिरी करायची नाही असा निर्धार ज्या क्षणी गुलाम करतो त्या क्षणापासूनच गुलामगिरीच्या त्याच्या बेड्या निखळून पडतात. तो स्वतंत्र होतो व इतरांनाही स्वातंत्र्याचा मार्ग दाखवतो. स्वातंत्र्य आणि गुलामी या मानसिक अवस्था आहेत. यामुळे, 'आता मी गुलामगिरी करणार नाही. मी आदेशांचे जसेच्या तसे पालन करणार नाही. जे आदेश माझ्या अंतःकरणाला स्वीकारार्ह वाटत नाहीत त्या आदेशांचे मी पालन करणार नाही' असे म्हणण्याची पहिली गरज असते. (हरि, २४-२-१९४६, पृ. १८)

## स्वातंत्र्याची किंमत

आपण एक असो की अनेक, आपल्या स्वाभिमानाचे वा आपण जोपासलेल्या

आपल्या श्रद्धांचे मोल देऊन त्यांच्या मोबदल्यात आपले स्वातंत्र्य विकत घेण्याला आपण नकार दिला पाहिजे. लहान मुलांना एखादी गोष्ट करायची असेल वा हवी असेल परंतु आईवडिलांनी त्यांना त्याकरिता परवानगी दिली नाही तर - मग आईवडलांच्या दृष्टीने ती गोष्ट कितीही तुच्छ असो - आईवडलांसमोर हट्टाने ताठ उभे राहताना मी त्या मुलांना पाहिले आहे. (यंग, १५-१२-१९२१, पृ. ४१८)

आपण जर स्वतंत्र स्त्री-पुरुष म्हणून जगू शकणार नसू तर मरण पत्करण्यात आपल्याला समाधान वाटले पाहिजे. (यंग, ५-१-१९२२, पृ. ५)

आपल्या पारतंत्र्याकरिता माणसाने स्वतःलाच दोष दिला पाहिजे. ज्या क्षणी तो निर्धार करील त्याच क्षणी तो स्वतंत्र होईल. (हरि, ११-१-१९३६, पृ. ३८०)

स्वातंत्र्याकरिता कोणतीही किंमत मोठी नाही. स्वातंत्र्य जीवनाचा श्वास आहे. माणूस जिवंत राहण्याकरिता काय देणार नाही? (हरि, १०-१२-१९३८, पृ. ३६८)

## तळाच्या व्यक्तीकरिता स्वातंत्र्य

स्वतंत्र भारतातील काही लोक आपल्या भविष्याविषयी चिंताग्रस्त असलेले जेव्हा मी पाहतो तेव्हा मला पीडा आणि आश्चर्य या दोन्ही गोष्टींचा अनुभव येतो. माझ्या मते भारत जोपर्यंत आपल्या सीमांमधील, केवळ कृत्रिम नाही तर नैसर्गिक, अगदी तळाशी असलेल्या व्यक्तींना स्वातंत्र्याची ग्वाही देत नाही तोपर्यंत त्याला स्वतंत्र भारत म्हणता येणार नाही.

आमची भीती आमच्या विचारशक्तीला अवरुद्ध करते. असे नसते तर प्रत्येक प्रामाणिक स्त्री-पुरुषाकरिता सध्याच्या परिस्थितीपेक्षा स्वातंत्र्याची परिस्थिती केव्हाही चांगली हे आम्हाला लगेच कळले असते. स्वातंत्र्याच्या आगमनाने केवळ त्यांनीच घाबरले पाहिजे जे शोषक आहेत, इतरांचा पैसा लुबाडणारे आहेत, डाकू आहेत वा अशाच प्रकारचे इतर अपराधी आहेत. (यंग, २६-१२-१९२९, पृ. ४२१)

मी अशा घटनेकरिता प्रयत्न करीन की ज्यात गुलामगिरी वा संरक्षणवादाला कोणत्याही प्रकारचा आश्रय मिळणार नाही आणि याकरिता गरज पडली तर मी पाप करण्याचाही अधिकार देईन. मी अशा भारताकरता प्रयत्न करीन ज्यात गरिबात गरीब माणसालाही हा देश आपला आहे आणि याच्या निर्मितीत आपला महत्त्वाचा वाटा आहे असे वाटेल; एक असा भारत की जिथे लोकांमध्ये ना कोणी उच्च असेल आणि ना कोणी कमी प्रतीचा; एक असा भारत की ज्यात सर्व समुदायांमध्ये मैत्रीभाव असेल. अशा भारतात अस्पृश्यतेच्या अभिशापाला वा

मादक द्रव्यांना कोणतेही स्थान नसेल, स्त्रियांनाही पुरुषांच्या बरोबरीचे अधिकार असतील.

उर्वरित जगाशी आपले शांततापूर्ण संबंध असल्यामुळे.... ना आपण कोणाचे शोषण करू ना कोणाला आपले शोषण करू देऊ.... यामुळे आपल्याला कमीत कमी सैन्य ठेवावे लागेल. भारताच्या करोडो मूक जनतेच्या हक्कांच्या विरोधात नसलेल्या सर्व देशी आणि विदेशी हितसंबंधांना मान्यता देण्यात येईल. व्यक्तिगत दृष्टीने सांगायचे तर देशी आणि विदेशी असा भेद मला घृणास्पद वाटतो. माझ्या स्वप्नातील भारत हाच आहे, मला दुसरा कोणताही भारत नको.
(यंग, १०-९-१९३१, पृ. ३५५)

**शोषणविरहित**

माझ्यावर विश्वास ठेवा की माझ्या देशाकरिता मला जे स्वातंत्र्य हवे आहे ते संपूर्ण मानवजातीच्या एकपंचमांश लोकसंख्येच्या देशाच्या रूपाने जगातील अन्य कोणत्या प्रजातीचे वा देशाचे शोषण करता यावे म्हणून नाही. जर मला माझ्या देशाचे स्वातंत्र्य हवे असेल तर ते मिळवण्याचा अधिकार मला तोपर्यंत मिळत नाही जोपर्यंत जगातील प्रत्येक वंशाला वा देशाला, मग ते प्रबळ असो की दुबळे, या स्वातंत्र्याचा अधिकार मिळवण्याची तेवढीच संधी मी देत नाही आणि त्यांच्या या अधिकाराचे मोल मला कळत नाही. (यंग, १-१०-१९३१, पृ. ३७८)

ज्या लोकांना स्वतःला स्वतंत्र व्हायचे असेल ते इतरांना गुलाम करण्याचा विचारही करू शकत नाहीत. जर ते असा विचार करतील तर त्यांच्या भोवतीच्या गुलामगिरीच्या शृंखला आणखी घट्ट आवळल्या जातील.
(हरि, १३-४-१९४७, पृ. १०६)

माझ्या संकल्पनेतील स्वातंत्र्य म्हणजे तुमच्यामधील आणि या भूमीवरील 'ईश्वराच्या साम्राज्याच्या' प्राप्तीपेक्षा काहीही कमी नाही. हेच स्वप्न साकारण्याकरिता मी प्रयत्नशील आहे. ते स्वप्न साकार होवो वा न होवो त्याकरिता प्रयत्नशील असताना माझी मरण्याचीही तयारी आहे. याकरिता असीम धैर्य आणि चिकाटीची गरज आहे.

भारत जर केवळ राजकीय स्वातंत्र्यावर समाधान मानणार असेल आणि नंतर माझ्याकरिता करण्यासारखे कोणतेही काम नसेल तर मी हिमालयात निघून जाईन. माझी वाणी ऐकण्याची इच्छा असलेल्या लोकांना माझा शोध तिथेच

घ्यावा लागेल. (हिंस्ट, पृ. १-४-१९४०)

ठामपणे सांगायचे तर.... स्वातंत्र्य राजकीय, आर्थिक आणि नैतिक असे तिन्ही प्रकारचे असले पाहिजे.

'राजकीय'चा अनिवार्य अर्थ आहे प्रत्येक स्वरूपातील इंग्रजी सैन्याचे येथील नियंत्रण काढून घेतले जावे. 'आर्थिक'चा अर्थ आहे इंग्रज भांडवलदार आणि त्यांचे भांडवल तसेच भारतातील त्यांच्यासारखेच लोक यांच्यापासून पूर्णपणे मुक्ती. वेगळ्या शब्दात सांगायचे तर अगदी तळाच्या माणसालासुद्धा आपण सर्वाधिक शक्तिसंपन्न माणसाच्या बरोबरीचे आहोत असे वाटले पाहिजे. जेव्हा भांडवलदार आपल्या कौशल्यात आणि भांडवलात सर्वात हीनदीन व्यक्तीलाही सहभागी करून घेईल तेव्हाच हे शक्य होईल.

'नैतिक'चा अर्थ आहे सशस्त्र सैन्यापासून मुक्ती. (हरि, ५-५-१९४६, पृ.११६)

## शांततेची साधने आणि उपाय

भारताने कधीही कोणत्याही राष्ट्राविरुद्ध युद्ध केले नाही. त्याने काही वेळेस केवळ आत्मरक्षणाकरिता अव्यवस्थित वा अर्धव्यवस्थित पद्धतीने आक्रमकांचा प्रतिकार केला. यामुळे शांततेच्या इच्छेचा विकास करण्याची त्याला गरज नाही. त्याला जाणीव असो वा नसो त्याच्यामध्ये ही इच्छा भरपूर प्रमाणात आहे.

शांततापूर्ण उपायांनी आपल्या शोषणाचा प्रतिकार करून भारत शांततेचा प्रसार करू शकतो. वेगळ्या शब्दांत त्याला आपले स्वातंत्र्य शांततामय मार्गाने मिळवावे लागेल. तो जर असे करू शकला तर कोणत्याही एका राष्ट्राद्वारे शांततेकरिता झालेली ती सर्वात मोठी मदत असेल. (यंग, ४-७-१९२९, पृ. २१८)

व्यक्तिशः माझे मत असे आहे की रक्तपाताद्वारे स्वातंत्र्य मिळवण्यापेक्षा गरज भासली तर अनेक युगांपर्यंत वाट पाहणे मी पसंत करेन. जवळपास गत पस्तीस वर्षांच्या राजकारणातील अविरत अनुभवांनंतर, अंतःकरणाच्या अगदी आतून मला जाणवते की हे जग रक्तपाताला कंटाळलेले आहे. त्याला यातून सुटकेचा कोणता तरी मार्ग हवा आहे आणि विचार करता-करता मला वाटू लागते की, शांततेकरिता तहानलेल्या या जगाला शांततेचा मार्ग दाखवण्याचे श्रेय बहुधा या प्राचीन देशालाच मिळेल. असा विचार मनात आला की मी खुश होतो.

यामुळेच भारताच्या या महान संघर्षात जगातील सगळ्या राष्ट्रांना मदतीकरिता आवाहन करताना मला संकोच वाटत नाही. करोडो लोक राष्ट्राच्या प्रतिष्ठेकरिता

आणि सन्मानाकरिता कोणताही प्रतिकार न करता पीडा सहन करयला तयार आहेत, हे दृश्य मननीय व संस्मरणीय आहे. (इंके, पृ. ३०९)

सत्याचा बळी देऊन स्वातंत्र्य मिळवण्यापेक्षा भारत नष्ट झालेला मी पसंत करेन. (यंग, १-१०-१९३१, पृ. २८१)

भारताने आपले स्वातंत्र्य मिळवले परंतु त्याने विश्वशांततेत काहीही भर घातली नाही तर त्यामुळे माझे समाधान होणार नाही. इंग्लंड जेव्हा भारताची लूट थांबवील तेव्हा तो इतर राष्ट्रांचीही लूट थांबवील असे मला वाटते. ते काहीही असले तरी भारत खुनी लोकांमध्ये सामील होणार नाही.
(यंग, ३-१२-१९३१, पृ. ३८०)

## भारताच्या स्वातंत्र्याचा अर्थ

....भारताच्या स्वातंत्र्यामुळे शांतता आणि युद्ध यांच्यासंबंधीच्या विश्वाच्या दृष्टिकोनात निश्चितच क्रांती होईल. भारताचा नपुंसकपणा संपूर्ण मानवजातीला प्रभावित करत आहे. (यंग, १७-९-१९२५, पृ. ३२२)

माझी आकांक्षा स्वातंत्र्यापेक्षा किती तरी अधिक आहे. भारताच्या मुक्तीच्या माध्यमातून जगातील सगळ्या तथाकथित दुर्बल प्रजातींना मला पाश्च्यात्त्यांच्या शोषणापासून मुक्त करायचे आहे.... (यंग, १२-१-१९२८, पृ. १३)

राष्ट्रीय स्वातंत्र्य ही काही काल्पनिक गोष्ट नाही. जितके व्यक्तिस्वातंत्र्य आवश्यक आहे तितकेच तेही आवश्यक आहे. परंतु ते जर अहिंसेवर आधारित असेल तर आपल्याला एकमेकांची भीती कधीही बाळगावी लागणार नाही आणि जी गोष्ट व्यक्तिस्वातंत्र्य आणि राष्ट्रीय स्वातंत्र्याला लागू होते तीच गोष्ट आंतरराष्ट्रीय स्वातंत्र्यालाही लागू होते. 'तुमच्या संपत्तीचा अशा रीतीने उपयोग करा की त्यामुळे इतरांच्या हक्कांना बाधा पोहोचणार नाही' हे कायद्यातील सूत्र नैतिक सूत्रसुद्धा आहे. ब्रह्मांड अणूत सामावलेले आहे असे जे सांगण्यात आले आहे ते अगदी योग्यच आहे. अणूचे नियम वेगळे आणि ब्रह्मांडाचे नियम वेगळे असे काहीही नाही. (यंग, ३०-१-१९३०, पृ. ३७)

## आंतरराष्ट्रीय सहकार्य

संस्कृतीला वाचविण्याकरिता मला राष्ट्रा-राष्ट्रांमधील सहकार्य हवे आहे, परंतु सहकार्याचे सामर्थ्य असणारी राष्ट्रे स्वतंत्र असली पाहिजे ही त्याकरिता पूर्व अट आहे. (यंग, १२-११-१९३१, पृ. १५३)

**शोषित प्रजातींचे स्वातंत्र्य**

मी गेल्यानंतर भारत स्वतंत्र होईल आणि केवळ भारतच नाही तर सगळे जग स्वतंत्र होईल. इंग्लंड आणि अमेरिका स्वतंत्र आहेत असे माझे मत नाही. जोपर्यंत त्यांच्याजवळ अश्वेत राष्ट्रांना ताब्यात ठेवण्याची शक्ती आहे तोपर्यंत ते स्वतंत्र होणार नाहीत. मला माझे ध्येय माहीत आहे आणि स्वातंत्र्य काय आहे तेही मला माहीत आहे. जे मी पाहतो आणि अनुभवतो त्याच्याच आधारावर मी स्वातंत्र्याची व्याख्या करेन. (बांत्रा, पृ. ९-८-१९४२)

भारताच्या स्वातंत्र्यामुळे आपलेही स्वातंत्र्य फार जवळ आहे आणि काहीही केले तरी आता आपले शोषण करता येणे शक्य नाही, हे जगातील अन्य शोषित वंशांच्या स्पष्टपणे लक्षात येईल. (बांत्रा, पृ. १८-४-१९४५)

## ६५. स्वराज्याचा माझ्याकरिता काय अर्थ आहे

माझ्याकरिता स्वराज्याचा अर्थ आहे सर्वाधिक दीनहीन देशवासीयांचे स्वातंत्र्य.... मला भारताला केवळ इंग्रजांच्या गुलामगिरीतून सोडवण्यात स्वारस्य नाही. मी भारताला सर्व प्रकारच्या गुलामगिरीतून मुक्त करण्याकरिता कटीबद्ध आहे. एका शासकाच्या ठिकाणी दुसरा शासक आणण्याची मला जराही इच्छा नाही. (यंग, १२-६-१९२४, पृ. १९५)

स्वराज्याचा माझा अर्थ आहे असे भारत सरकार जे देशातील सर्व प्रौढ मतदारांच्या बहुमताद्वारे निवडले गेले असेल; प्रौढांमध्ये इथे जन्मलेल्या वा बाहेरून आलेल्या त्या सर्व स्त्री-पुरुषांचा समावेश असेल ज्यांनी राज्याच्या सेवेकरिता कोणत्या ना कोणत्या प्रकारे श्रमदान केले असेल व मतदार म्हणून मतदारसूचीत नाव नोंदवण्याचे कष्ट घेतलेले असतील.

खरे स्वराज्य मूठभर लोकांनी सत्ता बळकावल्यामुळे येणार नाही तर सत्तेचा दुरुपयोग करणा-यांचा प्रतिकार करण्याची शक्ती जनतेत आल्यामुळे येईल. वेगळ्या शब्दात सत्तेचे नियमन आणि नियंत्रण करण्याची जनतेची क्षमता विकसित करण्याचे शिक्षण दिल्यामुळे स्वराज्य येणार आहे. (यंग, २९-१-१९२५, पृ. ४१)

स्वराज्याचा अर्थ आहे सरकारच्या नियंत्रणातून मुक्त होण्याचा अविरत प्रयत्न, मग ते सरकार विदेशी असो वा राष्ट्रीय. (यंग, ६-८-१९२५, पृ. २७६)

स्वराज्य एक पवित्र शब्द आहे, हा एक वैदिक शब्द आहे आणि याचा अर्थ

आहे स्वशासन आणि आत्मनिग्रह; याचा अर्थ सर्व प्रकारच्या संयमापासून मुक्ती असा होत नाही. सामान्यपणे स्वातंत्र्याचा अर्थ असा लावला जातो. (यंग, १३-३-१९३१, पृ. ३८)

## गरिबांकरिता स्वराज्य

माझ्या - आपल्या स्वप्नातील स्वराज्य कोणत्याही वांशिक वा धार्मिक भेदभावांवर विश्वास ठेवत नाही, तसेच त्यावर शिक्षित लोकांचा वा श्रीमंतांचा एकाधिकार नसेल. स्वराज्य सर्वांचे असेल, शिक्षितांचे आणि श्रीमंतांचेही. परंतु यात अपंग, आंधळे, उपाशी आणि मेहनतमजुरी करणारे भारतीय यांचा खास समावेश असेल. (यंग, १-५-१९३०, पृ. १४९)

माझ्या स्वप्नातील स्वराज्य गरिबांचे स्वराज्य आहे. जीवनाच्या अपरिहार्य वस्तू ज्याप्रमाणे राजांना आणि श्रीमंतांना उपलब्ध आहेत तशा तुम्हालाही असल्या पाहिजेत. परंतु याचा अर्थ असा नाही की तुमच्याजवळ त्यांच्यासारखे महालही असतील. सुखी जीवनाकरिता यांची आवश्यकता नाही. तुम्ही अथवा मी तर त्यात हरवूनच जाऊ. परंतु तुम्हाला जीवनातील त्या सर्व सुखसोयी मिळाल्या पाहिजे ज्या एका श्रीमंताला उपलब्ध असतात. जोपर्यंत तुम्हाला त्या सुखसोयींचे आश्वासन मिळत नाही तोपर्यंत स्वराज्य खरे स्वराज्य आहे असे मानता येणार नाही. (यंग, २६-३-१९३१, पृ. ४६)

....पूर्ण स्वराज्याचा आपला काय अर्थ आहे आणि त्यापासून काय अपेक्षित आहे?....पूर्ण स्वराज्य सर्वसामान्य लोकांमधील एक जागृती आहे. आपल्या ख-या हिताबद्दलची माहिती आणि प्रसंगी सर्व जगाचा सामना करूनही ते हित साध्य करण्याची क्षमता म्हणजे पूर्ण स्वराज्य.... सुसंगती, स्वातंत्र्य, आतील आणि बाहेरील आक्रमणापासून मुक्ती आणि सर्वसामान्य माणसांच्या आर्थिक परिस्थितीत क्रमशः सुधारणा म्हणजे पूर्ण स्वराज्य....(यंग,१८-६-१९३१,पृ.१४७)

ख-या स्वराज्याचा अनुभव स्त्रिया, पुरुष, व मुले अशा सर्वांना आला पाहिजे. त्याच्याच सिद्धीकरिता प्रयत्न करणे हीच खरी क्रांती आहे. भारताने एक उघड आणि निःशस्त्र संघर्ष केला आहे. शोषकाला कोणत्याही प्रकारची इजा न पोहोचवता सर्वांचे बलिदान मागणारा तो संघर्ष होता. त्यामुळे भारत जगातील सर्व वंशांतील लोकांकरिता आदर्श बनला आहे. आपला संघर्ष उघड आणि निःशस्त्र संघर्ष नसता तर भारताच्या करोडो लोकांमध्ये जागृती निर्माण झाली

नसती. संघर्षाच्या सरळ मार्गावरून जेव्हा जेव्हा आपण विचलित झालो तेव्हा तेव्हा काही काळाकरिता आमच्या विकासात्मक क्रांतीला धक्का लागला. (हरि, ३-३-१९४६, पृ. ३१)

### बहुसंख्याकांचे शासन नाही

असे सांगण्यात आले आहे की भारताचे स्वराज्य बहुसंख्याकांचे म्हणजे हिंदूंचे शासन असेल. यापेक्षा मोठा भ्रम अजून कोणताही नाही. जर असे झाले तर त्याला मी स्वराज्य मानणार नाही आणि माझ्या पूर्ण शक्तीनिशी मी त्याला विरोध करेन.... कारण माझ्या दृष्टीतून भारताच्या स्वराज्याचा अर्थ आहे सर्वांचे शासन, न्यायाचे शासन. या शासनात मंत्री हिंदू असले, शीख असले वा मुसलमान असले तरी अथवा विधानसभेचे सगळे सदस्य हिंदू असले, शीख असले वा मुसलमान असले वा कुणा अन्य समुदायाचे असले तरी सर्वांना निष्पक्ष न्याय मिळेल. (यंग, १६-४-१९३१, पृ. ७८)

आज आमच्या मनात संभ्रम निर्माण झालेला आहे. अज्ञानामुळे आपण एकमेकांशी भांडतो आहोत आणि आपल्याच भावंडांबरोबर दंगेधोपे करतो आहोत. अशा लोकांकरिता ना मोक्ष आहे ना स्वराज्य. स्वशासन वा स्वराज्याची पहिली अट आहे स्वयंशासन. (हरि, २८-४-१९४६, पृ. १११)

### अभिव्यक्तिस्वातंत्र्य

आपल्या देशासारख्या विशाल देशात प्रामाणिकपणे विचार करणा-या सर्व संप्रदायांना स्थान असले पाहिजे. यामुळे कमीत कमी आपल्या विरोधकांचा दृष्टिकोन समजून घेण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे आणि जर तो दृष्टिकोन आपल्याला मान्य नसला तरी आपण त्याचा तसाच आदर करावा जशा आदराची अपेक्षा आपण आपल्या स्वतःच्या दृष्टिकोनाकरिता इतरांकडून करू. एवढी आपली स्वतःची आणि इतरांचीही किमान जबाबदारी आहे. निरोगी सार्वजनिक जीवनाची ही एक अपरिहार्य कसोटी आहे आणि यामुळे स्वराज्याकरिताही ही आवश्यक आहे. (यंग, १७-४-१९३४, पृ. १७०)

वाणी आणि लेखणीचे स्वातंत्र्य हा स्वराज्याचा पाया आहे. जर या गोष्टी संकटात आल्या तर प्राणांची बाजी लावून तुम्हाला त्यांचे रक्षण करावे लागेल. (हरि, २९-९-१९४०, पृ. ३०६)

**स्वराज्य मिळवणे**

ईश्वरसुद्धा आम्हाला स्वराज्य देऊ शकत नाही, ते आम्हाला स्वतःलाच मिळवावे लागते असे म्हणण्याचे धारिष्ट्य मी केले होते. स्वराज्याचा स्वभावच असा आहे की ते तुम्हाला कोणीही देऊ शकत नाही. (यंग, २५-५-१९२१, पृ. १६४)

स्वराज्य मृत्यूच्या भीतीचा त्याग आहे. जे राष्ट्र मृत्यूची भिती बाळगते, ते स्वराज्य मिळवू शकत नाही आणि कधी काळी त्याने ते मिळवलेच तरी ते त्याचे रक्षण करू शकणार नाही. (यंग, १३-१०-१९२१, पृ. ३२६)

एक राष्ट्र दुस-या राष्ट्राला स्वराज्याची निःशुल्क भेट देऊ शकत नाही. हा तर असा मूल्यवान खजिना आहे जो राष्ट्रातील मूल्यवान रक्ताचे मोल देऊन विकत घ्यावा लागतो. इतके मोठे मोल देऊन विकत घेतलेली गोष्ट देणगी समजली जाऊ शकत नाही.... अविरत श्रम आणि अपरिमित पीडाभोग यांच्या मोबदल्यात स्वराज्य मिळते. (यंग, ५-१-१९२२, पृ. ४)

स्वराज्य आकाशातून नक्कीच टपकणार नाही. धैर्य, चिकाटी, अविरत परिश्रम, सहनशीलता आणि पर्यावरणाची विवेकी जाणीव यांचे ते फळ असते. (यंग, २७-८-१९२५, पृ. २९७)

माझ्या दृष्टीने स्वराज्याकरिता एकाच प्रशिक्षणाची गरज आहे आणि ते आहे सर्व जगापासून आपले रक्षण करण्याची आणि परिपूर्ण स्वातंत्र्यात आपले नैसर्गिक जीवन जगण्याची पात्रता विकसित करणे. या स्वराज्यात अनेक दोष राहू शकतील, परंतु त्यांची काळजी करण्याचे कारण नाही. सुशासन हे काही स्वयंशासनाचा पर्याय असू शकत नाही. (यंग, २२-९-१९२०, पृ. १)

स्वराज्याच्या तीर्थयात्रेची चढण फार कठीण आहे. यात लहानाहून लहान गोष्टीवरही लक्ष द्यावे लागते. याचा अर्थ आहे संघटनेची क्षमता, याचा अर्थ आहे केवळ गावक-यांच्या सेवेच्या उद्देशाने गावागावात शिरकाव करणे. वेगळ्या शब्दात याचा अर्थ होतो राष्ट्रीय शिक्षण वा सर्वसामान्यांचे शिक्षण. याचा अर्थ आहे सर्वसामान्यांमध्ये राष्ट्रीय चेतनेचा विकास. जादूगाराच्या आंब्याप्रमाणे एकाएकी ही गोष्ट निर्माण होऊ शकत नाही. वडाच्या झाडाप्रमाणे ही गोष्ट नकळत विकसित होत असते. रक्तरंजित क्रांतीने हा चमत्कार कधीही होऊ शकत नाही. इथे घाईचा अर्थ जवळपास विचका असाच होतो. पी हळद आणि हो गोरी असे इथे होऊ शकत नाही. (यंग, २१-५-१९२५, १७८)

कधी कधी ऐकायला येते : ‘भारत सरकार आमच्या हाती आले की सर्व

काही ठीक होईल.' याहून मोठा अंधविश्वास अजून कोणताही असू शकत नाही. कोणत्याही राष्ट्राला अशा प्रकारे स्वातंत्र्य मिळालेले नाही. वसंत ऋतूचे वैभव जेव्हा झाडांच्या पानापानातून फुलते तेव्हा संपूर्ण धरतीमाता यौवनाच्या ताजेपणाने बहरून येते. अशाच रीतीने स्वराज्याच्या भावनेने समाज खरोखर भारून जाईल तेव्हा जर कोणी अनोळखी माणूस आमच्याकडे आला तर त्याला जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात ऊर्जेचे दर्शन होईल. राष्ट्रसेवक आपापल्या क्षमतेप्रमाणे विविध प्रकारच्या सार्वजनिक कार्यात सहभागी होत असल्याचे त्याला आढळून येईल. (स्पीरा, पृ. ४१६)

## स्वराज्याचा आधार स्वार्थत्याग

स्वराज्य तेव्हाच कायम टिकू शकेल जेव्हा मोठ्या संख्येने निष्ठावंत आणि देशभक्तीने प्रेरित झालेले लोक वैयक्तिक स्वार्थ आणि इतर सर्व गोष्टी यांच्यापेक्षा राष्ट्रकल्याणाला अधिक महत्त्व देतील. (यंग, २८-७-१९२१, पृ. २३८)

माझे स्वराज्य.... इतरांच्या हत्येचा परिणाम नसेल. उलट स्वार्थत्यागाच्या उत्स्फूर्त भावनेतून ते निर्माण होईल. माझे स्वराज्य रक्तपाताद्वारे अधिकार बळकावून मिळणार नाही तर ते उत्तम पद्धतीने आणि ख-या अर्थाने आपले कर्तव्य पार पाडल्याचे सुंदर आणि स्वाभाविक फळ असेल. निरोप्रमाणे नाही तर चैतन्याप्रमाणे आपल्याला ते भरपूर प्रमाणात उत्तेजित करील. स्वराज्य अशा वेळीही येते - केव्हा केव्हा येते - जेव्हा क्षितिज अंधाराने भरलेले असते. परंतु मला माहीत आहे की स्वराज्याच्या आधी अशा एका वर्गाचा उदय होईल ज्याला राष्ट्राकरिता काम, काम आणि कामाशिवाय काहीही सुचणार नाही. त्यातच त्यांना पूर्ण उत्तेजना मिळेल. (यंग, २७-८-१९२५, पृ. २९७)

स्वार्थत्यागी आणि दृढनिश्चयी कार्यकर्त्यांच्या एका विशाल सेनेशिवाय जनतेची वास्तविक प्रगती होणे शक्य नाही, असे माझे मत आहे आणि या प्रगतीशिवाय स्वराज्य नावाची कोणतीही गोष्ट येऊ शकत नाही. गरिबांची सेवा करण्याकरिता आपले सर्वस्व समर्पित करण्याची हिंमत असलेल्या कार्यकर्त्यांच्या संख्येत जेवढी वाढ होईल तेवढ्याच प्रमाणात स्वराज्याच्या दिशेने प्रगती होईल. (यंग, २४-६-१९२६, पृ. २२६)

जनतेच्या स्वराज्याचा अर्थ आहे व्यक्तींच्या स्वराज्याची (स्वयंशासन) एकूण बेरीज. प्रत्येक व्यक्तीने नागरिक म्हणून आपले कर्तव्य पार पाडल्यामुळेच असे

स्वराज्य निर्माण होते. यात स्वतःच्या अधिकारांचा कोणीही विचार करत नाही. चांगल्या पद्धतीने कर्तव्यपालनाकरिता जेव्हा त्या अधिकारांची गरज असते तेव्हा ते आपोआप मिळतात. (हरि, २५-३-३९, पृ. ६४)

## सत्य आणि अहिंसेच्या माध्यमातून

आपल्याला सत्य आणि अहिंसेच्या माध्यमातून स्वराज्य मिळवायचे असेल तर त्याचा एकमेव उपाय आहे रचनात्मक कार्याच्या माध्यमातून त्याच्या पायाभरणीला सुरुवात करून हळूहळू वरपर्यंत मजबुतीने इमारतीची बांधणी करत जाणे. प्रस्थापित व्यवस्था उधळून लावण्याकरिता अराजक निर्माण करायचे आणि एखादा हुकूमशहा येऊन दंडुक्याच्या बळावर या अनागोंदीतून सुव्यवस्था निर्माण करील अशा प्रकारच्या आशेला या योजनेत कोणतेही स्थान नाही. (हरि, १८-१-१९४२, पृ. ४)

आपण सर्व - शासक आणि शासित - दीर्घ काळापासून गुदमरवणा-या अशा अनैसर्गिक वातावरणात राहत आहोत की स्वातंत्र्याच्या स्फूर्तिदायी वातावरणात श्वास घेण्याच्या लायकीची फुफ्फुसेच आपल्याजवळ नाहीत असे सुरुवातीला आपल्याला वाटेल. स्वाभाविक परिस्थिती जर एका व्यवस्थित पद्धतीने म्हणजे अहिंसक पद्धतीने आली आणि संबंधित पक्षांना ती येणे उचित आहे असे वाटल्यामुळे ती आली तर त्यामुळे सर्व जगाचे डोळे उघडतील. (हरि, ७-४-१९४६, पृ. ७०)

## आपल्या संस्कृतीचे अलौकिकत्व

माझे स्वराज्य आपल्या संस्कृतीचे अलौकिकत्व कायम टिकवण्याकरिता आहे. मला अनेक गोष्टी लिहिण्याची इच्छा आहे परंतु त्या गोष्टी भारतीय पाटीवरच लिहिल्या पाहिजे. पश्चिमेकडून राजीखुशीने उधार घेण्याची माझी तयारी आहे. परंतु मी तेव्हाच उधार घेईन जेव्हा ती उधारी मी योग्य व्याजासह परत करू शकेन. (यंग, २६-६-१९२४, पृ. २१०)

स्वराज्यामुळे आपण सुसंस्कृत होणार नसू, त्यामुळे आपली संस्कृती शुद्ध आणि स्थिर होणार नसेल तर त्याला काहीही अर्थ नाही. आपल्या सार्वजनिक वा खाजगी कामात नैतिकतेला सर्वोपरी स्थान देणे हेच आपल्या संस्कृतीचे सारतत्त्व आहे. (यंग, २३-१-१९३०, पृ. २६)

## ६६. मी इंग्लंडविरोधी नाही

माणसाच्या स्वभावावर माझा अढळ विश्वास आहे आणि प्रतिकूल परिस्थितीतही युक्तिवाद आणि अनुनय यांच्यासमोर मी इंग्रजांना झुकताना पाहिले आहे. स्पष्टपणे अनुचित काम करत असतानाही न्यायप्रिय दिसण्याची त्यांना इच्छा असते. त्यामुळे इतरांपेक्षा त्यांना योग्य कृती करायला भाग पाडणे अधिक सोपे आहे. (यंग, ७-१-१९२०, पृ. २)

....इंग्रजांना वा इतर कोणाला इजा न करता माझ्या देशवासीयांची सेवा करण्याचे सामर्थ्य माझा वैयक्तिक धर्म मला देतो. मी जसा माझ्या रक्ताच्या भावाशी वागणार नाही तसा मी इंग्रजांशीही वागणार नाही. एखादे राज्य मिळवण्या-करितासुद्धा मी त्यांना इजा करणार नाही. परंतु गरज पडली तर मी इंग्रजाशी त्याप्रमाणेच सहकार्य करणार नाही ज्याप्रमाणे मी माझ्या भावाशी (जे आता वारले आहेत) सहकार्य करणे बंद केले होते. ब्रिटिश साम्राज्याच्या अनैतिक कार्यात सहभागी न होऊन मी त्याची सेवा करत आहे. (यंग, ५-५-१९२०, पृ. ४)

मी इंग्रज विरोधक नाही, मी इंग्लंडविरोधीही नाही; मी कोणत्याही सरकारच्या विरोधात नाही, परंतु मी असत्याच्या विरोधात आहे, लांडीलबाडीच्या विरोधात आहे आणि अन्यायाच्या विरोधात आहे. जोपर्यंत सरकार अन्याय करणे थांबवत नाही तोपर्यंत ते मला स्वतःचा शत्रू समजू शकते. (स्पीरा, पृ. ५२३)

मी प्रवृत्तीने इंग्रजविरोधक आहे असा आरोप माझ्यावर कोणीही करू शकणार नाही. खरे सांगायचे तर मला माझ्या विवेकाचा अभिमान वाटतो. त्यांच्या अनेक गोष्टींचा मी साभार स्वीकार केला आहे. वेळ पाळणे, मितभाषीपणा, सार्वजनिक स्वच्छता, स्वतंत्र चिंतन, विवेकानुसार वागणे इत्यादी अनेक गोष्टी मी इंग्रजांच्या सहवासातून शिकलो आहे. (यंग, ६-३-१९३०, पृ. ८०)

माझा राष्ट्रवाद इतका संकुचित नाही की.... (इंग्रजांवर आलेल्या) आपत्तींकडे मी समाधानाच्या दृष्टीने पाहत राहीन. इतर कोणत्याही देशाच्या समाधानाचा बळी देऊन माझ्या देशांचे समाधान मिळवण्याची माझी इच्छा नाही.
(यंग, १५-१०-१९३१, पृ. ३०९)

माझ्यात कोणतीही कटुता नाही. मी क्षुद्रतम पशूंनांही माझ्या भावंडांप्रमाणे मानतो. मग ज्या इंग्रजाबरोबर, वाईट कारणांकरिता का होईना, आपण

शतकांपासून बांधलेलो आहोत आणि ज्यांच्यात काही माझे घनिष्ट मित्र आहेत त्या इंग्रजांना मी भावाप्रमाणे का मानणार नाही? तुम्हाला (इंग्रजांना) आढळेल की मी एक साधा माणूस आहे, परंतु तुम्ही माझा मैत्रीचा हात झिडकाराल तर मी तुमच्यापासून दूर होईन, परंतु त्यामुळे माझ्या मनात कटुता निर्माण होणार नाही. तुमच्या हृदयात जागा मिळवण्याएवढा मी निर्मळ नाही एवढाच मी त्याचा अर्थ घेईन. (यंग, १५-१०-१९३१, पृ. ३१०)

ब्रिटनवासीयांबद्दल माझ्या मनात तेवढेच प्रेम आहे जेवढे माझ्या देशबांधवां-बद्दल माझ्या मनात आहे. ही काही विशेष गोष्ट नाही कारण निरपवादपणे मी सर्व मानवांवर सारखेच प्रेम करतो. त्याच्या मोबदल्यात मी काहीही मागत नाही. या जगात कोणालाही मी माझा शत्रू समजत नाही. हाच माझा धर्म आहे. (बांक्रा, ९-८-१९४२)

....मी ब्रिटिश सरकारला माझ्या सार्वजनिक जीवनाच्या काळात सतत एकोणतीस वर्षे सहकार्य दिले. इतके सहकार्य कोणत्याही भारतीयाने ब्रिटिश सरकारला दिले नसेल आणि ते सहकार्यही अशा परिस्थितीत दिले ज्या परिस्थितीत दुसरा कोणी बंडखोर झाला असता....

साम्राज्याकरिता मी माझे जीवन चारदा धोक्यात घातले. बोअर युद्धाच्या वेळी, ज्या वेळी मी शुश्रूषा पथकाचा प्रमुख होतो आणि आमच्या कामाची प्रशंसा जनरल बुलर यांनी आपल्या पत्रातून केली होती, नाताळमधील झुलू युद्धाच्या वेळी, जेव्हा मी वरीलप्रमाणेच शुश्रूषा पथकाचा प्रमुख होतो, गत विश्वयुद्धाच्या सुरुवातीच्या वेळी, जेव्हा मी शुश्रूषा पथक तयार केले होते आणि कठीण प्रशिक्षणामुळे मला फुफ्फुसावरणदाहाचा (प्ल्युअरसी) विकार झाला होता तेव्हा आणि अखेरच्या वेळी दिल्लीत आयोजित युद्ध परिषदेच्या वेळी लॉर्ड चेम्सफोर्ड यांना दिलेल्या वचनाप्रमाणे खेडा जिल्ह्यात रंगरूट भरती करण्याकरिता पायपीट करत असताना मला आमांशाचा विकार होऊन जवळपास मी मरणाला टेकलो तेव्हा. माझ्या देशाला ब्रिटिश साम्राज्यात बरोबरीचा दर्जा मिळेल असे वाटल्यामुळे मी हे सर्व केले होते. (यंग, २७-१०-१९२०, पृ. १)

### निरंकुश राज्यकारभार

आजच्या (१९४७ पूर्वीच्या) भारत सरकारसारख्या एकाधिकारशाही असलेल्या राज्यात मौलिकता असूच शकत नाही. हे विश्वातील सर्वात मोठे हुकूमशाही शासन

आहे. लोकशाही केवळ इंग्लंडपर्यंत सीमित आहे. जेव्हा इंग्लंड इतर वंशांच्या लोकांवर राज्य करू लागते तेव्हा ते स्पष्टपणे वाईटपणाचे व पापाचे रूप धारण करते. यामुळे एका सुजाण लोकशाहीचे सर्वोत्कृष्ट कार्य शोषणच आहे या कल्पनेने संपूर्ण द्वीपकल्पाची बुद्धी दूषित झाली आहे. माझा तर्क बरोबर असेल तर ही मूलभूत गोष्ट आपण पक्की लक्षात ठेवली पाहिजे. आपल्यासमोरील समस्येचा विचार करताना आपण जर ही गोष्ट समजून घेतली तर आजच्या सत्ताधा-यांबरोबर आपण धीराने व्यवहार करू. इथे मी वाईटपणा सहन करण्याकरिता आवाहन करत नाही आहे. हे वैशिष्ट्य आपण लक्षात ठेवले तर वाईटपणाशी व्यवहार करताना आपल्याला अडचण येणार नाही. (हरि, १७-२-१९४६, पृ.,१२)

अशा कोणत्याही व्यक्तीचे स्वागत केले जाईल जी आमची वरिष्ठ म्हणून नाही तर खरी मित्र म्हणून सेवाभावनेने इथे येईल. स्वातंत्र्यानंतर भारताला अशा ख-या मित्रांची गरज असेल. इंग्रजांबद्दलची अविश्वासाची भावना.... इथे आहे. भारतीय विद्यार्थ्यांना इंग्लंडमध्ये पाठवून ती संपणार नाही. हिची मुळे इतिहासात असल्यामुळे ती तुम्हाला समजून घ्यावी लागतील आणि त्याकरिता तुम्हाला स्वतःला तयार करावे लागेल (हरि, ३१-३-१९४६, पृ. ६०)

....आतापर्यंत भारतीयांनी इंग्रजांना शासक वर्गाचे सदस्य म्हणूनच पाहिले आहे - जेव्हा ते वरच्या वर्गातील सदस्यासारखे वागत नसतात तेव्हा ते आढ्यतेखोरपणे वागतात. सर्वसामान्य भारतीय अशा प्रकारचे इंग्रज आणि विनम्र युरोपीय यांच्यात भेद करत नाही. जुन्या पद्धतीचा सुपरिचित साम्राज्यनिर्माता इंग्रज आणि नवीन प्रकारचा इंग्रज, ज्याच्यात आपल्या पूर्वजांनी केलेल्या पापाचे प्रायश्चित्त करण्याची इच्छा असलेल्या इंग्रजांचाही समावेश आहे, यांच्यात आजचा भारतीय भेद करू शकत नाही. (हरि, ३१-३-१९४६, पृ. ६१)

## नवीन प्रकरण

तोडण्यात आलेली अभिवचने आणि उध्वस्त करण्यात आलेल्या आशा यांनी परिपूर्ण अशा एखाद्या शोकांतिकेसारखा इंग्लंडचा भारताबरोबरचा संबंध राहिलेला आहे ही गोष्ट मी विसरू शकत नाही. परंतु आपण आपले मन उघडे ठेवले पाहिजे. कोणताही सत्यशोधक आपल्या विरोधकाशी अविश्वासाने व्यवहाराला सुरुवात करणार नाही. त्यामुळे मी आशावादी आहे आणि कोणताही जबाबदार भारतीय यापेक्षा वेगळा विचार करणार नाही असे मी समजतो. परंतु या वेळी

इंग्रजांना जबाबदारी पार पाडायची आहे असे मला वाटते. स्वातंत्र्याचा हा प्रस्ताव एकाएकी आला आहे....

कटुतेच्या लाटा जोरात आहेत आणि आत्म्याकरिता ही शुभ गोष्ट नाही.... हा केवळ भारत आणि इंग्लंडच्या इतिहासामधीलच नाही तर संपूर्ण विश्वाच्या इतिहासातील मैलाचा दगड आहे.... (हरि, १४-४-१९४६, पृ. ९०)

## राष्ट्रमंडळ

इंग्रजांना आपला कट्टर शत्रू समजायचे आणि पहिली संधी मिळताच त्यांना या देशातून हुसकून लावायचे आहे ही भावना मनात न ठेवता ज्या इंग्लंडचे साम्राज्य दुबळ्या आणि अविकसित राष्ट्रांच्या व वंशांच्या शोषणावर आधारित होते व जे केवळ शक्तीवर आधारित होते त्या इंग्लंडशी मैत्री करून राष्ट्रमंडळात त्यांच्याशी भागीदारी करण्याकरिता तयार राहणे ही गोष्ट भारताला शोभण्यासारखी होईल. (यंग, ५-१-१९२२, पृ. ४)

सम्राटाच्या भूमिकेचे महत्त्व मला ॲन्ड्र्यूज यांनी समजून सांगितले होते. ब्रिटनचा राजा अंकित राष्ट्रांचाही राजा आहे परंतु भारताचा तो सम्राट आहे. साम्राज्य केवळ भारत आहे. अंकित राष्ट्रांमध्ये तर केवळ तुमची (इंग्रजांची) भावंडे राहतात. परंतु संस्कृती आणि परंपरा यांनी वेगळे असलेले आम्ही भारतीय ब्रिटिश कुटुंबाचे सदस्य कधीही होऊ शकत नाही. आम्ही राष्ट्रांच्या विश्वव्यापी कुटुंबाचे सदस्य होऊ शकतो परंतु आधी आम्ही पददलितांच्या श्रेणीतून बाहेर पडलो पाहिजे. म्हणूनच मला स्वातंत्र्य मिळवायचे आहे....

इंग्रजांनी बनिया नाही तर ब्राह्मण बनणे शिकले पाहिजे. बनिया एक तर व्यापारी असतो वा नेपोलियन म्हणाल्याप्रमाणे दुकानदार असतो. ब्राह्मण तो असतो ज्याच्यात जीवनातील भौतिक मूल्यांपेक्षा नैतिक मूल्यांना अधिक महत्त्व देण्याची क्षमता असते. इंग्रजांनी स्वतःमध्ये ते ब्राह्मणत्व विकसित केले पाहिजे....

भारताला जर स्वातंत्र्याच्या प्रकाशाचे दर्शन झाले तर तो बहुधा असा काही करार करू शकेल. (इंग्लंडबरोबर संरक्षण करार) परंतु तो करार तो स्वेच्छापूर्वक करू शकेल. असे झाले तर भारत आणि इंग्लंड यांच्यामधील उत्स्फूर्त मैत्रीचा विकास इतर सत्तांपर्यंतही वाढवता येऊ शकेल व यांच्याजवळ नैतिक बळ असल्यामुळे हे सर्व मिळून शक्तिसंतुलनही करू शकतील. हे स्वप्न साकार झालेले पाहण्याकरिता १२५ वर्षे जगण्याची माझी इच्छा आहे. (यंग, १४-४-१९४६, पृ. ९१)

## ६७. रामराज्य

रामराज्याचा माझा अर्थ हिंदू राज्य असा नाही. रामराज्य म्हणजे दैवी राज्य वा ईश्वरी साम्राज्य. माझ्या दृष्टीतून राम आणि रहीम एकच आहेत. मला एकच ईश्वर माहीत आहे आणि तो आहे सत्य आणि सदाचाराचा ईश्वर.

माझ्या कल्पनेतील राम या पृथ्वीवर कधी राहिले असतील वा नसतील, परंतु रामराज्याचा प्राचीन आदर्श एका ख-या लोकशाहीचा आदर्श आहे यात काही संशय नाही. या राज्यपद्धतीत क्षुद्रतम नागरिकालाही लांबलचक आणि महाग प्रक्रियेशिवाय ताबडतोब न्याय मिळू शकतो. (यंग, १९-९-१९२९, पृ. ३०५)

माझ्या स्वप्नातील रामराज्यात राव आणि रंक या दोघांनाही समान अधिकार असतील. (अबाप, २-८-१९३४)

### स्वातंत्र्याची व्याख्या

हाऊस ऑफ कॉमन्स वा रशियातील सोव्हिएट शासन वा इटलीतील फॅसिस्ट पद्धतीचे शासन वा जर्मनीचे नाझी शासन यांचे अनुकरण करणे म्हणजे राजकीय स्वातंत्र्य असा माझा अर्थ नाही. त्यांच्या पद्धती त्यांच्या स्वतःच्या गरजेनुरूप आहेत. आपली पद्धती आपल्या गरजांना अनुरूप असली पाहिजे. मी जी पद्धती सांगतो त्यापेक्षाही ती चांगली असू शकते. मी तिला रामराज्य म्हणजे लोकांचे प्रभुत्व असलेले राज्य असे म्हणतो व त्याचा आधार नैतिक सत्ता असला पाहिजे. (हरि, २-१-१९३७, पृ. ३७४)

स्वातंत्र्याची व्याख्या करण्याचे आव्हान मित्रांनी मला वारंवार दिले आहे. मी परत सांगतो की माझ्या स्वप्नातील स्वातंत्र्याचा अर्थ आहे रामराज्य म्हणजेच पृथ्वीवर ईश्वराच्या साम्राज्याची स्थापना. स्वर्गात ईश्वराचे साम्राज्य कसे असेल ते मला माहीत नाही. एवढ्या अंतरावरील गोष्ट जाणून घेण्याची माझी इच्छाही नाही. वर्तमानकाळ जर पुरेसा आकर्षक असेल तर भविष्यही त्यापेक्षा फारसे वेगळे असू शकणार नाही. (हरि, ५-५-१९४६, पृ. ११६)

### बळजबरी नाही

माझ्या कल्पनेतील रामराज्यात ब्रिटिश सैन्याची जागा घेऊन एखादे राष्ट्रीय सैन्य हा देश व्यापणार नाही. ज्या देशावर सैन्याची सत्ता असेल, मग ते राष्ट्रीय सैन्य

का असेना, तो देश नैतिक दृष्टीने स्वतंत्र आहे असे कधीही मानले जाऊ शकत नाही आणि त्यामुळे त्याचे तथाकथित दुर्बलतम नागरिक आपला संपूर्ण नैतिक उत्कर्ष कधीही करून घेऊ शकणार नाहीत. (हरि, ५-५-१९४६, पृ. ११६)

आजच्या अन्याय्य विषम परिस्थितीत मूठभर लोक ऐश्वर्याचा उपभोग घेत आहेत आणि दुसरीकडे सर्वसामान्य माणसाला पोट भरणेही कठीण होत आहे. अशा परिस्थितीत रामराज्य कधीही येऊ शकत नाही.... कोणत्याही स्थायी सुधारणेकरिता हिंसेचा साधन म्हणून उपयोग करणे मला चुकीचे वाटते. समाजवादी आणि अन्य लोकांना माझा जो विरोध आहे त्याचे हेच कारण आहे. (हरि, १-६-१९४७, पृ. १७२)

मी निर्वाणाची रामराज्याशी म्हणजे पृथ्वीवरील स्वर्गीय राज्याची तुलना करतो.... ब्रिटिश सत्ता निघून जाणे म्हणजे रामराज्य नाही. अहिंसेच्या बुरख्याखाली आपण सर्व आपल्या हृदयात हिंसा पाळत असताना इथे रामराज्य कसे येऊ शकते? (हरि, ३-८-१९४७, पृ. २६२)

### इतरांबद्दल आदर

माझा हिंदू धर्म मला सर्वांचा आदर करणे शिकवतो. रामराज्याचे रहस्य यातच दडलेले आहे. (हरि, १९-१०-१९४७, पृ. ३७८)

तुम्हाला जर रामराज्याच्या रूपात ईश्वराचे दर्शन घ्यायचे असेल तर आधी तुम्हाला आत्मनिरीक्षण करावे लागेल. तुम्हाला तुमचे दोष हजारपटीने मोठे करून पाहावे लागतील आणि इतरांच्या दोषांकडे दुर्लक्ष करावे लागेल. ख-या प्रगतीचा मार्ग हाच आहे. (हरि, २६-१०-१९४७, पृ. ३८७)

## ६८. काश्मीर

### समस्या आणि समाधान

परिस्थिती काय आहे? असे म्हटले जाते की, आफ्रिदी लोक आणि त्यांच्यासारखे इतर बंडखोर यांची एक फौज कुशल अधिका-यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीनगरकडे कूच करत होती आणि तिने मार्गातील गावांची लूट आणि जाळपोळ केली. त्याचबरोबर त्यांनी विद्युतनिर्मितीगृहही नष्ट केले व परिणामी श्रीनगर अंधारात बुडाले. काश्मीरमधील बंडखोरांचा हा प्रवेश पाकिस्तान सरकारच्या कोणत्या ना कोणत्या मदतीशिवाय झाला हे मान्य करणे कठीण आहे. या प्रकरणाच्या

गुणदोषांची चर्चा करण्याएवढी पुरेशी माहिती माझ्याजवळ नाही आणि माझ्या हेतूकरिता तिची गरजही नाही. मला केवळ एवढे माहीत आहे की संघ सरकारने काश्मीरमध्ये सैन्याच्या तुकड्या पाठवून, जरी त्या कमी असल्या तरी, योग्य पाऊल उचलले आहे. यामुळे काश्मीरी लोकांमध्ये कमीतकमी आत्मविश्वास तरी निर्माण होईल.... परिणाम ईश्वराच्या हाती असतो. माणूस तर करू वा मरू शकतो. काश्मीरचे रक्षण करत असताना संघराज्याचे सैन्य स्पार्टन लोकांप्रमाणे सगळेच्या सगळे शहीद झाले तरी मी अश्रूचा एक थेंबही सांडणार नाही. अशाच रीतीने हिंदू, मुसलमान, शीख बंधुभगिनींनी काश्मीरचे रक्षण करता करता प्राणोत्सर्ग केला तर मला किंचितही वाईट वाटणार नाही. शेष भारताकरिता ते एक आदर्श उदाहरण होईल. अशा प्रकारे रक्षण कार्य शौर्याने केले तर संपूर्ण भारत नवचैतन्याने भरून जाईल आणि हिंदू, मुसलमान व शीख हे कधी काळी शत्रू होते हे विसरले जाईल. (हरि, ९-११-१९४७, पृ. ४०६)

भारताने राष्ट्रसंघात केलेल्या आवेदनावर पाकिस्तान सरकारने आव्हान दिले असल्याचे पाहून आणि हल्लेखोरांनी काश्मीरवर केलेल्या आक्रमणात आपला काही हात असल्याचे पाकिस्तानने अमान्य केल्याचे पाहून मला आश्चर्य वाटते. केवळ अमान्य करून काहीही होत नाही. हल्लेखोरांना हुसकावून लावण्याकरिता काश्मीरने जेव्हा भारताकडे मदत मागितली तेव्हा काश्मीरला मदत करणे भारताचे कर्तव्य होते आणि या कामात भारताच्या संघ सरकारला मदत करणे हे पाकिस्तानचे कर्तव्य होते. पाकिस्तानने सहकार्य करण्याची इच्छा व्यक्त केली परंतु या बाबतीत त्याने कोणतेही पाऊल उचलले नाही....

या दोन्ही उपखंडात युद्ध झाले तर ते तिस-या शक्तीच्या नियंत्रणात जातील आणि यापेक्षा अजून वाईट काहीही होऊ शकणार नाही. मी मैत्री आणि सद्‌भावनेकरिता आवाहन करतो.... परंतु सामंजस्य अंतःकरणापासून असावे. मनात घृणा ठेवणे तर युद्धाहूनही वाईट आहे. (हरि, १२-१-१९४८, पृ. ५०९)

## ६९. भारतातील विदेशी वस्त्या

### (अ) गोवा

**बदलाची वेळ**

ही लहानशी पोर्तुगीज वस्ती ब्रिटिश सरकारच्या मौन अनुमतीमुळेच येथे टिकून आहे. त्यांच्या वाईट वर्तणुकीची नक्कल करून पोर्तुगीज इथे टिकू शकणार नाहीत. स्वतंत्र

भारतात स्वतंत्र भारताच्या कायद्याला विरोध करून गोव्याला एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून आपले अस्तित्व टिकवून ठेवण्याची परवानगी देता येऊ शकत नाही. एकही गोळी चालवल्याशिवाय गोव्याच्या लोकांना स्वतंत्र राज्याच्या नागरिकांचे हक्क मिळवण्यात यश येईल. गोव्यातील रहिवाश्यांच्या इच्छेच्या विरोधात गोव्याला एकटे पाडून आपल्या ताब्यात ठेवण्याकरिता सध्याचे पोर्तुगीज सरकार ब्रिटिश शस्त्रांच्या मदतीवर विसंबून राहू शकणार नाही. गोव्याच्या पोर्तुगीज सरकारला मी सल्ला देईन की त्यांनी काळाची पावले ओळखावी आणि त्यांच्यात आणि ब्रिटिश सरकारमध्ये कधी काळी झालेल्या कराराचा आधार घेण्याऐवजी त्यांनी गोव्यातील रहिवाश्यांशी सन्मानजनक करार करावा. (हरि, ३०-६-१९४६, पृ. २०८)

## दहशतवादी सत्ता

....मी मोझांबिक, डेलागोआ आणि इन्यमबान येथे गेलो आहे. तिथे लोकोपकाराच्या दृष्टीने चालवले जाणारे सरकार मला आढळले नाही. उलट तेथील सरकार भारतीय, पोर्तुगीज आणि आफ्रिकी लोकांमध्ये भेदभाव करत असल्याचे पाहून मला आश्चर्य वाटले. भारतातील पोर्तुगीज वस्त्यांचा इतिहासही तेथील लोकोपकारी सरकार सुरू असल्याचा दावा सिद्ध करू शकत नाही. गोव्याच्या अवस्थेबद्दल मी जे काही पाहिले आणि ऐकले आहे ते प्रशंसनीय नाही. गोव्याच्या भारतीयांनी अजून आवाज उठवला नाही याचे कारण पोर्तुगीज सरकारचे निर्दोषत्व वा परोपकारी वृत्ती नसून तिथे व्याप्त असलेली राज्याची दहशत आहे. (हरि, ११-८-१९४६, पृ. २६०)

....गोव्यातील भारतीयांची जन्मभूमी पोर्तुगाल आहे असे म्हणणे.... अगदी मूर्खपणाचे आहे. ज्याप्रमाणे माझी मातृभूमी भारत आहे त्याचप्रमाणे त्यांची मातृभूमीही भारतच आहे. गोवा ब्रिटिश भारताबाहेर आहे हे खरे परंतु भौगोलिक दृष्टीने तो भारताचाच भाग आहे. आणि पोर्तुगिजांमध्ये आणि गोव्यातील लोकांमध्ये क्वचितच काही साम्य असेल. (हरि, ८-९-१९४६, पृ. ३०५)

## नागरिक स्वातंत्र्य

गोवावासीयांना माझे सांगणे आहे की ज्याप्रमाणे भारताच्या अन्य भागातील लोकांनी शक्तिशाली ब्रिटिश सरकारची भीती आपल्या मनातून काढून टाकली होती त्याप्रमाणे त्यांनी पोर्तुगीज सरकारची भीती आपल्या मनातून काढून टाकावी आणि नागरी स्वातंत्र्य आणि मूलभूत हक्क यांच्याकरिता आपला आवाज

उठवावा. (हरि, ३०-६-१९४६, पृ. २०८)

गोव्यातील लोकांनी स्पष्टपणे नागरी स्वातंत्र्याचा मुद्दा घेऊन हे आंदोलन चालवणे हे आंदोलनाच्या यशस्वितेकरिता अतिशय आवश्यक आहे. स्वराज्याचा मुद्दा तोपर्यंत वाट पाहू शकतो जोपर्यंत भारत स्वतंत्र होत नाही. ही गोष्ट मात्र खरी आहे की पोर्तुगीज सरकारने सुज्ञपणाने काम करत स्वतःच आपल्या वस्त्यांतील लोकांशी मैत्रीपूर्ण चर्चा करून करार करावा. गोव्याचे नागरिक सरळ कारवाईद्वारे, मग ती हिंसक असो वा अहिंसक, स्वातंत्र्य मिळवू शकणार नाहीत. अहिंसक कारवाईत यश जरूर मिळते परंतु त्याकरिता प्रत्येक देशवासीयाला आपले प्राण पणाला लावण्याची तयारी ठेवावी लागत असते. भारताच्या तुलनेत - ज्याची लोकसंख्या फार मोठी आहे, ज्याच्याजवळ अनुभव आहे आणि जिथे जागृती झालेली आहे - गोव्यात अशी आशा करता येणे कठीण आहे. यामुळे सध्या नागरी स्वातंत्र्याकडेच आपण लक्ष देणे उचित होईल.

यशाची दुसरी अट अशी आहे की संघर्ष अहिंसक असावा आणि तो उघडपणे चालवण्यात आला पाहिजे. तिसरी गोष्ट, सत्ता वा पद यांकरिता कोणत्याही पक्षांमध्ये संघर्ष होऊ नये. जर ध्येय एकच असेल तर वेगवेगळे पक्ष ठेवण्यात काहीही अर्थ नाही. (हरि, २८-७-१९४६, पृ. २३५)

भारताच्या या भागातून मला जी व्यक्तिगत माहिती मिळाली आहे वा वर्तमानपत्रातून मी जे वाचले आहे त्यावरून गोव्यात नागरी स्वातंत्र्य नाही हेच सिद्ध होते. सैनिकी न्यायालयाद्वारे (कोर्ट मार्शल) डॉ. ब्रिगेंजा यांना झालेली आठ वर्षांची शिक्षा आणि त्यांना कोणत्या तरी दूरवरच्या पोर्तुगीज वस्तीत पाठवण्याचा निर्णय गोव्यात नागरी स्वातंत्र्य नसल्याचा पक्का पुरावा आहे. डॉ. ब्रिगेंजासारख्या कायद्याचे पालन करणा-या व्यक्तीला हद्दपार करण्याचा आदेश द्यावा लागावा एवढे भयानक का समजण्यात आले?....

गोवावासी स्वातंत्र्याकरिता तोपर्यंत वाट पाहू शकतात जोपर्यंत विशाल भारत स्वतंत्र होत नाही. परंतु कोणतीही व्यक्ती आपला आत्मसन्मान न गमावता नागरी स्वातंत्र्याशिवाय जिवंत राहू शकत नाही. (हरि, ११-८-१९४६, पृ. २३५)

....नागरी स्वातंत्र्याविषयी प्रेम असणा-यांची शिकार करण्याचा खेळ गोव्यात खूप खेळण्यात आला आहे. लहान शक्ती लहान असल्यामुळे तिला शिक्षेची भीती वाटत नाही, त्यामुळे ती जे साहस करू शकते ते मोठी शक्ती करू शकत नाही. परोपकाराच्या भावनेबद्दल आणि रोमन कॅथॉलिक चर्चबरोबरच्या मैत्रीबद्दल

पोर्तुगाल मोठा टेंभा मिरवत असतो. त्याला मनुष्य आणि ईश्वरासमोर आपल्या वर्तनाचा न्यायीपणा सिद्ध करावा लागेल. निर्दोषांचे रक्त.... जिवंत व्यक्तीत कितीही मोठी वक्तृत्वशक्ती असली तरी, थडग्यातून वा भस्मातून किंचाळून ओरडल्याशिवाय राहणार नाही. त्यांच्यात जिवंत व्यक्तींच्या वाणीपेक्षा अधिक शक्ती असते. (हरि, १-९-१९४६, पृ. २८६)

## (आ) फ्रेंच भारत

....साम्राज्यवादाचे हात नेहमीच रक्तरंजित असतात. महान अशोकाप्रमाणे साम्राज्यवादी शक्ती जितक्या लवकर आपल्या साम्राज्यवादाचा त्याग करतील तितकेच या कण्हणा-या जगाकरिता चांगले होईल. परंतु फ्रान्स प्रशंसनीय आहे म्हणून त्याची प्रशंसा केली जाऊ शकते. फ्रेंच भारताची स्थिती याचे उदाहरण आहे.... (हरि, २४-८-१९४७, पृ. ३०५)

माझे निश्चित मत आहे की फ्रान्स अधिकृत प्रदेशातील भारतीय वेळ येताच भारताचे नागरिक बनतील. परंतु या क्षेत्रातील भारतीयांनी कायदा आपल्या हाती घेऊ नये. संवैधानिक उपाय त्यांच्या हातात आहेत आणि इंडोनेशियाला स्वातंत्र्य मिळवून देणारे आपले मुख्यमंत्रीही (पं. जवाहरलाल नेहरू) तुमच्यासोबत आहेत. फ्रान्सच्या ताब्यातील या दोन प्रदेशांकडे ते नक्कीच दुर्लक्ष करणार नाहीत. (हरि, २४-८-१९४७, पृ. २९५)

....अखेरीस फ्रेंच लोक फार महान आणि स्वातंत्र्यप्रेमी आहेत. भारताने, ज्याने आपले स्वातंत्र्य स्वतः मिळवले आहे, त्यांच्यावर कोणतेही दडपण आणू नये. (हरि, ३१-८-१९४७, पृ. २९८)

....माझा स्पष्ट सल्ला आहे की करोडो भारतवासी ब्रिटिशांच्या शासनातून आता मुक्त झालेले असल्यामुळे या लहानशा वस्त्यांमधील लोकांनाही आता पारतंत्र्यात राहण्याकरिता बळजबरी करण्यात येऊ नये. या लहान लहान वस्त्यांमधील लोकांची अवस्था उर्वरित भारतापेक्षा कमी प्रतीची असावी हे मी कधीही सहन करू शकणार नाही. मला आशा आहे की महान फ्रान्स राष्ट्र भारतात वा अन्यत्र काळ्या अथवा भु-या लोकांना दडपून ठेवण्याकरता कधीही सहकार्य देणार नाहीत. (हरि, १६-११-१९४७, पृ. ४१६)

# ७०. भारत आणि पाकिस्तान

## विभाजन इस्लाम विरोधी

माझे ठाम मत आहे की मुस्लीम लीगने जी पाकिस्तानची मागणी केली आहे ती इस्लामविरोधी आहे. यामुळे मी निःसंकोचपणे तिला पापपूर्ण म्हणतो.

इस्लाम मानवजातीच्या ऐक्याचा आणि बंधुभावाचा समर्थक आहे. तो मानवपरिवाराचे तुकडे करण्याच्या बाजूचा नाही. यामुळे जे लोक भारताला दोन युयुत्सू गटांमध्ये वाटू इच्छितात ते भारताचेही शत्रू आहेत आणि इस्लामचेही. (हरि, ६-१०-१९४६, पृ. ३३९)

## द्विराष्ट्र सिद्धान्त चुकीचा

भारतातील मुसलमान एक स्वतंत्र राष्ट्र आहेत याबाबतीत कदाचित काही युक्तिवाद करता येतील, परंतु जगात जितके धर्म आहेत तितकी राष्ट्रे आहेत असे मी कधीही ऐकले नाही. (हरि, ११-११-१९३९, पृ. ३३६)

'द्विराष्ट्र सिद्धान्त' चुकीचा आहे. भारतातील अधिकांश मुसलमानांनी एक तर स्वतः मुसलमान धर्माचा स्वीकार केला आहे वा धर्म परिवर्तन केलेल्या मुसलमानांचे ते वंशज आहेत. धर्म परिवर्तन करताच ते वेगळे राष्ट्र होत नाहीत. (हरि, ६-४-१९४०, पृ. ७६)

माझे नेहमीच मत राहिले आहे की हिंदू आणि मुसलमान यांच्यात कोणतेच अंतर नाही. त्यांच्या चालीरीतीत फरक असला तरी तेवढ्याकरिता ते वेगळे आहेत असे मानता येऊ शकत नाही. हे खरे आहे की ते वेगवेगळ्या धर्माचे अनुयायी आहेत, परंतु त्यांचे मूळ एकच आहे. (हरि, ९-११-१९४७, पृ. ४००)

## बळाचा वापर करून फाळणीला विरोध नाही

भारतातील मुसलमान जर खरोखरीच फाळणीचा आग्रह धरणार असतील तर अहिंसेचा पुजारी असल्यामुळे बळाचा वापर करून मी फाळणीचा प्रतिकार करणार नाही. परंतु राष्ट्राचे तुकडे करण्याचे स्वेच्छापूर्वक समर्थन मी कधीही करणार नाही. (हरि, १३-४-१९४०, पृ. ९२)

जीवनात मी अनेक तडजोडी केल्या आहेत, परंतु त्यांनी माझ्या ध्येयाजवळ

पोहोचण्याकरिता मला मदत केली आहे.... आता ईश्वराची इच्छा असेल तर मला माझी स्वप्ने तुटत असलेली पाहणे भाग पडणार आहे. (हरि, ४-५-१९४०, पृ. ११५)

....आठ कोटी मुसलमानांची हीच इच्छा असेल तर हिंसक वा अहिंसक विरोध केल्यानंतरही जगातील कोणतीही शक्ती फाळणी अडवू शकणार नाही. (हरि, ४-५-१९४०, पृ. ११७)

शक्तीच्या जोरावर पाकिस्तानला संपवणे म्हणजे स्वराज्य संपवणे होईल. (हरि, ५-१०-१९४७, पृ. ३५५)

जर सर्व शंकाकुशंका दूर करण्यात आल्या आणि शत्रुत्वाचे मैत्रीत आणि अविश्वासाचे विश्वासात परिवर्तन करण्यात आले तर पाकिस्तानचे, ज्याला मी एक वाईटपणा म्हणालो, विशुद्ध चांगुलपणात परिवर्तन होऊ शकेल.
(हरि, १३-७-१९४७, पृ. २३६)

**अल्पसंख्याकांचे संरक्षण**

मी अशा पाकिस्तानची कल्पना करू शकत नाही ज्यात मुसलमानेतर लोक शांततेत राहू शकणार नाहीत आणि ना अशा हिंदुस्तानची कल्पना करू शकतो ज्यात मुसलमान असुरक्षित असतील. (हरि, २७-४-१९४७, पृ. १२३)

याच उद्दिष्टाच्या पूर्ततेकरिता मी काम करतो आहे. प्रत्येक राज्यातील बहुसंख्य समाजाने स्वतः होऊन पुढे येऊन स्वातंत्र्याकरिता आवश्यक अशी परिस्थिती निर्माण करावी म्हणून मी प्रयत्न करतो आहे.
(हरि, १४-९-१९४७, पृ. ३२३)

अल्पसंख्याकांच्या सेवेकरिता मी स्वतःला समर्पित करून टाकावे असा आदेश माझी अहिंसा मला देत आहे. दोन्ही भागातील हिंदू आणि मुसलमान शांततेने राहणे सुरू करतील आणि आपसातील शत्रुत्व विसरतील तर ही गोष्ट एका नव्या जन्मासारखी असेल व त्यामुळे मला नवा जोम येईल. (हरि, ११-५-१९४७, पृ. १४६)

आपल्या येथील अल्पसंख्याकांना संरक्षण देणे - ज्यांची संपत्ती, अब्रू आणि प्राण हे बहुसंख्याकांच्या हातात आहेत - हे पाकिस्तानमधील बहुसंख्याक आणि त्याचप्रमाणे भारतातील बहुसंख्याक यांचे सर्वात मोठे कर्तव्य आहे....

प्रत्येक मुसलमानाला भारतातून बाहेर काढण्याचा आणि प्रत्येक हिंदूला व शिखाला पाकिस्तानमधून बाहेर काढण्याचा परिणाम होईल युद्ध आणि देशाचे कायमचे नुकसान. (हरि, २८-९-१९४७, पृ. ३५२)

### मतभेद दूर करण्याचा मार्ग : युद्ध नाही

भारत आणि पाकिस्तान यांनी आपले मतभेद आपसातील चर्चेने मिटवावे आणि त्यात यश येत नसेल तर लवादाच्या निर्णयाचा आधार घेण्यात यावा.
(हरि, ५-१०-१९४७, पृ. ३६३)

पाकिस्तानने आपले चुकीचे धोरण कायम ठेवले तर भारत आणि पाकिस्तान यांच्यामध्ये युद्ध होणे अपरिहार्य आहे. (हरि, २८-९-१९४७, पृ. ३४९)

भारत आणि पाकिस्तान यांच्यामध्ये सतत शत्रुत्व राहिले आणि त्यांच्यात युद्ध झाले तर या उपखंडातील दोन्ही प्रदेशांचा विनाश होईल व इतक्या अडचणींनंतर मिळालेल्या स्वातंत्र्याचा लवकरच लोप होऊन जाईल. तो दिवस पाहण्याकरिता मला जिवंत राहायचे नाही. (हरि, २८-९-१९४७, पृ. ३३९)

दोन्ही स्वतंत्र राष्ट्रांमध्ये युद्ध होऊ नये हे योग्य आहे. त्यांनी मित्रांप्रमाणे राहिले पाहिजे अन्यथा ते नष्ट होतील. दोघांनी जवळून सहकार्य करत काम केले पाहिजे. ही दोन्ही राष्ट्रे परस्परांपासून स्वतंत्र असली तरी यांच्यात अनेक गोष्टी समान आहेत. यांनी जर शत्रुत्वाची भावना कायम ठेवली तर यांच्यात कोणतेच साम्य उरणार नाही. जर यांच्यात खरी मैत्री राहिली तर दोन्ही राज्यात राहणारे लोक एकमेकांबद्दल निष्ठेने राहू शकतात. हे दोघेही एकाच राष्ट्रमंडळाचे सदस्य आहेत. असे असताना ते एकमेकांचे शत्रू कसे असू शकतात? (हरि, ५-१०-१९४७, पृ. ३५६)

## ७१. भारताचे ध्येय

### आत्मबळाचा आधार

भारताचे ध्येय इतर राष्ट्रांपेक्षा वेगळे आहे असा माझा अनुभव आहे. विश्वाचे धार्मिक नेतृत्व करण्याचे सामर्थ्य भारताजवळ आहे. त्याने जसे स्वतःहून आपले शुद्धीकरण केले आहे, तसे दुसरे उदाहरण जगात आढळत नाही. भारताला पोलादी शस्त्रांची गरज तेवढीशी नाही. दैवी शस्त्रांच्या आधारे त्याने आपला संघर्ष केला आणि गरज भासली तर आजही तो तसे करू शकतो. इतर राष्ट्रे पाशवी शक्तीच्या बाजूची आहेत. युरोपमध्ये सुरू असलेले भयानक युद्ध याच सत्याचा पुरावा आहे. आपल्या आत्मबलाने भारत सर्वांना जिंकू शकतो.

आत्मबळासमोर पशुबळ काहीच नाही असे सिद्ध करणारी अनेक उदाहरणे इतिहासात आहेत. याचे गुणगान कवींनी केले आहे आणि त्रिकालज्ञ लोकांनी

त्यासंबंधीच्या आपल्या अनुभवांचे वर्णन केले आहे. (स्पीरा, पृ. ४०५)

भारत भ्याडांचा देश नाही हे त्याच्या युद्धप्रिय जातीजमातींच्या - मग ते हिंदू असो, मुसलमान असो, शीख असो वा गुरखा असो - व्यक्तिगत शौर्याच्या आणि साहसाच्या वृत्तांतावरून सिद्ध होते. माझे म्हणणे आहे की भारताकरिता युद्धाची खुमखुमी ही नवीन गोष्ट आहे आणि विश्वविकासात त्याला एक उच्चतर भूमिका वठवावी लागणार असण्याची शक्यता आहे. भारताची नियती काय आहे ते अखेरीस काळच सांगू शकेल. (यंग, २२-६-१९२१, पृ. १९९)

मला ईश्वराचा साक्षात्कार हवा आहे. मला माहीत आहे की ईश्वर सत्य आहे. माझ्या दृष्टीने ईश्वराला जाणून घेण्याचे एकमेव निश्चित साधन अहिंसा म्हणजेच प्रेम आहे. मी भारताच्या स्वातंत्र्याकरिताच जगेन आणि त्याकरिताच मरेन कारण भारत हा त्या सत्याचाच भाग आहे. केवळ स्वतंत्र भारतच ईश्वराची आराधना करू शकतो.

माझी स्वदेशीची भावना मला शिकवते की मी भारतात राहणारा असल्यामुळे आणि त्याच्या संस्कृतीचा वारस असल्यामुळे त्याची सेवा करण्याची सर्वाधिक पात्रता माझ्यात आहे आणि माझ्या सेवेवर त्याचा सर्वात आधी अधिकार आहे. त्यामुळे मी भारताच्या स्वातंत्र्याकरिता प्रयत्नशील आहे.

परंतु माझे राष्ट्रप्रेम इतरांना वगळणारे नाही. यात इतर राष्ट्रांचे नुकसान करण्याचा विचार तर नाहीच नाही, उलट ख-या अर्थाने सर्वांचे कल्याण करण्याच्या भावनेचाही त्यात समावेश आहे. भारताच्या स्वातंत्र्याची माझी जी संकल्पना आहे तिच्याप्रमाणे ते स्वातंत्र्य जगाला त्रासदायक असल्याचे कधीही सिद्ध होणार नाही. (यंग, ३-४-१९२४, पृ. १०९)

पश्चिमेच्या रक्तरंजित मार्गावर चालणे, ही भारताची नियती नाही. या मार्गावरून चालताना आधीच पश्चिम थकली आहे. भारताला तर शांततेच्या रक्तहीन मार्गावरून चालायचे आहे आणि साध्या आणि दैवी जीवनामुळेच असे करता येऊ शकते. भारतासमोर आपल्या आत्म्याच्या नाशाचे संकट आहे. त्याचा आत्मा राहिला नाही तर तोही जिवंत राहणार नाही. यामुळे 'मी पश्चिमेकडून येणा-या वा-याला अडवू शकत नाही.' असे त्याने आळसामुळे वा असहायतेच्या भावनेमुळे म्हणायला नको. आपल्या स्वतःकरिता आणि जगाकरिता या वा-याचा प्रतिकार करण्याचे सामर्थ्य त्याने दाखवलेच पाहिजे. (यंग,७-१०-१९२६, पृ.३४८)

भारतात अनादी काळापासून अहिंसेची अविच्छिन्न परंपरा आहे. परंतु माझ्या

माहितीप्रमाणे संपूर्ण देशात अहिंसेचे राज्य होते अशी वेळ कधीच आली नव्हती. तरीही मला खात्री वाटते की मानव जातीला अहिंसेचा शुभ संदेश सांगण्याचे कार्य भारतच करील. असे घडायला युगे लागू शकतात. परंतु माझ्या समजाप्रमाणे भारताच्या आधी हे काम कोणीही करू शकणार नाही.

(हरि, १२-१०-१९३५, पृ. २७६)

जगातील सर्व वंशांच्या लोकांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी भारतावरच आहे. भारतात जोपर्यंत अहिंसेच्या साम्राज्याची वाढ होणार नाही, तोपर्यंत भारत ही जबाबदारी पेलायला समर्थ होणार नाही. भारत ही जबाबदारी घेण्याकरिता समर्थ व्हावा म्हणून माझा संघर्ष अधिक व्यापक करण्याकरिता मी प्रयत्नशील आहे. जुलमाखाली दडपलेल्या आणि शोषित वंशांच्या लोकांकरिता भारत तेव्हाच प्रकाशस्तंभ बनू शकेल जेव्हा तो स्वतःच्या बाबतीत अहिंसेचा प्रत्यय आणून देईल व स्वातंत्र्य मिळताच अहिंसेचा त्याग करणार नाही. (हरि, १९-५-१९४६, पृ. १३४)

## कर्मभूमी

....भारत भोगभूमी नसून कर्मभूमी आहे. (यंग, ५-२-१९२५, पृ. ४५)

भारताची प्रत्येक गोष्ट मला आकर्षित करते. भारताजवळ ते सर्व काही आहे जे कोणत्याही माणसाला आपल्या उच्चतम आकांक्षांच्या पूर्तीकरिता आवश्यक आहे असे वाटत असते. (यंग, २१-२-१९२९, पृ. ६०)

## भारत आणि जग

युरोपच्या चरणासमोर झुकलेला भारत मानवतेकरिता आशेचा कोणताही किरण दाखवू शकत नाही. जागृत आणि स्वतंत्र भारतच कण्हत असलेल्या जगाला शांती आणि सद्भावनेचा संदेश देऊ शकेल. (यंग, १-६-१९२१, पृ. १७३)

मानवतेकरिता प्राणत्याग करण्याची तयारी करण्याआधी भारताला जगणे शिकावे लागेल. (यंग, १३-१०-१९२१, पृ. ३२६)

भारताच्या प्रयत्नांमुळे आंतरराष्ट्रीय प्रकरणे नैतिकतेवर आधारित असावी ही माझी किमान अपेक्षा आहे. (यंग, २६-१२-१९२४, पृ. ४२१)

सर्व जग लाभान्वित व्हावे म्हणून मला भारताचा अभ्युदय हवा आहे. भारताची निर्मिती इतर कोणत्या राष्ट्राच्या भग्नावशेषावर व्हावी अशी माझी इच्छा नाही. यामुळे भारत सुदृढ आणि समर्थ झाला तर तो सगळ्या जगाला आपल्या कलाकृतींची आणि स्वास्थ्यवर्धक मसाल्यांची निर्यात करील, परंतु अफू आणि

इतर मादक द्रव्यांच्या निर्यातीपासून कितीही धन मिळाले तरी त्यांच्या निर्यातीला तो नकार देईल. (यंग, १२-३-१९२५, पृ. ८८)

जगाच्या उन्नतीकरिता स्वेच्छेने स्वतःचा विशुद्ध बळी देण्याकरिता भारत स्वतंत्र आणि सुदृढ झालेला आहे हे मी पाहू इच्छितो. व्यक्ती शुद्ध असेल तर ती कुटुंबाकरिता आपला बळी देते, अशाच प्रकारे कुटुंब गावाकरिता, गाव जिल्ह्याकरिता, जिल्हा प्रांताकरिता, प्रांत राष्ट्राकरिता आणि राष्ट्र सर्वांच्या हिताकरिता आपला बळी देत असते. (यंग, १७-९-१९२५, पृ. ३२१)

मी नम्रतापूर्वक मान्य करतो की पश्चिमेकडील अनेक गोष्टी आत्मसात केल्यामुळे आपण लाभान्वित होऊ शकतो. बुद्धिमत्तेवर कोणत्याही एखाद्या खंडाचा वा वंशाचा एकाधिकार नसतो. पाश्चात्त्य संस्कृतीला वास्तवात माझा जो विरोध आहे तो पाश्चात्त्य संस्कृतीच्या सरसकट व आंधळेपणाच्या अनुकरणाला आहे. पश्चिमेकडून येणा-या गोष्टीची नक्कल करण्याची तेवढी पात्रता आशियावासीयांमध्ये आहे अशी धारणा या अनुकरणामागे आहे.

माझा विश्वास आहे की भारतात जर पीडेच्या अग्निपरीक्षेतून जाण्याचे धैर्य असेल आणि आपल्या अपूर्ण परंतु काळाच्या कसोटीवर उतरलेल्या संस्कृतीवरील कोणत्याही बेकायदेशीर आक्रमणाचा तो सामना करू शकत असेल, तर तो विश्वशांती आणि विश्वाची प्रगती यांच्याकरिता भरीव मदत करू शकेल. (यंग, ११-८-१९२७, पृ. २५३)

भारताचे ध्येय किती तरी उदात्त आहे, उदाहरणार्थ विश्वात मैत्री आणि शांतता यांची स्थापना. शांतता केवळ संमेलनांनी येत नाही. संमेलने होतच असतात आणि शांततेचा भंग होतच असतो हे आपण सर्वच पाहत असतो. (हरि, १७-११-१९४६, पृ. ४०४)

## सहिष्णुतेचा पाठ

सभ्यता आणि सहिष्णुता यांचे मूल्य तेव्हाच आहे जेव्हा कठीणाहून कठीण परिस्थितीतही या गोष्टी कायम राहतील. असे झाले नाही तर भारताकरिता ती खेदाची गोष्ट असेल.... (हरि, ५-१०-१९४७, पृ. ३५४)

संघराज्य (भारतीय) धर्माधारित हुकुमशाही राष्ट्र असेल काय व ते हिंदू धर्माचे सिद्धान्त इतर धर्मातील लोकांवर लादणार आहे काय? असे होईल असे मला वाटत नाही. परंतु असे झालेच तर भारत माझ्या आशेचा आणि विश्वासाचा देश

राहणार नाही. ज्याच्याकडे आशियायी आणि आफ्रिकी वंशीय लोकांनी आशेने पाहावे असा देश तो राहणार नाही.

जग भारताकडून क्षुद्रपणा आणि धर्मांधतेची अपेक्षा करत नाही.... ज्यामुळे जगाला आजच्या अंधःकारपूर्ण वातावरणात प्रकाशकिरण दिसू शकेल व काही शिकता येईल अशा महानतेची आणि चांगुलपणाची जगाला भारताकडून अपेक्षा आहे. (हरि, १६-११-१९४७, पृ. ४११)

भारत जेव्हा ख-या अर्थाने स्वतंत्र होईल तेव्हा तो अफगाणिस्तान, श्रीलंका, ब्रह्मदेश यांसारख्या शेजारी राष्ट्रांना संकटात मदत करण्याकरिता नक्कीच धावून जाईल. ही गोष्ट वरील तीन राष्ट्रांच्या शेजा-यांकरिताही लागू होते. याचा अर्थ तेसुद्धा भारताचे शेजारी आहेत. अशा रीतीने व्यक्तिगत बलिदान जर जिवंत बलिदान असेल तर ते संपूर्ण मानवतेला आपल्यामध्ये सामावून घेईल. (हरि, २३-३-१९४७, पृ. ७८)

### भारत आणि आशिया

भारताला अपयश मिळाले तर आशियाला कोणतेही भविष्य राहणार नाही. मिळत्याजुळत्या अनेक संस्कृतीची रोपवाटिका म्हणून भारताला संबोधले जाते आणि ते पूर्णपणे योग्य आहे. भारताला आशिया आफ्रिका आणि जगातील कोणत्याही भागातील शोषित वंशांच्या आशेचे केंद्र बनायचे आहे.
(हरि, ५-१०-१९४७, पृ. ३५४)

सर्व जगाचे डोळे भारताकडे लागलेले आहेत. त्याच्याकडे केवळ आशिया आणि आफ्रिकाच नाही तर सर्व जग अपेक्षेने पाहत आहे.
(हरि, २६-१०-१९४७, पृ. ८८)

## ७२. लोकशाहीचे सारतत्त्व

लोकशाही भावना काही यांत्रिक गोष्ट नाही की जी वाटेल त्या साच्यात बसू शकेल. तिच्याकरिता हृदयपरिवर्तन आवश्यक आहे.... तिच्याकरिता बंधुभावाच्या भावनेचा विकास जरुरी आहे.... (यंग, ८-१२-१९२०, पृ. ३)

थोडक्यात लोकशाहीचा अर्थ 'सर्वांच्या कल्याणाकरिता, सर्व वर्गांतील लोकांची सर्व भौतिक, आर्थिक आणि आध्यात्मिक संसाधने जुळवण्याची कला आणि विज्ञान', असा असला पाहिजे. (हरि, २७-५-१९३९, पृ. १४३)

## अनुशासन

स्वातंत्र्याच्या उच्चतम स्वरूपाकरिता अधिकाधिक अनुशासनाची आणि विनम्रतेची अपेक्षा असते. जे स्वातंत्र्य अनुशासन आणि विनम्रतेतून निर्माण होते ते हिरावून घेतले जाऊ शकत नाही; अनियंत्रित स्वेच्छाचार असभ्यपणाचे चिन्ह आहे. त्यामुळे व्यक्तीचीही हानी होते आणि तिच्या शेजा-यांचीही.
(यंग, ३-६-१९२६, पृ. २०३)

अनुशासित आणि सुजाण लोकशाही जगातील सर्वात चांगली गोष्ट आहे. पूर्वग्रह, अज्ञान आणि अंधविश्वास यांनी युक्त अशी लोकशाही अव्यवस्थेला जन्म देते व ती स्वतःचाच नाश करते. (यंग, ३०-७-१९३१, पृ. १९९)

## व्यक्तीची जबाबदारी

ख-या लोकशाहीत प्रत्येक स्त्री-पुरुषाला स्वतः विचार करण्याचे शिक्षण दिले जाते. दानाप्रमाणे प्रत्येक सुधारणेची सुरुवात स्वतःपासूनच केली पाहिजे, याशिवाय खरी क्रांती आणता येण्याचा दुसरा कोणताही मार्ग मला माहीत नाही.
(हरि, १४-७-१९४६, पृ. २२०)

लोकशाहीत व्यक्तीची इच्छा समाजाच्या इच्छेद्वारा, जिला राज्य म्हणतात, नियंत्रित आणि सीमित होत असते आणि राज्य लोकमताद्वारे नियंत्रित होत असते. प्रत्येक व्यक्ती जर कायदा आपल्या हातात घेईल तर राज्य नावाची गोष्ट राहणार नाही, अराजक पसरेल आणि याचा अर्थ सामाजिक कायद्याचा म्हणजे राज्याचा लोप. यामुळे अखेरीस स्वातंत्र्याचा नाश होतो. यामुळे तुम्ही तुमचा क्रोध ताब्यात ठेवला पाहिजे आणि न्यायदान करण्याचे काम राज्याला करू दिले पाहिजे.
(हरि, २८-९-१९४७, पृ. ३५०)

## कसोटी

जोपर्यंत व्यक्ती इतरांच्या जिवाला वा संपत्तीला हानी पोहोचवत नाही तोपर्यंत तिला हवे ते करण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे ही लोकशाहीची सर्वात मोठी कसोटी आहे. सार्वजनिक आचरण गुंडगिरीने नियंत्रित करता येणे अशक्य आहे.
(यंग, १-८-१९२०, पृ. ४)

सर्वात गरीब माणसाशी पूर्णपणे एकरूप होणे, त्याच्यापेक्षा चांगले जीवन जगण्याची अपेक्षा न ठेवणे आणि आपल्या संपूर्ण क्षमतेस त्याच्या पातळीवर

पोहोचण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करणे यांमुळे जर एखादी व्यक्ती लोकशाहीवादी म्हणवली जाऊ शकत असेल तर मला लोकशाहीवादी म्हणवून घेण्याचा अधिकार आहे. (बांक्रा, १८-९-१९३४)

जन्मजात लोकशाहीवादी जन्मजात अनुशासनप्रिय असतो. ज्या व्यक्तीचा स्वभावच स्वेच्छेने सर्व नियम पाळण्याचा असतो, मग ते नियम मानवनिर्मित असो वा दैवी, त्या व्यक्तीकरिता लोकशाही स्वाभाविक असते.... लोकशाहीची सेवा करण्याची ज्याची इच्छा असेल त्याने स्वतःला आधी ही कसोटी लावून पाहिली पाहिजे. अजून एक गोष्ट आहे, लोकशाहीवादी व्यक्तीने अतिशय निःस्वार्थी असले पाहिजे. त्याने स्वतःबद्दल वा स्वतःच्या पक्षाबद्दल विचार न करता केवळ लोकशाहीबद्दल विचार केला पाहिजे. अशा व्यक्तीलाच सविनय आज्ञाभंगाचा अधिकार असतो.

कोणत्याही व्यक्तीने आपल्या श्रद्धांचा त्याग करावा वा त्यांना दाबून ठेवावे अशी माझी इच्छा नाही. निरोगी आणि ख-या मतभेदांमुळे आपल्या ध्येयाची हानी होते असे मला वाटत नाही. परंतु संधीसाधूपणा, फसवणूक अथवा मनात नसताना केलेली तडजोड यांच्यामुळे मात्र लोकशाहीची हानी होते. जर तुम्ही एखाद्या गोष्टीबाबत सहमत नसाल तर लक्षात ठेवा की तुमची संमती तुमच्या अंतःकरणाचे प्रतिनिधित्व असली पाहिजे, सोयीस्कर पक्षीय घोषणांकरिता उपयोग करता यावा म्हणून ती नसावी. (हरि, २७-५-१९३९, पृ. १३६)

इतरांच्या हाती दो-या असलेली लोकशाही टिकू शकत नाही. ती केवळ विश्वासाच्या आधाराने टिकू शकते. (हरि, १६-११-१९४७, पृ. ४०९)

आपली वाढ व्हावी म्हणून भांडवल काही लोकांचे शोषण करत असते. करोडो लोकांच्या श्रमाची विचारपूर्वक बेरीज केली तर त्यामुळे करोडो लोकांच्या संपत्तीत वृद्धी करता येऊ शकते. यातच खरी लोकशाही, खरे पंचायत राज्य समाविष्ट आहे. (हरि, २८-१२-१९४७, पृ. ४८८)

## लोकशाहीत प्रतिनिधित्व

प्रतिनिधींची संख्या जास्त असली तर कामकाज चांगले होऊ शकते वा लोकशाहीच्या सिद्धान्ताचे चांगले रक्षण होऊ शकते ही धारणा पूर्णपणे चुकीची आहे असे माझे मत आहे. कसे तरी निवडून आलेल्या सहा हजार बेजबाबदार प्रतिनिधींपेक्षा लोकशाहीकरिता दक्ष असलेले, उदार मनाचे आणि

सत्याची चाड असलेले पंधराशे प्रतिनिधी लोकशाहीचे अधिक चांगले रक्षण करू शकतील. लोकशाहीच्या रक्षणाकरिता लोकांमध्ये स्वातंत्र्य, स्वाभिमान आणि ऐक्याची भावना उत्कट असली पाहिजे आणि जे लोक सज्जन आणि सत्यनिष्ठ असतील त्यांनाच त्यांनी निवडले पाहिजे. (ए, पृ. ३६९)

लोकांच्या प्रतिनिधींची संख्या कमी असली तरी प्रतिनिधींमध्ये लोकांच्या भावना आणि आकांक्षा यांचे प्रतिनिधित्व करण्याची इच्छा असेल तर त्यामुळे ख-या लोकशाहीचे कोणतेच नुकसान होत नाही. माझे मत आहे की बळजबरी करून लोकशाहीचा विकास होऊ शकत नाही. तो आतून उमलला पाहिजे. (बांक्रा, १८-९-१९३४)

लोकशाहीचे सार हेच आहे की प्रत्येक व्यक्तीने राष्ट्राच्या वेगवेगळ्या हितसंबंधांचे प्रतिनिधित्व केले पाहिजे. हे खरे आहे की हिच्यात विशेष हितसंबंधांकरिता विशेष प्रतिनिधित्वाला कोणतीही मनाई नाही आणि असायलाही नको. परंतु असे प्रतिनिधित्व लोकशाहीची कसोटी नाही. ते तिच्या अपूर्णतेचे चिन्ह आहे.... (हरि, २२-४-१९३९, पृ. ९९)

भारताच्या ख-या लोकशाहीत प्रत्येक गावाला एक घटक मानले जाईल.... खरी लोकशाही केंद्रात बसलेल्या वीस लोकांद्वारे चालवली जाणार नाही. तिचे संचालन खालून म्हणजे प्रत्येक गावातील लोक करतील. (हरि, १८-१-१९४८, पृ. ५१९)

....हे खरे आहे की सामान्यपणे लोकांचा एखाद्या विशेष गोष्टीवर विश्वास असेल आणि त्यांना ती हवी असेल तर ती वास्तवात आणण्याच्या बाबतीत लोकशाहीत भ्याडपणाला कोणतेही स्थान नसते. जनतेच्या प्रतिनिधींनी जनतेच्या मागणीला योग्य स्वरूप देऊन तिच्या पूर्तीचा उपाय अवश्य केला पाहिजे. जनतेची मानसिक प्रवृत्ती अनुकूल असली तर संघर्षात मोठी मदत होत असल्याचे आढळून आले आहे. (हरि, १८-१-१९४८, पृ. ५१८)

**जनता**

जनतेचा आवाज ईश्वराचा म्हणजे पंचायतीचा आवाज आहे असे मानले जाऊ शकते. परंतु जिथे लोक स्वतःच शोषक असतील तिथे त्यांचा आवाज हा ईश्वराचा आवाज कसा असेल....? लोकांचा आवाज ईश्वराचा आवाज असेल तर तो पक्षीय हिताच्या वर असला पाहिजे. ईश्वर प्रत्येक मुद्द्याला सत्य आणि

अहिंसेच्या तराजूत ठेवून निष्पक्ष न्याय करील. (हरि, २९-९-१९४६, पृ. ३३२)

मी असंख्य वेळा सांगितले आहे की राष्ट्रकार्य करण्याकरिता राष्ट्रीय कार्यकर्त्यांजवळ राजकीय शक्ती असण्याची गरज नाही, परंतु लोक ज्यांच्या हाती सत्ता देतील त्यांच्याबरोबर त्यांचा नित्य संपर्क असणे आवश्यक आहे. असे लोक मोजकेच असतात. परंतु जनता जर आपली शक्ती ओळखेल व तिचा बुद्धिमत्तापूर्वक चांगल्या पद्धतीने उपयोग करेल तर सर्व गोष्टी आपोआप ठीक होतील. (हरि, १४-९-१९४७, पृ. ३२१)

लोकशाहीत सरकार काही चूक करत असेल, तर त्या चुकीकडे सरकारचे लक्ष वेधूनच लोकांनी स्वस्थ बसले पाहिजे. त्यांची इच्छा असेल, तर ते सरकार बदलू शकतात. परंतु लोकांनी सरकारच्या कामात अडथळे आणता कामा नये. आपले सरकार काही विदेशी सरकार नाही की ज्याच्याजवळ मदतीकरिता शक्तिशाली सैन्य आणि आरमार असेल. त्याला तर आपली शक्ती जनतेकडूनच मिळवावी लागते. (हरि, २६-१०-१९४७, पृ. ३८२)

लोकशाहीत जनतेची इच्छाच महत्त्वाची असते....
(हरि, १४-१२-१९४७, पृ.४७१)

बहुतांश लोक स्वार्थी आणि अविश्वसनीय असतील तर लोकशाही म्हणजेच पंचायत राज कसे चालू शकेल? (हरि, २८-१२-१९४७, पृ. ४८६)

**बहुसंख्यांक आणि अल्पसंख्यांक**

विवेकाच्या बाबतीत बहुसंख्येच्या नियमाला कोणतेही स्थान नसते.
(यंग, ४-८-१९२०, पृ. ४)

जनादेशाच्या सिद्धान्ताला आपण हास्यास्पदतेच्या सीमेपर्यंत ताणू नये आणि बहुसंख्यांकांच्या ठरावाचे आपण गुलाम बनू नये. पाशवी शक्तीचे ते अजूनच जोमदार स्वरूपातील पुनरुज्जीवन असेल. अल्पसंख्यांकांच्या अधिकारांचे जर पुनरुज्जीवन करायचे असेल तर बहुसंख्यांकांनी त्यांच्या मताचा आदर केला पाहिजे व त्यानुसार होणारी कारवाई सहन केली पाहिजे.... अल्पसंख्यांकांचे म्हणणे नीटपणे ऐकून घेतले जाते आणि त्यांना कोणत्याही रूपाने अपमानित करण्यात येत नाही, हे पाहणे बहुसंख्यांकांचे काम आहे.
(यंग, ८-१२-१९२१, पृ. ४०३)

आपल्याला जर आपले म्हणणे स्वतंत्रपणे आणि जाहीरपणे मांडण्याचा व

त्यानुसार कार्य करण्याचा अधिकार हवा असेल तर तसाच अधिकार आपण इतरांनाही दिला पाहिजे. बहुसंख्यांकांचे शासन जेव्हा जुलमी होते तेव्हा ते अल्पसंख्यांक नोकरशाहीप्रमाणेच असह्य होते. प्रेमाने समजावून सांगून आणि तर्काचा उपयोग करून अल्पसंख्यांकांना आपण आपला दृष्टिकोन पटवून दिला पाहिजे. (यंग, २६-१-१९२२, पृ. १२९)

बहुसंख्येच्या शासनाच्या नियमाच्या अंमलबजावणीची सीमा फार अरुंद आहे. ती सीमा अशी आहे की, सविस्तर माहितीच्या बाबतीत आपण बहुमताचे म्हणणे ऐकले पाहिजे. परंतु बहुमत जो निर्णय घेईल तो मान्य करणे गुलामगिरी आहे.... लोकमत म्हणजे शेळ्या-मेंढ्यांप्रमाणे कळपाने चालणे नाही. लोकशाहीत मत व्यक्त करण्याचे आणि कार्य करण्याचे व्यक्तिगत स्वातंत्र्य यांचे काळजीपूर्वक रक्षण केले पाहिजे. यामुळे अल्पसंख्यांकांना बहुसंख्यांकांपेक्षा वेगळ्या दिशेने मत व्यक्त करण्याचा पूर्ण अधिकार आहे असे माझे मत आहे. (यंग, २-३-१९२२, पृ. १२९)

जिवंत श्रद्धेची रचना बहुमताच्या नियमाने करता येऊ शकत नाही. (यंग, १६-३-१९२२, पृ. १६१)

**असहिष्णुता**

आपल्याला लोकशाहीच्या ख-या भावनेचा विकास करायचा असेल तर आपण असहिष्णू व्हायला नको. आपली आपल्या ध्येयावर पूर्ण निष्ठा नसल्याचे चिन्ह असहिष्णुता आहे. (यंग, २-२-१९२१, पृ. ३३)

निर्णय घेण्याचा अधिकार केवळ आपलाच आहे असा दावा कोणत्याही विचारसंप्रदायाला करता येऊ शकत नाही हे मी वारंवार सांगितले आहे. आपणा सर्वांकडूनच चुका होऊ शकतात आणि आपण घेतलेल्या निर्णयामध्ये आपल्याला फेरबदल करावा लागू शकतो. आपल्यासारख्या विशाल देशात प्रामाणिक विचार सांगणा-या सर्व संप्रदायांना स्थान असले पाहिजे. यामुळेच आपण विरोधकाचा दृष्टिकोन समजून घेण्याचा प्रयत्न करावा आणि तो मान्य जरी झाला नाही तरी आपल्या दृष्टिकोनाचाही जसा सन्मान केला जावा असे आपल्याला वाटत असते तसाच सन्मान विरोधकाच्या दृष्टिकोनाचाही करणे हे आपले स्वतःचे आणि इतरांचेही किमान कर्तव्य आहे. निरोगी सार्वजनिक जीवनाची ही अपरिहार्य कसोटी आहे व त्यामुळे स्वराज्याकरिताही ती आवश्यक आहे.

आपल्यामध्ये जर उदारपणा आणि सहिष्णुता नसेल तर आपण शांततापूर्वक

आपले मतभेद कधीही दूर करू शकणार नाही आणि त्यामुळे आपल्याला नेहमी लवादाकरिता तिस-या पक्षाकडे म्हणजे विदेशी शक्तीच्या तोंडाकडे पाहावे लागेल. (यंग, १७-४-१९२४, पृ. १३०)

असहिष्णुता, उद्धटपणा आणि कठोरपणा.... सर्वच चांगल्या समाजात वर्ज्य असतात आणि निःसंदिग्धपणे या गोष्टी लोकशाहीच्या भावनेच्या विरोधात आहेत. (हरि, १४-८-१९३७, पृ. २०९)

आपण जर दुस-या पक्षाचे म्हणणे समजून घ्यायला तयार नसू तर लोकशाहीचा विकास होऊ शकणार नाही. आपण आपल्या विरोधकाचे म्हणणे ऐकून घ्यायला नकार दिला वा ते ऐकून घेतल्यानंतर त्यांची टर उडवली तर आपण तर्काचे दार बंद करतो. असहिष्णुतेची जर आपल्याला सवय लागली तर आपल्या हातातून सत्य निसटून जाण्याचा धोका निर्माण होतो. एकीकडे जिथे ईश्वरापासून मिळालेल्या प्रकाशाचा आपल्या सीमित बुद्धीद्वारे अर्थ लावून आपल्याला त्याची निर्भयपणे अंमलबजावणी करायची असते तिथेच आपण नेहमी या गोष्टीकरिता तयार राहिले पाहिजे की ज्याला आपण सत्य समजतो ते अखेरीस सत्यच नसू शकते. मनाचा मोकळेपणा आपल्यामधील सत्याला दृढ करतो व त्यात काही दोष असला तर तो काढून टाकतो. (हरि, ३१-५-१९४२, पृ. १७२)

## संख्या नाही, गुणवत्ता

परिमाण काहीही असले तरी त्यापेक्षा मी गुणवत्तेला जास्त महत्त्व देतो.... संशय, भांडण, परस्परविरोधी हितसंबंध, अंधविश्वास, भीती, अविश्वास इत्यादी असताना संख्येत काहीही संरक्षण नसते उलट धोका असतो.... अनुशासनामुळे एकत्र होऊन जेव्हा लोक कारवाई करतात तेव्हा त्यांना दाबून ठेवणे कठीण होत असते. परंतु प्रत्येक व्यक्ती आपापला वेगळाच सूर काढते अथवा कुणीकडे जायचे आहे, हे कोणालाच कळत नसते तेव्हा जनशक्ती स्वतःचाच सर्वनाश करून घेते. (यंग, १३-८-१९२५, पृ. १५२)

मी उमेदवाराला एवढेच विचारीन की 'तुमच्यात किती पुरुषत्व वा स्त्रीत्व आहे?' 'काळानुरूप स्वतःत बदल करण्याची तुमच्यात क्षमता आहे काय?' या कसोटीवर जे टिकतील त्यातून सर्वात मागसवर्गीय उमेदवाराला मी मत देईन. अशा प्रकारे भारताचे हित लक्षात ठेवत मी सर्व अल्पसंख्यांकांना योग्य तो प्राधान्यक्रम देईन.... भारताच्या हिताचा अर्थ आहे संपूर्ण भारताचे हित, केवळ हिंदू वा मुसलमान वा

एखाद्या इतर विशिष्ट जमातीचे हित नाही. (यंग, १३-८-१९२५, पृ. २७८)

तुम्ही संख्येने अल्पमतात आहात या विचाराने तुम्ही घाबरू नका असे मी तुम्हाला सांगत असतो. काही वेळेस तर ही विशेषाधिकाराची स्थिती असते. माझ्याबद्दलच्या आदरामुळे माझ्यामागे जे कृत्रिम बहुमत दिसते आहे, त्यामुळे माझी प्रगती अवरुद्ध होते. म्हणूनच मी बहुधा म्हणत असतो की मी एकटाच उरेन इतक्या अल्पमतात आलो तर मला फार चांगले वाटेल. तो अडथळा नसता तर मी निश्चिंतपणे सविनय आज्ञाभंग केला असता....(यंग, १३-८-१९२५, पृ. २७९)

अहिंसेवर ठाम विश्वास असण्याचा हा अर्थ नक्कीच आहे की, अल्पसंख्यांक खरोखरच कमजोर असतील तर मी त्यांचे म्हणणे ऐकेन. समुदायाला सर्वात दुबळे बनवण्याचा मार्ग त्याचे म्हणणे ऐकत जाणे हा आहे. प्रतिकारामुळे त्यांच्या मनात केवळ संशय निर्माण होईल आणि त्यांच्या विरोधाची ताकद वाढत जाईल. (यंग, २-७-१९३१, पृ. १६२)

**लोकमत**

लोकमतच एखाद्या समाजाला शुद्ध आणि निरोगी ठेवू शकते. (यंग, १-१२-१९२०, पृ.४)

कोणतेही लोकप्रिय सरकार लोकमताच्या पलीकडे जाऊन कार्यवाही करू शकत नाही. ते जर लोकमताविरुद्ध जाईल तर ते नष्ट होईल. (हरि, ३०-७-१९३१, पृ. १९९)

निरोगी, तथ्यावर आधारित संतुलित टीका सार्वजनिक जीवनाचा ओझोन आहे. (हरि, १३-११-१९३७, पृ. ३३२)

लोकशाही तर केवळ सरासरीपेक्षा कमीचे जरी नाही तरी सरासरीचेच प्रतिनिधित्व करू शकते. यामुळे तळागाळाच्या लोकांच्या सर्व प्रकारच्या शिक्षणाकडे जेव्हा लोकशाही लक्ष देईल तेव्हाच ती शुद्ध राहू शकेल. तिने सर्व प्रकारचे अंधविश्वास आणि सामाजिक अपप्रवृत्ती दूर केल्या पाहिजेत. अशा समाजात ना कोणी ख्रिश्चन असेल ना ख्रिश्चनेतर; स्त्री-पुरुष भेदही तिथे नाहीसा होईल. (हरि, ५-५-१९४६, पृ. १२४)

लोकशाही नीट चालण्याकरिता केवळ तथ्यांच्या ज्ञानाची नाही तर योग्य शिक्षणाची गरज असते. हरि, (२९-९-१९४६, पृ. ३३४)

निरोगी लोकमताचा काय परिणाम होतो ते अजून आपल्याला पूर्णपणे कळू

शकलेले नाही.... लोकमत जेव्हा हिंसक आणि आक्रमक होते तेव्हा ते असह्य होते. (यंग, ७-५-१९३१, पृ. १०३)

लोकशाहीजवळ एकच शक्ती आहे व ती म्हणजे लोकमताची. सत्याग्रह, सविनय आज्ञाभंग आणि उपवास यांच्यात आणि बलप्रयोगात काहीही साम्य नाही. परंतु लोकशाहीत यांचाही मर्यादित उपयोग असतो. (हरि, ७-९-१९४७, पृ. २०८)

## कायदे करणे

लोकमताच्या पुढे गेलेला कायदा निरुपयोगी असण्यापेक्षा बहुधा अतिशय वाईटच ठरण्याची शक्यता असते. लोकमत त्वरित तयार करण्याचा उपाय असहकार आहे. (यंग, २९-९-१९२१ पृ. २०८)

लोकशाहीत कायदा तयार करण्याआधी धैर्याने त्याची माहिती लोकांना देणे आवश्यक असते. (हरि, १६-६-१९४६, पृ. १८१)

## राजकीय कार्य

....मला राजकारणात येणे भाग पडले कारण राजकारणाच्या स्पर्शाशिवाय सामाजिक कार्य करता येणे शक्य नाही असे मला आढळून आले. राजकीय कार्याकडे सामाजिक आणि नैतिक प्रगतीच्या संदर्भात पाहिले पाहिजे, असे मला जाणवले. लोकशाहीत जीवनाचा कोणताही भाग राजकारणाच्या स्पर्शापासून वेगळा राहू शकत नाही. (हरि, ६-१०-१९४६, पृ. ३४१)

## सत्तेचा स्वभाव

सत्ता मिळाल्यानंतर माणूस आंधळा बहिरा होतो. आपल्या अगदी नाकाखाली होणा-या गोष्टीही त्याला दिसत नाहीत आणि कानावर आदळणारे शब्दही त्याला ऐकू येत नाहीत. यामुळे सत्तेची धुंदी चढलेले सरकार काय करून बसेल हे काहीही सांगता येऊ शकत नसल्यामुळे देशावर प्रेम करणा-यांनी मृत्यू, तुरुंगवास आणि अशाच प्रकारच्या इतर घटनांकरिता तयार राहिले पाहिजे.
(यंग, १३-१०-१९२१, पृ. ३२७)

निष्ठापूर्वक सेवा केल्यामुळे जी शक्ती मिळते ती माणसाचे उदात्तीकरण करते. परंतु सेवेच्या नावाने मिळवलेली सत्ता आणि केवळ बहुमताच्या बळावर मिळवलेली सत्ता हा भ्रम आहे आणि तिच्या मोहपाशातून वाचले पाहिजे....
(यंग, ११-९-१९२४, पृ.३०१)

सत्ता दोन प्रकारची असते. एक ती जी शिक्षेच्या भीतीने मिळवली जाते आणि दुसरी ती जी प्रेम करण्याच्या कलेने मिळते. प्रेमावर आधारित सत्ता शिक्षेच्या भीतीतून निर्माण झालेल्या सत्तेपेक्षा हजारपट अधिक प्रभावी आणि टिकाऊ असते. (यंग, ८-१-१९२५, पृ. १५)

माझ्या दृष्टीने राजकीय सत्ता हे काही अंतिम ध्येय असू शकत नाही. उलटपक्षी ती जीवनातील सर्व क्षेत्रातील लोकांची परिस्थिती सुधारण्याचे केवळ एक साधन आहे. राजकीय सत्तेचा अर्थ आहे राष्ट्रीय प्रतिनिधित्वाद्वारे राष्ट्रीय जीवनाला शिस्त लावण्याचा प्रयत्न. स्वतःचे नियंत्रण स्वतः करू शकण्याएवढे राष्ट्रीय जीवन जर परिपूर्ण झाले तर मग कोणत्याही प्रतिनिधित्वाची आवश्यकता राहणार नाही. तेव्हा त्या स्थितीला विवेकी अराजकाची स्थिती असे म्हणता येईल. या स्थितीत प्रत्येक व्यक्ती स्वतःची शासक असते. शेजा-याच्या प्रगतीच्या आड आपण कधीही येणार नाही अशा प्रकारे ती स्वतःवर नियंत्रण ठेवत असते. यामुळे आदर्श राज्यात राजकीय सत्ता नावाची कोणतीही गोष्ट नसते, कारण तिथे राज्य नावाच्या गोष्टीचेच अस्तित्व नसते. परंतु जीवनात आदर्शाची पूर्णपणे प्राप्ती कधीही होऊ शकत नाही. थोरोचे सुभाषित आहे की ‘सर्वात चांगले शासन ते असते जे किमान शासन करते’. (यंग, २-७-१९३१, पृ. १६२)

वरून लादलेल्या सत्तेला जिथे पोलीस आणि सैन्याच्या मदतीची गरज असते तिथेच आतून निर्माण झालेल्या सत्तेकरिता यांचा काहीही उपयोग नसतो वा असलाच तरी तो नाममात्र असतो. (हरि, ४-९-१९३७, पृ. २३३)

लोकशाही तोपर्यंत शक्य नाही जोपर्यंत सगळ्यांची सत्तेत भागीदारी नसेल, परंतु लोकशाहीचे रूपांतर जमावशाहीत होईल इतके लोकशाहीचे पतन होऊ देऊ नये. स्वशासनात अस्पृश्य आणि मजुरांचीही, ज्यांच्या बळावर तुम्ही कमाई करता, भागीदारी असली पाहिजे. परंतु तुम्हाला त्यांच्या संपर्कात यावे लागेल, ज्या झोपड्यांमध्ये ते शेळ्या-मेंढ्यांप्रमाणे राहतात, त्या झोपड्यांत जाऊन तुम्हाला पाहावे लागेल. मानवतेच्या या भागाची काळजी घेण्याची जबाबदारी तुमची आहे. त्यांचे जीवन बनवणे वा बिघडवणे तुमच्या हाती आहे. (यंग, १-१२-१९२७, पृ. ४०४)

अशी कोणतीही मानवी संस्था नाही जी धोक्यांपासून मुक्त असेल. जेवढी मोठी संख्या तितकाच तिच्या दुरुपयोगाचा धोका. लोकशाही एक महान संस्था आहे, यामुळेच तिचा फार मोठा दुरुपयोग होऊ शकतो. याचा अर्थ आपण लोकशाही टाळावी असा होत नसून तिच्या दुरुपयोगाची शक्यता शक्यतोवर कमी करण्याचा

प्रयत्न करावा असा आहे. (यंग, ७-५-१९३१, पृ. ९९)

....जेव्हा लोकांना राजकीय सत्ता मिळते तेव्हा लोकांच्या स्वातंत्र्यातील हस्तक्षेप किमान होतो. वेगळ्या शब्दांत ज्या राष्ट्रात शासनाच्या हस्तक्षेपाशिवाय सर्व कामे नीट आणि प्रभावीपणे चालतात ते राष्ट्र ख-या अर्थाने लोकशाहीवादी असते, जिथे अशी परिस्थिती नसते तिथे लोकशाही नावापुरती असते. (हरि, ११-१-१९३६, पृ. ३८०)

## हुकूमशाही

अनेक व्यक्तींवर एका व्यक्तीचे शासन ही गोष्ट असह्य आहे. हे संपले पाहिजे. प्रश्न आहे 'कसे'? मार्ग हा आहे की लोकांनी जगायला सुरुवात करावी. एखाद्या शासकाचा शिरच्छेद करणे सोपी गोष्ट आहे. रावणाची गोष्ट आठवा. त्याला दहा डोकी होती. एक डोके कापताच त्या ठिकाणी दुसरे डोके निघायचे. जनता जागृत असेल तर डोके कापायची गरजच पडत नाही हा धडा यातून मिळतो. (हरि, ६-१०-१९४६, पृ. ३४१)

लोकांचे, लोकांकरिता आणि लोकांद्वारे शासन कोणत्याही एका व्यक्तीद्वारे चालवता येऊ शकत नाही, मग ती व्यक्ती कितीही महान का असेना. (हरि,१४-४-१९४७,पृ.३२०)

व्यक्तिगत रूपाने शासनाच्या कोपाची मी तितकी फिकीर करत नाही जितकी जमावाच्या कोपाची करतो. जमावाचा कोप राष्ट्रीय असमाधानाचे चिन्ह असते त्यामुळे शासनापेक्षा, जी लहानशी व्यवस्था असते, जमावाचा सामना करणे कठीण असते. ज्या सरकारमध्ये शासन करण्याची क्षमता राहत नाही त्याला पदावरून काढता येणे सोपे आहे. परंतु उन्मत्त अडाणी जनतेवर इलाज करणे कठीण असते. (यंग, २८-७-१९२०, पृ. ३)

## झुंडशाही

....जमावाजवळ कोणतीही बुद्धी वा पूर्वचिंतन नसल्यामुळे त्याला प्रशिक्षित करण्याइतके दुसरे कोणतेही सोपे काम नसते. तो तर उन्मादाच्या भरात काम करत असतो. त्याला पश्चात्तापही फार लवकर होतो.... लोकशाहीचा विकास करण्याकरिता मी असहकाराच्या अस्त्राचा उपयोग करतो आहे. (यंग, ८-९-१९२०, पृ. ५)

....ज्यांची अंतःकरणे निर्मळ आहेत, ज्यांना देशाची जाणीव आहे व

आपल्याला कोणी तरी शिकवावे आणि आपले नेतृत्व करावे असे ज्यांना वाटते त्या जनसमूहाला आपल्याला प्रशिक्षित करायचे आहे. हुशार, प्रामाणिक असे थोडेसे स्थानिक कार्यकर्ते मिळाले तर संपूर्ण राष्ट्राला बुद्धिमत्तापूर्वक काम करण्याकरिता संघटित करता येऊ शकते आणि झुंडशाहीतून लोकशाही विकसित करता येऊ शकते. (यंग, २२-९-१९२०, पृ. ३)

लोकशाहीवादी संघटनेत कोणत्याही परिस्थितीत योग्य पाऊल उचलण्याचे धैर्य असले पाहिजे. जी व्यक्ती लोकांच्या उणिवांना उत्तेजन देते ती स्वतःचा आणि लोकांचाही अधःपात करते आणि ती त्यांना लोकशाहीकडे न नेता झुंडशाहीकडे घेऊन जाते. लोकशाही आणि झुंडशाही यांतील विभाजक रेषा अनेकदा अतिशय सूक्ष्म असते, परंतु ती पोलादापेक्षाही अतिशय मजबूत असते.

लोकशाही जीवन आणि प्रगती यांच्याकडे घेऊन जाते तर झुंडशाही शुद्ध मृत्यूकडे. आपल्या अधःपाताचे कारण शेवटी आपल्याला स्वतःमध्येच शोधावे लागतो, बाहेर नाही. आपण लोक जर संशय आणि प्रलोभन यांना बळी पडलो नसतो तर जगातील सगळी साम्राज्य एकत्र येऊनही आपल्याला गुलाम करू शकली नसती. हे तर आम्ही रोजच ऐकत असतो असे म्हणून ही गोष्ट सोडून देण्यात येऊ नये. आपण जर मूलभूत तथ्य समजून घेतले तर आपण सत्य आणि धैर्याने व्यवहार करू शकू व आतून वा बाहेरून येणा-या प्रत्येक अडचणीचा सामना करू शकू. (हरि, ३१-३-१९४६, पृ. ६६)

**लष्करशाही**

....सैन्य व पोलीस यांच्यावर अवलंबून राहणे व लोकशाही यात काहीही सुसंगती नाही. ही गोष्ट एका ठिकाणी बरोबर आहे आणि दुस-या ठिकाणी चूक असे तुम्ही म्हणू शकत नाही. सैन्याच्या मदतीमुळे तुमची अवनती होईल. लोकशाहीत मतदार जर एखाद्या गुंडाला शासनाध्यक्ष निवडतील तर मतदारांना एक तर आपल्या वर्तनाचे दुष्परिणाम भोगावे लागतील वा गरज पडली तर मतदारांमध्ये सत्याग्रहाद्वारे परिवर्तन घडवून आणावे लागेल. हीच लोकशाही आहे.
(हरि, १२-४-१९४७, पृ. ४८८-९)

लोकशाही आणि सैन्यभावना यांना मी परस्पर विरोधी मानतो. लोकशाहीवादी व्यक्ती जगासमोर आपल्या राज्यातील शस्त्रांचे प्रदर्शन करून त्या शस्त्रांच्या बळावर विसंबून राहत नसते. ती आपल्या नैतिक बळावर अवलंबून राहत असते

व ते जगाच्या कल्याणार्थ केव्हाही उपलब्ध असते. (हरि, १३-७-१९४७, पृ. २३३)

शासकीय वा लोकप्रिय आतंकवादाच्या वातावरणात लोकशाहीची भावना विकसित करता येऊ शकत नाही. अनेक प्रकरणी सरकारी आतंकवादाच्या तुलनेत लोकांच्या प्रेरणेतून निर्माण झालेला आतंकवाद लोकशाहीच्या भावनेचा प्रखर विरोधी असल्याचे आढळून येते. याचे कारण असे आहे की सरकारी आतंकवाद लोकशाहीला सुदृढ करतो, तर जनप्रेरित आतंकवाद तिला नष्ट करतो. (यंग, २३-२-१९२१, पृ. ५९)

## लोकशाही आणि अहिंसा

लोकशाही आणि हिंसा सोबत चालू शकत नाहीत. ज्या राज्यांमध्ये आज नावापुरती लोकशाही आहे त्यांनी एक तर उघडपणे हुकूमशाही स्वीकारली पाहिजे वा त्यांना खरोखर लोकशाहीवादी बनायचे असेल तर त्यांनी अहिंसक रूप धारण केले पाहिजे. अहिंसेनुसार आचरण केवळ व्यक्तीच करू शकते राष्ट्र कधीच करू शकणार नाही असे म्हणणे पाखंडीपणाचे होईल कारण तेही व्यक्तींचे मिळूनच बनलेले असते. (हरि, १२-११-१९३८, पृ. ३२८)

खरा लोकशाहीवादी तो आहे जो विशुद्ध अहिंसक उपायांनी आपल्या स्वातंत्र्याचे व त्यामुळे आपल्या देशाच्या स्वातंत्र्याचे व अखेरीस संपूर्ण जगाच्या स्वातंत्र्याचे रक्षण करतो. (हरि, १५-४-१९३९, पृ. ९०)

खरी लोकशाही अथवा स्वराज्य खोट्या आणि हिंसक साधनांचा आधार घेऊन कधीही स्थापित केली जाऊ शकत नाही. या गोष्टींच्या उपयोगाचा स्वाभाविक उपपरिणाम असा होईल की तुम्हाला होत असलेला प्रत्येक प्रकारचा विरोध संपवण्याकरिता दमनचक्र चालवावे लागेल वा विरोधकांना हद्दपार करावे लागेल. याला आपण व्यक्तिगत स्वातंत्र्य म्हणू शकत नाही. व्यक्तिगत स्वातंत्र्य केवळ अहिंसेच्या विशुद्ध वातावरणात बहरू शकते. (हरि,२७-५-१९३९,पृ.१४३)

लोकशाहीची माझी संकल्पना अशी आहे की तिच्यात दुर्बलतम व्यक्तीलाही तीच संधी मिळाली पाहिजे जी सर्वात ताकदवान असलेल्या व्यक्तीला उपलब्ध असते. अहिंसेशिवाय इतर कोणत्याही पद्धतीने हे शक्य नाही. आज जगात एकही असा देश नाही जो दुर्बलांबद्दल आश्रयदात्याच्या भावनेशिवाय इतर कोणतीही भावना दर्शवत नाही.... पश्चिमेकडे आज ज्या प्रकारे लोकशाही चालवली जाते आहे त्या प्रकाराला आपण सौम्य नाझीवाद वा फॅसिस्टवाद असेच म्हणू शकतो.

अधिकात अधिक साम्राज्यवादाला वा नाझीवादाला वा फॅसिझमला झाकण्याचा तो प्रकार आहे असे म्हणता येईल..... (हरि, १८-५-१९४०, पृ. १२९)

माझा विश्वास आहे की खरी लोकशाही केवळ अहिंसेचा परिणाम असू शकते. (गांकक, १९४२-४४)

....पूर्ण लोकशाही तोपर्यंत शक्य नाही जोपर्यंत ती पूर्ण अहिंसेवर आधारित नसेल. (हरि, २-३-१९४७, ४४)

**लोकशाही : पौर्वात्य आणि पाश्चिमात्य**

पाश्च्यात्त्य लोकशाही जर आधीच असफल झालेली नसेल तरी तिची परीक्षा नक्कीच सुरू आहे. भारताने आपल्या योग्यतेचे प्रत्यक्ष दर्शन घडवून लोकशाहीच्या ख-या विज्ञानाच्या विकासाचे श्रेय का घेऊ नये? आज निःसंशयपणे दिसत असल्याप्रमाणे लोकशाहीचा अपरिहार्य परिणाम म्हणून भ्रष्टाचार आणि दांभिकपणा निर्माण व्हायला नको वा त्याचे प्रमाण ही लोकशाहीची कसोटीही ठरायला नको. (प्रेस वक्तव्य, १७-९-१९३४)

माझ्या मते पश्चिमेत जी लोकशाही आहे ती केवळ नावाकरिता आहे. हे खरे आहे की तिच्यात ख-या लोकशाहीचे बीज आहे. परंतु खरी लोकशाही तेव्हाच स्थापित होऊ शकते जेव्हा सर्व प्रकारच्या हिंसेचा त्याग करण्यात येईल व अधिकारपदाचा दुरुपयोग पूर्णपणे बंद होईल. या दोन्ही गोष्टी बरोबरीने चालत असतात. खरे सांगायचे तर अधिकाराचा दुरुपयोग ही एक प्रकारची हिंसाच आहे. भारताला जर ख-या लोकशाहीचा विकास करायचा असेल तर त्याने हिंसा आणि खोटेपणा यांच्यावरोबर कोणतीही तडजोड करू नये. (हरि, ३-९-१९३८, पृ. २४)

भारत ख-या म्हणजेच हिंसाविरहित लोकशाहीचा विकास करण्याचा प्रयत्न करत आहे. आपली शस्त्रे आहेत : चरख्याच्या रूपातून व्यक्त होणारा सत्याग्रह, ग्रामोद्योग, अस्पृश्यता निवारण, सांप्रदायिक सद्‌भावना, मद्यनिषेध आणि अहमदाबादच्या पद्धतीची श्रमिकांची संघटना. याकरिता फार मोठ्या प्रयत्नांची आणि लोकशिक्षणाची आवश्यकता आहे. या कार्याकरिता आपल्याजवळ फार मोठी यंत्रणा आहे. ती पूर्णपणे स्वयंसेवी आहे आणि सर्वात तळागाळाच्या व्यक्तींची सेवा हाच तिचा पुरस्कार आहे. (हरि, १८-५-१९४०, पृ. १२९)

## ७३. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस

### काँग्रेसचा -हास

जेव्हा काँग्रेसच्या नैतिक प्रभावाचे स्थान गुंडगिरी घेईल तेव्हा तिचा स्वाभाविक मृत्यू होईल आणि ते योग्यही होईल. (हरि, १८-६-१९३८, पृ. १४९)

काँग्रेसमध्ये पसरलेली घाण दूर करण्याकरिता केवळ संकल्पाची गरज आहे. परंतु काँग्रेसच्या समित्यांचे सदस्य अकर्मण्य आणि उदासीन राहिले तर भ्रष्टाचाराचा सामना करणे कठीण जाईल. 'जेव्हा मिठाचीच चव निघून जाते तेव्हा चवीकरिता कोणते मीठ टाकणार?' (हरि, २२-१०-१९३८, पृ. २९९)

रोमचा -हास त्याच्या पतनाच्या आधीच सुरू झाला होता. अशाच रीतीने काँग्रेसचा - जिचे पोषण गत पन्नासपेक्षा अधिक वर्षांपासून देशातील सर्वोत्कृष्ट बुद्धिमत्तेने केले आहे - -हास सुरू होताच ती एकदम तुटून जाईल. परंतु वेळ येताच भ्रष्टाचारावर उपाय करण्यात आला तर काँग्रेस तुटण्याची वेळ मुळीच येणार नाही. (हरि, २८-१-१९३९, पृ. ४४)

### काँग्रेस आणि अहिंसा

काँग्रेसचा प्रभाव तोपर्यंतच राहू शकेल जोपर्यंत ती अहिंसेचा पदर सोडणार नाही. तिचे एकमेव भांडवल तिचा नैतिक प्रभाव आहे. इतर कोणतीही परिस्थिती निर्माण झाली तर सामुदायिक दंगली आणि रक्तपात होऊ शकेल. (हरि, २९-७-१९३९, पृ. २१८)

तुमच्या मनात तलवार असेल आणि तुम्ही नाव अहिंसेचे घेत असाल तर हा केवळ पाखंडीपणा आणि खोटेपणाच होणार नाही, ते भ्याडपणाचेही कृत्य होईल. ब्रिटिश सरकारसमोर आपण ज्या अहिंसेचे प्रदर्शन केले ती दुर्बलांची अहिंसा होती. असे नसते तर आमच्यात ही भांडणे का झाली असती?

....दुबळ्या आणि नपुंसक माणसाच्या अहिंसेपेक्षा अजून घातक गोष्ट कोणतीही नाही. आपल्यामध्ये खरी अहिंसा असती तर आपल्या सार्वजनिक जीवनात सहिष्णुतेला स्थान राहिले असते. तेव्हा जेवढी मते असती तितक्या पक्षांची शक्यता राहिली असती, तसे असते तर मतभेद हे जीवनाचा नियम असलेल्या बुद्धीच्या निरोगी स्वातंत्र्याचे चिन्ह राहिले असते, पक्षीय भांडणे आणि

संघर्ष यांच्याशी मतभेदांचा संबंध राहिला नसता. यांना स्वातंत्र्याशी काहीही देणेघेणे नाही. (हरि, ६-१०-१९४६, पृ. ३३८)

### मूलभूत उद्दिष्ट

अडचणीच्या काळात काँग्रेस लोकप्रिय राहू शकली नाही तर तिला लोकप्रिय संस्था म्हणता येणार नाही. जर ती बेकार आणि उपाशी लोकांना काम देऊ शकत नसेल, जर ती लूटमारीपासून लोकांचे रक्षण करू शकत नसेल वा लुटारूंचा सामना करणे ती लोकांना शिकवू शकत नसेल, जर ती संकटाच्या वेळी लोकांना मदत करू शकणार नसेल, तर तिची लोकप्रियता संपून जाईल. (हरि, १८-१-१९४२, पृ. ४)

### आपला पक्ष

काँग्रेसमध्ये एकच पक्ष असू शकतो आणि तो पक्ष म्हणजे काँग्रेसी लोकांचा. दुसरा कोणताही पक्ष काँग्रेसमध्ये राहू शकत नाही. माझ्या म्हणण्याचा असा अर्थ नाही की काँग्रेसमध्ये वेगवेगळ्या विचारधारेच्या लोकांना कोणतेही स्थान नाही. माझा निर्जीव ऐक्यावर विश्वास नाही. सर्व व्यक्ती समान आणि स्वतंत्र जन्मत असतात या निसर्गाच्या सिद्धान्ताचा अर्थ शब्दशः घेण्यात येऊ नये. उदाहरणार्थ सर्व व्यक्ती समान बुद्धी घेऊन जन्माला येतात. परंतु समतेचा हा सिद्धान्त तेव्हाच सत्य सिद्ध होऊ शकतो जेव्हा अधिक बुद्धिमान लोक आपल्या बुद्धीचा उपयोग इतरांना हानी पोहोचवून स्वतःच्या प्रगतीकरिता न करता आपल्यापेक्षा कमी बुद्धीच्या लोकांच्या सेवेकरिता करतील. आज काँग्रेसमध्ये सर्व प्रकारचे लोक आहेत. (हरि, ६-१०-१९४६, पृ. ३३८)

....सत्ता मिळाल्याबरोबर काँग्रेसच्या लोकांना सर्व काही आपलेच आहे असे वाटू लागले. एका अर्थाने हे बरोबरच आहे. परंतु याचा अर्थ असा नाही की आपला शिस्तीशी काहीही संबंध नाही. अनुशासन आणि विनम्रता काँग्रेसच्या लोकांकरिता गौरवाची बाब असली पाहिजे. (हरि, १-६-१९४७, पृ. १७६)

काँग्रेस पक्षीय कटकारस्थानाच्या वर उठेल आणि संपूर्ण भारताच्या ऐक्याची आणि सेवेची प्रतीक बनेल. (हरि, १-६-१९४७, पृ. १७५)

### पूर्ण स्वराज्याचे उद्दिष्ट

जी सर्वात जुनी राष्ट्रीय राजकीय संघटना आहे आणि जिने अनेक संघर्षांनंतर

अहिंसक मार्गाचे अनुसरण करत स्वातंत्र्य मिळवले आहे, अशी काँग्रेस संपू देता कामा नये. ही तर राष्ट्राबरोबरच संपेल. कोणतीही जिवंत संघटना एक तर वाढत जाते वा संपते. काँग्रेसने राजकीय स्वातंत्र्य मिळवले परंतु तिला अजून आर्थिक, सामाजिक आणि नैतिक स्वातंत्र्य मिळवायचे आहे. हे काम पूर्वीसारखा उत्साह निर्माण करणारे नाही व दिसायला तितके आकर्षकही नाही. राजकीय स्वातंत्र्याच्या तुलनेत हे स्वातंत्र्य मिळवणे कठीण आहे. हे स्वातंत्र्य रचनात्मक आहे. या सर्वसमावेशक रचनात्मक कार्याकरिता प्रत्येक सदस्याची ऊर्जा अपेक्षित आहे. काँग्रेसने स्वराज्याकरिता आवश्यक असा प्राथमिक आणि आवश्यक भाग मिळवला आहे. परंतु कठीण कार्य तर आता येईल. लोकशाहीच्या कठीण चढणीच्या दरम्यान तिने अपरिहार्यपणे भ्रष्टाचाराचे असे काही खड्डे खोदलेले आहेत आणि अशा काही संस्था निर्माण केल्या आहेत की ज्या केवळ नावापुरत्या लोकप्रिय आणि लोकशाहीवादी आहेत. या तणकटाने भरलेल्या व आडव्या-तिडव्या पसरलेल्या जंजाळातून मार्ग कसा काढायचा?

## संघटना

काँग्रेसने आपल्या सदस्यांचे नोंदणी पुस्तक बंद करून टाकले पाहिजे. याच्यात एक कोटीपेक्षा अधिक नावे कधीही नोंदवली गेली नव्हती आणि तेव्हाही सर्व सदस्यांची ओळख पटवणे कठीण होते. काँग्रेसचे अज्ञात असेही एक नोंदणी पुस्तक होते. त्यात लाखो-करोडो लोकांची नावे सामील होती व त्याची कधीही गरज वाटत नव्हती. आता काँग्रेसच्या नोंदणी पुस्तकात त्या सर्व लोकांच्या नावाचा समावेश आहे असे मानले पाहिजे ज्यांची नावे देशाच्या मतदार सूचीत सामील आहेत. या सूचीमध्ये एकही खोटे नाव नोंदले जाणार नाही आणि एकही वैध नाव सुटणार नाही हे पाहणे काँग्रेसचे काम आहे. काँग्रेसच्या पुस्तकात त्या राष्ट्रसेवकांची नावे असतील जे वेळोवेळी त्यांना सोपवलेले काम पार पाडतील.

देशाकरिता ही दुर्दैवाची गोष्ट आहे की सध्या बहुतेक कार्यकर्ते शहरी आहेत. त्यांना गावात जाऊन गावाकरिता काम करण्याकरिता सांगितले जाईल. परंतु गावांमधून अधिकाधिक कार्यकर्ते भरती करण्याचा प्रयत्न केला गेला पाहिजे.

## लोकसेवक

कायद्याप्रमाणे नोंदणी करण्यात आलेल्या आपल्या जवळपासच्या मतदारांची सेवा करावी अशी अपेक्षा या लोकसेवकांकडून करण्यात येईल. अजूनही ब-याचशा

व्यक्ती आणि पक्ष त्यांना आपल्याकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न करतील. ज्याचे कार्य सर्वोत्तम असेल तोच त्यांचे हृदय जिंकेल. हाच एक असा उपाय आहे की ज्यामुळे काँग्रेस देशातील आपली घसरती प्रतिष्ठा परत मिळवू शकेल. आता काल-परवाची गोष्ट आहे जेव्हा काँग्रेस नकळत राष्ट्राची सेवक होती. तिला खुदाई खिदमतगार म्हणजे ईश्वराचा सेवक म्हटले जात असे. आता तिने स्वतः स्वतःसमोर आणि जगासमोर घोषित केले पाहिजे की यापुढे ती केवळ ईश्वराची सेवक राहील, यापेक्षा ना कमी, ना जास्त. जर ती सत्तेच्या घाणेरड्या आदळआपटीत गुंतली तर एक दिवस तिचे अस्तित्व संपलेले आढळेल. ईश्वराचे आभार की आता राजकीय क्षेत्रात काँग्रेसच एकमेव पक्ष नाही. (हरि, १-२-१९४८, पृ. ४)

## लोक सेवक संघ

(काँग्रेसच्या या नव्या रूपाविषयी गांधीजींचा प्रस्ताव ‘हरिजन’मध्ये ‘हिज लास्ट विल ॲन्ड टेस्टॅमेन्ट’ शीर्षकाखाली प्रकाशित झाला होता.)

दोन भागात वाटणी झाल्यानंतरही भारताने, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने जुळवलेल्या साधनांच्या मदतीने राजकीय स्वातंत्र्य मिळवले आहे. त्यामुळे एक प्रचार माध्यम आणि सांसदीय यंत्रणा म्हणून काँग्रेसच्या वर्तमान स्वरूपाची आता काहीही उपयोगिता नाही. शहरे आणि खेडी यांच्याहून वेगळ्या अशा आपल्या सात लाख गावांकरिता भारताला अजून सामाजिक, नैतिक आणि आर्थिक स्वातंत्र्य मिळवायचे आहे. भारत जेव्हा आपल्या लोकशाहीच्या उद्दिष्टाकडे प्रगती करेल तेव्हा त्याची असैनिक शक्ती सैनिक शक्तीवर वर्चस्व स्थापण्याकरिता निश्चितपणे संघर्ष करील. काँग्रेसला राजकीय पक्ष आणि सांप्रदायिक संस्था यांच्यापासून दूर ठेवणे आवश्यक आहे. या आणि इतर कारणांमुळे अखिल भारतीय काँग्रेस कमेटी वर्तमान काँग्रेस संघटनेला विघटित करण्याचा संकल्प करते आणि एक लोक सेवक संघ स्थापन करण्याचा निश्चय करते आहे. तिचे नियम खाली दिल्याप्रमाणे राहतील व त्यात काळानुरूप बदल करण्याचा संघाला अधिकार असेल.

### पंचायत

पाच प्रौढ पुरुष अथवा स्त्रियांचा एक घटक समजला जाईल. हे स्त्री-पुरुष ग्रामवासी वा ग्रामीण मनोवृत्तीचे असतील.

गावकरी वा ग्रामीण मनोवृत्तीच्या पाच प्रौढ पुरुष वा स्त्रियांची प्रत्येकी एक पंचायत बनलेली असेल आणि ती एक घटक म्हणून कार्य करील.

जवळजवळच्या अशाच पंचायतीत काम करणा-या पंचायती मिळून एक कार्यकारी समूह बनेल व तो त्यांच्या नेत्याची निवड करील.

अशा प्रकारच्या १०० पंचायती बनतील, तेव्हा प्रथम पातळीवरील ५० नेत्यांनी आपल्यामधून दुस-या पातळीवर काम करण्यासाठी एका नेत्याची निवड करावी. अशा रीतीने पहिल्या पातळीवरील नेत्यांनी दुस-या पातळीवरील नेत्याच्या अधीनस्थ काम करावे. दोनशे पंचायतींचे असे जाळे विणणे तोपर्यंत चालू ठेवण्यात यावे जोपर्यंत संपूर्ण भारतात त्यांचा प्रसार होत नाही. नंतर पंचायतीच्या प्रत्येक समूहातून आधी सांगितल्याप्रमाणे दुस-या पातळीवरील नेत्यांची निवड करत जावे. दुस-या पातळीवरील नेत्यांनी संपूर्ण भारतासाठी काम करावे. तसेच त्यांनी आपल्या संबंधित क्षेत्रातही काम करावे. आवश्यकता भासेल तेव्हा दुस-या पातळीवरील नेत्यांनी आपल्यामधून एका नेत्याची निवड करावी आणि त्या नेत्याने समूहांची इच्छा असेल तोवर समूहांची घडी बसवून त्याचे मार्गदर्शन करत राहावे.

(प्रांत आणि जिल्ह्यांची अजून अंतिम रचना झालेली नसल्याने सेवकांच्या या समूहाला प्रांत वा जिल्हानिहाय वाटण्याचा प्रयत्न करण्यात आलेला नाही आणि रचण्यात आलेल्या समूहांचे कार्यक्षेत्र कोणत्याही वेळी संपूर्ण भारत असेल. सेवकांना अधिकार वा सत्ता त्यांच्या त्या मालकांकडून म्हणजे भारतीय जनतेकडून मिळालेली आहे, ज्यांची त्यांनी स्वेच्छेने आणि सूज्ञपणाने निवड केलेली आहे हे लक्षात ठेवण्यात यावे.)

## कार्यकर्त्यांची योग्यता

(१) प्रत्येक सेवक आपल्या हाताने कताई केलेल्या सुतापासून तयार केलेली खादी वापरणारा असेल आणि सर्व प्रकारच्या व्यसनांपासून तो मुक्त असेल. तो जर हिंदू असेल तर त्याने स्वतःमधील आणि स्वतःच्या कुटुंबातील सर्व प्रकारची अस्पृश्यता दूर केली पाहिजे आणि जातीय ऐक्यावर, सर्वधर्मसमभावावर तसेच जात, धर्म आणि स्त्री-पुरुष यांच्यात कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता सर्वांना समान संधी मिळण्याच्या तत्त्वावर त्याचा विश्वास असायला हवा.

(२) आपल्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक गावक-याशी त्याचा वैयक्तिक संपर्क असायला हवा.

(३) गावक-यातून तो कार्यकर्त्यांची निवड करील आणि त्यांना प्रशिक्षण देईल. या सर्वांचं तो रजिस्टर ठेवील.

(४) तो आपल्या दैनंदिन कामाची नोंद ठेवील.

(५) जेणेकरून गावं आपली शेती आणि गृहोद्योगाच्या बाबतीत स्वयंपूर्ण होतील अशा रीतीनं तो गावांची संघटना करील.

(६) गावक-यांना तो स्वच्छतेचे आणि आरोग्याचे प्रशिक्षण देईल आणि त्यांची प्रकृती बिघडू नये व त्यांना आजार होऊ नये म्हणून तो सर्वतोपरी प्रयत्न करील.

(७) हिंदुस्थानी तालिमी संघाच्या धोरणानुसार नई तालीमच्या आधारावर गावक-यांच्या जन्मापासून मृत्यूपर्यंतच्या सर्व शिक्षणाची तो व्यवस्था करील.

(८) शासनाच्या मतदार सूचीत ज्यांची नावे आलेली नसतील त्यांची नावे तो नोंदवील.

(९) ज्यांनी मतदानासाठी आवश्यक पात्रता मिळवली नसेल त्यांच्यात ती यावी म्हणून तो त्यांना प्रोत्साहित करील.

(१०) वर सांगितलेल्या आणि वेळोवेळी वाढवण्यात आलेल्या उद्देशांच्या परिपूर्तीसाठी योग्य त्या कर्तव्यांचे पालन करण्याच्या दृष्टीने संघाने तयार केलेल्या नियमानुसार तो स्वतः प्रशिक्षण घेईल आणि पात्र होईल.

**रचनात्मक संघटना**

संघ खालील स्वयंशासित संस्थांना मंजुरी देईल.

(१) अखिल भारतीय चरखा संघ
(२) अखिल भारतीय खादी ग्रामोद्योग संघ
(३) हिंदुस्थानी तालिमी संघ.
(४) हरिजन सेवक संघ
(५) गो सेवा संघ.

**अर्थव्यवस्था :**

संघ आपल्या ध्येयाची परिपूर्ती करण्यासाठी गावक-यांकडून आणि इतरांकडून वर्गणी गोळा करील. गरीब लोकांकडून पैसा घेण्यावर खास भर देण्यात येईल. (हरि, १५-२-१९४८, पृ. ३२)

# ७४. लोकप्रिय मंत्रिमंडळ

## मंत्रिमंडळांची रचना

वेगवेगळ्या हितसंबंधांच्या समाधानाकरिता मंत्र्यांची पदे निर्माण करणे निश्चितपणे चूक होईल. मी जर प्रधानमंत्री झालो आणि अशा प्रकारच्या दाव्यांनी मला त्रस्त करण्यात आले तर माझ्या ठिकाणी दुसरा नेता निवडा असे मी निर्वाचकांना सांगेन. अशा प्रकारचे पद तटस्थ भावनेने धारण केले पाहिजे. आपण त्याला चिकटून बसलो आहोत असे होऊ नये. हा काटेरी मुकुट असला पाहिजे, प्रसिद्धी मिळवण्याचे साधन तर ते कधीही होऊ नये. पदांमुळे आपल्या उद्दिष्टांपर्यंत पोहोचण्याची गती वाढेल हा ती पदे स्वीकारण्यामागील दृष्टिकोन असावा.

स्वार्थी आणि पथभ्रष्ट कट्टर समर्थकांना प्रधानमंत्र्यावर दडपण आणून त्यांच्या मार्गात अडसर निर्माण करण्याची सूट मिळाली तर ती फार दुर्दैवी गोष्ट होईल. ज्यांच्यापासून मंत्र्यांना अखेरीस शक्ती मिळेल त्या लोकांचे समाधान करणे जर आवश्यक असेल तर त्या लोकांकडून संशयातीत निष्ठा, आज्ञापालनाची तयारी आणि शिस्तपालन या गोष्टींचे आश्वासन मिळवणे त्यापेक्षाही किती तरी जास्त आवश्यक आहे.

अखेरीस खरी कसोटी ही आहे की ज्यांना मंत्रिपद द्यायचे असेल त्यांना पक्षाच्या त्या सदस्यांनीही पसंत केले पाहिजे ज्यांच्या हातात प्रधानमंत्र्याचे नामांकन असते. कोणताही प्रधानमंत्री आपल्या आवडीच्या स्त्रीला वा पुरुषाला पक्षावर क्षणभराकरितासुद्धा लादू शकत नाही. पक्षाला त्याच्या पात्रतेवर, त्याला असलेल्या लोकांच्या माहितीबद्दल आणि त्याच्या इतर गुणांबद्दल पुरेपूर विश्वास असल्यामुळे तो प्रधान असतो. (हरि, ७-८-१९१७, पृ. २०४)

मंत्र्यांनी आणि काँग्रेसच्या तिकिटावर निवडून आलेल्या विधायकांनी निर्भयपणे आपल्या कर्तव्याचे पालन केले पाहिजे. आपली जागा आणि पद निघून जाण्याचा धोका पत्करण्याची त्यांची नेहमी तयारी असली पाहिजे. काँग्रेसची प्रतिष्ठा आणि शक्ती वाढवण्याच्या पात्रतेशिवाय या जागांना काहीही महत्त्व नाही आणि या गोष्टी पूर्णपणे सार्वजनिक आणि व्यक्तिगत गुणांवर अवलंबून असल्यामुळे हे लक्षात ठेवले पाहिजे की कोणतीही नैतिक चूक काँग्रेसची हानी केल्याशिवाय राहणार नाही. हा अहिंसेचा अनिवार्य परिणाम आहे. (हरि,२३-४-१९३८, पृ.८८)

मंत्री आपल्या पक्षाचे हित पाहत असतो यात काहीही संशय नाही, परंतु कोणत्याही अवस्थेत संपूर्ण राष्ट्राच्या हिताला हानी पोहोचवून असे करता येत नाही. त्याला माहीत असते की तो जर विदेशी शासनाचा सामना करू शकत नसेल तर राष्ट्रातील विरोधकांचाही तो सामना करू शकणार नाही. त्यामुळे खरे सांगायचे तर तो त्याच सीमेपर्यंत काँग्रेसचा फायदा करू शकतो ज्या सीमेपर्यंत तो देशाचा फायदा करू शकतो आणि जिथे सर्व समुदायाच्या लोकांना एकमेकांबरोबर बसणे भाग पडते. अशा विधानसभेत आपल्या विरोधकांना आपल्या बाजूने ते वळवू शकले तर तिथे जे निर्णय घेतले जातील त्यांना विरोध होणार नाही. जर विधानसभांना राष्ट्रीय समस्या सोडवण्याचे व्यासपीठ मानले तर.... तिथे सांप्रदायिक ऐक्यासह राष्ट्राच्या सर्व समस्या सोडवल्या जाऊ शकतात.... (हरि, १६-७-१९३८, पृ. १८४)

साधेपणातच सौंदर्य आणि कला आहे. नीटनेटकेपणा, स्वच्छता आणि प्रतिष्ठितपणाने राहणे यांकरिता पैसा लागत नसतो. डामडौल आणि भपकेबाजपणा या गोष्टी अनेकदा छचोरपणासारख्याच असतात. (हरि, १७-७-१९३७, पृ. १८०)

पदधारणा ही अशी गोष्ट आहे ज्यामुळे प्रतिष्ठेत वृद्धी होऊ शकते वा ती पूर्णपणे नष्टसुद्धा होऊ शकते. जर प्रतिष्ठा पूर्णपणे गमवायची नसेल तर मंत्र्यांनी आणि विधायकांनी आपल्या खाजगी आणि सार्वजनिक आचरणावर पूर्ण लक्ष ठेवले पाहिजे. सिझरच्या पत्नीप्रमाणे त्यांनीही पूर्णपणे संशयातीत असले पाहिजे.

त्यांनी स्वतःच्या वा स्वतःच्या नातेवाइकांच्या लाभाकरिता कोणतेही काम करायला नको. जर नातेवाइकाची वा मित्राची कुठे नियुक्ती होणार असेल तर ती उपलब्ध उमेदवारांमधील सर्वश्रेष्ठता आणि बाजारमूल्यापेक्षा अधिक पारिश्रमिक नसणे केवळ याच तत्त्वाधारे व्हावी. (हरि, २३-४-१९३८, पृ. ८८)

## मंत्र्यांकरिता संहिता

काँग्रेस सरकारमध्ये कोणतेही पद धारण करायचे असेल तर ते केवळ सेवाभावनेने करण्यात यावे व त्यात व्यक्तिगत लाभाचा हेतू मुळीच नसावा. (हरि, ३-९-१९३८, पृ. २४२)

जनतेची संघटना म्हणून काँग्रेसला आपले अस्तित्व टिकवून ठेवायचे असेल, तर मंत्रीसाहेब लोकांसारखे वागू शकत नाहीत आणि शासकीय कामाकरिता पुरवण्यात आलेल्या सोयीसवलतींचा खाजगी कामाकरिता त्यांना उपयोगही करता

येणार नाही. (हरि, २९-९-१९४६, पृ. ३३३)

मंत्र्यांनी लोकांच्या टीकेबद्दल सहनशील असले पाहिजे. छिद्रान्वेषी दृष्टीच्या टीकाकारांच्या टीकेतीलही चांगला भाग त्यांनी ग्रहण केला पाहिजे.... जनतेच्या या सेवकांकडून टीकाकार अधिक साधेपणाची, धैर्याची, प्रामाणिकपणाची आणि मेहनतीची अपेक्षा करत असतात.... (हरि, २१-९-१९४७, पृ. ३२५)

आपले मंत्री जनतेचे आहेत आणि जनतेतून घेतले गेले आहेत. मंत्रिपदी नसलेल्या अनुभवी लोकांपेक्षा आपल्याला अधिक ज्ञान आहे असे मंत्र्यांनी समजू नये. (हरि, १६-११-१९४७, पृ. ४०९)

नेत्यांच्या हाती सरकारचे लगाम आहेत आणि खर्च करण्याकरिता करोडो रुपये आहेत. त्यामुळे त्यांनी सावध राहिले पाहिजे. त्यांनी नम्रपणे वागले पाहिजे. लोक सहजपणे आश्वासने देतात आणि ते तितक्याच सहजपणे मोडतात. मंत्र्यांनी अशी कोणतीही आश्वासने देऊ नये जी त्यांना पूर्ण करता येणार नाहीत. एकदा आश्वासन दिले की ते काहीही करून पूर्ण केले पाहिजे.
(हरि, १४-१२-१९४७, पृ. ४६७)

मंत्री जनतेचे सेवक असतात. जनतेच्या स्पष्ट इच्छेच्या विरोधात ते कोणतेही काम करू शकत नाहीत. जनतेच्या इच्छेशिवाय ते एक दिवसही पदावर राहू शकत नाहीत. (हरि, ४-१-१९४८, पृ. ४९५)

## विधिमंडळ

आपण विधिमंडळांसंबंधी विचार करू या. विधिमंडळ सरकारचे दोष उघड करू शकते, परंतु ही तितकीशी महत्त्वाची सेवा नाही. शासनाचे दोष माहीत असूनही तुम्ही शासनाची शिकार का झालेले आहात आणि शासनाच्या अपकृत्यांच्या विरोधात कसे उभे राहावे हे जो जनतेला सांगू शकतो तोच जनतेची खरी सेवा करत असतो. अन्याय निवारणाकरिता जनतेने आपल्याकडे पाहावे अशी विधिमंडळ सदस्यांची इच्छा असल्यामुळे, ते ही अनिवार्य सेवा करू शकत नाहीत.

नको असलेले कायदे थांबवणे आणि विधायक कार्यात अधिकात अधिक मदत होईल असे जनतेला उपयोगी असलेले कायदे करायला लावणे हा विधिमंडळांचा दुसरा उपयोग आहे.

विधिमंडळांनी जनतेच्या इच्छेचे पालन करावे अशी अपेक्षा असते. काही काळ

अशा संस्थांमध्ये वक्तृत्वाला महत्त्व असते. परंतु अंतिमतः त्याची आवश्यकता नसते. व्यावहारिक ज्ञान असलेले तज्ज्ञ आणि या थोड्याशा लोकांना पाठिंबा देणारे लोक यांची खरी आवश्यकता असते. जी संघटना सेवेकरिता अस्तित्वात आहे आणि जिने पदव्या आणि अन्य क्षुद्र गोष्टींवर बहिष्कार टाकलेला आहे त्या संघटनेच्या सदस्यांनी विधानसभेवर निवडले जाणे प्रतिष्ठेचे मानले तर ती गोष्ट हानिकारक होईल. या भावनेने मूळ धरले तर यामुळे काँग्रेसची बदनामी होईल आणि अखेरीस हेच तिच्या नाशाचे कारण सिद्ध होईल.

काँग्रेसच्या लोकांचे इतके पतन झाले तर मग भारताच्या कोट्यवधी कलेवरांमध्ये रक्त आणि प्राण यांचा संचार कोण करील? भारत आणि जग कुणाकडे आशेने पाहतील? (१७-२-१९४६, पृ. १३)

लोकप्रिय मंत्रिमंडळ विधानसभेला जबाबदार असते आणि तिच्या संमतीशिवाय ते कोणतेही काम करू शकत नाही. लोकप्रिय विधिमंडळांचा प्रत्येक सदस्य आपल्या मतदारांना जबाबदार असतो. यामुळे जनतेचे प्रतिनिधित्व करणा-या मतदाराने आपल्या सरकारवर टीका करण्याआधी चांगल्या प्रकारे विचार केला पाहिजे.

याशिवाय लोकांची एक वाईट खोड लक्षात ठेवली पाहिजे. त्यांना कोणत्याही प्रकारचा कर देण्याची इच्छा नसते. सरकार चांगले असेल तर कर देणा-याला आपल्या कराचा पूर्ण मोबदला मिळतो. शहरांमध्ये द्यावा लागणारा पाण्यावरील कर हे याचे एक उदाहरण आहे. कोणताही करदाता इतक्या कमी पैशात स्वतःकरता पाण्याची व्यवस्था करू शकत नाही. असे कर जनतेच्या इच्छेने लावण्यात आलेले असले तरी लोक अशा प्रकारचा कर देण्याला कचरतात.

हे खरे आहे की अशा प्रकारे सर्व करांपासून लाभ मिळतो हे सिद्ध करता येऊ शकत नाही ज्या प्रकारे पाणीकराच्या बाबतीत ते सिद्ध करता येते. परंतु जसजसा समाजाचा आकार वाढतो आणि सेवेचे क्षेत्र विस्तृत होते तसतसे कोणत्या करामुळे आपला किती फायदा झाला हे प्रत्येक करदात्याला समजून घेणे कठीण जाते. परंतु ही गोष्ट अगदी स्पष्ट आहे की, करांपासून मिळणारे एकूण उत्पन्न संपूर्ण समाजाच्या हितार्थ खर्च झाले पाहिजे. असे जर झाले नाही तर कर जनतेच्या इच्छेने लावले गेले आहेत हा युक्तिवाद टिकू शकत नाही.
(हरि, ८-९-१९४६, पृ. २९३)

# ७५. माझ्या स्वप्नातील भारत

हिंदू मुस्लीम ऐक्य आणि अहिंसक उपाय यांच्याद्वारे म्हणजेच शुद्ध स्वार्थत्यागाद्वारे स्वातंत्र्य आणि आत्माभिव्यक्ती मिळवून भारत आजच्या काळोखातून बाहेर पडण्याचा मार्ग दाखवू शकतो. (यंग, ६-१०-१९२०, पृ. ४)

जनतेचा आवाज जर ईश्वराचा आवाज असेल तर त्यात प्रामाणिकणा, शौर्य, सौजन्य, नम्रपणा आणि संपूर्ण स्वार्थत्याग यांचा ध्वनी असला पाहिजे.
(यंग, १९-११-१९२५, पृ. ४००)

माझा विश्वास आहे की कोणतीही गोष्ट स्थिर नसते. मानव स्वभावाची एक तर उन्नती होते वा अवनती होते. आपण आशा करू या की, भारतात हिचा उत्कर्ष होतो आहे. असे नसेल तर भारतात आणि शक्य आहे की सर्व जगात प्रलय होईल....

स्वतंत्र भारत विश्वाला शांततेचा पाठ शिकवील की ज्यामुळे आधीच जग त्रस्त आहे त्या घृणेचा आणि हिंसेचा पाठ शिकवील? (हरि, ८-६-१९४७, पृ.१७७)

स्वतंत्र भारत जर प्रेमाच्या या शाश्वत नियमाचा अंगीकार करील तर तो संपूर्ण विश्वाचा निर्विवादपणे नेता बनेल. मला केवळ एवढेच सांगायचे आहे की विवेकाशिवाय इतर कुणाचेही म्हणणे आपण ऐकू नये.
(हरि, ८-६-१९४७, पृ.१८१)

**नवा भारत**

मी केवळ आशा करतो आहे की.... अशा एका नवीन आणि निरोगी भारताचा उदय होईल की जो पश्चिमेकडील सर्व घृणित गोष्टींची नक्कल करणारा युद्धप्रिय देश नसेल. तो असा नवीन भारत असेल की, जो पश्चिमेकडील सर्व उत्कृष्ट गोष्टी शिकेल आणि केवळ आशिया आणि आफ्रिकेचेच नाही तर सर्व जगाचे आशास्थान होईल.

आज सैन्य आणि नग्न पाशवी शक्तीशी जुळलेल्या सर्व प्रकारच्या गोष्टींचा आपण जो आधार घेत आहोत तो पाहता अशी आशा करणे व्यर्थ आहे....तरीही पश्चिमेकडील भडक गोष्टींची नक्कल करण्याच्या वेडेपणानंतरही मनातून मला आशा वाटते की भारत या मृत्यू-नृत्यातून वाचेल व १९१५पासून सतत बत्तीस

वर्षे त्याने अर्धवट का असेना अहिंसेचे जे प्रशिक्षण घेतले त्यामुळे नैतिकतेच्या उच्च सिंहासनावर बसण्याचा हक्क तो मिळवील. (हरि, ७-१२-१९४७, पृ. ४५३)

### पृथ्वीवर स्वर्ग

१८९६मध्ये मी जेव्हा आग्रा आणि दिल्ली येथील किल्ले पाहिले होते तेव्हा त्यातील कोणत्या तरी दारावर एक शेर कोरलेला होता त्याचा अनुवाद आहे : 'जर पृथ्वीवर स्वर्ग कुठे असेल तर तो इथे आहे, इथे आहे, इथेच आहे.' आपल्या सर्व भव्यतेसहही तो किल्ला मला स्वर्ग वाटला नव्हता. परंतु पाकिस्तानच्या सर्व प्रवेशद्वारांवर न्यायभावनेसह हा शेर कोरलेला असेल तर मला आनंद होईल. अशा स्वर्गात, मग तो भारतात असो वा पाकिस्तानमध्ये, कोणी दरिद्री नसेल, भिकारी नसेल, उच्च नसेल, नीच नसेल, ना कोणी लखपती असेल ना कोणी अर्धपोटी कर्मचारी असेल, ना मादक पेय असतील ना धुंद करणारी औषधे असतील. तिथे जो सन्मान पुरुषाला मिळेल तोच स्त्रियांना मिळेल, स्त्री-पुरुषांच्या पावित्र्याचे काळजीपूर्वक रक्षण केले जाईल, तिथे आपल्या पत्नीशिवाय सर्व स्त्रियांना सर्व धर्मातील लोक वयानुसार आई, बहीण वा मुलगी मानून व्यवहार करतील. तिथे अस्पृश्यतेची नावनिशाणी नसेल आणि सर्व धर्मांकडे समान आदराने पाहिले जाईल. तिथे सर्व लोक भाकरीकरिता श्रम करणे ही अभिमानाची गोष्ट समजतील. (यंग, १८-१-१९४८, पृ. ५२६)

## ७६. खेड्यांकडे परत

### खरा भारत

माझा विश्वास आहे आणि अनेकदा मी या गोष्टीचा पुनरुच्चारही केला आहे की, भारत त्याच्या शहरांमध्ये राहत नाही तर सात लाख खेड्यांमधून राहतो. आम्हा शहरी लोकांना असे वाटते की, भारत शहरांमध्ये राहतो आणि आमच्या गरजांची पूर्तता करण्याकरिता खेडी आहेत. या निर्धन खेडुतांजवळ खाण्यापिण्याची पुरेशी व्यवस्था आहे की नाही आणि ऊनपावसापासून संरक्षण होण्यासारखा काही निवारा त्यांना आहे की नाही हे माहीत करून घेण्याचा आपण कधीही प्रयत्न केला नाही. (हरि, ४-४-१९३६, पृ. ६३)

आपण जगावे म्हणून आतापर्यंत खेड्यातील लोकांनी हजारोंच्या संख्येत बलिदान केले आहे. आता त्यांनी जगावे म्हणून आपण आपली आहुती देण्याची

वेळ आली आहे. परंतु या दोन गोष्टींमध्ये मूलभूत अंतर आहे. गावक-यांनी नकळत आणि इच्छा नसताना आपल्या प्राणांची आहुती दिली आहे. विवश होऊन त्यांना कराव्या लागलेल्या बलिदानामुळे आपण शहरी लोक पतीत झालो आहोत. आता आपण जाणीवपूर्वक त्यांच्याकरिता बलिदान केले तर त्यामुळे आमचे आणि आमच्या संपूर्ण राष्ट्राचे उदात्तीकरण होईल. जर आपल्याला एक स्वतंत्र आणि स्वाभिमानी राष्ट्र म्हणून जगायचे असेल तर या आवश्यक त्यागापासून आपण माघार घेता कामा नये. (यंग,१७-४-१९२४,पृ.१३०)

## खेडी आणि शहर

स्वतःची काळजी घेण्याकरिता शहर समर्थ आहे. यामुळे आपण खेड्यांकडे लक्ष देणे जरुरी आहे. आपल्याला त्यांना पूर्वग्रह, अंधविश्वास, संकुचित दृष्टिकोन इत्यादी गोष्टींपासून मुक्त करायचे आहे. याकरिता आपल्याला खेड्यांमध्ये जाऊन राहावे लागेल, त्यांच्या सुखदुःखात भागीदार व्हावे लागेल आणि त्यांच्यात शिक्षणाचा व इतर उपयोगी माहितीचा प्रचार करावा लागेल. याशिवाय त्यांच्या सुधारणेचा दुसरा कोणताही चांगला उपाय नाही. (यंग, ३०-४-१९३१, पृ. ९४)

शहरी लोकांनी सामान्यपणे गावक-यांचे शोषण केले असल्याचे मला आढळले आहे. खरे सांगायचे तर शहरे या गरीब लोकांनी केलेल्या पोषणावर जगत आहेत. अनेक इंग्रज अधिका-यांनी भारताच्या अवस्थेबद्दल लिहिले आहे. परंतु भारतातील ग्रामवासीयांजवळ जीवनावश्यक साधने उपलब्ध आहेत असे माझ्या माहितीप्रमाणे त्यापैकी कोणीही म्हटलेले नाही. याउलट त्यांनी हे मान्य केले आहे की गावांमधील अधिकांश लोक उपासमारीच्या अवस्थेत राहत आहेत व १० टक्के लोकांना अर्धपोटीच राहावे लागते आणि करोडो लोक असे आहेत की त्यांना घाणेरडे मीठ, तिखट आणि पॉलिश केलेले तांदूळ वा भाजलेले धान्य यांच्यावरच निर्वाह करावा लागतो.

तुम्ही विश्वास ठेवा की आपल्यापैकी कोणाला असे अन्न खावे लागले तर आपण एक महिनाही जिवंत राहणार नाही आणि राहिलोच तर आपण आपले मानसिक संतुलन गमावून बसू. तरीही आपले गावकरी मात्र कायम असे जीवन जगत आहेत. (हरि, ४-४-१९३६, पृ. ६३-४)

## शेतकरी

तुम्ही त्यांच्याशी (भारतीय शेतकरी) बोलू लागल्याबरोबर जेव्हा ते बोलू

लागतात, तेव्हा त्यांच्या तोंडून बुद्धिमत्तापूर्ण गोष्टी बाहेर पडू लागतात. वरून अडाणी दिसणा-या या शेतक-यांच्या आत तुम्हाला आध्यात्मिकतेचा सागर आढळेल. मी यालाच संस्कृती म्हणतो - ही गोष्ट तुम्हाला पश्चिमेत आढळणार नाही. युरोपच्या कोणत्याही शेतक-याशी तुम्ही बोलू लागलात तर त्याला आध्यात्मिकतेत मुळीच रस नसल्याचे तुम्हाला आढळून येईल.

जोपर्यंत अनेक खेड्यात राहणा-या भारतीयांचा संबंध आहे, त्याच्या गावठीपणाच्या पापुद्र्याखाली युगांची प्राचीन संस्कृती दडलेली असल्याचे तुम्हाला दिसून येईल. हा वरचा पापुद्रा काढून टाका, दारिद्र्यासंबंधीचा त्यांचा जुनाट विकार दूर करा, निरक्षरता नाहीशी करा आणि मग तो गावकरी सुसंस्कृत, सभ्य आणि स्वतंत्र नागरिकाचा उत्तम नमुना असल्याचे तुम्हाला आढळेल.
(हरि, २८-१-१९३९, पृ.४३९)

आपल्या लोकसंख्येतील ७५ टक्क्यांपेक्षा अधिक लोक शेतकरी आहेत.... परंतु श्रमाच्या पूर्ण फळापासून आपण जर त्यांना वंचित केले वा अजून कोणाला असे करू दिले तर आमच्यामध्ये स्वयंशासनाची काही भावना शिल्लक आहे असे म्हणता येणार नाही. (स्पीरा, पृ. ३२३)

गावांमधून मिळणारी शक्ती आणि पोषण यांचा पूर्ण मोबदला देणे आपले कर्तव्य आहे असे जेव्हा आपली शहरे मान्य करतील आणि आपल्या स्वार्थाकरिता ग्रामीणांचे शोषण बंद करतील तेव्हाच शहरी लोक आणि ग्रामीण यांच्यात निरोगी आणि नैतिक संबंध निर्माण होतील. शहरांतील मुलांना जर सामाजिक पुनर्निर्माणाच्या या महान कार्यात हातभार लावायचा असेल तर त्यांना त्या व्यवसायांच्या माध्यमातून आपले शिक्षण घ्यावे लागेल जे व्यवसाय गावांशी संबंधित आहेत. (हरि, ९-१०-१९३७, पृ. २९३)

शहरांची वाढ ही वाईट गोष्ट आहे असे मी समजतो; मानवजात आणि जग यांच्याकरिता ही दुर्दैवाची गोष्ट आहे; इंग्लंड आणि भारताकरिताही ही निश्चितपणे दुर्दैवाची गोष्ट आहे. इंग्रजांनी शहरांच्या माध्यमातून भारताचे शोषण केले आहे. शहरांनी बदल्यात गावांचे शोषण केले. शहरातील मोठमोठ्या इमारतींचे बांधकाम गावातील लोकांच्या रक्तरूपी सिमेंटने झाले आहे. मला वाटते की आज जे रक्त नगरांच्या धमन्यातून वाहते आहे ते परत एकदा गावातील रक्तवाहिन्यांमधून धावू लागले पाहिजे. (हरि, २३-६-१९४६, पृ. १९८)

....मला माहीत आहे की भारताला निर्मळ विचारावर आधारित निर्मळ

कर्माच्या क्षेत्रात नेतृत्व प्रदान करायचे असेल तर ईश्वर मोठ्या लोकांची बुद्धी कुंठित करील आणि गावातील लोकांना आपले म्हणणे तशा पद्धतीने मांडण्याची शक्ती देईल ज्या पद्धतीने ते मांडले जाणे योग्य असेल.
(हरि, २८-७-१९४६, पृ. २३६)

भारत गावांनी मिळून बनलेला आहे, परंतु आमच्या बुद्धिवादी वर्गाने त्यांची उपेक्षा केली आहे.... ग्रामीण जीवन शहरी जीवनाची नक्कल वा त्याची पुरवणी नसावी. शहरी लोकांनी ग्रामीण जीवनपद्धतीचा अवलंब केला पाहिजे आणि गावांकरिता आपले जीवन सर्मर्पित केले पाहिजे. (हरि, ३-११-१९४६, पृ. ३८१)

## आपले कर्तव्य

आपण गावक-यांशी एकरूप झालो पाहिजे जे आपल्या कुबड निघालेल्या पाठीवर प्रखर ऊन्हाचा मारा सहन करत कठोर परिश्रम करत असतात आणि ज्या डबक्यात ते आंघोळ करतात, कपडे धुतात आणि जनावरे पाणी पितात त्या डबक्यातील पाणी पीणे आपल्याल्या शक्य होईल काय? जोपर्यंत हे होणार नाही तोपर्यंत आपण आपल्या देशातील जनतेचे प्रतिनिधित्व करू शकणार नाही आणि तेसुद्धा आपले कोणतेही म्हणणे ऐकणार नाहीत.
(यंग, ११-९-१९२४, पृ. ३००)

आपल्याला आदर्श ग्रामीण बनायचे आहे, असे ग्रामीण नाहीत की ज्यांचे स्वच्छतेबद्दलचे विचार अतिशय विचित्र असतात अथवा काहीही विचार नसतात वा ज्यांना आपण काय खातोपितो आहोत याचेही भान नसते. त्यांच्यातील बहुतेक लोक करतात त्याप्रमाणे कसेही शिजवलेले कसेही खायचे आणि कसेही राहायचे असे आपल्याला राहायचे नाही. आदर्श आहार काय आहे हे त्यांना आपल्याला दाखवायचे आहे. आपल्याला केवळ आवड वा नावड यांच्याबद्दलच त्यांच्याशी बोलायचे नाही तर या आवडीनिवडीच्या मुळाशी आपल्याला जायचे आहे....

आपल्याला गावातील लोकांना सांगायचे आहे की ते कोणताही विशेष खर्च न करता भाजीपाला पिकवू शकतात आणि निरोगी जीवन व्यतीत करू शकतात. आपल्याला त्यांना हेही सांगायचे आहे की, ते जेव्हा पाने शिजवतात तेव्हा त्यातील बहुतेक जीवनसत्वे नष्ट होतात.

आरोग्य आणि संपत्तीची बचत कशी करावी हे आपल्याला गावातील लोकांना शिकवायचे आहे.... लिओनल कर्टिसने आपल्या गावांना शेणाचे उकिरडे म्हणून

संबोधले आहे. आपल्याला त्या गावांचे आदर्श गावात परिवर्तन करायचे आहे. आपल्या गावांच्या चोहोकडे ताजी हवा असते, परंतु ती गावक-यांच्या मात्र नशिबी नसते. ते अगदी ताज्या खाद्यपदार्थांजवळ राहतात परंतु हे पदार्थ त्यांच्या नशिबी नसतात. आहाराच्या बाबतीत मी एका मिशन-याची भाषा बोलतो आहे, कारण गावांचे सुंदर वस्त्यांमध्ये परिवर्तन करणे हे माझे मिशन आहे.
(हरि, १-३-१९३५, पृ. २१)

याचा केवळ एकच उपाय आहे. तो असा की आपण गावक-यांमध्ये जाऊन बसलो पाहिजे आणि त्यांचे पालक म्हणून नाही तर भंगी म्हणून, परिचारक म्हणून आणि सेवक म्हणून अतिशय श्रद्धेने आपण त्यांचे काम केले पाहिजे. क्षणभराकरिता स्वराज्याची गोष्ट आपण विसरलो पाहिजे आणि त्या आहेरे वर्गातील व्यक्तींनाही आपण विसरलो पाहिजे ज्यांची उपस्थिती आपल्याला नेहमी दडपून टाकत असते. त्यांना त्यांच्या ठिकाणी राहू द्या. या मोठ्या समस्यांचा सामना करण्याकरिता अनेक लोक आहेत. आपल्याला गावातील ती लहान लहान कामे हाती घ्यायची आहेत ज्यांची नितांत गरज आहे आणि आपले उद्दिष्ट साध्य झाल्यानंतरही ज्यांची आवश्यकता राहील. खरे सांगायचे तर गावातील कामात यश मिळाल्यानंतर आपण आपल्या ध्येयाच्या अजूनच जवळ पोहोचू.
(हरि, १६-५-१९३६, पृ. ११२)

## ग्राम आंदोलन

ग्राम आंदोलन ज्याप्रमाणे गावात राहणा-यांकरिता एक शिक्षण आहे तसेच ते शहरी लोकांकरिताही आहे. ग्रामविकासाकरिता शहरातून जे कार्यकर्ते येतील त्यांनी स्वतःमध्ये गावातील मानसिकता विकसित केली पाहिजे आणि गावक-यांप्रमाणे जगण्याची कला शिकली पाहिजे. याचा अर्थ असा नाही की, गावक-यांप्रमाणे त्यांनी उपाशी राहिले पाहिजे. परंतु याचा एवढा अर्थ नक्कीच आहे की त्यांनी आपल्या जीवनाची जुनी पद्धत पूर्णपणे बदलली पाहिजे. (हरि, ११-४-१९३६, पृ. ६८)

स्वातंत्र्याचे जे चित्र माझ्या मनात आहे त्यात ग्रामसमुदायाला एक घटक मानण्यात येईल. ते या देशाचा आधार आहेत. ४० कोटी लोक चिरडले जातील, अशा रीतीने ग्रामीण घटकावर स्वातंत्र्याची वास्तूरचना उभारणी करण्यात येणार नाही....

माझ्या धारणेनुसार तो सदृढतम घटक असेल. माझ्या कल्पनेतील गावाची लोकसंख्या जवळपास एक हजार असेल. अशा घटकाचे संघटन जर स्वावलंबनाच्या तत्त्वावर करण्यात आले, तर माझ्या मते त्यापासून फार चांगले परिणाम मिळू शकतात. (हरि, ४-८-१९४६, पृ. २५१-२)

आपण आपल्या हातांचा उपयोग करणे तर विसरणार नाही ना हा आज आपल्यासमोर धोका आहे. जमीन कशी खोदतात आणि मातीची काळजी कशी घेतात हे जर आपण विसरलो तर असे समजा की, आपण स्वतःला विसरलो. केवळ शहरांची सेवा करून तुमचे मंत्रिपद यशस्वी झाले असे तुम्ही दाखवणार असाल तर भारत त्याच्या सात लाख गावांमध्ये वसतो हे तुम्ही विसराल. माणसाला सर्व जग मिळाले आणि त्याला त्याचा आत्मा गमवावा लागला तर त्याच्याजवळ वाचेल तरी काय? (हरि, २५-८-१९४६, पृ. २८२)

## ७७. समग्र ग्रामसेवा

खरा भारत त्याच्या सात लाख गावांमध्ये राहतो. भारतीय संस्कृतीला जर स्थिर विश्वव्यवस्था निर्माण करण्यामध्ये आपला पूर्ण हातभार लावायचा असेल तर गावांमध्ये वसलेल्या या विशाल जनसंख्येला.... परत जगणे शिकवावे लागेल. (हरि, २७-४-१९४७, पृ. १२२)

आज आपली खेडी ज्या तीन विकारांनी जखडली आहे, ती आहेत : (१) सामूहिक स्वच्छतेचा अभाव, (२) अपुरा आहार, (३) शैथिल्य.... खेड्यातील लोकांना स्वतःलाच आपल्या कल्याणात रूची नाही. त्यांना स्वच्छतेच्या आधुनिक पद्धतींचे महत्त्व वाटत नाही. आपल्या शेतीची लागवड आणि प्रदीर्घ काळापासून ते करत आलेल्या कष्टाचे काम याशिवाय इतर कोणतेही काम करण्याची त्यांची इच्छा नाही. या अडचणी वास्तव आणि गंभीर आहेत. परंतु यांमुळे आपण घाबरू नये.

आपल्या ध्येयावर आपली अदम्य श्रद्धा असली पाहिजे. आपण लोकांसोबत धीराने वागले पाहिजे. आता आपण स्वतःच ग्रामकार्यात नवशिके आहोत. आपल्याला जुन्या आजारांचा इलाज करायचा आहे. आपल्यात जर धैर्य आणि चिकाटी असेल तर आपण मोठ्यात मोठ्या अडचणी पार करू शकू. रोगी असाध्य रोगाने ग्रस्त असला तरी त्याची शुश्रूषा करणारा परिचारक ज्याप्रमाणे त्याला सोडून जाऊ शकत नाही त्याचप्रमाणे आपणही या कामातून माघार घेऊ

शकत नाही. (हरि, १६-५-१९३६, पृ. १११-२)

शिक्षणाचा फायदा मिळालेल्या शिक्षितांच्या दुर्लक्षाला खेडी ब-याच काळापासून बळी पडलेली आहेत. शिकलेले लोक शहरात राहू लागले आहेत. ग्राम आंदोलन गावांशी संपर्क करण्याचा एक प्रयत्न आहे. यामुळे ज्या लोकांमध्ये सेवेची उत्कट भावना असेल व ज्यांना खेड्यातील लोकांच्या सेवेत आत्माभिव्यक्तीचे सुख अनुभवायला मिळेल असे वाटते त्यांना गावात जाऊन राहण्याकरिता प्रेरित करावे लागेल....

जे लोक सेवाभावनेने गावात जाऊन राहू लागले आहेत त्यांनी आपल्यासमोरील अडचणींमुळे घाबरून जाऊ नये. आपल्या खेडूत बांधवांच्या उदासीनतेसह अनेक अडचणींना आपल्याला तोंड द्यावे लागेल हे तिथे जाण्यापूर्वीच त्यांना माहीत होते. यामुळे गावांची सेवा तेच करू शकतील ज्यांचा स्वतःवर आणि स्वतःच्या ध्येयावर विश्वास असेल.

**कार्यकर्ते**

लोकांमध्ये राहून प्रामाणिक जीवन जगणे हासुद्धा एक आदर्श पाठच आहे. याचा आजूबाजूच्या वातावरणावर नक्कीच प्रभाव पडला पाहिजे. आपले युवक सेवाभावनेऐवजी केवळ जीविकोपार्जनाकरिताच गावात गेले आहेत एवढीच अडचण आहे.

लोक पैसा कमावण्याकरिता खेड्यांमध्ये जातात हे मला मान्य आहे. त्यांना तिथे कोणतेच आकर्षण वाटत नाही. सेवेची प्रेरणा नसेल तर नावीन्याची अनुभूती संपली की ग्रामीण जीवन निरस वाटू लागते. खेड्यांमध्ये जाणा-या युवकांनी थोडीशी अडचण येताच आपले ध्येय सोडता कामा नये. ग्रामीण लोक शहरी लोकांपेक्षा फारसे वेगळे नाहीत व त्यांच्या समस्यांकडे तुम्ही जे लक्ष देता त्याचा व तुमच्या प्रेमाचा त्यांच्यावर नक्कीच अनुकूल प्रभाव पडतो हे धैर्याने प्रयत्न केल्यानंतरच सिद्ध करता येईल.

हे खरे आहे की खेड्यांमध्ये राहिल्यामुळे तुम्हाला देशातील महान नेत्यांशी संपर्क करता येणार नाही. परंतु ग्रामीणांच्या मानसिकतेतील विकासाबरोबरच नेत्यांनाही गावांचा दौरा करणे आवश्यक वाटू लागेल व ते गावांच्या अधिकाधिक संपर्कात येऊ लागतील. याशिवाय जर महापुरुषांचा सत्संग आवश्यक आहे असे तुम्हाला वाटत असेल तर तुम्ही चैतन्य, रामकृष्ण, तुलसीदास, कबीर, नानक,

दादू, तुकाराम, तिरुवल्लूवर इत्यादी अनेक प्रसिद्ध महापुरुषांचे साहित्य वाचून ते सुख मिळवू शकाल. याशिवाय इतरही अनेक संत झाले आहेत. ते यांच्यासारखेच प्रसिद्ध आणि पवित्र आहेत.

### साहित्य

अडचणींमुळे आपले मन चिरंतन मूल्यांचा स्वीकार करण्यास तयार होते. आपल्याला जर राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि वैज्ञानिक क्षेत्रांशी संबंधित आधुनिक विचारांचा अभ्यास करायचा असेल तर आपली जिज्ञासा शांत करण्यासाठी साहित्य उपलब्ध आहे. परंतु माझे मत आहे की जेवढ्या सहजपणे धार्मिक साहित्य उपलब्ध आहे तितक्या सहजपणे आधुनिक साहित्य उपलब्ध नाही. संतांनी सर्व लोकांकरिता लिहिले आणि उपदेश केला. आधुनिक विचारांचा सर्वसामान्य लोकांना समजण्यासारख्या भाषेत अनुवाद करण्याची परंपरा अजून चांगल्या पद्धतीने रुढ झालेली नाही. परंतु काळानुसार यात बदल नक्कीच होईल.

यामुळे मी युवकांना सल्ला देईन की त्यांनी.... धीर सोडू नये व आपला प्रयोग सुरू ठेवावा आणि आपल्या उपस्थितीने त्यांनी गावांना राहण्यालायक व आकर्षक बनवावे. हे काम ते तेव्हाच करू शकतील जेव्हा ग्रामवासीयांना स्वीकारार्ह होईल अशा प्रकारे ते गावातील लोकांची सेवा करू शकतील. याची सुरुवात प्रत्येक व्यक्ती ग्रामसफाई करून आणि आपल्या क्षमतेनुसार गावातील लोकांना शिक्षण देऊन करू शकते. कार्यकर्त्यांची जीवनपद्धती जर स्वच्छ, पद्धतशीर आणि कष्टाळूपणाची असेल तर ते ज्या गावात काम करत असतील त्या गावांमध्ये त्यांचा प्रभाव पडल्याशिवाय राहणार नाही.

(हरि, २०-२-१९३७, पृ. १६)

### समग्र ग्रामसेवा

समग्र ग्रामसेवकाचा त्याच्या खेड्यातील प्रत्येकाशी परिचय असला पाहिजे आणि त्याने ग्रामवासीयांची शक्य असेल, ती सर्व सेवा केली पाहिजे. याचा अर्थ असा नाही की तो सर्व काम एकटाच करू शकतो. ग्रामवासी कशा प्रकारे स्वतःच स्वतःची मदत करू शकतात हे तो त्यांना सांगेल व त्यांना जी काही मदत आणि साहित्य लागेल ते तो त्यांना उपलब्ध करून देईल. तो त्यांच्या मदतनीसांना प्रशिक्षित करेल. ग्रामवासीयांना आपल्याकडे विचारविनिमयाकरिता यावेसे वाटावे अशा प्रकारे तो त्यांचे मन जिंकून घेईल.

असे समजा की एक घाणी घेऊन एका गावात मी राहण्याकरिता गेलो तर मी १५-२० रुपये कमावणारा सामान्य तेली होणार नाही. मी एक महात्मा तेली होईन. मी इथे महात्मा हा शब्दप्रयोग विनोदाकरिता केला आहे. माझ्या म्हणण्याचा खरा अर्थ हा आहे की ग्रामवासीयांना अनुकरण करावेसे वाटावे असा मी आदर्श तेली होईन. मी असा तेली होईन की ज्याला गीता आणि कुराण यांची माहिती असेल. त्यांच्या मुलांना शिकवता येईल इतका मी शिकलेलो असेन. या कामाकरिता मला कदाचित वेळ मिळू शकणार नाही ही गोष्ट वेगळी. तेव्हा गावकरी माझ्याकडे येतील आणि मला म्हणतील की 'मेहेरबानी करून आमच्या मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था करून द्या.' तेव्हा मी त्यांना म्हणेन, 'मी तुमच्या मुलांकरिता एका शिक्षकाची व्यवस्था करू शकतो, परंतु त्याचा खर्च तुम्हाला द्यावा लागेल.' आणि ते अतिशय खुषीने या प्रस्तावाकरिता तयार होतील.

मी त्यांना कताई शिकवीन आणि जेव्हा ते मला विणकर आणून द्यायला सांगतील तेव्हा ज्याप्रमाणे मी शिक्षक आणून दिला होता त्याचप्रमाणे मी त्यांना विणकरही आणून देईन. आपण आपले कापड कसे विणू शकतो हे तो विणकर त्यांना समजावून सांगेल. स्वच्छतेच्या महत्त्वाची मी त्यांना जाणीव करून देईन आणि जेव्हा ते मला एखादा भंगी आणून द्यायला सांगतील तेव्हा मी त्यांना सांगेन की 'मीच तुमचा भंगी आहे आणि या कामाचे शिक्षण मीच तुम्हाला देईन.'

समग्र ग्रामसेवेची माझी कल्पना ही अशी आहे. तुम्ही म्हणाल की वर वर्णन केलेल्या तेल्यासारखा तेली आजच्या काळात कुठेही मिळणार नाही. माझे उत्तर असेल, 'जर असे असेल तर या काळात आपण गावाच्या सुधारणेची आशा करू शकत नाही.'.... अखेरीस जो माणूस तेलगिरणी चालवतो तो तेलीच तर असतो. त्याच्याजवळ पैसा असतो परंतु त्याची ताकद त्याच्या पैशात नसते. खरी ताकद ज्ञानात असते. खरे ज्ञान नैतिक अधिष्ठान आणि नैतिक शक्ती देते. अशा माणसाचा सल्ला प्रत्येकजण ऐकत असतो. (हरि, १७-३-१९४६, पृ. ४२)

## आर्थिक सर्वेक्षण

सर्व गावांचे सर्वेक्षण करण्यात येईल आणि त्या वस्तूंची यादी तयार करण्यात येईल ज्या कमीत कमी वा कोणत्याच प्रकारच्या मदतीशिवाय स्थानिक पातळीवर तयार करता येतील व ज्यांचा गावातच उपयोग होऊ शकेल वा ज्या गावाबाहेर विकता येतील. उदाहरणार्थ तेलघाणीतून काढलेले तेल आणि ढेप, तेलघाणीतून काढले गेलेले

जळणाचे तेल, हातकुटीचा तांदूळ, ताड, गूळ, मध, खेळणी, चटया, हाताने बनवलेला साबण इत्यादी. अशा प्रकारे पुरेसे लक्ष दिले गेले तर जी गावे एक तर निर्जीव झाली आहेत वा होण्याच्या प्रक्रियेत आहेत त्या गावांमध्ये पुन्हा नवजीवनाचा संचार होऊ शकेल. तसेच त्यांनी स्वतःकरिता आणि भारतातील लहानमोठ्या शहरांच्या उपयोगाकरिता आवश्यक असलेल्या अधिकांश वस्तू गावातच तयार करण्याच्या शक्यतेचा आपल्याला अंदाज येईल. (हरि, २८-४-१९४६, पृ.१०४)

## कला आणि शिल्प

ग्रामवासीयांनी आपले कौशल्य इतके वाढवले पाहिजे की, त्यांनी तयार केलेल्या वस्तू बाहेर जाताच हातोहात खपल्या पाहिजे. आपल्या गावांचा पूर्ण विकास होईल तेव्हा गावांमध्ये उच्च दर्जाचे कौशल्य आणि कलात्मक प्रतिभा असलेल्या लोकांची उणीव राहणार नाही. तेव्हा गावाचे स्वतःचे कवी असतील, कलावंत असतील, वास्तुशिल्पी असतील, भाषाविद असतील आणि संशोधकही असतील. थोडक्यात जीवनात ज्या कोणत्या गोष्टीची गरज असते त्या सर्व गावात उपलब्ध असतील.

आज आपली खेडी शेणाचे उकिरडे मात्र आहेत. उद्या ते सुंदर सुंदर वाटिकांचे रूप घेतील. तिथे इतके बुद्धिमान लोक राहतील की त्यांना कोणी फसवूही शकणार नाही आणि त्यांचे कोणी शोषणही करू शकणार नाही. वर सांगितल्याप्रमाणे गावांच्या पुनर्निमाणाचे काम ताबडतोब सुरू केले पाहिजे.... गावांचे पुनर्निर्माण तात्पुरते नाही तर कायमस्वरूपी झाले पाहिजे. (हरि, १०-११-१९४६, पृ. ३९४)

## आर्थिक पुनर्रचना

आर्थिक दृष्टीने आणि आरोग्यरक्षणाच्या दृष्टीने लाखो उपाशी लोकांचा कसा लाभ होऊ शकेल व यासंबंधी काही बाजूंवर ताबडतोब कसे काम सुरू केले पाहिजे हे मी पूर्ण स्वदेशी संबंधीच्या लेखनातून दाखवले आहे. देशातील श्रीमंताहून श्रीमंत माणसे या लाभाचे वाटेकरी होऊ शकतात. कल्पना करा की जुन्या पद्धतीप्रमाणे गावांमध्ये भाताची हातकुटाई होऊ लागली तर त्यामुळे मिळणारी मजुरी भातकांडपाचे काम करणा-या लाखो भगिनींच्या खिशात जाईल आणि भात खाणा-या लाखो लोकांना पिष्टमय पदार्थाने युक्त असलेला पॉलिशचा निकस तांदूळ न खावा लागता हातसडीचा सकस तांदूळ खाता येईल.

माणसाचा लोभ त्याच्या पायदळी येणा-या लोकांच्या आरोग्याची वा संपत्तीची मुळीच पर्वा करत नाही. भात पिकवणा-या क्षेत्रांमध्ये ठिकठिकाणी उघडलेल्या घृणित भातगिरण्या याचे ढळढळीत उदाहरण आहे. लोकमत जर शक्तिशाली झाले तर ते पॉलिशविरहित तांदळावर जोर देऊन सर्व भातगिरण्या बंद करायला लावू शकते आणि संपूर्ण राष्ट्राच्या आरोग्याला हानी पोहचवणा-या आणि गरीब लोकांच्या उपजीविकेचे साधन काढून घेणा-या भातगिरण्या बंद करण्याचे आवाहन ते भातगिरणी मालकांना करू शकते. (हरि, २६-१०-१९३४, पृ. २९२)

....माझे तर म्हणणे आहे की खेडी नष्ट झाली तर भारतच नष्ट होऊन जाईल. तेव्हा भारत भारत राहणार नाही. भारताला जगात जी भूमिका वठवायची आहे तीच संपून जाईल. गावांचे पुनरुज्जीवन तेव्हाच शक्य आहे जेव्हा त्यांचे शोषण बंद होईल. उद्योगीकरणाबरोबर स्पर्धा आणि बाजार यांच्या समस्या जुळलेल्या असल्यामुळे मोठ्या प्रमाणावरील उद्योगीकरणामुळे ग्रामीणांचे सक्रिय वा निष्क्रिय शोषण होणे अपरिहार्य आहे.

यामुळेच आपल्याला गावांना स्वावलंबी बनवण्यावर जोर द्यावा लागेल. ते आपल्या उपयोगाच्या वस्तू स्वतः बनवतील. ग्रामोद्योगांचे अशा प्रकारे जर रक्षण केले गेले तर मग ग्रामवासीयांनी त्या आधुनिक यंत्रांचा आणि अवजारांचाही उपयोग करायला हरकत नाही ज्यांना ते बनवू शकतात व ज्यांचा उपयोग करण्याची क्षमता त्यांच्यात असते. एवढे खरे की त्यांनी इतरांच्या शोषणाचे साधन बनू नये. (हरि, २९-८-१९३६, पृ. २२६)

**अहिंसक अर्थव्यवस्था**

फॅक्टरी संस्कृतीवर तुम्ही अहिंसेची इमारत उभारू शकत नाही, परंतु स्वावलंबी गावांवर उभारू शकता.... ग्रामीण अर्थव्यवस्थेबद्दल माझी जी धारणा आहे तिच्यात शोषणाला कोणतेच स्थान नाही आणि शोषणच हिंसेचे सार आहे. यामुळेच तुम्हाला अहिंसक बनायचे असेल तर तुम्हाला ग्रामीण मानसिकता तयार करावी लागेल आणि ग्रामीण मानसिकतेचा अर्थ आहे चरख्यावर श्रद्धा. (हरि, ४-११-१९३९, पृ. ३३१)

आपल्याला दोघांमधून एक गोष्ट निवडावी लागेल. गावांमधील भारत, जो त्या गावांएवढाच प्राचीन आहे वा शहरी भारत, जो विदेशी सत्तेचा परिणाम आहे. आज शहरांचे प्रभुत्व आहे व ते खेड्यांचे अशा प्रकारे शोषण करत आहेत की,

खेडी उजाड बनत आहेत. खादीची माझी मानसिकता मला सांगते की, जेव्हा शहरांचे प्रभुत्व संपेल तेव्हा ती गावांना मदत करणा-याच्या भूमिकेत येतील. गावांचे शोषण स्वतःच एक हिंसा आहे. स्वराज्य अहिंसेवर आधारित असावे, अशी आपली इच्छा असेल तर आपण गावांना त्यांचे योग्य स्थान दिले पाहिजे. (हरि, २०-१-१९४०, पृ. ४२३)

## आहारविषयक सुधारणा

खेड्याच्या आर्थिक पुनर्रचनेचे काम आहारविषयक सुधारणांपासून सुरू झालेले असल्यामुळे ग्रामवासी आपले हरवलेले आरोग्य परत मिळवू शकतील असे अगदी साधे आणि स्वस्त खाद्यपदार्थ कोणते आहेत याचा शोध घ्यावा लागेल. त्यांच्या आहारात हिरव्या पालेभाज्यांचा समावेश करण्यात आला तर आज ज्या आजारामुळे ते ग्रस्त आहेत त्यातील बरेचसे दूर होतील.

ग्रामीणांच्या आहारात जीवनसत्वांची उणीव आहे, त्यातील बहुतेक जीवनसत्व ताज्या हिरव्या पालेभाज्यांमधून मिळू शकतात. एका प्रसिद्ध डॉक्टरने मला सांगितले आहे की, हिरव्या पानांचा योग्य उपयोग करण्यात आला तर आहार-विषयक प्रचलित विचारांमध्ये क्रांती होऊ शकेल आणि जे पोषण सध्या दुधापासून मिळते ते हिरव्या पानांपासून मिळू शकेल. (हरि, १५-२-१९३५, पृ. १)

## शक्तिचलित यंत्रे

प्रत्येक गावातील सर्व घरांमध्ये वीज आली तर ग्रामवासीयांनी आपली अवजारे आणि यंत्रे विजेवर चालवण्यावर माझा कोणताही आक्षेप राहणार नाही. परंतु विद्युत केंद्रांचे स्वामित्व एक तर शासनाकडे असले पाहिजे वा ग्रामसमूहाकडे. सध्या गायरानाबद्दल हीच परिस्थिती आहे. परंतु जिथे वीजही नसेल आणि यंत्रेही नसतील तिथे रिकाम्या हातांनी काय करावे? (हरि, २२-६-१९३५, पृ. १४६)

हजारो गावामध्ये सुरू झालेल्या पीठगिरण्या या लाचारीची हद्द आहेत असे मी समजतो. या सर्व पीठ गिरण्यांची यंत्रे भारतातच बनत असतील असे मला वाटत नाही. सर्व खेड्यांमध्ये अशा प्रकारे दळणयंत्रे लावणे हेसुद्धा हावरटपणाचे चिन्ह आहे. गरीब माणसाच्या पोटावर लाथ मारून अशा प्रकारे आपले खिसे भरणे कितपत उचित आहे? अशी यंत्रे हजारो जात्यांना बेकार करतात. त्यामुळे हजारो घरगुती स्त्रिया बेकार होतात आणि जाते बनवणा-या कारागिरांचा धंदा बसतो.

याशिवाय अजून एक गोष्ट आहे. ही प्रवृत्ती संक्रामक असते. यामुळे सर्व ग्रामोद्योगांना ती खाऊन टाकील. ग्रामोद्योगाचा -हास झाला तर कलेचा -हास होण्यातही त्याची परिणती होईल. याचा अर्थ असा असेल की जुन्या हस्तकौशल्याची जागा नवीन हस्तकौशल्य घेईल तर मग काही हरकत नाही. परंतु असे घडत नाही. ज्या हजारो गावांमध्ये शक्तिचलित पीठगिरण्या लागल्या आहेत तिथे सुप्रभाती ऐकू येणारे जात्यावरील मधुर संगीत कायमचे झोपले आहे. (हरि, १०-३-१९४६, पृ. ३४)

## ७८. पंचायतराज

### ग्राम गणतंत्र

भारताला ग्राम गणतंत्राचा अनुभव आहे. माझा अंदाज आहे की नकळत का होईना ते अहिंसेद्वारा संचालित होते.... आता जाणीवपूर्वक अहिंसेच्या योजनेच्या अंतर्गत त्यांचे पुनरुज्जीवन करावे लागेल. (हरि, ४-८-१९४०, पृ. २४०)

सर्वोत्तम, सर्वात वेगवान आणि सर्वात कार्यक्षम उपाय तळापासून बांधणी करायला सुरुवात करणे हाच आहे.... प्रत्येक गावाने स्वयंपूर्ण गणतंत्र झाले पाहिजे. याकरिता फार मोठ्या प्रस्तावाची गरज नाही. याकरिता साहसपूर्ण, सामूहिक आणि विवेकपूर्ण कामाची गरज आहे.... (हरि, १८-१-१९२२, पृ. ४)

स्वातंत्र्याची सुरुवात तळापासून झाली पाहिजे. त्यानुसार प्रत्येक गाव एक गणतंत्र वा पंचायत असेल व त्याला सर्व अधिकार असतील. याचा अर्थ असा आहे : प्रत्येक गावाला स्वावलंबी व्हावे लागेल व स्वतःच्या समस्यांची सोडवणूक गावाला स्वतःलाच करावी लागेल. एवढेच नाही तर जगापासून स्वतःचे रक्षण करण्याचे सामर्थ्यही त्याला विकसित करावे लागेल. बाह्य आक्रमणापासून आपले रक्षण करण्याकरिता आणि आवश्यकता निर्माण झाल्यास त्या प्रयत्नात स्वतः नष्ट होण्याकरिता गावातील लोकांना प्रशिक्षित आणि प्रोत्साहित केले जाईल.

याचा अर्थ असा नाही की तो शेजा-यांवर वा बाहेरच्या जगावर अगदीच अवलंबून राहणार नाही वा त्यांनी स्वतःहोऊन केलेल्या मदतीचाही स्वीकार केला जाणार नाही. परंतु परस्परांतील हा व्यवहार उभय पक्षांच्या इच्छेने आणि स्वतंत्रपणे घेतलेल्या निर्णयाद्वारे होईल. असा समाज अपरिहार्यपणे सुसंस्कृत असेल. त्यातील प्रत्येक पुरुषाला आपल्याला काय हवे आहे याचे ज्ञान असेल आणि याहूनही महत्त्वाची गोष्ट ही आहे की, जी गोष्ट तितकेच श्रम

केल्यानंतर दुस-याला मिळू शकणार नाही त्या गोष्टीची इच्छा करू नये हेही त्याला माहीत असेल.

असा समाज सत्य आणि अहिंसेवर आधारित असला पाहिजे. परंतु माझ्या मते जोपर्यंत ईश्वरावर जागृत श्रद्धा नसेल तोपर्यंत असे शक्य नाही. जो ईश्वर स्वयंभू आणि सर्वज्ञ आहे, जो विश्वातील सर्व ज्ञात शक्तीमध्ये समाविष्ट आहे, जो कोणावरही आधारित नाही आणि जो सर्व शक्ती नष्ट झाल्यानंतरही कायम राहतो अशा सर्वसमावेशक जागृत प्रकाशावर श्रद्धा ठेवल्याशिवाय मी तर जीवनाची कल्पनाही करू शकत नाही.

## विस्तारशील वलय

असंख्य गावांच्या या ढाच्यात एकानंतर एक विस्तारशील, परंतु कधीही उर्ध्वगामी न होणारी वलये असतील. तळाला शिखराचे ओझे वाहावे लागते अशा प्रकारच्या पिरॅमिडसारखे जीवन त्या व्यवस्थेत नसेल. उलट त्या व्यवस्थेतील जीवन अशा एखाद्या समुद्री वलयाप्रमाणे असेल ज्याच्या केंद्रस्थानी व्यक्ती असेल व ती आपल्या गावाकरिता मरायलाही तयार असेल. गाव ग्रामसमूहाकरिता नष्ट होण्याकरिता तयार असतील आणि ही प्रक्रिया अखेरपर्यंत सुरू राहील. तिथे संपूर्ण विश्व एक जीव होऊन जाईल. हे सर्व जीव त्या एकाच जिवाचे अवयव असतील. ते कधीही आक्रमक होणार नाहीत, उलट ते नेहमी नम्रपणाने वागतील आणि ही सर्व वलये त्या समुद्राच्या ऐश्वर्याचे वाटेकरी होतील ज्याचे ते मूलभूत घटक आहेत.

या समुद्री वलयांमध्ये बाह्य परिघाजवळ आतील परिघाला चिरडण्याची शक्ती नसेल. उलटपक्षी आपल्या आतील सर्व परिघांना तोच शक्ती प्रदान करील आणि स्वतः त्यांच्यापासून शक्ती घेईल. या सर्व दिवास्वप्नाच्या गोष्टी आहेत आणि यांच्याकडे लक्ष देण्याची मुळीच गरज नाही असे यावर लोक म्हणू शकतील. युक्लिडच्या बिंदूचे, जरी कोणीही तो कागदावर काढू शकणार नाही तरी, अक्षय मूल्य आहे तसेच माझे वरील चित्रही मानवजातीकरिता अमूल्य आहे.

## आदर्श

हे आदर्श चित्र आपण जरी कधीही पूर्णपणे वास्तवात आणू शकणार नसलो तरी भारताने या आदर्श चित्राकरिता जगले पाहिजे. आपल्याला जे हवे आहे त्याचे आपल्यासमोर आधी योग्य चित्र असले पाहिजे. तसे असले तरच आपण ते प्राप्त

करण्याच्या दिशेने प्रयत्न करू शकू. भारतातील प्रत्येक गाव कधी तरी गणतंत्र बनले तर माझा दावा आहे की माझे चित्र खरे ठरेल, त्यात निम्नतम व्यक्ती उच्चतम व्यक्तीच्या बरोबरीची असेल म्हणजेच ना कोणी वरचा असेल ना कोणी खालचा.

या चित्रात सर्व धर्मांना पूर्ण आणि बरोबरीचे स्थान आहे. आपण सर्व एका भव्य वृक्षाची पाने आहोत आणि या वृक्षाची मुळे पृथ्वीच्या गर्भात अशा रीतीने रुजली आहेत की त्या मुळांपासून बुंध्याला वेगळे करता येऊ शकत नाही. कितीही मोठे वादळ आले तरी ते या वृक्षाला जागेवरून हलवू शकणार नाही.

या चित्रात अशा कोणत्याही यंत्रांना स्थान नाही जी मानव श्रमाला हुसकून लावतात आणि मूठभर लोकांच्या हाती शक्ती केंद्रित करतात. सुसंस्कृत मानवी परिवारात श्रमाचे स्थान अद्वितीय आहे. अशा प्रत्येक यंत्राचे स्वागत आहे जे प्रत्येकाचे श्रम कमी करते. असे कोणते यंत्र असू शकते यावर मी अजून विचार केलेला नाही. एक गोष्ट मात्र मी मान्य करायला तयार आहे. सिंगरचे शिवणयंत्र माझ्या लक्षात आहे. परंतु तो विचारही वरवरचा आहे. माझे चित्र पूर्ण करण्याकरिता मला त्याची गरज नाही. (हरि, २८-७-१९४६, पृ. २३६)

मला माहीत आहे की एक आदर्श गाव निर्माण करणे तेवढेच कठीण असते जेवढे कठीण आदर्श भारत निर्माण करणे आहे. परंतु एका व्यक्तीकरिता आपल्या जीवनकाळात एका गावाला आदर्श रूप देणे शक्य असतानाच आदर्श भारत निर्माण करण्याकरिता एका व्यक्तीचा जीवनकाळ फार अल्प ठरतो. परंतु एक माणूस एका गावाला आदर्श रूप देऊ शकत असेल तर तो संपूर्ण देशासमोरच नाही तर जगासमोरही एक आदर्श चित्र प्रस्तुत करील. सत्यशोधकाने यापेक्षा मोठी आकांक्षा ठेवू नये. (हरि, ४-८-१९४०, पृ. २३५)

## ग्रामगणतंत्रांतर्गत

मी अशा भारताची कल्पना करत नाही की जो दारिद्र्याने पिचलेला असेल व जिथे करोडो अज्ञानी लोक राहत असतील. माझ्या कल्पनेतील भारत आपल्या स्वभावाप्रमाणे निरंतर प्रगती करणारा देश असेल. परंतु भारताने पश्चिमेच्या मरणासन्न संस्कृतीच्या तिस-या दर्जाची वा फारच चांगले झाले तर पहिल्या दर्जाची नक्कल बनावे अशी माझी इच्छा नाही.

जर माझे स्वप्न खरे होणार असेल तर देशातील सात लाख गावांमधील

प्रत्येक गाव गणतंत्र बनेल. त्यात कोणीही निरक्षर नसेल, कोणी बेरोजगार नसेल, प्रत्येकाजवळ भरपूर काम असेल आणि पौष्टिक आहार असेल, हवेशीर घर असेल, शरीर झाकण्याकरिता पुरेशी खादी असेल, सर्व गावक-यांना आरोग्याच्या आणि स्वच्छतेच्या नियमांचे ज्ञान असेल व ते त्या नियमांचे पालन करत असतील. अशा परिस्थितीत राज्याच्या गरजा विविध आणि वाढत्या असतील. त्यांची पूर्ती गावाला करावी लागेल नाहीतर गावाची प्रगती थांबेल. (हरि, ३०-७-१९३८, पृ. २००)

## ग्रामस्वराज्य

ग्रामस्वराज्याच्या माझ्या कल्पनेप्रमाणे ते एक पूर्ण गणतंत्र असेल. आपल्या मूलभूत गरजांकरिता ते आपल्या शेजा-यांवर अवलंबून नसेल. परंतु तरीही ज्या बाबतीत अवलंबून राहणे आवश्यक असेल तिथे गावकरी परस्परांवर अवलंबून राहतील. याप्रमाणे प्रत्येक गावाला आपल्या खाण्याकरिता धान्य आणि कपड्याकरिता कापूस या गोष्टी पिकवाव्या लागतील. आपल्या जनावरांकरिता तो गायरानाची आणि मुलांच्या मनोरंजनाकरिता व खेळण्याकरिता मैदानाचीही व्यवस्था करील. यानंतरही जमीन शिल्लक राहिली तर अफू, गांजा व तंबाखू या गोष्टी सोडून तो इतर पीक घेईल.

गावात एक नाट्यगृह, शाळा आणि सार्वजनिक सभागृह असेल. त्याची एक पाणीपुरवठ्याची व्यवस्था असेल व तिच्याद्वारे ते स्वच्छ पाण्याच्या पुरवठ्याची व्यवस्था करील. ही व्यवस्था पाणीपुरवठा मंडळाच्या नियंत्रणातील विहिरी आणि तलाव यांच्या माध्यमातून केली जाऊ शकेल. मूलभूत शिक्षणाच्या अंतिम वर्षापर्यंतचे शिक्षण सक्तीचे असेल. जोपर्यंत शक्य असेल तोपर्यंत सर्व कामे सहकाराच्या तत्त्वावर चालवण्यात येतील. आजच्यासारखी उतरंड असलेली जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता तिथे नसेल.

सत्याग्रह आणि असहकार या तंत्राचा आधार असलेली अहिंसेची शक्ती ग्रामसमुदायावर नियंत्रण ठेवील. ग्रामरक्षकाच्या रूपाने सर्वांना अनिवार्य सेवा करावी लागेल. रक्षण करणा-यांची निवड गावात ठेवलेल्या रजिस्टरमधून आळीपाळीने केली जाईल.

## गावाचे प्रशासन

गावाचे प्रशासन पाच लोकांची पंचायत चालवील. ही पंचायत किमान पात्रता

असणा-या सर्व प्रौढ स्त्री-पुरुषांद्वारे दरवर्षी निवडली जाईल. या पंचांजवळ आवश्यक ते सर्व अधिकार आणि अधिकारक्षेत्र (ज्युरिस्डिक्शन) असतील. रूढ पद्धतीनुसार शिक्षा करण्याकरिता कोणतीही व्यवस्था नसल्यामुळे ही पंचायतच आपल्या कार्यकाळात विधिमंडळ, न्यायपालिका आणि कार्यपालिका या तिघांचेही अधिकार स्वतःकडे घेईल व आपली जबाबदारी पार पाडेल....

पंचायतीचे आपल्या शेजारी गावांच्या केंद्राबरोबर कसे संबंध असतील किंवा नाही, याचा विचार मी अजून केलेला नाही. ग्रामप्रशासनाची रूपरेखा सादर करणे एवढाच माझा उद्देश आहे. गावात संपूर्ण लोकशाही असेल व व्यक्तिगत स्वातंत्र्यावर ती आधारित असेल. व्यक्ती आपल्या सरकारची निर्माती असेल. तिच्यावर आणि तिच्या सरकारवर अहिंसेचे शासन असेल. आपल्या गावाच्या सन्मानाप्रीत्यर्थ आपल्या प्राणाची आहुती देण्याकरिता प्रत्येक गावकरी तयार असल्यामुळे प्रत्येक व्यक्ती आणि तिचे गाव सर्व जगाला आव्हान देऊ शकेल....

वर जे चित्र सादर करण्यात आले आहे त्यात अशक्य असे काहीही नाही. अशा आदर्श गावाची स्थापना करण्याकरिता व्यक्तीच्या जीवनाचा पूर्ण काळ लागू शकतो. ख-या लोकशाहीचे आणि ग्रामीण जीवनाचे प्रेम असणारी व्यक्ती जर एक गाव निवडेल आणि तेच आपले जग आहे व एकमेव काम आहे असे मानून ती व्यक्ती त्या कामात पडली तर बरेच चांगले परिणाम मिळू शकतात. (हरि, २६-७-१९४२. पृ. २३८)

### लोकमत

पंचायत राज्य स्थापन झाल्यानंतर लोकमत ते काम करू शकते जे हिंसा कधीही करू शकत नाही. जमीनदार, भांडवलदार आणि राजे यांच्या सध्याच्या शक्तीचा गवगवा तोपर्यंतच असू शकतो जोपर्यंत सर्वसामान्यांना आपल्या शक्तीची जाणीव होत नाही. जर लोक जमीनदार आणि भांडवलदार यांच्या वाईटपणाशी असहकार करू लागले तर तो मुळापासूनच नाहीसा होऊन जाईल. पंचायत राजमध्ये केवळ पंचायतीचाच हुकूम चालेल आणि आपल्याच कायद्याप्रमाणे पंचायत काम करेल. (हरि, १-६-१९४७,पृ.१७२)

खरे सत्ताधीश तर मेहनत करणारे लोक आहेत. (हरि, १५-६-१९४७,पृ.१९३)

### शेतकरी पाठीचा कणा आहे

साहजिकच पंचायत राज्यांतर्गत भारतात सर्वाधिक महत्त्व शेतक-याचे राहील.प्रश्न

आहे पंचायत राज्यांना पुढे कसे न्यायचे? (हरि, ७-१२-१९४७, पृ. ४५८)

पंचायतींजवळ जितकी अधिक शक्ती असेल तितकेच लोकांकरिता चांगले होईल. एक गोष्ट अजून आहे की पंचायती तेव्हाच प्रभावी आणि कार्यक्षम होतील जेव्हा लोकांच्या शैक्षणिक दर्जात भरघोस वाढ होईल. मी लोकांच्या शक्तीबद्दल जे बोलतो आहे ते सैनिक शक्तीबद्दल नाही तर नैतिक शक्तीबद्दल बोलतो आहे. स्वाभाविकपणेच या बाबतीत मी नई तालीमवर विसंबून आहे.
(हरि, २१-१२-१९४७, पृ. ४७३)

## पंचायतीचे कार्य

प्रामाणिकपणा आणि मेहनत यांना परत प्रतिष्ठा मिळवून देणे, हे पंचायतीचे कार्य आहे.... जर पंचायतीतील भांडणे मिटवायची असतील तर भांडण करू नये असे गावातील लोकांना शिकवणे हे पंचायतीचे काम आहे. पंचायतीद्वारे कोणत्याही खर्चाशिवाय न्याय दिला जाऊ शकतो आणि तुम्हाला ना पोलिसांची गरज पडेल ना सैन्याची....

पंचायतींनी पशुसुधारणेकडे लक्ष दिले पाहिजे.... तिने उत्तम पशूंच्या जातींचा विकास करून दाखवला पाहिजे, गावातील दुग्धोत्पादनात आणि.... गावातील धान्योत्पादनात पुरेशी वाढ करून दाखवली पाहिजे. याकरिता जमिनीत योग्य खत टाकण्याची गरज राहील.

तुमच्याजवळ खेळण्याकरिता देशी खेळ आहेत. मादक पेये आणि नशा आणणारी औषधे यांचे सेवन पूर्णपणे बंद झाले पाहिजे. तुमच्या गावात थोडीशीही अस्पृश्यता कायम असेल तर तिचे अस्तित्वही शिल्लक राहायला नको. हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, पारशी, शीख या सर्वांनी भावंडांप्रमाणे राहिले पाहिजे. मी वर जे काही सांगितले आहे ते जर तुम्ही करून दाखवाल तर संपूर्ण भारतातील लोक तुमचे आदर्श गाव पाहण्याकरिता येतील आणि तुमच्याकडून प्रेरणा घेतील.
(हरि, ४-१-१९४८, पृ. ५००)

## पंचायतीची स्थिती

आपण जर पंचायत राज्याचे वा ख-या लोकशाहीचे स्वप्न पूर्ण झालेले पाहू शकलो तर आपण सगळ्यात दीन आणि खालच्या वर्गातील माणसालासुद्धा मोठ्यात मोठ्या व्यक्तीच्या बरोबरीने भारताच्या शासकाचा दर्जा देऊ शकू. हे तेव्हाच शक्य होईल जेव्हा लोक शुद्ध असतील व जे शुद्ध नसतील ते शुद्ध होतील

आणि शुद्धतेबरोबर बुद्धिमत्तेचाही योग असावा. तेव्हाच एखादी व्यक्ती एक समुदाय आणि दुसरा समुदाय, अथवा जात आणि जातीतून वाळीत टाकण्यात आलेला यांच्यात भेद मानणार नाही. प्रत्येक व्यक्ती दुस-या व्यक्तीला आपल्या बरोबरीची समजेल व तिला प्रेमाच्या रेशमी बंधनाने बांधून ठेवेल. कोणी कोणालाही अस्पृश्य मानणार नाही. मेहनत करणारा मजूर व श्रीमंत भांडवलदार यांना आपण सारख्याच दृष्टीने पाहू. प्रत्येक व्यक्तीला शारीरिक कष्ट करून प्रामाणिकपणे आपली भाकरी मिळवता येईल व ती बौद्धिक आणि शारीरिक कष्टांमध्ये कोणताही भेदभाव करणार नाही. ही गोष्ट लवकरात लवकर व्हावी म्हणून आपणही स्वतःला भंगी समजू. कोणताही शहाणा माणूस अफू, दारू या मादक गोष्टींना स्पर्शही करणार नाही. प्रत्येक व्यक्ती स्वदेशीला आपला प्राण समजेल आणि प्रत्येक पुरुष आपल्या पत्नीशिवाय इतर सर्व स्त्रियांना त्यांच्या वयाप्रमाणे आई, बहीण वा मुलगी समजेल व आपल्या अंतःकरणात त्यांच्याबद्दल कधीही कामवासना निर्माण होऊ देणार नाही. आवश्यकता निर्माण झाल्यानंतर प्रत्येक माणसाची प्राणाची आहुती देण्याची तयारी राहील परंतु दुस-याचा जीव घेण्याचा विचार त्याच्या मनात कधीही येणार नाही.... (हरि, १८-१-१९४८, पृ. ५१७)

## ७९. शिक्षण

प्राचीन सुभाषित 'सा विद्या या विमुक्तये' आजही तितकेच सत्य आहे जितके आधी होते. इथे शिक्षणाचा अर्थ केवळ आध्यात्मिक शिक्षण असा नाही, विमुक्तीचा अर्थ मृत्यूनंतर मोक्ष असाही नाही. मानवजातीच्या सेवेकरिता उपयोगी असलेल्या सर्व प्रकारच्या शिक्षणाचा ज्ञानात समावेश होतो आणि विमुक्ती म्हणजे सर्व प्रकारच्या पारतंत्र्यातून मुक्तता. यात सध्याच्या परिस्थितीचाही समावेश आहे - म्हणजे बाह्य सत्तेची गुलामगिरी आणि माणसाच्या स्वतःच्या कृत्रिम गरजांची गुलामगिरी यांच्यापासून मुक्ती. याच आदर्शाच्या प्राप्तीकरिता करण्यात आलेले ज्ञानार्जन म्हणजे खरे शिक्षण. (हरि, १०-३-१९४६, पृ. ३८)

### जगण्याचे ज्ञान

आज शुद्ध पाणी, शुद्ध पृथ्वी आणि शुद्ध हवा या गोष्टींचा आपल्याला परिचय नाही. आकाश आणि सूर्य यांचे अपरिमित मूल्य आपल्याला कळत नाही. आपण जर पंचतत्त्वांचा (पृथ्वी, जल, आकाश, अग्नी आणि वायू) सुज्ञपणाने उपयोग

केला आणि योग्य व संतुलित आहार घेतला तर आपण युगांचे काम पूर्ण करू शकू. हे ज्ञान मिळवण्याकरिता ना बुद्धीची गरज आहे ना करोडो रुपयांची. याकरिता ईश्वरावर जागृत विश्वास पाहिजे, सेवा करण्याचा उत्साह पाहिजे, पंचतत्त्वांशी परिचय पाहिजे आणि आहार विज्ञानाचा परिचय पाहिजे. शाळांमध्ये आणि महाविद्यालयांमध्ये वेळ न घालवताही या गोष्टी मिळवता येऊ शकतात. (हरि, १-९-१९४६, पृ. २८६)

कोणत्याही प्रकारचे ज्ञान मिळवायचे असेल तर पहिली अट आहे - सतत प्रश्न विचारणे आणि शुद्ध जिज्ञासा. जिज्ञासेच्या मुळात नम्रता आणि गुरूबद्दल आदरभाव असला पाहिजे. जिज्ञासेत विकृती होऊन ती उद्धटपणात बदलणार नाही या बाबीकडे लक्ष ठेवले पाहिजे. उद्धटपणा माणसाच्या ग्रहणशीलतेचा शत्रू आहे. विनम्रता आणि शिकण्याची इच्छा यांशिवाय ज्ञानप्राप्ती अशक्य आहे. (हरि, ८-९-१९४६, पृ. ३०६)

नव्या जगाच्या निर्मितीकरिता शिक्षणही नवीन पद्धतीचे पाहिजे.
(हरि, १९-१-१९४७, पृ. ४९४)

साक्षरता आणि विद्वत्ता यांमुळे माणूस माणूस बनत नाही, तर ख-या जीवनाकरिता घेतलेल्या शिक्षणामुळे तो माणूस बनतो. (हरि, २-२-१९४७, पृ.३)

माझा आग्रह आहे की प्रौढ मताधिकाराबरोबरच वा त्याआधी विश्वशिक्षणाची व्यवस्था केली पाहिजे. हे शिक्षण पुस्तकी असणे अपरिहार्य नाही. बहुधा पुस्तकांची भूमिका मदतनीसाची राहू शकेल. मला वाटते की, इंग्रजी शिक्षणाने आपल्या मनाची उपासमार केली आहे, आपल्याला दुर्बल बनवले आहे आणि शूर नागरिकाचे कर्तव्य बजावण्याकरिता त्याने आपल्याला कधीही तयार केले नाही. मी समृद्ध भाषेमध्ये असे ज्ञान देईन की ज्यामुळे देशाला तुमच्याबद्दल अभिमान वाटेल. आपल्यात जर प्रामाणिकपणा आणि उत्साह असेल तर नागरिकत्वाचा अर्थ कळू शकेल असे शिक्षण अल्पकाळात देता येऊ शकते. (हरि, २-३-१९४७, पृ. ४६)

### श्रमप्रतिष्ठा

आपला बहुतांश वेळ आपल्या उपजीविकेकरिता श्रम करण्यातच जात असल्यामुळे आपल्या मुलांना सुरुवातीपासूनच अशा प्रकारच्या श्रमप्रतिष्ठेचा पाठ शिकवला पाहिजे असे माझे मत आहे. आपली मुले श्रमाला कमी लेखू

लागतील अशा प्रकारचे शिक्षण त्यांना दिले जाऊ नये. शेतक-याचा मुलगा शाळेत जाऊ लागल्यानंतर त्याने शेतमजूर म्हणून काम न करण्याचे कोणतेही कारण नाही, परंतु आज तसे होताना दिसते. (यंग, १-९-१९२१, पृ. २७७)

पुस्तकी शिक्षण हाताच्या शिक्षणानंतर सुरू झाले पाहिजे. हात माणसाला निसर्गाकडून मिळालेली अशी देणगी आहे की जी माणसाला पशूपासून वेगळे करते. लिहिण्या-वाचण्याची कला आल्याशिवाय माणसाचा पूर्ण विकास अशक्य आहे हा अंधविश्वास आहे. हे खरे आहे की ज्ञानामुळे जीवनाला शोभा येते. परंतु माणसाच्या नैतिक, शारीरिक वा भौतिक विकासाकरिता ते अपरिहार्य नाही. (हरि, ८-३-१९३५, पृ. २८)

माझे मत आहे की बुद्धीचे खरे शिक्षण हात, पाय, डोळे, कान, नाक इत्यादी शरीराच्या अवयवांना योग्य व्यायाम दिल्यामुळेच होऊ शकते. वेगळ्या शब्दांत मुलांना त्यांच्या शारीरिक अवयवांचा बुद्धिमत्तापूर्वक उपयोग करण्याचे शिक्षण देणे हीच त्यांच्या बुद्धीचा सर्वोत्तम जलद विकास करण्याची उत्तम पद्धती आहे. परंतु जोपर्यंत बुद्धी आणि शरीराच्या विकासाबरोबरच त्याच्या आत्म्याच्या जागृतीचे काम चालत नाही तोपर्यंत विकास एकांगी असल्याचे सिद्ध होईल. आध्यात्मिक शिक्षणाचा माझा अर्थ आहे हृदयाचे शिक्षण. यामुळेच बुद्धीचा उचित आणि संपूर्ण विकास तेव्हाच होऊ शकतो जेव्हा मुलाच्या शारीरिक आणि आध्यात्मिक क्षमतांची प्रगती शिक्षणासोबतच बरोबरीने होत राहील. हे सर्व अविभाज्य घटकाप्रमाणे आहे. यामुळे असे समजणे चूक आहे की या तत्त्वानुसार या सगळ्या गोष्टींचा विकास तुकड्यातुकड्यांनी वा वेगवेगळा करता येईल.

## सुसंगतीपूर्ण मिश्रण

शरीर, बुद्धी आणि आत्मा यांच्या विविध क्षमतांमध्ये सुसंवाद आणि सामंजस्य नसले तर त्यापासून होणारे दुष्परिणाम स्पष्ट आहेत. आपल्या चोहोकडे ते दिसू शकतात. परंतु सध्याच्या विकृत गोष्टींची आपल्याला सवय झालेली असल्यामुळे आपल्याला त्यांची जाणीव होत नाही....(हरि, ८-५-१९३७, पृ. १०४)

मनुष्य ना केवळ बुद्धी आहे, ना केवळ पाशवी शरीर व ना केवळ हृदय अथवा आत्मा. संपूर्ण माणूस या तिघांच्या उचित आणि सुसंवादपूर्ण मिश्रणानेच तयार होतो आणि शिक्षणाच्या ख-या योजनेत या तिन्ही गोष्टींचा समावेश असला पाहिजे. (हरि, ८-५-१९३७, पृ. १०४)

त्यामुळे शिक्षणाचा माझा अर्थ आहे मुलांच्या वा माणसाच्या शरीरात, बुद्धीत आणि आत्म्यात जे काही श्रेष्ठ असेल त्याला पूर्णपणे वर आणणे. साक्षरता ना शिक्षणाचा परिणाम आहे ना सुरुवात. स्त्री अथवा पुरुषाला शिक्षित करण्याचे ते केवळ एक साधन आहे. साक्षरता म्हणजे काही शिक्षण नाही. यामुळे मुलाच्या शिक्षणाची सुरुवात मी त्याला एखादे हस्तकौशल्य शिकवण्यापासून करीन आणि हे शिक्षण सुरू होताच त्याने कोणती ना कोणती वस्तू बनवावी असा प्रयत्न मी करेन.... माझे मत आहे की शिक्षणाच्या अशा पद्धतीने बुद्धी आणि आत्मा यांचा अधिकात अधिक विकास होऊ शकतो. परंतु आज शिकवतात त्याप्रमाणे हस्तोद्योगाचे शिक्षण यांत्रिकपणे देण्यात येऊ नये तर वैज्ञानिक पद्धतीने दिले जावे, म्हणजे प्रत्येक प्रक्रिया का केली गेली हे मुलाला माहीत असले पाहिजे. (हरि, ३१-७-१९३७, पृ. १९७)

शिक्षणाच्या साहित्यिक बाजूपेक्षा मी त्याच्या सांस्कृतिक बाजूला किती तरी अधिक महत्त्व देतो. (हरि, ५-५-१९४६, पृ. १२०)

बुद्धिमत्तापूर्वक केलेले उपयोगी शारीरिक श्रम बुद्धीच्या विकासाचे सर्वोत्तम साधन आहे.... शरीर, बुद्धी आणि आत्मा यांच्या सामंजस्यपूर्ण विकासानेच संतुलित बुद्धिविकास शक्य आहे.... जी बुद्धी समाजोपयोगी श्रमाच्या माध्यमातून विकसित केली जाईल ती सेवेचे साधन होईल व कोणीही तिला सहजपणे चुकीच्या मार्गावर नेऊ शकणार नाही वा ती इतस्ततः भरकटू शकणार नाही. (हरि, ८-९-१९४६, पृ. ३०६)

**नयी तालीम**

शिक्षणाचे माध्यम म्हणून उपयोगात येणारे कोणतेही मूलभूत हस्तकौशल्य विश्वात्मकतेच्या कसोटीला उतरले पाहिजे. (हरि, २५-८-१९४६, पृ. २८३)

शिल्प, कला, आरोग्य आणि शिक्षण या सर्वांचा एकाच योजनेत समावेश केला पाहिजे. 'नयी तालीम' या चारही गोष्टींचे सुंदर मिश्रण आहे आणि गर्भधारणेपासून तर मृत्यूपर्यंतच्या माणसाच्या संपूर्ण शिक्षणाचा तिच्यात समावेश होतो.... शिल्प आणि उद्योग यांना शिक्षणापासून वेगळे मानण्यापेक्षा मी त्यांना शिक्षणाचे माध्यम समजतो. (हरि, १०-११-१९४६, पृ. ३९४)

माझी 'नयी तालीम' पैशावर अवलंबून नाही. तिला चालवण्याचा खर्च स्वतः शिक्षण प्रक्रियेतूनच निघून आला पाहिजे. हिच्यावर कोणतीही टीका होत असली तरी मला माहीत आहे की जे 'स्वावलंबी' असते तेच खरे शिक्षण असते.

(हरि, २-३-१९४७, पृ. ४८)

हिला शिक्षणाची नवीन पद्धती याकरिता म्हणतात की ती विदेशातून आयात करण्यात आलेली नाही वा विदेशी लोकांद्वारे ती लादण्यात आलेली नाही. उलट ती ग्रामप्रधान असलेल्या भारताच्या पर्यावरणाला अनुकूल आहे. शरीर, बुद्धी आणि आत्मा - या तिघांपासून मनुष्य बनतो - यांच्यामध्ये संतुलन स्थापन करण्यावर ही पद्धती विश्वास ठेवते. ही पाश्चात्त्य शिक्षणासारखी नाही. ते सैन्यवादी आहे व त्याच्यात मुख्यत्वेकरून शरीर आणि बुद्धी यांच्याकडे लक्ष दिले जाते व आत्म्याला गौण लेखले जाते. शिक्षण हस्तकौशल्याद्वारे देणे ही सर्वात चांगली पद्धती आहे. 'नयी तालीम'चे दुसरे वैशिष्ट्य हे आहे की ती पूर्णपणे स्वावलंबी आहे. यामुळे ही चालवण्याकरिता करोडो रुपये खर्च करण्याची गरज नाही. (हरि, ११-५-१९४७, पृ. १४७)

शिक्षक जे घेतात तीच त्यांची कमाई असते. नयी तालीम जगण्याच्या कलेच्या बाजूची आहे. यामुळेच शिक्षक आणि शिष्य या दोघांनाही शिकवण्याच्या आणि शिकण्याच्या प्रयत्नात काही उत्पादन करावे लागते. ही सुरुवातीपासूनच जीवन समृद्ध करते. ही राष्ट्राला रोजगार शोधण्याच्या कटकटीतून मुक्त करते. (हरि, ११-५-१९४७, पृ. १४५)

आपली शिक्षण पद्धती बुद्धी, आत्मा व शरीर या तिघांचाही विकास करते, याउलट सामान्य शिक्षण पद्धती केवळ बुद्धीकडे लक्ष देते.
(हरि, ९-११-१९४७, पृ. ४०१)

हस्तकौशल्याच्या माध्यमातून शिक्षण असे सामान्यपणे लोक हिला संबोधतात आणि ते बरोबरही आहे. परंतु हा सत्याचा केवळ एक अंश आहे.

वास्तवात 'नयी तालीम'ची मुळे अजूनच खोलवर आहेत. मानवी जीवनातील, मग ते वैयक्तिक असो वा सामुदायिक, प्रत्येक प्रकारच्या कृतीतील सत्य आणि प्रेम यांच्यापर्यंत तिची मुळे पसरलेली आहेत. जीवनातील सर्व कृतींचा स्रोत सत्य आणि प्रेम यांच्यातूनच निघाला पाहिजे हा विचार हस्तकौशल्याच्या माध्यमातून शिक्षण देण्यामागे आहे. हे खरे शिक्षण प्रत्येकाला उपलब्ध असले पाहिजे आणि ते ग्रामीण लोकांच्या दैनंदिन जीवनाकरिता उपयोगी असले पाहिजे ही त्या प्रेमाची मागणी आहे. असे शिक्षण पुस्तकांमधून मिळू शकत नाही व त्यांच्यावर ते अवलंबूनही नाही. या शिक्षणाचा धर्माशी काही संबंध असेल तर तो सार्वभौम धर्माशी आहे ज्यातून सर्व धार्मिक पंथ निघतात. यामुळे

हे शिक्षण जीवनाच्या पुस्तकातून मिळते. त्याकरिता कोणताही खर्च येत नाही व जगातील कोणतीही शक्ती ते तुमच्यापासून हिरावून घेऊ शकत नाही. (हरि,२१-१२-१९४७,पृ.४८०)

## विश्वविद्यालयीन शिक्षण

विश्वविद्यालयीन शिक्षणाचे ध्येय खरे देशसेवक तयार करणे हे असले पाहिजे. असे देशसेवक जे देशाच्या स्वातंत्र्याकरिता मरतील वा जगतील. यामुळेच माझे मत आहे की, विश्वविद्यालयीन शिक्षणाचा मूलभूत (बुनियादी) शिक्षणाशी समन्वय असला पाहिजे व तेही त्याच साच्यातून दिले गेले पाहिजे....
(हरि, २५-८-१९४६, पृ. २८३)

जोपर्यंत स्त्रीशिक्षणाचा संबंध आहे, ते पुरुषांना दिल्या जाणा-या शिक्षणापेक्षा वेगळे असले पाहिजे की नाही व त्याची सुरुवात केव्हा झाली पाहिजे हे मी नक्की सांगू शकत नाही. परंतु माझे पक्के मत आहे की स्त्रियांनाही पुरुषांच्या बरोबरीच्या सोयीसवलती मिळाल्या पाहिजेत आणि जिथे आवश्यक असेल तिथे त्यांना विशेष सुविधाही मिळाल्या पाहिजेत. (हरि, ५-८-१९५०, पृ. १९५; आश्रम ॲक्टिव्हिटीज, १९३२, अनु. बी. जी. देसाई)

आपल्या विद्यार्थ्यांनी विलायतेत जावे या गोष्टीचा पुरस्कार मी कधीही केला नाही. माझ्या अनुभवावरून मी सांगू शकतो की आपल्या देशात परतल्यानंतर या विद्यार्थ्यांची अवस्था गोल छिद्रात चौकोनी बुचासारखी होते. तोच अनुभव सर्वात मूल्यवान असतो जो देशाच्या समृद्धीत सर्वाधिक भर घालतो आणि जो आपल्याच भूमीतून निर्माण झालेला असतो. (हरि, ८-९-१९४६, पृ. ३०८)

## विद्यार्थ्यांकरिता संहिता

आंदोलन केवळ त्या लोकांकरिता आहे ज्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले आहे. अध्ययनाच्या काळात आपल्या ज्ञानात वृद्धी करणे हेच विद्यार्थ्यांचे कर्तव्य असले पाहिजे.... देशात दिले जाणारे प्रत्येक प्रकारचे शिक्षण हे देशाच्या प्रगतीत भर घालणारे आहे असे सिद्ध झाले पाहिजे. (हरि, ७-९-१९४७, पृ. ३१२)

सर्वात महत्त्वाची गोष्ट ही आहे की विद्यार्थ्यांनी नम्र आणि योग्य असले पाहिजे.... सर्वात महान तोच आहे जो स्वतःहून सर्वात खालचे स्थान ग्रहण करतो. मी जर हिंदूंच्या श्रद्धेच्या भाषेत बोललो तर मी असे म्हणेन की, विद्यार्थी जीवनाच्या अंतापर्यंत त्याने संन्यासी राहिले पाहिजे. त्याने कठोर शिस्तीत राहिले

पाहिजे. तो विवाह करू शकत नाही, दुराचरणात लिप्त होऊ शकत नाही, तो कोणत्याही प्रकारच्या मादक पदार्थांचे सेवन करू शकत नाही. त्याचा व्यवहार एखाद्या आदर्श संयमी व्यक्तीसारखा असला पाहिजे. (हरि, ७-९-१९४७, पृ. ३१४)

## शिक्षणाचे माध्यम

भारतीयीकरण नष्ट करण्यात आलेल्या या शिक्षणामुळे करोडो विद्यार्थ्यांवर जे सतत व अधिकाधिक दुष्परिणाम होत आहेत त्याचे पुरावे मी दररोज पाहतो आहे....

आपल्याला असे वाटू लागले आहे की इंग्रजी आल्याशिवाय कोणीही बोस सारखे बनू शकत नाही. यापेक्षा अधिक मोठा अंधविश्वास अजून कोणताही असू शकत नाही. जी लाचारी आपल्याला जाणवते तशी लाचारी जपानी माणसाला तर जाणवत नाही?....

शिक्षणाचे माध्यम ताबडतोब बदलवले पाहिजे आणि प्रांतिक भाषांना काहीही झाले तरी त्यांचे योग्य स्थान दिले पाहिजे. शक्य आहे की यामुळे काही काळाकरिता उच्च शिक्षणामध्ये अव्यवस्था निर्माण होईल. परंतु आज जी गुन्हेगारी स्वरूपाची हानी होत आहे तिच्यासमोर ही अव्यवस्था काहीही नाही.

प्रांतीय भाषांची प्रतिष्ठा आणि त्यांचे बाजारमूल्य वाढावे म्हणून त्या त्या प्रांतांच्या न्यायालयातील भाषा त्या प्रांताची प्रांतिक भाषा करण्यात यावी. प्रांतीय विधिमंडळांची कार्यवाही त्याच प्रांताच्या भाषेत झाली पाहिजे आणि एखाद्या प्रांतात एकाहून अधिक भाषा प्रचलित असतील तर त्या सर्व भाषांमध्ये ती कार्यवाही होऊ शकते.... केंद्रात सर्वात महत्त्वाचे स्थान हिंदुस्तानीला दिले पाहिजे.

माझ्या मते हा प्रश्न विद्वानांवर सोडण्यासारखा नाही. जेव्हा देश खरोखर स्वतंत्र होईल तेव्हा शिक्षणाच्या माध्यमाच्या समस्येचे हेच एकमेव उत्तर असेल. विद्वान लोकांचे काम या उद्दिष्टानुसार पाठ्यपुस्तके तयार करणे आहे. त्या वेळी तुम्हाला दिसेल की स्वतंत्र भारतात शिक्षण घेऊन जे विद्यार्थी निघतील ते देशाच्या गरजांच्या अनुरूप असतील.... मला भीती आहे की जोपर्यंत आपण शिकले-सवरलेले लोक या प्रश्नाचा खेळखंडोबा करत राहू तोपर्यंत आपण आपल्या स्वप्नातील आदर्श भारत निर्माण करू शकणार नाही. कठोर प्रयत्न करून आपल्याला गुलामगिरीची बंधने तोडावी लागतील, मग ती बंधने शैक्षणिक, आर्थिक वा सामाजिकही असू शकतात. तीन चतुर्थांश संघर्ष तर प्रयत्नांतच

सामावलेला आहे. (हरि, ९-७-१९३८, पृ. १७७-८)

मला याबद्दल मुळीच संशय नाही की, ज्या लोकांच्या हाती युवकांचे शिक्षण आहे त्यांनी जर मानसिक तयारी केली तर त्यांना आढळून येईल की मातृभाषा माणसाच्या मनोविकासाकरिता तेवढीच स्वाभाविक आहे जेवढे मातेचे दूध बाळाच्या शारीरिक विकासाकरिता. यापेक्षा वेगळे काही असणे कसे शक्य आहे? मूल आपला पहिला पाठ आईजवळून शिकत असते. यामुळे मुलांवर मातृभाषे-ऐवजी दुसरी एखादी भाषा लादणे हे मातृभूमीच्या विरोधातील पापाचरण आहे असे मी समजतो. (मीइन्स, पृ. ८)

## राष्ट्रभाषा

आंतरप्रांतीय भाषा.... केवळ देवनागरी वा उर्दूमध्ये लिहिलेली हिंदुस्तानीच होऊ शकते....

इंग्रजी सांस्कृतिक सत्ता बळकावणारी असल्यामुळे मी इंग्रजीला देशाबाहेर काढण्याचा आग्रह धरतो. याप्रमाणेच राजकीय सत्ता बळकावली म्हणून इंग्रजी सत्तेला यशस्वीपणे आपण या देशातून बाहेर काढले आहे. वाणिज्य आणि आंतरराष्ट्रीय कूटनीतीची भाषा म्हणून समृद्ध इंग्रजी भाषेचे स्वाभाविक स्थान कायम राहील. (हरि, २१-९-१९४७, पृ. ३३२)

प्रांतीय भाषांचा जास्तीत जास्त उत्कर्ष करायचा असेल तर प्रांतांची भाषावार पुनर्रचना आवश्यक आहे. हिंदुस्तानी भारताची राष्ट्रभाषा होईल परंतु ती प्रांतीय भाषांचे स्थान कधीही घेऊ शकणार नाही. प्रांतांमध्ये ती शिक्षणाचे माध्यम होऊ शकणार नाही - आणि इंग्रजी तर नाहीच नाही. भारताबरोबरचे सेंद्रीय संबंध प्रांतांना समजून देण्याकरिता मदत करणे हे हिंदुस्तानीचे कार्य आहे. (हरि, १-२-१९४८, पृ. १४)

## इंग्रजी भाषा

भारतीय मनाचा उच्चतम विकास इंग्रजीशिवाय करणे शक्य झाले पाहिजे. (यंग, २-२-१९२१, पृ. ३४)

भारतात ज्या प्रकारे इंग्रजीचे शिक्षण देण्यात आले आहे त्या प्रकारामुळे इंग्रजी शिकलेल्या लोकांचे दुर्बलीकरण झाले आहे, त्यामुळे भारतीय विद्यार्थ्यांवर जबरदस्त ताण पडला आहे आणि आम्हाला तिने नक्कल करणारे बनवले आहे, असे माझे विचारांती मत झाले आहे. अनुवादकांची पिढी तयार करून कोणताही

देश राष्ट्र बनू शकत नाही. (यंग, २७-४-१९२१, पृ.१३०)

आज इंग्रजी निर्विवादपणे विश्वभाषा आहे. त्यामुळे शालेय पातळीवर नाही, परंतु विद्यापीठातील शिक्षणात वैकल्पिक भाषेच्या स्वरूपात द्वितीय भाषा म्हणून मी हिला स्थान देईन. ती काही निवडक लोकांकरिताच असू शकते, लाखोंकरिता नाही.... इंग्रजीशिवाय आपले काम भागू शकत नाही असे आपण समजतो हे आपले मानसिक दास्य आहे. या पराभूत मनोवृत्तीचे मी कधीही समर्थन करू शकत नाही. (हरि, २५-८-१९४६, पृ. २८४)

## साहित्य

असे समजू नका की मी इंग्रजीची वा तिच्या उदात्त साहित्याची निंदा करतो आहे. हरिजनच्या स्तंभांमध्ये माझ्या इंग्रजी प्रेमाचे पुरेसे पुरावे उपलब्ध आहेत. परंतु ज्याप्रमाणे इंग्लंडच्या शीतोष्ण वातावरणाचा वा निसर्गसौंदर्याचा लाभ भारताला होऊ शकत नाही त्याचप्रमाणे त्याचे उदात्त साहित्य भारताच्या उपयोगी पडू शकत नाही. भारताला आपल्याच वातावरणात, आपल्याच निसर्गसौंदर्यात आणि आपल्याच साहित्यात विकसित व्हावे लागणार आहे, मग इंग्लंडचे वातावरण, इंग्लंडचे निसर्गसौंदर्य आणि इंग्लंडचे साहित्य यांच्यापेक्षा या गोष्टी कमी प्रतीच्या असल्या तरी काही हरकत नाही. आपल्या आणि आपल्या वंशजांना जो वारसा मिळाला आहे त्यावरच आपल्याला प्रासाद उभा करावा लागणार आहे. आपण जर दुस-या कोणाचा वारसा उधार घेतला तर आपण आपला वारसा हरवून बसू. परकीयांनी केलेल्या अन्नधान्याच्या बेगमीवर आपली वाढ कधीही होऊ शकणार नाही. माझी इच्छा आहे की आपण इंग्रजी आणि तशाच प्रकारे विश्वातील इतर भाषांमधील उत्कृष्ट साहित्य भारतीय भाषांच्या माध्यमातून वाचावे. रवीन्द्रनाथांच्या अनुपम साहित्याचा रसास्वाद घेण्याकरिता मला बंगाली भाषा शिकण्याची गरज नाही. सुंदर अनुवादाच्या माध्यमातून मी ते वाचू शकतो. टॉलस्टॉयच्या लघुकथांचा आनंद घेण्याकरिता गुजराती मुलामुलींना रशियन भाषा शिकावी लागत नाही. सुंदर अनुवादाच्या माध्यमातून ते त्या कथा वाचू शकतात. इंग्रजांना या गोष्टीचा अभिमान आहे की विश्वातील सर्वोत्कृष्ट साहित्य, त्याच्या प्रकाशनानंतर एका आठवड्याच्या आत सोप्या इंग्रजीत उपलब्ध झालेले असते. मग मला शेक्सपिअर आणि मिल्टन वाचण्याकरिता इंग्रजी शिकण्याची आवश्यकता का जाणवावी? (हरि, ९-७-१९३८, पृ. १७७)

## ८०. भाषावार प्रांतरचना

काँग्रेसच्या कामकाजाकरिता प्रांतांची भाषावार पुनर्रचना करण्याला मान्यता मिळवून देण्यात माझी महत्त्वाची भूमिका राहिली आहे. सरकारनेही अशा प्रकारची पुनर्रचना स्वीकारावी म्हणून मी अनेकदा आवाज उठवला आहे.
(हरि, २९-३-१९४२, पृ. ९७)

माझा विश्वास आहे की प्रांतांच्या सीमा ठरवण्याचा योग्य आधार भाषा आहे. परंतु एकच भाषा बोलणारे दोन भाग एकमेकांशी लागून नसले तर त्याबाबतीत एकच भाषा बोलणारे दोन प्रांत झाले तर त्यावर माझा कोणताही आक्षेप नाही. उदाहरणार्थ केरळ आणि कर्नाटक या दोन प्रदेशात जर एकच भाषा बोलली गेली असती तरी मी त्यांना दोन वेगवेगळे प्रांत मानले असते.
(हरि, १९-४-१९४२, पृ. ११८)

### प्रांतीय विद्यापीठे

समृद्ध प्रांतीय भाषांना आणि त्या बोलणा-यांना आपला विकास करायचा असेल तर अशी विद्यापीठे असली पाहिजे.... हे मला मान्य आहे. परंतु मला भीती आहे की या बाबतीत आपण अनावश्यक उत्सुकता दाखवली तर आपण स्वतःची फसवणूक करू. प्रांतांची भाषांच्या आधारावर पुनर्रचना करणे हे पहिले पाऊल असले पाहिजे. (हरि, २-११-१९४७, पृ. ३९२)

वेगळेपणाच्या भावनेला नेहमीच सर्वात अधिक महत्त्व मिळत असलेले आढळले आहे. प्रत्येक माणूस स्वतःबद्दल आणि स्वतःच्या कुटुंबाबद्दल विचार करत असतो. संपूर्ण भारताबद्दल कोणीही विचार करत नाही. केंद्राभिमुख ताकद असते हे खरे पण ती कधीही स्पष्टपणे दिसून येत नाही, ती कधी उसळी मारत नाही; याच्या तुलनेत केंद्रापासून दूर जाणा-यांची ताकद नेहमी दिसून येते. तिचा स्वभावच असा आहे की ती सर्वात जास्त आवाज करते आणि सर्वांचे लक्ष आकर्षित करून घेते. ती सांप्रदायिक स्वरूप घेऊन वर येते. यामुळे इतर क्षेत्रांमध्ये भीती निर्माण झाली आहे....

परंतु देशाच्या कल्याणाकरिता 'आदानप्रदाना'च्या भावनेला मोकळ्या मनाने मान्यता देण्यात येईपर्यंत आणि भारताचे कल्याण, ज्यात सर्वांचे कल्याण

समाविष्ट आहे, हेच एकमेव ध्येय ठेवून त्याला वर्गीय हितावर स्थान दिले जाण्याची वेळ येईपर्यंत उत्साही सुधारकही असे वादग्रस्त मुद्दे टाळत असतात.

यामुळे रचनात्मक सुधारणांची लगेच अंमलबजावणी केली जावी असे वाटणा-या माझ्यासारख्या माणसांनी असे निरोगी वातावरण तयार करण्याकरिता प्रयत्न केले पाहिजे की जिथे मतभेदांच्या जागी मैत्री, संघर्षाच्या ठिकाणी शांतता, अवनतीच्या जागी प्रगती आणि मृत्यूच्या जागी जीवन फुलू शकेल.
(हरि, ३०-११-१९४७, पृ. ४३६)

## इतरांना वगळणारा प्रांतवाद नाही

माझे मत आहे की सर्व प्रांतांचे लोक भारताचे आहेत व भारत त्या सर्वांचा आहे. अट एवढीच आहे की कोणताही माणूस दुस-या एखाद्या प्रांताचे शोषण करण्याकरिता, त्या प्रांतावर शासन करण्याकरिता वा त्या प्रांताच्या हिताला धक्का लावण्याकरिता त्या प्रांतात जाऊन राहू शकत नाही. सर्व लोक भारताचे सेवक आहेत व ते सेवेच्या भावनेने जगतील. (हरि, ७-९-१९४७, पृ. ३११)

इतरांना वगळणारा प्रांतवाद आपल्या जीवनाचा अभिशाप आहे. खरे सांगायचे तर माझ्या प्रांताची सीमारेषा भारताच्या सीमारेषेपर्यंत पसरलेली असली पाहिजे व अखेरीस तिने सर्व जगाला आपल्या कवेत घेतले पाहिजे. असे झाले नाही तर सर्व काही नष्ट होईल. (यंग, २१-९-१९४७, पृ. ३३३)

## भारताचे ऐक्य

काँग्रेसने प्रांतांच्या भाषावार पुनर्रचनेचा सिद्धान्त आधीच मान्य केला आहे आणि सत्तेत येताच याला आपण घटनात्मक रूप देऊ अशी घोषणाही केली आहे. अशा रीतीने ही पुनर्रचना देशाच्या प्रगतीचा मार्ग प्रशस्त करील. परंतु या पुनर्रचनेमुळे भारताच्या सेंद्रीय ऐक्याला धक्का लागता कामा नये. स्वायत्ततेचा अर्थ विघटन नाही आणि असूही नये. याचा अर्थ असा नाही एका प्रांताने केंद्राची पर्वा न करता आपल्या इच्छेप्रमाणे वाटेल ते करावे. प्रत्येक प्रांत जर स्वतःला प्रभुत्वपूर्ण वेगळा घटक मानू लागेल तर भारताच्या स्वातंत्र्याला काहीही अर्थ राहणार नाही व त्याचबरोबर त्यांच्या स्वातंत्र्याचाही लोप होऊन जाईल....

बाहेरचे जग आपल्याला गुजराती, मराठी, तामीळ आदी रूपात ओळखत नाही तर केवळ भारतीय म्हणून ओळखते.

यामुळे विघटनकारी प्रवृत्तींना मुळीच प्रोत्साहन द्यायला नको आणि आपण भारतीय असल्याप्रमाणे आपला व्यवहार असला पाहिजे व तशीच जाणीव आपल्या मनात राहिली पाहिजे. या सर्वोच्च विचाराची जपणूक केली गेली तर भारताच्या भाषावार पुनर्रचनेमुळे शिक्षण आणि व्यापार या दोघांनाही प्रोत्साहन मिळेल. (यंग, १-२१-१९४८, पृ. ११)

## ८१. गोरक्षण

### गायीचे स्थान

गाय करुणेचे काव्य आहे. हा सौम्य पशू मूर्तिमान करुणा आहे. गाय करोडो भारतीयांची आई आहे. गोरक्षणाचा अर्थ आहे ईश्वराच्या संपूर्ण मूक सृष्टीचे रक्षण. प्राचीन ऋषींनी, ते जे कोणी असतील, गायीपासून सुरुवात केली. सृष्टीतील निम्न स्तरावरील प्राण्यांच्या रक्षणाचा प्रश्न अजूनच महत्त्वपूर्ण आहे कारण देवाने त्यांना वाणी दिलेली नाही. (यंग, ६-१०-१९२१, पृ. ३६)

....गाय मानवी जीवनाच्या खालील जीवसृष्टीचे एक पवित्रतम रूप आहे. प्राण्यांमध्ये सर्वात समर्थ असलेल्या मानव प्राण्याकडे सर्व मानवेतर प्राण्यांतर्फे ती न्यायाकरिता विनवणी करते आहे. असे वाटते की आपल्या डोळ्यांच्या भाषेतून ती म्हणते आहे : 'आम्हाला मारून टाकावे, आमचे मांस खावे वा इतर कोणत्याही प्रकारे आमच्याशी दुर्व्यवहार करावा म्हणून ईश्वराने तुम्हाला आमचे मालक बनवले नाही तर तुम्ही आमचे मित्र बनून आमचे रक्षण करावे म्हणून त्याने असे केले आहे.' (यंग, २६-६-१९२४, पृ. २१४)

मी गायीची पूजा करतो व त्या पूजेचे समर्थन करण्याकरिता सर्व जगाशी सामना करण्याची माझी तयारी आहे. (यंग, १-१-१९२५, पृ. ८,)

गोमाता अनेक अर्थांनी आम्हाला जन्म देणा-या मातेपेक्षा श्रेष्ठ आहे. आमची आई आम्हाला दोन वर्ष दूध पाजते आणि मोठे झाल्यानंतर आपण तिची सेवा करावी अशी अपेक्षा करते. गाय आपल्याकडून चारा आणि दाणा याशिवाय आणखी कशाचीही अपेक्षा करत नाही. आपली आई अनेकदा आजारी पडते व आपल्याकडून सेवेची अपेक्षा करते, गोमाता क्वचितच कधी आजारी पडते.

गोमाता जिवंत असेपर्यंतच आपली सेवा करत नाही तर मेल्यानंतरही ती आपली सेवा करत असते. आपल्या आईच्या मृत्यूनंतर तिला मूठमाती

देण्याकरिता वा अग्निसंस्काराकरिता पैसे खर्च करावे लागतात. गोमाता मेल्यानंतरही तेवढीच उपयोगी सिद्ध होते जेवढी ती जिवंतपणी उपयोगी असते. आपण तिच्या शरीराच्या सर्व अवयवांचा - मांस, अस्थी, आतडे, शिंग आणि चामडे या सर्व गोष्टींचा - उपयोग करू शकतो. हे मी जन्मदात्या आईची निंदा करण्याकरिता सांगत नाही आहे तर मी गायीची पूजा का करतो, एवढेच इथे सांगतो आहे. (हरि, १५-९-१९४०, पृ. २८१)

## हिंदू धर्मात गाय

हिंदू धर्माचे केन्द्रीय तत्त्व गोरक्षण आहे. गोरक्षणाला मी मानव विकासातील सर्वात अद्‌भुत घटना समजतो. ती माणसाचे उदात्तीकरण करते. माझ्या दृष्टिकोनातून गायीचा अर्थ संपूर्ण अमानवीय जग आहे. गायीच्या माध्यमातून संपूर्ण प्राणिसृष्टीशी आपण आपले तादात्म्य प्रस्थापित करतो. देवत्वाचा आरोप करण्याकरिता गायीला का निवडण्यात आले याचे कारण स्पष्ट आहे. भारतात गाय माणसाची सर्वात चांगली सोबती आहे. तिला कामधेनू म्हणण्यात आले आहे. ती केवळ दूधच देत नाही. तिच्यामुळेच शेती करणे शक्य झाले आहे....

गोरक्षण ही हिंदू धर्माने जगाला दिलेली देणगी आहे. जोपर्यंत गोरक्षक हिंदू जिवंत आहेत तोपर्यंत हिंदू धर्म जिवंत राहील....

हिंदूंची परीक्षा त्यांच्या टिळ्यावरून, शुद्ध मंत्रोच्चारणावरून, तीर्थयात्रांवरून वा जातिपातीच्या नियमांवरून केली जाणार नाही तर गायीचे रक्षण करण्याच्या त्यांच्या पात्रतेच्या आधारे केली जाईल. (यंग, ६-१०-१९२१, पृ. ३६)

## गोवध

ज्याप्रमाणे एखाद्या गायीच्या रक्षणाकरिता मी कोणत्याही माणसाला मारणार नाही त्याचप्रमाणे एखाद्या माणसाचे रक्षण करण्याकरिता मी कोणत्याही गायीला मारणार नाही. (यंग, १८-५-१९२१, पृ. १५६)

ज्या लोकांचा दृष्टिकोन माझ्यापेक्षा वेगळा आहे त्यांना गायीला मारणे पाप आहे व त्यामुळे गोहत्या बंद करावी हे मी माझ्या स्वतःच्या आचरणाने पटवून द्यावे असे माझा धर्म मला असे शिकवतो. (यंग, २९-१-१९२५, पृ. ३८)

गोवध कायद्याने कधीही बंद केला जाऊ शकत नाही. ज्ञान, शिक्षण आणि गायीबद्दलची दयाभावना यांच्याद्वारेच तो बंद करता येऊ शकतो. जे पशू भूमीला

भार आहेत त्यांना वाचवले जाऊ शकत नाही, एवढेच नाही तर जी माणसे भूमीला भार असल्यासारखी आहेत त्यांनाही वाचवता येऊ शकत नाही.
(हरि, १५-९-१९४६, पृ. ३१०)

गोरक्षणाला संपूर्ण विश्वात मान्यता मिळावी अशी माझी आकांक्षा आहे. परंतु याकरिता भारतातील गोवंशाची दुर्गती आधी थांबली पाहिजे व त्याला त्याचे योग्य स्थान मिळाले पाहिजे. (यंग, २९-१-१९२५, पृ. ३८)

माझ्या दृष्टीने गोरक्षणाचा अर्थ केवळ गायीचे रक्षण नाही. याचा अर्थ आहे जगातील त्या सर्व प्राणिमात्रांचे रक्षण जे असहाय व दुर्बल आहेत.
(यंग, ७-५-१९२५, पृ. १६०)

मी परत सांगेन की.... की गोवधावर कायदेशीर मनाई ही गोष्ट गोरक्षणाच्या कार्यक्रमातील सर्वात गौण मुद्दा आहे.... लोकांना कदाचित असे वाटत असावे की एखाद्या वाईटपणाविरुद्ध कायदा पास केला की इतर कोणतेही विशेष प्रयत्न न करता तो वाईटपणा नाहीसा होईल. यापेक्षा मोठी आत्मवंचना अजून कोणतीच असू शकत नाही. एखाद्या अडाणी वा दुष्टबुद्धी असलेल्या लहानशा गटाच्या विरोधात करण्यात आलेला कायदा एकदा यशस्वी होऊ शकेल परंतु असा कायदा नेहमीच यशस्वी होऊ शकत नाही ज्याचा विरोध समजदार आणि संघटित लोकमताद्वारे होतो वा एखादा कट्टरपंथी वर्ग धर्माच्या नावाने त्याचा विरोध करतो.

गोरक्षणाच्या प्रश्नाचा मी जितका विचार करतो तसतसे माझे पक्के मत होत चालले आहे की गाय आणि गोवंश यांचे रक्षण तेव्हाच शक्य आहे जेव्हा मी सुचवलेले उपाय स्वीकारून रचनात्मक कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांच्या अंमलबजावणीकरिता सतत आणि दीर्घकालीन प्रयत्न करण्यात येतील.
(यंग, ७-७-१९२७, पृ. २१९)

## गोसेवा

पशूंचे संरक्षण गोसेवेचा महत्त्वाचा भाग आहे. भारताकरिता याचे फार महत्त्व आहे.... याकरिता सखोल अभ्यासाची आणि त्यागाच्या भावनेची ताबडतोब गरज आहे. विपुल धनसंपत्तीचा साठा आणि दानपुण्य यातून ख-या व्यावसायिक क्षमतेचा परिचय होत नाही. पशूंच्या संरक्षणासंबंधी ज्ञान मिळवणे, त्या ज्ञानाचा जनतेत प्रसार करणे आणि स्वतःला त्या आदर्शानुरूप बनवणे आणि या कार्याकरिता पैसा खर्च करणे ही खरी व्यावसायिक क्षमता

आहे. (हरि, १७-२-१९४६, पृ. ११)

जोपर्यंत गोरक्षणाचा प्रश्न शुद्ध आर्थिक बाबींचा आहे, तोपर्यंत त्यावर केवळ त्याच दृष्टीने विचार केला तर त्यावरील उपाय शोधून काढणे सोपे होईल. तसे असल्यास कोणताही विचार न करता त्या सर्व पशूंना मारून टाकले जाईल, ज्यांचे दूध आटले आहे वा त्यांच्यावर येणा-या खर्चाच्या तुलनेत मिळणा-या दुधाची किंमत फार कमी असते वा जे म्हातारे आणि बेकार झाले आहेत. विरोधाभासाच्या या भूमीत राहणारे वास्तवात अनेक हृदयहीन कृत्याचे दोषी असले तरीही अशा हृदयशून्य अर्थव्यवस्थेला भारतात कोणतेही स्थान नाही.

**सकारात्मक उपाय**

पुरेसे दूध देऊ शकत नसल्यामुळे वा अन्य काही कारणामुळे फायदेशीर न ठरणा-या गायीला मारण्याऐवजी कसे वाचवायचे? या प्रश्नाचे उत्तर थोडक्यात असे असू शकतेः

(१) गाय अथवा गोवंश यांच्याबद्दलच्या कर्तव्याचे पालन हिंदूंनी करावे. जर ते असे करतील तर आपले पशू भारताकरिता आणि जगाकरिता अभिमानाची गोष्ट ठरतील. आजची परिस्थिती अगदी याच्या विरुद्ध आहे.

(२) पशुपालनविज्ञानाचा अभ्यास करण्यात यावा. आज या क्षेत्रात पूर्ण अनागोंदी आहे.

(३) खच्ची करण्याची सध्याची क्रूर पद्धत बंद करण्यात यावी आणि पश्चिमेकडील मानवी पद्धतीचा अंगीकार करण्यात यावा.

(४) भारतातील पांजरपोळांची आमूलाग्र सुधारणा करण्यात यावी. आज ज्यांच्या हातात त्यांचे व्यवस्थापन आहे ते याबाबतीत अगदी अडाणी आहेत व अतिशय अव्यवस्थित पद्धतीने ते हे काम करतात.

(५) या मूलभूत गोष्टी जेव्हा केल्या जातील तेव्हा आपल्याला असे आढळून येईल की आपल्या हिंदू बांधवांच्या इच्छेखातर का होईना मुसलमान गोमांसाकरिता वा अन्य हेतूकरिता गोवध न करण्याच्या आवश्यकतेचा स्वतःहून स्वीकार करतील.

वाचकांच्या लक्षात येईल की वरील अपेक्षांमध्ये एक गोष्ट आहे आणि ती आहे अहिंसा. तिलाच सार्वभौम करुणा असेही म्हणता येईल. आपण जर त्याप्रमाणे वर्तन करू लागलो तर सर्व काही सोपे होईल. जिथे अहिंसा आहे

तिथे असीम धैर्य, आंतरिक शांतता, विवेक, स्वार्थत्याग आणि खरे ज्ञान यांचा वास असतो. (हरि, ३१-८-१९४७, पृ. ३००)

## ८२. सहकारी पशुपालन

जनावरांना घरातच ठेवून त्यांची योग्य आणि वैज्ञानिक पद्धतीने देखरेख करणे ही गोष्ट शेतक-यांकरिता शक्य नाही. गाय आणि इतर सर्व जनावरांच्या दुर्दशेकरिता सामूहिक प्रयत्नांचा अभाव जबाबदार आहे.

आज जग जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात सामूहिक अथवा सहकारी प्रयत्नांच्या दृष्टीने पुढे जात आहे. यात बरेच यश मिळाले आहे वा मिळत आहे. या देशातही या विचाराने प्रवेश केला आहे परंतु तो अशा विकृत रूपाने केला आहे की त्याचा फायदा निर्धनांना झाला नाही. आपल्या लोकसंख्येत होत असलेल्या वाढीबरोबरच सामान्य शेतक-याच्या लागवडीखाली असलेली सरासरी जमीन कमी होत आहे आणि व्यक्तीजवळ तर बहुधा फारच कमी जमीन राहिली आहे.

अशा शेतक-यांनी आपल्या घरात जनावरे ठेवणे आत्मघातकीपणाचे आहे. परंतु तरीही आज असेच होत आहे. जे लोक अर्थशास्त्राला सर्वाधिक महत्त्व देतात आणि धार्मिक, नैतिक वा मानवीय दृष्टिकोनाला फार कमी महत्त्व देतात त्यांचे ठासून सांगणे आहे की जनावरांच्या चा-यावर होणा-या खर्चाच्या तुलनेत त्यांच्यापासून होणारे उत्पन्न इतके कमी आहे की वास्तवात जनावरे माणसांनाच खात आहेत. त्यांचे म्हणणे आहे की निरुपयोगी पशूंचा वध न करणे मूर्खपणा आहे.

प्रश्न आहे मानवतावादी लोकांनी काय करावे? याचे स्पष्ट उत्तर हे आहे की आपण असा कोणता तरी मार्ग शोधून काढला पाहिजे ज्यामुळे जनावरांचे रक्षण तर होईलच आणि शिवाय ते शेतक-यांवर ओझेही बनून राहणार नाहीत. मी निश्चितपणे सांगू शकतो यात सहकारी प्रयत्न ब-याच प्रमाणात आमची मदत करू शकतो. या संदर्भात खालील तुलना लाभदायी होऊ शकते :

(१) सामूहिक प्रणाली अंतर्गत आज होते त्याप्रमाणे कोणताही शेतकरी आपल्या घरात जनावर ठेवू शकत नाही. पशू वायू दूषित करतात व आपल्या आजूबाजूला घाण पसरवतात. पशूंबरोबर राहण्यात ना हुशारी आहे ना मानवतावाद. माणूस जनावरांबरोबर राहण्याकरिता बनलेला नाही. सामूहिक पद्धती स्वीकारण्यात आली तर आज घरातील जी जागा जनावरांच्या राहण्याकरिता

लागते ती कुटुंबाकरिता उपलब्ध होऊ शकेल.

(२) जसजशी पशूंची संख्या वाढते शेतक-याचे घरातील जीवन कठीण होऊ लागते. यामुळे तो वासरांना विकून टाकतो, म्हशींच्या नर पिल्लांना मारून टाकतो वा त्यांना बाहेर हाकलून मरण्याकरिता सोडून देतो. पशुपालन सहकारी तत्त्वावर होऊ लागले तर अशा प्रकारची अमानवीय कृत्ये बंद होतील.

(३) सामूहिक पशुपालनाच्या स्थितीत जनावरे आजारी पडल्यानंतर त्यांच्या चिकित्सेची नीट व्यवस्था करता येईल. कोणताही सामान्य शेतकरी आपल्या बळावर हा खर्च पेलू शकत नाही.

(४) अशाच पद्धतीने सामूहिक प्रणालीत अनेक गायींकरिता एक चांगला सांड पाळता येऊ शकतो. एरव्ही ही व्यवस्था कठीण आहे. कोणी कृपा केली तर गोष्ट वेगळी.

(५) सहकारी प्रणालीअंतर्गत गायरानाकरिता वा जनावरांना चारण्याकरिता जमीन सहज उपलब्ध होऊ शकेल. उलट आज शेतक-याला व्यक्तिगत पातळीवर सामान्यपणे अशी कोणतीही व्यवस्था उपलब्ध नाही.

(६) सामूहिक प्रणालीत चा-याचा खर्चही तुलनात्मक दृष्टीने कमी येतो.

(७) सामूहिक प्रणालीत चांगल्या किंमतीवर दूधविक्रीची व्यवस्था होईल आणि शेतक-याला दुधात भेसळ करण्याचा आज जो मोह होतो त्याची शक्यता वा कारण राहणार नाही.

(८) प्रत्येक पशूची तपासणी करणे आज शेतक-याच्या आवाक्याबाहेरचे आहे. परंतु संपूर्ण गावातील जनावरांसाठी अशी व्यवस्था सहजपणे करता येऊ शकते. यामुळे जनावरांच्या वंशात सुधारणा करणेही सोपे होईल.

(९) वरील लाभ पाहता सहकारी पशुपालन हितावह असल्याचे सहज सिद्ध होते. याच्या बाजूने सर्वात महत्त्वाचा युक्तिवाद हाच आहे की प्रत्येक शेतक-याने आपापली जनावरे पाळण्याच्या पद्धतीमुळे आपल्या जनावरांची दशा दयनीय झाली आहे. हा आवश्यक बदल करूनच आपण आपल्या जनावरांना आणि स्वतःलाही वाचवू शकतो.

माझी खात्री आहे की, जोपर्यंत आपण सहकारी शेती स्वीकारणार नाही तोपर्यंत शेतीचा पूर्ण फायदा आपल्याला मिळू शकणार नाही. ही गोष्ट समजणे कठीण आहे का की लहान लहान शंभर शेतांवर कशी तरी शेती करण्यापेक्षा गावातील शंभर कुटुंबांनी आपल्या जमिनीवर सामूहिक शेती केली व उत्पन्न

आपसात वाटून घेतले तर ते फायदेशीर होईल? आणि जी गोष्ट शेतीला लागू होते तीच पशूंनाही लागू होते.

हे खरे आहे की, या जीवनपद्धतीकरिता एकाएकी लोकांची सहमती मिळवणे कठीण होऊ शकते. सरळ आणि अरुंद सडकेवरून चालणे नेहमीच कठीण असते. गोसेवेचे प्रत्येक पाऊल अडचणींनी भरलेले आहे. परंतु या अडचणींचा सामना करूनच आपण आपला मार्ग सरळ करू शकतो.

यावेळी मला केवळ एवढेच दाखवायचे आहे की व्यक्तिगत पशुपालनापेक्षा सामूहिक पशुपालन श्रेष्ठ आहे. माझे असेही मत आहे की सामूहिक पद्धती चांगली आहे, व्यक्तिगत पद्धती चूक. खरे सांगायचे तर व्यक्ती आपल्या स्वातंत्र्याचे रक्षण सहकार्याद्वारेच करू शकते. पशुपालनाच्या व्यक्तिगत प्रयत्नाने स्वार्थ आणि अमानुषतेलाच प्रोत्साहन दिले आहे. उलट सामूहिक प्रयत्नात हे दोष पूर्णपणे जरी नाही तरी ब-याच अंशी नक्कीच कमी करता येतात. (हरि, ५-२-१९४२, पृ. ३९)

## ८३. निसर्गोपचार

माझा विश्वास आहे की माणसाला औषधे घेण्याची फारशी गरज पडू नये. हजारातून नऊशेनव्याणऊ आजार योग्य पद्धतीचा नियमित आहार, पाणी आणि मातीचे उपचार आणि घरगुती औषध यांनी दुरुस्त करता येतात. (ए, पृ. १९९)

माझे ठाम मत आहे की स्वच्छतेच्या वैयक्तिक, घरातील आणि सार्वजनिक नियमांचे कठोरपणे पालन केले तर आणि आहार व व्यायाम यांच्याबद्दल योग्य काळजी घेतली तर दुखण्याखुपण्याची भीती राहत नाही. जिथे पूर्ण आंतरिक आणि बाह्य शुचिता असेल तिथे आजार जवळपासही फिरकू शकत नाही. गावातील लोकांना ही गोष्ट कळली तर डॉक्टर, वैद्य वा हकीम यांचे काम पडणार नाही.... (हरि, २६-५-१९४६, पृ. १५३)

### उत्तम जीवन

माणसाची जीवन पद्धती आदर्श असली पाहिजे हे निसर्गोपचारातून ध्वनित होते आणि हे तेव्हाच शक्य आहे जेव्हा शहरांतील आणि गावांमधील राहण्याची सोय आदर्श असेल. अजून एक गोष्ट आहे, निसर्गोपचारपद्धती ईश्वराच्या नावाला केंद्रस्थानी मानून चालते. (हरि, २६-५-१९४६, पृ. १५३)

निसर्गोपचारात उपचार स्वस्तात स्वस्त आणि साध्यात साधा असला पाहिजे हे गृहीत धरण्यात आले आहे. सर्वात चांगली गोष्ट तर ही आहे की, हा उपचार

गावात राहत असतानाच करता आला पाहिजे. याकरिता आवश्यक साधन आणि उपकरण यांची जुळवाजुळव करणे गावातील लोकांना शक्य झाले पाहिजे. जी गोष्ट गावात उपलब्ध नसेल ती बाहेरून मागवली जाऊ शकते.

निसर्गोपचारामुळे स्वतः जीवनाबद्दल माणसाच्या दृष्टिकोनातच हितकारक बदल झाला पाहिजे. आपल्या जीवनात आरोग्याच्या नियमांचे पालन करण्याची प्रेरणा निसर्गोपचारामुळे माणसाला मिळते. दवाखान्यात जाऊन पैसे देऊन औषध देण्यासारखी ही गोष्ट नाही. जी व्यक्ती दवाखान्यातून फुकट उपचार करून घेते ती दान घेते. जो निसर्गोपचाराचा आधार घेतो तो कधीही दान मागत नाही. स्वावलंबनामुळे स्वाभिमान वाढतो. आपल्या शरीरातील विष काढून त्याला रोगमुक्त करण्याचा तो उपाय करतो आणि आपण परत आजारी पडणार नाही, याची काळजी घेतो....(हरि, २-६-१९४६, पृ. १६५)

## योग्य आहार

योग्य आणि संतुलित आहार आवश्यक आहे. आज आपली खेडी आपल्याप्रमाणेच दिवाळखोर झाली आहेत. गावात भाज्या, फळे, दूध यांचे पुरेसे उत्पादन होणे ही गोष्ट निसर्गोपचार पद्धतीचा आवश्यक भाग आहे. यावर खर्च होणा-या वेळेला अपव्यय समजण्यात येऊ नये. (हरि, २-६-१९४६, पृ. १६५)

यामुळे सगळ्या गावांचा आणि अखेरीस भारताचा नक्कीच लाभ होईल.

निसर्गोपचाराचे सार हेच आहे की, आरोग्य रक्षण आणि स्वच्छता विषयक नियम समजून घ्यावे आणि त्यांच्या तसेच उचित पोषणासंबंधीच्या नियमांचे पालन आपण केले पाहिजे. यामुळे प्रत्येक माणूस स्वतःचा डॉक्टर बनू शकतो.

जी व्यक्ती जिवंत राहण्याकरिता जेवण करते, जी पृथ्वी, जल, वायू, अग्नी आणि आकाश या पंचतत्त्वाबरोबर मैत्रीचा भाव ठेवते आणि या सर्वांचा निर्माता असलेल्या ईश्वराची जी सेवक आहे ती व्यक्ती कधी आजारी पडलीच तर तिने ईश्वरावर विश्वास ठेवून आपले मन शांत ठेवले पाहिजे आणि अखेरची वेळ आली की शांतपणे तिने प्राणत्याग केला पाहिजे. त्या व्यक्तीच्या गावातील शेतांमध्ये काही औषधी वनस्पती असतील तर, ती त्यांचे सेवन करू शकते. करोडो लोक अशाच पद्धतीने सहजपणे जगत आणि मरत असतात. डॉक्टर काय गोष्ट आहे हेही त्यांना माहीत नसते, मग त्याला पाहण्याची गोष्ट तर दूरच. (हरि, १-९-१९४६, पृ. २८५-६)

## आजार

अज्ञानामुळे वा जाणीवपूर्वक निसर्गनियमांचा भंग केल्यामुळे आजार होतो. याचा अर्थ असा होतो की, वेळ राहताच आपण परत त्या नियमांचे पालन करू लागलो तर आपल्याला परत स्वास्थ्यलाभ होऊ शकतो. ज्या व्यक्तीने निसर्गनियमांचे दीर्घ काळापासून उल्लंघन केले आहे त्या व्यक्तीला एक तर निसर्गाने दिलेली शिक्षा भोगावी लागेल वा त्यापासून वाचण्याकरिता आवश्यकतेप्रमाणे डॉक्टरची वा शल्यचिकित्सकाची मदत घ्यावी लागेल. योग्य शिक्षा भोगल्यामुळे मनाची शक्ती वाढते तर ती चुकवल्यामुळे मनाच्या शक्तीचा -हास होतो.
(हरि, १५-९-१९४६, पृ. ३११)

निसर्गोपचार अथवा देशी चिकित्सापद्धतिविषयक माझ्या प्रेमाचा अर्थ असा नाही की पाश्चात्त्य चिकित्सापद्धतीने जी प्रगती केली आहे तिच्याकडे मी डोळेझाक करू इच्छितो. एवढे मात्र खरे की काळी जादू म्हणून मी तिची निंदा केली आहे. हे कठोर शब्द मी याकरिता वापरले - आणि ते परत घेण्याचा माझा हेतू नाही - की पाश्चात्त्य पद्धती जीवोच्छेदन आणि तिच्याशी जुळलेल्या सर्व घृणित गोष्टींना प्रोत्साहन देते आणि ही पद्धती कितीही वाईट असली तरी देहाला अधिकात अधिक काळ जिवंत ठेवता यावे म्हणून या पद्धतींचा अवलंब पाश्चात्त्य उपचार पद्धती करतच राहणार आहे. अशा प्रकारे शरीराला जिवंत ठेवण्याचा प्रयत्न करत असताना ती आत्म्याची उपेक्षा करते. निसर्गोपचाराच्या फार मोठ्या मर्यादा असतानाही आणि निसर्गोपचारकांच्या भंपक दाव्यानंतरही मी या चिकित्सापद्धतीचा पुरस्कर्ता आहे. (हरि, ११-८-१९४६, पृ. २५९)

## गावांकरिता

निसर्गोपचार पद्धतीची माझी योजना केवळ ग्रामवासीयांकरिता आणि गावांकरिता आहे. यामुळे त्यात ना दुर्बिणी, क्ष-किरण इत्यादींकरिता स्थान आहे ना तिच्यात क्विनाईन, इमेटिन आणि पेनिसिलीन सारख्या औषधांचे काही काम आहे. हिच्यात मूलभूत महत्त्व स्वच्छता आणि आरोग्यदायी जीवनपद्धती यांनाच आहे. बस, एवढेच पुरे आहे.

प्रत्येक व्यक्ती या कलेत पारंगत झाली तर आजार राहणारच नाहीत आणि निसर्गाच्या सर्व नियमांचे पालन करत असतानाही आजार शिरला तर सर्वात प्रभावी उपाय रामनाम आहे. परंतु रामनामाचा उपाय सर्वांकरिता पापणी

मिटता क्षणीच यशस्वी होत नाही. रोग्यामध्ये रामनामाबद्दलची श्रद्धा जागृत करण्याकरिता स्वतः चिकित्सक रामनामाच्या शक्तीचे जिवंत उदाहरण असला पाहिजे. (हरि, ११-८-१९४६, पृ. २६०)

आपण खरोखरीचे ग्रामीण मनोवृत्तीचे होऊ या. गावातील मुले आणि प्रौढ आपल्याकडे येतील. आपण त्यांना जगण्याच्या ख-या पद्धतीची शिकवण देऊ. डॉक्टरांचे म्हणणे आहे की नव्वद टक्के आजार घाणेरडेपणा, चुकीचा आहार आणि कुपोषणामुळे होतात. जर आपण ही नव्वद टक्के जगण्याची कला शिकलो आणि उरलेली दहा टक्के कला जरी विसरलो तरी काही फरक पडणार नाही.... शक्य आहे की त्या आजाराची चिकित्सा करण्याकरिता एखादा परोपकारी डॉक्टर मिळेल.... त्याची चिंता करण्याची आपल्याला गरज नाही.
(हरि, १-९-१९४६, पृ. २८६)

डॉक्टर आणि वैज्ञानिक देशाकरिता काय करत आहेत हे मला जाणून घ्यायचे आहे. विशेष आजाराच्या चिकित्सेच्या नवीन पद्धती समजून घ्यायला विदेशात जाण्याची त्यांची नेहमीच तयारी असते. माझा आग्रह आहे की त्यांनी भारताच्या सात लाख खेड्यांकडे लक्ष द्यावे. ग्रामसेवेकरिता योग्यताप्राप्त सगळ्या चिकित्सकांची गरज असल्याचे त्यांना आढळून येईल. हे खरे आहे की ग्रामसेवा पूर्वेच्या पद्धतीने होईल, पाश्चात्त्य पद्धतीने नाही. तसे झाले की ते स्वतःला अनेक देशी पद्धतींच्या अनुकूल बनवून घेतील.

भारताच्या गावातच मुळात औषधींचे अक्षय भांडार निर्माण होत असल्यामुळे पश्चिमेकडून औषधे मागवण्याची आम्हाला काहीही गरज नाही. परंतु ग्रामवासीयांना जगण्याची योग्य पद्धती शिकवणे ही गोष्ट औषधांपेक्षा अधिक महत्त्वाची आहे. (हरि, १५-६-१९४७, पृ. १८४-५)

## ८४. सामूहिक स्वच्छता

### नागरिक विवेक

सामूहिक स्वच्छता तेव्हाच पाळली जाऊ शकते जेव्हा सामूहिक विवेक असेल आणि सार्वजनिक ठिकाणांना स्वच्छ ठेवण्याचा समूहांचा आग्रह असेल. आपले रस्ते आणि सार्वजनिक शौचालये यांच्या घाणीकरिता बहुतांश आमच्यामधील अस्पृश्यताच जबाबदार आहे.

सुरुवातीला अस्पृश्यता स्वच्छतेचा एक नियम होता. भारत सोडून जगाच्या

सगळ्या भागात तो आजही आहे. नियम असा आहे की अस्वच्छ व्यक्ती वा वस्तू अस्पर्श असते, परंतु तिची अस्वच्छता दूर होताच ती व्यक्ती वा वस्तू अस्पर्श्य राहत नाही. याप्रमाणे सफाई करणारी व्यक्ती, मग पैसे घेऊन काम करणारा भंगी म्हणा की निःशुल्क काम करणारी आमची आई म्हणा तोपर्यंतच अस्वच्छ आहे जोपर्यंत घाण साफ केल्यानंतर हे लोक स्वतः स्वच्छ होत नाहीत. (हरि, ११-२-१९३३, पृ. ८)

### नगरपालिका

कोणतीही नगरपालिका कर लावून वा पगारी कर्मचारी ठेवून शहरातील घाण आणि गर्दी यांच्याशी यशस्वी लढा देऊ शकत नाही. ही महत्त्वपूर्ण सुधारणा श्रीमंत आणि गरीब अशा सर्व लोकांच्या स्वेच्छापूर्ण सहकार्यानेच शक्य आहे. (यंग, २६-११-१९२५, पृ. ४१६)

मी जर एखाद्या परिषदेच्या वा नगरपालिकेच्या सीमेत राहणारा करदाता असतो तर जोपर्यंत आम्ही दिलेल्या पैशाच्या चौपट सेवा आम्हाला मिळाली नसती तोपर्यंत वाढीव कराचा एक पैसाही मी दिला नसता व इतर लोकांनाही असेच करण्याचा मी सल्ला दिला असता. जे लोक आमचे प्रतिनिधी बनून स्थानिक परिषदांमध्ये वा नगरपालिकांमध्ये जातात त्यांनी लक्षात ठेवले पाहिजे की ते सन्मान मिळवण्याकरिता वा परस्परांत स्पर्धा करण्याकरिता तिथे जात नसतात तर प्रेमाने सेवा करण्याकरिता तिथे जात असतात व या सेवेकरिता पैसे लागत नसतात.

आपला देश दारिद्र्यात खितपत पडलेला आहे. आपल्या नगरपालिकांच्या सदस्यांमध्ये सेवेची खरी भावना असेल तर ते स्वतः बिनपगारी भंगी आणि रस्त्यांची झाडझूड करणारे सफाई कामगार होतील व त्याबद्दल त्यांना अभिमान वाटेल. काँग्रेसच्या तिकिटावर निवडून न आलेल्या आपल्या साथी सदस्यांनाही आपल्याबरोबर काम करण्याकरिता ते आमंत्रित करतील आणि त्यांचा स्वतःवर व स्वतःच्या ध्येयावर विश्वास असेल तर त्यांचे आमंत्रण वाया जाणार नाही.

याचा अर्थ असा आहे की नगरपालिकेचा सदस्य पूर्ण वेळ काम करणारा असला पाहिजे. त्याचा कोणताही वैयक्तिक स्वार्थ नसावा. यानंतर दुसरे काम म्हणजे नगरपालिकेच्या वा परिषदेच्या सीमेत राहणा-या सर्व प्रौढ लोकांची सूची तयार करण्यात यावी. सर्वांना नगरपालिकेच्या कामात सहकार्य करण्याकरिता

सांगण्यात यावे. एक नियमित रजिस्टर ठेवण्यात यावे. अतिशय गरीब असल्यामुळे जे कोणतीही आर्थिक मदत करू शकत नाहीत परंतु शारीरिक दृष्टीने धडधाकट असल्यामुळे जर ते श्रमदान करू शकत असतील तर त्यांना श्रमदान करण्याकरिता सांगितले जाऊ शकते. (हरि, १८-२-१९३९, पृ. २२)

**निसर्गाविरुद्ध अपराध**

कोणतीही व्यक्ती जर बेफिकिरपणे इकडेतिकडे थुंकून, केरकचरा फेकून वा इतर प्रकारे जमीन घाणेरडी करून हवा दूषित करत असेल तर ती व्यक्ती माणूस आणि निसर्ग या दोघांच्याही विरुद्ध पाप करत असते. माणसाचे शरीर ईश्वराचे मंदिर आहे आणि जी व्यक्ती या मंदिरात शिरणारा वायू दूषित करते ती मंदिराला अपवित्र करत असते. ती रामनामाचा कितीही जप करत असली तरी सर्व व्यर्थ आहे. (हरि, ७-४-१९४६,पृ.६९)

राष्ट्रीय अथवा सामाजिक स्वच्छतेच्या भावनेचा आपल्या गुणात समावेश नाही. आपण आंघोळ करतो पण जिच्या काठावर वा जिच्यात आपण आंघोळ करतो त्या विहिरीला वा तलावाला वा नदीला आपण घाणेरडी केल्याशिवाय सोडत नाही. या दोषाला मी फार मोठा वाईटपणा समजतो. ही गोष्ट आपल्या गावांची, आपल्या पवित्र नद्यांची व पवित्र विहिरींची दुर्दशा करण्याकरिता जबाबदार आहे. (कंप्रो, पृ. १५)

## ८५. सांप्रदायिक सद्‌भाव

सांप्रदायिक शांततेची माझी लालसा कधीच कमी झाली नव्हती याची साक्ष माझ्या जिवंतपणी जरी नाही तरी माझ्या मृत्यूनंतर हिंदू आणि मुसलमान हे दोघेही देतील हे मला माहीत आहे. (यंग, ११-५-१९२१, पृ. १४८)

गरज भासल्यास माझ्या रक्ताने हिंदू आणि मुसलमान यांच्यातील संबंध दृढ करावे अशी माझी इच्छा आहे. (यंग, २५-९-१९२४, पृ. ३१४)

मी हिंदुंवर जितके प्रेम करतो तितकेच मुसलमानांवरही करतो. माझ्या हृदयात ज्या भावना हिंदूंकरिता निर्माण होतात त्याच मुसलमानांकरिताही निर्माण होतात. माझे हृदय फाडून दाखवता आले असते तर त्यात हिंदूंकरिता एक, मुसलमानांकरिता दुसरा, तिसरा अजून कोणासाठी असे कोणतेच वेगवेगळे कप्पे नाहीत असे दिसून आले असते. (यंग, १३-८-१९२१, पृ. २१५)

## ऐक्याचा अर्थ

माझ्या तारुण्याच्या सुरुवातीपासूनच मला हिंदू मुसलमान ऐक्याचे वेड लागलेले होते. अनेक उच्च कोटीचे मुसलमान माझे घनिष्ट मित्र आहेत. इस्लामची एक भक्त माझ्या मुलीसारखी आहे. ती हिंदू मुसलमान ऐक्यासाठी जगते आहे आणि त्याकरिता प्राणत्याग करायलासुद्धा ती आनंदाने तयार होईल. मुंबईच्या जामा मशिदीचे मुअज्झीन यांचा मुलगा माझ्या आश्रमातील निष्ठावंत रहिवासी होता. (हरि, ३०-४-१९३८, पृ. ९९)

हिंदू-मुसलमान ऐक्याचा अर्थ आहे आपले उद्दिष्ट एक असावे, ध्येय समान असावे आणि दुःखही समान असावे. एकमेकांच्या दुःखात सहभागी होऊन परस्परांबद्दलच्या सहिष्णुतेच्या भावनेने आपल्या समान ध्येयाच्या दिशेने आपण पुढे जाऊ तर ते हिंदू-मुसलमान ऐक्याच्या दृष्टिने सर्वात मजबूत पाऊल असेल. (यंग, २५-८-१९२०, पृ. ३)

हिंदू-मुसलमान ऐक्याचा अर्थ केवळ हिंदू मुसलमान यांच्यातील ऐक्य एवढाच नाही तर भारताला आपले घर समजणा-या सर्व लोकांमधील ऐक्य, मग त्यांचा धर्म कोणताही असो, असा त्याचा अर्थ आहे. (यंग, ११-५-१९२१, पृ. १४८)

आमच्या मैत्रीचा आधार प्रेम आहे, तोच धर्माचाही आधार आहे. मला प्रेमाच्या अधिकाराच्या बळावर मुसलमानांची मैत्री हवी आहे. एका संप्रदायात जरी प्रेमाची भावना कायम राहिली तरी राष्ट्रीय जीवनात ऐक्याची समस्या कधीही निर्माण होणार नाही. (यंग, २०-१०-१९२१, पृ. ३३३)

## एक कुटुंब

सर्वात चांगला उपाय आहे विश्वमैत्री. याचा अर्थ आहे सगळ्या माणसांना आपल्या कुटुंबातील सदस्य समजणे. जी व्यक्ती आपल्या आणि दुस-या कुटुंबांच्या सदस्यांमध्ये भेदभाव करते ती आपल्याच कुटुंबातील लोकांना चुकीचे शिक्षण देत असते व मतभेदाचा व अधर्माचा मार्ग प्रशस्त करते. (हरि, १७-११-१९४६, पृ. ४०२)

## सांप्रदायिक दंगली

सांप्रदायिक अराजक एक बहुमुखी राक्षस आहे. अखेरीस त्याच्याकरिता जबाबदार असणा-यांसह तो सर्वांचाच बळी घेतो. (हरि, १५-९-१९४०, पृ. २८४)

एका बाजूने बदला घेणे थांबवले तर दंगली पुढे जाऊ शकणार नाहीत. (हरि, १४-७ १९४६, पृ. २१९)

चुकीचे काम करणा-या व्यक्तीच्या सहधर्मी नातेवाइकांवर बदला घेण्याकरिता हल्ला करणे हे भ्याडपणाचे कृत्य आहे. (हरि, १७-११-१९४६, पृ. ४०८)

इस्लाम आणि हिंदू धर्मात असे लोक निर्माण झाले पाहिजे की ज्यांचे चारित्र्य तुलनात्मक दृष्टीने उच्च कोटीचे असेल आणि जे गुंडांमध्ये जाऊन काम करायला तयार असतील. (यंग, २९-८-१९२४, पृ. १८१)

आपण गुंडांचे हृदयपरिवर्तन करू आणि त्यांना नियंत्रणात ठेवू. (हरि, ७-४-१९४६, पृ. ७४)

कोणत्याही चांगल्या धर्मात, मग तो इस्लाम असो, हिंदू असो वा अजून कोणता असो, गुंडगिरीला कोणतेही स्थान असू शकत नाही. (हरि, ५-१-१९४७, पृ. ४७८)

## धर्मांबद्दल आदर

प्रत्येकाने दुस-याच्या धर्माबद्दल आदर बाळगला पाहिजे आणि त्याला हानी पोहोचवण्याचा विचार मनातही आणायला नको. (यंग, ७-५-१९१९)

दुस-याच्या धर्माची निंदा करणा-या प्रचाराची परवानगी देता येऊ शकत नाही. (यंग, २९-५-१९२४, पृ. १८०)

एकमेकांच्या धर्माची निंदा करणे, त्यांच्याबद्दल बेजबाबदार वक्तव्य देणे, खोटे बोलणे, निर्दोष लोकांची डोकी फोडणे, मंदिरांना वा मशिदींना अपवित्र करणे म्हणजे ईश्वराला नाकारणे आहे. (यंग, २५-९-१९२४, पृ. ३१३)

प्रत्येक व्यक्तीने आपल्या धर्मातील सर्व चांगल्या गोष्टींवर श्रद्धा ठेवावी आणि इतर धर्मांना व त्यांना मानणा-यांना तेवढ्याच आदरभावाने पाहावे. (हरि, ४-१-१९४८, पृ. ४९७)

प्राचीन संस्कृतीच्या दडलेल्या खजिन्याचा शोध घेत असताना प्राचीन हिंदू संस्कृतीत जे काही चिरंतन आहे तेच येशू, बुद्ध, महंमद आणि झरतुष्ट यांच्या शिकवणुकीतही आहे ही अमूल्य गोष्ट माझ्या हाती लागली. (विगांसी, पृ. १३१)

हिंदू धर्माने जगातील सर्व धर्मांमध्ये जे काही चांगले आहे ते सर्व आत्मसात केले आहे आणि यामुळे हा धर्म इतरांना वगळणारा धर्म नाही. यामुळे याचे इस्लाम वा त्याचे अनुयायी यांच्याशी कोणतेही भांडण असू शकत नाही. (हरि, २९-८-१९४७, पृ. ३४९)

तलवार ही इस्लामची प्रतीक नाही. परंतु इस्लामची निर्मिती अशा वातावरणात झाली होती की जिथे तलवारच सर्वश्रेष्ठ होती आणि आजही आहे....

अजूनही मुसलमानांमध्ये तलवारीवर फार भर आहे. इस्लामला आपल्या शब्दार्थाप्रमाणे खरे ठरायचे असेल तर त्याला आपली तलवार म्यान करावी लागेल. (यंग, ३०-१२-१९२६, पृ. ४५८)

इस्लामची मुख्य देणगी आहे.... ईश्वराच्या एकत्वावर दृढ विश्वास आणि आपल्या अनुयायांमध्ये बंधुभावाच्या प्रामाणिक भावनेनुसार व्यवहार. (यंग, २१-३-१९२९, पृ. ९५)

इस्लाम शब्दाचा अर्थ आहे शांतता. शांतता केवळ मुसलमानांपर्यंत मर्यादित ठेवता येऊ शकत नाही. याचा अर्थ विश्वशांतता असा घेतला पाहिजे. (यंग, २२-८-१९४०, पृ. २९४)

### धर्मांतर

बळजबरीने धर्मांतर करण्याचे दिवस आता गेले. (यंग, ११-५-१९२१, पृ. १४८)

एक धर्म सोडून दुसरा धर्म स्वीकारल्यामुळे आणि प्रतिस्पर्धी धर्माचे खंडन केल्यामुळे घृणाभाव निर्माण होतो. (यंग, ६-१-१९२७, पृ. १)

बळजबरीच्या धर्मांतराचे समर्थन करता येईल असे कुराणात काहीही नाही. (यंग, २९-९-१९२१, पृ. ३०७)

ज्याप्रमाणे नागरी समस्यांमुळे आपण एकमेकांची डोकी फोडत नाही त्याचप्रमाणे धर्माच्या बाबतीतही आपण असे करू नये. (यंग, २९-५-१९२४, पृ. १७६)

माझी खात्री आहे की पुढा-यांची भांडण्याची तयारी नसेल तर जमावाचीही भांडण्याची तयारी नसते. यामुळे प्रगत देशांप्रमाणे आपसातील भांडणांना रानटीपणाचे आणि धर्मविरोधी समजून सार्वजनिक जीवनातून पुढारी वर्गाने भांडणे नाहीशी केली तर जनताही मुकाट्याने त्यांचे अनुसरण करील याबद्दल माझ्या मनात कोणताही संशय नाही. (यंग, २९-५-१९२४, पृ. १८२)

### मध्यस्थी

मध्यस्थी ही सुसंस्कृत लोकांची प्राचीन पद्धत आहे. (हरि, २४-५-१९४२, पृ. १६६)

परस्पर सहिष्णुता सर्व काळांमध्ये आणि वंशांमध्ये एक आवश्यक गुण मानला गेला आहे. (यंग, २५-२-१९२०, पृ. ३)

प्रामाणिक लोकमताने दुखावलेल्या पक्षाला कायदा आपल्या हाती घेऊ देऊ नये आणि प्रत्येक विवादास्पद प्रकरण एक तर मध्यस्थाकडे वा कायदेशीर न्यायालयाकडे सोपवले पाहिजे.... (यंग, ५-६-१९२४, पृ. १८८)

## मशिदीसमोर वाद्य

मशिदीसमोर वाद्य वाजवायचे नाही या प्रथेचे जिथे हिंदू स्वतःहून पालन करत आले आहेत तिथे त्यांनी ही प्रथा तोडू नये. परंतु जिथे ते कोणत्याही अडथळ्याशिवाय वाद्य वाजवत आले आहेत तिथे ती प्रथा सुरू ठेवली पाहिजे. जिथे भांडणाची शक्यता असेल वा तथ्याबद्दल मतभेद असतील तिथे प्रकरण मध्यस्थाकडे सोपवले पाहिजे. (यंग, १८-९-१९२४, पृ. ३१२)

## गाय

गोरक्षा हिंदूंचा धर्म आहे, परंतु अहिंदूविरुद्ध बळजबरी करून गायीचे रक्षण करणे हा हिंदूंचा धर्म कधीही होऊ शकत नाही. (यंग, १८-९-१९२४, पृ. ३११)

....बहुसंख्याक हिंदुंनी कायदा करून गायीची कत्तल करण्याकरिता अल्पसंख्याक मुसलमानांना मनाई करणे ही गोष्ट सुज्ञपणाची व उचित होणार नाही. (यंग, २९-१-१९२५, पृ. ३८)

## लिपी

हिंदूंनी आणि मुसलमानांनी हिंदी आणि उर्दू लिपी स्वीकारावी हा माझा सल्ला एकात्मक पद्धतीवर आधारित आहे. (हरि, १-२-१९४२, पृ. २७)

## नोक-या

सरकारी विभागात आपण जर सांप्रदायिक भावना पसरवू तर ही गोष्ट सुशासनाकरिता फार घातक असल्याचे सिद्ध होईल.(यंग,२९-५-१९२४, पृ. १८२)

अल्पसंख्याकांना पूर्ण न्याय मिळवण्याचा हक्क आहे. कौशल्य आणि पात्रता हीच एकमेव कसोटी असली पाहिजे.... (हरि, २७-७-१९४७, पृ. २५०)

## सहिष्णुता

ज्या ऐक्याची आपल्याला इच्छा आहे ते ऐक्य तेव्हाच निर्माण होऊ शकेल जेव्हा आपण एकमेकांबद्दल लवचिक आणि उदार मनोवृत्ती विकसित करू. (यंग, ११-५-१०२१, पृ. १४८)

सहिष्णुताच ती गोष्ट आहे की जी वेगवेगळ्या धर्माच्या अनुयायांना चांगल्या शेजा-याप्रमाणे आणि मित्राप्रमाणे राहण्याकरिता मदत करते. (हरि, ३-११-१९४६, पृ. ३८३)

## धर्मनिरपेक्षता

संप्रदायवादापेक्षा राष्ट्रवाद मोठा आहे. या अर्थाने आपण आधी भारतीय आहोत आणि नंतर हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, पारशी इत्यादी. (यंग, २६-१-१९२२, पृ. ६२)

राज्याकरिता पूर्णपणे धर्मनिरपेक्ष असणे अपरिहार्य आहे.... त्यानुसार कायद्यासमोरही सर्व लोक समान असतील. परंतु कोणत्याही अडथळ्याशिवाय प्रत्येकजण आपल्या धर्माचे पालन करण्याकरिता स्वतंत्र असेल. परंतु तसे करताना सामान्य कायद्याचे त्याला उल्लंघन करता येणार नाही.
(हरि, ३१-८-१९४७, पृ. २९७)

## समान नागरिकत्व

अल्पसंख्याक वर्गाला जाणवले पाहिजे की ज्या राज्यात ते राहतात त्या राज्यातील बहुसंख्याक वर्गाएवढेच तेही महत्त्वाचे नागरिक आहेत. (हरि, ७-९-१९४७, पृ. ३१०)

बहुसंख्याक हिंदू आपल्या धर्माला आणि कर्तव्याला बहुमूल्य समजत असतील तर काहीही झाले तरी ते न्याय्य वर्तन करतील. अल्पसंख्याक न्यायाकरिता बहुसंख्याकांवरच अवलंबून असल्यामुळे बहुसंख्याक वर्ग अल्प-संख्याकांच्या उणिवा आणि दोष यांच्याकडे लक्ष देणार नाही.
(हरि, ३१-८-१९४७, पृ. २९८)

तुम्ही मुसलमानांना बरोबरीचे नागरिक मानले पाहिजे. उर्दूकडे आदराने पाहणे ही समतेच्या नियमाची मागणी आहे. (हरि, २६-१०-१९४७, पृ. ३८३)

अल्पसंख्याक वर्ग कितीही लहान असला तरी आपल्याला दबून राहावे लागत आहे असे त्याला जाणवायला नको. भाषा, लिपी इत्यादी प्रश्न फार नाजुकपणे हाताळले पाहिजेत. (हरि, २६-१०-१९४७, पृ. ३८७)

हिंदू-मुसलमान समस्येसंबंधी माझे ध्येय असे आहे की ही समस्या सुटून भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांमधील अल्पसंख्याकांना, ते अल्पसंख्याक असले तरी, पूर्ण सुरक्षितता जाणवली पाहिजे. (हरि, १४-९-१९४७, पृ. ३२३)

हिंदू आणि शीख भगिनींनी मुसलमान भगिनींशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले पाहिजे. त्यांनी त्यांना सणावाराला बोलावले पाहिजे. मुसलमान मुले आणि मुली यांना सांप्रदायिक नव्हे तर सार्वजनिक शाळेची ओढ वाटली पाहिजे. त्यांनी खेळामध्ये मिसळले पाहिजे. (हरि, २५-१-१९४०, पृ. ५३६)

# १३. स्वदेशी

## ८६. चरख्याचा दिव्य संदेश

**गरिबांकरिता**

मी जेव्हा जेव्हा चरख्यावर सूत कातते तेव्हा तेव्हा मला भारतातील गरीब लोकांची आठवण होते. मध्यम वर्ग वा श्रीमंतांपेक्षाही भारतातील निर्धनांचा आज ईश्वरावरील विश्वास उडाला आहे. भुकेने तडफडणा-या माणसाची एकमेव इच्छा पोट भरण्याची असते. त्याच्याकरिता त्याचे पोटच ईश्वर असते. त्याला जो कोणी भाकरी देईल त्यालाच तो आपला मालक समजतो. त्याच्यातच त्याला बहुधा ईश्वराचे दर्शन होत असते. धडधाकट लोकांना भिक्षा देणे स्वतःला आणि त्यांना, दोघांनाही भ्रष्ट करणे आहे. वास्तवात त्यांना कोणता तरी कामधंदा पाहिजे असतो आणि हाताने सूतकताई हाच एकमेव असा उद्योग आहे जो करोडो लोकांना रोजगार देऊ शकतो.

....माझ्या कताईचे वर्णन मी तपस्या वा धार्मिक विधी म्हणून केले आहे आणि माझा विश्वास आहे की जिथे गरिबांबद्दलचे शुद्ध आणि सक्रिय प्रेम असते तिथे ईश्वर असतो. चरख्यावर मी कातत असलेल्या सुताच्या प्रत्येक धाग्यातून मला ईश्वराचे दर्शन होते. (यंग, २०-५-१९२६, पृ. १८७)

....चरख्यामुळे आपण करोडो लोकांशी एकरूप होऊ शकतो. पैशाने जगातील आपण काहीही विकत घेऊ शकतो असे करोडपतींना वाटत असते. परंतु असे नाही. कोणत्याही क्षणी मृत्यू येऊन त्यांचा अंत करू शकतो.... जीव जाणे म्हणजे.... म्हणजे काही 'स्वत्व' नाहीसे करणे होत नाही. ईश्वराचा शोध घ्यायचा असेल तर माणसाला स्वतःला वा आपल्या अहम्ला स्वेच्छेने पुसून टाकणे शिकावे लागते. चरख्यामुळे इतरांना वगळण्याची शक्यता नाहीशी होते. तो गरिबांसहित सर्वांचा आहे. यामुळेच तो आमच्याकडून नम्र होण्याची व अहंकार पूर्णपणे नष्ट करण्याची अपेक्षा करतो. (हरि, १३-१०-१९४६, पृ. ३४५)

केवळ कुटिरोद्यागामुळे नाही तर कुटिरोद्योगाच्या पुनरुज्जीवनामुळे देशाची गरिबी दूर होईल. केवळ एका उद्योगाचे जरी पुनरुज्जीवन झाले तरी इतर सर्व

उद्योग त्याचे अनुसरण करतील.... चरख्याच्या पायावर मी सुदृढ ग्रामीण जीवन उभे करीन. सर्व कामकाजाच्या केंद्रस्थानी मी चरख्याला ठेवेन. (यंग, २१-५-१९२५, पृ. १७६-१७७,)

**चरख्याचा संदेश**

माझा दावा आहे की चरखा आपल्याला आर्थिक यातनांमधून अतिशय सहजपणे, कमी खर्चात आणि व्यावसायिक पद्धतीने मुक्त करू शकतो.... चरखा देशाच्या समृद्धीचे व पर्यायाने स्वातंत्र्याचे चिन्ह आहे. चरखा वाणिज्य विषयक संघर्षाचा नाही तर शांततेचा प्रतीक आहे. (यंग, ८-१२-१९२१, पृ. ४०६)

चरख्याचा संदेश त्याच्या परिघापेक्षा जास्त व्यापक आहे. साधेपणा, मानवजातीची सेवा, दुस-याला त्रास होणार नाही अशी जीवनपद्धती, श्रीमंत आणि गरीब, भांडवल आणि श्रम, राजा आणि रंक या सर्वांमध्ये निकट संबंध स्थापन करणे हा चरख्याचा संदेश आहे. असा हा व्यापक संदेश स्वाभाविकपणे सर्वांकरिताच आहे. (यंग, १७-९-१९२५, पृ. ३२१)

शोषणाच्या स्थानावर सेवेच्या भावनेला स्थानापन्न करणे हा खरे म्हणजे चरख्याचा संदेश आहे. पश्चिमेचा प्रमुख स्वर शोषणाचा स्वर आहे. माझ्या देशाने त्या भावनेची वा त्या स्वराची नक्कल करावी अशी माझी मुळीच इच्छा नाही. (यंग, २-२-१९२८, पृ. ३४)

चरख्याजवळ अमेरिकेसहित सगळ्या जगाला देण्याकरिता संदेश आहे असे मला जाणवते. परंतु ती वेळ तेव्हा येईल जेव्हा भारताने चरख्याचा पूर्णपणे अंगीकार केला आहे असे तो जगाला दाखवून देऊ शकेल. अजून ती परिस्थिती आलेली नाही. दोष चरख्याचा नाही. भारत आणि विश्व यांना चरखाच वाचवू शकेल याबद्दल मला मुळीच संशय नाही. भारत जर यंत्राचा गुलाम झाला तर जगाला देवच वाचवू शकेल. (यंग, १७-११-१९४६, पृ. ४०४)

**परत साधेपणाकडे**

आधुनिक भोगवादी जीवनाविरुद्ध मी जो प्रचार करतो आहे आणि स्त्री-पुरुषांना साध्या जीवनाकडे, ज्याचे प्रतीक चरखा आहे, परत फिरण्याकरिता मी प्रेरित करतो आहे कारण मला माहीत आहे की समंजसपणाने साध्या जीवनपद्धतीकडे आपण परतलो नाही तर आपले इतके अधःपतन होईल की आपली अवस्था पशूंपेक्षाही वाईट होईल. (यंग, २१-७-१९२१, पृ. २२८-९)

माझा विश्वास आहे की भारताला अहिंसेशिवाय दुसरा कोणताही मार्ग नाही. भारताकरिता त्या धर्माचा प्रतीक चरखा आहे कारण चरखाच केवळ विपत्तिग्रस्त लोकांचा मित्र आहे व निर्धन लोकांना समृद्धी देणारा आहे. प्रेमाच्या नियमाला स्थळकाळाच्या सीमा माहीत नसतात. यामुळेच माझ्या स्वराज्यात भंगी, धेड, दुबळे आणि इतर दुर्बलतम व्यक्ती यांना स्थान आहे आणि मला अशी कोणतीही गोष्ट माहीत नाही की जी या सर्वांची मित्र आहे. (यंग, ८-१-१९२५, पृ. १८)

**जीवनचक्र**

मानसिक शांततेकरिता चरख्यावर कताई करा. चरख्याचे संगीत तुमच्या आत्म्याकरिता मलमाचे काम करील. माझा विश्वास आहे की आपण कातत असलेल्या सुतात आपल्या जीवनाचा तुटलेला धागा परत सांधण्याचे सामर्थ्य आहे. चरखा अहिंसेचे प्रतीक आहे व आपल्याला प्रामाणिक जीवन जगायचे असेल तर आपले संपूर्ण जीवन त्यावर आधारित असले पाहिजे.
(हरि, २७-४-१९४७, पृ. १२२)

चरख्यामुळे काही लोकांना शांततासम्राट अशोकाची आठवण होईल. त्याने एका साम्राज्याचा पाया रचला होता. परंतु सत्ता आणि संपत्ती यांचे अवडंबर सोडून तो जनतेच्या हृदयातील निर्विवाद सम्राट बनला व त्या काळातील सगळ्या ज्ञात धर्मांचे त्याने प्रतिनिधित्व केले. जर आपल्याला चरख्यात त्या नियमचक्राचे दर्शन झाले, जे करुणा आणि प्रेम यांच्या जागृत सागराशी जुळलेले आहे, तर ती चरख्याची तंतोतंत व्याख्या होईल.

अशा प्रकारचा अर्थ असलेला चरखा करोडो मानवी जीवनांना अर्थपूर्ण बनवतो. अशोकचक्राबरोबर याची तुलना करणे आणि त्यातून त्याची निर्मिती मानणे याचा अर्थ आहे सामान्य दिसणा-या चरख्यात सदैव गतिमान असलेल्या प्रेमाच्या दैवी नियमाच्या पालनाची आवश्यकता मान्य करणे.
(हरि, ३-८-१९४७, पृ. २६६)

आश्रमातील प्रार्थनेचा चरखा हा एक अविभाज्य भाग बनला आहे. चरख्याला त्यागाचे प्रतीक मानून त्याला ईश्वराच्या संकल्पनेशी जोडण्यात आले आहे. गरीब लोकांच्या मुक्तीचे चरखा हे एकमेव साधन आहे, असा आमचा विश्वास असल्यामुळे असे करण्यात आले आहे. (हरि, १८-८-१९४६, पृ. २६३)

माझा दावा आहे की हातकताईला सार्वत्रिक करून आणि चरख्याच्या सर्व

उद्देशांचा प्रचार करूनच भारतासारख्या विशाल देशाचे जडत्व संपवता येऊ शकते. मी चरख्याची तुलना सूर्याशी केली आहे आणि गावातील अन्य कौशल्यांना सौरमंडळातील इतर नक्षत्रांप्रमाणे मानले आहे. सूर्य सर्व नक्षत्रांना प्रकाश आणि उष्णता देतो व त्यांना जिवंत ठेवतो. सूर्याशिवाय नक्षत्रांचे अस्तित्वच राहत नाही. (हरि, ३१-३-१९४६, पृ. ५८)

**कताईचे कर्तव्य**

ज्याप्रमाणे आपल्यामधील प्रत्येक व्यक्तीला खाण्या-पिण्याची आणि कपड्या-लत्त्यांची आवश्यकता आहे, त्याचप्रमाणे आपल्यापैकी प्रत्येकाने स्वतः कताईही केली पाहिजे. (यंग, २८-५-१९२५, पृ. १८२)

मी कर्मयोगी वा अन्य कोणता योगी आहे की नाही, हे मला माहीत नाही. मला केवळ एवढे माहीत आहे की, मी काम केल्याशिवाय जगू शकत नाही. चरख्यावर कताई करता करता मला मरण यावे अशी माझी कामना आहे. ईश्वराशी संबंध स्थापण्यासाठी जर एखाद्या माध्यमाची आवश्यकता असेल तर ते माध्यम चरखाच का असू नये? गीतेत भगवान सांगतात जो माझी आराधना करतो त्याला मी उचित मार्ग दाखवतो व त्याची प्रत्येक आवश्यकता मी पूर्ण करतो. (हरि, ८-५-१९३७, पृ. ९९)

भारतातील प्रत्येक स्त्री जर कताई करायला सुरुवात करील तर भारतात मूक क्रांती होऊन जाईल व त्याचा निश्चित लाभ जवाहरलाल नेहरूंसारखा नेता घेऊ शकतो. एकदा वाफ तयार झाली आणि तिचा उचित उपयोग केला गेला नाही तर इंजिन चालणार नाही आणि वाफ तयार करणारी व्यक्ती स्वतःच त्या वाफेत जळेल व कदाचित त्यातच तिचा जीवही जाऊ शकेल.
(हरि, १४-४-१९४६, पृ. ८८)

चरख्याचा शास्त्रीय अभ्यास आपल्याला समाजशास्त्राकडे घेऊन जाईल. जोपर्यंत चरख्याशी संबंधित शास्त्रांचा आपण सखोल अभ्यास करणार नाही तोपर्यंत भारताच्या स्वातंत्र्याकरिता आपल्या हातातील प्रभावी अस्त्र चरखा बनणार नाही. आपण जर असे केले तर चरखा भारताला तर स्वतंत्र करीलच शिवाय सर्व जगाला तो मार्गही दाखवील. (हरि, ३१-३-१९४६, पृ. ५९)

**'स्वातंत्र्याचा गणवेष'**

....एकीकडे खादी गरिबांकरिता भाकरी कमावण्याचा एक सन्माननीय

व्यवसाय आहे तर दुसरीकडे अहिंसक पद्धतीने स्वराज्य मिळवण्याचे ते एक अतिरिक्त आणि तुलनात्मक दृष्टीने अधिक मूल्यवान अस्त्रही आहे. (हरि, २८-४-१९४६, पृ. १०४)

सन १९०८ मध्ये दक्षिण आफ्रिकेत असताना मला वाटू लागले होते की, गरिबीने ग्रस्त भारताला विदेशी शक्तीपासून मुक्त करायचे असेल तर, चरख्याला आणि त्याने कातलेल्या सुताला स्वातंत्र्याचे प्रतीक मानण्यात आले पाहिजे. यामुळे गरीब माणसाला आपल्या तुटपुंज्या उत्पन्नात थोडीबहुत भरही घालता येते. (हरि, २२-९-१९४६, पृ. ३२०)

माझ्या दृष्टिकोनातून खादी भारतवासीयांचे ऐक्य, त्यांचे आर्थिक स्वातंत्र्य आणि समता यांचे प्रतीक आहे. यामुळे जवाहरलाल नेहरू यांच्या काव्यमय भाषेत ती 'भारताच्या स्वातंत्र्याचा गणवेष' आहे.

याशिवाय खादीच्या मानसिकतेचा अर्थ आहे जीवनावश्यक वस्तूंच्या उत्पादनाचे व विक्रीचे विकेंद्रीकरण. यामुळेच आता असे सूत्र तयार करण्यात आले आहे की प्रत्येक गावाने आपल्या गरजेच्या सर्व वस्तूंचे उत्पादन स्वतः करावे आणि त्याचबरोबर शहरांच्या आवश्यकतांकरिताही काही अतिरिक्त उत्पादन करावे.

जड उद्योग निश्चितच केंद्रीकृत आणि राष्ट्रीयीकृत असतील. परंतु विशाल राष्ट्रीय उपक्रमात, जे प्रामुख्याने गावातून होईल, जड उद्योगांचे स्थान अतिशय नगण्य असेल....

या केंद्रीय ग्रामोद्योगाचा आणि त्याच्याशी संबंधित हस्तकौशल्याचा निर्दयपणे नाश केल्यानंतर बुद्धिमत्ता आणि प्रतिभेने गावातून पळ काढला व त्यामुळे गाव मूढ आणि निस्तेज झाले आणि तिथे पाळल्या जाणा-या पशूंसारखी त्यांची अवस्था झाली. (कंप्रो, पृ. १२)

## आर्थिक पुनरुद्धार

माझा विश्वास आहे की हातकताई आणि विणकाम यांचा पुनरुद्धार केल्यामुळे भारताच्या आर्थिक आणि नैतिक पुरुज्जीवनात फार मोठी भर पडेल. आपल्या लाखो ग्रामवासीयांजवळ कृषीला पूरक असा कोणता तरी साधा जोडधंदा करण्याची आवश्यकता आहे. वर्षांपूर्वी कताई हा एक कुटिरोद्योग होता आणि लोकांना उपासमारीपासून वाचवायचे असेल तर आपण आपल्या घरांमधून परत कताईची सुरुवात केली पाहिजे आणि प्रत्येक गावाजवळ स्वतःचा एक विणकर

असला पाहिजे. (यंग, २१-७-२०, पृ. ४)

चरखा जगातील कोणत्याही राष्ट्राच्या विरोधातील दुर्भावनेचे प्रतीक नसून तो सद्‌भावना आणि स्वावलंबनाचा संदेशवाहक आहे. यामुळे त्याच्या संरक्षणाकरिता नौदलाची आवश्यकता पडणार नाही कारण विश्वशांती आणि विश्वाची संसाधने यांचे शोषण होण्याचा त्याच्यापासून कोणताही धोका नाही. एवढे मात्र खरे की आपले जेवण ज्याप्रमाणे आपण आपल्या घरात बनवतो त्याचप्रमाणे आपल्या कपड्यांकरता लागणारे सूतही आपण आपल्याच घरात कातायचे असा संकल्प आपल्या लाखो देशबांधवांना करावा लागेल.

माझ्या चुकांकरिता येणा-या पिढ्या मला दोष देऊ शकतात. परंतु चरख्याच्या पुनरुद्धाराकरिता त्या मला आशीर्वादच देतील याची मला खात्री आहे. याकरिता मी माझे सर्व काही पणाला लावले आहे. चरख्याच्या चक्राच्या प्रत्येक फेरीबरोबर शांती, सद्‌भावना आणि प्रेम यांचेही सूत निघत असते. आणि ज्याप्रमाणे चरख्याचा लोप झाल्यानंतर भारत गुलाम झाला होता त्याचप्रमाणे त्याच्या आणि त्याच्याशी जुळलेल्या सर्व गोष्टींच्या पुनरुद्धारानंतर भारताला स्वातंत्र्य मिळेल. (यंग, ८-१२-१९२१, पृ. ४०६)

### ग्रामीण जनतेची आशा

अनेकदा मी म्हणालो आहे की भारतातील लाखो गावांना जिवंत ठेवायचे असेल आणि सर्व संस्कृतीचे मूळ असलेली शांतता मिळवायची असेल तर आपल्याला चरख्याच्या सर्व हस्तोद्योगांना केंद्र बनवावे लागेल. (हरि, १९-२-१९३८, पृ. ११)

माझ्या दृष्टीकोनातून चरखा सर्वसामान्य जनतेच्या आशेचे प्रतीक आहे. चरख्याच्या लोपाबरोबरच सर्वसामान्य जनतेच्या स्वातंत्र्याचा लोप झाला होता. गावक-यांकरिता चरखा शेतीला पूरक उद्योग होता व त्यामुळे त्यांना प्रतिष्ठा मिळाली. तो विधवांचा, आईबहिणींचा मित्र आणि आधार होता. कापसातून सरकी दूर करणे, पिंजाई, ताणा तयार करणे, खळ लावणे, रंगाई असे अनेक उद्योग चरख्यासोबत जुळलेले होते. त्यामुळे गावातील लोक निष्क्रिय राहत नव्हते आणि हे लोक गावातील सुताराला व लोहारालाही आपल्या कामात व्यस्त ठेवायचे.

चरख्यामुळे आमची सात लाख खेडी स्वयंपूर्ण होती. चरख्याबरोबर घाण्यांचा आपला उद्योगही नष्ट झाला. यांची जागा दुस-या कोणत्याही उद्योगाने घेतली नाही. परिणामी गावातील अनेक व्यवसाय नष्ट झाले व त्याबरोबरच तेथील सृजनात्मक

प्रतिभेचाही लोप झाला. त्यामुळे जी थोडीबहुत कमाई होत होती तीही बंद झाली.... यामुळेच गावांचे पुनरुज्जीवन व्हावे असे आपल्याला वाटत असेल तर चरखा आणि त्याच्याशी जुळलेल्या सर्व गोष्टींचा पुनरुद्धार केला पाहिजे ही गोष्ट सर्वात आधी समोर येते. (हरि, १३-४-१९४०, पृ. ८५)

चरखा माणसाच्या उपजीविकेचे यशस्वी साधन ठरू शकतो याबद्दल मला किंचितही संशय नाही आणि याचबरोबर चरख्यावर कताई करणारा शेजा-यांचीही सेवा करत असतो.... कौशल्यपूर्वक कताई करण्याकरिता त्याआधीच्या व नंतरच्या प्रक्रियांचे ज्ञान असणेही जरुरी असते. (हरि,१७-३-१९४६, पृ. ४२)

भारतात येण्यापूर्वीच मला निश्चितपणे वाटू लागले होते की हातकताईच्या पुनरुज्जीवनानेच भारताला आपल्या प्राचीन गौरवाचे स्थान परत मिळू शकेल. तेव्हा मी चरख्याची तुलना सूर्याशी केली होती. आपली संपूर्ण अर्थव्यवस्था त्याची परिक्रमा करत असते. श्रीमंत आणि गरीब यांना जोडणारा हा सुवर्णाचा सेतू आहे. (हरि, २१-७-१९४६, पृ. २३१)

पश्चिमेकडील लहान वा मोठ्या यंत्रांसारखा चरखा नाही. तिथे मोजक्या ठिकाणी करोडो घड्याळांची निर्मिती होते. ही घड्याळे सगळ्या जगात विकली जातात. हीच गोष्ट शिवणयंत्रालाही लागू होते. या गोष्टी एका संस्कृतीच्या प्रतीक आहेत.

एखाद्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात उत्पादन करून आम्ही चरख्याचे सार्वत्रीकरण करू इच्छीत नाही. ज्या वस्तीत कताई करणारे राहत असतील त्याच वस्तीत चरखे आणि त्याच्या साहाय्यक वस्तू तयार झाल्या पाहिजे हा आपला आदर्श आहे. यातच चरख्याचे मूल्य दडलेले आहे. चरख्यात काही बिघाड झाला तर तो तिथेच दुरुस्त करता आला पाहिजे आणि कताई करणा-याला त्याचे प्रशिक्षण दिले पाहिजे. (हरि, २०-१०-१९४६, पृ. ३६३-४)

**मीलउद्योग**

सूत कताई करणा-या आमच्या गिरण्या आमच्या गरजेप्रमाणे सूत कातू शकत नाहीत आणि जरी कातू शकल्या तरी त्या त्यांची किंमत तोपर्यंत कमी ठेवणार नाहीत जोपर्यंत त्याकरिता त्यांना बाध्य करण्यात येणार नाही. हे उघडपणे पैसा कमावणारे उद्योग आहेत आणि हेच कारण आहे की ते राष्ट्राच्या गरजेप्रमाणे किंमती निर्धारित करत नाहीत. यामुळेच निर्धन गावक-याच्या हातात करोडो रुपये

पोहोचावे हा हातकताईचा आमचा उद्देश आहे. कृषकाला आपल्या रिकाम्या वेळेचा उपयोग करता यावा म्हणून प्रत्येक कृषिप्रधान देशाला अशा प्रकारच्या पूरक उद्योगाची म्हणजे जोडधंद्याची गरज असते. भारताच्या बाबतीत कताईच अशा प्रकारचा जोडधंदा राहिला आहे. त्याच्या विनाशाबरोबर भारतात दारिद्र्य आणि गुलामगिरी आली आणि भारताच्या अनुपम कलेचा व प्रतिभेचा लोप झाला. चरख्याद्वारे भारत असे कापड निर्माण करत होता की संपूर्ण विश्वाकरिता ती ईर्ष्येची गोष्ट झाली होती. अशा एका प्राचीन उद्योगाला पुनर्जीवित करणे, हा काय मोठा स्वप्नाळू आदर्श आहे?.... (यंग, १६-२-१९२१, पृ. ५०-१)

तुम्हाला मीलउद्योग नष्ट करायचा आहे का? असे मला अनेकदा विचारले जाते. अशीच जर माझी इच्छा असती तर उत्पादन शुल्क समाप्त केले जावे अशी मागणी मी केली असती काय? मला मीलउद्योगाची समृद्धी हवी आहे, परंतु ती देशाची हानी करून व्हावी अशी मात्र माझी इच्छा नाही आणि या देशाचे हित हा उद्योग संपण्यातच असेल तर तो संपला तर मला किंचितही दुःख होणार नाही. (यंग, २४-२-१९२७, पृ. ५८)

माझ्या मते मीलमजूरही त्याचप्रकारे मीलचे मालक आहेत ज्याप्रमाणे भागधारक मीलचे मालक आहेत आणि मजूरही मीलमालकांप्रमाणेच मीलचे मालक आहेत ही गोष्ट जेव्हा मीलमालकांना कळेल तेव्हाच त्यांच्यामधील सगळी भांडणे संपतील. (यंग, ४-८-१९२७, पृ. २४८)

## ८७. स्वदेशीचा अर्थ

### स्वदेशीची भावना

स्वदेशी ती भावना आहे जी दूरवरचे क्षेत्र सोडून जवळच्या क्षेत्राचा उपयोग करण्याकरिता व त्याची सेवा करण्याकरिता आपल्याला उद्युक्त करते. अशा रीतीने या व्याख्येनुसार धर्माच्या बाबतीत मी स्वतःला माझ्या पूर्वजांच्या धर्मापर्यंतच सीमित ठेवले पाहिजे. माझ्या निकटस्थ धार्मिक वातावरणाचा उपयोग असे याला म्हणता येईल. मला जर यात काही दोष दिसत असले तर उपयुक्त सेवा करून मी ते दूर केले पाहिजे.

राजकारणाच्या क्षेत्रात मी स्थानिक संस्थांचा उपयोग केला पाहिजे आणि त्यांच्यामध्ये स्पष्टपणे दिसणारे दोष दूर करण्याकरिता त्यांची सेवा केली पाहिजे. जोवर आर्थिक क्षेत्राचा प्रश्न आहे मी त्या गोष्टींचा उपयोग केला पाहिजे ज्यांचे

उत्पादन माझ्या जवळचे शेजारी करतात आणि मला जर तेथील उद्योगांमध्ये काही उणीव दिसत असेल तर त्यांना अधिक कुशल बनवण्याकरिता मी त्यांची सेवा केली पाहिजे. स्वदेशीच्या या भावनेनुसार कार्य करण्यात आले, तर ती हजार वर्षांपर्यंत टिकेल....

**धर्म**

....हिंदू धर्म एक रूढीवादी धर्म बनला आहे आणि याच्या मुळाशी स्वदेशीची भावना असल्यामुळे हा अतिशय सामर्थ्यवान बनला आहे. इतर लोकांचे धर्मपरिवर्तन घडवून त्यांना हिंदू बनवण्याची यात कोणतीही व्यवस्था नसल्यामुळे हा धर्म सर्वात जास्त सहिष्णू धर्म आहे. हा आधी जितका विस्तारशील होता तितकाच आजही आहे. लोकांची धारणा आहे की, हिंदू धर्माने बौद्ध धर्माला देशाबाहेर काढले परंतु याने बौद्ध धर्माला देशाबाहेर काढले नसून त्यालाच याने आत्मसात केले आहे. स्वदेशीच्या भावनेमुळेच हिंदू आपला धर्म बदलण्याला नकार देतात. याचा असा मात्र अर्थ नाही की ते आपल्या धर्माला सर्वश्रेष्ठ समजतात. उलटपक्षी त्यांना माहीत असते की या धर्मातील उणिवा दूर करून आपण या धर्मामध्ये सुधारणा करू शकतो. मी आता जी गोष्ट हिंदू धर्माबद्दल सांगितली तीच गोष्ट जगातील सर्व महान धर्माविषयी सांगता येईल असे मला वाटते. हे खरे आहे की हिंदू धर्माच्या बाबतीत ही गोष्ट विशेषत्वाने लागू होते.

**शिक्षण**

शिक्षणाच्या बाबतीत स्वदेशीचा घातक त्याग केल्यामुळे आपले फार मोठे नुकसान झाले आहे. आपल्या शिक्षित वर्गाचे शिक्षण इंग्रजी माध्यमातून झाले आहे. याचा परिणाम असा झाला आहे की आपण सर्वसामान्य लोकांशी एकरूप होऊ शकलो नाही. आपण सर्वसामान्यांचे प्रतिनिधित्व करू इच्छितो परंतु आपल्याला त्यात यश येत नाही. सर्वसामान्य लोक आपल्याकडे त्याच परकेपणाने पाहत असतात ज्याप्रमाणे ते इंग्रज अधिका-यांकडे पाहत असतात. त्यांच्या मनातील गोष्ट ना आपल्याला कळते ना इंग्रज अधिका-यांना. सर्वसामान्यांच्या आकांक्षा आपल्या आकांक्षा नाहीत. यामुळेच त्यांच्यात व आपल्यात दरी निर्माण झाली आहे. यामुळे तुम्हाला जे दिसते आहे ते आपल्या संघटनेचे अपयश नसून ते प्रतिनिधींचे आणि ते ज्यांचे प्रतिनिधित्व करतात त्यांच्यामधील तादात्म्याच्या अभावाचे ते अपयश आहे.

गत पन्नास वर्षांमध्ये आपले शिक्षण आपल्या भाषेत झाले असते तर आपले वडीलधारे, आपले नोकरचाकर आणि आपले शेजारी आपल्या ज्ञानाचे भागीदार झाले असते; बोस अथवा राय यांच्या शोधांचा तसाच प्रचार झाला असता जसा रामायण आणि महाभारत यांचा झाला आहे. आजची परिस्थिती अशी आहे की हे शोध भारतीयांनी लावले की एखाद्या विदेशी माणसाने याचा आपल्या सामान्य माणसावर काहीही परिणाम होत नाही. शिक्षणाच्या सर्व शाखांमध्ये देशी भाषांमधून शिक्षण होत राहिले असते तर त्यांची अद्‌भुत वाढ झाली असती ही गोष्ट मी छातीठोकपणे सांगू शकतो....

## आर्थिक जीवन

सामान्य माणसाच्या घोर दारिद्र्याचे सर्वात मोठे कारण आर्थिक आणि औद्योगिक क्षेत्रात स्वदेशीचा त्याग आहे. जर एकही गोष्ट भारताबाहेरून विकत घेतली गेली नसती तर या देशात दुधातुपाच्या नद्या वाहत राहिल्या असत्या. परंतु असे व्हायचे नव्हते. आपण हावरट आहोत आणि आपल्यासारखाच हावरट इंग्लंडही आहे. इंग्लंड आणि भारत यांच्यामधील संबंध स्पष्टपणे एका चुकीवर आधारित होते....

आपण जर स्वदेशीच्या सिद्धान्ताचे पालन केले तर आपण अशा व्यक्तींचा शोध घेतला पाहिजे ज्या आवश्यक असलेल्या वस्तू आपल्याला पुरवू शकतील आणि जर काही वस्तूंचे उत्पादन करणे त्यांना शक्य होत नसेल तर त्या गोष्टीचे त्यांना प्रशिक्षण देणे हे तुमचे आणि माझे कर्तव्य होईल. आपण इथे असे गृहीत धरतो आहोत की आपल्या शेजारीपाजारी असे लोक आहेत जे कामकाजाच्या शोधात आहेत. जर असे घडले तर भारतातील प्रत्येक गाव स्वावलंबी आणि स्वयंपूर्ण होईल आणि ते दुस-या गावांबरोबर त्याच गोष्टींची अदलाबदल करतील ज्यांचे उत्पादन स्थानिक पातळीवर शक्य नाही.

या गोष्टी मूर्खपणाच्या वाटू शकतात. माझे उत्तर आहे हा देशच वेड्यांचा आहे. आपल्या घशाला तहानेमुळे जर कोरड पडली असेल आणि एखादा दयाळू मुसलमान आपल्याला शुद्ध पाणी पाजायला तयार असेल तरी आपण ते प्यायला नकार देत असू तर हाही वेडेपणाच आहे. तरीही लाखो हिंदू एखाद्या मुसलमानाच्या घरातील पाणी घेण्यापेक्षा तहानेने मरून जाणे पसंत करतील. या मूर्ख लोकांच्या मनात जर ही गोष्ट ठसवण्यात आली की केवळ भारतात निर्माण झालेल्या वस्तूच खाल्ल्या पाहिजे आणि भारतात निर्माण झालेले कपडेच वापरले

पाहिजे असे धर्म सांगतो तर हे लोक देशी कपडे आणि देशी खाद्यान्न यांच्याशिवाय दुस-या कशाचाही उपयोग करायला नकार देतील....

## धार्मिक अनुशासन

बहुधा असे सांगितले जाते की भारत आपल्या आर्थिक जीवनात कधीही स्वदेशीचा अवलंब करू शकणार नाही. जे लोक असा आक्षेप घेतात ते जीवनाचा नियम म्हणून स्वदेशीचा स्वीकार करत नाहीत. त्यांच्या दृष्टिकोनातून राष्ट्रीय भावनेने प्रेरित होऊन केलेला तो केवळ एक प्रयत्न आहे आणि त्यात त्रास झाला तर तो सोडताही येऊ शकतो. स्वदेशीची जी व्याख्या मी वर सांगितली आहे तिच्याप्रमाणे हे एक धार्मिक अनुशासन आहे. भौतिक त्रासाची किंचितही काळजी न करता आपल्याला हे व्रत पाळायचे असते. स्वदेशीच्या भावनेच्या प्रभावाने आपण जर पिन वा सुईचा उपयोग, या वस्तू भारतात निर्माण होत नाही म्हणून, केला नाही तर त्यामुळे आपल्याला मुळीच दुःख वा त्रास होणार नाही. स्वदेशीचे पालन करणा-या व्यक्तीने अशा अनेक गोष्टी सोडायला तयार राहिले पाहिजे ज्या आज आपल्याला आवश्यक वाटतात....

माझे म्हणणे आहे की स्वदेशी हाच एकमेव असा सिद्धान्त आहे जो विनम्रता आणि प्रेमाच्या नियमांना अनुकूल आहे. जर मी माझ्या कुटुंबाचीच नीट सेवा करू शकत नसेन तर मी संपूर्ण भारताच्या सेवेकरिता निघणे हा केवळ दांभिकपणा होईल. तशा अवस्थेत मी स्वतःला माझ्या कुटुंबाच्या सेवेपुरतेच मर्यादित ठेवले पाहिजे आणि असे गृहीत धरले पाहिजे की असे केल्यामुळेच मी संपूर्ण भारताचीच काय तर संपूर्ण मानवतेची सेवा करतो आहे. हाच नम्रपणा आहे आणि हेच प्रेम आहे.

आपल्या कृतीमागील हेतूच आपल्या कृतीचे श्रेष्ठत्व ठरवील. शक्य आहे की माझ्या कुटुंबाची सेवा करत असताना मी इतर लोकांना किती त्रास देतो आहे याची मी चिंताच करत नसेन. उदाहरणार्थ मी अशी नोकरी करू लागतो की, ज्यामुळे मला लोकांवर बळजबरी करून पैसे घ्यावे लागतात. यामुळे मला पैसाही मिळेल आणि माझ्या कुटुंबाच्या अनेक अनावश्यक गरजाही मी पूर्ण करीन, परंतु असे केल्यामुळे ना मी माझ्या कुटुंबाची सेवा करतो ना माझ्या देशाची.

हेही शक्य आहे की माझ्या स्वतःच्या आणि माझ्यावर अवलंबून असलेल्या लोकांच्या जीवननिर्वाहाकरिता काम करण्याकरिताच देवाने मला हातपाय दिले

असावे. असे होताच माझ्या आणि माझ्या जवळच्या लोकांच्या जीवनात साधेपणा येईल. मग इतर कोणत्याही कुटुंबाचे नुकसान न करता मी माझ्या कुटुंबाची सेवा करीन. प्रत्येक व्यक्ती जर या जीवनपद्धतीचा अवलंब करील तर आपले राज्य आदर्श राज्य होईल. मला मान्य आहे की सर्व लोक एकाच वेळी या स्थितीपर्यंत पोहोचू शकत नाहीत. परंतु हा सिद्धान्त सत्य आहे हे मान्य करून जे लोक त्यानुसार आचरण करू लागतील ते त्या आदर्शाजवळ नक्कीच पोहोचल्याशिवाय राहणार नाहीत.(स्पीरा, पृ. ३३६-४४)

## शेजा-यांची सेवा

स्वदेशीची माझी व्याख्या सर्वांना माहीत आहे. माझ्या जवळच्या शेजा-याच्या किंमतीवर एखाद्या दूरच्या शेजा-याची मी सेवा करणार नाही. यात बदला घेण्याची वा शिक्षा करण्याची भावना मुळीच नाही. कोणत्याही अर्थाने यात संकुचितपणासुद्धा नाही कारण माझ्या विकासाकरिता आवश्यक असलेली गोष्ट मी जगाच्या कोणत्याही काना-कोप-यातून विकत घेऊ शकेन. परंतु माझ्या स्वतःच्या वा नियतीने ज्यांच्या काळजीची जबाबदारी माझ्यावर सोपवली आहे त्यांच्या विकासाच्या आड एखादी गोष्ट येत असेल तर ती कितीही सुंदर वा चांगली असली तरी मी ती विकत घेणार नाही.

जगाच्या कोणत्याही भागात निर्माण झालेले चांगले साहित्य मी विकत घेतो. मी शस्त्रक्रियेची साधने इंग्लंडमधून, पिना आणि पेन्सिली ऑस्ट्रेलियातून आणि घड्याळ स्वित्झर्लंडमधून विकत घेतो. परंतु कितीही सुंदर कापड असले तरी मी एक इंचभर कापडसुद्धा इंग्लंड वा जपानमधून वा जगाच्या इतर कोणत्याही भागातून विकत घेणार नाही कारण त्यामुळे भारतातील करोडो लोकांचे नुकसान झाले आहे आणि वाढत्या प्रमाणात अजूनही नुकसान होते आहे.

भारतातील गरजवंतांनी कातलेले आणि विणलेले कापड विकत घेण्याला नकार देऊन विदेशी कापड, मग ते भारतात हातकताईच्या सुतापासून तयार करण्यात आलेल्या कापडापेक्षा कितीही सुंदर वा टिकाऊ असले तरी विकत घेणे पाप आहे असे मी समजतो. अशा प्रकारे माझ्या स्वदेशीचा केंद्रबिंदू हातकताईची खादी आहे आणि स्वदेशीच्या या भावनेत त्या सगळ्या गोष्टींचा समावेश होतो ज्यांचे भारतात उत्पादन होते वा होऊ शकते. (यंग, १२-३-१९२५, पृ. ८८)

(स्वदेशीचा पुजारी) आपल्या जवळच्या शेजा-याकरिता स्वतःला समर्पित

करणे आपले कर्तव्य समजेल. यात इतर लोकांकडे लक्ष न देणे वा त्यांचा त्याग करणे या गोष्टींचाही समावेश आहे परंतु हा वेगळेपणा वा त्याग वरवरचा आहे वास्तव नाही. आपल्या शेजा-याची शुद्ध भावनेने केलेली सेवा निसर्गतःच इतर लोकांना हानी पोहोचवू शकत नाही आणि खरे सांगायचे तर जे दूरस्थ आहेत, त्यांचीही सेवा यामुळे होईल.

'जी गोष्ट व्यक्तीकरिता तीच विश्वाकरिता' हे त्रिकालाबाधित सत्य आहे या गोष्टीची खूणगाठ आपण आपल्या हृदयाशी बांधली पाहिजे. वेगळ्या शब्दात जी व्यक्ती 'दूरच्या दृश्याच्या' आकर्षणाने मोहीत होऊन जगाच्या दुस-या टोकापर्यंत सेवा करण्याकरिता धावत असते ती स्वतःच्या आकांक्षांच्या बाबतीत तर विफल होतेच शिवाय शेजा-यांबद्दलचे कर्तव्य पार पाडण्यातही चुकते.... (फ्रॉयेम, पृ. ६२-३)

माझा या सत्यावर अढळ विश्वास आहे की व्यक्ती एकाच वेळी आपल्या शेजा-याची आणि मानवतेची सेवा करू शकते. अट एवढीच आहे की शेजा-याच्या सेवेमागे स्वार्थाची वा इतरांना वगळणारी भावना नसावी. म्हणजेच त्यात इतर व्यक्तींच्या शोषणाचा अंतर्भाव नसावा. असे झाले तर ज्या भावनेने तुम्ही शेजा-यांची सेवा करू इच्छिता ती भावना शेजा-यांनाही कळू शकेल. अशा प्रकारे या सेवाभावनेची गुणोत्तर वृद्धी होत जाईल व ती संपूर्ण जग व्यापून टाकेल. याचा अर्थ असा होतो की स्वदेशी ती भावना आहे की जी इतरांची फिकीर न करता तुम्हाला तुमच्या शेजा-यांची सेवा करण्याकरिता प्रेरित करत असते. मी आधीच सांगितल्याप्रमाणे अट एवढीच आहे की तुमच्या शेजा-यांनीही त्याच्या मोबदल्यात त्यांच्या शेजा-यांची सेवा केली पाहिजे. या अर्थाने स्वदेशीत इतरांना वगळण्याची कोणतीच भावना नाही. माणसाच्या सेवा करण्याच्या सामर्थ्यालाही एक सीमा आहे हे वैज्ञानिक तथ्य यात स्वीकारण्यात आले आहे एवढेच. (हरि, २३-७-१९४७, पृ. ७९)

## आंधळी राष्ट्रभक्ती नाही

जीवनाच्या या योजनेंतर्गत इतर सगळे देश सोडून केवळ भारताची सेवा करून मी इतर कोणत्याही देशाचे नुकसान करत नाही. माझे राष्ट्रप्रेम व्यावर्तकही आहे आणि समावेशकही. व्यावर्तक या अर्थाने की अगदी नम्रतापूर्वक मी माझे पूर्ण लक्ष माझ्या मातृभूमीपर्यंतच सीमित ठेवतो आणि समावेशक या अर्थाने की माझी

सेवा किंचितही स्पर्धात्मक वा विरोधात्मक नाही. 'आपल्या संपत्तीचा अशा रीतीने उपयोग करा की त्यामुळे इतरांचे नुकसान होणार नाही' हे सूत्र केवळ कायद्याकरिताच नाही; हा जीवनाचा एक महान सिद्धान्त आहे. अहिंसा अथवा प्रेम यांची अंमलबजावणी करण्याची ही एक अमोल गुरुकिल्ली आहे. (स्पीरा, पृ. ३४४)

विदेशात तयार झालेली वस्तू काहीही झाले तरी त्याज्य समजली पाहिजे असा स्वदेशीचा माझा अर्थ कधीही राहिला नाही. स्वदेशीची ढोबळ परिभाषा ही आहे की देशी उद्योगांना संरक्षण देण्याकरिता विदेशी वस्तूंचा त्याग करून देशी वस्तू वापरणे; ही गोष्ट त्या उद्योगांवर विशेषत्वाने लागू होते ज्यांच्या विनाशामुळे भारत दारिद्र्यावस्थेत पोहोचला. यामुळे एखादी विदेशी वस्तू कितीही फायदेशीर असली आणि तिच्यामुळे आपल्या येथील कोणत्याही व्यवसायावर परिणाम होणार नसला तरी तिचा त्याग केला पाहिजे असा स्वदेशीचा अर्थ लावणे म्हणजे स्वदेशीची व्याख्या संकुचित करणे होईल असे माझे मत आहे.
(यंग, १७-६-१९२६, पृ. २१८)

इतर अनेक गोष्टींप्रमाणेच आपण जर स्वदेशीचे अकारण स्तोम माजवू लागलो तर तिचा मृत्यू होईल. हा असा धोका आहे ज्याबद्दल आपण नेहमी सावध राहिले पाहिजे. विदेशी वस्तू केवळ विदेशी आहेत म्हणून त्यांचा त्याग करणे आणि त्यांच्या उत्पादनाकरिता आपल्या येथील परिस्थिती अनुकूल नसतानाही त्यांच्या उत्पादनाचा प्रयत्न करणे ही गोष्ट राष्ट्रीय संपत्तीचा अपव्यय करणारी, मूर्खपणाची आणि स्वदेशीच्या भावनेला नाकारणारी आहे.

स्वदेशीचा खरा पुजारी कोणत्याही विदेशी गोष्टीबद्दल आपल्या मनात दुर्भावना बाळगणार नाही. जगातील कोणत्याही गोष्टीबद्दलच्या विरोधी भावनेने तो प्रेरित होणार नाही. स्वदेशी आंदोलन घृणा पसरवणारे आंदोलन नाही. हा निःस्वार्थ सेवेचा सिद्धान्त आहे व त्याच्या मुळाशी विशुद्ध अहिंसा म्हणजेच प्रेम आहे. (फ्रॉयेम, पृ. ६६)

# १४. बंधुभाव

## ८८. प्रेमाचा दिव्य संदेश

### जोडणारी शक्ती

प्रेमाची शक्ती तीच आहे जी आत्म्याची वा सत्याची आहे. आपल्याला पावलोपावली तिच्या कार्याचा पुरावा मिळतो. ही शक्ती नसेल तर विश्वाचा लोप होईल.... ही शक्ती अतिशय सक्रिय असल्यामुळेच हजारो लाखो लोकांचे जीवन अस्तित्वात आहे. यामुळे रोज लाखो कुटुंबांमध्ये होणारी भांडणे मिटतात. शेकडो राष्ट्रे शांततेत राहत आहेत. या तथ्याची नोंद इतिहास घेऊ शकत नाही. खरे म्हणजे या प्रेमाच्या वा आत्म्याच्या शक्तीत आलेल्या व्यवधानांची नोंद म्हणजेच इतिहास असे झाले आहे. दोन भावांचे भांडण होते, त्यातील एकाला पश्चात्ताप होतो, त्याच्या अंतःकरणातील सुप्त प्रेमाला तो परत जागवतो व दोन्ही भाऊ परत एक होतात या गोष्टीकडे कोणाचेही लक्ष जात नाही. परंतु या दोन्ही भावांनी, वकिलाच्या हस्तक्षेपामुळे वा अन्य काही कारणाने शस्त्र उचलले वा ते न्यायालयात गेले - जे पाशवी शक्तीचेच दुसरे रूप आहे - तर त्यांच्या वर्तनाची चर्चा लगेच वृत्तपत्रातून येईल, शेजा-यांचे लक्षही त्यांच्याकडे जाईल आणि शक्य आहे की ते भांडण इतिहासाचा विषय होईल आणि जी गोष्ट कुटुंबांकरिता वा समुदायांकरिता बरोबर आहे तीच राष्ट्रांकरिताही बरोबर आहे. कुटुंबांकरिता एक नियम लागू होतो व राष्ट्राकरिता वेगळा असे मानण्याचे कोणतेही कारण नाही. अशा रीतीने इतिहास निसर्गक्रमात उत्पन्न होणा-या व्यवधानाचा अभिलेख आहे. आत्मशक्ती ही नैसर्गिक असल्यामुळे तिची इतिहासात नोंद नाही. (हिंस्व, पृ. ७७-७९)

शास्त्रज्ञ सांगतात की ज्या अणूंनी मिळून आपल्या पृथ्वीची रचना झाली आहे त्या अणूंना जोडणारी शक्ती अस्तित्वात नसती तर या पृथ्वीचे तुकडे तुकडे झाले असते व आपले अस्तित्वही राहिले नसते आणि जड पदार्थांना जोडण्याकरिता जर संयोजक शक्ती लागते तर मग सर्व चेतन पदार्थांना जोडण्याकरिताही ती लागत असेलच. ती शक्ती आहे प्रेम.

आपल्याला ती वडील आणि मुलामध्ये दिसते, भावाबहिणीत दिसते आणि मित्रामित्रात दिसते. परंतु सर्व प्राणिमात्रांमध्ये त्या शक्तीचा वापर करणे अजून आपल्याला शिकायचे आहे आणि त्याच्या उपयोगातच ईश्वराचे ज्ञान दडलेले आहे. जिथे प्रेम असते तिथे जीवन असते; द्वेष विनाशाकडे नेत असतो. (यंग, ५-५-१०२०, पृ.७)

माझा विश्वास आहे की, मानवजातीच्या ऊर्जेची एकूण बेरीज माणसाच्या अपकर्षाकरिता नाही तर उत्कर्षाकरिता आहे आणि ती प्रेमाच्या निश्चित परंतु नेणीवपूर्वक नियमाचा परिणाम आहे. परंतु मानवजात अस्तित्वात आहे यावरून असे सिद्ध होते की विध्वंसक शक्तीपेक्षा जोडणारी शक्ती मोठी आहे व हा याचाच पुरावा आहे. (यंग, १२-११-१९३१, पृ. ३५५)

## आपल्या अस्तित्वाचा नियम

हजारो वर्षांपासून या जगावर पाशवी शक्तीचे राज्य राहिले आहे व मानवजात त्याचे फार मोठे फळ भोगत आहे हे ज्याला दृष्टी असेल त्याला दिसू शकेल. भविष्यातही त्या पाशवी शक्तीचा काही चांगला फायदा होण्याची शक्यता नाही. निबिड काळोखातून प्रकाशाचा जन्म शक्य असेल तरच घृणेतून प्रेमाचा जन्म शक्य आहे असे म्हणता येईल. (ससा, पृ. १८८)

विनाशामध्येही जीवनाचे अस्तित्व कायम असते त्यामुळे असा कोणता तरी नियम असला पाहिजे जो विनाशाच्या नियमापेक्षा उच्चतर आहे. त्याच नियमांतर्गत एका सुव्यवस्थित समाजाची स्थापना करता येऊ शकेल आणि जीवन जगण्यासारखे होऊ शकेल. आणि जीवनाचा नियम जर तोच असेल तर आपल्या दैनंदिन जीवनात आपण त्याचे अनुसरण केले पाहिजे. जिथे मतभेद असतील, जेव्हा तुमचा विरोधकाशी सामना होईल तेव्हा त्याला तुम्ही प्रेमाने जिंका. याच ढोबळ पद्धतीचा अवलंब मी माझ्या जीवनात करत आलो आहे. याचा अर्थ असा नाही की माझ्या सर्व अडचणी दूर झाल्या. या प्रेमाच्या नियमाचा मला जेवढा प्रतिसाद मिळाला तेवढा विनाशाच्या नियमाचा कधीही मिळाला नाही. (यंग, ५-१०-१९३१, पृ. २८६)

जर प्रेम अथवा अहिंसा आपल्या अस्तित्वाचा नियम नसेल.... तर वारंवार होणा-या युद्धांपासून आपली कधीही सुटका होणार नाही आणि प्रत्येक युद्ध त्याच्या पूर्वीच्या युद्धापेक्षा अधिक भीषण राहणार आहे....

आजपर्यंत जितके उपदेशक झाले त्यांनी कमीअधिक प्रमाणात याच नियमाचा प्रचार केला आहे. जर प्रेम जीवनाचा नियम नसता तर मृत्यूच्या तांडवातही जीवनाचे दर्शन सतत घडले नसते. जीवनाने नेहमीच मृत्यूवर विजय मिळवला आहे. माणूस आणि पशू यांच्यात काही मूलभूत भेद असेल तर तो आहे माणसाने प्रेमाच्या नियमाला दिलेली अधिकाधिक स्वीकृती आणि त्यानुसार आपल्या व्यक्तिगत जीवनात वागण्याचा केलेला प्रयत्न. आपापली वैयक्तिक प्रतिभा आणि क्षमता यांच्यानुसार विश्वातील प्राचीन आणि अर्वाचीन असे सर्व संत अस्तित्वाच्या याच नियमाचे जिवंत उदाहरण आहेत. हे खरे आहे की आपल्यामध्ये बसलेला पशू अनेकदा सहजपणे विजयी होताना दिसतो, परंतु यामुळे प्रेमाचा नियम खोटा असल्याचे सिद्ध होत नाही. यावरून केवळ एवढेच सिद्ध होते की प्रेमाच्या नियमानुसार आचरण करणे कठीण असते. सत्यासारखाच उच्च कोटीच्या नियमानुसार आचरण कठीण नसेल तर अजून काय असणार आहे? जेव्हा सर्व लोक या नियमानुसार आचरण करू लागतील तेव्हा पृथ्वीवर ईश्वराचे तसेच राज्य स्थापित होईल जसे आज स्वर्गात आहे. इथे या गोष्टीची आठवण देण्याची गरज नाही की पृथ्वी आणि स्वर्ग हे दोन्ही आपल्यामध्येच आहेत. आपल्याला पृथ्वी माहीत आहे परंतु आपल्यामधील स्वर्गाची आपल्याला अजून ओळख पटलेली नाही. जर असे मान्य केले की काही लोकांकरिता प्रेमाने व्यवहार करणे शक्य आहे आणि उरलेल्या लोकांकडून यानुसार आचरण शक्य नाही तर असे मानणे गर्विष्ठपणाचे होईल. एके काळी आपले पूर्वज नरभक्षी होते याला फार जास्त काळ लोटलेला नाही. ते अजूनही अशी बरीच कामे करायचे की ज्याकडे आपण आज घृणेच्या दृष्टीने पाहतो. त्या काळातही डिक शेफर्डसारखे लोक राहिले असतील, ज्यांना लोक हसत असतील आणि आपल्याच बांधवांना न खाण्याचा प्रचार केल्याबद्दल त्याला खोड्यात अडकवून शिक्षा देत असतील. (हरि. २६-९-१९३६, पृ. २६०)

इतिहास एकानंतर एक झालेल्या युद्धांचा अभिलेख आहे. परंतु आपण एक नवीन इतिहास निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहोत - कमीतकमी जोपर्यंत अहिंसेचा संबंध आहे, ही गोष्ट मी राष्ट्रीय मानसाचा प्रतिनिधी म्हणून सांगतो आहे. तलवारीचा सिद्धान्त मी तर्काच्या तराजूने मोजून पाहिला आहे, त्याच्या शक्यतांवर मी विचार केलेला आहे आणि मी या निष्कर्षावर पोहोचलो आहे की मानवाचे भविष्य जंगलाच्या कायद्यापेक्षा प्रेमाच्या कायद्यावरच

अवलंबून आहे. (हरि, ३-७-१०३७, पृ. १६५)

जिथे प्रेम आहे तिथे ईश्वरही आहे. (ससा, पृ. ३६०)

प्रेम मागत नसते, नेहमी देत असते. प्रेम स्वतः सहन करते, कधी दोष सांगत नाही, बदला घेत नाही. (यंग, ९-७-१९२५, पृ. २४)

## सेवेचा नियम

व्यवहारातील सर्वात सुरक्षित नियम हा आहे की जेव्हा आपण सेवा करतो तेव्हा बंधुभावना निर्माण करावी आणि जेव्हा कोणी अधिकार मागू इच्छितो तेव्हा बंधुभावावर भर देऊ नये. याला मी व्यवहाराचा सुवर्ण नियम म्हणतो आणि जीवनाच्या या नियमाला मी भारताच्या आंतरप्रांतीय संबंधात लागूही केले आहे.... मानवी व्यवहारात गोड संबंध टिकवून ठेवण्याचा दुसरा उपाय मला माहीत नाही आणि अनेक वर्षांच्या दीर्घ अनुभवानंतर माझी पक्की धारणा झाली आहे की, जिथे जिथे या सुवर्ण नियमाचा भंग झाला आहे तिथे तिथे भांडणे, मारामारी आणि डोकेफोडीपर्यंतची वेळ आली आहे.... (यंग, ८-१२-१९२७, पृ. ४०७)

## समतेची वागणूक

(माझा मुख्य उद्देश) संपूर्ण मानवतेकरिता समतेची वागणूक निर्धारित करणे आहे आणि समान वागणुकीचा अर्थ आहे समान सेवा. (यंग, १२-३-१९२५, पृ. ९१)

कारण ते (लोक) समान वयाचे, समान उंचीचे, सारख्याच कातडीचे आणि सारख्याच बुद्धीचे नाहीत. परंतु ही विषमता अस्थायी आणि वरवरची आहे. या मातीच्या पापुद्र्याखाली आत्मा लपलेला आहे. तो सर्व प्रदेशांमधील स्त्री-पुरुषांमध्ये अगदी एकच आहे.... आपल्या चारी बाजूला जे वैविध्य दिसते त्यात एक खरे आणि तात्त्विक ऐक्य आहे. 'विषमता' हा एक घाणेरडा शब्द आहे. त्याने पूर्व आणि पश्चिम या दोघांमध्येही अहंकार आणि अमानुषता यांना जन्म दिला आहे. आणि जी गोष्ट व्यक्तींकरिता बरोबर आहे तीच राष्ट्रांकरिताही बरोबर आहे कारण अखेरीस राष्ट्र म्हणजे व्यक्तिसमूह. विषमतेच्या खोट्या आणि ताठर सिद्धान्तामुळेच आशिया आणि आफ्रिका या खंडांतील राष्ट्रांचे उद्धटपणाने शोषण करण्यात आले आहे. पूर्वेचे शोषण करण्याची सध्याची पश्चिमेची क्षमता पश्चिमेच्या अहंगंडामुळे आहे की पूर्वेच्या न्यूनगंडामुळे आहे हे कोणाला माहीत आहे? (यंग, ११-८-१९२७, पृ. २५३)

स्वरूप अनेक आहेत परंतु प्राण ओतणारा आत्मा एकच आहे. जर बाह्य वैविध्याखाली सर्वसमावेशक ऐक्य अस्तित्वात असेल तर उच्च आणि नीच या भेदाची संभावनाच कुठे राहते? दैनंदिन जीवनात याच तथ्याचे आपल्याला पावलोपावली दर्शन होत असते. सर्व धर्मांचे अंतिम उद्दिष्ट या मूलभूत ऐक्यापर्यंत पोहोचणे आहे. (हरि, १५-१२-१९३३, पृ. ३)

कोणत्याही प्रकारचा भेदभाव न मानणा-या प्रेमाच्या सार्वभौम नियमावर मी विश्वास ठेवतो. (हरि, २५-५-१९४७, पृ. १६५)

मी नातेवाईक आणि अनोळखी, देशवासी आणि विदेशी, श्वेत आणि अश्वेत, वा भारतातील हिंदू आणि मुसलमान, पारशी, शीख, ख्रिश्चन, ज्यू वा इतर धर्मातील लोक यांच्यामध्ये कोणताही भेदभाव केला नाही. अशा प्रकारचा भेदभाव करण्याचे सामर्थ्यच माझ्या हृदयात नाही हे मी सांगू शकतो. हा गुण मी प्रयत्नपूर्वक मिळवलेला नसून तो माझा स्वभावच आहे व त्यामुळे हा माझा विशेष गुण आहे असा दावा मी करू शकत नाही. याउलट मला चांगले माहीत आहे की अहिंसा, ब्रह्मचर्य, अपरिग्रह आणि इतर मूलभूत गुणांचा विकास करण्याकरिता मला सतत संघर्ष करावा लागला होता. (ए, पृ. २०४)

आपण आपल्या प्रेमाचा विस्तार तोपर्यंत करत गेलो पाहिजे जोपर्यंत पूर्ण गावाचा त्यात समावेश होत नाही; अशाच प्रकारे गावांनी शहरांना, शहरांनी प्रांतांना, प्रांतांनी देशाला व देशाने संपूर्ण जगाला आपल्या प्रेमाच्या राज्यात सामावून घेतले पाहिजे. (यंग, २७-६-१९२९, पृ. २१४)

अतिशय वेगाने मूल्यपरिवर्तन होण्याच्या काळात आपण राहत असल्यामुळे हळूहळू होणा-या परिणामांनी आपले समाधान होत नाही. आपल्याच जातीच्या लोकांच्या कल्याणाने वा आपल्याच देशाच्या कल्याणाने आपले समाधान होत नाही. आपण संपूर्ण मानवतेकरिता विचार करतो वा करू इच्छितो. मानवतेच्या ध्येयाच्या शोधाकरिता या गोष्टी अतिशय लाभदायक आहेत. (हरि, ३०-५-१९३६, पृ.१२६)

माझा तुम्हाला आग्रह आहे की.... तुमचे हृदय समुद्राप्रमाणे विशाल करा.... इतरांबद्दल न्यायनिवाडा करण्याचा प्रयत्न करू नका, नाही तर इतरही तुम्हाला त्याच तराजूने तोलतील. तुमच्यावर सर्वांचा न्यायाधीश बसलेला आहे. तो तुम्हाला फासावर लटकवू शकतो परंतु त्याने दयाळूपणाने तुम्हाला जिवंत राहू दिले आहे. तुमच्या आत आणि बाहेर इतके शत्रू आहेत परंतु ईश्वर त्या

सर्वांपासून तुमचे रक्षण करतो व तुमच्यावर कृपादृष्टी ठेवतो. (यंग, १-१-१९२५, पृ. ८)

**परस्परांबद्दल सहिष्णुता**

व्यवहाराचा सुवर्णनियम आहे.... परस्परांबद्दल सहिष्णुता. आपले विचार कधीही एक सारखे होणार नाहीत व सत्याकडेही आपण तुकड्या तुकड्याने व वेगवेगळ्या कोनातून पाहू. असे असल्यामुळे सर्वांचा विवेक सारखा नसतो. विवेक जरी व्यक्तीचा चांगला मार्गदर्शक असला तरी आपल्या विवेकाचा निर्णय सर्वांवर लादल्यामुळे प्रत्येक माणसाला आपल्या विवेकानुसार वागण्याच्या अधिकारावर मोठा आघात होतो.... अतिशय विवेकशील माणसांमध्येही ख-या मतभेदांची शक्यता नेहमीच राहणार आहे. यामुळे प्रत्येक सुसंस्कृत समाजात परस्परांमधील सहिष्णुता हाच व्यवहाराचा एकमेव नियम संभवतो. (यंग, २३-९-१९२६, पृ. ३३४)

क्षमा आत्म्याचा गुण आहे यामुळे तो सकारात्मक गुण आहे. तो नकारात्मक नाही. भगवान बुद्ध म्हणाले होते 'क्रोधाला प्रेमाने जिंका'. हा अक्रोध काय आहे? हा एक सकारात्मक गुण आहे आणि याचा अर्थ आहे औदार्य अथवा प्रेम. हा सर्वोच्च गुण आहे. या सर्वोच्च गुणाचा विकास तुम्ही तुमच्यामध्ये केला पाहिजे. यामुळे क्रोधी व्यक्तीजवळ जाऊन तुम्ही तिला तिच्या क्रोधाचे कारण विचारू शकाल व जर एखाद्या कारणाने तुम्ही तिला दुखवले असेल तर तुम्ही स्वतःमध्ये सुधारणा करू शकाल. तसे नसल्यास तुम्ही त्या व्यक्तीला तिचा दोष सांगू शकाल व क्रोध करणे चुकीचे असल्याची जाणीव तिला करून देऊ शकाल. आत्म्याच्या चैतन्याची ही जाणीव व तिचा जाणीवपूर्वक प्रयोग यामुळे माणूसच उन्नत होत नाही तर त्याच्या अवतीभवतीचे वातावरणही उन्नत होते. अर्थातच ज्याने प्रेमाच्या या गुणाचा विकास केला असेल तोच याचा प्रयोग करू शकेल. सतत चिकाटीपूर्वक प्रयत्न केल्याने अर्थातच हे प्रेम विकसित करता येऊ शकते. (यंग, १२-१-१९२८, पृ. ११)

जे व्यक्तीकरिता खरे आहे तेच राष्ट्राकरिताही खरे आहे. माणूस फार मोठी क्षमा करू शकत नाही. दुबळा माणूस कधीही क्षमा करू शकत नाही. क्षमा हा सबळांचा गुण आहे. (यंग, २-४-१९३१, पृ. ५९)

**विश्वास**

माणसाच्या स्वभावावर अविश्वास करणे मला मान्य नाही. कोणत्याही उदात्त आणि मैत्रीपूर्ण कार्याला माणूस प्रतिसाद देईल आणि नक्कीच

देईल. (यंग, ४-८-१९२०, पृ. ५)

माझ्यामध्ये मानव आणि मानवजात यांच्याबद्दल कोणतीही अविश्वासाची भावना नाही. जे विश्वासघात करतील त्यांना देवाला उत्तर द्यावे लागेल. यामुळे मी त्यांची चिंता का करावी? परंतु जोपर्यंत माझ्या जीवनाच्या ध्येयाचा प्रश्न आहे माझा विचार सक्रिय आहे आणि संशय व अविश्वासानंतरही मी सर्वांचे कल्याण व्हावे असे चिंतण्याचा प्रयत्न करत असतो. माझ्या नशिबी दुःख लिहिले असेल तर मी ते भोगेन. परंतु जोपर्यंत माझ्यात वाईटपणाशी लढण्याची ताकद आहे तोपर्यंत मला घाबरण्याचे कोणतेही कारण नाही. (स्पेक्ट, ६-३-१९४२)

परस्परांनी विश्वास आणि प्रेम यांच्या मोबदल्यात दाखवलेला विश्वास आणि केलेले प्रेम हे काही खरे प्रेम आणि विश्वास नाहीत. जो तुमची घृणा करतो त्याच्यावरही तुम्ही प्रेम करणे, तुमच्या शेजा-यावर तुमचा विश्वास नसला तरी त्याच्यावर प्रेम करणे हे खरे प्रेम आहे. इंग्रज अधिकारी वर्गावर अविश्वास करण्यासारखी माझ्याजवळ ठोस कारणे आहेत. माझे प्रेम खरे असेल तर त्यांच्यावरील या अविश्वासानंतरही मी त्यांच्यावर प्रेम केले पाहिजे. माझ्या मित्रांवर माझा विश्वास असेपर्यंतच मी त्यांच्यावर प्रेम करू शकत असेन तर त्या प्रेमाची किंमत तरी किती? हे तर चोरही करतात. ज्या क्षणी त्यांचा विश्वास उडतो त्या क्षणी ते शत्रू बनतात. (हरि, ३-३-१९४६, पृ. २८)

## मुलांच्या तोंडून

विश्वास ठेवा की मी शेकडोच नाही तर हजारो मुलांच्या अनुभवावरून सांगतो की आमच्यापेक्षा मुलांमध्ये आत्मसन्मानाची भावना फार तीव्र असते. आपल्यामध्ये पुरेसा नम्रपणा असेल तर जीवनाचा सर्वात मोठा पाठ वय झालेल्या विद्वानांकडून नाही तर तथाकथित अज्ञानी मुलांकडून आपण शिकू शकतो. ज्ञान भाबड्या मुलांच्या तोंडून बाहेर पडत असते असे जे येशूने सांगितले होते त्यापेक्षा दुसरे मोठे सत्य त्याने कदाचित सांगितले नसावे. मी येशूच्या या विधानाशी पूर्णपणे सहमत आहे. मला स्वतःला हा अनुभव आला आहे की आपण नम्रपणाने आणि भोळेपणाने मुलांशी बोललो तर त्यांच्याकडून आपण सुज्ञपणा शिकू शकतो.

## विश्वशांती

मी एक धडा शिकलो आहे - जे माणसाला शक्य नसते ते ईश्वराकरिता पोरखेळासारखे असते आणि आपली जर त्या दिव्य शक्तीवर श्रद्धा असेल, जी

आपल्या सृष्टीतील अगदी निम्न पातळीवरील जीवाचीसुद्धा भाग्यविधाती आहे, तर सर्व काही शक्य आहे याबद्दल मला काहीही संशय नाही आणि याच आशेवर मी जगतो आहे व माझा काळ कंठतो आहे. तसेच त्या सर्वशक्तिमानाच्या इच्छेचे पालन करण्याचा मी प्रयत्न करतो आहे.

....या जगात आपल्याला जर खरी शांतता हवी असेल आणि युद्धाच्या विरोधात खरा लढा द्यायचा असेल तर आपल्याला मुलांपासून सुरुवात करावी लागेल. आपली मुले जर त्यांच्या निरागस स्वभावासह मोठी होऊ शकली तर, ना आपल्याला संघर्ष करावा लागेल ना आपल्याला मोठमोठे प्रस्ताव पास करावे लागतील. तेव्हा आपण एका प्रेमापासून दुस-या प्रेमापर्यंत, एका शांततेपासून दुस-या शांततेपर्यंत जात राहू. असे झाले तर संपूर्ण विश्व आज ज्या शांततेकरिता तहानलेले आहे त्या शांततेचे साम्राज्य विश्वात स्थापन होऊन जाईल. (यंग, १९-११-१९३१, पृ. ३६१)

**आत्मशक्ती**

जीवनाच्या दर क्षणी मला असे वाटते की ईश्वर माझी परीक्षा घेतो आहे. (ए, पृ. ३२६)

मी जर पाशवी शक्तीच्या ठिकाणी आत्मशक्तीला, जी प्रेमाच्या शक्तीचेच दुसरे नाव आहे, लोकप्रिय बनवू शकलो तर मी तुम्हाला एक असा भारत देऊ शकेन की जो सगळ्या जगाला आव्हान देऊन सांगू शकेल की, आमचे जे काही वाईट करायचे असेल ते करा. याकरिता, प्रसंग असो वा नसो, यातना सहन करण्याच्या शाश्वत नियमाची माझ्या जीवनातून अभिव्यक्ती करण्याचा मी सतत प्रयत्न करीन व त्याचा स्वीकार करण्याकरिता जे तयार असतील त्यांच्यासमोर त्याचे प्रात्यक्षिक घडवीन. मी ज्या कोणत्या इतर कामात भाग घेतो तेसुद्धा या नियमाची अतुलनीय श्रेष्ठता सिद्ध करण्याकरिताच घेत असतो. (ए, पृ. ३३१)

तलवार एकीकडे फेकून दिल्यानंतर विरोधकांना देण्याकरिता आता माझ्याजवळ प्रेमाच्या प्याल्याशिवाय दुसरे काहीही शिल्लक नाही. हा प्याला समर्पित करताच ते माझ्याजवळ येतील अशी मला आशा आहे. मी माणसा-माणसामध्ये कायम शत्रुत्वाचा विचार करत नाही आणि पुनर्जन्माच्या सिद्धान्तावर विश्वास असल्यामुळे मी अशी आशा करतो आहे की या जन्मात नाही तर पुढील कोणत्या तरी जन्मात मी संपूर्ण मानवतेला माझ्या मैत्रीच्या बंधनात बांधून टाकू शकेन. (यंग, २-४-१९३१, पृ. ३६१)

## प्रेमाचे ध्येय

संपूर्ण नम्रपणाने आणि प्रामाणिकपणाने मी मान्य केले पाहिजे की मी कितीही तटस्थपणे वागण्याचा प्रयत्न करत असलो तरी माझ्या अस्तित्वाच्या प्रत्येक अणुरेणूतून मी प्रेमाची अभिव्यक्ती करण्याचा प्रयत्न करतो आहे. मी माझ्या निर्मात्याच्या, जो सत्यस्वरूपी आहे, उपस्थितीचा अनुभव घेण्याकरिता अधीर आहे. मला माझ्या जीवनाच्या सुरुवातीच्या वर्षांतच कळले होते की जर मला सत्यप्राप्ती करायची असेल तर प्राणांची बाजी लावून का होईना मी प्रेमाच्या नियमाचे अनुसरण केले पाहिजे. ईश्वर कृपेने जेव्हा मला मूल झाले तेव्हा मला कळले की प्रेमाचा नियम सर्वात चांगल्या पद्धतीने लहान मुलांकडून कळू शकतो व शिकता येऊ शकतो. निर्विवादपणे माझा या गोष्टीवर विश्वास आहे की कोणतेही मूल वाईट अर्थाने खोडकरपणा घेऊन जन्माला येत नाही. जर मुलाच्या आईवडलांनी मुलाच्या जन्मापूर्वी आणि नंतर मुलाशी चांगला व्यवहार केला तर मूल स्वाभाविकपणे सत्य आणि प्रेमाच्या नियमाचे पालन करू लागेल ही गोष्ट सर्वविदित आहे. माझ्या जीवनाच्या सुरुवातीच्या काळात जेव्हा मी हा धडा शिकलो तेव्हा माझ्या जीवनात हळूहळू परंतु एक निश्चित असे परिवर्तन येऊ लागले.

मी तुमच्यासमोर त्या अनेक अवस्थांचे वर्णन करू इच्छीत नाही ज्यातून माझे हे वादळी जीवन निघाले आहे. परंतु संपूर्ण प्रामाणिकपणाने आणि नम्रपणाने मी सांगतो की माझ्या जीवनात काही प्रमाणात विचार, शब्द आणि कृती यांच्याद्वारे मी प्रेमाचे प्रतिनिधित्व केलेले आहे हे अगदी सत्य आहे व त्या सीमेपर्यंत मला अद्‌भुत शांतताही मिळाली आहे. माझे अनेक मित्र माझ्या जीवनातील शांतता पाहून बुचकळ्यात पडले आहेत, त्यांना माझा हेवाही वाटला आहे आणि त्यांनी मला माझ्या या अमूल्य ठेव्याचे कारणही विचारले. मी त्यांना एवढेच सांगू शकलो की जर तुम्हाला माझ्या जीवनात शांततेचे दर्शन होत असेल तर त्याचे एकमेव कारण मी मानवी अस्तित्वाच्या सर्वोच्च नियमाचे - प्रेमाच्या नियमाचे - पालन करण्याचा प्रयत्न करतो आहे हेच आहे. (यंग. १९-११-१९३१, पृ.३६१)

माझ्या जीवनाचा प्रत्येक क्षण अहिंसेच्या म्हणजेच प्रेमाच्या मार्गदर्शनाप्रमाणे व्यतीत व्हावा अशी माझी इच्छा आहे. मुळात मी शांतताप्रेमी आहे. मला कलह निर्माण करायचा नाही. सत्य आणि प्रेम यांच्या विरोधात असलेले कोणतेही काम मी करणार नाही असे आश्वासन मी माझ्या विरोधकांना देऊ

इच्छितो. (हरि, १२-१-१९३४, पृ. ८)

कोणावरही अधिकार गाजवण्याकरिता माझ्याजवळ प्रेमाशिवाय दुसरे कोणतेही अस्त्र नाही. (बांक्रा, ९-९-१९४२)

माझे ध्येय विश्वमैत्री आहे आणि मोठ्यात मोठ्या चुकीच्या गोष्टीचा जास्तीत जास्त विरोध करत असतानाही मी सर्वाधिक प्रेम करू शकतो. (यंग, १०-३-१९२०, पृ. ५)

माझ्या ध्येयावर माझी अढळ श्रद्धा आहे आणि जर त्यात यश आले - व यश नक्कीच येईल, यश येणे अपरिहार्य आहे - तर एकमेकांचे शत्रू म्हणून नाही तर एकाच समग्राचे भाग म्हणून सर्व लोकांना एकाच सूत्रात बांधण्याचा प्रयत्न म्हणून इतिहास या आंदोलनाची नोंद घेईल. (हरि, २६-१-१९३४, पृ. ८)

## ८९. सर्व जीवन एक आहे

### सर्वांशी बंधुभाव

मी माकडांनाच नाही तर घोडे आणि शेळ्या, सिंह आणि वाघ, साप आणि विंचू यांनासुद्धा माझे भावंड मानले पाहिजे असा दावा करायला माझे नीतिशास्त्र मला केवळ सांगतच नाही तर तसा आदेशही देते. या प्राण्यांनी माझ्याबद्दलची तशीच भावना ठेवण्याची गरज नाही.

जे कठोर नीतिशास्त्र माझ्या जीवनावर शासन करत आहे, आणि माझे ठाम मत आहे की तेच नीतिशास्त्र प्रत्येक स्त्री-पुरुषावर शासन करत असावे, ते आपणा सर्वांवर ही एकतर्फी जबाबदारी टाकत आहे आणि माणसावर ही जबाबदारी याकरिता येते की केवळ त्याचीच घडण ईश्वराच्या मूर्तीप्रमाणे झाली आहे. आपल्यापैकी काही लोकांना या विशेषत्वाची जाणीव नाही एवढ्या कारणामुळे काहीही फरक पडत नाही. एवढे मात्र खरे की यामुळे, या विशेषत्वामुळे होणा-या फायद्याचा लाभ त्यांना मिळत नाही. शेळ्यांमध्ये वाढलेल्या सिंहाला आपल्या क्षमतेची कल्पना नसते व त्यामुळे त्याला त्याचा लाभ होत नाही तसेच हेही आहे. परंतु ज्या क्षणी सिंहाला त्याच्या क्षमतेची ओळख होते त्या क्षणापासूनच तो शेळ्यांवर आपली सत्ता गाजवू लागतो. परंतु सिंहाची कातडी पांघरल्यामुळे कोणतीही शेळी सिंह होऊ शकत नाही.

हे विधान सिद्ध करण्याकरिता माणसाला ईश्वराच्या स्वरूपात निर्माण करण्यात

आले आहे आणि सर्व माणसांच्या व्यक्तित्वातून त्याचे दर्शन होते हे दाखवण्याची आवश्यकता नाही. एका जरी माणसाच्या व्यक्तित्वातून त्याचे दर्शन होत असेल तरी तेवढे पुरे आहे आणि मानव जातीत जन्मलेल्या महान उपदेशकांमध्ये ईश्वराचे दर्शन होते ही गोष्ट कोण नाकारू शकेल? (यंग, ८-७-१९२६, पृ. २४४)

माझा विश्वास आहे की माझ्यात अहिंसा ओतप्रोत भरलेली आहे. अहिंसा आणि सत्य ही माझी दोन फुफ्फुसे आहेत. त्यांच्याशिवाय मी जगू शकत नाही. परंतु मी क्षणोक्षणी अधिकाधिक स्पष्टपणाने अहिंसेची असीम शक्ती व मानवाचा लहानपणा अनुभवत असतो.

## अपूर्ण अहिंसा

वनवासीमध्ये असीम करुणा असते आणि तरीही तो हिंसेपासून पूर्णपणे मुक्त राहू शकत नाही. श्वासागणिक तो काही ना काही हिंसा करतच असतो. शरीर स्वतःच एक कत्तलखाना आहे. यामुळेच मोक्ष आणि परमानंद मृत्यूनंतरच मिळू शकतो. मोक्षाच्या आनंदाशिवाय इतर सर्व सुख आणि आनंद क्षणिक आहेत आणि म्हणूनच आपल्याला जीवनात हिंसेचे कटू घोट प्यावे लागतात.
(यंग, २१-१०-१९२६, पृ. ३६४)

कोणत्या ना कोणत्या हिंसेच्या आधारानेच या शरीरात प्राण टिकलेले आहेत. यामुळेच या श्रेष्ठतम धर्माला अहिंसा हे नकारात्मक नाव दिले आहे. जग विनाशाच्या शृंखलेत बंदिस्त आहे. वेगळ्या शब्दात शरीरातील प्राणरक्षणाकरिता हिंसा अपरिहार्य आहे. यामुळेच तर अहिंसेचा पुजारी नेहमीच देहबंधनातून पूर्णपणे मुक्त होण्याची प्रार्थना करत असतो. (यंग, ४-१०-१९२८, पृ. ३३१)

मला या गोष्टीची दुःखद जाणीव आहे की शरीरात प्राण टिकवून ठेवण्याची माझी इच्छा मला सतत हिंसा करायला लावते. यामुळेच या भौतिक शरीराबद्दल मी अधिकाधिक उदासीन होत चाललो आहे. उदाहरणार्थ मला माहीत आहे की श्वास घेण्याकरिता हवेत तरंगणारे असंख्य जीवाणू मला मारावे लागतात. परंतु मी श्वास घेणे बंद करू शकत नाही. भाज्या खाण्यात हिंसा होते पण मी त्या सोडू शकत नाही.

कीटाणुनाशक पदार्थांच्या उपयोगामुळेही हिंसा होते. परंतु डास वगैरेंपासून रक्षण व्हावे म्हणून मातीच्या तेलासारख्या कीटाणुनाशकांचा उपयोग केल्याशिवाय मी राहू शकत नाही. आश्रमात जेव्हा सापांना पकडणे वा पळवून लावणे शक्य

होत नाही तेव्हा त्यांना मारावे लागते - ही हिंसाही मी सहन करतो. आश्रमातील बैलांना हाकलण्याकरिता काठीचा उपयोग मला सहन करावा लागत असतो.

यामुळे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रूपाने माझ्याकडून जी हिंसा होते तिला काहीच अंत नाही.... नम्रपणे हा अपराध मान्य केल्याबद्दल माझ्या मित्रांनी माझा त्याग केला तर त्यामुळे मला दुःख नक्कीच होईल आणि तरीही अहिंसेनुसार आचरण करण्यात माझी जी अपूर्णता आहे ती लपवण्याचा मी मुळीच प्रयत्न करणार नाही. माझा केवळ एवढाच दावा आहे की मी अहिंसेचा महान आदर्श त्याच्या गूढार्थासह समजून घेऊन मन, वाणी, कर्म यांच्याद्वारे माझ्या जीवनात त्याचे अनुसरण करण्याचा सतत प्रयत्न करतो आहे आणि माझ्या कल्पनेप्रमाणे मला त्यात थोडेबहुत यशही मिळाले आहे. परंतु या दिशेने मला बराच लांब पल्ला गाठायचा आहे हे मला माहीत आहे. (यंग, १-११-१९२८, पृ. ३६१)

## जीव विच्छेदन

मी वैज्ञानिक प्रगतीच्या विरोधात नाही. उलट पश्चिमेच्या वैज्ञानिक भावनेकडे मी प्रशंसेच्या भावनेने पाहत असतो. या प्रशंसेत काही किंतु असेल तर तो एवढाच आहे की पश्चिमेचा वैज्ञानिक ईश्वर निम्नतम प्राण्याची अगदीच फिकीर करत नाही. मी माझ्या आत्म्याच्या पूर्ण शक्तीनिशी जीवविच्छेदनाची घृणा करतो. विज्ञान आणि तथाकथित मानवता यांच्या नावावर निर्दोष प्राण्यांची जी अक्षम्य हत्या केली जात आहे त्याकडे मी घृणेने पाहतो आणि निर्दोषांच्या रक्ताने रंगलेल्या सर्व वैज्ञानिक शोधांचे मला किंचितही महत्त्व वाटत नाही.

जर रक्तसंचाराच्या पद्धतीच्या सिद्धान्ताचा शोध जीवांच्या विच्छेदनाशिवाय लागणे शक्य नसते तर मानवजातीने त्याशिवायच राहायला पाहिजे होते. पश्चिमेकडील प्रामाणिक वैज्ञानिक ज्ञानार्जनाच्या वर्तमान पद्धतीच्या काही मर्यादा ठरवतील असा दिवस जवळ येत असल्याचे मला स्पष्टपणे दिसते आहे.

## निम्न श्रेणीचे प्राणी

भावी मोजमापात केवळ मानवालाच नाही तर सर्व प्राणी जगताला लक्षात घेतले जाईल आणि आपल्या एकपंचमांश भागाला निकृष्ट दर्जा देऊनही आपली भरभराट होऊ शकते हा हिंदूंचा समज तसेच पौर्वात्य आणि आफ्रिकी देशातील लोकांच्या शोषणाने व अवनतीने आपली प्रगती होऊ शकते हा पश्चिमेतील लोकांना समज चूक असल्याचे हळूहळू परंतु निश्चितपणे आपल्याला कळेल. याचप्रमाणे निम्नतर

प्राण्यावरील आपल्या प्रभुत्वाचा उपयोग त्यांना मारून टाकण्याकरिता नाही तर परस्परांच्या हितसंवर्धनाकरिता आहे हेही आपल्याला कळेल. मी निश्चितपणे सांगतो की ईश्वराने या प्राण्यांनाही तोच आत्मा दिला आहे जो मला दिला आहे. (यंग, १७-१२-१९२५, पृ. ४४०)

असे वाटते की संस्कृतीची अजून प्रगती होऊ लागल्यानंतर त्या प्रगतीबरोबरच माणसाचे पशूंवरील प्रभुत्व वाढेल, परंतु त्यांचा उपयोग करण्याची पद्धती अधिकाधिक मानवतापूर्ण असेल. मानवतावाद्यांचे तीन संप्रदाय आहेत. एक संप्रदाय पशूच्या शक्तीच्या ठिकाणी इतर कोणती तरी शक्ती वापरण्याच्या बाजूचा आहे. दुसरा संप्रदाय पशूला माणसाचा साथी मानण्यावर विश्वास ठेवतो आणि त्यांचा उपयोग केवळ बंधुभावनेला अनुकूल असेल अशाच पद्धतीने करावा असे मानतो. तिसरा संप्रदाय निम्नतर पशूंचा माणसाच्या स्वार्थसिद्धीकरिता उपयोग करू इच्छीत नाही, उलट आपल्या आणि त्या पशूंच्या शक्तीचा केवळ त्याच सीमेपर्यंत उपयोग करू इच्छितो ज्या सीमेपर्यंत पशू तसे करू देतील. मी या तिस-या संप्रदायाचा सदस्य आहे. (हरि, ५-५-१९४६, पृ. १२१)

## ‘दयामृत्यू’

एखाद्या कुत्र्याला वा अन्य प्राण्याला हळूहळू मृत्यूच्या मुखात जात असताना ज्या वेदना असहायपणे सहन कराव्या लागत असतात त्या मी एक क्षणभरही सहन करू शकत नाही. अशाच परिस्थितीतील माणसाला मी मारू शकत नाही कारण त्याच्यावर उपचार करण्यासारखी औषधे उपलब्ध आहेत, परंतु कुत्र्यांकरिता कोणताच उपचार उपलब्ध नाही. यामुळेच मी त्याला मारून टाकले पाहिजे. माझ्या मुलाला रेबिज हा विकार झाला व त्याची वेदनांमधून सुटका करण्याचा कोणताच मार्ग उपलब्ध नसेल तर त्याला मारून टाकणे हे माझे कर्तव्य आहे असे मी मानले पाहिजे.

नियतिवादाच्याही स्वतःच्या मर्यादा आहेत. सर्व उपाय केल्यानंतरच आपण नशिबावर गोष्ट सोडत असतो. वेदनाग्रस्त मुलाच्या वेदना दूर करण्याच्या उपायातील एक आणि अंतिम उपाय म्हणजे त्याचे जीवन समाप्त करणे आहे. (यंग, १८-११-१९२६, पृ. ३९६)

मी ज्याप्रमाणे गायीचा जीव वाचवण्याकरिता एखाद्या माणसाचा जीव घेणार नाही त्याचप्रमाणे माणसाचे प्राण वाचवण्याकरिता, मग त्या माणसाचे प्राण

कितीही मोलाचे असले तरी, मी गायीचा जीव घेणार नाही.
(यंग, १८-५-१९२१, पृ. १५६)

माझ्या समजाप्रमाणे सशाचे जीवन माणसाच्या जीवनापेक्षा कमी मूल्यवान नाही. एखाद्या मानवशरीराकरिता सशाचा जीव घेताना मला संकोच वाटला पाहिजे. माझे मत आहे की जो प्राणी जितका अधिक लाचार तितकाच माणसाकडून संरक्षण मिळवण्याचा त्याचा हक्क जास्त. (ए, पृ. १७२)

## विषारी पशूंची समस्या

एका सापाचासुद्धा जीव घेऊन माझी जगण्याची इच्छा नाही. त्याचा जीव घेण्यापेक्षा त्याच्या दंशाने मरण्याची माझी तयारी असली पाहिजे. परंतु ईश्वर माझी इतकी कठीण परीक्षा घेऊ इच्छीत असेल आणि सापाला माझ्यावर आक्रमण करू देत असेल तर शक्यता याच गोष्टीची आहे की एक तर मी मरण्याची हिंमत करू शकणार नाही व या नाशिवंत शरीराचे रक्षण करण्याकरिता माझ्यातील पशू जागा होईल व तो सापाला मारण्याचा प्रयत्न करील.

मी सापाच्या भीतीपासून मुक्त झालो आहे आणि त्याच्यासोबत मनाप्रमाणे मैत्री करू शकतो असे खात्रीपूर्वक म्हणण्यासारखा विश्वास आतापर्यंत माझ्यामध्ये निर्माण झालेला हे मला मान्य आहे. माझा अढळ विश्वास आहे की, साप, वाघ इत्यादी पशू माणसाच्या विषारी, कुटिल आणि वाईट विचारांना ईश्वराने दिलेले प्रत्युत्तर आहे....

माझा विश्वास आहे की सर्व जिवंत प्राण्यांमध्ये एकच प्राण आहे. विचार वेगवेगळे रूप धारण करत असतात. वाघ आणि साप यांच्याशीही आमचे बंधुत्व आहे. आपण वाईट, कुटिल आणि कामुक विचार आपल्यामध्ये राहू देऊ नये अशी सावधगिरीची सूचना आपल्याला त्यांच्याकडून मिळत असते. मला जर पृथ्वीवरील क्रूर पशू आणि रांगणारे विषारी जीव यांचे अस्तित्व मिटवायचे असेल, तर मी माझ्यातील सर्व विषारी विचार नष्ट केले पाहिजे. परंतु शरीराला अधिकात अधिक काळ जिवंत ठेवण्याकरिता अज्ञानामुळे मी घाईघाईत या पशूंना वा रांगणा-या जीवांना मारण्याचा प्रयत्न केला तर त्याचा अर्थ होईल मी माझे कुविचार नष्ट करू इच्छीत नाही. जर क्रूर पशूंपासून स्वतःचे रक्षण न केल्यामुळे माझा मृत्यू झाला तर माझा पुनर्जन्म एक चांगला आणि अधिक पूर्ण पुरुष म्हणून होईल. माझा जर असा विश्वास असेल तर माझा सहचर असलेल्या सापाची

हत्या मी का करावी? (यंग, १४-४-१९२७, पृ. १२१)

....मृत्यूच्या सावलीत वावरत असताना आपण सत्यापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत आहोत. संकटांची कल्पना आणि आपल्या अस्तित्वाची अनिश्चितता या गोष्टींची जाणीव झाल्यानंतरही आपण अहंकारात इतके गर्क असतो की संपूर्ण सृष्टीच्या निर्मात्याकडेही आपण दुर्लक्ष करतो. यामुळे जीवनात क्षणोक्षणी आपल्याला जो संकटाचा सामना करावा लागतो तोच कदाचित उचित असेल.

....माझी विचारशक्ती कोणत्याही प्रकारच्या जीवाची हत्या करायला विरोध करते. परंतु आपल्या अनुभवाच्या आधारावर ज्यांना आपण हिंसक प्राणी समजतो त्या प्राण्याशी मैत्री करण्याइतके माझे हृदय मजबूत झालेले नाही. दृढविश्वासाची भाषा, जी वास्तव अनुभवातून उत्पन्न होत असते, ऐन वेळी मला सुचत नाही आणि तोपर्यंत सुचणार नाही जोपर्यंत वाघ, साप इत्यादी प्राण्यांशी मैत्री करण्याएवढे धैर्य माझ्यात येणार नाही. (यंग, १७-७-१९२७, पृ.२२२)

माझा पक्का विश्वास आहे की लहान-मोठ्या गोष्टींत दुस-या माणसाचा जीव घेण्याच्या सवयीमुळे माणसाच्या विवेकावर पडदा पडला आहे. तो अन्य प्राण्यांच्या जीवाशी निस्संकोचपणे खेळ खेळत असतो. ईश्वर प्रेम आणि करुणेचा ईश्वर आहे हे जर माणसाला खरोखर पटले तर असे करत असताना त्याच्या हृदयाचा थरकाप झाल्याशिवाय राहणार नाही. कारण माझ्यावर दयाभाव ठेवणारी शक्तीच मला अन्य प्राणिमात्रांवर दया करणे शिकवील.(हरि,९-१-१९३७,पृ. ३८२)

## सर्वोच्च आदर्श

सर्व जिवंत प्राण्यांवरील दया एवढाच माझ्या अहिंसेचा अर्थ नाही. मानवाच्या खालच्या पातळीवरील प्राण्यांना पवित्र मानण्यावर जैन धर्मात जो भर देण्यात आला आहे तो योग्यच आहे, परंतु याचा असा अर्थ कधीही होऊ शकत नाही की माणसांपेक्षाही त्या प्राण्यांना दयेकरिता अधिक पात्र समजावे. अमानवीय प्राण्यांच्या पावित्र्याबद्दल लिहिताना मी असे गृहीत धरून चालतो आहे की मानव प्राण्याला आपण आधीच पवित्र मानलेले आहे. वास्तवात अमानवीय प्राण्यांवर आवश्यकतेपेक्षा अधिक भर देण्यात आला आहे आणि आचरण करत असताना तर त्यात अजूनच विकृती आली आहे. उदाहरणार्थ अनेक लोक मुंग्यांना साखर खाऊ घालण्यानेच समाधानी होतात. असे वाटते की जीवदयेचा हा सिद्धान्त केवळ लाकडी निर्जीव मतप्रणालीप्रमाणे झाला आहे. धर्माच्या नावावर पाखंड आणि विकृती यांचा बोलबाला सुरू आहे.

अहिंसा सर्वोच्च आदर्श आहे. ते शूरांचे शस्त्र आहे, भ्याडांचे मुळीच नाही. इतरांनी केलेल्या जीवहत्येचा फायदा घेणे आणि आपण फार मोठे धार्मिक अहिंसक आहोत असे समजणे ही केवळ आत्मवंचना आहे.
(हरि, ९-६-१९४६, पृ.० १७२)

**हत्या न करण्याचा सिद्धान्त**

माझी अहिंसा माझी स्वतःची आहे. जनावरांची हत्या न करण्याचा सिद्धान्त मी पूर्णपणे मान्य करू शकत नाही. जे प्राणी नरभक्षक आहेत वा माणसाला दुखापत करतात त्यांचे रक्षण करावे असा कोणताही आग्रह माझ्या मनात नाही. अशा जनावरांच्या वंशवृद्धीत मदतनीस होणे चूक आहे असे मी समजतो. यामुळेच मी मुंग्या, माकड आणि कुत्र्यांना खाऊ घालण्याला नकार देतो. या प्राण्यांच्या रक्षणाकरिता मी माणसाचा बळी कधीही देणार नाही.

अशा प्रकारे विचार करताना मी या निष्कर्षावर पोहोचलो आहे की जेव्हा जेव्हा माकडे माणसाकरिता संकट झाली तेव्हा त्यांना मारणे क्षम्य तर आहेच पण ते आपले कर्तव्यही आहे. प्रश्न आहे की हाच नियम माणसांवर का लागू करू नये? हा याकरिता लागू करता येत नाही की माणूस कितीही वाईट असला तरी तो माणूस असतो. ईश्वराने माणसाला विवेकाची शक्ती दिली आहे, ती पशूंना दिलेली नाही. (हरि, ५-५-१९४६, पृ. १२३)

ख-या अहिंसेची मागणी आहे की आपल्याला जर माकडांच्या उत्पातापासून आपले स्वतःचे व समाजाचे रक्षण करायचे असेल तर आपल्याला त्यांची हत्या करावीच लागेल. सामान्य नियम हा आहे की किंचित जरी शक्यता असेल तरी आपण हिंसेपासून वाचलेच पाहिजे. समाजाची अहिंसा व्यक्तीच्या अहिंसेपेक्षा अनिवार्यपणे वेगळी आहे. समाजापासून वेगळी राहणारी व्यक्ती समाजाच्या सर्व नियमांना गुंडाळून ठेवू शकते, परंतु समाज असे करू शकत नाही. (हरि, ७-७-१९४६, पृ. २१३)

## ९०. मला सांस्कृतिक वेगळेपणा नको आहे

माझे घर चोहोबाजूंनी भिंतीत बंदिस्त असावे व त्याला खिडक्याही नसाव्या अशी माझी इच्छा नाही. माझी इच्छा आहे की सर्व देशांच्या संस्कृतीने सुवासित झालेला वारा माझ्या घरात दरवळावा. परंतु अशा कोणत्याही वा-यामुळे मी माझे पाऊल

अस्थिर होऊ देणार नाही. इतर कोणाच्या घरात लुडबुड्या, भिकारी वा गुलाम होऊन राहण्याला माझा नकार आहे. (यंग, १-६-१९२१, पृ. १७०)

आपण वेगळे राहावे वा आपल्या भोवती तटबंदी उभारावी असा विचार चुकूनही माझ्या मनात येत नाही. परंतु आदरपूर्वक आणि तरीही ठामपणाने मी सांगू इच्छितो की इतरांच्या संस्कृतीच्या गुणग्रहणाचा प्रश्न आपल्या संस्कृतीच्या गुणग्रहणानंतरच निर्माण होतो, त्याआधी नाही.

माझे ठाम मत आहे की जे बहुमूल्य रत्न आपल्या संस्कृतीजवळ आहे ते अन्य कोणत्याही संस्कृतीजवळ नाही. परंतु आपल्याला त्याचे ज्ञानच नाही. संस्कृतीचा अभ्यास करण्याला विरोध करण्याची आणि तिचे अवमूल्यन करण्याची शिकवण आपल्याला देण्यात आली आहे. या संस्कृतीनुसार जगणे आपण जवळपास सोडून दिले आहे. आचरणाचा आधार नसलेले केवळ शास्त्रीय ज्ञान हे औषध लावलेल्या शवासारखे असते. ते दिसायला कितीही सुंदर असले तरी ते प्रेरणादायी वा उदात्तीकरण करणारे नसते.

माझा धर्म मला इतर संस्कृतींचा अनादर करायला वा त्यांची उपेक्षा करायला मनाई करतो, परंतु त्याचबरोबर तो मला माझी संस्कृती आत्मसात करण्याकरिता व तिच्याप्रमाणे जगण्याकरिताही आग्रह करतो. असे केले नाही तर ते आपल्याकरिता निश्चितपणे आत्मघातीपणाचे होईल. (यंग, १-९-१९२१, पृ.२७७)

## भारतीय संस्कृतीचे संस्लेषण

भारतीय संस्कृती त्या वेगवेगळ्या संस्कृतींचे एकत्रीकरण आहे ज्या या देशात स्थिरावल्या होत्या आणि ज्यांनी भारतीय जीवनाला प्रभावित केले आणि ज्या या भूमीच्या आत्म्याने प्रभावित झाल्या. स्वाभाविकपणेच या एकत्रीकरणाचे स्वरूप स्वदेशी आहे व तिच्यात प्रत्येक संस्कृतीकरिता योग्य स्थान आहे.... (यंग, १७-११-१९२०, पृ. ६)

भारतीय संस्कृती वेगवेगळ्या धर्मांचे प्रतिनिधित्व करणारी आहे आणि आपापल्या भौगोलिक व इतर वातावरणांनी प्रभावित संस्कृतींचे मीलन आहे. यानुसार अरबस्तान, तुर्कस्तान, इजिप्त, आणि भारत या देशातील इस्लामी संस्कृती सारखी नाही. उलट ती स्वतः या देशांच्या संस्कृतीने प्रभावित झाली आहे. याप्रमाणे भारतीय संस्कृती भारतीय आहे. ही पूर्णपणे ना हिंदू आहे, ना इस्लामी आहे ना अन्य कोणी. या सर्वांचे ती मिश्रण आहे. जो माणूस स्वतःला

भारतीय म्हणवतो त्याने या संस्कृतीची जपणूक केली पाहिजे, हिचा विश्वस्त बनले पाहिजे आणि तिच्यावर कोणतेही संकट आले तर त्याने त्या संकटाचा सामना केला पाहिजे. (यंग, ३०-४-१९३१, पृ. ८८)

आपल्या युगातील भारतीय संस्कृती अजून निर्माणाधीन आहे. ज्या संस्कृतींमध्ये संघर्षाची स्थिती दिसते आहे त्या संस्कृतींचे मिश्रण करण्याचा प्रयत्न आपल्यातील अनेक लोक करत आहेत. जी संस्कृती वेगळी राहण्याचा प्रयत्न करील ती जिवंत राहू शकणार नाही.

विशुद्ध आर्य संस्कृतीसारखी कोणतीच संस्कृती आज भारतात अस्तित्वात नाही. आर्य लोक भारताचे मूळ रहिवासी होते की ते इथे घुसले होते हे जाणून घेण्यात मला मुळीच रस नाही. ब-याच पूर्वीचे माझे पूर्वज संपूर्ण मोकळेपणाने एकमेकांमध्ये मिसळले होते आणि आपली आजची पिढी त्याच मिश्रणाचा परिणाम आहे यातच मला खरा रस आहे.

आपण आपल्या मातृभूमीचे आणि त्या लहानशा पृथ्वीचे, जिच्यामुळे आपण आज जिवंत आहोत, काही कल्याण करतो आहोत की केवळ तिच्यावर ओझेच आहोत हे भविष्यच ठरवेल. (हरि, ९-५-१९३६, पृ. १००-१)

एक तर आपण वेगवेगळ्या धर्माच्या लोकांबरोबर मैत्रीच्या बंधनात बांधून घेऊन, सोबत राहून संस्कृतीचे जे सुंदर मिश्रण तयार केले आहे, ते टिकवून ठेवण्याचा व वाढवण्याचा प्रयत्न करू अथवा त्या दिवसाचा शोध घेण्याला सुरुवात करू जेव्हा हिंदुस्तानात एकच धर्म होता आणि त्याच एकाकी संस्कृतीकडे आपण आपली पावले परत वळवू.

हेही शक्य आहे की, त्या दिवसाचा शोध लावण्यात आपल्याला यशच येणार नाही आणि आलेच, तरी आपली पावले परत फिरवून आपण आपल्या संस्कृतीला परत त्या कुरूप युगाकडे ढकलून देऊ. जर असे झाले तर जगाच्या तिरस्काराला आपण पात्र ठरू व ते योग्यच होईल. (हरि, २-११-१९४७, पृ. ३९२)

## पाश्चात्त्य संस्कृती

जोपर्यंत माझा प्रश्न आहे, जरी मी माझ्यावरील पाश्चात्त्य संस्कृतीचे ऋण मान्य केले असले तरी मी हे सांगू शकतो की, या राष्ट्राची जी काही सेवा माझ्या हातून घडली आहे ती मी प्राच्य संस्कृतीचा पदर धरून ठेवण्याचा पुरेपूर प्रयत्न केल्यामुळे घडू शकली आहे. मी जर इंग्रजीपणा स्वीकारून एक राष्ट्रहीन व्यक्ती

बनलो असतो, तर भारताच्या सर्वसामान्य लोकांबद्दल मला काहीही कळले नसते व त्या लोकांची मी फिकीरही केली नसती. तसेच भारतीयांच्या पद्धती, सवयी, विचार आणि आकांक्षा यांच्याकडे मी तिरस्काराच्या दृष्टीने पाहिले असते व त्यांच्याकरिता मी कुचकामी ठरलो असतो. (यंग, ५-७-१९२८, पृ. २२४)

युरोपीय संस्कृती निःसंशयपणे युरोपीय लोकांकरिता अनुकूल आहे. परंतु आपण जर तिला अनुसरण्याचा प्रयत्न करू तर त्यामुळे भारताचा विनाश होऊन जाईल. माझ्या सांगण्याचा अर्थ असा नाही की तिच्यात जे काही चांगले व स्वीकार्य असेल तेही आपण स्वीकारू नये. याचा अर्थ असाही नाही की युरोपीय संस्कृतीत काही वाईटपणा निर्माण झाला असेल तरी तो काढून टाकण्याची युरोपीय लोकांना गरज नाही.

भौतिक सुखांमागे सतत धावणे आणि त्यांत अंदाधुंद वाढ करत जाणे हा एक वाईटपणा आहे. युरोपवासी आज ज्या सुखांचे गुलाम झाले आहेत त्याच्या ओझ्याखाली दबून मरण्याची जर त्यांची इच्छा नसेल तर त्यांना आपला दृष्टिकोन बदलावा लागेल हे निश्चित. शक्य आहे मी चूक असेन, परंतु मला माहीत आहे की, भारताने जर या सुवर्णमृगामागे पळायला सुरुवात केली तर तो निश्चितपणे मरणाच्या दारात जाईल.

आपण पाश्चात्त्य तत्त्वज्ञांचे पुढील विचार आपल्या हृदयपटलावर कोरून ठेवले पाहिजेत : 'साधी राहणी, उच्च विचारसरणी.'

आपण लाखो-करोडो लोकांना उच्च स्तरावरील जीवन उपलब्ध करून देऊ शकत नाही आणि सर्वसाधारण लोकांच्या हिताचा विचार करण्याचा दावा करणारे आपण मूठभर लोक त्या उच्चतर जीवनस्तराच्या शोधात यशस्वी होणार नाही आणि त्या प्रक्रियेत उच्च विचारांचा आदर्शही आपण हरवून बसू हे आज स्पष्ट झाले आहे. (यंग, ३०-४-१९३१, पृ. ३८)

## पश्चिमेचे सांस्कृतिक प्रभुत्व

माझे मत आहे की आपल्याकरिता आपल्या संस्कृतीच्या रक्षणाचे काम इतर कोणीही करू शकत नाही. तिचे रक्षण स्वतः आपल्यालाच करावे लागेल आणि आपल्या मूर्खपणामुळे आपण तिला नष्टही करू शकतो.
(हरि, २५-५-१९४७, पृ. १६६)

आपल्याला जरी राजकीय स्वातंत्र्य मिळालेले असले तरी आपण पश्चिमेच्या

सूक्ष्म प्रभावापासून अजून मुक्त झालेलो नाही. ज्ञान केवळ पश्चिमेकडून मिळू शकते असे मानणा-या राजकारणी लोकांच्या संप्रदायाला मला काहीही सांगायचे नाही आणि पश्चिमेकडून काहीही चांगले मिळाले नाही हा विश्वासही मला मान्य नाही. परंतु याबाबतीत आपण अजून कोणत्याच निष्कर्षावर पोहोचलो नसू अशी मला भीती वाटते.

ज्याअर्थी आपल्याला विदेशी सत्तेपासून राजकीय स्वातंत्र्य मिळाले त्याअर्थी विदेशी भाषा आणि विचार यांच्या सूक्ष्म प्रभावापासून मुक्ती मिळवण्याकरिता तोच मार्ग पुरेसा आहे असा दावा कोणीही करणार नाही अशी आशा मी करतो. (हरि, २-११-१९४७, पृ. ३९२)

## आशिया आशियायींकरिता

आशिया आशियायींकरिता आहे या सिद्धान्तावरून जर एखाद्या युरोपविरोधी संघटनेचा बोध होत असेल तर मी या सिद्धान्ताच्या विरोधात आहे. आपण जर आशियाला कूपमंडुक राहू देऊ इच्छीत नसू तर मग आपण आशिया आशियायींकरिता ही घोषणा कशी काय करू शकतो? परंतु कूपमंडुक राहून आशियाचे काम भागू शकत नाही. विश्वाला देण्याकरिता त्याच्याजवळ एक संदेश आहे, परंतु त्यानुसार आचरण करण्याची त्याची स्वतःची तयारी असली पाहिजे. संपूर्ण आशियावर, ज्यात भारत, चीन, जपान, ब्रह्मदेश (म्यांमार), श्रीलंका, मलेशिया सामील आहेत, बौद्ध धर्माचा प्रभाव आहे. ब्रह्मदेशाच्या व श्रीलंकेच्या लोकांना मी सांगितले आहे की तुम्ही नावाचेच बौद्ध आहात, खरे बौद्ध भारतीय आहेत. चीन आणि जपानच्या लोकांनाही मी हेच सांगेन. आशिया केवळ आशियायींकरिता न राहता सर्व जगाकरिता झाला पाहिजे. याकरिता आशियाने बुद्धाचा संदेश परत समजून घेतला पाहिजे व तो जगाला सांगितला पाहिजे. आज या संदेशाची सर्वत्र उपेक्षा होते आहे. माझ्याजवळ तुम्हाला देण्याकरिता एकच संदेश आहे.... आणि तो हा आहे की तुम्हाला जो प्राचीन वारसा मिळाला आहे त्यावर तुम्ही निष्ठा ठेवली पाहिजे. बुद्धाचा संदेश २५०० वर्षे जुना आहे परंतु त्यानुसार प्रामाणिकपणे आचरण केले गेले नाही. परंतु २५०० वर्षांचा काळ असा मोठा तरी किती आहे? कालचक्राच्या एका फे-याएवढा हा काळ आहे. अहिंसेच्या फुलाला, जे कोमेजत असलेले दिसते आहे, अजून पूर्णपणे फुलायचे आहे. (हरि, २४-१२-१९३८, पृ. ४०४)

मला आशा आहे की.... वेगवेगळ्या आशियायी देशांचे सगळे प्रतिनिधी केवळ 'एक विश्व' हे स्वप्न साकारण्याचा शक्य तो सर्व प्रयत्न करतील. हा आदर्श प्राप्त करण्याच्या उपायांचा व साधनांचा शोध त्यांना घ्यावा लागेल. जर तुम्ही दृढ संकल्पाने काम कराल तर हे स्वप्न आपल्याच पिढीत साकार झालेले आपल्याला आढळेल याबद्दल मला किंचितही संशय नाही.... जगाला एक व्हायचे नसेल तर या जगात राहण्याची मला इच्छा नाही. माझ्या जीवनकाळातच हे स्वप्न पूर्ण व्हावे अशी माझी नक्कीच इच्छा आहे. (हरि, २०-४-१९४७, पृ. १४८)

सगळे डोळे भारताकडे लागले आहेत. विशेषतः आशिया आफ्रिकेचे.... भारताने अहिंसेच्या मार्गाने स्वातंत्र्याकरिता लढा देऊन इंग्लंडवर नैतिक विजय मिळवला आहे. यामुळे आशियायी देश त्याच्याकडे उपयुक्त मार्गदर्शनार्थ डोळे लावून बसले आहेत. ही आशा व्यर्थ ठरणार नाही हे पाहणे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे. आशिया आणि आफ्रिका यांना भारताकडून योग्य मार्गदर्शन मिळाले तर जगाचा नकाशाच बदलून जाईल. (हरि, ११-५-१९४७, पृ. १४८)

## एक विश्व

ईश्वराने विश्वव्यवस्था अशा प्रकारे केली आहे की, कोणतीही व्यक्ती आपला चांगुलपणा वा वाईटपणा स्वतःपर्यंत सीमित ठेवू शकत नाही. संपूर्ण विश्व एखाद्या मानवी शरीराप्रमाणे आहे व सगळे त्याचे वेगवेगळे अवयव आहेत. एका अवयवाला वेदना झाल्या, तर त्याची अनुभूती संपूर्ण शरीराला होते. एक अवयव सडू लागल्यानंतर त्याचे विष संपूर्ण शरीरात भिनते. (हरि, २६-५-१९४६, पृ. १५४)

ईश्वराच्या संपूर्ण सृष्टीच्या कल्याणाची कामना माणसाने अंतःकरणपूर्वक केली पाहिजे आणि ती कामना पूर्ण करण्याकरिता ईश्वराने आम्हाला पुरेशी शक्ती द्यावी अशी प्रार्थना त्याने केली पाहिजे. सर्वांच्या कल्याणाच्या प्रार्थनेतच व्यक्तीचे कल्याण अंतर्भूत आहे. जी व्यक्ती स्वतःच्या व स्वतःच्याच कल्याणाकरिता प्रार्थना करते ती स्वार्थी असते व तिचे कधीही भले होऊ शकत नाही. (हरि, २७-१०-१९४६, पृ. ३७५)

भारत आणि पाकिस्तान या दोन्ही राष्ट्रांकरिता ही गोष्ट शक्य आहे की.... जगातील स्वतंत्र राष्ट्रांच्या कुटुंबाचे ध्येय त्यांनी आपल्या उराशी बाळगावे. या गोष्टीसोबतच अनिवार्यपणे ही गोष्टही गृहीत धरण्यात आली आहे की या राष्ट्रांचे स्वतःचे असे वेगवेगळे सैन्य नसेल. इतर देशांच्या हिताच्या विरोधात असलेले

धोरण भारत विनाकारण अवलंबील आणि विश्वशांततेकरिता तो संकट सिद्ध होईल असे मला वाटत नाही....

भारताच्या प्रयत्नाने मुक्त आणि स्वतंत्र राष्ट्रांचा असा विश्वसंघ जर अस्तित्वात आला तर मग अशीही आशा करता येईल की जगात ईश्वराच्या साम्राज्याची, ज्याला रामराज्यही म्हणता येऊ शकते, रचना होऊ शकेल. (हरि, १३-७-१९४७, पृ. २३५)

### युनेस्को

शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे शांतता स्थापण्याचा युनेस्कोचा जो प्रयत्न सुरू आहे त्यात मला फार रस आहे. जगातील राष्ट्रांमध्ये आज जी शैक्षणिक आणि सांस्कृतिक भयानक विषमता आहे ती जोपर्यंत दूर होणार नाही तोपर्यंत खरे संरक्षण आणि शांतता स्थापित करता येऊ शकत नाही. त्या कमी भाग्यशाली देशांच्या दूरस्थ घरांमध्ये प्रकाश पोहचवला पाहिजे जे तुलनात्मक दृष्टीने अंधारात आहेत आणि माझे असे मत आहे की जी राष्ट्रे शैक्षणिक दृष्टीने उन्नत आणि आर्थिक दृष्टीने प्रगत आहेत, त्यांची ही विशेष जबाबदारी आहे. (हरि, १६-११-१९४७, पृ. ४१२-३)

## ९१. राष्ट्रभक्ती विरुद्ध आंतरराष्ट्रीयतावाद

### भारतीय राष्ट्रीयत्व

दुस-या देशांना माझ्या स्वतंत्र देशापासून काही शिकता यावे आणि माझ्या देशाच्या साधनसामग्रीचा उपयोग मानवजातीच्या कल्याणार्थ करता यावा म्हणून मला माझ्या देशाचे स्वातंत्र्य पाहिजे.

व्यक्तीने कुटुंबाकरिता प्राणत्याग केला पाहिजे, कुटुंबाने गावाकरिता नष्ट झाले पाहिजे, गावाने जिल्ह्याकरिता, जिल्ह्याने प्रांताकरिता आणि प्रांताने देशाकरिता आपला बळी देण्याकरिता तयार राहिले पाहिजे हे राष्ट्रप्रेमाचा मार्ग ज्याप्रमाणे आम्हाला शिकवतो, त्याचप्रमाणे गरज पडली तर विश्वहिताकरिता राष्ट्राला आपला स्वतःचा बळी देता आला पाहिजे म्हणून माझ्या देशाने स्वतंत्र होणे आवश्यक आहे. यामुळे राष्ट्रीयतेबद्दलचे माझे प्रेम अथवा राष्ट्रीयतेची माझी संकल्पना अशी आहे की माझा देश स्वतंत्र झाला तर आवश्यकता पडल्यानंतर मानवजातीच्या अस्तित्वाच्या रक्षणार्थ त्याला स्वतःची आहुती देता यावी. या

संकल्पनेमागे वंशविषयक घृणेचा कोणताही भाग नाही. आमच्या राष्ट्रीयत्वाची भावना अशीच असली पाहिजे. (ग्राइंवि, पृ. १७१)

आम्ही कोणाचेही शोषण करणार नसल्यामुळे आणि कोणालाही आम्ही स्वतःचे शोषण करू देणार नसल्यामुळे आमचे राष्ट्रीयत्व इतर कोणत्याही राष्ट्राकरिता संकट बनू शकत नाही. स्वराज्याच्या माध्यमातून आम्ही सर्व जगाची सेवा करू. (यंग, १६-४-१९३१, पृ. ७९)

माझ्याकरिता राष्ट्रीयता आणि मानवता एकच गोष्ट आहे. मी मानव आणि सहृदय असल्यामुळे मी राष्ट्रभक्त आहे. माझे राष्ट्रीयत्व इतरांना वगळणारे नाही, भारताची सेवा करण्याकरिता मी इंग्लंड वा जर्मनीचे नुकसान करणार नाही. माझ्या जीवनाच्या योजनेत साम्राज्यवादाला कोणतेही स्थान नाही. राष्ट्रभक्ताला कुटुंबप्रमुखासारखेच नियम लागू होत असतात आणि राष्ट्रभक्तात मानवता जितकी कमी असेल, तितकीच त्याच्या राष्ट्रभक्तीतही उणीव असेल. वैयक्तिक आणि राजकीय कायद्यात कोणताही विरोध नाही.
(यंग, १६-३-१९२१, पृ. ८१)

जी व्यक्ती राष्ट्रवादी नाही ती व्यक्ती आंतरराष्ट्रवादीही होऊ शकत नाही. राष्ट्रवाद अस्तित्वात आल्यानंतर जेव्हा वेगवेगळ्या देशाचे लोक संघटित होतील व एका व्यक्तीप्रमाणे काम करू लागतील तेव्हाच आंतरराष्ट्रवाद अस्तित्वात येईल. राष्ट्रवाद वाईट गोष्ट नाही, वाईट आहे संकुचित वृत्ती, स्वार्थीपणा, इतरांबद्दलची बेफिकीर वृत्ती. आधुनिक राष्ट्रांकरिता याच गोष्टी विनाशकारक आहेत. त्यांच्यातील प्रत्येक राष्ट्र दुस-या राष्ट्राच्या हिताचा बळी देऊन वा त्याला नष्ट करून स्वतःची उन्नती करू इच्छितो. भारतीय राष्ट्रवादाने एक नवीन मार्ग निवडला आहे. संपूर्ण मानवतेच्या हिताकरिता आणि तिच्या सेवेकरिता तो स्वतःला संघटित करू इच्छितो. म्हणजेच त्याला संपूर्ण आत्माभिव्यक्ती हवी आहे.... ईश्वराने माझे नशीब भारताच्या लोकांबरोबर बांधलेले असल्यामुळे मी त्यांची सेवा केली नसती तर माझ्यावर माझ्या निर्मात्याचा विश्वासघात करण्याचा दोष आला असता. भारतवासीयांची सेवा करण्याची पात्रता जर माझ्यामध्ये आली नाही तर मानवतेची सेवा करण्याकरिताही मी अपात्र ठरेन आणि जोपर्यंत माझ्या देशाची सेवा करत असताना मी इतर राष्ट्रांचे नुकसान करत नाही तोपर्यंत मी चुकीच्या मार्गाने जात नाही असे मी समजतो.
(यंग, १८-६-१९२५, पृ. २११)

## भारत मानवतेला कवटाळतो

मी सगळ्या जगाचा विचार करत नाही. माझ्या राष्ट्रभक्तीत सामान्यपणे संपूर्ण मानवजातीचे कल्याण समाविष्ट आहे.... अशा रीतीने माझ्या भारताच्या सेवेत मानवतेची सेवा समाविष्ट आहे. भारताच्या मुक्तीची संपूर्ण योजनाच आंतरिक शक्तीच्या विकासावर आधारित आहे. ही आत्मशुद्धी करण्याची योजना आहे. यामुळेच पश्चिमेचे लोक भारताच्या आंदोलनाला मदत करू इच्छीत असतील तर त्यांनी काही विशेषज्ञांना या आंदोलनाच्या अंतर्गत स्वरूपाचा अभ्यास करण्याकरिता स्वतंत्रपणे पाठवावे. भारताच्या आंदोलनाला मदत करण्याची ही त्याची सर्वात चांगली पद्धत असेल. परंतु या विशेषज्ञांनी कोणताही पूर्वग्रह न ठेवता भारतात यावे, प्रत्येक सत्यशोधकामध्ये असते तशी त्यांच्यामध्ये नम्रपणाची भावना असावी....

शब्दशक्तीपेक्षा - मग ती लेखी शब्दांची असो वा तोंडी - विचारशक्तीवर माझा अधिक विश्वास आहे आणि ज्या आंदोलनाचे मी प्रतिनिधित्व करतो आहे त्याच्यात जर चैतन्यशक्ती असेल व ईश्वराचा आशीर्वाद जर त्याच्यामागे असेल तर मी विश्वाच्या वेगवेगळ्या भागात जरी मी गेलो नाही तरी ते आंदोलन संपूर्ण विश्वात पसरेल....

किंचितही अहंकार न बाळगता आणि संपूर्ण नम्रपणाने जर मी सांगू शकत असेन तर मी सांगेन की माझा संदेश आणि माझी पद्धती मूलतः खरोखरच संपूर्ण जगाकरिता आहे आणि हे पाहून मला फार समाधान होते की फार मोठ्या संख्येने पश्चिमेतील स्त्री-पुरुषांच्या अंतःकरणात याला अद्‌भुत प्रतिसाद मिळाला आहे आणि अशा लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढते आहे.(यंग,१७-९-१९२५,पृ.३२०)

माझ्या मर्यादित क्षमतेमुळे, ज्याची मला दुःखद जाणीव आहे, मला असे वाटते की माझे प्रयोग पृथ्वीच्या एका खंडापर्यंतच मी सीमित ठेवले पाहिजे. जी गोष्ट एखाद्या ठिकाणी लागू होईल, तीच सर्व जगाला लागू होईल. सगळ्या जगाची मदत मिळवण्याकरिता मी उत्सुक आहे. ती मिळतेही आहे.... परंतु मला माहीत आहे की एका प्रचंड प्रवाहाच्या रूपात - जो आपल्याला शुद्धही करील व स्फूर्तीही देईल - ती मदत आपल्याकडे येण्यापूर्वी आपण स्वतःला शुद्ध केले पाहिजे. (यंग, १७-९-१९२५, पृ. ३२२)

## बंधुभावनेचे ध्येय

केवळ भारतीयांमध्येच बंधुभावना निर्माण करण्याचे माझे ध्येय नाही. यात काही संशय नाही की आज माझे पूर्ण जीवन आणि पूर्ण वेळ भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनातच जात आहे. तरीही केवळ भारताचे स्वातंत्र्य हेच माझे ध्येय नाही. परंतु भारताचे स्वातंत्र्य मिळवण्याच्या माध्यमातून मी संपूर्ण मानवतेत बंधुभावना निर्माण करण्याचे ध्येय साध्य करू इच्छितो. माझी राष्ट्रभक्ती केवळ स्वतःचाच विचार करणारी नाही. ती सर्वसमावेशक आहे आणि मी ती राष्ट्रीयता नाकारेन जी इतर राष्ट्रातील लोकांच्या दुःखावर आणि शोषणावर स्वतःची उन्नती करण्याचा प्रयत्न करील. संपूर्ण मानवतेच्या अधिकाधिक कल्याणाशी राष्ट्रभक्तीची माझी भावना निरपवादपणे सुसंगत नसेल तर तिला काहीही अर्थ नाही. एवढेच नाही तर माझा धर्म आणि त्यातून निघालेल्या माझ्या राष्ट्रभक्तीत सर्व प्राणिमात्रांचा समावेश आहे. केवळ मानवजातीशीच मला बंधुभाव वा तादात्म्य नको आहे. तुम्हाला ऐकून धक्का बसणार नसेल तर मी सांगेन की पृथ्वीवर रांगणा-या सर्व जीवांशी मला एकरूप व्हायचे आहे, कारण आपण सर्व ईश्वराची लेकरे आहेत. यामुळेच जीवन विविधरूपी असले तरी ते मुळात एकच आहे.
(यंग, ४-४-१९२९, पृ. १०७)

मी भारताचा नम्र सेवक आहे आणि भारताची सेवा करत असतानाच मी संपूर्ण मानवतेची सेवा करतो आहे. माझ्या जीवनाच्या सुरुवातीच्या काळात मला कळले होते की भारताची सेवा आणि मानवतेची सेवा यांच्यात कोणताही विरोध नाही. जसजसा मी मोठा झालो आणि माझ्या बुद्धीचाही विकास झाला तसतसे मला जाणवू लागले की माझा विचार योग्य होता आणि आज जवळपास पन्नास वर्षांच्या सार्वजनिक जीवनानंतर मी सांगू शकतो की देशसेवा आणि मानवसेवा यांच्यात कोणताही विरोध नाही या सिद्धान्तावरील माझा विश्वास अजूनच दृढावला आहे. हा एक चांगला सिद्धान्त आहे. याचा स्वीकार केल्यामुळे जगातील तणाव कमी होईल आणि वेगवेगळ्या राष्ट्रांमधील ईर्ष्या समाप्त होईल.
(हरि, १७-११-१९३३, पृ. ५-६)

## स्वातंत्र्य विरुद्ध परस्परावलंबन

केवळ स्वतःचे स्वातंत्र्य हे विश्वराज्याचे ध्येय असू शकत नाही. त्यांचे ध्येय परस्परावलंबन आहे. (यंग, १७-७-१९२४, पृ. २३६)

एकमेकांशी भांडत राहावे अशा स्वातंत्र्याच्या बाजूने आज जगातील समंजस लोक नाहीत तर मैत्रीपूर्ण स्वतंत्र राज्यांच्या संघाच्या बाजूने ते आहेत. अशा संघाच्या स्थापनेला अजून बराच वेळ लागू शकतो. माझ्या देशाबद्दल मी फार मोठा दावा करू इच्छीत नाही. परंतु आपण स्वातंत्र्याऐवजी परस्परावलंबनाकरिता तयार झालो तर ती काही फार मोठी वा आश्चर्यचकित करणारी गोष्ट नाही.... माझी इच्छा आहे की स्वातंत्र्याकरिता ताकद लावण्याऐवजी पूर्णपणे स्वतंत्र होण्याची शक्ती विकसित करण्यावर आपण भर द्यावा. आज इंग्लंड साम्राज्यांतर्गत भारताला बरोबरीचा दर्जा देण्याची घोषणा करण्याच्या तयारीत असताना मी जी काही योजना तयार करेन तिचे ध्येय मैत्री असेल, मैत्रीविरहित स्वातंत्र्य नाही. (यंग, २६-१२-१९२४, पृ. ४२५)

## समाजातील परस्पर संबंध

माणसाचा आदर्श जेवढा स्वावलंबन आहे तितकाच परस्परावलंबनही आहे आणि असायलाही पाहिजे. माणूस एक सामाजिक प्राणी आहे. समाजाशी परस्परांचे संबंध ठेवल्याशिवाय विश्वासोबत तादात्म्य स्थापित करता येऊ शकत नाही म्हणजेच आपल्या अहंकाराचे आपण दमन करू शकत नाही. त्याचे सामाजिक परस्परावलंबन त्याला स्वतःच्या श्रद्धेची परीक्षा घेण्याची व स्वतःला वास्तवतेच्या कसोटीवर कसण्याची संधी देते. आपल्या सहका-यांच्या सहकार्यावर किंचितही अवलंबून राहावे लागणार नाही अशा स्थितीत जर माणूस असता तर तो इतका गर्विष्ठ वा दांभिक झाला असता की तो पृथ्वीवर ओझे बनला असता व या धरेकरिता तो काट्यासारखा झाला असता. समाजावर अवलंबून राहावे लागल्यामुळेच त्याच्यात मानवतेचा विकास झाला आहे. माणसाला आपल्या मूलभूत गरजांची पूर्तता स्वतःला करता आली पाहिजे हे उचितच आहे, परंतु स्वावलंबनाच्या भावनेचा विकास इतक्या अमर्याद प्रमाणात करण्यात आला की त्यामुळे माणूस समाजापासून वेगळा पडेल तर ते स्वावलंबन पापासारखे होईल याबद्दल मला मुळीच संशय नाही. माणूस सरकी पेरण्यापासून सूतकताईपर्यंतची सर्व कामे एकट्याने करू शकत नाही. त्याला कोणत्या ना कोणत्या कामात कुटुंबाच्या इतर सदस्यांची मदत घ्यावी लागते आणि जर माणूस आपल्या कुटुंबातील सदस्यांची मदत घेऊ शकत असेल तर आपल्या शेजा-यांची मदत तो का घेऊ शकत नाही? असे घडले नाही तर 'वसुधैवकुटुंबकम' या महान

उक्तीला काय अर्थ राहील? (यंग, २१-३-१९२९, पृ. ९३)

आपण हे विसरायला नको की.... माणसाची सामाजिकताच त्याला पशूजगापासून वेगळे करते. जर स्वतंत्र होणे त्याचा विशेषाधिकार असेल तर परस्परावलंबन त्याचे कर्तव्य आहे. केवळ दांभिक माणूसच जगाच्या सर्व लोकांपासून स्वतंत्र असल्याचा दावा करू शकतो. (यंग, २५-४-१९२९, पृ.१३५)

**व्यक्ती**

समाजात जगण्याकरिता व्यक्तिगत स्वातंत्र्य आणि परस्परावलंबन या दोघांचीही गरज आहे. पूर्णपणे स्वावलंबी तर एखादा रॉबिन्सन क्रुसोच असू शकतो. आपल्या मूलभूत गरजांच्या पूर्तीकरिता शक्य तितका प्रयत्न केल्यानंतर उर्वरित गरजांकरिता माणसाला शेजाऱ्यांची मदत मागावी लागेल. हेच खरे सहकार्य आहे. (यंग, ३१-३-१९४६, पृ. ५९)

आत्मनिरीक्षण माणसाला उदात्त बनवते आणि दुसऱ्याचे छिद्रान्वेषण त्याला भ्रष्ट करते. आपण सामूहिक जीवनाची कला आणि गुण शिकलो पाहिजे. त्यात सहकार्याचा परीघ सतत विस्तृत होत जातो आणि अखेरीस संपूर्ण मानवजातीला तो आपल्या कवेत घेतो. (यंग, १४-१२-१९४७, पृ. ४६५)

असा एकही गुण आणि दोष नाही की, जो समाजावर परिणाम करत नाही. यामुळे चांगले वा वाईट असणे हा केवळ व्यक्तिगत प्रश्न नाही, तो संपूर्ण समुदायाचा वा असे म्हणता येईल की संपूर्ण जगाचा प्रश्न आहे. (इरि, पृ. ५५)

मानवजात एक आहे कारण नैतिक नियम सर्वांना सारखेच लागू होतात. ईश्वरदृष्ट्या सर्व लोक समान आहेत. हे खरे आहे की वंश आणि सामाजिक स्थान यांच्यासंबंधी लोकांमध्ये अंतर आहे. परंतु व्यक्तीचे स्थान जितके मोठे तितकीच त्याची जबाबदारी मोठी. (इरि, पृ. ५७)

माझा या गोष्टीवर विश्वास नाही की.... एका माणसाचा आध्यात्मिक लाभ व्हावा आणि त्याच्या आजूबाजूच्या लोकांनी दुःखात खितपत पडावे. माझा अद्वैतावर विश्वास आहे. माणसांच्याच नाही तर प्राणिमात्रांच्या अनिवार्य ऐक्यावर माझा विश्वास आहे. यामुळेच माझा विश्वास आहे की एका माणसाचा आध्यात्मिक लाभ झाला तर त्याच्यामुळे सर्व जगाला त्याचा लाभ होतो आणि एका माणसाचे जर पतन झाले तरी त्या सीमेपर्यंत सर्व जगाचे पतन होते. (यंग, ४-१२-१९२४, पृ. ३९८)

व्यक्तीने समुदायाकरिता आपली आहुती द्यावी, समुदायाने जिल्ह्याकरिता,

जिल्ह्याने प्रांताकरिता, प्रांताने राष्ट्राकरिता आणि राष्ट्राने जगाकरिता बलिदान करावे ही आत्मबलिदानाची तार्किक परिणती आहे. समुद्रापासून वेगळा झालेला थेंब कोणाचेही कल्याण केल्याशिवाय नष्ट होतो. तो जर समुद्राचा भाग बनून राहिला असता तर त्याला आपल्या छातीवर शक्तिशाली जहाजाचा तांडा वाहवून नेण्याचे भाग्य लाभले असते. (हरि, २३-३-१९४७, पृ. ७८)

## ९२. वंशवाद

हे शक्य नाही की माणूस एका क्षेत्रात चुकीचे काम करत राहील आणि दुस-या क्षेत्रात बरोबर. जीवन एक अविभाज्य संपूर्ण आहे. (यंग, २७-१-१९२७, पृ. ३१)

माझ्या जीवनाच्या योजनेत ज्याप्रमाणे भारतातील वेगवेगळ्या धर्मातील लोकांमधील भेदभावांना स्थान नाही त्याचप्रमाणे वेगवेगळ्या वंशांमधील कोणताही भेद मानत नाही. माझ्या दृष्टीने 'माणूस केवळ माणूस आहे'. (यंग, २०-२-१९२०, पृ. ६१)

### श्वेतनीती

दक्षिण आफ्रिकेच्या श्वेतनीतीत विश्वयुद्धाचे बीज लपलेले आहे. (हरि, २४-३-१९४६, पृ. ५२)

श्वेत लोकांच्या ख-या श्रेष्ठत्वाकरिता कायद्याच्या बाह्य मदतीची गरज आहे काय? (हरि, २४-३-१९४६, पृ. ५२)

ज्या संस्कृतीला आपल्या अस्तित्वाच्या रक्षणाकरिता अतिशय संशयास्पद अशा वंश विषयक कायद्यांच्या मदतीची गरज असते तिला संस्कृती म्हणता येऊ शकते काय? (हरि, ३०-६-१९४६, पृ. २०४)

### दुष्कृत्याचा बदला

अश्वेत लोकांच्या हातात कोणी सत्याग्रहाचे शस्त्र दिले नाही तर आपल्या श्वेत अत्याचा-यांचा बदला घेण्याकरिता ते अटिलप्रमाणे एक दिवस उठून उभे राहतील. (हरि, १९-५-१९४६, पृ. १३४)

जमावाने ठेचून मारण्याचा वंशविषयक कायदा दक्षिण आफ्रिकेत लागू करण्यात आला तर श्वेत संस्कृतीवरील तो एक कलंक होईल. मला आशा आहे की दक्षिण आफ्रिकेतील सरकार आणि मानवजातीची सौजन्यशील अंतःचेतना असे होऊ देणार नाही. (हरि, १९-५-१९४६, पृ. २०६)

ही नवीन वंशवादी व्यवस्था भारतातील समाप्तप्राय प्राचीन जातिव्यवस्थे-पेक्षाही वाईट आहे, त्या जातिव्यवस्थेत निदान काही तरी चांगले होते. जातिव्यवस्थेच्या या नवीन आवृत्तीत एकही चांगला गुण नाही. श्वेत संस्कृतीला आशियायी व आफ्रिकी लोकांपासून आपले रक्षण करण्याकरिता कायदेशीर अडथळे उभारण्याची गरज आहे अशी घोषणा ती बेशरमपणे करते आहे. (हरि, २-६-१९४६, पृ. १५७)

## श्वेत माणसाचे ओझे

अश्वेतांवरील म्हणजे करड्या वा काळ्या लोकांवरील श्वेत जातीचे खरे ओझे श्वेतांचे आधिपत्य नसून मनातल्या मनात त्यांना खाणारे दांभिकपणाचे ओझे आहे. सर्व लोक समान आहेत हे गो-यांनी मान्य करण्याची वेळ आता आलेली आहे. कातडीच्या गोरेपणामागे काहीच गूढ नाही. समान संधी मिळाली तर कोणत्याही देशातील वा कोणत्याही रंगाची व्यक्ती पूर्णपणे इतरांच्या बरोबरीची असल्याचे दिसू शकते हे वारंवार सिद्ध झालेले आहे.

....'इतरांबरोबर तसाच व्यवहार करा जसा व्यवहार इतरांनी तुमच्याबरोबर करावा असे तुम्हाला वाटते.' ज्या महापुरुषाचे हे शब्द आहेत त्याचे नाव गोरे लोक केवळ तोंडदेखलेपणाने घेतात का? ज्या महान अश्वेत आशियायी माणसाने जगाला वरील संदेश दिला होता त्याचे नाव गो-यांनी आपल्या अंतःपटलावरून पूर्णपणे पुसून टाकले आहे काय?

मानवजातीचे सर्व महान उपदेशक आशियायी होते व त्यांचे चेहरे गोरे नव्हते ही गोष्ट ते विसरले आहेत का? हे महापुरुष जर आज पृथ्वीवर अवतरले आणि दक्षिण आफ्रिकेत गेले तर त्यांना वेगळ्या वस्त्यांमध्ये राहावे लागेल काय? गो-यांची बरोबरी न करू शकणारे अश्वेत आशियायी म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाणार आहे का? (हरि, ३०-६-१९४६, पृ. २०४)

## वंशवादाचे उन्मूलन

वंशवादाच्या विषमतेचे उन्मूलन केले पाहिजे असे जे लोक मान्य करतात आणि तरीही त्या वाईटपणाविरुद्ध जे संघर्ष करत नाहीत ते नपुंसक आहेत. अशा लोकांना मला काहीच सांगायचे नाही. अखेरीस पददलितांना आपला उद्धार स्वतःच करावा लागणार आहे.... या समस्येचे उत्तर बहुतांश भारताच्या हातात आहे. भारताची अंतर्गत स्थिती सर्व प्रकारे चांगली राहिली तर कदाचित तो या

समस्येच्या सोडवणुकीत महत्त्वाची भूमिका वठवू शकेल....

दक्षिण आफ्रिकी-भारतीय वाद न्याय्य पद्धतीने सोडवण्यात जर राष्ट्रसंघ यशस्वी झाला नाही तर त्याची प्रतिष्ठा संपून जाईल. राष्ट्रसंघ जेव्हा न्यायाची बाजू घेईल तेव्हाच तो पुढे जाऊ शकेल याबद्दल मला मुळीच संशय नाही. (हरि, २६-१०-१९४७, पृ. ३८५)

## ९३. युद्ध आणि शांतता

### युद्धातील माझा सहभाग

इतकी वर्षे आत्मविश्लेषण केल्यानंतरही मला असे वाटते की बोअर युद्ध आणि युरोपीय लोकांचे मोठे युद्ध तसेच १९०६ साली नाताळमधील झुलूंचे तथाकथित बंड या युद्धांच्या काळात ज्या परिस्थितीत मी होतो त्या परिस्थितीत मला तसेच वागणे भाग होते.

जीवन एकाच वेळी अनेक शक्तींद्वारे संचालित होत असते. जर माणूस डोळे मिटून एका सामान्य सिद्धान्ताद्वारे आपल्या कार्याची दिशा ठरवू शकत असेल तर जीवन अतिशय सोपे होईल. परंतु मला माझ्या जीवनातील असे एकही काम आठवत नाही ज्याचा निर्णय मला केवळ एकाच शक्तीचा विचार करून घेता आला.

कट्टर युद्धविरोधी असल्यामुळे प्रशिक्षणाची संधी मिळाल्यानंतरही घातक शस्त्रे चालवण्याचे प्रशिक्षण मी कधीही घेतले नाही. कदाचित यामुळेच मानवजातीचा प्रत्यक्ष नाश करण्यापासून मी वाचलो. परंतु शक्तीवर आधारित शासनपद्धतीच्या अंतर्गत जोपर्यंत मी राहत होतो व त्या पद्धतीने दिलेल्या सुविधांचा व विशेषाधिकारांचा मी स्वेच्छेने उपभोग घेत होतो तोपर्यंत युद्धात गुंतलेल्या सरकारला माझ्या क्षमतेप्रमाणे मदत करणे माझे कर्तव्य होते. जर मी सरकारशी असहकार केला असता आणि त्याने दिलेल्या विशेषाधिकारांचा माझ्या पूर्ण शक्तीनिशी मी त्याग केला असता तर गोष्ट वेगळी असती.

आपण एक उदाहरण घेऊ या. मी अशा एका संस्थेचा सदस्य आहे जिच्या मालकीची काही एकर जमीन आहे व तिच्यात आलेल्या पिकाला माकडांपासून धोका आहे. जीवनाच्या पावित्र्यावर माझा विश्वास आहे आणि त्यामुळे माकडांना दुखापत करणे मला अहिंसेचा भंग वाटतो. परंतु पीक वाचवण्याकरिता माकडांवर

हल्ला करण्याकरिता इतरांना प्रोत्साहित करण्यात व तसे करायला सांगण्यात मला किंचितही संकोच वाटत नाही. ही वाईट गोष्ट टाळता आली असती तर मला आवडले असते. ती संस्था मोडूनही मी हे अपकृत्य टाळू शकलो असतो. परंतु मी तसे करू शकत नाही कारण ज्या समाजात शेती होत नाही आणि त्यामुळे किंचितही हिंसा होण्याची शक्यता नाही असा समाज आढळण्याची शक्यता मला वाटत नाही. त्यामुळे भीतीने थरकाप होत असतानाही नम्रपणा आणि पश्चात्तापाची भावना मनात ठेवून व कधी काळी या समस्येचे उत्तर सापडेल अशी आशा करत मी माकडांवरील हल्ल्यात सहभागी होतो....

याच मनोवृत्तीने मी तिन्ही युद्धांमध्ये भाग घेतला. मी ज्या समाजात राहत होतो त्या समाजाशी मी संबंध तोडू शकत नव्हतो; तसे करणे वेडेपणाचे झाले असते. याशिवाय त्या तिन्ही प्रसंगी ब्रिटिश सरकारबरोबर असहकार करण्याचा विचारही माझ्या मनात आला नव्हता. आज त्या शासनाबद्दल माझी स्थिती अगदी वेगळी आहे. त्यामुळे स्वेच्छेने मी त्या युद्धात भाग घेऊ शकत नाही. मला जर सैनिक कारवाईच्या दरम्यान शस्त्र उचलण्याकरिता वा इतर कोणत्याही प्रकारे युद्धात भाग घेण्याकरिता भाग पाडले जात असेल तर तसे करण्याऐवजी मी तुरुंगात जाण्याचा वा फासावर चढण्याचाही धोका पत्करला पाहिजे. (यंग, १३-९-१९२८, पृ. ३०८)

## राष्ट्रीय नागरी सेना

.... जर देशात नागरी सरकार असेल तर, जरी मी स्वतः कोणत्याही युद्धात भाग घेणार नाही, जे लोक सैनिक प्रशिक्षण घेऊ इच्छितात त्यांच्या प्रशिक्षणाचे समर्थन करणे माझे कर्तव्य ठरावे अशी वेळ येऊ शकते. याचे कारण असे आहे की, माझ्याएवढा समाजाच्या सर्व सदस्यांचा अहिंसेवर विश्वास नाही हे मला माहीत आहे. कोणत्याही व्यक्तीला वा समाजाला बळजबरीने अहिंसक बनवता येत नाही. (यंग, १३-९-१९२८, पृ. ३०८)

परिस्थितीच्या दडपणामुळे मी अहिंसेचा शिक्षक झालो आहे. माझ्या स्वतःच्या जीवनात संपूर्ण शक्तीनिशी मी माझ्या शिकवणुकीनुसार वागण्याचा प्रयत्न करत असतो असा माझा दावा आहे आणि व्यक्तिगत पातळीवर युद्धाला विरोध करण्याची माझ्यात शक्ती आहे असे मला वाटते.

लोकांना बळजबरीने अहिंसक बनवता येत नाही ही जाणीव असल्यामुळेच

स्वराज्यांतर्गत राष्ट्रीय नागरी सेना स्थापन करण्याला मी पाठिंबा देऊ शकेन. राष्ट्रीय संकटांचा अहिंसेने सामना कसा करावा ते मी आज लोकांना शिकवतो आहे. परंतु एखाद्या विशिष्ट हेतूकरिता अहिंसक मार्गाचा अवलंब करणे ही एक गोष्ट आहे आणि जीवनाचे तत्त्वज्ञान म्हणून कोणत्याही परिस्थितीत व कोणत्याही काळात अहिंसेचाच अवलंब करायचा हा निर्धार ही वेगळी गोष्ट आहे. अशा प्रकारे अहिंसेचा अवलंब अशक्य आहे असे मी समजत नाही. परंतु असे करायला लावण्याचे सामर्थ्य माझ्यात नाही. त्यामुळे राष्ट्रीय नागरी सेना स्थापन करायला मी कदाचित विरोध करणार नाही. मी मात्र तिच्यात भाग घेऊ शकणार नाही. अशा प्रकारचे नागरी सैन्य अनावश्यक आहे अशी माझ्या मनातून मला खात्री वाटते. परंतु माझी ही श्रद्धा लोकांच्या अंतःकरणात रुजवण्यासारखे शब्द माझ्याजवळ नाहीत. (यंग, १०-१-१९२९, पृ. १०)

## अहिंसेची कार्यपद्धती

अहिंसा अतिशय गूढ पद्धतीने काम करत असते. अनेकदा माणसाच्या वर्तनाचे अहिंसेच्या मानदंडाने विश्लेषण करता येत नाही. त्याचप्रमाणे अनेकदा व्यक्ती पूर्णपणे अहिंसक असतानाही तिचे वर्तन हिंसक स्वरूपाचे असल्यासारखे दिसू शकते परंतु अंतिमतः ते अहिंसक असते. त्यामुळे माझ्या वर्तनाविषयी मी एवढाच दावा करू शकतो की वरील प्रसंगातील माझे वर्तनसुद्धा अहिंसेच्या प्रेरणेने प्रेरित होऊनच झाले होते. त्यामागे स्वार्थी राष्ट्रीय भावना नव्हती किंवा इतर कोणत्याही प्रकारचा स्वार्थी हेतू नव्हता....

माझ्याकरिता अहिंसा केवळ तत्त्वज्ञानात्मक सिद्धान्त नाही. ती माझ्या जीवनाचा नियम आणि श्वास आहे. मला माहीत आहे की, जाणीव असूनही अहिंसेचे पालन करण्यात मला अपयश येते व अनेकदा नकळत माझ्याकडून अहिंसेचे पालन होत नाही. ही गोष्ट बुद्धीशी नाही तर हृदयाशी संबंधित आहे. निरंतर ईश्वराची सेवा, अधिकतम विनम्रता, स्वार्थत्याग, स्वतःची आहुती देण्याची सदैव तयारी यांमुळेच खरे मार्गदर्शन मिळते. अहिंसेचे पालन करण्याकरिता श्रेष्ठ प्रतीची निर्भयता आणि साहस यांची गरज असते. मला माझ्या उणिवांची दुःखद जाणीव आहे. परंतु माझ्या आतील प्रकाश स्थिर आणि स्पष्ट आहे. आपल्यापैकी कोणाकरिताही सत्य आणि अहिंसा यांच्याशिवाय दुसरा कोणताही मार्ग नाही. मला माहीत आहे की युद्धे नक्कीच थांबतील. माझी खात्री आहे की रक्तपात आणि

फसवणूक यांच्या मार्गाने मिळवलेले स्वातंत्र्य हे काही खरे स्वातंत्र्य नसते.... मानव जातीचा नियम हिंसा आणि असत्य नाही तर सत्य आणि अहिंसा आहे. (यंग, १३-९-१९२८, पृ. ३०८)

अहिंसक व्यक्तीला जर हिंसेच्या पद्धतीवर आधारित व्यवस्थेत राहणे भाग पडत असेल व त्याच्यासमोर अन्य कोणताही पर्याय नसेल तर तो अप्रत्यक्ष हिंसेपेक्षा प्रत्यक्ष हिंसेत अंतःप्रेरणेने सामील होईल. मी ज्या जगात राहतो ते जग अंशतः हिंसेवर आधारित आहे. जर मला शेजा-यांना मारण्याकरिता तयार करण्यात आलेल्या सैन्याच्या खर्चाकरिता मदत करणे वा स्वतः शिपाई म्हणून सैन्यात भरती होणे या दोन पर्यायांतून एक पर्याय निवडणे भाग असेल तर सैन्यात गेल्यानंतर हिंसक शक्तींना नियंत्रित करू शकण्याची व बरोबर असलेल्या शिपायांच्या मनोवृत्तीत बदल घडवून आणण्याची अपेक्षा करत व अहिंसेवर निष्ठा ठेवत मी सैन्यात दाखल होईन. (यंग, ३०-१-१९३०, पृ. ३७)

**सैन्यात दाखल होणे**

सैन्यात दाखल होण्याला नकार देणेच पुरेसे नाही. जेव्हा युद्धाची वेळ येते तेव्हा सैनिकी सेवा करण्याला नकार देणे म्हणजे अपकृत्य टाळण्याचा प्रयत्न करण्याची वेळ निघून गेल्यानंतर कार्यवाही करणे आहे. सैन्याची गरज ही गोष्ट एका गंभीर आजाराचे वरवरचे चिन्ह आहे. मी म्हणेन की ज्यांची नावे सैन्याच्या रजिस्टरमध्ये नोंदवलेली नाहीत असे लोक कोणत्याही प्रकारे राज्याचे समर्थन करत असतील तर तेसुद्धा हिंसेकरिता तेवढेच जबाबदार ठरतात. सैनिक पद्धतीवर आधारलेल्या राज्याचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष समर्थन करणा-या सर्व स्त्री-पुरुषांवर युद्धात भाग घेतल्याचा दोष येतो. यामुळेच युद्धाच्या वेळी मी स्वतःलाच सांगितले की जोपर्यंत सैन्याच्या मदतीने मिळणारा गहू मी खात आहे तोपर्यंत सैन्यात दाखल होणे सोडले तर बाकी सर्व काही मी करतो आहे. अशा परिस्थितीत सैन्यात दाखल होऊन शत्रूच्या गोळीने मरणे ही सर्वात चांगली गोष्ट होईल. जर मी असे करू शकत नसेन तर मी हिमालयाकडे प्रस्थान केले पाहिजे आणि निसर्गाने निर्माण केलेल्या खाद्यपदार्थांवर निर्वाह केला पाहिजे. यामुळे सैनिकी कार्यवाही थांबवू इच्छिणारे सर्व लोक सरकारशी सर्व प्रकारचे असहकार करूनच तसे करू शकतात. सरकारचे समर्थन करणा-या संपूर्ण व्यवस्थेशी असहकार करण्याच्या तुलनेत सैन्यात दाखल होण्याला नकार देणे ही गोष्ट किती तरी वरवरची आहे. परंतु

तोपर्यंत तुमचा विरोध इतके तीव्र रूप घेईल की एक तर तुम्हाला तुरुंगात डांबण्यात येईल वा तुम्हाला घरातून काढून रस्त्यावर फेकून दिले जाईल. (यंग, ३१-१२-१९३१, पृ. ४२६)

## युद्धाचा प्रतिकार

जेव्हा राष्ट्रांमध्ये युद्ध सुरू असते तेव्हा युद्ध थांबवण्याचा प्रयत्न करणे हे अहिंसेच्या पुजा-याचे कर्तव्य असते. जे या कर्तव्याचे पालन करण्यात असमर्थ असतात, ज्यांच्यात युद्धाचा प्रतिकार करण्याची शक्ती नाही ते युद्धात भाग घेऊ शकतात आणि तरीही स्वतःला, आपल्या राष्ट्राला आणि जगाला युद्धापासून मुक्त करण्याचा शक्य तो सगळा प्रयत्न ते करू शकतात.(यंग, ७-२-१९२९, पृ. १४८)

माझी पक्की खात्री आहे की.... युद्ध हा एक शुद्ध वाईटपणा आहे. कोणी काहीही म्हणाले तरी युद्धाबद्दलची माझी घृणा कमी होणार नाही. परंतु विश्वास एक गोष्ट आहे आणि योग्य आचरण दुसरी. युद्धाविषयी एकसारखा दृष्टिकोन असूनही युद्धाचा प्रतिकार करणारी एक व्यक्ती आपल्या ध्येयाच्या दृष्टीने जे काम करील ते काम दुस-या युद्धविरोधकाला मुळीच पसंत नसण्याची व तो अगदी उलट काम करण्याची शक्यता असते. हा विरोध माणसाच्या स्वभावातील आश्चर्यजनक गुंतागुंतीमुळे निर्माण होतो. मी तर केवळ एवढाच आग्रह करू शकतो की एकाच मताचा प्रचार करणा-यांमध्ये परस्पर सहिष्णुता असली पाहिजे. (यंग, ७-२-१९२९, पृ. ४६)

जोपर्यंत युद्धाची कारणे समजून घेतली जाणार नाहीत आणि ती मुळापासून नाहीशी केली जाणार नाहीत तोपर्यंत युद्ध थांबवण्याचे सर्व प्रयत्न निष्फळ होतील. आधुनिक युद्धांचे कारण जगातील तथाकथित दुर्बल वंशाच्या लोकांचे शोषण करण्याकरिता चाललेली अमानवी स्पर्धा नाही का? (यंग, ९-५-१९२९, पृ. १४८)

युद्धात जर एकही गुण नसता, त्याच्यामागे, साहस आणि शौर्य नसते तर ती निंदनीय गोष्ट असती व त्याला नष्ट करण्याकरिता भाषणे द्यावी लागली नसती. परंतु मी जी सूचना करू पाहतो आहे ती रेडक्रॉस संघटनेसहित युद्धाच्या सर्व उपक्रमांपेक्षा किती तरी उदात्त आहे. माझ्यावर विश्वास ठेवा - या जगात अजूनही करोडो कैदी आहेत - वासनांचे आणि जीवनाच्या परिस्थितीचे गुलाम आणि विश्वास ठेवा आपल्याच चुकांनी स्वतःचे नुकसान करून घेतलेले करोडो लोक आहेत आणि करोडोंची घरे उध्वस्त झालेली आहेत. यामुळे उद्याच्या शांतिसमित्या

जेव्हा आंतरराष्ट्रीय सेवाकार्य हाती घेतील तेव्हा त्यांच्याजवळ करण्यासारखे बरेच काम असेल.... (यंग, ३१-१२-१९३१, पृ. ४२७)

आज आपल्या चोहोबाजूला जे घडत आहे ते अहिंसेच्या नियमाची उपेक्षा करणारे आणि हिंसेचा नियमच जणू काय चिरंतन आहे असे समजून त्याला सिंहासनावर बसवण्यासारखे आहे.... आज आपल्याला शस्त्रास्त्रांची वेडेपणाची स्पर्धा सुरू असलेली दिसते व सर्व एकमेकांना त्या बाबतीत मागे टाकण्याकरिता धडपडत आहेत आणि जेव्हा संघर्षाची वेळ येईल - आणि ती येणे अपरिहार्य आहे - तेव्हा जर लोकशाही विजयी होईल तर सरकार चालवताना आपलेही ऐकले जाते असा समज असलेल्या जनतेच्या समर्थनामुळेच ती विजयी होईल.... (हरि, ११-२-१९३९, पृ. ८)

## द्वितीय विश्वयुद्ध

माझे व्यक्तिगत मत आहे की विश्वयुद्धाचा अंतही महाभारतातील युद्धासारखाच होईल. त्रावणकोरच्या एका सज्जन गृहस्थांनी महाभारताला 'एक चिरंतन इतिहास' म्हणून संबोधले आहे. त्या महान महाकाव्यात जे वर्णन करण्यात आले आहे ते रोज आपल्यासमोर घडत आहे. युद्धात रत असलेली राष्ट्रे ज्या उन्मादाने व क्रौर्याने स्वतःचा नाश करत आहेत ते पाहता असे वाटते की अखेरीस त्या सर्वांच्याच शक्तीचा क्षय होऊन जाईल आणि तेव्हा विजयी राष्ट्रांची तीच अवस्था होईल जी पांडवांची झाली होती. महाप्रतापी अर्जुनाला दिवसाढवळ्या एका लुटारूने लुटले होते. आजच्या या विध्वंसातून एक अशी नवीन व्यवस्था जन्म घेईल की, जिच्याकरिता करोडो शोषित मजूर आतुरलेले आहेत. शांतताप्रेमींची प्रार्थना वाया जाऊ शकत नाही. सत्याग्रह स्वतःच व्यथित अंतःकरणाची अचूक आणि मौन प्रार्थना आहे. (हरि, १५-२-१९४२, पृ. ४०)

ज्यांचा हिंसेवर विश्वास आहे ते स्वाभाविकपणे असेच म्हणतील की, 'आपल्या शत्रूला, तो जिथे कुठे असेल तिथे, परिस्थितीप्रमाणे उघडउघड वा लपूनछपून मारा, त्याचे व त्याच्या संपत्तीचे नुकसान करा.' परिणाम होईल दोन्ही बाजूला तीव्र द्वेष, बदल्यात वाढता द्वेष आणि बदला यांचा नंगा नाच सुरू होईल. सध्याच्या युद्धाने, ज्याचे सदस्य अजून नष्ट झालेले नाहीत, तिरस्काराच्या भावनेच्या दिवाळखोरीची घोषणा केली आहे. आता हे पाहायचे आहे की विजयी राष्ट्रे खरोखरी विजयी झाली आहेत की आपल्या शत्रूला नाउमेद करण्याच्या

प्रयत्नात स्वतःही नाउमेद होत आहेत. (हरि, २४-२-१९४६, पृ. २०)

# ९४. परमाणू युद्ध

**अण्वस्त्र**

जगात प्रलयंकारी परिवर्तने झाली आहेत. अजूनही सत्य आणि अहिंसेच्या श्रद्धेवर माझा दृढ विश्वास आहे का? अण्वस्त्राने या श्रद्धेला उध्वस्त केले नाही का? अण्वस्त्राने असे तर केलेच नाही उलट त्याने मला स्पष्टपणे दाखवून दिले आहे की विश्वात सत्य आणि अहिंसा याच सर्वात श्रेष्ठ शक्ती आहेत. यांच्यासमोर अण्वस्त्र काहीच नाही. या दोन विरोधी शक्ती परस्परांपासून अगदी वेगळ्या आहेत. एक नैतिक आणि आध्यात्मिक आहे तर दुसरी स्थूल आणि भौतिक. पहिली निश्चितपणे दुसरीच्या तुलनेत श्रेष्ठ आहे. दुसरीची घडणच अशी आहे की तिचा अंत आवश्यक आहे. आत्मशक्ती नेहमीच प्रगतिशील आणि अनंत असते. जेव्हा ती पूर्णपणे अभिव्यक्त होते तेव्हा जगातील कोणतीही शक्ती तिला पराभूत करू शकत नाही. असे सांगून मी कोणतीही नवीन गोष्ट सांगितलेली नाही हे मला माहीत आहे. जे काही आहे त्याचा मी तर केवळ साक्षीदार आहे. मोठी गोष्ट ही आहे की स्त्री, पुरुष आणि मुले या सर्वांमध्ये - त्यांच्या कातडीचा रंग कोणताही असो - ही शक्ती अस्तित्वात आहे. एवढेच की अनेकांमध्ये ही शक्ती सुप्तावस्थेत असते. परंतु समंजसपणाच्या प्रशिक्षणाने ही शक्ती जागृत करता येऊ शकते.

या सत्याची ओळख पटल्याशिवाय आणि ते मिळवण्याकरिता आवश्यक ते प्रयत्न केल्याशिवाय माणूस आत्मनाशापासून वाचू शकत नाही ही गोष्ट समजून घेतली पाहिजे. त्यामुळे आपला शेजारी काय करतो आहे या गोष्टीची काळजी न करता प्रत्येक व्यक्तीने जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आत्माभिव्यक्तिकरिता स्वतःला प्रशिक्षित करणे हाच यावरील उपाय आहे. (हरि, १०-२-१९४६, पृ. ८)

अण्वस्त्राने सर्व प्रकारच्या हिंसेची व्यर्थता सिद्ध केलेली नाही का? (हरि, १०-३-१९४६, पृ. ३६)

**अहिंसा हेच उत्तर**

अमेरिकी मित्रांचे म्हणणे आहे की अहिंसा आणण्याचे काम अण्वस्त्रापेक्षा आणखी चांगले कोणीही करू शकत नाही. याचा अर्थ जर असा असेल की अण्वस्त्राची संहारक शक्ती जगात इतकी किळस निर्माण करील की काही काळाकरिता ती हिंसेपासून दूर होईल तर हे म्हणणे बरोबरही असू शकते. ज्याप्रमाणे एखाद्या

माणसाने मळमळ होईल इतक्या प्रमाणात स्वादिष्ट पदार्थ खाल्ले तर तो काही वेळ ते पदार्थ खाणे सोडून देईल. परंतु ती मळमळ दूर होताच तो त्या पदार्थांवर तुटून पडेल. अशाच प्रकारे किळस दूर होताच जग दुप्पट उत्साहाने हिंसेकडे वळेल.

बहुधा वाईटपणातून चांगुलपणा जन्म घेत असतो. परंतु हा चमत्कार ईश्वर करत असतो माणूस नाही. माणसाला तर एवढेच माहीत आहे की चांगुलपणाचा परिणाम चांगला होतो आणि वाईटपणाचा वाईट.

अमेरिकी शास्त्रज्ञांनी आणि सैनिकांनी अण्वस्त्रांचा प्रयोग संहारक प्रयोजनाकरिता जरी केला आहे तरी इतर शास्त्रज्ञ याचा उपयोग लोकोपकारी कामाकरिता करू शकतात या गोष्टीची शक्यता मुळीच नाकारता येत नाही. परंतु माझ्या अमेरिकी मित्रांच्या म्हणण्याचा अर्थ असा नव्हता. ज्याचे उत्तर अतिशय स्पष्ट असेल असा प्रश्न विचारण्याइतके ते साधे नाहीत. आग लावण्याकरिता टपलेली व्यक्ती ज्या अग्नीचा उपयोग विनाशक आणि नीच कार्याकरिता करते त्याच अग्नीचा उपयोग गृहिणी पौष्टिक जेवण बनविण्यासाठी नित्यनेमाने करत असते.

ज्या उच्चतम भावनांनी मानवजातीला अनेक युगांपासून जिवंत ठेवले आहे त्या उच्चतम भावनांना अण्वस्त्राने निर्जीव केले आहे. युद्धाचेही काही तथाकथित नियम असायचे व त्यामुळे युद्ध सह्य व्हायचे. परंतु आता शक्तीशिवाय युद्धाचा कोणताच नियम नाही हे सत्य समोर आले आहे. अण्वस्त्राने मित्र राष्ट्रांना एक पोकळ विजय दिला आहे. परंतु त्याच्या उपयोगामुळे जपानच्या आत्म्याचा नाश झाला आहे. विनाशक राष्ट्रांच्या आत्म्याची काय अवस्था आहे हे अजून दिसायचे आहे. निसर्गशक्ती गूढ पद्धतीने काम करत असते. परंतु आपण अशाच प्रकारच्या मागील घटनांच्या ज्ञात परिणामांच्या आधारे या अज्ञात परिणामाचे गूढ उकलू शकतो. गुलामांचा मालक गुलामाकरिता बनवलेल्या पिंज-यात स्वतःला वा आपल्या मदतनीसाला बंद केल्याशिवाय गुलामाला बांधून ठेवू शकत नाही. कोणी असे समजू नये की आपल्या निर्दय आकांक्षांच्या पूर्तीकरिता जपानी लोकांनी केलेल्या कुकृत्यांना मी उचित ठरवतो आहे. अंतर केवळ प्रमाणाचे आहे. मला मान्य आहे की जपानची हाव अधिक निंदनीय होती. परंतु या कारणामुळे कमी हाव असलेल्या लोकांना हा अधिकार मिळत नाही की त्यांनी अधिक हाव असलेल्या जपानच्या विशिष्ट क्षेत्रातील स्त्रियांचा, मुलांचा आणि पुरुषांचा

निर्दयतापूर्वक संहार करावा.

अण्वस्त्राच्या भीषण शोकांतिकेपासून आपण हे शिकू शकतो की, याचा विनाश प्रत्युत्तरादाखल टाकलेल्या अण्वस्त्राने होणार नाही. ज्याप्रमाणे हिंसेचा नाश प्रतिहिंसेने होऊ शकत नाही तसेच हे. मानवजात केवळ अहिंसेच्या मार्गानेच हिंसेवर विजय मिळवू शकते. घृणेला प्रेमानेच जिंकता येऊ शकते. प्रत्युत्तरार्थ निर्माण झालेली घृणा घृणेचाच विस्तार करते व तिची तीव्रता वाढवते. मला माहीत आहे की जी गोष्ट मी वारंवार सांगितली आहे व जिच्याप्रमाणे मी माझ्या पूर्ण शक्तीनिशी आचरण करण्याचा प्रयत्न करतो आहे तीच गोष्ट मी परत सांगतो आहे. जी गोष्ट मी आधी सांगितली होती तीसुद्धा नवीन नव्हती. ती गोष्टही तितकीच प्राचीन आहे जितका पर्वत. मी काही पुस्तकी तत्त्वज्ञान सांगितलेले नाही, माझ्या अस्तित्वाच्या रोमारोमात जे भिनलेले आहे असा विश्वास मला वाटतो तेच केवळ मी सांगितले आहे. जीवनाच्या विविध क्षेत्रांमध्ये साठ वर्षे अंमलबजावणी केल्यानंतर माझी ही श्रद्धा अजूनच दृढ झाली आहे व मित्रांच्या अनुभवाने तिला दुजोरा मिळाला आहे. काहीही असले तरी हेच केंद्रीय सत्य आहे आणि क्षणभरही न कचरता यावर एकटा माणूससुद्धा ठाम राहू शकतो. सत्य तोपर्यंत वारंवार सांगितले पाहिजे जोपर्यंत त्यावर विश्वास न ठेवणारे लोक अस्तित्वात आहेत या मॅक्सम्युलरच्या उक्तीवर माझा पूर्ण विश्वास आहे.
(हरि, ७-७-१९४६, पृ. २१२)

अण्वस्त्रांची भयानक भीषणताही जगावर बळजबरीने अहिंसा लादू शकत नाही का? जगातील सर्व राष्ट्रांजवळ अण्वस्त्रे झाली तर ते त्यांचा उपयोग करणार नाहीत का? तशा अवस्थेत सर्वांचाच पूर्णपणे नाश होणार नाही का?' माझ्या मते असे होणार नाही. पूर्वीपेक्षा आता आपण किती जास्त विध्वंस करू शकतो आणि मृत्यूचा खेळ खेळू शकतो या विचाराने हिंसक माणसाचे डोळे अजूनच विस्फारतील. (हरि, २३-७-१९४६, पृ. १९७)

विज्ञानाचा सर्वात क्रूर उपयोग म्हणजे स्त्रिया, पुरुष आणि मुले या सर्वांच्या संहाराकरिता अण्वस्त्रांचा उपयोग करणे आहे असे मी समजतो.

'यावर उपाय काय आहे? अण्वस्त्राने अहिंसेला चलनातून बाहेर काढून टाकले आहे का?' नाही. उलट आता मैदानात केवळ अहिंसाच आहे जिचा विध्वंस अण्वस्त्राला करता आलेला नाही. अण्वस्त्राने हिरोशिमा शहराला पूर्णपणे नष्ट केले असे जेव्हा मी ऐकले तेव्हा मी मुळीच शहारलो नाही. उलट मी

स्वतःलाच म्हणालो, 'आता जर जग अहिंसेचा स्वीकार करणार नसेल तर मानवजातीला आत्महत्याच करावी लागेल.' (हरि, २९-९-१९४६, पृ. ३३५)

जोपर्यंत मोठी राष्ट्रे शोषणाची इच्छा आणि हिंसेच्या भावनेचा त्याग करत नाहीत, ज्या भावनेची स्वाभाविक अभिव्यक्ती युद्ध आणि अण्वस्त्र आहे, तोपर्यंत विश्वशांतीची अपेक्षा करणे व्यर्थ आहे याबद्दल माझ्या मनात मुळीच संशय नाही. युद्धाच्या दरम्यान मी हे सांगण्याचा प्रयत्न केला होता आणि ब्रिटिश सरकार, हिटलर व जपानला यासंबंधी मी अनावृत पत्रही लिहिले होते, परंतु याकरिता मला पंचमस्तंभी ठरवण्यात आले होते. (हरि, १०-११-१९४६, पृ. ३८९)

## पूर्वेकडील महापुरुष

सर्वात पहिला विद्वान ऋषी झरतुश्ट होता. तो पूर्वेकडील होता. त्यानंतर बुद्ध आले. ते भारताचे म्हणजेच पूर्वेचेच होते. बुद्धानंतर कोण आले? येशू. तेही पूर्वेचेच होते. येशूच्या आधी मोझेस आले. त्यांचा जन्म जरी इजिप्तमध्ये झाला होता तरी ते पॅलेस्टाईनमधील होते. येशूनंतर महंमद आले. कृष्ण, राम इत्यादी दीपस्तंभांची नावे मी सोडली आहेत. मी त्यांना कमी प्रतीचा प्रकाश समजत नाही परंतु साहित्यिक जगात ते तेवढे परिचित नाहीत. तरीही मला जगातील अशी एकही व्यक्ती दिसत नाही जी या महापुरुषांची बरोबरी करू शकेल. नंतर काय झाले? ख्रिश्चन धर्म जेव्हा पश्चिमेत गेला तेव्हा त्याचे स्वरूप विकृत झाले. असे म्हणताना मला दुःख होते. मी या विषयाची अजून जास्त चर्चा करणार नाही....

## आशियाचा संदेश

माझी इच्छा आहे की तुम्ही आशियाचा संदेश समजून घ्यावा. याकडे तुम्ही पश्चिमेच्या चष्म्याने वा अण्वस्त्राची नक्कल म्हणून पाहू नका. जर तुम्हाला पश्चिमेला काही संदेश द्यायचा असेल तर तो प्रेमाचा आणि सत्याचा संदेश असला पाहिजे.... लोकशाहीच्या या युगात, तळागाळाच्या लोकांच्या या युगात तुम्ही अजूनच जोर लावून या संदेशाचा पुनरुच्चार करू शकता. तुम्ही जर असा विचार कराल की पश्चिमेने आपले शोषण केलेले असल्यामुळे तिचा बदला घेतला पाहिजे तर तुम्ही पश्चिमेला पूर्णपणे जिंकू शकणार नाही; तुम्ही तिच्याशी प्रामाणिकपणाने आणि समंजसपणाने वागूनच तिला जिंकू शकाल. मला आशा आहे की तुम्ही तुमची बुद्धीच नाही तर अंतःकरणेही एक कराल आणि पूर्वेच्या या महापुरुषांनी आम्हाला दिलेल्या संदेशाचे रहस्य जर समजून घ्याल तर तुम्ही

स्वतः त्या महान संदेशाचे उत्तराधिकारी असल्याचे सिद्ध कराल. असे झाले तर पश्चिमेवर आपण पूर्ण विजय मिळवू शकू. आपल्या या विजयामुळे पश्चिमही प्रसन्न होईल.

आज पश्चिम ज्ञानाकरिता तडफडत आहे. अण्वस्त्रांच्या वाढत्या संख्येमुळे ते हताश झाले आहेत. अण्वस्त्रांचा अर्थ आहे विनाश, केवळ पश्चिमेचाच नाही तर सर्व जगाचा विनाश; असे समजा की बायबलची भविष्यवाणी खरी ठरू पाहत आहे आणि पूर्ण प्रलय झाल्याशिवाय राहणार नाही. तुमचे कर्तव्य आहे की तुम्ही जगाला त्याच्या वाईटपणाबद्दल आणि पापाबद्दल सांगावे - हा असा वारसा आहे की ज्याची शिकवण तुमच्या आणि माझ्या गुरूंनी आशियाला दिली आहे. (हरि, २०-४-१९४७, पृ. ११६-७)

ख-या अहिंसेशी सामना होताच हिंसेचे शस्त्र - मग ते अण्वस्त्र का असेना - बेकार असल्याचे सिद्ध होते. (हरि, १-६-१९४७, पृ. १७२)

# ९५. शांततेचा मार्ग

## (अ) निरस्त्रिकरण

माझे म्हणणे असे आहे की अहिंसेचा सिद्धान्त राष्ट्राष्ट्रामधील संबंधांकरिताही चांगला सिद्धान्त असल्याचे सिद्ध होते. मला माहीत आहे की गेल्या युद्धाची मी जर चर्चा केली तर नाजूक बाबीला स्पर्श केल्यासारखे होईल. तरीही स्थिती स्पष्ट करण्याकरिता मी असे केलेच पाहिजे. माझा समज आहे गत युद्ध उभय पक्षांच्या वैभवाच्या वृद्धीकरिता होते. दुर्बल राष्ट्रांचे शोषण करून मिळालेल्या संपत्तीच्या वाटणीकरिता ते युद्ध होते. यालाच गोड शब्दांत विश्ववाणिज्य असे संबोधण्यात येते.... युरोपला जर आत्महत्या करायची नसेल तर मागेपुढे संपूर्ण युरोपमध्ये निरस्त्रिकरणाला सुरुवात झालीच पाहिजे असे तुम्हाला वाटेल. निरस्त्रिकरणाची सुरुवात करण्याआधी एखाद्या मोठ्या राष्ट्राला धोका पत्करत स्वतःचे निरस्त्रिकरण करण्याचे साहस दाखवावे लागेल. जर एखाद्या राष्ट्राने हे सुखद पाऊल उचलले तर त्या राष्ट्रात अहिंसेचा स्तर इतका उंचावलेला असेल की सगळे जग त्याच्याकडे आदराने पाहू लागेल. त्या राष्ट्राचे निर्णय निर्दोष असतील, ते दृढनिश्चयी असेल, त्याच्यात जबरदस्त स्वार्थत्यागाची फार मोठी क्षमता असेल व त्याला जितके स्वतःचे कल्याण हवे असेल तितकेच कल्याण त्याला इतर राष्ट्रांचेही हवे असेल. (यंग, ८-१०-१९२५, पृ. ३४५)

अफूच्या उत्पादनाप्रमाणे विश्वातील तलवारीचे उत्पादनही नियंत्रित केले पाहिजे. जगाच्या विनाशाकरिता अफूपेक्षाही तलवारच कदाचित अधिक जबाबदार असावी. (यंग, १९-११-१९२५, पृ. ३९७)

**तटस्थ राज्यांचे कर्तव्य**

'निरस्त्रिकरण मुख्यत्वेकरून मोठ्या शक्तींवर अवलंबून असल्यामुळे स्वित्झर्लंडसारख्या एका लहानशा आणि तटस्थ देशाला त्याकरिता आग्रह का करण्यात यावा?' (एका स्विस नागरिकाचा प्रश्न)

तुमच्या देशाच्या तटस्थ भूमीतून मी केवळ स्वित्झर्लंडलाच नाही तर सर्व शक्तींना संबोधत आहे. जर तुम्ही हा संदेश युरोपच्या अन्य भागापर्यंत पोहोचवणार नसाल, तर त्यात माझा काहीही दोष नसेल. स्वित्झर्लंड एक तटस्थ क्षेत्र आहे व ते अनाक्रमक राष्ट्र असल्यामुळे त्याला सैन्य ठेवण्याची आवश्यकता असू नये ही गोष्ट अजूनच तर्कसंगत आहे. दुसरी गोष्ट ही आहे की तुमची आतिथ्य भावना आणि अनुकूल स्थिती यांमुळे इतर राष्ट्राचे लोक तुमच्याकडे येतात. सैन्याशिवाय राहू शकण्याएवढे तुम्ही शूर आहात आणि निरस्त्रिकरणाचा पाठ शिकवण्याला पात्र आहात हे जगाला दाखवणे तुम्हाला शक्य झाले पाहिजे. (यंग. १९-११-१९२५, पृ. ३९७)

'कोणताही निःशस्त्र स्वतंत्र देश इतर राष्ट्रांना नष्ट होताना कसा काय पाहू शकतो? गत युद्धाच्या काळात आमचे सैन्य आमच्या सीमेवर उभे नसते तर आम्ही नष्ट झालो असतो.' - इति एक स्विस नागरिक.

अव्यावहारिक वा मूर्ख म्हणवले जाण्याचा धोका पत्करत मी या प्रश्नाचे उत्तर त्याच भाषेत देईन जी मला माहीत आहे. कोणताही तटस्थ देश आपल्या शेजारी राष्ट्राला नष्ट होऊ देत असेल तर त्या राष्ट्राकरिता ही फार भ्याडपणाची गोष्ट होईल. परंतु युद्धातील शिपाई आणि अहिंसेचे शिपाई यांच्यात दोन गोष्टी सारख्या आहेत आणि मी स्वित्झर्लंडचा नागरिक व संघ राज्याचा राष्ट्रपती असतो तर मी सर्व प्रकारची रसद थांबवून आक्रमणकारी सैन्याच्या वाटेवर आडवा पडलो असतो व त्याला मार्ग देण्याला नकार दिला असता. दुसरी गोष्ट स्वित्झर्लंडमध्ये थर्मोपाईलच्या दाखल्याचे अनुसरण करत स्त्रिया, पुरुष आणि मुलांची तुम्ही एक भिंत उभी केली असती व आमच्या कलेवरावरून पुढे जा असे तुम्ही आक्रमकांना सांगितले असते. तुम्ही असे म्हणू शकाल की ही गोष्ट माणसाचा अनुभव व

त्याची सहनशक्ती यांच्या पलीकडची आहे. मी सांगतो की अशी काहीही गोष्ट नाही. हे अगदी शक्य आहे. मागील वर्षी गुजरातमध्ये स्त्रियांनी निडर होऊन लाठीमाराचा सामना केला होता व पेशावरमध्ये हजारोंनी हिंसा करण्याकरिता उत्सुक असलेल्यांचा गोळीबार सहन केला होता. कल्पना करा की सुरक्षित मार्ग मागणा-या एखाद्या दुस-या देशाच्या सैन्यासमोर हे उभे आहेत. तुम्ही म्हणाल की सैन्य इतके क्रूर असते की आम्हाला मारून आमच्या छातीवरून ते पुढे निघून जाईल. माझे उत्तर असेल आपले अस्तित्व मिटवून आपल्या कर्तव्याचे पालन केले पाहिजे. जे सैन्य निर्दोष स्त्री-पुरुषांच्या शवावरून पुढे जाण्याचे साहस करील ते हा प्रयोग परत करू शकणार नाही. स्त्री-पुरुषांची विशाल संख्या इतके मोठे साहस करू शकते या गोष्टीवर वाटल्यास तुम्ही अविश्वास करू शकता, परंतु मग तुम्हाला मान्य करावे लागेल की अहिंसा ही काही अशातशांची गोष्ट नाही, अहिंसेचे शस्त्र दुर्बलांचे शस्त्र नाही, तिच्याकरिता पूर्णपणे खंबीर अंतःकरणाची माणसे हवी असतात. (यंग, ३१-१२-१९३१, पृ. ४२७)

## महाशक्ती आणि निरस्त्रिकरण

ज्या दिवशी हवे असेल त्या दिवशी अहिंसेचा स्वीकार करून आपली प्रतिष्ठा वाढवून आगामी पिढ्यांना कायमचे ऋणी करून ठेवण्याचा मार्ग महाशक्तींकरिता मोकळा आहे. त्यांनी अथवा त्यांच्यातील कोणत्याही राष्ट्राने मनातील भीती काढून टाकून स्वतःला निःशस्त्र केले तर त्यामुळे इतर राष्ट्रांना परत आपले मानसिक संतुलन स्थापन करण्यात आपोआप मदत होईल. परंतु मग या महाशक्तींना आपल्या साम्राज्यवादी आकांक्षांचाही त्याग करावा लागेल, पृथ्वीवरील तथाकथित असंस्कृत वा अर्धसंस्कृत राष्ट्रांचे शोषण करणे बंद करावे लागेल आणि आपल्या राहणीमानात बदल करावा लागेल. याचा अर्थ आहे संपूर्ण क्रांती. आजपर्यंत महाशक्ती ज्या दिशेने सामान्यपणे जात होत्या व त्यांच्या दृष्टीने ज्या दिशेने त्यांना यश मिळत होते ती दिशा सोडून अचानक वेगळ्या दिशेने महाशक्ती चालू लागतील अशी अपेक्षा त्यांच्याकडून करता येणे कठीण आहे. परंतु चमत्कार तर आधीही झाले आहेत व या रूक्ष युगातही ते होऊ शकतात. वाईटपणा मिटवण्याच्या ईश्वराच्या शक्तीवर अंकुश लावण्याचे साहस कोणामध्ये आहे? एक गोष्ट नक्की. जर शस्त्रीकरणाची स्पर्धा सुरू राहिली तर पूर्ण इतिहासातही उदाहरण सापडणार नाही इतका भयानक नरसंहार तिच्यामुळे होईल. यातून एखादे राष्ट्र

जरी विजयी झाले व विनाशापासून वाचले तरी त्याचा विजय जिवंत मृत्यूप्रमाणे असेल. या सर्वनाशापासून वाचण्याचा एकच उपाय आहे. तो हा की आपण धैर्याने अहिंसेचा तिच्या संपूर्ण गूढार्थासहित कोणत्याही अटीशिवाय स्वीकार केला पाहिजे. (हरि, १२-११-१९३८, पृ. ३२८)

## (आ) टोळीवाद अथवा आतंकवाद आणि अहिंसा

‘नेहमीच्या वापरातील अर्थाप्रमाणे बोलायचे तर आतंकवादी राष्ट्रांचे काय करावे? अमेरिकेत व्यक्तिगत आतंकवादी होते. त्यांना स्थानिक आणि राष्ट्रीय पोलिसांनी नेस्तनाबूत केले होते. असेच काही आपण टोळीवादी राष्ट्रांच्या बाबतीत करू शकत नाही का? मंचुरियातील अफूचा जबरदस्त प्रयोग, अबिसिनिया आणि स्पेनमध्ये झालेली दुष्कृत्ये, ऑस्ट्रियाला एकाएकी ताब्यात घेणे व नंतर झेकोस्लाव्हाकियावर तीच पाळी येणे या गोष्टी टोळीवादाचीच उदाहरणे आहेत का?’

जगातील सुज्ञ लोकांनी अहिंसेची भावना आत्मसात केली नाही तर त्यांना पारंपरिक पद्धतीने टोळीवादाचा सामना करावा लागेल. परंतु त्यामुळे एवढेच सिद्ध होईल की आपण सर्व अजून जंगलाच्या कायद्याच्या वर गेलेलो नाही आणि ईश्वराने माणसाला जो वारसा दिला आहे त्याचे मूल्य अजून आपल्याला कळलेले नाही व १९०० वर्ष प्राचीन असलेला ख्रिश्चन धर्म आणि त्याहूनही प्राचीन असलेला हिंदू, बौद्ध आणि इस्लाम धर्म (जर मला त्यांचा नीट अर्थ कळला असेल तर) या धर्मांच्या उपदेशानंतरही मानव म्हणून आपण अजून काहीही प्रगती केलेली नाही. ज्या लोकांचा अहिंसेवर विश्वास नाही त्यांनी अहिंसेचे पालन न करणे मी समजू शकतो. परंतु ज्या लोकांचा अहिंसेवर विश्वास आहे त्यांनी टोळीवादाचा वा आतंकवादाचा सामनासुद्धा अहिंसेने करता येतो हे पूर्ण शक्तीनिशी सिद्ध केले पाहिजे. तुम्ही शक्तिप्रयोग कितीही योग्य कारणाकरिता केला तरी अखेरीस तो आपल्याला त्याच दलदलीत फसवील जिच्यात हिटलर आणि मुसोलिनीने फसवले होते. यांच्यामध्ये केवळ प्रमाणाचे अंतर असेल. तुमच्यामधील आणि आमच्यामधील ज्या लोकांचा अहिंसेवर विश्वास असेल त्यांनी संकटाच्या स्थितीतही हिचे अनुसरण करायला विसरू नये. क्षणभर जरी आपल्याला असे वाटले की आपण आपले डोके भिंतीवर आदळत आहोत तरी टोळीवाल्यांच्या अंतःकरणात प्रेमभावना जागृत करण्याच्या बाबतीत आपण आशा

सोडता कामा नये. (हरि, १०-१२-१९३८, पृ.३७२)

**अहिंसक विकल्प**

अहिंसेच्या नियमांच्या संदर्भात परिस्थितीचा विचार केला असता ४० कोटी लोकसंख्या असलेल्या चीनसारख्या मोठ्या आणि सुसंस्कृत देशाने जपानी आक्रमणाचा सामना जपानच्या पद्धतीनेच करणे हे चीनला शोभत नाही. चिनी लोकांमध्ये माझ्या मतासारखी अहिंसा असती तर त्यांना जपानजवळ असलेल्या विनाशक मशिनींसारख्या मशिनींचा काहीच उपयोग नसता. मग चिनी लोक जपानला म्हणाले असते 'तुम्ही तुमच्या सर्व मशिनी आणा, आम्ही आमची अर्धी लोकसंख्या तुम्हाला अर्पण करतो. परंतु उरलेले २० कोटी चिनी लोकसुद्धा तुमच्यासमोर गुडघे टेकणार नाही.' चीनने जर असे केले असते तर जपान त्याचा गुलाम झाला असता. (हरि, २४-१२-१९३८, पृ. ३९४)

तुलनात्मक दृष्टीने मोठ्या व सैनिक साधनसामग्रीने सज्ज असलेल्या जर्मनीच्या सैन्यासमोर पोलंडने धैर्याने ठाम उभे राहणे ही पोलंडची 'जवळपास' अहिंसाच होती हे विधान वारंवार करताना मला किंचितही संकोच वाटण्याचे कारण नाही. तुम्ही 'जवळपास' शब्दाकडे पूर्ण लक्ष द्या. आपण जवळपास ४० कोटी आहोत. आपण जर एक विशाल सैन्य उभे केले आणि विदेशी आक्रमणाची तयारी केली तर आपण तिला अहिंसक तर सोडाच पण 'जवळपास' अहिंसकही कसे म्हणू शकू? पोलंडवासीयांवर शत्रूने जेव्हा एकाएकी हल्ला केला तेव्हा त्याकरिता पोलंडची तयारी नव्हती. आपण जेव्हा सैनिकी तयारीबद्दल बोलतो तेव्हा आपण संभावित हिंसेचा सामना श्रेष्ठतम हिंसेने करण्याचा प्रयत्न करत असतो. भारताने स्वतःला कधी अशा रीतीने तयार केले तर तो विश्वशांततेकरिता सर्वात मोठा धोका ठरेल. आपण जर या मार्गाचे अनुसरण केले तर आपल्याला युरोपीय राष्ट्रांप्रमाणेच शोषणाचा मार्गही अवलंबावा लागेल. (हरि, २५-८-१९४०, पृ. २६१)

## (इ) प्रेमाच्या मार्गाने शांतता

शक्य आहे की आंतरराष्ट्रीय बाबतीत प्रेमाच्या नियमाला मान्यता मिळण्याकरिता अजून बराच वेळ लागेल. सरकारी यंत्रणा वेगवेगळ्या राष्ट्रांतील नागरिकांच्या संबंधात अडचणी निर्माण करते व त्यांच्या हृदयाचे मीलन होऊ देत नाही. तरीही.... व्यक्तींमधील परस्परांतील समस्यांची सोडवणूक शक्तीच्या बळावर करता येऊ शकत नाही हे तथ्य कोणत्या ना कोणत्या प्रकारे जगाला कळू लागले

असल्याचे आपल्याला आढळते. अशाच रीतीने राष्ट्रांमधील भांडणेही शक्तीच्या मदतीने सोडवली जाऊ शकत नाहीत व भूसेना वा नौदल यांच्यापेक्षा असहकाराची आर्थिक शक्ती अधिक प्रभावी आणि निर्णायक आहे. (यंग, २३-६-१९१९, पृ. ५०)

जोपर्यंत एखाद्या नवीन ऊर्जेचा शोध लावून तिचा उपयोग सुरू होत नाही तोपर्यंत जुन्या ऊर्जेचे नायक या नवीन आचरणाला तात्त्विक, अव्यावहारिक, आदर्शात्मक वगैरे मानत राहतील. आंतरराष्ट्रीय चांदण्यांना प्रेमाच्या धाग्याने जोडण्याकरिता वेळ लागू शकतो, परंतु भौतिक शक्तीपेक्षा आंतरराष्ट्रीय असहकाराला महत्त्व देणे.... ही गोष्ट समस्येच्या अंतिम आणि एका ख-या सोडवणुकीच्या दिशेने नक्कीच महत्त्वाची वाटचाल आहे. (यंग, २३-६-१९१९, पृ. ५१)

## स्थायी शांतता

स्थायी शांततेच्या शक्यतेवर विश्वास न ठेवणे म्हणजे मानव स्वभावाच्या ईश्वरपरायणतेवर विश्वास न ठेवणे आहे. आतापर्यंत करण्यात आलेले उपाय अयशस्वी झाले कारण ते करणा-यांमध्ये मनाचा प्रामाणिकपणा नव्हता. ही गोष्ट त्यांना कळली नाही. ज्याप्रमाणे एखादे रासायनिक संयुग तोपर्यंत तयार होऊ शकत नाही जोपर्यंत त्याच्या सर्व अटी पूर्ण होत नाहीत त्याचप्रमाणे अटींचे आंशिक पालन केल्यामुळे स्थायी शांतता निर्माण होऊ शकत नाही. मानवजातीच्या ज्या मान्यवर पुढा-यांचे पूर्ण नियंत्रण विनाशक यंत्रसामग्रीवर आहे त्यांनी त्या यंत्रसामग्रीचा उपयोग करायचा नाही असे ठरवले - यात उपयोग न करण्यात अंतर्भूत असलेल्या संपूर्ण अर्थाचा समावेश आहे - तर स्थायी शांतता निर्माण होऊ शकते. जोपर्यंत महाशक्ती आपल्या साम्राज्यवादी उद्दिष्टांचा त्याग करत नाहीत तोपर्यंत हे अशक्य आहे आणि जोपर्यंत मोठी राष्ट्रे आत्म्याचा नाश करणारी स्पर्धा, गुणोत्तर पद्धतीने गरजांची वाढ करणे आणि त्याकरिता आपली भौतिक संपत्ती वाढवण्याचा प्रयत्न करणे या गोष्टी थांबवत नाहीत तोपर्यंत ही गोष्ट शक्य नाही. माझी खात्री आहे की या वाईटपणाचे खरे मूळ जागृत ईश्वरावर जागृत श्रद्धा नसणे हे आहे. येशूच्या संदेशावर विश्वास ठेवण्याचा दावा करणा-या व येशूला शांततेचा दूत समजणा-या पृथ्वीवरील त्या लोकांच्या स्वतःच्या आचरणातून येशूच्या त्या श्रद्धेचे कुठेच दर्शन होत नाही ही मोठीच मानवी शोकांतिका नाही काय? ख-या ख्रिश्चन धर्मतत्त्वज्ञांनी येशूचा संदेश काही निवडक लोकांकरिता सीमित करून टाकला हे पाहून दुःख होते. मूलभूत मानवी गुणांचा

विकास अगदी खालच्या पातळीवरील व्यक्तीही करू शकते ही गोष्ट मला लहानपणापासून शिकवण्यात आली आहे आणि अनुभवाच्या कसोटीवर मी तिचा खरेपणाही तपासून पाहिला आहे. हीच संशयातीत शक्यता माणसाला ईश्वराच्या उर्वरित सृष्टीपेक्षा वेगळे करते. एक राष्ट्र जरी कोणत्याही अटीचा भंग न करता उत्तम उदाहरण दाखवू शकेल तर आपल्यापैकी अनेक लोकांना आपल्या जिवंतपणीच शांततेचे दर्शन होऊ शकेल. (हरिजनमध्ये उद्धृत, 'कॉस्मॉपॉलिटन न्यू यॉर्कला देण्यात आलेला संदेश' १६-५-१९३६, पृ. १०९; हरि, १८-६-१९३८, पृ. १५३-४सुद्धा,)

शांतता तोपर्यंत येणार नाही जोपर्यंत महाशक्ती साहस करून आपले निरस्त्रिकरण करणार नाहीत. मला वाटते की सध्याच्या घटना असे करण्याकरिता महाशक्तींना अडवतील. मानव जातीला केवळ अहिंसाच वाचवू शकते यावर माझा अढळ विश्वास आहे आणि हा विश्वास अहिंसेवर अर्धशतक काम केल्यानंतर अजूनच दृढ झाला आहे. बायबलचा अर्थ मला नीट लागला असेल तर येशूचा हाच उपदेश आहे. (हरि, २४-१२-१९३८, पृ. ३९५)

## 'तुष्टीकरण' नाही

मी 'तुष्टीकरणाचे' समर्थन कधीही केलेले नाही. मला संपूर्ण मानवजातीकरिता शांतता हवी आहे, परंतु त्याकरिता कोणतीही किंमत द्यायला मी तयार नाही. आक्रमकाला तुष्ट करणे वा स्वतःचा आत्मसन्मान विकणे या गोष्टी तर मी कधीही करणार नाही. यामुळे या दोनपैकी कोणत्या तरी एका गोष्टीकरिता मी दोषी आहे असे जर कोणाला वाटत असेल तर तो आपल्या समोरील प्रयोजनाला मोठीच हानी पोहोचवेल. (बांक्रा, ९-८-१९४२)

माझा अनुभव, जो सतत दृढ आणि सखोल होत चालला आहे, मला सांगतो की सत्य आणि अहिंसा यांचे जास्तीत जास्त पालन केल्याशिवाय व्यक्तींना आणि राष्ट्रांना शांतता मिळू शकत नाही. प्रतिकाराच्या धोरणाला आजपर्यंत कधीही यश आले माही. (यंग, १५-१२-१९२७, पृ. ३५८)

## अहिंसक समाज

समाजाला अहिंसक पद्धतीने संघटित करणे आणि चालवणे शक्य नाही असे म्हणण्याची आजकाल फॅशनच झाली आहे. या मुद्यावर मी वादाकरिता तयार आहे. कुटुंबात वडील जेव्हा आपल्या अपराधी मुलाला थापड मारतात तेव्हा

मूल त्यांचा बदला घेण्याचा विचार करत नाही. वडिलांच्या आज्ञेचे पालन तो थापडीच्या भीतीने करत नसतो तर त्यांच्या प्रेमाला जो धक्का लागलेला असतो त्यामुळे करत असतो. माझ्या मते हीच ती भावना आहे जिच्याद्वारे समाजाचे संचालन होत असते अथवा झाले पाहिजे. जी गोष्ट कुटुंबाला लागू होते तीच समाजालाही लागू झाली पाहिजे. कारण समाज हेही एक विशाल कुटुंबच आहे. (हरि, ३-१२-१९३८)

**युद्धाचा शेवट**

मी परत खात्रीपूर्वक सांगतो की मित्र राष्ट्रांकरिता वा जगाकरिता तोपर्यंत शांतता निर्माण होणार नाही जोपर्यंत त्यांचा युद्धाच्या सामर्थ्यावरील आणि त्याच्याशी संबंधित भयानक धोकेबाजी आणि फसवणूक यांच्यावरील विश्वास उडत नाही आणि सर्व वंशांच्या व राष्ट्रांच्या लोकांकरिता स्वातंत्र्य आणि समता यांच्यावर आधारित खरी शांतता निर्माण करण्याचा निर्धार करत नाहीत. सर्व प्रकारचे युद्ध संपवण्याकरिता प्रयत्नशील असलेल्या जगात एका राष्ट्राद्वारे दुस-या राष्ट्राच्या शोषणाला व वर्चस्वाला कोणतेही स्थान असू शकत नाही. केवळ अशाच जगात सैनिकी शक्तीच्या दृष्टीने दुर्बल असलेले राष्ट्र दहशत आणि आणि शोषण यांच्यापासून मुक्त असण्याची आशा करू शकते.
(बांक्रा, १८-४-१९४५)

हिंसेचे उत्तर हिंसेने न देणे आणि आक्रमकाकडे मैत्रीकरिता जो हात पुढे करण्यात आलेला होता तो तसाच कायम ठेवायचा परंतु त्याच वेळी आक्रमकाने (बळाच्या आधारावर) केलेल्या मागण्या मान्य करायच्या नाही हाच जगात राहण्याचा सभ्य मार्ग आहे. याशिवाय इतर कोणतीही पद्धती शस्त्रस्पर्धेला जन्म देईल; अधूनमधून शांततेचे झटके येतील परंतु भांडखोर राष्ट्रे भांडण करता करता थकल्यामुळे आलेला तो झटका असेल व त्या काळातही ते अजून उग्र हिंसा करण्याची तयारी सुरू ठेवतील. तीव्र हिंसेकरिता सुरू असलेल्या तयारीच्या या काळातच अण्वस्त्रासारख्या अस्त्रांचा जन्म होत असतो. अहिंसा आणि लोकशाही यांना पूर्णपणे नाकारणारी ही गोष्ट आहे - लोकशाही तर अहिंसेशिवाय शक्यच नाही. (हरि, ३०-३-१९४७, पृ. ८६)

मी खात्रीपूर्वक सांगू शकतो जगात जर शांतता स्थापन व्हायची असेल तर ते ध्येय प्राप्त करण्याचे साधन अहिंसाच असू शकते, अजून काहीही नाही. (हरि, २०-७-१९४७, पृ. २४३)

### शांततावाद आणि शांततावादी

खरा शांततावादी खरा सत्याग्रही असतो. सत्याग्रही श्रद्धेच्या आधारावर कार्य करत असतो. कार्य जर खरे असेल तर त्याचे अपेक्षित परिणाम निश्चितच चांगले राहतील असा विश्वास असल्यामुळे तो परिणामाची चिंता करत नाही.

....रक्षणात्मक व आक्रमक अशा दोन्ही प्रकारच्या युद्धांशी कोणत्याही प्रकारचा संबंध ठेवायला दृढतापूर्वक नकार देऊन शांततावाद्याला आपली श्रद्धा सिद्ध करावी लागेल. (हरि, १५-४-१९३९, पृ. ९०)

....शांततावाद्याला आपले जीवन 'सर्मन ऑफ द माऊंट'मधील आदेशाबरहुकूम व्यतीत करावे लागेल आणि तसे झाले की आपल्याला अनेक गोष्टींचा त्याग करायचा आहे व अनेक गोष्टींचे रूप बदलणे आवश्यक असल्याचे त्याच्या लक्षात येईल. सर्वात मोठी गोष्ट ही आहे की साम्राज्यवादाच्या फळांचा आस्वाद घेण्यापासून स्वतःला वंचित करण्याची त्याला तयारी ठेवावी लागेल....
(हरि, १५-३-१९४२, पृ. ७३)

## ९६. उद्याचे जग

भविष्याबद्दल आज जेवढे अंदाज करण्यात येत आहेत तेवढे कदाचित पूर्वी कधीही करण्यात आले नव्हते. आपल्या जगात हिंसेचा नेहमीच दबदबा राहील का? इथे नेहमी दारिद्र्य, उपासमार आणि दुःख यांचे साम्राज्य राहील काय? धर्माबद्दलची आपली श्रद्धा अजून दृढ आणि व्यापक होईल की जग नास्तिक होईल? समाजात जर जबर परिवर्तन होणार असेल तर ते कोणत्या प्रकारचे असेल? युद्धाद्वारे वा क्रांतीद्वारे? की शांतीमय पद्धतीने?

प्रत्येक व्यक्तीजवळ या प्रश्नांची उत्तरे वेगवेगळी आहेत. प्रत्येक व्यक्ती उद्याच्या जगाचे चित्र आपापल्या आशाआकांक्षेप्रमाणे रेखाटत असते. मी केवळ विश्वासाच्या आधारावर नाही तर पक्की खात्री असल्यानंतरच उत्तर देतो आहे - उद्याचे जग नक्कीच अहिंसेवर आधारित जग असेल, हा पहिला नियम आहे आणि त्यातूनच इतर सर्व वरदान प्रगट होतील. हे एक दूरचे ध्येय आहे, ही एक अव्यावहारिक स्वप्नाळू कल्पना आहे असे कोणाला वाटू शकेल. परंतु हे अशक्यप्राय कधीही नाही कारण यावर आज आणि आताच अंमलबजावणी करता

येऊ शकते. इतर कोणाचीही वाट न पाहता कोणतीही व्यक्ती भावी जगाची जीवनपद्धती म्हणजे अहिंसेची जीवनपद्धती अंगीकारू शकते आणि जर एक व्यक्ती असे करू शकत असेल तर व्यक्तिसमूह असे का करू शकणार नाही? संपूर्ण राष्ट्र का करू शकणार नाही? ध्येयाच्या टोकापर्यंत पोहोचता येणार नाही या भीतीनेच लोक अनेकदा सुरुवात करत नाहीत. आपली ही मनोवृत्तीच प्रगतीच्या मार्गातील सर्वात मोठा अडसर आहे - हा अडसर असा आहे की इच्छा असेल तर प्रत्येक माणूस तो दूर करू शकतो.

## समान वितरण

उद्याच्या जगाचा दुसरा महान नियम समान वितरण हा असेल. तो अहिंसेतूनच उत्पन्न होतो. या नियमाचा अर्थ असा नाही की जगातील वस्तूंची मन मानेल त्याप्रमाणे वाटणी केली जाईल. याचा अर्थ असा आहे की प्रत्येक व्यक्तीजवळ त्याच्या नैसर्गिक गरजांच्या पूर्तीकरिता साधने उपलब्ध असतील आणि त्यापेक्षा अधिक त्याच्याजवळ काहीही नसेल. एक ढोबळ उदाहरण घ्यायचे तर एखाद्या माणसाला दर आठवड्याला एकचतुर्थांश पौंड पिठाची गरज असेल आणि दुस-या माणसाला पाच पौंडांची तर त्या दोघांनाही पाचपाच पौंड वा एकचतुर्थांश एकचतुर्थांश पौंड पीठ मिळायला नको तर प्रत्येकाच्या गरजेप्रमाणे मिळाले पाहिजे.

यावरून आपण या मुद्द्यावर येतो की कदाचित उद्याच्या जगाचे स्वरूप निर्धारित करणारा सर्वात महत्त्वाचा मुद्दा हाच असेल. कशा प्रकारे हे समान वितरण केले जावे? श्रीमंतापासून त्यांची सर्व संपत्ती हिसकून घेतली पाहिजे काय?

अहिंसेचे उत्तर आहे ‘नाही’. अशी कोणतीही गोष्ट जी हिंसक आहे ती मानवजातीचे स्थायी कल्याण करू शकत नाही. श्रीमंतांकडून बळजबरीने संपत्ती हिसकावून घेतल्याचा परिणाम असा होईल की समाजाला अनेकांच्या प्रतिभेला मुकावे लागेल. संपत्ती कशी मिळवावी आणि कशी उभारावी हे श्रीमंतांना माहीत असते. त्याच्या क्षमतेपासून समाजाने वंचित होता कामा नये. याऐवजी श्रीमंतांजवळ त्याची संपत्ती राहू द्यावी व त्यातून त्याच्या स्वतःच्या गरजा पूर्ण करण्याकरिता जेवढ्या संपत्तीची गरज असेल तेवढी संपत्ती त्याला खर्च करू द्यावी आणि शिल्लक राहिलेल्या संपत्तीचे विश्वस्त म्हणून त्यांना काम करू द्यावे व ती संपत्ती समाजहिताकरिता खर्च केली जावी. असे लोक झाले आहेत आणि

आजही आहेत. माणूस ज्या क्षणी स्वतःला समाजाचा सेवक समजू लागतो, त्याच्याचकरिता कमावतो व त्याच्याचकरिता खर्च करतो त्या क्षणीच त्याच्या कमाईला चांगले स्वरूप येते व त्याचा व्यवसाय रचनात्मक होतो.

## मानवी स्वभावात परिवर्तन

परंतु अहिंसेचा हा संपूर्ण विचार स्वीकारण्याकरिता मानवी स्वभाव बदलण्याची गरज पडणार नाही का? इतिहासात अशा प्रकारच्या बदलाचा काही उल्लेख मिळतो का? होय, नक्कीच मिळतो. अनेक व्यक्तींनी हलकटपणा, स्वार्थी आणि हावरट स्वभावाचा त्याग करून संपूर्ण समाजाबद्दल विचार केला आहे व त्याच्या कल्याणार्थ काम केले आहे. जर असा बदल एका माणसात होऊ शकला असेल तर बाकीच्यांमध्येही तो होऊ शकतो.

## भविष्य

उद्याच्या जगात मी ना दारिद्र्य पाहतो, ना युद्ध ना क्रांत्या आणि ना रक्तपात. त्या जगात ईश्वराबद्दल इतकी व्यापक व सखोल श्रद्धा असेल जशी पूर्वी कधीही नव्हती. व्यापक अर्थाने पाहायचे तर विश्वाचे अस्तित्वच धर्मावर अवलंबून आहे. त्याला मिटवण्याचे सर्व प्रयत्न फसतील. (नाव्हावे, पृ.४९-५१)

विश्वसंघाचा ढाचा केवळ अहिंसेच्या पायावरच उभा केला जाऊ शकतो. आंतरराष्ट्रीय बाबतीत हिंसेचा पूर्ण त्याग करावा लागेल.
(गांकॉग, १९४२-४४, पृ. १४३)

# १५. स्फुट विचार

## १. अंधश्रद्धा

ज्या क्षणी आपण योग्य पद्धतीने जगायला सुरुवात करतो त्याच क्षणी अंधश्रद्धा आणि अनावश्यक गोष्टी जीवनातून निघून जातात. माझ्या दृष्टीने महत्त्व श्रद्धेला नसून योग्य गोष्ट करायला आहे. ही पद्धती अवलंबिताच श्रद्धेला आपोआप योग्य स्वरूप मिळते. (यंग, ११-८-१९२७, पृ. २५१)

'प्राचीनत्वा'च्या नावावर चालत येणा-या सर्व अंधश्रद्धांवर मी विश्वास ठेवत नाही. एखादी गोष्ट कितीही प्राचीन असली तरी ती वाईट अथवा अनैतिक असेल तर ती मिटवताना मी कधीही मागेपुढे पाहिले नाही. एक गोष्ट मात्र नक्की आहे की मी प्राचीन संस्थांचा पुजारी आहे आणि लोक प्रत्येक आधुनिक गोष्टीमागे पळू लागतात व आपल्या सर्व प्राचीन परंपरांची निंदा करू लागतात व आपल्या जीवनात त्यांना कोणतेच स्थान देत नाहीत हे पाहून मला फार दुःख होते. (विगांसी, पृ. १०७)

माझा विश्वास आहे की माझ्यामध्ये अंधश्रद्धा नाही. सत्य प्राचीन आहे एवढ्याकरिता ते सत्य नाही आणि ते प्राचीन आहे एवढ्याच कारणामुळे त्याच्याकडे अनिवार्यपणे संशयाने पाहण्यात येऊ नये. जीवनाचे काही मूलभूत सिद्धान्त आहेत आणि ते आचरणात आणणे कठीण आहे एवढ्याच कारणाकरिता त्यांना सोडता येत नाही. (हरि, १४-३-१९३६, पृ. ३६)

## २. चांगुलपणा

असे म्हणतात की जो चांगला असतो त्याच्याकरिता सगळे जग चांगले असते. व्यक्तीकरिता ही गोष्ट खरी आहे, परंतु चांगुलपणा तेव्हाच गतिमान होतो जेव्हा वाईटपणा समोर असतानाही चांगुलपणानुसार आचरण केले जाते. जर तुम्ही चांगुलपणाच्या बदल्यात चांगला व्यवहार करत असाल तर तो एक प्रकारचा सौदा होईल व असे होणे हे काही फारसे प्रशंसनीय नाही. परंतु तुम्ही वाईटपणाशीही चांगुलपणाने वागत असाल तर ती गोष्ट मुक्ती देणारी शक्ती असल्याचे सिद्ध

होईल. असे झाले की चांगुलपणासमोर वाईटपणा पराभूत होतो व चांगुलपणाचा प्रभाव वाढता वाढता तो असे रूप धारण करतो की त्याला दाबून ठेवणे अशक्य होते. (हरि, २-६-१९४६, पृ. १६६)

## ३. अनासक्ती

वरवर पाहता खाणे, पिणे आणि झोपणे यांच्याबद्दलच्या नियमित सवयींचे मी कठोरपणे पालन करतो हे माझ्या निरोगी प्रकृतीचे कारण आहे. एक कारण हेही आहे की १९०१ सालापासून मी माझ्या जीवनात निसर्गोपचारावर संपूर्ण भर दिला.... परंतु याहूनही मोठी गोष्ट ही आहे की मी अनासक्त राहण्याचा प्रयत्न करत असतो.

अनासक्तीचा माझा अर्थ आहे जोपर्यंत तुमचे ध्येय चांगले आहे व साधने उचित आहेत तोपर्यंत तुम्ही जे काही केले आहे त्याचा काही परिणाम होतो की नाही या गोष्टीची तुम्ही चिंता करू नये. खरी गोष्ट ही आहे की तुम्ही तुमची साधने चांगली ठेवली आणि बाकी सर्व ईश्वरावर सोडले तर सर्व काही चांगले होईल. (हरि, ७-४-१९४६, पृ. ७१-७२)

माझे वर्तमान आचरण मी कितीही चांगले ठेवले तरी माझे मागील आचरण असे नाही की मला पूर्ण आयुष्याचा उपभोग घेता येईल. परंतु मनाने आणि शरीराने पूर्ण अनासक्तीचे अनुसरण करून मी मागील चुकांचा परिणाम नाहीसा करू शकतो. अनासक्तीमुळे आपल्याला भूतकाळातील चुकीची दुरुस्ती करता येऊ शकते आणि वंश व वातावरण यांच्यामुळे आलेल्या मर्यादाही दूर करता येतात.

सामान्यपणे प्रकृतीच्या नियमांपासून जाणता वा अजाणता झालेले कोणत्याही प्रकारचे विचलन उदाहरणार्थ क्रोध, चिडखोरपणा, उतावीळपणा, लैंगिक जीवनातील चुका इत्यादींची शिक्षा नक्कीच भोगावी लागते. परंतु ही गोष्ट नक्की आहे की तुम्ही जर अनासक्त भावाचा पूर्ण विकास केला तर तुम्ही हे सर्व दोष नष्ट करू शकता. 'जोपर्यंत तुझा पुनर्जन्म होणार नाही तोपर्यंत तुला चिरंतन जीवन मिळणार नाही.'

हेच वेगळ्या शब्दात सांगायचे तर तुमचा पुनर्जन्म झाला तरच तुम्हाला चिरंतन जीवन मिळू शकते. मृत्यू कोणत्याही अडथळ्याला जुमानत नाही. तुमच्या जीवनात कायापालट करून तुम्ही नवीन जीवन इथेच आणि आताच सुरू करू शकता. अनासक्तीच्या कु-हाडीने जर तुम्ही तुमचा भूतकाळ आणि त्यापासून

मिळालेला वारसा कापून टाकला तर तुम्हाला कशाचीही काळजी करण्याची गरज नाही. (हरि, ७-४-१९४६, पृ. ७२)

आत्मनिरीक्षण करत असताना कवी विचारतो, 'अरे माणसा तू देवाचे नाव घेणे का सोडलेस? तू ना क्रोध सोडला, ना वासना सोडली, ना लोभ सोडला, बस, तू खरे काय आहे ते केवळ विसरलास. काय शोकांतिका आहे की तू कवड्यांकरिता ईश्वरप्रेमासारखा अमूल्य हिरा सोडला! या सगळ्या व्यर्थ गोष्टी सोडून तू स्वतःला परमेश्वराच्या भरवशावर का सोडत नाहीस?' याचा अर्थ असा नाही की जर कोणाजवळ धनसंपत्ती असेल तर ती त्याने फेकून द्यावी व बायकोला आणि मुलांना घराबाहेर काढून टाकावे. याचा सरळ-साधा अर्थ असा आहे की माणसाने या गोष्टींबद्दलच्या आसक्तीचा त्याग केला पाहिजे आणि आपले सर्वस्व देवाला समर्पित केले पाहिजे आणि ईश्वराने आपल्याला जे काही दिले आहे त्याचा उपयोग त्याच्याच सेवेकरिता केला पाहिजे. याचा असाही अर्थ आहे की जर आपण अंतःकरणापासून ईश्वराचे नाव घेतले तर वासना, असत्य अशा वाईट विकारांपासून आपली सुटका होईल. (हरि, २८-४-१९४६, पृ. १११)

अदम्य उत्साह आणि त्याबरोबर पूर्ण अनासक्ती सर्व यशाची गुरुकिल्ली आहे. (हरि, २९-९-२९४६, पृ. ३३६)

## ४. अनुशासन

अनुशासनाच्या बाबतीत ना कोणी मोठा आहे ना लहान. ज्या राजाला अनुशासनाचे मूल्य कळते त्या राजाने एखादी बाब आपल्या अनुचराकडे सोपवली असेल तर त्या बाबतीत आपल्या अनुचराचे म्हणणे तो सर्वोपरी समजेल. (यंग,२५-१९२५,पृ.२२०)

स्वातंत्र्याच्या उच्चतम स्वरूपाकरिता जास्तीत जास्त अनुशासनाची आणि नम्रपणाची गरज असते. जे स्वातंत्र्य शिस्त आणि नम्रपणातून निर्माण होते ते कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. निरंकुश स्वेच्छाचार आपल्याकरिता आणि आपल्या शेजा-यांकरिता असभ्यपणाचे चिन्ह असते. (यंग, ३-६-१९२६, पृ. २०३)

अशा अनेक प्रसंगांची मी कल्पना करू शकतो जेव्हा कारणांवर विचार करत बसण्यापेक्षा मुकाट्याने आज्ञेचे पालन करणे आवश्यक असते. मुळात हा शिपायाचा गुण आहे आणि कोणतेही राष्ट्र तोपर्यंत प्रगती करू शकत नाही जोपर्यंत त्याच्या बहुतांश रहिवाशांजवळ हा गुण नसेल. परंतु अशा प्रकारे

युक्तिवाद न करता सांगितलेले मुकाट्याने ऐकून घेण्यासारखे प्रसंग समाजात फार कमी असतात आणि कोणत्याही सुसंघटित समाजात असे प्रसंग कमी असणे आवश्यक असते. (यंग, २४-६-१९२६, पृ. २२६)

आपल्याला जर एखादे महान आणि टिकाऊ काम करायचे असेल तर आपल्याला कठोर शिस्त पाळावी लागेल आणि ही शिस्त केवळ शास्त्रार्थ, विवेक आणि तर्क यांना आवाहन करून निर्माण होत नसते.

अनुशासनाचे शिक्षण प्रतिकूल परिस्थितीतून मिळत असते. जेव्हा आपले उत्साही युवक कोणत्याही संरक्षणाशिवाय जबाबदारी पार पाडण्याचे प्रशिक्षण घेतील तेव्हाच त्यांना उत्तरदायित्व व अनुशासन काय आहे ते कळेल. (यंग, १९-५-१९२७, पृ. १६०)

स्वेच्छापूर्वक अनुशासन सामूहिक स्वातंत्र्याची पहिली अट आहे.... जे राष्ट्र आपल्या स्वातंत्र्याकडे वाटचाल करत असते त्याच्याकरिता सैनिकांची कूच करण्याची वेळ पाळली जाण्याकरिता आवश्यक असलेल्या अनुशासनापेक्षा किती तरी अधिक अनुशासनाची गरज असते. अनुशासनाच्या अभावी रामराज्य, जे पृथ्वीवरील ईश्वराच्या साम्राज्याचेच दुसरे नाव आहे, केवळ स्वप्न बनून राहून जाईल. (हरि, १८-८-१९४६, पृ. २६४)

ज्या लोकांना एक महान राष्ट्र बनण्याची आकांक्षा असते त्यांच्याकरिता व्यापक अनुशासन ही आवश्यक अट असते. (हरि, ११-१-१९४८, पृ. ५०७)

## ५. अमरत्व

मी आत्म्याच्या अमरत्वावर विश्वास ठेवतो. हे समजावे म्हणून मी समुद्राची उपमा देईन. समुद्र पाण्याच्या थेंबांनी मिळून बनला आहे व त्यात प्रत्येक थेंबाला अस्तित्व आहे आणि तरीही तो थेंब संपूर्ण समुद्राचा एक अंश आहे, 'तो अनेकात एक आहे'. जीवनसागरात आपण सर्व लहान लहान थेंबांसारखे आहोत.

माझा सिद्धान्त सांगतो की संपूर्ण प्राणिमात्रांशी माझे तादात्म्य झाले पाहिजे आणि ईश्वराच्या सान्निध्यात जीवनाच्या ऐश्वर्यात मी भागीदार झालो पाहिजे. या जीवनाची एकूण बेरीज ईश्वरच आहे. (इंके, पृ. २४५)

## ६. आत्मशुद्धीकरण

आत्मशुद्धी केल्याशिवाय सर्व प्राणिमात्रांशी तादात्म्य पावणे अशक्य आहे.

आत्मशुद्धीकरणाशिवाय अहिंसेचे पालन केवळ एक स्वप्न बनून राहील. ज्या व्यक्तीचे हृदय निर्मळ नाही त्याला कधीही ईश्वरप्राप्ती होऊ शकत नाही. यामुळे आत्मशुद्धीकरणाचा संबंध जीवनाच्या सर्व अंगांच्या शुद्धीकरणाशी आहे. शुद्धीकरण एक संक्रमणशील गोष्ट आहे. याचा अर्थ आहे आत्म्याची शुद्धी केली की त्याबरोबरच आजूबाजूच्या सर्व वातावरणाची शुद्धी होऊन जाते. परंतु शुद्धीकरणाचा मार्ग कठीण व निसरडा आहे. पूर्ण शुद्ध होण्याकरिता माणसाचे मन, वाणी आणि कर्म हे सर्व विकारमुक्त होणे आवश्यक आहे.

त्याला प्रेम आणि घृणा, आसक्ती आणि तिटकारा या विरोधी प्रवाहांपासून वर उठले पाहिजे. मला माहीत आहे की अविरतपणे आणि अथक प्रयत्न केल्यानंतरही माझ्यात अजून ही त्रिविध शुद्धी आलेली नाही. याच कारणामुळे जगाची प्रशंसा मला स्पर्श करू शकत नाही; खरे सांगायचे तर बहुधा ती मला दंशच करते. सूक्ष्म मनोविकारांना जिंकणे हे शस्त्राद्वारे जग जिंकण्यापेक्षाही कठीण असल्याचे जाणवते. (ए, पृ. ३७१)

## ७. आदर्श

आदर्शाचा गुण असीमतेत आहे. परंतु धार्मिक आदर्श आपल्या असीमत्वामुळे स्वाभाविकपणेच अपूर्ण मानवांकरिता अप्राप्य असले पाहिजे आणि आपण जितके त्यांच्याजवळ जाऊ तितकेच ते त्यांच्या असीमत्वामुळे आपल्यापासून दूर जाऊ शकतात. परंतु त्यांच्या वास्तवतेची व सत्यत्वाची आपली जाणीव आपल्या शरीराच्या अस्तित्वापेक्षाही तीव्र असल्यामुळे ते आपल्या हातापायांपेक्षाही जवळ असल्यासारखे वाटतात. आपल्या आदर्शांबद्दलची हीच श्रद्धा खरे जीवन आहे किंबहुना तेच माणसाचे सर्वस्व आहे. (यंग, २२-११-१९२८, पृ. ३९१)

शक्य आहे की आपण डगमगू आणि पडू, परंतु आपण उठून परत उभे राहू. आपण संघर्षापासून पळ काढला नाही तर तेवढे पुरे आहे. (नव, ७-९-१९१९)

## ८. प्रामाणिकपणा

शंभर टक्के प्रामाणिकपणाने व्यवसाय करणे कठीण आहे हे खरे असले तरी अशक्य मात्र नाही. उलट व्यवसायात जितका अधिक प्रामाणिकपणा असेल तितकेच अधिक यश मिळेल हेच खरे आहे. यामुळेच व्यावसायिकांमध्ये असा वाक्प्रचार आहे की 'प्रामाणिकपणा हीच उत्तम नीती आहे'.... आणि हे खरे आहे

की प्रामाणिकपणाने वागत असताना विपुल धनसंपत्ती गोळा करता येऊ शकत नाही. 'हे खरे आहे की उंट एकदा सुईच्या छिद्रातून निघू शकेल परंतु श्रीमंत व्यक्ती स्वर्गात प्रवेश करू शकत नाही....' व्यवसाय करणा-यांच्या साधनसामग्रीवर प्रामाणिकपणाचे ओझे कधीही होत नसते.
(हरि, २८-७-१९४६, पृ. २३३)

## ९. इच्छा

खरे पाहता माणसाचे सुख त्याच्या समाधानी वृत्तीवर अवलंबून असते. एखाद्या व्यक्तीजवळ कितीही पैसाअडका असला परंतु ती समाधानी नसली तर ती आपल्या इच्छांची दास बनते आणि इच्छांच्या गुलामगिरीपेक्षा दुसरी कोणतीही गुलामगिरी मोठी नाही. माणूसच आपला सर्वात मोठा शत्रू असतो आणि सर्वात मोठा मित्रही असतो असे सर्व ऋषीमुनींनी वर्षानुवर्षे सांगितले आहे. स्वतंत्र राहायचे की गुलाम बनून राहायचे हे ठरवणे माणसाच्या हातात आहे आणि जी गोष्ट व्यक्तीकरिता बरोबर आहे तीच गोष्ट समाजाकरिताही बरोबर आहे.
(हरि, १-२-१९४२, पृ. २७)

## १०. क्षमा

क्षमा शूरांचा गुण आहे, भ्याडांचा नाही. विराटाकडे अज्ञातवासात असताना पांडवांतील एका भावाला जेव्हा अचानक इजा झाली तेव्हा दुस-या भावांनी ती घटना लपवली. एवढेच नाही तर त्याच्या रक्ताचा एक थेंब जरी जमिनीवर सांडला तरी विराटाची हानी होईल या भीतीने त्यांनी ते रक्त सोन्याच्या भांड्यात धरले. माझी इच्छा आहे की प्रत्येक भारतीयाने स्वतःमध्ये, मग तो हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, पारशी, शीख कोणीही असो, अशा प्रकारच्या उच्च कोटीच्या सहिष्णुतेचा विकास करावा. (हरि, २०-३-१९४७, पृ. ८६)

## ११. गुरू

हिंदूंचा गुरू बनवण्याचा सिद्धान्त आणि आध्यात्मिक सिद्धीकरिता त्याचे महत्त्व यांच्यावर माझा विश्वास आहे. माझे मत आहे की या सिद्धान्तात बरेच तथ्य आहे आणि गुरूशिवाय खरे ज्ञान मिळवणे अशक्य आहे. दैनंदिन जीवनात अपूर्ण शिक्षकाच्या मदतीनेही काम भागू शकते, परंतु आध्यात्मिक बाबतीत हे शक्य

नाही. या बाबतीत तर पूर्ण ज्ञानी पुरुषालाच गुरूच्या सिंहासनावर बसवता येऊ शकते. (ए पृ. ६४-५)

जर माझा कोणी गुरू असता - आणि मी गुरूच्या शोधात आहे - तर मी शरीर आणि आत्मा यांच्यासह त्याला शरण गेलो असतो. परंतु अविश्वासाच्या या युगात खरा गुरू मिळणे कठीण आहे आणि कोणी असा तसा गुरू केवळ व्यर्थच सिद्ध होणार नाही तर तो हानिकारकही होईल.

यामुळेच अपूर्ण व्यक्तीला गुरू बनवण्यापासून मी सर्वांना सावध करू इच्छितो. 'ज्या व्यक्तीला हेही माहीत नसते की त्याला काय माहीत नाही' अशा व्यक्तीला गुरू बनवण्यापेक्षा माणसाने अंधारात चाचपडत राहावे व त्याच्यात लाखो उणिवा असल्या तरी सत्यापर्यंत पोहोचण्याचा आपला मार्ग त्याने स्वतः शोधून काढणे चांगले. गळ्यात दगड बांधून आजपर्यंत कोणी तरी पोहणे शिकला आहे काय? (यंग, ३-१२-१९२५, पृ. ४२२)

गुरूबद्दलची माझी संकल्पना काही सामान्य संकल्पना नाही. गुरू जोपर्यंत पूर्ण होणार नाही तोपर्यंत माझे समाधान होणार नाही. मी अशा गुरूच्या शोधात आहे जो या पार्थिव शरीरात राहत असतानाही भ्रष्टाचारापासून पूर्णपणे मुक्त आहे, वासनांसमोर वाकणारा नाही, द्वंद्वांपासून मुक्त आहे, सत्य आणि अहिंसा यांचा अवतार आहे आणि यामुळे तो कोणालाही घाबरत नाही व तो कोणाला घाबरवतही नाही. (यंग, १७-६-१९२६, पृ. २१५)

## तीन महान प्रभाव

माझ्या जीवनावर तीन महापुरुषांनी खोल ठसा उमटवला आहे आणि मला आकर्षित केले आहे : रायचंदभाईंनी आपल्या सजीव संपर्काद्वारे; 'द किंगडम ऑफ गॉड इज विदिन यू' या टॉलस्टॉयच्या पुस्तकाद्वारे टॉलस्टॉयने, आणि 'अनटू दिस लास्ट' या पुस्तकाद्वारे रस्किनने. (ए, पृ. ६५)

माझा विश्वास आहे की माझ्यामध्ये खोलवर रुजलेल्या श्रद्धांचे प्रतिबिंब रस्किनच्या या महान ग्रंथात दिसले आणि त्याने मला अतिशय प्रभावित केले. त्यामुळे माझा कायापालट झाला.... माझ्या समजाप्रमाणे 'अनटू दिस लास्ट'ची शिकवण याप्रमाणे आहे :

(१) सर्वांच्या कल्याणातच व्यक्तीचे कल्याण आहे.

(२) प्रत्येक व्यक्तीला आपल्या कामाद्वारे उदरनिर्वाह करण्याचा समान

अधिकार असल्यामुळे एका वकिलाचे काम तितकेच मूल्यवान आहे असे समजले पाहिजे जितके एखाद्या न्हाव्याचे.

(३) श्रमिक म्हणजे शेतीत कष्ट करणारे व हस्तोद्योग करणारे यांचेच जीवन जगण्यासारखे आहे.

यातील पहिल्या शिकवणुकीबद्दल मला आधीच माहीत होते, दुस-या शिकवणुकीची मला अस्पष्ट जाणीव होती आणि तिसरी शिकवण कधीही माझ्या लक्षात आली नव्हती. दुस-या आणि तिस-या शिकवणुकीचा पहिल्या शिकवणीतच समावेश आहे हे 'अनटू दिस लास्ट'ने मला प्रकाशाप्रमाणे स्पष्टपणे दाखवून दिले. (ए, पृ. २२०-१)

## १२. माझे राजकीय गुरू

मी गोखले यांना माझे राजकीय गुरू मानले आहे. परंतु राजकारणात मी गोखल्यांच्या बाबतीत करत असे त्याप्रमाणे ज्याला मी स्वतःला पूर्णपणे समर्पित करू शकेन आणि ज्याचे मत कोणताही प्रश्न न करता मी मान्य करू शकेन असा गुरू आध्यात्मिक बाबतीत अजून कोणीही मला मिळालेला नाही हे सांगायला मला खेद होतो. आध्यात्मिक गुरू मिळवण्याला तुम्ही पात्र झाला की तसा गुरू तुमच्याजवळ चालत येतो असा माझा विश्वास आहे. त्यामुळे मला वाटते की कदाचित आध्यात्मिक गुरू मिळवण्याची पात्रता अजून माझ्यात आली नसावी. खरे सांगायचे तर जेव्हा तुम्ही त्याच्याकरिता तयार होता तेव्हा तो स्वतःच तुम्हाला शोधून काढतो.

माझ्या अंतःकरणात आध्यात्मिक गुरूचे सिंहासन अजून रिकामे असले तरी रायचंदभाईंनंतर आधुनिक पुरुषांमधून टॉलस्टॉय यांनी माझ्या जीवनावर सखोल आध्यात्मिक प्रभाव टाकला आहे. तिस-या क्रमांकावर रस्किनचे नाव येते. चाळीस वर्षांपूर्वी मी जेव्हा संशय आणि विश्वासाच्या घनघोर संकटातून जात होतो तेव्हा माझ्या हाती टॉलस्टॉयचे 'द किंगडम ऑफ गॉड इज विदिन यू' हे पुस्तक लागले. त्याने मला फार प्रभावित केले. त्या वेळी माझी हिंसेवर श्रद्धा होती. हे पुस्तक वाचल्यामुळे माझ्या सर्व शंका दूर झाल्या आणि मी अहिंसेचा पक्का पुजारी झालो. टॉलस्टॉयच्या ज्या गोष्टीने मला सर्वाधिक प्रभावित केले असेल ती ही आहे की त्यांनी ज्या गोष्टीचा प्रचार केला त्यानुसार त्यांनी स्वतः पूर्णपणे आचरण केले आणि सत्याच्या मार्गावर चालत असताना कोणताही त्याग मोठा

मानला नाही. (यंग, २०-९-१९२८, पृ. ३१९)

माझा कोणीही शिष्य नाही; सध्या तर मीच गुरूच्या शोधात असून मी स्वतःच शिष्य बनण्याची आकांक्षा बाळगून आहे. (हरि, १९-१२-१९३६, पृ. ६२)

## १३. गोपनीयता

सर्व पापे लपून केली जातात. ईश्वर सर्व गोष्टींचा साक्षी आहे हे ज्या क्षणी आपल्याला कळेल त्या क्षणी आपण स्वतंत्र झालो असे समजा.
(यंग,५-६-१९२४,पृ.१८६)

गोपनीयता एक पाप आहे असे माझे मत आहे, विशेषतः राजकीय बाबतीत. आपल्याला जर हे कळले की आपण जे काही करतो आहोत त्याचा ईश्वर साक्षी आहे तर आपण या जगात कधीही कोणापासून काहीही लपवणार नाही. तसे झाले तर आपल्या निर्मात्यासमोर घाणेरडे विचारसुद्धा आपण आपल्या मनात आणणार नाही, मग ते तोंडातून बाहेर पडण्याची गोष्ट तर दूरच. घाणेरड्या गोष्टींकरिता गोपनीयता आणि अंधाराची गरज असते. माणसाचा स्वभाव घाण लपवण्याचा आहे, घाणेरड्या गोष्टी पाहणे वा त्यांना स्पर्श करणे आपल्याला आवडत नाही आणि त्यांना नजरेआड करण्याचा आपण प्रयत्न करतो. हीच गोष्ट आपल्या वाणीलाही लागू होते. मी तर म्हणेन की जो विचार आपण जगापासून लपवू इच्छितो तो मनातही आणायला नको. (यंग, २२-२-१९२०, पृ. ३)

विशुद्ध अहिंसक कार्यवाही आणि प्रकट साधने यांच्या बाजूचा मी आहे आणि गोपनीयतेला मी घृणेच्या दृष्टीने पाहतो. (हरि, १०-३-१९४६, पृ. ३७)

जी संस्था उघडपणे काम करत नाही ती लोकांच्या जीवनाला वा धर्माला संरक्षण देऊ शकत नाही. (हरि, २०-४-१९४७, पृ. १२०)

## १४. घोड्यांची शर्यत

मला घोड्यांच्या शर्यतीबद्दल काहीही माहिती नाही. तिच्याबरोबर जुळलेल्या गोष्टींमळे मला ती भयावह गोष्ट वाटते. घोड्यांच्या शर्यतीने अनेकांचा नाश झाला असल्याचे मला माहीत आहे. (यंग, २७-४-१९२१, पृ. १३२)

जोपर्यंत घोड्यांवर डाव लावण्याचा प्रश्न आहे, माझे मत आहे की ही गोष्टसुद्धा पश्चिमेकडून घेण्यात आलेल्या अनेक गोष्टींपैकी एक आहे आणि माझे चालले तर घोड्यांच्या शर्यतीवर सुरू असलेल्या जुगाराला जे काही कायदेशीर

संरक्षण आहे ते सर्व मी बंद करून टाकेन.... लोक असा युक्तिवाद करत असल्याचे मी ऐकले आहे की चांगल्या घोड्यांची जात तयार करण्याकरिता घोड्यांची शर्यत आवश्यक आहे. हे बरोबरही असेल, परंतु जुगाराशिवाय घोड्याची शर्यत होऊ शकत नाही काय? की घोड्यांची जात सुधारण्याकरिता जुगारही आवश्यक आहे? (हरि, ४-९-१९३७, पृ. २३३-४)

घोड्यांवरील प्रेमामुळे घोड्यांच्या शर्यतीचे आयोजन करणे आणि त्यांच्याकरिता उत्तेजक कार्यक्रम ठेवणे आवश्यक आहे. यामुळे लोकांच्या दुर्गुणांमध्ये वाढ होते आणि शेतीयोग्य चांगल्या भूमीपासून व विपुल संपत्तीपासूनही आपण वंचित होतो. घोड्यावरील जुगारात चांगल्या चांगल्या लोकांचा नाश झालेला पाहिला नाही असा कोणी आहे काय? पश्चिमेकडून घेतलेल्या वाईट गोष्टींचा त्याग करण्याची व उत्तम गोष्टी स्वीकारण्याची वेळ आता आलेली आहे. (हरि, १८-१-१९४८, पृ. ५१५)

## १५. ज्युरींद्वारे खटल्याची सुनावणी

न्यायाधीशांऐवजी ज्युरींद्वारे सुनावणी केली जाण्याचे फायदे आहेत या विचाराशी मी सहमत नाही.... ऐन वेळी ज्युरी अयशस्वी झाल्याचे इंग्लंडमध्येसुद्धा आढळले आहे. जेव्हा वातावरण उत्तेजक असते तेव्हा त्याचा प्रभाव ज्युरीवरही पडतो व ते चुकीचा निकाल देतात. आपण असेही गृहीत धरू शकत नाही की ज्युरी नेहमीच सौम्यपणे काम करते. पुरावे आणि न्यायाधीशांनी काढलेला निष्कर्ष या दोन्ही गोष्टी विरोधात असतानाही ज्युरीने आरोपीला दोषी ठरवले असल्याचे आणि ज्युरीच्या या निर्णयामुळे न्यायाधीशांनीही विरोधी निर्णय दिला असल्याचे मी पाहिले आहे.

इंग्रजांच्या प्रत्येक गोष्टीचे गुलामगिरीच्या भावनेने आपण अनुकरण करू नये. पूर्ण निःपक्षपातीपणाने, शांतचित्ताने साक्षीदारांची उलटतपासणी करून काय खरे आहे याचा शोध लावण्याची पात्रता आणि मानव स्वभावाचे ज्ञान असलेल्या न्यायाधीशांच्या ठिकाणी अप्रशिक्षित व्यक्तींना संयोगाने एकत्र आणून त्यांच्याकडे न्यायदानाचे काम सोपवायला नको.

खालून वरपर्यंत भ्रष्टाचाराच्या पलीकडे असलेली, निष्पक्ष आणि कार्यक्षम न्यायपालिका स्थापन करण्याचे आपले ध्येय आहे. (यंग, २७-८-१९३१, पृ.२४०)

## १६. खोटी निंदा

सार्वजनिक व्यक्तींना नेहमीच खोटी निंदा आणि विपर्यास यांना तोंड द्यावे लागत असते. विरोधकावर मात करण्याचा एकच उपाय आहे व तो म्हणजे अप्रतिकार.... यामुळे सामान्यपणे माझा सल्ला हा असतो की दुर्भावनेने प्रेरित होऊन घेतलेल्या निराधार आक्षेपांकडे मुळीच लक्ष देऊ नये. उलट आक्षेपकाची कीव करण्यात यावी व अखेरीस त्याच्या मनोवृत्तीत बदल होईल अशी आशा व प्रार्थनाही करण्यात यावी....

माणूस स्वतःशी प्रामाणिक असला तर तेवढेच पुरे आहे. त्यानंतर तो अफवांच्या घाणेरड्या नाल्याला मुक्तपणे वाहू देऊ शकतो. (यंग, ६-१२-१९२८, पृ. ४०५)

## १७. डॉक्टर

खरी गोष्ट ही आहे की डॉक्टर आपल्याला चुकीच्या गोष्टी करण्याकरिता प्रोत्साहित करतात. त्यामुळे आपण आपले स्वतःवरील नियंत्रण गमावून बसतो व स्त्रैण होतो. (हिंस्व, पृ. ५९)

चिकित्सा व्यवसाय आत्म्याची पूर्णपणे उपेक्षा करतो म्हणून व शरीरासारख्या ठिसूळ गोष्टीला ठोकपीट करण्याचा कोणताही प्रयत्न तो शिल्लक ठेवत नाही. त्यामुळेच चिकित्साव्यवसायाशी माझे भांडण आहे. आत्म्याची उपेक्षा करून चिकित्साव्यवसाय लोकांना स्वतःवर अवलंबून राहायला लावतो व मानवी प्रतिष्ठा आणि आत्मनियंत्रण यांच्या -हासाकरिता तो कारणीभूत आहे.

पश्चिमेकडे असा एक संप्रदाय निर्माण झाला आहे जो आजा-याचा उपचार करत असताना हळूहळू पण निश्चितपणे आत्म्याकडे लक्ष देतो व त्यामुळे औषधांवर भर न देता शक्तिशाली रोगनिवारक म्हणून निसर्गशक्तीवर भर देतो. (यंग, ११-६-१९२५, पृ. २०५)

### आत्म्याचे चिकित्सक

आपल्याला शरीरापेक्षा आत्म्याच्या चिकित्सकांची अधिक गरज आहे. रुग्णालये आणि चिकित्सक यांची वाढती संख्या ख-या संस्कृतीचे चिन्ह नाही. आपण आपल्या शरीराला जितके कमी महत्त्व देऊ तितकेच ते आपल्याकरिता व जगाकरिता चांगले होईल. (यंग, २९-९-१९२७, पृ. ३२७)

शरीराला देवाचे मंदिर समजून त्याचा उपयोग करण्याऐवजी आपण त्याला

विषयोपभोगाचे साधन बनवतो व विषोपभोगात वाढ करता यावी म्हणून पार्थिव शरीराचा दुरुपयोग करण्याच्या प्रयत्नात निर्लज्जपणे डॉक्टरकडे धाव घेत असतो. (यंग, ८-८-१९२९, पृ. ३२७)

डॉक्टरची पदवी ही काही कसोटी नाही, खरा डॉक्टर तो असतो जो खरा सेवक असतो. (हरि, १०-२-१९४६, पृ. ८)

डॉक्टर, हकीम आणि वैद्य सर्व पैशाचे गुलाम आहेत. केवळ सेवेच्या भावनेने ते या व्यवसायाकडे वळत नसतात. काही चिकित्सकांमध्ये सेवाभाव आहे असा युक्तिवाद करून तुम्ही माझे म्हणणे खोटे ठरवू शकत नाही. (हरि, २-६-१९४६, पृ. १५८)

## १८. औषध

मी पाश्चात्त्य औषधांच्या विरोधात बोललो होतो. काळ्या जादूचा अर्क म्हणून मी त्यांना संबोधले होते. माझ्या अहिंसेतून माझा हा दृष्टिकोन तयार झालेला असल्यामुळे चिरफाडीविरुद्ध माझा आत्मा बंड करून उठतो.... जे क्रौर्यपूर्ण वर्तन मी स्वतःच्या बाबतीत करणार नाही ते खालच्या श्रेणीतील प्राण्यांवर करण्याचा मला काय अधिकार आहे?

परंतु मी सर्व प्रकारच्या चिकित्सेची निंदा करत नाही. मला माहीत आहे की सुरक्षित प्रसूती आणि मुलांची काळजी या गोष्टींच्या बाबतीत आपण पश्चिमेकडून बरेच काही शिकू शकतो. आपली मुले कशी तरी जन्म घेतात आणि आपल्या बहुतांश स्त्रियांना मुलांचे पालन पोषण कसे करावे यासंबंधी वैज्ञानिक माहिती नसते. या बाबतीत आपण पश्चिमेकडून बरेच काही शिकू शकतो. परंतु माणसाच्या पार्थिवाला अधिकात अधिक टिकवून ठेवण्याला पश्चिम आवश्यकतेपेक्षा अधिक महत्त्व देते. माणसाचा अखेरचा श्वास सुरू असेपर्यंत ते त्याला औषधांवर औषधे देत राहतात, एवढेच नाही तर इंजेक्शनच्या मार्गाने काहीही करून ते त्याला अधिकात अधिक काळ जिवंत ठेवण्याचा प्रयत्न करतात. युद्धात अंदाधुंदपणे ज्या प्रकारे ते माणसांचा बळी चढवतात त्याच्याशी त्या प्रकाराशी या गोष्टीची कुठेच सुसंगती नाही. (हरि, ३-७-१९३७, पृ. १६५)

## १९. संपत्ती

जी गोष्ट बंधुभावात आहे, गोड शब्दांत आहे आणि स्नेहपूर्ण दृष्टीत आहे ती संपत्तीत नाही असा माझा अनुभव आहे. जर एखादी व्यक्ती श्रीमंत होण्याकरिता उत्सुक आहे आणि दुस-या व्यक्तीकडून कोणत्याही प्रकारच्या सहानुभूतीशिवाय तिला संपत्ती मिळाली तर कालांतराने पहिली व्यक्ती दुसरीशी संबंध तोडून टाकेल. याउलट एखाद्याला प्रेमाने जिंकले तर ज्याने त्याला प्रेम दिले त्याच्याकरिता तो कितीही त्रास घेण्याकरिता तयार असतो. (ससा, पृ. २२२)

माझा दृढविश्वास आहे की आणि अनुभवानेही हेच सिद्ध झाले आहे की, भावनेच्या बाबतीत रुपया-पैशाचे महत्त्व सगळ्यात कमी आहे.
(हरि, २६-१२-१९३६, पृ. ३६८)

## २०. धूम्रपान

तंबाखूने मानवजातीचा सत्यानाश केला आहे. याच्या मगरमिठीत सापडल्यानंतर क्वचितच कोणाची सुटका होते.... टॉलस्टॉयने सर्व मादक पदार्थात तंबाखूला सर्वात जास्त भयानक पदार्थ म्हणून संबोधले आहे....

भारतात लोक तंबाखूचा उपयोग धूम्रपानाकरिता, हुंगण्याकरिता आणि खाण्याकरिता करत असतात.... ज्यांना आपल्या आरोग्याविषयी प्रेम असेल त्यांना जर यापैकी कोणतीही वाईट सवय असेल तर त्यांनी निर्धाराने या गुलामगिरीतून आपली सुटका करून घेतली पाहिजे. अनेक लोकांना यांपैकी एक, दोन वा तिन्ही प्रकारचे व्यसन असते. त्यांना ही गोष्ट किळसवाणी वाटत नाही. परंतु आपण शांतपणे विचार केला तर धूर सोडण्यात, वा दिवसभर तोंडात तंबाखू व पान भरत राहण्यात वा डबी उघडून सतत नस ओढत राहण्यात कोणताही मोठेपणा नाही. या तिन्ही सवयी अतिशय घाणेरड्या आहेत. (कीहै, पृ. ३९-४२)

दारूप्रमाणेच मला धूम्रपानाचीही भीती वाटते. धूम्रपान एक दुर्गुण आहे असे मी समजतो. यामुळे माणसाची विवेकबुद्धी निर्जीव होते आणि या दृष्टीने ही सवय दारूपेक्षाही वाईट आहे. हिचा प्रभाव अगोचरपणे होत असतो. एकदा माणूस तंबाखूच्या जाळ्यात फसला की मग त्याचे त्यातून निघणे कठीण होते. हे एक महागडे व्यसन आहे. यामुळे श्वासाला वास येतो. दात रंगाने मळकट होतात आणि अनेकदा कॅन्सरही होतो. हे एक घाणेरडे व्यसन आहे. (यंग, १२-१-१९२१, पृ.११)

या दृष्टीने दारूपेक्षा धूम्रपान वाईट आहे. याच्या तडाख्यात सापडलेल्या

व्यक्तीला वेळीच जाग येत नाही. हे रानटीपणाचे चिन्ह आहे असे समजले जात नाही आणि सभ्य लोकही याच्याकडे चांगल्या दृष्टीने पाहतात. मी एवढेच म्हणू शकतो जे लोक हे व्यसन सोडू शकत असतील त्यांनी ते सोडून लोकांसमोर आदर्श उभा करावा. (यंग, ४-२-१९२६, पृ. ४६)

## २१. ध्वज

सर्व राष्ट्रांकरिता ध्वज आवश्यक आहे. लाखो लोकांनी ध्वजाकरिता आपल्या प्राणांची आहुती दिली आहे. यात संशय नाही की ही एक प्रकारची मूर्तिपूजाच आहे व तिला नष्ट करणे पाप होईल. ध्वज आदर्शाचे प्रतिनिधित्व करत असते. युनियन जॅक फडकवला की इंग्रजांच्या मनात ज्या भावना उचंबळून येतात त्यांचे मोजमाप करणे कठीण आहे. अशाच प्रकारे तारकांकित आणि रेषा असलेल्या ध्वजाचे अमेरिकी लोकांकरिता महत्त्व आहे. चंद्र आणि तारे असलेल्या ध्वजाकरिता मुसलमान आपल्या प्राणाची बाजू लावायला तयार असतात.

भारताला आपले घर मानणारे हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, यहुदी, पारसी आणि इतर सर्व यांच्याकरिता एक असा ध्वज असणे आवश्यक आहे की ज्याकरिता ते जगू शकतील व मरूही शकतील. (यंग, १३-४-१९२१, पृ. ११६)

## २२. नद्या

आपल्या इथे दोनपेक्षा जास्त गंगायमुना आहेत.... आपण ज्या देशात राहतो त्याकरिता आपण काही त्याग केला पाहिजे या गोष्टीची त्या आठवण करून देतात. वाहण्याच्या प्रक्रियेत त्या स्वतःला शुद्ध करत जात असतात. आपणही आपले असेच शुद्धीकरण केले पाहिजे याचीच त्या जणू काय आठवण करून देत असतात.... नद्यांमध्ये आपल्या घाणेरड्या नाल्यांमधील पाणी ओतायचे आणि आपला व्यापारी माल नेण्याकरिता त्यांच्यातून नावा वा जहाजे चालवायची एवढाच आजच्या धावपळीत आपल्याकरिता नद्यांचा उपयोग राहिला आहे. या प्रक्रियेत त्या अजूनच घाणेरड्या होतात. त्यांच्या काठावर फिरण्याकरिता आणि आपल्या मर्मर ध्वनीतून त्या काय सांगतात ते शांतपणे ऐकून त्यावर चिंतन करण्याकरिता आपल्याजवळ वेळ नाही. (यंग, २३-१२-१९२६, पृ. ४४६)

## २३. नियती

मृत्यूची वेळ, ठिकाण आणि स्वरूप पूर्वनियोजित आहे की नाही हे मला माहीत नाही. मला केवळ एवढे माहीत आहे की 'ईश्वराच्या इच्छेशिवाय एक पानही हालत नाही.' ही गोष्टसुद्धा मला अस्पष्टपणेच माहीत आहे, परंतु ईश्वरासमोर प्रार्थनारत राहिल्यामुळे आज जी गोष्ट अस्पष्ट आहे ती उद्या स्पष्ट होऊन जाईल. (हरि, २८-७-१९४६, पृ. २३३)

असे म्हणतात की, माणूस स्वतःच आपल्या नियतीचा निर्धारक असतो. काही प्रमाणात ही गोष्ट सत्य आहे. परंतु तो आपल्या नियतीचा त्याच प्रमाणात निर्धारक असतो ज्या प्रमाणात ईश्वर त्याला तसे करू देतो.... तो आपले हेतू आणि आपल्या योजना निरस्त करून स्वतःच्या योजनांना कार्यान्वित करत असतो. (हरि, २०-४-१९४७, पृ. १०९)

## २४. नेतृत्व

केवळ आपल्या मतांचा पुनरुच्चार करत राहणे आणि जनतेसमोर वाकणे हे अपुरे आहे. शिवाय महत्त्वाच्या बाबतीत जनमत अविवेकीपणाचे आहे असे नेत्यांना वाटत असेल तर त्यांनी जनतेच्या इच्छेविरुद्धसुद्धा वागले पाहिजे असे माझे मत आहे. (यंग, १४-७-१९२०, पृ. ४)

माझे निश्चित मत आहे की एखाद्या भित्र्या आणि संशयग्रस्त वकिलापेक्षा शूर आणि श्रद्धाशील चांभार आपल्या संघर्षाचे नेतृत्व अधिक चांगल्या पद्धतीने करू शकतो. त्याग, सत्य, प्रेम, आणि श्रद्धा यांच्यावर यश अवलंबून असते; कायद्याचा अन्वयार्थ लावण्यातील प्रतिभा, जोडतोड, कूटनीती, घृणा आणि अविश्वास यांच्यावर नाही. (यंग, २५-८-१९२१, पृ. २६६)

बरोबरीच्या लोकांमधील नेता केवळ पहिला असतो. कोणाला ना कोणाला तरी पहिले स्थान द्यावेच लागेल. परंतु साखळीतील सगळ्यात कमकुवत दुव्यापेक्षा तो अधिक मजबूत असू शकत नाही आणि असायलाही नको. एकदा कोणाला आपला नेता निवडल्यानंतर आपण त्याच्या मागे गेलो पाहिजे नाही तर साखळी तुटून जाते आणि सर्व काही नष्ट होऊन जाते.
(यंग, ८-१२-१९२१, पृ. ४०२)

तो नेता बेकार आहे जो वेगवेगळ्या दृष्टीच्या अनेक व्यक्तींमध्ये असूनही आपल्या विवेकाच्या आदेशानुसार वागत नाही. त्याच्या आतील आवाज जर

त्याला निर्धाराने वागण्याकरिता सांगत नसेल व मार्गदर्शन करत नसेल तर तो सुकाणू नसलेल्या जहाजाप्रमाणे हेलकावे खाईल व पथभ्रष्ट होईल.
(यंग, २३-२-१९२२, पृ. ११२)

नेत्याला चांगला वा वाईट त्याचे अनुयायी बनवत असतात. तो जनसामान्यांच्या सुप्त आकांक्षांचे प्रतिबिंब असतो. (यंग, २-२-१९४७, पृ. ३)

## २५. नैतिकता

खरी नैतिकता रूढ मार्गावरून चालण्यात नाही तर खरा मार्ग शोधून त्यावरून निर्भयपणे चालण्यात आहे. (इरि, पृ. ३६)

जे काम स्वेच्छेने केले जात नाही त्याला नैतिक म्हणता येऊ शकत नाही. जोपर्यंत आपण यंत्राप्रमाणे काम करत असतो तोपर्यंत नैतिकतेचा प्रश्नच उपस्थित होत नाही. आपल्याला आपल्या एखाद्या कामाला नैतिक म्हणून संबोधायचे असेल तर ते विचारपूर्वक आणि कर्तव्य म्हणून केलेले असले पाहिजे. (एफा, पृ. ४३)

नैतिक अधिकारांना चिकटून राहिल्याने ते मिळत नाहीत. ते न मागताच मिळत असतात व ते टिकवून ठेवण्याकरिता प्रयत्नांची गरज नसते.
(यंग, २९-१-१९२५, पृ. ४०)

आपले धोरण ठरवत असताना स्वस्त लोकप्रियता मिळवण्याच्या मोहाने आपण प्रभावित होऊ नये तर जे योग्य आहे त्यावर आपण ठाम राहिले पाहिजे.
(हरि, २८-२-१९४६, पृ. २३३)

## २६. पत्रकारिता

पत्रकारितेचे एकमेव ध्येय सेवा असले पाहिजे. वर्तमानपत्रांजवळ फार मोठी शक्ती असते, परंतु अनियंत्रित पूर ज्याप्रमाणे संपूर्ण वस्तीला बुडवून टाकतो आणि पिकांची नासाडी करतो त्याचप्रमाणे अनियंत्रित लेखणीची सेवासुद्धा विनाशकारी असते. जर तिचे नियंत्रण बाहेरून करण्यात आले तर ती गोष्ट नियंत्रण नसण्यापेक्षाही अनिष्ट असल्याचे सिद्ध होते. प्रेसवरील नियंत्रण तेव्हाच हितकारक होते जेव्हा प्रेस ते स्वतः होऊन लावेल. हा युक्तिवाद बरोबर असेल तर जगातील किती वृत्तपत्रे या कसोटीवर उतरतील? परंतु जी वृत्तपत्रे कुचकामी आहेत त्यांना कोण अडवेल? चांगुलपणा आणि वाईटपणाप्रमाणेच चांगली आणि बेकार वृत्तपत्रेही सोबत राहणार आहेत व वाचकांना आपली निवड स्वतःच करावी

लागेल. (ए, पृ. २११)

पत्रकारितेचे योग्य काम लोकमानसाला प्रशिक्षित करणे आहे, त्याला वाटेल त्या विचारांनी भरणे नाही.

यामुळेच वृत्तपत्रात कोणती गोष्ट द्यावी आणि केव्हा द्यावी याचा निर्णय पत्रकाराने आपल्या विवेकाने केला पाहिजे. आज परिस्थिती अशी आहे की केवळ तथ्य सांगून पत्रकारांचे समाधान होत नाही. पत्रकारिता आज काय घडणार आहे याचा अंदाज करण्याचीही कला झाली आहे. (हरि, २९-९-१९४६, पृ. ३३४)

## आधुनिक पत्रकारिता

आधुनिक पत्रकारितेत उथळपणा, पक्षपात, अचूकपणाचा अभाव आणि अप्रामाणिकपणासुद्धा शिरलेला आहे आणि न्यायाचाच विजय व्हावा असे वाटणा-या प्रामाणिक लोकांना ती चुकीच्या मार्गाने नेते आहे.
(यंग, १२-५-१९२०, पृ. ४)

माझ्यासमोर वृत्तपत्र-पत्रिकांची अशी उद्धरणे आहेत की ज्यांच्यात बीभत्स गोष्टी लिहिलेल्या आहेत. त्यांच्यात सांप्रदायिकता भडकवणे, खोट्या बातम्या आणि राजकीय हिंसा भडकवणा-या हत्येसारख्या गंभीर गोष्टी आहेत. अशा पत्रपत्रिकांवर खटले भरणे या त्यावर बंदी आणणारे आदेश काढणे सरकारकरिता कठीण गोष्ट नाही. यामुळे कोणताही हेतू साध्य होत नाही आणि जर काही परिणाम झालाच तर तो अतिशय तात्कालिक असतो. कोणत्याही अवस्थेत या लेखकांमध्ये कोणताही बदल होत नाही आणि वृत्तपत्राचे जाहीर व्यासपीठ बंद झाल्यानंतर ते गोपनीय प्रचाराकडे वळतात.

यावरील खरा उपाय निरोगी लोकमत आहे. त्याने विषारी पत्रपत्रिकांना संरक्षण देणे बंद केले पाहिजे.... प्रेसचे स्वातंत्र्य हा एक मूल्यवान विशेषाधिकार आहे व कोणताही देश त्याचा त्याग करू शकत नाही. फार क्षुल्लक अडथळ्यांशिवाय कोणत्याही प्रकारचे बंधन वृत्तपत्रांवर नसावे. आंतरिक बंधने असू शकतात व ही गोष्ट असंभवही नाही आणि त्याबद्दल आक्षेपही असू नये.
(यंग, २८-५-१९३१, पृ. १२१)

## जाहिराती

अनैतिक जाहिरातींच्या बळावर.... वृत्तपत्र चालवणे चूक आहे असे माझे मत

आहे. जर जाहिराती घ्यायच्याच असतील तर वृत्तपत्राच्या मालकांनी व त्याच्या संपादकांनी त्याबद्दल कसून चौकशी केली पाहिजे आणि केवळ निरोगी जाहिराती तेवढ्या घेतल्या पाहिजे.

आज मोठ्यात मोठी वृत्तपत्रे आणि पत्रिका अनैतिक जाहिरातीच्या वाईटपणाला बळी पडत आहेत. वृत्तपत्रांच्या मालकांचा आणि संपादकांचा विवेक जागृत करूनच याचा सामना करता येऊ शकतो. माझ्यासारखा नवशिक्या पत्रकाराच्या प्रभावाने हे काम होऊ शकत नाही. हे काम तेव्हाच होईल जेव्हा ते या वाढत्या वाईटपणाला ओळखतील व त्यामुळे त्यांचा विवेक जागा होईल अथवा जनतेचे प्रतिनिधित्व करणारे सरकार जनतेच्या नैतिक आदर्शांबद्दल जागृत होऊन त्यांच्यापर्यंत आपला विवेक संक्रमित करतील. (यंग, २५-३-१९२६, पृ. ११४)

## वृत्तपत्रे आणि सत्य

पश्चिमेप्रमाणे पूर्वेतही वृत्तपत्रे लोकांचे बायबल, कुराण, झेंदअवेस्ता आणि भगवद्‌गीता होऊ लागले आहेत. वृत्तपत्रांमध्ये जे छापले जाते त्याला लोक ईश्वरीय सत्य मानू लागले आहेत. (हरि, २८-४-१९४६, पृ. १०१)

वृत्तपत्रांकडून मत विकत घेण्याची सवय वाईट आहे असे माझे मत आहे. वृत्तपत्र तथ्यांचा अभ्यास करण्याकरिता आहे. स्वतंत्रपणे चिंतन करण्याची आमची सवय संपवण्याची परवानगी त्यांना देता येऊ शकत नाही.
(हरि, २६-५-१९४६, पृ. १५४)

वृत्तपत्राचे कर्तव्य वाचकांना केवळ तथ्य सांगणे आहे, यापेक्षा अधिक नाही असे माझे मत आहे. (हरि, ९-२-१९४७, पृ. १९)

## प्रेसची शक्ती

प्रेसला लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणता येऊ शकते. त्याच्या शक्तिशाली असण्याबद्दल कोणताही संशय नाही, परंतु त्या शक्तीचा दुरुपयोग करणे एक अपराध आहे. मी स्वतः एक पत्रकार आहे आणि माझ्या पत्रकार साथीदारांना माझी विनंती आहे की त्यांनी आपली जबाबदारी लक्षात घ्यावी आणि आपले काम करताना सत्य समोर आणायचे आहे व त्यालाच आश्रय द्यायचा आहे हा विचार त्यांनी लक्षात असू द्यावा. (हरि, २७-४-१९४७, पृ. १२८)

वृत्तपत्राचा परिणाम फार जबरदस्त होत असतो. ज्यामुळे जनता भडकेल अशी एकही खोटी बातमी वा खोटा अहवाल आपल्या वृत्तपत्रातून प्रकाशित होऊ

नये हे पाहणे संपादकाचे कर्तव्य आहे.

संपादकांनी व त्यांच्या सहायकांनी बातम्या व त्या देण्याची पद्धती याबद्दल अतिशय सावध राहिले पाहिजे.

स्वातंत्र्याच्या वातावरणात प्रेसवर नियंत्रण ठेवणे शासनाकरिता जवळपास अशक्य आहे. वृत्तपत्रांवर बारीक नजर ठेवून त्यांना योग्य मार्गावर आणण्याची जबाबदारी जनतेची आहे. भडकवणा-या वा अश्लील वृत्तपत्रांना सुज्ञ जनता संरक्षण देणे बंद करील. (हरि, १९-१०-१९४७, पृ. ३७८)

कोणत्याही छापलेल्या गोष्टीला लोक दैवी सत्य समजतात. यामुळे बातम्या लिहिणारांची जबाबदारी अजूनच वाढते. (हरि, २-११-१९४७, पृ. ३९१)

मी स्वतः वृत्तपत्रांतील अहवालांवर फारसा विश्वास ठेवत नाही आणि वृत्तपत्रांच्या पाठकांनाही सावधगिरीची सूचना देऊ इच्छितो की त्यांनी मुद्रित कहाण्यांनी फारसे प्रभावित होऊ नये. चांगल्यात चांगली वृत्तपत्रेही अतिशयोक्ती आणि आलंकारिक भाषा यांच्या मोहापासून सुटू शकत नाहीत. (हरि, ३०-११-१९४७, पृ. ४४७)

## २७. पोषाख

माझा संकुचित राष्ट्रवाद हॅट घालण्याच्या विरोधात विद्रोह करण्याकरिता मला प्रेरित करतो परंतु माझा सुप्त आंतरराष्ट्रवाद सोलो हॅट ही युरोपने दिलेल्या काही देणग्यांमधील एक आहे असे मानतो. जर हॅटच्या विरोधात इतका राष्ट्रीय पूर्वग्रह नसता तर सोलो हॅटला लोकप्रिय बनवण्याकरिता संघटित झालेल्या एखाद्या संस्थेचा मी अध्यक्ष झालो असतो.

या देशातील हवामानात अनावश्यक, आरोग्याकरिता हानिकारक आणि विद्रूप पॅन्टचा भारताच्या शिक्षित वर्गाने केलेला स्वीकार आणि सोलो हॅटचा स्वीकार करण्यात त्याने दाखवलेला संकोच ही चूक आहे परंतु मला माहीत आहे की राष्ट्रीय आवडनावड विवेकाने ठरत नसते. (यंग, ६-६-१९२९, पृ. १९२)

मी राष्ट्रीय पोषाख याकरिता घालतो की तो पोषाख पूर्णपणे स्वाभाविक आणि एका भारतीयाकरिता शोभणारा आहे. माझे मत आहे की पश्चिमेच्या पोषाखाची आपण जी नक्कल करतो आहोत ती अवनती, अपमान आणि दुर्बलता यांचे चिन्ह आहे आणि भारताच्या हवामानाला सर्वाधिक अनुकूल, स्वस्त आणि साध्या पोषाखाचा अस्वीकार करून आपण राष्ट्रीय पाप करत आहोत. या पोषाखाची

बरोबरी जगातील कोणताही पोषाख करत नाही. त्याचबरोबर हा पोषाख आपल्याला स्वच्छ राहण्याकरिताही मदत करतो. खोटा गौरव आणि प्रतिष्ठेच्या खोट्या भावनेचा अडथळा नसता तर इंग्रजांनी ब-याच आधी भारतीय पोषाखाचा स्वीकार केला होता.

पावित्र्याचा विचार करून मी जोडे घालत नाही आणि मला असेही वाटते की जोडे न घालणे जास्त स्वाभाविक आणि आरोग्यदायी आहे.(स्पीरा, पृ. ३९३-४)

## २८. पाप आणि पापी

मला माझ्या पापांच्या परिणामांपासून सुटका नको आहे. माझी इच्छा आहे की स्वतः पापापासूनच वा त्याच्या विचारापासूनच मला मुक्ती मिळावी. जोपर्यंत हे उद्दिष्ट साध्य होत नाही तोपर्यंत मला स्वस्थ वाटणार नाही. (ए, पृ. ९०)

पारंपरिक समज असा आहे की पापांपासून पुढील जन्मात मुक्ती मिळत असते. मला तुम्हाला सांगायचे आहे की आपण काही आवश्यक अटी पूर्ण केल्या तर मुक्ती.... इथेच आणि आताच मिळू शकते. पहिली अट आहे आत्मशुद्धी आणि दुसरी अट आहे ईश्वरीय नियमांचे पालन करणे. या जन्मात आपण पापाचे ओझे डोक्यावर वागवत असलो तरी ईश्वर मुक्तिदाता असल्यामुळे पुढील जन्मात तो आपले रक्षण अवश्य करील अशी आशा करणे व्यर्थ तसेच नैतिक पतनाचे चिन्ह आहे. जर एखादा व्यापारी खोटे बोलत असेल व आपल्या साध्यासरळ अडाणी ग्राहकांना फसवत असेल तर आपल्या पापांपासून मुक्त होण्याची आशा तो करू शकत नाही. (हरि, २-६-१९४६, पृ. १६६)

### दोषांची कबुली

आपल्या दोषांची कबुली एखाद्या झाडूसारखी आहे. झाडू धूळ आणि माती झाडून काढतो व त्यामुळे आंगण आधीपेक्षाही स्वच्छ दिसते. (यंग,१६-२-१९२२,पृ.१०२)

शुद्ध अंतःकरणाने दिलेली पापाची कबुली आणि त्याचबरोबर हे पाप परत करणार नाही असे दिलेले वचन या गोष्टी ज्याला मान्य करण्याचा अधिकार आहे अशा माणसासमोर करण्यात आल्या तर ते पश्चात्तापाचे शुद्धतम रूप होईल. (ए, पृ.२०-१)

ज्या व्यक्तीने आपल्या भूतकाळाशी संबंध तोडले आहेत ती व्यक्ती एक वेगळीच व्यक्ती होते. मागील चुकांचा आता तिला स्पर्श होत नसल्यामुळे त्या

कबूल करण्याची तिला लाज वाटत नाही. (यंग, ६-१०-१९२७, पृ. ३४०)

कोणताही आजारी आपला आजार लपवून ठेवू शकत नाही. जर तो असे करील तर तो स्वतःचाच शत्रू होईल. (यंग, २-२-१९२८, पृ. ३७)

ईश्वराच्या दृष्टिकोनातून पापी आणि संत सारखेच असतात. दोघांनाही सारखाच न्याय मिळतो व प्रगती आणि अधोगती यांची दोघांनाही सारखीच संधी असते. दोघेही ईश्वराची अपत्ये असतात व ते त्याची निर्मिती असतात. जो संत स्वतःला पापीपेक्षा श्रेष्ठ समजतो तो आपले संतपण गमावतो व त्याची अवस्था पाप्यापेक्षाही वाईट होते. कारण असे आहे की अहंकारी संताला ज्ञान असते तर पाप्याला मात्र आपण काय करतो आहोत तेही माहीत नसते. (हरि, १४-१०-१९३३, पृ. ५)

मी माझी अनेक पापे उघडपणे मान्य केली आहेत. त्यांचे ओझे खांद्यावर घेऊन मी फिरत नाही. जर मी ईश्वराच्या दिशेने वाटचाल करत असेन, जसे की मला जाणवते, तर मी सर्व प्रकारे सुरक्षित आहे. मला ईश्वराच्या उपस्थितीची ऊब जाणवते. मी स्वतःला सुधारण्याकरिता साधेपणा, उपवास, प्रार्थना यांच्यावर अवलंबून राहिलो तर त्यांचा काहीच उपयोग नाही हे मला माहीत आहे. परंतु आपल्या निर्मात्याच्या मांडीवर आपले थकलेभागलेले डोके टेकवायला व्याकुळ असलेल्या आर्त आत्म्याच्या हाकेचे प्रतिनिधित्व जर या गोष्टी करत असतील तर या सर्व गोष्टींचे मूल्य अमाप आहे असे मी समजेन.
(हरि, १८-४-१९३६, पृ.७७)

माणूस प्रमादशील प्राणी आहे. आपल्या चुका कबूल करून आपण आपल्या चुकांना प्रगतीपथावरील पाय-यांमध्ये रूपांतरित करतो. याउलट जी व्यक्ती आपल्या चुका लपवण्याचा प्रयत्न करते ती जिवंत फसवणूक बनते व तिचा अधःपात होतो. माणूस ना तर पशू आहे ना ईश्वर. तो ईश्वराची अशी निर्मिती आहे की जो ईश्वराच्या ईश्वरत्वाला प्राप्त करण्याचा प्रयत्न करू शकेल. पश्चात्ताप आणि आत्मशुद्धी या दोन गोष्टी ईश्वरप्राप्तीची साधने आहेत. ज्या क्षणी आपण आपल्या चुकांबद्दल पश्चात्ताप व्यक्त करतो व त्याकरिता ईश्वराची क्षमा मागतो त्या क्षणी आपण पापमुक्त होतो व आपल्या नवजीवनाला सुरुवात होते. खरा पश्चात्ताप प्रार्थनेची अनिवार्य अट आहे. (हरि, २१-४-१९४६, पृ.९४)

केवळ तोंडदेखली निंदा करून कोणतेही पाप धुतले जाऊ शकत नाही. (हरि,२३-६-१९४६, पृ. २००)

चुकीची वा पापाची कल्पना येताच त्याची स्वीकृती दिल्याने आपण त्यापासून

मुक्त होतो. (हरि, २०-१०-१९४६, पृ. ३६७)

## २९. पुनर्जन्म

माझा पूर्वजन्म आणि पुनर्जन्मावर विश्वास आहे. आपले सर्व संबंध मागील जन्मातील संस्कारांचे परिणाम आहेत. ईश्वराचे नियम फार गूढ असतात. त्यावर सतत संशोधन होते आहे परंतु त्यांचा शोध कोणालाही लागू शकणार नाही. (हरि, १८-८-१९४०, पृ. २५४)

## ३०. पुरोहित

खरे पाहता ज्या पुरोहितांनी धर्माचे रक्षण करायला पाहिजे होते तेच त्याला नष्ट करण्याकरिता साधनीभूत झाले असल्याचे सिद्ध झाले हे ऐतिहासिक सत्य आहे व ही फार दुःखद गोष्ट आहे. (यंग, २०-१०-१९२७, पृ. ३५३)

## ३१. प्रयोग

स्वतःवर आणि इतरांवर प्रयोग करूनच मी पुढे जाऊ शकतो. ईश्वराच्या संपूर्ण एकत्वावर माझा विश्वास आहे. यामुळेच मानवजातीवरही माझी श्रद्धा आहे. आपले देह वेगवेगळे असले तरी काय फरक पडतो? आपल्यामध्ये आत्मा तर एकच आहे. वक्रीभवनामुळे अनेक सूर्यकिरणे दिसतात, परंतु त्यांचा स्रोत एकच आहे. यामुळेच दुष्टाहून दुष्ट आत्म्यापासूनही मी स्वतःला वेगळा करू शकत नाही (आणि मोठ्यात मोठ्या आत्म्याशी एकरूप होण्यापासून मला वंचित करण्यात येऊ नये). यामुळेच संपूर्ण मानवजातीला आपल्या प्रयोगात मी सामील करून घेतले पाहिजे. प्रयोगाशिवायही मी राहू शकत नाही. अखेरीस जीवनही प्रयोगांची एक अखंड शृंखलाच आहे. (यंग, २५-९-१९२४, पृ. ३१३)

## ३२. परलोकविद्यावाद अथवा प्रेतात्मवाद

मला प्रेतात्म्यांकडून कधीही संदेश प्राप्त होत नाहीत. अशा संदेशांवर अविश्वास करण्याचा माझ्याजवळ कोणताही पुरावा नाही. परंतु असे संदेश मिळवण्याला वा ते मिळवण्याचा प्रयत्न करण्याला माझा सक्त विरोध आहे. अशा प्रकारचे प्रयत्न बहुधा धोका देणारे आणि कल्पनेचे खेळ असतात.

आपण जरी मान्य केले की प्रेतात्म्याकडून संदेश येऊ शकतात तरी असे

करणे माध्यम आणि मृतात्मा या दोघांकरिताही हानिकारक आहे. यामुळे प्रेतात्मा पृथ्वीकडे आकर्षित होतो व पृथ्वीशी बांधला जातो, जिथे पृथ्वीपासून मुक्त होऊन अधिकाधिक लांब जाण्याचा त्याचा प्रयत्न असला पाहिजे. शरीर सोडले की अपरिहार्यपणे आत्मा आधीपेक्षा शुद्ध होतो असे नाही. पृथ्वीवर असताना त्याच्यामध्ये जी नैतिक दुर्बलता होती ती तो आपल्यासोबत घेऊन जात असतो. यामुळे त्याने दिलेली माहिती खरी वा योग्यच असली पाहिजे असे काही नाही.

प्रेतात्म्याला पृथ्वीवर राहणा-याशी बोलावेसे वाटावे ही काही आनंदाची गोष्ट नाही. याऐवजी आत्म्याला अशा प्रकारच्या आसक्तीपासून मुक्त होण्याची इच्छा असली पाहिजे. प्रेतात्म्याला होणा-या हानीच्या संदर्भात मी या ठिकाणी बोलतो आहे.

जोपर्यंत माध्यमाचा प्रश्न आहे माझ्या अनुभवात जितकी प्रकरणे आली त्या सर्वांमध्ये प्रेतात्म्यांचा संदेश ग्रहण करण्याच्या काळात अथवा तसे करण्याचा आभास होण्याच्या काळात माध्यमाची मनःस्थिती एक तर चांगली नव्हती वा ते दुर्बलमनस्क होते हे मला चांगले माहीत आहे. प्रेतात्म्याचा संदेश ग्रहण करणा-या माझ्या कोणा मित्राचा काही फायदा झाला असल्याचे मला माहीत नाही. (यंग, १२-९-१९२९, पृ. ३०२)

## ३३. विमा

....मला असे वाटत होते की जीवनविम्याचा अर्थ आहे भीती आणि ईश्वरावरील श्रद्धेचा अभाव.... माझ्या जीवनाचा विमा करून मी पत्नी आणि मुलांना स्वावलंबी होण्यापासून वंचित केले होते. जगातील असंख्य निर्धन कुटुंबांची काय अवस्था होते? त्यांनी आपल्या कुटुंबाची काळजी घ्यावी अशी अपेक्षा का करू नये? मी स्वतःला त्यांच्यातील एक का समजू नये? माझा मृत्यू कुटुंबातील इतर सदस्यांच्या आधी होईल असे समजण्याचा मला काय अधिकार होता? अखेरीस माझ्या कुटुंबाचा खरा रक्षक ना मी होतो, ना माझे भाऊ होते, खरा रक्षक तर सर्वशक्तिमान ईश्वर आहे. (ए, पृ. १९३)

## ३४. आहार

....चरित्रनिर्मितीकरिता वा देहदमनाकरिता आहाराला जे अतिरिक्त महत्त्व दिले जाते ते चूक आहे. हे खरे आहे की आहार एक शक्तिशाली तत्त्व आहे

व त्याची उपेक्षा करता येऊ शकत नाही. परंतु आहारालाच धर्माचे सर्व काही मानणे, जसे की भारतात केले जाते, तितकेच चूक आहे जितके आहारासंबंधीच्या सर्व प्रकारच्या संयमांचा त्याग करणे आणि आपल्या जिभेच्या स्वादात काहीच कमतरता न ठेवणे. शाकाहारवाद हिंदू धर्माची अमूल्य देणगी आहे. तिचा असाच त्याग करणे योग्य नाही. यामुळे शाकाहारी असल्यामुळे आपली बुद्धी वा शरीर दुर्बल झाले आहे वा आपण आळशी झालो आहोत हा चुकीचा भ्रम दूर करणे आवश्यक आहे. सर्व महान हिंदू सुधारक आपल्या पिढीतील अतिशय सक्रिय व्यक्तींमधील होते व ते सर्व शाकाहारी होते. शंकर वा दयानंद यांच्यापेक्षा अधिक सक्रिय त्यांच्या पिढीत कोण राहिले असावे?

....आहारातील पदार्थाच्या निवडीचा धर्माशी काहीही संबंध नाही. ही अशी बाब आहे की जिचा निर्णय प्रत्येक व्यक्तीने आपल्या विवेकाप्रमाणे केला पाहिजे. इतक्यात शाकाहारवादावर बरेच साहित्य समोर आले आहे, विशेषतः पश्चिमेत. ते वाचून सत्यशोधकाचा फायदा होऊ शकतो. अनेक नामवंत चिकित्सकांनी या साहित्यात आपली भर घातली आहे. भारतात शाकाहाराला प्रोत्साहन देण्याची आवश्यकता कधीच पडली नाही. कारण आतापर्यंत या गोष्टीला सर्वात वांछनीय आणि आदरणीय मानण्यात आले आहे. ज्या लोकांच्या मनात संभ्रम आहे त्यांनी पश्चिमेकडे वाढत असलेल्या शाकाहारवादात रस घेऊन त्याचा अभ्यास केला पाहिजे. (यंग, ७-१०-१९४६, पृ. ३४७)

## जगण्याकरिता खाणे

माणसाने रसनेच्या तृप्तीकरिता नाही तर शरीराच्या रक्षणाकरिता खाल्ले पाहिजे. जेव्हा आपले प्रत्येक इंद्रिय शरीराची व शरीराच्या माध्यमातून आत्म्याची सेवा करू लागते तेव्हा त्या इंद्रियांची व्यक्तिगत आवड शून्यवत होते व ते त्या पद्धतीने कार्य करू लागतात, ज्या पद्धतीने कार्य करण्याकरिता निसर्गाने त्यांना बनवले आहे.

निसर्गाबरोबर हा सुसंवाद साधण्याकरिता कितीही प्रयोग केले व त्याग केला तरी तो कमीच असेल. परंतु दुर्दैवाने आज हवा उलट दिशेने वाहते आहे. या नश्वर शरीराला सजवण्याकरता व काही क्षणांनी त्याचे अस्तित्व लांबवण्याकरिता अनेक जिवांचा बळी देताना आपल्याला लाज वाटत नाही. याचा परिणाम असा होतो की आपण स्वतःला - शरीराला व आत्म्याला - मारून टाकतो. एक जुना

आजार दुरुस्त करण्याकरिता आपण असंख्य नवीन आजार विकत घेतो आहोत. अधिकाधिक इंद्रियभोग घेण्याच्या प्रयत्नात आपण इंद्रियभोग घेण्याची शक्तीच गमावून बसतो आहोत. हे सर्व आपल्या डोळ्यांसमोरच होत आहे परंतु दिसत असूनही जे पाहू इच्छीत नाहीत त्यांचे काय करायचे?
(ए, पृ. २३७)

माणूस जसे खातो तसेच त्याचे मन बनते या उक्तीत बरेच सत्य आहे. भोजन जितके स्थूल असेल शरीरही तितकेच स्थूल असेल. (हरि, ५-८-१९३३, पृ. ४)

**मांसाहार**

मादक पेय आणि तशाच प्रकारचे खाद्यपदार्थ विशेषतः मांस हे पदार्थ आहारात नसले तर आध्यात्मिक विकासात निःसंदेह मदत होते. परंतु कोणत्याही दृष्टीने हे स्वतः साध्य नाहीत. अनेक लोक मांसाहार करतात, परंतु ईश्वराची भीती बाळगत ते जगत असतात. असे लोक त्या लोकांपेक्षा आपल्या मुक्तीच्या किती तरी जवळ असतात जे मांसाहार आणि इतर अनेक पदार्थ त्याज्य मानतात परंतु आपल्या प्रत्येक कृत्यातून ईश्वराची निंदा करतात. (यंग, ६-१०-१९२१, पृ. ३१८)

चूक असो वा बरोबर माणसाने मांस, अंडी आदींचे सेवन करू नये हा माझ्या धार्मिक विश्वासाचा भाग आहे. स्वतःला जिवंत ठेवण्याच्या साधनांनाही काही सीमा असली पाहिजे. काही गोष्टी तरी अशा असल्या पाहिजे ज्या प्राण वाचवण्याकरिताही आपण करणार नाही. (ए, पृ. १८०)

कोणत्याही अवस्थेत, सामान्यपणे मनुष्य जिवंत राहू शकेल अशा कोणत्याही वातावरणात मांसाहार आवश्यक नाही असे माझे मत आहे. माझे मत असे आहे की मांसाहार माणसाकरिता नाही. आपण जर कमी श्रेणीच्या पशुंपेक्षा श्रेष्ठ आहोत तर मग आपण त्यांचे अनुकरण करू नये. ज्यांना आपल्या मनोविकारांवर नियंत्रण मिळवायचे असेल त्यांच्याकरिता मांसाहार अनुकूल नाही असे अनुभव सांगतो (यंग, ७-१०-१९२६, पृ. ३४७)

आपल्या शरीराच्या रक्षणाकरिता आपण आपल्या सहचर प्राण्यांची हत्या बंद करावी अशी अपेक्षा कोणत्या ना कोणत्या अवस्थेत आध्यात्मिक प्रगती आपल्याकडून करते असा माझा अनुभव आहे. (इंके, पृ. ४०२-३)

**शाकाहार**

मी शुद्ध शाकाहाराच्या बाजूने आहे. परंतु अनुभवाने मला शिकवले आहे की पूर्ण

निरोगी राहण्याकरिता शाकाहारी जेवणात दूध आणि दही, लोणी आणि तूप तसेच दुधापासून बनलेल्या वस्तूंचा समावेश असणे आवश्यक आहे....

परंतु माझे असे मत आहे की या विशाल वनस्पतिजगात अशी कोणती तरी गोष्ट नक्कीच असली पाहिजे जिच्यातून दूध आणि मांसातून मिळतात ते आवश्यक तत्त्व मिळतील व जी इतर नैतिक दोषांपासून मुक्त असेल.

माझ्या मते दुधाचे वा मांसाचे सेवन करण्यात निश्चित दोष आहे. मांसाकरिता आपल्याला जीवहत्या करावी लागते. जोपर्यंत दुधाचा संबंध आहे आपल्याला आपल्या शैशवावस्थेत आईकडून जे दूध मिळते त्याशिवाय इतर कोणत्याही दुधावर आपला अधिकार नाही. नैतिक दोषाशिवाय दुधात आरोग्याच्या दृष्टिनेही अनेक दोष आहेत. दूध आणि मांस यांचे सेवन केल्यामुळे आपल्यामध्ये त्या पशूचेही दोष येतात ज्याच्यापासून ते दूध वा मांस मिळते.

भुकेमुळे जेवणाला जी चव येते ती चव जगातील कोणत्याही स्वादिष्टाहून स्वादिष्ट पदार्थात असू शकत नाही. (कीहै, पृ. १४-१६)

माझे निश्चित मत आहे की माणसाला शैशवावस्थेत आपल्या आईकडून मिळालेल्या दुधानंतर अजून दुधाची गरज पडायला नको. त्याच्या जेवणात केवळ झाडावर पिकलेली फळे आणि मेवा असला पाहिजे. अंगुरासारखी फळे आणि बदामासारखा मेवा यांच्यापासून मांसपेशी आणि स्नायू यांच्याकरिता पुरेसे पोषण मिळाले पाहिजे. जी व्यक्ती अशा आहारावर राहते तिच्याकरिता कामवासना आणि इतर विकारांवर संयम ठेवणे सोपे होते. (ए, पृ. २००)

## आहारविषयक संशोधन

व्यक्ती सवयीमुळे मांस वा अजून काही नाही तर दूध व दुधापासून तयार केलेल्या पदार्थावर अवलंबून असते. नाही तर वनस्पतिजगतात माणसाला पूर्ण निरोगी ठेवण्याची असीमित क्षमता आहे - हा विषय असा आहे की ज्याला आयुर्विज्ञानाने अजून स्पर्श केलेला नाही. या कर्तव्याची जबाबदारी शाकाहारी परंपरा असलेल्या भारताच्या आयुर्विज्ञानतज्ज्ञांना पार पाडायची आहे. जीवनसत्वांच्या बाबतीत वेगाने होणारे संशोधन आणि अधिकांश जीवनसत्वे सरळ सूर्यापासून ग्रहण करण्याची शक्यता यांच्यामुळे आहाराविषयी आयुर्विज्ञानाद्वारे प्रतिपादित अनेक सिद्धान्त आणि विश्वास यांच्यामध्ये क्रांतिकारक परिवर्तन आणण्याचा मार्ग प्रशस्त झाला आहे. (यंग, १८-७-१९२९, पृ. २३६)

दीर्घ अनुभव आणि निरीक्षण यांच्यानंतर मी असा निष्कर्ष काढला आहे की सर्व प्रकारच्या शरीरांकरिता आहाराचा एकच नियम ठरवता येऊ शकत नाही. चांगल्यात चांगले चिकित्सकही एवढाच दावा करू शकतात की एखाद्या विशिष्ट बाबतीत विशिष्ट वस्तूमुळे विशिष्ट लाभ होण्याची शक्यता आहे. कारण अशाच प्रकरणी याचा फायदा झालेला आढळतो. विज्ञानाच्या इतर शाखांमध्ये संशोधन करत असताना तेवढ्या अडचणी येत नाहीत जेवढ्या आयुर्विज्ञानात येतात. कोणतेही विशेष औषध वा खाण्याच्या वस्तूचा प्रभाव वा मानव शरीरावर त्याचा परिणाम याबद्दल खात्रीपूर्वक काहीही सांगण्याची आयुर्विज्ञान हिंमत करू शकत नाही. हा विषय नेहमीच अनुभवाधारित राहील. एक लोकप्रिय म्हण आहे की एका माणसाचा आहार दुस-याकरिता विष ठरू शकते.. ही म्हण अतिशय व्यापक अनुभवावर आधारित आहे व याचे पुरावे दररोज मिळत असतात. अशा स्थितीत बुद्धिमान स्त्री-पुरुषांकरिता संशोधनाचे हे असीमित क्षेत्र उघडे आहे. शरीराच्या आत बसलेल्या आत्म्याच्या विकासात शरीराची भूमिका महत्त्वाची असल्यामुळे सर्वसामान्य माणसाला शरीराचे कामापुरते ज्ञान असलेच पाहिजे आणि असे असतानाही शरीराबद्दल आपण जितके बेफिकीर असतो तितके इतर कोणत्याच बाबतीत नसतो. (यंग, ८-८-१९२९, पृ. २६१)

माझे निवेदन आहे की वैज्ञानिकांनी आतापर्यंत माणसाला अधिकात अधिक पोषण देण्यासंबंधात बिया, पाने, फळे यांच्या सुप्त क्षमतांचा शोध लावलेला नाही. एक गोष्ट अशीही आहे की मांस इत्यादींच्या ओढीमुळे त्याच्याशी ज्यांचे जबरदस्त हितसंबंध गुंतलेले आहेत ते वैज्ञानिकांना याच्या मुळापर्यंत जाऊ देत नाहीत. (यंग, १५-८-१९२९, पृ. २६५)

## नैतिक आधार

शाकाहाराबद्दल पूर्ण निष्ठा ठेवण्याकरिता माणसाला काही नैतिक आधार पाहिजे.... कारण की तो आत्म्याच्या निर्मितीकरिता आहे शरीराच्या नाही. माणूस केवळ मांसच नाही. आपला संबंध त्याच्या आत बसलेल्या आत्म्याशी आहे. यामुळेच माणसाचा जन्म मांसाहारी पशू म्हणून झालेला नाही तर पृथ्वीवर निर्माण झालेली फळे आणि भाज्या यांच्यावर निर्वाह करण्याकरिता झालेला आहे असा शाकाहारींचा नैतिक आधार असला पाहिजे. (हरि, २०-२-१९४९, पृ. ४३०-१)

अहिंसा केवळ आहारविज्ञानाचा विषय नाही. ही त्याच्या पलीकडील गोष्ट

आहे. माणूस काय खातोपितो याला तेवढेसे महत्त्व नसून त्याच्यामागे जो स्वार्थत्याग आणि आत्मसंयम असतो त्याला महत्त्व आहे. आपल्या जेवणातील वस्तूंच्या निवडीबाबत जितका संयम ठेवता येत असेल तेवढा आनंदाने ठेवा. संयम प्रशंसनीय आहे, आवश्यकही आहे परंतु अहिंसेला तो केवळ काठावरूनच स्पर्श करतो. हे शक्य आहे की आहाराच्या बाबतीत भरपूर स्वातंत्र्य घेणारी व्यक्ती अहिंसेची पुजारी असू शकेल व आपल्याकरिता आदरणीय. आणि जर तिचे हृदय प्रेमाने दुथडी भरून वाहत असेल व इतरांच्या पीडेने ती व्याकुळ होत असेल आणि वासनेवरही तिने विजय मिळवला असेल तर आपण तिच्याकडे नक्कीच आदराच्या दृष्टीने पाहू. दुसरीकडे आहाराच्या बाबतीत नेहमीच अतिशय काळजी घेणारी व्यक्ती स्वार्थ आणि वासनांची दास असेल व ती कठोरहृदयी असेल तर ती व्यक्ती अहिंसेच्या जवळपासही गेलेली नाही व अतिशय हलकट स्वभावाची आहे असे म्हणावे लागेल. (यंग, ६-९-१९२८, पृ.,३००-१)

हीसुद्धा आठवण ठेवली पाहिजे की केवळ जीवदयेनेच आपण काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर या षड्रिपूंवर विजय मिळवू शकत नाही.... जी व्यक्ती मुंग्या आणि किड्यांना रोज खाऊ घालते आणि जीवहत्याही करत नाही परंतु कामक्रोधात जी आकंठ बुडालेली असते तिच्यात प्रशंसनीय असे काहीही नसते. तिची जीवदया एक यांत्रिक कृती आहे व तिला काहीही आध्यात्मिक मूल्य नाही. उलट खरे सांगायचे तर ते यांत्रिक कामापेक्षाही वाईट काम आहे - आतील भ्रष्टाचार लपवण्याकरिता घेतलेले ते आवरण आहे.(यंग,१५-९-१९४०,पृ.२८५)

## ३५. मताधिकार

.... प्रौढ मताधिकाराचे मी पूर्णपणे समर्थन करतो.... प्रौढ मताधिकार अनेक कारणांनी आवश्यक आहे; माझ्या दृष्टिकोनातून निर्णायक कारण असे आहे की यामुळे केवळ मुसलमानांच्याच नव्हे तर तथाकथित अस्पृश्य, ख्रिश्चन, मजूर आणि इतर सर्व वर्गांच्या आकांक्षांची पूर्ती होते. जी व्यक्ती चारित्र्यसंपन्न आहे परंतु जिच्याजवळ पैसा नाही वा जी निरक्षर आहे व म्हणून तिला मताधिकार नसावा अथवा जी व्यक्ती रात्रंदिवस घाम गाळून प्रामाणिकपणाने आपला उदरनिर्वाह करते परंतु निर्धन असण्याच्या अपराधाकरिता तिला मताधिकार मिळू शकत नाही ही गोष्ट सहन करण्यासारखी नाही. (यंग, ८-१०-१९३१, पृ. २९७)

## ३६. महानता

कोणत्याही व्यक्तीच्या जिवंतपणी तिच्या सुखी असण्याविषयीचा निर्णय देण्यात सोलनला अडचण जाणवली होती; अशा परिस्थितीत माणसाच्या महानतेबद्दल निर्णय देणे किती कठीण काम असू शकते? खरा मोठेपणा पर्वतावर बसून लोकांना दर्शन देत नसतो. याउलट माझ्या सत्तर वर्षांच्या अनुभवाने मला शिकवले आहे की जे खरोखर महान असतात त्यांच्याबद्दल त्यांच्या जिवंतपणी लोकांना क्वचितच काही माहीत असते. ख-या मोठेपणाचा निर्णायक ईश्वरच असू शकतो कारण तोच आपली मने ओळखत असतो. (हरि, १०-१२-१९३८,पृ.३७७)

## ३७. आईवडील

मला असा एकही सुपुत्र दिसला नाही की ज्याला आपली आई म्हातारपणामुळे कुरूप दिसते. शुद्ध सोन्यावर एकदा मुलामा चढवणे शक्य होईल परंतु आपल्या वडिलांना सुशोभित करू शकेल असा एकही मुलगा अजून जन्माला आला नाही. (यंग, हरि, ३-८-१९४७, पृ. २६०)

## ३८. मृत्यू

अनेक वर्षांपासून मी या विधानाबद्दल बौद्धिक सहमती व्यक्त करत आलो आहे की मृत्यू म्हणजे जीवनात येणारे एक मोठे परिवर्तन आहे, यापेक्षा अधिक काहीही नाही आणि जेव्हा तो येईल तेव्हा आपण त्याच्या स्वागताकरिता तयार राहिलो पाहिजे. मी विचारपूर्वक मृत्यूसहित सर्व भीतींपासून दूर राहण्याचा भरघोस प्रयत्न केला आहे.

मला माझ्या जीवनातील ते प्रसंग आठवतात जेव्हा मी जवळ आलेल्या मृत्यूमुळे तसाच खुश झालो होतो जसा हरवलेल्या मित्राला भेटण्यामुळे आनंद होतो. दृढ बनण्याच्या सर्व प्रयत्नांनंतरही माणूस बहुधा दुबळाच राहतो आणि जे ज्ञान बुद्धीपर्यंत मर्यादित असते आणि हृदयात उतरत नाही ते जीवनाच्या अटीतटीच्या प्रसंगी उपयोगी पडत नाही.

अजून एक गोष्ट आहे. जेव्हा एखाद्या व्यक्तीला बाहेरून मदत मिळते व तो तिचा स्वीकार करतो तेव्हा त्याच्या आत्म्याची शक्ती बहुधा नाहीशी होऊन जाते. सत्याग्रहीने नेहमीच अशा प्रलोभनांपासून सावध राहिले पाहिजे. (ससा, पृ. १८६)

जीवन आणि मृत्यू या एकाच गोष्टीच्या दोन अवस्था आहेत, एकाच नाण्याच्या

दोन बाजू आहेत हे मला सूर्यप्रकाशासारखे स्पष्ट दिसत आहे. खरे पाहता मला सुख अथवा जीवन यांच्या तुलनेत मृत्यू अधिक समृद्ध असल्याचे जाणवते. संकट आणि यातना हे जीवनात मिठाप्रमाणे आहेत, त्यांच्याशिवाय जीवनाला काय अर्थ आहे? (यंग, १२-३-१९३०, पृ. ९५)

## मृत्यूची भीती

जर कोणी मला असे सांगितले की मृत्यूला चुकवण्याकरिता या वर्षाच्या अखेरपर्यंत तू हिमालयात जाऊन राहिले पाहिजे तर मी तसे मुळीच करणार नाही, कारण असे आहे की, माणसाने कितीही सावधगिरी बाळगली तरी मृत्यू अपरिहार्य आहे. मी भारतातील त्या निवडक लोकांपैकी एक आहे ज्यांना आपल्या प्रकृतीची काळजी कशी घ्यावी हे माहीत आहे हे तुम्ही लक्षात ठेवावे अशी माझी इच्छा आहे. माझ्याकडून कोणते काम करून घ्यायचे आहे ते ईश्वरालाच माहीत आहे. त्याला आपल्या कामाकरिता माझी जोपर्यंत आवश्यकता आहे त्या क्षणानंतर तो मला एकक्षणही जिवंत राहू देणार नाही. (हरि, १५-१-१९३८, पृ. ४१६)

मृत्यू एक सहचर व मित्र आहे. जे बहाद्दरीने मरतात त्यांना मरण प्रिय वाटत असते. (हरि, २०-४-१९४७, पृ. ११७)

मृत्यूला कोणीही घाबरू नये. प्रत्येक व्यक्तीकरिता मृत्यू अटळ आहे. परंतु आपण जर हसत हसत मरू तर आपल्याला नवजीवन मिळेल.
(हरि, २०-४-१९४७, पृ. १२०)

मृत्यूपासून वाचण्याकरिताच माणूस जिवंत राहत नसतो. जर कोणी असे करत असेल तर तो चूक करतो.

माणसाने मृत्यूवर अधिक नाही तर कमीत कमी जीवनाइतकेच प्रेम केले पाहिजे. तुम्ही म्हणू शकाल की ही एक कठीण गोष्ट आहे व तिच्याप्रमाणे वागणे हे तर अजूनच कठीण आहे. परंतु प्रत्येक चांगले काम कठीणच असते. उतरणे सोपे आणि बहुधा घसरण्याची भीती असलेले असते. जीवन तोपर्यंत जगण्यासारखे असते जोपर्यंत आपण मृत्यूला मित्र समजू, शत्रू कदापिही नाही.

जीवनातील प्रलोभनांना जिंकण्याकरिता मृत्यूची मदत मागा. भ्याड माणूस मृत्यू टाळण्याकरिता आपला सन्मान, पत्नी, पुत्री इत्यादी सर्वांचा बळी द्यायला तयार असतो. साहसी व्यक्ती स्वाभिमानाचा बळी देण्याऐवजी मृत्यूला कवटाळणे पसंत करते.

जेव्हा वेळ येईल तेव्हा - ज्याची कल्पना सहज करता येऊ शकते - माझ्या उपदेशाबद्दल तर्क करण्याची आवश्यकता मी ठेवणार नाही, तो मी स्पष्ट शब्दात लिहून जाईन. (हरि, ३०-११-१९४७, पृ. ४३७)

सर्वांना एक ना एक दिवस मरायचे आहे. मृत्यूपासून कोणाचीच सुटका नाही. मग त्याच्यापासून घाबरायचे कशाला? वास्तवात मृत्यू एक मित्र आहे व तो दुःखांपासून आपली सुटका करतो. (हरि, २५-१-१९४८, पृ. ५२९)

### मृत्युकर

मृत्युशुल्क का लावण्यात येऊ नये? करोडपतींच्या मुलांना, जी प्रौढ झालेली आहेत, आपल्या आईवडलांचे वारस असल्यामुळेच नुकसान सहन करावे लागते. यामुळे राष्ट्राचे दुहेरी नुकसान होते. माणसाच्या मृत्यूनंतर शिल्लक राहिलेल्या संपत्तीवर राष्ट्राचाच अधिकार असला पाहिजे. संपत्तीच्या ओझ्याखाली दबून उत्तराधिकारी आपल्या क्षमतांचा पूर्ण उपयोग करू शकत नाही व त्यामुळे राष्ट्राला उत्तराधिका-यांच्या क्षमतांनाही मुकावे लागते. (हरि, ३१-७-१९३७, पृ. १९७)

उत्तराधिकार म्हणून मिळणा-या संपत्तीवर माझा विश्वास नाही. श्रीमंतांनी आपल्या मुलांना असे शिक्षण दिले पाहिजे व अशा प्रकारे त्यांचे पालनपोषण केले पाहिजे की ते आपल्या पायावर उभे राहू शकतील. दुःखाची गोष्ट आहे की ते असे करत नाहीत. त्यांची मुले थोडेफार शिकतात, ते गरिबांचे गुणगान करणा-या काही कविताही ऐकवतात, परंतु आईवडलांकडून मिळणा-या संपत्तीचा उपयोग करताना त्यांना संकोच वाटत नाही व त्यांना दुःखाची जाणीवही होत नाही. (हरि, ८-३-१९४२, पृ. ६७)

## ३९. तरुणवर्ग

माझ्या आशेचे केंद्र देशातील तरुणवर्ग आहे. जे तरुण दुर्गुणाला बळी पडले आहेत.... तेही स्वभावाने वाईट नाहीत. ते असहायपणे आणि अविचाराने दुर्गुणांकडे आकर्षित झाले आहेत. आपल्यामुळे स्वतःचे व समाजाचे किती नुकसान होते आहे हे त्यांना कळले पाहिजे. त्यांना हेही कळले पाहिजे की कठोर अनुशासनात राहूनच ते स्वतःला व देशाला सर्वनाशापासून वाचवू शकतात. (यंग, ९-७-१९२५, पृ.२३९)

उच्चवर्गातील तरुणांना फॅशनचे जे वेड आहे ते पाहून मला फार वेदना होतात. पश्चिमेच्या या संमोहक झगमगाट करणा-या फॅशनचे गुलाम झाल्यामुळे

ते आपल्या गरीब देशबांधवांपासून किती दूर जात आहेत याची त्यांना क्वचितच जाणीव असावी. आपला हा तरुणवर्ग.... या खोट्या वैभवात फसून साधेपणाला जर विसरला तर ती एक महान राष्ट्रीय आपत्ती व शोकांतिका होईल हे मी विसरू शकत नाही. (यंग, ८-१२-१९२७, पृ. ४१६)

## ४०. वकील

आपण जर वकिलांच्या आणि न्यायालयांच्या मोहपाशात फसलो नाही आणि आपल्या हीन भावनांना आवाहन करून न्यायालयाच्या दलदलीत फसवण्याकरिता दलाल नसते तर आपले जीवन किती तरी सुखी झाले असते. न्यायालयात घिरट्या घालणा-या मोठ्यात मोठ्या व्यक्तीही न्यायालयातील वातावरण अतिशय घाणेरडे असल्याची साक्ष देतील. दोन्ही बाजूंनी खोट्या साक्षी उभ्या केल्या जातात व हे साक्षीदार पैशाकरिता वा मैत्रीकरिता आपला आत्मा विकण्याकरिता नेहमी तयार असतात. (यंग, ६-१०-१९२०, पृ. २-३)

मी खरी वकिली करणे शिकलो; माणसाचे गुण आणि त्याची चांगली बाजू यांचा शोध घेणे शिकलो; माणसाच्या हृदयात प्रवेश करणे शिकलो. वकिलाचे कर्तव्य वादी आणि प्रतिवादी यांच्यातील दरी मिटवणे आहे असे मला आढळले. हा धडा माझ्या अंतःकरणात इतका खोलवर रुजला की माझ्या वीस वर्षांच्या वकिलीच्या काळात माझा बहुतेक वेळ शेकडो खटल्यात दोन्ही बाजूंमध्ये तडजोड घडवून आणण्यातच गेला. यामुळे मी काहीच गमावले नाही. पैसा गमावला असेही मी म्हणू शकत नाही; आणि आत्मा तर मुळीच गमावला नाही. (ए, ९७)

### कायदा आणि सत्य

माझा हा विश्वास अजूनच दृढ झाला की वकिलीतही प्रामाणिकपणे वागून यश मिळू शकते. परंतु वाचकांनी लक्षात ठेवावे की वकिली करताना सत्यावर दृढ राहिल्यानंतरही वकिली पेशाच्या मूलभूत दोषांवर इलाज करता येऊ शकत नाही. (ए, पृ. २६९)

माझ्या वकिलीच्या काळात मी एकदाही विशुद्ध सत्य आणि प्रामाणिकपणा यांच्यापासून दूर झालो नाही. (यंग, २२-१२-१९२७, पृ. ४२१)

....जर तुम्हाला वकिली व्यवसायात आध्यात्मिकता आणायची असेल तर पहिली गोष्ट तुम्ही ही लक्षात ठेवली पाहिजे की तुमचा व्यवसाय तुमच्या

बटव्याचा गुलाम बनायला नको. दुर्दैवाने मात्र आज असेच पाहायला मिळत आहे. वास्तवात तो देशसेवेच्या उपयोगी पडला पाहिजे. आपल्यासमोर सर्व देशांमधील प्रख्यात वकिलांची अशी उदाहरणे आहेत की जे त्यागाचे जीवन जगले आणि आपल्या कायदेविषयक प्रतिभेचा संपूर्ण उपयोग त्यांनी देशसेवेकरिता केला. हे खरे आहे की यामुळे त्यांना गरिबीचे जीवन जगावे लागले....

### वकिलांचे कर्तव्य

....तुम्ही रस्किनच्या 'अनटू दिस लास्ट' या पुस्तकामध्ये देण्यात आलेल्या सूचनांचे पालन करू शकता. ते विचारतात, 'जर एखाद्या सुताराला आपल्या कामाचा मोबदला म्हणून मुश्किलीने पंधरा शिलींग मिळत असतील तर वकिलाला पंधरा पौंड का मिळावे?' वकिलीद्वारे वसूल करण्यात आलेली फी सर्वत्र अव्वाच्यासव्वा असते.... इंग्लंडमध्ये, आफ्रिकेत, जवळपास सर्व ठिकाणी मी असे पाहिले आहे की आपल्या व्यवसायाच्या दरम्यान वकील लोक कळत न कळत आपल्या अशिलाकरिता खोटे बोलत असतात. एका प्रतिष्ठित वकिलाने तर मला इथपर्यंत सांगितले होते की आपला अशील दोषी आहे हे माहीत असतानाही त्याचा बचाव करणे हे वकिलाचे कर्तव्य आहे. या विचाराशी मी सहमत नाही. न्यायाधीशासमोर खटला मांडायचा व त्याला सत्यापर्यंत पोहोचू द्यायचे हेच वकिलाचे कर्तव्य असते. दोषी व्यक्तीला निर्दोष सिद्ध करणे हे वकिलाचे कर्तव्य नाही. (यंग, २२-१२-१९२७, पृ. ४२७-८)

## ४१. विचारशक्ती

शुद्ध जीवन जगण्याची आकांक्षा असलेल्या व्यक्तीने माझ्याजवळून हा धडा घेतला पाहिजे की शरीराला जेवढा धोका अशुद्ध कर्माचा असतो बहुधा तेवढाच धोका अशुद्ध विचारांचाही असतो. (यंग, २५-८-१९२७, पृ. २७८)

माणसाला आपण जसे आहोत असे वाटत असते बहुधा तो तसाच होत असतो. जर मी तुम्हाला म्हणालो की अमुक काम मी करू शकणार नाही तर या गोष्टीची पूर्ण शक्यता असते की अखेरीस ते काम करण्याची क्षमता माझ्यामध्ये खरोखरच राहणार नाही. याउलट ते काम मी करू शकेन असा माझ्यात विश्वास असेल तर माझ्यात ते काम करण्याची जरी क्षमता नसेल तरी ते काम करण्याची क्षमता मी नक्कीच मिळवीन. (हरि, १-९-१९४०, पृ. २६८)

तुम्ही विचार करता तसेच होते. विचार तोपर्यंत पूर्ण होत नाही जोपर्यंत तो कर्मात परिणत होत नाही आणि कर्म तुमच्या विचाराची सीमा निश्चित करत असते. जेव्हा या दोघांमध्ये सामंजस्य निर्माण होते तेव्हा जीवन पूर्ण आणि स्वाभाविक होते. (हरि, ७-४-१९४६, पृ. ७२)

## ४२. व्यक्ती

व्यक्ती कितीही लहान असली तिला न्याय मिळणे ही माझ्या मते सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. इतर सर्व गोष्टी नंतर येतात. (यंग, १७-९-१९१९, पृ. १४९-५०)

## ४३. मद्य

भारतात मद्यपान न करण्याची सक्ती करण्यात येऊ नये व ज्या लोकांना पिण्याची इच्छा आहे त्यांच्याकरिता ती सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी या वरपांगी युक्तिवादाला तुम्ही फसू नका. राज्याचे काम लोकांच्या दुर्गुणांकरिता व्यवस्था करणे नाही. आपण बदनाम कोठ्यांचे नियमन करत नाही वा त्यांना परवाने देत नाही. चोरांना चोरी करण्याची सुविधा आपण देत नाही. मी मद्यपींना चोरांपेक्षा आणि कदाचित वेश्यावृत्तीपेक्षाही अधिक निंदनीय मानतो. हे दोन्ही दुर्गुण बहुधा दारूडेपणातूनच निर्माण होत असतात ना? (यंग, ८-६-१९२१, पृ. १८१)

दारू आजार जास्त आहे, दुर्गुण कमी. मला असे अनेक लोक माहीत आहेत जे हे व्यसन आनंदाने सोडायला तयार आहेत. आमच्या डोळ्यांसमोर दारूची बाटली आणू नका असे म्हणणारे लोकही मला माहीत आहे. परंतु बाटली दूर केल्यानंतरही त्यांच्यापैकी अनेक लोक चोरून दारू प्याले आहेत.... आजारी लोकांना त्यांच्या स्वतःपासून वाचवण्याचीच अनेकदा गरज पडत असते.
(यंग, ६-७-१९२१, पृ. २४०)

दारू आणि नशा आणणारी अनेक औषधे अनेक दृष्टीने मलेरियासारख्या आजारापेक्षाही जास्त हानिकारक आहेत कारण मलेरिया जिथे केवळ शरीराचे नुकसान करतो तिथे दारू शरीर आणि आत्मा या दोघांचेही शोषण करते.
(यंग, ३-३-१९२७, पृ. ६८)

### भिकेला लागणे

आपल्या देशात हजारो दारूडे असण्यापेक्षा भारत भिकेला लागलेला असणे मी सहन करीन. शहरे कोरडी होण्याची किंमत म्हणून भारताला अशिक्षित ठेवावे

लागले तर तेही मला चालेल. (यंग, १५-९-१९२७, पृ. ३०६)

जे राष्ट्र मद्यपानाला बळी पडलेले आहे त्याच्या हाती विनाशाशिवाय अजून काहीही लागू शकत नाही. या व्यसनामुळे पूर्णच्या पूर्ण साम्राज्य नष्ट झाली आहेत याची इतिहासातून साक्ष मिळू शकेल. भारतात श्रीकृष्णाच्या यदुवंशांचे पतन याच व्यसनामुळे झाले होते. रोमच्या पतनाच्या कारणात एक कारण निश्चितपणे हे व्यसनच होते. (यंग, ११-४-१९२९, पृ. ११५)

दारू माणसाच्या आत्म्याचा नाश करते व त्याला पशू बनवते. माणूस दारूच्या आहारी गेला की तो पत्नी, आई आणि बहीण यांच्यात फरक करू शकत नाही. मी असे लोक पाहिले आहेत की जे दारूच्या नशेत हे अंतरही विसरले. (हरि, ९-३-१९३४, पृ. ३०)

दारू प्याल्यामुळे बिचा-या दारू पिणारांचे जे नैतिक भौतिक नुकसान होते त्याच्या तुलनेत दारूपासून मिळणा-या अबकारी कराचे लाभ काहीच नाही, दारूबंदी केल्यामुळे या गरीब बिचा-या दारू पिणा-यांचा जो फायदा होईल त्यासमोर अबकारी करात होणारी हानी काहीच नाही याबद्दल मला काहीही संशय नाही. अबकारी कराच्या बाजूने करण्यात येणारा दुसरा युक्तिवाद असा आहे की सैन्याचा खर्च भरून काढण्याकरिता हा कर आवश्यक आहे. नवभारताच्या दृष्टीने हा युक्तिवादही व्यर्थ आहे कारण यापुढे हे ओझे राहणारच नाही. यामुळे अबकारी करापासून मिळणा-या उत्पन्नाचा निःसंकोचपणे ताबडतोब त्याग केला पाहिजे. या उत्पन्नाच्या नुकसानाची भीती या आवश्यक सुधारणेच्या विचाराच्या आड येऊ देता कामा नये....

मद्यनिषेधाच्या नकारात्मक बाजूबरोबरच सकारात्मक बाजूवरही लक्ष देणे आवश्यक आहे. सकारात्मक बाजू ही आहे का मद्यपींकरिता वैकल्पिक आरोग्यदायी आकर्षणांची व निर्दोष मनोरंजनाची व्यवस्था केली पाहिजे. (हरि, १५-९-१९४६, पृ.३१३)

## ४४. श्रमविभाजन

श्रमविभाजन आवश्यक आहे. एकाच व्यक्तीने सर्व काम करणे उचित नाही; आणि संघटित कार्यप्रणालीकरिता तर ही गोष्ट निश्चितपणे बाधक आहे. ब्रिटिश शासनव्यवस्था काही व्यक्तिगत संघटना नाही. 'राजा दिवंगत झाला, राजा चिरायू होवो' असे याकरिता म्हणण्यात आले आहे की 'राजाकडून कोणतीही चूक होऊ

शकत नाही'. एक व्यक्ती म्हणून राजा धूर्त असू शकतो परंतु संघटनेवर तो विराजमान झाल्यानंतर त्याला तेवढेच पूर्ण मानले जाते जितका त्या समाजाने 'पूर्ण' या शब्दाचा अर्थ घेतला असेल.

मथितार्थ हा आहे की कोणत्याही प्रगतिशील संघटनेच्या सुरुवातीच्या काळात तिचा प्रमुख कितीही अकार्यक्षम असला तरी त्याचे वर्तन संशयातीत असले पाहिजे; संस्थेचे हित सर्वोपरी आहे असे त्याने मानले पाहिजे आणि स्वतःच्या हिताला त्याने सर्वात कमी महत्त्व दिले पाहिजे. संघटनेचे काम धूर्त माणसांकडून चालवले जाण्याचा जर प्रयत्न केला जाईल तर संघटनाप्रमुखाचे पद नेहमीच कोणत्या ना कोणत्या धूर्ताच्या ताब्यात राहील. (हरि, ३१-३-१९४६, पृ. ६१)

## ४५. वेळ पाळणे

अनासक्तीच्या बाबतीत इंग्रज आपल्या बरेच पुढे आहेत असे मत माझ्या मित्रांजवळ मी अनेकदा व्यक्त केले आहे. कितीही महत्त्वाचा राष्ट्रीय प्रश्न असो ते आपल्या जेवणाच्या आणि मनोरंजनाच्या वेळेचे पालन करतात. धोका समोर पाहून वा महासंकटाची आशंका असली तरी ते घाबरत नाहीत. गीतेच्या भाषेत याला अनासक्त भावाने काम करणे असे म्हणतात. भारताच्या राजकीय कार्यकर्त्यांमध्ये फार कमी असे लोक आहेत की ज्यांची या बाबतीत इंग्रजांशी तुलना करता येईल....

नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी जर वेळेचे पालन केले तर त्यामुळे राष्ट्राचे निश्चितपणे हित होईल.... कोणतीही व्यक्ती आपल्या क्षमतेपेक्षा जास्त काम करू शकत नाही. दिवस संपल्यानंतरही जर काम शिल्लक राहत असेल अथवा व्यक्तीने आपला खाण्यापिण्याचा, झोपण्याचा वा मनोरंजनाच्या वेळेत कपात करूनही तिला ते काम संपवणे शक्य होत नसेल तर व्यवस्थेत काही गडबड आहे असे समजले पाहिजे. आपण जर वेळ पाळण्याची सवय लावली व ठरलेल्या कार्यक्रमाप्रमाणे चाललो तर राष्ट्राच्या काम करण्याच्या कौशल्यात वाढ होईल, आपल्या उद्दिष्टाकडे पोहोचण्याची आपली गती तीव्र होईल, कार्यकर्त्यांची प्रकृती चांगली राहील व त्यांचे आयुष्य वाढेल. (हरि, २४-९-१९३८, पृ. २६६)

## ४६. सामाजिक सुधारणा

दीर्घ काळापासून माझा विश्वास राहिला आहे की राजकीय सुधारणांपेक्षा सामाजिक

सुधारणांचे काम जास्त कठीण आहे. राजकीय सुधारणांकरिता वातावरण तयार आहे, लोकांना त्यामध्ये रसही आहे आणि हे काम आत्मसुधारणेशिवायच करता येऊ शकते असे बाहेरच्या देशांना वाटते. दुसरीकडे समाजसुधारणेच्या कामात लोकांना फार कमी रस आहे, त्याकरिता करण्यात आलेली आंदोलने प्रभावी होत नाहीत आणि समाजसुधारकांचे अभिनंदन केले जाण्याची वा त्यांना मानपत्र मिळण्याची शक्यता फार कमी असते. यामुळे समाजसुधारकांना काही काळ असाच काढावा लागेल व शांततापूर्वक काम करत थोडक्या परिणामांवर समाधान मानावे लागेल. (यंग, ६-९-१९२८, पृ. ३०१-२)

माझ्या मते सुधारकाला पैशाची गरज सर्वात कमी असते. आपल्या वास्तव गरजांच्या प्रमाणात त्याला न मागता पैसा मिळत असतो. पैशाच्या अभावी आम्हाला चांगले काम करता आले नाही अशी तक्रार माझ्याजवळ जे सुधारक करतात त्यांच्याकडे मी नेहमीच संशयाने पाहत असतो.

जिथे उत्साह आहे, पूर्ण माहिती आहे आणि स्वतःवर विश्वास आहे तिथे आर्थिक मदत नेहमीच उपलब्ध होत असते. (यंग, १४-११-१९२९, पृ. ३६९)

समाजसुधारणेचे अथवा आत्मशुद्धीकरणाचे काम.... हे मला विशुद्ध राजकीय कामापेक्षा शंभरपट प्रिय आहे. (यंग, ६-८-१९३१, पृ. २०३)

## ४७. साधी राहणी

जगातील प्रत्येक व्यक्तीने जास्तीत जास्त उत्पादन केले तर तिच्या राहणीमानाचा दर्जा उंचावून ती उच्चतम पातळीवर पोहोचू शकेल असे समजणे तेवढेच काल्पनिक आहे जेवढे सुईच्या छिद्रातून उंट शिरू शकेल असे मानणे.... विलासी जीवन जगणे.... संपूर्ण समाजाकरिता कधीही शक्य होणार नाही. आणि जर विलासाला काही मर्यादाच नाही तर आपण कुठे जाऊन थांबणार आहोत? विश्वातील सर्व धर्मग्रंथांनी अगदी याविरुद्ध शिकवण दिलेली आहे. त्यांनी आपल्यासमोर 'साधी राहणी, उच्च विचारसरणी'चा आदर्श ठेवला आहे. बहुतांश लोकांना या आदर्शाचे महत्त्व कळते परंतु मानवी दुर्बलतेमुळे ते त्याप्रमाणे आचरण करू शकत नाहीत.

परंतु या आदर्शापर्यंत पोहोचणे पूर्णपणे शक्य आहे.... आपल्या दैनंदिन गरजांमध्ये वाढ करण्याचा विचार करू लागताच आपण 'साधी राहणी, उच्च विचारसरणी'च्या आदर्शापासून दूर जाऊ लागतो. इतिहासात याची पुरेशी उदाहरणे

आहेत. (हरि, १-२-१९४२, पृ. २७)

साधेपणा हा विश्वात्मकतेचा सार आहे. (हरि, ७-४-१९४६, पृ. ६९)

माणसाच्या व्यक्तिमत्वाचे रक्षण इतर कोणत्याही मार्गाने (साध्या राहणीच्या) करता येऊ शकत नाही या 'अनटू दिस लास्ट'मधील निहितार्थाशी मी पूर्णपणे सहमत आहे. या पुस्तकाने माझ्या जीवनाची दिशाच बदलून टाकली. जगाने आपल्याकरिता जे करावे असे आपल्याला वाटते ते आपण जगाच्या अगदी तळाशी असलेल्या माणसाकरिताही केले पाहिजे. (यंग, १७-११-१९४६, पृ. ०४)

## ४८. साधन आणि साध्य

त्यांचे म्हणणे आहे की साधन हे तर अखेरीस साधनच असते. माझे म्हणणे आहे की साधनच सर्व काही आहे. जसे साधन तसे साध्य. हिंसक साधनांनी हिंसक स्वराज्याचीच प्राप्ती होईल. ते सर्व जगाकरिता आणि स्वतः भारताकरिताही संकट निर्माण करील.... साधनापासून साध्याला दूर करण्याकरिता मध्ये कोणतीही भिंत नाही. वास्तव हे आहे की ईश्वराने आपल्याला केवळ साधनांवरच नियंत्रण दिले आहे (व तेही मर्यादित प्रमाणात). साध्यावर आपले काहीच नियंत्रण नाही. साधनांच्या प्रमाणानुसारच साध्याची प्राप्ती होत असते या विधानाला कोणताच अपवाद नाही. देशाने पूर्णपणे शांततामय आणि वैध साधनांचा अवलंब करावा याकरिता मी जो प्रयत्न करतो आहे तो माझ्या या विश्वासामुळेच. (यंग, १७-७-१९२४, पृ. २३६-७)

माझ्या जीवनाच्या तत्त्वज्ञानात साधन आणि साध्य हे परिवर्तनीय शब्द आहेत. (यंग, २६-१२-१९२४, पृ. ३)

## ४९. सार्वजनिक कार्यकर्ता

आधुनिक सार्वजनिक जीवनाची अशी प्रवृत्ती आहे की सार्वजनिक कार्यकर्ता जोपर्यंत प्रशासनतंत्रात व्यवस्थितपणे काम करत आहे तोपर्यंत त्याच्या चारित्र्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करावे. असे म्हणतात की व्यक्तीचे चरित्र ही त्याची खाजगी बाब आहे. लोकांचा सामान्यपणे हाच दृष्टिकोन असतो हे माहीत असतानाही मी या मताशी कधीही सहमत होऊ शकलो नाही, त्याचा स्वीकार करण्याचा तर प्रश्नच उपस्थित होत नाही. खाजगी चरित्राला काहीही महत्त्व न देणा-या संघटनांवर या मताचे गंभीर परिणाम झालेले मी पाहिले आहेत. (हरि, ७-११-१९३६, पृ. ३०८)

## ५०. सार्वजनिक जीवन

मी वारंवार सांगितले आहे की योग्य निर्णय घेण्याचा केवळ आपलाच एकाधिकार आहे असा दावा कोणताही वैचारिक संप्रदाय करू शकत नाही. आपणा सर्वांकडून चुका होत असतात व आपण घेतलेल्या निर्णयामध्ये अनेकदा आपल्याला फेरबदल करावा लागत असतो. आपल्या देशासारख्या विशाल देशात सर्व प्रामाणिक वैचारिक संप्रदायांना स्थान असले पाहिजे. यामुळे आपण आपल्या विरोधकाचा दृष्टिकोन समजून घेण्याचा प्रयत्न करावा व त्याचा आपण जरी स्वीकार करू शकत नसू तरी त्या दृष्टिकोनाचा आपण तेवढाच आदर करावा जेवढा विरोधकाने आपल्या दृष्टिकोनाबद्दल करावा असे आपल्याला वाटते. कमीतकमी एवढी जबाबदारी आपल्या स्वतःवर आणि इतरांवर आहे. निरोगी सार्वजनिक जीवनाची ही अपरिहार्य कसोटी आहे आणि यामुळेच ती स्वराज्याकरिताही आवश्यक आहे.

आपल्यामध्ये उदारपणा आणि सहिष्णुता नसेल तर आपण आपले मतभेद सामंजस्याने कधीही दूर करू शकणार नाही. तशा अवस्थेत आपल्याला नेहमी मध्यस्थीकरिता वा लवादाकरिता तिस-या पक्षाकडे शरणागती पत्करावी लागेल. याचा अर्थ होईल विदेशी प्रभुत्व. (यंग, १७-४-१९२४, पृ. १३०)

माझे निश्चित मत आहे की सार्वजनिक कार्यकर्त्याने कधीही महाग भेटींचा स्वीकार करू नये. (ए, पृ. १६१)

## ५१. सार्वजनिक संपत्ती

आपण जर जनतेकडून मिळालेल्या पै पैचा नीट हिशेब ठेवला नाही व त्याचा काळजीपूर्वक खर्च केला नाही तर त्यांनी आपल्याला सार्वजनिक जीवनातून काढून टाकले जाणेच उचित होईल. (यंग, ६-७-१९२१, पृ. २०९)

माझ्याजवळ अशी कोणतीही संपत्ती नाही की जिला मी आपली म्हणू शकेन. स्वतःच्या व्यक्तिगत गरजा पूर्ण करण्याकरिता.... वर्गणीतून मिळालेल्या पैशाचा खर्च करण्याचा मला अधिकार आहे? माझ्या संपूर्ण जीवनात मी कधीही असे केले नाही आणि मित्रांनाही असे न करण्याचा मी सल्ला दिला आहे. माझे असे मत आहे की ज्या लोकांवर जनतेचा विश्वास असतो व आपण दिलेल्या पैशाचा जे लोक एखाद्या सार्वजनिक कार्याकरिता आपल्यापेक्षा अधिक बुद्धिमत्तेने व

काळजीपूर्वक उपयोग करतील असे समजून जनता त्यांना वर्गणी देते त्या लोकांकरिता अजून कोणताही मार्ग मोकळा नसतो. अशा प्रकारे एखाद्या व्यक्तीवर टाकण्यात आलेल्या विश्वासाचा व्यक्तिगत कामाकरिता भंग करण्यात आला तर ती भयानक गोष्ट होईल. अशा प्रकारामुळे होणा-या भयानक परिणामांचे वर्णन करण्यापेक्षा त्यांची कल्पना केलेली बरी. जनसेवा ही सिझरच्या पत्नीप्रमाणे संशयातीत असली पाहिजे. (हरि, २४-२-१९४६, पृ. २३)

....मी संचालित केलेल्या अनेक सार्वजनिक संस्थांचा बराच अनुभव घेतल्यानंतर माझे पक्के मत झाले आहे की सार्वजनिक संस्था कायम निधीवर चालवण्यात येऊ नये. कायम निधीमध्येच संस्थेच्या नैतिक अधःपतनाचे बीज रुजलेले असते. सार्वजनिक संस्था म्हणजे अशी संस्था जी जनतेच्या मान्यतेने व जनतेच्या पैशाने चालवण्यात येते. जेव्हा जनतेचा अशा संस्थेला असलेला पाठिंबा थांबतो तेव्हा तिला अस्तित्वात राहण्याचा अधिकार उरत नाही. (ए, पृ. १४४)

## ५२. सार्वजनिक संस्था

माझे निश्चित मत आहे की कोणतीही चांगली संस्था समर्थनाच्या अभावामुळे कधीही बंद पडत नाही. ज्या संस्था बंद पडल्या आहेत त्या जनतेने प्रशंसा करावी असे त्यांच्यात काहीही नसल्यामुळे बंद पडल्या आहेत अथवा संचालकांची श्रद्धा कमी पडल्यामुळे म्हणजे त्यांचे सामर्थ्य कमी पडल्यामुळे असे झाले असे म्हणता येईल. यामुळेच अशा संस्थांच्या.... संचालकांना मी विनंती करीन की अशा प्रसंगांमुळे सामान्यपणे जे नैराश्य येते त्यामुळे त्यांनी धीर सोडू नये. चांगल्या संस्थांकरिता ही परीक्षेची वेळ असते. (यंग, १५-१०-१९२५, पृ. ३५१)

## ५३. सुख

सुख म्हणजे.... मानवी प्रतिष्ठेची विचारपूर्वक केलेली परिपूर्ती आणि मानवी स्वातंत्र्याची ओढ. व्यक्तिगत सुविधा आणि भौतिक आवश्यकतांच्या स्वार्थी समाधानापेक्षा ते स्वतःला अधिक महत्त्व देते आणि स्वतःच्या अस्तित्वाकरिता ते आनंदाने या गोष्टींचा त्याग करायला तयार असते. (यंग, ५-३-१९३१, पृ. १)

सुखाचा वास प्रत्येक व्यक्तीच्या आत असतो आणि ते पूर्णत्व व सत्याच्या शोधात असते.... 'सर्व माणसे पूर्णत्व प्राप्त करू शकतात काय?' - होय, ते

त्यांच्यातच आहे. (इंके, पृ. २७४)

## ५४. आरोग्य

निःसंशयपणे हे सिद्ध झाले आहे की वारसा म्हणून मानवजातीला जे आजार मिळाले आहेत त्यातील बहुतेकांकरिता आरोग्य आणि आरोग्य रक्षणाच्या नियमांचे अज्ञान व त्यांच्याबाबतीतील दुर्लक्ष जबाबदार आहे. यात संशय नाही की आपल्या येथील इतक्या जास्त मृत्यूदराचे कारण मुख्यत्वेकरून आपले घोर दारिद्र्य आहे, परंतु लोकांना आरोग्य आणि आरोग्य रक्षणाच्या विषयाचे योग्य ज्ञान करून दिले तर या समस्येचे समाधान शक्य आहे.

'निरोगी शरीरात निरोगी मन' हा मानव जातीचा पहिला नियम आहे. ही गोष्ट स्वयंसिद्ध आहे. मन आणि शरीर यांच्यात अपरिहार्य संबंध आहे. आपले मन जर निरोगी असेल तर आपण सर्व प्रकारच्या हिंसेचा त्याग करू व आरोग्याच्या नियमांचे पालन करून आपले शरीर निरोगी ठेवू.

आरोग्य आणि आरोग्य रक्षणाचे मूलभूत नियम फार सोपे आहेत व ते सहजपणे शिकता येतात. अडचण येते ती त्यांचे पालन करताना. यातील काही नियम असे आहेत :

विचार शुद्ध ठेवा; निरर्थक आणि अशुद्ध विचार मनातून काढून टाका. रात्रंदिवस शुद्ध हवेत श्वासोच्छ्वास करा.

शारीरिक आणि मानसिक श्रमात संतुलन ठेवा.

ताठ उभे राहा, ताठ बसा आणि आपल्या प्रत्येक कामात स्वच्छतेचे पालन करा व तुमच्या अंतःकरणाचे प्रतिबिंब त्यातून पडू द्या.

मानवसेवेकरिता जगता यावे म्हणून जेवण करा. विषयोपभोगांकरिता जगू नका. यामुळे तुमचे जेवण इतकेच ठेवा की ते तुमच्या मनाला व शरीराला चांगले ठेवू शकेल. माणूस जसे खातो तसाच तो बनतो.

तुमचे पाणी, भोजन आणि वायू स्वच्छ असले पाहिजे आणि केवळ व्यक्तिगत स्वच्छतेवरच तुमचे समाधान होऊ नये. तुमच्या चोहोकडे ही त्रिविध स्वच्छता राहील याची तुम्ही काळजी घेतली पाहिजे जशी ती तुम्हाला स्वतःकरिता हवी असते. (कंप्रो, पृ. १८-९)

पूर्वनियोजिततेच्या सिद्धान्ताचा अर्थ असा मुळीच नाही की आपण आजारी पडल्यानंतरही स्वतःची 'काळजी' घेऊ नये. आजारी पडण्यापेक्षाही मोठा अपराध

आजाराबद्दल बेफिकीर असणे आहे. कालच्या तुलनेत आज अधिक काम करण्याला कोणतीच सीमा नाही. आपण का आजारी आहोत वा का आजारी पडलो याचा विचार आपण केला पाहिजे. निसर्गाचा नियम आरोग्य आहे, आजार नाही. आपल्याला जर आजारी पडायचे नसेल आणि पडलोच तर बरे होण्याची जर आपली इच्छा असेल तर प्रकृतीच्या नियमाचा आपण शोध घेतला पाहिजे व त्याचे पालन केले पाहिजे. (हरि, २८-७-१९४६, पृ. २३३)

## शरीर आणि आत्मा

माझा विश्वास आहे की निरोगी शरीरात निरोगी आत्मा असला पाहिजे. यामुळेच ज्या सीमेपर्यंत आत्म्याचा विकास होतो व विकारांपासून तो मुक्त होतो त्याच सीमेपर्यंत शरीरही विकसित होते. याचा अर्थ असा नाही की निरोगी शरीर अनिवार्यपणे बलदंड शरीरच असले पाहिजे. वीर आत्म्याचा सामान्यपणे दुबळ्या शरीरात वास असतो. एका अवस्थेनंतर जसजसा आत्म्याचा विकास होतो तसतसे शरीरावरील मांस झडत जाते.

पूर्णपणे निरोगी शरीर दिसायला अतिशय काटकुळे असते. लठ्ठ शरीर अनेकदा अनेक आजारांचे घर असते. अनेकदा ते वरवर निरोगी दिसत असले तरी ते साथीचे रोग, संसर्गजन्य रोग इत्यादींपासून मुक्त नसते. याउलट पूर्णपणे निरोगी शरीराला असा कोणताही रोग होत नाही. शुद्ध रक्तात सर्व प्रकारच्या रोगांचा प्रतिकार करण्याचे नैसर्गिक सामर्थ्य असते.

अशी साम्यावस्था प्राप्त करणे वास्तवात फार कठीण आहे. असे नसते तर मी ती आतापर्यंत प्राप्त करून घेतली असती. मी असे म्हणतो कारण ही स्थिती प्राप्त व्हावी म्हणून माझी कितीही त्रास घेण्याची तयारी आहे. या गोष्टीकरिता माझा आत्मा साक्षी आहे. माझ्या आणि या साम्यावस्थेमध्ये कोणताही अवरोध उभा राहू शकत नाही.

आपले मागील संस्कार मिटवणे सर्वांच्याच आटोक्यातील गोष्ट नाही, कमीत कमी माझ्याकरिता तरी ही फार कठीण गोष्ट आहे. परंतु याकरिता होणा-या विलंबामुळे मी हताश झालेलो नाही. त्या परिपूर्ण अवस्थेचे माझ्या मनात चित्र स्पष्ट असल्यामुळे मी असे म्हणतो आहे. मला त्याचे अस्पष्टसे दर्शनही झाले आहे. आतापर्यंत जी काही प्रगती मी करू शकलो ती पाहून माझी निराशा होत नाही, उलट माझ्यात आशेचा संचार होतो. ही आशा पूर्ण करण्याकरिता मला

देहत्याग करावा लागला तरी मी अयशस्वी झालो असे मी समजणार नाही. मी जितका माझ्या सध्याच्या शरीरावर विश्वास ठेवतो तितकाच विश्वास मी पुनर्जन्मावर ठेवत असल्यामुळे मी असे म्हणतो आहे. यामुळे मला माहीत आहे की थोडासा प्रयत्नसुद्धा वाया जाणार नाही. (यंग, ५-६-१९२४, पृ. १८७)

## स्त्रोत

| | |
|---|---|
| अबाप | अमृत बझार पत्रिका, कोलकाताहून प्रकाशित होणारे इंग्रजी दैनिक |
| आआए | आश्रम ऑब्झरवेशन्स इन ॲक्शन, वी. जी. देसाईद्वारा गुजरातीमधून अनुवादित, नवजीवन प्रकाशन हाऊस, अहमदाबाद, १९५५ |
| इंके | इंडियाज केस फॉर स्वराज, डब्ल्यू. पी. कबाडी द्वारा संपादित, येशानंद ॲड कंपनी, मुंबई,१९३२ |
| ए | ॲन ऑटोबायोग्राफी, ऑर द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ, एम. के. गांधी, महादेव देसाईद्वारे गुजरातीतून अनुवादित, नवजीवन प्रकाशन हाऊस, अहमदाबाद; खंड १, १९२७; खंड २, १९२९, संयुक्त आवृत्ती, १९५९ |
| आअ | आशिया ॲड द अमेरिकाज, न्यूयॉर्कहून प्रकाशित होणारे मासिक |
| अग्रे | अमंग द ग्रेट, दिलिपकुमार राय, प्रस्तावना - एस. राधाकृष्णन, नालंदा पब्लिकेशन्स, मुंबई, १९४५, सुधारित आवृत्ती - पुनर्मुद्रण : जयको पब्लिशिंग हाऊस, मुंबई, १९५० |
| एफा | द एपिक फास्ट, प्यारेलाल, मोहनलाल मगनलाल भट्ट, अहमदाबाद, १९३२ |
| एमके | एम. के. गांधी : ॲन इंडियन पॅट्रियट इन साऊथ आफ्रिका, लेखक - जे. जे. डोक, प्रास्ताविक - लॉर्ड ॲम्टहिल, द लंडन इंडियन क्रॉनिकल, लंडन, १९०९. |
| इरि. | इथिकल रिलिजन : महात्मा गांधी, बी. रामा अय्यर द्वारा हिंदीत अनुवादित, एस. गणेशन, चेन्नै. |
| कंप्रो | कंस्ट्रक्टिव्ह प्रोग्रॅम : इट्स मिनींग ॲड प्लेस - एम. के. गांधी, नवजीवन प्रकाशन हाऊस, अहमदाबाद, १९४८, |
| कीहे | की टू हेल्थ - महात्मा गांधी, नवजीवन प्रकाशन हाऊस, अहमदाबाद, १९४८ |

गांकॉग — गांधीजीज कॉरस्पॉंडन्स विथ द गव्हर्नमेंट, १९४२ - ४४, नवजीवन प्रकाशन हाऊस, अहमदाबाद, १९४५

गांइंव्हि — गांधीजी इन इंडियन व्हिलेजेस-महादेव देसाई, एस. गणेशन, चेन्नै, १९२७

टाइ — द टाईम्स ऑफ इंडिया, मुंबईहून प्रकाशित दैनिक

टुन्यू — टुवर्ड्स न्यू व्हराईझन्स, प्यारेलाल, द लास्ट फेजमधून पुनर्मुद्रित, नवजीवन प्रकाशन हाऊस, अहमदाबाद, १५९

नव — नवजीवन (१९१९-३१) : गुजराती साप्ताहिक, केव्हा केव्हा आठवड्यातून दोन अंकसुद्धा, ७ सप्टेंम्बर १९१९ला प्रकाशनास सुरुवात, गांधीजींद्वारे संपादित आणि अहमदाबादहून प्रकाशित

नाव्हावे — नॉन व्हॉयोलंट वे टू वर्ल्ड पीस : एम. के. गांधी; आर. के. प्रभूद्वारा संकलित, नवजीवन प्रकाशन हाऊस, अहमदाबाद, १९५९

फ्रॉयेमं — फ्रॉम येरवडा मंदिर : आश्रम ऑब्झर्व्हेशन्स : एम. के. गांधी; बी. जी. देसाईद्वारे अनुवादित; नवजीवन प्रकाशन हाऊस, अहमदाबाद, १९५७

बांक्रॉ — बॉम्बे क्रॉनिकल, मुंबईहून प्रकाशित दैनिक

म — महात्मा : लाईफ ऑफ मोहनदास करमचंद गांधी - डी. जी. तेंडुलकर; विठ्ठलभाई झवेरी आणि डी. जी. तेंडुलकर, मुंबई, १९५१-५४, ८ खंड

मगां — महात्मा गांधीज आयडियाज - सी. एफ. अँड्रूज, जॉर्ज अॅलन, लंडन, १९२९

मगांअ — महात्मा गांधी : अखेरचं पर्व, खंड १ ते ४ प्यारेलाल, मराठी अनुवाद ब्रिजमोहन हेडा, पराग एजन्सीज, अकोला, २००४

मानॉ — माय नॉन-व्हायोलन्स : एम. के. गांधी; शैलेशकुमार बंदोपाध्यायद्वारा संकलित, नवजीवन प्रकाशन हाऊस, अहमदाबाद, १९६०

मॉरि — द मॉडर्न रिव्ह्यू, कोलकाताहून प्रकाशित मासिक

मासो — माय सोशॅलिझम : एम. के. गांधी; आर. के. प्रभूद्वारा संकलित, नवजीवन प्रकाशन हाऊस, अहमदाबाद, १९५९

मीइन्स — मिडियम ऑफ इंस्ट्रक्शन : एम. के. गांधी, भारतन कुमारप्पाद्वारा संपादित, नवजीवन प्रकाशन हाऊस, अहमदाबाद, १९५४

| | |
|---|---|
| यंग | यंग इंडिया : (१९१९ ते ३२) इंग्रजी साप्ताहिक, गांधीजींच्या देखरेखीखाली मुंबईहून ७ मे १९१९पासून आठवड्यातून दोन वेळा प्रकाशित होणारी पत्रिका आणि गांधीजींच्या संपादकत्वाखाली ८ ऑक्टोबर १९१९पासून साप्ताहिक म्हणून अहमदाबाद येथून प्रकाशन |
| रिकप | रिपोर्ट ऑफ द कमिशन अपाईंटेड बाय द सबकमिटी ऑफ इंडियन नॅशनल कॉंग्रेस : के. संथानमद्वारा लाहोर येथून प्रकाशित, १९२० |
| ली | द लीडर, अलाहाबाद येथून प्रकाशित होणारे दैनिक |
| विगांसी | विथ गांधी इन सिलोन : महादेव देसाईद्वारा संपादित, एस. गणेशन, चेन्नै, १९२८ |
| सली | सत्याग्रह लीफ्लेट्स : मार्च ते मे १९१९च्या दरम्यान मुंबईहून वेळोवेळी प्रकाशित |
| ससा | सत्याग्रह इन साऊथ आफ्रिका : एम. के. गांधी; बी. जी. देसाईद्वारा अनुवादित, नवजीवन प्रकाशन हाऊस, अहमदाबाद, १९५० |
| सा | साबरमती : फौंडेशन ऑफ इंटरनॅशनल फेलोशिपच्या वार्षिक सभेचा वृत्तांत, १९२९ |
| स्पीरा | स्पीचेस ॲंड रायटिंग्ज ऑफ महात्मा गांधी : जी. ए. नटेसन ॲंड कंपनी, चेन्नै, १९३३, चौथी आवृत्ती |
| स्पेक्ट | द स्पेक्टेटर, लंडनहून प्रकाशित होणारे साप्ताहिक |
| हरि | हरिजन : (१९३३ ते ५६) गांधीजींनी सुरू केलेले इंग्रजी साप्ताहिक, हरिजन सेवक संघ, पुणेद्वारे प्रकाशित आणि १९४२पासून नवजीवन ट्रस्ट अहमदाबादद्वारा प्रकाशित, १९४०मध्ये व्यक्तिगत सत्याग्रहाच्या काळात याचे प्रकाशन स्थगित राहिले; जानेवारी १९४२मध्ये पुन्हा प्रकाशनाला सुरुवात, परंतु छोडो भारत आंदोलनादरम्यान परत बंद, १९४६पासून परत प्रकाशनास सुरुवात. |
| हिं | द हिंदू, चेन्नैहून प्रकाशित होणारे दैनिक |
| हिंस्ट | द हिंदुस्तान स्टॅन्डर्ड, कोलकाताहून प्रकाशित होणारे दैनिक |
| हिंस्व | हिंद स्वराज ऑर इंडियन होमरूल : महात्मा गांधी, नवजीवन प्रकाशन हाऊस, अहमदाबाद, १९५८ |

# कालानुक्रम

| | | |
|---|---|---|
| १८६९ | ऑक्टोबर २ | मोहनदास करमचंद गांधी यांचा जन्म पोरबंदर येथे काठेवाडमधील एका बनिया (वैश्य अथवा व्यापारी जमात) कुटुंबात झाला. ते करमचंद गांधी अथवा काबा गांधी, जे क्रमशः पोरबंदर, राजकोट आणि वांकानेर राज्याचे प्रधानमंत्री होते, आणि त्यांची चौथी पत्नी पुतळीबाई यांच्या तीन मुलांमधील सगळ्यात लहान पुत्र होते. |
| १८७६ | | आईवडलांबरोबर राजकोटला गेले; तिथे बाराव्या वर्षापर्यंत प्राथमिक शाळेत गेले, एक व्यापारी गोकुलदास माकनजी यांची मुलगी कस्तुरबा हिच्याबरोबर साक्षगंध झाला. |
| १८८१ | | राजकोट येथे माध्यमिक शाळेत प्रवेश |
| १८८३ | | कस्तुरबांशी विवाह |
| १८८४-५ | | चोरून मांसाहार सुरू केला, परंतु आईवडलांचा विश्वासघात करत असल्याचा विचार मनात आल्यानंतर एक वर्षानंतर या सवयीचा त्याग केला. वयाच्या ६३व्या वर्षी वडिलांचा मृत्यू झाला. |
| १८८७ | | मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले; भावनगर (काठियावाड) येथील एका महाविद्यालयात प्रवेश घेतला, परंतु पहिल्या सत्रानंतर शिक्षण सोडले. |
| १८८८ | सप्टेंबर ४ | समुद्रमार्गे इंग्लंडला रवाना झाले. |
| | ऑक्टोबर २८ | लंडनला पोहोचले. शाकाहारावर राहिले. एका सभ्य गृहस्थाकरिता नृत्य आणि संगीत आवश्यक आहे असे वाटल्यामुळे नृत्य आणि संगीताचे शिक्षण घ्यायला सुरुवात केली. साध्या राहणीबद्दल पुस्तके वाचली आणि आपला खर्च निम्मे करण्याचे ठरवले, गीतेचा पहिल्या वेळी अभ्यास केला व त्याने फार प्रभावित झाले. |
| १८९० | | शाकाहारी आंदोलनाशी संलग्न; काही काळ शाकाहारी क्लब चालवला. |

| | | | |
|---|---|---|---|
| | जून | | लंडनमध्ये मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. |
| | सप्टेंबर | | शाकाहारी सभेत सहभाग |
| १८९१ | जून | १० | बॅरिस्टर झाले. |
| | जून | १२ | समुद्राच्या मार्गाने भारताकरिता रवाना झाले. |
| | जुलै | | मुंबईला पोहोचले. |
| | नोव्हेंबर | | मुंबई उच्च न्यायालयात प्रवेशाकरिता अर्ज दिला |
| १८९२ | | | राजकोट आणि मुंबई इथे वकिली चालावी म्हणून संघर्ष केला; नंतर राजकोट येथे मसुदालेखनाचे (legal draftsman) काम करू लागले. |
| १८९३ | एप्रिल | | कायद्याच्या कामाकरिता एका मुसलमान पेढीतर्फे नेमणूक झाल्यानंतर दक्षिण आफ्रिकेकरिता प्रस्थान. |
| | मे-जून | | रंगभेदाचे अनेक प्रकारचे अनुभव आले. तिथे राहून वंशीय पूर्वग्रहांशी संघर्ष करण्याचा निश्चय. |
| १८९४ | ऑगस्ट | २२ | नाताळ भारतीय काँग्रेसची स्थापना. |
| | सप्टेंबर | | नाताळच्या सर्वोच्च न्यायालयात अधिवक्ता म्हणून नाव नोंदवले; तिथे नाव नोंदवणारे पहिले भारतीय. |
| | | | धार्मिक साहित्याचा अभ्यास केला. त्यात बायबल, कुराण आणि टॉलस्टॉय यांच्या 'किंगडम ऑफ गॉड इज विदिन यू' यांचा समावेश होता. |
| १८९५ | | | दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांच्या समस्येकरिता स्वतःला अजूनच वाहून घेतले. 'द इंडियन फ्रेंचाईज : ॲन अपील टू एव्हरी ब्रिटन इन साउथ आफ्रिका' प्रसिद्ध केले. |
| १८९६ | जुलै | | भारतात परत आणि दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांच्या वतीने आंदोलन सुरू केले. |
| | ऑगस्ट | १४ | राजकोट येथे 'द ग्रीन पॅम्फ्लेट प्रसिद्ध' केले; दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांच्या तक्रारींसंबंधी भारतीयांना माहिती देण्याकरिता मुंबई, चेन्नै, पुणे आणि कोलकाता येथील दौरा केला. |
| | नोव्हेंबर | ३० | पत्नी आणि मुलांसहित दक्षिण आफ्रिकेकरिता रवाना झाले. |
| १८९७ | जानेवारी | १३ | डरबन येथे उतरल्यानंतर दक्षिण आफ्रिकेतील बंधु मजुरांवरच्या परिस्थितीसंबंधी भारतात केलेल्या भाषणांच्या अहवालामुळे उत्तेजित झालेल्या जमावाने त्यांना घेरले. |
| | | २० | आक्रमकांवर खटला भरण्यास नकार दिला. |
| | एप्रिल | ६ | डरबनला उतरल्यानंतर घडलेल्या घटना व त्यांची पार्श्वभूमी |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | यांसंबंधी चेम्बर्लेन यांना दीर्घ आवेदन पत्र लिहिले. व साम्राज्याच्या स्थानिक अधिका-यांना निवेदन देत राहण्याबरोबरच भेदभाव करणा-या कायद्यांसंबंधी इंग्लंड व भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील व्यक्तींशी संपर्क करत राहिले. |
| १८९८-९९ | | | राहण्याच्या जागा व भारतीयांच्या व्यापारासंबंधीचे अधिकार यांच्यावरील प्रतिबंधांच्या विरोधात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, उपनिवेशातील व साम्राज्यातील अधिका-यांना निवेदने दिली. |
| १८९९ | | | बोअर युद्धाच्या वेळी भारतीय ॲम्ब्युलन्स कोअरची स्थापना, या पथकाद्वारे करण्यात आलेल्या कार्याचा उल्लेख तेथून पाठवण्यात आलेल्या खलित्यांमधून करण्यात आला. युद्ध पदकाने सन्मानित. |
| १९०० | | | काँग्रेसच्या सभेकरिता दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांच्या समस्येवरील जो ठराव पाठवायचा होता त्याचा मसुदा दादाभाई नौरोजी यांना पाठवला. |
| १९०१ | ऑगस्ट | १८ | समुद्रामार्गे भारताकरिता रवाना. |
| | डिसेंबर | १४ | पोरबंदरमार्गे राजकोटला पोहोचले. |
| | | २७ | काँग्रेससमोर दक्षिण आफ्रिकेसंबंधी ठराव मांडला. |
| १९०२ | जानेवारी | २८ | रंगूनला गेले. |
| | फेब्रुवारी | १ | कोलकाता येथे गोखले यांच्याबरोबर एक महिना राहिले. राजकोटला परतले व तिथे वकिली करू लागले. |
| | जुलै | | राजकोटहून मुंबईला आले व तिथे वकिली सुरू केली. |
| | नोव्हेंबर | | ट्रान्सवालमधील आशियाविरोधी कायद्याविरुद्ध नेतृत्व करण्याकरिता भारतातून दक्षिण आफ्रिकेत बोलावण्यात आले. |
| | डिसेंबर | | डरबन येथे पोहोचले, चेम्बर्लेन यांना भेटण्याकरिता एका प्रतिनिधी मंडळाचे नेतृत्व केले. |
| १९०३ | | | ट्रान्सवाल येथील सुप्रीम कोर्टात अटर्नी म्हणून नाव नोंदवण्याकरिता अर्ज केला. ट्रान्सवाल ब्रिटिश इंडियन असोसिएशनची स्थापना केली. दादाभाई नौरोजी यांना परिस्थितीची माहिती कळवणारे साप्ताहिक अहवाल पाठवत गेले. |
| | जून | | इंडियन ओपिनियन'च्या प्रकाशनास सुरुवात. |
| १९०४ | | | रस्किनचे 'अनटू दिस लास्ट' वाचले; डरबन (नाताळ) येथे फिनिक्स आश्रमाची स्थापना केली; जोहान्सबर्ग येथे प्लेग पसरल्यानंतर रुग्णालयाची व्यवस्था केली; आहारविज्ञानावर |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | गुजरातीत लेखमाला लिहिली, काही वर्षांनंतर त्यांचा इंग्रजीत अनुवाद करण्यात आला व गाईड टू हेल्थ या नावाने तो प्रकाशित झाला. |
| १९०५ | | | बंगालच्या विभाजनाचा विरोध केला, विलायती वस्तूंच्या बहिष्काराचे समर्थन केले. गोखले-लजपतराय प्रतिनिधि मंडळ इंग्लंडला गेले तेव्हा भारताला 'साम्राज्याचा एक अभिन्न अंग' मानण्याची व त्याला सन्माननीय दर्जा देण्याची उपनिवेशवादी नेत्यांना विनंती केली. |
| | | | ब्रिटिश उच्चायुक्त लॉर्ड सेलबोर्न यांना ट्रान्सवालमधील भारतीयांच्या समस्या सांगण्याकरिता प्रतिनिधी मंडळाचे नेतृत्व केले. |
| १९०६ | मे | १२ | 'न्यायाच्या नावावर आणि भारताच्या कल्याणार्थ' भारताकरिता होम रूलच्या मागणीचे समर्थन केले. |
| | | २७ | भाऊ लक्ष्मीदास यांना सांसारिक गोष्टींबद्दल रस नाही असे सांगणारे पत्र लिहिले. |
| | जून-जुलै | | झुलू विद्रोहात भारतीय स्ट्रेचर वाहक पथकाची स्थापना केली; जीवनभर ब्रह्मचर्यपालनाची शपथ घेतली. |
| | सप्टेंबर | ११ | जोहान्सबर्ग येथे भारतीयांच्या विशाल सभेला संबोधित केले. त्या सभेत नुकताच जाहीर करण्यात आलेल्या ट्रान्सवाल आशियायी कायद्याच्या दुरुस्तीला विरोधात निष्क्रिय प्रतिकार करण्याची शपथ घेण्यात आली. |
| | ऑक्टोबर | २१ | उपनिवेशाच्या मंत्र्याला भारतीयांच्या प्रकरणासंबंधी निवेदन देण्याकरिता प्रतिनिधी म्हणून ३० नोव्हेंबरपर्यंत इंग्लंडला गेले. |
| | डिसेंबर | १८ | दक्षिण आफ्रिकेला परतले. |
| १९०७ | जाने.-फेब्रू. | | 'नैतिक धर्म' या विषयावर गुजरातीत ८ लेखांची लेखमाला लिहिले. ते इंडियन ओपिनियनमधून दर आठवड्याला प्रकाशित झाले व नंतर एका पुस्तकरूपानेही ते प्रकाशित झाले. |
| | मार्च | | ट्रान्सवालच्या संसदेत आशियायी नोंदणी कायदा मंजूर झाला. त्याला विरोध करण्याकरिता भारतीयांनी सभांचे आयोजन केले. |
| | एप्रिल | | प्रिटोरियात स्मट्सला भेटले व जनसभांमध्ये मंजूर करण्यात आलेल्या ठरावांची त्यांना माहिती दिली. इंडियन ओपिनियनमधून काळ्या कायद्याला विरोध करण्याची शपथ घेतली. |
| | मे | | काळ्या कायद्याला ब्रिटिश सम्राटाची मान्यता मिळाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | जुलै | | काळ्या कायद्याला विरोध करत असताना जनसभेला संबोधित केले. |
| | ऑगस्ट | | नोंदणी कायद्यावर टीका करणारे पत्र स्मट्स यांना लिहिले व त्या कायद्यात काही दुरुस्त्या सुचवल्या. |
| | | | सविनय कायदेभंग करणारे व नोंदणी कार्यालयावर पिकेटिंग करणारे यांचा न्यायालयात बचाव केला. |
| | डिसेंबर | | गांधीजींवर खटला भरण्याचा स्मट्स यांनी निर्णय घेतला. |
| १९०८ | जानेवारी | ८ | नोंदणी कायदा स्थगित करण्याची सरकारला विनंती केली. स्वेच्छापूर्वक नोंदणीचा प्रस्ताव दिला. |
| | | १० | निष्क्रिय प्रतिकाराच्या ठिकाणी सत्याग्रह शब्द स्वीकारला. ट्रान्सवाल सोडायला असमर्थता दाखवल्यामुळे दोन महिन्यांची तुरुंगाची शिक्षा झाली. |
| | | २१ | नोंदणी कायदा रद्द करण्याच्या अटीवर स्वेच्छापूर्वक नोंदणी करण्याच्या निर्णय मान्य केला. |
| | | ३० | जनरल स्मट्स यांना भेटण्याकरिता प्रिटोरिया येथे बोलावण्यात आले व तडजोड झाल्यानंतर तुरुंगातून सोडण्यात आले. |
| | फेब्रुवारी | १० | तडजोडीनुसार स्वेच्छेने आपल्या बोटांचे ठसे देण्याच्या गांधीजींच्या कृतीला विश्वासघात मानत पठाणांनी गांधीजींवर जवळपास घातक हल्ला केला. परंतु आक्रमकांवर खटला चालवण्याला त्यांनी नकार दिला. |
| | मार्च-जून | | अधिनियम रद्द करण्याचे वचन पूर्ण करायला लावण्याकरिता स्मट्सशी चर्चा, स्मट्सद्वारा वचनपूर्तीला नकार. |
| | जुलै | | स्मट्सबरोबरचा पत्रव्यवहार प्रकाशित; एका विशाल सभेत भारतीयांनी बोटाचे ठसे न देण्याचे ठरवले आणि नोंदणीपत्र जाळले. |
| | ऑगस्ट | | हिंसेद्वारा भारतातील ब्रिटिश राज्य घालवण्याच्या प्रयत्नाला हानिकारक म्हणून संबोधले, एवढेच नाही तर ते व्यर्थ आहे असे त्यांचे म्हणणे होते. |
| | सप्टेंबर | | सुधारित अधिनियमाला सम्राटांची मान्यता. स्मट्सने भारतीयांनी तडजोडीसाठी ठेवलेल्या अटी फेटाळल्या. |
| | ऑक्टोबर | १५ | गांधीजींना अटक करण्यात आली व त्यांना दोन महिन्यांची शिक्षा ठोठावण्यात आली. |
| | डिसेंबर | १२ | फॉक्सरस्ट तुरुंगातून मुक्तता. दक्षिण आफ्रिकेतील इंग्रज तेथील |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | भारतीयांबरोबर जो कठोर, अपमानास्पद व निष्ठुर व्यवहार करत होतो तो ब्रिटिश साम्राज्याकरिता हानिकारक आहे असा ठराव काँग्रेसने दक्षिण आफ्रिकेसंबंधी केला. |
| १९०९ | जाने. | १६ | नोंदणीपत्र दाखवू न शकल्यामुळे फॉक्सरस्ट येथे अटक; हद्दपार करण्यात आले, परत आले व परत अटक करण्यात आली व परत जमानतीवर मोकळे सोडण्यात आले. |
| | | २० | वृत्तपत्रांत लेख लिहून अंतिम संघर्षाकरिता तयार राहण्याचे भारतीयांना आवाहन केले. |
| | फेब्रुवारी | २५ | फॉक्सरस्ट येथे अटक, तीन महिन्यांची शिक्षा |
| | मे | २ | प्रिटोरिया येथील तुरुंगात स्थानांतरण |
| | | २४ | तुरुंगातून सुटका |
| | जून | २१ | भारतीयांची बाजू मांडण्याकरिता हाजी अली यांच्याबरोबर प्रतिनिधी म्हणून इंग्लंडला रवाना |
| | जुलै | १० | लंडनला पोहोचले.<br>लॉर्ड ॲम्टहिल यांच्या मदतीने प्रभावी ब्रिटिश पुढारी आणि जनता साम्राज्याच्या अधिकारी यांच्यासमोर आपली बाजू मांडण्याकरिता सतत प्रयत्न करत राहिले. |
| | ऑक्टोबर | १ | सविनय कायदेभंगाविषयी टॉलस्टॉय यांना पत्र लिहिले. |
| | नोव्हेंबर | ९ | ट्रान्सवाल कायद्यासंबंधी सरकार आणि गांधीजी यांच्यातील बोलणी फिसकटल्याची ‘द टाईम्स’मध्ये बातमी प्रकाशित |
| | | १० | टॉलस्टॉय यांनी पत्राचे उत्तर दिले. |
| | | १३ | इंग्लंडहून दक्षिण आफ्रिकेकरिता परत निघाले.<br>‘एस. एस. किल्डोनन कॅसल’वर हिंद स्वराजचे लेखन. |
| | | ३० | दक्षिण आफ्रिकेला पोहोचले. |
| | डिसेंबर | २९ | दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांच्या संघर्षाची प्रशंसा करत बंधुआ मजूरप्रथा थांबवण्याची मागणी करणारा ठराव लाहोर काँग्रेसने मंजूर केला. |
| १९१० | एप्रिल | ४ | टॉलस्टॉय यांना ‘इंडियन होमरूल’ची प्रत पाठवली व त्यावर अभिप्राय द्यावा अशी विनंती केली. |
| | मे | ८ | टॉलस्टॉय यांनी उत्तर दिले की निष्क्रिय प्रतिकाराचा प्रश्न भारताकरिताच नाही तर सर्व जगाकरिता अतिशय महत्त्वाचा आहे. |
| | | ३० | टॉलस्टॉय फार्मची स्थापना केली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | डिसेंबर | ४ | टॉलस्टॉय यांना श्रद्धांजली वाहिली. |
| १९११ | जाने. | | आप्रवासी प्रतिबंधक विधेयकातील संशोधनासंबंधी स्मट्सशी पत्रव्यवहार केला; कायद्यात रंगभेदासंबंधी कोणताही दोष राहणार नाही असे आश्वासन स्मट्स यांनी दिले. |
| | मार्च | २७ | केपटाऊनमध्ये स्मट्सची भेट घेतली |
| | एप्रिल | २२ | निष्क्रिय प्रतिकार आंदोलन स्थगित केल्यानंतर भारतीयांनी मागितलेले आश्वासन द्यायला स्मट्स तयार झाले. |
| | मे | ३ | स्मट्सची भेट घेतली, आशियायी नोंदणी कायदा व आप्रवासी प्रतिबंधक कायदा रद्द करण्याचे स्मट्स यांनी वचन दिल्यानंतर 'अस्थायी तडजोड' झाली. |
| | जून | २४ | राज्याभिषेकाप्रसंगी सम्राटांबद्दल निष्ठा व्यक्त केली. |
| | डिसेंबर | ८ | गोखले यांना दक्षिण आफ्रिकेत येण्याचे निमंत्रण दिले. |
| १९१२ | मार्च | १६ | गोखले यांनी करार पद्धती बंद करण्याकरिता सुरू असलेल्या प्रयत्नांची प्रशंसा केली. |
| | सप्टेंबर | १२ | फिनिक्स ट्रस्टची स्थापना केली. |
| | ऑक्टोबर | २२ | गोखले यांच्याबरोबर दक्षिण आफ्रिका, लॉरेन्को मार्कस, आणि झांजीबार येथील दौरा केला. |
| | | | युरोपीय पोषाख करणे बंद केले व दूध बंद केले आणि ताजी फळे व सुका मेवा यांच्यावर राहण्याचे ठरवले. |
| १९१३ | जाने. | १८ | 'इंडियन ओपिनियन'मधून वर्षाच्या अखेरपर्यंत भारतात परतण्याचा विचार व्यक्त केला. |
| | मार्च | १४ | सिअर्ले सर्वोच्च न्यायालयाने दक्षिण आफ्रिकेत भारतीय विवाह अवैध असल्याचा निकाल दिला. |
| | | ३० | सिअर्ले येथील निकालाच्या विरोधात भारतीयांची विशाल सभा. |
| | एप्रिल | १२ | १९११मध्ये झालेल्या अस्थायी तडजोडीचे पूर्णपणे पालन करण्यात नवीन आप्रवासी विधेयक अयशस्वी झाले असल्याचे 'इंडियन ओपिनियन'ने निदर्शनास आणून दिले. |
| | मे | १९ | आश्वासनानुसार सरकारने सवलती दिल्या नाहीत तर परत आंदोलन सुरू केले जाईल अशी सूचना देण्यात आली. |
| | जून | ७ | भेदभाव करणा-या कायद्याची कठोर अंमलबजावणी सुरू झाल्यामुळे परत सत्याग्रह करावा लागण्याची शक्यता पाहून भारतात परतण्याचा विचार स्थगित केला. |
| | | २८ | चर्चेकरिता मान्यता दिली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | सप्टेंबर | १३ | चर्चा 'निष्फळ सिद्ध झाली'. |
| | | १५ | निष्क्रिय प्रतिकारास परत सुरुवात. |
| | | १६ | कस्तुरबांना अटक |
| | ऑक्टोबर | १७ | न्यू कॅसल येथे गेले. ३ पौंड कर रद्द होत नाही तोपर्यंत काम बंद करण्याचा करारावरील भारतीयांना सल्ला दिला. ३००० खाण कामगारांनी संप केला. |
| | | २४ | ट्रान्सवालकडे कूच करण्याचा ठराव केला. |
| | | २८ | न्यू कॅसलपालून कूच करायला सुरुवात केली. |
| | | ३० | चार्ल्स टाऊन येथे पोहोचले. |
| | नोव्हेंबर | ३ | अटक करवून घेण्याकरिता ट्रान्सवालकडे कूच करण्याची घोषणा केली. |
| | | ५ | तीन पौंड कर रद्द करण्यासंबंधी आश्वासन द्यावे असा स्मट्सला फोन केला. |
| | | ६ | 'महान कूच'चे नेतृत्व केले. पामफोर्ड इथे अटक. |
| | | ७ | फॉक्सरस्ट येथे जमानतीवर सुटका. कूच करणारात परत सामील. |
| | | ८ | स्टॅंडरटन येथे परत अटक. जातमुचलक्यावर सुटका. कूच सुरू. |
| | | ९ | टीकवर्थ येथे अटक, बेलफोर येथे नेण्यात आले. |
| | | १० | जोपर्यंत कर रद्द होणार नाही तोपर्यंत दिवसातून एकदा जेवण करण्याची प्रतिज्ञा केली. |
| | | ११ | डंडी येथे नऊ महिन्यांची सश्रम कारावासाची शिक्षा. |
| | | १३ | फॉकरस्ट तुरुंगात नेण्यात आले. |
| | | १४ | फॉकरस्ट येथे नवीन खटला चालवण्यात येऊन तीन महिन्यांची शिक्षा. |
| | डिसेंबर | १८ | बिनशर्त सुटका करण्यात आली. सुटकेपासून तडजोड होईपर्यंत एक वेळा जेवण करण्याचा निश्चय केला. बंधुआ मजुरासारखे कपडे घालू लागले. |
| १९१४ | जाने. | १३,१६ | स्मट्सशी भेट, तडजोडीकरिता अटी सांगितल्या. |
| | | २२ | स्मट्सशी तडजोड झाल्यानंतर सत्याग्रह स्थगित केला. फार्मवरील रहिवाश्यांच्या नैतिक चुकीकरिता १५ दिवसांचा उपवास केला. |
| | जून | | भारतीय रिलीफ कायदा मंजूर करण्यात आला. |
| | जुलै | १८ | इंग्लंडमार्गे जहाजाने भारताकरिता रवाना. |

| | | | |
|---|---|---|---|
| | ऑगस्ट | ४ | लंडन येथे पोहोचले. |
| | ऑक्टोबर | | भारतीय स्वयंसेवक पथकाची स्थापना केली. पथकाची नियुक्ती. पथकाच्या कामात शासकीय हस्तक्षेपामुळे सत्याग्रह केला. |
| | डिसेंबर | १९ | जहाजाद्वारे भारताकरिता रवाना. |
| १९१५ | जाने. | ९ | भारतात पोहोचले. |
| | | | रुग्णवाहिका सेवेकरिता 'कैसर ए हिंद' पदक मिळाले. |
| | मे | २० | अहमदाबाद येथे सत्याग्रह आश्रमाची स्थापना केली. (तो साबरमती नदीच्या काठावर असल्यामुळे साबरमती आश्रम म्हणून ओळखला जाऊ लागला.) |
| १९१५-१६ | | | भारत आणि म्यांमारचा दौरा केला, रेल्वेच्या तिस-या वर्गातून प्रवास केला. |
| १९१७ | | | करारावरील आप्रवासी भारतीयांच्या छळाबद्दल यशस्वी आंदोलन केले. मोठ्या प्रमाणात हाताने कापड तयार करण्याकरिता चरख्याचा विचार मनात आला. |
| | एप्रिल | | नीळच्या शेतीवरील मजुरांच्या अवस्थेची चौकशी करण्याकरिता चंपारण (बिहार) येथे गेले. अटक व नंतर सुटका. रयतीच्या तक्रारीवर चौकशी करण्याकरिता शासनाने नेमलेल्या समितीवर नियुक्ती. |
| १९१८ | जाने.-मार्च | | अहमदाबाद येथे कापडगिरण्यांमधील मजुरांची समस्या हाती घेतली. प्रकरण शांततेने मिटावे म्हणून उपवास केला. पीक न झाल्यामुळे खेडा जिल्ह्यात (तेव्हाचा मुंबई प्रांत, आता गुजरात) शेतसारा रद्द व्हावा म्हणून सत्याग्रह सुरू केला. |
| | एप्रिल | २७ | व्हाईसराय यांनी दिल्ली येथे बोलावलेल्या युद्ध संमेलनात भाग घेतला. त्यानंतर लोकांना सैन्यात भरती करण्याकरिता खेडा जिल्ह्याचा दौरा केला. |
| १९१९ | फेब्रु. | २८ | रौलेट कायदा परत घेण्यात यावा म्हणून सत्याग्रह करण्याच्या शपथेवर सही केली. |
| | एप्रिल | ६ | अखिल भारतीय सत्याग्रह आंदोलनाचे उद्घाटन केले. |
| | | | देशव्यापी संप झाला. |
| | | ८-११ | पंजाबमध्ये प्रवेश करण्याला मनाई करणारा आदेश मान्य करायला नकार दिल्यामुळे दिल्ली येथे जाताना अटक करण्यात आली, मुंबई इथे परत आणण्यात आले, अनेक शहरांमध्ये हिंसा भडकली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | १३ | अमृतसर येथे जालियनवाला बागेची दुःखद घटना घडली, सैन्याने निःशस्त्र लोकांवर गोळीबार केला केला, त्यात ४०० पेक्षा अधिक लोक मरण पावले. साबरमती आश्रमाजवळ सार्वजनिक सभेत भाषण आणि पश्चात्ताप म्हणून तीन दिवसांच्या उपोषणाची घोषणा. |
| | | १४ | नादियाड येथे सत्याग्रह करण्यात आपली फार मोठी चूक झाली हे कबूल केले, पंजाबमध्ये सैनिकी कायदा लागू करण्याची घोषणा झाली. |
| | | १८ | सत्याग्रह स्थगित. |
| | नोव्हेंबर | २४ | दिल्ली येथे अखिल भारतीय खिलापत परिषदेचे अध्यक्षपद भूषवले. |
| | डिसेंबर | | अमृतसर काँग्रेसमध्ये मॉन्टेग्यू-चेम्सफर्ड सुधारणा मान्य करण्याचा सल्ला दिला. |
| १९२० | जानेवारी | | तुर्कस्तानच्या सुलतानाला (जो मुसलमानांचा खलिफाही होता) इस्लामच्या पवित्र स्थळावरील शासनापासून वंचित करण्यात येऊ नये म्हणून ब्रिटिश सरकारवर दडपण आणण्याकरिता व्हाईसरायकडे जाणा-या प्रतिनिधिमंडळाचे नेतृत्व केले. |
| | ऑगस्ट | १ | 'कैसर ए हिंद पदक', 'झुलू युद्ध पदक' आणि 'बोअर युद्धपदक परत करण्यासंबंधी व्हाईसराय यांना पत्र लिहिले. |
| | सप्टेंम्बर | | कोलकाता येथे आयोजित भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या विशेष अधिवेशनात पंजाब आणि खिलाफत आंदोलनातील न्यायाबद्दल असहकार आंदोलन करण्याला गांधीजींच्या कार्यक्रमाला स्वीकृती मिळाली. |
| | नोव्हेंबर | | अहमदाबाद येथे गुजरात विद्यापीठाची स्थापना. |
| | डिसेंबर | | काँग्रेसचे उद्दिष्ट भारताने सर्व वैध आणि शांततापूर्ण साधनांद्वारे स्वराज्यप्राप्तिकरिता प्रयत्न करावा असे आहे हा आहे हा गांधीजींचा ठराव नागपूर काँग्रेसमध्ये मंजूर करण्यात आला. |
| १९२१ | एप्रिल | | राष्ट्रीय रचनात्मक आंदोलनाची प्रगती करण्याकरिता काँग्रेसचे एक कोटी सदस्य बनवणे, टिळक स्वराज्य फंडाकरिता एक कोटी रुपये गोळा करणे आणि २० लाख चरखे सुरू करण्याच्या कार्यक्रमाची सुरुवात केली. |
| | ऑगस्ट | | विदेशी कापडांचा पूर्ण बहिष्कार करण्याच्या आंदोलनाचे नेतृत्व केले व मुंबईत विदेशी कापडाची विशाल होळी पेटवली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | डिसेंबर | | अहमदाबाद अधिवेशनात गांधीजींना काँग्रेसने सर्वाधिकार दिले. |
| १९२२ | फेब्रु. | १ | बारडोलीमध्ये सत्याग्रह सुरू करण्याची सूचना व्हाईसरायना दिली. |
| | | ५ | चौरीचौरा (उत्तर प्रदेश) येथील जमावाने २१ पोलीस शिपाई आणि एक उपनिरीक्षक यांना जिवंत जाळून टाकले या दुःखद घटनेमुळे गांधीजींनी पाच दिवसांचे उपोषण केले आणि सत्याग्रह आंदोलनाची योजना स्थगित केले. |
| | मार्च | १० | राजद्रोहाच्या आरोपाखाली साबरमतीत अटक, सहा वर्षांची शिक्षा. |
| १९२४ | जाने.-फेब्रू. | | ससून रुग्णालय, पुणे येथे (१२ जानेवारीला) आंत्रपुच्छाची शस्त्रक्रिया आणि ५ फेब्रुवारीला त्यांची तुरुंगातून सुटका करण्यात आली. |
| | एप्रिल | | यंग इंडिया आणि नवजीवन यांच्या संपादनाचे कार्य परत स्वतःच्या हाती घेतले. |
| | सप्टेंबर | १८ | हिंदू मुसलमान ऐक्याकरिता २१ दिवसांचे उपोषण सुरू. |
| | डिसेंबर | | बेळगावमध्ये काँग्रेसचे अध्यक्षपद भूषवले. |
| १९२५ | सप्टेंबर | | चरखा कातणारांकरिता अखिल भारतीय चरखा संघाची स्थापना केली. |
| | नोव्हेंबर | | आश्रमवासियांनी केलेल्या दुष्कर्माकरिता त्यांच्या वतीने सात दिवसांचा उपवास केला. आपली आत्मकथा 'द स्टोरी ऑफ माय एक्सपेरिमेंट्स विथ ट्रुथ' लिहायला सुरुवात केली. |
| १९२७ | नोव्हेंबर | | श्रीलंकेच्या दौ-यावर गेले. |
| १९२८ | डिसेंबर | | १९२९च्या अखेरपर्यंत भारताला स्वतंत्र उपनिवेशाचा दर्जा मिळाला नाही तर काँग्रेसचे ध्येय पूर्ण स्वातंत्र्य असेल असा ठराव कोलकाता काँग्रेसमध्ये मांडला. |
| १९२९ | डिसेंबर | | त्यांच्या आग्रहावर लाहोर काँग्रेसने घोषित केले केले की काँग्रेसचा स्वराज्याचा अर्थ पूर्ण स्वराज्य (अर्थात पूर्ण स्वातंत्र्य) आहे. |
| १९३० | फेब्रुवारी | | अखिल भारतीय काँग्रेस समितिद्वारे सविनय आज्ञाभंगाकरिता सर्वाधिकार देण्यात आले. |
| | मार्च | २ | काँग्रेसच्या मागण्या मान्य करण्यात आल्या नाहीत तर आपण मिठाचा कायदा तोडू असे पत्र व्हाईसराय यांना पाठवले. |
| | | १२ | मिठाचा कायदा तोडण्याकरिता समुद्रकाठावरील दांडी गावाकडे कूच करायला सुरुवात केली व औपचारिक पद्धतीने तिथे त्यांनी कायदा तोडून मीठ हाती घेतले (एप्रिल ६). |

| | | | |
|---|---|---|---|
| | मे | ५ | अटक आणि खटला न भरता तुरुंगात ठेवले; संपूर्ण भारतात सत्याग्रह झाला; वर्षाच्या अखेरपर्यंत एक लाखापेक्षा अधिक लोकांना तुरुंगात डांबण्यात आले. |
| १९३१ | जानेवारी | २६ | तुरुंगात बिनशर्त मुक्तता. |
| | फेब्रु.-मार्च | | व्हाईसराय बरोबर चर्चेच्या अनेक फेरी होईन अखेरीस इर्विन-गांधी करार झाला |
| | ऑगस्ट | २९ | दुस-या गोलमेज परिषदेत भाग घेण्याकरिता एक प्रतिनिधी म्हणून समुद्रमार्गे इंग्लंडकरिता रवाना. |
| | सप्टें-डिसें. | | परिषदेच्या सभांमध्ये भाग घेतला. |
| | डिसेंबर | ५ | इंग्लंडहून भारताकरिता प्रस्थान. |
| | डिसेंबर | २८ | मुंबईला उतरले. |
| १९३२ | जाने. | ४ | अटक करण्यात येऊन खटला न भरता तुरुंगात टाकण्यात आले. |
| | सप्टेंबर | २० | सांप्रदायिक निवाड्यात हरिजनांकरिता वेगळ्या मतदार संघाची रचना करण्यात आली होती तो रद्द करायला लावण्याकरिता तुरुंगातच ‘आमरण उपोषणाला’ सुरुवात. |
| | | २६ | भारत सरकारने हरिजनांसंबंधीच्या गांधीजींच्या मागण्या मान्य केल्यानंतर उपवास सोडला. |
| १९३३ | फेब्रु. | ११ | इंग्रजी आणि हिंदीमध्ये प्रकाशित होणा-या हरिजन साप्ताहिकाची स्थापना केली. |
| | मे | ८ | आत्मशुद्धिकरिता दुपारपासून एकवीस दिवसांच्या उपोषणाला सुरुवात केली; रात्री नऊ वाजता बिनशर्त मुक्तता करण्यात आली. |
| | | ९ | सहा आठड्यांकरिता सविनय आज्ञाभंग स्थगित ठेवण्याची घोषणा करण्यात आली आणि सरकारने आपले अध्यादेश परत घ्यावे अशी मागणी केली. |
| | | २९ | उपोषण सोडले. |
| | जुलै | २६ | सत्याग्रह आश्रमाचे विघटन केले. |
| | | ३० | सविनय आज्ञाभंग आंदोलन परत सुरू करण्याची व त्याकरिता ३३ सहका-यांसह अहमदाबादहून रासपर्यंत कूच करण्याच्या आपल्या निर्णयाची सूचना मुंबई सरकारला दिली. |
| | | ३१ | अटक आणि विनाचौकशी तुरुंगात टाकण्यात आले. |
| | ऑगस्ट | ४ | सुटका आणि प्रतिबंधाच्या आदेशाचा भंग केल्यामुळे परत अटक. |
| | | १६ | अस्पृश्यताविरोधी प्रचार सुरू ठेवण्याकरिता सुविधा न दिल्यामुळे उपवास केला. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | २३ | बिनशर्त मुक्तता |
| | नोव्हेंबर | ७ | हरिजनोद्धाराकरिता दौरा सुरू. |
| १९३४ | सप्टेंबर | १७ | ग्रामोद्योगाचा विकास, हरिजन सेवा, मूलभूत हस्तकौशल्याचे शिक्षण देण्याकरिता १ ऑक्टोबरपासून राजकारणातून संन्यास घेण्याची घोषणा केली. |
| | ऑक्टोबर | २६ | अखिल भारतीय ग्रामोद्योग संघाचे उद्‌घाटन |
| १९३६ | एप्रिल | ३० | मध्यप्रांतात (आता महाराष्ट्र) वर्धेजवळील सेवाग्रामला मुख्य केंद्र बनवून तिथेच राहू लागले. |
| १९३७ | ऑक्टो. | २२ | वर्धेत शिक्षण संमेलनाचे अध्यक्षपद भूषवत असताना मूलभूत हस्तकौशल्याद्वारे शिक्षण देण्याची आपली योजना सांगितली. |
| १९३९ | मार्च | ३ | प्रशासनात सुधारणा करण्याचे शासनाचे आश्वासन पूर्ण करायला लावण्याकरिता राजकोट येथे आमरण उपोषण सुरू केले आणि व्हाईसराय यांच्या मध्यस्थीनंतर ७ मार्चला ते उपोषण सोडले. |
| १९४० | जुलै-सप्टें. | | युद्धाच्या स्थितीविषयी चर्चा करण्याकरिता व्हाईसराय यांनी आमंत्रिल्यानंतर त्यांची भेट घेतली. |
| | ऑक्टोबर | | वैयक्तिक सविनय आज्ञाभंगाकरिता मान्यता दिली; सत्याग्रह या विषयावर 'हरिजन'मध्ये प्रकाशित होणारे अहवाल आणि लेख यांची पूर्वतपासणी करण्याची शासनाची मागणी पाहून 'हरिजन' व संबंधित नियतकालिकांचे प्रकाशन स्थगित केले. |
| १९४१ | डिसें. | ३० | स्वतःच्याच विनंतीनुसार काँग्रेस कार्यकारिणीच्या जबाबदारीतून मुक्त झाले. |
| १९४२ | जाने. | १८ | 'हरिजन' व संबंधित नियतकालिकांचे प्रकाशन परत सुरू. |
| | मार्च | २७ | नवी दिल्लीत सर स्टॅफर्ड क्रिप्स यांची भेट घेतली. त्यानंतर क्रिप्सचे प्रस्ताव 'नंतरच्या तारखेच्या (post dated)' धनादेशासारखे आहेत असे सांगितले. |
| | मे | | ब्रिटिश सरकारला भारत सोडण्याची विनंती केली. |
| | ऑगस्ट | ८ | भारत छोडोच्या ठरावावर प्रकाश टाकण्याकरिता मुंबईमध्ये अखिल भारतीय काँग्रेस कमेटीच्या सभेला संबोधित केले. |
| | | ९ | अटक व पुण्यातील आगाखान महालात नजरकैद. |
| | | १५ | आगाखान महालात गांधीजींचे स्वीय सचिव महादेव देसाई यांचा हृदयक्रिया थांबल्याने मृत्यू. |
| | ऑग.-डिसे. | | दंगलींसंबंधी व्हाईसराय आणि भारत सरकार यांच्याशी पत्रव्यवहार. |

| | | | |
|---|---|---|---|
| १९४३ | फेब्रु. | १० | २१ दिवसांचे उपोषण सुरू व ते ३ मार्चला संपवले. |
| १९४४ | फेब्रु. | २२ | आगाखां महालात कस्तुरबा गांधींचे निधन. |
| | मे | ६ | बिनशर्त सुटका |
| | सप्टें. | ९-२७ | एम. ए. जिना यांच्याशी पाकिस्तानविषयी चर्चा सुरू होती. |
| | ऑक्टोबर | २ | ७५व्या वाढदिवसानिमित्त कस्तुरबा स्मारककाकरिता ११० लाख (८,२५,०००पौंड) रुपयांची रक्कम भेट देण्यात आली. |
| १९४५ | एप्रिल | १७ | आगामी सॅनफ्रॅन्सिस्को संमेलनासंबंधी एक वक्तव्यातून घोषित केले की समानता आणि भारताचे स्वातंत्र्य यांच्याशिवाय शांतता अशक्य आहे. |
| | डिसेंबर | १९ | शांतिनिकेतनमध्ये सी. एफ. ॲन्ड्र्यूज रुग्णालयाची पायाभरणी केली. |
| १९४५-४६ | | | डिसेंबर आणि जानेवारी महिन्यात बंगाल आणि आसामचा दौरा केला. |
| १९४६ | जाने.-फेब्रु. | | अस्पृश्यताविरोध व हिंदुस्तानी यांच्या प्रचाराकरिता दक्षिण भारताचा दौरा केला. |
| | फेब्रुवारी | १० | हरिजन आणि संबंधित साप्ताहिकांचे प्रकाशन परत सुरू केले. |
| | एप्रिल | | दिल्लीत कॅबिनेट मिशनबरोबरच्या बोलण्यांमध्ये भाग घेतला. |
| | मे | ५-१२ | सिमला येथे गेले; सिमला संमेलन आयोजित; विचारविमर्श निष्फळ ठरले. |
| | | १६ | कॅबिनेट मिशनने आपल्या योजनेची घोषणा केली. |
| | | १८-१९ | कॅबिनेट मिशनच्या योजनेबद्दल कॅबिनेट मिशनबरोबर चर्चा केली. |
| | | २६ | ब्रिटिश सरकारने तयार केलेला दस्तावेज सर्वोत्तम असल्याचे मत दिले. |
| | जून | ६ | मसुरीला गेले. |
| | | ७ | दिल्लीला परतले. |
| | | १० | मित्र राष्ट्रांचा विजय ‘असत्यावरील सत्याचा विजय’ नसल्यामुळे त्याबद्दल आनंद व्यक्त करायला नकार दिला. |
| | | ११ | व्हाईसराय यांनी गांधीजींची भेट घेतली. केंद्रात संयुक्त सरकारचा प्रस्ताव ठेवला. |
| | | १६ | कॅबिनेट मिशनची बोलणी स्थगित झाली, व्हाईसराय यांनी अंतरिम सरकार बनवण्याचा प्रस्ताव मांडला. |
| | | १८ | काँग्रेस कार्यकारिणेने अंतरिम सरकारची योजना मान्य |

करण्याचा निर्णय घेतला.

२०-२१ कार्यकारिणीच्या सभेत भाग घेतला, क्रिप्स यांची भेट घेतली.

२१ काँग्रेसने अंतरिम सरकारमध्ये सामील न होता केवळ संविधान सभेत सामील व्हावे असा सल्ला दिला.

२४ कॅबिनेट मिशनची भेट घेतली.

२९ दिल्लीहून पुण्याकरिता रवाना झाले, रस्त्यात गाडी रुळावरून घसरवण्याचा प्रयत्न झाला.

जुलै ७ मुंबईमध्ये अखिल भारतीय काँग्रेस कमेटीला संबोधित केले. काँग्रेसने कॅबिनेट मिशनची १६ मेची योजना स्वीकारली.

३१ जिनांनी सरळ कारवाई करण्याची धमकी दिली.

ऑगस्ट १२ व्हाईसरायनी काँग्रेसला अंतरिम सरकार बनवण्याकरिता आमंत्रित करण्याची घोषणा केली.

१६-१८ कोलकातात भयानक कत्तली.

२४ व्हाईसराय यांनी आपल्या योजनेची रेडिओवर माहिती सांगितली.

२७ गांधीजींनी बंगालमधील शोकांतिकेची पुनरावृत्ती होऊ नये याबद्दल सावधगिरीची सूचना करणारी तार केली; वेव्हेल यांनाही पत्र लिहिले.

सप्टेंबर ४ अंतरिम सरकारची स्थापना.

२६ वेव्हेल यांची भेट.

ऑक्टोबर ९ जिना यांच्या नऊ सुत्री मागण्यांबद्दल काँग्रेसला सूचीत करण्यात आले.

१० नोआखालीत नरसंहार.

१५ मुस्लिम लीगची अंतरिम सरकारमध्ये सामील होण्याला संमती.

२८ कोलकाताकरिता प्रस्थान, बिहारमध्ये दंगलींना सुरुवात.

नोव्हेंबर ६ नोआखालीकरिता प्रस्थान, 'आंशिक उपवासा'संबंधी वक्तव्य प्रकाशित केले, नोआखालीचा दौरा सुरू.

२० कोणालाही सोबत न घेता दौरा सुरू केला.

डिसेंबर २० श्रीरामपूरमध्ये एक महिन्याचा प्रवास पूर्ण केला.

२५ ईश्वर माझी सत्त्वपरीक्षा पाहतो आहे असे ते नोआखालीत म्हणाले.

३० जवाहरलाल नेहरू गांधीजींना येऊन भेटले, त्यांना गांधीजी म्हणाले, 'माझा विवेक माझ्या अंतःकरणातील भावनांचे पूर्णपणे समर्थन करतो आहे.'

| | | | |
|---|---|---|---|
| १९४७ | जाने. | २ | ते म्हणाले, 'माझ्या चोहोबाजूला काळोखच काळोखच आहे.' श्रीरामपूरहून पायी दौ-यावर निघाले. |
| | | ३-२९ | बिहारमधील दंगलग्रस्त क्षेत्रांचा दौरा केला. |
| | | ३० | पटण्याहून दिल्लीकरिता रवाना झाले. नवीन व्हाईसराय माऊंटबॅटन दिल्लीला पोहोचले. |
| | एप्रिल | १-२ | आशियायी संबंध संमेलनाला गांधीजींनी दिल्लीत संबोधित केले. |
| | | १५ | सांप्रदायिक दंगली थांबण्याकरिता जिनांबरोबर संयुक्त आवाहन केले. |
| | | २९ | बिहारला गेले. |
| | मे | १ | काँग्रेस कार्यकारिणीने तत्त्वतः देशाची फाळणी मान्य केली. |
| | | ५ | सांप्रदायिक आधारावर भारताचे विभाजन होणे अपरिहार्य आहे ही गोष्ट गांधीजींनी एका मुलाखतीत अमान्य केली. |
| | | २४ | बिहारहून दिल्लीकरिता प्रस्थान. |
| | | ३१ | गांधीजींनी घोषणा केली की विभाजनापूर्वी भारतात शांतता प्रस्थापित झाली पाहिजे, भारताच्या चिरफाडीत मी भागीदार नाही असे म्हणाले. |
| | जून | २ | व्हाईसराय यांनी फाळणीची योजना मांडली, काँग्रेस कार्यकारिणीने ती स्वीकारली. |
| | | ३ | माऊंटबॅटन यांच्या योजनेवर भारतीय नेत्यांचे रेडिओवर भाषण. |
| | | ६ | पाकिस्तानचा स्वीकार करत गांधीजींनी माऊंटबॅटन यांना लिहिले की काँग्रेसबरोबरचे सर्व वाद मिटवण्याकरिता जिनांना सांगण्यात यावे. |
| | | १२ | काँग्रेस कार्यकारिणीच्या सभेला संबोधित केले. |
| | जुलै | | 'भारत स्वातंत्र्य विधेयक' मंजूर झाले. |
| | | २७ | जनतेचे वर्चस्व हा जनतेचा विशेषाधिकार आहे व तो मान्य करण्यात यावा असा सल्ला भारतातील संस्थानिकांना दिला. |
| | ऑगस्ट | १४ | इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त झाल्यानंतर पुढील दिवसाचा आनंदाचा दिवस म्हणून स्वागत, परंतु फाळणीची निंदा, पाकिस्तानचा जन्म. |
| | | १५ | कोलकातात हिंदू मुसलमान यांच्यामध्ये सद्भाव. |
| | | १६ | कोलकातामधील या 'चमत्काराचे' स्वागत. |
| | सप्टेंबर | १ | कोलकातामधील शांती म्हणजे नव्याचे नऊ दिवस असे म्हणून उपवासाचा निश्चय. |

| | | |
|---|---|---|
| | | २ कोलकाता येथील घरात मोठ्या जमावाने त्यांना घेरले. नोआखालीला जाण्याचा विचार रद्द केला, शांततेकरिता करत असलेल्या प्रयत्नांची तीव्रता वाढवली. |
| | | ४ उपोषण सोडले. |
| | | ७ कोलकाताहून दिल्लीकरिता प्रस्थान, दंगलग्रस्त क्षेत्रांचा दररोज दौरा करायला सुरुवात. |
| | | २४ पाकिस्तानी हल्लेखोरांचा काश्मीरवर हल्ला. |
| | | २५ काश्मीर भारतीय संघराज्यात सामील झाला. |
| | | २६ 'भारताचा सर्वनाश' या चर्चिलच्या विधानावर टीका केली. |
| | नोव्हेंबर | १ भारतीय सैन्याचा जुनागढमध्ये प्रवेश. |
| | | ३ जुनागढ भारतात सामील. अखिल भारतीय काँग्रेस कमेटीला संबोधित केले. |
| | | ११ जुनागढच्या भारतातील सामिलीकरणाचे समर्थन. |
| | डिसेंबर | २५ भारत आणि पाकिस्तान यांच्यातील मैत्रीपूर्ण संबंधांच्या कराराचा आग्रह. |
| | | ३० भारताने काश्मीरचा मुद्दा संयुक्त राष्ट्राकडे नेला. |
| १९४८ | जाने. | १२ सांप्रदायिक शांततेकरिता दिल्लीत उपवास करण्याचा निर्णय, उपवास करू नये म्हणून माऊंटबॅटन यांनी समजूत घालण्याचा प्रयत्न केला परंतु अपयश. |
| | | १५ प्रकृती नाजूक, भारतीय मंत्रिमंडळाने पाकिस्तानला देणे असलेले ५५ कोटी रुपये देण्याचा निर्णय घेतला. सांप्रदायिक शांततेकरिता उपोषण सुरूच. |
| | | १७ उपवास थांबवणे अतिशय आवश्यक असल्याचा चिकित्सकांचा सल्ला. केंद्रीय शांतता समिती स्थापन. तिने शांततेकरिता शपथ घेण्याचा निर्णय घेतला. |
| | | १८ शांतता समितीने शपथपत्रावर सह्या केल्या. 'शांतीशपथपत्र' गांधीजींना देण्यात आले. गांधीजींनी उपवास सोडला. |
| | | २० प्रार्थनासभेत बॉम्बस्फोट. |
| | | २७ महरौली येथील मुसलमानांच्या मेळ्यात गेले. |
| | | २९ चिडलेल्या निर्वासितांनी गांधीजींनी हिमालयात जावे म्हणून मागणी केली. |
| | | ३० कॉंग्रेसचे लोकसेवक संघात रुपांतर करण्याच्या योजनेला अंतिम रूप दिले, प्रार्थनासभेत जाताना हत्या करण्यात आली. |

# विषयसूची


आंतरराष्ट्रीयतावाद, आंतरराष्ट्रीवादी, ४७४, ४७५

अंधश्रद्धा, ५२, ६४, ६७, ८३, १०७, ११४

अखिल भारतीय काँग्रेस समिती, ३८५

अग्यारी, ११४

अचूकता, २०

अण्वस्त्र १३४, १३६, १५८, १६४, ४८८-४९२; - सर्व प्रकारच्या हिंसेचे व्यर्थत्व सिद्ध करतो, ४८८; मानवतेला जिवंत ठेवणा-या सर्वोत्तम भावनेला निर्जीव करतो, ४८९; अस्थायी स्वरूपात जपानच्या आत्म्याला नष्ट केले, ४८९;-चा अंत प्रत्युत्तरात टाकलेल्या अण्वस्त्राने होणार नाही, ४९०; चा उपयोग विज्ञानाचा सर्वात क्रूर उपयोग आहे, ४९०

अतिशूद्र, ११५, १२०

अद्वैत, २४४, ४७९

अधिकार, २४८, ३१६

'अनटू धिस लास्ट', ५, २१६, २४६, २६२, ने लेखकाला अतिशय प्रभावित केले, ५

अनुशासन वा शिस्त, २१, ४८, ९७, १३३, १३८, १७४, ३६९; स्वेच्छापूर्वक - सामूहिक स्वातंत्र्याची पहिली अट, ५०६; प्रतिकूल परिस्थितीत शिकता येऊ शकते, ५०६

अनियंत्रित राज्यकारभार, ३५३

अपरिग्रह, २०४-२१५

अब्दुल्ला, शेख, १६४

अफगाणिस्तान, ३६८

अमेरिका, ३१, १६६, २६४, २७०, ४९५

अमेरिकी, २६२, ४८८, ४८९

अरबस्तान, ४६९

अराजकता १४२; प्रबुद्ध, १४५

अराजकतावादी, १५३

अरिमन, १९६

अर्जुन, १९६, ४८७

अर्थशास्त्र, नैतिक मूल्यांची उपेक्षा करणारे खोटे आहे, २८८; खरे-नैतिक मानदंडाच्या विरोधात नसते, २८९; कुबेराच्या पूजेला महत्त्व देणारे खोटे आणि निराशाजनक विज्ञान आहे, २८९; सामाजिक न्यायाच्या बाजूला असते, २८९

अल्पसंख्याक, ३६३

अवतार, ६७, ८२

अशोक ४४१

अश्वेत वंश, गो-यांच्या दडपशाही विरुद्ध उठून उभे राहतील, ४८०

असत्य, ३०, ४४, ६२, ७०

असहकार, २२, २८, १४४, १९५-२०१, २२५, ३७८, ४०८, ४८५; चा

धार्मिक आधार, १९५; चे नीतिशास्त्र, १९८-९९; च्या मुळात प्रेम, २००; एक कर्तव्य, २००; भौतिक शक्तिप्रयोगापेक्षा अधिक महत्त्व देणे निश्चितपणे प्रगतिचे चिन्ह, ४९७
अस्त्र, २८
अस्पृश्य, ११५-११७, २६७
अस्पृश्यता, ११५-११७, २७४, ३४३, ४०७
अस्पृश्यताविरोधी आंदोलन, ११५
अहंकार, ४
अहिंसक अर्थव्यवस्था, २८८-९१
अहिंसक असहकार, १९८, २७०
अहिंसक पद्धती, गरीब आणि श्रीमंत यांच्यातील दरी मिटवल्याशिवाय अशक्य, २८१
अहिंसक राज्य, १४५-४९, १७३
अहिंसक विद्रोह, ३१९
अहिंसक व्यक्ती, १५८
अहिंसक समाज, १४१-४५, २९३
अहिंसक स्वराज्य, १४७-४९
अहिंसा, १, २, ३, १९, २०, २५, ३०, ४०, १०१, १२१-१७७, २४०, २६९, २७२, २९३, ३३३, ३४५, ४६१, ४६३, ५३०
ॲन्ड्रयूज, सी. एफ. ३५५
ॲबिसिनीमियन, १६०
आग्रा येथील किल्ला, ३९३
आंतरजातीय विवाह, ११८
आंतरिक शत्रू, ६४
आध्यात्मिक शक्ती, ८९
आत्मरक्षण, ६५, १५६-५७,
आत्मविकास, २५४
आतंकवाद, १४९-१५४
आतला आवाज, ३२-३६, ३७, ९३, १५८
आत्मदमन, ६५
आत्मनिग्रह, २९७
आत्मबलिदान, ६५
आत्मवंचना, १४५
आत्मशुद्धिकरण, ५०६; शिवाय सर्वांशी तादात्म्य अशक्य, ५०६; चा अर्थ आहे जीवनाच्या सर्व क्षेत्रात, ५०७
आत्मसाक्षात्कार, १३, ५७-५८,
आत्महत्या, १७, १६८
आदर्श अर्थशास्त्र, २८८; मध्ये कोणालाही अन्नवस्त्राची ददात जाणवू नये, २८८
आध्यात्मिक प्रगती, २९३
आफ्रिका, २६५, ४५६, ४७३
आफ्रिकी, ३६८, ४८१
आफ्रिदी, ३५७
आयर्लंड, १५३
आरमार, १७०
आराधना, सामूहिक, ११४
आरोग्य, निसर्गाचा नियम, ५४३
आरोग्यरक्षण, ३८९
आर्थिक नियम, २८८
आर्थिक पुनर्रचना, ४०२
आर्थिक समानता, ५, २७२; -अहिंसेच्या मार्गाने, २९२
आशिया, ३६७, ४५६, ४७२, ४७३; -चे प्रेम आणि सत्याचा संदेश, ४९१; -देश, १७७, -संमेलन, १६९
आसक्ती, ६४
आहारविज्ञान ५२९
ऑस्ट्रिया, ४९५

इंग्रज २३७, ३५२-३५६, ४५९
इंग्रज अधिकारी, ४४७
इंग्रजांमध्ये झालेले विवाह, ३०५
इंग्रजी भाषा, २२६, ४१८
इंग्रजी- द्वितीय भाषेच्या स्वरूपात अभ्यास केला जाऊ शकतो, ४१९, इंग्रजी भाषेने शिक्षित भारतीयांना दुर्बल बनवले आहे, ४१८
'इंडियन ओपिनियन', ४२
इंडोनेशिया, ३६१
इजिप्त, २६५, ४६९, ४९१
इटली, ३५६
इन्यमवान, ३५८
इस्लाम, १०१, ३६२
ईशोपनिषद, २६९
ईश्वर, देव - वर जिवंत श्रद्धा १८६, २०१, २१०, २१४, २२०, २२३, २७३
ईश्वरीय नियम, ८३
उच्चनीचभाव, ११६
उतावीळपणा, २३२, ४५७
उत्पादन, विशाल प्रमाणावर, ६०,२६०
उद्योगवाद, २५५; -चे भविष्य अंधकारपूर्ण, २६५
उद्योगिकरण, -चे दुष्परिणाम, २६६; -चा शाप, २६४-६८
उर्दू, ४१८; -लिपी, ४३७
उपलब्ध व्हावी, २९१
उपनिषद, ६४, १०२
उपवास, माझ्या अस्तित्वाचा भाग, ३६;
उच्चतर शक्तिद्वारा आदेश, ३७; एक खरी प्रार्थना, ३७; केव्हा करावा, ३८; पीडादायक, ३८-९
ऐकण्याकरिता प्रयत्न आवश्यक, ३४; अचूक आहे, ३४

ओल्ड टेस्टॅमेंट, १५९

ऋषी, २८, १२१

कपट, ३३
कताई, २४६, ४०१; -तप अथवा प्रसाद, ४३९; देशाची जडता मिटवून टाकेल, ४४२
कबीर, २०९
कर्नाटक, ४२०
कमाल पाशा, १५२
कलाकृती अपूर्ण, ५९
कर्म, अनासक्त भावाने, १८
कर्मभूमी, ३६६
कर्मयोगी, ४४२
कला, ५९-६३; -आत्म्याची अभिव्यक्ती, ५९; सौंदर्याच्या शाश्वत नियमांच्या तुलनेत
कलाकार, ५९
कल्पना, ३५, ३६
कवी, २१८
काम, माणसाचा महान शत्रू, ३२७
काम, २१३, २२०; -चा सिद्धान्त २२२-२३; -बौद्धिक, २२३
कार्यकर्ता, १०
काश्मीर, १६४, ३५७-५८
काश्मीरी, १६४, ३५८
कुमारी मेरी, ११४
कारखाने (मोठे), १४८

कुराण, ६०, ७१, १००, १०६, १०८, १०९, १२७, ४०१
केंद्रीकरण १४८
केरळ, ४२०
कोलंबस, २५७
काँग्रेस, १४४; - कराची, २७४
क्रोध न करणे, १६
कृषी, २१९, २९०
कृष्ण, १०६, ११४, १५२

खाजगी मालकी, १४६
खानसाहेब, १३६
खेडा जिल्हा, ३५३
ख्रिश्चन, २७१, ३७५, ४३८, ४५७; -जग, १५९; -धर्म, १०४, १०५, १०७, २५६, ४९५; -धर्माने येशूच्या वचनांना नाकारले १९७; -धर्माचा जन्म, १९७; - धर्माच्या तत्त्वज्ञांनी येशूचा उपदेश निवडक लोकांकरिता सीमित केला आहे, ४९७-९८

गंगा, ५१६, २९९
गांधी, मोहनदास करमचंद, -चा दावा आहे की ते काही शाश्वत सत्यांबद्दल प्रयोग करत आहेत, १; देश अथवा धर्माच्या मुक्तिकरिता सत्य आणि अहिंसेचा बळी देणार नाही, १; लहानपणापासूनच सत्याचे कैवारी, २; गृहस्थ आणि सेवक, ३; -चे म्हणणे आहे की पंचा त्यांच्या जीवनाचा स्वाभाविक विकास आहे, ३; विशेषाधिकार आणि एकाधिकाराची घृणा, ३; -चे म्हणणे आहे की आपण आपले अस्तित्व पूर्णपणे मिटवून टाकले पाहिजे, ४; निर्धनांची सेवा करण्याची मनापासून इच्छा, ५; -प्राणिमात्राबरोबर एकरूप होण्याची इच्छा, ६; मानवतेच्या पूर्ण ऐक्यावर विश्वास, ७; अधिकांश आध्यात्मिक कृत्य व्यावहारिक असले पाहिजे, ७; -चा दावा आहे की त्यांच्या मनात कोणत्याही व्यक्तिबद्दल वा राष्ट्राबद्दल घृणाभाव नाही, ७, ८, ९; वाईटाशी संबंध, वाईट वागणाराला हानी पोहोचवण्याची इच्छा नाही, ८; महात्मा या पदवीमुळे खुषी झाली असावी असा एक क्षणही नाही १०; -राजकारणाला आपला सर्वात कमी महत्त्वाचा भाग समजतात, १०; त्याचे महात्मापण कार्यकर्त्यांच्या शुद्धतेवर अवलंबून आहे, १०; सत्य, अहिंसा आणि ब्रह्मचर्य यासंबंधीचा आग्रह आपल्या जीवनाचा सर्वात महत्त्वपूर्ण भाग समजतात, १०; -स्वतःला ईश्वराचा क्षुद्रतम प्राणी समजतात, १०; स्वतःला श्रीकृष्णाचा एखादा अवतार म्हटले जाणे ईश्वराचा अपमान समजतात, १२; -आपल्या कार्यक्रमाला पुढे नेऊनच आपला सन्मान करता येईल असे म्हणणे, १२; -आपले फोटो लावण्याविरुद्ध सावधगिरीची सूचना, ११-१२; -आपली राष्ट्रसेवा याच जन्मात मोक्षप्राप्तिच्या प्रयत्नाचा भाग आहे असे सांगतात, १३; -कोणताही चमत्कार करू शकत

नाही असे आग्रहपूर्वक सांगतात, १३; -आपल्या मर्यादांची जाणीव, १४, १८; ईश्वरावर अढळ श्रद्धा, १४, १७, १९; -दुर्दम्य आशावादी, १७; -हळूहळू झिजून मरण्यापेक्षा खुनी माणसाच्या गोळीने मरणे चांगले, १६; -त्यांच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे बाह्य शक्तिकडून माणसाच्या ध्येयाची हानी होऊ शकत नाही, १७; -सहजप्रवृत्तीने काम करत असल्याचा दावा, १९; - त्यांचे काहीही गुप्त वा खाजगी नाही, १९-२०; -पराजयाने हतोत्साहित नाही, २१; -सार्वजनिक वा वैयक्तिक जीवनात कधीही वचनभंग केला नसल्याचा दावा, २२; -कोणी वचनभंग केला तर आत्म्याचा थरकाप होतो, २२; -कधीही आशावाद सोडला नाही, २२; -त्यांचे नेतृत्व, २२; -राष्ट्राचा अविभाज्य भाग बनल्याचा दावा, २२; -भारत अहिंसक मार्गाने आपले ध्येय साध्य करील अशी आशा, २३; -व्यावहारिक आदर्शवादी, २३; -अहिंसेच्या प्रसाराकरिता जीवन समर्पित, २४; -आपल्या जीवनध्येयाची व्याख्या, २३-३२; -सत्य आणि अहिंसा त्याची दोन फुफ्फुसे, २५; -अनेक प्राचीन सत्यांवर नवीन प्रकाश टाकल्याचा दावा, २६; - शक्य तितक्या मोठ्या प्रमाणात सत्य आणि अहिंसा यांचा प्रयोग, २७; -संप्रदाय स्थापन करण्याची कोणतीही इच्छा नाही, २७

गांधीवादी अर्थव्यवस्था, तिच्या अंतर्गत उत्पादनाचे स्वरूप सामाजिक आवश्यकतेप्रमाणे ठरेल, २८८

गांधीवादी विचार, २६-२७

गांधीजींच्या हृदयात चोवीसही तास, ८६-८७

गुंड, ४३५

गुंडगिरी, १४७, ४३५

गाय, ४३७; -तिचे स्थान, ४२२; -चे रक्षण ईश्वराच्या मूक सृष्टिचे संरक्षण, ४२२; -करोडो भारतीयांची आई, ४२२; -संपूर्ण अमानवीय विश्वाची प्रतीक, ४२३; -चे रक्षण मानवीय विकासातील अद्‌भुत घटना, ४२३; -रक्षण हिंदू धर्मातील केंद्रीय तत्त्व, ४२३; -ची पूजा, १२६; -चा वध, ४२३; -ची सेवा, ४२४; -सेवा संघ, ३८७

गर्भनिरोधक, ३१३, ३१५; -नारित्वाचा अपमान, ३१२

गाव, ग्राम, खेडी, ८८, १४२, ३९४, ३९५, ३९६, ४०८; -चे विघटन, २६७; पूर्ण अधिकार असलेले ग्रामगणतंत्र, २७६; -चे जीवन शहरातील जीवनाची नक्कल नसावे, ३९६; -नष्ट झाले तर भारतही नष्ट होईल, ४०३; -गणतंत्र, ४०५; -स्वावलंबी आणि आपल्या समस्यांची सोडवणूक करण्याचे सामर्थ्य असले पाहिजे. ४०५; -मध्ये पंचायतींचे शासन असेल, ४०८

गुजरात, ४९४

गुजराती, ४१९, ४२१

गुरुत्वाकर्षण, ११७
गुरू गोविंदसिंह, १५२
गुलामगिरी, १६४, ३४१
गोखले, गोपाळ कृष्ण, गांधीजींचे राजकीय गुरू, ५१०
गोपनीयता, ५११
गोपाळ, २६८
गोवा, ३५८-६१
गॅरिबॉल्डी, १५२
ग्राम -अर्थव्यवस्था कधी काळी अहिंसेवर आधारित होती, २९०; -पंचायत,२८६, पाहा पंचायत; -वासी, गावकरी, खेडूत, ३९३, ३९४, ३९५, ४०३; गावातील लोकांनी उच्च प्रतिचे कलाकौशल्य विकसित केले पाहिजे. ४००; -सेवक,४००; -स्वराज, ४०८; -उद्योग, ३८१; -चा पुनरुज्जीवन २६७-६८
ग्रामसेवा, समग्र, ३९८-४०५
ग्रीस, ६१, २६५
ग्रेट ब्रिटन, इंग्लंड १६६, १६७, २६५, २६६, ३४५, ३५२, ३५३, ३५४

घटस्फोट, ३२६

चंगेजखान, ३४०
चमत्कार, ८१-२
चर्च, ११२, ११३
चर्चिल, ८२
चरखा, १५१, २१३, २१५, २४६, २६१, ३८१, ४०३, ४३९, ४४०, ४४१; -राष्ट्राच्या समृद्धीचे आणि स्वातंत्र्याचे प्रतीक, ४४०; -आर्थिक दुर्दशा दूर करण्याकरिता सहजपणे समर्थ, ४४०; अमेरिका आणि जगाला एक संदेश देऊ शकतो, ४४०; -चा शोषणाच्या ठिकाणी सेवाभावाची स्थापना करण्याचा संदेश, ४४०; अहिंसेचा प्रतीक, ४४१; शेतीला पूरक, ४४६; उपजीविकेचा साधन, ४४५; विशाल प्रमाणातील उत्पादनाच्या मार्गातून सार्वभौमीकरण नाही, ४४५; -आंदोलन, यंत्राला विस्थापित करण्याचा प्रयत्न. २५९; -चा शास्त्रीय अभ्यास आपल्याला समाजशास्त्राकडे घेऊन जाईल, ४४२; मंडळ, ७४
चाती, २५८
चिकित्सक, २५८
चीन, ४७२
चीनी, १६०
चैतन्य, रामकृष्ण, तुलसीदास, कबीर, नानक, दादू, तुकाराम, तिरुवल्लूवर आदी संत, ३९९
चेम्सफोर्ड ३५३
चैतन्य, २०९, ३५०, ४००
चोरी, २०९

जंगली तापज्वर, १५२
जवाहरलाल नेहरू, ३६१, ४४३
जनक, ६, १२६
जनरल बुलर, ३५३
जनरल स्मट्स, १३५, १९७, २३७
जपान, १७७, ४७२, ४८९, ४९०

जपानी, २३८, ४१७, ४८९
जमनालाल, २८५
जमीनदार, २३९, २७५, २८५, ४०९; -चे हृदयपरिवर्तन, २३९; -गरीब शेतक-याचे विश्वस्त बनले तर त्यांचे भविष्य उज्ज्वल, २८६
जमीनदारी, २४९, ४०९; -एक वाईटपण, २३९
जर्मनी, २६५, ३५६, ४७५
जातींमुळे निर्माण होणारे अडथळे, ११९
जाती, ९५, ११६
जाहिरात, ५१९
जीवन, सर्व कलांपेक्षा मोठे, ६१; आध्यात्मिक पूर्णता प्राप्तिकरिता मनसा, वाचा, कर्मणा पूर्ण संयम आवश्यक, २९७
जैन, ८५

झुंडशाही, ३७८-७९
झरतुष्ट, २४, १०१, १०६
झार, १७८
झुलू विद्रोह, ३५३, ४८२
झेक, १६०
झेकोस्लाव्हाकिया, ४९५

टिळा, ४२३
टिंबक्टू, २३३
टाइमन १९

डरबन, २६४
डायर, २००
डार्विन, २५६
डिक शेफर्ड, ४५५
डी व्हॅलेरा १५२
डेलागोआ, ३५९
डॅनियल, २४, १७८

तर्क, २१६; -च्या मर्यादा, ६७-८
तलवारबाजी, १२९
तुकाराम, २२२
तुलसीदास, ४९, ८७, १९६, ३९९
त्याग, १०३, २२१, २५१; -सुखी जीवनाचे रहस्य, २१०

थर्मोपाईल, ४९३
थोरो, १४५, ३७७

दमयंती, ३१९
दयानंद, २०९, ५२६
दरिद्रनारायण, २१४-१५
दलित वर्ग, १५१
दारिद्र्य, १५३
दारू, दुर्गुणापेक्षा एक मोठा आजार, ५३६
दिल्ली, ३५३, ३९३
दिवाळखोरी, २३, १५८
दिवास्वप्ने, २७७, ४०७
दुर्भावना, ९८
देवत्वावर विश्वास, २७७
देहदमन, ३७
दैवी प्रेरणा, ३३
दैवी नियम, २०५, २१६; -प्रेमाचे कारण, ४४१
द्रौपदी, ३१९, ३२४
दांभिकता, ६४

धरणे, १९३
धूम्रपान, ५१५
धैर्य, ९५, १४९, १६५
ध्यान, ९६

नगरपालिका, ४३२
नयी तालीम, ४१४, ४१४-१६; -हस्तकौशल्याच्या शिक्षणाचे माध्यम, ४१५; शिल्प, कला, आरोग्य आणि शिक्षण यांचे संमिश्र रूप, ४१४; - पैशांवर अवलंबून नाही, ४१४; पूर्णपणे स्वावलंबी, ४१४; -शिक्षक आणि विद्यार्थ्यांना शिकत असताना आणि शिकवत असताना उत्पादन करावे लागेल, ४१५
नवी दिल्ली, २८१
नागरी लिपी, ४१८
नागरी विवाह, सुधारणेच्या स्वरूपात स्वागत, ३०६
नाझी शासन, ३५६
नाताळ, ३५३, ४८२
नानक, २४, २०९
नास्तिक, नास्तिकता, ५३, ५५
निरपेक्ष नैतिकता, ७०
निरस्त्रिकरण, ४९२-९५
निर्बीजीकरण, लादणे अमानवीय, ३१७; पुरुषाचे स्वेच्छेने व्हायला हरकत नाही, ३१७; कायद्याने करणे अमानुष, ३१७
निरो, ३५०
निर्भयता, ६३, ३३६; -आध्यात्मिकतेची पहिली अट, ६५; कशी मिळवता येऊ शकते, ६५;
निर्वाण, ९५, १०४; रामराज्याशी तुलना, ३५७
निष्क्रिय प्रतिकार, १५९, १७१-२, १७८-९
निसर्गोपचार, ८८, ४२८
नीतिशास्त्र, ४६२
नेपोलियन, ३५५
नैतिक आधार, ११०; -प्रगती, ११०; -शक्ती, १६८;
नैतिक संहिता, ४३, १६१
नैतिकता, ५१८; -ख-या मार्गावर अवलंबून, ५१८
नैतिकता, सापेक्ष, ७०
न्यायिक अधिनिर्णय, २३२
न्यूटन, २८, १२१
'न्यू टेस्टॅमेंट', ७४, १५९
न्यूनगंड, पूर्वेचा, ४५६

पंच, २४३
पंचायत, पंचायती, २४३, २७६, ३७१; -चा आवाज परमेश्वराचा आवाज, ३७१; -चे कार्य, ४१०-११; -ची स्थिती, ४१०; -राज, ४०९-१०
पत्नी, पुरुषाची सहकारी आणि मदतनीस, ३०५
पत्रकारिता, ४३; -चे एकमेव ध्येय सेवा, ५१८
पश्चात्ताप, ८४
पश्चिमेचा अहंगंड, ४५६ -ची संस्कृती, ३६७; -चे समाजवादी, २७०; -कडून शोषण, ३४५
पांजरपोळ, ४२५

पांडव, ४८७, ५०८
पाकिस्तान, ३५७, ३६२, ३६३, ३६४, ३९३, ४३८, ४७३; -ची मागणी इस्लामविरोधी, ३६२
पारशी, २७१, ४१०, ४३६
पाश्चात्त्य, -चिकित्सापद्धती काळ्या जादूप्रमाणे, ४३०; - संस्कृती, ४७०; -समाजवाद, २६९
'पिलग्रीम्स् प्रोग्रेस', ३३६
पोर्तुगीज, ३५८; -सरकार ३५९
पोर्तुगीज वस्त्या, ३५८, ३५९
पोलीस दल, १७२-७४
पोषाख, ५२१
पैगंबर, १९६
प्रतिकार, १७८
प्रह्लाद, १९६, ३३२
प्रीतम, ६३
प्रार्थना, २३, ३७, ९०-९९
प्रेरणा, २०
प्रॉटेस्टंट, ११४
प्लायमाऊथ ब्रदर्स, १००
पोलंडवासी, १६०

फाशी, १५१-५२
फाळणी, मुसलमानांना हवी असेल तर बळजबरीने अडवता येऊ शकत नाही, ३६२
फिडियस, ६१
फ्रान्स, १६५, २६५, ३६१
फ्रेंच भारत, ३६१
फ्रेंच लोक, ३६१
फॅसिझम, -शासन, ३५६, ३८१

बंगाली, ४१९
बदला, १२९
बनिया, ३५५
बॅनरमन, हेन्री कॅम्पबेल, ८२
बादशाह खान, १२७
बायबल ७१, ७३, १००, १०२, १९६, २६५
बुद्ध, १०३, २५६; -भगवान, ४५७
बोअर युद्ध, ८२, ३५३, ४८२
बोस, जगदीश चंद्र, ४१७, ४४८
बोस, सुभाष, १६४
ब्राह्मण, ११५, ११७; -वाद, ११८
ब्रिटिश, -आरमार, १६९; -नीती, ९; - वायुसेना, १६९; -शासन, ३६१; - सरकार, ३५३, ३५७, ३८२
बोन्डारि़फ, टी. एफ., २१६
बोल्शेव्हिक, २६८; -आदर्श, २७८-७९
बॅबिलोनिया, २६५
ब्रह्मचर्य, २९७, २९९; -चा अर्थ आहे मन, वाणी, आणि कर्म यांच्यावर नियंत्रण, २९७; -चा चा संपूर्ण अर्थ आहे ब्रह्माचा शोध, २९८; -मनावरील नियंत्रणाशिवाय अपूर्ण, २९९; -एक मानसिक अवस्था, ३००; -चे चतुर्दिक नियंत्रण वैज्ञानिक आहे व त्याचे यश शक्य आहे, ३०१; -च्या प्रभावामुळे गांधीजी स्त्रीला आई समजू शकले, ३०२
ब्रह्मचारी, ३००, ३०२
ब्रह्मा, २२१, २९८

भंगी, २२०, ४३२
'भगवद्‌गीता', ९, ६३, ७६, १०२
भांडवल, १४५, २२४, २२५, २८१,

३७०; -स्वतः वाईट गोष्ट नाही, २२५; -दार, २३८, २४९; -शाही, २२४, २८२
भांडवलदार, २८३
भाकरीकरिता शारीरिक श्रम, २१६, २२२; पाहा शारीरिक श्रम
भारत, १८, २३, २६, २८, २९, १६८, ३५३, ३५८, ३६३, ३६४, ३६५; -पाकिस्तान आणि भारतातील समस्या आपसातील चर्चेने सोडवण्यात याव्या, ३६४; -धार्मिक प्रभुत्वाकरिता योग्य, ३६४; भित्र्यांचा देश नाही, ३६५; स्वतंत्र आणि जागृत भारताजवळ विश्वाकरिता संदेश, ३६६; -अनेक संस्कृतिंचा संगम असलेला देश, ३६८; -माता, ३१९; -विद्यार्थी, ३५४; -चे दुर्बलिकरण, ४१८
भारतीय भाषा, ३३७
भारतीय मानवता, ४७७
भारतीय राष्ट्रवाद, एक नवीन मार्ग, ४७५
भारतीय संस्कृती, ४६९; -संस्कृतीत सर्वांचा संगम आणि मूलतः प्राच्य, ४७०
भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, ३८२–८७, पाहा, अखिल भारतीय काँग्रेस समिती, काँग्रेस भाषा, -न्यायालयांची भाषा प्रांतांची भाषा असावी, ४१७
भाषावार प्रांत, ४१८-२०; -पुनर्रचना राजकीय, ४२०
भिक्षावृत्ती, २१२, २१३
भीती, ५२, ६४, ६५
भूकंप, बिहारमधील, ८४
भ्याडपणा की हिंसा, १५४-५७
भ्याडपणा/भित्रेपणा, ६५, १२८-३०, १५२, १५४, १६३, १६७

मंचुरिया, ४९५
मंत्री, कर्तव्यपालनात भीडमूर्वत नसावी, ३८८; हितरक्षणाकरिता मंत्रिपद बनवण्यात येऊ नये, ३८९
मंत्र, २१२
मंदिर, ९३, ११२-१५
मक्का, १९६
मदिना, १९६
मद्रास, ३३६, पाहा चन्नै
मद्यनिषेध, ३८१, ५३७
मनोनिग्रह, संपूर्ण मानवतेकरिता, २८९
मराठी, ४२१
मशीद, ११३, ११४
महामानव, १४४
महात्मा, १०; -पदवी, १०
महाभारत, ८७, ४८७; -माणसाचा चिरंतन इतिहास, ४८७
महावीर, २४
मॅक्समुल्लर, ४९०
मॅमन, १०५
मातृभाषा, माणसाच्या बौद्धिक विकासाकरिता स्वाभाविक, ४१८
मानव, -जीवन, तडजोडींनी भरलेले, ४२; -स्वभाव, ३९२
मानवता, ६, १२, १७, ६९, ८०, ९५

मानवीकरण, १७४
मानसिक, -प्रशिक्षण, ६५; -शांती, ९२, ९४
म्यांमार, १६९, ४७२
माफेकिंग डे, ८२
माया, ५३, ८०
मिल्टन, ४१९
मीराबाई, १९६
मुंबई, १९४, ३३०, ३३६
मुसलमान, ४२५, ३६२, ३६३; -मोठ्या संख्येत धर्म परिवर्तन करून झाले आहेत, ३६२
मुसोलिनी, ४९५
मुस्लीम लीग, ३६२
मूर्तिपूजा, ६८, ११२-१५, ५१६
मूलभूत सत्य, २०
मोझांबिक, ३५९
मोझेस, ४९१
मोक्ष, ६, १३, ५८
मौन, ९६; -चे सामर्थ्य, ९६
मृत्यू, ५३१-३३; -जीवनातील केवळ एक परिवर्तन, ५३१; -आणि जीवन एकाच गोष्टीची टप्पे, ५३१; दोन्हींशीही प्रेम केले पाहिजे, ५३२; पीडेपासून मुक्ती, ५३३
मृत्यूकर, ५३३

यंत्र, २५७, २५८, २५९, २६७, २६१, २६२, २६३, २६४
यहुदी, २७१
यज्ञ, २५०, २५१
यांत्रिकीकरण, २५८; -श्रमिकांची उणीव असेल तर उचित, २५८-५९
युक्लिड, १३१, १४२, २७७, ४०६
युद्ध, १५८, १६०, १६५; -चा पर्याय, १६५; -जंगलाचा नियम, १८५
युधिष्ठिर, सत्यवादी, २६४
युनियन जॅक, ५१६
युरोप, ३१, १५९, १७५, २६५, ४९२, ४९३
येशू ख्रिस्त, २४, ६०, ७९, १०५, १४४, १७८, १७९, १९६, २०२, २०९, ४९७; निष्क्रिय प्रतिकार करणांरांच्या गळ्यातील ताईत, १९६;
योजना, २६८, वास्तव योजना भारताच्या संपूर्ण मानवशक्तिच्या इष्टतम उपयोगाकरिता त्याच्या कच्च्या मालाच्या वितरणात आहे, २६८

रमजान, १२७
रशिया, १७८, २६५, २७९; -चे सोव्हिएट शासन, ३५६
रस्किन, ५, २२६, २६४, ५३५
राजकारण, १०, १३, १०९-१२; -माणसाच्या अस्तित्वाचा भाग, ३३८; धर्मच्युत-निरर्थक, ३३८; -चा अर्थ ब्रिटनच्या हाऊस ऑफ कॉमन्सची नक्कल नाही, ३५६
राज्य, २६३, २६७
राम, ५२, ३५६, ३५७, ४९१; -आणि रहीम एकच आहेत, ३५६
रामकृष्ण, २०९
रामनाम, ८६-९०, ८९, ४३३; -मध्ये

रोग नाहीसे करण्याचे सामर्थ्य, ८८-८९;
रामराज्य, ३५६-५७; -चा अर्थ ईश्वरी साम्राज्य, ३५६; प्रचंड विषमता असलेल्या राष्ट्रांमध्ये शक्य नाही, ३५७; -मध्ये राजा आणि रंक यांचे अधिकार सारखे, ३५६
रामानुज, ८५
रामायण, तुलसीदासकृत, ८७
रामायण, वाल्मिकी, ८७
राय, प्रफुल्लचंद्र, ४४८
रावण, ७९, ८१
राष्ट्रभक्ती, राष्ट्रप्रेम, २३१; -शिकवते की व्यक्तिने कुटुंबाकरिता मेले पाहिजे, ४७४; -मानवतेत असते तीच, ४७५; -मध्ये मानवजातिचे कल्याण समाविष्ट, ४७६
राष्ट्रवाद, ३५२, ४७५; -भारतीय, ४७५; -वाईट नाही, ४७५
राष्ट्रीयत्व, १११
राष्ट्रीयीकरण, प्रमुख उद्योगांचे, २७४
रॉबिन्सन क्रुसो, ४७९
रिडली, १७८
रेडक्रॉस, संघटना, ४८६
रेडियम, १३२
रेल्वे, उच्च संस्कृतीचे प्रतीक नाही, २५३
रोम, २६५
रोमन कॅथॉलिक चर्च, ३६१

लंका, १७०, ३६८, ४७२
लॅंकेशायर, २६२
लॅटिमर, १७८
लिओनल कर्टिस, ३९६
लेनीन, १५२, २७९
लैंगिक जीवनाचे नियमन, ३
लैंगिकविज्ञान, ३२७; -शिक्षण, ३२७-२८
लोकमत, ३७५
लोकशाही, २८०, ३६८-३८१, ३६९, ३७०; -करिता हृदयपरिवर्तन आवश्यक, ३६८
लोकसंख्या, ८८; -कृत्रिम उपायांनी नियंत्रित करणे धोकादायक ३११-१७
लोक सेवक संघ, ३८५
लोहारकाम, २१९
वकील, २१८, २२०, २२३
वर्गसंघर्ष, २२९
वर्ण, ११७
वर्णव्यवस्था, ११६, ११७
वर्णाश्रम धर्म, ११७
वस्तुविनिमय, २६१
वॅलेस, २५६
वाईटपण, २७, ५१; -ची उत्पत्ती, ८०, ८१
वाद्य, मशिदीसमोर, ४३७
वायुसेना, १७०
वाशिंग्टन, १५२
वासना, रसनेंद्रियांच्या नियंत्रणाने यांचे नियंत्रण सोपे, ३३४
वास्तवातील अनेकत्व, ८५
विकेंद्रीकरण, १४८, २६१
बिभिषण, १९६
विवाह, पतिपत्नीकरिता अनुशासन, २९७; -कामवासनेकरिता करण्यात आलेला व्यभिचार, ३०४; -चा खरा अर्थ दोन व्यक्तिंमध्ये घनिष्ट मैत्री आणि सहवासाचा विकास, ३०५; वैवाहिक जीवन अनुशासनाचे जीवन, ३०५

विवेकवाद, विवेकवादी, ६८

विश्वस्तता, २८२-२८८

विश्वस्त, २८७

विदेशी आक्रमण, १६९

विदेशी वस्त्या, ३५८

विद्यार्थी, संन्यास्यासारखे जीवन असावे, ४१६

विनम्रता, ४, ७, १७, ७३, ९३

वेश्यावृत्ती, ३३०-३९

विश्वविद्यालय, प्रांतीय, ४२१-२१

वेद, ७३, ८५

वेदांत, ८०

वेलिंग्टन, २८

वैद्य, ४२८, ५१४

वैधव्य, स्वेच्छेचे, ३२६

वैश्य, ११५, ११८

वृत्तपत्र, लोकांचे बायबल, कुराण, झेन्द अवेस्ता आणि भगवद्‌गीता, ५२०; -तथ्य काय आहे हे समजून घेण्याकरिता वाचली पाहिजे, ५२०; वाचकांना केवळ तथ्य सांगावे, ५२०

व्यवसाय, ११७

व्यायाम, ४१३; -चा अर्थ मुलांचा आणि प्रौढांचा सर्वांगीण विकास, ४१३; -तेच जे व्यायाम ४१३, स्वावलंबी बनवते, ४१३; हस्तोद्योगाच्या माध्यमातून, ४१५; -स्त्रियांचे पुरुषांपेक्षा वेगळे नाही, ४१६; विश्वविद्यालयीन, ४१६; चे माध्यम, ४१७-१८ आध्यात्मिक प्रशिक्षण अर्थात अंतःकरणाला शिकवणे, ४१३

वृक्षपूजा, ११३

शंकर, २०९, ५२६

शांतता, ४९६

शांततावाद, खरा शांततावादी खरा सत्याग्रह, ५००; शांततावाद्यांना सर्मन ऑफ द माऊंटप्रमाणे जीवन जगावे लागेल, ५००; युद्धाशी काहीही संबंध नाही, ५००

शाकाहारवाद, ५२६; -हिंदू धर्माची अमूल्य देणगी, ५२६

शास्त्र, ३२४

शिक्षण, ४११, ४१२, ४१४, ४१५; -बौद्धिक विकासाचा योग्य मार्ग इंद्रियांना प्रशिक्षण, ४१३

शीख, ३४८, ३६३, ४१०, ५०८

शूद्र, २९२

शुश्रुषा पथक, ३५३

शेक्सपिअर, ४१९

शेतकरी, २३९, ३९४-९५

शोषण, २९; हिंसेचे रूप, ४०३, ३४५

श्रद्धा ४, ६७-७५, ९०, ९१, ९४, १२१, ३३८; -अंतःकरणात वसलेल्या ईश्वराची जिवंत जाणीव आहे, ६७; द्वंद्व, ४६

श्रद्धा, चिकित्सा, ८९

श्रम, श्रमिक, २२३, २२४ आणि भांडवल यांच्यात सामंजस्य २२४, आपले अधिकार कळावे २२५; चे कर्तव्य आणि अधिकार २२५; ची शक्ती २२६; भारतीय पद्धतीवर संघटना असावी, २२८; भांडवल आहे २२८; - शारीरिक, मताधिकाराची पहिली

अट असावी, २२०
श्रीनगर, ३५७
श्रीमंत, -आपल्या संपत्तीचे विश्वस्त बनावे, २१७; श्रीमंतांना वर्गयुद्ध अथवा स्वेच्छेने आपल्या संपत्तीचे विश्वस्त बनणे यातून निवड करावी लागेल, २८६
श्वेत माणसाचे ओझे, ४८१

षड्यंत्र, कट १५१
संगीत, ६०
संघसरकार, १६४, ३५८; -ने काश्मीरमध्ये सैन्य पाठवणे उचित, ३५८
संततिनियमन, ३०८, ३०९, ३१३
संन्यास, संन्यासी, ३
संप, २३०, २३१, २३२, २३३, २३४, २३५, २३६, २३७; -आणि राजकारण, २३०, -अहिंसक, २३३; -आणि भांडवलशाही, २३४
संपत्ती, २०६
संरक्षण आणि आक्रमक, १५७; -चे उदात्तीकरण, १७२
संस्कृती, ९, २०५, २०६, २५३, २५४; -आधुनिक, २५४; औद्योगिक- एक विकृती, २५५; -आधुनिकतेचे पाशवी स्वरूप, २५; पाश्चात्त्य, २५७
संस्कृती, प्राच्य, ४७०
संयुक्त राष्ट्र संघ, ३५८, ४८२
सत्य, १, २, ७, १९, २०, २७, ४४-५०, ४४; ४७, ५०, ७४, १६८
सत्याग्रह, १७८-२०३, १९१, १९२; -चे स्वरूप, १८१-८२; -चे उद्दिष्ट पीडेद्वारा सत्य सिद्ध करणे आहे, १८४; - विकसनशील विज्ञान, १८२; -च्या यशाच्या अटी, १९२; सशस्त्र प्रतिकारापेक्षा उत्तम, १९२; -चा दिव्य संदेश, १७८-७९; -चे तंत्र, १८३-८४
सत्याग्रही, १८०, १८४, १८५, १८६, १८७, १९०
सत्वपरीक्षा, २०, ३४
समतोल आहार, ८८, ४२९
समाजसुधारणा, राजकीय सुधारणांपेक्षा कठीण, ५३८
समाज, वर्गविहीन, २८०; -सत्य आणि अहिंसेवर आधारित असला पाहिजे, २७७
समाजवाद, २७०, २७१
समाजवादी व्यवस्था, २७५; -समाज, २७४; -सिद्धान्त, २८३
समाजसेवा, २१७
समान नागरिकत्व, ४३६
समान व्यवहार, संपूर्ण मानवतेबरोबर, ४५६
समान वितरण, २९३, २९४; -चा अर्थ आहे सर्वांना आपल्या मूलभूत गरजांची साधने, २९४
समुराई, २३८
सरकार, रोजगार देणे कर्तव्य, २२३; -सुशासन स्वशासनाची जागा घेऊ शकत नाही, ३४९
सविनय कायदेभंग, १४९, १७९, १८०; -करिता आवश्यक पूर्व अटी, १८०; पाहा, असहकार
‘सर्मन ऑफ द माऊंट’, ७३, १०२, २५६

सर्वहारा, २७६
सर्वोदय, ५, २४४, २८०
सशस्त्र उठाव, १५०
सहभोजन, ११७, ११८
सहिष्णुता, परस्परातील, ७२, १००, १२३; सहिष्णुता, परस्परातील, १३९; -एकाच संप्रदायाच्या अनुयायांतही असावी, ४८६
सांप्रदायिक दंगली, १७३; -ऐक्य, ३८९; - सद्‌भाव, ४३३-३८
साधन आणि साध्य, १४३, २४८
साप, ४६६
सामाजिक न्याय, शक्तिच्या बळावर शक्य नाही, २७०
सामाजिक व्यवस्था, ११८; - गांधीजींच्या धारणेनुसार चरखा व त्याच्याशी जुळलेल्या सर्व गोष्टीवर अवलंबून, २७५
साम्यवाद, २६९, २७८, २७९; -पौर्वात्य संस्थांच्या अध्ययनाद्वारे खरा विकास शक्य, २६९
साम्यवादी, २८०, २८४
साम्राज्यवाद, १२३
सार्वजनिक संस्था, कायम निधीने चालवायला नको, ५४२
सार्वजनिक सेवा, सीझरच्या पत्नीप्रमाणे संशयातीत असले पाहिजे, ५४२
सावित्री, ३१९
साहित्य, ३३८
साक्षरता आणि विद्वत्ता यांमुळे माणूस माणूस बनत नाही, ४१२
सीझर, २२३
सीता, ३१९, ३२४, ३२९; -पत्नीचा आदर्श, ३०६
सुतारकाम, २१९
सेवा, ५, १३, १५, १७, २६, ५५
सैनिकी, -हुकुमशाही, १६९; -करण, १७०, १७६
सैन्य, १६९
सौंदर्य, सत्यात समाविष्ट, ६१, ६२
सॉक्रेटीस, ६१, १७८
स्टीफेन्सन, २५७
स्थितप्रज्ञ, ३०१
स्पार्टन, ३५८
स्पेन, ४९५
स्पॅनिश, १६०
स्मृती, ३२४
स्वच्छता, ४०८, ५४३
स्वदेशी, -पूर्ण, ४०२
स्वराज्य, -पूर्ण, ३४१
स्वर्गाचे साम्राज्य, ११०, १३६
स्वशासन, सरकारी शासनापासून मुक्त होण्याचा अविरत प्रयत्न, ३४६
स्वातंत्र्य, १५३, १५४; -व्यक्तिगत, ३४५; -चा अर्थ आहे रामराज्य, ३५६;
स्वातंत्र्य, व्यक्तिगत, समाजात जीवनाकरिता आवश्यक, ४७९
स्वानुकंपा, १३१
स्वित्झर्लंड, ४९३

हजरत मोहम्मद, २४, ४३५, ४९१
हनुमान, ८५
हरिजन, ४१९
हातकताई, भारताच्या आर्थिक आणि नैतिक